UNIVERSAL
LIBRARY
OU_176571
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M491.3|D79M Accession No. M4410

Author दाते, यशवंत रामकृष्ण - संपा. Vol.:

Title महाराष्ट्र सारस्वत (वे-ज्ञ) 1938

This book should be returned on or before the date last marked below.

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग सातवा

वे – ज्ञ

कोशमंडळांतील व बाहेरील अनेक साहाय्यकांच्या मदतीनें तयार केलेला.

प्रकाशक—महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड, पुणें; तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर यशवंत रामकृष्ण दाते, ४८१ शनिवार, पुणें २.

मुद्रक—यशवंत रामकृष्ण दाते, महाराष्ट्र कोशमंडळाचा शारदा प्रेस, ४८१ शनिवार, पुणें २.

किंमत १० रुपये

इ. सन १९३८] पुणें [शा. शक १८६०

संपादकमंडळ

श्री. यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्एल्. बी. (प्रमुख)

श्री. चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.

श्री. आवा चांदोरकर,

श्री. चिंतामण शंकर दातार.

प्रमुख शाखा–साहाय्यक संस्था

विदर्भसाहित्यसंघ (वऱ्हाडी बोली); गोमंतसाहित्यकमंडळ (गोमंतकी);
वाङ्मयचर्चामंडळ (कर्नाटकी बेळगांव); शारदोपासकमंडळ (कोंकणी.
मालवण); महाराष्ट्र शब्दकोशमंडळ (कुडाळी. पेडणें), पुणें
भाषाशास्त्रमंडळ (व्युत्पत्ति); शारदाश्रम (महानुभावी.
यवतमाळ) हेटकरी भंडारीमंडळ (दादर);
साहित्यसेवामंडळ (कऱ्हाड). इ. इ.

संपादकीय निवेदन

तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।
करूनि घेयावें हें तुमतें । विनवितु असें ॥ –ज्ञानेश्वर १.८०.

या सातव्या विभागानें संकल्पित **महाराष्ट्र शब्दकोशाची** परिसमाप्ति होत आहे, त्याचा आम्हांस आनंद होत आहे. दहा वर्षांपूर्वी महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें काम संपवून आम्हीं या शब्दकोश रचनेला जें वाहून घेतलें तें जनतेच्या सहानुभूतीच्या बळावरच. ती थोर सहानुभूति आणि अढळ विश्वास आम्हांस फार उपयोगी पडला व हें अवघड कार्य एकदाचें फार पडलें. प्रतिकूल परिस्थितीच्या भोंवऱ्यांत सांपडून लवकर डोकें वर काढतां न येतें तर मात्र आमच्याविषयीं 'आरंभशूराः' असा साहजिक प्रवाद पडता व डॉ. केतकर यांनीं दिलेली शिकवण कच्ची ठरती. पण सुदैवानें आतां डॉ. केतकर यांच्या कर्तृत्वाविषयीं असणाऱ्या लौकिकांत आम्हांस कांहीं भर टाकतां आली व त्यांचें ऋणहि थोडेंबहुत फेडतां आलें, याचा आम्हांस अभिमान वाटतो.

शब्दकोशरचनेचा सविस्तर इतिहास पुढें प्रस्तावनेंत दिलाच आहे. त्यावरून आमच्या कार्याची आणि प्रगतीची दिशा कळून येईल. झालें यापेक्षां अधिक चांगलें कार्य व्हावयास पाहिजे होतें असें आम्हांसहि पदोपदीं वाटतें. महाराष्ट्राच्या विद्यमान परिस्थितींत सर्वांगपरिपूर्ण शब्दकोश करणें कसें अशक्य आहे, हें पाहिल्या विभागाच्या प्रस्तावनेंत दिग्दर्शित केलेंच आहे. झालें हेंच विशेष, असें मानण्यासारखी आजची स्थिति आहे हें कोणीहि सुज्ञ व्यावहारिक विद्वानास पटेल. असो.

ज्यांचें ज्यांचें या कामांत लहानमोठें साहाय्य झालें त्यांचा त्यांचा गौरवपर नामनिर्देश प्रस्तावनेंत केला आहे. चुकून कोणाच्या नांवाचा अगर मदतीचा उल्लेख राहिला असेल तर त्यांनीं उदार मनानें आम्हांस क्षमा करावी. दीर्घकाल चाललेल्या एवढ्या मोठ्या कामाशीं संबंध आलेल्या सर्वच व्यक्तींचा किंवा गोष्टींचा आठव रहातो असें नाहीं, तेव्हां ज्यांचे आभार प्रस्तावनेंत मानावयाचे राहिले असतील त्यांचे या ठिकाणीं मोठ्या कृतज्ञतेनें मानीत आहोंत.

कोशांत अनेक कारणांमुळें ज्या चुका राहून गेल्या आहेत त्यांच्या दुरुस्त्या व पुरवणी शब्दसंग्रह देण्याचा विचार तूर्त रहित करावा लागत आहे, याचें फार वाईट वाटतें. अगोदर कोशाचे दोन भाग वाढले म्हणून कांहीं ग्राहक आमच्यावर नाखुष आहेत. त्याप्रमाणेंच आतांच घाईनें पुरवणी काढण्यापेक्षां कांहीं काल थांबून गळलेले शब्द वगैरे जमविण्यास कांहीं अवधि जाऊं देऊन पुरवणी काढल्यास ती अधिक उपयुक्त होईल असें वाटतें व तशी ती आज जरी नाहीं तरी पुढें लवकरच काढूं. तोंपावेतों कोशांत आढळणाऱ्या उणीवा व चुका आम्हांस दाखवून ठेवाव्यात अशी सर्वांना आग्रहाची विनंति करतों.

ज्ञानकोशाप्रमाणेंच याहि कोशाचें संपादन-प्रकाशन सार्वजनिक मदतीवर झालेलें आहें. हीच अखंड मदत आम्हांस सर्वांत महत्त्वाची वाटते. आपल्या महाराष्ट्र जनतेला अशा व्यापक राष्ट्रसंवर्धक कार्याची महती पटलेली आहे याची आमच्या-सारख्यांना नेहमीं प्रचीति येते. यापुढें आम्ही घेऊं त्या कामांत आम्हांस अखिल महाराष्ट्राचा पाठिंबा राहील असा विश्वास वाटतो.

शेवटीं, ज्यांना हा महाराष्ट्र शब्दकोश अर्पण केला आहे, त्या महाराष्ट्रभाषाभिमानी महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांना कोश पुरा झालेला पाहून फार समाधान होईल याबद्दल आम्हांस धन्यता वाटते. परमेश्वरानें महाराज साहेबांस दीर्घायुरारोग्य देऊन त्यांच्याकडून अधिकाधिक वाङ्मयाभिवृद्धि करवावी अशी त्यास प्रार्थना आहे.

आतां अखेरीस ज्या जगनियंत्या परमेश्वरी शक्तीनें आमच्या हातून हें लेणें आपल्या महाराष्ट्र मायेच्या अंगावर चढ-विलें व या दहा वर्षांच्या अवधींत संपादकवर्गास कार्यक्षम व एकत्र ठेवलें व सहकार्याचें उदाहरण घालून दिलें त्या सर्वश्रेष्ठ शक्तीस वंदन करून मराठी भाषेच्या जाज्वल्य अभिमानी व तिच्या गौरवास कारण झालेल्या परमपूज्य अशा महाराष्ट्रीय संत व कविवर्य ज्ञानेश्वरांच्या शब्दांत हें निवेदन पूर्ण करतों.

जें मज तुम्हां आड । होतें भेदाचें कवाड । तें फेडोनि केलें गोड । सेवासुख ॥ –ज्ञा १८.१५७४,

यशवंत रामकृष्ण दाते.

प्रस्तावना

हनुमानेव विजानाति भमं सागरलंघने ।
तथैव ग्रंथकर्तैव ग्रन्थकर्तुः परिश्रमम् ॥ –रामचंद्र–मनुस्मृति टीका.

विषय प्रवेश:—मराठीमध्यें शब्दकोशरचनेचे जे प्रयत्न आजपर्यंत झाले त्यांची सविस्तर माहिती शब्दकोशाच्या पहिल्या विभागाच्या प्रस्तावनेंत दिलीच आहे.

त्यानंतर या शब्दकोशाच्या रचनेचा प्रथम कल्पनेपासून पूर्ण होईपर्यंतचा इतिहास येथें देण्याचें योजिलें आहे. हेतु हा कीं या कोशरचनेच्या कार्याची प्रथम कल्पना कशी आली, तिला मूर्त स्वरूप येण्याच्या मार्गांत कोणकोणती परिस्थिति उत्पन्न झाली व प्रत्यक्ष कार्यारंभापासून अखेरीपर्यंत कोणकोणत्या घटना व क्रिया घडत गेल्या याचें थोडक्यांत टांचण करून ठेवल्यास अशा कार्यामध्यें पडणाऱ्या आगामी कार्यकर्त्यांस त्याच्या वाचनापासून कार्य पद्धतीचा बोध व्हावा, त्यांतील अडचणींची कल्पना यावी, न्यूनत्वाचा बोध व्हावा, वैगुण्यांची जाणीव व्हावी व पुढील प्रयत्नामध्यें मागील अनुभवाचा फायदा मिळावा व शक्य तीं वैगुण्यें त्यांचीं कारणें लक्ष्यांत घेऊन दूर करण्यांत यावीं. असो.

प्रथम कल्पना:—शब्दकोशाची कल्पना माझ्या मनांत प्रथम इंदूरच्या संमेलनाची हकीगत वाचतांनाच आली. १९१७ मध्यें इंदूर येथें जें साहित्यसंमेलन भरलें त्यावेळीं तेथें मराठीमध्यें एक सर्वांगीण शब्दकोश असावा ही कल्पना प्रामुख्यानें मांडली गेली असें वृत्तपत्रांतून मीं वाचलें. १९१६ सालीं एल्एल्. बी.च्या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर कोठील सनद काढावी वगैरे विचार करीत असतां महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें कार्य नुकतेंच सुरू झालेलें होतें त्यांत प्रथम फुरसुदीच्या दिवसांत कांहींतरी कार्य करावें म्हणून काम करण्यास मी नुकताच आरंभ केला होता. त्यावेळीं प्रत्यक्ष वाङ्मयक्षेत्रांत असें मीं प्रथमच पाऊल टाकलें होतें तेव्हां प्रत्यक्ष संमेलनास हजर राहण्याइतकी उत्सुकतेची तीव्रता उत्पन्न झाली नव्हती. त्याचवेळीं महाराष्ट्रीय वाङ्मयसूचीचें कार्य निकडीनें व शक्य तितक्या थोडक्या वेळांत करावयाचें ठरलें होतें व त्या सूचीचें संपादनाचें काम मजकडेच देण्यांत आल्यामुळें तशी सवड अशी मुळींच नव्हती, परंतु ज्ञानकोशाप्रमाणेंच शब्दकोशाचेंहि कार्य हें एक अत्यंत महत्त्वाचें असून मराठी भाषेंत तें होणें अवश्य आहे अशी मनामध्यें एक प्रकारची निश्चित वृत्ति उत्पन्न झाली होती किंबहुना आधीं ज्ञानकोश कीं आधीं शब्दकोश अशा प्रकारची चर्चाहि त्यावेळीं आमच्या संपादक मित्रमंडळींत चालत असे. इंदूर येथें अशा तऱ्हेचा शब्दकोश तयार करावयाची निश्चित कल्पना झाल्याचें ऐकण्यांत आलें.

त्यासंबंधानें इंदूर येथें भरलेल्या नवव्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या इतिवृत्तांत पृष्ठ दोनवर पुढें दिल्याप्रमाणें मजकूर आढळतो.

" साहित्यसंमेलन आतांपर्यंत आठ वेळां ठिकठिकाणीं भरलें पण प्रत्यक्ष व चिरस्थायी असें महत्त्वाचें कार्य त्याच्या हातून म्हणण्यासारखें कांहींच झालें नाहीं असा आक्षेप वारंवार घेण्यांत येत असतो. या अपवादाला जागा ठेवूं नये व कांहींतरी प्रत्यक्ष कार्याची योजना यंदाचे संमेलनांत सर्वांच्या विचारानें तयार होऊन शक्य तितक्या त्वरनें अंमलांत यावी म्हणून या गोष्टीसंबंधानें चर्चा करण्यासाठीं रा. वासुदेव गोविंद आपटे यांनीं ठिकठिकाणच्या प्रमुख साहित्यसेवकांस पत्रें लिहून संमेलनाचे आदले दिवशीं म्हणजे ता. ८ मार्च रोजीं हजर राहण्याविषयीं त्यांस विनंती केली होती. त्याप्रमाणें सुमारें पाऊणशें गृहस्थांची खासगी सभा रा. ब. सरदार किबे यांचे बंगल्यांत ता. ८ मार्च रोजीं तिसरे प्रहरीं भरली होती. रा. आपटे यांनीं प्रत्यक्ष कार्य करण्यासंबंधाची आपली योजना मंडळीपुढें मांडली व तिच्या छापील प्रती मंडळींत वांटल्या. ही योजना परिशिष्टांत दिली आहे. (प्रस्तुत अहवालास परिशिष्ट नाहीं !). या योजनेंत अग्रस्थान मराठी भाषेचा कोश तयार करण्याच्या कामास दिलें होतें हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें इतर सर्व गोष्टी बाजूला ठेवून कोशाची रचना या एकाच विषयावर जवळ जवळ तीन तास चर्चा करण्यांत आली. आणि शेवटीं–१ रा. हरि नारायण आपटे, पुणें (अध्यक्ष). २ रा. गणेश सदाशिव भाटे, मुंबई. ३ रा. जनार्दन विनायक ओक, पुणें. ४ रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले,

पुणें. ५ रा. विनायक कृष्ण मुळ्ये, इंदूर. ६ प्रो. परशुराम नारायण पाटणकर, देवास–या गृहस्थांची कमिटी कोशाच्या योजनेला व्यवस्थित स्वरूप देण्यासाठीं नेमण्यांत आल्यावर रात्रीं ८ वाजतां सभा बरखास्त झाली. "

या कमिटीनें पुढें काय कार्य केलें याबद्दल कोठें वाचनांत आलें नाहीं.

पुढें १९२१ मध्यें बडोदें येथें जें दहावें महाराष्ट्र साहित्य-संमेलन भरलें त्यास ज्ञानकोशमंडळाचा प्रतिनिधि म्हणूनच मला पाठविण्यांत आलें होतें. त्यावेळीं रा. वासुदेव गोविंद आपटे हे प्रवासांत आमचे बरोबरच होते तेव्हां प्रवासामध्यें व नंतर प्रतिनिधि-वसतिगृहांत शब्दकोशाबद्दल मागील संमेलनांत काय झालें व तें कार्य कसें करतां येईल यासंबंधीं वारंवार चर्चा चाले व त्यावेळीं इंदूर संमेलनांत या कार्याकरितां दहा हजार रुपये मिळाल्याबद्दल मधून मधून उल्लेख येत तेव्हां दहा हजार रुपये मिळतील तर आम्ही तेव्हांच शब्दकोश तयार करून दाखवूं असें मी सहज म्हणालों; परंतु तें कार्य तावडतोब हातीं घेण्याची खरोखर त्यावेळीं माझी किंवा आमच्या मंडळीचीहि तयारी नव्हती; कारण ज्ञानकोशाचे फक्त दोन भागच प्रसिद्ध झाले होते व तेहि प्रस्तावनाखंडाचे, खऱ्या ज्ञानकोशाचा अद्यापि आरंभ व्हावयाचाच होता व त्याची प्रचंड जबाबदारी डोक्यावर असतां दुसरें कार्य अंगावर घेण्याची गोष्टसुद्धां काढणें शक्य नव्हतें. तथापि शब्दकोश व्हावा ही जनतेची इच्छा कायम होती व तसा एक ठराव बडोदें येथील साहित्यसंमेलनांत मान्यहि झाला होता तो ठराव असा:–

म रा ठी श ब्द को शा सं बं धी:—" मराठी भाषेचा विस्तार महत्त्व व तिजमधील शब्दभांडार लक्षांत घेतां, विशेषतः तिच्या वाढत्या अध्ययनाचीं व प्रगतीचीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलेलीं आहेत. अशावेळीं मूलरूपें, शब्दसिद्धि, समानार्थक शब्द, योजनादर्शक अवतरणें वगैरे सर्व अंग–उपांगांनीं पूर्ण असा व्यापक व विस्तृत मराठी शब्दांचा कोश अत्यंत अवश्य असून मराठी साहित्य परिषद, इतर साहित्यसभा व महाराष्ट्रांतले लोक यांच्या सहकारितेनें किंवा व्यक्तिस्फूर्तीनें ही उणीव लवकरच भरून निघेल अशी या सभेस आशा वाटत आहे. "

प्रस्तुत ठराव इतका महत्त्वाचा व निकडीचा होता कीं या कोशाच्या आवश्यकतेसंबंधीं विवेचन करण्याची मुळींच जरूर न भासल्यामुळें व यासंबंधीं सर्वांचें ऐकमत्य असल्यामुळें हा ठराव अध्यक्षांकडूनच मांडण्यांत आला.

त्यानंतरहि ही कल्पना माझ्या मनांत घोळत राहिलीच होती तिला पुन्हां चालना पुणें येथील साहित्य संमेलनांत मिळाली. त्यापूर्वी केसरीमध्यें महाराष्ट्रीय ज्ञानकोश पुरा झाल्यावर ज्ञानकोशाच्या संपादकवर्गानें जें पुढील कार्य अंगावर घ्यावयाचें त्याबद्दल सुचना म्हणून २३ नोव्हेंबर १९२६ च्या 'केसरी' पत्रांत एक पत्र प्रसिद्ध झालें होतें तें पुढें दिलें आहे.

ज्ञानकोशमंडळास व महाराष्ट्रास विनंति

" ज्ञानकोश मंडळानें अंगीकारलेल्या ज्ञानकोशाचें काम आतां थोडयाच दिवसांत पुरें होणार आहे. मंडळानें हें जें काम शिरावर घेतलें होतें तें किती जिकीरीचें, खर्चाचें व अडचणीचें होतें त्याची तसल्याच कामांत जे कोणी पडले असतील त्यांनाच कल्पना येईल. असल्या कामाची सांगता करण्यास नाना प्रकारचे किती कष्ट पडतात व निरनिराळ्या आपत्तींना कसें तोंड द्यावें लागतें आणि वेडया–वांकडया व खांचखळग्यांच्या चाकोरींतून मोठ्या कुशलतेनें गाडी नेऊन ठरलेलें ठिकाण कसें गाठावें लागतें हें सांगणें सोपें असलें तरी करणें बहुत कठीण आहे. परंतु असलें बिकट काम पूर्ण करून डॉ. श्री व्यं. केतकर हे आणखी एक महिन्यानें आरंभलेल्या या वाङ्मय–यज्ञांतून मोकळे होऊन अवभृत स्नान करणार आहेत.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ जरी अनृणी झालें तरी त्यानें एकदां जें ज्ञानमय यज्ञचक्र प्रवर्तित केलें तें कायमचें बंद करावें काय? असा एक प्रश्न मराठी भाषेच्या अभिमान्यांपुढें येत आहे. आमच्या मतें हें चक्र आणखी असेंच पुढें चालावें. तशी सोय या मंडळाच्या स्थापनेच्या नियमावलींत आहे. मंडळानें पहिल्या प्रथम ज्ञानकोश काढावा व मग इतर मराठी ग्रंथ काढावेत आणि तेणेंकरून मराठी वाङ्मयांत भर घालावी अशी ही सोय आहे. तिचा फायदा घेऊन या मंडळानें ज्ञानकोश संपल्यावर असल्या जातीचें दुसरें एखादें काम अंगावर घ्यावें असें आम्हांस वाटतें. असें केल्यानें आज अनेकवर्षे मंडळांत काम करून बहुश्रुत व जाणता बनलेला संपादकवर्ग फुटून पांगला न जातां ज्ञानकोश–कार्यालयांतच कायम राहूं शकेल. वाङ्मयाच्या कामीं असल्या वर्गाची किती आवश्यकता आहे हें स्पष्ट करण्याची जरूरी नाहीं. असलीं कामें अनेक प्रकारचीं सांगतां येण्यासारखीं आहेत; पण तूर्त आम्ही पुढील एक कार्य सुचवितों, तें म्हणजे मराठी भाषेचा " बृहत्कोश " काढणें. सध्यां असा मराठी कोश अस्तित्वांत नाहीं. श्री. वा. गो. आपटे यांचा " मराठी शब्दरत्नाकर " नांवाचा एक कोश आहे पण तो छोटया स्वरूपांत आहे. सर्वांगांनीं परिपूर्ण असा नाहीं, असें खुद्द कर्त्यानेंहि आपल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे (पृ. ११). यानें आपल्या कोशास तसल्या भावी सर्वांगसुंदर " कोशाचा कच्चा खर्डा " असें म्हटलें आहे. म्हणून खरोखरच असल्या एका कोशाची सांप्रत आवश्यकता आहे.

या कोशाचें स्वरूप थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मराठी भाषेतील (जुने आणि नवे) एकूण एक शब्द, त्यांचा मरा-

ठींतच सांगितलेला अर्थ यांचा संग्रह त्यांत असावा. असे प्रयत्न यापूर्वी कांहीं झाले आहेत; उदाहरणार्थ–

(१) मानभावी मराठी कोश, पंधराव्या शतकांतील दत्तराज महानुभाव–यानें करून ज्यास " टीप " असें नांव ठेविलें आहे तो.
(२) शास्त्र्यांच्या १८२९ तील कोश.
(३) गोडबोले यांचा १८६३ तील हंसकोश.
(४) मुळे यांचा १८६७ तील कोश.
(५) गोडबोले यांचा १८६७ तील नवीन कोश.
(६) याच सालांतील सुबह कोश.
(७) हंस यांचा रत्नकोश.
(८) बापट व पंडित यांचा शुद्धकोश.
(९) भारत इतिहास मंडळाचा फार्शी–मराठी कोश, इत्यादि

याखेरीज आणखीहि कांहीं कोश झालेले आहेत. पण या सर्व कोशांत अपूर्णता असून कांहीं कांहीं कोश तर विशिष्ट विषयापुरतेच तयार झालेले आहेत. शिवाय कांहीं कोश सुमारें १७० वर्षांपूर्वीचे जुने आहेत. अर्थात गेल्या शतकांत मराठी भाषेंत ज्या हजारों नवीन शब्दांचा भरणा झाला आहे त्यांचा समावेश त्यांत साहजिकच झालेला नाहीं. आज देशी व विदेशी अशा अनेक शास्त्रांचा व विषयांचा मराठी भाषेशीं संबंध आलेला आहे व येत आहे. यामुळें तदंतर्गत बनलेल्या नवीन मराठी शब्दांचें कायमचें समावेशन कोशांत होणें जरूर आहे. असे कांहीं फुटकळ प्रयत्न तूर्त झाले आहेत व होत आहेत. पण तेहि विशिष्ट विषयापुरते मर्यादितच आहेत. खेरीज या २५।३० वर्षांत मराठीचा अभ्यास विद्वान् लोक ज्यास्त आस्थेनें करूं लागले असून मुंबई, नागपूर या युनिव्हर्सिटयांनीं मराठी भाषेकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली आहे. पुढें–मागें महाराष्ट्र युनिव्हर्सिटी निघणार असें घाटत आहे. महाराष्ट्राशिवाय परप्रांतीय कांहीं युनिव्हर्सिटयांनीं आपल्या उच्च अभ्यासक्रमांत मराठीचा समावेश केला आहे. अशावेळीं मराठी भाषा शब्दरूपानें एकेजागीं विराजलेली दिसणें अत्यवश्य आहे. आजची मराठी भाषा शास्त्र्यांच्या कोशाच्या वेळच्या मराठी भाषेपेक्षां पुष्कळ पुढें गेली आहे. फार्शी किंवा आरबी शब्दांचा त्याकाळीं जितका भरणा मराठींत झाला होता तितका किंबहुना त्याच्यापेक्षां जास्त इंग्रजी व इतर कांहीं युरोपीय भाषा यांच्यांतील शब्दांची भरती आजच्या मराठींत झाली आहे. असल्या परकीय शब्दांचें मराठींतून उच्चाटण करण्याचें कांहीं प्रयत्न हल्लीं चालू आहेत, ते सफल होवोत किंवा निर्फळ होवोत त्याचा विचार करणें कोशकाराचें काम नाहीं. भाषेंत जे शब्द रूढ आहेत व ज्या शब्दांनीं वस्तुजात अथवा पदार्थमात्र जाणविला जातो तो प्रत्येक शब्द असल्या कोशांत समाविष्ट होऊन त्यांचें उपबृंहण झालें पाहिजे, मग तो स्वदेशी असो किंवा परदेशी असो. भाषेची वाढ व्हावयाची असल्यास व ती अनेक लोकांना (किंवा देशांना) समजावी अशी इच्छा असल्यास स्वभाषेंत आवश्यक अशा परकी शब्दांचें समावेशन होणें अपरिहार्य आहे. म्हणून अशा परकी व देशी सर्व शब्दांची कुळकथा व विस्तार असल्या कोशांत पाहिजे. मूळ शब्द, त्याचा धात्वर्थ, प्रसंग विशेषानें बनलेले त्याचे (आढळतील तेवढे) अर्थ, त्यांचें व्याकरणांतील स्वरूप, त्यांची जात, विशेष अर्थ जेथें होतात तेथले संदर्भ, त्यावरील संक्षिप्त टीपा (आणि वाटल्यास जे परके लोक मराठी भाषा शिकतात त्यांच्यासाठीं अगदीं मोजके इंग्रजी प्रतिशब्द) इत्यादि प्रकारची कोशाची रचना असावी. शब्दाबरोबर मराठी भाषेंत रूढ झालेल्या म्हणी व वाक्प्रचारहि कोशांत घ्यावेत. याखेरीज जितक्या अंगांनीं शब्दांचे स्वरूप जास्त स्पष्ट करतां येईल तितक्या अंगांचा त्यांत समावेश व्हावा. सारांश, वर सांगितल्याप्रमाणें आज मराठी भाषेंत जे एकूण एक शब्द आहेत त्यांचा अर्थ मराठी भाषेंत देणारा सर्वांग परिपूर्ण असा एक बृहत्कोश होणें जरूर आहे. तेव्हां आमची ज्ञानकोश मंडळास अशी अत्याग्रहाची सूचना आहे कीं, त्यानें असला मराठी कोश निर्माण करण्याचें काम यापुढें तात्काळ हातीं घ्यावें. एतद्विषयक व्यावहारिक ज्या कांहीं योजना करावयाच्या त्या ज्ञानकोश मंडळास सांगण्याची विशेष जरूर नाहीं. कारण त्याला याचा अनुभव आहे. ज्ञानकोश मंडळाप्रमाणें बृहन्महाराष्ट्रालाहि आमची विनंति आहे कीं, त्यानें हें कोशाचें काम मंडळानें हातीं घेण्याबद्दल सक्रीय सहानुभूती दाखवावी आणि सर्वतोपरी मदत करून हें मंडळानें आरंभलेलें यज्ञचक्र पुढें चालू ठेवण्याचें श्रेय पदरांत घ्यावें.

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाची उभारणी कंपनी तत्वावर म्हणजे व्यापारी दृष्टीनें करण्यांत आली होती. परंतु अशीं कामें स्वार्थत्यागाच्याच बळावर अखेर निश्चितेतेनें आणि यशस्वितेनें परतीर गांठतात असें आम्हास वाटतें. तरी इकडे लक्ष ठेवून आणि व्यवहार दृष्टीचाहि यथाप्रमाण अंगिकार करून कोशकार मंडळींनीं नूतन उपक्रम करावा अशी आमची सूचना आहे. "

खंडेराव चिंतामण मेहेंदळे. दत्तो वामन पोतदार. सदाशिव महादेव दिवेकर. दत्तात्रेय विष्णु आपटे.

या पत्रास प्रेरणा कोठून मिळाली होती हें चाणाक्ष महाराष्ट्रीयांनीं तेव्हांच ओळखलें होतें.

त्यानंतर पुणें येथें भरलेल्या बाराव्या साहित्यसंमेलनांत पुढें दिल्याप्रमाणें एक ठराव स्वीकृत करण्यांत आला.

'मराठी भाषेचा एक सर्वांगीण बृहत्कोश व्हावा असें या सभेचें मत आहे व हें काम ज्ञानकोशांतील संपादक मंडळानें हातीं घ्यावें अशी या सभेची शिफारस आहे आणि महाराष्ट्र साहित्यपरिषदेनें या कार्यास सर्व प्रकारें साहाय्यक व्हावें.' प्रस्तुत ठराव श्री. ना. गो. चापेकर यांनीं मांडला होता व श्री. वा. म. जोशी यांनीं त्यास अनुमोदन दिलें होतें. (–अहवाल पृ. २५).

याच वेळीं महाराष्ट्र साहित्य परिषदेची जी सभा संमेलन प्रसंगींच पुणें येथें भरली होती त्या सभेंत शब्दकोशाची योजना तयार करण्याकरितां एका ठरावानें एक समिति नेमण्यांत आली होती व खर्चाकरितां १०० रुपये मंजूर करण्यांत आले होते. या समितींत श्री. श्री. कृ. कोल्हटकर व कांहीं पुणें व मुंबई येथील गृहस्थांची नांवें घालण्यांत आलीं होतीं व रा. य. रा. दाते यांस या समितीचे चिटणीस नेमण्यांत आलें होतें. या समितीची एक सभा जुलै १९२७ मध्ये मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयांत बोलावण्यांत आली होती परंतु त्या सभेस चिटणीसाशिवाय कोणीच उपस्थित झालें नाहीं.

पुढें अशा कोशाची एक योजना मीं स्वतःच तयार करून ग्वाल्हेरला भरणाऱ्या परिषदेच्या सभेपुढें मांडावयाचें ठरविलें व ती छापून घेऊन त्याच्या प्रती समितीच्या सभासदांकडे पाठविल्या व त्यांची अनुमति मागविली. त्या योजनेस रा. श्री. कृ. कोल्हटकर यांची अनुमति आली होती बाकी कोणाकडून उत्तर आलें नाहीं. सदर योजना पत्रक नं. २ म्हणून प्रसिद्ध करण्यांत आली होती ती अशी.

महाराष्ट्र शब्दकोश-स्वरूपयोजना.

हा शब्दकोश कां व कसा काढावयाचा याची सामान्य रूपरेखा आम्ही पहिल्या पत्रकांत दिली आहे (हें पत्रक पुढें दिलें आहे); येथें कोशाच्या स्वरूपासंबंधीं योजना देतों.

का यै क्षे त्र—आतांपर्यंत जे कोश प्रसिद्ध झाले आहेत त्यांत साधारण अभिजात मराठी म्हणून जिला म्हणतां येईल अशा (उ. पुणें-सातारा प्रांतांत बोलल्या जाणाऱ्या) मराठीचाच भरणा केला गेला आहे. क्वचित् एखाद्या कोशांत तुरळक तुरळक कोंकणी भाषेंतील शब्द आले आहेत पण ते फार कमी आहेत. कोंकणी सोडल्यास इतर प्रांतिक मराठी भाषांचा शब्दसंग्रह असल्या कोशांत आढळत नाहीं. आम्ही आमच्या या कोशांत ही पहिली सुधारणा करणार आहों, म्हणजे खास पुणेरी भाषा तर यांत येईलच, परंतु तिच्याबरोबर सातारी ऊर्फ माणदेशी, वायदेशी (वांई), कोल्हापुरी, नगरी, खानदेशी, अहिराणी, बालेघाटी, वऱ्हाडी, गंगथडी (मराठीचा मूळ प्रांत अथवा तिचें माहेर ही गंगथडीच होय), वैतुली, नागपुरी यांचा समावेश होईल. तसेंच कर्नाटकाच्या सीमेवर असलेल्या विजापूर, धारवाड, बेळगांव, दक्षिण महाराष्ट्रांतील कांहीं संस्थानें, निजामाच्या संस्थानांतील कांहीं जिल्हे इकडील कानडी–मराठीचा अंतर्भाव करण्यांत येईल. शहाजीराजे भोंसले यांनीं कर्नाटकांत आपलें ठाणें बेंगरूळपासून थेट तंजावरपर्यंत बसवून मराठीचा प्रसार तिकडे केला होता. हें मराठीचें वर्चस्व परवां परवांपर्यंत म्हैसुर व मद्रास येथील दफ्तरांत चालू होतें. त्यामुळें त्या प्रांतांत सरकारी कामकाजांत जी मराठी शिल्लक राहिली होती ती हुडकून तिलाहि कोशांत समाविष्ट होण्याचा मान देण्यांत येईल. यानंतर वसई ते रत्नागिरीपर्यंतची कोंकणी, गोव्यांतील गोमांतकी, तिच्या शेजारची कारवारी या समुदकिनाऱ्यावरील भाषा आम्ही घेऊं. मराठ्यांनीं आपलीं संस्थानें जेथें जेथें स्थापिलीं तेथें तेथें मराठी भाषा नेली होती, ती अद्यापि बऱ्याच संस्थानांतून जिवंत आहे. अशा संस्थानांपैकीं बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, धार, देवास हीं संस्थानें मोठीं आहेत. या संस्थानांत मराठी चालू आहे. मात्र कांहीं ठिकाणीं तिनें नेमाडी, हिंदी, रांगडी, गुजराथी, काठेवाडी अशा निरनिराळ्या ओढण्या किंवा बुरखे आपल्या अंगावर घेतले. परंतु त्या बुरख्यांतून तिचें मूळचें महाराष्ट्रीय स्वरूप स्पष्ट दिसून येतें. अर्थात् या भाषांचा अनादर करणें म्हणजे मराठीचाच अनादर केल्यासारखें होणार म्हणून याहि भाषां (किंवा प्रांतिक भाषां)तील शब्द आमच्या कामापुरते आम्ही घेऊं. काशी हें प्राचीन विद्यापीठ आहे व तेथें प्राचीन कालापासून महाराष्ट्रीय पंडितांची परंपरा कायम आहे म्हणून काशी व तिच्या आसपासच्या क्षेत्रांतील मराठीचाहि सन्मान आम्ही करूं. एकंदरींत सांप्रतच्या हिंदुस्थानांत मराठी भाषा ज्या ज्या प्रांतांत बोलली जात असेल त्या त्या ठिकाणच्या बोलींतील शब्दसंग्रह जमवून तो कोशांत समाविष्ट करण्याचा व त्या ठिकाणीं त्याचें प्रांतिक नांव देण्याचा आम्ही यावच्छक्य प्रयत्न करावयास चुकणार नाहीं.

व्या क र ण व व्यु त्प त्ति—असा शब्दसंग्रह तयार झाल्यावर त्याची व्याकरणविषयक वर्गवारी देण्यांत येईल; म्हणजे त्या त्या शब्दाचें स्थान व्याकरणांत काय आहे हें सांगण्यांत येईल.

भाषाशास्त्राचा एक डोळा व्याकरण तर दुसरा व्युत्पत्ति हा असल्यानें शब्दांची व्युत्पत्ति लावण्यांत येईल. अर्थभेदानें ही निरुक्ती निरनिराळी होण्याचा संभव असतो; अशा ठिकाणीं तें अर्थभेद व व्युत्पत्ती सांगण्यांत येतील.

अ र्थ नि श्चि ति—यानंतर शब्दांचे वेगवेगळे अर्थ द्यावयाचे, अर्थात् ते अर्थ वेगवेगळे कसे बनले त्याची तत्तदर्शक उदाहरणें द्यावीं लागतील; म्हणजे त्यांचे आधार किंवा संदर्भ द्यावे लागतील. ते क्वचित् एखाद्या वाक्यखंडांत तर क्वचित् सबंध वाक्यांतहि आढळणार. त्यामुळें तीं वाक्यखंडे किंवा वाक्यें उध्दृत करावीं लागणार. याप्रमाणें शब्दाच्या नांवापासून त्याच्या अर्थापर्यंत त्यांच्या वरील होणाऱ्या संस्काराचें वर्णन येथपर्यंत केलें. आतां कोशाच्या दुसऱ्या अंगांकडे वळतों.

श ब्द सं शो ध न—आपल्या मराठी भाषेच्या जन्माबद्दल पंडितांमध्यें वाद चालू आहे. कांहींच्या मतें तिचा जन्म शक १००० च्या सुमाराचा आहे (कै. डॉ. गुणे वगैरे मंडळी) तर कांहींच्या मतें शक ६०० मध्यें ती जन्मास आली (कै. वि. का. राजवाडे वगैरे मंडळी). या वादांत आम्हांस पडावयाचें नाहीं व कोणत्याहि एका पक्षाचा आग्रह आम्हांस धरावयाचा नाहीं. तर प्रत्यक्ष प्रमाणांनीं मराठीचा उद्गम मागें किती जातो, हें पाहावयाचें आहे; तें पुढीलप्रमाणें:—

पुष्कळ काळपर्यंत अशी समजूत होती कीं, विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी हेच काय ते मराठींतील आद्य गद्यग्रंथ होत. पण ही समजूत अलीकडील १५–२० वर्षांत पालटली आहे. कै. वि. का. राजवाडे यांनीं महानुभावांच्या वाङ्मयाचा शोध लावून तें उजेडांत आणण्याचा पहिला मान पटकावून असें सिद्ध केलें कीं, मुकुंदराजाच्याहि थोडेसें मागें मराठीचें नागर स्वरूप दृष्टीस पडतें. या महानुभावी वाङ्मयानें मराठी भाषेचा नानाविध विलास दृष्टिगोचर होऊं लागला आहे. गद्य, पद्य, कोश, व्याकरण, प्रवासवर्णन वगैरे मराठीचीं अनेक अंगें आपल्यास दिसूं लागलीं आहेत. महानुभावांच्या या प्राचीन ग्रंथांत देवगिरीजवळची–यादव राजवटींतील–खरीखुरी मराठी आढळते. तिला म्लेंच्छस्पर्श बिलकूल झालेला नाहीं; असें हें "देशीकार लेणें" आहे. या पंथांतील महौद्रव्यास, महादंबा, भास्करव्यास, भावेदेवव्यास वगैरे आद्य कवी आणि कवयित्री असून त्यांनीं बाराव्या शतकाच्या शेवटच्या चरणांत ग्रंथनिष्पत्ति केली आहे (उदा. लीलाचरित्र, धवळे, शिशुपालवध, पूजावसर इत्यादि). शक १२७५ मधील एका ग्रंथांत तत्कालीन बऱ्हाडांतील कांहीं तीर्थयात्रांचें व क्षेत्रांचें वर्णन आहे. पंधराव्या शतकांत दत्तराज नांवाच्या एका महानुभावानें प्रसिद्ध महानुभावी ग्रंथांतील कठिण शब्दांचा एक कोश केला आहे; तो कोश तर आम्हांस अवश्य पाहावा लागेल. कदाचित् मराठी भाषेंतील हाच प्रथम कोश असावयाचा! या पंथाचा प्रसार पंजाब व पेशावरकडे झाला असल्यानें त्याच्या तत्प्रांतस्थ मठांतून मराठी भाषेंत लिहिल्या गेलेल्या पोथ्या वाचल्या जातात व तेथील मठपती मराठी बोलतातहि. तेव्हां या मराठी बोलणाऱ्या महानुभाव पंजाबी, काश्मिरी (काश्मिरांतहि या पंथाचे मठ आहेत) लोकांना म्हणजे त्यांच्या मराठी भाषेला सोडून कसें चालेल? त्यांच्या बरोबरच महानुभावांचे प्राचीन ग्रंथहि अवलोकन करून त्यांतील शब्दसंग्रह आमच्या कोशांत सांठविणें भाग आहे.

महानुभावांचा स्वतंत्र पंथ व त्यांचें स्वतंत्र वाङ्मय सोडून आपल्या मराठी संतकवींच्या वाङ्मयाकडे आपण पाहिल्यास मन दडपून जाईल, इतका तो वाङ्मयोदधि विस्तीर्ण आहे. मुकुंदराजापासून होनाजीबाळापर्यंतचे हे कवी घेतल्यास त्यांची संख्या सुमारें ७२३ पर्यंत म्हणजे ठोकळमानानें ७०० पर्यंत भरते (संतकविकाव्यसूचि पहा). या कवींची परंपरा शक १११० पासून शक १७४० पर्यंतची असल्यानें त्यांच्या ग्रंथांत ६५० वर्षांच्या मराठीचें स्वरूप आलेलें. या अर्धसहस्रकाच्या कालांत मराठीचें हें स्वरूप कसकसें बदलत गेलें, देवगिरीवर झळकणाऱ्या सुवर्णवराहांकित ध्वजापासून शनिवारवाड्यावर लागलेल्या युनियन जॅकच्या बावट्यापर्यंतचा काळ या मराठीनें कोणकोणतीं वळणें घेत पाहिला, यादवांचें स्वराज्य, मुसलमानांचें परराज्य, शिवाजीचें स्वराज्य व पुन्हां इंग्रजांचें परराज्य या कालखंडांत तिचा प्रकर्ष किंवा अपकर्ष कसकसा झाला, हें उमगून येतें. म्हणून या संतकवींच्या सर्व वाङ्मयाची ओळख करून घेणें जरूर आहे. पण हें काम अत्यंत अवघड असल्यानें त्यांतील प्रख्यात प्रख्यात व्यक्तींची प्रसिद्ध प्रसिद्ध कामगिरी तेवढीच पाहावयास परवडेल. ती कामगिरी तपासली म्हणजे मूळ मराठी, मुसुलमानस्पृष्ट मराठी, शिवाजीनें शुद्धिसंस्कार केलेली मराठी आणि इंग्रजीस्पृष्ट मराठी अशा मराठीच्या निरनिराळ्या परिवर्तनांचें आपल्यास ज्ञान होईल. या ७०० संतकवींत नर्मदेपासून रामेश्वरापर्यंतचे मराठींत काव्यरचना करणारे कवी येत असल्यानें वर आम्हीं सांगितल्याप्रमाणें मराठी भाषेतील निरनिराळ्या प्रांतिक भेदांचें स्वरूप आपोआपच पुढें येईल. या ६५० वर्षांचे पुढीलप्रमाणें कालखंड करणें शक्य आहे. १ मुकुंद–ज्ञानेश्वरकाल; २ चोभाकाल; ३ एकनाथकाल; ४ रामदासकाल; ५ निरंजनमाधवकाल; ६ मोरोपंतकाल; ७ होनाजीबाळा काल; या कालखंडांतील विवेकसिंधु (मुकुंदराज), ज्ञानेश्वरी (ज्ञानेश्वर), ज्ञानेश्वरसमकालीन गोरा, चोखा, नामा, जनाबाई वगैरे संतमंडळींचे अभंग, उषाहरण (चोभा), नाथभागवत, रुक्मिणीस्वयंवर (एकनाथ), गीतार्णव (दासोपंत), अपरोक्षानुभूति (शिवराम कल्याणीकर), अनुभूतिलेशटीका (वामनपंडित), महाभारत (मुक्तेश्वर), दासबोध (रामदास), अभंग (तुकाराम),

रामायण युद्धकांड (कृष्णदास मुद्गल), कथाकल्पतरू (कृष्ण याज्ञवल्ली), सीतास्वयंवर (वेणाबाई), समर्थप्रताप (गिरिधर), शिवलीलामृत (श्रीधर), गुरुचरित्र (सरस्वतिगंगाधर), भागवत (बहिरा जातवेद), पवनविजय (शेखमहंमद), दीपरत्नाकर (रत्नाकर), नित्यानंददीपिका (शिवकल्याण), आर्याभारत (मोरोपंत), ख्रिस्तपुराण (स्टेफेन), भक्तिविजय (महिपति), कटाव, पदें वगैरे (अमृतराय, रामजोशी, अनंतफंदी), लावण्या पवाडे (सगनभाऊ, होनाजी बाळा, परशराम, प्रभाकर, अगिनदास) इ. इ. ग्रंथसंपत्तीचें अवलोकन केलें म्हणजे बाकीच्या संतकवींच्या कार्याकडे विशेष लक्ष दिलें नाहीं तरी चालण्यासारखें आहे. तत्रापि त्यांचेंहि प्रसिद्ध झालेलें सर्व काव्यवाङ्मय एकदां डोळयांखालून घालावें लागेल. तदनंतर म्हणजे शक १७४० पासून आजमित्तीपर्यंतचें आधुनिक काव्यवाङ्मय पहावें लागेल हें ओघानेंच आलें. पाश्चात्य कल्पनांशीं घर्षण होऊन अलिकडील काव्यामध्यें कांहीं नवीन कल्पना शिरल्या असल्यानें नवीन शब्द रूढ होत आहेत तेव्हां त्यांचाहि परामर्ष घ्यावा लागेल. हें झालें पद्यवाङ्मयाबद्दल.

मराठींतील गद्यवाङ्मयाचा शोध महानुभावांतील जुन्या ग्रंथांपर्यंत जातो. त्यांत पद्याइतपतच गद्य वाङ्मयहि आहे व तें बाराव्या शतकापासूनचें आहे. तत्पूर्वी म्हणजे शक ९६१ च्या सुमारास सुप्रसिद्ध श्रीपति या ज्योतिर्विदानें मराठींत आपली रत्नमाला गुंफिलीहि आहे. तर तत्पूर्वी कांहीं मराठी शिलालेख किंवा ताम्रपटहि आढळतात. श्रवणबेळगोळ येथील गोमटाच्या पुतळयावर शक ९०५ च्या सुमाराचा एक मराठी शिलालेख आहे. चिकुर्डेचा ताम्रपट हा मराठींतील जुना ताम्र पट आहे. पाटणचा, पंढरपूरचा चौऱ्याशीचा, कर्णेश्वरचा वगैरे शिलालेख हे जुन्या मराठींत कोरलेले आहेत. नंतर बखरींचा काल येतो. यावेळीं मराठीला फारशीचा बराच स्पर्श झाला होता. बखरींचें स्वरूप मेस्तकें, कथावर्णनपर (बकासुराची वगैरे), चरित्रपर (शिवाजीच्या बखरी व पेशव्यांच्या बखरी), शासनशास्त्रीय (अमात्यांची व मल्हारिरामरावाची राजनीति), प्रवासवर्णनपर, कहाण्या इत्यादि विविध आहे; त्यामुळें हीं शिलालेखताम्रपत्रेबखरीआदिकरून साधनें पहावीं लागतील.

शास्त्रीय वाङ्मयावर मराठींत जुनें गद्य लिखाण बरेंच आहे नुसत्या वैद्यशास्त्रावर शेकडों बाडें आढळतात (यांत कांहीं बाडें गद्याप्रमाणें पद्यमयहि आहेत). ज्योतिष, शालीहोत्र, रसायन, स्थापत्य, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांवर मराठींत पूर्वी ग्रंथ निर्माण झाले आहेत. इंग्रजीनंतर या विषयांत भरच पडत गेली आहे; आणि त्याबरोबरच शास्त्रीय परिभाषा नवीन बनत आहे. अर्थात या जुन्या-नव्या परिभाषांचें संकलन आम्हांला देणें प्राप्त आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चरणांत आमच्याकडील विद्वानांचें लक्ष्य इंग्रजींतील शालोपयोगी अशा पुस्तकांकडे व नंतर इतर प्रसिद्ध पुस्तकांकडे वळून त्यांचीं भाषांतरें किंवा रूपांतरें करण्याकडे लागलें. या भाषांतरांत गद्य वाङ्मयाचीं बहुतेक अंगें आलीं आहेत. प्रथम हें काम मिशनऱ्यांनीं हातीं घेतलें आणि त्याला आमच्यांतील कांहीं शास्त्रीमंडळींनीं हातभार लाविला. तदनंतर इंग्रजी शिकलेल्या पहिल्या पिढीनें (कै. कृष्णशास्त्री चिपळुणकर) सरकारच्या सांगीवरून व स्वयंस्फूर्तीनें हा उद्योग पुढें चालविला. यापुढें धाकटे चिपळूणकरांनीं आपली प्रख्यात निबंधमाला काढिली व एक प्रकारें सामाजिक क्रांतीबरोबरच राजकीय क्रांतीसहि प्रारंभ केला; त्यानंतर इंग्रजी शिक्षणाची वाढ बरीच झाल्यानें व आपल्या मातृभाषेंत उत्तम उत्तम ग्रंथ तयार व्हावेत अशी इच्छा देशांत उत्पन्न झाल्यामुळें सर्व बाजूंनीं मराठीचा उत्कर्ष होईल असा प्रयत्न होऊं लागला; तो अजून चालूच आहे. अशा या काळांतील कोणकोणत्या ग्रंथांचा आधार आम्हीं कोशास घेऊं तें येथें सांगणें अशक्य आहे. फक्त एवढेंच सांगतां येईल कीं, २५।२५ वर्षांचे कालखंड पाडून त्या त्या काळांतील उत्तमोत्तम पुस्तकांची ओळख आम्हांस करून घ्यावी लागेल. अलीकडच्या १०।१२ वर्षांत गेल्या महायुद्धामुळें आमची बौद्धिक परिभाषा बरीच नवीन बनली आहे. तसेंच बंगभंगाच्या चळवळीपासून आजच्या सायमन कमिशनच्या काळापर्यंत निरनिराळया प्रकारची राजकीय परिस्थिति बनत गेल्यामुळें मराठींत अनेक राजशासनशास्त्रीय शब्द नवीन रूढ होत चालले आहेत. सारांश, या सर्व परिभाषांचा संग्रह आम्हाला करावा लागेल.

पूर्वप्रयत्न—आजपर्यंत लहानमोठे मराठी कोश अनेक झाले असून आम्हीं हा कोश पुन्हां काढण्याचा उद्योग कां चालविला अशी शंका येणें साहाजिक आहे; त्याचें समाधान पुढीलप्रमाणें--आजपर्यंतचे कोश अपुरे होते. आम्हीं आमच्या कोशांतील संग्रहाचें जें स्वरूप आतांपर्यंत वर्णन केलें, तशा स्वरूपाचा एकहि कोश आमच्या आढळांत नाहीं. मराठी भाषेंतील पहिला कोश दत्तराज महानुभावाचा होय; हा कोश केवळ महानुभावांतील प्रसिद्ध सात ग्रंथांतील कठीण शब्दांचा आहे, इतर महानुभावी वाङ्मयाचा किंवा तत्कालीन मराठी भाषेचा तो कोश नाहीं. हेमाडपंताचा एक संस्कृत-मराठी कोश होता असें कै. राजवाडे म्हणत; पण तो उपलब्ध नाहीं. त्याचप्रमाणें त्यांनीं सांगितलेल्या शक १२३९ पर्यंतच्या

काळांतील दोन (एक शुद्ध मराठी व दुसरा संस्कृत-मराठी) कोशहि उपलब्ध नाहींत. राज्यव्यवहारकोश प्रसिद्ध आहे खरा पण तो फारशी-मराठी (किंवा अरबी-संस्कृत) आहे आणि तो केवळ राजशासनपरशब्दांचाच आहे, म्हणजे अपुराच आहे. इ. स. १८१० मधील कॅरेचा व १८२४ तील केनेडीचा हे कोश सांप्रत दुर्मिळ असून दुसरा तर मराठी-इंग्रजी आहे. शास्त्र्यांचा म्हणून प्रसिद्ध असलेला कोश हल्लीं दुर्मिळ असून त्यांतहि तत्कालीन सर्व मराठी शब्दसंग्रह आलेला नाहीं. मोल्स्वर्थ व कँडीचा कोश मराठी-इंग्रजी आहे व तोहि आतां दुर्मिळ आहे. माधव चंद्रोबाचा शब्दरत्नाकर कोश संस्कृत-मराठी आहे. गोडबोले यांचा मराठी भाषेचा नवीन कोश हा मराठी-मराठी आहे खरा पण तो अत्यंत लहान आहे. हंसकोशांत बहुतेक मराठी पद्यग्रंथांतील शब्दांचा-व तोहि थोडासा-च भरणा आहे. बाबा पदमनजीचा कोश अपुरा असून सांप्रत दुर्मिळ आहे. याशिवाय कांहीं किरकोळ कोश आहेत पण एक तर ते छोटे छोटे असुन त्यांतील कांहीं एखाद्या विषयापुरतेच आहेत. अशी स्थिति आहे म्हणून सांप्रत आम्हीं हें काम हातीं घेतलें आहे. आज मराठी भाषेंत जेवढे शब्द आहेत त्या सर्वांचा मराठींतील वाक्प्रचार, म्हणी वगैरे निरनिराळ्या अंगांसह या कोशांत समावेश व्हावा अशी आमची इच्छा आहे व हेंच आमच्या कोशाच्या स्वरूपाचें थोडक्यांत वर्णन आहे. आजच्या अंदाजानें मराठींत सांप्रत पाऊण लक्षाइतके शब्द असावेत; अर्थात त्या सर्वांचा संग्रह करावा लागेल.

का र्य वि भा ग—यासाठीं निरनिराळे विभाग पुढीलप्रमाणें पाडले आहेत.

१ शिलालेखवाङ्मयः-यांत प्रसिद्ध अप्रसिद्ध सर्व प्रकारचे मराठी शिलालेख येतील; तसेंच ताम्रपत्रवाङ्मयहि येईल.

२ महानुभावी वाङ्मयः-हें वाङ्मय फारच महत्त्वाचें आहे. यापैकीं प्रसिद्ध असें थोडें आहे, यासाठीं अप्रसिद्ध मूळ ग्रंथ पाहावे लागतील.

३ मुकुंद व ज्ञानेश्वर वाङ्मयः-यांत मुकुंदराज, ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरकालीन आणि तेथपासून एकनाथापर्यंतचे इतर संतकवी यांचें वाङ्मय येईल. विशेषतः यांत ओंवीवाङ्मय येईल. उ. विवेकसिंधु, ज्ञानेश्वरी, इत्यादि.

४ एकनाथ-मुक्तेश्वर वाङ्मयः-वरीलप्रमाणें, एकनाथापासुन मुक्तेश्वर, वामन, समर्थपंचायतन यांचें ओंवीवाङ्मय. उ. एकनाथी भागवत, मुक्तेश्वरीभारत, अपरोक्षानुभूति इ.

५ रामदासीवाङ्मयः-हें स्वतंत्रच आहे. यांत ओंवी, व इतर श्लोक, पदें अभंग, वगैरे सर्व प्रकारचें काव्य येईल. श्रीसमर्थ व त्यांचा संप्रदाय यांचें सर्व वाङ्मय यांत येणार उ. दासबोध, समर्थप्रताप, सीतास्वयंवर वगैरे.

६ अभंग व स्फुट वाङ्मयः-यांत नामदेव, नामदेवकालीन इतर संत, ज्ञानेश्वरादिबंधु, एकनाथ, तुकाराम, निळोबा, व सर्व संतकवी यांचे अभंग आणि इतर श्लोक, कटाव, पद्यें वगैरे वाङ्मय यांत येईल. उ. गाथापंचक, काव्येतिहाससंग्रहांतील पदसंग्रहांचे भाग, इतर अभंगांच्या गाथा इ.

७ आर्यावाङ्मयः-यांत विशेषेंकरून मोरोपंत व यांच्या धर्तीवर ज्यांनीं आर्या रचिल्या त्यांचा समावेश होईल. उ. मोरोपंताचें आर्याभारत, रामायणें, मोरोपंती इतर प्रकरणें, वगैरे.

८ जुनें शाहिरीः-यांत आंग्लाई पूर्वकालीन शाहीर, कीर्तनकार, गोंधळी वगैरेंचे पवाडे, लावण्या, गारूड, कटाव वगैरे सर्व प्रकारचें वाङ्मय येईल. उ. शाळिग्रामांनीं प्रसिद्ध केलेले पोवाडे, रामजोशी, प्रभाकर, होनाजी बाळा, परशराम, इत्यादिकांचे लावण्या व पोवाडे, अमृतराय, अनंतफंदी यांचे कटाव.

९ ऐतिहासिकः-यांत ऐतिहासिक कागदपत्रें, बखरी, प्रशस्त्या यांचा समावेश होईल. राजवाडे यांचे खंड, खरे यांचे लेखसंग्रह, काव्येतिहाससंग्रहांतील बखरी, इतिहाससंग्रह, प्रभात, भारतवर्ष वगैरे मासिकांतील ऐतिहासिक मजकूर इत्यादि लेखसंग्रह येईल. तसेंच भारतइतिहाससंशोधकमंडळानें प्रसिद्ध केलेलें वाङ्मय.

१० निबंधमालाकालीन गद्यः-यांत सदाशिव काशिनाथ छत्रे यांजपासुन विष्णुशास्त्र्यांच्या निबंधमालेपर्यंत मराठींत जीं जीं उत्कृष्ट गद्य पुस्तकें झालीं त्यांचा समावेश होईल. यांत कादंबऱ्या, निबंध इत्यादि पुस्तकें येतील.

११ आधुनिक काव्यः-यांत केशवसुतापासून आज मित्तीपर्यंतच्या आधुनिक कवींचें काव्यवाङ्मय व त्यावरील चर्चात्मक वाङ्मय यांचा अंतर्भाव केला जाईल. यांत पहिल्या पिढींतील-केशवसुत, लेभे, आगाशे, भिडे, चंद्रशेखर, विनायक, आपटे इत्यादि मंडळी येतील. आणि दुसऱ्या पिढींतील-गोविंदाग्रज रविकिरणमंडळ, तिवारी, टेकाडे, इत्याहि मंडळी येतील.

१२ मराठी नाट्यः-यांत पूर्वीचीं लळितें, जुनीं नाटकें आणि हल्लींचीं नाटकें आणि त्यांवरील वाङ्मयांना स्थान दिलें आहे.

१३ शास्त्रीयः-यांत जुनें व नवें दोन्ही प्रकारचें वाङ्मय येईल. जुनी शास्त्रीय परिभाषा (निरनिराळ्या शास्त्रांतील) व हल्लींची परिभाषा यांचा समावेश यांत करावयाचा आहे. सांप्रत अशी सर्वमान्य परिभाषा रूढ झाली नाहीं. एकाच शास्त्रावर निरनिराळ्या विद्वानांनीं निरनिराळ्या परिभाषा उपयोगांत आणल्या

आहेत. त्यासाठीं त्यांच्याऐवजीं सर्वसामान्य अशी परिभाषा सर्व विद्वानांच्या मदतीनें तयार करण्यांत येईल.

१४ परीक्षणात्मक उर्फ टीकात्मक:–यांत टीकाशास्त्रानुरोधानें जें वाङ्मय सांप्रत तयार होत आहे त्याचा संग्रह केला जाईल. निरनिराळ्या विषयांवर मराठींत जीं पुस्तकें हल्लीं तयार होत आहेत त्यांचें समालोचन करण्यासाठीं ज्या टीका प्रसिद्ध होत असतात त्यांनां यांत वाव मिळेल.

१५ निबंधात्मक:–निरनिराळ्या विषयांवरील निबंधांचा हा एक निराळा वर्ग पाडण्यांत येईल. हें निबंध इंग्रजी सुरू झाल्यापासून आजपर्यंतचे असतील.

१६ वर्तमानपत्रीय उर्फ नियतकालिक:–मराठींत वर्तमानपत्रें निर्माण झाल्यावर, समाजांत ज्या निरनिराळ्या प्रकारच्या खळबळी उत्पन्न झाल्या त्यांचा फायदा घेऊन वर्तमानपत्रकर्ते यांनीं बरेच नवीन शब्द बनविले आहेत, त्यांचा संग्रह करावा लागेल. उदा० नोकरशाही, खासदार, आमदार, बहिष्कार, वगैरे.

१७ लौकिक प्रांतिक भाषा:–यांत गोवें, कारवार, बागलाण, नेमाड, खानदेश, वऱ्हाड, वगैरे प्रांतांतील निरनिराळ्या लौकिक पोट भाषांचा समावेश होईल. शब्दाबरोबर वाक्प्रचार व म्हणी हीं येतील.

१८ कारुवाङ्मय:–सोनार, सुतार, लोहार, कृषि, वाणिज्य, इत्यादि धंद्यांतील विशिष्ट शब्दहि येतील.

याप्रमाणें आम्हीं आमच्या कोशांत येणाऱ्या शब्दसंग्रहाचे १८ ठोकळ भाग पाडले आहेत. या विभागणीनें संग्रहाचें कार्य लवकर होईल; म्हणजे सर्व मराठी वाङ्मय या १८ विभागांत वांटून त्याची संपादकीय व्यवस्था निरनिराळी करतां येईल. तसेंच आमच्याशीं सहकार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांनाहि ही विभागणी सोईची पडेल, म्हणजे यांतील जो विभाग ज्याच्या आवडीचा असेल त्यानें तो निवडून त्यांतील शक्य तो शब्दसंग्रह जमा करून आमच्याकडे तो पाठवूं शकेल. हे १८ विभाग आम्हीं कायमचेच केले आहेत असें नाहीं, याहून जास्त कोणी सुचविल्यास किंवा या १८ ची संख्या कमी करावी असें म्हटल्यास आमची ना नाहीं, मात्र हे विषय (व याहून जास्त असल्यास तेहि) त्या संख्येंत आले म्हणजे झालें.

किं म त—एकंदर कोश कमींत कमी डबलक्राऊन आकाराच्या अष्टपत्री सांच्याचीं २५०० पृष्ठें तरी होईल असें वाटतें. आज किंमतींचें मान ठोकळमानानें आगाऊ दर १०० पृष्ठांमागें १ रु. असें धरलें आहे. याहूनहि पृष्ठें जास्त वाढण्याचा संभव आहे; त्या वाढीचाहि हिशेब याच आकारानें होईल.

म द ती ची अ पे क्षा—या कामासाठीं महाराष्ट्रांतील व बृहन्महाराष्ट्रांतील निरनिराळ्या वाङ्मयीन संस्थांचें व विद्वान मंडळींचें साहाय्य आम्हांस घ्यावें लागेल आणि त्याप्रमाणें त्यांनीं तें द्यावें अशी आमची त्यांना विनति आहे. आमच्या माहितीप्रमाणें व्यक्तिश: असल्या विद्वानांना आणि संस्थांना आम्हीं विनंतीपत्रें पाठवीत आहोंतच, पण नजरचुकीनें कोणी राहिल्यास त्यांनां ही जाहीर विनंति करून मदतीची अपेक्षा करीत आहों.

आतांपर्यंत पुढील संस्थांनीं व व्यक्तींनीं आम्हांस सहाय्य करण्याचें आश्वासन दिलें आहे. बोधमाला कार्यालय (फलटण), मराठी ग्रंथसंग्रहालय (ठाणें), रा. नी. वि. दळवी (मडगांव–गोवें), रा. विठ्ठलराव सुखटणकर (गोवें), विदर्भसाहित्यसंघ (अमरावती), वाङ्मयविहारमंडळ (नाशिक), महाराष्ट्र शारदाश्रम (यवतमाळ), रा. शं. वा. गोडशे (सं. प्रकाश सातारा).

आम्हाला संस्थांची व विद्वानांची जी मदत पाहिजे आहे तिचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहे. आपापल्या आवडीच्या विषयांवरील शब्दसंग्रह जमा करून तो आम्हांला पुरविणें. उदा० ज्यांना शास्त्रीय परिभाषेची आवड असेल त्यांनीं किंवा ज्यांना कारागीर लोकांच्या शब्दांची ओळख असेल त्यांनीं त्यांचें टिपण करून आमच्याकडे धाडावें. महानुभावी, रामदासी, वारकरी, लिंगायत इत्यादि वाङ्मयांतील, ऐतिहासिक वाङ्मयांतील, धर्मशास्त्र स्थापत्य, संगीत, रसायन, ज्योतिष वगैरे शास्त्रांतील, राजकारणशास्त्रांतील याप्रमाणें निरनिराळ्या वाङ्मयीन विषयांची ज्यांना आवड आहे, त्यांनीं या आपल्या विषयांतील शब्दांची माहिती आम्हांला द्यावी अशी विनंति आहे.

ही योजना ग्वाल्हेर येथें भरलेल्या साहित्यपरिषदेच्या बैठकीस सादर करण्यांत आली होती.

परंतु सदर कार्याकरितां मंजूर केलेली शंभर रुपयाच्या रकमेची आम्ही परिषदेकडे मागणीहि केली नाहीं व ती आम्हांस मिळालीहि नाहीं.

ज्ञानकोशानंतर—महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचा एकविसावा भाग १९२६ मध्येंच छापून निघाला होता व तेविसावा भाग छापण्याचें व बाविसावा सूचीविभाग तयार करण्याचें काम चाललें होतें.

ज्ञानकोश पूर्ण झाल्यावर कोणतीं कामें मंडळानें घ्यावीं याबद्दल संपादकवर्गांत मधूनमधून चर्चा होत असे व जमलेली कार्यकर्ती मंडळी एकत्र राहून कांहींतरी कार्य सुसूत्रतेनें चालू रहावें व ज्ञानकोशमंडळामार्फतच मराठी भाषेंत अधिक भरीव, महत्त्वपूर्ण व अभिजात ग्रंथांची भर पडावी अशी बहुतेक सर्वांची इच्छा होती. परंतु या बाबतींत निश्चित अशी योजना कोणतीच ठरली नव्हती. मधूनमधून या प्रश्नाला आमच्याकडून चालना मिळे व डॉ. केतकर यांच्याकडे दोनतीन निरनिराळ्या योजना तयार

करून पाठविण्यांतहि आल्या होत्या परंतु त्यांचेकडून एकाहि योजनेचा निश्चितपणें स्वीकार होईना. विद्यासेवक मासिक, पुणें समाचार वगैरे गोष्टी थोडयाफार पुढील कार्याचा अंदाज घेण्याच्या स्वरूपाच्याच होत्या. त्याचप्रमाणें कथामंदिर मासिक, राजवाडे धातुकोश प्रकाशन वगैरे कार्याचीहि घोषणा झाली होती, परंतु प्रत्यक्ष अशी कोणतीच योजना निश्चित होईना व मंडळाच्या चालकवर्गाची संघटना किंवा रचना कोणत्या प्रकारची असावी यासंबंधीहि कांहीं निश्चित होईना.

अल्पारंभ—माझ्या मनानें मात्र ज्ञानकोशाच्या कार्यानंतर शब्दकोश तयार करण्याचें कार्य अंगावर घ्यावयाचें निश्चित ठरविलें होतें व ज्ञानकोशमंडळाच्या भवितव्यतेच्या वाटाघाटी चाललया असतांनाच शब्दकोशाची जुळवाजुळव करण्याच्या मार्गास मी लागलों होतों व त्याकरितां साधनसामुग्री जमवीत होतों. १९२१ सालीं बडोदें येथें संमेलनासाठीं गेलों असतां तेथील एक वृद्ध साहित्यिक रा. अनंत बाबाजी देवधर यांची भेट झाली तेव्हां त्यांच्या ग्रंथसंग्रहांत पूर्वी शास्त्री मंडळानें तयार केलेला 'महाराष्ट्र भाषेचा कोश' शिलाप्रेसवर छापलेला व अत्यंत दुर्भिळ झालेला पाहावयास मिळाला होता. त्याचवेळीं त्यांस मी माझ्या पुढील कामासाठीं त्याची मागणी केली होती व यावेळीं त्यांजकडे माझे मित्र रा. संत यांचे मार्फत बोलणें करून व त्यांनींहि अनेकवार जाऊन त्याची प्राप्ती करून घेतली व विजयादशमीच्या मुहूर्तावर त्या वरून कार्डें लिहावयास रा. कर्वे यांच्या घरीं आरंभ केला; कारण त्यावेळीं माझें गृह गृहिणीहीन होतें. असो.

याप्रमाणें शब्दकोश तयार करावयाचा हें निश्चित ठरल्यावर हें काम अनेक सहाय्यकांच्या मदतीशिवाय होणें शक्य नाहीं ही गोष्ट लक्ष्यांत घेऊन निरनिराळया प्रकारच्या वाङ्मयाचे अभ्यासक विद्वान् गृहस्थ व महाराष्ट्राच्या निरनिराळया भागांत राहणारे भाषाप्रेमी गृहस्थ व संस्था यांस आपल्या परिचित वाङ्मयांतील व प्रांतांतील विशिष्ट व प्रांतिक स्वरूपाचे शब्द जमवून पाठविण्यासाठीं विनंतिपत्रकें पाठविण्यांत आलीं त्यांचा नमुना पुढें दिल्याप्रमाणें होता:—

मुख्य संपादक **महाराष्ट्र शब्दकोश कचेरी**
यशवंत रामकृष्ण दाते
बी. ए. एल्एल्. बी. पुणें.....

सहसंपादक
चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.
आबा चांदोरकर
हौत्रवेत्ते वे. शा. सं. चिंतामणशास्त्री दातार

"महाराष्ट्र शब्दकोशाचें कार्य सुरू होऊन आतां त्यास बरेंच स्वरूप येत चाललें आहे. सोबत जोडलेल्या पत्रकांतील योजनेप्रमाणें आमच्या कार्याचे एकंदर १८ विभाग केले आहेत. या विभागांतील शब्दशोधनाचें कार्य आम्ही निरनिराळया विद्वान् मंडळींकडे सोंपविणार आहोंत. आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या कोशांतील व सामान्य वाङ्मयांत आढळणाऱ्या शब्दांचा संग्रह करण्याचें कार्य कार्यालयांत चालू आहे. परंतु विशिष्ट वाङ्मयांतील विशेष शब्दांची निवड करण्याचें काम त्या त्या वाङ्मयाचा विशेष व्यासंग असणाऱ्या व्यक्तींकडे सोंपविण्याचें आम्हीं योजिलें आहे. तसेंच निरनिराळया प्रांतिक बोलींत रूढ असलेल्या शब्दांचा संग्रह करण्याचें कार्य त्या त्या प्रांतांत बरींच वर्षे वास्तव्य करून राहिलेल्या प्रांतिक भाषेंतील शब्दांच्या व अर्थांच्या खांचा खोचा वगैरेशीं पूर्ण परिचय असलेल्या गृहस्थांकडे देण्याचें आम्हीं ठरविलें आहे. आपला..... वाङ्मयाचा विशेष व्यासंग असल्यामुळें आपण त्या वाङ्मयांतील (आपण ... प्रांतांतील स्थाईक रहिवासी व तेथील भाषेशीं विशेष परिचित म्हणून... प्रांतांतील भाषेतील) विशेष शब्दांची निवड करून ते शब्द अर्थ व अवतरणांसह व शक्य तर व्युत्पत्ति देऊन आम्हांस पुरविल्यास आमचें मोठें कार्य होणार आहे व या महाराष्ट्रास भूषणभूत होणाऱ्या ग्रंथाच्या रचनेंत सहकार्य केल्याचें श्रेय आपणांस मिळणार आहे. तरी आपण हें कार्य आपल्या अंगावर घेऊन आम्हांस आभारी कराल अशी आशा आहे. कळावें हें विनंति."

आपला,
यशवंत रामकृष्ण दाते.

महाराष्ट्रीय साहित्यभक्तांस विनंति

याप्रमाणें अनेक संस्थांस व लेखकांस विनंति करतां यावी म्हणून 'महाराष्ट्रीय साहित्यभक्तांस विनंति' म्हणून एक पत्रक तयार करून अनेक साहित्यिकांस पाठविण्यांत आलें होतें तें पुढें दिल्याप्रमाणें होतें:—

महाराष्ट्र शब्दकोश

"महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें मुख्य कार्य आतां पूर्ण झालें आहे व आतां उरलेले पुरवणीभागहि लवकरच बाहेर पडतील. यानंतर ज्ञानकोशाच्या संपादकवर्गानें रा. यशवंतराव दाते यांस संपादक नेमून महाराष्ट्र शब्दकोश तयार करावयाचें काम हातीं घेण्याचें ठरविलें आहे. या कामाची सांपत्तिक बाजूची योजना लवकरच स्वतंत्र रीतीनें जाहीर करण्यांत येईल पण संपादकीय व रचनेचें धोरण सामान्यतः पुढें दिल्याप्रमाणें आंखावयाचें ठरविलें आहे:—

संपादकीय मुख्य कार्य पुण्यास करावयाचें ठरविलें आहे तथापि केवळ पुण्यास राहून किंवा पुण्याच्याच मंडळीकडून एकाकी हें कार्य पूर्ण होणें शक्य नाहीं. याकरितां निरनिराळया

शहरीं कार्याचीं केंद्रें करावयाचें ठरविलें आहे आणि याकरितां कामाची विभागणी पुढें दिल्याप्रमाणें करावयाचें ठरविलें आहे.

पुण्यास मुख्यतः आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व कोशांतील शब्दांचा संग्रह करण्याचें कार्य करून जें कार्य दुसऱ्या कोठेंहि होण्यासारखें नसेल तें पुरें करावयाचें व अखेरची हस्तलिखित प्रत तयार करावयाचें काम करावयाचें.

आपल्या महाराष्ट्रांत निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करणारीं लहान लहान वाङ्मयमंडळें बरींच निर्माण झालीं आहेत. उदाहरणार्थ, यवतमाळ येथें रा. यशवंत खुशाल देशपांडे एम्. ए एल्एल्. बी. यांनीं काढलेली शारदाश्रम ही संस्था महानुभावी वाङ्मयाचें प्रकाशन व अभ्यास करण्याचें कार्य करीत आहे. धुळें येथील सत्कार्योत्तेजक सभेच्या रा. देव वगैरे मंडळीनें रामदासी वाङ्मयाच्या अभ्यासास आपणांस वाहून घेतलें आहे. शिवाय तेथें रा. भट यांच्यासारखे इतिहास व धर्मशास्त्र यांचा अभ्यास करणारे व कार्यकर्ते वाङ्मयसेवक आहेत. बडोदें येथें महाराष्ट्र वाङ्मयमंडळ ही संस्था शास्त्रीय संज्ञांच्या क्षेत्रांत कार्य करीत आहे व तेथें ऐतिहासिक संशोधकांचाहि एक चांगला संघ आहे. याखेरीज दादर येथील गोविंदाप्रजमंडळ, मुंबई येथील वाङ्मयसेवामंडळ, यासारख्या लहानमोठ्या संस्था नाशिक, मुंबई, उप नगर वगैरे ठिकाणीं विशिष्ट वाङ्मयशाखेस वाहून घेऊन कार्य करीत आहेत. तेव्हां अशा संस्थांचें सहकार्य असल्याशिवाय एवढें मोठें प्रचंड कार्य चांगल्या तऱ्हेनें शेवटास जाणें शक्य नाहीं.

खुद्द पुणें शहरांतहि भारतइतिहाससंशोधकमंडल, मयूरमंडळ वगैरेसारख्या संस्थांचें सहकार्य आम्ही मिळविणार आहों.

याखेरीज कांहीं गृहस्थ या बाबतींत स्वतःच आपल्या परीने वैयक्तिक प्रयत्न करीत आहेत. उदाहरणार्थ, रा. सा. नारायण गोविंद चाफेकर यांनीं निरनिराळ्या कारागीर लोकांत त्यांच्या धंद्यासंबंधी प्रचलित असलेले शब्द जमविण्याचें कार्य चालविलें आहे. प्रो. मा. त्रिं. पटवर्धन यांचा फारसी मराठी कोश हें अशा तऱ्हेच्या प्रयत्नाचेंच एक दृश्य फल आहे. तेव्हां अशा विवक्षित क्षेत्रांत कार्य करणाऱ्या वाङ्मयभक्तांचेंहि साहाय्य आम्हास पाहिजे आहे.

याकरितां आम्ही अशा तऱ्हेनें जेथें जेथें वाङ्मयसेवेचें कार्य चालू आहे किंवा होण्यासारखें आहे अशा सर्व संस्थांस व ज्या ज्या व्यक्ती अशा तऱ्हेनें कार्य करीत असतील त्यांस आमच्या कार्यांत सहकार्य करण्याची या पत्रद्वारें विनंति करीत आहों.

तरी आमच्या वाचकवर्गांनीं आपल्या बाजूच्या अशा ज्या संस्थांची माहिती आपणांस असेल त्यांचीं नांवें, कार्यकर्त्यांचीं नांवें व पत्ते आम्हांस कळविल्यास त्यांसहि आम्ही विनंतिपत्रें पाठवूं. तरी आमचे वाचक अशा तऱ्हेची मदत आम्हास अवश्य करतील अशी आशा आहे."

यशवंत रामकृष्ण दाते.

याखेरीज अखिल महाराष्ट्रीय जनतेस म्हणून एक विनंतिपत्रक काढण्यांत आलें होतें तें पुढें दिलें आहे:-

महाराष्ट्र-शब्दकोश-मंडळ, सदाशिव पेठ,
भाऊमहाराजांचा वाडा, पुणें. १।५।२८.

अखिल महाराष्ट्रीयांना विनंति.

भाषेचे डोळे व्याकरण व कोश हे आहेत; त्यांच्याखेरीज कोणतीहि भाषा आंधळी होय. या न्यायानें पाहिलें म्हणजे प्रत्येक भाषेनें हे आपले डोळे शाबूत ठेविले पाहिजेत. आपल्या मराठी भाषेच्या बाबतींत आतांपर्यंत असे प्रयत्न झालेले आहेत. त्यांत मराठी कोशाची परंपरा तर फार जुनी, म्हणजे शालिवाहनाच्या बाराव्या शतकापासून आहे. त्या वेळच्या महानुभावी कोशापासून परवांच्या शब्दरत्नाकरापर्यंत वीसबावीस मराठी कोश तयार झाले आहेत. परंतु सर्वांगपरिपूर्ण व शास्त्रीय दृष्टीनें तयार केलेला असा एकहि कोश आज बाजारांत मिळत नाहीं. आतांपर्यंत जे कोश तयार झाले होते त्यांत मराठी भाषेच्या सर्व प्रांतिक पोट-भाषांचा समावेश करण्यांत आलेला नसे. अलीकडील पंधरावीस वर्षांत निरनिराळ्या चळवळी व घडामोडीमुळें मराठी भाषेंत अनेक नवीन शब्दांची भर पडली आहे. शास्त्रीय परिभाषा बनत चालल्या आहेत, विद्यापीठांतून मराठीचा बहुमान उत्तरोत्तर जास्त होत जाणार व सध्यां होत आहे. त्याप्रमाणेंच महाराष्ट्रीयांचें वाङ्मय-लेखन मराठींतून उत्तरोत्तर अधिकाधिक निर्माण होत आहे. अशा वेळीं हल्लींच्या मराठी भाषेंत प्रचलित असलेल्या सर्व शब्दांचा संग्रह एकत्रित करण्याचा समय प्राप्त झाला आहे. हा संग्रह करतांना अलीकडील शास्त्रीय दृष्टि सोडतां कामा नये. ज्ञानकोशसंपादकवर्गानेंच हा कोश हातीं घ्यावा अशाबद्दलचा ठराव पुण्यास भरलेल्या साहित्यसंमेलनानें केलेला असून महाराष्ट्र-साहित्य-परिषदेचा याला पूर्ण पाठिंबा आहे. सारांश, वरील सर्व गोष्टी लक्षांत घेऊन मराठीचा एक सर्वांगपरिपूर्ण असा बृहत्कोश तयार करावा अशी इच्छा मनांत बाळगून आम्ही त्या कामास हात घालीत आहों. या प्रयत्नांत निरनिराळ्या मराठी वाङ्मयसंस्थांनीं व विद्वानांनीं आम्हांला मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे.

* हें पत्रक केसरी व इतर प्रमुख महाराष्ट्रांतील पत्रांतून प्रसिद्ध झालें आहे.

कोशाचें नांव "**महाराष्ट्र शब्दकोश**" असें ठेवण्यांत आलें आहे. त्याची एक साग्र योजना छापून काढण्यांत आली असून तिलाहि वरील विद्वानांची व संस्थांची अनुमति मिळाली आहे. कामास सुरुवात गेल्या विजयादशमीपासुन झालीच आहे. कोशांत साधारणपणें पाऊण लक्षांपर्यंत शब्द येतील; सुपर रॉयल आकाराचे पांचशें पांचशें पानांचे पांच खंड तयार होतील. किंमतीचें मान दर शंभर पृष्ठांगणिक एक रुपाया, याप्रमाणें पंचवीस रुपये तूर्त ठरविलें आहे. याहून जास्त पृष्ठ वाढल्यास हेंच प्रमाण राखण्यांत येईल. यासाठीं पंचवीस रुपयांचा एक भाग ठेऊन ही भागीदारांची रजिस्टर्ड कंपनी करण्यांत आली आहे व भागीदारांना भागाच्या तारणावर ग्रंथ मिळण्याचीहि योजना केली आहे. खालील सर्व मंडळींनीं ज्ञानकोश संपवून हें काम स्वतंत्रपणें हातीं घेतलें आहे; तेव्हा आतां यापुढें महाराष्ट्र शब्दकोश मंडळाचा व ज्ञानकोश मंडळाचा कांहीं संबंध नाहीं. शेवटीं अखिल महाराष्ट्रांतील सर्व मराठी-भाषाभिमान्यांना आमची आग्रहाची विनंति आहे कीं, त्यांनीं या कामीं आह्मांला सर्व प्रकारें मदत करून मराठी भाषेच्या अंगावर हें "देशीकार लेणें" आमच्या हातून लेवविण्याचें श्रेय स्वतः घ्यावें.

यशवंत रामकृष्ण दाते,
चिंतामण गणेश कर्वे,
आबा चांदोरकर,
चिंतामणशास्त्री दातार,
गजानन नारायण टिळक.

या पत्रकास पुढील गृहस्थांनीं खालीं दिल्याप्रमाणें पुष्टी दिली होती:-

वरील मंडळीनीं "महाराष्ट्र शब्दकोशा" ची जी योजना आंखून प्रसिद्ध केली आहे ती चांगली असून आज असल्या कोशाची अत्यंत जरूरी आहे. असलें अवजड काम पुरें पाडण्यास जी दृष्टि व कार्यक्षमता लागते ती या सर्व मंडळींच्या ठिकाणीं आहे हें सांगण्याची गरज नाहीं. यांच्यांत वेदाभ्यासी, समाजाभ्यासी, श्रौताभ्यासी,' इतिहाससंशोधक इत्यादि निरनिराळ्या अभ्यासक व्यक्ती आहेत. शिवाय त्यांनीं ज्ञानकोशासारखें प्रचंड काम तुकतेंच पार पाडलें आहे; म्हणजे यांनीं आतांपर्यंत मराठी भाषेची निरनिराळ्या अंगानें सेवा चालविली आहे. त्यामुळें शब्दकोशाचें काम अंगावर घेण्यास त्यांना एक प्रकारें अधिकार आलेला आहे. या कामीं आमची पूर्ण सहानुभूति असुन अखिल महाराष्ट्रांतील मराठी भाषा बोलणाऱ्या एकूण एक महाराष्ट्रीयांस आमची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं या कार्यास सर्व बाजूंनीं हातभार लावून हें वाङ्मय कार्य पुरें करून मराठी भाषेचें ऋण फेडावें.

आपले,

न. चिं. केळकर, श्री. नी. चाफेकर, गं. ना. मुजुमदार, खंडेराव चिंतामण मेहेंदळे, वै. का. राजवाडे, शि. म. परांजपे, गो. वि. तुळपुळे, श्री. व्यं. केतकर, वा. गो. आपटे, द. वा. पोतदार, मा. वि. किबे (इंदूर), य. खु. देशपांडे (यवतमाळ), ना. गो. चापेकर (बदलापूर), भा. वा. भट (धुळें), चिं. वि. वैद्य, डॉ. आंबेडकर (मुंबई), मा. श्री अणे (यवतमाळ), या. मा. काळे (बुलढाणा), रा. ना. मंडलीक (अलीबाग), द. व्यं. पै (गोवें), ग. श्री. खापर्डे (उमरावती), र. वि. धुळेकर (झांसी), पां. के. शिराळकर (कऱ्हाड), श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधि (औंध), गो. अ. ओगले (नागपूर), श्री. कृ. कोल्हटकर (जळगांव, वऱ्हाड), वगैरे.

प्रत्यक्ष कार्य योजना—ज्ञानकोशमंडळांतून प्रत्यक्ष बाहेर पडण्यापूर्वीच शब्दकोशाचें कार्य करावयाचा निश्चय झालेला असल्यामुळें व डॉ. केतकर यांनीं अनेक वेळां यासंबंधीं चर्चा चालली असतां ते काम आपण अंगावर घेणार नाहीं, तुम्हीं पाहिजे तर घ्या असें म्हटल्यामुळें या कार्याकरितां कदाचित् एखादी नवीन योजना करावी लागेल असें वाटूं लागलें होतें व याकरितां खासगी प्रसाराकरितां म्हणून नवीन नोंदावयाच्या मंडळीचा एक प्रॉस्पेक्टस छापून काढला होता (हें पत्रक नं. १ होतें) व त्याचा कांहीं मित्रांमध्यें प्रसारहि केला होता एवढेंच नव्हे तर कांहीं लोकांकडून त्याप्रमाणें अर्जे व पैसेहि आले होते. हें पत्रक असें.-

(फक्त खासगी प्रसाराकरितां)

भांडवल—रुपये २५००० (वाढविण्याचा अधिकार आहे), १००० भाग. प्रत्येकीं भाग २५ रुपयांचा.

भागवसुली—प्रत्येक भागाबद्दल अर्जाबरोबर रु. ५. भाग मंजूर झाल्याबरोबर रु. ५. पुढील रु. १५ जसजसे लागतील तसतसे तीन हप्त्यांनीं वसुल केले जातील. दोन हप्त्यांमधील अंतर कमींतकमी ३ महिन्यांचें राहील.

आतांपर्यंत खालील गृहस्थांनीं पुढें दिल्याप्रमाणें भाग घेण्याचें कबूल केलें आहे,

नांव	भाग	रुपये
यशवंत रामकृष्ण दाते, बी. ए. एल्एल्. बी.	४०	१०००
चिंतामण गणेश कर्वे, बी. ए.	१०	२५०
पांडुरंग मार्तंड उर्फ आबा चांदोरकर	१०	२५०
गजानन नारायण टिळक	१०	२५०

उद्देश

महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचें प्रचंड काम अंगावर घेऊन ज्ञान कोशमंडळांतील उत्साही मंडळीनीं तें नेटानें व चिकाटीनें १२ वर्षें परिश्रम करून पूर्ण केलें आहे. त्यानंतर महाराष्ट्राच्या कीर्तीला साजेल असा व ज्ञानकोशाच्या संपादकवर्गाच्या योग्यतेस साजेल असा दुसरा कोणता तरी ग्रंथ प्रसिद्ध करावयास घ्यावा अशा जाहीर व खासगी सूचना अनेक मित्रांकडून व शुभचिंतकांकडून मंडळाकडे आल्या. त्यांत प्रामुख्यानें महाराष्ट्र भाषेचा एक सर्वांगपरिपूर्ण कोश करावा ही सूचना बऱ्याच विद्वान मंडळीकडून आली. आणि गेल्या पुणें येथें भरलेल्या बाराव्या साहित्यसंमेलनामध्यें एक स्वतंत्र ठराव या विषयावर होऊन ज्ञानकोशाच्या संपादकवर्गानें हा कोश करावा असें सुचविण्यांत आलें. या सर्व गोष्टींचा विचार करून अशा तऱ्हेचा कोश तयार करावयाचें काम ज्ञानकोशाच्या संपादक-वर्गातील कांहीं प्रमुख मंडळीनीं अंगावर घेतलें आहे. त्याप्रमाणें एक महाराष्ट्र शब्दकोश तयार करावयाचा.

त्याप्रमाणें शास्त्रीय पारिभाषिक संज्ञांचा एक कोश तयार करावयाचाहि उद्देश आहे. अशा तऱ्हेच्या कोशाची आवश्यकता किती आहे हें येथें विस्तारशः सांगण्याचें कारण नाहीं. याप्रमाणेंच वैदिक कोश व इतर संदर्भग्रंथ एकामागून एक तयार करावयाचें धोरण आहे. याखेरीज सवडीनें प्रौढ वाङ्मयाची वृद्धि होईल अशा तऱ्हेचे प्रयत्न निरनिराळ्या शाखांत ग्रंथ लिहून ते छापून काढून करावयाचे आहेत.

कंपनीचें धोरण—ज्याप्रमाणें महाराष्ट्रीय ज्ञानकोश हा ग्रंथ, ग्रंथाकरितां होणाऱ्या ग्राहकांकडून मिळणाऱ्या पैशांतूनच खर्च करून पुरा करण्यांत आला तशाच तऱ्हेचें धोरण हा ग्रंथ करतांनाहि मुख्यतः पुढें ठेवलें जाईल. तथापि या ग्रंथामध्यें संपादकीय धोरणाबद्दल मतभेद होण्याचा संभव नाहीं. तसेंच शब्दांकरितां बरेंच संशोधन व त्याकरितां प्रवासहि करावा लागेल. व काम निरनिराळ्या ठिकाणीं वांटून द्यावें लागेल. याकरितां प्रांतिक सरकारें, युनिव्हर्सिटया इत्यादिकांकडून संशोधनाकरितां देणग्या मिळाल्यास स्वीकारण्यांत येतील. किरकोळ देणग्या न स्वीकारण्याचें धोरण राहील. कंपनी ग्रंथ प्रकाशनाच्या मुख्य उद्देशानें काढली असल्यामुळें महाराष्ट्र शब्दकोश प्रसिद्ध होईपर्यंत भागांवर फायदा वांटला जाणार नाहीं.

काम करणारीं सर्व माणसें, व्यवस्थापक, संपादक, वगैरे कंपनीचे वैतनिक कामगार राहतील.

धंद्यास सुरुवात कमींत कमी २००० रुपयांचे भाग खपले म्हणजे करण्यांत येईल.

कंपनीचे शेअर शक्य तों खासगी प्रयत्नानें विकण्यांत येतील. प्रसंगीं पगारी नोकरांकडूनहि हें काम केलें जाईल. भाग विकण्याबद्दल कमिशन शेंकडा पांचपेक्षां अधिक दिलें जाणार नाहीं. कमिशनवर भागविक्रीचा हमीदार घेण्यांत येणार नाहीं.

कंपनी उभारण्यास प्राथमिक खर्च ५०० रुपयांपेक्षां जास्त लागणार नाहीं असा अंदाज आहे.

मेमोरँडम व आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कंपनीच्या आफिसांत पहावयास मिळतील.

शब्दकोश—शब्दकोशाच्या प्रत्यक्ष कामास गेल्या विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर सुरुवात केली असून प्रथम शास्त्र्यांचा महाराष्ट्र भाषेचा कोश यांतील शब्दांच्या कार्डा तयार करण्यास सुरुवात केली असून सुमारें २५००० कार्डा तयार झाल्या आहेत. अशाच दुसऱ्या कोशांतील निवडक कार्डा तयार करण्याचें काम प्रथम पुणें येथें करावयाचें असून प्रांतिक व विशिष्ट वाङ्मयांतील शब्द जमविण्यानें कार्य निरनिराळ्या शाखांकडे वांटून द्यावयाचें आहे. याकरितां महाराष्ट्रांतील निरनिराळ्या साहित्यभक्तांशीं पत्रव्यवहार चालू आहे आणि कांहीं संस्थांकडून संमतिदर्शक पत्रेंहि आलीं आहेत.

शब्दकोशाची किंमत आतांच अमुक एक रक्कम असें जाहीर न करतां दर १०० पृष्ठांस १ रुपया याप्रमाणें भागीदारांस व आगाऊ कांहीं रक्कम भरून वर्गणीदार होणारांस ठेवावी असें योजिलें आहे. मागाहून होणाऱ्या ग्राहकांस १। रुपयास १०० पृष्ठें असा दर ठेवावा व पुस्तक सर्व प्रसिद्ध झाल्यावर घेणारास १॥ रुपयास १०० पृष्ठें असा दर ठेवावा असें योजिलें आहे. नक्की किंमत भागीदारांच्या सभेंत ठरेल.

पृष्ठांप्रमाणें किंमत ठेवावी असें धोरण अंगीकारण्याचें कारण असें कीं, आधींच सर्व ग्रंथाची किंमत नक्की जाहीर केल्यास तेवढयाच किंमतींत ग्रंथ देतां यावा म्हणून मागाहून तयार झालेल्या मजकुरासहि कात्री लावण्याचा मोह उत्पन्न होतो; येवढेंच नव्हे तर प्रसंगीं तसें करणें भागहि पडतें. ज्ञानकोशामध्यें दोन तीन भाग अधिक वाढवूनहि १८ ते २१ या भागांत बरीच काटकसर करावी लागली हा अनुभव आहे.

शब्दकोशांत अशा तऱ्हेनें काटाकाट करणें इष्ट नाहीं म्हणून वरील धोरण स्वीकारलें आहे.

कोशाचें स्वरूप—या शब्दकोशामध्यें आजपर्यंतच्या मराठी वाङ्मयामध्यें उपलब्ध होणाऱ्या सर्व शब्दांचा अंतर्भाव करण्यांत यावयाचा आहे म्हणजे ज्ञानेश्वरापूर्वीच्या महानुभावी

वाङ्मयांत आढळणारे शब्द, ज्ञानेश्वर व तदुत्तरकालीन संत-कवींच्या काव्यांतील व रामजोशी, अनंतफंदी यासारख्या शाहीरांच्या पवाडे, लावण्या वगैरे शाहिरी काव्यांतील शब्द, तसेच अव्वल इंग्रजी आमदानींतील गद्य व पद्य ग्रंथ व अर्वाचीन गद्य व पद्य ग्रंथ, ऐतिहासिक कागदपत्रें व बखरी, वामनपंडित, रामदास, मोरोपंत इत्यादि कवींचीं काव्यें यांतील सर्व शब्दांचा संग्रह या कोशांत करावयाचा आहे. तसेंच नागपुरी, वऱ्हाडी, खानदेशी, नगरी, सोलापुरी, कोंकणी वगैरे प्रांतिक प्रचारांतील बोलींतील शब्द व वाक्प्रचार यांचाहि संग्रह करण्यांत येईल.

प्रत्येक शब्दाची व्युत्पत्ति व निरनिराळे अर्थ देण्यांत येऊन प्रत्येक निराळया अर्थास आधार देण्यांत येतील.

यशवंत रामकृष्ण दाते,
संपादकीय व्यवस्थापक-ज्ञानकोश.

तारीख १।१।२८

महाराष्ट्र कोशमंडळ लिमिटेड.

मॅनेजर महाराष्ट्र कोशमंडळ लि. पुणें यांस वि. वि. मी..... भाग विकत घेऊं इच्छितों. त्यांकरितां सोबत प्रत्येक भागाकरितां रुपये पांचप्रमाणें रक्कम पाठवीत आहें. तरी त्याप्रमाणें भाग किंवा त्यापैकीं जितके देतां येतील तितके भाग मला देण्याची कृपा करावी. कळावें हे विनंति.

ता. सही—

पूर्ण नांव—

पत्ता

परंतु मध्यंतरीं पुन्हां एकदां असा विचार मनांत आला कीं नोंदणी, स्टांप वगैरे खर्च निष्कारण पडूं नये म्हणून हें मंडळ सहकारी कायद्याखालीं नोंदवावें. यावेळीं माझा सहकारी चळवळीशीं डेक्कन जिमखाना कोऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीचा अवेतन चिटणीस म्हणून बराच संबंध आला होता व मी त्या सुमारास प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या कौन्सिलचाहि सभासद होतों. तेव्हां या सवलतीचा फायदा घ्यावा म्हणून एक नियमावली तयार करून व दहा सभासदांच्या सह्या घेऊन सहकारी कायद्याखालीं मंडळ नोंदण्याकरितां अज दिला व त्यावेळचे रजिस्ट्रार श्री. व्ही. एस. भिडे यांचीहि गांठ घेतली. परंतु आमच कार्य मिश्र स्वरूपाचें म्हणजे केवळ भांडवल पुरवणारें किंवा केवळ लेखक किंवा केवळ ग्राहक अशा स्वरूपाचें नसल्यामुळें सहकारी साच्यांत तें बसत नाहीं म्हणून नोंदतां येत नाहीं, असें आम्हास बरेच दिवसांनीं कळविण्यांत आलें.

कायदेशीर कार्यारंभ—तेव्हां मग अखेरीस कंपनीच्या कायद्याप्रमाणें मंडळ नोंदावयाचें ठरवून ज्ञानकोश मंडळाच्याच धर्तीवर मेमोरँडम व आर्टिकल्स तयार करून महाराष्ट्र कोशमंडळ लि. पुणें म्हणून मंडळ ४ सप्टेंबर १९२८ रोजीं नोंदविण्यांत आलें व कार्यास आरंभ करण्याचें सर्टिफिकेट २८ जानेवारी १९२९ रोजीं मिळालें.

प्रत्यक्ष मंडळ नोंदविण्यास वगैरे जरी इतका विलंब लागला तरी प्रचार, ग्राहक जमविणें, शब्द गोळा करणें वगैरे कामें चालूच होतीं व पहिल्याच भागवांटणींत ८६७ भाग प्रत्यक्ष वाटण्यांत आले.

प्रथम कंपनी फक्त २५ रुपयाचा एक असे हजार भाग म्हणजे २५००० रुपये भांडलाकरितांच नोंदली होती व मी स्वत: ४० रा. कवें व चांदोरकर यांनीं प्रत्येकीं २० वे रा. दातार यांनीं १० शेअर घेतले होते पण पुढें ग्राहक जसजसे वाढत गेले तसें भांडवल वाढवून पुढें रु. ७५००० भांडवल करण्यांत आलें.

शब्दसंकलन—शब्दकोशाचें मुख्य कार्य जें शब्दसंकलन तें करण्याची पद्धती पुढें दिल्याप्रमाणें स्वीकारली होती.

१ उपलब्ध, मराठी-मराठी, मराठी-इंग्रजी व इंग्रजी-मराठी, हिंदी-मराठी, फार्सी-मराठी वगैरे सर्व कोशांचा संग्रह करून त्यांतील यच्चायावत् शब्दांच्या पत्रिका तयार करण्यांत आल्या. म्हणजे जुन्या कोणत्याहि कोशांतील शब्द गळूं नये.

२ मराठी वाङ्मयांतील शब्द जमविण्यासाठीं मराठी वाङ्मयाचे पुढें दिल्याप्रमाणें वीस विभाग पाडण्यांत आले.

शब्दसंशोधनाकरितां केलेलें मराठी वाङ्मयाचे विभाग

१ शिलालेख वाङ्मय.	२ महानुभावी.
३ मुकुंद-ज्ञानेश्वर.	४ एकनाथ-मुक्तेश्वर.
५ रामदासी वाङ्मय.	६ अभंग व स्फुटकाव्य.
७ आर्या वाङ्मय.	८ जुनें शाहिरी वाङ्मय.
९ ऐतिहासिक.	१० निबंधमालाकालीन गद्य.
११ आधुनिक काव्य.	१२ नाट्य-नृत्य.
१३ साहित्य (अलंकार).	१४ शास्त्रीय वाङ्मय.
१५ परीक्षणात्मक वाङ्मय.	१६ निबंधात्मक वाङ्मय.
१७ वृत्तपत्रीय.	१८ प्रांतिक भाषा.
१९ कारुवाङ्मय.	२० स्त्रीवाङ्मय.

यापैकीं ज्या विभागाचा अभ्यास केलेले विद्वान गृहस्थ आढळून आले त्यांस त्या त्या विभागांतील शब्द निवडून पाठविण्यासाठीं विनंति करण्यांत आली. या विनंतीस अनेक विद्वान मंडळीनीं मान दिला. परंतु रामदासी वाङ्मयाच्या एका अधिकारी व्यक्तीस लिहिलें असतां वेळेच्या अभावीं नकार दर्शविण्यांत आला व

तुकारामाच्या एक अभ्यासकास विनंति केली असतां मी तुकारामाच्या फक्त विचारांकडे लक्ष्य देतों शब्दासारख्या रुक्ष गोष्टीकडे मी मुळींच लक्ष्य देत नाहीं असें उत्तर आलें. तथापि एकंदर शब्दसंग्रह करण्याच्या बाबतींत आम्हांस बाहेरून बरेंच सहाय्य झालें. अशा सहाय्यकांचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

वाङ्मयीन शब्दविषयक साहाय्यक

१ ब्रह्मश्री नारायणशास्त्री मराठे (वैदिक वाङ्मय). २ रा. प्र. धों. कानिटकर (गाथासप्तशती). ३ रा. रा. ग. हर्षे, रा. गो. त्रि. शिंत्रे, प्रो. चिं. नी. जोशी, प्रो. दांडेकर (ज्ञानेश्वरादि कवि). ४ रा. माधवराव देशमुख (एकनाथी भागवत). ५ कै. गणपतराव खरे (तुकाराम गाथा). ६ रा. गं. आ. भागवत (शनिमहात्म्य, गुरुचरित्र). ७ रा. श्री. शा. हणमंते (पांडवप्रताप, रामविजय, पैमाषेंदु). ८ रा. श्री. कृ कोल्हटकर (स्वतःचे ग्रंथ). ९ रा. द. वि. आपटे, न. रा. गोडबोले, रा. अ. दा. केळकर (कादंबरी–निबंध इ० वाङ्मय). १० रा. भा. कृ उजगरे (ख्रिस्ती वाङ्मय). ११ रा. वि. रा. शिंदे, हरिभाऊ गोळे. (कानडी–मराठी). १२ सौ. यशोदाबाई भट, सौ. लक्ष्मीबाई अभ्यंकर, सौ. सुलोचनाबाई गोखले (बायकी). १३ प्रो. माधवराव पटवर्धन (मुक्तेश्वर). १४ महंत गोपीराज महानुभाव, ह. ना. नेने (महानुभावी).

यांखेरीज ज्या विभागावर साहाय्यक मिळाले नाहींत त्या विभागांवरील ग्रंथ कार्यालयांतच वाचून शब्द निवडण्यांत आले.

३ यानंतर निरनिराळ्या प्रादेशिक बोलींतील शब्द जमविण्यासंबंधीं निरनिराळ्या भागांतील मंडळीस व साहित्यसंस्थांस विनंति करण्यांत आली होती तीसहि पुष्कळच प्रमाणांत सक्रिय सहानुभूति मिळून अनेक प्रांतिक बोलींतील शब्दांचा संग्रह चांगल्या प्रमाणावर करतां आला.

संपादक मंडळी जेव्हां प्रचाराकरितां बाहेर गांवीं जात तेव्हां प्रांतिक व ग्रांथिक शब्द, तसेच कारुवाङ्मयांतील शब्द मिळविण्याची शक्य ती खटपट करीत; त्यामुळें शब्दसंग्रहास पुष्कळच पदत होत असे.

प्रांतिक शब्दविषयक साहाय्यक

१ रा. ब. ग. खापर्डे, रा. गो. ना. मोहरीर, रा. के. ना. मुळे, रा. ह. सी. राजंदेकर, रा. ग. अं. जोशी, रा. वा. ग. लाडखेडस्कर, रा. गु. ह. देशपांडे, रा. वि. ग. कविमंडन, रा. दाजीशास्त्री चांदेकर, रा. द. बा. पद्माकर, रा. भि. का. भोरटक्के, रा. द. ना. हरताळकर, रा. स. र. पांडे, रा. कृ. व्यं. देशपांडे, रा. जा. रा. वरकडे, रा. रा. का. कडुकर, रा. बी. आर, संगारे, रा. भ. अं. करफडे, रा. या. मा. काळे, रा. भा. त्र्यं. कोरडे, रा. रा. म. काटे, रा. वि. भि. कोलते, डॉ. चिं. ल. मुळे, (वऱ्हाडी); २ रा. आनंदराव जोशी (नागपुरी); ३ रा. वि. भा. केळकर (बनारसी हिंदी–उर्दू); ४ डॉ. बी. जे. चिकेरूर, रा. गं. आ. भागवत (खानदेशी); ५ रा. वि. वा. जोशी (चंद्रपुरी); ६ प्रो. ना. बा. पराडकर (माळवी); ७ रा. य. रा. लाळे (अहिराणी); ८ रा. बा. ना. शेडगे (माणदेशी); ९ रा. अ. य. देशपांडे (वायदेशी); १० रा. का. प. साने (जुन्नरी); ११ रा. द. वि. आपटे, रा. अ. दा. केळकर (कोंकणी–कुलाबा); १२ रा. प. गो. मंडपे, रा. ग. ह. खरे, दि. धों. परांजपे, रा. पु. द. मराठे (कोंकणी–रत्नागिरी); १३ रा. कृ. गो. साठे, रा. र. कृ पाटणकर (कोंकणी–राजापुरी, चित्पावनी); १४ रा. का. रा. झारापकर, रा. शि. बा. मुळीक (कुडाळी); १५ रा. गो. ब. अमोणकर, रा. दा. अ. कारे, रा. ना. भा. नाईक, रा. आर. एस्. देसाई, रा. बी. आंर. प्रभु, रा. नी. वि. दळवी, रा, कृ. द. वर्दे, रा. वि. का. शिखरे, रा. वि. रं. शेलडेकर (गोमांतकी); १६ रा. क. रा. आंबेवाडी, रा. पु. ल. ओगले, रा. रा. रा. करंदीकर, कै. वा. रा. गुत्तीकर, डॉ. के. वा. साठे (कर्नाटकी); १७ प्रो. द. सी. पंगु, रा. कृ. ना. देशपांडे, रा. के. रा. कुलकर्णी (करवीर प्रांतीय); १८ रा. राजारामपंत पिंगळे (तंजावर मराठी); १९ डॉ. भोईर (आगरी); २० रा वा. अ. खलप, (सीगन–जिप्सी).

४ यानंतरचें महत्त्वाचें शब्दसंशोधनाचें क्षेत्र म्हणजे कारुवाङ्मय होय. महाराष्ट्रांत अनेक धंदेवाईक लोक आपल्या धंद्याच्या कामीं निरनिराळ्या कृति, साधनें व वस्तु याकामीं अनेक साधे, सुगम व सुटसुटीत शब्द वापरतात परंतु हे शब्द फक्त त्यांच्याच वेटाळ्यांत रूढ असतात. सुशिक्षित अथवा नागर समाजांत ते मुळींच रूढ नसून जवळजवळ अपरिचित असतात. शिवाय अलीकडे इंग्रजी शिक्षणामुळें व सुशिक्षित लोकांचें अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीमुळें या लोकांतहि आपल्या स्वतःच्या शब्दांऐवजीं इंग्रजी शब्दांस अधिक शिष्ट मानण्यांत येऊन त्यांचा उपयोग करण्याची अनिष्ट प्रवृत्ति वाढत चालली आहे व प्रत्येक पिढींत अनेक निजशब्द मागें पडत जाऊन त्यांची जागा शुद्ध अथवा हेंगाडे इंग्रजी शब्द घेऊं लागले आहेत. सुताराला गलथा शब्दाऐवजी कारनीस शब्द अधिक जवळ वाटूं लागला आहे. साधणीजी जागा पाणसळच नव्हे तर लेव्हलबाटली घेऊन बसली आहे. अशा प्रकारें अनेक शब्द विस्मृतिपथास लागले आहेत हे शब्द जिवंत ठेवणें याच पिढींत शक्य होतें म्हणून तिकडे विशेष लक्ष्य देऊन हे असे शब्द जमविण्याची पुष्कळच खटपट मंडळानें केली. त्याकरितां महाराष्ट्रांतील निरनिराळ्या धंद्यांची यादी करून ते धंदे ज्या भागांत चालतात त्या भागांतील आस्थेवाईक मंडळीस पत्रें पाठवून व कशा तऱ्हेनें हे शब्द जमवावयाचे त्याची माहिती देणारीं पत्रकें व पत्रिका पाठवून असे

शब्द जमविण्याची शिकस्त करण्यांत आली. या कामीं अनेक साहित्यसंस्थांनीं व व्यक्तींनीं आम्हांस साहाय्य केलें त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

धंदेविषयक शब्दसाहाय्यक

१ रा. ब. ग. के. केळकर, रा. गो. भि. देशमुख, रा. कृ. गो. साठे (शेती). २ रा. शं. आ. पोतदार (सोनारी). ३ रा. के. रा. कुलकर्णी (शिवणकाम). ४ रा. कृ. परांजपे (सुतारी). ५ रा. राऊत (चांभारी). ६ रा. र. ग. बोंदरडे (विणकाम). ७ रा. वि. दे. सारंग, रा. अ. दा. केळकर (नाविक). ८ रा. सहस्रबुद्धे (शारीर). ९ रा. पी. डी. कान्हेरे, रा. रा. स देशपांडे, रा. रा. ब. हिवरगांवकर (स्थापत्य). १० पं. द. के. जोशी (संगीत-नृत्य). ११ रा. शं. बा. मुजुमदार (नाट्य). १२ रा. गो. गो. मुजुमदार (बुद्धिबल क्रीडा). १३ श्री. बाळासाहेब पटवर्धन, चीफ ऑफ् मिरज (जंबिया, कुस्ती). १४ रा. ल. के. भावे (कायदा). १५ रा. वि. त्रि. खरे, रा. ग. स. मराठे (विमा). १६ रा. म. ल. खांबेटे, रा. अ. द. केळकर (मोतीं, रत्नासंबंधीं). इ.

याखेरीज मंडळानें पगारी माणसें नेमून त्यांस निरनिराळ्या कारागिरांच्या घरीं व दुकानांत पाठवून त्यांस समक्ष विचारून बरेचसे शब्द गोळा केले. तसेंच असे शब्द पाठविणारास कांहीं पारितोषिकहि देण्यांत येईल अशी एक योजना केसरीमध्यें प्रसिद्ध केली. व विशेष सहाय्य करणारास प्रत्यक्ष रकमेऐवजीं शब्दकोशाची प्रत देण्यांत आली.

वर्णानुक्रम रचना—शब्दांचें संकलन पूर्ण होत आलें तेव्हां कोशाची रचना कशी करावी हा प्रश्न पुढें उभा राहिला. मराठी किंवा सामान्यतः देशी भाषांतील शब्दांची वर्णानुक्रमरचना कशी करावी याबद्दल फारच मतभेद आहेत व अद्यापि एक-पद्धति अशी बसलेली नाहीं. क्ष व ज्ञ हीं जोडाक्षरें उगीचच वर्णमालेंत शिरलीं आहेत. अनुनासिक आणि अनुस्वार व त्यांत पुन्हां परसवर्णोच्चारित आणि अपरसवर्णोच्चारित अनुस्वार, उष्म वर्णोच्यापूर्वी येणारा अनुस्वार वगैरे अनेक घोटाळे उत्पन्न करणारे प्रश्न पुढें उभे राहतात व या बाबतींत जुन्या कोणत्याहि ग्रंथावरून समाधानकारक मार्गदर्शित्व मिळत नाहीं ही अडचण मला प्रथम महाराष्ट्रीय वाङ्मयसूचींतील ग्रंथकार नामसूची करतांना आली व त्यावेळींहि समाधान-कारक पद्धति बसवितां आली नाहीं. तोच प्रश्न आतां विशेष महत्त्वाचा व प्रामुख्यानें पुढें येऊन उभा राहिला. तेव्हां इतर विद्वानांकडून तरी मार्गदर्शित्व मिळेल म्हणून महाराष्ट्र साहित्य-परिषदेच्या पुणें शाखेमार्फत या मराठींतील वर्णानुक्रमरचने-संबंधीं चर्चा करण्याचा उपक्रम केला; परंतु तीन दिवसांच्या चर्चेनंतरहि समाधानकारक मार्ग सांपडला नाहीं तेव्हां अखेरीस शब्द पाहणाऱ्यास सुलभ पडेल अशी वर्णानुक्रम रचना अनुसराबी, रूढीपासून फार दूर जाऊं नये असें ठरवून जी पद्धति अंगीकारावयाची तिचा स्पष्ट निर्देश प्रथम करावयाचा एवढें ठरवून सध्याच्या पद्धतीचा म्हणजे जवळ जवळ मोल्स्व-र्थेनें वापरलेल्या पद्धतीचा स्वीकार करावयाचें सर्व संपादकांच्या विचारें ठरविलें.

व्युत्पत्ति शोधन—शब्द संकलनानंतर करावयाच्या क्रियां-पैकीं एक महत्त्वाची क्रिया म्हणजे व्युत्पत्तिनिश्चिति. या कामीं फारच मोठ्या अभ्यासाची व परिश्रमाची आवश्यकता असते; तेव्हां या क्षेत्रांत ज्यांचा विशेष अभ्यास आहे अशा विद्वान् गृहस्थांचें या कामीं साहाय्य घेण्याचा संकल्प करून एका व्युत्पत्ति-चर्चा मंडळीची स्थापना करण्यांत आलीं व या मंडळाच्या आठ-वड्यांतून दोन दिवस सभा भरवून कांहीं कठिण शब्दांच्या व्युत्पत्तिसंबंधीं चर्चा करून व्युत्पत्ति निश्चित करण्याचा उपक्रम करण्यांत आला. या मंडळींत अनेक निरनिराळ्या क्षेत्रांत अभ्यास करणाऱ्या व्यक्तींचा समावेश करण्यांत आला होता त्यांपैकीं प्रमुख मंडळीचीं नांवें पुढें दिलीं आहेत:-

श्री. बाबासाहेब देशपांडे, रा. न. रा. गोडबोले, प्रो. वै. का. राजवाडे, रा. गो. कृ. मोडक, रा. वि. रा. शिंदे, डॉ. प्रो. पी. व्ही. बापट, प्रो. डॉ. र. ल. वैद्य, प्रो. कृ. पां. कुळकर्णी, श्री. मुकुंदशास्त्री मिरजकर वगैरे. या सर्व मंडळीनीं अनेक सभांस उपस्थित होऊन आम्हांस केलेल्या साहाय्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

यानंतरहि प्रत्यक्ष हस्तलिखित प्रत तयार झाल्यानंतर तींतील फक्त व्युत्पत्तीचा भाग तपासून द्यावा अशी एका साक्षेपी भाषाभ्यासकास विनंति करण्यांत आली होती व अशा तऱ्हेचें काम दररोज सुमारें तास दीडतास करण्याबद्दल दरमहा २५ रुपये पर्यंत पारितोषिक देण्याचें योजिलें होते; परंतु सदरहू सद्गृहस्थांनीं आमची विनंति मान्य केली नाहीं. असो.

भाषाशास्त्र-व्याख्यानें—याखेरीज संपादकवर्गास व इतर अभ्यासु लोकांसहि भाषाशास्त्राचीं आद्यतत्त्वें लक्ष्यांत यावी व व्युत्पत्तिनिश्चय, अर्थनिश्चय करण्याच्या कामीं साहाय्य व्हावें म्हणून भाषाशास्त्रावर प्रो. कृ. पां. कुळकर्णी, श्री. वि. रा. शिंदे वगैरे कांहीं विद्वानांचीं व्याख्यानेंहि करविण्यांत आलीं. या व्याख्यानांचा कांहीं एम्. ए. पदवी परीक्षेस बसणाऱ्या विद्या-र्थ्यांनींहि लाभ घेतला.

राजवाडे धातुकोश—याचप्रमाणें कै. वि. का. राजवाडे यांनीं जमविलेली धातुकोशाची सामुग्री मंडळीच्या उपयोगी

पडावी म्हणून खटपट करण्यांत आली व त्याबाबद धुळें येथील मंडळीशीं पत्रव्यवहारहि करण्यांत आला पण त्यापासून प्रत्यक्ष कांहीं लाभ न होतां मध्यंतरीं या धातुकोशासंबंधीं चाललेल्या वादविवादांत शब्दकोशाच्या कार्यकर्त्यांविषयीं गैरसमज मात्र पसरविण्यांत आला. परंतु त्यावेळीं आम्हांस वादविवादांत पडून आगीं तेल ओतण्यास सवड नव्हती व इच्छाहि नव्हती म्हणून त्या बाबतींत आम्हीं पूर्णपणें मौन स्वीकारलें होतें. परंतु आतां हें कार्य व धातुकोशाचेंहि कार्य पूर्ण झालें असल्यामुळें त्यासंबंधीं आमची वृत्ति काय होती हें आमच्या ग्राहक व सहानुभूतिक वर्गापुढें तरी स्पष्ट करणें इष्ट आहे व हें कार्य त्यासंबंधीं पुढें दिलेल्या दोन पत्रांवरून होईल अशी आशा धरून त्या पत्रांवर कांहींहि विवरण न करितां तीं पत्रें पुढें देत आहे.

श्री

विश्वनाथो विजयते.

राजवाडे संशोधन मंडळ, धुळें.

सा. न. वि. वि.— १०-१-३४.

आपलें तारीख ८ जानेवारीचें पत्र पावलें, पत्रांत आपण दर्शविलेल्या मनोभावनेबद्दल आपला आभारी आहे. राजवाडयांच्या धातुकोशाविषयीं आपण आपल्या पत्रांत जें लिहिलें आहेत त्याविषयीं थोडा खुलासा करितों. राजवाडयांनीं जो मराठी धातुकोश तयार केला आहे त्याचे उपयुक्ततेविषयीं व सत्यतेविषयीं महाराष्ट्राची अद्याप अकारणे सांशक वृत्ती आहे. आपला कोश वादग्रस्त विषयाव्यतिरिक्त सर्वमान्य व्हावयाचा आहे. ही गोष्ट मनांत येऊन आपण राजवाडयांचा कोश आपल्या ग्रंथाची पुरवणी म्हणून छापणें इष्ट होणार नाहीं. वास्तविक आपला कोश तयार होत असतां राजवाडयांनीं त्यांच्या कोशांत दिलेल्या व्युत्पत्ति आपल्या कोशांतील प्रत्येक शब्दापुढें देणें युक्त व इष्ट झालें असतें. परंतु ही गोष्ट आतां साध्य होणें शक्य नाहीं. शिवाय आपण हातीं घेतलेलें मुख्य काम पुरें झाल्याशिवाय आपणांस हा ग्रंथ छापतां येणार नाहीं. धातुकोशाशिवाय, नामें, विशेषणें, क्रियाविशेषणें इत्यादींच्या व्युत्पत्ति राजवाडयांनीं केल्या आहेत. हें प्रकरण धातुकोशाइतकेंच मोठें आहे. याशिवाय धातुकोशासंबंधाचे राजवाडयांचे दुसरे लेख व अनेक टिपणें आहेत. हें सर्व लिखाण आहे तसेंच छापावयाचें आहे. स्वतंत्र ग्रंथरूपानें हे सर्व लिखाण छापणें युक्त आहे अशी आमच्या मंडळाची समजूत आहे नागपुरास रा. दाते यांनीं मराठी धातुकोशासंबंधीं ठराव रा. देव मांडणार होते त्यास विरोध केला असें समजलें. राजवाडयांचें कार्य हें माझें खाजगी नाहीं. त्यांत माझा वैयक्तिक लाभ कांहीं नाहीं. हें लक्षांत घेऊन ठरावास विरोध केला गेला नसता तर बरें झालें असतें. विरोध झाल्यानें कांहीं बिघडत नाहीं. येथें प्रसिद्धीची योजना यशस्वी होणार यांत संदेह नाहीं. आमच्या कार्यास यशप्राप्ती व्हावी अशी सदीच्छा ठेवावी एवढेंच मागणें आहे. कळावें, लोभ असावा.

आपला,

भा. वा. भट.

श्री. भा. वा. भट. धुळें यांसः—

ता. १०।३।३४.

सा. न. वि. वि.

आपलें १०।१।३४ चें रा. चिं. ग. कर्वे यांस आलेलें पत्र त्यांनीं मला दाखविलें त्यावरून राजवाडे धातुकोशासंबंधीं आमच्या विचारांबद्दल आपला थोडाफार गैरसमज झाल्यासारखें वाटतें म्हणून हें पत्र लिहीत आहे. कै. राजवाडे यांनीं धातुकोशाचें कार्य आरंभिलें होतें त्यावेळीं ते डेक्कन जिमखान्यावर माझ्या शेजारींच रहात होते. त्यावेळीं त्यासंबंधीं आमचें पुष्कळ बोलणें झालें होतें. त्यावेळीं मी ज्ञानकोशाचें कार्य करीत होतों व जमल्यास ज्ञानकोशमंडळामार्फतच तें काम छापलें जावें अशी आमची इच्छा होती व त्याप्रमाणें मी संपादित असलेल्या विद्यासेवकामध्यें प्रसिद्धहि केलें होतें. पुढें ज्ञानकोशमंडळाशीं माझा असलेला संबंध सुटून मी कांहीं सहकाऱ्यांसह शब्दकोशाचें कार्य सुरू केलें. त्यावेळींहि धातुकोश आमच्या दृष्टीआड नव्हता. एवढेंच नव्हे तर आम्ही स्थापित केलेल्या व्युत्पत्तिचर्चामंडळाच्या अनेक बैठकींत त्यांतील चिठ्ठयांचा उपयोग करण्यांत आला होता. कारण त्यावेळीं त्या चिठ्ठया रा. कुळकर्णी यांजजवळ असून ते येथेंच होते.

आतां शब्दकोश व धातुकोश यांचा संबंध जोडण्याची आमची योजना अशी होती कीं धातुकोशांतील व्युत्पत्तींचा पूर्ण उपयोग शब्दकोशांतील व्युत्पत्ति देतांना करावयाचा, मात्र शब्दांच्या शेवटीं संपादकांस मान्य तेवढया व्युत्पत्ती द्यावयाच्या; कांहीं तुलनात्मक स्वतंत्र राजवाडे नांव घालून द्यावयाच्या व तशा सध्याच्या कोशांतहि कांहीं ठिकाणीं राजवाडे यांनीं प्रकाशित केलेल्या स्थळांचा उल्लेख करून दिलेल्या आपणांस आढळतील. व याखेरीज राजवाडयांचा धातुकोश सर्वच पुरवणी म्हणून जितकीं अक्षरें कोशांत येतील तितक्या अक्षरांचा त्या त्या भागांत छापावयाचा व याच्याच अधिक प्रती (Off prints) छापल्या म्हणजे स्वतंत्र धातुकोशाचें पुस्तकहि तयार होईल. सध्या आमच्या प्रस्तावनेचीं स्वतंत्र पुस्तकें आम्ही छापलीं आहेतच. अशा रीतीनें राजवाडयांच्या ग्रंथांत कोणताहि फेरफार न होतां तो छापला गेलाच असता पण त्याचा शब्दकोशरचनेसहि उपयोग

झाला असता. परंतु आपली इच्छा तशी नव्हती यामुळें शब्द-कोशास त्याचा उपयोग होऊं शकला नाहीं हें मराठी भाषेचें दुर्दैव. राजवाडे धातुकोश स्वतंत्रतेनें केव्हांही छापला गेलाच असता याबद्दल आम्हास कधींच संशय वाटला नाहीं. कारण अशा कामाची आतां आम्हास संवय झाली आहे.

आतां नागपुरास साहित्य संमेलनप्रसंगीं जें झालें त्यासंबंधींहि थोडें लिहिणें आवश्यक दिसतें. आपणांस हें विदितच असेल कीं राजवाडे यांच्या धातुकोशावद्दलचा ठराव कोल्हापूर येथील साहित्य संमेलनाच्यावेळीं माझे मित्र रा. निजसुरे यांनीं मांडला होता. त्या वेळीं मी संमेलनास, विषयनियामक कमिटीच्या बैठकीस वगैरे सर्वत्र हजर होतों. एवढेंच नव्हे तर ठरावांचें लेखन (Drafting) विषयनियामक मंडळीकरितां मींच केलें होतें. ही गोष्ट रा. निज-सुरे यांस ठाऊक असेल; निदान एक चिटणीस प्रो. पटवर्धन हे या बाबतींत साक्ष देतील. त्यावेळीं जर राजवाडे धातुकोशावद्दल आमच्या मनांत कांहीं किंतु असता तर तेथेंहि विरोधाचा सूर निघणें शक्य होतें पण तसें कांहीं झालें नाहीं. व तो ठराव विषय नियामक मंडळांत व संमेलनांत विनाविरोध म्हणून अध्यक्षांकडून मांडला गेला व पासहि झाला.

आतां त्याच विषयावर पुन्हां दुसऱ्याच वर्षी ठराव मांड-ण्याची जेव्हां विषयनियामक मंडळींत रा. देव यांनीं प्रस्तावना केली तेव्हां तत्त्वतः अशा एकच ग्रंथाबद्दल संमेलनांत ठराव दरवर्षी करणें साहित्यसंमेलनाच्या दृष्टीनें ठीक नव्हे, यामुळें पुढेंपुढें त्रास होईल व अनवस्था प्रसंग येईल व अनेकांना नाखूष करावें लागेल असें मी आपलें मत मांडलें यांत कांहीं गैर झालें असेल असें मला अद्यापहि वाटत नाहीं व ही विचारसरणी रा. देव यांसहि पटली व त्यांनीं ठराव पुढें मांडला नाहीं व संमेलनांतील आपल्या भाषणांतहि(साहित्यपरिषदेस मदत करण्यासंबंधींच्या) या गोष्टीचा उल्लेख करून माझें मत त्यांस रास्त वाटल्याचें बोलून दाखविलें. या प्रकारचा ठराव त्याच बैठकींत एवढाच नव्हता. दुसरा टिळक-विद्यापीठास मदत करण्यासंबंधींचा होता व तोहि याच मुद्यावर संमेलनांत मांडूं नये असें. सर्वानुमतें ठरलें. आतां रा. राजवाडे किंवा लो. टिळक यांची योग्यता यामुळें कोणास कमी वाटते असें त्यावेळीं कोणासच वाटलें नाहीं व त्यांच्या कार्यास संमे-लनाच्या एखाद्या ठरावानें कांहीं विशेष बळ येईल असेंहि नाहीं. शिवाय या सर्व गोष्टी विषयनियामक मंडळींत झाल्या, संमेलनांत नव्हे; व समजा, रा. देव यांस जर ठराव मांडावयाचाच असता तर त्यांच्या सारख्या वक्तृत्वसंपन्न व महाराष्ट्रास पूज्य व परिचित अशा व्यक्तीपुढें माझी दाद कधींच लागली नसती हें मला ठाऊक आहे. व त्यांनीं तशी इच्छा प्रदर्शित केली असती तर विषय-नियामक मंडळांतहि ठरावास विरुद्ध मत देण्याइतका विरोध मीं दाखविला नसता मग संमेलनांत विरोध करण्याची गोष्टच नको. आणि मीहि त्यांस 'आमच्या चांगुलपणाचा अधिक फायदा घेऊं नये' या शब्दांनींच ठराव न मांडण्याबद्दल सुचविलें.

राजवाडे यांचा धातुकोश आपण प्रसिद्ध करणार व तो होणार यांत संदेह नाहीं याबद्दल आम्हालाहि आपल्याप्रमाणेंच आनंद आहे. मात्र मराठी भाषेंत होणाऱ्या शब्दकोशास त्याचा उपयोग झाला असता तर आपल्या भाषेच्या दृष्टीनें तें अधिक चांगलें झालें असतें असें आम्हास वाटतें व तसें अजूनहि वाटतें. आपला कोश प्रसिद्ध झाल्यावर अर्थात् राहिलेल्या भागासाठीं तो आम्हास उपयोगांत आणतां येईलच व तो सहज थोडया किंमतींत घेऊनहि करतां येईल. त्याकरितां तो छापण्याची जबाबदारी आमचेवरची गेली यांत आमचें नुकसान कांहींच झालें नाहीं. नुकसान कोणाचें झालें असेल तर महाराष्ट्र भाषेच्या शब्दकोशाचें व त्याचा उप-योग करणारांचें. त्यांत हर्षविषाद आम्हास कांहींच नाहीं.

असो, आपण लिहिलेल्या माझ्या विरोधाचा व धातुकोशा-संबंधीं माझ्या वृत्तीचा थोडक्यांत अल्पमतीनें जो खुलासा करतां आला तो केला आहे. यानें जें आपलें समाधान होईल तें होईल. यापेक्षां अधिक लिहिण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. असो, लोभ असावा हें विनंति.

आमच्या फिरतींत धुळें मुक्कामीं आलों असतां आपली समक्ष भेट घेण्याची इच्छा होती परंतु आपण औंध येथें गेल्यामुळें भेटीचा योग आला नाहीं. असो.

आपला

य. रा. दाते.

या राजवाडे धातुकोशाच्या कच्च्या चिठ्ठ्यावरून श्री. कृ पां. कुळकर्णी हे पुणें येथें धातुकोशाचें संपादन करीत असतांना आमच्या मंडळांतील श्री. कर्वे यांना मदतीला घेण्याचा त्यांचा विचार होता व त्याप्रमाणें त्यांनीं धुळ्यास विचारलेंहि होतें; पण संमति मिळाली नाहीं, असें समजलें. असो, याप्रमाणें महाराष्ट्र शब्दकोशाच्या कामांत कै. राजवाडयांच्या लिखाणाचा जो सहजा सहजीं फायदा मिळावयाचा तो निदें शकला नाहीं. पण याबद्दल आमचें मंडळ कसें दोषी नाहीं हें वरील मजकुरावरून समजून येईलच. वरील पत्रास उत्तरहि आलें नाहीं. मात्र धातुकोश खप-विण्याकरितां महाराष्ट्रांतील ग्राहक होण्यासारख्या गृहस्थांची यादी करण्याकरितां रा. विश्वनाथराव जावडेकर पुणें येथें आमच्या-कडे आले व आमच्या ग्राहकांची यादी जी सहसा कोणी धंदे-वाईक दाखवीत नाहीं ती, आम्ही त्यांस दिली व त्यावेळीं त्यांस वरील पत्रेंहि दाखविलीं व त्यांनीं त्या बाबतींत आपलें समाधान झाल्याचें बोलून दाखविलें. असो.

प्रतिलेखन—याप्रमाणें सर्व सिद्धता झाल्यावर शब्दपत्रिकांची वर्णानुक्रम रचना करून प्रत्यक्ष मुद्रणप्रत लेखनाची तयारी केली व पुढें दिल्याप्रमाणें पद्धती अनुसरली.

सर्व संपादकांनीं एका टेबलाभोंवतीं बसून समोर शब्दपत्रिका व अनेक कोश ठेवावयाचे व एका शब्दाच्या सर्व पत्रिका वाचून त्यांचें व्याकरण, शक्य ते सर्व अर्थ व व्युत्पत्ति निश्चित करावयाची व निरनिराळ्या अर्थांकरितां अगदीं साधे सरळ अर्थ सोडून शक्य तितकीं अवतरणें धुंडाळावयाचीं. कांहीं अवतरणें शब्दपत्रिकांवर असत, नसतील तेथें आपल्या वाचनाचा अगर पठणाचा अवलंब करून प्रत्येक संपादकानें योग्य व शक्य तीं अवतरणें सुचवावयाचीं व त्यांतून जुन्यांत जुनीं, अधिक परिचित, विशेष सुलभ अशा तऱ्हेच्या अनुक्रमानें निवडून द्यावयाचीं.

शब्दांचे निरनिराळे अर्थ निश्चित करतांना जरूर तेथें चर्चा करून संदर्भग्रंथ पाहून सर्वानुमतें योग्य वाटतील ते अर्थ योग्य शब्दांत नमूद करावयाचे, अशा तऱ्हेची क्रिया करावयाची असे. संपादक वर्ग याप्रमाणें सर्व क्रियांशीं परिचित होऊन आपआपलें कार्य करण्यास जसजसा अधिकाधिक कार्यक्षम होऊं लागला तसतसे त्यास कांहीं पदवीधर मदतनीस देण्यांत आले व प्रत्येक संपादक आपले मदतनीस घेऊन स्वतंत्रपणें प्रतिलेखनाचें कार्य करूं लागला व अशा पद्धतीनें मुद्रणाची कच्ची प्रत तयार करण्यांत आली.

प्रत तपासणी—प्रारंभीं मुद्रणाची कच्ची प्रत तयार करण्यांत आल्यावर तिच्या नागरी टंक (टाइपरायटर) यंत्रानें चार प्रती तयार करण्यांत येऊन त्या चार गृहस्थांस तपासण्याकरितां देण्यांत येऊं लागल्या. यांपैकीं कांहीं गृहस्थ बाहेरगांवींहि राहणारे असत. या प्रती निरनिराळ्या गृहस्थांकडून तपासून आल्यावर संपादकानें त्यांतील दुरुस्ती, सूचना, शंका वगैरेचा विचार करून व सर्वांचा योग्य तो परामर्ष घेऊन शेवटची प्रत तयार करावयाची असा क्रम ठेवला. जोंपर्यंत मंडळाबाहेरचे गृहस्थ तपासावयास मिळूं शकले तोंपर्यंत हा क्रम अव्याहत चालू ठेवला.

मुद्रण—सुमारें सर्व स्वरांचे शब्द लिहून झाल्यावर मुद्रण करावयास प्रारंभ करावयाचें ठरविलें व कांहीं भाग प्रेसकडे पाठविला व फक्त पहिलीं आठ पृष्ठें जुळण्यास सांगितलीं. जुळणी शुद्ध व्हावी, जुळारी तरबेज व्हावे व पाहिजे तितकी दुरुस्ती करणें शक्य व्हावें म्हणून स्वतःचा टाइप वगैरे विकत घेऊन 'शारदा प्रेस' नांवाचा छापखाना काढला; पण छापण्याच्या यंत्रांत रक्कम फार गुंतून राहते व एका यंत्रास केवळ शब्दकोशाचें काम पुरें पडणार नाहीं म्हणून दुसऱ्या छापखान्यांत छापून घ्यावयाची योजना केली.

पहिलीं आठ पृष्ठें जुळून झाल्यावर सुमारें १०० अभ्यासू विद्वान् गृहस्थांकडे पाठवून त्यांच्या सूचना मागविल्या व पुण्यांतील कांहीं गृहस्थांस मुद्दाम पाचारण करून त्यांजबरोबर चर्चा करून योग्य त्या सूचनांचा स्वीकार करून कोश छापण्याच्या पद्धतीचा निश्चय करण्यांत आला व कामास सुरुवात करण्यांत आली.

शब्दकोशाच्या शब्दपत्रिका लिहिणें, त्या तपासणें, शब्दपत्रिकांवरून कच्ची प्रत तयार करतांना करावयाच्या कृती, उदाहरणार्थ व्याकरणसंज्ञा, अर्थनिश्चिति व अर्थांचा क्रम लावणें, अवतरणांची निवड करणें, व्युत्पत्ति देत असतां भाषांचा क्रम लिहिणें वगैरेसंबंधीं वेळोवेळीं योग्य त्या सूचना लेखक व संपादकवर्गास देण्यांत येत असत व सर्व कार्य सुसंगत रीतीनें चालावें व एकपद्धति सर्वत्र अंगीकारली जावी म्हणून अशा सूचना वेगवेगळ्या लिहून त्या सर्व लेखकांस दिल्या जात आणि कार्यालयांत प्रमुख ठिकाणीं फलकांवर लावून ठेवलेल्या असत.

याप्रमाणें मुद्रणप्रतीचा कांहीं भाग तयार करून छापावयास सुरुवात झाली तरी शब्दसंकलनाचें वगैरे कार्य चालूच होतें व प्रत्यक्ष मजकूर छापला जाईपर्यंत नवीन शब्द, अर्थ, अगर योग्य अवतरण सांपडल्यास त्याचा अंतर्भाव करण्यांत येत असे. प्रत्यक्ष शब्द छापून झाल्यानंतर उपलब्ध झालेली माहिती अगर शब्द पत्रिका यांचा पुरवणीकरितां संग्रह करून ठेवण्यांत येत असे.

शब्दकोशाच्या अंतरंगासंबंधीं व धोरणासंबंधीं कांहीं गोष्टींचा वर उल्लेख आलाच आहे. याशिवाय कांहीं बाबींचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे म्हणजे तें निदान पुढील कार्यकर्त्यांस उपयुक्त होईल.

परकीय शब्द—कोणत्याहि जिवंत, चालू व वाढत्या भाषेचा कोश करावयाचा म्हणजे त्या भाषेंतील शब्द जमविण्यास कितीहि वेळ दिला तरी तो अपुराच पडणार हें प्रत्येक कोशकाराच्या अनुभवास येतें व आम्हांस तर आमच्या ग्राहकांचा विश्वास कायम ठेवावयाचा तर या कार्यास कांहीं तरी मर्यादा घालणें अवश्यच होतें; याकरितां मागें वर्णिल्याप्रमाणें शक्य ते प्रयत्न करून शब्द जमविण्याचें कार्य अव्याहतपणें चालू ठेवलें तरी सुमारें ४ वर्षांनंतर या कार्याकडील लक्ष्य कमी करून तें पुढील कार्याकडे देणें अवश्य झालें. त्यामुळें तेवढ्यांत मुख्यतः जें शब्दसंकलन झालें त्यावर सुरुवात करावी लागली व पुढें हें कार्य तुरळक स्वरूपांत झालें. त्यामुळें कांहीं शब्द घ्यावयाचे राहिले असणें शक्य आहे. शब्दसंकलन करीत असतां मराठी

भाषेंत शिरलेल्या परकीय शब्दांचा समावेश कितपत करावा हा मोठा महत्त्वाचा प्रश्न पुढें उभा राहिला. मराठी भाषेंत मूळ संस्कृत तत्सम शब्द, तद्भव शब्द व येथील मूळ कांहीं देश्य शब्द हे आद्य घटक होत. पण याखेरीज महाराष्ट्रीय लोकांचा ज्या अनेकभाषाभाषी लोकांशीं संबंध आला त्यांनीं अनेक शब्द या भाषेंत रूढ केले आहेत; त्यांपैकीं मुख्य म्हणजे अरबी, फारसी, उर्दू, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी या परकीय व कानडी, तेलगू वगैरे द्राविड तशाच गुजराती, हिंदी वगैरे देश्य भाषा या होत.

यांपैकीं कानडी, तेलगू वगैरे भाषांतील बरेच शब्द आत्मसात् होऊन गेले आहेत, गुजराती, हिंदी फारसे नाहींत पण अरबी, फारसी व उर्दू या भाषांची छाप दीर्घकाल पडून शासन शास्त्रासारखे कांहीं प्रांत तर त्यांनीं बरेचसे बळकावले आहेत. तसेंच पोर्तुगीज व फ्रेंच शब्दांचा प्रवेश जरी पूर्वी झाला असला तरी आज बंद झाला आहे. परंतु इंग्रजीचें आक्रमण भरमसाटपणें चालू आहे. तेव्हां या बाबतींत विवेक करणें प्राप्त आहे. अशा वेळीं भाषाशुद्धि करणाऱ्याची भूमिका स्वीकारून सर्व परकीय किंवा परसंभव शब्दांचें एकसहा निष्कासन करावयाचें किंवा कांहीं मध्यम मार्ग आचरावयाचा हा प्रश्न संपादकांपुढें पडला व अखेरीस कोशकाराचें कार्य हें संग्राहकाचें कार्य असून भाषाशुद्धिकाराचें नव्हे, तेव्हां संग्रह करतांना तरी मराठी वाङ्मयांत आढळणाऱ्या सर्व शब्दांच्या पत्रिका करण्यांत याव्यात. त्या अवस्थेंत तरी त्यांत गाळागाळी करूं नये असें धोरण प्रथम ठरविण्यांत आलें. अर्थात् जे परकीय शब्द संग्रहीत करण्यांत आले ते मराठी ग्रंथांतूनच निवडण्यांत आले होते. वर्तमानपत्रें वगैरे चालचलाऊ वाङ्मयांतून नव्हे ही गोष्ट येथें नमूद करणें जरूर आहे.

यानंतर फारसी, अरबी, उर्दू वगैरे भाषांतून आलेले शब्द जे अत्यंत रूढ होऊन गेले आहेत किंवा जुना पत्रव्यवहार, बखरी, दस्तऐवज, कागदपत्र वगैरेमध्यें आढळतात त्यांचा शुद्ध अगर अपभ्रष्ट ज्या स्वरूपांत ते आढळतील त्या स्वरूपांत संग्रह करून कोशांत अंतर्भाव करावयाचा असें ठरविलें. कानडी, तेलगू व तद्भव शब्द तर आत्मसात् झालेच होते. पोर्तुगीज, फ्रेंच वगैरे भाषांतील शब्दहि ऐतिहासिक कालांतच रूढ होऊन बहुतेक अपभ्रष्ट स्वरूपांत, भाषेंत मिसळून गेले होते. इंग्रजी शब्दांच्या बाबतींत मात्र जरी संग्रह करतांना सढळ हात ठेवला होता तरी प्रत्यक्ष कोशांत घालतांना बरीच काटाकाट करण्यांत आली व दुसऱ्या विभागापासून पुढें तर अगदींच आत्मसात् झालेले तेवढेच शब्द फार अल्प प्रमाणांत घेण्याचें ठरविण्यांत आलें.

म्हणी—म्हणींचा संग्रह जरी विस्तृत प्रमाणांत करण्यांत आला तरी विशिष्ट शब्दांचा विशेष अर्थ देण्याच्या कामीं उदाहरणादाखल जेथें उपयोग झाला तेथेंच म्हणींचा अंतर्भाव कोशांत झाला; पण साध्या 'अती राग भीक माग.' 'भटो लग्न करा तर म्हणे तुम्हीच वाईल व्हा.' 'राजाला दिवाळी माहीतच नाहीं.' अशा प्रकारच्या म्हणी प्रत्यक्ष कोशांत अंतर्भूत झाल्या नाहींत. याकरितां जमलेल्या साहित्यांत भर घालून म्हणींचा व वाक्संप्रदायांचा एक स्वतंत्र कोश करावयाचा विचार आहे.

अवतरणें—अवतरणें कोणत्या क्रमानें व किती द्यावयाचीं याबद्दलहि निश्चित पद्धति अंमलांत आणतां आली नाहीं. अवतरणें कालानुक्रमें द्यावयाचीं तर विशेषतः मध्यकालीन पद्य वाङ्मयांत अनेक शब्दांस ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, दासोपंत, श्रीधर वगैरे अनेक कवींचीं तुल्यबल अवतरणें आढळून येत त्यांत निवड करणें कठीण होऊं लागलें. सर्वांत प्राचीन द्यावें तर ज्ञानेश्वर, महानुभावी अवतरणेंच फार येऊन पुढील कवींचीं अवतरणें मागें ठेवावीं लागतीं; तेव्हां त्यांतल्या त्यांत जुनें पण शक्यतर अधिक परिचित अवतरण प्रथम द्यावयाचें व नंतर इतर द्यावयाचीं असें धोरण ठेवलें. पहिल्या भागांत एकाच अर्थास एकाहून अधिकहि अवतरणें देण्याचा क्रम स्वीकारला, पण त्यामुळें पृष्ठसंख्या फारच आटोक्याबाहेर जाईल असें दिसूं लागलें. २५०० पृष्ठांचा अजमास होता तो ३००० वर जाणार हें तर शब्दसंख्येवरूनच दिसूं लागलें, परंतु अवतरणें भरपूर दिल्यास ५००० संख्याहि कमी पडेल असें वाटूं लागलें. तेव्हां एकापेक्षां अधिक अवतरणें देण्याचें धोरण कमी केलें, जमविलेलीं अवतरणें तर शक्यतों द्यावयाचीं हे धोरण ठेवलें पण जेथें एक अवतरण असेल तेथेंहि शोधून शोधून अधिक अवतरणें घालावयाचें धोरण कमी केलें.

पृष्ठसंख्येप्रमाणें कालमर्यादेकडेहि पाहणें अवश्य होतें. संकल्पित ५ ते ७ वर्षांपेक्षां तीन वर्षें अधिक लागलीं. यापेक्षां अधिक काल या कार्यास दिला असता तर आमचा ग्राहकवर्ग अधिकच अधीर झाला असता असें दिसूं लागलें. यामुळें सामान्यतः तिसऱ्या भागानंतर अवतरणांच्या बाबतींत हात आंखडता घ्यावा लागला.

अवतरणें देण्याच्या बाबतींत दुसरी एक महत्त्वाची गोष्ट लक्ष्यांत घ्यावी लागते ती म्हणजे ज्या ग्रंथांतील अवतरण द्यावयाचें त्याची संशोधनपूर्वक पाठशुद्ध आवृत्ति उपलब्ध असावी लागते पण मराठीमध्यें ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथाचीहि संशोधनपूर्वक शुद्ध पाठांची आवृत्ति अद्यापि तयार झाली नाहीं मग तुकाराम, मोरोपंत, वामन किंवा इतर कवींची काय कथा ?

ज्ञानेश्वरींतील अवतरणें देतांनाहि राजवाडेप्रत, माडगांवकरप्रत, वेंकटस्वामीप्रत वगैरेमध्यें पाठभेद दिसून आल्यामुळें त्या प्रतींचा निर्देश करून कांहीं अवतरणें दिलीं आहेत.

तसेंच बखरी व ऐतिहासिक कागदपत्रांत वाचनाच्या असंख्य चुक्या आढळतात. उदा० नाहकबद्दल जाहला, सानकबद्दल साजक वगैरे. त्यामुळें फारच घोंटाळा होतो. या बाबतींतहि संशोधकांनीं लक्ष्य दिलें पाहिजे.

कांहीं काव्यग्रंथांत तळटीपांत चुकीचे अर्थ दिल्यामुळेंहि कोशकारांची अनेक ठिकाणीं दिशाभूल होण्याचा संभव असतो.

व्युत्पत्ति—व्युत्पत्तीच्या बाबतींत आम्हीं काय प्रयत्न केले ते पूर्वी सांगितलेच आहेत. या कामीं जेवढा वेळ द्यावा व जितकें सहाय्य घ्यावें तितकें थोडेंच आहे. त्यामुळें या बाबतींत समाधानकारक परिश्रम झाला नाहीं. शक्य तो केला आहे. संस्कृत शब्द मराठींत कोणत्या पायऱ्यांनीं आला हें दाखविणें अवश्य आहे पण तें तितकेंच वादग्रस्त होण्याचा संभव आहे व केवळ कोशकार म्हणून केवळ अनुमान धपक्यावर व्युत्पत्ति ठोकून देणें रास्त नव्हे, या विषयाचा विशेषतः प्राकृत भाषांचा अभ्यास अधिक झाल्याशिवाय मधील टप्प्यांचा निश्चय करणें सुलभ नाहीं. तेव्हां चुकीचें लिहिण्यापेक्षां न लिहिणें बरें असें समजून व्युत्पत्ति सांग न देतां फक्त दिग्दर्शित केल्या आहेत. फारसी व अरबी व्युत्पत्ति देतांनाहि अनेक शब्द मूळ अरबी असून फारसीमार्फत मराठींत आले आहेत ते केवळ फारसी म्हणून न देतां त्यांची मूळ अरबी व्युत्पत्ति दिली पाहिजे. कारण शुद्ध फारसी भाषा ही संस्कृतची बहिण–अवेस्तापल्हवी मार्फत–असल्यामुळें शुद्ध फारसी व संस्कृत शब्दांत धातुसाम्य आढळतें तसें अरबींतून फारसींत आलेल्या शब्दांतं नसतें. या बाबतींत फारसी कोशांचाहि व्हावा तितका उपयोग होत नाहीं. संस्कृत जाणणारे फारसीचे व अरबीचे अभ्यासक उत्पन्न होतील तेव्हां याकामीं अधिक संशोधन होऊन ही शाखा पूर्णत्वास येईल. व्युत्पत्तिसंशोधन हें एकट्यादुकट्या व्यक्तीचें कार्य नसून त्यास अनेक संशोधक अभ्यासकांचें साहाय्य होईल तरच तें विचारांत घेण्यासारखें होईल, असो.

वास्तविक कोशामध्यें प्रत्येक शब्दाचा इतिहास दिला गेला पाहिजे ही जी कोशाच्या परिपूर्णतेची कल्पना ती साध्य व्हावयास आपल्यास अजून पुष्कळच वाट पहावी लागेल असें दिसतें.

उच्चारचिन्हें—याशिवाय तालव्य व दंत्यतालव्य च वर्ग, शब्दावरील जोरामुळें उच्चारांचें दीर्घीकरण वगैरे बाबतींत शब्दांचे उच्चार स्पष्ट कळण्यासाठीं उच्चार देणें कोशांत अवश्य असतें पण तेंहि छापण्याच्या कामीं योग्य साधनाभावीं करतां आलें नाहीं.

कांहीं विद्वानांचें म्हणणें असें असतें कीं शब्द शुद्ध स्वरूपांत तेवढेच कोशांत अंतर्भूत करावे अपभ्रष्ट रूपें देऊं नये. परंतु शब्दकोश रचनेचें शास्त्र काय यासंबंधीं पहिल्या विभागाच्या प्रस्तावनेंत आम्ही विवेचन केलेंच आहे (पृ. २६–२७). कोशकाराचें काम केवळ अभिजात शब्द देणें हें नसून 'कोश म्हणजे केवळ भाषेतील शब्दांचा संग्रह असावा' हें डीन ट्रेंच याचें म्हणणेंच आज सर्वमान्य झालें आहे. त्यामुळें भिन्न रूपांतहि शब्द दिल्यास पाहणाऱ्यास सुलभ होतें. मात्र तो शिष्ट कीं अशिष्ट, शुद्ध कीं अशुद्ध वगैरे दिग्दर्शित केलें म्हणजे झालें.

पुरवणी—शब्दसंकलन कितीहि कसोशीनें केलें तरी जोंपर्यंत सर्व मराठी बोलणाऱ्यांमध्यें या कामासंबंधीं आस्था उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत प्रांतिकशब्द, बोलींतील शब्द व कारु वाङ्मयातील शब्द संपूर्णतया संकलित होणें शक्य नाहीं, त्यामुळें कांहीं शब्द राहिले असणें शक्य आहे. कांहीं आम्हीं पुरवणीकरितां जमविले आहेत. तथापि आणखी कांहीं दिवस प्रयत्न झाल्यास नष्ट होण्याच्या मार्गास लागलेले हे शब्द संकलित होणें शक्य आहे. तसेंच निरनिराळ्या गणभाषांचे कोश झाल्यास हें कार्य अधिक सुलभ होईल.

आतां कोणी म्हणेल कीं ही प्राथमिक कार्ये झाल्याशिवाय आधीं शब्दकोश तयार करावयास कां घेतला? तर त्यास उत्तर एवढेंच देतां येईल कीं, सामान्यतः भाषेतील सर्व शब्द देणाऱ्या कोशाची जरूर आज पन्नास वर्षांपासून लोकांस वाटत आली आहे व ती आजपर्यंत मोठमोठ्या लोकांनीं प्रयत्न करूनहि पूर्ण झाली नाहीं. उदाहरणार्थ रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलीक यांनीं सरकारच्या साहाय्यानें एक कोश करण्याचा प्रयत्न केला होता. त्याप्रमाणेंच लो. टिळक यांचे स्नेही रा. माधवराव नामजोशी यांनी एक प्रयत्न केला होता. पण हे दोन्ही प्रयत्न दृश्य स्वरूपास पोंचले नाहींत. आज आमच्याजवळ ज्ञानकोशामुळें एक कार्यकर्त्यांचा निदान संच तरी होता व हीं कामें एकट्यादुकट्या व्यक्तीचीं नाहींत; तेव्हां आज संपूर्ण मिळत नाहीं म्हणून अजीबात कांहींच न करण्यापेक्षां शक्य तेवढें करावें व या संधीचा फायदा घ्यावा म्हणून हें कार्य यावेळीं हातीघेण्यांत आलें. नाहीं तर या पिढींत तरी हें झालें नसतें. व जो तो केवळ व्हावें म्हणून म्हणत असतो पण प्रत्यक्ष करावयास पुढें कोणीच होत नाहीं, ते आम्ही झालों एवढेंच. आम्हीं कोश करावयास घेतला त्याचवेळीं ज्ञानेश्वरीचा एक स्वतंत्र कोश आम्ही करीत आहों असें एक मुंबईचे प्रोफेसर मजजवळ म्हणाले होते; परंतु त्याचा अद्यापि कोठें मागमूस दिसत नाहीं. असो.

मुद्रितांची तपासणी कितीहि कसोशीनें केली तरी कांहीं मुद्रणदोष राहणें अपरिहार्य आहे; तसे ते या कोशांतहि राहिले असले पाहिजेत. तथापि आजच घाईनें शुद्धिपत्र काढण्यापेक्षां कांहीं दिवस जाऊं देऊन पुरवणीबरोबरच शुद्धिपत्र काढल्यास तें अधिक उपयुक्त होईल असें वाटून आजच शुद्धिपत्र जोडलें नाहीं.

आर्थिक बाजू—१ एप्रिल १९२८ या दिवशीं आम्ही ज्ञानकोश मंडळ सोडून बाहेर पडलों. प्रारंभीं रा. दाते, रा. कर्वे,

रा. चांदोरकर व रा. टिळक अशी मंडळी एकत्र येऊन नवीन कार्याची योजना करावयाची असें घाटत होतें व त्याप्रमाणें केसरी मध्यें जाहीरहि केलें होतें. यावेळीं ज्ञानकोशमंडळाच्या पुनर्घट नेच्या वाटाघाटी चालूच होत्या. त्यामध्यें येथें खोलांत शिरण्याचें कारण नाहीं. ज्ञानकोश मंडळाचा किंबहुना ज्ञानकोश रचनेचा इतिहास जरी लिहिला गेला असला तरी अलिखित वृत्तांतहि मोठा आहे पण तो लिहिण्याचें हें स्थान नव्हे. असो, आम्हीं वर लिहिल्याप्रमाणें १ एप्रिल रोजीं ज्ञानकोशमंडळांतून निघालों व शब्दकोशाच्या कार्यास लागलों. परंतु ज्ञानकोशमंडळाची निरवा-निरव करण्यास रा. टिळक यांची अवश्यकता असल्यामुळें ते पुन्हां तिकडेच राहिले व रा. दातार हे आमच्याकडे आले व हळूहळू ज्ञानकोशांतील इतरहि कांहीं मंडळी जरूर तशी आम्हीं लावून घेतली.

ज्ञानकोशमंडळांतून बाहेर पडलों त्यावेळीं किंवा त्यापूर्वी वेळेवर व पूर्ण असा पगार कोणासच कधींच मिळत नसे, त्यामुळें यावेळींहि कोणाजवळ एका पगाराचेहि पैसे नव्हते. तेव्हां शक्य तेवढया कमी खर्चांत काम करावयाचें ठरविलें व लागलीच शब्द कोशाची योजना तयार असल्यामुळें भावी कंपनीचे भागीदार मिळविणें व ग्राहक मिळविण्याचें कार्य सुरू केलें.

प्रथम कार्य फारसें नसल्यामुळें आम्हीं चालविलेल्या सर स्वती मंदिर संस्थेतच कचेरीचें काम करीत असूं; त्यामुळें भाडयाचाहि खर्च नसे. व ज्ञानकोशमंडळाचीच जागा सरस्वती-मंदिर संस्थेनें घेतल्यामुळें त्याच जागेंत काम करण्यास मिळे. पुढें काम वाढल्यावर कांहीं दिवसांनीं प्रथम एक व नंतर दोन अशा खोल्या तेथेंच भाडयानें घेण्यांत आल्या व मुद्रणप्रत तयार होईपर्यंत त्याच जागेंत काम चालविलें. पुढें मुद्रणाच्या सोईकरितां जमखंडीकरांच्या वाडयांत कचेरी आणण्यांत आली व स्वतः कंपोज करून गणेश प्रिंटिंग छापखान्यांत पहिले दोन भाग छापून घेतले; पण त्यांत दिरंगाई फार होऊं लागल्यामुळें छापण्याचें काम दुसरीकडे द्यावें लागलें व गणेश प्रिंटिंगला ती जागा पाहिजे असल्यामुळें त्यांनीं आम्हांस नोटीस दिली तेव्हां तेथें सोईस्कर जागा नव्हती म्हणून पूर्वीच्या ज्ञान कोशाच्या जागेंत म्हणजे शनवार वाडयाजवळील फुटक्या बुरजाजवळच्या मोतीवाल्यांच्या वाडयांत कचेरी आणण्यांत आली व ती आजतागायत तेथेंच आहे. या एकंदर प्रकारांत जागाभाडयाचा खर्च मंडळीस फारच अल्प प्रमाणांत करावा लागला.

कितीहि कमी खर्च करावयाचा म्हटला तरी कांहीं तरी खर्च करावा लागतोच व तो भागविण्याकरितां भागीदार व ग्राहक मिळविण्याचें काम सर्वांनीं सतत नेटानें चालविलें होतें व पहिल्याच भागवाटणींत ८६७ भाग वाटले गेले, हें पूर्वी सांगितलेंच आहे. आम्हा प्रथम चार कार्यकर्त्यांबाहेरचे पहिले भागीदार म्हणजे येथील कंत्राटदार रा. कृष्णाजी रावजी साठे हे होत. हे ताबडतोब भागीदार झाले एवढेंच नव्हें तर त्यांनीं भागाचे सर्व (२५) रुपये एकदम देऊन टाकले. यामुळें जनतेचा आमच्यावर किती विश्वास आहे हें आम्हांस कळून येऊन काम करण्यास फार उत्तेजन मिळालें. त्याप्रमाणेंच प्रथम सहकारी तत्त्वावर मंडळ नोंदावयाचें म्हणून खटपट करण्यांत वेळ गेला व नंतर कंपनीच्या कायद्याप्रमाणें नोंदण्यांत येऊन कार्यारंभास परवानगी जानेवारी १९२९ मध्यें मिळाली. याप्रमाणें मध्यंतरीं बराच वेळ गेला तरी कोणीहि त्याबद्दल कुरकूर अगर टीका केलेली आमचे कानीं आली नाहीं. अर्थात् ग्राहक मिळविण्याबरोबरच शब्द गोळा करण्याचें आमचें काम चालूच होतें व प्रचारकार्याची, कोशकार्याची वगैरे माहिती दर तीन महिन्यांनीं साधारणतः केसरी वगैरे पत्रांत देण्यांत येत असे. त्यामुळें आमच्या ग्राहक वर्गास कार्याची प्रगति कळून येत असे.

चालक—मंडळ नोंदावयाचें तेव्हां प्रथमचा चालक वर्ग पुणें येथीलच व काम लागलें असतां सहज भेटण्यासारखा असाच नेमण्यांत आला. पहिले चालक, संपादक वर्गापैकीं रा. दाते, रा. कर्वे व रा. आबा चांदोरकर हे असून बाहेरचे रा. ल. बा. कोल्हटकर, रा. द. गो. फडके, रा. वि. वि. काणे व रा. रा. रा. करंदीकर, हे होते. बाहेरच्यापैकीं पहिले दोघे आम्हीं स्थापन केलेल्या सरस्वतीमंदिर संस्थेच्या सभासदांपैकींच आमचे सहकारी होते. रा. काणे हे एक परिचित इंजिनिअर व कंत्राटदार होते व रा. करंदीकर हे धारवाडचे पण आमच्या ज्ञानकोश सहकाऱ्यांपैकींच होते. याप्रमाणें कार्याची योजना, कंपनीची घटना वगैरे होऊन कार्यास रीतसर प्रारंभ झाला व लवकरच त्याची प्रगतीहि समाधानकारकपणें होऊं लागली.

यानंतर कंपनीच्या चालक वर्गांत पुढील मंडळी त्यांची संमति मिळवून घेण्यांत आली. व त्यांनीं आम्हांस सर्व बाब-तींत फार मदत केली. याबद्दल त्याचे येथें आभार मानणें अवश्य आहे.

श्री. माधवराव विनायकराव किबे, श्री. पांडुरंग केशव शिराळकर, श्री. मा. ग. बावडेकर, श्री. सरदार राजाराम जनार्दन पोतनीस, व श्री. विश्वनाथ नारायण जोग.

प्रचार—ज्ञानकोशाचें काम करीत असतांहि वारंवार पैशाची अडचण पडत असे त्यामुळें संपादक वर्गासहि वरचेवर प्रचारा-करितां बाहेर पडावें लागे त्यामुळें प्रचार कार्याबद्दल अनेक सुशिक्षित लोकांत जी साशंक वृत्ति दिसून येते ती आमच्या

बाबतींत अजीबात नाहींशी झाली होती व सर्व महाराष्ट्रभर प्रवास झाल्यामुळें अनेक ठिकाणीं आधींच ओळखी झाल्या होत्या. अनेक ठिकाणीं व्याख्यानें वगैरे दिल्यामुळें आदरहि उत्पन्न झाला होता व ज्ञानकोशाचें कार्य पूर्ण केल्यानंतर हें कार्य सुरू केल्यामुळें लोकांमध्यें विश्वास उत्पन्न झाला होता व डॉ. केतकरांबद्दल जो कांहीं लोकात प्रतिकूल ग्रह उत्पन्न झालेला होता तो आम्ही त्यांपासुन स्वतंत्र झाल्यामुळें आम्हांस बाधक झाला नाहीं. तसेंच सर्वच संपादक वर्ग आळीपाळीनें प्रचाराकरितां बाहेर पडत असल्यामुळें प्रचाराचें काम वाटलें गेलें व कोणाहि एकावर बोजा पडला नाहीं.

याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे शब्दकोशाकरितां शब्दसंकलनाचें कार्य करावयाचें होतें. विशेषतः प्रांतिक व बोलींतील शब्द निरनिराळ्या ठिकाणाहून जमवावयाचे होते; त्याकरितां प्रवास करणें आवश्यक होतें; तेव्हां शब्द व ग्राहक दोन्हीहि जमविण्याचें कार्य त्याच परिश्रमांत होऊं शकलें; व पुढें मुद्रण कार्य सुरू झाल्यावर येथें कचेरींत अधिक काम पडूं लागणार तेव्हां त्यावेळीं प्रचारास वेळ मिळणार नाहीं याकरितां हें काम त्यापूर्वीच करणें आवश्यक होतें त्यामुळें खरोखर पहिल्या तीन वर्षांत प्रचाराचें काम पुष्कळच झालें, हें पुढें दिलेल्या ग्राहक संख्येवरून कळून येईल.

पहिल्या	वर्षाच्या	अखेरीस	८६७
दुसऱ्या	”	”	११७०
तिसऱ्या	”	”	२०५७
चवथ्या	”	”	२४२५
पांचव्या	”	”	२५९१
सहाव्या	”	”	२७५४
सातव्या	”	”	२९१८
आठव्या	”	”	३०००
नवव्या	”	”	३१८१

म्हणजे पहिल्या तीन वर्षांत दोन हजार ग्राहक झाले तर पुढील एक हजार मिळविण्यास सहा वर्षे लागलीं.

या प्रचाराच्या कामांत आम्हांस अनेक ठिकाणच्या मित्रमंडळींकडून पाहुणचारापासून प्रत्यक्ष ग्राहक मिळवून देण्याच्या कामापर्यंत पुष्कळच मदत झाली; त्याचें सविस्तर वर्णन येथें देतां येणार नाहीं पण त्यांपैकीं विशेष मदत करणाऱ्या मित्रांचीं नांवें येथें नमूद करणें अवश्य आहे.

मदतीबद्दल विशेष उल्लेख करण्यासारख्या व्यक्ती

हैद्राबाद—श्री. काशिनाथराव वैद्य, वकील, वासुदेवराव हर्डीकर, कै. लक्ष्मण बाळकृष्ण फाटक.
ग्वाल्हेर—कॅप्टन मोडक, श्री. रामचंद्र वासुदेव दाते, हाय. जज्ज.
बडोदें—श्री. सरदार राजे शिर्के, श्री. कृष्णाजी रामचंद्र संत.
नगर—श्री. रा. ब. हिवरगांवकर, श्री, य. द. नवाथे.
नासिक—प्रो. भा. ल. पाटणकर.
पणजी—श्री. शिवा फटु पै, आंगले.
मडगांव—श्री. दत्तात्रय व्यंकटेश पै.
कोल्हापूर—श्री. गोविंदराव उपळेकर.
सांगली—श्री. बाबुराव करमरकर, श्री. लागू वैद्य.
फलटण—श्री. भा. ल. लिखिते, फायनॅन्समेंबर.
कर्जत—श्री. आरेकर, इनामदार.
धारवाड—श्री. रा. रा. करंदीकर, श्री. भा. र. पटवर्धन.
बेळगांव—श्री. आंबेवाडी.
जमखंडी—श्री. वा. त्र्यं. आपटे.
देवास—श्री. चिं. ग. ओक, श्री. के. ब. बिडवई.
इंदूर—प्रो. बा. गो ऊर्ध्वरेषे.
उज्जैन—डॉ. खिरवाडकर, प्रो. ना. बा. पराडकर.
कल्याण—श्री. विनायक महादेव वैद्य.
कराची—श्री. य. मो. नानल.
धुळें—श्री. द. ज. गोखले.
जळगांव—कै. ल. ना. फडणीस, वकील.
अमळनेर—श्री. म. गो. भालेराव, वकील.
नंदुरबार—श्री. डॉ. काणे.
सातारा—श्री. शंकरराव गोडसे, श्री. शेवडे वकील.
कऱ्हाड—श्री. पां. के. शिराळकर.
राजापूर—श्री. र. कृ. पाटणकर.
रत्नागिरी जिल्हा—श्री. रा. मा. फडके.
बंगळूर—श्री. नारायणराव नाईक.
विजापूर—श्री. नारायणराव जोशी.
चिकोडी—श्री. सदाशिवराव कल्लोळकर, वकील.
नागपूर—श्री. गोपाळराव देव, श्री. श. वा. रानडे.
जबलपूर—. श्री. रा. के. पेंडसे, वकील.
रायपूर—श्री. राजिमवाले वकील.
बालाघाट—श्री. देवपुजारी वकील.
सागर—श्री. वासुदेवराव सुभेदार.
मुंबई—श्री. द. गो. परचुरे.
मद्रास—श्री. राजारामपंत पिंगळे.

शब्दकोशाचा पहिला विभाग छापून झाल्यावर तो ग्राहकांकडे पाठवावयाचा त्यावेळीं तो ग्राहकांस कमींतकमी खर्चांत कसा देतां येईल या गोष्टीकडे लक्ष्य देण्यांत आलें. ज्ञानकोशाचे वेळेस असा अनुभव आला कीं जे १०० रुपये देऊन आमचे अगाऊ

ग्राहक झाले त्यांस प्रत्येक भाग पोष्टानें व्ही. पी. करून पाठवावयाचा म्हणजे जवळजवळ एक रुपया खर्च येत असे. शिवाय ज्ञानकोशाची विनामूल्य म्हणून जी कागदी बांधणी योजण्यांत आली होती ती इतकी भिकार होती कीं अशा ग्रंथास ती बांधणी कोणीहि पतकरणार नाहीं. त्यामुळें कापडी बांधणीचा एक रुपया व पोष्टखर्च मिळून सुमारें दोन रुपये खर्च प्रत्येक भागास ग्राहकास सोसावा लागे व पांच रुपयाचे पुस्तकास दोन रुपये वरखर्च म्हणजे प्रमाणाबाहेर होत असे व १०० रुपयांचा ग्रंथ जवळजवळ दीडपट किंमतीस पडावयास जाई. यानंतर वाढत्या किंमतींत वर्गणीदार झालेल्यावर तर हा बोजा फारच होई. तेव्हां यावेळीं विनामूल्य देण्याच्या बांधणींतहि सुधारणा करून बाजूस जाड पुठ्ठा व मागें कापडी पट्टी अशी अर्धकापडी बांधणी विनामूल्य द्यावयाचें ठरविलें व पूर्ण कापडी बांधणीस एक रुपया ऐवजीं फक्त बारा आणे अधिक घ्यावयाचे ठरविलें. त्याप्रमाणेंच ज्यांस आपल्या मित्रामार्फत कार्यालयांतून ग्रंथ नेण्याची सोय असेल त्यांस तशी सूचना देऊन अशी सोय असणाराची नोंद करून ठेवली व ज्या ठिकाणीं बरेचसे ग्राहक होते अशा ठिकाणीं कांहीं मित्रांमार्फत ग्रंथ वाटण्याची सोय केली. या सोईनें जवळजवळ एक रुपयाऐवजीं फक्त चार आण्यांत ग्रंथ घरपोंच मिळूं लागला व तोहि पोष्टामार्फत येऊन खराब न होतां चांगल्या पार्सलमध्यें आल्यामुळें चांगल्या स्थितींतहि मिळूं लागला.

याकामीं आम्हांस अनेक मित्रांनीं साहाय्य केलें अशा प्रकारचे आमचे साहाय्यक अगर प्रतिनिधींचीं नांवे पुढें दिलीं आहेत.

महाराष्ट्र शब्दकोश प्रती वाटणें व वसुली करणेंचें काम करणारे साहाय्यक व प्रतिनिधि

१ श्री. धोंडो सखाराम कुलकर्णी, ॲड. ऑफिसर, अंमळनेर.
२ श्री. विष्णु वामन काळे, कराची.
३ श्री. महादेव रामचंद्र जागुष्टे, बुकसेलर, अहमदाबाद.
४ श्री. कमलाकर वामन ऊर्ध्वरेषे, रामबाग, इंदूर.
५ श्री. डी. बी. दांडेकर, बुकसेलर इंदूर.
६ श्री. के. रा. कुलकर्णी, कोल्हापूर.
७ श्री. व्यंकटेश त. कट्टी व श्रीनिवास त. कट्टी, ग्वाल्हेर.
८ श्री. रा. गो. हुंकरी, धारवाड.
९ प्रो. भा. ल. पाटणकर, दहीपूल, नाशिक.
१० श्री. श्री. वा. दाते, नागपूर.
११ श्री. शिवा फटू पै आंगले, पणजी.
१२ श्री. नारायण गोविंद नाईक, बंगलोर.
१३ श्री. कृष्णाजी रा. संत; बडोदें.
१४ श्री. लक्ष्मण नारायण फडणीस, जळगांव.
१५ श्री. दत्तात्रय व्यं. पै, मडगांव.
१६ श्री. पी. डी. जोशी, मद्रास.
१७ श्री. रा. वा. कामत, मालवण.
१८ श्री. रा. सि. सिद्धये, मुंबई.
१९ श्री. पी. डी. सोवनी, वर्धा.
२० श्री. विनायक महादेव वैद्य, कल्याण.
२१ श्री. रघुनाथ कृष्ण पाटणकर, राजापूर.
२२ श्री. जी. व्ही. करमरकर, सराफ, सांगली.
२३ श्री. शं. वा. गोडसे, सातारा.
२४ श्री. लक्ष्मण शे. नाईक, हैद्राबाद.
२५ श्री. रा. ब. हिवरगांवकर, नगर.
२६ श्री. द. गो. परचुरे, मुंबई.

साहाय्यक—शब्दकोश प्रकाशनाच्या कार्यांत ज्यांचें आम्हास वर उल्लेखिल्याखेरीज विशेष आर्थिक साहाय्य झालें त्यांचे येथें आदरेखून आभार मानणें अवश्य आहे.

श्री. सयाजीराव गायकवाड.

यांमध्यें श्री. महाराज सयाजीराव गायकवाड यांचें नांव प्रामुख्यानें प्रथम पुढें येतें. विद्यमान् महाराष्ट्रीय संस्थानिकांत विद्येबद्दल आस्था व अभिरुचि या बाबतींत श्रीमंतांस सहजच अग्रेसरत्व प्राप्त झालें आहे. त्यांच्या सारखा स्वतः सुविद्य व विद्येचा चाहता संस्थानिकांत काय पण इतरत्रहि मिळणें कठीण आहे. त्यांनीं या कार्यास सर्वांत मोठें साहाय्य केलें आहे व त्यांत विशेष हें कीं त्यांनीं आमच्या कार्यास हें साहाय्य अनाहूतपणें दिलें आहे याबद्दल व कृतज्ञताबुद्धीनें हा ग्रंथ त्यांस अर्पण करण्यांत आला आहे. आम्ही १९२९ च्या डिसेंबर महिन्यांत जेव्हां बडोदें येथें शब्दकोशाच्या प्रचाराकरितां गेलों त्यावेळीं तेथें गांवांत हिंडून एकंदर सुमारें ९० ग्राहक मिळविले. त्यावेळीं श्री. महाराज बडोद्यांत होते परंतु आमच्या जवळ प्रत्यक्ष दृश्य अशा स्वरूपांत कांहीं नव्हतें केवळ योजना होती. तेव्हां अशा वेळीं महाराजांची भेट न घेतांच आम्ही परत आलों. यावेळीं भेट न घेण्याला एक कारण असेंहि होतें कीं, ज्ञानकोशाच्या वेळीं १९२१ मध्यें मीं बडोद्यास गेलों असतां श्री. महाराजांची व्यवस्थितपणें भेट व्हावी म्हणून जी मीं खटपट केली तींत मनाजोगतें यश न मिळून मध्यस्थांबद्दल एक प्रकारचा तिटकारा मात्र उत्पन्न झाला. तेव्हां यावेळीं आमच्या नेहमीच्या शिरस्त्या प्रमाणें मध्यमवर्ग हेच आमचे महाराज असें समजून फक्त त्याच वर्गांत आम्ही काम केलें. परंतु आम्ही बडोद्यास येऊन गेल्याचें जेव्हां श्री. महाराजांस कळलें तेव्हां आमचें कार्य समजून घेण्याची उत्सुकता उत्पन्न होऊन त्यांनीं आमचें प्रसिद्धिपत्रक आणवून संपूर्ण वाचवून घेतलें व आमच्या मित्रमंडळी मार्फत

आम्हांस बडोद्यास बोलावून घेऊन आमची योजना पूर्णपणें समजावून घेतली व अशा रीतीनें अगाऊ ग्राहक मिळवून ग्रंथप्रकाशन करण्याची आमची योजना त्यांस पटून त्यांनीं आमच्या कार्यास सहाय्य करण्याची मनीषा प्रकट केली. तेव्हां आम्ही देणगीची मागणी न करतां कांहीं प्रती घ्याव्या अशी विनंति केली. अखेरीस आम्हांस ५००० रुपये अर्पणपत्रिकेकरितां देणगी म्हणून व प्रत्येक भागाच्या १०० प्रती प्रसिद्धीनंतर घ्यावयाच्या अशी आज्ञापत्रिका मिळाली. त्याप्रमाणें आम्ही ग्रंथ अर्पण करण्याची अनुज्ञा मिळाल्याबद्दल आभार मानून व देणगीचा स्वीकार करून परत आलों. यावेळीं श्री. रामचंद्र शामराव माने पाटील, श्री. सडेकर पवार, श्री. अवधूतराव राजे शिर्के व त्यांची कांहीं मित्रमंडळी यांनीं आम्हांस फारच मदत केली व एकंदर आमच्याशीं जी वागणूक ठेविली तीमुळें माझा ज्ञानकोशाच्या वेळचा झालेला ग्रह बराच बदलला. तथापि कांहीं अधिकारी वर्गास जणूं ही रक्कम आपल्या पगारांतूनच जात आहे अशा सारखे क्लेश होऊन त्यांनीं निदान ही देणगी लांबणीवर पाडण्याचा प्रयत्न केलाच; पण प्रत्यक्ष श्री. महाराजांचीच इच्छा आमचें कार्य विलंब न लावतां ताबडतोब व्हावें अशी असल्यामुळें आम्ही देणगीचा चेक घेऊन ताबडतोब परत येऊं शकलों.

एक हितचिंतक, हैद्राबाद.

यानंतरचें आम्हास मोठें साहाय्य आमचे हैद्राबाद दक्षिणचे 'एक हितचिंतक' यांचे झालें. यांसहि आम्हीं कांहीं भाग घ्यावे अशी विनंति केली असतां त्यांनीं भाग न घेतां १००० रुपये देणगी दाखलच देऊं केले व तेहि वार्षिक हप्त्यांनीं आणि आपले नांव जाहीर न करण्याच्या अटीवर. त्यामुळें आमच्या कार्यावर त्यांची देखरेख राहून आम्हांस त्या निमित्तानें त्यांची वारंवार भेट घेण्याची व अधिक परिचय करून घेण्याची संधि मिळाली व आमच्या कार्यावर त्यांचा कायमचा लोभ जडून पुढें निझाम सरकारकडून जी देणगी मिळाली ती मिळण्यासहि त्यांचेच परिश्रम व वजन कारणीभूत झालें.

निजाम सरकार.

निझाम सरकारनेंहि आमच्या कार्याचें महत्त्व जाणून हाली एक हजार रुपयांची देणगी दिली तीबद्दल त्याचे आभार मानणें अवश्य आहे.

श्री. पंतप्रतिनिधि.

यानंतर महाराष्ट्रीय संस्थानिकांपैकीं श्री. भवानराव श्रीनिवास राव पंत प्रतिनिधि, राजेसाहेब औन्ध यांनीं दहा प्रतींची मागणी करून एकंदर सातश रुपयांची मदत केली. विशेष उत्तेजन देण्याच्या कामीं स्वतःचें लहान संस्थान असूनहि हे संस्थानिक खरोखर इतरांस उत्तम उदाहरण घालून देणारे आहेत. स्वतः काटकसर करून योग्य ठिकाणीं आपल्या द्रव्यशक्तीचा व्यय करणारे असे संस्थानिक जर आपल्यांत अधिक निपजतील तर दरिद्री महाराष्ट्राचाहि भविष्यकाल उज्ज्वल होईल यांत शंका नाहीं.

श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर.

याप्रमाणेंच श्री. नारायणराव गोविंद उर्फ बाबासाहेब घोरपडे इचलकरंजीकर यांचा हात तर कोणत्याहि उपयुक्त कार्यास मदत करण्यांत नेहमीं तत्पर असतो. यांनींहि आमच्या विनंतीस मान देऊन पांचशें रुपयांची या कार्यास अगाऊ मदत केली आहे.

श्री. सरकार करवीर.

श्री. छत्रपति राजाराम महाराजसाहेब संस्थान कोल्हापूर हे तर महाराष्ट्राचे छत्रपतीच आहेत. तेव्हां सर्व महाराष्ट्राचा त्यांचेवर हक्कच आहे. या अधिकाराची त्यांनींहि जाणीव ठेवून त्यांच्या सरकारनें या कार्यास तीनशें रुपयांची देणगी दिली आहे. याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों.

श्री. बाबासाहेब बिवलकर.

श्री. विनायक धुंडीराज उर्फ बाबासाहेब बिवलकर यांचा आमचा फार पूर्वीपासूनचा ऋणानुबंध असल्यामुळें त्यांनीं प्रथम मंडळाचे दोन भाग घेतलेच होते पण पुन्हां सहाव्या भागाच्या वेळीं त्यांस विनंति केली तेव्हां त्यांनीं ३०० रुपये देणगीदाखल दिले हें विशेष होय.

श्री. राजेसाहेब जमखंडीकर यांनीं चार प्रती घेतल्या व **श्री. राजे बाळासाहेब मिरजकर** यांनीं तीन प्रतींची मागणी केली. यांनीं कुस्ती व जंबियाचे शब्द पुरविल्याबद्दलचा उल्लेखपूर्वी आला आहे.

याखेरीज **श्री. प्रतापशेट**, अमळनेर, **रा. ब. गो. स. सरदेसाई**, कामशेत व **श्री. अवधूतराव वाघोजीराव राजे शिर्के** यांनीं प्रत्येकीं शंभर रुपये देणगीदाखल दिले त्यांचेहि आभार मानणें अवश्य आहे.

डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीनें महाराष्ट्र शब्दकोशाच्या प्रत्येक विभागास बक्षिसादाखल रु. १२५ प्रमाणें दिले अहेत. वास्तविक या संस्थेकडे बक्षिसासाठीं शब्दकोश पाठविण्याचा आमचा विचार नव्हता व ज्ञानकोश या संस्थेकडे पाठविण्यांत आला नव्हता. कारण आमच्या मतें या संस्थेकडे जो थोडा फार निधि आहे त्यातून नवीन होतकरू लेखकांस मदत व्हावी, मोठ्या ग्रंथास साहाय्य करण्यानें लहान ग्रंथांची उपासमार होऊं नये असें आमचें मत होतें. परंतु पहिला भाग बाहेर पडला तेव्हां सदरहू संस्था आमची ग्राहक असल्यामुळें तो भाग न्यावयास आलेल्या मनुष्याबरोबर असा

निरोप आला कीं, संस्थेजवळ थोडी फार रक्कम असून शब्द-कोश परीक्षणार्थ पाठविल्यास कांहीं बक्षीस मिळेल. व त्या निरोपानुसार मिळणाऱ्या मदतीस नाहीं म्हणणें योग्य होणार नाहीं म्हणून आम्हीं ग्रंथ पाठविला व त्यास व पुढें प्रत्येक भागास रुपये १२५ प्रमाणें आम्हांस मदत मिळाली, याबद्दल संस्थेचे आम्हीं आभारी आहों.

याशिवाय आम्ही जेव्हां प्रचाराकरितां बाहेर फिरत होतों त्यावेळीं आमच्या मंडळाचा भाग जरी पंचवीस रुपयांचा होता तरी कांहीं मंडळीस आम्ही अशी विनंति करीत असूं कीं, आपण एकच भाग घ्यावयाच्या ऐवजीं कांहीं अधिक भाग घ्यावे. आपण शब्दकोशाचे ग्रंथ एकाच भागाकरितां घ्यावे पण अधिक भाग घ्यावयाचे ते एवढयाकरितां कीं, आम्हांस एक एक भाग खपविण्याकरितां जे श्रम लागतात ते कांहीं भाग एकदम घेतल्यास वांचतील. व पुढें आम्हास जीं इतर कामें करावयाचीं आहेत त्यांस हें भांडवल उपयोगी पडेल. हो विचारसरणी कांहीं गृहस्थास पटून व यांत प्रत्यक्ष फायदा मिळण्याचा संभव नसताहि या कार्यास मदत म्हणून त्यानीं अधिक भाग घेतले अशा मंडळींचीं नावें पुढ दिलीं आहेत. त्यापैकीं **श्रा. रावराजे गणपतराव राजवाडे,** ग्वाल्हेर यांनीं पांचशें रुपयाचे भाग घेऊन शिवाय युद्धविषयक शब्दसाहित्यहि पुरवलें. तसेंच **कै. श्री. वामन रावजी नाईक** यांचा आमचा प्रथम परिचय नसताहि त्याच्या उदार बुद्धीस अनुसरून भाषा व संस्कृति यावरील प्रेमानें उयुक्त होऊन त्यानींहि पांचशें रुपयांचे भाग घेतले हे विशेष होय तसेंच आमचे मित्र कोल्हापूर येथील सराफ **श्री. गोविंदराव उपळेकर** यानीं आमचे तीनशें रुपयांचे भाग घेतले एवढेंच नव्हें तर आमच्या कोल्हापूर येथील कार्यात आम्हांस मदत केली. सामान्यतः सराफी वगैरेसारख्या धंद्यात पडलेल्या गृहस्थांस विद्येची अभिरुची कमीच दिसून येते परंतु रा. गोविंदराव हे या बाबतींत अपवाद असून त्यांचा सर्व मित्रवर्ग सुशिक्षित वर्गापैकींच असून त्यांचें वाचनहि चौरस आहे व त्यांचा ग्रंथसंग्रहहि सर्वांगामी व अद्यावत दिसून येतो हें त्यांस भूषणावह आहे.

विशेष भागीदार

श्री. रावराजे गणपतराव राजबाडे, ग्वाल्हेर,	रु. ५००
कै. वामन रावजी नाईक, हैद्राबाद.	रु. ५००
श्री. गोविंदराव उपळेकर, कोल्हापूर.	रु. ३००
श्री. सरदार चंद्रोजीराव आंग्रे, ग्वाहेर.	रु. २५०
श्री. सरदार माधवराव किबे, इंदूर.	रु. २५०
श्री. सरदार देवराव जाधव, ग्वाल्हेर.	रु. २५०
श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित, पुणें.	रु २२५
श्रीमंत मा. वि. भिडे, हायकोर्ट जज्ज, लाहोर.	रु. २५०
श्रीमंत पां. के. शिराळकर सावकार, कऱ्हाड.	रु. २५०
श्री. धों. कृ. साठे, कॉन्ट्रॅक्टर, पुणें.	रु. २५०
श्री. स. वि. रानडे, पुणें.	रु. २५०
श्री. शं. न. दातार, पुणें.	रु. २५०
श्रीमंत वि. ना. जोग, धारवाड.	रु. २५०
श्रीमंत सरदार पाटणकर, ग्वाल्हेर.	रु. १७५
श्री. रा. रा. करंदीकर, धारवाड.	रु. १५०
श्री ग. म. दाते, बारामती.	रु. १५०
श्रीमंत सरदार खं. रा. विंचुरकर.	रु. १२५
श्री. नायब दिवाण, सावंतवाडी.	रु १२५
श्री. वि. वि. काणे, पुणें.	रु १२५
श्री. र. हि. दोशी, सोलापूर.	रु १२५
श्री. वि. वि साठ्ये, पुणें.	रु. १२५
श्री. डेव्हिड अ. तरणखोपकर, मुंबई.	रु १२५
श्री. ध. रा. गाडगीळ, पुणें.	रु १२५
श्री. द. रा. घारपुरे, मुंबई.	रु. १२५
श्री ल. का. किर्लोस्कर, किर्लोस्करवाडी.	रु. १२५
श्री. रा. मा. देशमुख, नागपूर.	रु. १२५
श्री. के. जी. घारपुरे, पुणें.	रु. १२५
श्री. रा. ब. वा. अ. बांबर्डेकर, मुंबई.	रु. १२५
श्री. मा. के. दाबके,	रु. १२५
श्री किसनलाल ओंकारदास, अकोला.	रु. १२५
श्री. अ. वि. दातार, चाळिसगांव.	रु. १२५
श्री. गो. प्र. भांडारकर, इंदूर.	रु १२५
श्रीमंत सरदार गं. ना. मुजुमदार, पुणें.	रु. १००
श्री. प्रायव्हेट सेक्रेटरी, श्रीमंत महाराज सरकार, देवास.	रु. १००
श्री. ना. श्री. राजहंस, (बालगंधर्व).	रु. १००
बॅ. वि. वि. ओक, मुंबई.	रु १००
श्री. द. ल. सहस्रबुद्धे, पुणें.	रु. १००
श्री. रा. अ कानिटकर, बुलढाणा.	रु. १००
श्री ल. र. गोखले, पुणें.	रु. १००
श्री. ल. बा. कोल्हटकर, पुणें.	रु. १००
श्री. ग. स. मराठे, पुणें.	रु. १००
डॉ. ग. ब. गोळे, मुंबई.	रु १००
श्री. ह. ग. बारपुरे, पुणें.	रु १००
श्री. द. गो. फडके, पुणें.	रु. १००
श्री. न. रा. गोडबोले, पुणें.	रु. १००
श्री. का. वा. कर्वे, बंगळूर.	रु. १००

श्री. गो. ह. जोशी, पुणें.	रु. १००
श्री. आ. धो. धोपेश्वरकर, धारवाड.	रु १००
श्री. पु. मं. लाड, आय्. सी. एस्.	रु. १००
श्री. त्रिं. वि. गोरे, पुणें.	रु. १००
श्री. मो. कृ. शारंगपाणी, बडोदें.	रु. १००
श्री. दि. बा. परांजपे, पुणें.	रु. १००
श्री. वि. द. हर्डीकर, हैद्राबाद (दक्षिण).	रु. १००
श्री. रा. का. भिडे, पुणें.	रु. १००
श्री. वि. गो. गोखले, पुणें.	रु. १००
श्री. शं. बा. ढवळे, आय्. सी. एस्.	रु. १००

प्रस्तावना—आम्ही शब्दकोशाची रचना करावयाचें निश्चित केलें तेव्हां कोशरचनेसंबंधीं कांहीं वाङ्मय उपलब्ध आहे काय म्हणून बरीच चौकशी केली, अनेक पुस्तक विक्रेत्यास लिहिलें, ग्रंथसंग्रहालयें धुंडाळलीं, ग्रंथसूची चाळून पाहिल्या पण इंग्रजी-मध्येंहि कोशरचनेसंबंधीं वाङ्मय उपलब्ध झालें नाहीं. त्यावेळीं पूर्ण होत आलेल्या ऑक्सफर्ड कोशाच्या कार्याबद्दल कांहीं नुकतींच निघालेलीं ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीची पत्रकें मात्र मिळालीं. तेव्हां आपणांस जरी कांहीं साहित्य उपलब्ध झालें नाहीं तरी मराठी वाचकांस कोशरचना शास्त्रासंबंधीं व कोशरचनेच्या इतिहासासंबंधीं माहिती व्हावी म्हणून पहिल्या विभागास या विषयावरच एक विस्तृत प्रस्तावना लिहावी असें ठरविलें व उपलब्ध साधनां वरून निघंटुपासुन अर्वाचीन कोशासंबंधीं सर्व माहिती देणारी प्रस्तावना संपादक वर्गानें तयार करून पहिल्या भागास जोडिली.

यानंतर शब्दकोश रचनेबरोबरच जो भाषाशास्त्रविषयक अभ्यास आम्हांस अवश्य झाला. त्या अभ्यासाचें फळ केवळ आपल्या डोक्यांत सांचवून ठेवण्यापेक्षां मराठी वाचकवर्गास उपलब्ध करून दिल्यास भाषाभ्यासकांस त्याचा उपयोग होऊन मराठींत उणीव असलेल्या एका शाखेंत चांगली भर पडेल असें मनांत येऊन प्रत्येक भागास भाषाशास्त्रविषयक व मराठी भाषेच्या उत्पत्तीस व वाढीस अनुसरून एक विस्तृत प्रस्तवना जोडावयाची असें ठरविलें व त्या प्रमाणें सर्व भागांस एक एक प्रस्तावना जोडली. यामुळें शब्दकोशाचा नवीन भाग आल्याबरोबर ग्राहकांस कोशाखेरीज वाचनीय असा मजकूर सहजच मिळत गेला व त्यामुळें कोशाचा बराच मोठा वाचकवर्ग उत्सुकतेनें प्रत्येक भागाची वाट पाहूं लागला. व या निमित्तानें या विषयावर एक चांगल्याप्रतीचें लिखाण मराठी भाषेंत तयार झालें.

या प्रस्तावनांचा मराठी भाषेच्या अभ्यासकांस विशेष उपयोग होईल याकरितां या प्रस्तावनांच्या स्वतंत्र प्रती काढाव्या अशी कांहीं अभ्यासू मित्रांची सूचना आल्यावर सर्व प्रस्तावनांच्या सुटया प्रतीहि डेमी आकारांत काढण्यांत आल्या व त्या स्वतंत्रपणें मिळण्याची सोय केली.

या प्रस्तावनांसंबंधीं आम्हास शाबासकी अनेक लोकांकडून मिळाली पण आम्हास दोन गृहस्थानीं दोष देण्यासहि कमी केलें नाहीं. त्यापैकीं एक येथील एका बोळांतील छापखानदार असुन आमचे ग्राहक नव्हते पण प्रस्तावनेमुळें आमच्या ग्राहकांस तेवढीं कोशाचीं पानें कमी मिळतात अशी त्यांची तक्रार होती. दुसरे गृहस्थ आमचे ग्राहक असुन विद्वानहि होते व त्यांनीं तर प्रस्तवनांचा खर्च अनाठायीं असुन तो डायरेक्टरांकडून वसुल करण्यांत यावा असेंहि आम्हांस कळविलें. तेव्हां आम्ही रीतसर तो प्रश्न एका सर्वसाधारण सभेपुढें ठेवून त्या सभेची संमति घेतली. अर्थात् चालकांकडून किंवा संपादकांकडून जर ही रकम वसुल करण्याची आमच्या ग्राहक वर्गाची इच्छा दिसती तर आम्ही त्या गोष्टीस माघार घेतली असती असें कधींच झालें नसतें कारण बेताचा पगार ठरवून तोहि पूर्ण न घेतां त्याचीच बाकी मंडळाकडे राहण्याची प्रथा ज्ञानकोशापासुनच आमच्या आंगवळणी पडली आहे व हौसेच्या कार्यांत थोडी घस लागली तर ती सोसावयाची आमची तयारी नेहमींच असते. तेव्हां या सद्गृहस्थांची मनीषा पूर्ण झाली असती तरी आम्हांस त्यांत विषाद वाटला नसता. असो.

या प्रस्तावनांबद्दल कोणाचे विशेष अभिप्राय देण्याची जरूर नसली तरी दुसऱ्या विभागावर जें डे. व्ह. ट्रा. सोसायटीच्या परिक्षकांनीं परीक्षण केलेलें आम्हांस त्यांनीं कृपेनें पाठविलें त्यांतील प्रस्तावनेसंबंधीं अभिप्राय पुढें उध्दृत करतों. कारण हे अभिप्राय म्हणजे वर्तमानपत्रांत थोडया अवधीनें व घाईनें लिहिलेले केवळ उत्तेजनार्थ व प्रसिध्यर्थ दिलेले अभिप्राय नसुन तज्ज्ञ परीक्षकांकडून मिळालेले अभिप्राय आहत.

१ " या भागातील विशेष गोष्ट म्हणजे त्यांतील ' भाषाशास्त्र व जगांतील भाषा ' या बाबतींतील स्वतंत्र प्रस्तावना होय. मराठी-मध्यें भाषाशास्त्रविषयक वाङ्मय फारसें नाहीं. तसें वाङ्मय निर्माण करण्याच्या उद्देशानें ज्याप्रमाणें पहिल्या विभागांत 'कोशरचना शास्त्र ' या विषयाचें विस्तृत विवेचन केलें आहे त्याप्रमाणें सामान्य सुशिक्षित माणसास भाषेची उत्पत्ति, विकास, पोटभाषा कशा बनतात याची माहिती, भाषेचें अनेक कारणानीं बदलणारें स्वरूप, निरनिराळ्या भाषांचा वांशिक संबंध वगैरेचें ज्ञान विशेष खोलांत न शिरतां व्हावें या हेतूनें प्रस्तुतच्या भागांत आपल्याकडे व पाश्चिमात्य देशांत भाषाशास्त्रविषयक विचारांची वाढ कसकशी होत गेली याचें सविस्तर विवेचन केलें असुन जगांतील बहुतेक सर्व भाषांची थोडक्यांत माहिती दिली आहे. तसेंच प्रस्तावनेच्या परिशिष्टांत जगांतील महत्त्वाच्या भाषा, हिंदुस्था-

नांतील भाषा व इंडो–युरोपियन भाषा. यांचें वंशवार वर्गीकरण दिलें आहे. प्रकाशकांचे मनांत प्रत्येक भागाचे आरंभीं भाषाशास्त्रविषयक वाङ्मयाची माहिती देणारी अशाच प्रकारची प्रस्तावना देण्याचें आहे. प्रत्येक भागास जोडलेल्या अशा प्रस्तावना एकत्र करून छापल्यास मराठी भाषेंत भाषाशास्त्राची माहिती देणाऱ्या एका चांगल्या ग्रंथाची भर पडेल."

२ "कोशाच्या या विभागांत 'ओ' पासून 'ख' पर्यंत काम पुरें झालेलें आहे. याशिवाय आरंभी एक विस्तृत प्रस्तावना जोडलेली असुन तींत भाषाशास्त्राचा विस्तृत इतिहास-प्राचीन व अर्वाचीन भाषेच्या उत्पत्तीविषयीं निरनिराळ्या भाषाकोविदांनीं सुचविलेल्या तर्कांची थोडीशी हकीगत, जगांतील निर निराळ्या भाषांची कुलपीठिका, एकाच भाषेंत कालभेदामुळें होणारे विकार, भाषा व बोली यांचें विवेचन व विविध भाषांची थोडीफार माहिती इत्यादि विषय आले आहेत. समग्र प्रस्तावनेपैकीं हा एक पोटविभाग असल्यामुळें व बाकीचे विभाग पुढें व्हावयाचे असल्यामुळें यावर अखेरचें मत आतांच देतां येणार नाहीं. मात्र आहे तो मजकूर अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेला आहे व वाचनीय आहे एवढें मात्र सांगतां येईल."

३ "संपादकांनीं आरंभी जोडलेला प्रास्ताविक निबंध अगदीं माहितीनें भरलेला आणि मराठी वाचकांस फारच उपयुक्त असा आहे. थोडक्यांत पुष्कळ माहिती संपादकांनीं ठासून भरली आहे. प्रत्येक भागास जोडले जाणारे हे प्रास्ताविक निबंध एकत्र केले असतां मराठी भाषेंत एका चांगल्या ग्रंथाची भर निःसंशय पडेल. किंबहुना आजही स्वतंत्रपणें हे निबंध थोडया किंमतीस विक्रीस ठेवण्यालायक आहेत."

सरकार व संस्थानिकांचें सहाय्य—ज्ञानकोशाच्या वेळेस देणग्या न घेण्याचे धोरण होतें पण बारीकसारीक देणगी न घेतां ठळक देणगी मिळाल्यास घ्यावयाची असें धोरण ठेवण्यांत आलें पण शक्यतों प्रती देऊन मदत घ्यावी असें योजलें होतें व आम्ही मागणी केली नव्हती असें म्हणता येऊं नये म्हणून प्रथम पासूनच शब्दकोशाच्या कार्यास थोडेसे स्वरूप येऊं लागल्याबरोबर मुंबई सरकार, मध्यप्रांत व वऱ्हाड सरकार व महाराष्ट्रांतील प्रमुख संस्थानिक व महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषा बोलणारे इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें, धार, देवास वगैरे संस्थानिक यांजकडे या कार्याकरितां मदत मिळावी म्हणून अर्जे करण्यांत आले होते. मुंबई सरकारकडून डायरेक्टरकडे अर्जे करावा असें उत्तर आलें. डायरेक्टरकडून नेहमींप्रमाणें पैसा नाहीं हें उत्तर आलें मध्यप्रांत सरकारकडून कांहींच उत्तर आलें नाहीं. मध्य प्रांतांत एक मराठी अॅकॅडमी नांवाची वाङ्मयोत्तेजनाकरितां संस्था स्थापन झालेली आहे. त्या संस्थेचे त्या वेळचे अध्यक्ष रा. यादव माधव काळे यांस समक्ष भेटलों असतां अवश्य मदत करूं म्हणून उत्तर मिळालें परंतु अर्ज केला तेव्हां मात्र सदरहू कार्य मध्यप्रांताबाहेर चाललें असल्यामुळें कांहीं मदत करतां येत नाहीं असें उत्तर आलें. जणूं कांहीं मराठी भाषेच्या कोशाशीं मध्यप्रांत–वऱ्हाडचा कांहींच संबंध नाहीं!! असो. संस्थानिकांकडूनहि कोणाकडून उत्तर आलें नाहीं. परंतु समक्ष गांठी घेतल्या असतां जी मदत मिळाली ती पूर्वी नमूद केलीच आहे.

खर्चाचा अंदाज—शब्दकोशाकरितां भांडवल जमविण्याकरितां कंपनी काढून भाग खपविले, देणग्या मिळविल्या, वर्गणीदार मिळविले तरी जोंपर्यंत छपाईचें काम चालू नव्हतें तोंपर्यंत पैशाची अडचण मुळींच भासली नाहीं व सामान्यतः सर्वांचा पगारहि देतां येत असे पण छपाईचें काम सुरू झाल्यावर छपाईकडे पैसा फार लागूं लागला. सामान्यतः आमच्या ग्राहकांची संख्या तीन हजारा जवळ जवळ आली होती तरी प्रत्यक्ष पांच हजार प्रती छापून घेत असूं.

यासंबंधीं आमच्या एकंदर कामाचा व खर्चाचा अंदाज असा होता कीं, ज्ञानकोशासारख्या सुमारें १०० रुपये किंमतीच्या ग्रंथास तीन हजार ग्राहक मिळाले. तर महाराष्ट्रांत अशा कामास ज्याअर्थी शंभर रुपये देणारे तीन हजार लोक मिळतात तर पांच भागांच्या प्रथम अंदाजाप्रमाणें २५ रुपये देणारे ५००० लोक मिळण्यास अडचण पडूं नये. व पांच हजार लोकांचे सवालाख रुपये येतील त्यांत छपाई २५०००, संपादकीय व कचेरी खर्च ५००००, विक्रीखर्च २५००० याप्रमाणें एक लाख रुपयांत हें काम व्हावें. २५००० रुपयांची तजवीज, आकस्मिक खर्च किंवा कूस म्हणून रहावी. त्याप्रमाणें सामान्यतः आमच्या प्रचारांत ज्ञानकोशाच्या तीन ग्राहकांमागें शब्दकोशास पांच ग्राहक मिळणें हें प्रमाण बहुतेक जुळत आलें. ही क्रिया १९३० पर्यंत सुरळीत चालली. पण पुढें मंदी वाढत गेली व प्रचार कार्यास तितका वेळ देणें अशक्य होऊं लागलें. कारण छपाई सुरू झाल्यामुळें मुद्रणप्रत तपासणें, मुद्रितें तपासणें व छापण्याची व्यवस्था करणें याकडे लक्ष्य द्यावें लागून आयात कमी होऊं लागली पण खर्च मात्र वाढत चालला. शिवाय प्रत्येक विभागामागें २००० प्रती बैठया राहूं लागल्या व त्यांत कांहीं पैसा अडकून बसला व ही रकम प्रत्येक भागाबरोबर वाढूं लागली व कमी प्रती काढाव्या तर असा ग्रंथ बाहेर निघाल्याबरोबर दुर्मिळ होणार व असे ग्रंथ वरचेवर निघत नसल्यामुळें कांहीं प्रती तरी विकावयास राहणें अवश्य आहे व एकंदर मुद्रणखर्चाच्या

मानानें याच वेळीं खर्च होणारा पैसा प्रमाणानें थोडा लागतो. छापखान्याचें सामान घेण्यांत सुमारें दोन हजार रुपये गुंतून पडले. याप्रमाणें चालू रकमेची चणचण भासूं लागली. तथापि सामान्यतः हें प्रमाण प्रत्येक प्रसिद्ध झालेल्या विभागामागें एक हजार रुपयांपर्यंतच राहिलें. कारण संपादक वगैरे पूर्ण पगार न घेतां जरूर तेवढीच व कचेरीच्या सोईनें रकम उचलूं लागला व कांही मालहि उधारीवर मिळूं शकला. तथापि प्रत्यक्ष कांहीं रकम कर्जाऊ काढावी लागली

सावकार—ज्यावेळीं प्रथम सावकाराची गरज लागली त्यावेळीं कऱ्हाड येथील शिराळकर यांच्या पेढींतून एक हजार रुपये कर्जाऊ काढले; हे कांहीं दिवसांनीं परत करतां आले पण पुढें त्यांजकडून वेळोवेळीं काढलेल्या सर्व रकमा परत करतां आल्या नाहींत व सहाव्या विभागाच्या शेवटीं त्यांचें देणें व्याजा सुद्धां सुमारें पसतीससें रुपये राहिलें. ही मदत केल्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

याप्रमाणेंच केसरी-मराठा ट्रस्टनेंहि तिसऱ्या विभागाच्या वेळीं एक हजार रुपये कर्जाऊ दिले होते ते आम्ही सुमारें तीन वर्षांनीं परत केले. कारण त्यावेळीं श्री. तात्यासाहेब केळकर व श्री. विद्वांस यांनीं आपल्या जागांचे राजीनामे देऊन नवीन ट्रस्टी यावयाचे होते तेव्हां रा. तात्यासाहेबांच्या हातचा व्यवहार त्याच्याच हस्तें पुरा होणें योग्य होतें म्हणून ती रकम परत करण्यात आली. मात्र त्यांनीं झाल्या दिवसांचें सर्व व्याज आम्हांस सोडून दिलें याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

याखेरीज श्री. गणेश सदाशिव मराठे यांनीं पांचशें रुपये कर्जाऊ दिले आहेत. तसेंच रा. नरहर विष्णु देशमुख यांनींहि एक हजार रुपयांची रकम कर्जाऊ म्हणून दिली आहे. त्याचे आभार येथें मानणें अवश्य आहे.

अशा कामांत अडचणी या वारंवार येतातच व अनेक लोकांशीं व्यवहारांत संबंध येतो. परंतु आम्ही ज्यांच्याशीं व्यवहार केला त्यांत सर्वांनीं आमच्या कार्याकडे दृष्टि ठेवून आम्हांस अत्यंत सहानुभूति दाखविली. त्यांच्या सहानुभूतीच्या अभावीं आम्हांस या प्रचंड शब्दसागराचें पैलतीर गाठणें शक्य व झालें नसतें.

या सर्वांत प्रामुख्यानें निर्देश करावयाचा म्हणजे डेक्कन पेपरमिलचे मॅनेजर शेट फर्दुनजी पदमजी हे होत. यांचेकडे जेव्हां प्रथम मी कागदासंबंधीं करार करावयास गेलों तेव्हां त्यांची माझी मुळींच ओळख नसतां त्यांनीं अत्यंत आदरानें वागवून आम्हांस सवलतीच्या भावानें कागद द्यावयाचें कबूल केलें, एवढेंच नव्हे तर मध्यंतरीं भाव उतरला असतां ठरलेल्या दरापेक्षां आम्ही मागणी न करतांहि आमच्या कागदाचा दर कमी केला व आम्हाकडे बाकी थकली असतांहि कधीं आमच्या कामाची खोटी होऊं दिली नाहीं. त्यामुळें सर्व शब्दकोशास आम्हांस देशी कागद वापरतां आला व त्यांनीं आपली सहानुभूतीची दृष्टि आमच्यावर आजतागायत चालू ठेविली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहों. या गुजराती बोलणाऱ्या पारशी गृहस्थानीं जी सहानुभूति आम्हांस दाखविली तिचा सहस्रांशहि मराठी बोलणाऱ्या ब्राह्मण कागदाचे व्यापाऱ्यांनीं दाखविली असती तर आम्हांस अधिक आनंद झाला अडता.

त्या प्रमाणेंच छपाईचें काम प्रथम गणेश प्रिंटिंगमध्यें करून घेत असतां फार दिरंगाई होऊं लागली व त्यामुळें वरखर्च अंगावर फार बसूं लागला म्हणून तिसऱ्या भागापासून कलागृह छापखान्याकडे छपाईचें काम देण्यांत आलें तें अखेरपर्यंत त्याचेकडेच चालू राहून त्यांनींहि आम्हांस फार सहानुभूतीनें वागविलें य बद्दल त्या छापखान्याचे मालक रा. शंकर सखाराम दातेयांचे आम्ही फार आभारी आहों.

मध्यंतरीं सहावा विभाग छापण्याचें काम फारच लांबणीवर पडूं लागलें व पैशाचीहि अत्यंत टंचाई भासूं लागली. कारण भागीदारांकडून आलेली रकम पांच भाग छापण्यांत खर्च होऊन गली होती व सर्व भागीदारांनींच कांहीं विनंति केल्याप्रमाणे सहाव्या विभागाची रकम अगाऊ दिली नाहीं त्यामुळें फार अडचण झाली. अशावेळीं आम्ही आमचे मित्र रा. रा. न. अभ्यंकर व रा. श्री. र. राजगुरु यांची मदत मागितली व त्यांनींहि आम्हास सहावा विभाग छापून काढण्याच्या कामीं मदत करून आम्हांस मोठ्या पेंचांतून बाहेर काढलें. सहावा विभाग बाहेर पडल्यावर सातव्या विभागाची एवढी अडचण आम्हांस वाटली नाहीं. कारण त्यापूर्वीच संपादकांचें काम व पगार निम्मा करून इतर सर्व मदतनीस कमी केले होते व खर्चावर अगदीं काट्री चालविली होती व अखेरहि नजरेंत आल्यामुळें एक प्रकारचा उत्साहहि वाटूं लागला होता. तेव्हां या वर उल्लेखिलेल्या मदतीबद्दल आम्ही या मित्रद्वयाचे आभार येथें व्यक्त करणें अवश्य आहे.

मध्यंतरीं तिसरा, चवथा व पांचवा विभाग लवकर छापून निघावे म्हणून त्यांच्या प्रस्तावना समर्थ भारतकडे छापून घेतल्या त्यांचाहि या सहाय्याबद्दल निर्देश करणें अवश्य आहे.

जोंपर्यंत गणेशप्रिंटिंग वर्क्स मध्यें काम चालू होतें तोंपर्यंत बांधणीचें कामहि त्यांचेकडेस असे परंतु तेथून काम काढल्यानंतर रा. कोकाटे बंधु यांचेकडे बांधणीचें काम देण्यांत आलें व त्यांनींहि तें शेवटपर्यंत आमच्याशीं सहानुभूतिपूर्वक वागणूक करून तडीस नेलें याबद्दल त्यांचेहि येथें आभार मानिले पाहिजेत.

शब्दकोश छपाईचें काम ज्ञानकोशापेक्षांहि जास्त किचकट व कंटाळवाणें व वरचेवर दुरुस्त्या करावयास लावणारें, यामध्यें प्रत्येक स्वल्पविराम, अर्धविराम, वगैरे चिन्हें, लहानमोठा टाइप, अवतरणचिन्हें, डॅश वगैरे सर्वांसच महत्त्व व आंकडेहि नीट टाकले पाहिजेत नाहीं तर प्रत्येकांत चूक व्हावयाची याकरितां हेंच काम करण्यांत तरबेज झालेला जुळारीवर्ग अवश्यक होता व शक्य तों ज्ञानकोशांत असलेल्या मंडळीस एकत्र ठेवावयाचें या प्रयेस अनुसरून ज्ञानकोशामध्यें विद्यासेवकाचें काम करणारे रा. रा. मुकुंद सदाशिव देवकुळे याचेकडे आरंभापासुन छापखान्याची व्यवस्था सोंपविली व त्यांनींहि आमचा हेतु पूर्णपणें ध्यानात घेऊन आपला जुळारी वर्ग तयार केला व मुद्रित दुरुस्तीचे आमचे श्रम वांचविले. मजकूर ध्यानात घेऊन दुरुस्ती लक्ष्यांत घेऊन काम शक्य तितकें शुद्ध करण्याकडे त्यानीं नेहमीं लक्ष्य ठेवून अत्यंत निरलसपणें व चिकाटीनें व आमच्या अडचणींतहि सहभागी होऊन हें काम पूर्ण होईपर्यंत आम्हास सहाय्य केलें या बद्दल आम्हांस त्यांचा अभिमान वाटणें साहजिकच आहे. रा देवकुळे हे सुप्रसिद्ध कै. रावजी मोरेश्वर देवकुळे याच्याच परंपरेतील आहेत ही गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते.

संपादक वर्गाचीं नांवें ग्रंथावर येतात व तीं सर्वांस माहीत होतात पण कचेरीची व्यवस्था पाहणारी मंडळी पडद्याआड असतात पण त्यांचीहि मदत अशा कार्यांत महत्त्वाची असते तेव्हां हिशोबी व लिहिण्याचें काम करणारे व आमचे मदतनीस रा रामचंद्र मोरेश्वर देव हे ज्ञानकोशाच्या कार्यांतहि कचेरींत अपुन विद्यासेवकाच्या कामांत मला मदत करीत असत तेच शब्दकोशाच्या आरंभापासुन आमच्यात सर्व अडचणी सोसुन राहिले हें त्यांचें कामावरील व आम्हांवरील प्रेमाचें द्योतक आहे व त्या बद्दल आम्हास फार धन्यता वाटते. तसेच एक ज्ञानकोशांतीलच आमचे सहाय्यक रा. द. ना. बोकील हेहि या कार्यांत बरेच दिवस आमच्या कचेरींत होते पण मध्यंतरीं केलेल्या काटकसरींत त्यांस आम्हांस सोडावें लागलें. तिसरे आमचे कचेरींतील कार्यकर्ते रा. ना. त्र्यं. पुरंदरे हेहि आपलें काम दक्षतेनें व काळजीपूर्वक करून आम्हांस सर्व प्रकारें मदत करीत आले आहेत.

याखेरीज मध्यंतरीं काहीं पदवीधर व इतर कार्यकर्ते आम्ही आमच्या मदतीस घेतले होते त्यांचीं नांवें पुढें दिलीं आहेत.

रा. रा. यशवंत गोपाळ कानेटकर, रा. रा. पुरुषोत्तम सावळाराम दीक्षित, रा. रा. नरहर रामकृष्ण तळेकर, रा. रा. विठ्ठल दिनकर आधारकर, रा. रा. वि. ल. कोरान्ने, रा. रा. केशव नरहर शास्त्री, रा. रा. भालचंद्र शंकर डांगे, रा. रा. गो. वि. राजगुरु, रा. रा. नारायण लक्ष्मण करमरकर, रा. रा. एस्. व्ही. पेंडसे

आमचे ग्राहक--महाराष्ट्र शब्दकोशाच्या कामांत विशेष सहाय्य कोणाकडून झालें त्यांचा निर्देश मागें केलाच आहे. त्यांचें सहाय्य हें विशेष प्रकारचें असल्यामुळें त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंच पण आमचा मुख्य भर ज्या मध्यम वर्गावर असतो त्या वर्गाकडून आमच्या कार्यास कशी सहानुभूति मिळाली हेंहि येथें नमूद केल्यास त्यांचेहि आम्ही उतराई होऊं व इतर कार्यकर्त्यांसहि तें बोधप्रद होईल यांत शंका नाहीं. मध्यमवर्गास विशेष महत्त्व देण्यांत पूर्वी ज्यांचा आम्ही उल्लेख केला त्यांचें महत्त्व आम्ही कमी समजतों असें नव्हे तर उलट त्यांच्या सारखी जर कांहीं मंडळी अशा कार्यांत विशेष लक्ष्य घालतील तर अशीं कार्यें अधिक विविध प्रकारचीं व जास्त व्यवस्थित व पद्धतशीर होण्यास मदतच होईल. वाङ्मयीन कार्यकर्त्यांमागचा द्रव्य जमविण्याचा व बिलें देण्याचा समेमिरा जर कमी होईल तर त्यास आपलेंच कार्य अधिक उत्साहानें, मन व्यग्र न होऊं देतां व अधिक कार्यक्षमतेनेंहि करण्यास सांपडेल. पण मध्यम वर्गावर भार टाकण्यापासुनहि कार्यकर्त्यास एक लाभ होतो तो म्हणजे मनुष्यस्वभावाचा अभ्यास करण्यास मिळालेली संधि, सर्व महाराष्ट्र किंबहुना देशभर प्रवास करण्याची जरूरी व त्यामुळें विविध प्रकारच्या कार्यकर्त्यांशीं, मित्रांशीं वगैरे होणारा विचारविनिमय, परिचय व ज्ञानवृद्धि हा होय. असो, आमचे मध्यम वर्गातील ग्राहक सर्व महाराष्ट्रातच नव्हे तर सिमल्यापासुन रामेश्वरापर्यंत सर्व देशभर पसरलेले आहेत. त्यांतल्यात्यांत ज्या टिकाणीं आमचे दहापेक्षां अधिक ग्राहक आहेत अशा गांवाची पुढें प्रदेशवार माहिती दिली आहे ती बरीच उद्बोधक होईल.

त्याप्रमाणेंच या माहितीमुळें दुसराहि एक जनतेचा गैरसमज दूर होईल असेंहि म्हणावयास हरकत नाहीं. अलीकडे सामान्यतः सर्वत्र असें प्रतिपादण्यांत येतें कीं पुण्यातील मंडळी स्वतः पैसा खर्च न करतां बाहेरून पैसा आणून पुण्यांतील संस्था चालवितात. आतां पुण्यांत संस्था पुष्कळ आहेत ही गोष्ट खरी व त्यांतील काहीं सर्व महाराष्ट्राच्या तर काही अखिल भरतखंडाच्या उपयोगी असें कार्य करीत आहेत. उदा० पुण्यास स्थापन झालेलें वैदिक संशोधन मंडळ; महिला विद्यापीठ, भांडारकर प्राच्य विद्यामंदिर, वगैरे सर्व भरतखंडाचें कार्य करीत आहेत भारतइतिहाससंशोधकमंडळ वगैरे सारख्या संस्था महाराष्ट्राचें कार्य करीत आहेत. महाराष्ट्र शब्दकोशाचे कार्यहि सर्व महाराष्ट्राचें आहे तेव्हां असें कार्य कोठेंहि होत असलें तरी त्यास सर्व महाराष्ट्राकडून सहाय्य होणें जरूर आहे. ज्ञानकोशाचें कार्य नागपूरला सुरू झालें तरी पूर्ण होण्याकरितां पुणें येथेंच आणावें लागलें. शब्दकोशाचें कार्य तर पुण्यासच सुरू झालें. तेव्हां प्रथम पुणें येथील जनतेनें या

कार्यास कसें सहाय्य केलें व त्या मानानें इतर ठिकाणीं कोणत्या प्रमाणांत सहाय्य झालें हें पाहिलें म्हणजे पुण्यावरील वर उल्लेखिलेल्या आक्षेपास परभारेंच उत्तर मिळेल.

महाराष्ट्राच्या पुणें मुंबई व नागपूर या तीन राजधान्या मानल्या जातात व त्यांत या त्यांत पुणें ही महाराष्ट्राची शैक्षणिक राजधानी आहे ही गोष्ट मुंबई युनिव्हर्सिटीच्या व्हाइस चान्सेलरनींच आपल्या एका पुणें येथील भाषणांत बोलून दाखविली होती व शब्दकोशाच्या कार्यांत तरी पुण्यानें आपला हा लौकिक कायम ठेवला आहे ही गोष्ट पुणें येथें ३८० मुंबई येथ २३० व नागपूर येथें १४४ ग्राहक आहेत यावरून उघड होईल म्हणजे पुण शहरानें नागपूर व मुंबई मिळून होणाऱ्या संख्येपेक्षांहि अधिक ग्राहक देऊन आपल्यावरील जबाबदारी उत्तमरीतीनें पार पाडली आहे.

आतां वऱ्हाडकडच्या मंडळीचें नेहमीं असें म्हणणें असतें कीं महाराष्ट्र नेहमीं वऱ्हाड प्रांताला लुटून पैसा नेतें व कामें करतें. शब्दकोशाच्या बाबतींत तरी वरील तीन शहरें सोडून जिल्ह्यांच्या ठिकाणांचा विचार करतां वऱ्हाडची ही उदार वृत्ति आमच्या उपयोगी पडली नाहीं हें दुर्दैवानें नमूद करावें लागतें पुण्यानंतर सर्वांत जास्त अशी ग्राहकांची संख्या महाराष्ट्रांतील सर्वांत दुष्काळी म्हणून प्रसिद्ध असलेल्या अहमदनगर शहरांत (३९) आहे. त्या खालोखाल सोलापूर (३७), नाशिक (३६), सातारा (३३), व धुळें (३१) अशी असून सर्वांत श्रीमंत समजल्या जाणाऱ्या पूर्व खानदेशच्या राजधानींत धुळ्यापेक्षां कमीच (म्हणजे २४) ग्राहक आहेत उलट कोंकणच्या किनाऱ्यावरच्या मागासलेल्या समजल्या जाणाऱ्या मालवण गांवीं (२७) आहेत. ठाणें व कल्याण या दोन्ही गांवीं प्रत्येकीं (२२) ग्राहक असून राजापूरच्या पेठेंत (१९) तर अंमळनेरच्या पेठेत (१२) रत्नागिरी व देवरूख येथें (११), तर पंढरपूर क्षेत्रांत (१३) व वाई क्षेत्रांत (१०) ग्राहक आहेत.

या बरोबर वऱ्हाडच्या जिल्ह्यांच्या ठिकाणांची तुलना केली तर अकोला (२४), उमरावती (२२), यवतमाळ (१३) व वणी या तालुक्याच्या गांवीं (१०) अशी संख्या आहे,

मराठी मध्यप्रांतांत नागपूरचा आंकडा वर दिलाच आहे. त्या नंतर वर्धा (२१), चांदा (१२) व भंडारा येथें (१०) ग्राहक आहेत. म्हणजे मध्यमहाराष्ट्रांतील ग्राहकांची संख्या वऱ्हाड व मराठी मध्यप्रांताच्या ग्राहकांच्या दुप्पट आहे.

हिंदी मध्यप्रांतांत जरी जिल्ह्यांच्या ठिकाणीं महाराष्ट्रीय वस्ती बरीच असली तरी आमच्या दृष्टीनें दहा ग्राहकांच्या वर संख्या अडलेलीं ठिकाणें फक्त जबलपूर (२२) व खांडवा (१०) हीं दोनच आहेत.

महाराष्ट्राच्या बाहेरच्या विभागाचा विचार करावयाचा म्हणजे कर्नाटकांतील महाराष्ट्रीयांचा संबंध महाराष्ट्राशीं विशेष दृढ असून तेथें महाराष्ट्रीय संस्कृति चागलीच दृढमूल झाली आहे. त्यामुळें त्या भागांत शब्दकोशाच्या ग्राहकांची संस्था समाधानकारक दिसून येते. त्यांत अर्थात् बेळगांव अर्ध महाराष्ट्रीय असल्यामुळें सर्वांत पुढें असून तेथें (२०) तर हुबळी (१६) आणि धारवाड व विजापूर येथें (१४) याप्रमाणें ग्राहक आहेत व दक्षिणेकडे बंगलोर येथें (१४) तर मद्रासेस (१०) आहेत.

त्या मानानें गुजराथकडे महाराष्ट्रीयांची संख्या किंवा महाराष्ट्रांतील कार्याबद्दल आस्था कमी असावी असें वाटतें. कारण तिकडील खुद्द बडोदें सोडलें तर दहापेक्षां अधिक ग्राहक असलेलें शहर फक्त अहमदाबाद असून तेथें १५ ग्राहक आहेत.

बृहन्महाराष्ट्रातील उत्तरेकडचा भाग घेतल्यास कानपूर, दिल्ली व बनारस हीं आपल्या संस्कृतीचीं केंद्रें असून तेथें अनुक्रमें दहा, तेरा व दहा असे ग्राहक आहेत.

गोमांतक हा जरी राजकीय दृष्ट्या अलग असला तरी आम्ही त्यास महाराष्ट्राचाच भाग समजतों व तेथील मंडळीची महाराष्ट्रांतील चळवळीस जी सहानुभूति आढळून येते ती इतरत्र क्वचितच आढळते व आमच्या कार्यावर त्यांचें विशेषच प्रेम दिसून आलें. त्यामुळें त्यांतील मुख्य जीं पणजी (२२) व मडगांव (२०) हीं गावें, त्या ठिकाणीं आमचे ग्राहक खुद्द महाराष्ट्रांतील कांहीं जिल्ह्याच्या ठिकाणांपेक्षाहि अधिक आहेत ही गोष्ट विशेष अभिनंदनीय आहे.

यानंतर संस्थानांकडे दृष्टि दिल्यास महाराष्ट्रीय संस्थानांत सर्वांत मोठें संस्थान जें ग्वाल्हेर तेथेंच आमचे सर्वांत अधिक म्हणजे (८९) ग्राहक आहेत. अर्थात् या ठिकाणीं प्रत्यक्ष संस्थानिकांकडुन मिळणाऱ्या मदतीचा विचार केलेला नसून इतर जनतेसंबंधीं आपण विचार करीत आहों ही गोष्ट लक्ष्यांत ठेवली पाहिजे. ग्वाल्हेरनंतर अनुक्रम बडोद्याचा लागतो व त्या दोहोंमध्यें फक्त एकच आंकड्याचें अंतर आहे. यावरून बडोदें शहर आकारानें लहान असूनहि तेथें जी विद्याभिरुची वाढली आहे तिचा स्पष्टपणें बोध होतो. त्यानंतर आमची महाराष्ट्राची व छत्रपतींची राजधानी कोल्हापूर (६८) येते. वास्तविक हें शहर बडोदें व ग्वाल्हेरपेक्षां बरेंच लहान असून तेथें विद्येची प्रगति किती झाली आहे याचें हें द्योतक आहे.

यानंतर महत्त्वाचें संस्थान इंदूर यांत ६४ ग्राहक आहेत पण इंदूर व कोल्हापूरपेक्षांहि हैद्राबाद येथें ग्राहकांची संख्या अधिक असून ती ७० आहे. या गोष्टीचें आपणास नवल वाटल्यावांचून राहणार नाहीं.

यानंतर अनुक्रमें सांगली (३०), मिरज (१४), देवास (१२), धार (१०) याप्रमाणें ग्राहक आहेत व फलटण-सारख्या लहान गांवातहि आमचे (११) ग्राहक आहेत ही गोष्ट तेथील सध्यांच्या सुविध अधिपतींनीं व दिवाणांनीं प्रजेंत उत्पन्न केलेल्या विद्येच्या अभिरुचीमुळेंच शक्य झाली आहे याबद्दल शंका वाटत नाहीं.

याप्रमाणें एकंदर आमच्या ग्राहकांचा प्रादेशिक दृष्ट्या ठोकळ आढावा आहे. यांत एकदम मिळालेल्या देणग्या वगैरेंचा विचार केलेला नसून दहापेक्षां कमी ग्राहक असलेल्या गांवा-चाहि विचार केलेला नाहीं ही गोष्ट मात्र लक्षांत ठेवून याचा विचार केल्यास तो बराच उद्बोधक होईल यांत शंका नाहीं.

प्रसिद्धी—आजचें युग जाहिरातीचें असून जो तो आपल्या कार्याची जाहिरात करीत असतो. या कामीं बंगाली लोक सर्वांच्या पुढें असून आपण महाराष्ट्रीय सर्वांच्या मागें आहोंत. तथापि आपलें कार्य जनतेच्या नजरेपुढें नेहमीं असणें अवश्य आहे हीहि गोष्ट तितकीच महत्त्वाची आहे. तेव्हां आम्ही आमच्या प्रचारकार्यामध्यें अगर इतर आनुषंगिक कामामुळें व्याख्यानें वगैरे देण्यास अगर परिषद-संमेलनास गेलों तर आमच्या कार्याची माहिती, व्याख्यान अगर इतर मार्गांनीं शक्य तितकी दतच असूं पण वर्तमानपत्रातहि मधून मधून आमच्या प्रगतीचे अहवाल देऊन हें प्रचाराचें कार्य चालु ठेवीत असूं. विशेष प्रचाराची जरूर आमचे ग्रंथ बाहेर पडण्यापूर्वीच होती. पुढें प्रत्यक्ष ग्रंथ पाहून अनेक लोकास कार्याची कल्पना येत असे. यां आरंभींच्या काळांत व नंतरहि आम्हांस अनेक पत्रकारानीं आम्ही वेळोवेळीं पाठविलेलीं विनंतिपत्रकें, जाहीर-पत्रकें वगैरे चांगल्या ठिकाणीं छापून आम्हांस पुष्कळच मदत केली. या प्रकारचें सहाय्य आम्हांस केसरी, ज्ञानप्रकाश, महाराष्ट्र व नवाकाळ यांकडून विशेष मिळालें केसरीमध्यें तर आमचीं यथयावत् पत्रकें छापून आलीं होतीं व आमच्या शेअरच्या अर्जाचाहि फॉर्म एकदां छापला होता व तोच कापून काढून भरून पाठवून देवासचे रा. चिं. ग. ओक हे आमचे भागीदार झाले ही गोष्ट आम्हांसहि नवल वाटण्यासारखी वाटली. केसरी मोंगलाईंत जात नाहीं. त्या प्रांतात महाराष्ट्र व ज्ञानप्रकाश यांचा आम्हांस फार उपयोग झाला.

आमचे विभाग जसजसे प्रसिद्ध होत गेले तसतसे अभिप्रायहि वरील पत्रांनीं देऊन आम्हांस उत्तेजन दिलें.

वरील पत्रांची आम्हांस विशेष सहानुभूति असल्यामुळें व आम्ही पाठविलेली माहिती बहुधा प्रमुख जागच्या मजकुरांत येत असल्यामुळें त्याचा आम्हांस इतका उपयोग झाला कीं, प्रत्यक्ष जाहिरातीवर असा आम्ही एक पैसुद्धां खर्च केला नाहीं व जाहिरात न मिळतांहि या पत्रानीं आमच्या कार्याची प्रसिद्धि केली याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहों.

जाहिरात न देण्याचें दुसरें एक कारण असें कीं अशा ग्रंथांस जाहिरातीनें क्वचितच मागणी येते असा आमचा ज्ञानकोशाच्या वेळचा अनुभव आहे. ज्यास हा ग्रंथ घ्यावयाचा आहे तो जाहिरातीची वाट पहात नाहीं पण आमचे बहुतेक ग्राहक व्यक्तिशः विनंति करूनच मिळविलेले असत तेव्हा जाहिरातींत होणारा खर्च आम्ही अजीबात वांचविला.

ग्रंथांची मदत—अशा तऱ्हेच्या कार्यांना ज्याप्रमाणें द्रव्यबल व मनुष्यबल लागतें त्याप्रमाणें ग्रंथबलहि लागतें. ज्ञानकोशरचनेच्या वेळीं आम्ही फार उत्तम ग्रंथसंग्रह जमविला होता पण तो आमच्याकडून शक्य ते प्रयत्न होऊनहि आम्हाजवळच नव्हे पण येथें पुण्यातहि कोठें एकत्र राहूं शकला नाहीं. तेव्हा शब्दकोशाच्या कार्यास ग्रंथ तर अनेक लागणार व पुढें त्याची वाताहत झाल्यास जें दुःख होतें त्याचा अनुभव पुन्हां येऊं नये म्हणून यावेळीं प्रथमपासुन असें धोरण ठेविलें कीं, जोंपर्यंत विनामूल्य किंवा वापरण्यापुरता ग्रंथ मिळेल तोंपर्यंत तो प्रत्यक्ष विकत घ्यावयाचा नाहीं. जे महत्त्वाचे कोशादि संदर्भग्रंथ वरचेवर लागतात तेवढेच विकत घ्यावयाचे व बाकीच्या ग्रंथाचें काम उसनवारीवर भागवावयाचें. तेव्हां आम्हांस ग्रंथांकरितां अनेकांकडे याचना करावी लागली. परंतु आमची विनति कोणीहि अमान्य केली नाहीं. या कामीं आम्हांस ज्यांची मदत झाली त्यांचा उल्लेख पुढें करीत आहें.

बडोदे सरकारनें पुष्कळच ग्रंथ आजपर्यंत प्रसिद्ध केले आहेत त्यांपैकीं कांहीं विकत मिळतात पण कांहीं केवळ त्यांच्याच उपयोगाकरितां खानगीमधून तयार झालेले ग्रंथ आहेत ते बाहेर मिळणें शक्य नसतें तेव्हां आम्ही खाजगी कारभारी व विद्याधिकारी यांचेकडे अर्ज करून त्यांचेमार्फत प्रसिद्ध झालेले ग्रंथ आम्हांस मिळावे अशी विनंति केली व ती मान्य होऊन आम्हांस ते सर्व ग्रंथ मिळाले याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. याचप्रमाणें केसरी कचेरीमार्फत प्रसिद्ध झालेले सर्व ग्रंथ आम्हास विनामूल्य मिळाले. यानंतर व्युत्पत्ति वगैरेच्या दृष्टीनें बहुमोल ग्रंथ श्री. गंगाधरराव नारायणराव उर्फ आबासाहेब मुजुमदार यांचेकडून मिळाले, भारत इतिहास संशोधन मंडळांतील ग्रंथसंग्रहाचाहि आम्हास फार उपयोग झाला. तसेच श्री. सरदार तात्यासाहेब मेहेंदळे व श्री. दत्तो वामन पोतदार व श्री. दाजीसाहेब पटवर्धन यांचेकडूनहि बरेच

प्राचीन ग्रंथ मिळाले, तसेच श्री. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर, श्री. पांडुअण्णा शिराळकर, वगैरेकडून कांहीं उपयुक्त ग्रंथ मिळाले. श्री. रामचंद्र बळवंत टिळक यांनीं नामजोशी कोशाची हस्तलिखित प्रत दिली तिचा आम्हांस फार उपयोग झाला.

तसेंच प्रस्तावना लिहितांना भांडारकर इन्स्टिट्यूट, फर्ग्युसन कॉलेज व सर परशुरामभाऊ कॉलेज, सर्व्हंटस ऑफ् इंडिया सोसायटी, केसरी संस्था यांच्या ग्रंथ संग्रहालयांचाहि आम्हांस भरपूर उपयोग करून घेतां आला त्याबद्दल त्यांचाहि कृतज्ञता पूर्वक उल्लेख करणें जरूर आहे.

याखेरीज विशेष आभार मानावयाचे म्हणजे ज्या गृहस्थांस आम्ही सल्लागार मंडळांत येण्याची विनंति केली व ती ज्यानीं मान्य केली व जेव्हां जेव्हां आम्हांस जरूर वाटली व आम्ही विचारलें तेव्हां योग्य सल्ला दिला याबद्दल खालीं नांवे दिलेल्या मंडळीचे आम्ही विशेष ऋभारी आहों. यामध्यें श्रीमंत संस्थानिकापासुन वाङ्मसेवकांपर्यंत अनेक दर्जाची व योग्यतेची मंडळी आहेत.

श्री. महाराज सयाजीराव गायकवाड, (बडोदें).
श्री. राजेसाहेब पंतप्रतिनिधि, (औन्ध).
श्री. राजेसाहेब बाळासाहेब पटवर्धन, (मिरज).
श्री. नारायणराव उर्फ बाबासाहेब घोरपडे, (इचलकरंजी)
श्री. रावराजे गणपतराव राजवाडे, (ग्वाल्हेर).
श्री. गंगाधर नारायण उर्फ **आबासाहेब मुजुमदार**.
श्री. नरसिंह चिंतामण केळकर.
कै. श्री. चिंतामण विनायक वैद्य.
श्री. विठ्ठल रामजी शिंदे.
प्रि. वैजनाथ काशिनाथ राजवाडे.
प्रो दत्तो वामन पोतदार.
श्री. नारायण गोविंद चाफेकर.
श्री. यादव माधव काळे.
प्रो. श्रीकृष्ण निळकंठ चाफेकर.
प्रो. यशवंत खुशाल देशपांडे.

अखेरीस आम्हो सर्व संपादक मंडळी ज्ञानकोशांत अनेक वर्षे एकत्र काम करून त्यांतूनच पुढें निघालेल्या या महत्त्वाच्या स्वभाषेच्या कार्यांत आज दहा वर्षे एकत्र राहून काम करीत आलों व ज्ञानकोशाची परंपरा पुढें चालविली व मला पुढें करून माझे मित्र रा. चिंतामणराव कर्वे, रा. आबा चांदोरकर व रा. चिंतामणशास्त्री दातार यांनीं निरलसपणें आतापर्यंत सर्व प्रकारच्या अडचणींत समभागी होऊन माझ्याशीं जें सहकार्य केलें त्याबद्दल त्यांचाहि येथें मित्र भावानें सादर उल्लेख केला पाहिजे. अशीं कार्यें केवळ एकट्यादुकट्या व्यक्तीच्या हातून होत नाहींत व संशयक्तीनें तीं केलीं तरच यशस्वी होतात व त्याकरितां अशा तऱ्हेनें एकजुटीनें कार्य करण्याची ही परंपरा महाराष्ट्रांत यापुढें वाढत जाईल व मराठी भाषेच्या व एकंदर महाराष्ट्राच्या उत्कर्षास अनेक अंगानीं कारण होत जाईल अशी आशा व्यक्त करून महाराष्ट्रानें अशींच कार्यें आम्हांकडून यापुढें करून घ्यावीं व परमेश्वरानें तीं करण्यास आम्हांस समर्थ करावें व 'क्लेशः फलेनहि पुनर्नवतां विधत्ते' ही उक्ति आमच्या बाबतींत सार्थ करावी एवढीच प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करतों.

यशवंत रामकृष्ण दाते.

महाराष्ट्र शब्दकोश

ग्रंथसंक्षेप सूची (पुरवणी)

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक प्रकाशक इ०	आंकड्यांचा खुलासा
अग्नि	अग्निक्रीडा	संपा. रं. स. लाळे किकवीकर	पृष्ठ
अर्वाचीन	अर्वाचीन कविता (पूर्वार्ध)	संपा. कवि चंद्रशेखर, प्र. ग्रंथप्रसारक मंडळी सन १९०४	पृष्ठ
अस्पृ	अस्पृष्टांचा प्रश्न	ले. श्री म. माटे; लोकसंग्रह प्रेस, १९३३	पृष्ठ
आन	आनंदतनयकृत नवरसचरित्र	आनंदतनयकृत कवितासंग्रह, सपा. ज. बा. मोडक, वा. दा. ओक, निर्णयसागर १८९१	कविता, अंक
आफमाने	आदिलशाही फर्मानें	भा. इ. सं. मं. अखेरची यादी	
आमहा	आनंदतनयकृत महाबळ चरित्र	आनंदतनयकृत कवितासंग्रह	कविता, अंक
आराम	आनंदतनयकृत रामचरित्र	,, ,,	,, ,,
आश–आशबरी	आनंदतनयकृत शबरी आख्यान	,, ,,	,, ,,
आविश्वा	आनंदतनयकृत विश्वामित्राभिगमन	,, ,,	,, ,,
आसेतु	आनंदतनयकृत सेतुबंध	,, ,,	,, ,,
एक	एकचप्याला नाटक	संपा. गडकरी आवृत्ति ६ वी १९३२	पृष्ठ
एशिआ	एका शिपायाचं आत्मवृत्त	संपा. जनरल नानासाहेब शिंदे, सयाजी साहित्यमाला, पुष्प २३९ वें	पृष्ठ
कथासारा	कथासारामृत (महिपतिकृत)		अध्याय, ओवी
कला	कलावंत खातें (बडोदें)		पृष्ठ
कांगमो	कांचनगडची मोहना नाटक	संपा. कृ. प्र. खाडिलकर, आवृत्ति ५ वी, १९२१	पृष्ठ
कालिका	कालिकापुराण		अध्याय, ओवी
किंशुक	किंकरकविकृत शुकरंभासंवाद	अनेककविकृत कवितासंग्रह भाग २ रा	कविता
कीच	कीचकवध नाटक	संपा. कृ. प्र. खाडिलकर, आवृत्ति २ री	पृष्ठ
कीर्तन	कीर्तनतरंगिणी	संपा. दामोदर गणेश जोशी, आवृत्ति १० वी, सन १९१२	भाग, पृष्ठ
कृकौ	कृष्णकौतुक		कविता
कृयु	कृष्णार्जुनयुद्ध नाटक	संपा. न. चिं. केळकर	पृष्ठ
खाअ	खासगी खात्यांतील अंमलदारांचे अधिकार	बडोदें	पृष्ठ
खानो	खानगींतील नोकरांचे पोषाख	बडोदें	पृष्ठ
खाला	खानगी खातें लागतीचे नियम	बडोदें	पृष्ठ
खेया	खेड्यांतील यात्रा	संपा. द. वा. परचुरे, आनंद प्रेस, सातारा सन १९२९	पृष्ठ
गलिव्ह	गलिव्हरचा वृत्तांत		पृष्ठ
गुजा	गुन्हेगार जाती	संपा. त्रिं. ना. अत्रे	पृष्ठ
चंद्रग्र	चंद्रग्रहण नाटक	संपा. य. ना. टिपणीस	पृष्ठ
तप	तपशीलपत्रकें. मॅरट पहा.	कर्नेल मॅरटकृत पुस्तकाचें भाषांतर, संपा. शं. श्री. देशपांडे	पृष्ठ

संक्षेप	ग्रंथनाम	संपादक प्रकाशक इ०	आंकडयांचा खुलासा
तीप्र	तीर्थयात्रा प्रबंध	संपा. लेले	पृष्ठ
देकृष्णजन्म	देवनाथकृत कृष्णजन्म		कविता
देहु	देशी हुन्नर (हिंदुस्थानांतील कारागिरीचें वर्णन)	संपा. बा. आ. गुप्ते, प्रका. मा. का. नामजोशी, आर्यभूषण प्रेस, १८८९	पृष्ठ
द्रौ	द्रौपदी नाटक	संपा. कृ. प्र. खाडिलकर, आवृत्ति २ री	पृष्ठ
नव, नवनीत	नवनीत	संपा. परशुराम तात्या गोडबोले आवृत्ति, ८ वी सन १९२३	पृष्ठ
पाक	पाकशास्त्र	संपा. पाठक	पृष्ठ
पुण्य	पुण्यप्रभाव नाटक	संपा. गडकरी, सन १९१७	पृष्ठ
पेब	पेशव्यांची बखर	संपा. कृष्णाजी विनायक सोहनी, प्रका. का. बा. साने. आवृत्ति ५ वी	पृष्ठ
पेशवे	पेशवेकालीन महाराष्ट्र	संपा. वा. कृ. भावे	पृष्ठ
पैमा	पैमासेंदु	कविभास्कर (अप्रकाशित)	कला
प्रेम	प्रेमसंन्यास नाटक	संपा. गडकरी, आवृत्ति २ सन १९२२	पृष्ठ
बाचि	बालरोगचिकित्सा	संपा. पांडुरंग गोपाळ, मुंबई १८७२	पृष्ठ
बाय	बायकांचें बंड नाटक	संपा. कृ. प्र. खाडिलकर	पृष्ठ
भारा	भावार्थ रामायण	एकनाथकृत	कांड,अध्याय,ओवी
मऐशि	मराठी ऐतिहासिक शिलालेख		
मराचिथोरा	म. रा. चिटणीस-थोरले राजाराम महाराज	बखर	पृष्ठ
मानाप	मानापमान नाटक	संपा. कृ. प्र. खाडिलकर	पृष्ठ
माज्ञा	माडगांवकरांची ज्ञानेश्वरी		अध्याय, ओवी
मोमंरा	मोरोपंतकृत-मंत्ररामायण		अध्याय, कविता
मोविराट	मोरोपंतकृत-विराटपर्व		अध्याय, कविता
वाडदुबा	दुसरा बाजीराव रोजनिशी	संपा. ग. चि. वाड	पृष्ठ
विकार	विकारविलसित	गोपाळ गणेश आगरकर	पृष्ठ
शास्ते	शास्ते	बायबल मराठी भाषांतर	अध्याय, वचन
सृपनि	सृष्टपदार्थ नियम	संपा. शं. रा. हतवळणे, मुंबई १८८९	पृष्ठ
ज्ञागा	ज्ञानेश्वर गाथा		अभंग

याशिवाय ज्या ग्रंथांतील अवतरणें शब्दकोशांत थोडयाच वेळां घेतलीं आहेत त्यांचीं नांवें संक्षेप करून न देतां संपूर्ण दिलीं आहेत असे अनेक ग्रंथ आहेत त्यांपैकीं कांहींचीं नांवें पुढें दिलीं आहेतः-अध्यापन, अरुणोदय, आठल्ये (कृ. ना.) यांची कविता, आनंदीरमण, इलासुंदरी; उषःकाल, कमला, करुणाष्टकें, कल्याण नाटक, कान्होपात्रा, किरातार्जुन, केशवकुमार (कविता), गुप्तमंजूष, गोविंद कवि, ग्रंथराज, चक्रधर सिद्धांतसूत्रें, जन्मरहस्य, तांब्यांची कविता, तुफान, दत्तपदें, दामाजी नाटक, धनुर्भंग नाटक, धर्मसिंधु, धर्माजी, पूजावसर, प्रतिभासाधन, प्रेमशोधन, बदलापूर, बंदीशाला, बाजीराव, भयंकर दिव्य, मराठ्यांची बखर, महाराष्ट्र कृषीबल, महाराष्ट्र शारदा, महिपतिकृत पांडुरंग स्तोत्र, मिताक्षरा, मुलांचा व्यावहारिक कोश, यशोधन, रत्नकांता, रत्नप्रभा, राजसंन्यास, रासक्रीडा, लक्ष्मी आणि सरस्वती, वज्राघात, वररुचीची कथा, वाग्वैजयंती, विंध्याचल, वेडयांचा बाजार, शशिसेना, शापसंभ्रम, शारदा, शिवपाविऱ्य, शिवाजी, सवतीमत्सर, सहचारिणी, सौभद्र, स्वरशास्त्र इत्यादि.

॥ श्री ॥

महाराष्ट्र शब्दकोश

विभाग सातवा

वे

वे—(संक्षेप.) वेदशास्त्रसंपन्न.

वें—जुन्या मराठींतील तृतीयेचा प्रत्यय; नें. 'निरूपणी येऊन बैसला। तो विंचुवें फणकाबिला।' –दा १८.१०.२३. [एं. प्रत्यय]

वेउळ—पु. एक हिंस्र पशु; चिता. 'मग तया सिंहें आपुले सेवक। वाघु वेउळु कोल्हा काउळा। तयातें म्हणितलें।' –पंच ३९.४१. [सं. व्याल] **वेउळी**–स्त्री. वाघीण; इंगळी. 'कां आयुष्य जातिये वेळे। शेळिये सात वेउळी मिळे।' –ज्ञा १६. २५९.

वेंकट—पु. व्यंकटेश; व्यंकोबा. 'कथा वेंकटीची कथा वीटलाची।' –राक १.११. –वि. वांकडा. 'भ्रकुटी वेंकट वेंकट पाहे।' –दावि ७७५. [सं. व्यंकट]

वेंकावल्या—स्त्री.अव. (प्र.) वांकुल्या; वेडींवांकडीं तोंडें, बोटें करून वेडावणें.

वेक्ती—स्त्री. (प्र.) व्यक्ति; १ माणूस. 'पिंडब्रह्मांडतत्त्व रचना। विश्वाकारें वेक्ती नाना।' –दा ४.९.१३. २ व्यक्ति; व्यक्तता; उघड आकृति; दिसणारा आकार. 'जे अवेक्त पुरुषाची वेक्ती। विस्तारें वाढली इच्छाशक्ति।' –दा १.३.११. [सं. व्यक्ति] **वेक्त**–वि. व्यक्त; स्पष्ट; उघड; आकारयुक्त. 'ऐसीं पंचमाहाभूतें। पूर्वी होतीं अवेक्तें। पुढें जालीं वेक्तें। सृष्टिरचनेसी।' –दा ८. ३.५७. [सं. व्यक्त]

वेख—पु. १ वेष; पोशाख. २ आकृति; रूप; सोंग. 'तो ब्रह्मचि मनुष्यवेखें। ओळख तूं।' –ज्ञा ४.१०५. ३ दृष्टि; स्वरूप. 'तरीं कैसेनि पां वेखें। सदा सुखियें एकें।' –ज्ञा १५. ४१२. [सं. वेष]

वेखंड—न. एक औषधी द्रव्य, मूळ. हें वात आणि कृमि यांचा नाश करणारें आहे. [सं. वच+खंड] **म्ह०** वेडा वाणी वेखंडाचा पसारा.

वेखसें, वेखासें-शें—वि. १ विरुद्ध; वांकडें. 'परी धर्मासि वेखासें। जावों नेदी।' –ज्ञा ७.४७. २ वोखटें; वाईट. 'तेवीं वेखासें अंतरीं। राहों नेणें।' –ज्ञाप्र १०१. ३ व्यर्थ. [सं. द्वेष्य; प्रा. वेस; सं द्वेषस्=शत्रुत्व]

वेग—पु. १ गतीचा जोर; जोराची गति; गतिमान् पदार्थाचा जोर. 'आणि मातलिया इंद्रियाचे वेग।' –ज्ञा १६.१९२. २ त्वरा; गडबड; घाई; झपाटा; सपाटा; जलदी. –ज्ञा २.१७. 'तुम्ही आतां वेग कीजे। नळाची शुद्धि लाविजे।' –कथा १. १०.७५. ३ आवेश; जोर; उत्साह. 'आटु वेगु विंदाणु। आशा शंका प्रतारणु। हे संन्यासिले अवगुणु। जिया वाचा।' –ज्ञा १३. २७१. ४ वेदना; कळ; अंगांत भिनत असलेल्या विषाच्या लहरी किंवा वेदनेच्या उसळया प्रत्येक; पेटका. ५ मलमूत्र विसर्जनाची घाई; गुदद्वारें मलविसर्जन होतांना येणारा आवेग, शीण; जुलाब; ढाळ. ६ हल्ला. 'कपीवीर चौताळला वेग केला।' –राक १.६. ७ एखादें काम करण्याची आकस्मिक उसळी; मनानें एकदम घेतलेलें वळण; जोराचा उमाळा; मानसिक शक्तीचा एकदम झालेला उद्रेक; उसळी. ८ आधिक्य. [सं.] सामाशब्द– **वेगत्तरू**–क्रिवि. वेगवत्तर; अतिवेगानें; मोठया जलदीनें. 'घेऊनि निघाला बाहेरि। वेगत्तरु।' –गीता २.२३५५. [सं. वेगवत्+तर] **वेगमान**–न. वेगाचें प्रमाण; भ्रामकत्व. (इं.) मोमेंटम. [वेग+मान=मोजणी] **वेगमोड**–स्त्री. वेग कमी करणारी वस्तु; ढकली; खर्डी; घोरपड. [वेग+मोडणें] **वेगलबार**–पु एक नोकर; वेगचार. –राव्य १.१६. **वेगवत(त्त)र**–क्रिवि. अति वेगानें; ताबडतोब. 'कव्हणां नेणतां देवो चाले। कौंडण्यापुरा वेगवतरू।' –ज्ञेश्वरी २३.४. **वेगवंत, वेगवान्**–वि. १ चपळ; वेगानें जाणारा; जलद धावणारा. २ जोराची गति असलेला; मोठा वेग असलेला. **वेगवती, वेगसंधी**–स्त्री. घोडयाच्या गतीचे निरनिराळे प्रकार. –अश्वप १.१८५. **वेगसार**–क्रि. (गो.) लवकर. **वेगा**-क्रिवि. वेगानें; वेगें. 'बिरडें घालूनिया वेगा।' –मुसभा ९.८४. **वेगाघात**–पु. जिनें चलनयुक्त पदार्थ दुसऱ्या पदार्थावर आपटतो

ती शक्ति. हा वेगाघात पदार्थाचें प्रकृतिपरिमाण आणि वेग यांच्या गुणाकाराबरोबर असतो. -यंमू २१९. **वेगाडा-ढा**-वि. वेगवान्; वेगवंत; वेगाढ्य. 'वारेआं पासौनि बेगाडे। पर्वतांहौनि दळवाडे।' -शिशु ९३४; -गीता १.४५१. 'पुढें जुंपिले सबळ घोडे। जे कां अनिळाहुनि वेगाढे।' -ह २२.६३. -ह २४.१५. [सं. वेगाढ्य] **वेगाडा-ढा, वेगाढें**-क्रिवि. (महानु.) लवकर; वेगानें; त्वरेनें; जोरानें. 'जेणें दोष माझे नाससी वेगाडे। तो अधिकार फुडे नाहीं मज।' -ज्ञाप्र १३१. 'यादव उठिले वेगाढे। रथीं जुंपिले जी घोडे।' -एभा ३१०. **वेगाडेपण**-न. सवेगता; अतिगतिमान् असण्याचा गुण. 'जैसें मनाचें वेगाडेपण।' -कृमुरा २५.१५५. **वेगातिशय**-पु. वेगाचें आधिक्य. [वेग+अतिशय] **वेगावत**-क्रिवि. वेगानें. 'धांवति तो पोरें पळतां धरी वेगावत।' -निगा ९३. **वेगाळ**-वि. वेगवान्; चांगली गति असलेला. **वेगीं-गें**-क्रिवि. त्वरेनें, वेगानें; जलदीनें; चटकन; त्वरित. -ज्ञा २.१७. 'तात कोठें तो सांग मला वेगीं।' -ध्रुवचरित्र (नवनीत पृ. ४११).

वेंग—स्त्री. दोन्ही हात अंगापासुन लांब करून त्याच्यांत माणूस, वृक्ष, गाठोडें इ० पकडावयासाठीं घातलेली मिठी; कव; कवळा; कवळी; कवटळा. 'अंकुराचा कांहीं वर्षांनीं सपाटा बुंधा बनून दहा मनुष्यांच्या वेंगेंतहि तो मावणार नाहीं.' -नि ४७१. २ (गो.) आलिंगन. (क्रि० मारणें; घालणें). **०मारणें**-वेंगेंत, कवळींत घेणें, धरणें. **वेंगटणें, वेंगाटणें**-क्रि. १ वेंगेंत धरणें; वेंग मारणें; हातांनीं कवटाळणें. २ उराशीं धरणें; आलिंगन देणें; मिठी मारणें. **वेंगणें**-सक्रि. १ वळसा घालणें; प्रदक्षणा घालणें. 'झाडाला वेंगून जा.'=झाडाला वळसा घालून जा. २ वेंघणें पहा. **वेंग(गा)ळणें**-क्रि. (कों.) वेंग मारणें; मिठी मारणें; कवटाळणें. **वेंगाटी**-स्त्री. वेंग पहा. **वेंगाटी मारणें, वेंगाटींत धरणें-घेणें**-कवटाळणें; वेंग मारणें. **वेंगेवर घेणें**-कडेवर घेणें.

वेंग—न. १ (काव्य.) व्यंग; उणेपणा. 'इतुकें हें नस्तां वेंग। नरदेह आणी सकळ सांग।' -दा १.१०.३२;१५.९.२१. [व्यंग]

वेंग(गा)टणें, वेंग(गा)डणें—क्रि. (नेहमीं तोंड या शब्दाशीं जोडून) दीनपणाची मुद्रा करून एखाद्यापाशीं कांहीं याचना करणें; याचनेसाठीं तोंड पसरणें. 'माझ्या पुढें तोंड कशाला वेंगाडतोस? तुला नोकरी देणें माझ्या हातांत नाहीं.' [ध्व. वेंवें किंवा सं. व्यंकट=वाकडा]

वेंगड-डी, (वेंबडया-अव.)—स्त्री. १ स्नायू आंखडण्याची क्रिया (थंडी, भीति इ०नें). (क्रि० वळणें). 'वळे विवेकाची वेंगडी। पडे शब्दाची बोबडी।' -दा १.५.१०. २ गठडी; मुरकुंडी. 'म्हणौनि परतावया तांतडी। आस्था धरिली चोखडी। तंव वळली वेंगडी। जेथील तेथ।' -स्वादि १०.५.१०. 'तितका वेळ तेथें बसवत नाहीं. थंडीनें वेंगडी वळते.' ३ तिडा; पायांत पाय अडकणें. -ज्ञा १३.५७०. 'पळतां पडती वेंगडी।'-एरुस्व ११.५११. ४ वांकडी गति. 'देखोनि मृत्यूची धाडी। पायां वळतसे वेंगडी।' -एभा ९.२७१. वेंगडया असा अनेकवचनी प्रयोग बहुधां येतो. (वेंगडया वळणें-चढणें-होणें-उतरणें असे प्रयोग होतात). [सं. व्यंकट] **०पडणें**-पायांत पाय अडकणें; वांकडें पाऊल पडणें. -एभा २२.५३०.

वेंगणें—अक्रि. अति कष्ट, चिंता, उपास इ० मुळें थकणें; ग्लानि येणें; गळणें. [वेंग]

वेंगती—स्त्री. व्यक्ति; वेक्ति पहा. [सं. व्यक्ति]

वेंगळण-णें—न. (राजा.) पोटाशीं पोर बाळगणारी माकडी, वानरी. [वेंग=अलिंगन]

वेगळ—वि. (काव्य) पृथक्; निराळा; वेगळा पहा. -क्रिवि. १ शिवाय; विना; खेरीज. 'तिखटावेगळ भाकर न धके।' -विक ७९. २ सोडून; वांचून. [वेगळा] **०चार**-पु. (व.) एकत्र असलेलें कुटुंब विभक्त होणें. वेगळेचार पहा. **वेगळणें**-क्रि. १ वेगेवेगळें करणें; पृथक् पृथक् करणें; भाग पाडणें. २ वगळणें; गाळणें; काढून टाकणें. [वेगळा] **वेगळवाणें**-वि. भिन्न; वेगळें असें. 'म्हणोनि तें तैसें वोलणें। नव्हे सपातळ आड लावणें। केले मनचि वेगळवाणें। भोगावया।' -ज्ञा ६.११४. [वेगळा+वाणा] **वेगळवेंटाळी**-स्त्री. निरनिराळया पदार्थांचें एकीकरण. 'ना अशक्तपणें आंगिकें। वेगळवेंटाळी न टके।'-ज्ञा १६.३०० [वेगळी+वेटाळी] **वेगळा**-वि. १ विभक्त केलेला; अलग; अंतरावर सारलेला-ठेवलेला; विभिन्न. 'वोळपौनी करी वेगळा।' -उषा २८.१७. २ निराळा; विधर्मीय; अन्य. ३ विभिन्न झालेला किंवा केलेला; एखादी गोष्ट कमी असलेला; न्यून असलेला. (समासांत) दृष्टीवेगळा (अदृष्ट, अंध); बुद्धीवेगळा; ज्ञानावेगळा. (ज्ञानातीत, निर्बुद्ध) कृपेवेगळा; लोभावेगळा; विद्येवेगळा. एखादी गोष्ट केली नाहीं असा. जाण्या-येण्या-बसण्या-उठण्या-वेगळा; निराळा पहा. -क्रिवि. सोडून; शिवाय; खेरीज; विना. 'कीं राम तुजवेगळा. एकक्षण। सर्वथा नव्हे हा भिन्न.।' [सं. विगल; दे. प्रा. वेगल; गु. वेगळु] **वेगळा घालणें**-निराळें काढणें; विभक्त करणें. 'मजहि वृद्धपण आलें। लेकीं वेगळें घातलें।' -दा ३.५.३३. **वेगळाचार**-पु. वेगळा आचार; विभक्त राहणें; वेगळेचार पहा. [वेगळा+आचार] **वेगळाला**-वि. निरनिराळा; पृथक्पृथक्. 'वेगळालें अक्षर वाचावयास सोपें.' **वेगळावणें**-सक्रि. निराळी होणें; बदलणें; पालटणें. 'जेसु ध्यानस्तु होते वेंळां। पालटली

प्रभा मुखकमळा। वेगळावली रूपलिळा। सर्वांगीची।' –ख्रिपु २.३४.५. **वेगळावा**–पु. (कों. गो.) भेद; भिन्नता; वेगळेपणा **वेगळीक**–स्त्री. १ भिन्नता; वेगळेपणा; पृथक्पणा; वेगळेपणाची स्थिति. –ज्ञा १३.११२३; –एभा १३.३२२. 'देव तोचि भक्त नाहीं वेगळीक।' –निगा १७९. २ विभक्तपणा; कुटुंबांतील माणसांनीं वेगळें राहणें. ३ वरच्या दर्जाच्या माणसांना वागवितांना दाखविलेला फरक; मानाप्रमाणें भेदभाव करणें. ४ (क्र.) निवडून वेगळें करणें; वर्गीकरण; वेगळें केलेली स्थिति. 'रुपये आणि मोहरा ह्यांची वेगळीक कर.' **वेगळीव**–स्त्री. भिन्नता; वेगळीक. 'जेथें सुखदुःखासी वेगळीव । आथीचना।' –विपू ७.५५. **वेगळेचार**–पु. १ विभक्तपणा (विशेषतः कुटुंबांतील माणसांचा); विभक्तपणाची स्थिति. 'तुझ्या घरीं वेगळेचार झाला ही गोष्ट खरी कां?' –निचं १४९. वेगळें राहणें. २ असा विभक्तपणा होण्यास कारण असलेलें त्यांचें वर्तन. ३ मतें, आचारविचार, हिताहित इ० मधील भिन्नता, फरक, अंतर. ४ (गो.) विभक्त राहण्याचे विचार. [वेगळा+आचार] **वेगळेपण-णा**–नपु. भिन्नभाव; निराळेंपण.

वेंगणें—वेंघणें पहा. **वेंगणी**–स्त्री. (ना.) वर चढणें.

वेंघणें—उक्रि. १ पर्वत, झाड, जिना, घोडा इ० वर आरोहण करणें, चढणें. 'शृंगारिला हय तयावरि भूप वेघे।' –र. 'तदुपरी जव वेंघे विप्र सोपानपंक्ति।' –सारुह ५.२२. २ लोंबकळणें; (फांदी इ० ला लोंबकळून) खाली ओढणें, वांकविणें; लोंबकळत राहणें. (अकर्मक प्रयोग) 'देवही तैसें तरू कवळुनी। वृक्षावरी वेघती।' –नव १२.१७८. ३ मिठी मारणें. 'म्हणोनि गळयासि वेंघत।' –कथा १.१३.२०. [वेंग=कवटाळणें]

वेंघणें—अक्रि. करूं कीं नको करूं ह्या विचारानें साशंक स्थितींत पडणें; कचरणें; शंकित होणें.

वेंघणें—अक्रि. (आजार, कष्ट, चिंता, उपवास इ० कारणामुळ) थकणें; गळणें. वेंगणें पहा. [सं. व्यंग; म. वेंग]

वे(वें)च—पु. १ खर्च; व्यय. (खर्च शब्दार्थी युक्त होऊन प्रयोग); खर्चवेच. 'परि न योग्य हा असा वेच।' –मोउद्योग ८.१४; –ज्ञा १५.५५५. 'वेचास रुपये वीस देविले ते आज्ञेप्रमाणें पावविले।'–पेद ८.२७. २ क्षय; नाश. 'तरी तें पद गा नाहीं। वेचु जया'–ज्ञा १५.३०६. [सं. व्यय; प्रा. विच्च; का. वेच्च] **०खर्च**–पु. खर्च; खर्चवेच पहा. **०क**–वि. खर्चिक; सढळ हातानें खर्च करणारा; दिलदार; उदार. **वेचणें**–उक्रि. १ खर्चणें; खर्च करणें, होणें. 'फुकाचे मुखी बोलतां काय वेंचे।' –राम. २ नाहींसा होणें; संपणें; कमी होणें; क्षीण होणें. 'साहित्यस्वारस्य समस्त वेंचे।' –सारुह १.४६. 'आपुलें पाप आपणासी। ग्राह्य नव्हे पुत्रशिष्यासी। न भोगतां स्वदेहासी। न वेंचे पाप परियेसा।' –गुच २.१७८. ३ अर्पण करणें; पाणी सोडणें; गमावणें; कामीं लावणें. 'वेचुनि सर्वस्वातें, युष्मत्प्रियहित करीन बहुधा मी।' –मोभीष्म ३.१५. ४ खर्च करणें; देणें; योजणें; योग्य कारणीं उपयोग करणें. 'तोंडीचें पोटींचें गांठीचें। माता बाळकालागीं वेंचे। तेवीं भाविकालागीं आमुचें। सर्वस्व साचें मी वेंचीं।' –एभा ११.११५९. ५ विकणें. 'वृथा आसक्ती केले अभाग्य। शिश्नोदरा सांग वेचले।' –एभा ७.६३८. [सं. व्यय=खर्च; प्रा. विच्च; का. वेच्च] **वेंचता**–वि. (काव्य) क्षीण होणारा. 'लिंगदेह कमळाचा। पोटीं वेंचतया चित्भ्रमराचा।' -ज्ञा १६.४. **वेंचिक**–वि. (गो.) खर्चिक. **वेंचुकरी**–वि. १ (महानु.) खर्चिक. २ व्ययाधिकारी. 'सेनवै दिनकरू। वेचुकरी सुधाकरू।' –शिशु ५२. **वेंचू**–पु. १ खर्च; वेच पहा. 'अधिक वेंचूं कोण सोशी।' –एभा २३.९६. २ नाश. 'कापुरीं आगी प्रवेश। कीं अग्नी घातलां पोतास। तैसा नव्हे सौरस। वेंचू जाला।' –अमृ ७.१७७.

वेचक-का—वि. १ निवडक; निवडून वेगळा काढलेला; वेंचलेला. २ (ल.) उत्कृष्ट; उच्च प्रतीचा. [वेंचणें]

वे(वें)चकुली—स्त्री. वाकुली; वेडावणें (सामान्यतः अनेकवचनांत उपयोग–वेचकुल्या); टिवल्याबावल्या; तोंडें वेडीं वांकडीं करणें. 'बाळकृष्णपंतांचा रामराम होतांच गाडीबाहेर तोंड काढून माकडासारख्या वेंकुचल्या महाराजांनीं करून दाखवित्या.' –विक्षिप्त १.३६. [विचकणें]

वेचण—स्त्री. विक्री. –वि. विकलेला. 'परगणे मजकूरची जमीन गहाण व वेचण जाली असेल...' –वाडसमा २.२६७. [व्यय]

वेंचणी—स्त्री. (कों.) लहान टोपली.

वेंचणी—स्त्री. भाजी काढणी; तोडणी; तोड; गोळा करणें. [वेंचणें] **वे(वें)चणें**–सक्रि. १ एकेक टिपणें; गोळा करणें; एकेक उचलून एकत्र करणें. २ जमविणें; सांठविणें. 'गंधविषया मिलिंद भुलोन। कमलकोशीं वेचिती।' ३ निवडणें; पसंत करून वेगळें काढणें; बाजूस काढणें; निवडून घेणें. 'त्यानें भारतांतील श्लोक वेंचून काढले.' ४ वजा करणें. 'एका एकु वेंचला। शून्य बिंदू शून्ये पुसिला।' –अमृ ७.१७८. [सं. विच्=वेगळें करणें; सं. वि+चि=गोळा करणें] **म्ह०** नांव लक्ष्मी व गोऱ्या (गवऱ्या) वेची. **वेंचला**–वि. १ वेचक; निवडून काढलेला; बाजूस काढून ठेवलेला; पसंत केलेला. २ विचारांत घेतलेला; योग्य ठरविलेला; विचारपूर्वक निवडून योग्य ठरविलेला (विषय, मुद्दा). ३ नियमित; प्रमाणशीर; योग्य (खर्च इ०). [वेंचलेला] **०घेणें**–निवडणें; वेचणें; टिपणें. **वेचा**–पु. १ निवडक भाग; उतारा; एखाद्या

ग्रंथांतून निवडून काढलेला उतारा, कांहीं श्लोक इ०. 'शब्दोदधीचे निवडून वेचे।' –सारुह १.४६. २ सारांश; संक्षेप. ३ (बहुधा अनेकवचनी उपयोग) सारसंग्रह; निवडून काढलेल्या भागांचा संग्रह; मुख्य मुख्य भागाचे उतारे एकत्र करून झालेला ग्रंथ. उदा० मोरोपंती वेचे, वामनाचे वेचे इ०. ४ (ना.) शेतांतून कापूस गोळा करून आणल्यावर केलेली मोजणी. **वेंचे वेंचे बोलणें**–१ निवडक शब्दांत, निवडक शब्द, वाक्प्रयोग इ० योजून बोलणें. २ विचारपूर्वक, योग्य तितकें बोलणें; मुखांतून वावगा शब्द जाऊं नये किंवा भलतेंच विधान केलें जाऊं नये अशी काळजी घेऊन बोलणें. ३ शहाणपणानें बोलणें. **वेंचीक**–वि. (गो.) निवडक; वेचक.

वेंचवी, वेंचवीण—स्त्री. खरजेचा प्रकार. ही मनगटें, घोटे यांवर होते. विंचवी खरूज पहा.

वेचावण-न—स्त्री. वेचावण पहा.

वेचू—पु. (राजा कुण.) विंचू.

वेज-जें, वेझ-झें—न. १ मोतीं, मणी, रत्नें इ० ना पाडलेलें भोंक; छिद्र. 'तया ब्रह्मस्वरूपाचा गुणीं। भणौनि सुवेंझु भरले मुक्तामणी।' –ऋ २४. –उषा १७२९. २ सुई, दाभण इ० चें भोंक; नेढें. (क्रि० पाडणें). ३ (सामा.) छिद्र; भोंक. 'पडलें काळिजा वेज देवौघनागाचें तेज।' –मोरामायणें १.२५२.९६. ४ वर्म; लक्ष्य; केंद्र 'चुकलिया त्यागाचें वेझें। केला सर्व त्यागुही होय वोझें। निषिद्धें त्या सर्वत्र जुंझे। वीतराग ते।' –ज्ञा १८.१३४. [सं. वेध; प्रा. वेज्झ; का. वेज्ज] **वेझ देणें**–भोंक पाडणें. 'प्रज्ञा फळतया अर्था वेझ देणे जैं।' –ज्ञा १८.८६३; –शिशु १०३७. **वेजीं पडणें**–वेजीं उतरणें पहा. 'आतां नथ नका लपवूं. तीं उतरलेली वेजीं पडलेलीं मोतीं दिसूं देत सर्वांना.' –भाऊ ४८. **वेजीं उतरणें**–मोतीं, माणिक इ० चें भोंक, तार, रेशीम इ०च्या संततच्या घर्षणानें मोठें होणें (वेज मोठें झल्यास किंमत कमी होते). 'शिंदे होळकर एवढे लढते सरदार असतां त्यांची केवळ हिंमत हरली. वेंजी उतरलीं.' –भाब १०४. **वेज टिकली**–स्त्री. (सोनारी) ज्यांतून तार ओढली जाते तें लोखंडीपट्टीला पांडलेलें भोंक. **वेझपट्टी**–स्त्री. (सोनारी) चांदी-सोन्याचें सूत अगर तार ओढण्याची, भोकें असलेली पट्टी; जंतरपट्टी.

वेजीत—वि. पराभूत; पराजय झालेला; जिंकलेला. 'गांव मग आणिला वेजीत।' –ऐपो ४४७. [सं. विजित] **०पत्र**–न. अजितपत्र पहा.

वेट, वेंट—पुस्त्री. १ (पेंढा, गवत, झाडाची साल, कापड इ० चा) वळून केलेला दोर; दोरी; वेष्टन. 'आणि सिकतेचें वेंट वळून हातें।' –ह १४.२३२. २ वायूचे विकृतीमुळें, किंवा प्रेमाच्या असोसीमुळें आंतड्यांना पडणारा पीळ; पीळ पडल्याची होणारी भावना. (क्रि० उठणें; वळणें; येणें; फिरणें; पिळणें). 'पोटचां–बेंबीचा वेट वळला–पिळला.' ३ एखाद्या पदार्थाभोंवतीं घातलेला दोरी इ० चा वेढा, वळसा, फेरा. ४ अंबाडीची तीन पदरी दोरी. ५ एक वेल (हिचा पाला गुरें खतात). ६ (व. ना.) चाकाची लोखंडी धांव. ७ वेठ पहा. [सं. वेष्ट्; प्रा. वेट्ठ] **०वळणें**–१ कांहींएक कार्यासाठीं ऐकमत्य होणें; एकजूट होणें; संघशक्तीनें काम करणें. २ गर्दी करणें; खेचाखेच करणें; एकावर एक पडणें (भयादि कारणानें–गुरें, माणसें). 'फौजेचा त्या किल्ल्यावर मोठा वेट वळला.' ३ हैराण करणें. 'गुरांचा मुसळवाद्यानें (पटकीनें) एक वेट वळला.' **वेंटली-ळी, वेटणें वेंटणें**–नस्त्री. १ पीळ घालून वळलेली गवताची दोरी; वेटाळी. २ (मूल हगलेलें काढण्यासाठीं घेतलेली गवतकाडयांची) गुंडाळी. ३ वेढण; वेष्टन. **वे(वें)टणें**–जोरानें वेढा देणें; आवळणें. **वेंटाळणी**–स्त्री. १ वेढा; विळखा; फेरा; भोवतीं गुंडाळणें; वेष्टणें. (क्रि० घालणें). २ कापलेल्या पिकाच्या पेंढ्यांची बांधणी; कापून टेवलेले पिकाचे कवळे एकत्र बांधणें. **वे(वें)टाळणें**–उक्रि. १ एखाद्या भोवतीं हात, दोरी, दोरखंड इ० नीं) वेढा देणें; वेष्टणें; गराडा घालणें. २ (दोरी इ०) गुंडाळणें. –उषा १४६. ३ जोरानें गुंडाळणें, आवळणें; वेढा घालणें. 'तेव्हळीं वेटांळीला बहुतीं।' –उषा १५९.१८०२. ४ गोळा करणें; एके ठिकाणीं करणें. 'तेथ आपलेनि बळें। भोगिजे जें जें वेटाळें। हें वांचोनि कें वेगळें। पुण्य आहे।' –ज्ञा १६.२९९. ५ लुबाडणें. ६ कवटाळणें; (ल.) व्यापणें. 'हा ठायवरी लोभु। करी स्वैरत्वाचा राबु। वेंटाळितां अलाभु। तें तें उरे।' –ज्ञा १४.२३०. **वेटाळा-ळी-ळें, वेटोळें**–पुस्त्रीन. १ वळेखा; वर्तुळ; वेढा. २ साप किंवा दोरी यांची गुंडाळी; वळकटी; सुरळी. **वे(वें)टाळी**–स्त्री. वेटळी पहा. **वे(वें)टी**–स्त्री. १ गवताची बारीक दोरी; बारीक वेंट. २ (राजा.) मुडा बांधण्याकरितां भातेणाची पीळ घालून केलेली दोरी. ३ वेष्टण. 'मस्तकीं मुगुट आणि किरिटी। सभोंवतीं झिळमिळ्यांची दाटी। त्यावरी मयूरपिच्छांची वेटी। ऐसा जगजेटी देखिला।' –ब्यं ६९.

वेटण—न. (बे.) १ जुंवाच्या मधोमध असणारें जुंपणें; वेठण पहा. २ वेष्टन; गांठ. [सं. वेष्टन]

वेटणें, वेंटणें—उक्रि. १ (कणसें, फुलें, कापूस इ०) वेंचणें; खुडणें; तोडून गोळा करणें. वेंचणें पहा. **वेटाळणी**–स्त्री. जोंधळा खुडणें; तोडणी. –गांगा १००. **वेटाळणें**–उक्रि. जोंधळा उपटणें; खुडणें.

वेटणें—वटणें पहा. लाटणीं फिरवून कापसांतून सरकी काढणें. **म्ह०** दिवस गेला रेटारेटीं दिवे लावून कापूस वेटी.

वेटवण-णें, वेटाविणें—न. वेडावणें; वांकुल्या. तोंडें वेडींवांकडीं लेरून केलेली चेष्टा; उपहास; चाळे (क्रि० दाखवणें; दावणें; करणें). [सं. विटंबन]

वे(वें)टविणें, वेंटाविणें—उक्रि. वांकुल्या दाखविणें; वेडावणें; उपहास, विडंबन करणें. (अव.) वेटावण्या (-स्त्री.).

वेटाळ—पु. (व. ना.) पुरा; मोहल्ला; पेठ. [सं. वेष्ट्] ०**संबंध**-पु. (ना.) शेजारसंबंध.

वेठ—स्त्री. बिगार; रोख भेहनतान्यावांचून करावें लागणारें काम. -गांगा ४९. मजुरी न देतां अंमलदार, जमिनीचा मालक, खोत इ० नीं करवून घेतलेलें काम. 'गांठीचें तें सोडूं नावडे खाय आइतें दिलें। सांपडलें वेठी वोढी रे भार वाहतां मेलें।' -तुगा १७०. (कायदा) कोणा मनुष्याकडून त्याच्या संमतीवांचून काम करून घेणें. (इं.) कंपल्सरी लेबर. २ पैसे न देतां खोत, सरकारी अंमलदार इ०नीं कुळें किंवा रयत यांपासून अधिकाराच्या जोरावर घेतलेले जिन्नस; खोतवेठ. ३ जुलमानें मनुष्य किंवा जनावर यांकडून वाहून नेलेलें ओझें. [सं विष्टि; प्रा. विट्ठि, वेट्ठि; ते. वेट्टि] **म्ह०** १ वेठीच्या घोडयास तरवडाचा फोंक. २ (गो.) वेठीधर्माने गोंय (वेठीला धरून नेल्यानें गोवें पहाण्यास मिळालें) =वाइटांतून चांगलें निघणें. ०**करणें-वळणें-काढणें**-कसेंबसें, कसें तरी, निष्काळजीनें काम करणें. **वेठीचें करणें-वारणें**-न. वरवर, कसें तरी, निष्काळजीनें केलेलें काम; हलगर्जीपणाचें काम. **(एखाद्याला) वेठीस धरणें**-आपलें काम करण्यासाठीं एखाद्याला भाग पाडणें; फुकट काम करण्यासाठीं धरणें; ताबडणें. **वेठकरी, वेठया, वेठी**-पु. १ वेठीस धरलेला माणूस; बिगारी. २ (सामा.) हमाल. 'राबेत तेथें कितियेक वेठे।' -सारुह ३.३१. ०**बिगार-विरळा**-स्त्रीपु. १ वेठीनें करविलेलें काम; बिगार; वेठ पहा. २ वेठीनें काम करवून घेण्याचा खोत इ०चा हक्क. **वेठणें**-क्रि. वेठीला धरणें; आपल्या कदरेंत घेऊन मर्जीप्रमाणें काम करावयास लावणें. -ज्ञा १८.१४५९. 'पुंडलिकें पितरांस्तव वीटेवर वेठिलें विठोबाला।' -गोखलेकृत देवी सुशील. **वेठी, वेठें, वेठया**-पु.नपु. बिगारी. 'नाहींवेठी जेवा सारा। जाहाती नाहीं म्हणियारा।' -तुगा ३६०.

वेठ—स्त्री. जुनीं भांडीं मोडींत घालून नवीन भांडीं विकत घेतांना अधिक द्यावा लागणारा पैसा.

वेंठ—स्त्री. (महानु.) पेठ; उतारपेठ. 'की धर्माची उत्तर वेंठ।' -ऋ ११.

वे(वें)ठ—पु. १ वेट पहा. २ वळलेल्या चऱ्हाटाचे जे अनेक पेढ असतात ते प्रत्येक. **वेठण-न**-न. १ नांगराचें जोखड टेरूंजवळ इसाडास जोडण्याचा दोर; जुंपण व इतर दोर; विणकऱ्याच्या राहाटाचा दोरखंड; तेगार. (सामा.) सर्व आउतांस येटक घालण्यास लागणारी दोरी. २ (कों.) सुंभाची जाड दोरी; चऱ्हाट. ३ गाडी इ० कामासाठीं जोडणें; गाडीवर सरंजाम घालणें ४ (कुण.) खुबी; सफाई; हातोटी; कसब; उद्योगधंद्यांतील कौशल्य. ५ वेष्टन पहा. ६ घोडयावरील मांड. [सं. वेष्टन; प्रा. वेट्ठण] **वेठणें**-उक्रि. १ गाडी, नांगर, कुळव इ० ला वेठण बांधणें; जोखड आणि इसाड वेठणानें एकत्र बांधून गाडा, नांगर इ० कामाला तयार करणें. २ (दोऱ्या, जोखड इ०) एकत्र जोडणें, बांधणें, जुंपणें. ३ (सामा.) वेढणें पहा. सज्ज, तयार होणें. वेठला शब्दाच्या द्विरुक्तीनें आटूनवेटून, आठलावेठलां, असे प्रयोग येतात. **आटलावेठला**-वि. दोऱ्या, बंद इ० नीट बांधून तयार केलेला; व्यवस्थित रीतीनें जोडलेला; सज्ज केलेला -अक्रि. १ वेष्टलें जाणें; बांधलें जाणें. 'आणि पूर्णाहुंता वेटलों' -अमृ १०.१५. 'ते भोगावरी न वेठती। त्यागावरी न नुठती।' -एभा १.४८. २ पोशाख करणें; धारण करणें. 'जैसा जैसा पुरुष वेंठे। तैसी तैसी छाया नटे।' -एभा २.६६. [सं. वेष्टन; प्रा. वेट्ठण]

वेठणें—अक्रि. (महानु.) उठणें; निघणें. 'आवेशें सरिसा वेठिला। गांजिवां हातु घातिला।' -शिशु ९७८. [उठणें]

वेठणें—अक्रि. १ मूर्त होणें; आकाराला येणें. 'तरी मज पाहतां तें मागील उणें। फेडावया गीतापणें। वेदु वेठला भलतेणें। सेव्य होआवया।' -ज्ञा १८ १४५९. -शिशु ३६८. २ वठणें; उमटणें. 'तेयां मुरारीचें सैन्य पालाणिलें। जैसें मूर्तिसंहारु तेजु वेठलें।' -शिशु १०१५. ३ दिसणें; वाटणें. 'चोरु साधुत्वें नटे। लटिका साचा वेठे।' -ऋ १०३.

वेठी—स्त्री. १ (कु.) वळीव दोरी. वेट पहा. 'झाड सालाची वेळोनि वेठी।' -दावि ४२. २ झुली; झूल; तुरा; भूषण. 'मिरवे सुळाळीं मौक्तिकांची वेठी।' -दाव २४३. ३ कोंदण; वेढ; घर. 'तया मुकुटाचे तळवटीं। मुक्तमयुरपत्रांची वेठी।' -एरुस्व १.६५. [वेष्टन]

वेड—स्त्री. १ मंडळीतील म्हणजे गंजींतील गव्हाच्या पेंढया चोरांना उपसून काढतां येऊं नयेत म्हणून त्याच्या टाटांच्या मुळांची गंजीभोंवती घातलेली वेणी-गुंफण. २ -नस्त्री. हाताच्या किंवा पायांच्या बोटांत घालण्याचा दागिना; वळें; वेढें. [वेढणें. सं. वेष्टन]

वेड—स्त्री. ईडलिंबाचें झाड. -न. ईडलिंबू. याचअर्थी वेडलिंबू-निंबू. [ईड]

वेड—न. मेंदूमध्यें कांहीं बिघाड झाल्यामुळें उत्पन्न होणारा आजार; बुद्धिभ्रंश (यांत भलभलतें बोलणें, करणें इ० गोष्टी होतात); मेंदूचा विकार व त्याचा परिणाम; खूळ. २ मूर्खेपणा; मूर्खेपणाचें कृत्य. ३ (ल.) अतिशय आसक्ति; अत्युत्कट किंवा फाजील इच्छा; छंद; नाद; उत्कट लहर. 'जगांतील सर्व महत्कार्यांचा उदय

वेडाच्या उदरींच झालेला आहे.' –रणदुंदुभि ४६. ४ सबळ कारणाशिवाय मनांत ठाम बसलेली समजूत. 'या काव्यांत कवीच्या पूर्वचारित्र्यांतील कांहीं चमत्कारिक घडामोडींचा उल्लेख आहे असें वेड माझे डोक्यांत शिरतें.' –केकाआर्या १. ५ अविचार; अज्ञान. 'तो बलावीत होता तेव्हां गेला नाहींत हें वेड केलंत.' [का. एड्ड–ड्डु=मूर्खपणा, मूर्ख माणूस; तुल० सं. वैधेय(मूर्ख)–वेढेअ–वेढ–वेड. –भाअ १८३५] ०**काढणें**–१ वेड पांघरणें; वेड घेणें. २ एखाद्यानें मुद्दाम पांघरलेलें वेड धाकदपटशा दाखवून घालविणें; खोड मोडणें. ०**वेऊन पेडगांवास जाणें**–आपला कांहीं मतलब साधण्यासाठीं वेड दाखविणें, पांघरणें. ०**पांघरणें**–मुद्दाम वेड्यासारखें करणें; वेड काढणें अर्थ १ पहा. ०**पिकणें, वेडाचा पाऊस पडणें**–१ एखाद्या गोष्टीबद्दल अवास्तव कुतुहल उत्पन्न होणें. २ असमंजसपणा, अविचार यांची समृद्धि होणें; एखाद्या वस्तूचा ध्यास लागणें. ०**भरणें**–वेड लागणें; ०**भरणें–भरविणें**–वेड लावणें; वेडा करणें; वेड लागेपर्यंत त्रास देणें; फार उपद्रव देणें. ०**लावणें**–१ एखाद्याला मोहित करणें; त्याचें मन आकृष्ट करणें; छंद लावणें. 'वेड लावले भ्रताराला । नाहीं राहिला लौकिक ।' २ घोटाळ्यांत घालणें. ३ वेड लागण्याइतकी स्थिति होईपर्यंत एखाद्याला अति उपद्रव करणें; वेडा करणें. **वेडीचें सोंग घेणें**–वेड पांघरणें; वेडाचें ढोंग करणें. (ऋणकरी दिवाळखोरी दाखवीत असल्यास किंवा एखादा लायक इसम नालायकी दाखवीत असतां हा वाक्प्रचार योजितात). **वेडगळ, वेडका, वेडगेला, वेडसर**–वि. वेड्यासारखा; अर्धवट मूर्ख; वेड्यांत जमा; बावचळलेला; खुळचट. **वेडगळणें**–अक्रि. १ (क) वेडें होणें. २ वेडेचार करणें; छांदिष्टपणा, आडदांडपणा, मूर्खपणा करणें. **वेडझवा**–वि. १ व्यवहारज्ञानशून्य; खुळचट; मूर्ख; बेअकली; विक्षिप्त; चमत्कारिक; विलक्षण; अडाणी. 'ब्रह्मा वेडझवा म्हणुनि विभवा देतो अशा गाढवा ।' २ भ्रमांत पडलेला; गोंधळलेला; काय करावें तें सुचत नाहीं असा; भ्रमिष्ट. (ह्या शब्दाचें मूळचें अश्लील स्वरूप जाऊन आता तो सभ्य लोकांच्या बोलण्यांतहि येतो). **वेडविणें**–सक्रि. (वेड लागण्याइतकें वेडावून, त्रास देऊन) छळणें; सतावणें, गांजणें. वेडाविणें पहा. [वेडा]

वेंड—स्त्री. (कु.) दोन बाजूंला दोन काठ्यांत अर्धवर्तुळाकार लावलेलें मासें धरण्याचें जाळें.

वेड—न. (गो.) कुडें. **वेडीजोड**–पु. कुड्यांचा जोड.

वेडण—न. (राजा) हाताच्या किंवा पायाच्या बोटांत किंवा अंगठ्यांत घालण्याचें सोन्या–चांदीचें वळें; वेढें. [वेढणें]

वेडा—वि. १ ज्याला वेड लागलें आहे असा; ज्याच्या मेंदूत बिघाड झाला आहे व त्यामुळें जो भलतेसलतें बोलतो किंवा करतो तो; खुळा; भ्रमिष्ट. २ मूर्ख; ज्याला व्यवहारचातुर्य नाहीं असा. ३ बेताल; फाजील; मूर्खपणाचें; असंबद्ध; विसंगत (वर्तन, भाषण इ०). 'ही वेडी कल्पना तुझ्या डोक्यांत कोणी घातली.' ४ आसक्त; मोहित; आकृष्ट झालेला. 'त्या गवयानें मला अगदीं वेडा करून सोडलें.' ५ छांदिष्ट; नादी; एखाद्या गोष्टीचा ज्यानें ध्यास घेतला आहे, सारखा त्याच्या पाठीमागें आहे असा. ६ एकदम पुष्कळ कामें करावयाचीं असतां काय करावें, कसें करावें अशी मनाची भ्रांतिष्ट स्थिति झालेला; किंकर्तव्यमूढ; संभ्रांत झालेला. [वेड] ०**ऊंस**–पु. रानऊंस; खुळा ऊंस. याचा औषधाकरितां उपयोग होतो. 'नाहिं करित कोणाची आस । औषधास वेडाऊंस साजणा ।' –सला ३२. ०**खुळा–पिसा**–वि. वेडा; पिसाट; विरहादिकांनीं वेड्यासारखा वागणारा (वेडा, खुळा, पिसा, हे तिन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत). 'जयाचें नेत्रकटाक्षें होती । वेडेपिसे देवादी ।' ०**गोळा**–वि. अगदीं अडाणी; मूर्ख; वेडा. –सूपनि १३४. ०**धोतरा**–वि (ल) मूर्ख; माथेफिरू; वेडा. धोतरा पहा. ०**पीर**–पु. १ छांदिष्टपणें, बेताल वागणारा–बोलणारा; आततायी मनुष्य. 'हा एक आपला वेडापीर आहे. जें तोंडाला येईल तें बडबडत असतो.' –पिंगला. २ अजागळ; वेडगळ माणूस; मूर्ख मनुष्य. [वेडा+फा. पीर] ०**बागडा**–वि. १ वेडावांकडा; अनेक ठिकाणीं वांकलेला. वाकडातिकडा. २ (ल.) सरळ मार्गानें न चालणारा; लहरी; छांदिष्ट. 'मी साधा आहें, मी वेडावांगडा आहें, एवढाच कायतो माझा अपराध आहे.' –भा ९५. वेडावांकडा पहा. ०**मधुरा**–पु. एक प्रकारचा दोषिक ताप. यांत शीतोपचार झाला असतां वांत होऊन वेड लागल्यासारखी स्थिति होते. मधुरा पहा. ०**वांकडा**–वि. १ अनेक ठिकाणीं व निरनिराळ्या तऱ्हेनें वांकलेला; वाकडातिकडा. २ (ल.) कुटिल; वक्र; सीधा नसलेला; वाममार्गानें चालणारा (माणूस). ३ लहरी; भ्रमिष्ट. ४ असंबद्ध; भरमसाट; जसें आलें, सुचलें तसें–अगदीं वाईटहि नाहीं व वाखाणण्यासारखेंहि नाहीं असें (भाषण, कृति इ०). 'वेडेवांकडें गाईन। परि दास तुझा म्हणवीन।' (**एकाद्याला**) **वेडे वांकडें होणें**–एखाद्यावर अनपेक्षित संकट येणें. (**एखादीचें**) **वेडेवांकडें होणें**–(बायकी) वैधव्य प्राप्त होणें; संसार विसकटणें. ०**विद्रा, विपारा**–वि. १ वेडा आणि कुरूप; कुरूप आणि कुस्वभावी; भीतिदायक; भेसूर; हेंगाडा. 'मग पुरुष कसलेही वेडेविद्रे, साधेभोळे, खुळे, अजागळ असले तरी बिघडत नाहीं.' –सवतीमत्सर ८३. २ वेडावांकडा. 'ढोलकें पिटणाऱ्याच्या भोंवती भक्तांनीं वेड्याविद्रा उड्या माराव्या.' –टि ४.७९. **वेडी हळद**–स्त्री. १ जाड्या खोडाची किंवा मोटीं कुडी असलेली हळद. २ (ल.) वेडदुल्ली; खुळी; मूर्ख; वेडसर. ३ (ल.) वेडें पीक. **वेडेचार–चाळे**–पुअव. १ वेडेपणाचीं कृत्यें; मूर्खपणाचीं कामें. 'वेडेचार शिकविति बालांना। खेचुनि खेळीं।'

–होळीचें पद. २ वेडांतील हावभाव, चेष्टा चाळे इ० [वेडे+आचार] **वेडें पीक**–न. १ मशागतीवांचून विपुल येणारें पीक. उदा० एरंडांचें–निवडुंगाचें वेडें पीक. २ आलें तर पुष्कळ नाहींतर मुळींच नाहीं असें पीक. ३ (सामा.) पुष्कळ भरभराट; फाजील पीक, उत्पादन, प्रचार इ० ४ (ल.) वळला तर हवें तें देईल नाहींतर एक कवडीहि न देणारा दाता; अतिरेकी दाता; लहरी दाता. ५ (ल.) क्षुल्लक कारणावरून कधीं कधीं अतिरेक, आततायीपणा करणारा पण एरवीं मोठा उपद्रव दिला तरी अगदीं शांत राहणारा मनुष्य. ६ (ल.) छांदिष्ट वर्तन; हास्यकारक वर्तणूक; वेडेचार. **वेडें भाग्य**–न. नादान, नालायक, कर्तृत्वशून्य माणसाला प्राप्त झालेलें भाग्य; शिक्षण, शहाणपण किंवा योग्यता हीं कांहींहि नसतां आलेलें भाग्य. **वेडेवेडे चार**–पुअव. छांदिष्टपणाचीं कृत्यें; वेड्यासारखें आचरण; खुळेपणाचीं कृत्यें. **वेडें-ज्ञान**–न. चळ; खूळ; पिसें; मूर्खपणा. **वेड्यांचा बाजार**–पु. विचार न करतां एखाद्या गोष्टीच्या नादीं लागणाऱ्या, कांहीं तरी करणाऱ्या लोकांचा जमाव; मूर्ख माणसांची टोळी. (क्रि० भरणें) **वेडथर, वेडदु(धु)ल्ली**–वि. वेडगळ पहा. 'जा, वेडदुल्ली, तुला काय समजतें?' –बाळ २.१८४. [वेडा+थर, दुल्ला] **वेडपा**–वि. वेडगळ पहा. **वेडबंब-बंबू**–वि. वेडा; मूर्ख. **वेडवणें, वेडावणें**–अक्रि. १ मूर्ख किंवा वेडा होणें; खुळावणें. २ वांकुल्या दाखविणें. ३ जड होणें; मुकी; स्तब्ध होणें (वाणी). 'वेडावेलचि रसना, नकरी सिंहापुढें शिवा चाळा।' –मोकर्ण २८.८१. –दावि १३. **वेडाळणें**–अक्रि. १ वेडें होणें; खुळावणें. 'सिंहावलोकनें पडताळितां ग्रंथ। अविवेकी तेथें वेडाळूं लागत।' –मुआदि १.९८. **वेडावणें**–न. (अव. वेडावणी) वांकुल्या दाखविणें; चिडविणें. **वेडावणें**–उक्रि. १ वेडविणें; मोह पाडणें; एखाद्या गोष्टीच्या भरीं भरणें. 'तिनें आमच्या तरुण विद्वानांस इतकें वेडावून टाकलें आहे कीं घरांत शुद्ध मराठी बोलण्याची मारामार.' –नि ५. **वेडाळ-ळ्या**–वि. वेडा; अर्धवट; मूर्ख; वेडसर. **वेडाळवाणी**–विक्रिवि. वेडाळ पहा. वेड्यासारखें (बोलणें, करणें इ०). 'सकळ राजसदनींचीं माणसें। वेडाळवाणी बोलती त्यास।' –नव १८.५३. [वेडाळ+वाणी=सारखें] **वेडीव**–स्त्री. (काव्य) वेडेपणा; अजाणपणा; नेणीव. –ज्ञा १३. १९०. 'वायां वेडीव घेइजे चतुरें। शस्त्रास वाखाणिजे शस्त्रधरें।' –मुसभा ७.६९.

वेंडा—पु. (बडोदें) मातीचें भांडें; मडकें; कुंभ. 'या प्रतिमेपुढें पांढरा रंग लावलेला वेंडा ठेवतात.' –ऐरापुविवि ८१.

वेढ—नस्त्री. १ चांदी–सोन्याचें हाताच्या किंवा पायाच्या बोटांत घालण्याचें वळें; अंगठी; वेढणें. २ (गो.) कानांतील मोत्याचें कुडें. ३ –पु. (कों.) (किल्ला, घर, कमर इ०चा) घेर. [सं. वेष्ट्; प्रा. वेढ; बं. वेड; हिं. बेढ] **वेढणें**–न. १ बायकांचें पायाच्या मधल्या बोटांत घालण्याचें वळें; वेढें; विरोली (विशेषतः लग्नाच्या वेळीं वधू घालते). २ भातझोडणीसाठीं हातांत घेतलेल्या पेंढीस बांधलेली भातेणाची (पेंढ्याची) दोरी. –कृषि २३९.

वेढणी—स्त्री. उडीद इ० च्या पिठांत तिखटमीठ घालून केलेलें घिरडें किंवा घिरड्यासारखें तोंडीलावणें.

वेढणें—उक्रि. १ घेरणें; गराडणें; गराडा घालणें; वेढ, घालणें. २ एखाद्या पदार्थाभोंवतीं (दोरी इ०) गुंडाळणें; लपेटणें; वळसा, विळखा घालणें. 'हृदय हृदया लावुनी वेढ हातीं।' –मंमं ३३. ३ (ल.) (अडचणी, संकटें इ०नीं) चहूंबाजुंनीं घेरणें; पाठपुरावा करणें; सर्व बाजूंनीं अंगावर कोसळणें. ४ (सामान्यतः वेढून घेणें) कसें तरी नेसणें; कमरेभोंवतीं सरासरीनें गुंडाळून घेणें (स्नान वस्त्रांतर इ० करावयाचें असतां). ५ परिधान करणें; नेसणें. 'जसे जीर्ण वस्त्र सांडिजे। मग नूतन वेढिजे।' –ज्ञा २.१४४. ६ (ल.) पादाक्रांत करणें; (देश, गांव इ०चा) पूर्ण कबजा घेणें; ताब्यांत घेणें; व्यापून टाकणें. 'प्रणवाचिये पेठे। जाहलें शब्दब्रह्म माजिटें। तें जयाचिये यशा धाकुटें। वेढूं न पुरे।' –ज्ञा ६. १०९. –अक्रि. १ (कागद, भित इ०) चित्रें, अक्षरें इ० नीं व्यापला जाणें; लिहून भरला जाणें. २ (कोणी मनुष्य) कामाखालीं दडपून गेलेला असणे. [सं. वेष्टन; प्रा. वेढण] **वेढा**–पु. १ गराडा; फेरा; घेरा. (क्रि० घालणें). २ (एखाद्या पदार्थाभोंवतीं घातलेला दोरी इ०चा) विळखा; फेरा. ३ मळसूत्र, भोंवरा इ०चा स्वतांच्या आसाभोंवतीं होणारा एक सबंध फेरा, गिरकी; मध्यबिंदूभोंवतीं किंवा स्वतःभोंवतीं फिरणाऱ्या पदार्थाची एक फेरी; गिरकी; वर्तुळ. ४ मात्रा इ० सहाणेवर उगाळतांना होणारा तिचा एक वळसा. [सं. वेष्ट्] **०घालणें-देणें**–एखाद्या शहराला किंवा किल्ल्याला गराडा घालणें; भोंवतालीं सैन्याचा फेरा पडणें; कोंडून धरणें; घेरणें; वेढणें. **०रिग(घ)णें**–(काव्य) भ्रमण करूं लागणें. 'भ्रामकाचेनि संगें। जैसें लोही वेढा रिगे।' –ज्ञा १८. १३११. **वेढाळणें**–(काव्य) वेष्टणें; वेढणें. 'मी मज माझियानि वेढाळिलें बाई' –निगा ८२. –अक्रि. वेढला जाणें. –गीता २.५९. **वेढिता**–वि. नेसणारा. **वेढें**–न. हाताच्या किंवा पायाच्या बोटांत घालावयाचें सोनें–चांदीचें वळें; जाड आंगठी; वेढणें.

वेढा लावणें—(प्र.) वेड लावणें. भुलविणें; फसविणें; भ्रमविणें; गुंतविणें. 'म्हणोन दृश्य मिथ्या झालें। परंतु वेढा लाविलें। सकळांस येणें।' –दा ९.७.४४; ११.३.१९.

वेण, वेणा—स्त्री. १ प्रसववेदना; प्रसूतिसमयीं स्त्रीस पोटांत येणारी कळ; तिडीक. (क्रि० येणें; देणें; होणें). (वेणा–ण्या असा विशेषतः अव. उपयोग). 'नाहीं लागली वेण उद्भट। नाहीं

दुखिन्नलें गर्भपोट।' –भारा बाल ६.७. –मोकर्ण २७.१४. 'येतिया परम दुःखद वेणा।' –किंगवि ५४. २ आमांश झाला असतां किंवा अन्य कारणानें मलविसर्जनाचे वेळीं येणारी तिडीक; वेदना; कळ. ३ (वेण) स्त्रीच्या प्रसूतीचा प्रकार (उशीरा, सहजा-सहजीं, स्वाभाविक, किंवा त्रास होऊन बाळंत होणें). 'गोदू-बाईची वेण हरिणीसारखी आहे.' [सं. वेदना; प्रा. वेअणा] **वेणा-ण्या देणें**–१ (जनावरानें) प्रसूतिसमयीं कष्ट भोगणें; कण्हणें; कुंथणें; वेणटणें. २ परमावधीचा प्रयत्न करणें. एखाद्या कामांत अतिकष्ट, श्रम सोसणें. **वेणा(णा)टणें, वेणवणें**–अक्रि. प्रसववेदना होत असणें; प्रसूतीच्या आधीं पोटांत कळा उठणें–येणें; तिडका देणें.

वेण—स्त्री. (कु.) नदींत थोडया पाण्यांत मासे पकडण्याचें जाळें.

वेण—स्त्री. (कु. गो.) विहीण.

वेणा-णें—वि. (कों.) घरटांत घालून भरडून काढलेला (तांदूळ); न सडलेला; असडी (विशेषतः तांबडा व हलक्या प्रतीचा तांदूळ). **वेणे तांदूळ**–पुअव. फक्त भरडलेले; न सडलेलें तांदूळ; करड; असडी तांदूळ.

वेणी—स्त्री. १ डोक्याचे केंस, वाख इ० चे तीन किंवा अधिक पेड एकांत एक विशिष्टप्रकारें गुंतवून सर्पाकार केलेला आकार; अशा प्रकारची रचना, बांधणी. (क्रि० घाळणें). 'दंव्हढियां वेणियां खोविलियां' –शिशु ६५४. २ गुंतागुंत. 'तिहीं पुसली योगाची वाहाणी। ताता हें गुण चीत्ताची वेणी।' –भाए ६७०. ३ पाण्याचा अरुंद ओहळ; प्रवाह. ४ नद्यांचा संगम; त्रिवेणी संगम. ५ पंक्ति; रांग. ६ फुलें वेणीप्रमाणें दोऱ्यांत गुंफून केलेला (बायकांनीं खोपा–अंबाडा या भोंवतीं घालण्याचा) गजरा. ७ वेणीफणी पहा. 'शाळा तुझी सकाळीं। वेणी नाहीं झालेली।' –अभिनयगीत.' ८ करवतीची वेणीसारखी दिसणारी धार. [विणणें] **०करणें-करविणें**–वेणी घालणें. 'तों गुरुपत्नी न्हावुनि वेणी करवीत बैसली होती।' –मोआदि २.११८. **०दंड**–पु. (काव्य) वेणीचा पट्टा, शेपटा. 'वेणीदंड काढिला। गळफांस वेगीं घातला।'. **०दान**–न. प्रयागक्षेत्रांत सुवासिनीनीं आपल्या वेणीचीं दोन बोटें लांबीचीं अग्रें कापून त्रिवेणीस केलेलें दान; किंवा या दानाचा विधि (सर्वांस या क्षेत्रीं मुंडन सांगीतलें आहे पण सुवासिनीनीं फक्त दोन बोटें लांबीची वेणी कापून गंगेला अर्पण करावयाची असते. –तीप्र ९३.) **०दार**–वि. वेणीच्या आकाराचा. 'एका लाकडाचे फळीस वेणीदार खिळे मारून सुरा करतात.' –विक्षिप्त १.८३. **०फणी**–स्त्री. केसांना तेल लावणें, ते विंचरणें, त्यांची वेणी घालणें, कुंकू लावणें, डोळ्यांत काजळ घालणें इ० स्त्रियांचा प्रसाधनविधि. (क्रि० करणें; होणें). (सामा.) स्त्रियांचा सकाळचा शरीरमंडनविधि. 'तुझी वेणीफणी सुद्धां अजून झाली नाहीं.' –अमात्यमाधव. [वेणी+फणी; तुल० सं. वेणी-प्रवेणी]

वेणु—पु. १ वेळू; बांबू; कळक. २ वेळूची मुरली; पांवा; बांसरी. –एरुस्व ६.७३. 'वाहिला गोपाळें वेणुनाद पडे कानीं।' –तुगा १६१. [सं.] **०दंड**–पु. वेळूची काठी. 'केवळ वेणु-दंडग्रहण। तेणें सन्यासत्व न घडे जाण।' –एभा १८.१०३. **०बीज-यव**–नपु वेळूचें बी. अठरा उपधान्यापैकीं हें एक आहे.

वेत—न. १ विणें; जनावराची प्रसूति. २ प्रसूतीची खेप, पाळी. ३ वीण. [सं. वी=प्रसवणें]

वेत—पु. १ एक बोरूच्या जातीची वनस्पति, वेल. याच्या सालीच्या परड्या, खुर्च्या इ० करतात. २ या वेलाची काठी, छडी. [सं. वेत्र; प्रा. वेत्त; हिं. बेत] **०सरी**–स्त्री. खुर्ची इ० विणण्यासाठीं काढलेली वेताची साल. **वेतस-सी**–पुस्त्री; वेताचा वेल; वेत. [सं.] **वेतसवृत्ति, वेतसीवृत्ति**–स्त्री. १ वाकण्याची, नम्रपणाची, लीनपणानें वागण्याची पद्धत-रीत. २ वारा वाहील तशी पाठ देण्याची, प्रसंग पडेल तशी वागण्याची रीत. ३ लवचीकपणा; ताठरवृत्तीचा अभाव. **वेतसी**–स्त्री. वेत. –वि. वेताचा; वेताचा बनविलेला (पदार्थ–टोपली, खुर्ची इ०). **वेताचा मल्लखांब**–पु. १ मलखांबावरच्या उड्या, आसनें, कसरती करण्याकरतां छताला टांगण्यासारखा केलेला १०–१२ फूट लांबीचा वेत. २ अशा मलखांबावरचा खेळ. **वेताटी**–स्त्री. १ वेताची काठी, छडी. –एरुस्व १५.१०४. 'वेताटी घेऊन ते वेळां। ताडन करावया उदित।' –जै ५२.५०; –ह ९.४४. २ हातांत धरावयाची काठी. 'वेताटी धरून प्रत्ययाची।' –दावि १३९. [वेत+काठी] **वेतारी**–वि. १ वेत्रधारी. २ अधिकारी. –शर.

वेत—स्त्री. (गो.) वीत (हाताची); विशिष्ट रुंदी. [वीत]

वेतंड—पु. हत्ती. 'वेतंड ऐशा चरती रसाळा। वनांत गौ सुंदर गोरसाला।' –वामन, विराट ५.८५. [सं.]

वेतन—न. १ मजुरी; पगार; केलेल्या कामाचा मोबदला; बिदागी. 'वरदास दाससेना हे नाथा वेतनात मागे हें।' –मोकृष्ण ८४२०. –मोवन ४.१७७. २ (विशेषतः) सालीना नेमणूक (पूर्वी पुराणिक, पोतनीस, फडनीस इ०ना वेत ती). 'गांवकाम-गाराशिवाय वतनपद्धतीला फांटा मिळाला व चाकरीबद्दल वतना-ऐवजी वेतन देण्याची पद्धत चालली.' –गांगा ६८. [सं.] **०गुरु**–पु. भाडोत्री, निव्वळ पगारी मास्तर. –टिव्या. **वेतनी**–वि. १ वेतन ठरवून कांहीं कामास लावलेला (गडी, मजूर, पुराणिक, आश्रित इ०). 'मृत्यु न म्हणे वेतनी। वेतन धर्ता।' –दा ३.९.

१३. २ कांहीं कामाबद्दल एखाद्याला रोख पैसे किंवा पगार न देतां त्याच्या मोबदला बक्षीस दिलेला (गांव, हक्क, अधिकार इ०). वतन पहा. ३ वेतनासंबंधाचा (तंटा, हिशेब इ०). ४ भाडोत्री; पगारी.

वेतवेतून घेणें—वेवतणें पहा.

वेंतस, वेतूस—न. शरीरांतून रक्त काढावयाचें एक साधनविशेष; तुंबडी.

वेताळ—पु. १ पिशाचांचा राजा; भूतनाथ. –ज्ञा १७. २९८. ' वेताळ फेताळें। जळो त्यांचें तोंड काळें। '–तुगा ७९१. २ भूतपिशाचांतील एक उच्च जाति. किंवा त्या जातींतील एक व्यक्ति. ३ द्वारपाळ; वैतालिक. ' भाट वेताळ बंदीजन। भांडनटवे कुलालगण। ' –जै १०.४१. ४ एक क्षुद्र देवता; ग्रामदेवता. –खेया. [सं. वेताल] **म्ह०** वेताळ आहे तेथें भुतावळ आहेच. **०पूर्वस्थळीं येणें**–१ (एखादी व्यक्ति) पूर्वकर्मानुसार वागूं लागणें; (वेताळ पंचविंशींतील गोष्टीवरून) नियंत्रण गेल्यावर पुन्हा पूर्वीचा पेशा पत्करणें २ (विथरलेल्या मनुष्यानें) चौदावें रत्न दाखविल्यावर वठणीवर येणें. **०सेना**–स्त्री. पिशाचवत् क्षणिक, क्वचित् दिसणारी किंवा दिसतांच अदृश्य होणारी शक्ति. ' वेताळसेना दृष्टी पडोनी। कोठें लपली नेणवे। ' –दावि २५०. भुतें, पिशाचांचा समूह. **वेताळाची फेरी**–स्त्री वेताळाची प्रदक्षिणा, संचार. **वेताळाची स्वारी**–स्त्री. १ वेताळ आणि त्याचे गण, अनुचर यांची यात्रा, मिरवणूक २ पिशाचदीपिका. **वेतोबा**–पु. (कु) वेताळ देव.

वेत्ता—वि. ज्ञाता; जाणता; एखाद्या विषयांत पारंगत असलेला; तज्ज्ञ [सं.] **वेत्तृत्व**–न एखाद्या विषयाचें ज्ञान; त्यांतील पारंगतता. [सं.]

वेत्यास—पु. (प्र.) व्यत्यास; फरक; विरुद्धपणा; विसंगतता; विपर्यय. [सं. व्यत्यास]

वेत्र—पु १ वेत. २ वेताची छडी; वेताटी. ३ (राजा किंवा मोठा अधिकारी याच्या) छडीदार–चोपदाराच्या हातांतील काठी. [सं.] **०धर–धारी–पाणी**–पु. भालदार; चोपदार; द्वारपाळ; द्वाररक्षक [सं.] **०यष्टी**–स्त्री. वेताची काठी. ' घेती किरीटावरी वेत्रयष्टी। '–स.रुह ५.२५. [सं.] **०वतिका–वेत्रवती**–स्त्री. स्त्रीद्वारपाल; राजाच्या सन्निध असणारी दासी. **वेत्रासन**–न. वेताची बैठक; वेताचें आसन; खुर्ची. [वेत्र+आसन] **वेत्रकीय**–वि. वेतांनीं परिपूर्ण भरलेलें; खूप वेत असणारें–होणारें. [सं.]

वेथा—स्त्री. १ व्यथा; दुःख; शारीरिक किंवा मानसिक पीडा. ' औषध नेघे असोन वेथा। '–दा २.१.२२. २ संकट. ' वेथा मोठी रावणा। ' –वेसीस्व ४.१०२. [सं. व्यथा]

वेद—पुअव. १ भारतीयांचे पवित्र आद्य धर्मग्रंथ; श्रुति; जगांतील अत्यंत प्राचीन वाङ्मय. वेद चार आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद. यांतील मूळचे तीन हे मुख्य वेद होत आणि इतिहास व पुराणें यांना पांचवा वेद म्हणण्यांत येतें '. २ ज्ञान. ३ (महा'रांत) मंगलाष्टकें. –वदलापूर १६९. –वि. चार ही संख्या. ' दोन अक्षौहिणी पांडवदळ। वेदअक्षौहिणी हें त्याचें बळ। ' –जै ८३ २७. [सं. वेद; विद्–जाणणें] **एखाद्याचे वेद हरणें**–सर्व युक्त्या, बेत इ० फसून कर्तव्यमूढ होणें; कांहींएक मार्ग न सुचणें; तंत्रमंत्र हरणें. **०त्रय**–न. ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद. –ज्ञा ७.८४. **०त्रयी**–स्त्री. १ धर्म, अर्थ व काम यांचा समुच्चय. २ संहिता, ब्राह्मण व आरण्यकें मिळून होणारे ग्रंथ. ३ ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन वेद. **०निंदक**–पु. वेदांची निंदा करणारा; बौद्ध, जैन इ० अन्य धर्मीय मनुष्य. **०पद्य**–न. वेदवाक्य; वेदांतील ऋचा. ' घुमघुमिती घोषा। वेदपद्याचा। ' –ज्ञा १५.१८८. **०पुरुष**–पु. वेदरूपी पुरुष; वेद. ' वेदपुरुष तरि नेती का वचन। निवडूनि भिन्न दाखविलें। ' –तुगा १६५३. **०प्रतिपाद्य**–वि. वेदाच्या प्रतिपादनाचा असणारा (विषय). ' ॐ नमो जी आद्या। वेदप्रतिपाद्या। ' –ज्ञा १.१. **०मुख**–वि. वेद तोंडपाठ येत असलेला; चांगलें वेदपठण केलेला. **०मूर्ति**–स्त्री. (मूर्तिमंत वेद) वेदविद्यासंपन्न, विद्वान् भिक्षुक, शास्त्री इ० च्या नावामागे लावण्याची सन्मानदर्शक पदवी. **०रक्षण**–न. वेदाचा प्रतिपाळ. हा ब्राह्मणाचा आचार मानला आहे. **०लोक–कु**–पु. वेद आणि जग किंवा वेद हेच जग; श्रुतिशास्त्र. ' तो गा मी निरुपाधिकु । क्षराक्षरोत्तमु एकु। म्हणोनि म्हणे वेदलोकु । पुरुषोत्तमु । ' –ज्ञा १५.५५७. **०वती**–स्त्री. पृथ्वी; वेद (अन्न) युक्त पृथ्वी. ' जयाचेनि सौरभ्ये जीवित जोडे। वेदवतीये। ' –ज्ञा ११.२२४. **०वाक्य**–न. १ वेदश्रुतिसंहिता; वेदांतील वचन. ' वेदवाक्यांतून आगगाडी, तारायंत्र काढण्याचा प्रयत्न जितका असमंजस... ' –टिले ४.५२. २ ज्याच्या प्रामाण्याला निराळा आधार लागत नाहीं असें वेदांतील वाक्य. ३ (ल.) प्रमाण वचन. **०वादरत**–वि. वेदांतील अर्थवादांमध्यें मग्न असलेला. ' म्हणोनि हे पार्था। दुर्बुद्धि देख सर्वथा। तयां वेदवादरतां। मनीं वसे। ' –ज्ञा २.२५५. **०विद्**–वि. वेद जाणणारा; विद्वान् –ज्ञा ८ १०३. [सं.] **०शास्त्रसंपन्न**–वि. वेदमूर्ति. शास्त्रपुराणादि जाणणाऱ्या प्रतिष्ठित ब्राह्मणाच्या नावापूर्वी कागदोपत्रीं लिहावयाची पदवी. याचा संक्षेप वे० शा० सं० असा करतात. **०सार**–नपु. वेदांचें सार किंवा रहस्य; वेदांचें सार असलेली देवता. ' जयजय जगद्गुरुंशा वेदसारा। ' **वेदांगें**–नअव. वेदानुषंगी शास्त्र; वेदांचाच भाग म्हणून गणलेलें शास्त्र; उपवेद. हीं अंगें सहा आहेत. शिक्षा, कल्प, व्याकरण, छंद, ज्योतिष व

निरुक्त. षडंगें पहा. [वेद+अंग] **वेदांत**–पु. (वेदांच्या अंतीं असलेला) वेदांचें सार. १ ब्रह्मज्ञान सांगणारा वेदानंतरचा भाग; उपनिषदें; उत्तरमीमांसा; षड्दर्शनांतील सहावें दर्शन; उपनिषदांतील तत्त्वज्ञान. 'वेदांतु तो महारसु। मीदकु भिरवे।' –ज्ञा १.११. –एभा १७.४०. २ प्रपंचाचें ऐहिक सुखदुःखांचें मिथ्यात्व आणि ब्रह्माचें सत्यत्व प्रतिपादिणारी साधुसंत, हरिदास इ० सांगतात ती गोष्ट; उपदेश; ब्रह्मज्ञान. ३ ब्रह्म हेंच सत्य आहे; बाकी जग:मिथ्या आहे असें सांगून ईश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाचें निरूपण करणारें मत; जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य दाखविणारें अद्वैतमत. वेदांताचे द्वैत, अद्वैत व विशिष्टाद्वैत असे मुख्य तीन पंथ आहेत. [वेद+अंत] **वेदांती**–वि. १ उपनिषदांतील ब्रह्मज्ञान अभ्यासणारा किंवा त्याप्रमाणें वागणारा; ब्रह्मज्ञानी; वेदांतमताचा. २ ज्ञानमार्गी; ज्ञानकांडप्रतिपादक. याच्या उलट धादांती. –गीर २८७. **म्ह०** वेदांत्यापेक्षां धादांती बरा. **वेदाध्ययन**–न. वेद पठण; वेद शिकणें. पंचमहायज्ञांतील एक यज्ञ. –गीर २८८. [वेद+अध्ययन] **वेदाभ्यास**–पु. १ वेदांचें अध्ययन; वेदपठन. २ ॐकाराचा जप. [वेद+अभ्यास] **वेदाज्ञा**–स्त्री. वेदानें सांगितलेलें कर्तव्य; वेदाची आज्ञा; वेदवचन. [वेद+आज्ञा] **वेदोक्त**–वि. १ वेदांत कर्तव्य म्हणून सांगितलेलें. २ वेदमंत्रोच्चारपूर्वक. ३ (ल.) वेदमंत्रोच्चारपूर्वक करावयाचा(धर्मविधि). याच्या उलट पुराणोक्त. 'बगंभट, तुला काय काय वेदोक्त करतां येतें?' –तोबं ६१. **वेदोक्तकर्म**–न. वेदोक्त; वेदोक्त मंत्रानें करावयाचा गृह्यसंस्कार. जुन्या शास्त्रांप्रमाणें हा अधिकार फक्त त्रैवर्णिकांना असे. 'अलीकडे इंग्रजीविद्येनें व पाश्चिमात्य शिक्षणानें संस्कृत झालेल्या मराठे मंडळीच्या मनांत जीं कांहीं खुळें शिरलीं आहेत त्यांपैकींच वेदोक्तकर्माचें खूळ एक होय.' –टिले ४.३१६. **वेदोदित**–वि. वेदोक्त पहा. [वेद+उदित] **वेदोनारायण**–पु १ वेदस्वरूपी परमेश्वर. वेदविद्यासंपन्न ब्राह्मणाला सन्मानद्योतक लावावयाची पदवी. [सं.]

वेद—न. कपट; कारस्थान. 'म्हणोन ईश्वर पाप भृत्याचें। वेद दवडील लोकनिंदेचें।' –मुआदि १६.१४८. [सं. वेध]

वेद—पु. (प्र.) वेध; नाद; छंद. 'अखंड हरिकथेचा छंदु। सकळांस लागे नामवेदु।' –दा १९.६.१८. [वेध] **वेदणें**–क्रि. (महानु.) मोहून जाणें. (प्र.) वेधणें पहा. 'एक वेदुनी म्हणती देवातें द्यावी रुकुमीणी।' –धवळेपू ४२.२.

वेदकु—पु. (काव्य) जाणणारा; ज्ञाता. 'तैसा वेद्याच्या विलयीं। केवळ वेदकु उरे पाही।' –ज्ञा १८.१२०३. [सं. विद्–वेद; म. वेदणें]

वेदणें—सक्रि. (काव्य) जाणणें. –स्त्रिपु [सं. विद्]

वेदना—स्त्री. १ तीव्र दुःख; कळ; तिडीक; यातना. २ कळविणें; जाणीव देणें; दिग्दर्शन; ज्ञान; समजावणी. [सं.] **म्ह०** ह्या बोटाची वेदना त्या बोटाला येत नाहीं. =एकाच्या दुःखाची जाणीव दुसऱ्यास मुळींच होत नाहीं.

वेदि-दी, वेदिका—स्त्री. १ उंच आसन. २ यज्ञकुंडाची वरची बाजू, भोंवतालची जागा; आहवनीय, गार्हपत्य व दक्षिणाग्नि या तीन अग्निकुंडांच्यामधील विशिष्ट आकृतीची दर्भाच्छादित जागा. यज्ञपात्रें, उपकरणीं इ० ठेवण्याची स्वतंत्र जागा. (देऊळ, मंडप इ० ठिकाणीं). 'वेदिका रचे मांडवीं। शरीराच्या।' –ज्ञा ८.४९. ३ लग्न, मुंज, इ० विधींत घातलेलें बहुलें; देवळांतील देवांच्या मूर्ति असलेला उंचवटा. [सं.]

वेदित—वि. कळविलेलें; उघड केलेलें; पुढें मांडलेलें; जाणवलेलें. [सं.] **वेदितव्य**–वि. कळवावयाचें; जाणवावयाचें; जाणावयास योग्य.

वेद्य—वि. जाणण्यास योग्य; जाणावयाचें (जगत, ब्रह्मवस्तु इ०). [सं.] (समासांत) तर्कवेद्य, मनोवेद्य, ज्ञानवेद्य, इंद्रियवेद्य. –ज्ञा ६.४७९. 'वेधा देता मिठी। वेदकही सुये पोटीं।' –अमृ २.१५.

वेध—पु. १ मोती, माणिक इ० नाभोंक पाडण्याची क्रिया, छिद्र करण्याची क्रिया. २ छिद्र; भोंक; वेज. ३ भेद; दृष्टि, बाण, गोळी इ० नीं एखाद्या लक्ष्यावर केलेला परिणाम; लक्ष्य पदार्थावर झालेला परिणाम. ४ सूर्यग्रहणाच्या पूर्वी चार प्रहर आणि चंद्रग्रहणाच्या पूर्वी तीन प्रहर अशी धर्मशास्त्राप्रमाणें असलेली ग्रहणसंबंधीं दोषाची व्याप्ति. या कालांत भोजन इ० निषिद्ध आहे. ५ (ज्यो.) खस्थ पदार्थांचें क्षितिजापासून किंवा खस्वस्तिकापासून असलेलें कोनात्मक आणि कालात्मक अंतर. ६ मुख्य तिथिनक्षत्राचा दुसऱ्या तिथिनक्षत्राच्या त्या दिवशीं सकाळीं किंवा संध्याकाळीं असणाऱ्या अंशात्मक भागानें येणारा गुणदोषप्रयोजक संबंध. 'आज मंगळवारी दशमी तीन घटिका आणि एकादशी पडली सत्तावन घटिका म्हणून ह्या एकादशीला दशमीचा वेध आहे.' ७ सप्तशलाकादि चक्राचे ठायीं एकशलाकादिगत जीं नक्षत्रादिक असतात त्यांतून एकीकडचे नक्षत्रादिकांवर जो कोणीं ग्रह असतो त्याचा दुसरीकडचे नक्षत्रादिकांवर जो दृष्टिपात असतो तो. एका नक्षत्रानें दुसऱ्यासमोर येण्यानें होणारा परिणाम. (एक वस्तु दुसऱ्या समोर अगदीं समरेघेंत आली असली म्हणजे तें अशुभ मानतात. यामुळें घराचा दरवाजा व दिंडीदरवाजा हे समोरा समोर नसतात, किंवा एक खिडकी दुसरीच्या समोर नसते). (यावरून पुढील अर्थ). ८ अटकाव; अडचण; विरोध; उपसर्ग; पायबंद; अडथळा. 'जातो खरा पण वेध न आला म्हणजे बरा.' ९ एखाद्यावर असलेल्या कार्याच्या भारामुळ, काळजी–यातनामुळें

त्याला स्वतंत्रपणें वागतां न येणें. 'प्रपंचाचा वेध ज्याच्या पाठीमागें आहे त्याला खेळ-तमाशे कोठून सुचतील ?' १० चालेल्या कामांत अडथळा आल्यानें झालेला खोळंबा. 'माझ्या कामांत वेध आला.' ११ काळजी; निकड; चिंता; घोर; पुढें करावयाच्या गोष्टींचें आधीं लागलेलें व्यवधान. 'ह्या कामाचा मला वेध असा लागला कीं रात्रीं मला झोंप आली नाहीं.' १२ ध्यास; छंद; नाद; आकर्षण; चटका; ओढा. 'जडें पाटीं धावैती वेधें। आनंदें ढुलति चतुष्पदें।' -ऋ ३६. -ज्ञा १३.४१०. -एरुस्व ६.५. -तुगा ११७. १३ तळें, विहीर इ०चा खोलपणा. १४ प्रवेश; शिरकाव. 'एक एकासीं होय वेध। परि प्राप्तीविण नव्हे बोध।' १५ नेम (बाण इ० चा). १६ सूक्ष्म, लक्षपूर्वक अवलोकन; ठाव घेणें. १७ चित्ताकर्षकपणा. 'वेधे परिमळाचें वीक मोडे। जयाचेनि।' -ज्ञा ६.१५. १८ चिंतन. -ज्ञा १८.९६१. [सं. विध्=छिद्र पाडणें] **०घेणें-करणें**-दुर्बीण इ० साधनांनीं खस्थपदार्थांची स्थिति, गति, इ० मापणें किंवा ठरविणें, अवलोकन करणें.

वेधक—वि. १ भोंक पाडणारा. २ (ल.) झोंबणारा; बोचणारा; तिखट; कडक. ३ हृदयस्पर्शी; शहारे आणणारा; ठाव घेणारा. ४ आकर्षक; चित्तहारक. (समासांत) मनोवेधक. 'म्हणती वेधका वनमाळी। आम्हांस टाकून गोकुळीं। तुम्हीं द्वारका वसविली।' -ह ३६.३९. [सं.] **वेधणें**-उक्रि. १ भोंक पाडणें; भोसकणें. २ मारणें; टोंचणें; विद्ध करणें. 'प्रभुसी त्रिशतीं वेधी...' -मोकर्ण ११.२१. ३ एकाग्र करणें; स्थिर ठेवणें (मन). ४ आकर्षून घेणें; गुंतविणें. 'ज्याच्या नीतिश्रवणीं ज्ञात्याची चित्तवृत्ति वेधावी।' -मोकर्ण ७.२. ५ क्षत पाडणें; अंतःकरण विद्ध करणें; भेदणें. ६ परिणाम करणें; व्याप करणें. 'ए-हवीं दिठी वेधली कवळें। तैं चांदणियातें म्हणे पिवळें।' -ज्ञा ९.१४१. [सं. वेधन] **वेधन**-न. १ छिद्र, भोंक, वेज पाडणें; टोंचणें. २ गिरमिट; भोंक पाडण्याचें एक हत्यार. [सं.] **वेधनीय**-वि. वेध पाडण्यास योग्य, इष्ट. [सं.] **वेधवती**-स्त्री. १ वेधकपणा; आकर्षकता. 'ते कांई वाणौ वेधवती।' -शिशु ६०९. २ प्रेमशक्ति. 'आतां वेल्हाळ वेधवती।' -भाए ९२. -वि. वेध लावणारी; आकर्षक. 'कीं जगातें भूलवीति। ते श्रीकृष्णाची वेधवती।' -शिशु २४३. **वेधशाला**-स्त्री. ग्रहांचे वेध घेण्याचें ठिकाण. **वेधशास्त्र**-न. आकाशस्थ ज्योतींचें अवलोकन करून त्यांच्या गती, स्थिती, वगैरे निश्चित करणारें शास्त्र. **वेधित**-वि. १ विद्ध करणारें; भेदणारें. २ वेध करण्यांत कुशल. **वेध्य**-वि. वेधण्यास योग्य, शक्य, इष्ट, योजित. [सं.]

वेधमक्षिका—स्त्री. एक जातीची माशी. (इं.) इचन्युमॉन फ्लाय. -प्राणिमो ११६.

वेंधळा—वि. १ मंद आणि अव्यवस्थित; बावळट व गचाळ. 'धांव, धांव, असा काय वेंधळ्यासारखा इकडतिकडे पहातो आहेस.' -हामुबा. २ गोंधळलेला; गोंधळ घालणारा. वेंभळ.

वेधा—स्त्री. (महानु.) (प्र.) विद्या; ज्ञान. 'तै अब्रह्मापलीकडे। ज्ञानसूर्य उजियेडे। शुद्ध वेधा तव जोडे। कैवल्यविधि।' -ज्ञाप्र ३.

वेधा—पु. ब्रह्मदेव. [सं.]

वेन्नी—स्त्री. (गो.) मासळी विकणारी मंडळी.

वेपथणें—अक्रि. (महानु.) चळचळा कापणें. 'वातहतें कर्दळीपत्रें। तैसीं वेपथें सर्व गात्रें।' -ऋ ६४. [सं. वेप्-वेपथु]

वेपथु-पु. कंप.

वेंब(भ)ळ—वि. १ (महानु.) चांचरी; बोबडी. 'तैसी वेंभळ बोली। जिए श्रीमुखिची।' -ऋ ९४. २ (महानु.) बावळा; वेंधळा. 'एका कर्णें तारसें वेंभळें।' -दाव २८५. ३ लुला; गलित. 'कैसें सेविल शक्रही पडति यद्बाहें भयें वेंबळें।'-मोकृष्ण ६८.२९. [स. विह्वल; प्रा. विंभल] **वेंभळणें**-अक्रि. चाचरणें.

वेमा, वेम—पुन. १ (विणकाम) मागावर बाणा दाबण्याचें साधन; फणी. २ माग. [सं. वेम]

वेय—पु. (गो.) व्याही पहा. **०जेवण-न.** व्याहीजेवण.

वेयो—क्रि. (खा.) झाला. 'राम खूब खूस वेयो.' [सं. भू; हिं. हुवा]

वेर—स्त्री. भेग; चीर. **वेरणें**-चिरणें. 'लांकडाचा भुसा लांकूड वेरून पडतो.' -अश्वप १.१२७.

वेरजार-झार-धार—स्त्री. जा ये. (प्र.) येरझार पहा. 'जासुद करति वेरझार।' -राला ५९.

वेरीं, वेऱ्हीं—शअ. १ (काव्य) पर्यंत; पावेतों. (काल-स्थलवाचक). 'पदीहुनि मुगुटवेऱ्हीं। राममूर्ति देखिली साजिरी।' -स्वादि १.२.२५. 'ज्या आजवेरि सरिता तुजशीं मिळून।' -विवि ८.७ १२३. 'समुद्रजळ उसळत कैलासवेरी।' -ज्ञा १.९५५. वर पहा. २ कडून; वारीं. 'धुधुवातें कुठारे वेऱ्ही। बाहुभुजांचीं करौनी कांडौरीं।' -शिशु ४५५. **म्ह०** अंधळें धावे कुडावेरीं.

वेरुल—पु. (महानु.) लांडगा. 'हर्षामर्षे वेरुल चोहीं। दिशा धावताति।' -ज्ञाप्र २७०. [सं. व्याल, वेउल]

वेरूळचा निचाडया—वि. (क.) अतिशय कृपण, कद्रु. [वेरूळ+निचाड]

वेरेवाळी, वेरवाळीं—क्रिवि. (प्र.) वेळेवारीं पहा.

वेर्थ—(प्र.) व्यर्थ पहा. 'नाहीं तरी हें वेर्थचि गेलें।' -दा १.१०.६१. [व्यर्थ]

वेल—पुस्त्री. १ लता; वृक्षादिकांवर चढणारी वनस्पति. २ नागवेल. ३ कुडूक, काप इ० कानांतल्या दागिन्यांस

सोन्यामोत्यांची सांखळी असते ती. ४ वंश; वंशज. ' पार्थ म्हणें रक्ष या स्वयें वेला । ' –मोअश्व ४.४०. ५ वेलाच्या आकाराची नक्षी. ६ सोललेल्या झाडाचें पातळ वेष्टन, साल (भारा इ० बांधण्याच्या उपयोगी). [सं. वल्लि; प्रा. वेल्ली; गु. पं. वेल] **०चढविणें–उतरविणें, वेलाला आढ्या देणें**–(पानमळा) वेल वर गुंडाळणें, खालीं करणें इ० क्रिया. **०परतविणें**–वेल उलटविणें (रताळी इ० चा). **०मांडवास जाणें–वाढणें**–वंश वाढणें; कुटुंबविस्तार होणें. ' प्रिय पुत्रातें भेटोनि रडुनि म्हणे मांडवास जा वेला । ' –मोआश्रम ४.२. **०गुंडी**–स्त्री (व.) गवताच्या घरावर टाकण्याकरितां तुऱ्हाट्याचे वेट दूरदूर लावून केलेला कडा. **०गोंड**–पु एक भाजी. **०चवळी**–स्त्री. एक प्रकारची चवळी. **०पत्ती**–स्त्री. वेल, पानें यांची नक्षी; बूट. **०बाळी**–स्त्री. एक बुगडयाप्रमाणें कानांतला दागिना. ' कानीं घेंडया आणिक वेलबाळया मोत्याचे सर । ' –अफला ५५. **०बुटी–ट्टी–बूट–बुट्टा**–स्त्रीपु. भित, कागद, छीट इ० वर काढलेली वेलाची नक्षी, तऱ्हेतऱ्हेची बूट. **०बोंडी**–स्त्री. एक भाजीचा वेल. फळाला वेलबोंडें म्हणतात. **०मिरची**–स्त्री. एका जातीची मिरची. **०वटी**–स्त्री. कुंपण. ' तेणें वाचेस पडली वेलवटी । बोलों उफराटी विसरली । ' –एभा ९.४२४. **०वाक**–पु. (ना.) वेली वगैरे समुच्चयानें. **०वांगी**–स्त्री. वांग्याची एक जात. फळाला वेलवांगें म्हणतात. **०विस्तार**–पु. द्राक्ष किंवा इतर वेलीचा मोठा विस्तार, फैलाव. **०विस्तार वाढणें**–(ल.) वंश, कुटुंब वाढणें (आशीर्वादांत योजतात) **वेलरी**–स्त्री. वेल; वल्लरी; वेलीचें जाळें. ' मग पै कामनाचि तया । जिवीं जाल्या वेलरिया । ' –ज्ञा १६.३६७. [सं.वल्लरी] **वेली**–स्त्री. १ वेल पहा. २ लांब गाणें. ' एकु हामामा घालीति हुंबळी । एकु वेली गातांती । ' –दाव ८५. ३ वंश. ' आमुची वेली कां खुटिली । हा हा देवा वृत्ति बुडाली । ' –दा ३.३.४०. **वेली जाणें**–विस्तारणें; वाढणें. ' जैसा वर्षाकाळु गगनीं । पालव जे नवघनीं । तैसें आकारजात अज्ञानीं । वेलीं जाय । ' –ज्ञा १५.१५२; –एभा २६.२५०. **वेल्या करंज**–पु. करंज झाडाची एक जात.

वेल—स्त्री. (खा.) तुळई. –भात्रै ७.१.४.

वेल—स्त्री. घोडयांना होणारा क्षयासारखा एक रोग.

वेलची—स्त्री. १ एलची; एलदोडा पहा. २ केळीची एक जात.

वेलचूल—स्त्री. वैलचूल पहा.

वेलंडी—वेलांटी पहा.

वेलदोडा—पु. वेलची; एलदोडा पहा.

वेला–ळा—स्त्री. १ समुद्रकिनारा. ' दर्पसागरु वेळा । सांडुनि उते । ' –ज्ञा १६.३९३. २ वेळ. ३ सीमा; मर्यादा. [सं.] **वेलाउळ**–न. १ किनारा. ' कीं भवार्णवाचे वेलाउळ । मुक्तांचे तें । ' –ऋ ३८. २ बंदर; उतारपेठ. ' जे परिमळाचे वेलाउळ । सारग्राहिकांसी । ' –ऋ ९६.

वेलांटी, वेलांटी–डी, वेल्हांटी–डी—स्त्री. १ व्यंजनाला इ, ई स्वर जोडतांना योजावयाच्या ि, ी, चिन्हांची संज्ञा. ' क ला वेलांटी दे म्हणजे की होईल. ' २ वृद्धि; विस्तार. ' पै जेथुनी हे एवढी । विश्वपरंपरेची वेलांडी । ' –ज्ञा ९५ २८१. [वेल]

वेलावणें—वेल्हावणें पहा.

वेली–ल्ली—स्त्री. (गो.) एक लहान जातीचा मासा. –मसाप ३ ३.

वेली—स्त्री. घोडयाचा एक गांठीचा रोग. –अश्वप २.१८०. वेल पहा.

वेलें—न. (बाई) नांगराचा मधला दांडा व जूं यांना बांधावयाचा कातडी दोर.

वेलोणी—वि. (ना.) विडयाच्या पानाची एक जात.

वेल्यें हत्रुवें—न एक प्रकारचा तांदूळ.

वेल्हवणी—स्त्री. विस्तार; पाल्हाळ. ' तैसी प्रकृतीच्या गुणीं । जया कर्माचि वेल्हावणी । ' –ज्ञा १८.८२७. [वेल + लावणें] **वेल्हावणें, वेल्हवणें**–क्रि. १ विस्तारणें. ' सत्वाचेनि बोलांसे । बोधतरु वेल्हावतु दिसे : ' –भाए १८४. –अमृ ७.१३५. २ सुखावणें; आनंदणें. ' ब्रह्मानंदे जी डुलत । निजसुखें वेल्हावत । ' –एभा ७.२६९. ३ डोलणें; लोळणे. ' आपुलेनि समीरणें । वेल्हावतीं विझणें । ' –अमृ ९.२, –ऋ ९४. [सं. वेल्+हालणें]

वेल्हाळ—पु. १ काव्यात्मक मंडण, विस्तार. २ अतिशयोक्ति; तिखटमीठ. (क्रि० लावणें; मांडणें; करणें). ३ (सामा.) वाढ; विस्तार. ' दाऊ वेल्हाळ देसी नवी । जैसी साहित्यातें चोजवी । '. –स्त्री. गप्पिष्ट स्त्री. –वि. फोफावलेलें; विस्तारलेलें. ' जैसी अंकुरें सीं सरळ । वेली दिसे वेल्हाळ । ' –अमृ ७.४३. [? वल्ली; प्रा. वेल्ला] **०पणा**–पु. विस्तार. ' येती वैराग्यशाखा कवळिया । वेल्हाळपणें । ' –ज्ञा १५.१९०. **वेल्हाळ्या–ळी**–वि. अतिशयोक्ति करणें, रंगवून सांगणें, यांची खोड असलेला–ली.

वेल्हाळ—पु नवरा किंवा इतर प्रियकर यासंबंधीं लाडिकपणें म्हणतात. –स्त्री. १ बायको किंवा इतर प्रियपात्र यासंबंधीं योजतात. ' वदत वेल्हाळ गौरवर्णी । ' –ह ९.१८.२. (निंदार्थी) नगरभवानी; विलासिनी. –वि. १ लाडका; प्रिय. ' पंच वर्षाचा चिलया बाळ । बत्तीस लक्षणी वेल्हाळ । ' –शिली (नवनीत पृ २३४). २ सुंदर. ' डोळस आंगें वेल्हाळ । ' –दाव ६४. ३ नाजुक. ' कंठांतून पिक दिसे अशी वेल्हाळ । ' –अफला ५४.

[देप्रा. वेल्लहल] **वेल्हाळा-ळी**-स्त्री. १ पत्नी, रक्षा, प्रीतिपात्र इ० स लावतात. 'कीं वेल्हाळा विद्युल्लता। सेजें आलिया।' -शिशु ७५१. २ सुंदरी; प्रिय स्त्री; वेल्हाळ. 'देखोनि हांसिन्नला वनमाळी। भिऊं नको वो वेल्हाळी।' -एरुस्व ८.५६. -र १२.

वेव-पु. आश्रय. -मनको.

वेंव-न. (महानु.) मागाचें सुत गुंडाळण्यास लागणारें सरळ लाकूड. 'कल्हणी एक साळी हाटासि वेंव घेयावेया जाए।' -दृष्टांतपाठ ११. [सं. वेम]

वेवट-न. संकट; त्रास. 'पांडवांच्या वाचें मी काय लागें। त्यांचीं वेवटें सोशी अनेगें।' -एभा २४.३८३. [सं. विवेष्ट] **वेवतणें, वेवंतणें**-उक्रि. १ वेढा घालणें व लगटणें, नेट करणें. २ भंडावणें; त्रास देणें; जिकीर करणें (भिकारी इ० नीं). [सं. विवेष्टन] **वेवतून घेणें, वेतवेतून घेणें**-भंडावणें; त्रास देणें.

वेवधान-न. (प्र.) व्यवधान पहा. 'सावधान वेवधान उरले नाहीं।' -दावि ५४.

वेवर्धना-स्त्री. विवंचना; चिंता. 'ऐसी वेवर्धना करी। दुःख वाटलें अंतरीं।' -दा ३.४.४६.

वेवसा, वेवसाय-व-पु. १ खरेदी विक्री; व्यापार. २ धंदा; उद्योग; व्यवहार. 'लज्जा वाटे जीवा। त्रासलों या दुःखें वेवसाय देखें। तुटी येतां।' -तुगा ६५३. 'सोडोनिया वेवसाव। वीणा हातीं।' -रामदासी २.६५. (प्र.) व्यवसाय पहा. **वेवसाई**-(प्र.) व्यवसायी पहा. 'मृत्यु न म्हणे हा देसाई। मृत्यु न म्हणे वेवसाई।' -दा ३.९.१४.

वेवस्ता-स्त्री. (प्र.) व्यवस्था पहा. 'एवं देहाची वेवस्ता। ऐसी असे।' -दा ३.१.२७.

वेवाद-पु. विवाद; वाद पहा. 'निरूपण मिसें निंदा घडे। संवाद मिसें वेवाद पडे।' -दा ७.८.६६. [सं. विवाद] **वेवादणें**-अक्रि. वादविवाद करणें. **वेवदरणें**-विवाद करून भंडावणें. 'दुर्जनीं वेवदरून घेतला।' -दा १८.१०.४०. **वेवादी**-वि. विवादक; वाद करणारा. 'गेले बहुत वेवादी। बहुतापरीचे।' -दा ३.९.५४.

वेवारणें-उक्रि. (प्र.) व्यवहारणें पहा. 'बहुतजनांसि वेवारिलें। तें खरे कैसेनि मानावें।' -दा ६.८.६.

वेवें-न. भीति, गोंधळ इ० कारणामुळें तोंडांतून निघणारा अस्पष्ट उच्चार. 'बोलूं म्हणतां आहां, पण विचार करा, नाहीं तर तेथें गेला म्हणजे वेवें होईल.' [ध्व.]

वेव्हार-पु. (प्र.) व्यवहार. १ व्यापार; देवघेव; धंदा. २ अडचणी, हरकती आणून उत्तर देणें; प्रतिवाद; सबबी; ढोंगाच्या गोष्टी सांगणें. (क्रि० सांगणें; करणें). ३ एखादी क्रिया, आचार; प्रापंचिक गोष्ट. 'तुजवाचोनि आतां वेव्हार। खुंटला माझा।' -कथा २.१२.१००. ४ लोकरीत; व्यवहार. ५ व्यवहाराची जागा; दुकान. 'राजद्वारीं कां सभे माझारीं। बैसावें पारीं अथवा वेव्हारीं।' -एभा १३.१४३. ६ खटला; दावा. 'न दिसे नरहरी। जिंतोनी वेव्हारीं। घेईन जाणा।' -गुच १.१२४. [सं. व्यवहार] **वेव्हार-रा-री**-पु. १ सावकार; व्यापारी. 'तेथें वर्धमान नामें वेव्हारा' -पंच १.५. 'मज ग्रंथोद्यमु फळावया। वेव्हारा होई।' -ज्ञा १४.१६. **वेव्हारी**-वि. १ व्यापारी. २ अडचणी; हरकती, सबबी आणणारा; हुज्जतखोर.

वेश-वेष पहा.

वेश्या-स्त्री. १ द्रव्याकरितां वाटेल त्याला आपल्या शरीराचा विक्रय करणारी स्त्री; रांड; कसबीण. 'वेश्या म्हणजे जोडयांतल्या खडयासारख्या आहेत, लवकर निघत नाहींत आणि खुपल्यावांचून रहात नाहींत.' -मृ ५०.९ कलावंतीण; नायकीण; नर्तकी. [सं.] **०गमन**-न. रंडीबाजी. **०वृत्ति-व्यवसाय**-स्त्रीपु. शरीरविक्रय; कसब; भगवृत्ति. **वेश्याचार्य**-पु. वेश्यांचा मालक; वेश्या बाळगणारा. [वेश्या+आचार्य] **वेश्यागार, वेश्यालय, वेश्याश्रय**-पुन. वेश्या राहतात तें ठिकाण, घर; कुंटणखाना. [वेश्या+आगर, आलय, आश्रय]

वेष-पु. १ पोशाख; कपडे; पेहराव. २ पोशाखाची तऱ्हा, प्रकार, रिवाज. ३ बुरखा; सोंग; मिष. ४ रूप. 'मी सूर्याचिनि वेषें। तपें तैं हे शोषे।' -ज्ञा ९.२९६. [सं.] **०धारी**-पु. १ वेष, सोंग, बुरखा घेणारा; सोंगाडया. 'पुरुष-स्त्री वेषधारी.' 'येर मायीक वेषधारी। असल्हिष्य।'. २ ढोंगी. **०भूषा**-स्त्री. वस्त्रालंकार घालणें; पोशाख करणें; प्रसाधना. (इं.) टॉयलेटला नवा प्रतिशब्द.

वेष्टक-वि. वेढा, वळसा, आवरण इ० घालणारा. [सं.] **वेष्टणें**-उक्रि. १ वेढणें; घेरणें. 'वेष्टित सभे देखोनि करें। येरी वृत्तांत विचारी।' -मुआदि ४.१४३. २ भोंवतीं गुंडाळणें; लपेटणें. [सं. वेष्टन] **वेष्टन-ण**-न. १ घेरणें; वेढणें. २ आवरण; आच्छादन. २ पिशवी; म्यान; गवसणी. ४ कुंपण; तट; कोट. ५ वळसा; फेरा (रस्त्याचा पर्वताभोंवतीं) ६ नृत्यांतील एक प्रकार, हावभाव. ७ वेढण्याचें वस्त्र; धोतर. [सं. वेष्टन] **वेष्टनीय**-वि. वेढण्यास, भोंवतीं गुंडाळण्यास, झांकण्यास योग्य. [सं.] **वेष्टा**-पु वेढा; घेरा. 'वेष्टा धनंजयाला आत्मयशें सत्य पांडवेष्टाया।' -मोद्रोण २.२०. **वेष्टित**-वि. वेष्टिलेला. **वेष्टी**-स्त्री. १ (तंजा.) धोतर; लुंगी. २ आंतडीं गोळा होणें. वेट पहा. 'हृदयीं कवळून जठरवेष्टी। होत असे मोहानें।' -नवनीत १४.६.

वेस-स्त्री. १ गांवकुसाचा दरवाजा; नगरद्वार. २ परसाचें, कुंपणाचें दार. ३ घराचें मोठें दार; दिंडीदरवाजा. ४ सरकारी पट्टी,

सारा भरणें (गांवचे दरवाजे लावून ती वसुल करीत यावरून). [सं. विश्] **वेशीं-वेशीवर-ला-स बांधणें-टांगणें**-मोठ्यानें सांगणें; जाहीर करणें; सर्वांना कळविणें. 'हें माझें वेड मी चवथ्या लेखांत जनतेच्या वेशीवर टांगलें आहे' -केआर्या १. **(दुखणें) वेशीस बांधणें**-आपली अडचण; आपत्ति जाहीर करणें. **०कट-ड**-स्त्री. कुंपणाच्या दाराची कवाडी, फाटक. **०कर-री**-पु. वेस राखणारा महार. (पूर्वी गांववेशीवर महारांचा पहारा असे). 'जोहार मायबाप जोहार। सारा द्यावया आलो वेसकर।' -तुगा ३३६. **०वाटी**-पु. (कों.) घर राखणारा मूळ पुरुष (सर्प), किंवा देवता. ही घराला भुताखेतांची बाधा होऊं देत नाहीं.

वेसंगणें—अक्रि. (व.) दुबळे होणें; व्यंग पावणें. 'म्हातारपणीं हातपाय वेसंगला तर कोण संभाळ करील?'.

वेसजी—स्त्री. १ शुद्धि. २ प्रकाश. 'जयाचेनि आंगिकें तेजें। आपो रविशशीचिये वणिजे। म्हणऊनि जग वेसजे-। वीण असे तया।' -ज्ञा ६.११०. [सं. विशुद्धि; प्रा. विसुज्झि]

वेसण-न—स्त्री. १ बैल, टोणगा इ० कांनीं स्वाधीन रहावें म्हणून त्यांच्या नाकांत ओंवलेली दोरी; नथणी. 'कीं नासिकीं वेसण घालून। महावृषभ करिती दीन।'. २ (ल) पकड; छाप; वर्चस्व. 'मालकाचें गुप्त व बारीक काम नोकराकडे आलें म्हणजे नोकराची गुप्त आणि बारीक वेसण मालकाच्या मर्मस्थानीं बसलीच.' -सत्वपरीक्षा ५८. ३ एक नाकांतला अलंकार-बुलाख. 'ल्याली वेसण साजिरी वसुमतीधीशात्मजा नासिकी।' -शशिसेना. ४ (कुस्ती) आपल्या जोडीदारास खालीं धरून आपलीं बोटें जोडीदाराच्या नाकपुडींत घालून वर ओढून जोडीदाराला चीत करणें. [देप्रा. अवयासिणी=नासारज्जू; तुल० गवेसण] **वेसणी**-स्त्री. वेसण अर्थ १ पहा. 'वेसणी घालीन, माझा। मनोरथ पुरवी।' -दा ३.३.४२.

वेसन-नी—व्यसन-नी पहा. 'वेसन गेलें निष्काम झालें नर नव्हे नारी।' -तुगा २९७. 'चाहाड वेसनी निग्रही।' -दा २.३.२७.

वेसवा—स्त्री. १ वेश्या; कसबीण. २ गरती असून व्यभिचार करणारी स्त्री. ३ (सामा.) छचोर, बेढंगी स्त्री. ४ (शिवी) निर्लज्ज स्त्री. [सं. वेश्या]

वेसवार—पु. १ दोन तीन प्रकारच्या डाळी, धने, हळद, मिरच्या इ० पदार्थ तळून किंवा भाजून भाजी इत्यादिकावर घालण्यासाठीं त्याचें जें कूट करतात तो मसाला. २ मेतकूट. ३ (कों.) कच्चा मसाला. 'मांस व वेसवार यांचीं पोटीसें वाताबुंदावर बांधावीं.' -योर २.२६१. [सं. वेशवार] **वेसवाराचें लोणचें**-न. मोहऱ्या, मेथ्या, हिंग, हळद इ० चें चूर्ण आंत घालून करतात तें लोणचें.

वेस्त-स्ती—वि. अव्यवस्थित; व्यस्त पहा. 'मूर्ख अभक्त वेस्ती। दरिद्र भोगिजे।' -दा १४.८.२; -दा १२.९.१. [व्यस्त] **०वेस्ता**-वि. अस्ताव्यस्त. 'परंतु येथील कारभार वेस्तवेस्ता.' -पेद १ ४३.

वेहकळी, वेहंकळी—स्त्री. एक लहान झाड; विकळी. 'सोवणी टाहकळी वेहंकळीं' -कालिका २२.१४.

वेहणें—अक्रि. (भिल्ली) राहणें. जिया हांकीं जीव खुस वेहतो.' -भि ३१.

वेहरण—न. आळ; दोष. 'यांणें टाकिली ममतामाया। मजवरी वेहरण आलें वाया।' -भवि ४.२१०. विहरण पहा.

वेहळा—पु. बेहडा, झाड व फळ.

वेहळा, वेहेळा—पु. ओढा; नाला; ओहोळ. वहाळ पहा.

वेहायली—स्त्री. लगामाचा एक प्रकार. -अश्वप १.१८५.

वेहाळ—स्त्री. उषःकाल. 'वेहाळीचे वारे वांतां।' -उषा ७३.२१.

वेळ—पुस्त्री. १ कालविभाग; काळ. २ आतांचा काळ व कांहीं कार्य होण्याचा काळ यांमधील अवकाश, अंतर. 'पेरे होण्यास अझून वेळ आहे म्हणून अधीं घरें शाकारून घ्या.' ३ फुरसत; न गुंतलेला, रिकामा वेळ. 'माझे पाठीसीं काम आहे वेळ सांपडल्यास येईन.' ४ अपेक्षित किंवा योग्य कालापेक्षां जास्त काळ; उशीर (क्रि० लावणें, लागणें). 'मला शाळेंत जाण्यास वेळ झाला.' 'वेळ लावला-ली, वेळ लागला-ली.' ५ (स्त्री.) समय; हंगाम; विशिष्ट काल. 'ही वेळ पोथी वाचावयाची नव्हे.' ६ दिवसाचा अर्ध भाग; सकाळ किंवा दुपार. ७ तीस घटिकांच्या (रात्रीं किंवा दिवसां) आठ विभागांपैकीं एक. अमृत, उद्योग, काळ (मृत्यु), चंचळ (चोर), रोग, लाभ, शुभ आणि स्थिर वेळ. यांखेरीज इतर पुष्कळ प्रकारच्या वेळा आहेत, उदा० अंधेरी-घोर-घात-राक्षस-वेळ, जाती-येती वेळ इ०. ८ मुहूर्त. ९ प्रसंग; संधी. -क्रिवि. वेळां पहा. 'तो दिवसास तीन वेळ जेवतो.' [सं. वेला] **०दवडणें**-व्यर्थ, निष्फळ वेळ घालविणें. **०मारून नेणें**-प्रसंगीं कमीपणा येऊं न देणें; युक्तीनें प्रसंग साजरा करणें; बाणी राखणें. 'केवळ शब्दामात्रें वेळ मारून न नेतां कृति करून दाखविली पाहिजे.' -निचं. **०वाहणें-बरें** किंवा वाईट होण्यास समय अनुकूल होणें. सामाशब्द- **०अवेळ**-स्त्री. उचित किंवा अनुचित, अनुकूल किंवा प्रतिकूल असा काळ, प्रसंग (विवक्षित कामाविषयींचा). 'वेळ अवेळ आहे चार रुपये जवळ अधिक असूं द्या.' -क्रिवि. वेळ किंवा अवेळ न पाहतां; वाटेल त्यावेळीं. 'वेळ अवेळ बाहेर जातोस परंतु एथें पिशाचांचा उपद्रव भारी आहे.' **०काळ**-पु. काळ.

वेळ पहा. (क्रि० येणें; जाणें; गुदरणें; पडणें; टळणें). **वेळा काळाला कामास येणें**–प्रसंगविशेषीं, अडीअडचणीला उपयोगी पडणें. **वेळणेवारचा, वेळणेवारी**–विक्रिवि. वेळेप्रमाणें; वेळेनुसार; वेळेच्या चांगल्यावाईट गुणांप्रमाणें व भाषा किंवा कृति याच्या प्रकारानुसार घडणारी (गोष्ट इ०). अनिष्ट परिणामाच्या, कृतीच्या, वचनाच्या प्रसंगीं योजतात. ' वेळणेवारचा उगाच तूं बोलतोस काय म्हणून. ' [वेळ आणि वार] **०(अ)नसार**–(वेळनसार) –वेळेनुसार पहा. **०नावारीं**–क्रि. बरीवाईट वेळ न पाहतां. वेळअवेळ पहा. **म्ह०** वेळ ना वारीं गाढव आलें पारीं. [वेळ+ना+वार] **०प्रसंग**–पु. काळकळा, बळकुबल, वेळअवेळ पहा. **०भर**–क्रिवि. १ सारा दिवस; वरचेवर. ' वेळ भर करसी वेरझारा धाक याचा वाटे मजप्रती। ' –होला ९८. २ अर्धा दिवस पर्यंत. ३ बऱ्याच वेळपर्यंत. **०मारणारा-मारया**–वि. समयसूचक; प्रसंगावधानी. **०वारीं**–क्रिवि. वेळेवारीं पहा. **०साधणारा-साधु**–वि. १ संधी साधून काम करणारा. २ वक्तशीर. **वेळा**–स्त्री. १ हंगाम; समय; विशिष्ट काळ. २ आवृत्तिवाचक गणनाकाळ. **वेळां**–क्रिवि. संख्याचक किंवा गुणवाचक उपसर्ग लावून आवृत्ति दाखविण्यासाठीं योजतात. उदा० एक–तीन–बहुत–किती–वेळां. ' एक वेळां सोसीन, दोन वेळां सोसीन, तिसऱ्यानें बोलशील तर तोंडांत खाशील. ' **वेळाईत**–वि. वेळेवर, संकटप्रसंगीं सहाय्य करणारा, मदतीस धांवणारा; कैवारी. –विउ ११.२८. ' तुका म्हणे देव भक्तां वेळाईत। भक्त ते निश्चित त्याचि यानें। ' –तुगा २२७५. [वेळ+आगत ? तुल० सिं. वेलाइतो= वेळेवर] **वेळापत्रक**–न. आगगाडया, आगबोटी, शाळा इ० च्या कार्याचा वेला दाखविणारा तक्ता. (इं.) टाईम–टेबल. **वेळाप्रकाशक**–पु. (गणित) पट दाखविणारी संख्या; वार संख्याक; गुणक. **वेळायित**–वेळाईत पहा. ' धावला राघव वेळायितु। ' –दावि १४३. **वेळावणें**–अक्रि. आबाळणें; वेळेवर गरजेच्या गोष्टी न मिळाल्यानें खंगणें (पीक, जनावर, मूल इ०). **वेळावेळ**–स्त्री. १ वेळअवेळ पहा. २ (क) विलंब; उशीर. ' तो अलीकडे वेळावेळानें येऊं लागला आहे. ' [वेळ+अवेळ] **वेळेन(नु)सार**–क्रिवि. १ वेळ, प्रसंग याला अनुसरून. २ वेळप्रसंगीं; कधींकधीं. **वेळेवारचा**–वि. वेळेवर असलेला. कधीं वेरेवाळचा असा अशुद्ध प्रयोग येतो. **वेळेवारीं**–क्रिवि. योग्य वेळीं; वेळ टळण्याच्या आधीं; वेळेचा अतिक्रम न होतां. ' तुला चाकरी सोडणें असल्यास वेळेवारींच सांग, नाहींतर आयते वेळेस फसवशील. ' **वेळोवेळां**–क्रिवि. १ वरचेवर; वारंवार. २ वेळ येइल त्याप्रसंगीं; प्रत्येक वेळीं. [वेळ द्वि.]

वेळ—स्त्री. एक वनस्पति.

वेळ—स्त्री. समुद्रकिनारा. वेल पहा.

वेळ—पु. वेळू पहा. **०अंवस**–स्त्री. पंढरपूर येथील कार्तिकी किंवा मार्गशीर्षी आवस. यादिवशीं वेणुनाद कृष्णाप्रीत्यर्थ नदीतील खडकावर लोक जेवतात. **०कट-कूट**–न कळकाचा तुकडा. [वेळू+काष्ट] **०काठी**–स्त्री. कळक; बांबूचा वासा. **०वन**–न. वेळूचें वन. ' यदुवंशाचीं वेळवनें। वनवावी असती। '–भाए ५३. **वेळवी**–वि. वेळूसंबंधीं. ' वेळवी वासा. ' ' वेळाचे वेल वाचे न वदवति जसे तें तसें वेळवांचे। ' –२ (गजेंद्रमोक्ष) ५४.

वेळ—न. (गो.) जीभ खरवडण्याची (सोनें–चांदीची) पट्टी.

वेळ—स्त्री. वळी (गंधादिकाची) ? ' ज्याच्या कपाळाची वेळ। सुर सकळ वांछिती। ' –भारा बाल ६.५६. [वळी]

वेळकोट—एळकोट पहा. ' किं वाचे वेळकोट बोलती। ' –वेप ९३.

वेळटी—स्त्री. (क) विळी. (°मराठेलोकांत प्रचार). [विळी अल्प]

वेळण—स्त्री. १ पेज. ' वेळिलें वेळण भाताचे। ' –ययादि १७.१३३. २ वेळवण–णी पहा. ' शेवया वळिल्या अतिकुसरी। असार वेळण सांडिलें दुरी। ' –एरुस्व १४.११३. **वेळणी**–स्त्री. १ वेळण काढण्यासाठीं केलेलें तव्यासारखें खोलगट पितळी भांडें. २ (व.) मडक्यावर झांकण ठेवण्याचें मातीचें भांडें. ३ झांकणी; वाढणी. ' कां घडे गाडगें वेळणी। ' –एभा १३.३२४. ४ वाडगा; थाळी. ' त्या सापापुढें दुधाचि वेळणी ठेउनि। आपण घरासि आला। ' –पंच ३.१४. [सं. विल्=आच्छादणें–वेलनी] **वेळणें**–उक्रि. १ (शिजलेला भात, भाजी इ० ची) पेज, पाणी निथळून काढणें. ' त्वरित परम तेथें भात हे वेळयेलें। ' –सारुह ६.७२. २ (कढाई) गव्हले, शेवया इ० उकळून हलक्या हातानें हालवून पाणी निथळून काढणें. ३ गाळणें **वेळवण-णी**–न. भाजी, डाळ, पुंरण इ० पदार्थ वेळून त्याचें जें पाणी काढतात तें. [वेळणें+पाणी. सं. वन=पाणी यापासून मराठी प्रत्यय]

वेळणें, वेळविणें-वेळावणें—उक्रि. (दुसऱ्या शब्दाशीं जोडून येतो) सईल सोडून हलविणें. उदा० डोई–मान–पाय–हात वेळणें. [सं. वेल्लन]

वेळबोंड-डी—न स्त्री. (प्र.) वेलबोंड–डी पहा.

वेळा-ळ-ला—स्त्री. दंडांत घालावयाचा एक अलंकार. ' दंडी वेळा वांकडया गुजऱ्याचा झणत्कार। ' –अफळा ५५. [सं. वलय; म. वाळा]

वेळा—स्त्री.अव. वेलची. एळा–ला पहा. ' लवंगा वेळांनीं समरसच रामा मुखरणी। ' –किंसुदाम ३८.

वेळा—स्त्री. १ समुद्रकिनारा. ' वेळा लंघुनि वेळही न लागतां, जाई त्वरें श्यामला। ' –आसेतु ५. २ मर्यादा; हद्द. ' दर्पसागरु वेळा। सांडूनि उते। ' –ज्ञा १६.३९३. [सं. वेला]

वेळाउळ–न. वेलाउळ पहा. मंदिर; गृह; मुख्य पेठ. 'तो जाण वेल्हाळ। ज्ञानाचें वेळाउळ।' –ज्ञा १३.३११; –ऋ ९३.

वेळिलवाणें—(चुकीनें) येळिलवाणें पहा.

वेळीप—पु. (गो.) गोव्यांतील एक हिंदु शेतकरी जात.

वेळू—पु. बांबू; कळक; वंश; बांस. [सं. वेणु; प्रा. वेलु] **म्ह०** बारा हात वेळू फिरतो आहे=मूर्तिमंत दारिद्र्य नांदत आहे. **०जाळ**–वेळूचें बेट. 'दैवें वायूच्या कल्लोळी। परस्परें वेळूजाळीं। स्वजाति कांचणी इंगळी। पेटली ते होळी वनाची करी।' –एभा १३.१८९. [सं. वेणु+जाल]

वै—स्त्री. कुंपण; वई पहा.

वै—स्त्री. (विणकाम) ओवी पहा. **०काठी**–स्त्री. वैची पट्टी; कांबटी.

वै—स्त्री. बहुल्या भोंवतीच्या मडक्यांची उतरंड. वही पहा.

वैकल्पिक—वि. १ ज्याविषयीं मतभेद आहे असा (मुद्दा, सिद्धांत). २ ज्याविषयीं विकल्प सांगितला आहे असा (नियम, विधि); ऐच्छिक. ३ अनिश्चित; संशयित. [सं.]

वैकल्य—न. १ वैगुण्य; पंगूपणा; अवयवाची मोडलेली, नासलेली, व्यंग पावलेली स्थिति. २ व्याकुळता 'देह वैकल्याचा वारा। झणें लागेल या सुकुमारा।' –ज्ञा ८.१३२. ३ अपूर्णता; कमतरता (धंदा, प्रयोग इ० तील). **०पूर्ण**–(सांकेतिक) '(राघोबादादा पेशवे) वैकल्यपूर्णाबरोबर जावेसें नव्हें' –ख १२७०. [सं.]

वैकळ—वि. (प्र.) वायकळ पहा.

वैकारिक—पु. (वास्तु) दाब; ताण. (इं.) स्ट्रेस. [? सं. विकार–वैकारिक]

वैकुंठ—पुन. १ विष्णु देवतेचें निवासस्थान; विष्णुलोक. 'तेणें वैकुंठा पासोनि विशाळें। मजलागीं केलीं राउळें।' –ज्ञा ९.३८९. २ विष्णु; कृष्ण. –ज्ञा ११.१८१. 'वैकुंठाच्या कंठीं घालूनि मिठी रडे पृथा आर्या।' –मोउद्योग ७.४४. [सं.] **०चतुर्दशी**–स्त्री. कार्तिक शुद्ध चतुर्दशी. **०नाथ-नायक**–पु. विष्णु. 'आतां यावरी तो वैकुंठनाथु।' –ज्ञा १.२७४; 'तोषोनि वैकुंठ नायक। वर दिधला अलौकिक।' –व्यं १०१. **०पीठ**–न. वैकुंठ पहा. 'नातरी वैकुंठपीठनायकें।' –ज्ञा १०.१८; 'तुका झालासे संतुष्ट। घरा आलें वैकुंठपीठ।' –तुगा ६७८. **०भवन**–न. वैकुंठलोक. 'वैकुंठभुवनीं देहासहित। नेला तुकया कलयुगीं।' **०वासी**–वि. १ विष्णूचें अभिधान. 'शेषशयना सार्वभौमा। वैकुंठवासिया निरुपमा।' –व्यं ५१. २ मृत्यु पावलेल्या विष्णुभक्तासंबंधीं कागदपत्रांत त्याच्या नांवापूर्वी लिहितात. **०समाराधना**–स्त्री. वधूपक्षानें वरपक्षास दिलेली मेजवानी.

वैकृत—वि. बदललेला (आकार किंवा घटना यांत). विकृत पहा; –पु. (वास्तु.) ताण; नेट. (इं.) स्ट्रेन.

वैक्रांत—न. एक रत्न; एक प्रकारचा हिरा. [सं.]

वैखरी—स्त्री. १ जिच्या योगानें शब्द बाहेर पडतात ती चतुर्विध वाणींपैकी चवथी; (परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी) स्वपरवेद्यवाचा. 'उच्चार होता अक्षराला। वैखरी बोलिजे।' –दा १७.८ २. २ वाचा; वाणी. 'फेडुनि जन्माची जवनिका। वैखरीयेतें करी वादका।' –भाए ६०४. ३ वाग्देवता; वाचाशक्ति. ४ जीभ. 'घातल्या मुखामध्यें प्रेमानें वैखरा। वाटतो आतां तो हृदयांतरीं खरखरा।' –प्रला २००. ५ भाषा. 'तुझें उदारत्व श्रीहरी। वदूं न शके प्राकृत वैखरी।'. [सं.]

वैगणें—न. (कों.) उन्हाळ्यांत होणारें भात. –कृषि १९०. वायंगण पहा.

वैगुण्य—न. १ गुणामधील फरक, विरोध; गुणधर्मांचा विरोधीपणा. २ व्यंग; उणीव; दोष. [सं.]

वै(वैं)णें—उक्रि. सुपानें पाखडून, घोळून जाडा–बारीक अंश वेगळा करणें. 'नंतर तो रवा वैचावा' –पाकशास्त्र २३. [सं. विच्+ल्यप् होणें] **वैचपाखड**–स्त्री. (व्यापकार्थी) घोळणें–प ■ णें [वैचणें+पाखडणें]

वैचंद■—स्त्री. (व.) एका कंदाच्या वाळलेल्या चकत्या. या तळून उपासाला खातात.

वैचक्षण्य—न. १ नैपुण्य; पारंगतता. २ संशोधनांतील प्रावीण्य. [सं.]

वैचा—पु. (जरतार धंदा) निरनिराळ्या आकाराचे व आकृतीचे जरीचे ठसे उमटविणें. [? वेंचा]

वैचित्र्य—न. १ विविधता; भिन्नता (रंग इ० ची.). २ विलक्षणपणा; आश्चर्य. [सं.] **०वादी**–वि. रम्यादद्भुत. (इं.) रोमॉन्टिक. –मनोरंजन मार्च १९१४ पृ. २८२.

वैज—पु (कु. कों.) वैद्य. [सं. वैद्य; प्रा. वेज्ज] **वैजी**–स्त्री. (गों.) १ स्त्रीवैद्य; डाक्टरीण. २ दाई; सुईण. 'तंव आणियेकु प्रबंदु करितु। दोघी वैजी होतिया देशांतु।' –स्विपु १.१५. १२. **०पण**–न. सुईणपण.

वैजयंती—स्त्री. १ काळी तुळस. २ एक फुलझाड. ३ विष्णूच्या गळ्यांतील माळ हींत पृथ्वी–आप–तेज–वायु–आकाश या पांच तत्त्वांचीं दर्शक नील, मोतीं, माणिक, पुष्पराज व हिरा अशीं पांच रत्नें असतात. –ज्ञा ११.६०३. 'परम विसळ जेयें वैजयंती विराजे।' –सारुह ८.११९. [सं.] **०माला–ळ**–स्त्री. वैजयंती अर्थ ३ पहा. 'वरी डोले वैजयंतीमाळ।'

वैजात्य—न. १ जातींची भिन्नता; वर्ग, प्रकार, तऱ्हा यासंबंधांत भेद. २ जात, प्रकार, तऱ्हा यासंबंधीचा परकेपणा. [सं.]

वैडालव्रतिक—पु. बोकेसंन्यासी; धर्मनिष्ठा, सद्गुण यांची बतावणी दाखवून मत्सर, लोभ, कठोरपणा करणारा. [सं. विडाल=मांजर+व्रत]

वैडुरी—पु. (महानु.) एक राजनीतिग्रंथ? 'बोधीला निज-वैडुरी उशनसी।' –गस्तो. [वैडूर्य?]

वैडूर्य—न. एक रत्न; नीलोत्पल. [सं. वैदूर्य]

वैण—पु. (गो.) वणवा. **वैणुचें**–अक्रि. (गो.) वणव्यांत सांपडणें.

वैणव—वि. बांबूचा केलेला; बुरुडी (कणगा, टोपला इ०) [सं. वेणु–वैणव]

वैतरणी—स्त्री. १ यमलोकची एक नदी. २ मृताला ही नदी तरून जातां यावें म्हणून उत्तरक्रियेच्यावेळीं ब्राह्मणास दान दिलेली गाय. ३ एक नदी. [सं.]

वैताग—पु. संताप, तिरस्कार यापासून वाटणारी विरक्ति; उद्वेग; वीट; त्यागबुद्धि (जग, जगांतील गोष्टी याविषयीं). (क्रि० घेणें, येणें). [सं. वै+त्याग] **वैतागणें**–अक्रि १ तिटकारा वाटणें; त्रासून जाणें. २ रागानें निर्भर्त्सना करून संबंध सोडण्याच्या गोष्टी बोलणें. वैतागून जाणें असा प्रयोग येतो.

वैताद—पु. (गो.) एकतृतीयांश तोळा.

वैतालिक—पु. प्रातःकाळीं गायनवादनानें राजाला जागा करणारा भाट, स्तुतिपाठक; बंदी. [सं.]

वैद—पु. (विटीदांडू) मराठी खेळातील सहावा डाव; हात दुणून कोंपरावर विटी ठेवून ती थोडी उडवून दांडूनें मारणें. [का. ते. अयिदु=सहा?]

वैद—पु. १ वैद्य (अप.). २ वैदू (नाकाडोळ्याचा). 'गदू नांवचा रे शब्दीं। मुझा संग्रह कीजे वैदीं।' –एरुस्व ११. ३६. [सं. वैद्य] **वैदू**–पु. १ जडीबुटी–वनस्पतींचीं औषधें देणारी, रानावनांत राहणारी एक भटकी जात व तींतील व्यक्ति. २ अडाणी, न शिकलेला वैद्य. [सं. वैद्य; ते. वैदू]

वैदर्भी—स्त्री. १ विदर्भकन्या रुक्मिणी. 'नवल वैदर्भीच्या भावो।' –एरुस्व ४.६७. २ (साहित्य) एक काव्यरीति. हींत समास बहुधा असत नाहींत व ही माधुर्याची व्यंजक आहे. 'वैदर्भी तशि मागधी स्फुरु आम्हा घेवोत रीती अशा।' –कमं १.२. [सं.]

वैदिक—वि. १ वेदासंबंधी; वेदापासून घेतलेलें, निघालेलें; वेदोक्त. २ वेदाध्ययनशील; वेद पढलेला (ब्राह्मण, पंडित). [सं.] (वाप्र.) **एकापेक्षां एक वैदिक**–प्रत्येकजण शहाणा (विद्वानांच्या सभेविषयीं निंदाव्यंजक प्रयोग) **वैदिकी**–वि. वैदिकाचा आचार, विधि इ० संबंधी; वैदिक पहा. –स्त्री. वैदिकाची वृत्ति, धंदा; वैदिकपणा.

वैदिक—स्त्री. (गो. अशिष्ट) वैद्यकी; वैद्यक. 'मी जाणती असे वैदीक।' –उषा २८.७. [सं. वैद्यक]

वैदुरा—स्त्री. बेदर गांव. 'वैदुरा नगरीं जन्म घेसी।' –गुच ९.३३.

वैदूर्य—पुन एक रत्न. वैडूर्य पहा. [सं.]

वैदृति—पु. १ भयंकर पोटशूल. २ वैधृति; एक योग.

वैदेह—पु. १ विदेह देशाचा. २ ब्राह्मण स्त्रीस वैश्यापासून झालेला मुलगा. 'उत्तम वर्णाची जे नारी। हीन वर्णाचा गर्भ धरी।...। तेचि संतति प्रसिद्ध। सुत वैदेह मागध।' –एभा २०. ३०–३१. [सं.] **वैदेही**–स्त्री. सीता.

वैद्य—पु. (विटीदांडू) वैद पहा.

वैद्य—पु. रोगावर आयुर्वेदानुसार औषधादि उपचार करणारा तज्ज्ञ; देशी डॉक्टर; धन्वंतरि. –वि. १ औषधी; वैद्यकासंबंधीं. २ वेदांसंबंधी. [सं.] **म्हं०** १ वैद्याचीं पोरें गाल गुंडानें मेलीं–स्वतःचा स्वतःला उपयोग नाहीं याअर्थी. २ वैद्याला वाटलें आणि संन्याशाला मुंडलें, कोणास समजत नाहीं **०क**–न. १ औषधीशास्त्र; वैद्याचें शास्त्र. २ औषधोपचारावरचा ग्रंथ, शास्त्र. [सं.] **०की**–स्त्री. वैद्याचा धंदा, व्यवसाय **०क्रिया**–स्त्री. शास्त्रोक्त औषधें, रसायनें इ० करण्याचें वैद्याचें काम. **०गिरी**–स्त्री. (व्यापक) वैद्यकी. **०नाथ**–पु. बारा ज्योतिर्लिंगांपैकीं मोंगलाईतील परळीवैजनाथ. **०राज**–पु वैद्याला सन्मानपूर्वक म्हणतात. **०वाणी**–पु. (व्यापक) औषधोपचार, इलाज. 'वैद्यवाणी कले फार। परि गुण नयेचि अणुमात्र।' **०शास्त्र**–न वैद्यक; औषधोपचाराचें शास्त्र. **वैद्योपचार**–पुअव. वैद्यकातील उपचार, इलाज. सप्तोपचार पहा.

वैद्युत—वि (शाप.) विद्युतासंबंधी; विजेचें. [सं.] **०अणु-अयन**–पुन विद्युदणु असलेला फिरत्या द्रव्याचा कण; विद्युद्विश्लेषणांत ध्रुवाकडे जाणारें मूलद्रव्य. (इं) आयॉन. **०विघटन-पृथक्करण-विश्लेषण**–न. विजेच्या साहाय्यानें पृथक्करण. (इं) एलेक्ट्रोलिसिस.

वैध—वि. विधीसंबंधी; संस्कार–नियम–पद्धत इ० विषयींचें. [सं.]

वैधर्म्य—न. गुणविभिन्नता; विजातीयता. याच्या उलट सामर्थ्य. 'त्याला दोन्ही सभांमध्यें स्थानदय अथवा वैधर्म्य काय दिसून येईल बरें?' –पारे २५३. [सं.]

वैधव्य—न. १ विधवापण. 'सौंदर्याला वैधव्याचा अलंकार सुद्धां करुण शोभा देतो.' –एक ६२. २ विधवेची अवस्था, दशा. 'क्षत्रियां रणीं पळोनि जाणें। तें कोण साहे लाजिरवाणें। कां वैधव्यें पाचारणें। महासतियेतें।' –ज्ञा १६ १७७. [सं.]

वैधृत-ति—पुस्त्री. पोटांतील भयंकर शूळ.

वैधृत-ति—पु. (ज्यो.) सत्ताविसावा योग. [सं.]

वैन—न. (महानु.) ज्ञान; बुद्धि.

वैनजाब(बि)ता—पु. दोषनिर्णयपत्रक. –राव्य ८.८.

वैनतेय—न. गरुड. [सं.]

वैनसें—न. वनसें पहा.

वैपरीत्य—न. १ विपरीतता; उलट प्रकार. २ वैमनस्य; स्पर्धा. [सं.]

वैपुल्य—न. समृद्धि; विपुलता; सुकाळ. [सं.]

वैफल्य—न. विफलता; निष्फलता; निरुपयोगिता; नापिकी; अनुत्पादकता. [सं.]

वैभव—न. १ ऐश्वर्य; थाटमाट; श्रीमंती. 'तैसी सर्व वृत्ति-वैभवीं। बुद्धिचि एकली बरवी।' –ज्ञा १८.३४८. २ प्रताप; महिमा; थोरवी. [सं.]

वैमत्य—न. मतांतर; मतभिन्नता. 'आगरकर व टिळक यांच्यातील वैमत्याचें ठोकळ स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.' –मनोरंजन, आगरकर अंक. [सं.]

वैमनस्य—न. १ विमनस्कता; उदासीनता. २ मानसिक व्यग्रता; मनाची चलबिचल, गोंधळ. ३ वैर; विरुद्धभाव. [सं.] **वैमनस्व**-वैमनस्याचा अपभ्रंश.

वैमात्र, वैमात्रेय—वि. सावत्र; वेगळ्या आईच्या पोटचा (भाऊ) स्त्री-रूप वैमात्री, वैमात्रेयी (=सावत्र बहीण) अस होतें. [सं.]

वैमानिक—पु. विमान चालविणारा; विमानविद्येंत प्रवीण. –वि. विमानासंबंधी; विमानाचें (शिक्षण इ०). [सं.]

वैमुख्य—वि. (चुकीनें) विमुख पहा.

वैयधिकरण—न. निरनिराळ्या विषयांचें, आधारांचें इ० अधिष्ठान, अस्तित्व; व्यधिकरणत्व. [सं.]

वैयर्थ्य—न. व्यर्थत्व; वैफल्य पहा. [सं.]

वैयाकरण—पु. व्याकरणशास्त्री; व्याकरणतज्ज्ञ. –वि. व्याकरणासंबंधी (प्रक्रिया, इ०). [सं.] **वैयाकरणी-णीक**–पु. (चुकीनें) वैयाकरण पहा.

वैयात्य—न. उद्धटपणा; निलाजरा धीटपणा. [सं.]

वैयी—स्त्री. (सामा.) वई, वै पहा.

वैर—न. शत्रुत्व; वैमनस्य; प्रतिकूल भाव. [सं.] **म्ह० जळांत राहून माशासीं वैर. ०उगविणें**–सूड घेणें. **०चाळणें**–शत्रुत्व करणें. 'हे देहमासीं। वैर चाळी अहर्निसीं।' –भाए ५०६. **०निर्यातन-प्रतिक्रिया**–नस्त्री. अपकाराचा अपकारानें प्रतिकार; सूड. **०फेरा**–पु. शत्रुत्व; द्वेष. 'जे चालवीती तुज वैरफेरे। वैरी असे ते सुख पावले रे।' –अक २. –हरिराजकृत रामायाचें भाषांतर १३. **०भाव**–पु. द्वेष; शत्रुत्व. **०शुद्धि**–स्त्री. प्रत्यपकार; वैरनिर्यातन; सूड. **वैराचार**–पु. (काव्य) १ शत्रुत्व; द्वेष. २ वैर प्रगट करणें. 'जनकें केला वैराचार.' **वैराडा**–पु. (महानु) वैरी; शत्रु. 'हा काळु उघडा। जगीं वैराडा।' –भाए ५२०. **वैरिणी**–स्त्री. वैर, द्वेष करणारी स्त्री. **वैरी**–पु. शत्रु; ज्याच्याशीं वैर असतें तो माणूस. 'वैरी जालियाही आर्तातें। न वंचणें जें कां।' –ज्ञा १६.८६. –वि. विरुद्ध; शत्रुसंबंधी. **वैरोद्धार**–पु. सूड घेणें, उगविणें. (क्रि० करणें). [वैर+उद्धार]

वैरक्त्य—न. विरक्ति. [सं.]

वैरंगिक—पु. इंद्रियनिग्रही तपस्वी. [सं.]

वैरण—स्त्री. लग्नांत नवरीमुलीच्या ज्या दोन चिरडया असतात त्यांपैकीं जी अंगावर घ्यावयाची असते ती. दुसरी नेसू असते. –न. पांघरण्याचें वस्त्र; शेला. 'उत्तम वैरणें विराजत।' –वेसीस्व ९.१४५; –मुसभा १०.९. [सं. आवरण] **वैरण्य-गांठ**–स्त्री. वधूवरांच्या पांघरण्याच्या वस्त्रांची गांठ. 'वैरण्यगांठी वधुवरा।' –वेसीस्व १०.८६. [वैरण+गांठ]

वैरण—स्त्री. १ गुरांसाठीं चारा; ओलें गवत, वाळलेला कडबा इ०. २ गोठ्यांतील चारा घालण्याची जागा; गव्हाणी.

वैरण—नस्त्री. १ दळण्यासाठीं जात्याच्या पाळींत, भाजण्यासाठीं खापर, कढई इ० कांत किंवा कांडण्यासाठीं उखळांत एक वेळ घालतात तें धान्य; वैरा. 'पृथ्वी तेंचि उखळ जाण। नांगरें वीर घाली वैरण।' –एरुस्व १०.६०; 'पसेवरी वैरण घातलें। तांतडीनें जातें वोडिलें।' –दा १८.५.८. २ (सामा.) भर; पुरवण. 'कां ताथुवाचां ताणां। ताथु घालिता वैरणा। तंतु तोचि विचक्षणा। होय पट।' –माज्ञा १८.३६०. (आडवा धागा, बाणा)–बंज्ञा. [? सं. वि+ईर्=फेंकणें] **वैरणें**–न १ वैरण अर्थ १ पहा; वैरा. 'कीं दळावेआं पृथिवीचां जातां। काळरात्रीं वैरणें घातलें मज पांतां।' –शिशु १०४४. २ ज्यांतून जातें, उखळ इ० कांत वैरण घालतात तें भांडें. –उक्रि. १ शिजणें, भाजणें, दळण इ० कारणासाठीं तपेलें, खापर, जातें इ० कांत धान्य ओतणें, घालणें, ओयरणें. २ (ल.) लोटणें; ढकलणें (निदार्थी प्रयोग). 'आपली मुलगी अशा ठिकाणीं वैरलीत.' –माझी कहाणी ५. ३ (सामा.) अर्पण करणें; देणें. 'झाला द्रुपदमदातें स्वशर शिखिमुखांत वैरिता पार्थ।' –मोआदि २५.१४. **वैरा**–पु. १ एका वेळचा (डाळ, तांदूळ, इ०चा) शिधा; ओयरा. २ स्वयंपाकाचें साहित्य (चुलीपुढें ठेवलेलें). (वाप्र.) **मणाचा वैरा घरीं असणें**–मोठें कुटुंब, परिवार असणें.

वैरल्य—न. १ विरळपणा (वस्त्रांतील धाग्यांचा); वीण घट्ट नसणें. २ मनमोकळेपणा; ढिलेपणा (स्वभावाचा). ३ सैलभोंगळपणा (कारभाराचा). ४ (ल.) दुर्भिक्ष; टंचाई; कमतरता. [सं.]

वैरस्य—न. १ नीरसता; रसहीनता; शुष्कपणा. २ (ल.) कोरडेपणा; फिकेपणा; पाणचटपणा. विरस पहा. [सं.]

वैरागर—न. १ हिऱ्यांची खाण. ' वैरागरापुढें ठेविली गार। क्षीराब्धीपुढें ठेविलें तक्र।' –रावि ३४.१६७. २ (सामा.) रत्नांची खाण. ' सभाग्यें खणितां वैरागर । रत्नांहूनि रत्नें परिकर।' –कथा १.१२.१. ३ (ल.) खाण; सांठा. ' ऐकें त्रैलोक्य सुंदरा । सकळ सौंदर्य वैरागरा।' –एरुस्व ४.४. ४ स्पर्शमणि; चिंतामणि; स्पर्शानें हिरा करणारा मणि. –एभा १२.२१०. ' वैरागर मणि पूर्ण तेजाचा होय। भेटल्या हरळ हिरा करीतचि जाय।' [सं. वज्राकर ?]

वैरागी—पु. १ संन्यासी; साधु; वैराग्य प्राप्त झालेला पुरुष. २ बैरागी; धर्माच्या नांवानें भिक्षा मागणारा. ' आधार वाटला वैरागी प्रति।' –दावि १६६. [सं. वि+राग] **वैराग्य**–न. १ प्रापंचिक इच्छा, आकांक्षा यांपासून निवृत्ति; अनासक्ति. ' तरी वैराग्याचेनि आधारें। जिहीं विषय दवडूनि बाहिरें।' –ज्ञा ५.१५१. २ वैषयिक सुखांचा त्याग करणें; विषयाचा कंटाळा. ' बुजली वैराग्याची वोरप । जिराली मनाची धाप काप।' –ज्ञा १७.२३१. [सं.] **०पर**–वि. वैराग्याचें प्रतिपादन करणारें; वैराग्यबोधक. ' शृंगाररसाच्या भोक्त्यांना वैराग्यपर अर्थ कसा रुचणार ? –मतिविकार ५७. **०माला**–स्त्री. वैराग्याची माळ. **०माला घेणें, वैराग्यमालेंत पडणें**–संसारत्याग करून बैरागी होणें.

वैराट्—वि १ ब्रह्मयानें उत्पन्न केलेल्या विराटपुरुषासंबंधी. २ विराट् राजासंबंधी. ३ वांई गांव–प्रांत यासंबंधी. [सं. विराट] **म्ह०** वांयीं वैराट बोली सैराट.

वैराण–ळ—पु. एक जात व तींतील व्यक्ति. हे लोक कांकणें इ० विकतात. लावण्या–पोवाडे आणि बायकी बोली यांतून हा शब्द येतो.

वैराण–न—वि. १ ओसाड; उजाड; पडित; उध्वस्त. ' सरकारचे फौजेचे जातांयेतां तीन मुक्काम जाहले, त्यामुळें गांव लुटले, व घरें जळालीं; सबब गांव वैराण जाहालें.' –वाडसमा १.९. २ (भूगोल) वालुकामय; निर्जल (प्रदेश).[फा. वैरान्. तुल० सं. विरिण=शून्य] **वैराणी–नी**–स्त्री. नासाडी; ओसाडी; गैरआबादी. ' त्या मुलखाची दशा आबादी वैराणीची काय पहावी? ' –ऐटि ५.११. [फा. वैरानी]

वैरूप्य—न. विरूपता; विद्रूप आकार, घाट. [सं.]

वैल—पुन. चुलीचा बाजूचा भाग; अवेल पहा. [सं. विलग; म. वायला ?] **०चूल**–स्त्री. वैल असलेली चूल.

वैलंडी, वैलांडी—वेलांडी पहा.

वैलक्षण्य—न. १ विलक्षणपणा; विचित्रपणा; नेहमीच्या गुणाहून, प्रकाराहून वेगळा गुण. २ वेगळेपणा; भिन्नता. [सं.]

वैला—वि. वरच्या, बाहेरच्या बाजूसंबंधी. [वरला; गो. वैलों] **वैलाटी–ठी**–स्त्री. वरचा प्रदेश; उंचावरचा भाग. वलाटी.

वैलोम्य—न. विलोमता; विरुद्धपणा. [सं.]

वैवंथणें, वैवंतणें—उक्रि. निकड लावून त्रास देणें; खनपटीस बसणें.

वैवर्ण्य—न. १ रंग अगदीं खराब होणें. विवर्णता. २ गुणधर्मांत भेद; विजातीयता. [सं.]

वैवस्वत—पु. चालू मन्वंतराचा अधिकारी; सातवा मनु. विवस्वानाचा पुत्र. [सं.]

वैवाट, वैवाटणें, वैवाटदार—(प्र.) वहिवाट इ० पहा.

वैवाडा—पु. (कों.) घराभोंवतालचें परूस; वई–वयवाडा पहा.

वैवाहिक—वि. १ विवाहासंबंधी. ' तो मी आज पुरोहितत्व करितों वैवाहिकें मंगलें।'. २ नवराबायकोसंबंधाचा; दांपत्यधर्माचा. [सं.] **०हक्क**–पु. नवरा किंवा बायको म्हणून वागणूक ठेवण्याचा हक्क. (इं.) कॉन्जुगल राईट. ' वैवाहिक हक्कानें वर्तणूक करावयाला लावण्याचा हक्क कोर्टास दिला आहे ' –टिले ४.८९.

वैव्हानी—स्त्री. (महानु.) आवाहन; जमवाजमव (सैन्याची). ' करितां झाला वैव्हानी । चातुरंगांची।' –शिशु ७३०. [सं. आवाहन]

वैशद्य—न. १ स्पष्टपणा; साधेपणा; विशदपणा (भाषा इ० चा). २ मोकळेपणा; विस्तार (जागा, भांडें इ०चा). [सं.]

वैशाख—पु. चैत्रादि महिन्यांतील दुसरा महिना. [सं.] **०रेचित(अंगहार)**–पु. (नृत्य) सर्व शरीर रेचित करणें, हात अपविद्ध करणें आणि आखंडलस्थान करणें, नंतर शरीर उंच करून कटिहस्त व कटिच्छिन्न हीं करणें. **०रेचित(करण)**–न. हातपाय रेचित करणें; मान व कंबर रेचित करणें; व दोन्ही पाय वांकडे करून त्यांचीं बोटें दोन्ही बाजूंस होतील अशीं पावलें आडवीं ठेवणें. **०स्थान**–न. (नृत्य) दोन्ही पाय वांकडे करून आडवे ठेवणें, म्हणजे त्यांचीं बोटें समोर न राहतां डाव्या व उजव्या बाजूस जातील. चक्र सोडणें वगैरे गोष्टी या स्थानांत उभें राहण्यानें सूचित होतात. **०स्नान**–न. चैत्री पौर्णिमेपासून वैशाखी पौर्णिमेपर्यंत वसंतमाधवप्रीत्यर्थ प्रातःस्नान करणें; असें व्रत. **वैशाखा**–स्त्री–वि. वैशाख महिन्यासंबंधी. **वैशाखी**–स्त्री. वैशाखांतील पौर्णिमा.

वैशिष्ट्य—न १ निराळा गुण, विशेषता. २ भिन्नता; फरक; निराळेपणा; पृथकपण. ३ (सामा.) बाळगण्याचा, धारण करण्याचा गुण. [सं.]

वैशी—स्त्री. (कु. कुण.) नशीब; दैव 'आमची वैशीच म्हणून आम्हांला हातीं घेतलेल्या प्रत्येक कामांत अपयश येतें.'

वैशीक, वैसीक—वि. (महानु.) वश करणारा. 'ओळखिजा वैशीक।' –भाए ७४६. 'वैशीकाचा पासी हे बांधौनि उपासी।' –भाए ७५१ [सं. वशीकृ]

वैशेषिक—न. षड्दर्शनांतील एक मत; कणादमत. 'विशेष' म्हणून एक नवीनच पदार्थ मानून कणादाने त्यास या दर्शनात महत्त्व दिलें आहे. –पु. वैशेषिक मताचा अनुयायी. 'यांचा (गुणांचा) विनाश हाचि मोक्ष। ऐसा वैशेषिकांचा पक्ष।' –विउ ३.५. [सं.]

वैशेष्य—न. १ निराळेपणा; विशिष्टपणा. २ अलौकिकत्व; अत्युच्चता. [सं.]

वैश्य—पु. १ हिंदूंच्या चार वर्णांतील तिसरा, व्यापारी उदीमांचा वर्ग. –ज्ञा ९.४६०. २ या वर्णांतील व्यक्ति; व्यापारी; वाणी. 'वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार।' –तुगा २३३१. ३ एखाद्या वस्तूचे गुणानुक्रमानें चार प्रकार कल्पिले असतां त्यांतील तिसरा प्रकार दर्शविण्याकरितां हा शब्द योजितात. उदा० वैश्य–हिरा–भाग–सबजी–पिंपळ–इ०. [सं.]

वैश्य—वि. वश (अप.). 'करी रे मला वैश्य ते रामकांता।' –राक १.१४. [सं. वश]

वैश्वदेव—पु. रोज भोजनापूर्वी अग्नीला आहुती देण्याचा विधि; पंचमहायज्ञांपैकीं एक यज्ञ. [सं.]

वैश्वानर—पु १ अग्नि. 'मग लागलिया आगी कापुरा। ना काजळी ना वैश्वानरा।' –ज्ञा १५.४३९. २ एक औषधी पाक. [सं.]

वैषम्य—न १ विषमता; द्वैत. 'पार्था जयाचिया ठायीं। वैषम्याची वार्ताचि नाहीं। रिपुमित्रां दोहीं। सरिसा पाडु।' –ज्ञा १२.१९७. २ एकसारखेपणाचा अभाव; कमजास्तपणा. 'नाना कळावैषम्ये चंद्रु। कां सांडिला आधीं नरेंद्रु।' –ज्ञा १७.२६. ३ अनियमितपणा; असमता. ४ विरोध; विषमभाव; अननुकूलता. ५ दुःख; मत्सर; हेवा. 'प्रेम असतें तेथें वैषम्य असलें तरी तें नाहींसें होतें; परंतु वैषम्य असलें म्हणजे आधीं असलेलें प्रेमहि विलय पावूं लागतें.' [सं.]

वैषयिक—वि. विषयासंबंधी (सुख इ०). विषय पहा.

वैष्णव—पु. विष्णुभक्त 'शैव यासी म्हणती सदाशिव। वैष्णव भाविती रमाधव।' –ह ३४.१७७. २ विष्णुभक्तिसंप्रदायाचा अनुयायी. याच्या उलट शैव. –वि. विष्णूसंबंधीं; विष्णूचें. 'ऐसी गीता वैष्णव प्रासादु।' –ज्ञा १८.४९. [सं.] ०संप्रदाय–पु केवळ विष्णूची निरनिराळ्या स्वरूपांत उपासना करणारा एक धर्मपंथ. ०स्थान–न. (नृत्य) एका पायाची मांडी किंचित् वांकडी करून पाय ताठ ठेवणें, दुसरा पाय जमिनीपासुन किंचित् उचललेला व बोटें बाजूस वळलेला असा पहिल्या पायापासून अडीच ताल अंतरावर ठेवणें, कमरेवरील भाग सरळ ठेवणें. अशा प्रकारें उभें राहण्याची तऱ्हा. नमन, अश्वारूढ होणें, ह्या गोष्टी ह्या स्थानांत उभें राहाण्यानें सुचित होतात. **वैष्णवास्त्र**–न. पिशाचास मारक असें अस्त्र; विष्णुसंबंधीं अस्त्र. 'कर्णकुमारें जाणोनि अतिसत्वर। वैष्णवास्त्र सोडिलें।' –जै ५.४४५. **वैष्णवी**–स्त्री एक मातृका. –वि. वैष्णवासंबंधी (आचार इ०). 'अनुष्ठान विधिमंत्र उपासना। सांगेन ते धारणा वैष्णवीची।' –ब २.९. **वैष्णवी भात**–पु वैष्णवांच्या गंधाप्रमाणें (वरती अक्षता (कच्चा), मध्यें गोपीचंदन (मऊ) व खालीं रक्षा) झालेला भात.

वैससें—वनसें पहा.

वैसा—पु. (प्र.) वयसा. आयुष्य, वय. [सं. वयस्]

वैस्वर्य—न. १ स्वराचा बेसुरपणा. २ बेतालपणा. [सं.]

वो—या अक्षरानें आरंभ होणारे शब्द काव्यांतून व इतर लेखांतून जरी येतात तरी 'ओ' या अक्षरानें आरंभ होणाऱ्या शब्दापुढें त्यांचे अर्थ दिलेले आहेत. देशावर व अशिक्षित गांवढळ लोकांच्या तोंडी 'वो' नें आरंभ होणाऱ्या शब्दांचा विशेष प्रचार असला तरी 'ओ' रूप जास्त शुद्ध आहे. तेव्हां वोकणें, वेक्ती, वोखटा इ० शब्द 'ओ' नें आरंभ होणाऱ्या शब्दखालीं पहा. वौ साठीं औ पहा.

वो—उद्गा. ओ! हांकेला उत्तर. –मोउद्योग ८.९९. 'भाविकासि दे वो बाहतांचि।' –दावि २७७.

वो—ओम् (अप.). 'वो नमो विश्वभरिता।' –ख्रिपु १.१.१.

वो—अ. आदरार्थी संबोधन (स्त्रीपुरुषांस); अहो (काव्यांत उपयोग). जयजय वो शुद्धे।' –ज्ञा १२.१. 'कैसिया वो तुम्हीं शिहाणियां।' –शिशु ६५; (अगे) 'तूं कोण वो गोरटी।' –मुआदि ३७.४१.

वोइरणें—उक्रि. वैरणें पहा. 'मन स्वप्नाचें काबाड। वोइरी निद्रा।' –ज्ञा १८.५४०; –भाए ७०४. ओइरणें पहा.

वोक—स्त्री. ओक, ओकारी पहा. 'पोटीं नडतां मळमूत्र वोक। तरी मरोन जाती सकळ लोक।' –दा ३.१.२६. **वोकणें**–ओकणें पहा. 'नकळत पतिताचें खादलें अन्न वोकी। तरि पतित नव्हे तो' –वामन भरतभाव. **वोकारा**–पु. वांति, ओकारा पहा.

'तयेच्या देखोनिया वस्ना। रावणा आला वोकारा।' –कथा ६. १७.५२.

वोंकार—पु. ओंकार. ओम् पहा. 'शब्द मौनाचा विचार। म्हावया मूळ वोंकार।' –दा ६.१०.३२.

वोख—वि. वाईट; वोखट पहा. 'नाठवी कव्हणाचें वोख चांग।' –गीता १२.७७२. 'तोही विषमत्व सूर्य तपणें। अनुराग वोखा।' –ज्ञाप्र २४२. **वोखट-टा-टें**–वि वाईट. ओखट पहा. 'देवा बहुती परी पाहतां। एथ वोखटें होईल झुंजतां।' –ज्ञा १.२०९; 'वोखटा तरी मी विटलों देहासी।' –तुगा २१३९.

वोखत—पु. (भि.) वेळ, वखत पहा.

वोखद—न. औषध पहा. –ज्ञा १७.६२. 'वोखदीसी पाप न मिळें पाहाता।' –ब ४६०.

वोखारणें—अक्रि. (व.) रागावणें.

वोगडचें—अक्रि. (गो.) गहाळ होणें. **वोगडावचें**–उक्रि. (गो.) उधळणें; हरविणें.

वोगमान—पु. मानपान. 'व्याही जांवइयासी वोगमान। धनलोभें जाण कदा न करी।' –एभा २३.९७.

वोगर—पु. वाढलेलें अन्न; मूद; वाढप. ओगर पहा. 'आत्मबोधाचिया वोगरां। पुरे न म्हणेचि धनुधैरा। आरोगितां।' –ज्ञा ४.१०७. 'वोगर वोगरिती अष्टदशा पक्वान्नें।' –धवळेपू ५३. [का. ओगर=भात. तुलo सं. अवगृ] **वोगरणें**–सक्रि. वाढणें; ओगरणें पहा. 'अन्न सुरस निपजलें। नेऊनी रोग्या वोगरिलें।' –ब ६१०.

वोंगळ—वि. घाणेरडा. ओंगळ पहा. 'नकळे ओंगळा उपदेश।' –तुगा ५७४१.

वोगो—पु. (कु.) कलम करण्याकरितां योजण्यांत येणारी आंब्याची फांदी.

वोघ—पु. ओघ पहा. १ पाट; ओहोळ. 'जरी सरिता वोघ समस्त। परिपूर्ण होऊनि मिळत।' –ज्ञा २.३५८. २ ओघळ; पाट. 'पात्रें भरूनि जाती वोघ।' –वेसीस्व १२.९४. ३ क्रम; रूढी. 'वोघ मागला क्वचित जरी असतां तरी हृदयीं भेतें।' –होला ९६. [सं. ओघ] **वोघणें**–वाहणें. 'प्रारब्ध मंदराचळाची सरिता। वोघ वोघील आतांची।' –नव २.३५. **वोघें**–क्रिवि. सहज; ओघानें. 'कां वाटे जातां वोघें। कल्हातांही डोळा लागे।' –ज्ञा १४.१८८.

वोघरणी—स्त्री. फोडणी; ओघरणें पहा. 'तक्रा दिधली वोघरणी।' –सुवन १०.१३२. [का. ओग्गरण=फोडणी]

वोचकणें—वचकणें पहा. 'ब्रह्मादिका जो हरि वोचकेना।' –सारुह ५.३६.

वोज—स्त्री. १ रीत; मार्ग. 'तेजाची वोज दावित। इंद्रनीला।' –ज्ञा ११.६००. २ चांगली रीत; व्यवस्था. 'जेणें मद्भक्त पूजिले वोजा।' ३ चांगुलपणा. [सं. ओजस्; ऊर्जा–उज्जा–वोजा. –भाअ १८३३; तुलo का. ओजे=व्यवस्था]

वोजा–वि. चांगला. 'सूर्यैअस्तु हा समय वोजा।' –क्रिवि. १ व्यवस्थितपणें; चांगल्या रीतीनें. 'तया बैसवी आसनीं राम वोजा।' –माधवरामायण अयोध्या ४६. 'अमर करिती कृष्णपूंजा। तैसीया वोजा पूजी द्विजा।' –एरुस्व ३.२४. २ सहज; सोप्या रीतीनें. 'कैसें बंधन तोडिजेल वोजां।' –विपू १.९५. ३ संवयीनें. 'प्रवर्ते वोजा श्वान जैसा।' –रंयोवा १.६९७. **वोजावणी**–स्त्री. रीत; वोज. **वोजावणें**–क्रि. १ रीत, मार्ग दाखविणें; सुव्यवस्थित करणें. 'दाऊं वेल्हाळे देशी नवी। जे साहित्यातें वोजावी।' –ज्ञा १३.११५६. २ नीट होणें; सांवरणें. 'ऐसा अतिबळु संग्रामु झाला। न दिसे कोण्ही वोजावला।' –कालिका २५.१५. **वोजें**–क्रिवि. वोजा पहा. नीटपणें. 'पांचहि प्रलय वोजें। तुज निरूपिलें।'.–दा १०.५.२८.

वोजणें—अक्रि. (महानु.) आचरणें; वागणें. 'मायेबहीनी वोजती ते तुम्ही वोजा.'

वोझें—न. ओझें पहा. 'माथां प्रपंचाचें वोझें। घेऊनि म्हणे माझें माझें।' –दा ३.१०.६. **वोझेल-ला**–वि. ओझें वाहणारा; ओझेल. 'भांडयादि वोझेला बैल उष्ट्र।' –दावि ४०१.

वोटंगण—न. आश्रय; टेंकण. ओठंगण पहा. **वोटंगणें**–क्रि. आश्रय करणें; अवलंबून राहणें. ओटंगणें पहा. 'आम्हीं तनुमनु जीवें। तुझिया बोला वोटंगावें। आणि तुवांचि ऐसें करावें। तरी सरलें म्हणे।' –ज्ञा ३.१२. **वोटिंगण**–न. लोड; गिर्दी; वोटंगण, ओठंगण पहा. 'मृदुमवाळ वोटिंगणें।' –मुआदि ४८. १७. **वोठंगण, वोठांगण**–न. लोड. ओठंगण पहा. 'वोठांगणें गादिया तेजाळ।' –पांप्र ५१.११२. **वोठंगणें**–क्रि. टेंकणें; आश्रय करणें. ओटंगणें पहा.

वोटी—स्त्री. ओटी पहा. 'तथापि मागे पसरून वोटीं।' –सारुह १.१३.

वोठ—पु. ओठ पहा. –एभा ३.३९२. 'सीतें वोठ तरकती।' –दा ३.७.२३.

वोड-ढ—न.स्त्री. १ त्रास; आपत्ति; ओढ पहा. 'हें वोड ये काय यिच्या कपाळा।' –सारुह ८.२. २ तीव्र इच्छा; ओढा. 'अवघियांची वोढ कीं बिजेसिंग यांचें पारिपत्य करावें?' –भाव १६. ३ ओढ; खेंचणी. 'जन्ममरणांचियां वोडी। नाना दुःखांचिया कोडी।' –एभा २.४७१.

वोडउ—वोडव पहा.

वोडगस्त—वि. ओढगस्त पहा. 'अभिमानी आणि निसंगळ। वोडगस्त आणि खळ।' –दा २.३:१८.

वोड(ढ)ण—न. ढाल. –ज्ञा ९.४९१. 'येतां वैरियाचें शस्त्र। वोडण पुढें करावें।' –रावि २७.६५; 'माझ्या देहाचें वोढण। आड असतां तुम्हां विघ्न। स्वप्नींहि परि नाहीं जाण।' –मुरंशु ९. [ओढणें]

वोडंबर—न. अवडंबर, आडंबर पहा. १ डोलारा. 'रावण गर्वाचें वोडंबर। त्रिभुवन धनुष्य केला चूर।' –वेसीस्व ४.१०३. २ मिथ्या भास. 'प्रपंचाचे वोडंबर।' –एभा २८.२८४. ३ दंभ; ढोंग. **वोडंबरी**–स्त्री. गारुडविद्या; जादूगिरी. –अमृ६.३२. 'मनुष्याची गौड विद्या। राक्षसांची वोडंबरी विद्या।' –दा १०. ४.३४.

वोडव—न. मोटेचें चाक. 'तेथेंही मोट फुटे कां नाडा तुटे। वोडव पडे बैल अवचटे।' –एभा ११.१५३२. [ओढणें]

वोडव—स्त्री. योग्यता. 'तेही अधिकाराचे वोडवेविण। काय सिद्धि जाय।' –ज्ञा ६.३३९. –पु. आदरसत्कार. –ज्ञा १३. ६३७. –वि. नृत्याचा एक प्रकार. 'वोडव तांडवाची कुसरी। लाविये‌ली यंत्रकारी।' –कथा ३.८.५८.

वोडव—पु. (महानु.) उद्गार; अवतरण. 'तो अळाप करी परावाचा। वोडवो वोडवी नवारसाचा।' –आदिपर्व (कृष्णदास) १.२.

वोडवणें—अक्रि. ओढवणें पहा. –अक्रि. १ प्राप्त होणें; येणें. 'किं निवृत्तिचा थळिळं। वोडवला तो।' –भाए२५१. –तुगा २४८. २ अंगावर येऊन पडणें. –एभा १.३६०. –सक्रि. १ पुढें करणें. –ज्ञा ९.१५. 'राज्य सांडून हात भिकेला। वोडवी तो लोकासी।' –नव १८.३९. २ घेणें. 'मुखींच्या तांबुला। वोडविलें करकमळा।' –कथा १.२.१७३. [ओढणें; तुल० का. ओडु=पुढें ठेवणें, करणें]

वोडवन—स्त्री. (महानु.) मांडणी; रचना. 'प्रमेयाची वोडवन।' –भाए १२.

वोडसें—न. (कों.) मोठा कोयता.

वोडियाना—पु. एक मुद्रा; उड्डियानबंध. 'आणि स्वधिष्ठाना वरौतें। नाभिस्थानाचिया हडौतें। बंदु जो आरोपे त्यातें। वोडियाना बोलिजे।' –स्वानु ९ ४.६६; –अपरोक्षानुभव ११. ८३. [सं. उड्डीयान]

वोडौ—पु. (महानु.) रसपरिपाक? वोडव पहा. 'हा संवादु श्रीकृष्णोद्धवाचा। मियां बोलिला प्राकृता वाचा। परि वोडौ सुकोक्तीचा। ठाको नेदी।' –भाए ८२४.

वोढक—वि. १ ओढक पहा. २ ओढगस्त. 'वोढक म्हणवून घ्यावें असा प्रसंग पडला.' –ख ४७६३. [ओढणें]

वोढणी—स्त्री. ओढणी पहा. 'वोढणी जरी बादली.' –वाडसमा १.३७.

वोढणें—उक्रि. ओढणें पहा. १ आकर्षिलें जाणें; जवळ येणें. 'लोक सहजचि वोढे। कामासाठीं।' –दा १४.६.२२. २ उपसणें. 'शस्त्रें वोढती भरार।' –दावि ३९६. ३ जवळ घेणें. 'संसारकृत्यीं तुजला नवोढे। त्या वल्लभावांचुन कोण वोढे।' –सारुह ७. २३. **वोढव(वि)णें**–ओढवणें, वोडवणें पहा. १ (हात इ०) पुढें करणें. 'कीं सत्य चंचु–पुट वोढविलें शुकानें।' –र.१५. २ येणें; प्राप्त होणें. 'निर्माल्य साडितां मूर्ध्नी। प्रळयाचल वोढवी।' –मुसभा ४.१९.

वोढणें—न. पांघरूण. वेढणें पहा. **वोढवण**–न. पांघरूण. 'राव म्हणे मही आसन। अंबरासारखें वोढवण।' –नव १७. १५०. ओढवण पहा.

वोढदाम—पु. वाण्याच्या बैलावरील एक कर. –मसाप २. २.५२. [ओढणें+दाम]

वोढवी—स्त्री. (गो.) नवोढा कन्या. [सं. ऊढा]

वोढा—पु. ओढा पहा. 'कृष्णा कृष्णास वंदी प्रथम सुसमयीं धाबुनी, दीन वोढा। भेटे निःशंक गंगेप्रतिहि...।' –मोकृष्ण ५८.३.

वोढाकाढ—स्त्री. खटपट; श्रम. 'सांपडला रथाबुर्डी। वोढाकाढी निष्टला।' –एरुस्व १०.६९. **वोढा वारा**–पु. मर्यादा; घरबंद. 'जयाचिया अंतरा। नाहीं वोढावारा। संयमाचा।' –ज्ञा १३.६९२; –एभा १०.५७०; –तुगा १३१०. [ओढणें+वारणें]

वोढाळ—वि. ओढाळ पहा. –ज्ञा ११.५४०; –एभा ७. ७१३. 'स्वार्थी अभिळासी वोढाळ। अदत्त झोंड अदेखणा।' –दा २.३.२८. **वोढाळणें**–अक्रि. ओढाळपणा करणें; भटकणें. 'वोढाळितां लाविलें। ते तैसेंच कान पूंस वोलें।' –ज्ञा १३.७२९.

वोढियाणा—पु. (योग) एक मुद्रा; बंध; वोडियाना पहा. 'बंध पडे किरीटी। वोढियाणा तो।' –माज्ञा ६.२३०. [सं. उड्डीयान]

वोढी—स्त्री. वोढ, ओढ पहा. १ त्रास; कष्ट. 'परी धर्मपत्नी धांगडी। पोसितां जरी एकी वोढी। तरीं कां अपरवडी। आणावी आंगा।' –ज्ञा १८.९४२; –एभा २९.१००. २ कल; आकर्षण. 'उपस्थीं परमानंद गोडी। यालागी स्त्रीकामाची अति वोढी।' –एभा ३.४४३. ३ ताण; नेट; जोर. 'आमुच्या बाणाची वोढी। केवीं साहतील बापुडीं।' –एरुस्व १.२. ४ टंचाई; कमतरता. 'अनर्घ्य रत्न हाता चढे। तैं भांगाराची वोढी पडे।' –ज्ञा १७.२६८. ५ धनुष्याची दोरी; ओढी पहा. (क्रि०काढणें) 'धनुर्षी काढूं जाणें वोढी।' –एभा ११.३५६. ६ धक्का; संकट. 'होता ब्रह्मांडा घडामोडी। वैकुंठ कैलासा नलगे वोढी।' –एभा २४.२३०.

वोढें—न. उष्टें; ओढें पहा. 'नगर पीडिलें त्याचें वोढें। आज काढीन एकदां।' –मुआदि ३८.८४.

वोणत-ती—स्त्री. (गो.) भित; ओणत पहा. 'त्याही वोणती थोडेआं दिवसांभितुरीं। मोडोनि पडळिया भूमीवरी।' –ख्रिपु २.४२.१३०.

वोणवा—वि. ओणवा पहा. ०**करणें**–खालीं वांकविणें. 'अर्थ देखोनि लविन्नला। तोजाण लोभें वोणवा केला।' –एभा १४.१६४.

वोणवा—पु. वणवा पहा. 'यांसी कवतुक दाखविलें रानीं। वोणवा गिळुनी गोपाळांसी।' –तुगा ३६. –र ५८१.

वोणा—पु. (महानु.) ओहोळ. कोंकणांत ल्हान प्रवहास ओहोण म्हणतात. 'बुंदेस्वरापासौनि तळेयांचा वोणा।' –ऋ ११६. [सं. वह्-उप-वहन]

वोत—पु. (महानु.) ओहळ; ओत पहा. 'वाजेश्वरा पूर्वेवोतु।' –ऋ ११४.

वोतटी—स्त्री. फार परिचय, संघटन. 'कां तुझा बोल न मनणें। हें वोतटीचेनि दाटणें।' –माज्ञा ११.५५४.

वोतणें—अक्रि. (महानु.) अवतरणें. 'माया घटाकारें वोते।' –चक्रधर. सि. सूत्रें २३.६. [सं. अवतार, प्रा. ओतर–वोतर–वोत]

वोतपली—स्त्री. १ कोंवळें ऊन. 'तैसोच गुरुकृपा उखा उजळली। ज्ञानाची वोतपली पडली।' –ज्ञा ७.१३१. २ थोडा शेंक, ताप. [सं. आतप–ओतप–वोतप+ली=अल्पार्थी प्रत्यय]

वोतप्रोत-पोत—क्रिवि. ओतप्रोत पहा.

वोतंबर—वि. ओथंबलेला; वांकलेला. 'वोतंबरू फलपुष्पीं।' –एभा १२.४२३. [ओथंबणें]

वोतवर—वि. उतूं जाण्याइतकें; भरपूर. 'वोतवर सुख तारुण्याचा भोगु।' –धवळे –मास्व १०६. [ओत. का. ओत्तु=पूर]

वोंतवरा—पु. जिल्हई; मुलामा. 'सोनेआ रुपेआचा वोतवरा। दिधला चांगु।' –ख्रिपु १.२६.७४. [ओप–वोप]

वोतारी—पु. ओतारी पहा. 'देवाच्या प्रतिमा वोतिती वोतारी।' –मध्व ४९८ **वोतीव**–वि. ओतलेली (मूर्ति इ०); ओतीव. 'तो वैराग्याचा कांतिउ। किं माहा तपाचा वोतिउं।' –भाए २५१. –स्त्री. मूर्ति; पुतळा. 'तियें गर्भभेद मुसें। रक्तमूत्र रसें। वोंतीव होऊनि असे। तें लाजिरवाणें।' –ज्ञा १६.१८०.

वोथंबणें—ओथंबणें पहा. 'करिती निर्लज्ज हरीचे दास। सकळ वोथंबले रस।' –तुगा ७२०.

वोथंबा—पु. ओथंबा पहा. १ ओळंबा. 'पावे उणेया पुरेया। वोथंबा जेवीं।' –ज्ञा १३.५३६. २ आश्रय; टेंका; खांब. 'हा प्रकृतिमार्जी उभा। परि जुई जैसा वोथंबा।' –ज्ञा १३.१०२१.

वोथरणें—अक्रि. घाबरणें. 'सहस्र व्याघ्र गर्जता वनीं। जेवी हरणी वोथरे।' –मुसभा ९.७६. बोथरणें पहा.

वोथरणें—अक्रि. १ नाहींसा होणें. 'तेंचि वोथरे विस्मयो।' –एभा १३.६७३. २ ढिला पडणें; मंदावणें. 'उठावला वोथरे वेगा।' –अमृ ६.४६. [सं. उत्+स्थिर?]

वोथिजणें—उक्रि. १ पातळ करणें. 'आइका पाणी वोथिजावें नलगे।' –ज्ञा ९.२१. २ विस्तारणें. [अव+थिजणें]

वोदन—पु. ओदन पहा. 'अनेक शाखा वोदना।' –वेसीस्व ८.६५.

वोदरणें—क्रि. (महानु.) (थर फुगुन) कोसळणें; उमळून पडणें; ढासळणें. 'वोदरे तेथ मध्यें टेंका सुति।' –दृष्टांतपाठ १०.

वोनामा—पु. ओनामा पहा. "खडे मांडुनि शिकविला। वोनामा जेवीं।' –दा ६.६.२४.

वोप—पुस्त्रीन. १ मुलामा; तेज; ओप पहा. 'त्यावरी कनकाचे कलश। वोप जणो विजू प्रकाश।' –कथा ४.९.१९८; –मुविराट १.६४. २ शोभा; झळाळी. 'महाद्वारें विशाळ झळकती। नवरत्नांची चर्कें वोप देती।' –ह २९.७०. ०**सर-रा**–पु. १ रत्नाच तेज खुलून दिसण्यासाठीं त्याखालीं जो पदार्थ घालतात किंवा मुलामा देतात तो; ओपसरा पहा. 'उपाधीचा दुसरा घालिता वोपसरा।' –ज्ञा १५.७६. २ (ल) संबंध. **वोपसळें**–न. (महानु.) उजळा. 'कनकप्रभा सोलिजेती। वरी वोपसळें दीजती।' –पूजावसर ११.

वोपणें—उक्रि. १ देणें; अर्पण करणें. 'ऐसें युक्तिचेनि हातें। जै इंद्रियां वोपिजे भातें।' –ज्ञा ६.३५२. २ हाणणें; मारणें. 'शाल्व रथीं जंव चढे। तंव मुसळ वोपिलें रोकडें।' –एरुस्व १०.७२. ३ विकणें. 'पै सर्वभावेंसि उखितें। जें वोपिलें मज चित्तें।' –ज्ञा ९.३३५. –न. दान; अर्पण. 'मग देति ज्ञानाचें वोपणें।' –भाए ६२८. ओपणें पहा. **वोपविणें**–१ विकविणें. 'पुत्रपत्नी जीव। डोंबाघरीं वोपविलीं।' –तुगा १२५१. २ देवविणें; देणें.

वोंबणें—क्रि. ओथंबणें पहा. 'नां ते परिमळें वोंबिलें। चांपेयाचेनि।' –शिशु १९.

वोभाण, वोभण—न. १ पूर. 'जेथ प्रपंचाची वळणें। कर्माकर्मांचीं वोभाणें। वरी तरताती वोसाणें। सुखदुःखांचीं।'–ज्ञा ७.७३. २ वेग.

वोमथणें—अक्रि. लोंबणें. 'भंवईचीं पडळें। वोमथती शिनसाळें।' –ज्ञा १३.५६०. [उमतणें?]

वोमाय—स्त्री. (प्र.) वधूमाय; नवऱ्यामुलीची आई. [सं. वधू. प्रा. वहू+माय]

वोरकल-ली—पुस्त्री. कसोटीचा दगड. वरकल पहा. 'तंव म्हणे वन्नमाळी। ब्रह्मविद्येचां वोरकलीं।' –भाए ५४७.

वोरख(खं)डा—पु. ओरखडा पहा. 'पचाननें नखें कपाळीं वोरखंडा केला।' –सप्र १८.४३.

वोरंग—वि. बेरंग. 'विषय वोरंग करी' –दावि १४६. [अव+रंग] **वोरंगणें**–क्रि. विरणें; ओरंगणें. 'विषयें रंगीं वोरंगले। श्रीरंगरंगीं।' –दा ३.१०.३२. [वि+रंग]

वोरढाण-णी—स्त्री. दुर्गंधी. वरढाण पहा.

वोरप—स्त्री. १ खाखा; उत्कंठा. 'बुजाली वैराग्याची वोरप।' –ज्ञा १७.२३१. २ ओरखडा. [ओरपणें]

वोरपणें—ओरपणें पहा. १ ओढणें. 'वोरपिलीं कांटिया। कमळें जैसीं।' –ज्ञा १६.३६७. २ ओरबाडणें. 'अस्थीचे नळे निरपे। शिराचे हीर वोरपे।' –ज्ञा ६.२३४. **वोरपेकार**–वि. (महानु.) दरोडेखोर. 'वोरपेकारू गांवें घेताती।'.

वोराबरा-र— पु श्रम; खटपट. –ज्ञा ८.३५. 'निळा म्हणे म्हणोनि जागा। सांडोनि वोरवार वाउगा।' –निगा १८९.

वोरस—पु. १ स्नेहभरानें फुटणारा पान्हा. –ज्ञा १४.६२. 'डोरली हे काय कृपेच्या वोरसें।' –तुगा २१७९. २ प्रेम. 'जैसी भुलली वोरसें। माय बोले बाळा दोषें।' –ज्ञा १८. १३२८. –न. पुत्र; वत्स. 'तूं माझी माउली मी तुझें वोरस।' –नाम १५३९. ओरस पहा. [सं. उरस्–औरस; प्रा. ओरस्स] **वोरसणें**–१ पान्हा सोडणें. 'जेवीं वोरसोनि तान्ही गाय। वत्सांपासीं धावूनि जाय।' –भवि १७.२०३. २ प्रेम करणें. –एभा ३.८५०.

वोराड—न. (भि.) घर. 'एक दिही एका को ओरडा पांगवात आथी' –भिक्षीभाषा २५. [गु. वोरडी; म. ओरडी]

वोरें—न. (प्रा.) वैरा पहा. –शर.

वोल-ली—स्त्री. तारण; गहाण. 'जें आपुलें सर्वस्व द्याल। मग इयेतें सोडऊनि न्याल। म्हणोनि ग्रंथु नव्हे वोल। साचचि हे।' –ज्ञा १३.३३०. 'ऐसें म्हणौनि अंतरि वोलि घेऊनि घरासि पाठविलें' –पंच ४.८. ओल पहा.

वोल—स्त्री. ओलावा; ओल पहा. 'जयांचिये आस्थेचेनि वोलें। सत्कर्म पालव्हाळीं गेलें।' –ज्ञा ९.४७८. **वोलट**–स्त्री. ओल; ओली जमीन. –ज्ञा १८.९९९;–एभा ६.३०४. **वोला**–वि. ओला पहा. –एभा ८.२३३. **वोलावा**–ओलावा पहा. 'जरी पुण्याचा वोलावा। नाशिजैल।' –ज्ञा १.२३२. **वोलांशस**-पु. आर्द्रता; ओलेपणा, त्याचा अंश. –ज्ञा १८.४४६. 'सत्त्वाचेनि वोलांसें। बोधतरु वेल्हावतु दीसे।' –भाए १८४. **वोल्हावणें**–१ ओलें होणें. 'वोल्हावेल तनु होईल शीतळ।' –तुगा २०१८. २ शांत होणें, करणें. –ज्ञा ११.२९०; १३. ११५८. **वोल्हावण-न**–न. ओला लेप; ओलेपणा. 'तया प्रमेयाची वोडवन। वरि दीजे साहित्याचें वोल्हावन।' –भाए १२. **वोल्हावा**–पु. ओलावा; (ल.) आधार. 'नामरूपाही वोल्हावा। आपणचि जो।'–ज्ञा ९.२८६. **वोल्हासा**–पु. ओलावा. –अमृ ६.३४.

वोलंबा-बे—पुस्त्री. वाळवी. –शर. वाळंबा पहा.

वोलांडा—ओलांडा पहा. 'ओलांडा आणि वळ।' –दा ३.६.२३.

वोलिवठा—पु. वाहती वाट; रहदारीचा रस्ता. 'जन्ममरणाचा वोलिवठा। स्वभावें जें।' –ज्ञा ८.१४४.

वोलिसावलें—नभव. (महानु.) स्त्रियांचीं महावस्त्रें; ओलीं वस्त्रें. 'कव्हणा एका रायाचा डींगरा असे। तो वोलिसाउलें ने। तें उपसाहे।' –दृष्टांतपाठ ८२.

वोली—स्त्री. उपरणें. 'तदुपरि जरतारी मंदिले उंच वोली।' –सारुह ३ ३९. –दावि ५००.

वोल्हांटणें—उक्रि. हांकलणें; परतविणें. 'चिंतामणीची खाणी लागली। तेणेंवरी वोढाळें वोल्हाटिलीं।'–ज्ञा ११.५४०. [उलटणें]

वोल्हावण—न. (महानु.) ओलवण; शक्तिवर्धक औषधी उपाय. 'मग तो रावो म्हणे यासि वोल्हावण करी।' –दृष्टांतपाठ ७७.

वोवणी—स्त्री. ओंवणी पहा. माळ. 'जैसी असे विमल वोवणि मोतियांची।' –सारुह ५८५;–तुगा १०७२.

वोवथा—स्त्री. अवस्था पहा. –मनको.

वोवरा, वोवरी—पुस्त्री. ओरी, ओवरी पहा. –ऋ १०७. 'जो आत्मबोधाचिया वोवरां। पहुडला असे।' –ज्ञा ६.६२. खोली; कोठडी. –ज्ञा ८.६१; –एभा १४६. [ओवरी]

वोवसा—पु. वसा; व्रत; नेम. 'माझें अधिष्ठान घरीं। आणि वोवसें आनाचें करी।' –ज्ञा ११.८१६; –दा ७.९.२३. [सं. उप+आस्; प्रा. उवास; म. वसा] **वोवसणें**–व्रत घेणें; ओवसणें पहा. 'गौर वोवसली'. **वोवसी**–वि. वसा घेतलेला; व्रतस्थ. 'कां वाण धाडिजे घरा। वोवसीयाचे।' –ज्ञा १७ २८६; –एभा २३.३१९.

वोवळ-ळी—नस्त्री. (गो.) बकुळीचें झाड; फूल. ओवड पहा.

वोवा—पु. (अशिष्ट) १ बाम, बाव पहा. २ ओवा पहा.

वोवांडणें—अक्रि. १ फिरून परत येणें. 'मग वोवांडिती स्वर्गस्थ। पूर्व पुरुष।' –बंज्ञा १.२५३. (पडणें–माज्ञा). २ पार

पडणें. 'ऋतुकोटि वोवांडित।'–ज्ञा १३.१६४. (ओलांडणें-माझा. ओंबाळून टाकणें. –ज्ञा. परिभाषा; मनको). ३ उपेक्षा करणें. 'आइकोनिचि वोवांडिले। कोण्ही जरी।'–ज्ञा १३.२६५. (उल्लंघणें-माझा). ४ उघडण्याचा प्रयत्न करणें. 'हें घनगर्जना सरिसा। मयूर वोवांडे आकाशा।'–ज्ञा १८.४७४. (उलटणें–ज्ञा. परिभाषा). ५ झुकणें; कल जाणें. –दृष्टांतपाठ ४९.

वोंवारा—पु. (प्रां) आळा; मर्यादा. –शर.

वोवांळणी—स्त्री. ओवाळणी पहा. 'असो स्वप्रीतीची वोवाळणी। सदाजे करिती।'–रुपं १.४७०. **वोवाळणें**–ओवाळणें पहा. 'श्वासामोदा भुलेल भृंग। वोवाळती सुखातें।'–मुआदि ३९ ५२. **वोवाळी**–स्त्री. ओवाळणी; कुरवंडी. 'तो चतुर्भुज वनमाळी। अर्धांगीं लक्ष्मी वेल्हाळी। देखूनी करिती वोवाळी। वनदेवता।'–कालिका १४.१९४.

वोवी—स्त्री. ओवी पहा. 'ते भगवद्गीता वोविया गावों। ऐसें केलें।'–ज्ञा १०.१९.

वोंविळा—वि. ओवळा पहा. 'जें शिवपणही वोंविळे। आंगीं न लवी।'–अमृ २.११; –ज्ञा १०.२०२; –एभा ४.२५८.

वोशट— वि. ओशट पहा.

वोषद—न. (प्र.) औषध पहा. 'साधे वोषध गुणवंत।'–दा १४.१.२.

वोस—वि. ओसाड; शून्य; ओस पहा. 'काय करावें गोमटें। वोस नगर।'–ज्ञा ९.४३३; –एभा ३ ६७९. **वोसळ-ळ, वोसाळ**–वि. शून्य. 'तैसें जें वायाणें। वोसाळ दिसे जाणणें।'–ज्ञा १८.५७७. **वोसावणें**–१ न्यून, कमी होणें. 'चंद्रमा कळीं धाला। न दिसे कोणें आंगीं वोसावला।'–ज्ञा १५.३०३. २ उदास होणें. 'तुज उद्विग्न वोसावलें देखोन।'–रंयो १.२०३. ३ ओस पडणें. **वोसि**–स्त्री. (महानु.) खिन्नता. 'न मिळतां आहारीं। काहीं वोसि न धरी।'–भाए ३३४. **वोसिवा**–वि. वोसि पहा.

वोंस—स्त्री. (गो.) चरबी; वसा. [सं. वसा]

वोसक—पु. विषय. –मनको.

वोसंग—पु. मांडी. –ज्ञा ११.१०३. 'जगतुंडास वोसंगा घेऊन। विश्वजननी देत स्तनपान।'–शिली १४. ओसंग पहा. [सं. उत्संग] **वोसंगां असणें**–आश्रयाखालीं असणें. 'दोघे पुत्र कांता निर्धारी। तुझे वोसंगां आहेत हरी।'. **वोसिंगा**–वोसंग पहा.

वोसंडणें—अक्रि. ओसंडणें पहा. १ भरून वाहणें; सांडणें. 'तें कृष्णवचनामृत। पार्थी भरोनि वोसंडत।'–ज्ञा १५.५८८; –क्रि १८. २ टाकणें; त्यागणें. 'कां समोर अग्नि देखोनि। जरी न वचिजे वोसंडोनी।'–ज्ञा १.२३०; –एभा २.२८६.

वोसण—न. केरकचरा; वाहून आलेले जिन्नस; वोसाण पहा. –एभा ७.५२१ [वोसंडणें] **वोसगणें**–वोसंडणें पहा. 'आनंदें त्या आळविती। वोसणती हरिनामें।'–निगा १४९.

वोसण—स्त्री. (प्र) वेसण पहा.

वोसणणें, वोसगावणें, वोसाणणें—अक्रि. बरळणें; बडबडणें ओसणणें पहा –ज्ञा ८ ६; –एभा १० ३१२. 'गाढ मुढें निद्रिस्त जो। निद्राभरें वोसणे जो।'–मिसं ४१ 'नवल वैदर्भीचा भावो। रात्रीं वोसणावें देवो। भीमकी साडूं नको देहो। आलों पाहावो पणावया।'–एरुस्व ४ ६८ 'संसार हाच दीर्घ स्वप्न। लोभें वोसाणती जन।'–दा ७.१.२०. [सं उत्+स्वप्-स्वप्न]

वोसंतणें—उक्रि. १ आचरणें; करणें. 'वोसंतिता रात्रिदिवसें। नाराणुक जया।'–ज्ञा १६.९२. २ आक्रमण करणें. 'होतों अज्ञानाच्या आधारा। वोसंतीत जन्म बाहरा।'–ज्ञा १७.४२९. (भोगून टाकणें–माझा).

वोसन—क्रिवि. फुकट; व्यर्थ. 'तेथें शस्त्रें जातीं वोसन।'–रावि २८ ६६.

वोसपणें—अक्रि. भयभीत होणें. 'तैसें वोसपले जीव।'–तुगा ३८३९.

वोसर—पु. ओहोट; ओसर पहा. **वोसरणें**–अक्रि. ओसरणें पहा. १ कमी होणें; ओहटणें. 'मेघ उदार परी वोसरे। म्हणऊनि उपमेसी न पुरे।'–ज्ञा ९ २०५ २ नाहींसे होणें. 'तेथें तारुण्य वोसरेना। रोगव्याधिही असेना।'–दा ४.१०.१९. ३ मागें हटणें; दूर जाणें. –एभा ६.१७३ ४ खालीं पडणें. 'गगनिहूनि सुमनवृष्टि। भीष्ममाथां वोसरली।'–मुआदि २३.७४. **वोसरा, वोसारा**–पु. कमताई; न्यूनता. –ज्ञा १५.१६३; –एभा ११ १४०९.

वोसरी—स्त्री ओसरी पहा. 'सहजस्थिती जाऊनि वोसरी। बसती झालो शुभगात्री।'–नव २०.५१.

वोसवणें—वोसणणें पहा.

वोसाड-डा—पु. शिंतोडा. –वि. ओसाड. ओसाडा पहा. –एभा ११.१५.

वोसाण—न. पुरांत वाहून आलेला केरकचरा, इ०. 'वरी तरताती वोसाणें। सुखदुःखांचीं।'–ज्ञा ७.७३; –दा ११ ६.६. वोसण पहा.

वोह-हा—पु १ कांस; ओटी. 'का वोहाचे दुधीं। सायचि असावी आधीं।'–अमृ ७.६३. –ज्ञा १८.७८५. २ पान्हा. 'वोहा दाटल्या चहूं स्तनीं। दुग्धधारा वर्षती।'–मुवन १२.६७. [सं. ऊधस्; प्रा. ऊह]

वोहट—स्त्री. ओहट; उतार; कमीपणा. (क्रि० पडणें). 'मग म्हणे उत्कंठे वोहट न पडे। अझुनि सुखाची सोय न सांपडे. –ज्ञा ११.१५४; –सारुह ४.११०. ओहट पहा. **वोहटणें**–१ ओसरणें; ओहटणें पहा. 'मद मत्सर वोहटेना। भुली पाडिती।' –दा १०.४. २ आकर्षणें; संकुचित होणें. 'तेथ आपानु आंतुली-कडे। ओहोटों लागे।' –ज्ञा ६.२००.

वोहदा—पु. हुद्दा पहा. अधिकार. 'येक वोहदेचा जालो किंकर।'–दावि ३५३;३५५. [अर.] **वोहदेदार**–वि. हुद्देदार "जन्मविती भूवरी भोगावयाते। वोहदेदार देव ते यजमान।' –दावि ७६४.

वोहमा—पु. (प्र.) वहिमा, वहीम पहा. (क्रि० धरणें, येणें).

वोहमाय—स्त्री. वधूची आई; वहूमाय. 'वृद्ध परंपरा ऐसी आहे। वरचरण उटी वोहमाये।'–एरुस्व १४.८९;–मध्व ६८८. [सं. वधूमाता; प्रा. म. वहूमाय] **वोहोमा**–स्त्री. (अशिष्ट) वधूमाय.

वोहर-रें—न. वधूवर; नवें दंपत्य; मेहूण. 'वोहरेवीण वाधावणें। तो विटंबु गो।'–ज्ञा १३.८३७. 'परम साजिरीं शोभायमान। वोहरें पाहातीं विश्वजन।' –वेसीस्व १०.९० [सं. वधूवर]

वोहर—पु. (व.) कुणब्यांत श्राद्धपक्षांत देवस्थानीं ज्याला बसवितात तो.

वोहरणें—अक्रि. संपणें; ओहरणें पहा. 'गे बाई अघटीत संकटगती कवणें रिती वोहरे।' –आगो ११०.

वोहरी—स्त्री. शून्य; पोकळजागा. –शर. 'करीन शत्रु वोहरी।'

वोहळ, वोहाळ, वोहोळ—पु. ओढा; नाला. ओहळ पहा. –ज्ञा ९.४५८. 'लपौनि चोरखांचेचां वोहळीं। वळीत पळिताचे ताडवन घाली।' –भाए ५२१. 'चहूंकडून दाटले पूर। वोहाळ गंगा भरल्या समग्र।' –ह १०.१८२;–तुगा २२४०. [सं वह्] **वोहळणें**–अक्रि. वाहून जाणें; ओहळणें. 'वार्षिये प्रथमदशे। वोहळलया शैल्याचें सर्वांग जैसें।' –ज्ञा ११.२४७; –अमृ ३.२९. **वोहोळणें**–अक्रि. ओघळणें; न्हाणें. 'अवघा रगतें वोहोळला।' –उषा १२०.

वोहा—पु. गाईम्हशीची कांस; ओहा. 'कां वोहाच्या दुर्धी। सायिचि असावी आधीं।' –अमृ ७.६३. [सं. ऊधस्]

वोहा—क्रि. आज्ञा. (भि.) बसा! 'वोहा बा, जाहूं आमी रामराम।' –भिल्लीभाषा ३२.

वोहारा—वि (व) वाईट पायगुणाचा.

वोहिनी—स्त्री. वहिनी पहा. 'जेष्ठ बंधूची जे राणी। रेवती कृष्णाची वोहिनी।' –एरुस्व १४.७५; कचेसुच ९.

वोळकंबणें—क्रि. ओळकंबणें पहा. –एरुस्व ७.३३; 'वोळकंबली महावृक्षीं। अस्वलें आणि वाघुळें।' –मुआदि ३६.५५.

वोळख—स्त्री. (कों.) पाणी मरण्याकरितां केलेली दांडयाची नरोटी; डवली.

वोळख—स्त्री. ओळख पहा. परिचय; ज्ञान. 'जें चावळलें वोळखीं। शास्त्रांचिया।' –ज्ञा १७.३५६. **वोळखण**–स्त्री. ओळखण्याची खूण. 'अतां आइके वोळखण। अव्यक्ताची।' –ज्ञा १३.८९; –एभा ३.१२. **वोळखी**–स्त्री. ओळख पहा. 'चोरास वोळखी पुसो नये।' –द २.२.५.

वोळग—स्त्री. १ सेवा; उळिग पहा. 'होईन पुरेपण। वोळगेचें।' –ज्ञा १३.४२४. –एभा १४०. २ आश्रय; ओळग. 'चंद्रसतार वोळग घाली। नखप्रभेमाजो।' –पूजावसर ११. **वोळगण, वोळगी**–सेवा; वोळग. 'बहिणी म्हणे पूर्ण विरक्ति आनसीं। ज्ञान हें तयासीं वोळगण।' –ब १६०. 'जंव देह हें असेल। तंव वोळगी ऐसी कीजेल।' –ज्ञा १३.६३०. **वोळंगणा**–वि. सेवक; उपासक. 'स्वधर्म पंथीं वर्तता जाण। सिद्धी होती वोळंगण्या।' –मुआदि ८.८०. **वोळगणें, वोळंगणें**–क्रि. १ सेवा करणें; आश्रय करून राहणें. 'अष्टसिद्धि याचे द्वारीं। वोळंगत राहतील निरंतर।' –गुच ११.१८. –मुआदि १८.२०. २ बिलगणें; लोंबणें. 'वोळगे फळभार। लावण्येसी।' –ज्ञा ३.१००. ३ जवळ जाणें; भेटणें. 'नगरा येका जाउनि रायाते वोळगे।' –पंच ४.४. **वोळगविणें**–(महानु.) सेवे प्रीत्यर्थ अर्पण करणें. 'वाईसी कापुरे वीडा वोळगवीला।' –पूजावसर ३३.

वोळग, वोळंग—स्त्री. सभा; बैठक. 'वोळग वीसजेली तया ततक्षणीं। सकळही यादवां देवें दीधली पाठवणी।' –घवळे पू. २०. –गुच २९ ११२.

वोळघणें, वोळंघणें–वोळगणें पहा. १ भिडणें; लगटणें. 'सुरत सुखालागीं स्वामें। मृगीवरी वोळंघती।' –मुरंशु ३५. २ चढणें. 'आपल्या माथां वोळघे। आपण कोण्ही।' –अमृ ४.१९.

वोळणें—अक्रि. ओळणें पहा. १ वळणें; अनुकूल होणें; प्रसन्न होणें. 'गुणानुवाद श्रवण करितां। वोळे सरस्वती।' –दा १.२.२६. तुगा ६६. २ भागणें; तृप्त होणें. 'तृषा वोळे तेंचि सुख। वांचूनिया।' –ज्ञा १८.५५९. ३ भरून येणें; समृद्ध होणें. 'आगर बागा नाहीं मिती। सुधाफळानें वोळती।' –वेसीस्व ३.५४. 'मेघ वोळला अंबरीं। तळीं दुर्दैवी मयूरी।' [वळणें] **वोळवणें**–१ वोळणें; भागणें. 'करपात्रें प्राशितां देख। तृषा समूळ वोळवते।' –जै १.३०. २ उदित होणें. 'गगनीं वोळवितु गभस्ति।' –मुवन १.२२.

वोळणें—(व.) वाळणें पहा.

वोळंब—पु सोंग. 'सुखें वोळंब दावी गोहा। माझें दुःख नेणो पाहा।' –तुगा २९५७.

वोळंबणें—अक्रि. ओळंबणें पहा. –अमृ ६.१००.

वोळंबा, वोळिंबा—पु. वारुळ करणारी मुंगी, किडा; वाळवी. वाळिंबा. –ज्ञा ८.८९. 'वोळंबा घर करी सायासें। त्यामाजीं सर्प राहे सावकाशें।'–एभा ९.१७६. 'आजि इंगळासि वोळंबे निश्चिर्ती। लागलें ऐसें वाटतें।' –कथासा २५.१४६. ओळंबा पहा.

वोळसा—पु. १ वळसा; वेढा; फेरा. 'तुटला वोळसा मीपणाचा।'–दावि ४१६. २ भोंवरा. 'जातो तळा येतो मागुता लवकरी। वोळशाचे फेरीं सांपडलों।' –तुगा ५६२. [वळसा]

वौ०—वौसर (संक्षेप) पहा. 'देय दांड फुलें १०० वौ०' –चौऱ्याशीचा शिलालेख.

वौर—पु. (कु.) पूर; लोंढा. और पहा.

वौंश—पु. वंश पहा. 'उभय वौंशाचा उच्चार। ब्राह्मण मुखें होतसे।' –वेसीस्व १०८२. –मध्व ३८९.

वौसर—पु. पुडा; गड्डी.

वौसा—पु. वसा पहा.

वौळ—पु बकुळीचें झाड; ओऊळ पहा.

व्यंकट—वि. वांकडा; वक्र; कुटिल; वेंक पहा. 'भोंवया रेखिल्या कृष्ण रेखा। अतिसुरेखा व्यंकटा।' –एरुस्व ७.१५. 'चंद्ररेखा व्यंकटी। रुळती नखीं।' –कथा १.२.१४८. [सं. वक्र, वंक; आ. वंक, वंकुड] **०कटाक्ष**–पु. वांकड्या डोळ्यानें पाहाणें. –एभा ८.७१. **व्यंकटी**–स्त्री. वक्रता; कुटिलता. 'जे खळाची व्यंकटी सांडो।' –ज्ञा १८.१७९४. **व्यंकटेश, व्यंकोबा**–पु. कर्नाटकांतील एक देवता; विष्णु; बालाजी(गिरीचा).

व्यक्त—वि. १ इंद्रियगोचर; स्वतंत्र अस्तित्व असलेला. 'अव्यक्त ब्रह्मापासून. हा व्यक्त प्रपंच झाला.' २ उच्चारतां येणारा (वर्ण, शब्द). ३ स्पष्ट; उघड; दिसाया, समजाया जोगा. 'आतां शांतीचें जी लिंग। तें व्यक्त मज सांग।' –ज्ञा १६.१३६. –मोसभा १.१००. ४ दृश्य. –एभा १.१५. ५ साकार. 'वोळी लिही व्यक्तु। आपणचि।' –ज्ञा १३.३०७. ६ ज्ञात; ज्ञातसंख्येचें (गणित, अंकगणित). याच्या उलट अव्यक्त (बीजगणित). 'किती एक पदें व्यक्त ... सांगितलीं आहेत.' –म. बीजगणित १. ७ (तत्त्व) नाशिवंत; क्षर. –गीर १४१. [सं.]

व्यक्ति—स्त्री. १ सत्य, प्रत्यक्ष गोष्ट; वस्तु; विशेष (मनुष्याचा, पदार्थाचा). २ स्पष्टपणा; उघडपणा; प्रगटता. –ज्ञा १७.३७०; –एभा २४.८८. ३ आकार; स्थिति. –ज्ञा २.१५०. ४ स्पष्ट उच्चार. –ज्ञा १७.४०४. 'हें पोर नुगतें बोलूं लागलें, अजून वर्णाची व्यक्ति होत नाहीं.' ५ असाधारण, अलौकिक पुरुष. ६ कोणताहि मनुष्य; असामी; इसम. ६ (ल.) अष्टल लबाड, बदमाष माणूस. ७ आविष्करण; दिग्दर्शन. ८ अ चा लोप झाल्याची अक्षरापुढील ऽ खूण. [सं.] **०दर्शन**–न. (लेखनकला) लेखकानें जें कांहीं लिहिलें असेल त्यावरून विवक्षित व्यक्तीचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखें वाटणें किंवा लेखकाच्या वर्णनानें वर्ण्य व्यक्ति वाचकांपुढें मूर्तिमंत उभी राहणें. –प्रतिभा साधन. **०वाचक**–वि. १ वैयक्तिक; व्यक्तीसंबंधी. २ (व्या.) एखादें उदाहरण दाखविणारें, सिद्ध (नाम). याच्या उलट जातिवाचक. **०वैचित्र्य–वैशिष्ट्य**–न. एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणीं असणारा विशेष गुण. 'एखादा कलावान् व्यक्तिवैचित्र्यानें नवीन सुधारणा–कसब दाखवूं लागला तर लोक त्याला मागें खेंचतात.' **०स्वातंत्र्य**–न. व्यक्तीला निर्वेध वागण्याची मोकळीक. 'व्यक्तिस्वातंत्र्यानें धर्मबंधनें तुटत चालुलीं आहेत.' –केले १.१६७. **०स्वातंत्र्यवाद**–पु. (तत्त्व.) व्यक्तीला स्वातंत्र्य देण्याबद्दलचें मत. (इं.) इन्डिव्हिज्युॲलिझम्. **व्यक्तीकरण**–न. १ स्पष्टीकरण; विवरण; फोड. करण ७ पहा. २ चित्रकलेंतील अंग; साधनक्रिया. (इं.) आर्ट ऑफ एक्झेक्युशन.

व्यंग—वि. १ न्यून, उणेपणा असलेला (एखादा अवयव). २ ज्याच्या अवयवांत न्यून, उणेपणा आहे असा (माणुस); पंगु; विकलांग. ३ अपूर्ण; अखंड (वस्तु, पदार्थ); उणा; कमी. 'नाचों तेथें उभा राहे। जातां व्यंग करी साहे।'–तुगा ४०४८. ४ कमीपणा येणारी; अपमानाची (गोष्ट, इ०). 'हें कांहीं आपणांस वांचवीत नाहींत, मग व्यंग गोष्टी सांगणें हें विहित नव्हे.' –भाव ६६. –न. १ विकलत्व; पंगुता. २ अपूर्णता; अखंडता. ३ लंगडी बाजू; बिंग. ४ कातडीवरचा तीळ; वांग. [सं.] **व्यंगणें**–अपूर्ण होणें; यथासांग न घडणें. –ज्ञा १७.३९३. **व्यंगित**–वि. व्यंग पहा.

व्यंग—व्यंग्य पहा.

व्यंगणें—वेंगणें पहा.

व्यंगुल-लि—वि. बोटतुटका. –नस्त्री. अंगुलाचा साठावा अंश; एकसाठांश अंगुल. एक माप. [सं. वि+अंगुल]

व्यंग्य—वि. १ आडपडद्यानें, अप्रत्यक्षपणें, अलंकारिक शब्दानें सांगावयाचें, दिग्दर्शित करावयाचें; सूचक तऱ्हेनें, हावभावानें किंवा कृतीनें गुप्त गोष्टीबद्दल कळवावयाचें जें तें; व्यंजक; गर्भित. –न. १ छद्मी, सूचक भाषण; वक्रोक्ति. २ अलंकारिक भाषण. [सं.] **०चित्र**–न. थोडया रेषांनीं मूळवस्तूचें वैशिष्ट्य दाखविणारें चित्र; (इं.) कार्टून; टीकात्मक चित्र. **०व्यंजक–संबंध**–पु. (न्याय) वाच्य आणि गर्भित वस्तूमधील संबंध. **व्यंग्यार्थ**–पु. (साहित्य) शब्दांचे वाच्य; लक्ष्य, व्यंग–जे तीन प्रकारचे अर्थ आहेत त्यांतील एक, शब्दाचा वाच्य आणि लक्ष्य

यांखेरीज निघणारा खोल अर्थ. **व्यंग्योक्ति**–स्त्री. १ औपरोधिक, छद्मी भाषण. २ व्यंग्यार्थ-सूचक भाषण.

व्यग्र—वि. शोक, भय, चिंता इ० नीं क्षुब्ध, अस्वस्थ. (अंतःकरण. माणूस इ०).

व्यंजक—वि. सूचक; ज्ञापक; व्यक्त करून दाखविणारा. –ज्ञा १.४०२. [सं.] **व्यंजन**–न. १ (व्या.) स्वररहित ककारादि वर्ण प्रत्येकी. २ अनुस्वाराचें किंवा अनुनासिकाचें अक्षरावरील चिन्ह. ३ तोंडीलावणें; चटणी, लोणचे इ० ४ व्यंग्योक्ति; औपरोधिक भाषण. ५ खूण; चिन्ह; अभिज्ञान. –वि. व्यक्त; चिन्हित. 'एके अंगीं भिन्नपर्णी। जीव शिव वादिन्नले दोनी। तेणें झाली व्यंजन स्तनी।' –एरुस्व ७४० **व्यंजन(ना)संबंध**-पु. (न्याय) स्पष्ट आणि सूचित गोष्टींतील संबंध; वाच्यार्थ आणि व्यंग्यार्थ यांमधील संबंध. **व्यंजना**-स्त्री. उपरोध; गर्भितार्थ; ध्वनि; सूचना [सं.]

व्य(व्यं)जन—न. पंखा; विंझणा. 'मोले उणें व्यजन तें धरितां पुढारीं। छाया करी तपनदीप्तिसही निवारी।' –र. 'हातीं व्यंजन घेवोनि। श्रीगंध पुष्पमाळा आणुनि।' –कथा १.७.११२. [स व्यजन]

व्यजीत जाणें—(चुकीनें) अजित जाणें पहा.

व्यतकरण—न. (शाप.) अडथळा [सं.]

व्यतिक्रम—पु १ उलटा, विपरीत क्रम. २ उलट विरुद्ध वर्तन (आज्ञाभंग, स्वैरवर्तन इ०). ३ विपरीतता विरुद्धता. [सं.]

व्यतिक्रांत– वि उलटा; विपरीत झालेला; उफराटा. [सं]

व्यतिरिक्त—वि १ निराळा; भिन्न २ विरहित; विहीन; विना 'ज्ञानव्यतिरिक्त देह काष्ठोपम जाणावा' –शअ खेरीज; वांचून शिवाय. 'मी तुला घेतल्या व्यतिरिक्त जाणार नाहीं.' [सं] **व्यतिरेक**-पु. १ असंबद्धता; वेगळी, भिन्न स्थिति. 'ईश्वरीं अज्ञानाचा सर्वथा व्यतिरेक आहे.' २ अभाव. ३ अव्याप्ति. ४ अभावाचा नियम परस्पराभाव. 'जेथें ईश्वरभक्ति नाहीं तेथें भूतदया नाही व्यतिरेक आहे.' ५ अपवाद. ६ एक अर्थालंकार; जेथें उपमान आणि उपमेय यांतून एकाचे अधिकत्व किंवा न्यूनत्व वर्णिलें असतें तो अलंकार. 'त्वदुदारता जसी तसि न सुरांच्या बहुमता अगा साधो।' -मोभीष्म १४७ [सं] **०मुखें**-क्रिवि. व्यतिरेकाच्या म्हणजे अभावाच्या पद्धतीनें (प्रतिपादन). याच्या उलट अन्वयमुखें. **०व्याप्ति**-स्त्री. अभावापासून निघालेला व्यापक सिद्धांत. **व्यतिरेकोदाहरण**–न. विरुद्ध उदाहरण.

व्यतिपात—पु. १ (ज्यो.) विष्कंभ. प्रीति इ० २७ योगांतील १७ वा योग हा अशुभ व आपत्तिसूचक आहे. २ अपशकुन; अरिष्टसूचकें चिन्ह ३ (ल.) खोडकर, उपद्व्यापी मुलगा. [सं.]

व्यतिपातावर होणें-जन्मणें(पोर)–खोडकर मुलाबद्दल वापरतात.

व्यत्यय—पु. १ विरुद्धता; विपरीत भाव. २ उलटा प्रकार; विपर्यास. ३ उलटा क्रम. ४ (व्यापक) अडथळा; अडकाठी. [सं.]

व्यत्यस्त—वि. विपर्यस्त; उलट, (वाईट अर्थी उपयोग). [सं] **व्यत्यास**-पु. १ विरुद्धता; विपरीतता. २ विपर्यास; सरळ, योग्य याच्या उलट स्थिति; उलटापालट. [सं.]

व्यथक—वि. व्यथा देणारा; दुःखद. [सं.] **व्यथा**-स्त्री. दुःख (शारीरिक किंवा मानसिक); क्लेश; आधिव्याधि. 'पैं पार्थी काटा नेहटें। तैंव व्यथा जीवीं उमटे।' –ज्ञा १६.१५९. 'या भवीं रामदास। थोर पावतो व्यथा.' –राक (नवनीत पृ. ४४९). [सं.] **व्यथानक-नीक**–वि. १ रोगी; दुःखी; नादुरुस्त. २ त्रासदायक; पीडा देणारें (मूल). **व्यथित**–वि. दुःखित; पीडित; आर्त. **व्यथिष्ट**–वि. फार दिवसाची व्यथा असलेला; नेहमीचा दुखणेकरी.

व्यधिकरण—वि. १ निरनिराळे विषय, अधिष्ठान, भूमिका इ० संबंधी, इ० त असणारा. २ (ल.) विसंगत; अननुकूल; स्नेहविरहित. ३ दुटप्पी; संदिग्ध; शिथिल (मत, तर्क, इ०). –न. अडफांटा; विरोध. [सं.] **०बहुव्रीहि**–पु ज्या बहुव्रीहींतील दोन्ही पदांस निग्रह वाक्यांत भिन्न विभक्ति असतात तो.

व्यपदेश—पु. १ विशिष्ट नांवानें दिग्दर्शन, व्यवहार. २ नांव; संज्ञा. ३ कपट; अप्रामाणिकपणा. ४ बाहाणा; सबब. [सं.]

व्यपेक्षा—स्त्री. १ उणीव; न्यूनता. २ (व्या.) परस्पर विनियोग (दोन नियमांचा). ३ परस्पर संबंध. [सं]

व्यभिचार—पु. १ सामान्य नियमाचा भंग; अनियम; अपवाद. 'जितके बुद्धिमान् तितके आळशी असें म्हणतां येत नाहीं, कां कीं क्वचित् व्यभिचार दिसतो. कितीएक बुद्धिमान असुन उद्योगीहि आढळतात.' २ मार्गच्युति; व्यवहारातिक्रम; दुराचार. ३ परस्त्रीगमन; परपुरुषगमन. 'जै यमनियम ठाकती। तेथ इंद्रियें सैरा राहाटती। म्हणऊनि व्यभिचार घडती। कुळस्त्रियांसीं।' –ज्ञा १.२४९. ४ एकनिष्ठेचा अभाव; कृतघ्नपणा. 'जेथिचिया कृपा लाभिजे वरु। तेथेंचि मनें व्यभिचारु।' –ज्ञा २.३८. ५ वेगळेपणा; फरक. 'जे प्रकृतीचेनि आधारें। गुणाचेनि व्यभिचारें।' –ज्ञा ४.७८. [सं.] **व्यभिचरणें**–अक्रि. १ एकनिष्ठ, अनुकूल नसणें. 'तरी उचित काय आम्हां। जें व्यभिचरेना धर्मा।' –ज्ञा २.६३. २ सोडून जाणें; बदलणें. –ज्ञा १७.६०. ३ भलतीकडे जाणें; योग्य मार्गापासुन च्युत होणें. **व्यभिचरित**–वि. अपवाद करून मोडलेला; ज्यापासुन च्युति झाली आहे असा (नियम). **व्यभिचारी**–वि. १ अपवाद, भंग झालेला (नियम, शिरस्ता). २ व्यभिचार, परस्त्री (पुरुष) गमन

करणारा–री, केलेला–ली –एभा १ १९१. ३ दुराचारी; व्यसनी; स्वैरवर्तनी. **व्यभिचारी भाव**–पु. (साहित्य) रसाच्या उत्पत्तीस साहाय्यकारी असे ३२ भाव; संचारीभाव. निर्वेद, ग्लानि, शंका, असुया, मद, श्रम, आलस्य, दैन्य, चिंता, मोह, स्मृति, धृति, क्रीडा, चपलता, हर्ष, आवेग, जडता, गर्व, विषाद, औत्सुक्य, निद्रा, अपस्मार, सुप्ति विबोध, अमर्ष, अवहित्था, उग्रता, मति, अपलंभ, व्याधि, उन्माद, मरण. त्रास आणि वितर्क मिळून ३४ होतात

व्यय—पु. १ खर्च; वेंच. २ नाश. –ज्ञा १५.१२२. ३ एका संवत्सराचें नांव. –वि. नश्वर –एभा २ ३९४. [सं.] **०बुद्धि**–स्त्री. १ खर्चिक स्वभाव; उधळेपणाची प्रवृत्ति. २ (क.) औदार्यबुद्धि; सढळ हात. **०वेत्ता**–वि खर्चिक; व्ययबुद्धीचा. 'पार्थ पहाशील सुखें व्ययवेत्ते वित्त वेंचिती यज्ञा।' –मोकर्ण (नवनीत पृ ३३६). **०शंकित**–वि. कृपण; कद्रू. **०शील**–वि. खर्चीक; उधळया. **०स्थान**–न. (ज्यो.) कुंडलींतील बारावें स्थान. **व्ययित**–वि. खर्चलेलें; व्यय केलेलें. **व्ययी**–वि. सढळ हाताचा; खर्चिक.

व्यर्थ—वि. निरर्थक; निष्फल; फुकट. 'रे धर्मा व्यर्थ तुझें झालें सद्धार्मिक...।' –मोभीष्म १.२४. –क्रिवि. वृथा. [सं.]

व्यलीक—स्त्री. फसवेगिरी; लबाडी. 'ऐशा तूझ्या व्यलीका समजुनि न कळे कोण जाणेल तूंतें।' –निगा१; विठ्ठलस्तोत्र११. [सं.]

व्यवकलन—न. वजाबाकी; उणें करणें. [सं.] **व्यवकलित**–वि. वजा केलेलें. [सं.]

व्यवच्छिन्न—वि. १ निराळा; वेगळा केलेला. २ विशेष, भिन्न मानलेला; अपवादित. [सं.] **व्यवच्छेद**–१ निराळेपणा; विशिष्टीकरण. २ अपवाद. ३ पृथक्करण. ४ छेदन; कर्तन. [सं.] **व्यवच्छेदक**–वि. व्यवच्छेद करणारा. **व्यवच्छेद जीवन क्रिया**–स्त्री. (शाप. प्राणि) पृथक्करणपूर्वक अपचय. (इं.) कॅटॅबोलियम्. **व्यवच्छेदन**–न. (वैद्यक) फाडाफाडी; शस्त्रक्रिया. [सं.]

व्यवधान—न. १ आड येणें, असणें. 'डोंगराचे व्यवधानानें सुर्य दिसत नाहीं.' २ मध्यवर्ती अवकाश; अंतर. ३ आड येणारी वस्तु; अडचण. 'तयाचिया ठायीं ज्ञान। या बोला म्हणती व्यवधान।' –ज्ञा १३.६२२. ४ अडथळा; प्रतिबंध (प्रतिबंध करणारी वस्तु किंवा कारण). 'भिंगानें वायूचें व्यवधान होतें. पण दृष्टीचें व्यवधान होत नाहीं.' ५ खंड; थोडा विराम; गतिरोध (सुरू असलेल्या कामांत). ६ दुर्लक्ष. 'पत्रिका पहावी सावधान। विलंब न करावा व्यवधान। प्रातःकाळीं न्याहे लग्न। ऐशिया समयीं पावावें।' –एरुस्व १५ ६१. ७ उशीर; वेळ. 'नाहीं लग्नासी व्यवधान। वेगीं करा फळार्पण।' –एरुस्व १५. ६१. [सं.] **व्यवधायक**–वि. १ मध्यें, आड येणारा. २ प्रतिबंध, अडथळा करणारा. [सं.]

व्यवसा—(प्र.) व्यवसाय पहा.

व्यवसाय—पु. १ धंदा; व्यापार; व्यवहार. –ज्ञा १३.५५६. २ खात्री; निश्चय. ३ खटाटोप; श्रम; सतत काम. 'तरी कीर्तनाचेनि नटनाचे। नाशिले व्यवसाय प्रायश्चितांचे।' –ज्ञा ९.१९७. **व्यवसायात्मक**–वि. निवडानिवड करणारी. –गीर १३६. **व्यवसायी, व्यवसायक–ईक, व्यवसाई**–वि. १ व्यापारी; धंदा करणारा. 'तो मार्गी करून व्यवसाइक। त्या वंजारें वृषभ कटक' –नव २४.१७६. २ खटपटी; उद्योगी. **व्यवसित**–वि. निश्चित केलेलें; ठरविलेलें. **व्यावसायिक**–वि. व्यवसाय, उद्योग करणारा; व्यापारी. 'कृषिक नव जाती कृषिके। तीर्थयात्रेसी पाथिकें। व्यवहार सांडिला व्यावसायिकें। धेनु वंना नवजाती।' –मुहरिश्चंद्राख्यान (नवनीत पृ. १८६).

व्यवस्था—स्त्री. १ योजना; तजवीज. २ निर्णय; निकाल; शेवट. ३ कायद्याचें मत; कायदा. ४ मत. 'तरी अर्जुनिवरी पार्था। सांडी सांडी हे व्यवस्था।' –ज्ञा ११ ६३१. ५ रचना; प्रकार. 'या लागीं तया पार्था। विश्वतोमुख हे व्यवस्था। आली वाक्पथा। श्रुतीचिया।' –ज्ञा १३.८८०. ६ गणती; मोजदाद. 'पै महोदधीचिया तरंगा। व्यवस्था धरूं नये जवीं गा' –ज्ञा १० ३०१. ७ वर्णनसंगती. 'तैसें टणकोनी सर्वथा। हें तें ऐशीं व्यवस्था।' –अमृ ७.११८. [सं,] **व्यवस्थेणें**–उक्रि. ठरविणें; निश्चित करणें. 'जें अतींद्रिय म्हणोनि व्यवस्थिलें।' –ज्ञा ११. १५९. **व्यवस्थापक**–वि. व्यवस्था करणारा; लावणारा. –पु. कारभारी; मॅनेजर. **व्यवस्थापत्र**–न. आपल्या मरणानंतर आपल्या मिळकतीची कशा प्रकारें व्यवस्था लावावी यासंबंधलचा लेख; मृत्युपत्र. **व्यवस्थापन**–न व्यवस्था करणें; तजवीज; रचना **व्यवस्थापित**–वि. व्यवस्था केलेलें; नियोजिलेलें. **व्यवस्थित**–वि. १ नीट; चांगलें ठेवलेलें, रचलेलें, योजलेलें (काम, वस्तु, पद्धत इ०). २ यथायोग्य; खरें. 'गुण ते ते व्यवस्थित। दोषचि मानी' –ज्ञा १८.७२७. ३ पद्धतशीर; शिस्तीचा; बेतशीर (माणूस).

व्यवहर्ता—वि. व्यवहार चालविणारा, पाहणारा; व्यवस्थापक; चालक. [सं.] **व्यवहर्तृत्व**–न. व्यवस्था; देखरेख; कार्य कर्तृत्व.

व्यवहार—पु १ कार्य; क्रिया; व्यापार. २ वहिवाट; पद्धत; रीत. ३ धंदा; देवघेव; व्यापार. –ज्ञा ७.२६. ४ व्यवसाय;

उद्योग; काम. ५ न्यायालयाची वहिवाट; कोर्टाची रीत. ६ खटला; चौकशी. 'कोणत्याही व्यवहाराचा निर्णय करतांना सात सभासदांचे सल्ल्यानें निकाल करावा।'–टि १.१६०. ७ न्यायालयांत निर्णयासाठीं येणारी गोष्ट. ८ योग्य वर्तणूक, वर्तन. ९ भांडवल. 'कृतघ्ना उपेगु केला। कां चोरा व्यवहारु दिधला।' –ज्ञा १३.७२८. १०. संज्ञा. 'मग उत्तम ओघ सिंधु। हा नुरेचि व्यवहारभेदु।' –ज्ञा १६.१३९. [सं.] **०कुशल-चतुर-दक्ष-द्रष्टा-निपुण**–वि. व्यवहारांत हुषार, तरबेज, तज्ज्ञ. **०दर्शन**–न. न्यायतत्त्वशास्त्राचा अभ्यास. 'राजानें व्यवहारदर्शन नित्य करीत असावें.' **०धर्म**–पु. व्यवहारशास्त्र पहा. **०पद्**–न. १ खटला होण्यासारखी गोष्ट. २ खटला; कायदेशीर इलाज. **०यात्रा**–स्त्री. व्यवसाय; व्यवहारक्रम. 'शब्दांच्या व विचारांच्या भरभक्कम शिदोरीवरच सगळे लेखक, वक्ते, धर्मोपदेशक, वगैरे लोकांची व्यवहारयात्रा चालते.'–शर (प्रस्तावना). **०विषय**–पु. व्यवहारपद पहा. **०शास्त्र**–न. सामाजिक चालीरीती, व्यवहार यांसंबंधी नियम. याच्या उलट धर्मशास्त्र. **०शुद्ध**–वि. योग्य वर्तनाचें, व्यवहाराचें; चोख. **०शून्य-ज्ञानशून्य**–वि. व्यवहाराच्या कामीं अडाणी; रीतीचा व्यवहार माहीत नसलेला. **०ज्ञ**–वि. १ वयांत आलेला; अज्ञान नसलेला; सज्ञान (कायद्याच्या दृष्टीनें). २ व्यवहारांत कुशल; तरबेज. **०ज्ञान**–न. व्यवहारासंबंधी चांगली माहिती. **व्यवहारणें**–उक्रि. योग्य कामीं लावणें; उपयोजणें. 'मनप्रवर्ते इंद्रियद्वारे। बाह्यविषयीं व्यवहारे।' –परमा ६.१२. **व्यवहारि(री)क**–वि. व्यावहारिक पहा. **व्यवहारी**–वि. १ व्यवसायांत, धंद्यांत गुंतलेला; धंदेवाईक. २ व्यापारी. **व्यवहारी अपूर्णांक**–पु. (गणित) एका संख्येचे वाटेल तितके भाग पाडून त्यांपैकीं कांहीं घेणें. **व्यवहारी ज्योतिषी**–पु. मुंज, लग्न इ० चें आन्हिक चालविणारा ब्राह्मण; कांहीं ठिकाणीं याच्याकडे धर्माधिकाऱ्याचेहि हक्क असतात. **व्यवहारी रुपानी**–स्त्री. (गणित) रुपयाचे पैसे कितीहि असले तरी १६ गंडे (खुर्दातले) म्हणजे १ रुपाया असा हिशेब करणें. **व्यवहार्य**–वि. १ उपयोगाला, व्यवहाराला योग्य, अवश्य, शक्य (मनुष्य, वस्तु इ०). २ अनुसरण्याला, करण्याला योग्य (धंदा, उद्योग). ३ कायदेशीर इलाज करण्याजोगा. **व्यावहारिक**–वि. १ व्यवहारासंबंधी (भाषा, लिपि इ०). २ रूढ; सामान्य; नेहमीचें. ३ व्यवहारोपयोगी; व्यवहाराला योग्य, इष्ट. [सं.] **०अपूर्णांक**–पु. व्यवहारी अपूर्णांक पहा. **०दिवस**–पु (ज्यो.) मध्यम सौरदिवस. हा रात्रीं १२ पासून दुसऱ्या रात्रीं १२ पर्यंत धरतात. (इं.) सिव्हिल डे. **०नाम-नांव**–न. १ प्रचारांतील, परिचयाचें नांव; चालतें-वाहतें नांव. उदा० आण्णा, आबा, आत्या इ०. २ नक्षत्र नामाखेरीज मुलामुलीचें नांव ठेवतात तें. उदा० गणेश, नर्मदा इ० **०नीति**–स्त्री. शिष्टाचार; सामान्य, व्यवहारांतील नीति. **०वर्ष**–न. सरकारी वर्ष (३६५ दिवसांचें); कायद्याप्रमाणें ठरलेलें वर्ष. **०शिक्षण**–न. १ व्यवहार करण्यास उपयुक्त असें शिक्षण. याच्या उलट पुस्तकी शिक्षण. २ धंदेशिक्षण.

व्यवहित—वि. अडथळ्यामुळ थांबलेलें; प्रतिबंध केलें गेलेलें. व्यवधान पहा. 'ते अव्यवहिता भक्ति, तद्विलक्षण। व्यवहिता भक्ति तो दोष न असावा।' –यथादी १८.२४३८.

व्यवहृत—वि. उपयोजिलेलें; व्यवहारविषय केलेलें. व्यवहार पहा.

व्यवाय—पु. संभोग; रति. 'तिनें गर्भारपणी आनंदयुक्त व भ्रतारापासुन निराळें म्हणजे व्यवायाशिवाय रहावें.' –बाचि २. [सं.]

व्यष्टणें—क्रि. व्यापणें. 'मी माझिया विभूति। आणि व्यष्टलिया व्यक्ति।' –ज्ञा १० १०७. [वेष्टणें]

व्यष्टि—स्त्री. १ एकेकशः, व्यक्तिशः, व्याप्ति; अवयवभूत, विभाजित संस्थिति; एखाद्या समुच्चयाचा, मिश्रणाचा अंशविशेष किंवा व्यक्ति; जातींतील, वर्गांतील एक. याच्या उलट समष्टि. २ देह; पिंड. [सं.] **०ग्रह**–पु अवयवांचा, व्यक्तींचा बोध, ग्रह. याच्या उलट समष्टिग्रह. **०रूप**–वि. वैयक्तिक. 'व्यष्टिरूप सत्तेची परमावधी करून...अभिनंदन करितो.' –धनुर्भग २०.

व्यसन—न. १ आसक्ति; चट; नाद; छंद. 'जो गुरुसेवा व्यसनें सव्यसनु निरंतर।' –ज्ञा १३.४४३. २ वाईट, दुष्ट संवय; खोड. ३ अडचण. 'सांगें पैलतीरा जावें। ऐसें व्यसन कां जेथ पावे।' –ज्ञा ३.४७. ४ पाप; गुन्हा; दुराचरण. ५ तन्मयता; एकसारखें लक्ष. ६ संकट; आपत्ति. 'नीच व्यसनीं बुडतां निंदिति देवास न स्वकर्मास।' –मोकर्ण [सं] **समान व्यसनाचें सख्य**–न. १ एकाच व्यवसायाच्या, आवडीच्या, संवयीच्या माणसांची एकी. २ संवय इ०च्या सारखेपणामुळें होणारें सख्य. ३ सारख्याच संकटांत पडलेल्यांचें सख्य. ४ सामान्य विपत्तीमुळें होणारें सख्य. **व्यसनाईत**–वि. १ व्यसनी. २ (ल.) अभिलाषी. 'आम्ही व्यसनाईतु आवघे। कांहीं जाणौंचिना।' –ऋ २८. **व्यसनी, व्यसनीक**–वि. १ खोडी, चट, संवय असलेला; दुराचरणी. २ नादी; छांदिष्ट.

व्यंसित(करण)—न. (नृत्य) आलीढस्थान करून हात रेचित करून वक्षःस्थलावर ठेवणें व उंच करून खालीं सोडणें.[सं.]

व्यसुता—स्त्री. मरण; मृत्यु. 'मुनि सांगे वर्षांतीं येइल त्या भूप-पुत्रका व्यसुता।' –मोवन १३.२०. [सं. वि+असु+ता]

व्यस्त—वि. १ वेगळा; पृथक्; भिन्न. २ उलटपा, विपरीत क्रमाचा. 'कालक्रीडित हें बघून रडला, हें व्यस्त कांहीं नसे।'

–केक ५३. ३ गोंधळलेला; बावरलेला; अस्वस्थ. ४ सर्वत्र पसरलेला; वांटलेला; पृथक्भूत असलेला. व्यष्टि पहा. ५ (गणित) दोन परिमेयांचा परस्पराशीं असा संबंध कीं एक वाढतांना दुसरें कमी होत जावयाचें; विपरीत. [सं.] **०प्रमाण**–न. (गणित) एक कमी झालें असतां दुसरें वाढणारें प्रमाण. **व्यस्ताव्यस्त**–वि. १ अस्ताव्यस्त पहा. २ वेडेवांकडें. 'व्यस्ताव्यस्त गातां बोलतां सुशब्दें सन्मानिती।' –सप्र १९.११. **व्यस्ती**–वि. उफराटी; व्यस्त. 'बहु असत्क्रिया व्यस्ती। या नांव बद्ध।' –दा ५.७.३५.

व्यहाळ—न. अरण्य. व्याहाळ पहा. **व्यहाळी**–स्त्री. पारध; शिकार (क्रि० उठणें). 'तया तैशाकाळीं शबरहि व्यहाळीस उठिला।' –आमृगीचरित्र २.

व्यक्षर—वि. निरक्षर. [सं.]

व्याकरण—न. १ भाषेचा व्यवहार कोणत्या नियमांस अनुसरून होतो हें सांगणारें शास्त्र. यांत शब्दसिद्धि–जाति–संबंध इ० चें विवेचन केलें असतें. २ विस्तार करणें. –गीर १३३. [सं.] **०कार, व्याकरणी**–पु. वैयाकरण; व्याकरणकोविद. 'व्याकरणकार शब्द साधिती। त्याच्या नामाचा अनेक अर्थ करिती।' **व्याकरणें**–क्रि. विस्तारणें; विवेचणें. 'धरूनि येथें स्फुट या श्रुतीतें। यथामति व्याकरिजेल तीतें।' –वामन, नामसुधा ३ (३) ३३.

व्याकुल–ळ, व्याकूळ, व्याकुलित—वि. १ शोक, हर्ष, भय इ० कानीं व्याप्त, आर्त, ग्रस्त. २ शारीरिक–मानसिक वेदनांनीं पीडित झालेला; बेचैन; विव्हळ. 'हरिणास एक बाण लागतांच व्याकुळ होऊन पडला.' ३ मग्न; लुब्ध; आपन्न याअर्थी लेखांतून पुढील शब्दांशीं संयोग करून वापरतात. हर्ष, आशा, आनंद, क्रोध, काम, चिंता, क्षुधा, इ०. ४ (ल.) चंचल. 'प्रतिबिंब सुय तें व्याकुळ।' –विपू ५.४४. [सं. व्याकुल] **व्याकुळणें**–अक्रि. व्याकुळ होणें. 'चंचळ मानसें व्याकुळला।' –दावि १७.९.

व्याकृत—वि. १ विवेचिलेलें; फोड केलेलें. २ स्पष्ट; उघड; ज्ञात (कोणत्याहि इंद्रियास). [सं.]

व्याक्रोश—पु. मोठ्यानें आक्रोश, शोक. [सं. वि+आक्रोश]

व्याख्य—स्त्री. व्याख्या पहा. 'जेणें जीवेश्वराचें ऐक्य। तया पदत्रयाची व्याख्य।' –विउ १.७. **व्याख्या**–स्त्री. १ विवेचन; स्पष्टीकरण; अर्थ. २ टीका; भाष्य; अर्थाची फोड, छाननी. ३ सविस्तर वर्णन; लक्षणें, गुणधर्म, प्रयोजन इ० चें निरूपण. ४ (गणित) संज्ञार्थ; निरुक्ति. ५ (व्यापक) गुप्त गोष्टीचा बोभाडा; परिस्फोट (दोष, गुप्त इ० चा). ७ हेटाळणी; औपरोधिक वर्णन; टिंगल. [सं.] **व्याख्या करणें**–एक गोष्ट इतर सर्वांहून कोणत्या बाबतींत भिन्न आहे हें निश्चितपणें सांगणें. **०गम्य**–वि. टीकेची, विवरणाची जरुरी असलेलें. **व्याख्यात**–वि. १ व्याख्या झाली आहे असा; फोड केलेला. २ बोललेला; म्हटलेला. **व्याख्याता**–पु. १ व्याख्या करणारा; टीकाकार. २ वक्ता; व्याख्यान देणारा. **व्याख्यान**–न. १ ग्रंथ, वाक्य, श्लोक इ० ची फोड करणें; अर्थविवेचन. २ (सामा.) विवरण; प्रवचन. 'एवं प्रकारें करून। केलें मंगळाशुभाचें व्याख्यान।' –रास १.२९८. ३ जाहीरभाषण, विषयप्रतिपादन; कीर्तन. 'तें व्याख्यानीं निवाले सज्जन।' –दावि २६८; 'तो कोणत्याहि निषयावर व्याख्यान मुरेख करीत असे.' –नि ३२१. ४ (ल.) सबबी; आड मुद्दे; अळंटळं.

व्याग—पु. (कुंभारी) उत्तरक्रिया. –बदलापूर ७७. [सं. याग?]

व्याघात—पु. १ खंड; विराम; थांबणूक. 'तुम्ही एथें गोष्टी सांगू नका आमचे अध्ययनांत व्याघात होतो'. २ अडथळा; प्रतिबंध; आडकाठी. ३ आघात; तडाखा. ४ (ज्यो.) (सत्तावीस योगांतील) तेरावा योग. ५ एक अर्थालंकार. ज्या साधनानें एकजण कार्य करतो, त्याच साधनानें दुसरा त्याच्या उलट व यशस्वी कार्य करतो असें वर्णन. उद० 'रुद्रें नेत्रें केलें भस्म मनसिजा जनांस जो प्रेष्ठ। रमणीं सजीव करि त्या नेत्रें, रुद्राहुनीहि ती श्रेष्ठ।'.

व्याघ्र—पु. वाघ; शार्दूल. 'जें व्याघ्राचें क्षेत्र। जें पण्यांगनेचें मैत्र। जें विषयविज्ञान यंत्र। सुपूजित।' –ज्ञा ८.१४६. [सं.] **०कांती**–वि. (उन्हांत) वाघासारखा दिसणारा (घोडा). **०नख**–न १ वाघनख. २ मुलाचा एक दागिना. ३ एक सुगंधी पदार्थ. **० ख**–न. १ ज्यांचीं मूलतत्त्वें हस्तगत होण्यास कठीण पडतें असें शास्त्र, कला. २ दुर्बोध, घोंटाळ्याचें कोणतहि शास्त्र, ग्रंथ, वाक्य इ०. **०मुखी**–वि. तोंडाशीं रुंद असून मागें निमूळता होणारा जमीनीचा तुकडा. **व्याघ्रांबर**–न. पांघरण्यासाठीं उपयोग करावयाचें वाघाचें कातडें. 'नाहीं नाहीं चर्मांआंतु। कृष्णाजिन व्याघ्रांबर।' –तुगा ३४२. **व्याघ्रांबरी**–स्त्री. १ एक क्षुद्रदेवता. २ (ल.) डाग पडलेली, जळकी भाकरी (वाघाच्या अंगावरील ठिपक्यांप्रमाणें डाग दिसतात यावरून). ३ एक वस्त्र.

व्याज—न. १ पैशाच्या वापरास द्यावी लागणारी किंमत. वृद्धि; ही पैशाचा पुरवठा व मागणी यावर अवलंबून राहते. –व्यापारी उलाढाली (प्रो. काळेकृत). २ (गणित) मुद्दलावर मुदतीप्रमाणें होणारी वाढ. [सं. वृद्धि; म. वाढ; हिं. ब्याजू] **०कटावणी**–स्त्री. कटमितीनें व्याजाचा आकार करण्याची पद्धत. **०खाऊ–खोर**–वि. १ फार व्याज घेणारा. २ व्याजबट्ट्याचा

व्यवहार करणारा. ३ व्याज असणारें (कर्ज). ०फैलावणी-१ जमेकडील आणि नांवेकडील व्याज वेगवेगळें काढून कमी असेल तें अधिकांत वजा करून बाकी काढणें. २ संबंध मुदतीचें किंवा वर्षाचें व्याज आकारण्याचा प्रकार. याच्या उलट व्याज-कटावणी. ०बट्टा-पु. (व्यापकपणें) सराफी व्यवहार. (कर्जाऊ रकमा देणें, नाणीं वटावणें, हुंड्यापांड्या देणेंघेणें, इ०). ०भरी-वि. कर्जांत बुडून व्याजावारी ज्याचें संबंध उत्पन्न जातें आहे असा. व्याजाऊ, व्याजी-जू-वि. व्याज असणारें (कर्ज). व्याजानें दिली-घेतलेली (रक्कम)

व्याज—न. १ निमित्त; कारण. ' जें धर्मालय म्हणिजे । तेथ पांडव आणि माझे । गेले असती व्याजें । जुंझाचेनि । '—ज्ञा १.८६. २ मिष; कपट; ढोंग. ' व्याज न जेथें नसे वक्रता, उपचारांची पीडा । ' —टिक २८. ३ रूप; वेष; बुंथी: ४ सबब; बतावणी. ' पितृवचनाचें करूनि व्याजें । वना आलास तूं रघुराज । ' —रावि २२.१८. [सं.] ०निंदा-स्त्री. एक अर्थालंकार. खोटी निंदा; बाहेरून निंदा दिसावी पण गर्भितार्थे स्तुतिपर असावा; प्रच्छन्न-स्तुति. या शब्दाचे इतर अर्थहि उलटसुलट आहेत. १ एकाच्या निंदेनें दुसऱ्याची निंदा करणें. उदा० ' मीच मूर्ख म्हणून तुला हें काम सांगितलें '. २ प्रच्छन्न निंदा; व्याजस्तुति. ०स्तुति-स्त्री. एक अर्थालंकार. स्तुति करण्याच्या मिषानें निंदा किंवा निंदा करण्याच्या मिषानें स्तुति केली असतां हा अलंकार होतो. उदा० (कोणी मुलगा पहिल्यापेक्षां बाईट वाचूं लागल्यास) ' वाहवा ! आतां तर तूं फार चांगलें वाचूं लागलास; तसेंच ' (निंदेच्या योगें स्तुति).' आज एवढया पहांटेस उठून धडा पाठ करायाची ही अवदसा तुला कोठून आठवली ? '. व्याजोक्ति-स्त्री. एक अलंकार. मनांतून जें बोलावयाचें तें स्पष्ट न बालतां निमित्तांतरानें भाषण करून त्यांत स्वाभिप्रेत अर्थ आणावयाचा २ गुप्त गोष्ट, स्वरूप प्रगट झालें असतां तें कांहीं सबबी सांगून लपवून टाकावयाचें.

व्याजबी—वि वाजबी पहा.

व्याज्य—न. चिंता; घोर. ' काय तुलारे लागलें व्याज्य । ' —दावि ४३२.

व्याध—पु. १ पारधी; शिकारी. ' कां गोरिचिया भुली । मृग व्याधा दृष्टि न घाली । ' —ज्ञा १३.७३९. २ एक नक्षत्र; लुब्धक पहा. [सं]

व्याध—(प्र).व्याधि पहा. **व्याधि**-स्त्री. (संकृत शब्द पु.) १ शरीरव्यथा; रोग; आजार. हा शब्द आधि शब्दाशीं जोडूनहि येतो. ' कृष्ण पावलिया आधिव्याधी । जाती त्रिशुद्धी सर्वथा । ' —एरुस्व १३.७९. २ रक्तपिती; महारोग. ३ (व्यापक) संकट: आपत्ति. ४ पीडा; त्रास; लचांड. ५ अवाच्य, त्रासदायक पोरास निंदार्थी म्हणतात. [सं.] **व्याधित**-वि. रोगी; आजारी. [सं.] **व्याधिष्ठ-ष्टु**-वि. रक्तपिती, क्षय, शूल इ० मोठा आजार जडलेला; व्याधिग्रस्त.

व्यान—पु. पंचप्राणवायूंपैकीं एक; हा सर्व शरीर व्यापून राहतो. ' देह जसा व्यापिला सदा व्यानें । '—मोआदि ३४.२५; —ज्ञा १८.३३८. [सं.]

व्याप—पु. १ सतत वास, लक्ष, व्यग्र असणें, एकसारखें व्याप्त, उद्योगांत निमग्न असणें. ' तनु धन, विषयाचा । सर्व जो जो पसारा । अनृतचि परि माझा । त्यामध्यें व्याप सारा । ' २ प्रापंचिक उद्योग व त्रास; आयुष्यांतील हालअपेष्टा, कष्ट, इ०. ३ पसारा; विस्तार; मोठा व्यवहार. ' जितुका व्याप तितुकें वैभव ।' —दा १४.६.२६. ४ उपव्याप. [सं. वि+आप] **म्ह**० व्याप तितका संताप. **व्यापक**-वि. १ व्यापणारा; आच्छादणारा; सर्व विस्तार आपल्यांत घेणारा. २ पूर्णपणें भेदणारा व आक्रमणारा. ३ अंतर्भाव, समावेश करणारा; सर्व पोटांत घेणारा. ' मनुष्यत्व जाति ब्राह्मणत्वजातिपेक्षां व्यापक '. ४ पसरणारा; विस्तार पावणारा. ५ मोठ्या, उदार विचाराचा (माणूस). ' तेथें भले आडळती । व्यापक तेहि कळों येती । ' —दा १९.२.२१. **व्यापणें**-उक्रि. आच्छादणें; पोटांत घेणें; समाविष्ट करणें (ल. व शब्दशः). —अक्रि. १ पसरणें; व्याप्त होणें. २ भिनणें; फैलावणें (विषादि अंगांत). ' विष जों सर्वांगीं व्यापलें नाहीं तोंपर्यंत उपाय चालतो.' **व्यापन**-न १ आक्रमण; प्रसरण. २ समावेशन; व्यापण्याचा व्यापार. [सं.] **व्यापी**-वि. व्यापणारा; पसरणारा; समावेश करणारा. (समासांत उपयोग) जगद्व्यापी; सर्वव्यापी. **व्याप्त, व्यापित**-वि. १ व्यापलेला; आच्छादलेला; समाविष्ट केलेला. २ जिरलेला; मुरलेला. ३ परिपूर्ण; भरलेलें. ४ लब्ध; प्राप्त. **व्याप्ति**-स्त्री. १ आक्रमण; सर्वत्र विद्यमानता. २ विश्वव्यापकता; शिवादि देवतेचें एक अभिधान. ३ (सामा.) विस्तार; पसारा; व्याप. ' देखें हे शब्दाची व्याप्ति । ' —ज्ञा २.११४. ४ प्राप्ति; मिळकत. ५ (शाप.) वर्गीकरण; विभागणी. ६ (शाप.) स्थान; अस्तित्वाचें, मिळण्याचें ठिकाण. —सेंपू १.६३. ७ (तर्कशास्त्र) निकट व अविभाज्य साहचर्य; निश्चित अनुमानकारण. ' अग्नीची व्याप्ति धूमावर. ' (धुरामध्यें अग्नीचा समावेश असतोच, तेव्हां अग्नीच्या अस्तित्वाचें अनुमान निश्चित). **व्याप्य**-वि. १ व्यापावयाचें किंवा व्यापलेलें; आक्रमित. २ समाविष्ट व्हावयाचें किंवा झालेलें; अंतर्भूत. ३ (तर्कशास्त्र) अनुमानविषय असलेलें. ०कोटि-स्त्री अंतर्भूतवर्ग; गौण, पोटविषय, वर्ग व्याप्यकोटि-प्रविष्ट-अंतर्गत इ० समास. ०वृत्ति-स्त्री. (तर्क.) निरंतर साहचर्य. व्यापन. -वि. नेहमीं बरोबर, चिकटून असणारें; अंतर्वर्ती, अनुषक्त असणारें. ०व्यापक भाव-पु. एक व्याप्य आणि एक व्यापक असा भयतांचा संबंध.

व्यापादणें—क्रि. मारणें; नाश करणें. [सं. व्यापादन]

व्यापार—पु. १ काम; कर्म; कृत्य. 'कां निमेषोन्मेषांचे व्यापार' –एभा २.४३३. २ क्रिया; व्यवहार; कार्य; उद्योग 'मेंदूला रोग झाल्यास त्याचे व्यापार बंद पडतात.' ३ हालचाल; चलनवलन; चळवळ. ४ धंदा; उदीम; व्यवसाय; देवघेव; व्यवहार. 'लुगड्यांचा, भांडयांचा इ० व्यापार.' [सं.] **अव्यापारेषु व्यापार**–पु. ज्यांत कांहीं संबंध नाहीं अशा गोष्टी करणें; नसत्या भानगडी करणें. 'सरकारी शाळांची कशी काय व्यवस्था असते व तेथील विद्याभ्यासाच्या मानानें कोणत्या तऱ्हेचीं पुस्तकें तेथें चालणें जरूर आहे याविषयीं या पुस्तकांत उठाठेव करणें म्हणजे अव्यापारेषु व्यापार होणार' –नि. **व्यापारक**–पु. (शाप.) योगवाही साधन. (इं.) कॅटॅलिटिक एजंट. 'धातूंचें आसिडावर जितकें त्वरित कार्य घडतें, तितकें आल्कोहोलांचें आसिडांवर घडत नाहीं, दुसऱ्या व्यापारकाची मदत लागते.' –सेंपू १.२२२. **व्यापारणें**–उक्रि. १ कामाला लावणें; वापरणें; ज्याच्या त्याच्या विशिष्ट, योग्य कारणाला लावणें. –अक्रि. क्रिया करणें. 'तैसें प्रकृति आघारें । कर्मेंद्रिय विकारें । निष्कर्म्युंही व्यापारे । निरंतर ।' –ज्ञा ३.६२. **व्यापारी**–पु. १ व्यापार, धंदा करणारा; दुकानदार; देवघेव करणारा. २ उपयोग करणारा; उपयोगास लावणारा; चालना देणारा. ३ कर्मकर्ता; क्रियावान्. 'एऱ्हवीं चामाचे डोळेवरी । जे देखती देहवरी । ते कीरतो व्यापारी । ऐसेंचि मानिर्ती ।' –ज्ञा १८.४३७. –वि. व्यापार–वाणिज्य यासंबंधी; उदीमधंद्याचे. 'व्यापारी कायदा–पत्रव्यवहार इ०.' 'त्या चाचे लोकांच्या जहाजांनीं व्यापारी गलबतांवर हल्ला करावा.' –कोरकि ४. **व्यापारी व्यापारोपयोगी वारे**–पु.अप. (भूगोल) सतत वाहणारे आग्नेय वारे. हे व्यापारी गलबतांना हितकारक असतात. (इं.) ट्रेडविंड्स. **व्यापृत**–वि. १ उद्योगांत, उपयोगांत असलेला; योग्य मार्गी लावलेला. २ गुंतलेला; मग्न. 'कार्यव्यापृत.'

व्याम—पु. सहा फूट (पुरुष) लांबीचें माप; वांव. [सं.]

व्यामिश्र—वि. १ (शाप.) मिश्र; संकीर्ण. –सेंपू १.३. २ संदिग्ध; दुटप्पी. 'व्यामिश्रवाक्यें बुद्धीतें करिसी मोहल्यापरी।' (–गीता ३.२. टीका). [सं.]

व्यामोह, व्यामोहता—पु. १ भ्रम; मोह. –ज्ञा २.११०; १५.१०२. २ विस्मरण; स्मृतिनाश. [सं.]

व्यायाम—पु. १ दंड काढणें, जोडी फिरविणें इ० शरीरावयवास मेहनत देणारी क्रिया, खेळ. २ कसरत; मेहनत. ३ (सामा.) शरीराला चलनवलन होईल अशा प्रकारचा उद्योग. (आरोग्य आणि शरीरपोषण यासाठीं). ४ वांव; व्याम पहा. [सं.] **०शाळा**–स्त्री. व्यायाम, मेहनत करण्याचें ठिकाण; आखाडा, तालीम. (इं.) जिम्नॅशिअम.

व्याल—पु. १ हत्ती. २ साप; सर्प. –ज्ञा १५.४२०. [सं.] **व्याली**–स्त्री. सर्पिणी. **व्यालनकुल न्याय**–साप आणि मुंगूस हे एकमेकांचे शत्रू आहेत. यावरून हाडवैराचा संबंध.

व्याली—वि. (प्र.) व्यालेली. –स्त्री. १ नुकतीच बाळंत झालेली स्त्री. २ विणारी; मूल प्रसवणारी स्त्री. 'तानयाचे लळे पुरवणें । हे व्यालीची वेदना व्याली जाणें ।' –एभा २९.४९२. ३ जन्मदात्री आई. –एभा ३.६०७. 'व्यालीचा कळवळा । जीव बहुत कोंवळा ।' –तुगा १९७५. **म्हo** व्यालींच्या वेदना व्यालीस कळेत वांझेस काय समजे.

व्यावर्तित(अंगुली)—स्त्री.(नृत्य) एका हातानें दुसऱ्या हाताच्या कनिष्ठिकेपासून आरंभ करून त्या हाताच्या आंतल्या बाजूनें बाहेरील बाजूस वेढा घालणें.

व्यावृत्त—वि. १ अलग; भिन्न केलेला. २ बाहेर टाकलेला; वगळलेला. [सं.] **व्यावृत्ति**–स्त्री. १ वेगळेपणा; उच्चाटण; वगळणूक. 'चक्षूस दिव्य हें विशेषण दिल्यानें चर्मचक्षूची व्यावृत्ति होते.' या अर्थाचे सामाशब्द–दोष–भय–रोग–विघ्न–व्यावृत्ति. २ निराळेपणा; भिन्नपणा. 'घटादिक कार्याचे ठायीं मृत्तिकात्वाची अनुवृत्ति आहे परंतु मृत्तिकेचे ठायीं घटत्वादि धर्माची व्यावृत्ति.' ३ व्यतिरेक; नाहींपणा. ४ त्याग; खंडन. ५ निरास. –अमृ ५.१०. [सं.] **व्यावर्तक**–वि. १ वगळणारा; दूर करणारा; निराळा ठेवणारा. २ भिन्नभिन्न; निरनिराळा. 'वरील पद्धतीनुसार जबाबदार पद्धतीचें अस्तित्व अगर तिचा अभाव या गोष्टींकडे लक्ष देतां वसाहतींचे डोमिनिअन्स व क्राउन कॉलनीज असे दोन व्यावर्तक विभाग पाडतां आले असते.' –वसा १५. **व्यावर्त्य**–वि. वगळणारा; वेगळे करण्यास शक्य, योग्य, जरूर.

व्यावृत्ति—स्त्री. १ मनाचा गोंधळ; गडबड; अस्वस्थता. 'मी मोठया व्यावृत्तींत सांपडलों.' २ संकट; आपत्ति. 'तो काय हो व्यावृत्तींत पडला, घटकेमध्यें मरणार.' ३ त्रास; दगदग; लचांड. 'प्रपंचाची–लग्नाची–दुखणेकऱ्याची–पोराची–व्यावृत्ति.' ४ अडचण; कित्; आक्षेप. 'ज्याच्या मनांत कोणत्याहि गोष्टीविषयीं व्यावृत्ति नाहीं तो सालाधाला.' [सं. वि+वृत्ति]

व्यास—पु. १ (भूमिति) वर्तुळपरिघाच्या एका बिंदूपासून निघून मध्यबिंदूंतून समोरच्या बिंदूपर्यंत जाणारी सरळ रेषा; ही त्रिज्येच्या दुप्पट असते. २ विस्तार. [सं.] **०खंड, व्यासार्ध**–नपु. त्रिज्या.

व्यास—पु. १ महाभारत व पुराणें ज्यानें रचिलीं तो ऋषि. २ ज्यानें वेदांच्या संहिता केल्या तो ऋषि. कृष्ण द्वैपायन; बादरायण. 'तेथ व्यासादिकांच्या मती । तेचि मेखळा मिरवती ।' –ज्ञा १.९. २ पुराणिक; प्रवचनकार. [सं.] **०पीठ**–न. १ पुराणिकाचें आसन. २ पोथी ज्यावर ठेवतात ती घडवंची. ३ उच्चासन.

(इं.) डायस (सभागृहांतील). **॰पूजा**–स्त्री. पुराणसमाप्तीच्या वेळीं पुराणिकाची पूजा, बहुमान करतात तो. २ नेहमीच्या पुराणिकाची कार्तिकपौर्णिमेस जी पूजा करतात ती. ३ आषाढी पौर्णिमेस गुरु, संन्यासी इ० ची जी पूजा करतात ती. **व्यासासन**–न. व्यासपीठ. **व्यासो नारायण**–व्यास. अर्थ १ पहा.

व्यासंग—पु. १ एकसारखा परिश्रम, उद्योग (विद्या, कला इ० विषयीं). २ काळजीपूर्वक अभ्यास. ३ नाद. (समासांत) अध्ययन–विद्या–विषय–स्त्री–धन–व्यासंग. [सं.] **व्यासंगी**–वि. व्यासंग असलेला; अभ्यासी; उद्योगी; लक्ष घालणारा (विशिष्ट विषयांत).

व्यासज्यवृत्ति—वि. १ एकापेक्षां अधिक विषयांशीं संबद्ध, विषयांत अंतर्भूत (गुणधर्म, अनुबंध इ०). २ (ल.) दुटप्पी; तडजोड करण्याच्या वृत्तीचा, स्वभावाचा. [सं. वि+आ+सज्+वृत्ति]

व्याहत—वि. १ अडविलेला; प्रतिरोध झालेला. २ परावृत्त; प्रतिहत. ३ आघात केला गेलेला; आहत पहा.

व्याहार—पु. भाषण. 'व्याहार व व्यवहार'–पकोघे (टीका कोल्हटकर ६१). [सं.]

व्याहाळ—न. अरण्य; ओसाड जागा; रान. 'न जाऊनी अरण्य–व्याहाळीं।' –मुवन १२.३५. **व्याहाळी**–स्त्री. (महानु.) शिकार. 'रावो व्याहाळीए बाहिरी नीगे।' –दृष्टांतपाठ ७७. –एभा १३.७०१. **व्याहाळी जाणें–निघणें**–शिकार करणें –एभा ६.३६४. 'तव राव गेला बाहेरा। व्याहाळीसि।' –कथा १.५.१२८. **व्याहाळणें**–शिकार करणें. –एभा ७.२६०.

व्याही—पु. स्वतःच्या मुलाचा किंवा मुलीचा सासरा. मुला-मुलीचे वडील परस्पर व्याही असतात; परस्परांचे विहिणींचेहि व्याही होतात. [सं. वैवाहिक; प्रा. वेवाहिअ; गु. वेवइ; बं. वेहाइ] **॰भोज–भाजन**–पुन. (लग्नांत) व्याह्यास विशेषतः मुलीच्या बापास दिलेली मेजवानी.

व्याहृती—स्त्री. गूढस्वर, मंत्र. भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्यं या सात व्याहृती आहेत. वेदमंत्राला आरंभ करण्यापूर्वी ओंकारपूर्वक यांचा उच्चार करण्यांत येतो.

व्याळ—पु. साप. 'जैसा नखाग्रीं व्याळु लागे। तो शिखांत व्यापी वेगें।' –ज्ञा १.२५६; –तुगा १३६१. नाग, भुजंग यांनाहि हा शब्द वापरतात. [सं. व्याल]

व्याळी—स्त्री. रात्रीचें भोजन. –शर. [वेप्रा. विआलिउ= सायंकाळचें भोजन; हिं. व्यालु. तुल० सं. विकाल; प्रा. विआल= संध्याकाल]

व्याक्षेप—पु. १ विघ्न; अडथळा; आडकाठी. २ खोळंबा. ३ अढी; अस्वास्थ्य. 'इतकीं माणसें बरोबर नेलीं तर त्याचे चित्तास व्याक्षेप येईल.' –सूर्योदय ३३३. [सं. वि+आक्षेप]

व्याक्षोभ—पु. क्षोभ; अस्वास्थ्य; खळबळ (राग, लोभ इ० विकारांमुळें होणारी). [सं. वि+आ+क्षोभ]

व्युत्क्रम—पु. १ उलट, विरुद्ध प्रकार; विपरीत, प्रतिगामी व्यवस्था. २ अव्यवस्था; गोंधळ. ३ (गणित) व्युत्क्रांत; उलट मांडणी; उदा० $\frac{1}{5}$ चा व्युत्क्रम ५ [सं.] **॰कोन**–पु. (भूमिति) समांतर रेषांतील विरुद्ध प्रतिकोन. (इं.) आल्टरनेट अँगल. **॰प्रमाण**–न. व्यस्त प्रमाण. 'कोणत्याही दोन प्रवाही पदार्थांची उंची व घनता व्युत्क्रम प्रमाणांत असतात तेव्हां ते परस्परांस तोलून धरितात' –मराठी ६ वें पुस्तक (१८७५) पृ. ९६. **॰भाव**–पु. उलट क्रम; विपरीतता. –शिक्षणमीमांसा ११५. **॰मिश्रगणित**–न. मिश्रगणिताचा एक प्रकार 'याच्या उलट मध्यममिश्रगणित.

व्युत्थान—न. उत्थान. उठणें; समाधि अवस्थेंतून बाहेर येणें. 'यालागीं समाधि आणि व्युत्थान। या दोन्ही अवस्था सहित जाण। बुद्धि होय ब्रह्मार्पण।' –एभा ९.२०९. [सं. वि+उत्थान]

व्युत्पत्ति—स्त्री. १ नैपुण्य; प्रावीण्य (विशेषतः शास्त्रांत); शास्त्रवाङ्मयाशीं परिचय, ज्ञान. 'तुझें नाम जरी ते पुसती। तरी बाहुक सांगे तयांप्रती। अश्वविद्येची व्युत्पत्ती। करी तेथें।' –कथा १.१०.२२. २ अर्थज्ञान (शब्दाचें विशिष्ट जागीं); विशिष्ट पदार्थास अनुगुण जी अर्थकल्पना ती. 'वैदिक या शब्दीं वेदातें जो जाणणारा किंवा वेदानें सांगितलें जें कर्म अशा दोनही व्युत्पत्ती संभवतात.' ३ शब्दाची घटना, उगम; निरुक्ति. ४ विद्वत्ता. –एभा २.४६३. ५ ज्ञान. –एभा २७.३४४. ६ उत्पत्ति; स्वरूप. –एभा ३.१२४. ७ हातोटी; युक्ति. 'स्वधर्म घडूं भगवद्भक्ती। ऐसी अति गुह्य आहे व्युत्पत्ति।' –एभा १८.३६७. ८ परिस्फुटता; व्याख्यान. 'वेदांतीं ब्रह्मस्थिती बोलिली मानी यथानिगुती। इतर स्तोत्रीं ब्रह्म व्युत्पत्ती। तेही अति प्रीति मानी तूं।' –एभा ८.१०१. ९ ज्ञानाचा गर्व; अभिमान 'एथ व्युत्पत्ति आघवी विसरिजे। जैं जगा धाकुटें होइजे। –ज्ञा ९. ३७८. [सं.] **व्युत्पन्न**–वि. १ शास्त्र आणि वाङ्मय यांत प्रवीण; विद्वान; पंडित. 'कवी व्युत्पन्नाची योग्यता।' –रामदास (नवनीत पृ. १६०). २ साधित; सामासिक (शब्द). ३ (पासून) निघालेला; उत्पन्न झालेला. **व्युत्पन्नत्व**–न. विद्वत्व. 'तया शरीर जें जालें अज्ञानाचें बीं विरुढलें। तयाचें व्युत्पन्नत्व गेलें। अज्ञानवेलीं।' –ज्ञा १३.८४०. **व्युत्पादक**–वि. ज्याच्या योगानें व्युत्पत्ति समजते, दाखविली जाते असा (ग्रंथ, भाषण, इ०); उत्पादक पहा.

व्यूह—पु. सैन्याची रचना. याचे विविध प्रकार आहेत: दंड–भोग–मंडल–असंहत–शकट–मकर–पताका–व्यूह. 'तसें दळ

दुर्धर। नाना व्यूहीं परिकर।' –ज्ञा १.९१. २ शत्रुपराजयार्थ युक्ति, मसलत. ३ (सामा.) कट; कारस्थान; विभू. (क्रि० रचणें; ढासळून टाकणें). 'या माझ्या मूर्ख मुलांना कांहीं सांगितलें नाहीं तर हा माझा व्यूह ढांसळून टाकील.' –गुप्तमंजूष. ३ मूर्ति; शरीर. 'पूजिला जी श्रीपती। चतुमूर्ती व्यूहरूपें।' –एभा ६.११६. [सं.] ४ (योग. तत्त्व.) शारीरिक किंवा इंद्रियांची विशिष्ट रचना. ०**चतुष्य**–न. सैन्यरचनेचे चार प्रकार–दंड, भोग, मंडल, असंहत इ०.

व्येखंड—न. (ग्राम्य) वेखंड पहा.

व्येवसाओ—(प्र.) व्यवसाय पहा. 'साधुसंगाचेनि भांडवलें। ज्ञानमार्गाचा व्येवसाओ फळें।' –शिशु ७३.

व्योम—न. आकाश. –अमृ ७.४५. [सं.] ०**कुसुम**–न. आकाशाचें फूल; खपुष्प. अशक्य गोष्ट. 'व्योमकुसुमांचा पांडवा। कवणें देंठ तोडावा।' –ज्ञा १५.२३५. ०**केश**–पु. महादेव; शंकर. ०**गामी**–वि. आकाशाकडे जाणारा. 'चित्तेसीं व्योम। गामिये करिती।' –ज्ञा ५.१५३.

व्रज—पु. १ गवळीवाडा; गोकुळ. –एभा १८.१५९. २ समुदाय; जमाव. [सं.] ०**प**–पु. गौळवाडयाचा मुख्य; गोकुळचा राजा (नंद). **व्रजांगना**–स्त्री. गोपी; गवळण. 'पाहें पां वालभाचेनि व्याजें। तिया व्रजांगनांचीं निजें।' –ज्ञा ९.४६५.

व्रजबंबू—वि. (व.) गलेलठ्ठ 'व्रजबंबू वाढला आहे नुसता.' [व्रज=(भटक्या)+बंबू]

व्रण—पु. १ क्षत; छिद्र; एक रोग. २ जखम; दुखापत; भेग. [सं.] ०**स्फोट**–पु. व्रण फुटणें, वाहणें. **व्रणित, व्रणी**–वि. व्रणविशिष्ट; क्षत पडलेला; जखमी झालेला.

व्रत—न. १ स्वत:ला लावून घेतलेला एखादा धार्मिक नियम, नेम; देहदंडाचा एक मार्ग. –ह ८.१०. (क्रि० घेणें.) २ असा नेम पाळण्याची केलेली प्रतिज्ञा, पण. ३ व्रीद; प्रतिज्ञा; बाणा. 'नतावनधृतव्रत ज्वलन तूंचि बा धावनीं।' –केका ६. [सं.] (वाप्र) **तीळ खाऊन व्रत मोडणें**–अगदीं क्षुल्लक कारणासाठीं, फायद्यासाठीं बाणा, नेम सोडणें. .सामाशब्द– ०**बंध**–पु. मुंज; यज्ञोपवीत धारण करणें. हें एक प्रकारचें व्रतच आहे. [सं.] ०**भिक्षा**–स्त्री. व्रतबंधाच्या आनुषंगिक कर्मांपैकीं एक; भिक्षा मागणें. [सं.] ०**वैकल्य**–न. १ व्रताची अपूर्णता; त्यांतील न्यूनता, कमीपणा. २ लहानसहान व्रतें, नेम इ० व्रत अर्थ १ पहा. ०**संग्रह**–पु. व्रत घेणें; व्रतस्थ असणें. **व्रतस्थ, व्रती**–वि. १ व्रत पाळीत असलेला; व्रताप्रमाणें कांहीं नेम करणारा. २ स्त्रीसंग न करणारा; ब्रह्मचर्य पाळणारा. 'अमृतराव सात वर्षांचा असतांना त्याची आई स्वर्गवासी झाली; तेव्हांपासून बापूसाहेब व्रतस्थ होते.' –मौज यौवना.

व्रतति—स्त्री. वेल; लता. 'साध्वीच देवता ही साध्वीला बा सुर-व्रतति लाजे।' –मोवन १३.९६. [सं.]

व्रथा—(प्र.) वृथा पहा.

व्रात—पु. समूह; जमाव. [सं.]

व्रात्य—पु. १ योग्य कालीं उपनयन न झालेला द्विज. २ ज्ञातिधर्म न पाळणारा, बहिष्कृत माणूस. ३ अनार्य. –वि. अर्वाच्य; द्वाड. 'नित्य व्रात्य उपद्रवी म्हणुनियां त्या शापिलें सत्तमीं।' –आसे २८. [सं.] ०**स्तोम**–पु. १ व्रात्य. व्रतबंध न केलेल्यांना पुन्हां जातींत घेण्याचा विधि. २ अनार्य लोकांना आर्य समाजांत घेण्याचा संस्कार; शुद्धिसमारंभ. 'परकीयांस स्वसदृश करावें आणि त्यांस आपल्या समाजाचें सदस्य करावें म्हणून जी चळवळ झाली तींत व्रात्यस्तोमास महत्त्वाचें स्थान दिलें पाहिजे.' –प्राचीन महाराष्ट्र २८५ [सं.]

व्रीडा—स्त्री. लज्जा; संकोच. [सं.] **व्रीडित**–वि. लज्जित; लाजलेला.

व्रीहि—पु; तांदूळ; भात; साळी. 'यज्ञांत व्रीहींचा होम सांगितला आहे.' [सं.]

व्हअेल—वि. (खा.) झालेला; (ल.) म्हातारा. –भात्रै ७.१.४. [होणें]

व्हकला—पु. (बे.) लांकडाचा तुकडा. भकल पहा.

व्हकाल, व्होकल—स्त्री. (कु. गो.) नवरी. ०**पाषणी**–वरात.

व्हकळ—(बे.) भकल पहा.

व्हगळणें—क्रि. (बे.) चहाडी करणें.

व्हग्ग—पु (बे.) हंगामी गवत कापण्याचा धंदा करणारा.

व्हग्गाल—न. (बे.) एकच खोल गेलेली चाकोरी.

व्हंजी—स्त्री. १ (माण.) वहिनी. २ (कों.) नणंद. [वहिनी+जी]

व्हटाळी—स्त्री. (व.) ओठाळी पहा.

व्हट्ट—न. (बे.) द्विदलधान्य मळून वेगळें काढल्यानंतर मळणींतून उरणारा पाला.

व्हट्टी—स्त्री. (बे.) गाईम्हशीची ओटी, कास. [का. होट्टे=पोट] ०**किच्च**–न. (बे.) द्वेष; मत्सर. [का.]

व्हड—वि. (गो.) मोठा. [सं. वृद्ध; प्रा. वड्ढ] **व्हडलो**–वि. वडील; मोठा.

व्हंडा—पु. (बे.) चारी बाजूंनी पाळी असून मध्यें असणारी जमीन; चौंढा.

व्हंडागणें—क्रि. (बे.) फेंकणें. **व्हंडागा**–पु. फेंकतां येण्यासारखें लांकूड.

व्हणजे-से—स्त्री. व्हंजी; नवऱ्याची बहीण; वनसें.

व्हन—(प्र.) होन पहा.

व्हशोरा—पु. (बे.) सोनामुखी.

व्हयतो-ती-तें—सना. (कु.) तो, ती, तें.

व्हया—क्रि. (कु. कों.) पाहिजे. 'तुकां केळां व्हया!'. [होणें, व्हावें]

व्हरचें-प—क्रि. (गो.) नेणें. [सं. ह्-हॄ]

व्हरवई—स्त्री. (गो.) उतावेळपणा; घाई.

व्हलस—वि. (बे.) वाईट. [का.]

व्हल्यार—पु. महार.

व्हळें—न. (बे.) भक्कल.

व्हाईसरॉय—पु. राजप्रतिनिधि. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलला ही पदवी आहे. [इ. व्हाईस=दुय्यम+रॉय=राय, राजा]

व्हाएन, व्हैन—न. (राजा. कुण. बे.) उखळ (लहान दगडी). -मसाप २.४.१०६. वाईन पहा.

व्हान—स्त्री. (प्र.) वहाण. ०**वड**-न. (चांभारी) वहाणेवरचा- ज्यावर पाय ठेवतात तो-तुकडा.

व्हानी करणें—(हेट.) समुद्रांत टाकणें.

व्हाय—स्त्री. (गो. सोनारी) एक हत्यार; अवटी पहा.

व्हायोलिन—न. एक युरोपीय तंतुवाद्य. याला चार तारी असून त्या म, सा, सा, प या स्वरांत लाविताता. याला पडदे नसतात. हें गजानें वाजवितात. [इं.]

व्हावटां, व्हायकाट—न. (गो. कु.) पाण्यानें वाहून जाणारी जमीन.

व्हावस—वि. (गो.) विसंगत; बेफाट; गैर (भाषण इ०). [तुल० वाहेंसें?]

व्हावळा—वि. हांवरा; अधाशी; वखवखलेला. [व्हावें; हाव?]

व्हाघा—क्रि. पाहिजे. (लिंगानुरोधें व्हावी, व्हावें अशीं रूपें होतात). 'तो सकळ जनासी व्हावा। जेथें तेथें नित्य नवा।' -दा १९.३.५. [होणें]

व्हास—पु. (क. जैन) संध्याकाळचें जेवण (सूर्य मावळण्यापूर्वी).

व्हाळ—पु. ओढा; नाला. [ओहळ, वहाळ] ०**कट**-पु. लहान ओढा. **व्हाळी**-स्त्री. १ लहान ओढा, ओहोळ. २ झरा; ओहळी.

व्हाळ-ळी—स्त्री. वेलबोंडीचें झाड.

व्हिक्टोरिया—स्त्री. एक प्रकारचें वाहन; बग्गी. तीन माणसें बसतील अशी एका घोड्याची गाडी. [इं.]

व्हीर—पु (गो.) हीर. नारळाच्या झावळीची काडी.

व्हेळ—स्त्री. (प्र.) वेळ पहा. 'ते व्हेळीं मज गमलें ऐसें।' -दाव ३६६.

व्हेळा—पु. (राजा.) एक झाड. वेहळा पहा.

व्होवरी—स्त्री. (कु.) खोली. [ओवरी]

व्होवळीक—स्त्री. (कु.) लग्नाचें आमंत्रण.

व्होळसा—पु. (गो.) पाण्याचा मोठा लोटा.

श

श—मराठी वर्णमालेंतील तिसावें व्यंजन, आणि ऊष्म वर्णांपैकीं पहिला वर्ण; हा तालव्य वर्गांतील आहे. अक्षरविकासः-या वर्णाच्या पांच अवस्था-१ ली अशोकाच्या खालसी येथील शिलालेखांत, २ री, कुशानवंशी राजांच्या वेळच्या मथुरेच्या लेखांत (इ. स. १ लें व २ रें शतक); ३ री, राजा यशोधर्मन्च्या काळातील मंदसोर लेखांत (इ. स. ५३२); ४ थी, जपानमध्यें मिळालेल्या एका (उष्णीषविजयधरिणी) ताडपत्री ग्रंथांत (इ. स. ६ वें शतक); व ५ वी, अपराजित नांवाच्या मेवाडच्या गुहिलवंशी राजाच्या वेळच्या कुंडेश्वर लेखांत (इ. स. ६६१).

श—पु. शंकर. [सं.]

शं—न. सुख; कल्याण. [सं.]

शउर, शऊर—पु. १ विवेक; तारतम्य. -राव्यको ८.२६. २ प्रज्ञा; चातुर्य. [अर. शुऊर]

शक—पु. १ शंका; संशय; संदेह. २ भीति; कुशंका; कुतर्क. -इमं १९८. [अर. शक्क] ०**अंदेशा**-पु. संशय; भय. 'कोणे विशीं शक-अंदेशा न धरणें.' -रा १५.६४. ०**दील**-वि. साशंकचित्त. 'रयत शकदील होऊन तजावजा झाली आहे.' -ब्रच२७. ०**शूभ**-पु. शंका; संशय. 'शकशूभ दिलांत न आणितां करार--मोजीब खातरखा सजा करावी.' -पया ४६६. [अर. शक+शुब्ह] **शकी**-वि. शंकी पहा.

शक—पु. १ ज्या दिवसापासून एखादा राजा एखाद्या कृत्याची किंवा आपल्या राज्यारोहणाची कालगणना सुरू करतो किंवा एखादी महत्त्वाची गोष्ट घडते त्या दिवसापासूनचा काल; वर्ष--कालगणना. हिंदुस्थानांत अनेक शक होते. -ज्ञाकोविभाग ५ पहा. 'नर्मदेचे अलीकडे शालिकाहन शक चालतो, पलीकडे विक्रमशक चालतो.' २ (विशेषतः) शालिवाहनाच्या जन्मदिवसापासूनचा किंवा त्यानें विक्रमाचा पराभव केल्या पासूनचा काल.-शकसंवत्सराचा उल्लेख शकाब्द ३८० तल्या एका जैन ग्रंथांत सांपडतो. याचा शालिवाहनाशीं संबंध विजयानगरच्या बुक्करायानें (शके १२७६) जोडून दिलेला दिसतो. -मसाप १.२. शातवाहन पहा या कालाचा आरंभ वैशाख शु॥ १ कलियुगाचें ३१७९ वें वर्ष, सोमवार ता. १४ मार्च इ. स. ७८. ३ एक लोकराष्ट्र; शाक; शाक(त)वाहनाचे-शालिवाहनाचे अनुयायी. ४ राज्य; राजाची

कारकीर्द. ५ अधिकार; आधिपत्य; अधिकाराचा हुकूम; आज्ञा. ६ श्रेष्ठपणा; वर्चस्व; वरचढपणा. (क्रि० अमक्यावर शक चढणें; बसणें; लागणें). ७ हुकमत; दरारा. ' श्रीमंतांचे प्रतापें मोठा शक केला. ' [सं. शक–ऐश्वर्ये या धातूवरून –राजवाडे]. **०कर्ता**–पु. १ ज्याच्या नांवें वर्षगणना चालते तो; शक संस्थापक. २ धर्म, पंथ, संप्रदाय इ० स्थापन करणारा. ' कलियुगांत ६ शककर्ते होतील. ' ३ (सांके.) छत्रपती शिवाजी. –पया ३८९. [सं.] **शकाब्द**–न. शालिवाहन शकाचें वर्ष. [सं.] **शके**–अ. शकामध्यें, शकारंभापासून, (संवत्सरसंख्येपूर्वी प्रयोग). ' शके सतराशे बावन्न. ' [शक शब्दाचें सप्तम्यंत रूप]

शकट—पु. १ गाडा; गाडी. २ रोहिणी नक्षत्रांतील पांच ताऱ्यांनीं झालेली शकटाची आकृति. ३ (ल.) खोडा; लोढणें; अडथळा करणारा मनुष्य, काम. [सं.] **०भेद**–पु. १ रोहिणी या शकटाकृति नक्षत्रांतून एखादा ग्रह किंवा चंद्र यानें जाणें. २ शकटाकृति सैन्यरचनेमधून अगर घनव्यूहामधून भेद करून जाणें, त्यावरून फळी, जूट, कट फोडणें; फूट. ' मग अंतस्त शकटभेद ...न कळे. ' –पदे ५.८२; –पया २५४. ३ (अव. प्रयोग) लांडया लबाडया; युक्त्या. ' वृंदेसी करूनियां शकटभेद । वधिला जालंदर रणरंगीं । ' –निगा १०३. ४ कारस्थानें; मसलती; डावपेंच. [सं.] **०व्यूह**–पु गाडीच्या आकाराप्रमाणें–सैन्याची रचना, व्यूह. [सं.]

शकटास्य(करण)—न. (नृत्य) खालीं बसल्यासारखें करून तलसंचर पाय खूप पुढें पसरणें व वक्षस्थळहि पुढें करणें. **–(भौमीचारी)**–नुसत्या चवडयावर उभा ठेवलेला पाय शक्य तितका पुढें सरकविणें म्हणजे कमरेच्या वरील शरीराचा भाग मागच्या बाजूस खालीं वाकेल व छाती वर येईल याप्रकारची स्थिति. [सं.]

शकड—न. सांकडें; संकट; शकट अर्थ ३ पहा. ' दुष्मान पळती, वैऱ्याला शकड घालीती. ' –म. सा. प. २ ३.५४. [सं. शकट]

शकणें—अक्रि. समर्थ असणें, होणें; कांहींएक करण्याविषयीं कोण्याएकामध्यें शक्ति असणें. [सं. शक्–शक्य; प्रा. सक्क; हिं. सकना]

शंकणें—क्रि. संशय येणें, वाटणें; कुतर्क करणें; भीति, शंका वाटणें; आशंकणें. ' झणी शंकाल मद्रूपातें । माझें अभय सदा तुम्हातें । ' –मुआदि ५.३७. [सं. शक्]

शंकनीय–वि. संशययुक्त; शंकास्पद; विवादनीय; वादग्रस्त. [सं.]

शंकपाळ—पु. (अप.) शकपाल. शककर्ता; शकारंभ. तुलनार्थ संकपाळ आडनांव. ' शंकपाळ शिवाजी महाराजानें केला ' (शिवाजीनें नवीन शक सुरू केला.) –ऐपो २३. [सं. शकपालन]

शंकर—पु. १ सांब; शिव; महादेव. २ सुप्रसिद्ध अद्वैतमत प्रस्थापक आद्य शंकराचार्य. –वि. शुभ; मंगल; सुखदायक; क्षेमकर. (कों.) शंखासुराचें झाड. [सं. शम्=कल्याण; कर=करणारा] **०करणें**–क्रि. श्रीकाराप्रमाणें. ' श्री शंकर '. अर्से पत्रावर सहीवजा लिहिणें. होळकर राजे अशी स्वदस्तुरी करतात. ' तुमच्या वडिलांस नोकरी देण्यांत येत आहे असा मजकूर लिहून शंकर केला. ' –विक्षिप्त ३.६१. **०फोरा**–पु. मध खाणारा एक जांभळा पक्षी. **०मत**–पु. १ (संगीत) नोहारवाणी पहा. २ अद्वैत.

शंकराचार्य—पु. १ वेदान्त तत्त्वज्ञानप्रवर्तक एका धर्मगुरूची पदवी. २ (ल.) मठाधिपति; धर्मगुरु; पीठाधिष्ठित व्यक्ति. ' थोडया दिवसांपूर्वी रोम येथील ख्रिस्ती शंकराचार्यांनीं व्हनोस संतमालिकेंत गोवून, एका प्रसिद्ध ठिकाणीं त्याच्या पुतळयाची स्थापना केली. ' –आगर ३.५३. ३ एक मतप्रवर्तक आचार्य, गुरु. ४ स्वामी. वरील आचार्यांनीं ठिकठिकाणीं स्थापन केलेल्या मठांतील अधिपति [सं.] **शंकराचारी**–पु (अप) मठाधिपति. ' शंकराचारीस साह्य जाले । ' –दावि ४२८.

शंकरपट—पु. (व.नाग) संक्रांत वगैरे प्रसंगीं होणारी बैलगाडयांची शर्यत; बैलांची शर्यत; गाडी–घोडयांची धांवण्याची शर्यत. ' आजच्या दिवशीं आमच्या गांवीं शंकरपट असतो. ' [सं. संगरपट ?]

शंकरपाळा–ळें—पुन. एक खाद्य पदार्थविशेष; साखर अगर गूळ, तूप, कणिक यांचा तळीव गोड पदार्थ [सं शंखपाळ. तुल० फा. सक (क्क)र्–पारा; म. साखरपारा]

शंकरा, शंकराभरण—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव, षाडव, वादी गांधार, संवादी निषाद. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. याचा दुसराहि एक प्रकार आहे.

शकल—न. तुकडा; फांक; खंड. ' दोन शकलें दोन बाजूला. ' –ऐपो १६७. [सं.] **०पात्र**–न फुटकें भांडें. ' शकल पात्रें घेऊनी धांवताती. ' –सप्र २०.१३२.

शकल—स्त्री. १ शकल पहा. योजना. ' तुम्ही मनसब्याची शकल बांधोन सर्वांची येकवाक्यता केली. ' –पेद ५.२६. २ रीत; स्थिति. ' गांवची हे शकल व करोडचे दरमाईचाही कांहीं ठीक नाहीं. ' –रा ६.५९२. [अर. शक्ल्]

शकल—शिकल पहा.

शकस, शखस—पु. मनुष्य. ' एक मातबर शकस रवाना करितों ' –ख ७.३५६९; –ऐटि २.३५. [अर. शख्स्]

शकस, शकस्त—(प्र.) शिकस्त पहा.

शंका—स्त्री. १ संदेह; भय; अविश्वास; खात्री नसणें; आशंका; किंतु. 'जैसें शंका जात खेंवो लोपे। सापपण माळेचें।' –ज्ञा ९.७३. २ आक्षेप; हरकत; विरुद्ध मताचा प्रश्न (वादग्रस्त बाब तींत). (क्रि० घेणें, करणें). ३ कल्पना; सूक्ष्मसंस्कार. 'तैसी या विषयांची शंका। मनीं वसती देखा। घातुक करी अशेखा। विवेकजाता।' –ज्ञा २.३२०. ४ (संगीत) गाण्यांत घाई करणें. ५ अडचण; अडथळा; गुंता; अडकाठी; व्यत्यय. 'शंका होती पहिली तिमी। निःशंक झाली व्यथिताचारासी।' –गुच ७.१५६. ६ लाज; भय. 'दिवसास रांडेच्या घरीं जातोस, लोक आपल्याला हांसतील ही कांहीं शंका बाळगीत जा.' [सं. शंक्=संदेह वाटणें] **०घेणें–बाळगणें**–लाज, भीति वाटणें. **०धरणें**–भीति, धाक वाटणें. 'लज्जावती फार तथापि त्याची। शंका न सीता धरि हो पित्याची।'. **०बाह्य**–वि शंकेपलीकडे; शंका घेण्यास जागा नाहीं असें. 'त्याचें वर्तन शंकाबाह्य आहे.' **०शील–ळ**–वि. साशंक; संशयखोर; शंकित मनाचा [सं.]

शंकित—वि. १ साशंक; भीतियुक्त; दिक्कत बाळगणारा. २ भीति बाळगलेला; शंकिलेला; शंकास्पद (विषय). **०दृष्टि**–वि. (नृत्य) दृष्टी आजूबाजूस वळविणें व बाहुल्या गोंधळल्यासारख्या करणें असा अभिनय (शंकित मनोभाव प्रगट करण्याकडे उपयोग). [सं.] **शंकी**–वि. संशयी; साशंक.

शंकी—वि. दुर्दैवी; विपन्न. 'लढाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पांडुरंग शंकी' –पया ३८५. [अर. शक]

शंकासूर—पु. राजतुरा; एक फुलझाड व त्याचें फूल; शंखासुर.

शंकार—पु. राजशालक; राजाच्या रखेलीचा भाऊ. –मृ. केवळ नात्यामुळें थोर अधिकार असणारा. २ (ल.) मूर्ख, आढ्यतेखोर व दुष्ट मनुष्य. [सं.]

शंकु—पु. १ अणकुचीदार वस्तु; खिळा; सळई; शूळ; टांचणी; कांटा; खुंटी; गज; मेख; काठी इ०. २ मोजणी करतांना काटकोन पहाण्याचें एक साधन. (इं. स्क्वेअरस्टाफ). ३ छायायंत्राची सूची, कांटा. ४ एकावर चौदा शून्यें देऊन झालेली संख्या; संख्याविशेष; दहा महापद्म; दहाहजार अब्ज. ५ (भूमिति) सूची; सुळक्याच्या आकाराची वस्तु. (इं.) कोन. ६ (ज्यो) तारे, ग्रह इ० ची लंबोन्नतीची किंवा उंचीची ज्या. [सं.] **०छाया**–स्त्री. शंकुयंत्राच्या कीलाची पडलेली छाया. [सं.] **०यंत्र**–न. छायायंत्र; दिनमान पहाणें किंवा प्राचीसाधन या करितां याचा उपयोग करितात. (इं.) सन्–डायल. [सं.] **शंक्वाकार**–वि. १ शंकु किंवा सुळका या आकाराचें (इं.) कोनिकल. २ मळसूत्राकार. (इं.) स्पायरल. –सेंपू २.४४. [शंकु+आकार] **शंकाकृति**–स्त्री. शंकूसारखी आकृति. शंकाकार पहा. [शंकु+आकृति]

शकुंत—पु. १ एक पक्षी; चाष. २ सामान्यतः पक्षी. [सं.]

शकुंतल—न. घोडयाच्या कानाचें मूळ. –अश्वप १ ६१.

शकुन—पुन. १ शुभाशुभ चिन्ह; भविष्य सूचक चिन्ह किंवा वस्तु; (शब्द, दर्शन इ० रूप) लक्षण. 'एका नाकें बहुसिका। सहदेव म्हणे शकुन निका।'. २ ज्या लक्षणचिन्हावरून–गोष्टीवरून ज्योतिषी, भविष्य कथन करतो ती. ३ कौल; देवानें दिलेलें उत्तर. ४ अनुकूल गोष्टी होण्याबद्दल केलेली प्रार्थना, स्तोत्र, मंत्र. ५ एक पक्षी. [सं.]

शकुन—पु. (कों.) माशाच्या आकाराचें पिठाचें केलेलें चित्र; याला काकडीच्या बिया टोचलेल्या असतात. 'धूपारतीनंतर कुंभारानें एका ताटांत शकुन व दिवा घेऊन यावयाचें.' –आडिवऱ्याची महाकाली. [सं.] **०उंडा**–पु. १ मंगलकार्याच्यावेळीं कणिकेंत साखर वगैरे घालून केलेलें पक्वान्न. उंडा पहा. २ पुराणाचा वडा. –पाकशास्त्र ५५. **०गांठ–ग्रंथी**–स्त्री. १ एखादी पुढें होणारी किंवा देशांतरीं झालेली जी गोष्ट ती विषयीच्या शकुनाची आठवण राहण्यासाठीं पदरास बांधलेली खूणगांठ. शकुनाला मान्यता देणें. (क्रि० बांधणें). 'स्ववस्त्रप्रांतीं हे त्वरित शकुनग्रंथि दिधली –सारुह ८.३८; –वेसीस्व १.४१. २ शुभदायक, हितकारक घटना, बनाव, प्रसंग; मंगलकारक, शुभचिन्ह, लक्षण. ३ लग्नांत वधुवरांच्या पदरांस वराच्या मेहुणीनें बांधलेली शुभगांठ. **०गांठ बांधणें–घालणें**–१ अगदीं पूर्ण मनावर बिंबणें; पक्कें ध्यानांत ठेवणें. २ खात्री असणें; चांगला, बरोबर अजमास करणें. 'इकडे हीं तिघेजणे वाघोबाच्या तडाक्यांतून कसची पार पडतात अशी त्यानें शकुनगांठ बांधून ठेविली.' –संभाजी. **०पोतें**–पु. शकुनाबाबतचा एक सरकारी कर. –पया १२९. **०लाडू**–पु. प्रयाणकालीं शुभदायक म्हणून पदरांत लाडू बांधतात तो. 'आतां वेळु नलवावा। राम या मुहूर्तें जावा। तां शकुनलाडू बांधावा। याच्या पदरीं।' –वेसीस्व २.७. **०वंती**–वि. भविष्य सांगणारी. 'इच्छि. ते शकुनवंती। होय वेती तात्काळ।' –तुगा ३२१६. –स्त्री. भविष्यग्रंथ–पोथी. ही वरून ज्योतिषी, ठोक जोशी भविष्यें वर्तवितात. **शाकुनिक**–न. शकुन; दुश्चिन्ह; उत्पात; अद्भुत. –वि. शकनासंबंधी; अद्भुत कारक; अरिष्टकारक; अवलक्षणीय. [सं.]

शकुनि—पु. १ एक पक्षी; गिधाड. २ गांधार; दुर्योधनाचा मामा. ३ (ल.) कपटी, कारस्थानी, बदसल्ला देणारा आप्त, मनुष्य. ४ (ज्यो.) ववादि करणांतील आठवें करण. **शकुनिचतुष्टय**–न. १ दुर्योधन, दुःशासन, शकुनि व कर्ण हे चौघे. २ (ल.) दुष्ट इसमांची टोळी, कंपू; चांडाळचौकडी. [सं.]

शकून—पु. १ शब्द; भाषण; बोलणें; उच्चार. २ मसलत. ३ हुकमत. **शकुनांत असणें–चालणें–वागणें**–वचन किंवा

आज्ञा दिल्याप्रमाणें वागणें. **शकुनांत घेणें**–१ एखाद्याशीं संबंध ठेवणें; बसणें, बोलणें, असणें (निषेधार्थी–वारा न घेणें यासारखा प्रयोग होतो). २ सल्लामसलत घेणें.

शकुनी—वि. समर्थ; शक्त. ' साहे महापराधहि, दंड खळाला करावया शकुनी । ' –मोसभा ४.५८. [सं. शक्–शकु]

शकृत—न. घाण; मैला; विष्ठा. [सं.]

शंकेश्वर—पु. ' शंकासुर ' पहा.

शक्क—पु. संशय; शंका. शक पहा. [अर. शक्क्]

शक्कल—स्त्री. १ युक्ति; कल्पना; तोड; उपाय; योजना. (क्रि० काढणें; करणें; योजणें; निघणें; पाडणें). ' हीच कां तू शक्कल काढलीस. ' –इंप ११३. ' शक्कल काढावयाला अक्कल लागते. ' –रणदुंदुभी ३७. २ –नस्त्री. स्थिति; प्रकार; स्वरूप (एखाद्या कामाचें, वस्तूचें). ' इकडून ही हे शक्कल जलद नमूदांत यावी म्हणोन पत्रें जातात. ' –पया ४७७. [अर. शक्ल्]

शक्त—स्त्री. सामर्थ्य; बल; पराक्रम; जोर; ताकद; (प्र.) शक्ति पहा. –वि. १ समर्थ; कार्यक्षम; योग्य; लायक; तरबेज. ' हरी भक्त तो शक्त कामास मारी । ' –राम ८७. २ पराक्रमी; प्रबल; शक्तिमान. ' शक्त नामचि तुझें रघु–राया । ' –(वामन, नामसुधा नवनीत पृ ९१). ३ (व्या.) सूचक; दर्शक; विशेष अर्थदर्शक; (शब्द, वाक्यप्रचार); संज्ञीक. [शक्–योग्य, समर्थ होणें]

शक्ति—स्त्री. १ सामर्थ्य; योग्यता; लायकी. २ बळ; ताकद; प्रभाव. समासांत उपयोग. उदा० शरीरशक्ति; इंद्रियशक्ति; नेत्रशक्ति; कर्णशक्ति; वायुशक्ति; ज्ञानशक्ति; योगशक्ति; कालशक्ति. ' नाम शक्तिबळें जळीं पाषाण तरले । '. २ अर्थकक्षा; मर्यादा; सीमा; व्याप्ति (शब्द वगैरेची). ३ स्त्रीदेवता; पार्वती, लक्ष्मी, इ० देवी; ईश्वराची स्त्रीरूप सामर्थ्यप्रतिमा. ' तुका हरिभक्ती करी । शक्ति पाणी वाहे घरीं । ' –तुगा ४११. ' गणेश शारदा नाना शक्ती ' –दा ४.६.१०. ४ माया; परमेश्वरशक्ति. ' जे महंताची शांती । ...जे ईश्वराची शक्ति । '. ५ प्रेरणा; (यंत्रास चलन देणारा कर्ता). ६ एक आयुधविशेष; अस्त्र. उदा० वासवशक्ति. ' चित्रनृपें प्रतिविंध्यप्राण हरायासि सोडिली शक्ति. । ' –मोकर्ण ९.२४. ७ कुंडलिनी. ' तैसी वेढियातें सोडिती । कवितकें आंग मोडिती । कंदावरी शक्ति । उठली दिसे । ' –ज्ञा ६.२२७. ८ स्त्रीपुरूष मिळून जें मिथुन त्यांतील जी स्त्री ती. ९ शिवलिंगाला प्रतिरूप म्हणून असलेली योनी; प्रकृति. तंत्रमताची देवता. हिची उपासना करणारे ते शाक्त. १० अमुक शब्द उच्चारिला असतां अमुक अर्थाचाच बोध व्हावा असा शब्दाच्या ठिकाणीं असलेला संकेत. ११ भाला. [सं. शक्–सामर्थ्य असणें]. **०ग्रह**–पु. १ शब्दाचें विशेषअर्थी ग्रहण; अर्थज्ञान. २ शब्द, लक्षण, इ० वरून होणारा बोध, मत; एखाद्याच्या संबंधानें झालेला ग्रह. ' त्याच्या वेषावरून हा साधु असा मला शक्तिग्रह झाला होता. ' ३ अस्तित्वांत असलेल्या वस्तूंचें अस्तिरूपी ज्ञान, ग्रहण, बोध; वास्तविकज्ञान; यथार्थज्ञान. [सं.] **०ग्राहक**–वि. शब्दाच्या अर्थाचा निर्णय करणारा; निर्णायक. उदा० व्याकरण, कोश, रूढी, पद्धति. [सं.] **०चक्र**–न. मायारूप विश्व; मायाचक्र. ' जें शक्तिचक्राशी वेगळ । '. ' शक्तिचक्र जें अशेष । तें उपसंहरे निःशेष । मूळमायेसिसें । '. [सं.] **०त्रय**–न. १ युद्धाच्या तीन शक्ति; प्रभुशक्ति, मंत्रशक्ति, उत्साहशक्ति. २ घटना, रचना, यासंबंधी तीन शक्ति; ज्ञानशक्ति, क्रियाशक्ति, द्रव्यशक्ति. या तिन्हीस क्रमानें सत्वगुण, रजोगुण, तमोगुण यांशीं संबद्ध अशीं सात्विकशक्ति, राजसशक्ति, तामसशक्ति अशीं नांवें आहेत. [सं.] **शक्तितः**–क्रिवि. शक्तीप्रमाणें. **शक्तिनसार–रूप**–वि. शक्तीप्रमाणें;सामर्थ्याप्रमाणें;योग्यतेप्रमाणें. ' शक्तिनसार दे सर्वदा। तो सत्वगुण । ' –दा २.७.५५. [सं. शक्ति+अनुसार, शक्ति+अनुरूप] **०नित्यत्व**–न. (शाप) शक्ति केव्हांहि नष्ट होत नाहीं, तिचें फक्त रूपांतर होतें हा सिद्धान्त. [इं.] कॉन्झर्व्हेशन ऑफ एनर्जी. [सं.] **०पात**–पु. १ मंत्राचा उपयोग करण्याचें गुरूनें दिलेलें सामर्थ्य; शिष्यास गुरूनें दिलेलें स्वतःच्या ठिकाणचें मंत्रबल. २ शक्तिक्षय; बलहानि; दुर्बलता; दुबळेपणा. **०पूजा**–स्त्री. शक्तीची, देवीची, दुर्गेची पूजा (शाक्तांची). **०मान्–मंत–वंत**–वि. १ सामर्थ्यवान; कार्यक्षम; लायक; योग्य. २ बलवान; जोरदार; प्रबळ. [सं.] **०मापक**–न. (शाप.) यंत्राचें सामर्थ्य, गति वगैरे मोजण्याचें यंत्र. (इं.) डायनामोमीटर. **०वैकल्य**–न. (कोणत्याहि प्रकारचें) सामर्थ्यातील व्यंग; बलांतील उणेपणा, कमताई; कमजोरपणा. **०संग्राहक**–न. एंजिनाची गति स्थिर रहाण्याकरितां, योजिलेलें एक महत्त्वाचें चक्र; यामुळें दट्ट्याची गति स्थिर राहून एंजिन सारख्याच वेगानें फिरतें. (इं.) फ्लायव्हील. [सं.] **०सुत**–पु. १ कार्तिकस्वामी. २ पराशर ऋषि **०हीन**–पु. दुंबळ. **०क्षीण**–वि. शक्तिपात झालेला; अतिशय. अशक्त शालेला; आजारी, उपाशी, वृद्ध, (मनुष्य); सामर्थ्यहीन; बळहीन; सत्ताहीन. **शक्त्युपासना**–स्त्री. शक्तिदेवतेची सेवा, पूजा; शक्तिपूजा. [सं.] **शाक्त**–पु. शक्तीचे उपासक; देवीचा उपासक; शक्तिदेवीचा भक्त. ' शक्तिते शाक्तहि आराधिती । ' –घनःश्याम भूपाळी. –वि. शक्तिसंबंधाची (पूजा, अर्चा, विधी इ०). [सं.] **०पंथ–मार्ग**–पु. शक्त्युपासना; ज्यांत देवतोदेशानें मद्य प्राशनादि करावें असें सांगितलें आहे त्या तंत्रोक्त मार्गाचें नांव. वाममार्ग पहा. [सं.]

शक्य—वि. १ होण्याजोगें; संभवनीय; सामर्थ्याच्या आटोक्यांतील; साध्य; संभाव्य, करतां येण्याजोगें. ' शक्य असेल तरि रहा ' –धेनुहरण. २ ऐकण्याजोगें; अर्थ, मतलब, उद्देश.

शब्दानें ज्याचा बोध होतो असा (अर्थ, आशय). **०क्रियापद**–न. (व्या.) मूळ धातूस वणें अथवा ववणें प्रत्यय लावून जें नवें सामर्थ्यबोधक क्रियापद सिद्ध होतें त्यास म्हणतात. उदा० करवणें, जाववणें, घेववणें, देववणें. –मराठी भाषेचें व्याकरण १५५. **०भेद**–पु. (व्य.) क्रियापदाच्या कर्त्यास क्रिया करण्याचें सामर्थ्य आहे असें दर्शविणारा रूपभेद, प्रकार. भेद पहा. **शक्यरूप, शक्यार्थ**–पु. १ संभाव्य अर्थ; प्राप्त होण्यारखें वाक्य. २ (व्या.) शक्यता दाखविणारें क्रियापदाचें रूप; विधिलिङ्.

शक्र—पु. इंद्र. 'शक्रसभा सार्धशत योजन दीर्घा तशीच विस्तीर्णा' –मोसभा १.२३. [सं.] **०जित, शक्रारि**–पु. इंद्रजित; रावणाचा मुलगा. [सं] **०धनु**–न. इंद्रधनुष्य. [सं.] **०नंदन-सुत**–पु. १ वाली. २ अर्जुन. [सं.]

शक्रदर्शनी, शक्रदर्शनीं—क्रिवि. (अप) सकृद्दर्शनीं; देखतांक्षणींच; प्रथम दृष्टीसच; ताबडतोब. [सं. सकृत्+दर्शन]

शक्स, शख्स—पु. मनुष्य; माणूस; व्यक्ती. [अर. शख्स्]

शंख—पु. १ समुद्रांत रहाणारा एक प्राणी. २ अशा प्राण्याचें घर; त्याचें अस्थिरूप शरीर, कवच. याचा देवावर पाणी घालण्यासाठीं किंवा युद्धांत वाजविण्यासाठीं उपयोग करितात. 'मोत्यें म्हटलीं म्हणजे शिंपांचीं पोरें आणि शंखांचे भाचे.' –प्रेमशोधन १५५. ३ एक प्रकारचें वाद्य. 'शंख शृंगें काहळा भेरी' –सप्र ३२. 'काहळ मृदंग शंखभेरी। दुंदुभी दमामे रणमोहरी।' –जै ६८५. ४ बोटांवर असणाऱ्या शंखाकृति रेघा–रेषा. याच्या उलट चक्र. ५ बोंब; ओरडा; आरडाओरडा; शंखध्वनि. 'शंख करी आक्रोशे' –रावि ३१.१६१. ६ नवनिधींतील एक. ७ एक संख्या; शंकू. ८ कानशिलाजवळचें कपाळावरचें हाड; आंख. 'शंखद्वयीं धरूनि कौकुम कीरवाणी।' –र १७. ९ घोडयाचा विशिष्ट अवयव. –अश्व १.६२. १० चौदा रत्नांतील एक; पांचजन्य. 'लक्ष्मी जयास भगिनी आणि तात सिंधु। ... इतके असोन परि शंख फिरे भिकारी।'. ११ (ल.) अभाव; शून्य; पूज्य. 'बुद्धीच्या नांवानें शंख.' १२ शंखासुर (राक्षस) पहा. –वि. १ मूर्ख; अडाणी; ठोंब्या; निरक्षर. २ रडया; बोंबल्या; अपयश येणारा. ३ स्वच्छ, निर्मळ, पारदर्शक गुण दाखविणाऱ्या विशेषणापुढें आधिक्यार्थी योजतात. उदा० निर्मळशंख, पाणी. **०वाजणें**–संपणें; न उरणें; पराभूत होणें. 'लाडवांचा शंख वाजला.' 'परिक्षेंत त्याचा शंख वाजला'. **०करणें**–१ बोंब ठोकणें–मारणें; बोंबलणें; बाजा करणें. 'सात्यकि निघे, म्हणे कुरुभट हो हूं शंख करुनि मुख सुजवा।' –मोद्रोण ११.३५. –रावि ३१.१६. २ (ल.) मोठमोठ्यानें ओरडणें. 'पैशाच्या कलशावर नजर ठेवून वकील शंख करीत असतो.' –संगीत सत्तेचे गुलाम २१. **०करावयास लावणें**–बोंबलत बसविणें; कांहीं न देणें. 'विश्वामित्राला शंख करावयाला लावून इंद्रसभेचा रस्ता धरला.' –नाकु ३.७८. **०तीर्थ**–न. १ देवपूजेंत अभिषेकानंतर देवावर शंखांतून शिंपावयाचें पाणी. २ (ल.) फाल्गुनवाद्य; बोंब. [सं.] **०तीर्थ घेणें**–शंखध्वनि करणें; बोंब मारणें. 'बापलेकांचें भांडण जाहलें। लेकीं बापास मारिलें। तंव ते मातेनें घेतलें। शंखतीर्थ।' –दा ३.५.१९. **०द्राव**–पु. १ शंखापासुन काढलेला द्रव; रस. २ ज्यांत शंख इ० विरघळतात असा द्रावक रस. (क्रि० करणें; पाडणें). ३ (शाप.) लवणजाम्ल. (इं.) म्युरिॲटिक ॲसिड. –पदाव ११. **०धारी**–पु. दोन शिंपले एकावर एक बसून झालेली शंखाकार कवचघटना. –प्राणिमो ९२. [सं. शंखधृ] **०ध्मा**–पु. १ (शंख वाजविणारा) (ल.) उद्धट, आडदांड माणूस. २ निरक्षर; शंखोबा. [सं. शंख+ध्मा=वाजविणें] **०ध्वनी**–पु १ शंखाचा आवाज. २ दुःखोद्रेकामुळें बोंबलणें; बोंब; पांचजन्य. 'पायाला चटका लागतांच त्यानें शंखध्वनि केला' –अस्तंभा १७१. **०निवासी**–वि. शंखांत रहाणारा (प्राणी). **०पुष्पी**–स्त्री. एकप्रकारचें गवत; विष्णुक्रांता [सं.] **०भस्म**–न. शंखापासुन केलेलें रसायन; हें शूळनाशक आहे. शंखाचें प्राणिद. –संयोग १.५६. **०मणि**–पु १ शंखाचा मणि, मोती. २ (ल.) दिसण्यांत गोरागोमटा परंतु अक्कलशून्य मनुष्य. [सं] **०वटिका-वटी-भस्म**–स्त्री. शंखापासुन केलेलें एक औषध. हें संग्रहणी व शूल यांवर देतात. [सं.] **०वर्णी**–न. १ शंखांतील पाणी (देवावर घालण्यासाठीं). २ स्वच्छ, निर्मल पाणी. ३ (ल.) पाणी घातलेलें दूध, ताक, दहीं इ०. ताकवणी पहा. **०शिरोमणि**–पु. मूर्ख; ठोंब्या; अक्कलशून्य मनुष्य. 'सर्व पिढींत शंखशिरोमणि किंवा फार विद्वान एकादाच निघतो.' **०स्फुरण**–न. १ शंखनाद. २ (ल.) बोंब; आरडाओरड. 'ललाट पिटोनि करतलें। शंखस्फुरणें करीतसे।'–मुहरिचंद्राख्यान (नवनीत पृ. १९७). 'हा जेणें करी शंखस्फुरण' –एभा २३.५३५. **शंखावाती**–स्त्री. बोंब. 'न पेरितां जाण शेती। शिमग्यावीण शंखावाती।' –मुरंशु ८०. **शंखासारखें**–वि. स्वच्छ; निर्मळ. 'ह्या टांक्यांचें पाणी शंखासारखें आहे!' **शंखासुर**–पु १ एका दैत्याचें नांव. २ एक फुलझाड. ३ त्या फुलझाडाचें फूल; राजतुरा. **शंखाहुली**–स्त्री. एक वेल. हीस 'सांखवेल' म्हणतात. शंखपुष्पी पहा. –वगु ५ ७८. **शंखिनी, शंखीण**–स्त्री. १ स्त्रियांच्या चार जातींपैकीं एक; उंच, सडक केसांची, तामसी व कामुक स्त्री. २ (निंदार्थी) थोडें दूध देणारी गाय. ३ गोगलगाय. **शंखोदक**–न. देवांच्या मूर्तीवर शिंपडण्याचें शंखांतील पाणी. [सं.] **शंखोला**–पु. शंखाचा एक प्रकार. –भूशास्त्र ५३. **शंखोबा**–पु. ठोंब्या; मूर्ख मनुष्य, शंखध्मा पहा. **शंख्या**–पु.

१ शंखोबा. २ अक्काबाईचें बाळ; अपयशी माणूस; कमनशिबी माणूस. **शंख्यासोमल**-सोमलांत एक भेद.

शंखजिरें—न. संगजिरे पहा.

शंखपाल-ळ—पु. १ सापाची एक जात; एक जिवाणु. 'गव्हाळे तैसेचि शंखपाळ।' –गीता १.३६९. २ पुल्ली. पालीच्या जातीचा एक प्राणी; गणपत; पाल; सरडा. ३ शंकरपाळें नांवाचा खाद्यपदार्थ. [सं. शंखपाल=पाताळांतील सर्प]

शंखवलय-वळा-ळी, शंखावळी—न. शंखाची बांगडी. [सं. शंखवलय] **०श्वेत**-पु. घोडयाची एक जात. 'शंखासारखा शुभ्रवर्ण, शंखाप्रमाणें ज्याचा शब्द आहे, सुशील, हंसाप्रमाणें उभा रहाणारा, फार ठेंगणा नाहीं, फार उंच नाहीं, अशा अश्वास शंखश्वेत म्हणतात' –अश्वप १.२३.

शंखळा—स्त्री. सांखळी. [सं. शृंखला अप.]

शंखोट—वि. शाखोट पहा.

शंगूफ—पु. फूल; कळी. [फा.]

शचि-ची—स्त्री. इंद्राणी. इंद्राची पत्नी.[सं.] **०नायक-पति-वर**-पु. इंद्र.

शट्कर्णी—क्रिवि. (प्र.) षट्कर्णी; सर्वत्र प्रसिद्ध; जाहीर; उघड. (क्रि० करणें; होणें; जाणें; येणें. याशीं जोडून). तीन मनुष्यांस समजलेली गोष्ट गुप्त राहूं शकत नाहीं यावरून. [सं. षट्=सहा+कर्ण=कान]

शठ—वि. १ लबाड; कपटी; लुच्चा; ठक, 'ऋषीश्वरु कोपविलें शठें।' –एभा १.३७३. 'भोजन करा म्हणे शठ, देव म्हणे मज कशास हो करितां।' –मोउद्योग ७.६४. २ तिरस्कारार्ह; अमंगल; अघोरी; कुत्सित; कंजूष; चिक्कू; कदर्यु. ४ दुःशील; दुःस्वभावी. [सं.] **म्ह०** शठंप्रति शाठ्यं=लबाडाशीं लबाड (जशास तसें). **०ता, शाठ्य**-स्त्री. १ धूर्तता. २ कापट्य. [सं] **शठाई**-स्त्री. १ लबाडी; कपटीपणा. २ कवडीचुंबकपणा; कृपणता. ३ दुष्टपणा; खटपणा. शठ पहा.

शंड—पु. सांड; अंडीलबैल. [सं.]

शंड-ढ—पु. १ नपुसक; अधेनारी; हिजडा. २ खच्ची केलेला; खोजा. ३ निर्वीर्य; चेतनारहित, षंढ माणूस. शास्त्रांत सात प्रकारचे शंढ सांगितले आहेत. [सं. शंढ]

शड्डू—पु. (क.) डावा हात कोपरापासून वर करून उजव्या हातानें काढलेला आवाज; दंड थोपटणें. 'तो तुझ्यावर शड्डू मारतो आहे'. **०ठोकणें**-आव्हान करणें; मांडीवर अगर दंडावर हाताच्या खोंग्यानें मारणें. 'त्यानें शड्डू ठोकावा व तूं गप्प बसावें हें लांछनास्पद आहे.' [ध्व.]

शडावचें—क्रि. (गो.) (वृक्षाची) अंतस्त्वाचा काढणें. [सं. छाल]

शण—पु. ताग; सण; वाख; अंबाडी. [सं. हिं; गु.] **०पट्ट-वस्त्र**-न. तागाचें वस्त्र. [सं.] **०सूत्र**-न. तागाची दोरी; सुतळी. [सं.]

शणपो—पु. भात मोजण्याची मोठी ओंजळ; पसा. (कों.)

शणै—शेणवी पहा. 'विठ्ठल शणै'. 'शणै गोयबाब वालावलकर.'

शणोपण—न. शेणबीपण; लेखकाचें काम. –भाअ १८३४.

शत—वि. शंभर. 'भारताचें शतें सात। सर्वेस्वगीता।'–ज्ञा १८.१६६१. [सं.] **म्ह०** शतं तत्र पंचोत्तर शतं (शंभर तेथें एकशें पांच) ऐशीं तेथें पंचायशी (खर्च करण्यास काय हरकत?). [सं.] **०क**-न. शेंकडा; शंभराचा समुदाय. [सं.] **०कूट**-वि. शेंकडों तुकडे झालेला; शतधा भिन्न. 'तेथ ब्रह्मकटाह शतकूट। हो पाहत असे।' –ज्ञा १.१४७. 'वाटे उर्वी शतकूट। होऊन जाईल क्षणार्धें।' –पांप्र ४१.२२. **०कृत्य**-न. १ (शतक्रतूबद्दल चुकीचा शब्दप्रयोग) शंभर अश्वमेध यज्ञ करण्यासारखें अचाट कृत्य; शंभर यज्ञांचें कार्य. २ (ल.) एखादें अचाट काम; महत्कृत्य. शतक्रतु पहा. ३ विशेष प्रकारची चटणी, रायतें. **०कृत्य करणें**-पुण्य करणें; चांगली गोष्ट करणें. **०क्रतु**-पु. १ इंद्र. २ शंभर अश्वमेध यज्ञ हे केले असतां यजमानाला इंद्रपद मिळतें. ३ (ल.) मोठा विजय; मोठा पराक्रम; मोठें शौर्य; अचाट कृत्य. 'जन्मास आल्यापासून एक तळें बांधलें एवढा कायतो शतक्रतु केला.' [सं.] **०गुण**-वि. शंभरपट. 'शतगुणें स्नेहो वाढला तिसी।' –एभा ७.६०१. [सं.] **०घृत**-न. शंभर वेळां घूवून स्वच्छ केलेलें तूप (औषधाकरितां). [सं.] **०घ्नी**-स्त्री. (शंभरांची हत्त्या करणारा) लोखंडी भाले, खिळे बसविलेला एक ठोकळा; एक विशिष्ट हत्यार; कारलें; शेकडों लोक मारण्याचें जुनें आयुध. 'पट्टिश बाण लोहवृश्चिक उरण। दशघ्नंथा आणि शतघ्नथा।' –ह २२.३४. २ एक प्रकारची तोफ; उल्हाटयंत्र. 'शतघ्नी नामक अस्त्रें उंच प्रदेशावर नेऊन ठेवावीं.' –हिंलई२४. **०चिंध्या**-स्त्री. शंभर जागीं फाटलेलें वस्त्र; नेसतां किंवा वापरतां न येण्याइतकें फाटकें वस्त्र; लक्तर्‍या. **०चूर**-वि. शंभर तुकडे झालेलें. शतकूट पहा. 'घट घायें कीजे शतचूर।' –एभा २२.४२७. **०चूर्ण**-न. अगदीं चुरा; तुकडे तुकडे झालेले, पडलेले आहेत अशी स्थिति; पार चुराडा. 'फुटोनि होय शतचूर्ण।' –अमृ ७.६७. 'एकेचि घातें शतचूर्ण।' –एरुस्व ८.४६. –वि. चुरा झालेला; विभिन्न. [सं. शत+चूर्ण] **०छंदी**-वि. (शंभर लुच्चेगिऱ्या, फंद असणारा) फंदी; बेढंगी; वाईट चालीचा. **०च्छिद्र**-वि. शेंकडों भोकें पडलेला; चाळण झालेला (कागद, वस्त्र इ०). **०जर्जर**-वि. शंभर ठिकाणीं फुटलेली; शेंकडों ठिकाणीं खिळखिळी झालेली. शतचूर्ण पहा. 'यालागीं शतजर्जर नावे।

रिगोनि केवि निश्चित होआवें।' –ज्ञा ९.४९०. [सं.] **०तंत्रीवीणा**–स्त्री. एक वाद्य. 'सारंमडळ' पहा. **०तारका**–स्त्री. १ सत्तावीस नक्षत्रांपैकीं चोविसावें नक्षत्र (शंभर ताऱ्यांचें मिळून झालेलें). २ (ल.) एखाद्यास अनेक मुली असल्या म्हणजे थट्टेनें म्हणतात. [सं.] **०द्वार**–वि. शंभर द्वारें, दरवाजे, भोंकें वगैरे असलेलें. [सं.] **०धा**–क्रिवि. १ शंभरदां; शंभरवेळां. २ शेकडों प्रकारांनीं. 'कैसा शतधा दुर्वादीं। निस्तेजिलासी।' –ज्ञा ११.१०१. [सं.] **०धृति**–पु. १ ब्रह्मदेव. २ इंद्र. **०धौत**–वि. शंभरवेळां धुतलेलें (तूप वगैरे). **०पत्र**–न. १ एक जातीचें कमळ. २ सेवतीचें फूल. –वि. शंभर पाकळ्या, पानें असलेलें (कमळ). [सं.] **०पत्रनेत्रा**–स्त्री. कमलाक्षी (स्त्री). 'तेथूनि तूं मजसि ने शत–पत्र–नेत्रा।' –नवनीत पृ. ९७. [सं.] **०पत्रिका**–स्त्री. एक फुलझाड; शेवंती. [सं.] **०पद–पाद–पदी**–स्त्री. घोण; गोम. **०पदी**–स्त्री. शतपावली; जेवणानंतर अन्नपचनक्रिया सुलभ होण्यासाठीं फेऱ्या घालणें, थोडें चालणें. [सं.] **०पावली**–स्त्री. शतपदी पहा. **०भाग**–वि (शाप.) शंभर भाग ज्याचे पाडले आहेत असें. (इं.) सेंटिग्रेड. –रसामू ३०. **शतंभीष्म**–पु. १ (शंभर भीष्म; भीष्माचार्या सारखे पुष्कळ, एकाहून एक बलवान) आपल्या सामर्थ्याची बढाई मारणाऱ्याबद्दल निंदार्थी शब्दप्रयोग; अनेक वरचढ, अधिकाधिक पराक्रमी पुरुष. 'तूं आपली एवढी प्रतिष्ठा कशास सांगतोस. तुजसारखे असे शतंभीष्म पडले आहेत.' 'ऐसे दाते शतंभीष्म बहुत आहेत.' –शिवाजीचें चरित्र 'तुझ्या सारखे मी पुष्कळ शतंभीष्म लोळविले आहेत.' २ वृध्द; विशेष ज्ञानी पुरुष. **०मख**–पु. १ शंभर यज्ञ करणारा; इंद्र. 'जें शतमखा लोक सायासें। तें तो पावें अनायासें। कैवल्यकामु।' –ज्ञा ६.४४१. २ शंभर यज्ञ. 'जें शतमंखींहीं आंगवणें। नोहेचि एका।' –ज्ञा ८.२६५. [सं.] **०मखोत्तीर्ण**–वि. (शंभर यज्ञ करून पार झालेला) शंभर यज्ञ पूर्ण झाल्यामुळें इंद्रपद मिळालेला; इंद्र. 'जें शतमखोत्तीर्णकरा। आरूढोनि असे।' –ज्ञा १०.२४०. [शत+मख+उत्तीर्ण] **०मान**–वि. १ शंभराचें माप, मोज; शंभर संख्या भरणारें. 'शतमान आयुष्य.' २ (सांकेतिक) शंभर रुपये दक्षिणा 'तेथें तुम्हास काय मिळाले? शतमान किंवा एक शतमान मिळालें.' **०मारी**–वि. १ शंभर रोगांवर रामबाण उपाय करणारा निष्णात (वैद्य). २ (ल) शंभर रोग्यांना मारक किंवा त्यांची हत्या करणारा (वैद्य). **०मूर्ख**–पु. (शंभरपटीनें, शंभरमूर्खा इतका मूर्ख) अत्यंत मूर्ख, अज्ञानी; शुद्ध, केवळ मूर्ख; महामूर्ख. [सं.] **०वर्ष–वार्षिक**–वि. १ शंभर वर्षे टिकणारें, चालणारें; शंभर वर्षांच्या मुदतीचें. २ शंभर वर्षांतून एकदां येणारें. ३ शंभर वर्षांचा; शंभर वर्षे जगलेला; शतायुषी. ४ शंभर वर्षांसबंधीं. [सं.] **०वृद्ध**–पु. शतायु; शंभर वर्षांचा. 'जे तो शतवृद्ध आहे। नेणों कैचा।'–ज्ञा १३.५८४. **०शः**–अक्रिवि. शेंकडों; शेंकडयानें, शंभर शंभर अशा संख्येनें मोजलें जाणारें. [सं.] **०शाख**–वि. (शंभर फांद्या, अंगें, विभाग असलेला) विविध प्रकारचा; बहुविध; नानाविध; असंख्य प्रकारांनीं युक्त. [सं.] **शताधीश, शतायु शतायुषी**–पु. १ शंभरांचा स्वामी–मालक; शंभर लोकांवरील अधिपति. २ (थट्टेनें) ज्याच्या जवळ शंभर रुपये आहेत तो. शंभर वर्षे वयाचा, शंभर वर्षे जगणारा. [सं.] **शताळशी–सी**–वि. अतिशय आळशी; आळश्यांचा राजा. [सं. शत+आळशी] **शती**–स्त्री. शेंकडा; शे. [सं.] (समासांत उपयोग) द्वि–त्रिशती. **शतं**–न. शतकृत्य पहा. 'रान सुटले...शतं केले.' –ख९७४. –वि. शंभर. [सं.] **शतं जीव**–अ. (शंभर वर्षे जग) एक आशीर्वाद; लहान मुलांस शिंक आली असतां त्याची आई अथवा कोणी प्रौढ स्त्रिया उच्चारतात. शिंक आली असतां आयुष्यहानि होते अशी भावना आहे त्यावरून. 'शतंजीव शिंकतां आलवीसी वो।' –मध्व १५. [सं.]

शंत—पु. (गो.) केळीच्या पानाचा सुकलेला तुकडा. –सह्याद्री १३४.

शतद्रु—स्त्री. सतलज नदी. 'शतद्रु नदी उतरून अलीकडे आला.' –भाब २२. [सं.]

शतफळ—न. (गो.) बेलाचें आतडें.

शतमी—स्त्री. जाहिरात; जाहीरनामा; प्रसिद्धीपत्रक. सतमी पहा.

शतमर्दी—स्त्री. शतंमर्दी पहा.

शतरंज–शत्रंज—स्त्री. बुद्धिबळें; बुद्धिबळांचा खेळ. [अर. शत्रंज्; सं. चतुरंग; हिं. बं.]

शतरंजी—स्त्री. एक प्रकारची बैठक; बिछाईत. [फा.शत्रंजी]

शतवेधी—स्त्री. चुका (भाजी) पहा.

शतावरी—स्त्री. एक औषधी वनस्पती; या वनस्पतीस कोंकणांत 'अस्वली' व देशावर 'दिवसमावळी' म्हणतात. हिचे शतमूली आणि सहस्रमूली असे दोन भेद आहेत. [सं.शतावली]

शत्रु—पु १ अरी; दुष्मन्; वैरी; रिपु; अपकार करणारा, नाश करणारा माणूस. २ मारक, मोड करणारा पदार्थ, उदा० पित्तशत्रु, कफशत्रु, वातशत्रु, घृतशत्रु इ० [सं.] **०काशु**–वि. दुष्ट; डंख धरणारा; गुप्तशत्रु; दीर्घद्वेषी; आकसी. [सं. शत्रु द्विरुक्ति] **०जिणें**–न. शत्रूकडून जिंकलें जाणें. 'दुश्चीतपणें शत्रुजिणें।'–दा ८.६.२१. **०ता**–स्त्री वैर. **०पाचन**–न. अपायकारक पदार्थातील बाईट, अनिष्ट गुण नाहींसा करणारा पदार्थ, रामबाण औषध; उताऱ्यांचें औषध. [सं.]

शदत—स्त्री. अंमल; जोर; सक्ती. 'बिलफेल या मुलखांत वारिशेचा शदत फार आहे.' –रा १०.१८२. [अर. शिद्दत्]

शनघनी—पु. घोडयाचा एक रंग. –अश्वप १.२८.

शनि—पु. १ सूर्यमालेंतील एक ग्रह; नवग्रहांतील सातवा ग्रह. 'शनि हा खलग्रह आहे अशी सर्व देशांत फार प्राचीन काळापासुन समजूत आहे' –ज्ञाको श २. २ (ल.) प्रतिस्पर्धी; वैरी. सावकार, तगादेवाला, किंवा सारखा पाठीस लागलेला माणूस यांना हा शब्द योजतात. ३ (ल.) जुलूम; त्रासदायक गोष्ट; पीडाकारक कृत्य. 'हा शनि शनिवारपासुन मुंबईंत धूमाकूळ घालूं लागला' –के १७.६.३०. ४ मंदबुद्धि; अंगांत कांहीं जोर उद्योग, हुन्नर नाहीं असा पोर इ०. ५ नीळ नांवाचें रत्न. (इं. सॅटर्न) [सं.] **शनी उदरीं येणें**–(जन्मराशीस शनि असणें) मोठा लाभ होणें; दैव फळफळणें; नशीब उदयाला येणें. **०दृष्टीस येणें**–बारावा शनी येणें. **०लग्नास येणें**–जन्मराशीच्या पुढील राशीस येणें. **शनीचा फेरा**–पु शनिग्रहाचें अशुभ राशीस येणें; शनीची बारी; साडेसाती. संकटांची उपपत्ति लावतांना योजतात. पीडा (क्रि० येणें, चालणें). **०प्रदोष**–पु. शनिवारीं प्रदोष (त्रयोदशी) येणें; तत्प्रीत्यर्थ करावयाचा उपवास, शिवपूजा इ०. **०प्रिय**–पु. नीळरत्न. **०वार**–पु. मंदवार; रविवारपासुन सातवा वार. **म्ह०** न देत्याचा (कर्त्याचा) वार शनिवार. **शनिवाऱ्या, शनिवाऱ्या तेली**–पु. बेनेइस्राअल; यहुदी तेली; (हे तेल्याचा धंदा करितात. शनवारीं तेल विकीत नाहींत, गाळीतहि नाहींत म्हणून त्यांना हा शब्द लाविताता). **शनैश्च(श्व)र, शनैश्च(श्व)र**–पु. १ शनिग्रह; शनिदेव. २ (ल.) त्रासदायक माणूस. शनि अर्थ २ पहा. [सं. शनैस्+चर. अप. शनेश्चर, शनेश्वर] **म्ह०** सूर्यापोटीं शनैश्चर=चांगल्या बापाचा वाईट किंवा खोडकर मुलगा.

शनिपात, शनिःपात—पु. (प्र.) सन्निपात; त्रिदोष. [सं. सन्निपात]

शनिशनि—क्रिवि. हळूहळू. 'शनि शनि मग जात होतें।' –ज्ञानप्रदीप ८४४. [सं. शनैःशनैः] **शनेंशनें**–(प्र.) शनैःशनैः पहा. हळूहळू. 'सुख पडिलें सांठवणें। सत्ता वेचे शनेंशनें।' –तुगा ११४०. **शनैः, शनैःशनैः**–क्रिवि. हळू हळू; मंदगतीनें; मंदतेनें; सुस्तपणें. (क्रि० जाणें; येणें; बोलणें). 'शनैः शनैः विषयांसी निजाइसी त्यागवी वेद।' –एभा ५.२३१. [सं.]

शनैर्मेह—पु. मूत्रकृच्छ्र रोग. प्रमेह पहा.

शपणें—क्रि. शाप देणें; शापणें. [सं. शप्] **शपित, शप्त**–वि. १ शापित; शापलेलें. २ निर्भर्त्सना केलेलें; निंदित. [सं.] **शपत, शंपत, शफत**–स्त्रीपु. शपथ पहा. **शपूथ–शप्पथ**–(गो.) शपथ. 'शप्पथ खरें सांगेन.'

शपथ-थी-थे—स्त्री. १ प्रतिज्ञेवर सांगणें–बोलणें; आण; भाक; वचन (क्रि० घेणें; वहाणें; खाणें; करणें; देणें). 'सुगळ म्हणे 'रामा! म्यां शोधावी जानकी, शपथ करितो।' –मोवन ११.९९. जर तर हे शब्द पूर्वी घालून जोराचा नकार किंवा दुजोरा देण्यांत येतो. उदा० करील तर शपथ. 'हालिवल्या अंगावर अगर काडीवर पडेल तर शपथ.' २ दिव्य. [सं. शप्–शपथ घेणें] **म्ह०** शपथ केली वहायला, भाकरी केली खायला.' –मसाप ४.३. **०वाहायाला, शपथेला मोकळा होणें**–एखादें काम मुळींच केलें नाहीं असा दोष ठेवितां येऊं नये म्हणून कसें तरी (हलगर्जीपणानें किंवा थोडें फार) करणें; शपथ घेण्यास सदसदविवेकबुद्धि आड येणार नाहीं अशा स्थितींत असणें. **०सोडणें**–(मुलींच्या खेळांत) शपथेंतून मोकळें करणें. खालील वाक्य म्हणत शपथ सोडतात–'शपथ सुटली; कुंभाराची घागर फुटली; हत्तीवरून साखर वाटली.' **०पूर्वक**–क्रिवि. शपथ घेऊन. **०पत्र**–न. शपथपूर्वक लेखी जबानी; प्रतिज्ञालेख; शपथलेख; क्रियापत्र.

शंपा—स्त्री. वीज; विद्युल्लता; विद्युत्. 'होती उभी द्रुपद–जा जैसी शंपा नवांबु–भद्रारीं।' –मोवन ९.२.

शफ—पु. १ गाय, म्हैस, घोडा इ० पशूंचा खूर; हा विभागलेला असतो. २ या खुराचा विभाग. (समासांत) एकशफ; द्विशफ इ०. [सं.] **०बंध**–पु. घोडयाच्या घोटयास बांधतात तो चामडयाचा पट्टा. –अश्वप १.१२०.

शफताळू—पु (प्र.) सप्ताळू पहा.

शफर-री—पुस्त्री. एक माशाची जात; सहरी. हा मासा पांढरा असतो. 'तेथ देखों शफरें येरें। पोहों लाहती।' –ज्ञा १८. १७१८. [सं.] **०ध्वज**–पु. कामदेव; मदन.

शफा—स्त्री. इलाज; उपाय. [अर. शिफा] **०खाना**–पु. इस्पितळ; रुग्णालय. [फा.]

शबखून—शब्खून पहा.

शबय—स्त्री. १ (कु.) धांगडधिंगा. २ शिमग्यांत मागावयाचें पोस्त. ३ शिमग्यांत पोस्त मागण्याकरितां उच्चारलेला शब्द.

शबर—पु. एक जात; भिल्ल; कोळी. [सं.] **शबरी**–स्त्री. भिल्लीण.

शंबर—पु. सांबराची एक जात. रोही. [सं.]

शबल–ळ—वि. १ चित्रविचित्र; निरनिराळया प्रकारचें; रंगीबेरंगी. २ गढूळ; मिश्र; अशुद्ध. 'उठतां शुद्धासि करी शबळ।' –एभा १३.४३२. ३ एकांतएक मिसळून गेलेलें; गुंतागुंत झालेलें. ४ (वेदांत) मायोपाधिक; मायीक. –न. मिसळण; संकर; गुंतागुंत. [सं.] **०त्व**–न. गढूळपणा; मायाउपाधीची लिप्तता. 'हे बोल सोपाधी शबलत्वाचे।' –एभा ३.४८७. [सं.]

शबल, शंबळ—स्त्रीन. शिदोरी; प्रवासांतील अन्नसामुग्री, भक्ष्यपदार्थ. 'आणि प्रियु आलयां स्वभाव। शंबळें उरे वेंचे

ठाउकें नव्हे। तैसें सत्प्रसंगें करावें। पारुषें जरी।' –माज्ञा १८.५९१. [सं. शंबल]

शंभळ—पु. एक वाद्य. संबळ पहा. [सं. समेल]

शबिना—पु. छबिना पहा. [फा. शबीना]

शबिना—पु. (चुकीनें) तंबूच्या मागील किंवा पुढील पडदा; चांदणी. [फा. शामियान]

शब्खून—पु रात-छापा; रात्रीचा हल्ला. 'सरकारच्या फौजांवर शब्खून घालावा हा इरादा इंग्रजांनीं करून रात्रौ पोख्त सरंजामानसी चालून आले.' –रा १९.८०. [फा. शब्खून्]

शब्द—पु. १ आवाज; उच्चार; कोणत्याहि प्रकारचा ध्वनि; श्रोत्रेंद्रियाचा विषय. २ एखाद्या वस्तूचा, कल्पनेचा, दर्शक किंवा व्यंजक, जो अक्षरसमूह तो. ३ (व्या.) प्रथमादि विभक्ति ज्यावरून होतात अशी वर्णानुपूर्वी (नाम, सर्वनाम इ०). 'तळमळ हा संस्कृत शब्द चालतो तरी कसा?'. –नारुकु ३.४. ४ बोल; वाईटपणा; ठपका. (क्रि० लागणें; येणें; ठेवणें; लावणें; आणणें). 'तें केलें धार्तराष्ट्री विफळ सकळहि, आणिला शब्द सामीं.' –मोकृष्ण ६८.३३. ५ आज्ञा; हुकूम. ६ प्रतिज्ञा; वचन; वाचा. 'एकवेळ गेले शब्द।' –संग्रामगीतें १२०. ७ वेद. 'त्यासि शब्दपर निष्णातू।' –एभा १०.३४९. ८ शास्त्र. 'शब्दाचिया आसकडी। भेद नदीची दोही थडी। आरडते विरह वेडी। बुद्धिबोध।' –माज्ञा १६.५. [सं. शब्द=नाद करणें] (वाप्र.) **०खाणें**–लिहितांना किंवा बोलतांना शब्द गाळणें, न लिहिणें किंवा न उच्चारणें. **०खालीं न पडणें**–दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणें करणें; शब्दाला किंमत देणें; शब्द मानणें. **०खालीं पडूं न देणें**–उत्तरास प्रत्युत्तर देणें; वादविवादांत किंवा भांडणांत माघार न घेणें. **०झेलणें**–ज्याची सेवा, चाकरी शुश्रूषा, खुशामत वगैरे करावयाची असेल, त्याच्या तोंडून आज्ञा निघतांच तिच्याप्रमाणें करणें. 'राजकारस्थानी पुरुष आणि सेनापति यांचे शब्द त्यांच्या अमदानींत सगळे लोक झेलीत असतात' –ओक. **०टाकणें**–१ मागणी, विनंति करणें; एखादी गोष्ट सांगून बघणें. २ शिफारस करणें. **०ठेवणें–लावणें–लागणें**–दोष देणें; ठपका ठेवणें; दूषण लावणें. 'माझेनि दोषें पावलों खेद। हा तुज कासया ठेवणें शब्द।' –मुक्तेश्वर. 'त्वत्सम साधु न लागों देती स्वयशासि शब्द ते राजे' –मोवन २.३६; –मोउद्योग ८.१९. **०लागूं देणें–लागू–लावू देणें**–दोष पत्करणें. 'सत्यप्रतिज्ञ पांडव लागूं देती न आपणा शब्द।' –मोविराट ४.६३. सामाशब्द– **०काठिन्य**–न. (अलंकार) शब्दाचा कठोरपणा, कर्कशपणा. [सं.] **०कार्पण्य**–न. अल्पभाषा; कमी बोलणें; मितभाषण. 'शब्दकार्पण्य पंडितास दोष स्त्रीला महाभूषण।' [सं.] **०कोश–ष**–पु. १ शब्दसंग्रह; शब्दसमुच्चय; शब्दांचा साटा–खजिना; शब्दांचा अर्थासह संग्रह. २ शब्दाचे अर्थ, व्युत्पत्ति, व्याकरण वगैरे सांगणारा ग्रंथ. [सं.] **०कौशल्य**–न. शब्दरचनाचातुर्य; भाषाचातुर्य. [सं.] **०खंडन**–न. शब्द, विधान इ० खोडून काढणें; शब्दावरील टिका. **०गुण**–पु. शब्दांचे गुण, लक्षण. हे एकंदर चोवीस आहेत. ते पुढील प्रमाणें:–श्लेष, प्रसाद, समता, माधुर्य, सुकुमारता, अर्थव्यक्ति, उदारत्व, कांति, उदात्तता, ओज, सुशब्दता, और्जित्य, विस्तर, समाधि, सौक्ष्म्य, गांभीर्य, प्रेम, सन्मितत्व, प्रौढी, रीति, उक्ति, गति, भावुक, संक्षेप. इ० **०चातुर्य**–न. शब्दरचनाकौशल्य; वाक्चातुर्य; शब्दपटुता; भाषाशैली; भाषाप्रभुत्व. [सं.] **०चित्र**–न. १ शब्दांनीं केलेलें वर्णन, काढलेलें चित्र. २ (साहित्य) चित्रकाव्याचा एक प्रकार; शब्दचमत्कृति. उदा० 'मागे जी लुगडी, सकाप बुगडी' इ०. [सं.] **०चोर**–पु. दुसऱ्याचा लेख चोरून तो आपलाच म्हणून दडपून देणारा; दुसऱ्याचे शब्द चोरणारा; उष्टा बोल वापरणारा. **०जाल–ळ**–न. १ शब्दांचें जाळें; अनंत शब्दांचा नुसता समूह; शब्दावडंबर; शब्दभारूड. २ वायफळ भाषण; बडबड. 'म्हणती शब्दजाळ टाकून। निश्चल एकाग्र ऐसिजे मनें।' [सं.] **०तः**–क्रिवि. शब्दानें. 'शब्दतः अर्थतः अगाध खोली।' –एभा २१.३६७. [सं.] **०ताडन**–न. एखाद्यास लागेल असें भाषण; शब्दांचा मार; टोचून बोलणें. 'सूक्ष्मास शब्द ताडन मूर्खास प्रत्यक्ष ताडन.' [सं.] **०तात्पर्य**–न. भाषणाचा सारांश; शब्दार्थ; मतलब. [सं.] **०दोष**–पु. १ शब्दांतील व्यंग, उणेपणा; शब्दापराध; शब्दवैगुण्य. काव्यप्रकाशांत एकंदर शब्ददोष १३ सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणें: श्रुतिकटु च्युतसंस्कृति, अप्रयुक्त, असमर्थ, निहतार्थ, अनुचितार्थ, निरर्थक, अवाचक, अश्लील (जुगुप्सा, अमंगल, व्रीडा–युक्त), संदिग्ध, अप्रतीत, ग्राम्य, नेयार्थ. 'प्रताप रुद्रांत पुढील सतरा शब्ददोष सांगितले आहेत:–अप्रयुक्त, अपुष्ट–अपुष्टार्थ, असमर्थ, निरर्थक, नेयार्थ, च्युतसंस्कार–च्युतसंस्कृति, संदिग्ध, अप्रयोजक, क्लिष्ट, गूढ–गूढार्थ, ग्राम्य, अन्यार्थ, अप्रतीतिक, अविसृष्टविधेयांश, विरुद्धमतिकृत, अश्लील (जुगुप्सा, व्रीडा, अमंगल–युक्त), परुष–श्रुतिकटु. २ दोषारोप; बोल; ठपका; आळ. (क्रि० ठेवणें; घालणें; लावणें; आणणें; येणें; लागणें). ३ शब्दामुळें, नांवामुळें लागलेला बट्टा; कलंक. उदा० 'प्रतिव्रतेस व्यभिचारिणी म्हटली शब्ददोष तर येतो'. **०ध्वनि**–पु. आवाज; स्वर; बोलणें. 'तिचा हा शब्दध्वनि। म्यांही श्रवणीं ऐकिला।' [सं.] **०परीक्षा**–स्त्री. (वैद्यक) शब्दाच्या स्पष्टास्पष्टतेवरून किंवा जड हलकेपणावरून व्याधिनिदान करणें. [सं.] **०पांडित्य**–न. १ वक्तृत्व; भाषापांडित्य. २ कृती न करतां उगीच कोरडें व डौलाचें वाक्पाटव करणें; वृथा बडबड; प्रौढी. [सं.] **०पारुष्य**–न. कठोर भाषण; कटु भाषण. [सं.] **०पाल्हाळ**–पु. शब्दावडंबर;

शब्दभारूड. शब्दजाल पहा. (क्रि० लावणें; मांडणें; करणें). **०प्रमाण**–न. शब्दांनीं दिलेला पुरावा; साक्ष (तोंडी). [सं.] **०प्रहार**–पु. वाक्ताडन; मनाला लागतील, दुःख देतील असे शब्द बोलणें; रागें भरणें. [सं.] **०बोध**–न. शब्दज्ञान. 'शब्दबोधें सदोदित।' –एभा २.१६७. **०ब्रह्म**–न. वेद. 'हें शब्दब्रह्म अशेष।' –ज्ञा १.३; –एभा ११.४९८. [सं.] **०भेद**–पु. १ शाब्दिक फरक. २ प्रतिशब्द; दुसरे शब्द. [सं.] **०भेदी-वेधी**–वि. १ आवाजावरून बाण मारण्यांत पटाईत, निष्णात, तरबेज. २ वस्तूचा नुसता नाद ऐकून त्यावर बिनचूक जाणारा, वेध करणारा (अस्त्र, शक्ति, मंतरलेला बाण इ०). ३ (ल.) थोडक्या शब्दांवरून एखाद्याचें अंतरंग, मतलब, बेत जाणणारा; चांगला तर्कबाज. ४ दशरथ, अर्जुन यांचें विशेषण, अभिधान. [सं.] ५ मंत्रानें दुसऱ्याचा नाश करणारा; केवळ मंत्रोच्चारामुळें शत्रूचा नाश करणारा. **०माधुर्य**–न. शब्दांतील गोडी; मधुर भाषण. [लं.] **०योगी**–वि. (व्या.) व्याकरणांत नामें आणि नामाप्रमाणें योजलेले इतर शब्द यांना जोडून येणारें (अव्यय). उदा० वर, खालीं, पुढें, मागें इ०. हीं ज्यांना जोडलीं जातात त्यांचें सामान्यरूप होतें. **०योजना**–स्त्री. १ शब्दांची निवड, योग, जुळणी. २ शब्दरचना; वाक्यरचना. [सं.] **०योनि**–स्त्री धातु; शब्दाचें मूळ. [सं.] **०रचना**–स्त्री. शब्दांची रचना, मांडणी; वाक्यरचना; शब्दयोजना. [सं.] **०राशि**–पु. वेद. –मनको. **०लालित्य**–न. शब्दसौंदर्य; शब्दांची मनोवेधक योजना. लालित्य पहा. [सं.] **०वाहक यंत्र**–न. विजेच्या सहाय्यानें दूर अंतरावरून बोलण्याचें यंत्र. (इं.) टेलेफोन. 'सौ. महाराणीसाहेबास वारा घालण्यास एक स्त्री कामगार पाठविण्यास शब्दवाहकद्वारें...हुकूम द्यावा' –ऐरापुप्र ४.२२४. **०विचार**–पु. १ शब्दसाधनविचार; प्रत्यय प्रकरण. (इं.) इटिमॉलॉजी. २ (व्या.) वाक्यांतील निरनिराळ्या शब्दांचा परस्परांशीं असणाऱ्या संबंधाचा विचार. **०विता**–पु. परमात्मा. –मनको. **०वेध**–पु. १ वेदांतील गूढ स्थळें; शब्दांचें कूट; शब्दांचें जाळें; आडंबर. 'कंठीं शब्दवेधांचें साखळें.' –शिशु १११. २ आवाजास अनुसरून बाण, गोळी वगैरे मारणें. **०वेधी**–वि. शब्दभेदी पहा. **०वैपरीत्य**–न. (बोलणाराच्या हेतूशीं) विरुद्ध, विपरीत शब्दयोजना; भलतीच शब्दयोजना; चुकीची पदयोजना. 'कुंभकर्ण बोलला निद्रापद, कुंभकर्णाच्या मनांत होतें इंद्रपद, तस्मात्–शब्दवैपरीत्य झालें.' [सं.] **०शक्ति**–स्त्री. १ शब्दाचा जोर; शब्दाचा वास्तविक, अगदीं बरोबर असा अर्थ. शब्दाचा यौगिक अर्थ. २ (साहित्य) अभिधा, लक्षणा, व्यंजना इ० शब्दार्थ बोधकवृत्ति. [सं] **०शक्तिगम्य**–वि. शब्दशः; मूळ अर्थाप्रमाणें. **०शासन**–न, शब्दांचा अर्थ, त्यांची योजना वगैरे संबंधी; व्याकरणशास्त्र, शब्दविचार, इ० नियम. [सं.] **०शास्त्र**–न. १ शब्दविज्ञान; शब्दांचें संपूर्ण विवरण करणारें शास्त्र; व्युत्पत्तिशास्त्र. २ व्याकरणशास्त्र. [सं.] **०शुद्धि**–स्त्री. १ व्याकरणनियमाप्रमाणें निर्दोष अशी शब्दयोजना; अचूक मांडणी. २ शब्दांतील दोष काढून टाकणें; शब्दांची तपासणी; दुरस्ती. ३ परकीय शब्द न वापरणें; भाषाशुद्धि. **०शूर**–पु. केवळ बोलण्यांत शूर, पटाईत. –धनुर्भंग पृ. ७३. **०श्री**–स्त्री. शब्दांची शोभा. 'एथूनि शब्दश्री सच्छास्त्रिक।' –ज्ञा १.३४. **०संग्रह**–पु. शब्दसमूह; शब्दसमुच्चय; शब्दकोश–ष. [सं.] **०संचय**–पु. शब्दांचा सांठा, समूह; शब्दांची समृद्धि, वैपुल्य. **०संदर्भ**–पु. वाक्य रचनेंतील शब्दांचा एकमेकांशीं असलेला संबंध–अन्वय. [सं.] **०सादृश्य**–न. (अर्थानें अगदीं निराळे असणाऱ्या) शब्दांतील साम्य, सारखेपणा. [सं.] **०साधनिका**–स्त्री. १ शब्दविचार; शब्दांची बनावट; व्युत्पत्ति. २ शब्दांची फोड, उकल; व्याकरण चालविणें. [सं.] **०साधित**–न. शब्दापासून, नामापासून साधलेला शब्द. –वि. (व्या.) नामापासून बनलेलें. याच्याउलट धातुसाधित. [सं.] **०साम्य**–न. शब्दांचा सारखेपणा; सादृश्य. [सं.] **०सूची**–स्त्री. शब्दांची सूची. याच्या उलट पदसूची वगैरे. [सं.] **०सृष्टि**–स्त्री. १ शब्दांचा संग्रह; शब्दांची रचना. २ (ल.) काव्य; ग्रंथ; प्रबंध. 'आतां वंदूं कवेश्वर। शब्दसृष्टीचे ईश्वर।' –दा १.७. [सं.] **०स्फुरण**–न. (शब्दांचें फुरफुरणें, थरथरणें) ज्यांत जोडाक्षरें व ट वर्गांतील अक्षरें एकसारखीं पुष्कळ येतात अशा कठोर, कर्णकटु प्रबंधाबद्दल म्हणतात [सं.] **०स्वारस्य**–न. शब्दांतील गोडी, लज्जत; शब्दमाधुर्य. [सं.] **शब्दविणें**–क्रि. बोलविणें. 'मीचि शब्दातें शब्दविता।' –एभा १३ ३४४. **शब्दाचा मार**–पु. वाक्ताडन; शब्दप्रहार; कानउघाडणी; निर्भर्त्सना. 'वेड्यास टोणप्याचा मार, शहाण्यास शब्दाचा.' **शब्दांची कसरत**–स्त्री शब्दांची कसरतीप्रमाणें बळेनें केलेली अस्वाभाविक रचना. 'भाषा आणि तपश्चर्या, वचनाचें कष्ट, शब्दांची कसरत, या गोष्टींची जरूर असते.' –नाकु ३.४. **शब्दाडंबर**–न. शब्दजाल; केवळ शब्दांचें वैपुल्य; अर्थहीन शब्दरचना; पोकळ वक्तृत्व. [सं. शब्द+आडंबर] **शब्दातीत**–वि. शब्दांच्या किंवा बोलण्याच्या शक्तीबाहेरचें; वर्णन करितां येत नाहीं असें; शब्दांनीं वर्णन करण्यास अशक्य; अनिर्वाच्य. [सं. शब्द+अतीत] **शब्दानुप्रास**–पु. (साहित्य) शब्दाचा अनुप्रास; एक यमकरचना; ज्यांत त्याच त्या शब्दाची पुनःपुनः आवृत्ति होतें असा अलंकार. याच्या उलट वर्णानुप्रास. [शब्द अनुप्रास] **शब्दानुशासन**–न. शब्दशासन; शब्दांच्या लिंग, रूपांबद्दल, अर्थाबद्दल वगैरे नियम. [सं.] **शब्दानशब्द**–क्रिवि. प्रत्येक शब्द. 'या एकंदर बोलण्यांतील शब्दानशब्द शांतपणानें शिष्याच्या मुखांतून

निघत होता.' –उषःकाल. [शब्द+न्=आणि+शब्द] **शब्दामृत**–न. (काव्य) शब्दमाधुर्य; वाङ्माधुर्य; अमृताप्रमाणें गोड शब्द. [शब्द+अमृत] **शब्दार्थ**–पु. १ शब्दाचा अर्थ, आशय. २ शब्दाचा मूळ, शब्दशः अर्थ; यौगिकार्थ. [सं.] **शब्दालंकार**–पु. (साहित्य) शब्दाच्या रूपावरून साधलेला अलंकार; काव्यांतील अनुप्रास; यमकादि अलंकार; याच्या उलट अर्थालंकार. या अलंकारांचें पुढील पांच प्रकार आहेत:–वक्रोक्ति, अनुप्रास, यमक, श्लेष, पुनरुक्तवदाभास. ह्यांत पुन्हां प्रत्येकीचे जे निरनिराळे भेद आहेत ते सर्व प्रतापरुद्रग्रंथांत व काव्यप्रकाशांत सांगितले आहेत. [सं.] **शब्दाशब्द**–पु १ चांगले–वाईट शब्द; अविचाराचे व उद्धटपणाचें भाषण; वेळ प्रसंग न पहातां असभ्यपणाचें बोलणें. 'चौघांमध्यें शब्दाशब्द बोलूं नये, चांगले बोलावें' २ अप्रत्यक्ष व आक्षेप न घेतां बोलणें; चांगलें किंवा वाईट (यांपैकीं कोणतेंच नाहीं असें) भाषण. 'मी त्याला शब्दाशब्द कांहीं बोललों नाहीं.' [सं. शब्द+अशब्द] **शब्दित**–न. भाषण; आवाज; बोलण्याचा स्वर; ध्वनि. –वि. १ उच्चारलेलें; बोललेलें; वदलेलें; घोषित केलेलें. २ शब्दानें युक्त केला जो वाद्यादि तो; वाजविलेलें; निनादित. [सं.] **शाब्द, शाब्दिक**–वि. शब्दासंबंधी, वाग्युक्त; वाणीयुक्त; वाचिक. 'तरी तप जें कां सम्यक्। तेंही त्रिविध आइक। शारीर मानसिक। शाब्द गा।' –ज्ञा १७.२००. २ स्वरासंबंधी; आवाजासंबंधी. ३ (व्या.) नामासंबंधी; नामवाचक (प्रत्यय वगैरे). ४ अनुभवाशिवाय बडबड करणारे; केवळ शब्द जाणणारे; शब्दज्ञानी. 'वृथा शाब्दिकांचें शब्दज्ञान। तेंही व्याख्यान दाविलें।' –एभा ११.६४८. –पु. शब्दांचे अर्थ जाणण्यांत व रूप समजण्यांत, करण्यांत निष्णात, हुषार; तरबेज; वैयाकरण. [सं] **शाब्दबोध**–पु शाब्दिक बोध; अक्षरशः होणारा अर्थ; यौगिक अर्थ. [सं.] **शाब्दिकसृष्टि**–स्त्री. अलंकारिक, कुशल शब्दरचना; काव्यप्रबंधांतील शब्दरचनाचातुर्य. [सं.] **शाब्दी**–स्त्री. शब्दप्रवृत्ति. 'तेवींचि हा अनादि। ऐसी आथी शाब्दी।' –ज्ञा १५.२३०.

शब्दुली—स्त्री. (गो.) गुलबाशीचें झाड. [फा. शब्गुल]

शंभर—पु. सांबर; हरिणीची एक जात. सांबर पहा. [सं. शंबर]

शंभर—वि. शत; १०० संख्या; शें; एक, दोन, तीन अशाप्रकारची शंभराची पट दाखवितांना 'शें' असें रूप वापरतात. उदा० एकशें, दोनशें, तीनशें इ०. [सं. शतं; इं. सेंटम्] **म्ह०** शंभरांत फूल, हजारांत काणा, सर्वांत आंधळा दाणा. (व.) ज्याच्या डोळ्यांत फूल पडलें आहे, तो शंभर डोळसांत शहाणा, तसेंच एका डोळ्यानें आंधळा (काणा) असलेला हजारांत शहाणा व या सर्वांपेक्षां दोन्हीं डोळ्यांनीं आंधळा अधिक शहाणा असतो. (वाप्र.) **शंभर बुडथा मारून अंग कोरडें दाखविणारा**–ज्याची लबाडी किंवा लुच्चेगिरी दुसऱ्यास सिद्ध करतां येत नाहीं असा; अनेक लबाडया करून त्यांत न सांपडणारा. **०रुपये तोळा बोलणें**–मितभाषण, अगदीं थोडें व केवळ अवश्य तेवढेंच भाषण करणें (अबोल माणसाबद्दल वापरतात). **०वर्षें भरणें**–एखाद्याचा मरणकाल, विनाशकाळ जवळ येऊन ठेपणें. 'शतायुर्वै पुरुषः' या न्यायानें मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षें आहे, तें संपणें; मरणें. 'तुला जी काय हकीकत माहीत असेल ती सगळी सांग, नाहींतर तुझीं शंभर वर्षें आतांच भरलीं समज.' –मथुरा. **शंभर हातांत न देणें**–अगदीं दूर राहणें; अलिप्त असणें. **०नंबरी**–वि. उत्कृष्ट प्रतीचें; अत्यंत शुद्ध; ज्यांत बिलकुल भेसळ नाहीं असें (सोनें इ०).

शंभु—पु १ शिवाचें नांव; शंकर; महादेव. 'तैसें लक्ष्मीयेचें थोरपण न सरे। जेथ शंभूचेंही तप न पुरे।' –ज्ञा ९.३८०. २ (ल) सरळमार्गी, भोळा माणूस. ३ (ल.) मूर्ख माणूस. [सं.]

शम्—अव्यय. १ कल्याण; सुख. २ समाप्ति; शेवट. [सं.]

शम—पु. १ शांतता; शांति; स्थिरता; स्तब्धता. २ (राग आणि विकार यासंबंधी) इंद्रियदमन; मनोनिग्रह (वेदांती लोकांवर शम, दम, तप, तितिक्षा, श्रद्धा, आणि समाधान अशी एकंदर सहा कर्तव्यें लादलीं आहेत). 'ऐसा बुद्धीचा उपरमु। तया नाम म्हणिपे शमु।' –ज्ञा १८.८३४. शांति; अक्षुब्धता; अक्षोभ. ३ आत्यंतिक सुख; मोक्ष; निर्वाण. ४ औदासीन्य; संन्यस्तवृत्ति; निवृत्ति. ५ योगसिद्धि. 'कर्म हेंच शमाचें कारण होतें.' –गीर ६९६. [सं. शम्=मनोनिग्रह करणें] **०दम–दमादि**–न. वेदांती लोकांची शम, दम आदिकरून कर्तव्यें; शम पहा. शमदमादि साधनसमुच्चय. **०विषम**–वि. (पाऊस, भाव, रोग वगैरेसंबंधी लोकरूढ) १ हलके व जाड; कमजास्त; कमीअधिक; थोडेंफार; मागेंपुढें होणारें. २ थोडयाबहुत फरकाचें; थोडीफार चूक असलेले (हिशेब, विधान, रीत). ३ किंचित् मतभेद असलेलें; थोडाफार गैरसमज झालेलें. **शमणें**–अक्रि. १ शांत होणें; स्थिर, स्तब्ध, निश्चल होणें; संतुष्ट होणें; समाधान पावणें. 'अत्युग्र भीम काळचि, हें वचन यथार्थ मान रे! शम रे!।' –मोभीष्म १२.२७. ३ ओसरणें; कमी होणें. ४ मरण पावणें; मरणें. 'जो अधिप कोसलांचा भासत नव्हता रणीं शमावासा।'–मोकर्ण ३.२७. ४ दमणें; थकणें. 'शमले मद्बंधु बहु...' –मोभीष्म १०.१३. [सं. शम्] **शमविणें**–क्रि. १ शांत करणें; स्थिर करणें; दमन करणें. २ मारणें; नाहींसें करणें. [शम प्रयोजक] **शमन**–न. १ शांति; शांतता; स्वस्थता; स्तब्धता. २ (वैद्यक) शांतवन; उपशमन; उपशम; तीव्रता कमी करणें; थंडावा आणणें. 'सप्तोपचार' पहा. ३ उपशमक; उपशांतक; उपशमन करणारें

औषध; तीव्रता कमी करणारें, वेदना हलक्या करणारें औषध; दुःखहारक औषध. उदा० 'पित्ताचें शमन सुंठसाखर'. ४ शांत होणें; स्तब्ध होणें; उपशम होणें; स्थिर होणें; निवारण. ५ यम. [सं.] **शमनीय**–वि. शांत होणारें; शांत करण्यासारखें. [सं.] **शमित**–वि. १ शमलेलें; शांत झालेलें. २ कमी झालेलें; दबलेलें. ३ उपशम पावलेलें; संतुष्ट. [सं.] **शमी**–वि. सौम्य; शांत; स्तब्ध, स्थिर; सौम्य स्वभावाचा. 'नमिला शमि-लास्य-प्रद शांति-जल-धि एकनाथ तो भावें।'–मोसन्मणिमाला (नवनीत पृ. ३४७.) [सं.]

शमनाबीर—पु. एक क्षुद्र दैवत; एक मुसलमानी समंध. **शमनाबिराची कांडी फिरविणें**–लबाडी, कपट, लुच्चेगिरी करणें; हातचलाखी करणें.

शमल—न विष्ठा; घाण; मळ; मैला. [सं.]

शमला—पु. डोक्यावरील फेट्याचा किंवा कमरबंदाचा सोडलेला सोगा. समला पहा. [अर. शम्ला]

शमस-उल्-उलेमा—पु. मुसलमानांतील शास्त्री, पंडित, महामहोपाध्याय. [अर. शम्स्=सूर्य]

शमिना—पु. १ तंबूच्या पुढील भागाचा किंवा मागील भागाचा पडदा; चांदवा. २ शामियाना; डेरा; मोठा तंबू. [फा. शमियाना]

शमी—स्त्री. १ एक काटेरी झाड. (दसऱ्याच्या दिवशीं शमीची पूजा करितात). २ या झाडाचा (देवाला वाहण्यास आणतात तो) पाला. शमीस संवदड म्हणतात. [सं.] **०धान्य**–न. शेंगेंत उत्पन्न होणारें तूर, मूग, वाटाणा वगैरे धान्य. याच्या उलट शुकधान्य. [सं.] **०पूजन-पूजा**–नस्त्री. दसऱ्याच्या दिवशीं शमीच्या झाडाचें केलेलें पूजन, अर्चन.

शय—पु हात. 'अर्पीन अर्जुना जो दावील तया न आवरीन शय।'–मोकर्ण २६.१०. [सं.]

शयन—न. १ झोंप; नीज; निजणें; निजण्याचा व्यापार. 'कृष्ण तयां ध्यानीं आसनीं शयनीं।'–तुगा २२. २ बिछाना; मंचक; चटई; माचा; खाट; पलंग; आंथरूण; शय्या; शेज. 'नसतां... पयःफेन शुभ्र मृदु शयन।'–मोस्त्री ४.४४. ३ आडवें होणें; जमीन, पलंग इ० वर निजणें; अंग टाकणें; अंगाखालीं घेणें. **शयनी एकादशी**–स्त्री. आषाढ शुद्ध एकादशी, या दिवशीं विष्णु झोंपी जातात व चातुर्मास्य संपेपर्यंत उठत नाहींत. [सं.] **शयनीय**–वि. निजण्यास योग्य. **शय्या**–स्त्री. १ बिछाना; आंथरूण. २ खाट; पलंग. ३ शयन पहा. [सं.] **शय्यादान करणें**–१ मृताची शय्या ब्राह्मणास देणें; उत्तरक्रियेंतील दान. २ सती जाणें. 'शय्यादान करणें मला आणून द्या शिर।'–पला ४०, १०४. **शायी**–वि. निजणारा; झोंपणारा. (जेथें किंवा ज्याप्रकारें असेल तो शब्द पूर्वी योजतात) उदा० जलशायी; शेषशायी; भूशायी; सुखशायी; उत्तानशायी. [सं.]

शय्याद्री—पुस्त्री. (प्र.) सह्याद्रि पहा. [सह्याद्रि अप.]

शर—पु. १ बाण; तीर. २ मृग नक्षत्रांतील शिवाच्या तीन ताऱ्यांचा आकाशांतील बाण. लुब्धक पहा. –वि. (ज्यो.) पांच संख्या (मदनाचे पंच शर यावरून). [सं.] **०कांड**–पुन. बाणाची काठी, दांडी, कामटी. [सं.] **०जन्मा**–पु. कार्तिकस्वामी. [सं.] **०जाल**–न. (काव्य) बाणाची झोड, वर्षाव; सरबत्ती; बाणांचें जाळें. [सं.] **०धार**–पु. बाणांचा पाऊस; वर्षाव. 'मेघ वर्षतां जळ शरधारीं।'–एभा २१.८२. **०धि**–पु. भाता; बाणांची पिशवी. [सं.] **०पंजर**–पु. १ (काव्यांत अतिशयोक्तीनें वर्णन करतांना) एखाद्याच्या अंगांत पुष्कळ बाण शिरले म्हणजे हा शब्द योजतात; देहाला शरांचें पिंजऱ्याप्रमाणें आवरण. २ बाणांचा पिंजरा, पलंग. [सं.] **०मंजरीं पडणें**–१ (ल.) (भीष्माच्या कथेवरून) मृत्यूच्या द्वारीं खितपत पडणें; आजारानें, दुखण्यानें झिजत पडणें. २ ज्यांतून बाहेर पडण्यास कोणताच उपाय नाहीं अशा संकटांत पडणें. **०पात**–पु. १ बाण सोडणें, फेकणें. २ बाणाचें पतन; बाण येऊन पडणें, आदळणें. ३ बाणांचा वर्षाव. [सं.] **०पुंखा**–स्त्री. बाणाची पिसें; बाणाचा पिसें लावलेला मागील भाग. [सं.] **०फल**–न. बाणाचें टोंक, अग्र; बाणाचें धातूचें पातें [सं.] **०वर्ष-वर्षाव-वृष्टि**–पुस्त्री. बाणांचा वर्षाव, भडिमार. [सं.] **०शय्या**–स्त्री. बाणांचा बिछाना. [सं.] **०संधान**–न. बाणाचा नेम; बाणानें नेम धरणें, साधणें, मारणें. [सं.]

शरांटी—स्त्री. बाणाची कामटी. –क्रिवि. (महानु.) बाणांच्या आंटींत, कैचींत. 'शरांटी पिढौनु। तों हीं खांडेंसुनु।'–शिशु ४४२. (टीपग्रंथ) **शराभ्यास**–पु धनुष्यविद्या; शरसंधान करण्याची संवय; शिक्षण. [सं.] **शरासन**–न. १ धनुष्य; चाप. २ शरसंधान; बाण फेकणें. [सं.]

शर—पु (ज्यो.) १ ताऱ्याचें क्रांतिवृत्तापासून अंतर; याम्योत्तर अंतर; खगोलीय अक्षांश. २ (गणित) व्युत्क्रमज्या. **०पात**–पु. शरवृत्ताचा जो क्रांतिवृत्तांशीं पात होतो तो. –सूर्य १२. [सं.] **०वृत्त**–न. क्रांतिवृत्तांशीं लंब असणारें वृत्त. –सूर्य १२. **०सूत्र**–न. आकाशांतील रेखांशवृत्त [सं.]

शर—पु. १ (स्थापत्य) कमानीची चढ, उंची. 'कमानीची जाडी ६ इंच असून शर गाळण्याच्या एक अष्टमांश असावा' –मॅरट १९. २ (गणित) कंसाचीं दोन टोकें सांधणाऱ्या ज्येच्या मध्यापासून तिजवर लंब काढून तो त्या कंसाला मिळे तोंपर्यंत वाढविला असतां, त्या लंबाला त्याच कंसाचा शर म्हणतात. –महमा २९. उंची. [सं.]

शरग—पु. (तंजा.) पातेरा; वाळलेलीं पानें; पाचोळा. [ता. शरगु]

शरट-ठ—पु. सरड. सरडा; सरट. [सं. शरट]

शरण—न. रक्षण; संरक्षण; सांभाळ. (क्रि० जाणें, येणें; असणें). –वि. १ संरक्षक; रक्षक; सांभाळ करणारा इसम; प्रतिकारक; आश्रयदाता; रक्षणकर्ता. २ आश्रय, संरक्षण मागणारा. ०**असणें**-रक्षण व्हावें म्हणून विनंति करणारा होणें, असणें; आश्रय मागणें. 'मी तुम्हांस शरण आहें, जीवदान द्या.' ०**जाणें-येणें**-रक्षणासाठीं शरणागत होणें; एखाद्याचें वर्चस्व कबूल करून दया, क्षमा भाकणें. 'यालागीं तूं अर्पी सीता । शरण जाई अयोध्यानाथा ।' –एकनाथ–रामायण. **म्ह**० शरण आल्या मरण मोजूं (देऊं, चिंतूं) नये' =शरण आलेल्यास जीवदान द्यावें, त्याचें रक्षण करावें. 'शरण आलिया मरण चिंतूं नये' –भाब ३२. **शरणागत, शरणापन्न**–वि. आश्रय मागण्यास आलेला; शरणार्थी; दयेची याचना करणारा. 'शरण जाय अयोध्यानाथा । तो वज्रपंजर शरणागता । भवव्यथा वारील ।'. 'अहंकार जड पर्वत । शरणागता बाधे यथार्थ ।' [सं. शरण+आगत, आपन्न] ०**गतवत्सल**–वि. शरण आलेल्यावर दया करणारा; दीनदयाळु. (राजा, परमेश्वर यांचें अभिधान). [सं. शरण+आगत+वत्सल] **शरणार्थ**–पु. लिंगायत लोकांची एकमेकांची भेट झाली असतां नमनार्थी वापरावयाचा वाक्प्रचार, संज्ञा. तुमचा आश्रयार्थी, नम्र सेवक. **शरणार्थी**–वि. शरणागत पहा. **शरण्य**–वि. १ शरणागतांचा आश्रयदाता; संरक्षक; रक्षणकर्ता. २ आश्रय देण्यास, रक्षण करण्यास योग्य, लायक. इ० [सं.]

शरण—न. चिता. (प्र.) सरण पहा. [सरण]

शरत्-द—स्त्री. १ सहा ऋतूंपैकीं चौथा ऋतु. वैदिक महिने भाद्रपद व आश्विन पण पुराणाप्रमाणें आश्विन आणि कार्तिक हे महिने या ऋतूचे होत. २ वर्ष. [सं.] **शरत्काल, शरदृतु**–पु. शरद्ऋतूचा काल; हिंवाळा. [सं.] **शारदारंभपात**–पु. दक्षिणायनपात. उत्तरायणपात पहा.

शरपुंखा-खी—स्त्री. एक औषधी वनस्पति; उन्हाळी; सर्प विषावर औषधी झाड. 'या झाडाची मुळी पाण्यांत उगाळून पिण्यास देतात व डोळ्यांत घालतात.' –बदलापूर ३३८. [सं.]

शरबत—न. १ सरबत; लिंबू, डाळिंब, चिंच इ० च्या रसांत पाणी व साखर घालून केलेलें गोड–आंबट पेय. २ सुधा. [फा. शरबत] ०**खोरी**–स्त्री. शरबत पान. वाङ्निश्चयाचा फलाहार. 'सैफन्मुलूक यांची कन्या साहेब–जादे यांस देण्याचा निश्चय होऊन शरबत खोरी जाली.' –रा ७.१४८.

शरभ—पु. १ हिमालय पर्वताच्या भागांतील आठ पायांचा एक काल्पनिक प्राणी; हा सिंहाहून बलिष्ठ असतो असा समज आहे. २ हत्तीचा छावा. ३ टोळ. ४ एक किडा. [सं.]

शरम—स्त्री. लाज; लज्जा. [फा. शर्म्] **शरमणें**–क्रि. लाज, लज्जा वाटणें; लाजणें; वरमणें; ओशाळणें. **शरमिंदा-धा**–वि. १ शरमलेला; लाजलेला; खजील; ओशाळलेला. २ उपकाराच्या भारानें किंवा भिऊन दबलेला; गोगलगाय बनलेला. [फा.]

शरा—पु. १ मुसलमानी कायदा; इस्लामधर्म–शास्त्र. 'तेथील शरा–अन्वये फैसले करीत जाणें' –वाड सनदा ७६. २ शास्त्रनिर्णय. 'कागद शराचा करून दिला.' –वाड–शाछ १८३. [अर. शर्अ]

शरा—स्त्री. पगाराचा दर. 'स्वारास शरा पंधरापासुन तीस पर्यंत देतात.' –पेद १०.७६. [हिं. शरह]

शराईत—वि. निष्णात; तरबेज; निपुण; पटाईत. (प्र.) सराईत पहा. [सराव, सराईत]

शराकत-दार-नामा-कती—पु. सरकत, सरकतदार, सराकती पहा. [अर. शिराकत्] **शराकतदार**–वांटेकरी. 'दुसरे कोणास त्याचा हिस्सेदार व शराकतदार न जाणावा.' –वाड–सनदा ७५. [अर.] **शरीक**–पु. १ वांटेकरी; पातीदार; साथीदार. 'तेव्हां एवढे मसलतीस शरीक होऊन तोंड पहात बसावें, कजिया यांत काढावा फल काय?' –ख ८.४३१८. २ दोस्त. तेव्हां जिवानसीं शरीक आहों.' –रा ८.१६८. [अर. शरीक्]

शराब—पुस्त्री. (पिण्याची) दारू; मद्य. [अर. शराब्] ०**खाना**-पु. दारू पिण्याचें स्थान; सुरागार. ०**पाणी**–न. दारूबाजी; अंमल; निशा. 'नाचरंग आणि शराबपाणी याचीच त्याला विशेष आवड होती.' –स्वप ७३. **शराबी**–वि. मद्यपी; दारूबाज. [फा.]

शरायणी गज—पु जमीन मोजण्याचा गज; एक लांबीचें माप.

शरायती—स्त्री. (कारकुनी भाषा) काकपद; ∧ अशी खूण लेखांतील ओळीमध्यें किंवा वाक्यामध्यें मागाहून घातलेला शब्द, दाखविण्याकरितां करावयाची खूण. [अर. शराइत]

शरारत—स्त्री. (ना.) द्वेष; हेवा; मत्सर. [फा.] **शरारती**–वि. (ना.) हेवेखोर; मत्सरग्रस्त; द्वेषी; मत्सरी. **शरारती मामला**–पु. (ना.) द्वेषबुद्धिनें प्रेरित होऊन एखाद्यावर घेतलेलें बालंट.

शरारू—वि. घातुक. 'प्रकटि खरा रूपा, पी जें गगनाला असें शरारू पापी।' –मोकृष्ण १८.१५. [सं.]

शराव-वी—पुस्त्री. वेळणी; जोगली; ताटली; परळ नांवाचें मातीचें भांडें; उथळ भांडें. [सं. शराव]

शरीयत्-पन्हा—पु. इस्लामधर्मशास्त्रज्ञ; काजी. 'शरीयत्पन्हा महम्मद हैदर.' –वाड–सनदा ७४. [फा. शरीअत्पन्हा]

शरीर—न. १ देह; काया; वपु. २ गुह्येंद्रियाबद्दल संकेतानें म्हणतात. [सं.] **०कमावणें**–बलवृद्धि करणें; शरीराची निगा राखणें, जोपासना करणें; शरीर सुदृढ करणें. 'शरीर कमावून बसावयाचें पण अक्कल गमावून बसावयाचें.' –राजसंन्यास १५. **०वेंचणें**–परोपकाराकडे देह झिजविणें. सामाशब्द– **०कष्ट**–पुअव. शारीरिक श्रम, हाल, अपेष्टा; देहकष्ट. **०कळा–कांति**–स्त्री. शरीराचें तेज, टवटवी, तजेला. [सं.] **०दंड**–पु १ तप आचरून किंवा अन्य रीतीनें देहाला दिलेले श्रम; कष्ट; देहदंड. २ शारीरिक शिक्षा; मारणें इ०. [सं.] **०पाटव**–न. शरीराचा निरोगीपणा; सुस्थिति; आरोग्य; सुदृढता. [सं.] **०प्रकृति**–स्त्री. १ प्रकृतिमान; शरीराची ठेवण; स्वभाव. २ देहाचें आरोग्य; स्वास्थ्य. [सं.] **०भाव**–पु. १ शारीरिक प्रकृति; स्वभाव; शारीरिक अवस्था. 'व्याध करी साष्टांग नमस्कार। मुखे म्हणे जयजयकार। तों शरीरभाव पालटला।' –शिशु २. २ अहंभाव. –मनको. [सं.] **०भोग**–पु. १ शारीरिक कष्ट, यातना, रोगपीडा इ०. (सामा.) दुखणें; दुखापत. २ शारीरिक विलास, करमणूक, ऐषआराम. (क्रि० भोगणें). ३ प्रारब्धप्राप्त देहपीडा. ४ शरीराला होणारें सुखदुःख. [सं.] **०यष्टि**–स्त्री. शरीर; अंगकाठी; शरीरठेवण, घडण. [सं.] **०संपत्ति**–स्त्री. १ आरोग्य; स्वास्थ्य; निरोगीपणा. २ शरीरांतील जोम; उत्साह, शक्ति. [सं.] **०संबंध**–पु. १ सोयरिकीमुळें जडणारा संबंध; आप्तपणा; सोयरीक; सोयरगत; नातें. २ विवाहसंबंध; लग्न (लग्नचिट्ठींत वापरतात). ३ हातघाई; मारामारी; धक्काबुक्की, लगट. **०संबंधावर येणें**–हातघाईवर येणें; मारामारी, धक्काबुक्की करणें; लगट करणें. **०संबंधी**–वि. सोयरीकसंबंधी; विवाहामुळें नातें जडलें आहे असा. **०सांडोवा**–पु. देहाचें निंबलोण; देह ओवाळून टाकणें. 'यालागीं शरीरसांडोवा कीजे। सकल गुणांचें लोण उतरिजे।' –ज्ञा ९. ३८१. [शरीर+सांडणें] **०स्वास्थ**–न. शरीराची सुस्थिति; आरोग्य; शारीरिक सुख. [सं.] **शरीराची ढगळ**–स्त्री. शरीराची झीज; कृशपणा (हगवण इ० मुळें आलेला); शरीराची खराबी. **शरीराची दामटी**–स्त्री (अजारीपणामुळें) शरीराला आलेली हीन अवस्था; कृशता; खराबी. **शरीराची धलपी–ढळपी**–स्त्री. (रोगानें) शरीर कृश, काठीप्रमाणें होणें. **शरीरी**–वि. १ देहधारी; देही; देह धारण करणारा. २ शरीरासंबंधी; शरीराचें; शारीरिक. –पु. देहधारी सजीव प्राणी. [सं.] **शारीर, शारीरक**–न. १ शरीरविषयक शास्त्र; शारीरशास्त्र. २ गातांनां कंप घेण्याचें कौशल्य. –वि. १ दैहिक; देहासंबंधीं; शरीरी पहा. –गीर १४२. **शारीरव्रण**–पु. सहजव्रण; स्वाभाविक व्रण; याच्या उलट आगंतुक व्रण. **शारीरशास्त्र**–न. शरीरविषयक शास्त्र. (इं.) ॲनाटमी. [सं.] **शारीरिक**–वि. शरीराचा; शरीरासंबंधीं. शरीरी पहा. याच्या उलट मानसिक. [सं.]

शको. ७. ७

शर्करा—स्त्री. १ साखर. 'शर्करेचिया वाळवंटीं। घृत सरिता धांवती लोटीं।' –मुसभा ९.९८. २ वाळू; रेती. ३ मूतखडा रोग. **०मेह**–पु. लघ्वींतून वाळूसारखा पदार्थ ज्यांत जातो असा रोग. प्रमेह पहा. [सं.] **शर्करावगुंठित**–वि. साखरेंत घोळलेलें; साखरेनें आच्छादिलेलें. (ल) वरून गोड पण आंत कडू. [शर्करा+अवगुंठित] **शर्करिन**–न. साखरेपेक्षां अतिशय गोड पदार्थ; मधुमेहाचे रोगी साखरेऐवजी हें वापरतात. (इं.) सॅकरीन.

शर्ट—पु. एक विशेष प्रकारचा सदरा; खमीस. [इं.]

शर्त–र्त्त–र्थ—स्त्री. १ अट; करार; नियम. २ कसोशी; पराकाष्टा; कमाल; कळस; सीमा. 'आईसाहेबास शपथ दिली ती शर्त करणें ती केली.' –मराचिथोशा २६. 'किल्याचे लोक मुरारबाजी पडला म्हणोन गणना न करितां शर्तीनें भांडूं लागले.' –सभासद ३४. ३ एखाद्या गोष्टीचा बेसुमारपणा; आधिक्य, अतिशयता (आश्चर्य, कौतुक वाटण्याजोगी). ४ पराकाष्टेची समृद्धि; बाहुल्य. उदा० 'गलबतांची शर्त.' 'अंब्यांची शर्त.' 'लाडवांची शर्त.' 'पुष्पांची शर्त.' इ०. ५ पाणी; तेज, पराक्रम. –तुगा. 'एका टांकासरशी त्याचा फाडकन् फडशा पाडण्याची शर्थ झाली.' –नि १२. ६ शिरस्ता; वहिवाट. 'माफी भरल्यावर सलूकशर्त कमधारा याचा आकार होईल.' [अर. शर्त्] **०होणें**–बेसुमार होणें. 'तुझ्या खाण्याची शर्थ झाली'. **शर्तनामा**–पु. तह; करारनामा. [फा.] **शर्त-बेशर्त**–स्त्री. पराकाष्ठा, अतिशय मेहनत. (क्रि० करणें). 'फिरून चालून येण्याची उमेद धरावी तो सदाशिवपंतांची कुतर–तोड करून सर्व शत्रूस आपल्या लष्करांत शर्तबेशर्त करून दामटून घातले.' –पाब २५. **शर्तमर्दी**–स्त्री. अचाट पराक्रम; महनीय कृत्य; प्रयत्न; साहस इत्यादिबद्दल कौतुकानें योजावयाचा शब्द. 'सेवा शर्त–मर्दीनें केली।' –ख ४.१८०८.

शर्धा—स्त्री. पाद; अधोवायुनिस्सारण. (क्रि० करणें). 'शर्धा करिती अधोद्वारें। नाकीं तोंडीं भरे दुर्गंध।' –एभा २३. ५५८. [सं.]

शर्म, शर्मणें, शर्मिंदा, शर्मिंधा—शरम इ० पहा. **शर्मिन्दगी**–स्त्री. लज्जा; ओशाळगत. 'हल्लीचे शिकस्तेची गैरत आणि शर्मिन्दगी नबाबास फार जाली आहे.' –रा ५.१९. [फा. शर्म] **शर्मिन्दा**–वि. लज्जित; ओशाळा. 'चाकरी करून शर्मिन्दे व्हावे यांत कांहीं लौकिक नाहीं.' –ख ४.१८२१.

शर्म—न. सुख; कल्याण. [सं.]

शर्मा—अ. १ ब्राह्मणाच्या नांवापुढें लागणारें उपपद. उदा० विष्णुशर्मा ब्राह्मण. क्षत्रियाच्या नांवापुढें वर्मा, वैश्याच्या

नांवापुढें गुप्त, व शूद्राच्या नांवापुढें दास, पालित अशीं उपपदें योजितात. [सं.]

शर्मिष्ठा—स्त्री. १ नक्षत्रपुंज; उत्तरधुवाजवळचा एक सहा ताऱ्यांचा पुंज. (इं.) कॅसिओपिआ. २ ययातीच्या एका स्त्रीचें नांव. [सं.]

शर्यत—स्त्री. १ पैज; पण; होड. २ चुरस; एकमेकांवर ताण. ' शर्यतीनें लोक भांडूं लागले । ' –मदरु १.४७. [अर. शर्त्, शरायत]

शर्यत—स्त्री. इस्लाम धर्मशास्त्र. –शरा पहा. [अ. शरीअत्] **०पन्हा**–पु. इस्लाम धर्मशास्त्र किंवा ईश्वरी कायदा जाणणारा. ' शर्यत्पन्हा काजी मुहंमद ' –रा १८.५६.

शर्व—पु. श्रीशंकर. ' शक्राऽदि–लोक–पालक कथिले मुनिवालखिल्य हरिशर्व । ' –मोसभा १.४३. [सं.]

शलक्ख—स्त्री. भंडिमार; ताशेरा; झड; पाऊस; वृष्टी. [अर. शलक्]

शलगम—पुन. एक प्रकारची फळभाजी; एक फळ; सलगम्. [तुर्की. फा. शलघम्]

शलभ—पु. १ टोळ. २ दीपपतंग; दिव्यावर झडप घालणारा किडा. [सं.]

शलल—न. १ साळशिंदर; साळूच्या अंगांवरील कांटा. २ (ल.) कंटक; कांटा. ' तें भीमवपु विनाशर, शल्यवपु जसें विनाशलल, नाहीं । ' –मोद्रोण १२.४२. [सं. शल्य]

शलाका—स्त्री. १ सळई; लांब बारीक खिळा; टांचणी; तारेचा तुकडा. २ काड; भात्याण; पेंढा. ३ कामटी; काठी; वेत. [सं.] ४ (सामा.) लांब, बारीक अणकुचीदार पदार्थ. (उदा० छत्रीची काडी, गज इ०) **०परीक्षा**–स्त्री. एखाद्या विषयाचा अभ्यास केलेल्या इसमाची त्यानें अध्ययन केलेला ग्रंथ एखाद्या सळईनें उघडून कोठेंहि निघालेल्या पानावरील भागाचें त्यास स्पष्टीकरण करावयास सांगणें अशी विशिष्ट परीक्षापद्धति. [सं.] **०प्रश्न**–पु हातांत काडी, लेखणी, पेन्सिल वगैरे कांहींतरी घेऊन ती एखाद्या ग्रंथांत घालून जो श्लोक निघेल त्याच्या अर्थावरून प्रश्नाचें उत्तर काढण्याची पद्धति. [सं.]

शल्य—पु. एक पौराणिक राजा; नकुल–सहदेवाचा मामा. ' शल्य म्हणे रे सूता बडबड करितोसि फार मद्यपसा । ' –मोकर्ण २९.३५. [सं.]

शल्य—न. १ कांटा; टांचणी; कुसळ; टोंचणारा पदार्थ. शलाका पहा. ' जया जन्ममृत्यूचें । हृदयीं शल्य । ' –ज्ञा १३.५५३. २ न वाढतां पोटांत राहिलेला गर्भ; सल. ३ (ल.) टोंचणारें दुःख; सल; मनाला लागून राहिलेला अपमान; सलणी; तापदायक, दुःखदायक व्यथा; पीडा; मनाला टोंचणारी गोष्ट. ४ बांधीत असलेल्या इमारतीखालील जागेंतील प्रेत, केस, हाडें वगैरे अशुभ पदार्थ. हा काढून टाकला नाहीं तर त्याची बाधा होते. ५ बाणाग्र. ६ शरीरांत राहिलेला (कांटा, सुई, बाण, इ० चा) अंश. [सं.] **०तंत्र–शास्त्र**–न. वैद्यकीय शस्त्रविद्या; शरीरांत असलेले आगंतुक पदार्थ कसे काढावे या विषयींचें शास्त्र; शरीरव्यवच्छेदन शास्त्र. [सं.]

शव—न. प्रेत; मृतदेह; मढें. ' गुर्वाशीबैल वर्जित जो क्षणहि उभा न तो टिके शवसा । ' –मोभीष्म १.६९. [सं.] **०यान**–न. प्रेत नेण्याची ताटी; तिरडी. [सं.] **०वाहक**–पु. प्रेत नेणारा; प्रेतवाहक; प्रेताला खांदा देणारा. [सं.] **शाव–शावक**–पु. प्रेतासंबंधी; मढ्यासंबंधी. [सं.] **शावाशौच**–न. प्रेतवाहनामुळें किंवा कुटुंबांतील कोणी मरण पावल्यामुळें प्राप्त झालेली अशुद्धता; सुतक; अशौच. [सं.]

शवणें—न. (कों.) एक पांखरूं.

शवाळें—न. शेवाळें पहा.

शश, शशक—पु. ससा. [सं.] **शशविखान**–न. सशाचें शिंग; सशाच्या शिंगासारखी मिथ्या कल्पना. [सं. शशविषाण] **शशविषाण–शृंग**–न. १ सशाचें शिंग. ' गंधर्वदुर्ग कार्या पाडावे । काय शशविषाण मोडावें । ' –ज्ञा १५.२१५. २ (ल.) न मिळणारी वस्तु; अप्राप्य पदार्थ. अशक्य कोटींतील गोष्ट. ' खपुष्प ' पहा. उदा० ' भगवत् गुणाचा अंत शशविषाणप्राय आहे. ' [सं.]

शशधर, शशांक—पु. चंद्र; चांदोबा. (प्रायःकाव्यांत) ' आतां तीख होऊनि मवाळ । जैसें जातीचें मुकुळ । कां तेज परि शीतळ । शशांकाचें । ' –ज्ञा १६.११५. चंद्राच्या बिंबावर सशाच्या आकाराचा डाग आहे त्यावरून. [सं.]

शशी—पु. १ चंद्र. २ इडा या नाडींतून वहाणारा वारा. ३ इडानाडी. ४ कापूर. ' वेला कंकोल पूगीफल खदिर शशी जायपत्री लवंगा । ' –सारुह ३.४८. **शशिकर**–पु. १ चंद्र. २ चंद्रकिरण. [सं.] **शशिकला**–स्त्री. चंद्रकला. [सं.] **शशिनी**–स्त्री. चांदणी रात्र. [सं.] **शशिमौळी, शशिशेखर**–पु. शंकर. [सं.] **शशी सिरणें**–हातांत हात धरून वर्तुळाकृतीनें धरलेल्या हातांतून शिरणें तें; एक खेळ. ' खेळां आदरिलें गोपाळीं । शशी सिरणें चेंडुफळी । ' –मसाप १ ८१. –दांव ८५.

शशोपंज—पु. संकट; अडचण. ' राजाजीही शशोपंजांत आहेत । ' –रा ५.१००. [फा. शशोपञ्ज्]

शष्कुली—स्त्री. करंजी. ' मांडा साखरपांडा गुळवरी । शष्कुल्या अमृतफळें क्षीरधारी ।. ' –एभा २७.२९. [सं.]

शष्प—न. १ कोवळें गवत. २ शरीराच्या गुह्य भागांवरील केंस; शेट. शिवी देतांना हा शब्द योजतात. ' तुझ्या हातून

शष्प देखील व्हावयाचें नाहीं.' **शष्पित**–वि. कोंकळ्या गवतानें आच्छादलेली जागा; कोमल तृणानें युक्त. [सं.]

शंसक, शंसा, शंसणें, शंसित, शस्त—काव्यांत नित्य येणारे हे शब्द, नेहमींच्या प्रचारांत 'प्र' हा उपसर्ग लागून येतात. उदा० प्रशंसक वगैरे पहा. [सं. शंस्=स्तुती करणें]

शस्त—स्त्री. १ अंगुस्तान; अंगुष्टत्राण. २ नेम. [फा. शस्त्]

शस्य—न. धान्य. [सं.]

शस्यक—न. एक उपरत्न. [सं.]

शस्त्र—न. १ हत्यार; आयुध. २ (ल.) ज्यांत एखाद्याचें सामर्थ्य सांठविलेलें आहे असें साधन, पदार्थ, गोष्ट इ० जसें– विद्या, सौंदर्य, पावित्र्य, लेखणी इ० ३ (ल.) नाशक, हारक, मारक वस्तु, औषध इ० [सं.] **शस्त्र तुळणें-तोलणें**–१ योग्य स्थितींत, बरोबर रीतीनें, हत्यार धरणें. २ शस्त्र चालविण्यास उद्युक्त होणें; शस्त्र परजणें. (वर) **शस्त्र धरणें**–१ त्याचें वाईट करण्याविषयीं कंबर बांधणें. २ त्याबर हत्यार घेऊन उठणें; हल्ला करणें; दांत धरणें. **०कार**–पु. हत्यारें तयार करणारा. **०त्राण**–न. शस्त्रसंरक्षक कवच; चिलखत; टोप वगैरे. म्यान; आच्छादन. [सं.] **०पाणि**–वि. शस्त्रधारी; हातांत शस्त्र, आयुध असलेला, धारण केलेला; सशस्त्र. [सं.] **०वैद्य**–पु. जखमेवर किंवा रोगावर शस्त्रक्रिया करणारा निष्णात वैद्य; (इं.) सर्जन. **शस्त्राभ्यास**–पु. लष्करी शिक्षण, विद्या; हत्यारें वापरण्यांत तरबेज होणें. [सं.] **शस्त्रास्त्र व्यवहार**–पु. १ हत्यार वापरणें; हत्यारांशीं संबंध असणें, येणें, २ (ल.) लढाई, युद्ध इ० [सं. शस्त्र+अस्त्र+व्यवहार] **शस्त्री**–स्त्री. तलवार; कटयार; सुरी. 'तीस विलोकुनि मानी रामानुज तो मनीं जसी शस्त्री.' –मोमंत्ररामायण; अरण्य २२.

शह—पु. १ बुद्धिबळाच्या खेळांतील एक संज्ञा. विरुद्ध पक्षाच्या सामान्य मोहऱ्यानें केलेली राजाची अडवणूक व हल्ला; राजास येणारा वेध. २ एखाद्याचा पाडाव करण्यासाठीं धरलेला रोख, योजलेला डाव. अशा स्थितींत लागणारा वेध. धाक; दरारा; जोर; दाब. 'जें कर्तव्य तें सलाबतीनें आपली इभ्रत शह यांजवरी पडोन नक्श होय तें करावें.' –ख १.२४०. ३ (ल.) योग्य संधीची वाट पाहून,–अनुकूल काल पाहून मनोगत सिद्धीस नेण्यासाठीं केलेले प्रयत्न. (क्रि० देणें; बसणें; येणें.) ४ (ल.) सूचना; ताकीद; इशारा. 'शहाण्यास शह मूर्खास टोणपा.' (क्रि० देणें) **शहास गुंतणें**–(वचन, लेख इ०नें) बद्ध होणें, बांधले जाणें, सुटका नाहीं अशा संकटांत सांपडणें. [फा. शह्–राजा] **०देणें**–१ दुसऱ्याला हुसकावून लावणें. २ बुद्धिबळाच्या खेळांत प्रतिपक्षाच्या राजावर आपल्या मोहऱ्याची उडी पडेल अशा ठिकाणीं आपलें मोहोरें आणून बसविणें. ३ जेथून प्रतिपक्षावर हावें तेव्हां तुटून पडतां येईल, अशा ठिकाणीं बसून त्याला भीती दाखविणें. **०राखणें**–दाबांत ठेवणें; जरबेंत धरणें. 'वरकड अउघे एकत्र होऊन गनिमाचा शह राखोन स्वामीस संतोषानें पाववणें.' –शारो ७.

शहत, शहीत—अ. तपशील; जवाहिरी–दागिन्याचे पोटचे अवयव लिहावयाचे प्रसंगीं त्या दागिन्याचें नांवापुढें लिहितात. 'जगो, घाट साधा किमत रुपये ४०२ शहत.' –समारो–१.७१.७२. [अर.]

शह तूश—स्त्री. अंगठीतून जाण्याजोगी अत्यंत बारीक विणीची शाल. [फा.]

शहनिशह—पुस्त्री. शहानिशा पहा.

शहर—न. मोठें गांव; नगर. 'गांवची हुन्नरी व व्यापारी-वस्ती फुगली आणि काळीपेक्षां पांढरी बळावली कीं त्या गांवाची शहरांत गणना होऊं लागते.' –गांगा २. [फा. शहर] **०गुंडा**–पु. १ (गावगुंडा शब्दाप्रमाणें) निष्णात; अट्टल; लबाड व सोदा. २ सर्व जगाची माहिती असणारा, मोठा धूर्त आणि व्यावहारिक. ३ कोणत्याहि कामांत वाकबगार; हरहुन्नरी; चौरस. [शहर+गुंडा = गोटा] **०पन्हा**–पु. १ शहराची तटबंदी; कोट. 'तो पुढें फौज गेली म्हणोन शहराची बंदोबस्ती न करितां, शहरपन्हा खालींच होता.' –भाब २३. २ शहराचा पहारा; बंदोबस्त. ३ असा बंदोबस्त ज्याकडे आहे असा अधिकारी. [फा. शहर+पनाह्] **०बटाऊ**–पु. शहरांतील गुंड; अट्टल सोदा. याच्या उलट खेडयांतील भोळा माणूस, गांवढळ. **०बाजार**–पु. मोठें बाजार गांव; शहर. 'असली वस्तू शहरबाजारांत शोधावी, गांव-खेडयांत काय?' **शहरी**–वि. १ शहरासंबंधीं; नगरासंबंधीं; नागरिक; नागर. २ (ल.) लबाड; लुच्चा; सोदा.

शहर-रा-रें—पुन. १ कांटा; रोमांच; भीतीनें होणारा थरकांप. (क्रि० येणें). 'मऊ सेजेवरती निजतां उठती अंगीं शहर.' –पला १७९. २ हिमज्वर; हिंवताप. [सं. सीत्कार; प्रा. सीक्कार सिआर; तुल० अर. शअर=रोम]

शहरग—स्त्री. कानाच्या बाजूला गळ्यावर असणाऱ्या मोठ्या शिरा. [फा. शहरग् = हाताची मोठी शीर] **०उलटी**–बाँकमधील एक डाव; आपल्या हातांतील जंबियानें आपल्या डाव्या बाजूच्या अर्थात् जोडीदाराच्या उजव्या बाजूच्या कानाजवळील मोठ्या शिरेवर मारणें. **०सीधी**–स्त्री. बाँकमधील एक डाव; आपल्या हातांतील जंबियानें आपल्या उजव्या बाजूच्या अर्थात् जोडीदाराच्या डाव्या बाजूच्या कानाजवळील मोठ्या शिरेवर मारणें.

शहा—पु. राजा; अधिराज; बादशहा (मराठींत क्वचित् उपयोग) **म्ह०** 'नेसेन तर शहाचें नेसेन नाहीं तर नागवी बसेन.' [फा. शाह] **०जांग**–पु. युद्धसम्राट; एक पदवी. [फा.] **०जादकी**–स्त्री. यौवराज्य;राजपुत्रपणा. 'ज्या दिवशीं पातशहास शहाजादकी तुटून पातशाही जाली.'–ऐठि ५१. [फा. शाहझादगी.] **०जादा**–पु राजपुत्र; युवराज. [फा० शाहझादा] **०जादी**–स्त्री. राजकन्या. 'चांदबीबी नामें शहाजादी हिनें कमबैन्दीकरून दिलीचे फौजेसी लडाई बारा वर्षे केली.'–इस १ चांदबिबी १०. [शाहझादी] **०जानी-दानी**–वि. शहाजहान बादशहाचा, संबंधाचा, वेळचा (रुपया, राज्य इ०) **०जोर**–पु. मोठी सत्ता, सामर्थ्य. –वि. सुरेख; भव्य; बादशाही; उत्कृष्ट; प्रबळ. –क्रिवि. सुरेखपणानें; भव्य रीतीनें; राजशाही पद्धतीनें. [फा.] **०न शहा**–पु. राजाधिराज; अधिराज. 'तुम्हास किताब मोठा शहानशहा पादशहा जहाला असता.' –मदरु १.१११. [फा. शहन्शह.] **०नामा**–पु. फिर्दोसीनें फारसींत लिहिलेला काव्यमय इतिहास. [फा. शाहनामा]

शहा—वि. कृष्ण; काळें. [फा. सियाह्] **०काळे**–काळें कुट्ट.

शहा—उद्गा. कान्होबाचें वगैरे वारें अंगांत शिरल्यावर झाडाच्या तोंडांतून निघणारा उद्गारवाचक शब्द. –पु. साक्षात्कार. –सोहि महदनु. [ध्व.]

शहा—पु. (साव.) १ सावकार; शेट. २ सावकाराची पदवी; पत असलेली असामी; पैशाची देवघेव करण्यांत अगदीं विश्वासाचें कूळ. **म्ह०** 'शहा किंवा पादशहा.' ३ जकातदार; कर वसुली करणारा अधिकारी. 'शहाचा दाखला,' किंवा 'शहाची टीप,' जकातदाराकडे भरणा केल्याची पावती. [साव.] **०जोग**–वि. १ नांव लौकिकाचा: पतीचा; विश्वासुक (धंदा किंवा माणूस); भरंवशाचा. २ एक जातीची हुंडी; ही हुंडी दाखविणारास हुंडीतील रुपये (सदरहू इसम पतदार आहे असें समजून) मिळतात; (दर्शनी हुंडीप्रमाणें). ३ बिन दिक्कत द्यावयाचें (रुपये, इ०); बिनभानगडीची (गोष्ट). 'तुमचें शहाजोग रुपये देणें, त्याचा कोण तंटा सांगेल.' ४ अगदीं खरें, बरोबर चालणारें (नाणें). [हिं.]

शहानवीस—पु. (व.) तहसिलींतील खजिन्याचा हिशेबनीस. 'शहानवीस तहसीलदाराच्या हाताखालीं काम करतो.' [फा.]

शहागडी—वि. शहागड म्हणून एक पेठ आहे, त्यासंबंधीं. (पागोटें, शेला इ०).

शहांगी-ग्या—वि. किरकोळ अंगाची; सडपातळ; देहयष्टी बारीक असलेला–ली. [सं. सिंहांगी]

शहाजण-ग्यादानें-शादियानें—पुन. मोठा नगारा; मंगल वाद्यें. शादियान पहा. [फा. शाद्याना]

शहाजिरें—न. जिऱ्यांतला एक भेद, प्रकार; तिखटाच्या मसाल्यांतील एक जिन्नस. [फा. शाहजीरह; गु. शाजिरु]

शहाडा—पु. १ डोंगरमाथा; कडा; कणा. २ कडयावरील अरुंद वाट. [सं. संहृत; प्रा. साहट्ट?]

शहाडा—पु. १ एक होलारांचें वाद्य; मोठा डफ. २ होलारांची हें वाद्य वाजविण्याची पद्धत.

शहाडा—पु. मोठा वृक्ष; सिंह.

शहाडें—न. शहाळें; कोंवळा नारळ.

शहाणपण, शहाणीव, शाहणीव—न. स्त्री. हुषारी; धूर्तता; अक्कल; चातुर्य; चांगली समजूत. 'हृदयीं सांवरिती शहाणीव।' –मुभा ४१.५७. 'दावोत कोणी शाहणीव लाघव।' –दावि ३१२. [शहाणा]

शहाणा—वि. धूर्त; हुषार; बुद्धिवान्; अक्कलवंत; समजूतदार; चतुर. 'जो बहुतांस मानला। तो जाणावा शाहणा जाला।' –दा १५.३.२६. [हिं–शियाणा–ना. कुण. शाणा; सं. सज्ञानी, सज्ञान] **म्ह०** १ शहाण्याचें व्हावें चाकर, पण वेडयाचें होऊं नये धनी. २ शहाण्याची एक बात, मूर्खाची सारी रात. ३ शहाणा नाडतो, पोहणारा बुडतो. शहाणाच मनुष्य एखाद्यावेळीं फसतो व पोहतां येणाराच मनुष्य अनेकदां अपघातानें बुडतो. ४ अति शहाणा त्याचा बैल रिकामा–आपल्या बैलास काम करावयास लाविलें तर त्याला भूक लागून जास्त दाणावैरण आणावी लागेल, या भीतीनें बैलास रिकामें ठेवून त्याचें काम स्वतः करणारा; स्वतःस शहाणा म्हणविणाऱ्याचें कृत्य. ५ शाण्यांक तीन ठय, पिशांक एक ठय–(गो.) शहाणा मनुष्य एखाद्यावेळीं पुष्कळ फसतो. **०सुरता**–वि. १ हुषार व देखणा; बुद्धिमान व सुरेख. २ (सामा.) चांगला हुषार. [शहाणा+सुरत] **साडेतीन शहाणे**–पेशवाईतील सुप्रसिद्ध व्यक्ती. यांत, एक विठ्ठल सुंदर परशरामी (निजामाचा दिवाण), दुसरा दिवाकर पुरुषोत्तम ऊर्फ देवाजीपंत चोरघोडे, (नागपूरकर भोसले यांचे दिवाण), तिसरा सखाराम बापू बोकील (पेशव्यांचे दिवाण) व अर्धा नाना फडणवीस. (चटकन् ध्यानांत यावींत म्हणून संक्षेपानें) 'सख्या, देवा, विठ्ठला' असेंहि म्हणतात. **शहाण्याची खरबड**–स्त्री. मद्दड; मट्ट माणूस. **शहाणी होणें**–क्रि. (व. ना.) न्हातीधुती; ऋतुमति होण. 'कांहो तुमची पोरगी शहाणी झाली कां नाहीं अजून?'.

शहाणा—पु. गायनशास्त्रांतील एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत. कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत धैवत, वज, अवरोहं

संपूर्ण. गायनसमय मध्यरात्र. जाति षाडव संपूर्ण. वादी स्वर पंचम, संवादी षड्ज.

शहाण्णव—वि. एक संख्या; ९६. [सं. षण्णवति]

शहातूत—स्त्री. १ एक फळझाड; तुती. २ त्या झाडाचें फळ. [फा. शहतूत्]

शहात्तर-शाहत्तर—वि. ७६ ही संख्या. [सं षट्सप्तति-प्रा. छहत्तर]

शहानिशा—पु.स्त्री. १ निश्चित मत; निकाल; संशय-निरास. (एखाद्या बाबीसंबंधीं). २ चांगल्या वाईटाचा, खऱ्या-खोट्याचा निर्णय, निकाल, दोहोंपैकीं एक मार्ग ठरविणें. ३ सोक्षमोक्ष; निश्चित स्थिति ४ चौकशी; तपास. (क्रि० करणें). [फा. शह, न शह]

शहापुरी—वि. शहापूर गांवचा, गांवासंबंधी (धोतरजोडा, वस्त्र इ०)

शहाबादी (फरशी)—स्त्री. निजामच्या राज्यांतील शहा बाद येथील पातळ सपाट दगड.

शहामत—स्त्री. १ धाडस; साहस; पराक्रम. २ चातुर्य; करामत (एखादें काम करण्यांत). **०करणें**–बहादुरी करणें. [फा. शहामत्]

शहामुसळी—स्त्री. काळ्या जातीची मुसळी (एक औषधी). [फा. सियाह्+मुसली]

शहामृग—पु. एक मोठा उंच पक्षी; हा आफ्रिका व अरब-स्तानांत असतो. ' शहामृगाचा आवाज सिंहाच्या गर्जनेसारखा असतो. ' –ज्ञको २०.श १५. [फा. शाहेमृग]

शहांयशी—वि. ८६ संख्या. [सं. षट्+अशीति; प्रा. छासी इ०]

शहारत—स्त्री. प्रसिद्धी; आवई.' तेव्हांपासुन कलमजारीची शहारत पडून स्वारांच्या चुंगी येऊं लागल्या! –हौके ७८. [फा. शुहूरत्]

शहारा-रें-शारें—पुन. १ रोमांच; कंप. ' तया पुस्ता-वाच्या अंगीं शारें भरे सुमनाचें ' –मुरंशु ४४०. २ हींव; हिम-ज्वर. [सं. सोत्कार]

शहारण—क्रि. शहारे येणें. ' महादूच्या बायकापोरांना घराबाहेर काढीत असल्याचा देखावा अंतश्चक्षूसमोर उभा राहून राधाबाईंना शहारल्यासारखें झालें. '–हांच कां धर्म ५७. नाशिक-कर. **शहारा करणें**–पाठीवरून हात फिरविला असतां, जना-वरानें अंग चोरणें, भोंवरा करणें. –गोस्तनीप्रयोग चंद्रिका ८४.

शहाळू—पु. रबीचा जोंधळा. शाळू पहा.

शहाळें—न. कोंवळा नारळ; खोबरें घट्ट बनण्यापूर्वीचा नारळ.

शहीद—पु. हुतात्मा; युद्धांत पतन पावलेला मुसलमान; स्वधर्मार्थ किंवा स्वमतार्थ मेलेला वीर. [फा.]

शळी—स्त्री. १ सळई. २ साळपीस; साळिंदर. [सळई]

शाइणें—क्रि. उभारणें; आच्छादणें. ' मंडप शाइले केतकी-तळीं । स्तंभीं लाविल्या कर्पूर कदळी । ' –मुरंशु १८८. [सं. छाद्]

शाइदी—स्त्री. पुरावा; साक्ष. [अर. शाहिदी]

शाहिद-दी, शाहिदीदार—पु. साक्षीदार. [अर. शाहिद्]

शाई—स्त्री. १ मषी; लिहिण्यासाठीं बनविलेला रंगित द्रव पदार्थ. ' शाईचा उपयोग लिहिण्याची सुरवात झाल्यानंतर बऱ्याच काळानें झाला ' –ज्ञको २०.१५. २ लोखंडाच्या किसापासून तयार केलेलें मृदंग, पखवाज इ० स लावण्याचें लुकण, रोगण. [फा. सियाही] **०घालणें**–नाश करणें. 'त्या सुंदर चित्रावर त्या दुष्टानें शाई घातली '. **०देणें**–करारप्रमाणें वागण्याची निश्चितता दाखविण्याकरितां आगाऊ कांहीं पैसे देणें, इसार, बयाणा देणें. **०दान-नी**–न.स्त्री. (क.) दौत; शाई ठेवण्याचें साधन; पात्र. **०शिरें**–न. शिऱ्याची शाई. –रा ८.२१. **०शोक-सोक**–पु. (व. ना. न.) टिपकागद. (इं.) ब्लॉटिंगपेपर. [शाई+शोक (ष)णें] **शाईचा पुडा-शाईपुडी**–पुस्त्री शाई किंवा लुकण लावलेली मृदंगाची बाजू.

शाई-ही—वि. १ ताबा, अंमल यासंबंधीं; गुण, स्वभाव, नांव धारण करणारा; मालकीचा. उदा० पुणेशाई, मुंबईशाई, सुरतशाई. २ कडून प्रस्थापित; संबद्ध; वाच्य-वाचक. उदा० शिंदेशाई; होळकरशाई, अप्पाशाई, बाबाशाई. ३ नाणीं, चाली, रीतरिवाज, पद्धती, कायदे वगैरे. उदा० शिवशाई, आदिलशाई, इ० ४ विशिष्ट जातिगुणादिवाचक. उदा० ब्राह्मणशाई, शूद्रशाई, मोंगलशाई, सोदेशाई, शिनळशाई, लबाडशाई. –स्त्री. १ अंमल; सत्ता; अधिकार; आमदानी; कारकीर्द. ' शिंदेशाई पुण्यामध्यें झाली. ' २ (राज्य, गांव, लष्कर, इ० मध्यें राहणारा विवक्षित) जनसमूह; समाज. उ० ' सगळ्या शाईंत यासारखा शूर दुसरा कोणी नाहीं. ' ' होळकरशाईमधें मल्हारबा होता एकच पूत. ' –ऐपो ९०,११०,१२७, इ०. ३ राजमंडळ; राज्य. ४ आणखी निरनिराळे संकीर्ण उपयोगाचे प्रकार. उदा० ढपळशाई, फुकटशाई, बागशाई, लंगडशाई. [फा. शाही] **०शिरस्ता**–पु. १ सार्व-जनिक किंवा सर्वसाधारण चालरीत, पद्धत; रिवाज, रूढी; जन-रीति. २ राजशिरस्ता; राजरीत. ' चांगलें माणूस मिळऊन शाई शिरस्त्याचें मर्द माणूस पाहून ' –समारो १.१३.

शाई पैसा—पु. एक तांब्याचें नाणें. हा बिनशिक्याचा तांब्याचा तुकडा असतो. [हिं.]

शाईन—पु. श्येन; ससाणा पक्षी. [सं. श्येन]

शाऊ विवस—पु. (व.) लहान दिवस. –वशाप ५१. ११.४२२. शाळू पहा.

शाऐंशी—वि. ८६ संख्या. [सं. षडशीति; प्रा. छासीइ; हिं. छियासी]

शाक—पु. १ सात द्वीपांपैकीं सहावें द्वीप; जगाच्या सात भागांपैकीं एक (सहावा) भाग. २ शक लोकांचा प्रदेश. [सं.]

शाक—पु. शक; वर्षगणना; एखाद्या पराक्रमी राजाच्या नांवावरून चालू झालेला काल. [सं.]

शाक-ख—स्त्री. १ फळें, बिया, मुळें इ० कोणतींहि भाजी करण्याजोगीं पानें, भाजीपाला; भाजी. २ (व.बा.) मांस; शिजलेलें मांस. 'ब्रह्मसभाचि गुरुसभा, तन्न्यूना वर्णिल्या सुरस भ्यां ज्या। देव्युत्थ शाकभाज्या किंवा हे शाक या सुरस भाज्या।' –मोसभा १.३७. ३ (देशावर) फळभाजी; पालेभाजीस भाजी म्हणतात. (वाई) आमटी; तोंडी लावणें. 'वाढावया शाक आणा.' **०पाला-भाजी**–पु. (व्यापकपणें) भाजीपाला. **०व्रत**–न. चातुर्मासांत चार पदार्थ सोडण्याचें व्रत. यांपैकीं प्रत्येक महिन्यास ओळीनें एक एक पदार्थ वर्ज्य करितात. (भाज्या, दही, दूध, डाळी) [सं.]

शाकंबरी—स्त्री. १ दुर्गा; एक देवी. २ पौष पौर्णिमेस दुर्गादेवीस अनेकविध भाजांचा नैवेद्य करण्याचें व्रत. **शाकान्न**–न. शाकमिश्रित अन्न. 'क्षुधेते शाकान्नें अवचट सदन्नें निवटितो।' –नवनीत १३४. **शाकाव्रत**–(अप.) शाकव्रत पहा. **शाकाहार**–पु. वानस्पत्याहार; भाजीपाला; फळें वगैरे खाणें; याच्या उलट मांसाहार. [सं.]

शाक बेशाक-शाक-बे-शाक—स्त्री.न. १ अनिश्चितपणा; शंका कुशंका; डळमळीतपणा; अनियमितपणा; चुका; दोष. २ विलक्षणपणा; अद्भुतता; अलौकिकता (एखादी गोष्ट, विधान, दस्तऐवज या संबंधीं). ३ शंका निरसन; खात्री; निश्चय; निकाल. ४ उहापोह; चर्चा. 'ते याद तुम्हाकडे येणार; त्याजवर शाक-बे-शाक होय नव्हे होऊन सलाह जाणार.' –राज ७.८२. 'जें कांहीं लिहिलें त्याची पारख होऊन-शाकबेशाक वेळचेवेळेस होऊन सत्य काय-तें निघत जाईल' –इनाम १२६. –वि. क्रिवि. १ डळमळीत; अनिश्चित. २ निश्चित; निःसंशय. [अर. शाक द्वि.]

शाकलद्वीप—न. एक भूप्रदेश; शाकल ऋषीचें बेट, हें सप्तद्वीपांत समाविष्ट नाहीं. [सं.]

शाका—स्त्री. कत्तल; जिवें मारणें; तुकडे करणें. 'आतां गनीम मागतील ते रुपये द्यावे-किंवा बायकामुलें यांची शाका करून चाऊन-घेऊन मरावें.' –भाब ४. [अर. सक्का=चाकू, सुऱ्या करणारा]

शाकार—पु. १ (कु.) वृक्षाच्या लहान-डहाळ्यांचा विस्तार; शाकारण्यासाठीं गवत; झांप, इ० २ पर्जन्यादि निवारणार्थ–घरांवर घातलेलें आच्छादन. –शेकार पहा. [सं. छाया+आकार] **शाकारणी-शेकारणें-शेकारणी**–छपरांची आच्छादणी; गवतानें शिवणें; कवलें घालणें, चाळणें.

शाकिनी—स्त्री. गौण स्त्रीदेवतांचा वर्ग; दुर्गा व शिव यांच्या सेविका; एक पिशाच जाति. [सं.]

शाक्त—पु. १ शक्तिदेवतेचा उपासक. २ शक्ति-उपासना पंथ. ३ वाममार्ग. शक्ति पहा. –वि. शक्तिसंबंधी (पूजाविधी, पंथ, इ०). शक्ति पहा. [सं.]

शाख—स्त्री. शाक पहा.

शांखळा—स्त्री. साखळी. 'शांखळां खांडौनिआं। एकें वेळें केलियांति राणियां।' –शिशु ६८०. [सं. शृंखला]

शाखा—स्त्री. १ फांदी; डहाळी; खांदी. २ भाग; प्रकरण; विभाग; अवयव; वर्ग (पुस्तक, विषय इ० चा). ३ खातें. ३ पंथ; संप्रदाय; पक्ष; गण. ४ वेदांचे पोटविभाग प्रत्येकीं. ऋग्वेदाच्या शाकल व बाष्कल शाखा. इ० [सं. शाख्–व्यापणें; पसरणें] **०चक्रमण**–न. (माकड या खांदी वरून त्या खांदीवर उड्या मारतें त्याप्रमाणें,) १ उडत उडत केलेलें वाचन, अध्ययन, अभ्यास; अप्रस्तुत, अर्धवट अभ्यास. २ विषयांतर, अवांतर भारूड; अप्रस्तुत विषयाचें प्रतिपादन. [सं.] **०चंद्रन्याय**–पु. एक न्याय, (खूण म्हणून शाखेशीं चंद्राचा संबंध जोडणें). ज्या प्रमाणें चंद्र झाडाच्या फांदीवर बसलेला दिसतो पण तो प्रत्यक्ष तीपासून फार दूर असतो त्याप्रमाणें समोर दिसणाऱ्या गोष्टीमध्यें व वास्तविक परिस्थितिमध्यें जेव्हां फार अंतर असतें तेव्हां ही उपमा अथवा दृष्टांत योजितात. दूरस्थ वस्तूची ओळख त्याच्या जवळच्या वस्तूवरून करून देतांना हा न्याय योजतात उदा० समुद्रांत सूर्य बुडतो ही शाखा चंद्रन्यायें करून उक्ति आहे' [सं.] **०नगर**–न. उपनगर; शहराचा बाहेरचा, वाढलेला भाग; परिकर. [सं.] **०पाठी**–वि. वेदाच्या विवक्षित शाखेचा अभ्यास केलेला; वेदाभ्यासी लोकांतील आणखी भेद असेः क्रमपाठी, घनपाठी, जटापाठी, इ० [सं.] **०मृग**–पु. (झाडावरचें जनावर) वानर, खार इ० 'शाखामृगराज महाप्रताप विख्यात जो अनेकबळ।'–मोरा १.५६. **०रंड-ढी**–पु. स्वशाखेचा त्याग करून परकीय शाखेचें अध्ययन करणारा ब्राह्मण. **शाखी**–वि. १ शाखेचा; पंथाचा; पक्षाचा. २ शाखा, फांद्या असलेला (वृक्ष). ३ एक कान मोठा असून तो घट्ट उभा असतो, असा (घोडा) [सं. शाखा] **शाखोपशाखा**–स्त्री. लहानमोठ्या डहाळ्या, फांद्या, भेद, पंथ. [शाखा+उपशाखा]

साखोट—वि. (प्रां.) पतीचा; विश्वासुक, खरा. [साख]

शागिर्त-र्द, शागीर्द-शाग्रीत–पु. १ उमेदवार; छात्र; विद्यार्थी; शिष्य; (विशेषतः कला शिकण्यासाठीं राहिलेला). २ देवपुजेचें साहित्य मांडणें, धोतर धुणें, पाणी भरणें इ. कामें करणारा ब्राह्मण नोकर. [फा. शागीर्द] **०पेशा**–पु. १ उमेदवार विद्यार्थी; शागिर्द पहा. २ (सामा.) नोकर चाकर. 'खर्चाची बेगमी व शागीर्दपेशा व दरमहा यथायोग्य नेमून' –संभाजी चरित्र. ३ राजघराण्यासंबंधाचीं घरगुतीं कामें करणारें खातें. [फा.] ४ शागिर्दी पहा. **शागिर्ती-र्दी-शाग्रिती**–स्त्री. शागिर्दाची वृत्ति, धंदा. सेवा चाकरी 'सखारामपंन्त बोलिले होते की, विठ्ठलसुंदर याची शागिर्दी करीन परंन्तु आपले मनोरथ सिद्धीस नेईन' –खरे १.२९४. [फा. शागिर्दी]

शाट-शाटणें-शाटाशाट—(अप.) छाट, छाटणें–छाटा छाट पहा.

शाटी—स्त्री. १ छाटी; संन्याशाचें भगव्या रंगाचें वस्त्र विशेष; छाटी पहा. 'शाटी बंधन, वल्कलाजिन पटा, त्या पादुका बाजटा।'–आर्सी १०. २ (सामा) पांघरावयाचें किंवा नेसावयाचें वस्त्र [सं.]

शाठिका—स्त्री. पैठणी; साडी. 'भरजर अवघी हे शाठिका नेसविली।'–सारुह ८.७४. [सं. शाटी, शाटिका]

शाठ्य—न. १ लबाडी; लुच्चेगिरी; शठपणा. २ दुष्टपणा; नीचता. [सं.]

शाडवळ—वि. खेडवळ; गांवढळ; ओंगळ; घाणेरडा; साधा; अज्ञानी; अडाणी. [सं. शाद्वल] **शाडवल-ळ-शाड्वळ**–वि. १ हिरवागार; कोमल; कोंवळा (धान्यांकुर); ताजे; लुसलुशीत; (गवत इ०). 'हा ऊर्ध्वमूल आहे। परी उन्मूळिला नोहे। येणेचि हा होये। शाड्वळूगा।'–ज्ञा १५.५६. २ खेडवळ; गांवढळ. ३ अडाणी; अकुशल. [सं. शाद्वल]

शांडिल्य—पु. १ एका ऋषीचें नांव. २ एका गोत्राचें नांव; शांडिल्य ऋषीच्या कुलाचें नांव. –वि. शांडिल्य गोत्रांतील. [सं.]

शाड्—स्त्री. पांढऱ्या रंगाची चिकणमाती; खड्. **शाड्वट**–वि. १ शाड् असलेली (जमीन). २ शाड्ची केलेली (मूर्ति वगैरे). [शाड्+वत्-वट-प्रत्यय]

शाण—पु. १ सहाण पहा. २ धार लावण्याचा दगड; निसणा. [सं.] **शाणे धरणें**–(तंजा) धार लावणें.

शाणा—वि. (प्र.) शहाणा पहा.

शाण्णव-शाण्णौ—वि. ९६ संख्या पहा. शहाण्णव पहा. 'शाण्णव कुळींचे भूपाळ। आप्त सोयरे द्रुपदादि सकळ।' –हरि ३३.१०२. [सं. षण्णवति] **शाण्णवी**–(गो.) शाण्णव गांवचे अधिकारी.

शांत—पु. १ नवरसांपैकीं एक रस. संसाराची निःसारता, उपरति, सत्समागम इ० वर्णनांत हा योजतात. 'देशियेचेनि नागरपणें। शांतु शृंगारातें जिणें।' –ज्ञा १०.४२. २ (नृत्य) डोळ्याच्या पापण्या अर्धवट मिटणें, हा शांतरसाचा अभिनय आहे. –स्त्री. शांति (७, १२) पहा. –वि. १ शांतियुक्त; क्षुब्ध नसलेला; निर्विकार; निर्द्वेषी. २ संतुष्ट; समाधानी. ३ सत्त्वगुणी; सुशील. (माणूस, स्वभाव, वागणूकसंबंधीं). ४ थंड; गार; शमलेला; विझलेला (अग्नि, दिवा, इ०). [सं. शम्–शांत होणें] **०दांत**–वि. १ अगदीं शांत; थंड; सौम्य. २ संयमी; मनावर ताबा असणारा. **शांतवन**–न. १ शांति; उपशमन. २ सांत्वन. 'करी पुत्रांचें समाधान। शांतवन कुंतीचें।'–मुआ २८.१०३. **शांतता**–स्त्री. १ शांति; संतोष; समाधान. २ स्थिरस्थावर; राग, क्षोभ, इ०चें प्रदर्शन नसणें. ३ निवांतपणा; गडबड नसणें. शांति पहा. **शांतविणें**–क्रि. शांत करणें; सांत्वन करणें. **शांति**–स्त्री. १ थांबणें; शमन; उपशमन. 'रोग–क्रोध–ज्वर–शांति'. २ शांतता; स्थिरता; थंडपणा. ३ स्थिर; स्तब्ध अशी स्थिति; निस्तब्धता; स्थिरता; स्वस्थता. ४ मंदता; सौम्यत्व; मृदुता. ५ वैराग्य; विरागीपणा; निर्विकारता. ६ समाधान; संतुष्टपणा. ७ दुष्ट पिशाच्च, ग्रह वगैरेची पीडा दूर व्हावी म्हणून करावयाचीं जप, पूजा, मंत्रपठण वगैरे कर्में. 'अरिष्ट शांति'. ८ धार्मिक समारंभांतील आकस्मिक उद्भवणारीं संकटें व अशुभ गोष्टी टळाव्यात म्हणून आगाऊ केलेलें कर्म. ९ (ल.) संसारापासून मुक्तता; जीवितकष्टापासून सोडवणूक; मृत्यु. १० शांत रस. 'जेथ साहित्य आणि शांति। हे रेखा दिसे बोलती।' –ज्ञा ४.२१८. ११ मोक्ष; ब्रह्म; अंतिम साध्य. 'तयातेंचि गिवसित। तें ज्ञान पावे निश्चित। जयामाजी अचुंबित। शांति असे।' –ज्ञा ४.१८९. १२ पीडा त्रास वगैरेपासून सुटका; एखाद्या पीडाकारक मनुष्याची केलेली समजूत; तृप्ति; पीडेचें निवारण; शांत. (क्रि० करणें, होणें). [सं.] **शांतिक, शांतिकर्म**–न. १ अरिष्ट; त्रास; पीडा; यांच्या निवारणासाठीं शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें करावयाचा विधि; शांति; अरिष्ट–निवारक–कर्म. २ (व. गो.) ऋतुशांतीचा विधि; गर्भाधान. –वि. १ शांतिकारक; शांतता प्रस्थापक; प्रशमन, उपशमन करणारे. २ आराधणारा; आळवणारा; आराधक; प्रसन्नकारक; शांतिकर–प्रद–कारक–दायक. [सं.] **शांतिक पौष्टिक**–न. अनिष्ट निरसनार्थ केलेलीं कर्में. [सं.] (अप.) **शांतिपुष्टिक, शांतिपाठ**–पु. १ बाळ बाळंतिणीला कसलीहि बाधा होऊं नये म्हणोन किंवा एरव्हींहि

मांगल्यासाठीं करतात तो वेदमंत्रांचा पाठ; मंत्रांचें पठण. २ (ल.) संकटें, अडचणी किंवा त्रास दूर करण्याची युक्ति, कला. ३ (ल.) एकसारखें जोरजोरानें रागें भरणें; शिव्या देणें. [सं.] **शांतिब्रह्म-मैंद**-न. १ अतिशय शांतवृत्तीचा मनुष्य, धीर, गंभीर आणि शांत असा माणूस. २ वरून शांतवृत्ती दाखवून आंतून द्वेष मत्सरानें जळणारा. [सं.] **शांतिरस**-पु. (साहित्य) नऊ रसांपैकीं एक रस. नवरस, शांत पहा. [सं.] **शांतिहोम**-पु. अनिष्ट गोष्टी टाळण्याबद्दल केलेलें हवन. [सं.] **शांतोदक**-पुन. औध्वं देहिकांत तेराव्या दिवशीं ज्या जाग्यावर मृत्यु घडला असेल त्या जागेच्या शुध्यर्थ व मृत्युशमनार्थ केलेली शांति, विधि. [सं.]

शातकुंभ—न. सोनें. 'जैसा दीप आणि ज्योति। कीं शातकुंभ आणि कांति।' -ह २०.१०३. [सं.]

शाद—पु.न. शेवाळें.

शाद—वि. आनंदी; आनंदित. 'हमेशा खैर्-आफियतचें खत पाठवून दील शाद करीत जावा।' -रा १९.९५. [फा. शाद्] **०मानी**-स्त्री. १ कुशलवृत्त; खुशाली. २ आनंद. [फा. शादमानी]

शादियान, श्यादान—न. शहाजण; मोठा नगारा. 'शादियानें वाजवावयाची परवानगी झाली।' -दिमरा २. ९४. 'श्यादानें वाजवून द्वाही फिरविली।' -रा २.६.५९. [फा. शाद्याना]

शादी—स्त्री. मुसलमानाचें लग्न; लग्नसमारंभ; विवाह; निकाह. [फा. शादी]

शाद्वळ—न. कोवळें; नाजुक गवत. -शाडवळ पहा. [सं. शाद्वल]

शान—स्त्री. १ प्रतिष्ठा; डौल; छानदारपणा; थाटमाट; सुरेखपणा; शोभा; उत्कृष्टता; भव्यपणा (माणूस, चेहेरा, व्यवस्था, समारंभ-विषयीं). 'त्यांत मजा नाहीं व मैत्रीची शान रहात नाहीं।' -राज ३.३७२. २ नटवेपणा; छानछोकी. ३ तजेला; पाणी; जिल्हई. -वि. छानदार; शोभिवंत. छान पहा. [अर. शअन्] **०गुमान**-वि. नष्ट; शून्यवत्; बेपत्ता. (क्रि० करणें). [अर. शान्+फा. गुमान्] **०करणें**-नाहींसा करणें. **०दार-दारी**-वि. सुंदर; उत्कृष्ट; तजेलदार; छानदार; छानदारी पहा. 'कांहीं ठिकाणीं वर्णनेंही शानदार आली आहेत।' -नि ५४४. **०शुकी-शोकी**-स्त्री. १ छानछुकी-छोकी; नटापट्टा; नखरा. २ ऐट; नखरेबाजपणा; डौल. [अर.] **०शूक-शोक**-वि. फांकडा; कुरेंबाज; नखरेबाज. **०शौकत**-स्त्री. १ प्रतिष्ठा; थोरवी. 'राज्यावर कायम करून शान-शौकतीकरितां वसुली बारा लक्ष रुपये आकाराचा मुलुख नेमून देऊन।' -मदरु १.१५४. २ डामडौल; भपका. [फा. शान्-उ-शौकत्]

शानभोग—पु. (कर्ना.) १ कुलकर्णी. २ (क.) ब्राह्मण शब्दै पहा. -थर्स्टन.

शानां—न. (कु.) लोखंड तोडण्याचें एक पोलादी हत्यार; छिनी.

शानिशा—शहानिशा पहा.

शाने—शान-शानी-अ. धातुसाधितांना ऊन व क्रि. विशेषणांना ऊन, हून प्रत्यय लावल्यावर होणाऱ्या अव्ययार्थी खेडवळ लोकांच्या प्रचारांतील प्रत्यय. 'तिथूनशाने कशाला दाखवितोस; इकडे कां घेऊनशाने येईनास.' [सं. सत्]

शाप—पु. एखाद्याचें वाईट व्हावें म्हणून केलेला वाक्प्रयोग; अभिशाप; अनिष्टचिंतन; तळतळाट. (क्रि० देणें; होणें; जडणें; लागू होणें) [सं.] **०वठणें**-एखाद्याचा कार्यनाश होणें; हानि होणें. **०गुण**-पु. शापाचा परिणाम; शापफल. (जाति, कुल, समुदाय इ०तील व्यक्तीमध्यें जे कांहीं स्वभावसिद्ध दोष असतात ते पुरातन ऋषींच्या शापामुळें असतात अशी समजूत). 'बाघुळांनीं उलटें टांगून घ्यावें असा त्यास शापगुण आहे.' **०ग्रस्त**-वि. शापयुक्त; शापानें पीडिलेला, बाधित. [सं.] **०दग्ध**-वि. शापानें नाश दुर्दशा पावलेला, पीडलेला. [सं.] **०बद्ध**-वि. शापानें बांधला गेलेला. [सं.] **०मुक्त**-वि. शापाच्या पीडेंतून मुक्त झालेला; सुटलेला. [सं.] **०मोचन**-न. शापापासून सुटका, सोडवणूक. [सं.] **शापणें**-क्रि. शाप देणें; अनिष्ट चिंतणें. 'अन्यायाविण शापिले ऋषि मला.' [सं. शाप्] **शापादपि-शरादपि**-वि. १ शाप देण्यास व युद्ध करण्यासहि समर्थ; (ऋषि आणि योद्धा.) (शाप देऊन भस्म करण्याची शक्ति व त्याचप्रमाणें बाणांनीं ठार करण्याची शक्ति या दोनहि द्रोणाचार्यांचा अंगीं होत्या; म्हणून हें विशेषण प्रथम त्यास लावलेलें आढळतें. २ (ल.) व्यवहारांत आणि त्याचप्रमाणें शास्त्रांत, विद्येंत पारंगत; धर्म आणि कर्म यांत सारखा निपुण; गृहस्थाई व भिक्षुकी या दोन्हींत निपुण. समानार्थी शब्द शापानुग्रहसमर्थ; निग्रहानुग्रहसमर्थ; मुत्सद्दी असून शिपाई इ०-क्रिवि. १ धर्मश्रेष्ठता आणि सामर्थ्य यांच्या जोरावर; कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें. [सं. शापात्+अपि, शरात्+अपि.] **शापित**-वि. १ शापलेला; तळतळाट घेतलेला. २ शपथ घ्यावयास लावलेला, भाग पाडलेला; शपथ घेतलेला. [सं.] **शापोद्धार**-पु. शापापासून मुक्तता; शापमोचन. [सं.] **शापी**-स्त्री. (कु.) चिलमीचा फडका छापी.

शाबर—न. जादू; चेटूक; टाणाटोणा; मंत्रतंत्र. [सं. शबर] **शाबरी**-वि. शाबरसंबंधी; ऐंद्रजालिक; जादूसंबंधी. (मंत्रतंत्र, विद्या, अनुष्ठान इ०) स्त्री. एक हलकी प्राकृत भाषा. **०विद्या**-स्त्री. जादुटोणा; चेटूक; इंद्रजाल.

शांबरी—स्त्री. चेटकीण; जादुगारीण. [सं.]

शाबान—पु. मुसलमानी (अरबी) वर्षाचा आठवा महिना. [अर. शअबान्]

शाबास—उद्गा. १ वाहवा; भलेभले; फार चांगलें; भले बहादर; धन्य! 'कांहीं शाक-भाजी मागतों ते देतां तुम्ही कष्टी होतां, शाबास तुझा धीर!' -बप ३०२. -स्त्री. धन्यता; प्रशंसनीयता; स्तुत्यता. (एखादें वर्तन, कृत्य यासंबंधी योजतात). 'शाबास तुमचे खानदानाची असे' -रा १२.१२३. [फा. शाबाश्; शाद्बाश्; शाहअब्बास] **शाबासकी, शाबाशी-सी**-स्त्री. प्रशंसा; स्तुति; वाहवा; पाठ थोपटणें; धन्यवाद. 'तेव्हां शायसिंगानें शाबासी दिली.' -जोरा ८५. [फा. शाबाश्, शाबाशी]

शाबिती—स्त्री. १ सिद्धता; प्रस्थापना. २ समर्थन. **शाबीत**-वि. सिद्ध; प्रस्थापित. [अर साबित्]

शाबुडी—स्त्री. (कों.) एक प्रकारची मिठाई; साबणी.

शाबुदाणा—पु उपबासास उपयुक्त पदार्थ; सागो झाडाच्या सत्त्वाच्या गोळ्या. साबूदाणा पहा. [मलायी सागो-सागू]

शाबूत-द—वि. १ मजबूत; टिकाऊ; बळकट; दुरुस्त. २ न मोडलेलें; न तुटलेलें; व्यवस्थित; अभंग २ खरा; प्रस्थापित; सिद्ध; शाबीत पहा. 'याजकडे तीन खून शाबूत जाहले.' -वाडबा २.५५. [अर. सुबूत्] **शाबुती**-स्त्री. सुरक्षितपणा; व्यवस्थितपणा; नीटपणा; आढळपणा. 'चिरंजीव शाबुतीनें आला हाच लाभ जाणोन' -ख १.१६६. [फा.]

शांभव—वि. शंभूसंबंधी; शंकराचें; शंकरापासुन प्राप्त झालेलें. 'मग तिहीं तें शांभव। अद्वयानंद वैभव। संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथा।' -ज्ञा १८.१७५६. [सं. शंभु] **०सुख**-न. (महानु.) ब्रह्मानंद. 'तया प्रेमाचा महारु। शांभव सुखापसि मधुरु।' -शिशु ७९५. **शांभवी**-स्त्री. १ पार्वती. २ शंकराचें आवडतें पेय म्हणून संकेतानें भांग; घोटा. [सं.]

शाम—पु. एक देश; सियाम-सयाम. [सं. सुम्ह]

शाम—वि. (अप.) श्याम पहा. **०कर्ण**-(अप.) श्यामकर्ण. 'रासभ धुतला महातीर्था माजी। नव्हे जैसा तेजी शामकर्ण।' -तुगा ३१११. **०शाखा**-स्त्री (महानु.) तरवडयाची भाजी. -क्रि ८४.

शामक—वि. (वैद्यक) शमविणारें; थंड करणारें; तीव्रता कमी करणारें. उदा० पित्तशामक; वायुशामक इ०. [सं.]

शामत, शाम्मत—स्त्री. हिंमत; धैर्य. शहामत पहा.

शामदान—न. उभट दिवा; मेणबत्तीची ठाणवी; ठाणवाई; वालशीट; चिराखदान. [फा. शमादान्]

शामल—पु. १ श्यामल (सांवळा) पहा. २ हबशी; शिद्दी; जंजीरेकर. (काळ्या रंगावरून सांकेतिक). 'राजश्री कानोजी आंग्रे यांस पत्र जे। शामलाचा जमाव पालगडाखालीं येऊन राहिला आहे।' -शारो ७; -मराआ ३. [सं. श्यामल]

शामळू—वि. (कों.) नेभळट. [गु. सांभळो]

शामाटें—न. कसें तरी भांडण मिटविणें; कशीबशी तडजोड. [गु. शा माटे=कशाकरितां] **शामाठ्या**-वि. अगर्दी मठ्ठ; ठोंब्या; निर्बुद्ध.

शामाना-णा, शामीना, शामियाना—पु. १ तंबूच्या पुढील किंवा मागील बाजूस लावलेलें कापड, पडदा. २ सायवान. ३ मोठा डेरा, तंबू. [फा. शाम्याना, शामियाना]

शामिल, शामील—वि. प्रविष्ट; समाविष्ट; सामील पहा. 'ज्याणीं बलबा केला, त्यांत शामील जाले असतील त्यांचेंही पारिपत्य करणें.' -रा ७.४१. [अर. शामिल्]

शाम्युला—पु. (खा.) एक सरळ, उंच वाढणारें, व मोठें झाड.

शायद—क्रिवि. कदाचित्. 'शायद गरज्गो मनुष्याचे सांग-ण्यावर शुबाह व वस्वास राजे साहेबांचे अंतःकर्णांत प्राप्त होईल.' -रा १०.२५१. [फा. शायद्]

शायदी—स्त्री. साक्षी; साक्ष. (प्र.) शाहिदी [फा. शाहिदी] **०दार**-पु. साक्षीदार. (प्र.) शाहिदीदार.

शायशी-शीं—वि. ८६ संख्या. [सं. षडशीति]

शायस्ता—वि. योग्य. 'जमियत शायस्ता पैदा करून...' -रा १७ १६. [फा. शाइस्ता]

शायी—स्त्री. १ शाई; लिहिण्याच्या उपयोगाचें रंगीत पाणी; २ मृदंगाला लावण्याचें लुकण. शाई पहा.

शायी—वि. निजणारा, आडवा होणारा, टेंकणारा. शाई पहा. (समासांत) भू-शेष-सुख-जल-वृक्ष-शायी इ० [सं.शी-शय्]

शार—पु. (व.) शेराचें झाड; हुरा. 'शारांचें कुंपण आवाराला आहे!'

शार—न. शहर (अप.) 'आली शार पुण्याला शोभा दाटली पागा मिळेना जागा पुण्याभोवतेला।' -ऐपो ४३२.

शार—न. (व. खा.) भोंक पाडण्याचें हत्यार; सामता. **शारणें**-क्रि. लांकडांस भोंक पाडणें. **शारी**-स्त्री. १ छोटा लहान सामता.

शारंग—न. शार्ङ्ग पहा.

शारंगी—स्त्री. एक तंतुवाद्य; सारंगी.

शारद, शारदीय—वि. शरद्ऋतुसंबंधी.

शारदा—स्त्री. सरस्वती. वाणीची अधिष्ठात्री देवता. 'नमो-शारदा मूळ चत्वारिवाचा।' [सं.]

शारा, शारी, शारें—पु.स्त्री.न. १ भय; कंप. (प्र.) शहरा पहा. 'तया प्रस्तावाच्या अंगीं। शारें भरे सुमनाचें।' –मुरंशु ४४०. २ हींव; थंडीताप. 'दूत सांगती श्रीहरी। वन्हाडणीसी लागली शारी।'–एरुस्व १४.६८. 'जेवीं कां शारियाचें शीत। घामज्वरासमवेत।' –एभा १७.५५. 'ज्वर पाचाव आणि शारें।' –दा ३.६.२६.

शारी—स्त्री. (व) मंत्रतंत्राच्या साहाय्यानें दुसऱ्याच्या घरांतील अन्न किंवा इतर वस्तू आणविणारी स्त्री.

शार्ङ्ग—न. १ विष्णूच्या धनुष्याचें नांव. २ शृंगाचें धनुष्य. [सं. शृंग. अप. शारंग] **०धर-पाणी**–पु. विष्णु. 'तयापरी तो पांडुकुमरु। महामोहें अति जर्जरु। देखोनी श्रीशार्ङ्गधरु। काय बोले।'–ज्ञा २.५. 'पायां लागोनि बुझावणी। तुझ्या ठायीं शार्ङ्गपाणी।' –ज्ञा ११.५४६. **शार्ङ्गी**–पु. विष्णु; कृष्ण. 'हेंच समर्थावयालागीं। एक दोन चांगी। उपपत्ती शार्ङ्गी। दाविता जाहला।' –ज्ञा ११.७०४.

शार्दूल—पु. एक झाड; चित्रक. [सं.]

शार्दूल—पु. १ वाघ; व्याघ्र. २ राक्षस. –वि. (समासांत उत्तरपदीं) श्रेष्ठ. उदा० नरशार्दूल. [सं.] **०विक्रीडीत**–न. एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १९ अक्षरें; म, स, ज, स, त, त, ग हे गण येतात. उदा० 'वंशी नाद नटी तिला कटितटीं खोवोनि पोटीं पटीं।' [सं.]

शार्मण्य—वि. जर्मनदेशीय. 'सर्व जगतांत शास्त्रीय प्रगतीचें अग्रेसरत्व शार्मण्यदेशीयांना परमेश्वरानें दिलेलें आहे.' –सासं २.१३२. [जर्मन]

शाल—स्त्री. लोकरीचें पांघरण्याचें उंची वस्त्र. [फा. शाल्] **०जोडी**–स्त्री. १ दुहेरी शाल; शालीचे दोन फर्दे मिळून झालेलें जोडवस्त्र; दुशाल पहा. २ शाल. **शालजोडींतून मारणें-देणें, शालजोडीतला देणें-मारणें**–एखाद्याची व्यंगोक्तीनें निंदा, कुचाळकी करणें; उपरोधिक शब्दांत टोचणें; टोमणा देणें. 'जुलमी अम्मलदाराचा अगर राजाचा स्वभावच असा असतो कीं, ते आपल्याजवळ जीं माणसें बाळगतात तीं अशीं असावीं कीं त्यांस कोणी शालजोडींतील मारले तरी त्यांनीं शालजोडीच्या मऊपणाचीच तारीफ करीत रहावें.' –टिले २.१२८. **०नामा**–पु. अंगावर नकशी, वेलबुट्टया असलेली शाल. [फा.]

शाल—पु. एक झाड; साल. [सं.] **०निर्यास**–पु. शालझाडाचा चीक, डिंक. [सं.]

शालक—पु. मेहुणा; बायकोचा भाऊ किंवा बहिणीचा नवरा. साला. 'शालक लक्ष्मी बघती केवळ नच त्या जरि गुणबिंदु।' –सौभद्र. [सं. श्यालक]

शालग्राम, शाळग्राम—पु. (अप.) शालिग्राम शालिग्राम पहा.

शालमुद्री—स्त्री. (ना. व.) लग्नाचे अगोदर दोन महिने नवरदेवाला नवरीच्या बापानें अहेर करतांना केला जाणारा विधी. [शाल+मुद्रिका]

शाला-ळा—पु. १ घर; दालन; सर्वसामान्य जागा; गृह. सामाशब्द–होमशाला, गोशाला, पाठशाला, नृत्यशाला, रत्नशाला, अश्वशाला, टंकशाला, वित्तशाला इ० 'प्रभु रामकृष्ण दोघे गेले शाळेसि त्या कुलालाच्या।' –मोआदि ३६.१. २ शास्त्र, विद्या, कला, व्यायाम इ० शिकविण्याची जागा; शिक्षणमंदिर; विद्यागृह; आखाडा. ३ विवक्षित आचार्यानें प्रतिपादिलेली तत्त्वपद्धति; विवक्षित शिक्षणाची रीत, पद्धति; विशिष्ट विचारपद्धति, प्रणाली, शास्त्र. ४ एका तत्त्वानें, धोरणानें किंवा विचारानें एकत्र जमलेली मंडळी; संप्रदाय; मंडळ; गट. ५ एखादें वैशिष्ट्य; एकसारखी चालरीत इ० असलेला पक्ष, कुल, समाज. उदा० 'त्या कुळाची शाला अशीच कीं, सर्व मनुष्य गरीब' ६ व्यवसायाची जागा; लोहाराचें दुकान [सं.] **०बंधु**–पु. शाळेतील सहाध्यायी; शाळासोबती. [सं.] **०शुद्ध**–वि. जेथें शिक्षण, कलाकौशल्य, रीतभात उत्कृष्ट शिकविली जाते अशा चांगल्या शाळेंत असलेला (विद्यार्थी, गवई इ०) किंवा अशा शाळेंत शिकविलेलें (गायन, शिक्षण, इ०). **०सुटणें**–१ शाळा बंद होणें (विशिष्ट कालपर्यंत) शिक्षण थांबणें; शिकण्याचें बंद होणें. **शालेंतील-शालेचें-शिंगरूं-लेंकरूं**–न. परंपरेप्रमाणें; बापाप्रमाणें वाईट मार्गाला लागलेला मुलगा.

शालि—स्त्री. साळ; भात; व्रीहि जातीचें धान्य. [सं.] **०वन-क्षेत्र**–न. भाताचें शेत; साळीचें शेत. [सं.] **शाल्योदन**–पु. १ शिजविलेला भात. २ (ल.) भोजन; उत्तम चमचमीत जेवण. [सं. शालि+ओदन]

शालिका—स्त्री. स्थान; भूमि. 'जे महदादि विश्राम। शालिका हे।' –ज्ञा १४६७. [सं. शाला]

शालिग्राम—पु. (अप. शाळग्राम, शाळिग्राम). १ गंडकी नदींतील विष्णुस्वरूप मानिलेला काळा गुळगुळीत व वाटोळा गोटा. २ (ल. उप.) कांदा; कंदर्प. –वि. अगदीं काळा कुळकुळीत. [सं. शालग्राम. शाल=नदीचें नांव. ग्राव=दगड] **म्ह०** काळा काळा शाळिग्राम, गोरा गोरा मुसलमान.

शालिनी—स्त्री. एक वृत्त. याच्या एकेका चरणांत ११ अक्षरें आणि म, त, त, ग, ग हे गण असतात. उदा० काया वाचा इंद्रियेंबुद्धि चित्त। यांनीं किंवा दुःस्वभावें प्रमत्त। [स.]

शालिनी—वि. १ शोभणारी; शाली पहा. २ सुगृहिणी. ३ विनयशील. [सं.]

शालिवाहन—पु. एक शककर्ता; दक्षिण हिंदुस्थानांतील सार्वभौम राजा. याचा शक अद्यापि चालू आहे. [सं.] **०शक**–पु. एक कालगणना; संवत्सरक्रम. हा नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रांतांत चालतो. याचा आरंभ खिस्ती शकाच्या ७८ व्या वर्षी झाला. आरंभ चैत्र शुद्ध १. [सं.]

शालिहोत्र—पु. अश्वशास्त्रकर्ता; कपिलमुनीचा पुत्र. यानें अश्वशास्त्रविषयक ' शाल्यहोत्र ' नामक ग्रंथ लिहिला. ' तो शालिहोत्र, कीं हा तुल्यचि अश्वांसि जाण ताराया। ' –मोविराट १.२३. **०शास्त्र, शाल्यहोत्र**–न. घोडयांच्या रोगांचें निदान व चिकित्सा सांगणारें शास्त्र; पशुवैद्यक. [सं.]

शाली—वि. १ चमकणारा; चकाकणारा; तेजस्वी. २ नांवाजलेला; कीर्ति असलेला. ३ समृद्ध; संपन्न; परिपूर्ण. समासांत अभिमानशाली, मानशाली(पुरुष); उर्मिशाली, तरंगशाली, (समुद्र); गंधशाली, (वायु); ज्वालाशाली, (अग्नि); आणखी सामाशब्द–कृपा–कौशल्य–गुण–तप–दान–दैव–धर्म–पराक्रम–पल्लव–पुण्य–पुष्प–बल–भाग्य–भोग–विद्या–वीर्य–वैराग्य–शौर्य–ज्ञान–शाली. [सं.]

शालीन—वि. लाजाळू; नम्र; विनीत. शालिनी पहा. [सं.] **०ता**–स्त्री. सभ्यता; विनय; लाजाळूपणा. [सं.]

शालू-लु—पु. १ उत्तम; उंची, रेशमी, जरीचें लुगडें. ' शेले शालू साडया। क्षोरोदक लांबरुंद पाटावें। '–मोसभा ५. ८३. २ बैलावरील झूल. [हिं. सालू]

शालुक-की—स्त्री. एक बायकी खेळ. या खेळास चार अगर त्याहून अधिक भुली असल्या तरी चालतात. चौघींत खेळावयाचें असेल तर दोघींनीं एकमेकींचे पाठीस पाठ लावून उभे रहावें व दोघींनीं त्यांचे समोर टाळी देण्यास असावें. ह्याप्रमाणें तयार होऊन मग ' शालुक शालकी। तुझी माझी पालखी। ' हें गाणें म्हणत समोरील गडयास टाळी देत वाटोळें फिरावें –मखे २३७.

शाल्मल-ली-शाल्मलीद्वीप—पु.स्त्री.न. पृथ्वीच्या सप्तद्वीपांपैकीं एक. हें युक्झीनपासून बाल्टिक–आड्रियाटिक समुद्रापर्यंत पसरलेलें आहे. सप्तद्वीप पहा. [सं.]

शाल्मल-लि-ली—पु.स्त्री. सांवरी; शेवरीचें झाड. [सं.]

शाव-शावक—वि. शवासंबंधीं. शव पहा.

शाव, शावक—पु. छावा; बच्चा; बालक; (मृग, सिंह इ० चा). [सं.]

शावक—पु. (प्र.) श्रावक पहा. जैनयतींचा एक वर्ग. (सामा.) पाखंडी. ' मग त्या दैत्यीं सांडिलें हवन। सांप्रदाई जाहले नानावर्ण। ते हे जी शावक जन। बोलिले भारता। ' –कथा २.१७.९८. [सं. श्रावक]

शाश्वत—स्त्री. शाश्वती; टिकाऊपणा; कायमपणा. ' ह्या देहाची शाश्वत नाहीं म्हणून पहिल्यापासुन ईश्वरभजनीं लागावें. ' –वि. १ अनश्वर; चिर; अखंड. २ कायम टिकून रहाणारें; कायमचें. [सं.] **शाश्वती**–स्त्री. टिकाऊपणा; चिरंतनता; शाश्वत पहा. **शाश्वतिक**–वि. शाश्वत पहा. [सं.]

शासणें—क्रि. १ शासन, दंड, शिक्षा करणें. २ अधिकार चालविणें; व्यवस्था पाहणें. [सं. शासन] **शासक**–वि. १ शासन करणारा; दंड करणारा. २ राज्य चालविणारा, हांकणारा; राज्यकर्ता. ३ व्यवस्था पहाणारा अधिकारी. [सं.] **शासन**–न. १ शिक्षा; दंड; सजा. २ राज्यकारभार; सत्ता चालविणें. ३ हुकुम; आज्ञा. ' आले शरण तुज.....शासनांत राहुनी। ' –मोगदा ८.१७. ४ आज्ञापत्र; निर्णयपत्र. ५ राजाज्ञा; सनद; शासनपत्र. उदा० ' अशोकाचीं शिलाशासनें '. ६ सत्ता; अंमल; कारकीर्द. [सं.] **०पत्र**–न. अधिकारपत्र; सनद; हुकूम (कागद, ताम्रपट, शिला वगैरेवर लिहिलेलें). [सं.] **०पद्धति**–स्त्री. राज्यव्यवस्था; राज्यपद्धति; राजनीति; कायदेकानू. [सं.] **०शास्त्र**–न. राजकीय व्यवहारांचा विचार करणारें शास्त्र; राजनीतिशास्त्र. (इं.) पॉलिटिक्स. [सं.] **शासनीय**–वि. १ शिक्षा करण्याजोगें, योग्य; **दंड्य** (प्रजा, सेवक, इ०). २ अधिकार, सत्ता चालविण्याजोगें, लायक. [सं.] **शासित**–वि. १ सजा दिलेलें; शिक्षा केलेलें. २ अधिकार, अंमल, सत्ता गाजविलेलें; हुकमत, आज्ञा केलेलें; आज्ञापित. [सं.] **शास्ता**–पु. १ दंड, शिक्षा करणारा; शासक; शासन करणारा (न्यायाधीश, गुरु, इ०). २ अधिकार, अंमल चालविणारा; अधिपति; राज्यकर्ता. [सं. शास्] **शास्ति**–स्त्री. (महानु.) शासन; शिक्षा; दंड. शास्त पहा. ' लागलिजें तरी शास्ति कर्ती। ' –शिशु १९४. [सं.] **शास्तृत्व**–न. १ चुकीच्या मार्गावरून सरळ मार्गावर आणणें; शिक्षा, सजा करणें. २ सत्ता; अधिकार; अंमल. [सं.] **शास्य**–वि. १ शासन करण्यास, शिक्षा करण्यास युक्त, योग्य, शक्य, जरूर; सरळ मार्गावर आणण्यास योग्य, जोगतें, सारखें, जरूर. २ अधिकार, हुकमत, आज्ञा करण्याजोगें, युक्त, सारखें, जरूर, शक्य.

शास्त—स्त्री. शासन; शिक्षा दंड. ' साहेब जे शास्त अथवा गुन्हेगारी घेतील ते आपण कबूल असे. ' –रा १६.४७. ' शास्ताखानास शास्त केली. ' –सभासद २९. [अर. सियासत्; सं. शास्]

शास्त्र—न. १ (दैवी) धर्म, विधि, नियम, विद्या यासंबंधीं वचन, आज्ञा. हें ईश्वरी किंवा अपौरुषेय मानण्यांत येतें. बहुधा सामासांत उपयोग. समाशब्द–**शास्त्रमर्यादा, शास्त्ररीती, शास्त्रमार्ग,**

शास्त्रप्रतिपादित, शास्त्राभ्यास, शास्त्रज्ञ, शास्त्रज्ञान, शास्त्रतत्त्व. २ (समास नसतांना) धर्म, वाङ्मय, विज्ञान, कला इ० संबंधीं नियम. हा अर्थ अभिप्रेत असतां बहुधा मर्यादा घालणाऱ्या दुसऱ्या शब्दांस जोडून येतात. उदा० वेदांतशास्त्र, शिल्पशास्त्र, कामशास्त्र, न्यायशास्त्र, व्याकरणशास्त्र, ३ (सामा.) प्रबंध; ग्रंथ. ४ नियमबद्ध, सिद्धांतमय रचना असलेला विषय. [सं.] (वाप्र.) **शास्त्रास,शास्त्राचा, शास्त्रापुरता,शास्त्रार्थास असणें-नसणें**:-केवळ नांवाला असणें-नसणें. 'हा आपला उगीच शास्त्रास चाकू आहे. ह्यानें बोट देखील कापणार नाहीं.' 'आज घरांत शास्त्राला साखर नाहीं, मग शेरभर वेऊं कुठली?' 'शास्त्रास स्नान झालें खरें, मलशुद्धी ती निराळी' **शास्त्रांत**-वि. शास्त्राप्रमाणें; शास्त्र धरून, अनुसरून. [सं.] **०दर्शि-वेत्ता-विद ०प्रविण-ज्ञ-अभिज्ञ-संपन्न**-वि. शास्त्रांत निपुण, कुशल; चांगला शास्त्री. [सं.] **०निंदा**-स्त्री. शास्त्राची धिक्कारणी, अवमानणी, शास्त्राचा अपमान. [सं.] **०पाखंड**-न. शास्त्राचा भलता अर्थ; अशास्त्रीय विधान. 'पोट भरावया भांड। सैरा वाजविती तोंड। तैसे विषयालागीं. वितंड। शास्त्रपाखंड बोलती।'-एभा ९.३५५. **०पारंगत-सकलशास्त्रपारंगत**-वि. सर्व शास्त्रविशारद; सर्व शास्त्रांत निपुण. [सं.] **०बाहे**-वि. शास्त्रबाह्य; निषिद्ध. 'आशंकेचा उपक्रम। दिवसा नाहीं लाजाहोम। शास्त्रबाहे विषम। कां पा कवि बोलिला।'-सीस १०. १०८. [सं. शास्त्रबाह्य] **०मर्यादा**-स्त्री. शास्त्रानें घालून दिलेली, आंखून दिलेली, मर्यादा, सीमा. (क्रि० राखणें पाळणें, धरणें, पाळणें) [सं.] **०वत्**-वि. शास्त्राप्रमाणें; शास्त्रानुसार; सशास्त्र [सं.] **०व्युत्पत्ति**-स्त्री. न्यायादि शास्त्रांत गति; शास्त्र ग्रंथांतील निपुणता. 'पुराण सांगण्यास केवळ शास्त्रव्युत्पत्ति नको, काव्यव्युत्पत्ति असली म्हणजे झालें. [सं.] **०संख्याक**-वि. सहा. षट्शास्त्रें यावरून सांकेतिक. 'खदिर वृक्षांचे शास्त्रसंख्याक। पळसांचे ऋषि संख्याक। ऐसियापरी सम्यक। यज्ञक्रिया अवलंबिली।'-जैअ ९२.४९. **शास्त्रार्थ**-पु. शास्त्रांतील किंवा विधिनिषेधरूप वचन, अभिप्राय, शास्त्राची सांगणी. शास्त्रांतलें वचन; शास्त्राज्ञा. विशिष्ट बाबतींत शास्त्रानें घालून दिलेला नियम, वा दाखविलेला मार्ग. **शास्त्रार्थ करणें**-१ (एखादी गोष्ट) किंचित् नांवाला करणें; केली न केली याप्रमाणें वागणें. **शास्त्रार्थास असणें**-शास्त्रास असणें पहा. **शास्त्री**-पु १ शास्त्रांचा अभ्यास केलेला गृहस्थ; शास्त्रवेत्ता; पंडित २ ज्या शास्त्राचें अध्ययन ज्यानें केलें आहे तो तच्छास्त्री. उदा० न्यायशास्त्री, धर्मशास्त्री. ३ कोणत्याहि एखाद्या शास्त्रविशेषांत निपुण असलेल्या ब्राह्मणाच्या नांवापुढील बहुमानार्थी पदवी. उदा० बाळशास्त्री, गंगाधरशास्त्री, वासुदेवशास्त्री. **०बाणा**-पु. विशिष्ट धंदा किंवा व्यासंग म्हणून केल्या जाणाऱ्या पुढील सहा शास्त्रीय विद्यांना योजला जाणारा शब्द, आलंकारिक, ज्योतिषी, धर्मशास्त्री, नैय्यायिक, वैद्यकी, वैय्याकरणी-बाणा. **शास्त्रीय**-वि. १ शास्त्रासंबंधीं (विषय, परिभाषा, व्यवहार, ज्ञान, इ०). २ यथाशास्त्र;शास्त्रोक्त; [सं.]

शाह, शाहंगी, शाहांगी, शाहजादा, शाहाजादा, शाहजानी, शाहाजानी, शाहदानी, शाहाजिरे शाहजिरे, शाहजोग, शाहडा-डे, शाहणपण, शाहाणा, शाहाणासुरता, शाहाण्णव, शाहत्तर, शाहनिशा, शाहमत, शाहामृग, शाहरा, शाहरे, शाहळू, शाहळे. शाहा, शाहांगी याप्रमाणें श खालीं पहा.

शाह-गोश, शाहगोज-पु. रानमांजर, [फा. सियाह् गोश]

शाहदी, शाहीदी-स्त्री. साक्ष; गव्हा. 'कोणी जमीनदार महादजी देशमूख मसूरकर याची शाहदी द्याल म्हणजे मारिले जाल.'-रा ४. [फा. शाहिदी] **शाहिदी, शाहिदीदार, शाहीद**-पु. साक्षीदार, साक्षदेणारा; गवाह. 'आम्हीं ईश्वरास शाहीद देऊन कर्तव्यार्थ तो करितो'-रा ६.६१९. [फा. शाहीद्] **शाहीदी नामा**-पु. साक्षीपत्र; साक्षीदाराची जबानी, लेख. 'हल्लीं सरकारांत शाहिदीनामा तुमचे पडोशीचे...'-समारो ८.६९,२९.

शाही-स्त्री. राज्य; सत्ता; अंमल; कारकीर्द; शाई पहा. 'सारे शाहींत अस्कारियाचा'-चित्रगुप्त २०. [फा.]

शाहीर-पु १ पोवाडे, लावण्या व ह्या धर्तीचीं कवनें करणारा कवी; २ कवनें रचून तीं म्हणून दाखविणें यांवर चरितार्थ चालविणारा कवि. भाट; चारण. ३ तमाशा करून उपजीविका करणारा माणूस. ४ (सामा.) राष्ट्रीय किंवा वीरवृत्तीची कविता करणारा कवि. [अर. शाइर] **०की-गिरी**-१ कवित्व 'रामकृष्ण गुणीरामा कासार; शाहीरकीमधिं सदा मगन.'-पला १०७१. २ शाहीराची वृत्ति, पेशा. **शाहीरी**-वि. शाहिरासंबधानें.-स्त्री. कवित्व. [फा. शाइरी]

शाहीरु-पु. वेतनव्यय-राज्य ८.५. **०खर्च**-पु. सरकारी हिशोबांपैकीं एक खातें, यांत बदलमुशारा व खेरीजमुशारा हीं सदरें येतात, व शाहिरू खर्च आणि तैवजखर्च मिळून एकबेरजी या मोठ्या सदराखालीं मोडतात.

शाळ-शाळा-शाला, पहा. 'चला मुलांनो शाळ धरूं विद्या असते शाळेंत।'

शाळ-पु. साल (वृक्ष). पहा. 'शाळ ताळ निबिडबन.'-वेसीस्व २.१८.

शाळक-शालक पहा.

शाळंका-खा, शाळुंका-खा, शाळोंका-खा—स्त्री. महादेवाचें लिंग बसविण्यासाठीं केलेली पाषाणादिकांची बैठक; लिंगाची अडणी; योनि.

शाळंकृत—वि. (अप.) सालंकृत सालंकृत पहा.

शाळग्राम-शालिग्राम—शालिग्राम पहा.

शाळसूद—वि. साळसूद पहा.

शाळुंकी-स्त्री—स्त्री. एक पक्षी; सालुंकी.

शाळू—पु. १ जोंधळ्याची एक जात, हा हिवाळ्याच्या दिवसांत पिकतो. २ हिवाळ्यांतील लहान दिवस. –वि. (ल.) क्षणिक; नश्वर; थोडा वेळ रहाणारा. [सं. शीतकाल; प्रा. सियाल] **०गवत**–न. १ गुराढोरांचें खाण्याचें उत्तम चवदार गवत. २ पावसाळ्यांत उगवणारें व नंतर थोडक्याच अवधींत नाश पावणारें एक बारीक जातीचें गवत. **०आयुष्य**–न. क्षणभंगुर आयुष्य. **०ऐश्वर्य**–न. क्षणभंगुर ऐश्वर्य. **०मित्र**–पु. शाळू सोबती पहा. **०मैत्री**–स्त्री. थोडा वेळ टिकणारें मित्रत्व. **०संपत्ति**–स्त्री. अल्पकाल टिकणारें द्रव्य. **०सोबत**–स्त्री. शाळु सोबत्याची मैत्री, सोबत. **०सोबती**–पु. ज्याचा सहवास थोडे दिवसच आपणांस लाभावयाचा आहे असा माणूस; शेवटपर्यंत सोबत न ठेवतां, मध्येंच सोडून जाणारा माणूस, शाळू असेल तोंवर, लभ्यांश असेल तोंवर टिकणारा मित्र.

शाळू—स्त्री. अन्याय झालेल्या इसमानें आगळीक करणाऱ्याला धाक दाखविण्यासाठीं व न्याय्य गोष्ट करण्याला भाग पाडण्यासाठीं रात्रीं निर्जन स्थळीं उच्चारलेले तळतळाटाचे शब्द, शाप. (क्रि० पुकारणें).

शाळें—न. शहाळें पहा.

शाळोत्र, त्री—नपु. शालिहोत्र पहा.

शिऊळ—स्त्री. जोखडाची खुंटी; शिवळ पहा.

शिऊळ—स्त्री. शीळ; शीट. शीळ पहा. (क्रि० घालणें, वाजविणें).

शिक—स्त्री. शिक्षा; शिकवण. 'शिक लावुनियां घालिती बाहेरी।' –तुगा १६. [सं. शिक्ष्; प्रा. सिव–ख]

शिंक—स्त्री. शैत्यामुळें नाकांतून वायूचें जोराचें सशब्द निःसरण. (क्रि० जाणें, येणें). [हिं. शींक फ्रें. जि. चिक. तुल० सं. छिक्का] **शिंकणें, शिकणें**–क्रि. शिंक येणें; शिंकेनें युक्त होणें. **शिंकणी**–स्त्री. १ हुंगली असतां शिंका आणणारी एक औषधी वनस्पति; नाकशिंकणी. २ शिंकणें. **शिंकेचा शकून**–विशिष्ट वेळीं किंवा दिशेस शिंक आली असतां तीवरून पाहण्याचा शकून. 'रोज तुला शिंकेचा शकून पटतो।' –तोबंड १६.

शिककाई-शिकिकै—शिकेकाई पहा.

शिकजी, शिकंजी—स्त्री. एक प्रकारचें सरबत, थंडाई. लिंबू आणि साखर किंवा मध घालून त्याला गुलाबाचा वास लावतात. [फा. सकंजबीन्]

शिकंजा—पु एखादी वस्तु दोन्हीकडून दाबांत धरण्यांचें सुतार, बुकबाइंडर वगैरेचें हत्यार. [फा. शिकंजा]

शिकण—न. गवत; दोरी वगैरेचे भांड्याखालीं ठेवण्याचें वेटोळें; चुंबळ; निवणें. [सं. शिक्य]

शिकणें—क्रि. १ विद्या–कला–शास्त्र यासंबंधीं धडे घेणें; विद्या मिळविणें. २ अभ्यास करणें. [सं. शिक्ष्. प्रा. पं. सिखणा. सिं. सिखणु. हिं. सीखना. गु. शिखवुं. बं. शिखिवा. फ्रें. जि. सिक] **म्ह० शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिदोरी (फार वेळ पुरत नाहीं). शिकणाऊ**–वि. १ शिकणारा; शिकाऊ; विद्यार्थी; अभ्यासक; नवशिक्या; उमेदवार. 'लिहिणें पुष्कळ पडलें आहे, कोणी शिकणाऊ कारकून असेल तर लिहावयास आणून बसवा, म्हणजे दोघांचींहि कामें होतील'. २ उपजत नव्हे परंतु अभ्यासानें संपादन केलेलें; गुरूपासून शिकून साध्य केलेलें (गाणें, बोलणें इ०). **शिकवण–णी**–स्त्री. १ शिकविण्याची पद्धत; रीत. २ वाईट अर्थानें सुचविणें; फूस देणें; प्रवृत्त करणें. (क्रि० लावणें, देणें). ३ उपदेश; शिक्षण; बोध देणें; शिकविणें. ४ शिक्षणाचें वेतन. 'पुष्कळ वर्षे त्याचा चरितार्थ शिकवणीवर चालला होता।' –नि ६१४. [शिकविणें] **शिकवाशिकव**–स्त्री. दोन्हीं पक्षांना चिथावणी देऊन त्यांच्यामधील कलह चेतविणें; फूस देऊन भांडण वाढविणें. [शिकविणें द्वि.] **शिकविणें**–क्रि. १ शिक्षण देणें; आध्यापिणें. २ उपदेश, बोध करणें; पटविणें. ३ (वाईट अर्थानें) उत्तेजन देणें व मनांत भरविणें; चेतविणें; प्रवृत्त करणें. [शिकणें] **शिकाऊ**–वि. शिकणाऊ पहा.

शिकत्रा—पु. एक पक्षी.

शिकंदर—पु. १ मॅसिडोनियाचा जगज्जेता राजा अलेक्झँडर. हा मोठा पराक्रमी, धूर्त व भाग्यशाली असे. (याच्यावरून लक्षणेनें किंवा औपरोधिक गुणविशेषणें लावतात). –वि. १ (ल.) धूर्त; शहाणा व भाग्यशाली पुरुष; महा बलाढ्य व पराक्रमी मनुष्य. २ (उप.) पुंड; गुंड; पक्का हरामी; सोदा माणूस. [अर. इस्कंदर; फा. सिकन्दर; इं. अलेक्झँडर] **०नशीब असणें**–दैव अतिशय अनुकूल असणें. नशीब पहा. **शिकंदर ताले**–शिकंदराप्रमाणें उच्चीचे ग्रह. **शिकंदराची दिवाल**–स्त्री. १ याजूज व माजूज नांवाच्या रानटी लोकांपासून संरक्षण व्हावें म्हणून शिकंदरानें बांधलेली एक अत्यंत भक्कम अशी भिंत. कदाचित् ही चिनी भिंत असावी. २ (ल.) अढळ;

अभेद्य गोष्ट. 'व स्नेहही (नबाबाचा) कायम राहील जैशी शिकंदराची दिवाल।' –खरे ८७७.

शिकम—न. पोट; मर्यादित जागा; पोटविभाग; हद्द; क्षेत्र. '...भोंसले स्वराज्याचे शिकमांत तेव्हां मिलाफी सलूख करून घेतील हें कयासांत येत नाहीं।' –पया ४७७. 'फुल्वरीचे मकान फरासिसांचे सिकमांत आहे तें घेऊन बंदोबस्त करावा।' –रा ७. खलप १.३०. [फा. शिकम्] **शिकमीदार**–पोटहिस्सेदार.

शिकर—पु. बहिरीससाणा; ससाणा; श्येन. [फा.]

शिकरण, शिक्रण, शिखरण—स्त्री. केळीं, खरबूज इ० दुधांत कुसकरून व गूळ किंवा साखर घालून तयार केलेला खाद्य पदार्थ. 'एक मधुर शिखरणी। श्वेतभक्ष्य पंचवरान्नी।' –मुक्तेआदि २९.८३.०[सं. शिखरिणी]

शिकरणी—स्त्री. शिकाळी. [सं. शिक्य]

शिकरणें—क्रि. नाक धरून जोरानें हवा सोडून शेंबूड काढून टाकणें; नाक शब्दासह किंवा त्याशिवाय उपयोग करितात. उदा० तो शिंकरला, तो नाक शिंकरला. 'त्यानें नाक शिंकरलें।' असाहि प्रयोग करतात.

शिकरी—स्त्री. (का. कों. राजा). रहाटाचे माळेस लोटा बांधावयाच्या उपयोगी असा दोरीचा तुकडा.

शिकल, शिकील, शिक्कल—स्त्री. १ (घासून, पुसून) साफसूफी; उजाळा, जिल्हई देणें (हत्यारें, शस्त्रें इ० ना). 'मेण शिकलकेली, गडी घरचा पाठिवला जलदी गेला जिनकराला ताकीद केली।'–ऐपो ४३०.' 'जंग लागला न लागला हें पाहून, वरचेवर शिकल करवून...–भोंकु ११. २ तेज; शोभा; चकाकी; जिल्हई. ३ मान; अब्रू. (क्रि० चढणें; उतरणें; जाणें; गमावणें) 'पूर्व क्रमास शिकल राहील. –होकै७३. [अर. सैकल्]

०उडणें–उ. (ल.) लज्जित होणें; अवमान, अवहेलना होणें. **०उतरणें**–१ तेज कमी होणें; २ मानहानि करणें, होणें. **०कर–गार**–पु. शिकल करण्याचें कसब करणारा; हत्यारें उजळणारा; हत्यारें साफसूफ करून धार लावणारा. –भोंकु ४०. [फा. सैकल्गर]

शिकला—पु. लहान नथ; सुंकलें.

शिकली—स्त्री. (गो.) सोन्यावर पडलेले चरे घांसून साफ करण्याचें हत्यार. [शिकल]

शिकस्त—वि. १ पराजित; पराभूत, 'गनिमांनीं कधीं मोंगलाशीं युद्ध करून मोंगल शिकस्त केला नव्हता.'–भाब ८१. २ मोडके; तुटकें; मोडकें तोडकें; भग्न; मोडकळीस आलेलें. (घर, विहीर, इ०) 'सर्कारचे कारखान्यांतील थोरल्या तोफांची मारगिरी आज रात्रौ सुरू करून दिवाळ शिकस्त जाल्यावर उपरान्तिक हल्याचा बेत ठरेल.'–ख १२.६२९०. ३ निरुपयोगी; कुचकामाचें; –स्त्री. १ पराभव. 'मीरफैजल्लास त्यांणीं शिकस्त दिल्ही.–ख ७८५. २ मोड; दुर्दशा; भग्नदशा; नष्ट स्थिति; 'राजश्री सुभेदारांकडील लोकाची शिकस्त जाली'. –दिमरा २१६५. 'परंतु सिबाड जाया न जाहली व शिकस्तही न जाहली. –वाडबाबा ४.१४४. [फा.] **०करणें**–१ (कागद, तांब, तक्ता वगैरे घडी घालून चार रकाने पाडणें. **०खाणें**–हार खाणें 'शिकस्त खाऊन तोही फिरला।' –ऐपो २१०.

शिकस्त—स्त्री. कमाल; पराकाष्ठा; अत्युच्चता (कृत्य, इ० ची) वर पहा. [फा.]

शिकळ—स्त्री. (कु.) पानें किंवा फळें दोऱ्यांत ओवून केलेली माळ.

शिका—पु. शिक्का पहा.

शिकायत—स्त्री. (व.) तक्रार; फिर्याद; कागाळी. 'मुलाची पोट दुखण्याबद्दल शिकायत आहे. [अर. शिकायत्]

शिकार—स्त्री. १ पारध; मृगया; (सावजाचा) पाठलाग; शोध. २ सावज; मृग; पारध करावयाचा प्राणी. ४ (ल.) लग्गा; संधान (बहुधा निंदार्थी) (क्रि० साधणें). ५ अचानक मोठा लाभ; टावकें. **म्ह०** साधली तर शिकार नाहीं तर भिकार [फा. शिकार] **०खाना**–पु. पारधी पशुपक्ष्यांचा भरणा; रानटी पशुपक्षी ठेवण्याची जागा; प्राणिसंग्रहालय. तत्संबंधींचा कारखाना. [फा.] **०गाह**–पु. १ शिकारीची जागा; २ शिकार. 'कमठाणें येथें शिकारगाहाकरितां नबाब जाऊन राहणार'–रा ७.८५. **०दार**–पु. (ना.) शिकारी; पारधी. **०बंद**–पु. शिकारी स्वाराच्या खोगिराला मागेपुढें लावलेले बंद प्रत्येकीं [फा] **०बाज**– पु. पारधी; शिकारी. **शिकारी**–पु. शिकार करणारा; –वि. पारध करण्यासंबंधीं; मृगयेसंबंधीं; पारधीच्या, शिकारीच्या उपयोगी. [फा. शिकारी] **०चित्ता**–पु. शिकार करावयास शिकविलेला चित्ता.

शिकारणी, शिंकारणी—स्त्री. १ टांगण्यासाठीं टोपली, भांडें इ०ला बांधलेली दोरी. २ शिंक्याची, टांगलेली टोपली. **शिकारणें**–शिंकाळणें पहा. **शिकारी**–शिकरी पहा. [सं. शिक्य]

शिकारी—स्त्री. १ शिकरी; रहाटाच्या माळेला लोटा बांधावयाचा दोर, दोरी; २ भांडें, टोपली इ० च्या गळ्याला शिंकाळें करण्यासाठीं बांधलेली दोरी. ३ आंबे किंवा नारळ उतरावयाची टोपली. ४ नारळाच्या झाडावर चढण्यासाठीं केलेला दोरीचा पायंडा. [सं. शिक्य]

शिकारोखा—पु. वर्चस्व; अधिकार; स्वामित्व (क्रि० करणें; दाखविणें; मिरविणें; लावणें)..[शिका+रोखा]

शिंकाळ-ळी, शिकाळी—स्त्री. १ भांडयाला शिंक्याप्रमाणें बांधावयाची दोरी. २ भांडें सर्व बाजूंनीं सारखें उचलें जाऊन नेण्यास सोयीवार पडावें म्हणून त्याच्या गळ्याभोंवतीं दोरीचा फास घालून वर हाताला धरतां येईल अशी योजना. ३ नीट उचलतां यावें म्हणून ज्याच्या गळ्याभोंवतीं दोरी बांधलेली असते असें पात्र. ४ (व.) पाणी ओढण्याची दोरी. **शिकाळणें, शिंकाळणें**–उक्रि. १ शिंकें करणें, शिंक्याला लावणें (भांडें, टोपली इ०). २ लोंबत असणें, राहाणें (एखाद्याचा धंदा, वृत्ति सोडून). **शिंकाळणें**–न. शिंकाळें असलेलें भांडें.

शिकी—स्त्री. (नाविक) १ गलबताचें शीड गुंडाळून काठीस बांधावयाचे उपयोगी असा शिडास संबद्ध केलेला दोरीचा तुकडा. २ शिडाची गुंडाळी, घडी.

शिकील—शिकल पहा.

शिकीळें—न. (कों.) चिमणी.

शिकें, शिंकें—न. १ वस्तु टांगून ठेवण्यासाठीं दोरी विणून करतात तें जाळें, पाश; अधांत्री सांकळीसारखी केलेली विशेष प्रकारची योजना. २ जड वस्तु उचलून नेण्याकरितां वाशास टांग्यावयाकरितां केलेली दोऱ्यांची योजना, जाळी. ३ तराजूच्या दोऱ्या. [सं. शिक्य, शिक्या, शिक्यिका; प्रा. सिक्कग, सिक्किआ] **म्ह०** शिंक्याचें तुटलें, बोक्यैयाचें पटलें-पिकलें= आयताच फायदा; अकल्पित रीतीनें एखाद्यास पाहिजे तें मिळणें. **शिक्याला हात पुरणें**-(व.) मुलगी ऋतुस्नात होणें, वयांत येणें.

शिकेकई, शिकेकाई—स्त्री. एक प्रकारचें झाड व त्याच्या शेंगा; या शेंगांची पूड न्हातांना केंस स्वच्छ करण्यासाठीं वापरतात. साबणाप्रमाणेंहि उपयोग करतात. [ते. शिगा=बुचडा; ते. का. काई=शेंग. सं. शिखा.]

शिकोरा—पु. खापराचें झांकण. **शिकोरी**–स्त्री. (व.) खापराची पणती; खापरी. 'शिकोरीमध्यें कढी घ्या'.

शिक्कल—स्त्री. १ सुरत; तोंड. २ बिशाद; हिकमत. ३ आकार; स्वरूप. [अर. शक्ल्]

शिक्का—पु. १ नाण्यावरील छाप, चिन्ह, मुद्रा; ठसा. 'बादशहाची चाल अशी आहे कीं...शिक्क्यांत नांव भरावयाचें तें' –वाडसनदा २३. २ राजघराण्यांतील राजकर्त्याचा छाप; राजमुद्रा; सरकारी मुद्रा, मोहोर. ३ शिक्क्याचा ठसा, उठाव. ४ कापडावरील, फळावरील, शरीरावरील, खूण चिन्ह, डाग, छाप. ५ अंगावर (देवी इ०) टोंचलेल्याची खूण, व्रण. ६ नांवाचा, अक्षरांचा छाप; सील. **शिक्का-मोहोर**–पु. (व.) बायकांच्या बोटांत घालण्याची आंगठी. [फा. शिक्का]

शिक्य—न. मेण; मधमाशांच्या घरट्याचें मेण. [सं.]

शिक्केकटार—स्त्री. १ (शिक्का आणि कटयार या) राजचिन्हांबद्दलचा व्यापकार्थी शब्दप्रयोग; अधिकारचिन्हें; राज्याधिकाराचीं चिन्हें २ (ग्राम्य) प्रेतापुढें तिकटयावर विस्तव घातलेलें मडकें नेतात तें. **शिक्केकरी**–शिक्केनीस पहा. **शिक्केदाणी**–स्त्री. सरकारी शिक्के ठेवण्याची डबी. हिला पुडें असून ही बहुधा चांदीची असते. **शिक्केदौत**–स्त्री. शिक्क्याची शाई ठेवण्याची दौत. **शिक्केनवीस-नीस**–पु. राजाचा शिक्का संभाळणारा, शिक्का मारणारा अधिकारी; राजमुद्राधारी; मुद्राधिकारी. [फा.] **शिक्केनविशी-निशी**–स्त्री. शिक्केनिसाचा धंदा, हुद्दा [फा.] **शिक्केबरदार** पु. राजचिन्हें (शिक्केकटार) बाळगण्याकरितां नेमलेला अधिकारी. [फा.] **शिक्केशाही लोखंड**–न. उंची लोखंड. वरिष्ठ प्रकारच्या लोखंडाची जात. **शिक्की, शिक्केची**–पु. शिक्का लावणारा. –भासवृत्त ६.८५.

शिक्की—स्त्री. (व.) १ हौस; उत्सुकता. 'कामाची शिक्की'. २ दहशत; धाक. 'मुलाची शिकी फिटली'.

शिक्वा—पु. तक्रार; कागाळी. 'न जाणों, पूर्वी खोजीमकुलीखानांहीं गिल्लाशिक्वाही आमचा काय लिहिला असेल' –रा ६.६०२. [अर. शक्वा]

शिखंड—पु. १ मोराचें शेपूट; मयूरपुच्छ. २ मोराच्या डोक्यावरील तुरा. ३ लहान मुलाच्या डोक्यावरचे जावळाच्या वेळीं राखलेले दोन्ही बाजूंचे केंस; झुलपें. [सं.]

शिखंडी—पु. मोर. 'वीरा! तुवां करावें भीष्मीं, नागीं करी शिखंडी तें।' –मोभीष्म ८.४७. १ द्रुपदाचा पुत्र. हा मूळचा स्त्री असून पुढें याला पुरुषत्व प्राप्त झालें होतें. 'अद्भुत झालें, वधिला त्वत्तात शिखंडिनें, गजें हरिसा।' –मोभीष्म १.९. २ (ल.) नपुंसक; तृतीयप्रकृतीचा; हिजडा; अर्धनारी; उभयलिंगक. [सं.]

शिखणें, शिखणाऊ, शिखविणें, शिखवणी—शिकणें, शिकणाऊ, शिकविणें, शिकवणी इ० पहा.

शिखर—न. १ डोंगराचा किंवा पर्वताचा माथा, शिरोभाग; झाडाचा शेंडा; देवालय, घर इत्यादींचा शिरोभाग; (सामा.) वरचें अग्र; टोंक; कळस. २ सुळका; मनोरा. ३ (मोठेपणा, सद्गुण किंवा दुर्गुण यांचा) कळस; पराकाष्ठा; कमाली. 'त्यांतून कवींचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखून पाहणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय।'. –नि. ४ (व्यवहाराचा) शेवट; अखेरी. ५ (संगीत) एका तालाचें नांव. ह्यांत मात्रा सतरा व विभाग चार असतात. **शिखरास जाणें**-(त्या त्या गोष्टीचा) कळस, पराकाष्ठा होणें. **शिखरास हात पोचणें**-कृतकृत्य होणें; मनोरथ पुरतेपणीं सफळ

होणें; महत्त्वाकांक्षा तृप्त होणें. **शिखरापुरीस-शिकरापुरीस जाणें**-(विनोदानें) 'ग'ची, अतिशय गर्वाची बाधा होणें. **शिखरीं काठ्या लागणें**-(जेजुरी किंवा मढी या स्थानीं खंडोबाचे भक्तगण उंच काठ्यांना पताका लावून वाजत गाजत जाऊन खंडोबाच्या देवळाच्या शिखराला सदर काठ्या लावतात यावरून ल.) हातीं घेतलेलें काम शेवटास नेणें; ध्येय, उद्देश गांठणें; कृतकृत्य होणें. **शिखरीं पोट लागणें**-(आकंठ भोजन, पान, रोग किंवा गर्भारपण यांमुळें) पोट वाढणें; फुगणें. (सामा.) वाढणें; मोठें होणें. **०मणि, शिखरामणि**-पु. शिरोमणी पहा. **शिखरी**-वि. कळसाचा; शिखर असलेला (पर्वत, डोंगर). [सं.]

शिखरण—शिकरण पहा. केळीं, खरबुजें इ० दुधा-दह्यांत कुसकरून केलेलें पक्वान्न. 'एक मधुर शिखरणी। श्वेत भक्ष्य पंचवरान्नी।' -मुआदि २९.८३.

शिखरिणी—स्त्री. एक वृत्त. यांत १७ अक्षरें आणि य, म, न, स, भ, ल, ग हे गण असतात. उदा० अहो येतां जातां उठत बसतां कार्य करितां। [सं.]

शिखा—पु. (व. ना.) पावसाची लहान सर. [सं. सिच्-सेच]

शिखा—स्त्री. १ शेंडी. २ केंसांचा झुबका; डोक्यावरचे केंस (कोंबडा, मोर इ० च्या); (सामा.) तुरा; शेंडी. ३ घोडयाच्या डोक्यावरचा तुरा; बगली. ४ अग्नीची ज्वाळा; दिव्याची ज्योत. 'दीपू तोचि तो हा म्हणती। परी शिखा क्षणाक्षणा जाती।' -एभा ७.५२९; -ज्ञा १४.५५. 'नातरी दीपमूळकीं। दीपशिखा अनेकीं।' -ज्ञा १४.५५. ५ पीडा; छळ. दर्भशिखा पहा. [सं.] **०मागें लागणें**-कांहीं तरी त्रास, आपत्ति यांनीं सदोदित एखाद्याचा पिच्छा न सोडणें. **०नष्ट**-वि. १ शेंडी नसलेला. २ (ल.) मुसलमान; यवन. [सं.] **०मणि**-पु. १ मुगुटांतील मणी. २ उत्तम जातीचा मणि; उत्कृष्ट रत्न. [सं.] **०सूत्र**-न. शेंडी व जानवें (हीं ब्राह्मणत्वाचीं दोन मुख्य बाह्य चिन्हें आहेत.) [सं.] **०सूत्रावर येणें**-(शिखा व यज्ञोपवीत तोडून टाकण्याची तयारी करणें) अत्यंत क्रोधाविष्ट होणें; वैतागणें. **शिखी**-वि. शेंडी, तुरा असलेला (पक्षी इ०); शिखर असलेला (डोंगर इ०); शिखरी. -पु. १ मोर. २ अग्नि. 'शिखी स्थापिला दाटला धूम्र व्योमीं। जपे रावणू मंत्र व्हाया अरामी' -मुरायुद्ध २८७. [सं.] **शिखिनी**-स्त्री. लांडोर.

शिग—स्त्री. सळई (लोखंड, तांबें, पितळ इ० ची).

शिंग—न. १ शृंग; विषाण; जनावराच्या डोक्यावरील एक अणकुचीदार गात्र. २ या आकाराचें एक वाद्य; कर्णा. [सं. शृंग; प्रा. सिङ्ग; गु. हिं. सींग; बं. उरिया शिंग; फ्रेंजि. शिंग] **म्ह०** १ आलें अंगावर घेतलें शिंगावर. २ म्हशीचीं शिंगें म्हशीस जड नसतात. स्वतःच्या गोष्टीचें किंवा स्वकीयांचें कोणास ओझें वाटत नसतें. ३ शिरयांक तारूं गाबत्याक गोरूं. (गो.) शिंग वाजविणाऱ्याला जर तारूं दिलें व गाबत्याला जनावर (गुरूं) दिलें तर त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. (वाप्र.) **शिंगें असणें**-भेद असणें. (मनुष्य आणि पशु यांत ठळक भेद शिंग म्हणून). 'दहा वाजण्याला कांहीं शिंगें आहेत काय?'. **शिंगें फुटणें**-वेडेपणा, अति शहाणपणा करणें. **शिंगें मोडून वासरांत शिरणें**-१ जाणत्या माणसानें पोरकटपणा करूं लागणें. २ अज्ञपणाचें ढोंग करणें; शहाणपण दडवून मुलांप्रमाणें मूढ बनणें. **शिंगावर घेणें**-टक्कर घेणें; चांगलें तोंड देणें; लढणें. **शिंगटें**-न. १ (तिरस्कारार्थी) शिंग; शिंगाचा तुकडा; मेलेल्या जनावराचें शिंग. 'मणी होता शिंगटाचा। लोभ धरूनिया तयाचा। मूर्खपणें राज्याचा। अव्हेर केला।' -दा ५.६.६२. २ बंदुकीच्या दारूनें भरलेलें शिंग. (दारू उडविण्याकरितां). **शिंगटणें, शिंगाटणें**-क्रि. १ शिंगानें मारणें; शिंगावर घेऊन फेकणें. २ (ल) अतिशय रागें भरणें; खरडपट्टी काढणें. ३ (ल.) ठकविणें; फसविणें. **शिंगडा, शिंगाडा**-पु. १ पाण्यांतील एक वेल, व तिचें फळ. २ गोड्या पाण्यांतील एक मासा. ३ बंदुकीची दारू भरून ठेवण्याचें शिंग; दारू ठेवण्याचें पात्र. 'मुलानें कंबरेस दारूचा शिंगाडा बांधला होता त्यास आग लागली'. -तीप्र १३६. ४ एक प्रकारची ऐरण, साधी आणि संदान ह्याहून जरा निराळी. खिळे व भांडीं घडावयाची. ५ खणाची त्रिकोणी घडी. ६ शिंगांच्या आकाराचें खुंटाळें. [सं. शृंगाटक, संघाटिका] **शिंगडें**-न. बैलाच्या शिंगावरील एक दागिना. **शिंगदोरी**-स्त्री. मध्यें घुंगुर घालून शिंगाभोंवतीं बांधलेली दोरी. **शिंगशिंगोटी**-स्त्री. १ जनावरांचीं शिंगें, हाडें इ० (मेलेलीं जनावरें टाकतात त्या जागेवरचीं); गुराढोरांचीं पडलेली शिंगें, हाडें इ०. २ (व्यापकपणें) शिंगें असलेलें जनावर, पशु. ३ शिंगाडया जनावरांच्या विक्रीवरची सरकारी पट्टी; शृंगादाय. -राव्यको. **शिंगाटणें**-न. बैलाच्या शिंगदोरीला बांधलेला हस्तीदंताचा तुकडा. **शिंगाडा-डी-ड्या**-पु. शिंग फुंकणारा, वाजविणारा. -वि. मोठया व लांबलचक शिंगाचा. **शिंगाडा वेल**-पु. शिंगाच्या आकाराची वेलबुट्टी. **शिंगाडी**-स्त्री. १ शिंगाडयाचा वेल. २ गाडीच्या पुढें असणारे उभे दांडे. ३ जोडा सैल करण्याकरितां चांभार वापरतात तें शिंगासारखें हत्यार. **शिंगाडें**-न. पोळयाच्या दिवशीं बैलाला तेल पाजण्यासाठीं, भोंक पाडलेलें शिंग वापरतात तें. **शिंगाळ**-वि. १ लांब शिंगें असलेलें. २ मारकट; शिंगें मारणारा (बैल). ३ (ल.) आसपासच्या सर्व माणसांना त्रास देणारा किंवा त्यांच्या खोड्या करणारा उपद्रवी इसम. **शिंगाळणें**-क्रि. शिंगानें मारणें;

शिंगाटणें. **शिंगाळू**–वि. १ शिंगें फुटूं लागलेला (बकरा, मेंढा, काळवीट इ०). २ मारकट; शिंगांवर घेणारा. ३ मोठ्या व लांबट शिंगांचा. **शिंगाळें**-न. (जनावराला घरण्यासाठीं त्याच्या) शिंगांच्याभोंवतीं बांधलेली दोरी. **शिंगाळें केळें शिंगाळी केळ**–न. एक जातीचें केळें. **शिंगाळ्या**-वि मोठ्या किंवा लांबलचक शिंगांचा. **शिंगी**-स्त्री. १ वाजवण्याचें लहान शिंग (कानफाट्या गोसाव्याचें). २ लहान शिंगरूं (मादी) अल्पवयस्क घोडी. **शिंगोटी**-स्त्री. १ जनावराच्या शिंगाबद्दल अल्पार्थक शब्द. शिंगट. २ (समुच्चयार्थी) शिंगांचीं जनावरें. ३ (सामा.) शिंगाचें जनावर. ' दोन शिंगोट्या होत्या त्याही सरकारांत नेल्या. ' ४ शिंगांचें जनावर विकणाऱ्यापासून घ्यावयाचा कर. ५ बैलाच्या शिंगाला बांधलेली दोरी; शिंगाळें. **म्ह०** शिंग. तिकडे शिंगोटी-शिंगाचें जनावर म्हटलें कीं सरकारी कर आलाच. [हिं]

शिंगटापाग—पु. (कों.) एका जाळ्याचें नांव. [शिंग+पाग=जाळें]

शिंगटी-डी—स्त्री. एक जातीचा मासा.

शिंगट्या—पु. बिन खवल्याचा मासा. –बदलापूर १३२.

शिंगडी-री—स्त्री. (कों.) नारळाच्या झांपाचें टोक किंवा पातीचें टोंक; शिगा [शीग]

शिंगडी-डें—स्त्री.न. (कों.) वाळलेल्या शेंगांची रास (पावटा, तूर इ० द्विदल जातीच्या धान्याच्या). [शेंग]

शिंगर, शिंगार—न. चोई; पत्रावळ लावण्याच्या बारीक काड्या प्रत्येकी. [शीग]

शिंगरी—स्त्री. कोंवळा मोड, अंकुर; मिटलेल्या पानाची सुरळी. [शीग]

शिंगरी—स्त्री. (प्रां.) भांडें ठेवण्याचें, नेण्याचें दोरीचें शिकाळें. [शिंकें+दोरी ?]

शिंगरू—न. घोडें, खेचर, गाढव इ०चें लहान पोर, बच्चा; बछडें. [शिंगा] **शिंगरूप**-वि बच्चा; छोटा (घोडा) **शिंगरट**-न. शिंगरू शब्दाचें प्रेमळ किंवा तिरस्कारयुक्त रूप. **शिंगरवट**-वि. वयांत न आलेलें (शिंगरू, शिंगा). [शिंगरू+वत्] **शिंगा**-पु. शिंगरू; गाढव किंवा घोडा याचें पिल्लू (नर). **शिंगी**-स्त्री. १ शिंगरूं; घोड्याचें पिल्लू. मादी. २ (ल.) छबेली; छोकरी.

शिंगरुप-ब—पु. हिंगूळ; रससिंदूर. [फा. शंगर्फ]

शिंगऱ्या-डिंगऱ्या—स्त्री.अव. (खा.) मुळ्याच्या शेंगा.

शिंगस्त—न. (ना.) सिंहस्थ (अप.)

शिंगळदी(द्वी)प—न. (प्र.) सिंहलद्वीप; सिलोन. [सं. सिंहलद्वीप]

शिंगा—पु. (को.) माडाचे झावळीचा किंवा पातीचा अग्रभाग. शिगडी पहा.

शिंगाडो—पु. (कु.) सांबर. [शिंग]

शिंगाळ-ळा—(कों.) एक मासा; समुद्रांतील एक काळा मासा.

शिंगाळी, शिंगेळी केळ—स्त्री. एका जातीची केळ. **शिंगळें-शिंगाळें केळें, शिंगेळी केळें**-न. शिंगाळी केळीचें फळ.

शिंगूफ, शिंगूफा—स्त्री.पु. फूट; बखेडा; मजेला. ' दर्म्यान असे सिंगुफेमुळें मोठें मसलतींत कमती येते. '–रा १०.१६५. [फा. शिगाफ्]

शिंगोटी—पु. (व.) भुंगा; भोंगुळ.

शिंग्राम—पु. घमणी; बैलांची गाडी. एक विशिष्ट आकाराची घोड्यांची गाडी.

शिंग्रु—पु. शेगवा; शेवगा. [सं.]

शिंघळ, शेंघळ—स्त्री. मुंडावळ; बाशिंग. [सं. शीर्ष्+गल् ?]

शिंचा—पु. (संक्षेप) शिंदळीचा; एक शिवी; शिनळ स्त्रीचा मुलगा (यांतला वाईट अर्थ निघून गेला आहे). ' शिंच्यानें (दक्षणा) विनाकारण बुडविली. ' –नमना ४७.

शिजणें—क्रि. १ पाण्यांत उकळून मऊ होणें; उकळत असणें; रांधलें जाणें. २ पक्व होणें; तयार होणें. ३ त्रासणें; संताप होणें. 'भाग्यें माजे दरिद्रें शिजे.' ४ (ल.) विचारांत असणें; घाटत असणें; तयार होत असणें. ' तुमचेकडे मुलगी द्यावी असें शिजतें आहे. निश्चय होईल तेव्हां खरें ' ५ चालणें; घडून येणें. –मूल २६. ' त्याचें त्या ठिकाणीं कांहींहि शिजतें ' –अकर्तृक. उष्मा, उकाडा होणें. [सं. सिध्, स्विद्य; प्रा. सिज्ज; पं. सिज्जणा; सिं. सिझणु; हिं. सिझाना सिजाना; गु. सिजवुं; ओ. सिजिबा] **शिजवक**–न. (राजा.) भात, भाकरी इ० उरलेलें शिजलेलें अन्न. **शिजवण**-स्त्री. न. शिजलेला पदार्थ. **शिजविणें**–क्रि. पाण्यांत उकळून तयार करणें; रांधणें; उकडणें. **शिजाळू**-वि. लवकर शिजणारें (डाळ, अळू, इ० पदार्थ). **शिझणें, शिझाळू**–शिजणें, शिजाळू पहा.

शिजदा—पु. नमन; वंदन; जमिनीवर डोकें टेंकून वंदन; [अर. सिज्दा]

शिट—स्त्री. शितोडा; सडा; पाण्याचे उडणारे बारीक थेंब; पर्जन्यतुषार. (क्रि० उडणें; उडवणें; मारणें) ' पावसाची शिट लागूं नये म्हणून पागोळीला झडी बांधली पाहिजे. [सं. सिच्]

शिट, शिट—स्त्री.पक्ष्यांचा मल,विष्टा. शीट पहा. **शिटवा**–पु.(राजा.) वाघळाची, पाखराची विष्टा; शीट, **शिटणें**–क्रि. विष्टा

टाकणें. (पक्ष्यादिकांनीं); मळ थोडा पडत असेल तेव्हां लहान मुलांसंबंधींही उपयोग करितात. २ घोडीनें उनाड सुटून हलक्या प्रतीच्या घोड्यांपासून मैथुन करून घेणें. **शिटवा**–पु. (राजा.) वटवाघूळ, पक्षी इ० ची विष्टा, शिट पहा. **शिटाऊ, शिटाव, शिटवा**–वि. (ग्राम्य) १ एखाद्या मरतुकड्या घोडयापासून झालेलें (शिंगरू), शिटलेल्या घोडीपासून झालेला वाईटसाईट (घोडा इ०). २ (ल.) क्षुद्र, अकुलीन हरामी इसमाबद्दल वाप रावयाचा अपशब्द; छाकटा; हलकट; पाजी; हीन; नीच. ३ (अशिष्ट) धूर्त; हुषार; लबाड; बिलंदर, सोदा अशा अर्थानें लहान मुलाबद्दल योजतात. **०बंदर**–न. लबाड, सोदे, भामटे वगैरे तऱ्हेच्या लोकांनीं भरलेलें बंदर. ' गुरुजी ह्यापरिचे । शिष्य शिटाऊ बंदरीचे. ' **०बंदरी**–वि. धूर्त; ठक; लबाड; सोदा. **शिटाचें शिंगरूं**–न. शिटलेल्या घोडीपासून झालेलें शिंगरूं; हीन अवलादीचें शिंगरूं. **शिटावणें**–क्रि. लबाड, लुच्चा बनणें, होणें; खोडया करण्यास प्रवृत्त होणें; बिघडणें (मुलांसंबंधीं प्रयोग). [शिटाव]

शिटकळ—स्त्री. शिसारी. ' ज्याणें एकदां एरंडेल घेतलें असेल त्यास पुन्हां त्याचें स्मरण झालें तर शिटकळ येते. '

शिटा—पु. शिंतोडा. शिट पहा.

शिटी—वि. छिटी; चिटाचें केलेलें. [छीट]

शिटी—स्त्री. शीळ. (क्रि० वाजविणें; वाजणें). [ध्व]

शिंटी—स्त्री. एक लहान झाड.

शिटुक—वि. (कों.) चलाख; हुषार; चपळ; टिकाऊ.

शिट्टा-ट्टो—स्त्रीपु. (गो.) एक प्रकारचें भात.

शिडकणें—क्रि. (प्रा.) सडकणें; काठीनें, छडीनें बडवणें; मारणें.

शिडकणें-कावणें—उक्रि. शिडका टाकणें; शिंपडणें; शिंपणें. [हिं छिडकना] **शिडकाव-वा**–पु. शिडका; छिडकाव; शिंपडणें. [हिं. छिडकाव]

शिडका—वि. (तंजा.) चिडणारा; चिडका. [द्रा. सिडुकु]

शिडंब—पु. एक जंगली झाड.

शिडशिड, शिडशीड, शिडशिडी—क्रिवि. १ हाहां म्हणतां येऊन, पडून (पावसानें). २ तिरसटपणानें; चिडीनें; (बोलणें, वागणें, हडहड, छिटफिट, हिडिसफिडिस करणें). [ध्व.] **शिडशिडणें**–अक्रि. शिडशिड पडणें (पावसानें); जोराची पण अल्पकालीन पावसाची सर येणें. **शिडशिडी**–स्त्री. (कों.) पावसाची जोराची अल्पकालीन सर; थोडासाच पण जोरानें पडून जाणारा पाऊस.

शिडशिडा—वि. (व.) १ थकलेला. २ खिळखिळा.

शिडशिडीत—वि. (राजा) (प्र.) सडसडीत. १ सडपातळ; कृश; पातळ शरीराचा. २ फडफडीत; मोकळा व रुक्ष (शिजलेला भात वगैरे). [सडा, सडसडीत]

शिडा, शिडासांटा—वि. (राजा.) सडा. सडासांटा पहा.

शिडाईत—न. कलम; पैवंद. **शिडाइती**–वि. कलम लावून झालेलें; कलम केलेलें (आंबा, इ० झाड).

शिडी-ढी—स्त्री. १ दोन लांब उभ्या लाकडांना आडवीं लहान लांकडें जोडून उंच चढण्यासाठीं करतात तें साधन; पायऱ्या; निसण. २ सोपान; जिना; दादर. [सं. श्रेढी; देप्रा. सिड्ढी; हिं. सीढी]

शिणक, शिणीक—स्त्री. चमक; ठणका; तिडीक; कळ; वेदना. (हात, पाय इ० अवयवांतून निघणारी). (क्रि० उठणें; निघणें). **शिणकणें**–क्रि. ठणकणें; ठणका लागणें; शिणकांनीं व्यथित होणें.

शिणगार—पु (प्र.) शृंगार पहा. [सं. शृंगार] **शिणगारणें-शिणारणें** क्रि. (प्र.) शृंगारणें पहा. ' शिणगारांत अठरा मण तूप जळालं. ' (व) नेसण्या सवरण्यांत, दागिने घालण्यांत बराच वेळ लागला म्हणजे सुनेला सासू म्हणते.

शिणणें—अक्रि. १ थकवा, शीण येणें; दमणें; थकणें, भागणें; श्रमणें. २ त्रास घेणें; श्रम करणें; कष्टणें. ' सर्वस्वें शिणोनि एथें । अर्जवावीं संपत्तिजातें । ' –ज्ञा ३.२०७. ' म्हणे परम कृपाळू रघुवीर । मजकारणें शिणतो । '. **शिणत शिणत**–क्रिवि. अतिशय काकुळतीनें. ' शिणत शिणत पोटीं पाहिली वाट तूझी । ' –राकरुणा. **शिणवटा, शिणोटा**–पु. अतिशय शीण; थकवा; ग्लानि; भागवटा; अशक्तपणा. (क्रि० येणें, होणें). **शिणारणें**–अक्रि. शीण येणें. [शीण]

शिणशिणणें—शिवशिवणें पहा.

शिणा—पु. छातीच्या हाडांना लपेटलेला मांसल भाग; छातीचें मांस.

शिणारणें—उक्रि. १ शीण, चीण, चीर भरणें; फटी बुजविणें. २ चिणणें; दरांत दगड वगैरे घालून पक्कें करणें; खांब वगैरे जमीनींत चिपा घालून घट्ट बसविणें. [चीण, शीण]

शिंतडणें—सक्रि (कों.) शिंपडणें; सडा टाकणें. –अक्रि. थेंब थेंब पडणें; उगीच भुरभुरणें (पावसानें). **शिंतडा**–पु. शिंतोडा; सडा; उडालेला थेंब. (क्रि० उडणें; उडवणें; मारणें).

शितम—पु. खाडींतील एक जातीचा लहान पांढरा मासा.

शितर-री—नस्त्री. लहान झोपडें; छायेकरितां केलेलें छप्पर.

शितरणें—उक्रि. चितरणें पहा.

शितरणें, शिंतरणें—क्रि. छिनाविणें; फसवून नागविणें. 'पाश तस्कर वाटपाडा । वेष दाऊनि शितरी मूढा ।' –मुआदि २५.११. **शिंतरू, शिंतरू**–वि. फसविणारा. 'शठ शुंभ कातरु । लंड तर्मुंड सितरू ।' –दा २.३.२९.

शितरपाड—वि. चपळ; चलाख; तीक्ष्ण; हुषार; तडफदार. **शितरपाडी**—स्त्री. चपळता; चलाखपणा; हुषारी.

शितें—न. (खा.) बांबूचा तट्टया; चटई (गार्डीतील सामान बाहेर पडूं नये म्हणून बाजूंना लावतात).

शितळ, शीतळ—वि. शीतळ पहा. १ थंड; गार. २ सौम्य; सुलभ; सोपा; खर नव्हे असा (उतार वगैरे) [सं. शीतल] **०चंद**–पु. मद्दड; मट्ठ; रेंगाळणारा; सुस्त मनुष्य. **०शिमगा**–पु. १ शिमगी पौर्णिमेच्या पुढील दिवस; धुळवडीचा दिवस; होळी थंड करण्याचा दिवस. २ शिमग्यामध्यें (वसंतपंचमीस) गांठ्या, बसंती रंगाचीं आंगडींटोपडीं मुलांस द्यावयाचा सण. **शितळाई**-स्त्री. १ थंडपणा; थंडावा. २ शितळता; थंडाई. [सं. शीतळ]

शितळचिनी—स्त्री. एक झाड; कंकोळ.

शितळपाटी—स्त्री. शीतला झाडापासून केलेली मऊ, गार चटई.

शितळादेवी—स्त्री. शीतलादेवी. देवी रोगाची अधिष्ठात्री देवता. [सं. शीतलादेवी]

शितळान—स्त्री. (ना.) सूर्य उतरूं लागणें; ऊन कमी होणें; शीतळाई. [सं. शीतळ]

शिता—पु. (कों.) स्त्रियांचा केसांचा भांग; भांगांतील उभी रेघ. [सं. सीता=नांगराचे तास.]

शितागौरी-चंवरी—स्त्री. एक झाड. [सं. सीता+गौरी]

शिताप, शितापी, शिताफ, फी—शिताब, शिताबी, सिताफी पहा.

शिताफळ-ळी— स्त्री. एक फळ झाड. –न. त्याचें फळ. [सं. शीतफल]

शिताब—वि. १ चपळ; चलाख; तडफदार. २ उत्साही; हौशी; कळकळीचा. [फा. शिताब्]

शिताब-बी—स्त्री. १ चलाखी; चपळाई; तडफ; हुशारी; कुशाग्रता. सिताफी पहा.

शितारणें—क्रि. म. शितरणें, चितरणें पहा.

शितिकंठ—पु. १ शंकर; शिव. २ मोर. [सं.]

शिती—स्त्री. एकविटी भिंत; पडभिंत; पडदी.

शितें—न. १ (विणकाम) शीत पहा. २ बायकांच्या केसांतील भांग; रेषा. शिता पहा.

शितेचा कानवला—पु. एका जंगली झाडाचें पान. याचा आकार कानवल्याप्रमाणें असतो. [सीता+कानवला.]

शितैन, शित्तैन—वि. साठ; ६० संख्या. [अर. सित्तीन्]

शितोडा—पु. १ पडलेला, उडालेला थेंब; पाण्याचा कण. (क्रि. उडणें; उडवणें; मारणें) २ सिंचन; प्रोक्षण; शिडका. ३ सेक; सडा. [सं. सिच् हिं. छीटा] **०टाकणें-उडविणें**-(ल.) थोडासा कलंक लावणें; थोडासा दोष देणें; जातांजातां एखाद्याविषयीं लहानसें कुत्सित विधान करणें. **शितोडणें**-सक्रि. शिंपणें; शिंपडणें; सिंचन करणें. –अक्रि. थेंबथेंब पडणें (पावसानें).

शितोडा—पु. (कों) कळकाची फांदी; बांबूस बाजूला फुटलेलें शिरें, छडी.

शित्ता—वि. सहा; ६ संख्या. [अर. सित्त.]

शिथकण, शिथवड—पु. (कों.) शीतकण पहा.

शिथड—स्त्री. (विणकाम) हातमागाचा एक भाग; शीत; ओवीच्या बाहेर साधेच्या शेवटीं असणारीं आडवीं दोन लांकडें.

शिथिल—वि. १ सैल; ढिलें; मजबूत, बळकट नसलेलें. २ नेभळट; मंद; मट्ठ; निरुत्साही; निर्बल. [सं.] **०गात्र**–वि. निःशक्त व निर्बल अवयवांचा. कमजोर अवयव असलेला. (सामां.) दुर्बल. [सं.]

शिंद—स्त्री. खजूरीच्या जातीचें एक जंगली झाड. [हिं. सेंध.]

शिंद-ध—स्त्री. १ कुडाची भिंत; बांबूच्या चिपा, कारवी वगैरेची गिलावा केलेली भिंत. (क्रि० भरणें; घालणें). २ असल्या प्रकारची भिंत रचण्याचें सामान. [हिं. सं. संधू]

शिंदड, शिंदीड—पु. १ गांडूळ; काडू. 'श्रावणमासा शिंदड मातले शेषाघरीं नेऊं लग्न ।' –पला ३.

शिंदणें—क्रि. (कु. कों.) शेंदणें; विहिरींतून पाणी वर काढणें. (यांत्रिक साहाय्यानें किंवा नुसत्या हातांनीं). [हिं. सेंदना.].

शिंदपास देणें—क्रि. माडी काढण्यास नारळाचें झाड देणें. 'माड शिंदपास दिला.' –कृषि ७५८.

शिंदलाडू, शिंदलाडू—पुअव. (व.) कणकेंत गूळ घालून त्यांचे उकडून केलेले लाडू; सिद्धलाडू पहा.

शिंदळ—वि. जारकर्मी; बाहेरख्याली; बदफैली; छिनाल; दुराचरणी; व्यभिचारी (स्त्री, पुरुष). [देशी प्रा. छिण्णो, छिण्णाल; हिं. छिनाल; सं. छिद्-छिन्न; क्षुण्ण?] **०की**–स्त्री. (विशेषतः स्त्रियांना हा शब्द लावतात) जारकर्म; व्यभिचार; दुराचरण; छिनाली; बदफैली. **०चार-चाळ-टेव**–पुअव. बदफैली कर्में; छिनाल नखरे; नटणें, मुरडणें, चट्टीपट्टी करणें इ० शिंदळकीच्या चेष्टा; दुराचार. **०तीट**–स्त्रीपु. शिंदळ माणसानें कपाळावर लाव-

लेली तीट; विशिष्ट प्रकारची नखरेबाज तीट; टिळा. **०नखरा**-पु. शिंदळचार; व्यभिचारिणीचें नटणें, मुरडणें व हावभाव, बोलणें, चालणें इ० **०वडा-वाडा**-पु. जारकर्मी व व्यभिचारी लोकांच्या बस्तीची जागा, घर, गांव; (सामा.) व्यभिचार-बाहुल्याचें ठिकाण. **०सोव**-पुअव. (राजा.) व्यभिचारिणी-प्रमाणें ढोंगी वर्तन, लाडिकपणा, चेष्टा इ०. सोव पहा.

शिंदळवान-नी—स्त्री. एक झाड.

शिंदा—पु. एक खेळणें.

शिंदा—पु. अनौरस संततीची एक जात किंवा त्यांतील व्यक्ति. २ लेकवळा; दासीपुत्र. **०पोरगा**-पु. कट्ट; दासीपुत्र; दास्यत्व करणाऱ्या स्त्रीपासुन झालेला मुलगा. [शिंदळ]

शिंदाड—न. कवळ; भातशेतीची जमीन भाजण्यासाठीं लागणाऱ्या तृणकाष्ठादिकांचा ढीग. [शिंद+फाड]

शिंदी, शिंद्री—पु. अबिसीनियांतील रहिवासी; हबशी; हबसाण देशचा; सिद्धी.

शिंदी-धी—पुस्त्री. १ जंगली खजुरीचें झाड. २ या झाडाचा मादक रस; शिंदीपासुन तयार केलेली दारू. 'खंडयायान महार शिंदी पिऊन पडला।' -ऐपो ६८. **शिंदोली**-स्त्री. (ना.) शिंदीचें फळ. **शिंदो**-पु. (कों.) नारळ पाडणारा.

शिंदोड, शिंदोड—पु. गांडूळ; शिंदड पहा. **शिंदोडा सारखें फुगणें**-(व.) व्यर्थ रुसुन बसणें.

शिंदेशाई-ही—वि. १ कापड, दागिने इत्यादिसंबंधीं विशिष्ट तऱ्हा, घडण असणारें. 'शिंदेशाई पागोटें, तोरड्या, तोडा इ०' २ शिंद्यांचें राज्य, दरबार इ०संबंधीं; शिंद्यांच्या अमलांतील. -स्त्री. शिंद्यांचें राज्य, अंमल, सत्ता. [शिंदे+शाई]

शिंदोरी, शिंधोरी—स्त्री. १ रान, शेत मार्ग इ० ठिकाणीं खाण्यासाठीं गाठोड्यांत बांधून घेतलेलें अन्न; प्रवासांत बरोबर घेतलेले खाद्यपदार्थ; 'कथिली विदुरें सन्मति जाणों दिधली तयां शिंदोरी ती।' -मोसभा ७.३८. २ चातुर्मासांत बायकांनीं ब्राह्मणांना दान दिलेला शिधा, अन्नपाणी. ३ पुण्य संपादण्यासाठीं परक्या मुलांना दिलेलें अन्नपाणी. ४ गुराखी, मजूर शेतांत किंवा कामावर बांधून नेतात तें अन्न. 'काखेसि घेवोनि शिंदोरी। गोपाळा सहित श्रीहरि।' -कथा ४.५.३. [सं. सिद्ध+दोरी] **म्हं०** शिकविलेली बुद्धि आणि बांधलेली शिंधोरी (सर्वदा पुरत नाहीं).

शिंद्धाई—स्त्री. सिद्धाई पहा.

शिंधा—पु. १ स्वयंपाकासाठीं लागणारें सामान (तांदूळ, डाळ, पीठ, तूप, इ०); पाकसाहित्य. २ (सामा.) न शिजविलेले तांदूळ, धान्य इ० ३ एक दिवसाच्या भोजनास लागणारें सामान. [सं. सिद्ध] **०पाणी-सामान-सामग्री**-न स्त्री. (व्यापकार्थी) अन्न तयार करण्याला आवश्यक असें सर्व सामान (धान्य, लाकडें, भांडींकुंडीं इ०).

शिंधी—स्त्री. शिंदी पहा.

शिंधोट—वि. (प्रां.) १ सरळ व लांब जाणार (नदी, पर्वताची रांग इ०). २ (ल.) प्रांजळ; प्रामाणिक. 'गुणी राजाचे शब्द शिंधोटे।' -ऐपो २२७. [हि. सीधा]

शिनक, शिनीक—स्त्री. चमक; कळ. शिणक पहा. (क्रि० निघणें; येणें; होणें; भरणें; मारणें).

शिनगार, शिनगारणें—पु.न. १ शिणगार, शृंगार पहा. २ (व.) एकदाणी; गळसरी. [सं. शृंगार]

शिनसाल-ळ—स्त्री. जुनी साल. 'भवईचीं पडलें। वोमथती शिनसाळें।' -ज्ञा १३.५६०. [सं. शीर्ण+छाल]

शिनळ, शिनळ, शिनळकी, शिनळकी, शिनळचार, शिनळचाळे, शिनळटेव, शिनळतीट, शिनळ नखरा, शिनळवडा-वाडा, शिनळवान, शिनळसोव, शिंदळ इ० पहा. 'हो का शहाणी शिनळी नारी।' -एभा १३.१३३; 'त्याचा तो नित्य शिनळपणा पवित्र मानून रंगभूमीवर तरुण मुलांचे व मुलींचे पुढें आम्ही त्याचे प्रयोग करून दाखवावे?' -आगर ३.१७.

शिना—वि. निराळा, 'आत्मा देहाहून शिना।' -ज्ञा [सं. शीर्ण]

शिनाजोरी—स्त्री. धैर्य; सामर्थ्य; धाडस; ताकत. [फा. सीना-झोरी.]

शिनारणें—अक्रि. (व.) शीण येणें; शिणारणें.

शिनारणें—उक्रि. (व.) शिणारणें पहा. (खांब इ०) ठोकून पक्का करणें.

शिनीसाफ—वि. (व) निर्दोष; निष्कलंक.

शिनुटलें—न. शिपतर. -शर.

शिनें—अ. शाने पहा.

शिनेल—न. (कु.) चिरा.

शिंप-पी—स्त्री. १ जलचर प्राण्याच्या अस्थीचें सुपलीच्या आकृतीचें आवरण; यांचीं दोन पुडें असतात; त्यांपैकीं प्रत्येक शुक्ति २ पोकळ काठी, नळी इ० चा तासतांनां होणारा वरील सारखा आकार (लेखणी, अलगूज, पावा वगैरेच्या टोंकास करतात त्या सारखा). (क्रि० मारणें; तोडणें; घेणें; पाडणें.) ३ शिंपेच्या आकाराची छातीची खळगी. इ० [सं. शुक्ति; प्रा. सिप्पि; हिं. सीप] **०मारणें-उतरणें**-तिरकस काप छेद घेणें. **शिंपेला पोट लागेस्तूर खाणारा**-वि. अत्यंत अधाशी इसम. **शिंपला, शिंपला, शिंपुला**-पु. १ मोठी शिंप; ह्यांच्यामध्यें मोत्यें उत्पन्न होतात; पाठीवर रेषा असणारी शिंप

२ शिंपेच्या आकाराची लाकडांत घेतलेली खांच (क्रि० (नर) पाडणें; घेणें; मारणें) ३ उगाळलेलें गंध ठेवण्याकरितां शिंपेच्या आकाराची धातूची तबकडी; पात्र. -वि. उतरता; उतरट; ढाळता. **शिपली, शिंपली**-स्त्री. १ लहान शिंप. २ सुपली. **शिंपा**-पु. मोठी शिंप; कालव. **शिपोटी**-स्त्री. (व.) पोटाचा वरचा शिंपेसारखा भाग; शिंपा.

शिपका, शिबका—पु. १ हपका; तडाखा; हबका; पाण्याचा पातळ पदार्थाचा जोरानें मारा. (क्रि० मारणें, टाकणें देणें) २ शिंपणी; सडा (बागेंतील झाडांवर, धुराळी रस्त्यावर पाण्याचा). [सं. सिच्]

शिपट, शिंपट, शिपटी, शिंपटी, शिपटें, शिंपटें, शिपूट-शिंपूट—न. (कों.) १ पोफळांचा तुरा; लोंगर. २ पोफळांचा घड.

शिपटी—स्त्री. (कों.) फोकाटी; शिरठी; फोक; छडी; बारीक काठी. 'हातीं घेवोनिया शिपटी। माता लागली पाठोपाठीं।' -कथा ४.३१००. 'मारू जातां शिपटी। भेणें पळतो जगजेठी।' -ह ७.२४६. **शिपटणें**-क्रि. छडीनें, काठीनें, फोकाटीनें मारणें.

शिंपडणें—क्रि. १ सिंचणें; शिंपणें; प्रोक्षणें; सेक, सिंचन करणें. **शिंपडणी**-स्त्री. शिंपण; सिंचन; सेक; सडा.

शिंपण, शिंपणी—स्त्री. सेक; सिंचन; प्रोक्षण; सडा; शिंपणें. (क्रि० करणें; टाकणें; शिंपणें). **शिंपणें, शिपणें**-क्रि. १ सिंचणें; वर उडविणें; सडा टाकणें; प्रोक्षण करणें; सिंचन करून ओलें करणें; अभिषिक्त करणें. 'इथें वड शिंपीजे।' -वसा ६०. **शि(-शिं)पणें**-न. १ रंगपंचमीस किंवा शिमग्याच्या समाप्तीस अंगावर रंग उडवितात तें; रंग उडविण्याचा खेळ. २ रंगपंचमी. 'शिंपण्या दिवशीं हल्ला नेमिली कुंप झाले तयार।'-ऐपो ३५२ ३ (कों.) दांडयांतून पाणी वाहून नेऊन तें झाडांस देण्याची रीत. **शिंपणपंचमी-शिंपणेंपंचमी**-स्त्री. रंगपंचमी. **शिपणीचा ऊस**-पु. पाटाच्या पाण्यावर होणारा ऊंस. याच्या उलट-पुरणीचा ऊस.

शिपतर, शिंपतर—न. कळकाच्या चिपटांची केलेली पसरट परडी; उथळ टोपली (लग्नांत साहित्य ठेवण्यासाठीं, किंवा गुऱ्हाळघरांत रस गाळण्यासाठीं वापरतात).

शिपर—स्त्री. ढाल. [फा. सिपर्]

शिपा—पु. मोठ्या माशांचें तेल.

शिंपा—पु. नारळाच्या पोगींतून बाहेर येणारा अवयव; कणीस; शिंपट.

शिपाई—पु. १ सैन्यांतील सैनिक; योद्धा. २ पट्टेवाला; चपराशी; हरकारा; जासुद; चाकर. ३ (ल.) वाद, तंटा, अडचणीचे प्रसंग इ० वेळीं धीटपणें पुढें होऊन तोंड देणारा माणूस [फा. सिपाही.] **०की**-स्त्री. शिपाईगिरी, शिपायाचें काम **०गडी**-पु. १ शूर शिपाई; मर्द. २ (सामा.) शिपाई **०गिरी**-स्त्री. १ शिपाइकी; शिपायाचा धंदा. 'केवळ शिपाईगिरीच करीत नाहीं, हिक्मतीनेंच लढाई करूं'-ऐटि २.२७ २ (ल.) क्षात्रधर्म; शौर्य; मर्दुमकी. 'शिपाईगिरीची व मन्सुबेबाजपणाची शर्त करून यशास पात्र व्हावें ऐसेच आहां.' -पया ३३३१. -वि शिपायासंबंधी; लष्करी; सैनिकासंबंधी; [फा. सिपाहूगरी] **०खोर**-पु. एक मुलींचा खेळ. -मखेपु ३०९. **०प्यादा-राणा**-पु. (व्यापकार्थी सिपाई; चपराशी;) सैनिक; जासुद. **०बाणा**-पु. १ लष्करी धंदा, व्यवसाय; लष्करी पेषा; २ लष्करी गणवेष, पोषाख **०शाई**-स्त्री. लढवय्यांचें मंडळ; शूर लोक. 'अपाजि बळवंतराव शिपाईशाईमध्यें एक दाणा।'-ऐपो ४३९. **शिपाय**-यी-शिपाई पहा. **शिपायडा-डें**-पु. न. शिपायास निंदेनें म्हणतात. **शिपुरडा**-पु. शिपायडा पहा.

शिपाई—पु. पालखी, डोली, इ०ची दांडी; गाडी, दिवटी इ०कांस आधारभूत कैचीसारखी उभी करण्याची लांकडी घोडी; (फुलीप्रमाणें दोन लांकडें एकत्र बांधून करतात).

शिपाई—पु. एक पक्षी.

शिपार, शिफार—स्त्री. १ गलबतास खालून पाण्याचा उपद्रव होऊं नये म्हणून केलेला डांबर, रोगण इत्यादीचा लेप. २ सदर लुकण, लेप लावावयाची क्रिया. (क्रि० करणें).

शिपारशी, शिपारस—प्र. शिफारशी, शिफारस पहा.

शिपिला—वि. पोटाखालीं पुढीलभागीं तंगापाशीं भोंवरा असलेला. (घोडा).

शिपिस्ता—पु. बाळआंबा पहा. -मुंव्या १६८.

शिपी, शिंपी—स्त्री. एक प्रकारचें गवत. [सं. शिल्पिका; प्रा. दे. शिप्प]

शिंपी—पु. एक जातीचा मासा, यास तिसऱ्या असेंही म्हणतात. -मसाप ३.३.

शिंपी—पु. एक पक्षी. हा कुंपणाच्या कडेनें हिंडून किडे खातो.

शिंपी—स्त्री. शिंप पहा.

शिंपी—पु. शिवणकाम करणारी एक जात आणि तींतील व्यक्ति, दर्जी. [सं. षिव्=शिवणें. तुल० सं. शिल्पिक; प्रा. शिप्पिअ. दे. प्रा. सिप्पी=सुई] **शिंपुरडा**-पु. शिंप्यास निंदेनें म्हणतात.

शिप्पा—पु. (ना.) संधान. [हिं. सिप्पा]

शिफटें—न. (कु.) सुपारीचा घड; शिंपट पहा.

शिफार—शिपार पहा.

शिफारस—स्त्री. १ (दुसऱ्याजवळ केलेली) तारीफ; प्रशंसा; गुणगौरव. 'तेधवां पादशाहापाशीं बहुत शिफारस चंद्रराव्याची जाहली कीं बडे मर्द आदमी आहेत आणि जोरावर.' –ऐस्फुले २३. २ वशिला; तारीफपत्र; हिमाईत. ३ प्रशंसा करण्यालायक कृत्य (उपरोधिक अर्थानें उपयोग). 'त्वां काय ह्यांत मोठी शिफारस केलीस'. [फा. सिफारिश्] **०पत्र**–न. वशिला; काम होण्यासाठीं आणिलेली ओळख; भलावणपत्र. 'थोरामोठ्याची चुगली म्हणजे केव्हांही सही होणारें शिफारसपत्र आहे।'. –रणदुंदुभी ९४. **शिफारशी**–वि. आश्रय दिलेलें; वशिल्याचें; हात दिलेलें; उचलून धरलेलें; हिमाईती. **०तट्टू**–पु. स्वतःच्या गुणावरून नव्हे तर केवळ वशिल्यामुळें पुढें आलेला मनुष्य; वशिल्याचें तट्टू.

शिफ्ला—वि. नीच; हलकट. [अर. सिफ्ला]

शिबक्का—पु. शिपक्का पहा.

शिबंदी—स्त्री. कागदाचें एक पान (विशेषतः दौलताबादी); हाफशीट.

शिबंदी—स्त्री. अनियमित शिपाई; वसुलीच्या कामासाठीं; किल्ले, शहरें, परगणे इत्यादीच्या रक्षणाकरितां व बंदोबस्ताकरितां ठेवलेली फौज; हंगामी, विशिष्ट कामासाठीं ठेवलेली फौज. 'ठाणेयांत शिबंदी आहेत'. [फा.]

शिबरा—शिमरा पहा.

शिबरी—वि. (कु.) स्त्रीलंपट; कामी पुरुष. **०करणें**–(बैलानें) गाईचें मलमूत्र हुंगून विकारयुक्त होणें; तोंड वर करणें.

शिबला—पु. (चांभारी) खापराचें आडवें लांबट व मोठें कुंड.

शिबाड—स्त्रीन. गलबतांतील एक प्रकार; मोठा मचवा; सुवाल्यापेक्षां मोठी होडी.

शिबाळी-ळें—स्त्रीन. १ उकळत्या रसावरील मळी काढण्यासाठीं कळकाच्या दांडीला लावलेला शिपतरवजा झारा; गुऱ्हाळांत कढत रस गाळण्याची गाळणी. २ (कु.) आंबे वगैरे फळें झाडावरून उतरण्यासाठीं टोंकाला जाळीची टोपली बांधलेली लांब काठी; झेला. [शिबें]

शिबिका—स्त्री. यानविशेष; पालखी. [सं.]

शिबिर—न. १ रणांगणावर असतांना लष्करी तळावरील राजा, सेनापति इ०कांचे निरनिराळे गोट, प्रत्येकी. २ सैन्याची छावणी; तळ. 'मग म्लेंच्छांचे वसौटे। दांगाणे हन कैकटे। का शिबिरें चोहटे। नगरींचे ते।' –ज्ञा १७.२९४. ३ (सामा.) तंबू. ४ 'कँप' याचा प्रतिशब्द म्हणून योजतात. [सं.]

शिंबी—स्त्री. १ एक वनस्पति. २ शेंग. [सं. शिंबा, शिंबी]

शिंबुटलें—न. (कों.) टोपलें; परडें; शिपतर पहा. शिबें]

शिंबें—न. जाळें; घोसाळें किंवा दोडका निबर झाला असतां, त्यांत होणारें तंतुमय जाळें.

शिंबें—न. १ एक सौम्य कुष्ठरोग; त्वचारोग. २ याचे डाग, ठिपके इ०.

शिंबें—न. १ मध्यें खोलगट असणारें वेळणी, तसराळें इ० भांडें. २ चाळणी; रोवळी. ३ शिबाळें; शिबाळी. ४ (हेट.) भाताची पेज गाळण्याचा बांबूचा झारा.

शिबेमांड—स्त्री. (कु.) भात वेळतेवेळीं मडक्याच्या तोंडावर धरावयाची लांकडी फळी.

शिबोळी, शिबोळें—शिबाळी, शिबाळें पहा.

शिबोळी—स्त्री. (कु.) लहान पांटी; शिपतर.

शिमटणें—उक्रि. (प्र.) चिमटणें पहा.

शिमगा—पु १ होळीचा सण; होळीचे दिवस. २ फाल्गुन महिना. ३ (ल.) अश्लील, अचकटविचकट भाषण. [सं. शृंगार] **म्ह०** शिमगा जाई आणि कवित्व राही–शिमग्याचे दिवसांत अचकटविचकट केलेलीं कवनें तदनंतर सुद्धां आठवणींत रहातात. **शिमग्याचा मंत्र**–पु. बोंब; शंख; पांचजन्य. (क्रि० जपणें; म्हणणें; वाचणें). **आहे (असेल) ते दिवस दिवाळी, नाहीं (नसेल) ते दिवस शिमगा**–मिळेल तेव्हां उधळपट्टीनें खर्च करणें व न मिळेल तेव्हां उपास करणें. 'जो मनुष्य आहे ते दिवस दिवाळी नाहीं ते दिवस शिमगा या नात्यानें वागणारा आहे त्याच्या घरादारावरून नांगर फिरून त्याच्या हातांत लवकरच नारळाची आई येण्याचा संभव आहे।' –निचं. **शिमगा करणें**–१ बोंबलणें; बोंब मारणें. २ (ल.) निंदा करणें; एखाद्याच्या नांवानें खडे फोडणें; शिव्या देणें. **०सण**–पु १ वधुपक्षानें वरास बोलावून शिमग्याचा सण साजरा करणें. २ या सणांत विशेषतः रंग पंचमीस दिलेला अहेर, बहुमान.

शिमटी—स्त्री. १ शिपटी; फोक; झाडाची फांदी; छडी २ एक लहान झाड.

शिमरा—वि. (कों.) १ बसकट; विशोभित (नाक). २ अशा नाकाचा; नकटा (मनुष्य). 'नागवी माथां मोत्याची जाळी। शिमरी सुपाणी दाणा ल्याली।' –एभा ३.३९३. (गो.) शिंमरो; शिमुरा.

शिमा—स्त्री. मर्यादा; (प्र.) सीमा पहा. [सं. सीमा] **शिमधडो**–पु. (कु.) सीमेची हद्द. **शिमधडथा, शिमशेजारी**–पु. (राजा.) शींवशेजारी; शिवेवरचा शेजारी.

शिमाल—पु. उत्तर. [अर.]

शिया—पु. एक मुसलमानी धर्मपंथ याच्या उलट सुनी.

शियारी—स्त्री. शहारे; कांपरें. ' परी येतुलियाही वेगळा । जो केवळ आनंदैक कळा । तया अंतरात्मयाही निश्चळा । शियारी आली । '–ज्ञा ११.३६९. [सं.सीत्कार किंवा सं. शिशिर; गो. शीं. थंडी+आरी ?]

शियाळें—न. (गो) कोंवळा नारळ; शहाळें.

शिर—न. १ डोकें; माथा; मस्तक; शीर्ष. ' तीन शिरें, सहा हात । तया माझें दंडवत । ' २ झाडाचा माथा, शेंडा; टोंक. ३ सैन्याची आघाडी; बिनी. ४ डोई; व्यक्ति; घोडयांची संख्या मोजतांना वापरतात. उदा० घोडा शिर चार=चार घोडे [सं. शिरस् ; फा. सर] **म्ह०** १ शिरसलामत तो पगडया पंचवीस–जोंपर्यंत शरीरांत प्राण आहे, तोंपर्यंत बाह्य शृंगार वाटेल तसा करता येईल (ल.) मूळ कायम असलें म्हणजे बाकीच्या गोष्टी मिळतात. २ शिर सुरी तुझ्या हातीं=तुझ्या हातीं माझा प्राण दिला आहे मारणें तारणें सर्व तुझ्या इच्छेवर. **०हातावर घेणें**–१ धाडसाचें काम करावयास सिद्ध असणें; अत्यंत शूर असणें. २ जिवावर उदार होऊन एखादें कार्य करण्यास उद्युक्त होणें; जिवाकडे न पहाणें. **शिरावर जागें राहणें, शिरावर–शिरीं असणें**–एखाद्याच्या संरक्षणासाठीं, कल्याणासाठीं तत्पर असणें; पाठ राखणें. ' श्रीरामा तूं स्वामी अससी माझ्या शिरावरी जागा । '–मो केकाआर्या. ' शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज । ' –रामदास. **शिरावर घेणें**–(एखादें कार्य) पत्करणें. पेशवाईच्या रक्षणाची जोखीम आम्हीं आमच्या शिरावर घेतली आहे. –अस्तंभा १७. **शिरीं भार वहाणें**–जबाबदारी पतकरणें; हमी घेणें–पतकर घेणें; सोसणें. ' शिरीं भार वाहेन बोले पुराणीं । ' –राम ३४. **शिर:कंप–कंपन**–पुन. डोकें लटलट हालणें; थरकापणें. **०कमल–ळ**–न. (काव्य) (कमलासारखें शिर). शिर; डोकें. [शिर+कमल] **०गीर**–स्त्री. कोंबडयाच्या डोक्यावरील तुरा. **०गोम**–वि. कपाळावर गोमेच्या आकाराचे, केस असलेला (घोडा). –स्त्री. घोडयाचें एक अशुभ चिन्ह. [शिर+गोम] **०च्छेद**–पु. डोकें उडविणें; वध. [सं. शिरच्छेद] **०टोप**–पु. १ कानटोपी; माकड टोपी; घरांत घालण्याची टोपी; टकोचें; टोपडें. २ शिरस्त्राण. **०ताज, शिर्ताज**–पु. डोक्यावरचा एक दागिना; शिरोलंकार; मुकुट. ' शिरीं शिरताज रे शिरीं शिरताज गातो भरून । '–ऐपो २३७. [फा. शिर्ताज्] **०दीदे. शिर्दीदे**–क्रिवि. डोक्यावर; मस्तकीं; डोकीवर. [फा.सर-इ-दीदा] **०पाव, शिर्पाव, शिरोपाव**–पु. १राजा किंवा सरदार यांनीं कृपावंत होऊन दिलेलें पागोटें, वस्त्रें इ० बहुमानाचा पोशाख. ' मानपान, टिळा विडा व सिरपाव '–वाडबाबा ३ ४.१५. ' जवाहीर, सिरोपाव वगैरे जिन्साना पाठविला । '–जोरा ८. २ जमाबंदीचे कतबे होण्याच्या वेळचा देशपांडे इ० चा हक्क. [फा. सरोफा] **शिरपीडा**–स्त्री. डोकेंदुखी. [सं.] **०पेच, शिर्पेच**–पु पागोटयांत खोंबण्याचा जडावाचा मोत्यांचा तुरा; एक अलंकार. [फा. सर्पेच] **०फोडया**–वि. भिक्षा मिळण्यासाठीं डोक्यावर हाणून घेणारा डोकें फोडून घेणारा (भिकारी); भिकाऱ्यांची एक जात व तींतील व्यक्ति, **०बंद, शिर्बन्द, शिर्बस्ता**–पु. पागोटें; पगडी. [फा. सर्बन्द्] **०भारी**–स्त्री. डोक्यावर वाहून न्यावयाजोगें ओझें. [शिर+भार] **शिरयाळें, शिरियाळें**–न. डोक्याचा आधार; डोक्याची बैठक. ' उभऊनि करतळें । पडिघाये कपोळें । पायाचे शिरियाळे । मांडूं लागे । ' –ज्ञा १४.१८५. [शिरस्+आलय; म. शिर+आळें] **०वपन**–न. हजामत; विशेषत: विधवा बायकांचे केस काढणें; विकेशा करणें. ' कैकयीचें शिरवपन करून । छत्र धरोत कोण्हीतरीं । ' **शिरसा**–क्रिवि. १ डोक्यानें. २ शिर वाकवून; नम्रपणानें; आदरयुक्त; आज्ञाबरहुकुम. ' तुम्ही आमचे वडील, त्यापेक्षां तुम्ही सांगाल तें आम्हास शिरसा मान्य आहे. ' **शिरसावंद्य–धार्य–मान्य**–वि. अतिशय पूज्य; आदरणीय; माननीय. [सं] **०साष्टांग नमस्कार–दंडवत**–पु. (डोक्यासहित आठ गात्रें जमिनीवर टेकून) अत्यंत नम्रतापूर्वक प्रणाम (वडील माणसें, थोर किंवा श्रेष्ठ व्यक्ति यांस लिहावयाचा पत्रांतील मायना).[शिरस्+अष्ट+अंग+नमस्कार, दंडवत] **०स्त्राण**–न. डोक्याचें रक्षण, आच्छादन करणारें टोपी,पागोटें इ०. टोप;जिरेटोप. [सं.] **०स्नात**–वि. डोक्यावरून स्नान केलेला, **०स्नान**–न. डोक्यावरून केलेली आंघोळ; संबंध स्नान. **शिरातोरा–असणें**–एखाद्याच्या वरचढ असणें;–चा अधिकारी असणें. ' गणितांत तो माझा शिरातोरा आहे. ' **०लावणें–दाखविणें–मिरविणें**–शेखी मिरविणें; वरचढपणा गाजविणें. ' खंडयाला पाटिलकी मिळाल्यापासुन तो भारी शिरातोरा दाखवूं लागला आहे. ' **शिरी**–स्त्री. डोक्यावरील नक्षीचें, शोभिवंत कापड (हत्ती, घोडा इत्यादींच्या). **शिरीं**–क्रिवि. डोक्यावर; ऐनवेळीं. उदा० लग्नाच्या शिरीं, प्रसंगाच्या शिरीं, कामाच्या शिरीं. **०असणें**–अग्रभागीं असणें; संभाळणारा होणें. ' शिरीं असतां पंडरिनाथ । चिंता किमपि न करावी । ' **शिरोग्रह**–पु. डोकें धरणें; शिरोवेदना होणें (रोग, विकृति इ० नें). डोकें धरणारा; डोक्यावर परिणाम करणारा (रोग इ०). [सं.] **शिरोबस्ती**–पु. डोकेंदुखी बंद करण्याचा एक उपाय. **शिरोबिंदु**–पु. (भूमिति) अक्षाच्या समोरचें टोक, कोण बिंदू. –महमा १२,२०. **शिरोभाग**–पु. १ मानेपासुन वरचा भाग; डोक्याचा भाग. २ (एखाद्या समाजाचा, संघाचा) नायक, गुणांत योग्यतेनें उत्तम. **शिरोभूषण**–न. डोक्याला शोभा देणारी वस्तु; अलंकार, इ०. मुकुट पागोटें; टोपी. **शिरोमणी**–पु. १ डोक्यावरील दागिना; मुगुटमणि. २

मुख्य, श्रेष्ठ इसम; प्रमुख नायक. उदा० पंडित शिरोमणि, मूर्ख शिरोमणि, सोदाशिरोमणि. इ० 'बाप बळिया शिरोमणी । उताविळ या वचनीं । –तुगा १६४. [सं.] **शिरोरोग**–पु. डोक्यांतील बिघाड, रोग. त्याचे प्रकार–वातिक, पैत्तिक, श्लेष्मिक, सन्निपातिक, रक्तक्षयज, कृमिज. **शिरोलेख**-पु. (वृत्त.) मथळा; मायना; शीर्षक; लेखारंभीं लिहिलेलें वाक्य. (इं.) हेडिंग. 'शिरोलेखांत लिहिल्याप्रमाणें अद्याप ८।१० दिवसांचा अवकाश आहे. –टि २७२. **शिरोवेदना**–स्त्री. डोकेंदुखी; शिरपीडा. 'मोठी शिरोवेदना होत आहे.' –कमं ४. **शिरोवेष्टन**–न. कोणतेंहि डोक्याला गुंडाळावयाचें वस्त्र; (रुमाल, पागोटें वगैरे). [सं.]

शिर—स्त्री. (कु.) फांस; पेंच.

शिर—उद्गा. शुकशुक; मांजरास हांकून लावण्यासाठीं करावयाचा आवाज. [ध्व.]

शिरकणें—क्रि. (राजा) लोकर किंवा कापूस साफ करणें, निवडणें; कचरा व सरक्या काढून स्वच्छ करणें. [शिरकी]

शिरकी–स्त्री. (राजा.) (प्र.) सरकी पहा.

शिरकणें—अक्रि. १ घुसणें; शिरणें; प्रवेश करणें. (विरोध, अडथळा इ० दूर करून) वाट करून घेणें. 'त्या दाटीमध्यें माझें एक बोट शिरकतें म्हणजे मग वाट केली असती'. २ हातीं लागणें; सांपडणें. 'देव उठावले झुंजारी । परी अमृत शिरकलें असुरकरीं ।' –मुआदि ४.१२५. **शिरकवणी, शिरकावणी**–स्त्री. (बळेनें. प्रयत्नानें आंत) शिरकाव; प्रवेश; घुसणें; घुसडणी. **शिरकविणें, शिरकाविणें**–उक्रि. (शिरकणेंचें प्रयोजक रूप) घुसविणें; घुसडविणें; शिरविणें; प्रवेश करणें. **शिरकाव**–पु. रिघाव; प्रवेश; वाट.

शिरकंबा—पु. (ना.) १ पडसें. २ पडशामुळें डोकें दुखणें.

शिरका, शिर्का—पु. आसव; अम्लासव. [फा. शिर्का]

शिरकाटणें—क्रि. (व.) प्रवीण होणें; गति होणें; प्रवेश होणें. [शिरणें; शिरकणें]

शिरकाण—न. १ शिरके आडनांवाच्या लोकांचा प्रवेश, मुलूख. –शर. २ शिर्क्यांचें निर्मूलन; सत्यानाश; नायनाट; समूल उच्छेद. 'शिर्के जेथें असतील तितके मारावे ऐशी आज्ञा करून शिरकाण करविलें' –मराचिसं २१. 'परंतु संभाजी महाराज यांणीं शिरकाण केलें त्या दहशतेनें' –मराचियोरा ६९. [शिरके, किंवा सं. शीर्ष+खंड]

शिरकी—स्त्री. सरकी; कापसांतील बी.

शिरकुटी—स्त्री. शिमटी; शिपटी पहा.

शिरकें—न. शिंकाळीचा हातांत धरण्याचा भाग, मूठ, कडी.

शिरकंड, शिरखंड—न. (अप. श्रीखंड) १ श्रीखंड पहा. २ गंध; कपाळाला लावलेला चंदनी टिळा. (क्रि० लावणें; वठणें; उमटणें). 'आज तुम्ही शिरखंड लावून मोठें नटलांत!' [सं. श्रीखंड]

शिरगोळा—पु. रांगोळीचा दगड.

शिरघोसाळी-ळें—स्त्री.न. दोडक्याचा वेल व फळ. दोडकी, दोडका. शिराळी–ळें पहा.

शिरचष्मा, शिर्चष्मा—पु. (डोकें व डोळा) लावण्यांतील प्रियजनांविषयींची संज्ञा; प्रियजन; प्रियकर. [फा. सर्चश्मा. शिर+चष्मा=डोळा]

शिरजोर शिर्जोर—वि. १ हेकड; हेकेखोर; तिरसट; हट्टी. टोंग. २ खलेल; उमेट; अवखळ. ३ डोईजड; वरचढ. 'शिरजोर बायकोचा शीण जसा शांत दादला वाही?'. 'शिरजोर बायकोचें शेण जसें साधु दादला वाही। घी वर्तवित्ये जीवा सतहो देवाशी दाद लावा ही।' [फा. सर्जोर्] **०हू**० 'चोर तो चोर घरधन्याहून शिरजोर.'=स्वतः मालक नसुन मालकी हक्क गाजवूं पहाणारा. **०पणा, शिरजोरी**–पु स्त्री. १ हेकडपणा; हेकेखोरपणा; तिरसटपणा. २ दांडगेपणा; वरचढपणा; बंडखोरी.

शिरट–टी—न. १ (गों. कों) बारीक छडी; फोक; शिरें; डाहळी; फांदी. २ पोफळीचें शिंपूट. **शिरटांवचें**–क्रि. (गो.) छडी मारणें.

शिरड–डें—स्त्री.न. (राजा कु.) पाला झडलेल्या शिऱ्यांचा समुदाय; काटयाकुट्यांचा भारा; झाडाची छाट. शिरें पहा. [शिरें]

शिरड—स्त्री. चिरड; चीड. चिरड पहा. [चिरड] **शिरडी**–वि. चिडखोर. 'भीम विवेकी भला, न तो शिरडी।' –मोविराट १.१५७. **०खोर**–प्र. चिरडखोर.

शिरडी—स्त्री. (राजा.) फोकाटी; छडी; लहान सरळ फांदी. शिपटी. **शिरडाविणें**–क्रि. (राजा.) फोकाटीनें, छडीनें बडविणें, मारणें.

शिरडी—स्त्री. एक जातीचे तांदूळ.

शिरडी—स्त्री. चिरडी; लहान मुलींचें नेसावयाचें वस्त्र. [सं. चीर]

शिरणी—स्त्री. (ना.) एक त्वचारोग.

शिरणी—स्त्री. खिरापत; प्रसाद; शेरणी पहा. **शिरणीगार**–पु. शेरणीगार; हलवाई.

शिरणें—अक्रि. १ आंत जाणें; शिरकणें; प्रवेश करणें; घुसणें; जोरानें आंत जाणें. [सं. श्रि] **शिरविणें**–उक्रि. घुसविणें; खुपसणें; शिरकाव, प्रवेश करविणें (वस्तु, पदार्थ इ० चा). [शिरणें]

शिरती—स्त्री. (गो.) केळीचें कापलेलें पान; आगोतली. [सं. शिरस्]

शिरद-दं—न. एक माप; पावशेर; चिपटें.

शिरदाली—स्त्री. लगामाचा मुख्य भाग; सरदारी; मोहोरकी. [फा. सर्दवाल्]

शिरदोख—पु. बुरखा. 'कासे कासयला शिरदोख कशिला।' –वसा १३१. [फा.]

शिरप—न. (कों.) पायास किंवा अंगास लागणारा धस; ठोंब.

शिरपुट-टी—स्त्री. बारीक वाळलेली काटकी; शिपटी; बारीक डहाळी; छडी; फोक. [शिरें] **शिरपुटणें**–क्रि. काठीनें, छडीनें, फोकाटीनें बडविणें, मारणें. [शिरपुटी]

शिरःफल—पु. नारळाचें झाड व त्याचें फळ; नारळ. [सं.]

शिरबारणें—क्रि. (बे.) गर्वानें फुगणें; शेफारणें.

शिरमिंदा-धा—वि शर्मिंधा; लज्जित; ओशाळा. शरमिंदा पहा.

शिरयाणी—शिराणी पहा.

शिरवटमुशी—स्त्री. एक प्रकारचा समुद्रांतील मासा.

शिरवणी—स्त्री. (कु.) खिरापत; शिरणी; शेरणी पहा. [फा. शीरणी]

शिरवत—न. (कों.) १ डोंगरमाथ्याची जमीन. २ या जमिनीवरील सारा.

शिरवती—न. (कु.) केळीचें कोंवळें पान; शेंडयाचें पान. शिरती पहा. [सं. शीर्षवर्ती]

शिरवळ—पु.स्त्री. शिरोळ, शिळावेळ पहा.

शिरवा—पु. (बुरूड) बांबू उभा चिरून त्याच्या केलेल्या चार भागांपैकीं प्रत्येक भाग.

शिरवा—पु. (व.) थोडाच वेळ पडलेला जोराचा पाऊस.

शिरवाळ—स्त्री. ऊन्ह पडलें असतां मध्येंच ढगाआड होण्याची सूर्याची स्थिति. 'उन्हाळयांत बहुधा शिरवाळ नसतेच.' [सं. शिशिर+वेला]

शिरवाळया—स्त्रीअव. (कु.) एक पक्कान्न. शेवयासारखा खाद्यपदार्थविशेष. [?+वलय]

शिरशिरी—स्त्रीन. थरथरणें; हुडहुडी; हींव; कापरें. **शिरशिरणें**–क्रि. थंडीनें कुडकुडणें; थरथर कांपणें; शिरशिरी येणें.

शिरशिरी—क्रिवि. शिडशीड–डी पहा.

शिरशिला—पु. वहिवाट. सिलसिला पहा. 'हा ठराव या सरकारनें माजी राज्यांतील शिरशिल्यावरून केला असावा.' –इनाम ८४. [फा.]

शिरशी—स्त्री. दांदोळी. शिरसासारखें एक भाजीचें झाड. [सं. सरसु]

शिरस-सु—पु. एक प्रकारची मोहरी; अठरा उपधान्यांपैकीं एक धान्य. [सं. सर्षप] **शिरशेल-सेल**–न. सरसुचें तेल; शिरसाचें तेल. हें स्वयंपाकांत वापरतात व लोणच्यांत घालतात. [शिरस+तेल]

शिरस—पु (कु.) शिरीषवृक्ष. [सं. शिरीष]

शिरस्ता—पु. चाल; रीत; पद्धत; नियम; दंडक; वहिवाट. (समासांत) शाईशिरस्ता; सरकारशिरस्ता; जनशिरस्ता इ० [फा. सरिश्ता] **शिर(रि)स्तेदार**–पु. १ जिल्ह्याचा एक अधिकारी; मुलकी अधिकारी. २ न्यायकचेरी, मामलत. कचेरी इ०तील मुख्य कारकून. **शिरस्तेवाईक**–विक्रिवि. रूढ; शिरस्त्याचें; ठराविक पद्धतीप्रमाणें; नेहमींप्रमाणें.

शिरळक—स्त्री. बांबूची चोय (पत्रावळ लावावयासाठीं); शिलका. २ सल; धस. (क्रि० भरणें; जाणें; शिरणें). [सं. शलाका]

शिरळक—स्त्री. (विशेषतः अनेकवचनी प्रयोग) शिलका; चमका; शिणका. (क्रि० मारणें; भरून येणें; निघणें).

शिरळक—स्त्री. शीळ; शीट. (क्रि० वाजवणें; वाजणें). [ध्व.]

शिरळा—पु. एक मोठें झुडूप.

शिरळी समई—स्त्री. (ओतकाम) जाड व फुगीर खांब असलेली समई.

शिरा—पु. सीमा; मर्यादा; कड; हद्द; गांवची हद्द. [सं. शिरस्; हिं. सिरा]

शिरा—स्त्री. नाडी; रक्तवाहिनी; नस; शीर पहा. [सं.] **०ताणणें**–जोरानें, मोठ्यानें बोलणें; वाद करणें; रागानें बोलणें. **०निवणें**–अशक्त होणें. **०गत**–वि. शिरा, स्नायू यांमध्यें असलेला (रोग, दुःख इ०) **शिराळ**–वि. १ ज्याच्या शरीरावर किंवा बाह्यांगावर शिरा उठून दिसतात असा (इसम, पदार्थ). मोठ्या व फार शिरा असलेलें (शरीर). २ रेखांकित; पट्टेदार; शिरांकित. **शिरालपक्ष**–पु. किडयांचा एक वर्ग. या किडयांच्या पंखास बारीक शिरा असतात. –प्राणिमो १०८.

शिरा—पु. (तंजा.) उखळ.

शिरा—वि. उत्तम; उत्कृष्ट; सुरेख; छानदार; चांगलें. 'शिरा दारू चांगली.' –पया २८५. 'दिवटे...शिरा असतील त्यांजकडून' –पया २८७. 'बेतवूंद असतां काम शिरा जालें.' –ख ९.४६७२. 'नऊ लाख सैन्य एकदिल घोडा शिरा।' –ऐपो १११. [अर.] **०खजूर**–पु, एक जातीचा काळा खजूर.

शिरा—पु. १ रवा तुपांत भाजून व नंतर त्यांत गूळ किंवा साखर घालून केलेलें पक्कान्न; गोड सांजा. २ पाक; औषधी रांधा. ३ अर्क; सत्त्व; काढा.

शिराजणें—अक्रि. शोभणें; विराजणें. 'नागवंद झळके कटितटी । मणि शिराजे । '–कथा १.१.११. [सं. सु+राज् इ.]

शिराजी—वि. १ शिराजचें; शिराजसंबंधी (मद्य). २ एक प्रकारचें खबूतर. [शिराज इराणांतील शहरावरून]

शिराटा, शिरांटा—पु. (कों.) शिऱ्यांचा, काटक्यांचा खराटा. [शिरें] **शिराड**–न. (कु.) कांटेरी फांदी. शिरड पहा. [शिरें]

शिराडा—पु. चुराडा. 'यदुवंशीं केला कीर्तीचा शिराडा । '–राला ४६.

शिराणी—स्त्री. (काव्य) १ अपूर्वत्व; दुर्मिळता; अलभ्यत्व; थोर लाभ; दुर्लभता. 'तया ब्रह्मसुखाची शिराणी '–विपू. ५.७. 'आज दुधाची शिराणी झाली.' 'मोठ्या घरीं लेक द्यावी, भेटायाची शिराणी करावी.' २ आनंद; सुख; समाधान; विशेष आवड; कौतुक. 'आणि पुत्रें मी सर्वगुणीं । जिणावी हे बापा शिराणी । '–ज्ञा १८.१६५२. ३ महत्त्व; मातबरी; किंमत. 'इतरांची ठेविना शिराणी । '–ऐपो २१८. [सं. शिरस्]

शिरामें—न. जनावराच्या तोंडाचें कातडें; टाळकें. [शिर]

शिरावण—पु. (कु.) श्रावण महिना. [सं. श्रावण]

शिरावळ—पुस्त्री. शिरोळ आणि शिळावेळ पहा.

शिराळ—न. अभ्रच्छाया; ढगांची काळोखी; मळभ; अभ्राच्छादन. (क्रि० येणें; पडणें; जाणें.) [सं. शिशिर+वेला]

शिराळदोडका—पु. ज्याच्यावर जाड रेषा असतात त्या जातीचा दोडका. **शिराळी**–स्त्री. १ शिराळदोडकीची वेल. २ एक रानवेल. **शिराळें**–न. शिराळदोडका.

शिराळशेट—पु. एक विशेषनाम. हा वाणी असून दुर्गादेवीच्या दुष्काळांत अनेक लोकांचे प्राण वांचविल्याबद्दल यास साडेतीन घटका विजापुरास राज्य करण्याची संधि मिळाली व त्यांत त्यानें अनेक देवस्थानांस नेमणुका करून दिल्या अशी आख्यायिका आहे. यांचें स्मारक म्हणून याची श्रावण वद्य षष्ठीस प्रतिमा करून पूजा करतात. २ (ल.) रंगेल, चैनी, कोणतीहि ददात नसणारा मनुष्य. **शिराळशेट(टी)चें राज्य**–न. क्षणभंगुर ऐश्वर्य, वैभव; अल्पकालीन पण वैभवयुक्त सत्ता; पाण्यावरचा बुडबुडा, तुरंतुरं पहा.

शिरिशिरी—स्त्री. पावसाची भुरभुर; बारीक तुषारयुक्त पाऊस. [ध्व.]

शिरिस्ता, शिरिस्तेदार—शिरस्ता, शिरस्तेदार पहा.

शिरी—स्त्री. हत्तीचें खोगीर नीट रहावें म्हणून घालावयाचें दोहोंबाजूंस खारवे लावलेलें बुरणूस. –पुरवणी ऐरा २६१. [शीर]

शिरी—स्त्री. (गो.) शोभा; श्री. [सं. श्री]

शिरीं—न. (गो.) बांबूच्या काठ्यांचें केलेलें मासे धरण्याचें जाळें.

शिरीद, शिरवें—न. एक माप; पावशेर.

शिरीन्गार—पु. हलवाई. [फा.]

शिरीम—न. एक प्रकारचें कुष्ट; कोड. यानें शरीरावर पांढरे डाग पडतात. (क्रि० फुटणें; पसरणें.)

शिरीष—पु. एक फुलझाड; याचीं फुलें सुवासिक असतात. [सं.]

शिरीस—पु. शिरस; सरसु; मोहरीची एक जात.

शिरें—न. (कु.) कांटेरी फांदी.

शिरें—न. झाडाची छाटलेली फांदी; कुंपण घालावयास मांडवावर घालावयास वगैरे तोडून आणतात तशी झाडाची डहाळी; कांटयांची डहाळी. प्रेतयात्रेहून परत येतांना प्रेत परत येऊं नये म्हणून वाटेंत कांटेरी शिरें टाकतात त्यावरून शिरें मारणें, तोंडावर शिरें बसो (तोंड काळें होवो) असे वाक्प्रचार रूढ आहेत.

शिरें—न. १ शाई करण्यासाठीं धान्य जाळून पाणी काढून केलेला कषाय; लाखेचें उकळलेलें पाणी. २ बाळंतिणीकरितां आहाळिव, मिरीं वगैरे घालून नारळाच्या दुधाचा केलेला काढा.

शिरें—न. (व.) बाजू; कड. 'एका शिऱ्यानें आंबे घे मधले घेऊं नको.' [शीर]

शिरोती—स्त्री. (कु.) आगोतली; केळीच्या पानाचा अग्रभाग. [शीर]

शिरोस—पु. पांढऱ्या चमकदार रंगाचा घोडा.–अश्वप ३१.

शिरोळ—पुस्त्री. थंड वेळ; शिळोपा. शिरोळचा वेळ–समय–काळ–वखत. शिरोळचा निघणें–जाणें–चालणें–येणें. [सं. शीतल+वेळा; शिशिर+वेला]

शिरोळी—वि. शिरोळ नांवाच्या गांवासंबंधीं.

शिरोळी–ळें—प्र. शिराळी–ळें पहा.

शिर्पो—पु. (गो.) डुकराची आंतडीं.

शिर्वा—स्त्री. (व.) पावसाची सर.

शिल—पु. घोडयाचा एक रोग. –अश्वप २.३३०.

शिल—न. शेताची कापणी केल्यानंतर शेतामध्यें जीं कणसें सांपडतात तीं. 'शेत संवगूनि नेलया जाण । ते शेतीं प्राप्त कणसें कांकण । ते शिलवृत्ति संपूर्ण । ऐक लक्षण उंछवृत्तीचें । '–एभा १७. ४१५. [सं.]

शिलक–ख—स्त्री. बत्ती; सरबत्ती; फैर. 'त्या वेळेस इकडून दोन शिलका म्हणजे फैरा एक क्षणांत केल्या '–रा ३.१९१. 'तोफखान्याला शिलक दिली । ' –ऐपो २१३. [अर. शल्क]

शिलक(ग)णें–अक्रि. पेट घेणें; पेटणें; आग लागणें; चेतणें.

शिलका(गा)वणें–विणें–सक्रि. १ पेटविणें; आग लावणें; चेतविणें; बत्ती देणें. २ (ल.) चेतना देणें; उठावणी देणें; भडकविणें. **शिलका(गा)वण–णी**–स्त्री. १ पेटविण्याची, आग

लावण्याची क्रिया. २ (ल.) साऱ्यासाठीं तगादा करावयास पाठविलेल्या मनुष्यानें स्वत:करितां जबरीनें कांहीं रक्कम घेणें. ३ अशा प्रकारें घेतलेली रकम. ४ मुदतींत काम न केल्याबद्दल दररोज द्यावयाचा दंड. ५ वसुल केलेला पैसा जवळ ठेवल्याबद्दल, अफरातफर केल्याबद्दल द्यावयाचा दंड. **शिलगून देणें**-(व.) पेटविणें.

शिलक-शिल्लक—स्त्री. बाकी; खर्च वजा जातां उरलेली रकम; अवशेष; शेष (द्रव्य, धान्य, पदार्थ वगैरे). [अर. सल्ख्] **०झाडा**-पु. हिशेब, जमाखर्च पुरा होऊन काढलेली बाकी. (क्रि० काढणें; उतरणें). **०बंद**-पु. ज्या कागदावर जमाखर्च लिहून शिलक काढतात तो कागद; आढावा; हिशेबपत्रक; जमाखर्चाचा तक्ता. **०बाकी**-स्त्री. हिशोब पुरा होऊन राहिलेली रकम. **०साखळी**-स्त्री. १ दररोज किंवा महिनेवार हिशेब पुरे करून काढीत आणलेली बाकीची परंपरा. २ जमाखर्च तपासून काढलेला पडताळा; जमाखर्चाची तपासलेली तोंडमिळवणी; बिनचूकपणा, हिशेबाची खात्रीशीर मिळवणी. (क्रि० मिळविणें; नेसवणें; मिळणें; जमणें). **शिलकी**-वि. शेलका; निवडक; उत्तम; सुंदर; वेचक. **शिलकी**-वि. १ राहिलेला; बाकी; उर्वरित. २ संग्रहांतील; जपून ठेवलेला; राखीव. **०डागिने**-पुअव. राखीव, उत्तम, उत्कृष्ट पदार्थ, वस्तु, वस्त्र-पात्र, अलंकार वगैरे.

शि(सि)लक—स्त्री. चोय; पत्रावळी लावण्याची कामटीची बारीक काडी. 'सल सिलका आणि सराटे।' -दा ३.७.४. [सं. शलाका] **शिलकुंधा**-पु. (व.) कुंध्याच्या मधून मधून कुठे कुठे निघणाऱ्या शिलका, अंकुर.

शिलक—स्त्री, चमक; उसण; लचक; कळ. (क्रि० मारणें). **शिलका देणें**-छळणें; त्रासणें; गांजणें; हाल करणें.

शिलंगण—न. सीमोल्लंघन; दसऱ्याच्या दिवशीं सीमेबाहेर जाण्याचा विधि. [सं. सीमोल्लंघन] **म्ह०** शिलंगणाचें सोनें पाहिजे त्यानें लुटावें.

शिलतास—क्रिवि. दुथडी; एका तीरापासून दुसऱ्या तीरापर्यंत; तुडुंब; पूर्णपणें भरून. 'नदी शिलतास भरून चालली.' 'शेत शिलतास पेरलें-पिकलें-आलें-गेलें-बुडालें-जळलें'. [शेल=कडा+तास=पात्र]

शिलपट—वि. शिळपट; नेभळट; दुबळा; नपुंसक; अशक्त; नालायक. [सं. शिलापट्ट]

शिल(र)पुटी—स्त्री. हलकी बारीक वाळकी काठी; शिमटी; फोंक; छडी. [शिरें]

शिलबंत—प्र. चिलवंत पहा.

शिलशिला-ल्ला—पु. १ सांखळी; सूत्र; रांग; ओळ. 'स्नान-थोरामिळून साठ शिलशिला आरमाराचा फिरता ठेविला.' -पया ८७. २ संबंध; परंपरा; वहिवाट; ऋणानुबंध. 'मोहब तजंग याजकडे वर्तमान कळविण्याचा शिलशिला जारी असावा.' -ख ८.४३५०. [अर. सिलसिला]

शिलाशिलाटा—पु. ससेमिरा; छेडणें. 'सर मालकम हे ले यांच्या सारखा ताठर मुत्सद्दी त्यांच्या शिलशिलाटयाला कंटाळून असेंबली सोडून गेला.' -स्वभावचित्रें २४.

शिला—स्त्री. १ मोठा दगड; पाषाण; खडक. 'जशी पदरजें शिला परि असे न हे शापिली।' -केका ३६. २ पाटा; पदार्थ वांटावयाचा सपाट दगड. ३ उंबरा; उंबरठा. [सं.] **०कुसुम**-न. दगडफूल; धोंडफूल. **०जतु-जित**-पु. एक औषधी पदार्थ (हा दगडांतून पाझरतो असें म्हणतात); (इं.) बिटुमेन. **०धातु**-स्त्री. एक अल्युमिनियमयुक्त पांढरी माती; एक प्रकारचा खडा. **०पट्ट**-पु. पाटा. **०पुत्र**-पु. दगंडी रूळ; चुन्याच्या घाणीचें चाक. **०पुष्प**-न. शिलाकुसुम पहा. **०रस**-पु. एक सुगंधी चिकट पदार्थ. **०राशी**-पु. मोठा दगड; पर्वत. 'मोठेमोठे पर्वत मोडी फोडीहि जी शिलाराशी। विद्युल्लता नरें ती केली संदेशहारिका दासी।' -विद्याप्रशंसा. **०लेख**-पु. दगडावर कोरलेलीं अक्षरें. **शिलोच्चय**-पु. पर्वत.

शिला—पु. चिलखत; चिलखताचा भाग. [अर. सिलाअ]

शिलाई—स्त्री. शिवणावळ; कपडे शिवण्याची मजूरी. [शिवणें]

शिलाण—न. कापून, चिरून वगैरे तयार केलेली भाजी. [छिलणें]

शिलाणें—न. स्वभाव; वर्तन; वृत्ति; शील. [सं. शील]

शिलावर्त—पु. घोडयाच्या गुढघ्यावरील भोंवरा. [सं.]

शिली—स्त्री. छिली; दरवाजाच्या दुहेरी चौकटीस जोडणारा खालचा दांडा. (वरच्या दांडयास घोडा म्हणतात).

शिली—स्त्री. झिली; भिंगुरटी; मुरकुट. -भाए २६८.

शिलीक, शिलीकझाडा, शिलीकबंद, शिलीकसांखळी—शिलक इ० पहा.

शिलीमुख—पु. बाण. 'निर्दय काम शिलीमुखविद्धहृदय राम पावला कंपा' -मोरामायण १.२९. [सं.]

शिलेखाना—पु. शस्त्रागार; शस्त्रास्त्रें, दारूगोळा ठेवण्याची जागा. [अर. सिलाहखाना]

शिलेजोर—पु. शस्त्रसामर्थ्य; शस्त्रास्त्रांचें बळ. 'दत्ताजी शिन्दे यांणीं शिलेजोरानिशीं मारवाडी मागें सारोन गावांत घातले.' -भाव १६. [सं. सिलाह्+जोर]

शिलेटोप—पु. शिरस्त्राण; जिरेटोप.

शिलेदार—पु. हत्यारी; पदरचें घोडें घेऊन सैन्यांत चाकरी करणारा. 'शिलेदाराचे पायां पडतां पडतां कपाळ छिनत चाललें.' -पारसनीस ४१. [अर. सिलाहदार] **शिलेदारी**-स्त्री

शिलेदाराचा धंदा, चाकरी. –वि. १ शिलेदारासंबंधीं. २ (ल.) गर्विष्ठ, ऐटबाज; नोकझोकाचा; उधळ्या; बेताल; अनिर्बंध; स्वैर वगैरे. पुढें दिलेल्या शब्दांशीं जोडून योजतात. ढंग, ढोंग, डौल, रीत, चाल, बाणा, कारभार, डोलणें, चालणें, गोष्ट, आदर वगैरे. ०ढँग–पु. अवाढव्य, उधळ्या, बेसुमार खर्च; दिमाख; अतिशय उधळपट्टी; बेलाग ऐश्वर्यप्रदर्शन.

शिलेपाट—पु. आगगाडीच्या रुळाखालीं घालावयाचे लांकडी चौरस ओंडे. [इं. स्लीपर]

शिलेपोस-स्त—वि. १ चिल्खती; हत्यारबंद; कवचयुक्त. 'भहागिरी शिलेपोस.' –बाडसमा १ ९. 'शिलेपोस पल्टणें लाविलीं पठाण जरीचे समले।' –प्रला ४७. २ (ल) तयार; सज्ज; मागें पाश नाहीं असा; सडा. [अर. सिलाह्+पोश]

शिलेभाले—पुअने. चिल्खत व भाले; शस्त्रास्त्रें; सामान्यतः हत्यारेंपात्यारें वगैरे. **शिलेभाल्यानिशीं, शिलाभाल्यानिशीं**–क्रिवि. हत्यारापात्यारांसह; शस्त्रसामुग्रीसह; शस्त्रास्त्रयुक्त.

शिलेमान, शिलेमणी—पु. गोमेद; शिवधातु.

शिलोच्छवृत्ति—स्त्री. शेत कापून नेल्यानंतर जे धान्यादि कण राहतात ते वेंचून त्यांवर निर्वाह करण्याची वृत्ति. –वि. अशा वृत्तीनें राहणारा (तपस्वी, मुनि). [सं.]

शिलोंत(त्त)रा-री, शिलोत्री—पुस्त्री. १ जमीनीच्या इजारदारानें खंडकाराकडून घ्यावयाचा हक्क (सामान्यतः बिघ्यास एक मण). २ शिलोत्तरी पहा. **शिलोतरीदार**–पु शिलोतरी हक्काचा मालक; शिलोतरा पाटिल, शिलोत्तरा पाटील, शिलोत्तर–शिलोत्तरा पाटिलकी वगैरे या हक्कदारासच नांवें आहेत–. शिलोत्तरा पहा. कुलाब्याकडे मिठागराच्या मालकास शिलोत्री म्हणतात. [सं. शिला+उत्तर]

शिल्प—न. कोणतेंहि कलाकौशल्याचें, कुसरीचें, यांत्रिक वगैरे काम; हुन्नर; कला; हस्तकौशल्य. [सं.] ०**कर्म**–न. यांत्रिक अथवा हस्तकौशल्याचें काम; कारागिरी. ०**कला**–स्त्री. कलाकौशल्याच्यासंबंधीं शास्त्र, ज्ञान; यांत सामान्यतः वास्तुशिल्प, मूर्तिशिल्प हीं मोडतात–ज्ञाको श ६७. ०**कार, शिल्पी**–पु. कारागीर; यंत्रशास्त्रज्ञ; कलाभिज्ञ; यंत्रकलाविशारद. ०**विद्या**–स्त्री. हस्तकौशल्य, गृहरचना, चित्रकला, मूर्तिकर्म इत्यादींचें ज्ञान. ०**शाला**–स्त्री. कलाकौशल्याचे पदार्थ निर्माण करणारा कारखाना. ०**शास्त्र**–न. यंत्र, मूर्ति, चित्र वगैरेसंबंधीं नियम दर्शविणारा ग्रंथ, निबंध. **शिल्पिक, शिल्पी**–पु. कारागीर.

शिल्लकल–स्त्री. (कोंकणी) एक फूट लांबीची, टोकाकडे निमुळती होत गेलेली पहार. –गुजा ५३. [सं. शिला+ता. कल्ल=दगड]

शिल्ला—पु. (बे.) भिंत बांधतांना मध्यें घातलेला आडवा लांब दगड; बंद; (इं.) हेडर. [सं. शिला]

शिल्ली—स्त्री. (गो.) एक प्रकारचा सरडा.

शिव—पु. एक खाडींतील मासा. **शिवड-डा**–पु (कु. गो.) एक मासा; मोठें सुंगट.

शिव—स्त्री. सीमा; हद्द; मर्यादा; कड. [सं. सीमा] ०**धडा**–पु. शेजारी; सीमेवरील, हद्दीपलीकडील मनुष्य. [शिव+धडा] ०**धडी**–पु. शेजारी. **शिवधडे, शीमधडे, शींवधडे**–पुभव. सीमेबाहेरचे, शेजारच्या गांवचे लोक. –थोमा १७९. २१. ०**धार**–स्त्री. (सांकेतिक) बारीक तुपाची धार. [शिव+धार] ०**शेजारी**–पु. सीमेपलीकडील, शेजारच्या गांवचा मनुष्य. ०**सोयरा**–पु. शिवशेजारी. **शिवाणीं उभा न करणें उभा न राहूं देणें**–दारांशीं उभा न करणें, आपल्या सीमेवरहि येऊं न देणें. **शिवार-शिंवार**–नपु. १ गांवच्या सीमेच्या आंतील वस्तीखेरीज इतर जमीन; सर्व शेतजमीन. २ (कांहीं भागांत, विशेषतः दक्षिण कोंकणांत) झाडीझुडपें असलेली जमीन; बागबगिचे; राई. ३ कापून रचून ठेवलेलीं इमारतीचीं लांकडें. ४ लांकडें आणावयाकरितां जंगलांत केलेली खेप. [सं. सीमागार] ०**पंडित**–पु. खेडेगांवातील माहितगार इसम; ग्रामपंडित; खेडेगांवातील लोक ज्याचा सल्लामसलत घेतात असा अर्धवट ज्ञान असणारा खेडवळ ब्राह्मण; अडाणी, रानवट मनुष्य. ०**पाहणी**–स्त्री. गांवच्या जमीनीची मोजणी, तपासणी. ०**स्वैपाक**–पु. १ शेतांतील हुरडा, ओंब्या वगैरे अन्न. २ शेतांतील पदार्थांचें तयार केलेलें अन्न, जेवण. **शिवारी**–पु. (गो.) शिवाराची देवता.

शिव—पु. १ त्रिमूर्तीतील एक देव; संहारकर्ता देवता; शंकर; महादेव; महेश्वर. २ चैतन्य; आत्मा; जीवापासून निराळें चित्तत्त्व. ३ सत्तावीस योगांपैकीं एकविसावा योग. ४ मोक्ष. ५ (द्विरुक्तीनें शिवशिव) तिरस्कार, नापसंति, खेद, उद्वेगवाचक उद्गार. 'ऐकोनि कृष्ण शिव, शिव ऐसें आधीं म्हणोगि मग हांसे।' –मोकर्ण ४६. २५. –न. मंगल; कल्याण. –वि. मंगलकारक; कल्याणदायक; सुखदायक. **शिवशिव करणें, शिवाशिवा**–तिरस्कार, उद्वेग दाखविणें. (क्रि० करणें; म्हणणें). **शिवावरचा बेल उचलणें-काढणें-घेणें**–एक प्रकारचा शपथविधि; शपथ घेणें. **शिवावरचा बेल चुकेल पण हें चुकणार नाहीं**–एखादी न टळणारी गोष्ट दर्शविण्यास योजतात. ०**कळ**–स्त्री. (कर.) संचार; अंगांत येणें. ०**कळा**–स्त्री. (कर.) राग. ०**चतुर्दशी**–स्त्री. माघवद्य चतुर्दशी; महाशिवरात्र. ०**दिनी**–स्त्री. एकादशी; शिवगात्र. ०**दीक्षा**–स्त्री. (यट्टेनें) अंगाला राख फांसणें, रुद्राक्ष घालणें वगैरे शिवोपासनेचा व तपस्येचा अंगीकार करणें. (क्रि० घेणें). ०**धातु**–पु. गोमेद. ०**नद**–पु. एका नदीचें नांव. **निर्माल्य**–नपु.

१ शिवदेवतेस वाहिलेलीं फुलें वगैरे. २ शिवस्व; स्वतः न वापरावयाची, घ्यावयाची, उपभोगावयाची दुसऱ्याची वस्तु. याचा शपथेसारखा प्रयोग होतो. **०पंचाक्षरी मंत्र**–पु. ॐ नमः शिवाय हा मंत्र. **०पदी**–स्त्री. १ ज्यामध्यें कल्याणमय शब्द आहेत असें वाङ्मय. २ शंकराच्या स्तुतीपर पदें. ३ शिवाजी महाराजांवर रचलेलीं पदें. **०पुरी**–स्त्री. १ वाराणशी; बनारस; काशी. **०भैरव**–पु. (राग) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. पण अवरोहांत निषाद व गांधार हे कोमल देण्याचा प्रघात आहे. जाति संपूर्ण–संपूर्ण, वादी धैवत. संवादी ऋषभ. गानसमय प्रातःकाल. **०मुहूर्त**–पु. सुर्योदयाबरोबरचा पहिला मुहूर्त, साडेतीन घटकांचा काल. **०योग**–पु सत्तावीस योगांपैकीं एकविसावा योग. **०रात्र–रात्रि**–स्त्री. प्रत्येक महिन्याची वद्य चतुर्दशी. विशेषेंकरून माघ वद्य चतुर्दशी. **०रात्र वात**–स्त्री. कापसाच्या सुताची १८७॥ फेरे अथवा ३७५ पदरांची वात. ही दर शिवरात्रीस लावतात. **०लग्न**–न. (शुभ मुहूर्त) दसरा. [सीमोल्लंघन अप.] **०लिंग**–न. शंकराचें, महादेवाचें लिंग, पिंडी, प्रतिमा. **०शक्ति**–स्त्री. पुरुषप्रकृति. 'तेवी शिवशक्ति विवंचना तुजमी सांगेन संपूर्ण।' –एभा २४. ६९. **०शरणार्थी**–पु. लिंगायत लोक नमस्कार शब्दाऐवजीं याचा उपयोग करितात. **०स्व**–न. शिवास अर्पण केलेलें; ज्याचा अपहार करणें पातक होय असें द्रव्य वगैरे. **शिवा**–स्त्री. १ पार्वती. 'शिवा भवानी रुद्राणी। कां न पावतीच कोणी।' –एरुस्व ५.७४. २ कोल्ही. **शिवात्मा**–पु परमात्मा; जीवात्म्याहून निराळा जो आत्मा तो. **शिवापुढचा**–वि. १ नंदी; नंदीबैल; बैल. २ (ल.) निर्बुद्ध; दगड; मठ्ठ. **शिवामूठ**–स्त्री. १ विवाह झाल्यापासुन पांच वर्षेपर्यंत श्रावणांतील दर सोमवारीं नववधूनें महादेवास अनुक्रमें तीळ, तांदुळ, सातु, मुगाची डाळ व गहूं यांची मूठ वहावयाची असते ती. २ शिवामूठ वहावयाचा विधि, व्रत. **शिवालय**–न. १ महादेवाचें मंदिर, देवालय. २ स्मशान.

शिवक—स्त्री. (व.) शिलक; चोय (पत्रावळीची).

शिवका—पु. (नंद) दागिना. 'त्यानें आपले शिवके मोडून खाले'.

शिवटणें—सक्रि. शेवटणें; शस्त्रास, हत्यारास धार, टोंक काढणें. [शेवट]

शिवट-शेवते—पु. मांग जातींतील एक पोटजात. –अस्पृ ४७.

शिवटी—स्त्री. (व.) चोय. (पत्रावळीची) –वशाप ५.२९७.

शिवण-णी, शिवन-नी—स्त्री. (कों.) एक इमारती लांकडाचें झाड.

शिवण—स्त्री. १ दोरा घालणें; दोरा व सुईनें जोडणें; टांके घालणें; जोड; सांधा; दूण. २ ढुंगणाच्यामधील शिवणीप्रमाणें रेषा. ३ शिवावयाचे, शिवलेले कपडे, कापड, जिन्नस; शिवणकाम. ४ घरावरील गवताची शाकारणी. [सं. सीवन] **०कर**–पु. शाकारणी करणारा; शाकारी. **०काम**–न. शिंपीकाम; शिवण्याची क्रिया; शिवण्याचे कपडे वगैरे. **शिवणावळ, शिंवणावळ**–स्त्री. शिवण्याची मजुरी, वेतन, मूल्य. **शिवणी**–स्त्री. सांधा; जोड. 'मग शिवणी जैसी उलटे। शुक्ति पल्लवांची।' –ज्ञा ६.२६६. **शिवणें, शिंवणें**–उक्रि. १ टांके मारणें; दोरा घालणें २ शाकारणें; गवताचें छप्पर करणें.

शिवणें—अक्रि. स्पर्श करणें; स्पर्शणें; संसर्ग होणें; संबंध घडणें. 'तिला स्वशिशुवंचनें अधमता शिवे काय जी।' –केका १०६. [सं. स्पृश्] **शिवावयाचें नसणें**–स्त्री. अस्पर्श असणें **शिवाशिव**–स्त्री. १ स्पृश्य व अस्पृश्य यांचा निकट येऊन झालेला गोंधळ; विटाळाची कालवाकालव; संपर्काचा भ्रष्टाकार. २ अशौच वगैरेमुळें झालेला विटाळ. **शिवूं नयेशी**–स्त्री. अस्पर्श, रजस्वला स्त्री. **शिवतणें**–अक्रि. शिवणें; स्पर्श करणें.

शिवनक—पु. भातांतील, साळींतील एक जात.

शिवर—स्त्री. (गो) भेग. **शिवरांवचें**–अक्रि. (गो.) बारीक भेगा पडणें.

शिवरडोली—स्त्री. श्रावड; श्रावडे; अच्छूक; आऊल. एक झाड. यावर कांहीं पानें हिरवीं व कांहीं पांढरी येतात.

शिवरस—पु. भातावरील पातळ पेज किंवा शिजविलेल्या डाळीवरील पाणी, याचें कालवण करतात.

शिवरा—पु. (राजा.) शितोडा; पाणी शिंपडणें; पाण्याचा पातळ सेक. [सं. सिच्]

शिवराई—स्त्री. शिवाजीनें पाडलेलें नाणें; पैसा. [शिवाजी]

शिवराभिवरा-भेवरा-बिवरा—पु. मूळ सीना व भीमा या नद्यांच्या कांठची शेती. आतां सामान्य शेती, पिकें, जमीन या अर्थी वापरतात. 'शिवराभिवरा पिकलीं=शेतें पिकलीं.' =धान्य पिकलें, पीक आलें।'

शिवरो—वि. कुष्ठी; शेवडा.

शिवरू—स्त्री. बंदुकीची दारू.

शिवधनी—वि. श्रीवर्धनी; श्रीवर्धन गांवचें.

शिवशाही—स्त्री. शिवाजीनें स्थापन केलेलें राज्य व घालून दिलेली राज्यपद्धति.

शिवशिव शिमगा–पु. शीतळ शिमगा; धुळवडीचा दिवस.

शिवशितळ—वि. १ थंड; ताजें; शुद्ध. (हवा, पाणी वगैरे). २ सौम्य; कडक नव्हे तें. ३ भूतपिशाच्चादि बाधे पासून सुरक्षित (रस्ता, भाग, प्रदेश). ४ सौम्य; सुलभ; सोपें; सुसाध्य; खाष्ट, खडतर नव्हे असें. (दैवत, मूर्ति, देव). ५ भूतपिशाच्चादि पीडेपासून, कुरी देऊन, शांति वगैरे करून मुक्त केलेलें (धान्याची रास, वगैरे). ६ शांत; थंड; कोमल (मन, जीव वगैरे). [सं. शिव+शीतल]

शिवशिवणें—अक्रि. शिरशिरी येणें; कांपणें; फुरफुरणें; झणझणणें; थंडीनें दुखणें (दांत, कान, हात, पाय, शरीर वगैरे). [सं. सिमसिमाय्]

शिवसर—पु. सिंह राशीस सूर्य असण्याचा काल; सिंहस्थ. या कालांत गाय व्याली असतां धन्यास अनिष्ट फल मिळतें. [सं. सिंह+सरणें] **शिवसरणें**–अक्रि. सिंहस्थामध्यें गाय विणें. **शिवसुरणें-शिवसूर**–प्र. शिवसरणें, शिवसर पहा.

शिवळ—स्त्री. १ जोखडाचे दोन भाग असल्यास त्यांस जोडणारी खुंटी; जोखडाची बैलाच्या मानेजवळची खुंटी; बिरडी बांधावयाची खुंटी; शिऊळ. २ बैलाच्या मानेचा जोखडाजवळील भाग. **शिवाळ-शिवीळ-शिवूळ-शिऊळ**–शिवळ पहा.

शिवळ—स्त्री. शोळ; शीट. क्रि. वाजवणें; घालणें. **शिवळणें**–अक्रि. (कों.) शिरशिरी येणें; शिवशिवणें; अंग थडथडणें; कांपणें; थंडीनें शहारणें. [ध्व]

शिवळट-ळाटी—स्त्री. १ शिवळ. २ बैलाचा जोखडाजवळील मानेचा भाग.

शिवळवट—पु. रव्याचा भिजवून केलेला उंडा; पदार्थ बनविण्यासाठीं कणकीचा केलेला लांबट गोळा.

शिवळी—स्त्री. एक झाड.

शिवा—स्त्री. पार्वती. [सं.] **०लिखित**–न. पार्वतीनें लिहिलेलें फलज्योतिष; शुभाशुभ वेळ.

शिवा—स्त्री. कोल्ही.

शिवाई—स्त्री. शिवराई पैसा.

शिवाई-य—शअ. १ शिवाय; विना; वांचून; खेरीज; सोडून. 'शिवाय पाटीलबावाचे परवानगी इकडून तिकडे कोणी जाऊं पहात नाहीं.'–दिमरा १.११९. २ हे असून आणखी; घरून वर; आणि वर. 'इंग्रेज शिवाय तोफा ताहफ सव्वीस लक्ष रुपये दरसाल देत होते.'–दिमरा १.१०४. **०जमा**–स्त्री. अवांतर वसूल, मिळकत; शेतसाऱ्याशिवाय इतर खंड, गुन्हेगारी, नजर वगैरे निरनिराळ्या बाबींच्या वसूली रकमा. **०दोऱ्या**–स्त्रीअव. तंबूच्या मधील खांबाच्या वरील भागाला बांधून ठोकावयाच्या दोऱ्या. **०मिळकत**–स्त्री. अवांतर फायदा, प्राप्ति; किरकोळ, मुख्य बाब सोडून इतर होणारी प्राप्ति.

शिवाजी—पु. (हेटकरी) १ काठी व परबान यांस बांधलेला मोठा दोर. २ जिवा एकत्र करून त्यांचे शेवट (पदर) एकांत एक मिळवून जरूर असतील तितके फेरे घेऊन दोन बाजू बारीक दोरीनें गुंडाळून केलेला दोर. याचा उपयोग कपीस अडकवून लांकूड वर उचलण्याकडे अगर खालीं सोडण्याकडे होतो. ३ शिवाजी राजा.

शिवारा-ऱ्या—स्त्रीअव. भात झोडण्यासाळीं खळयांत डाबे रोवून घडवंचीवजा केलेली माचण. –कृषि २३९. –बदलापूर २९०.

शिवी, शिवीगाळ-ळी—स्त्री. अपशब्द; दुर्भाषण; अभद्र वाक्य [सं. शप्? का. सीवरिसु] **शिवरा-शिवराळ**–वि. शिव्या देणारा; अपशब्द बोलणारा. 'परि नव्हेत हे शिवरे।' –मोउद्योग ११.६१. **शिवेरा-शिऊरा**–वि. शिवरा.

शिव्या—पु. (गो.) भात ठेवण्याचें रुंद तोंडाचें लांकडी पात्र.

शिंशपा—स्त्री. १ सीताफळीचें झाड. २ अशोकाचें झाड. **शिंशपाचोद्य**–न. शिंशपा झाडासंबंधीं विचार; रावणानें सीतेस शिंशपा झाडाखालींच कां ठेवलो या प्रश्नासंबंधीं विनाकारण काथ्याकूट.

शिशिर, शिशिरऋतु, शिशिरर्तु—पु. सहावा ऋतु; मकर व कुंभ हे सौरमास किंवा माघ, फाल्गुन हे चांद्रमास यांचा काल. [सं.]

शिशी—स्त्री. लहान कुपी, बाटली. [फा.]

शिशी—स्त्री. शिसवी; शिसव नांवाचें झाड.

शिशु—पु. १ बालक; लहान मूल; लेंकरूं. 'रडे शिशु तयास धे कळवळोनि माता कडे'–केका १२१. २ प्राण्याचा लहान बच्चा; पिलूं. 'असो मच्छशिशूनें उगळून। आणून ठेविला पूर्वस्थळीं।' [सं.] **०वर्ग**–पु. १ बालवर्ग; तुकडी; बिगरयत्ता. २ लहान मुलें, बालकें वगैरे. **शिश्वी**–स्त्री. मनुष्याचें अथवा प्राण्याचें स्त्रीजातीय बालक; पिलूं.

शिश्न—न. पुरुषाचें गुह्येंद्रिय. [सं.] **शिश्नोदरपरायण**–वि. केवळ पोट भरणें व विषयसुख यांतच आनंद मानणारा, याकडेच लक्ष देणारा. [शिश्न+उदर+परायण]

शिष्ट—वि. (शब्दशः) शिस्तीचा; व्यवस्थित; नियमित; ऋजुमार्गी; नियमाप्रमाणें चालणारा; शिक्षित. (रूढ) विद्वान्; सभ्य; सभावित. २ उत्कृष्ट; वरिष्ठ; श्रेष्ठ; आदरणीय; पूज्य. ३ उर्वरित; राहिलेला; बाकीचा; शेष. उदा० यज्ञशिष्ट; हुतशिष्ट. 'हें शिष्ट मदन म्हणे धर्मात्मा भावितें चुकेल कसें।'

–मोसभा ४.५२. [सं. शिष्] **म्ह०** शिष्टागमने अनध्यायः संभावित, पूज्य लोक आले असतां आपला व्यवसाय बंद, बाजूला ठेवावा. **०मंडळ**–न. प्रेषित किंवा प्रतिनिधीमंडळ. विनंति करण्याकरितां, भेट घेण्याकरितां, शिष्टाई करण्याकरितां पाठविलेली मंडळी. (इं.) डेप्यूटेशन. **०संप्रदाय**–पु. संभावित, श्रेष्ठ, पूज्य लोकांची रीत, मार्ग, पद्धति, वागणूक, चाल. **०सभा**–स्त्री. श्रेष्ठ, बड्या, सन्मान्य लोकांची सभा, मंडळ, समाज. **०संभावना**–स्त्री. १ शिष्ट लोकांचें आदरपूर्वक स्वागत, वागवणूक; सत्कार (विवाह, यज्ञादि प्रसंगीं आहेर, देणगी, दान वगैरे देणें). २ अहेर; देणगी. (अशा प्रसंगीं दिलेली). **शिष्टाइकी–शिष्टाई–शिष्टायकी**–स्त्री. १ श्रेष्ठपणा; मोठेपणा; मान; पूज्यता; आदरणीयता. २ नियमितपणा; व्यवस्थितपणा; शिस्त; चोखपणा. ३ संभावितपणाची मध्यस्थी; विवाहादि व्यवहारांत जुळवून आणण्याकरितां केलेली मध्यस्थी, सांगितलेल्या समजुतीच्या गोष्टी वगैरे; दोन पक्षांत ऐक्य घडवून आणण्याकरितां केलेली मध्यस्थी, बोधपर कथन वगैरे. **शिष्टागम, शिष्टाचार**–पु. १ परंपरागत आलेली सभ्यपणाची, संभावीत रीत, पद्धति, चाल. 'शिष्टागम विधानें। बिविध याग वितानें।'–ज्ञा १५. १८९. २ विवाहादि प्रसंगीं यजमानास केलेला अहेर, देणगी वगैरे. ३ शास्त्रांत प्रत्यक्ष न सांगितलेले परंतु रूढ आचार; नियम, रीत, पद्धति. **शिष्टाचार करणें**–लोकव्यवहारास अनुसरून, वाईट दिसूं नये म्हणून केवळ एखादी गोष्ट वरवर करणें. **शिष्टावणें**–अक्रि. श्रेष्ठत्वास चढणें; मान्यता पावणें; योग्यता नसतां स्वतःस मोठें समजणें; उगाच मोठेपणा अंगीं आणणें.

शिष्य—पु. (शिष्या) १ विद्यार्थी; चेला; शागीर्द. अनुयायी; पट्टशा. २ उमेदवार; विद्यार्जनाकरितां सेवा करून राहिलेला मनुष्य. [सं.] **०परंपरा**–स्त्री. एका मागोमाग झालेल्या शिष्यांची मालिका; छात्रगणांची, विद्यार्थ्यांची अनुक्रमानें रांग, ओळ, माळ. **०प्रशिष्य**–पुअव. शिष्य व त्यांचे शिष्य; शिष्यांची मोठी मालिका; शिष्यगण. **०वृत्ति**–स्त्री. १ विद्यार्थिदशा. २ विद्यार्थिदशेंत मिळणारें वेतन, द्रव्य; विद्यावेतन. इं. स्कॉलरशिप. **०शाखा**–स्त्री. एखाद्या गुरूचा अनुयायी वर्ग; शिष्यसमुदाय; पंथांतील लोक; अनुचर. **०संप्रदाय**–पु. शिष्यवर्ग, मंडळ, समुदाय, पंथ. अनुयायी वर्ग; शिष्यशाखा. शिष्यसंप्रदायी शिष्यवर्गापैकीं (मनुष्य). **शिष्यानुशिष्य**–पुअव. शिष्य व त्यांचे शिष्य वगैरे; शिष्यपरंपरा; शिष्यांची मालिका. 'तो काय विद्वान! त्याचे शिष्यानुशिष्य किती होऊन गेले.' **शिष्यानुशिष्यपरंपरा**–स्त्री. एकामागून एक झालेले शिष्य व त्यांचे शिष्य यांचा अनुक्रम; मालिका.

शिस—न. डोकें, शिर. 'अर्धखांड अर्धमिशी । पांच पाटु काढिले शिर्सी।'–एरुस्व १२.१४९. [सं. शीर्ष] **०फूल**–न. स्त्रियांचें शिरोभूषण; डोक्यांतील दागिना. **शिसळ**–न. केसांच्या लोंबत असलेल्या बटा, जटा; पाठीवर अस्ताव्यस्त मोकळे सुटलेले केंस. **शिसार, शिसाळ**–स्त्री. मस्तकरोग; अर्धशिशी; डोकेंदुखी. 'शिसाराचें रागें लावगें। शिसचि जैसें।'–ज्ञा १८. १७९. सोहि; सिसं. **सिसाळ**–न. डोकें.

शिसकारी—स्त्री. १ पोटांतील मळमळ; कळमळण. २ (ल.) शिसारी; वीट; तिटकारा; कंटाळा.

शिसनेकड—न. (कों.) रहाट बाजूला तोलूं नये म्हणून रहाटाच्या गाडग्याला ज्या दोन काठ्या बांधतात त्यांपैकीं प्रत्येक.

शिसली—स्त्री. शिशी; लहान कुपी; बाटली. [फा.]

शिसव, शिंसव, शिसवी—पु.पु.स्त्री. एका काळ्या कठिण लांकडाचें झाड, याचें सामान व कोरींव काम उत्तम होतें. **शि(शिं)सवी**–वि. शिसवाच्या लांकडाचें केलेलें. **शि(शिं)सवेल**–न. शिसवाच्या लाकडापासुनं काढलेलें तेल.

शिंसा—पु ओळंबा. –सोहि. महदनु.

शिसा—पु. शिसव; शिसवीचें झाड.

शिसा—पु. १ मोठी बाटली; कुपी; काचेचें मोठें उभट भांडें. 'गुलाबशिसे उत्तमसे तीनचार पाठविलेत तर बरें होतें.' २ (शिसा) मधाचें मोहोळ (आकारावरून) [फा. शीशा]

शिसारी–टी, शिसाटी–री—स्त्री. १ तिटकारा; वीट; कंटाळा; २ दुर्गंधीमुळें येणारी मळमळ; ओकारी. (क्रि० येणें; बसणें). [शिस]

शिसाबासा–भासा, शिंसाबासा–भास—पु. १ फूटतूट; नफानुकसान; अपघात; दुखणें; भूतपिशाच्चादि बाधा; मोडतोड. 'भूतवैद्य केल्यानंतर आमच्या गुरांस शिसाबासा होत नाहीं.' २ (व.) चीजवस्त; मालाची जबाबदारी. 'लोकाचा शिसाबासा सांभाळणें मोठें जबाबदारीचें काम आहे.' [शिसा+बासा द्वि.]

शिसी—स्त्री. (चांभारी) भोंक; छिद्र. (चामडें टांगून पक्कें झाल्यावर त्यांतील पाणी बाहेर जाण्याकरितां पाडलेलें).

शिसें—न. एक काळसर जड धातु. [सं. शिमक] **शिसपेन**–स्त्री. शब्दशः शिशाची पेन्सिल; लकडी पेन्सिल; बिनशाईनें लिहावयाची लेखणी. [शिसें+इं. पेन] **शिसाशोध**–पु. शिसें घालून अशुद्ध रुपें शुद्ध करण्याची रीत.

शिस्त—वि. योग्य; लायक; शोभेसें; बिनचूक; बरोबर. [फा. शुस्त धुतलेलें] **०बाकी**–स्त्री. वसुली; येणें राहिलेली रकम; थकबाकी. **०वार**–वि. पद्धतशीर; योग्य प्रकारचें; शोभेसें; साजेसें; नियमानुसार. **शिस्तवी करणें**–नेम धरणें.

शिस्त—स्त्री. १ नेम; निशाण; वेध; संधान. (क्रि० धरणें; बांधणें). 'शिस्त धरून वनिं करोल वधितां हरणें ठिकाणीं

अडखळती।'-प्रला २३६. २ कुळांकडील वसुल करावयांसाठीं जो कुंळबार यादी करितात ती; बंदोबस्त. ३ विवक्षित पद्धतीनुरूप, संप्रदायानुरूप वर्तन, व्यवहार, जाबसाल; शिरस्ता; पद्धति; रीत. [फा. शिस्त]

शिहाना—वि. शाहणा पहा. 'विचारौनि पांता शिहाना नाहीं दादापरौता।'-शिशु २१२.

शिळई, शिळी—स्त्री. शीळ; शीट; (क्रि० वाजविणें; वाजणें) [ध्व]

शिळक-ळीक—स्त्री. शिलक पहा.

शिळकंबा, शिळकोपा—पु. प्र. शिळोपा पहा.

शिळट, शिळटी—स्त्री. १ गारठा; सर्दी; हवेंतील थंडपणा. शैत्य,(क्रि० पडणें; लागणें). २ जमीनींतील ओल, गारवा; ओलावा. (क्रि० येणें).'जमीनीला शिळट येऊं द्या मग पेरा.'[सं. शीतल]

शिळटणें-अक्रि. १ हवेंतील गारठा बाधणें; थंडीनें (पिकांस) इजा होणें. २ शिळें होणें.

शिळणधार, शिळंधार, शिळाधार—वि. क्रिवि. अति जोराचा, झपाटयाचा (पाऊस, सर, वगैरे). [सं. शिला+धारा]

शिळपट—वि. १ घांसलेलें (नाणें, पैसा, ठसा). २ बोथट; बोजड; बसलेली (शस्त्राची धार, टोंक वगैरे). ३ (ल.) ढिला; नेभळट; पुळपुळीत; निःसत्त्व; भोंगळ (मनुष्य, कारभार, व्यवहार वगैरे). [सं. शिला+पट]

शिळबुडा—वि. गारठा मोडलेलें; शिळमोड, कोमट; उबट; (पाणी, पदार्थ वगैरे).

शिळवट-टी—स्त्री. शिवळ पहा.

शिळा—स्त्री. शिला; मोठा सपाट दगड; पाटा. 'शिळा मनुष्य झाली। ज्याच्या चरणाचे चाली।'-तुगा ३८८. [सं शिला] ०**चुंबी**-पु. लोहचुंबक. ०**छाप**-पु. कागदावर लिहिलेला मजकूर शिलेवर उठवून छापण्याची पद्धति. ०**धार-धारा**-वि. शिळणधार पहा. ०**रस**-पु. शिलारस पहा. ०**राशि**-पु. शिलाराशि पहा. ०**श्वेत-सेत**-पु. १ दगडांचा सेतु, पूल. २ (ल) मजबूत, भरीव, घट्ट बांधणीचें पक्कें घर, यंत्र, काम, मसलत, घडण वगैरे (क्रि० बांधणें). [सं. शिला+सेतु] **शिळोच्चय**-पु. पर्वत. [सं. शिलोच्चय]

शिळा—वि. १ पर्युषित; बासा; पारोसा; जुना; निःसत्त्व २ (कों.) थंड; निवालेला. ३ (ल.) थंडा; ढिला; मंद (कारभार, व्यवहार, धंदा, स्वभाव). [सं. शीतल] **शिळ्या कढीला ऊत आणणें-येणें**-विसरलेली, जुनी झालेली गोष्ट उकरून काढणें; मागाहून अवसान आणणें. ०**पाका**-वि. उरलेसुरलेलें; आदल्या दिवशींचें; जुना; बेचव. **म्ह**० शिळेपाकें खाल तुम्हीं बांगडीसे व्हाल. ०**पाडवा**-पु. पाडव्याचा सण झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीं उरलेलें सणाचें पक्कान्न खाणें. ०**बाजार**-पु. मुख्य बाजाराचा दिवस होऊन गेल्यावर नंतर जीं एखाद दुसरीं दुकानें राहतात तीं; (मोडजत्रेप्रमाणें). ०**बिब्बा**-पु. एखाद्या कामांत पडला असतां तें काम लवकर संपवावयाचा नाहीं व सोडावयाचा नाहीं व कोणी बोलेंल तरी रागवावयाचा नाहीं असा फारच धिमा, मंद, चेंगट मनुष्य. **शिळवड-वट, शिळावट, शिळवण, शिळवरें**-न. (राजा.) शिळे पदार्थ (भात, भाकरी वगैरे). **शिळव(-वि-)णें**-उक्रि. शिळें करणें; दुसऱ्या दिवसाकरितां राखून ठेवणें; ताजेपणा नाहींसा करणें, घालविणें. **शिळावळ**-स्त्री. शिळें अन्न खाणें; शिळ्या पदार्थांचें भोजन. **शिळी ओटी**-स्त्री. गर्भाधान विधीनंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं मुलीची आई तिची ओटी निजावयाच्या खोलींत भरते ती.

शिळावेळ-शिळावळ—स्त्री. थंड वेळ; शिळोपा. [सं. शीतल+वेला] **शिळावन, शिळान**-स्त्री. शिळोपा; हवेंतील थंडाई; अभ्रांची छाया; मळभ. [सं. शीतल]

शिळासप्तमी—स्त्री. श्रावण शुद्ध सप्तमी. या दिवशी स्त्रिया वाण देतात. [सं. शीतला+सप्तमी]

शिळावर्त—पु. घोड्याच्या गुडघ्यावरील भोंवरा. -अश्वप १.९७.

शिळु—पु. शील; स्वभाव. [सं. शील]

शिळोत्तरा पाटीलकी—स्त्री. खार धरावयाची असतां अथवा मिठागर करतांना समुद्राचें किंवा खाडीचें पाणी अडविण्याकरितां जो बंधारा बांधावयाचा असतो त्यास जें एक द्वार राखलेलें असतें तेथें एक शिळा बसवीत. (शीळ पहा). या द्वाराची व शिळेची देखरेख ठेवण्याकरितां जो मनुष्य नेमलेला असतो त्यास जो हक्क किंवा वतन दिलेलें असतें ती.

शिळोत्तरा-री-शिळोत्तरा पाटील-शिळोत्तरीदार, शिळोत्री—पु. वरील शिळोत्तरा पाटिलकीचा वतनदार.

शिळोपा—पु. १ दिवसांतील थंड वेळ. शिळावेळ पहा. २ हवेंतोल थंडावा; गारवा; गारठा; सर्दी. [सं. शीतल]

शिक्षक—पु. १ पंतोजी; गुरूजी; अध्यापक; विद्या वगैरे शिकविणारा. २ (लष्क.) चोर वगैरेंस शिक्षा करणारा. [सं. शिक्ष्] **शिक्षण**-न. १ अध्ययन; शिकवणूक. २ दंडन; शिक्षा करणें; पारिपत्य; शासन. ३ अध्यापन; शिकवणी; शिकवणूक. **शिक्षणीय**-वि. १ शिकण्यास; अध्ययन करण्यास योग्य, शिकण्यासारखा. २ दंडनीय; शिक्षा करण्यास पात्र. **शिक्षणें**-उक्रि. १ शिकविणें; समजून सांगणें. २ दंड करणें; शिक्षा करणें; ताडन करणें. **शिक्षा**-स्त्री. १ शिक्षण; अध्ययन; अध्यापन. 'बापाच्या शिक्षेमुळें मीं पंचवीस वर्षें अगोदर जन्मून जितकें

ज्ञान प्राप्त झालें असतें तितकें झालें.' –नि ७१. २ दंड; पारिपत्य; शासन. **शिक्षापिणें**–सक्रि. शिकविणें. 'जो का तुम्ही शिक्षापिला । विद्या देऊनि कुरुठा केला ।' –ह्रा १.९५. **शिक्षावार**–क्रिवि. दिलेल्या शिक्षांप्रमाणें. उदा० शिक्षावार–तनखा–पत्रक–ताळेबंद. **शिक्षावारी**–स्त्री. शिक्षांप्रमाणें केलेलें पत्रक. **शिक्षित**–वि. १ शिक्षण मिळालेला; शिकलेला; निपुण; पंडित. २ शिक्षा, सजा दिलेला; शासित; दंड झालेला. ३ शिस्तीचा; सुव्यवस्थित; वळण लावलेला. ४ अध्ययन केलेला; वाचलेला; पढलेला; अभ्यासलेला (ग्रंथ, विषय, पुस्तक). **शिक्ष्य**–वि. १ शिकवावयाचा; शिकविण्यास योग्य. २ शिक्षा करण्यास पात्र; दंडनार्ह.

शी—अ. कालवाचक क्रियाविशेषणांस लागणारा एक निरर्थक प्रत्यय. उदा० केव्हांशी; कधींशी; तधींशी; एव्हांशी; मगशी इ० याप्रमाणेंच शेन आणि शीक हेहि प्रत्यय लावतात. प्रौढ भाषेंत हे सामान्यतः आढळत नाहींत.

शीं—स्त्री. (गो.) थंडी; शैत्य; सर्दी. [सं. शीतम्]

शी—स्त्री. घाण; विष्ठा.

शी—उद्गा. तिरस्कारदर्शक, तिटकारा दाखविणारा उद्गार.

शीक—स्त्री. शिक्षण; शिक्षा; रीत. 'तव दसवंती म्हणे आणा शीक लावूं।' –तुगा १२२. 'म्हणोनि किंवा स्मर शीक लावी।' –सारुह २ ६२. [सं. शिक्ष्]

शीक—न. शिंकें.

शीक-ख—पु. नानकपंथी मनुष्य; एक हिंदु धर्मांतील पंथ व त्यांतील व्यक्ति. [सं. शिष्य]

शींक—स्त्री. शिंक; चिच्चिका; नाकांतून ठसक्यानें बाहेर पडणारा वायु. (क्रि० जाणें; येणें). [सं. छिक्का; ध्व.]

शीग—स्त्री. १ धान्यानें माप भरलें असतां मापाच्या वर येणारी निमुळती रास. २ जमिनीवर धान्याची अगर इतर पदार्थांची रास केली असतां वर दिसणारा निमुळता भाग. ३ शिखर; उंचवटा. ४ (ल.) अखेर; शेवट; मर्यादा; अवधि. 'नेली कृष्णें न्यावी स्वपदाश्रित कामना शिगेला जी।' –मोगदा ५.१७. ५ सपाट जमिनीवरील उंचवटा. [सं. शीर्षक] (वाप्र.)**शीगमाप देणें**–क्रि. १ चांगलें माप घालणें. २ (ल.)एखाद्याची चांगली भरपाई करणें. **शिगेस चढणें**–शिखरास, पूर्णत्वास जाणें. 'कीं बहु चढला तुजा मद सिगेला।'–मोउद्योग १३.३३. सामाशब्द– **०लोट**–(शिगेच्यावर गेलेलें) अतिशय समृद्धि, संपन्नता; गर्दगंज. 'शीगलोट पीक–अमदानी–दौलत इ०.' –क्रिवि. समृद्धिपूर्ण; संपन्नतेनें. **०लोटा**–वि. अंतीं धान्यादिकांची शीग लोटून सपाट केलेलें (माप; पात्र). **शीगचर**–क्रिवि. अगदीं शीग लागेल इतक्या प्रमाणांत. अति समृद्धतेनें. **शिगोशीग**–अ. (ना.) अगदीं भरून; सांडेतोंवर; तोंडातोंड.

शीघ्र—वि. त्वरायुक्त; चलाख; त्वरितगति. –क्रिवि. त्वरित; सत्वर; लवकर; जलद; ताबडतोब. **०कवि**–पु. त्वरेनें काव्य करणारा; जलद कविता रचणारा; कोणत्याहि विषयावर ताबडतोब काव्य करतो तो. **०केंद्र**–न. (ज्यो.) युतिस्थान (उच्च) व ग्रह यांमधील सूर्याशीं होणारें कोनात्मक अंतर. **०कोपी**–वि. एकाएकीं, तत्काल, एकदम, ताबडतोब रागावणारा; यत्किंचित कारणावरून रागावणारा; तापट; रागीट. **०फल**–न. (ज्यो.) ग्रहापासून पृथ्वी व सूर्य यांस जोडणाऱ्या रेषा काढल्या असतां त्यांमध्यें होणारा कोन. **०बुद्धि**–वि. तीक्ष्ण, तरतरीत बुद्धीचा; चलाख; कुशाग्र बुद्धीचा. **०संतोष**–वि. लवकर संतुष्ट होणारा. **शीघ्रोच्च**–न. (ज्यो.) ग्रहाच्या कक्षेंतील सूर्यापासून सर्वांत दूरचा बिंदु. (इं.) लोअर ॲप्सिस. याच्या उलट मंदोच्च. **शीघ्रोच्च मंदोच्च सूत्र**–न. (ज्यो.) ग्रहाच्या कक्षेंतील सूर्यापासून सर्वांत दूरचा व जवळचा बिंदु जोडणारी रेषा; उच्चनीचरेषा. (इं.) लाइन ऑफ अप्साइडस.

शीट—स्त्री. पक्षाची विष्ठा.

शीट—न. चीट; रंगीबेरंगी कापड. [इं. चिंट्स]

शीट—स्त्री. शिटी; शीळ. [ध्व.]

शीड—न. १ गलबतांचें अवजार; वारा धरण्याकरितां गलबतावर जें कापडाचें केलेलें साधन वापरतात तें. २ (ल.) पाणीदार घोड्याचा मानेचा बांक. **०अर्धा करणें**–शीड पाडणें, उतरणें, गुंडाळणें. **०उतरणें**–(ल.) कमीपणा होणें; मानहानि होणें; अपयश येणें. **०उभारणें**–१ शीड मोकळें सोडणें; वारा धरून गलबत चालू करणें. २ (ल.)भरभराट होणें; उत्कर्ष होणें. **०चढणें**–उत्कर्ष होणें; वैभवास चढणें; ऐश्वर्य प्राप्त होणें. **०धरणें**–(ल.) घोड्यानें चालतांना ऐटीनें मान वर करणें. **०हाकारणें**–शीड चढविणें; मोकळें सोडणें. सामाशब्द– **०काठी**–स्त्री. डोलकाठी; शीड बांधावयाची मोठी काठी. **०दोर**–पु. शीड आवळण्याचें दोरखंड. **०बंद**–पु. शीड फाटूं नये म्हणून त्याच्या कांठास शिवलेला जाड दोर.

शीण—पु. १ थकवा; ग्लानि; भागवटा; अति श्रम केल्यामुळें येणारें गात्रवैकल्य; दमणूक. (क्रि० येणें; वाटणें; मानणें). २ कंटाळा; तिटकारा; खेद; तिरस्कार. 'तुमच्याच मुलानें तुम्हांस शिवी दिली म्हणून मला शीण वाटला.' ३ व्यर्थ श्रम; निष्फळ यत्न. 'रामदास स्वामींविण। केला तितुकाही शीण।' –नवनीत पृ. १४७. [सं. शीर्ण] **०भाग**–पु. थकवा; ग्लानि; दमणूक (सामान्यतः) [शिणणें+भागणें] **शिणोटा**–पु. थकवा; भागोटा.

शीण—पुस्त्री. वय; उमर; वयोमान; वयोमर्यादा. 'तो आणि मी एका शिणेचे आहों.' [अर. सिन्न=वय, काल] **शीण भीण**

फिटणें–वयांतील अंतरामुळें वाटणारा आदरयुक्त दरारा, भीति कमी होणें. **शीण भीण फेडणें**–वरील प्रमाणें आदर, भीति कमी करणें, नाहीशी होणें. [शीण+भीण–भीति, भेणें]

शीण—न. (गो.) उसनें वाण. **शीणकाडप**–उसनें वाण फेडणें.

शीत—न. १ शिजलेल्या भाताचा कण, दाणा. २ (कों.) ग्रामदेवतांस दाखवावयाचा (वार्षीक) नैवेद्य; बलि. [सं. सिक्थ] **म्ह०** १ शितावरून भाताची परीक्षा. २ असतील शितें तर मिळतील भुतें. **०कण–कूण**–पुन. भाताचें शीत. 'एक कढ येऊन गेला म्हणजे आंतील एक शितकण बोटानें चेपून पाहून' –पाकशास्त्र. **०वड**–स्त्री. (कों.) भाताच्या शितांचा पसारा; भाताची सांडलेलीं शितें. **०डी**–स्त्री. गोळा; गठ्ठा; गुठळी; कवडी (नासलेलें दही, रक्त, कढी, खीर इ० चा गोठून झालेला).

शीत—न. धनुष्याची दोरी; प्रत्यंचा. 'कडकड धनु मोडे वोढितां शीत नेटें' –माधव रामायण बाल २६.

शीत—न. १ (विणकाम)ताण्यामधील खालचे वरचे दोरे अलग करणारी आडवी काठी. २ (कों.) शिमग्याध्यें सहाणेवर पुरण्याकरितां आणतात तो सुरमाडाचा किंवा इतर झाडाचा शेंडा.

शीत—न. थंडी; शैत्य; सर्दी. [सं. शीत] –वि. १ थंड; गार. २ (ल.) मंद; जड; उदासीन; आळशी. **शीतक**–पु. पदार्थ थंड करण्याचें, थिजविण्याचें यंत्र. (इं) कन्डेन्सर. **शीत कटिबंध**–पु. ध्रुव व ध्रुववृत्तें यांमधील प्रदेश. **शीतकर**–पु. चंद्र. **०काल**–पु. १ हिंवाळा; हेमंत व शिशिरऋतूंचा काळ. २ हिंवाळ्यांतील व पावसाळ्यांतील मिळून सहा महिन्यांचा काळ. [सं.] **०ज्वर**–पु. थंडीपासून आलेला ताप; हिंवताप. [सं.] **०पित्त**–न. १ एक प्रकारचें कोरडें कुष्ट. २ पित्तदोषामुळें येणारें पडसें, होणारी सर्दी, शैत्यविकार. [सं.] **०भानु**–पु. चंद्र. 'जैसा नभीं न भी घन गर्जे झांकोनि शीतभानु रवी –मोकर्ण ११.२४. 'चौगुणीनें जरि पूर्ण शीतभानु' –र. [सं.] **०मंगल**–वि. दोन्ही कुशीखालीं दोन भोंवरे असणारा (घोडा). –अश्वप १२४. [सं.] **०मेह**–पु. १ मूत्रावरून ज्ञात होणारा शैत्यविकार, सर्दी, पडसें. २ अशा विकारांत होणारी लघवी. [सं.] **०वास**–पु. थंडीच्या वेळीं पाण्यांत उभें रहाणें; एक प्रकारची तपस्या. [सं.] **०वीर्य**–वि. ज्याचे गुणधर्म थंड आहेत असा; शैत्यकारक; सर्दी उत्पन्न करणारा. **०सुगंध**–पु. थंड व सौम्य असा सुवास. –वि. थंड व सौम्य अशा सुवासयुक्त (वाऱ्याची झुळुक) [सं.] **शीतांशु**–पु. चंद्र. **शीतोष्ण**–वि. कोंबट; अर्धवट उष्ण. **शीतता**–स्त्री. थंडी; सर्दी; शैत्य. **शीतल–ळ**–वि. १ थंड; गार. २ मऊ; सौम्य; सुखकारक. **शीतळशाई**–स्त्री. एक मुलांचा खेळ. 'हमाम्या शीतळशाई। पोरा मेली तुझी मायी।' –भज ३३. **शीतला–ळा**–स्त्री. १ देवी; अंगावर उठणारा फोडयांचा रोग. (क्रि० येणें; निघणें; मावळणें; कानपणें). २ या रोगाची देवता. **शीतला(ळा)देवी**–स्त्री. देवी या रोगाची देवता. **शीतळचिनी-पाटी-शिमगा**–शितळ पहा. **शीतळावो**–पु. थंडावा; गारवा.

शीत—वि. सहा; सहा ही संख्या. अरबी वर्षांस लावतात. [अर. शीत्]

शीद—न. आपटयाचें झाड. –बदलापूर २८४.

शीन—वि. जुनें; मोडकें; जीर्ण; मोडकळीस आलेलें. [सं. शीर्ण]

शीनबाज—पु. एक पक्षी. हा गांवचिमणीपेक्षां थोडा लहान असतो. रंग गडद उदी असून छातीवर पांढरे ठिपके असतात. [फा.]

शीना—पु. छाती; ऊर. 'त्याची दुराटी बंदूक लाविली शिन्याला।' –सासंइ. रापुपो ३. [फा. सीना]

शीप—स्त्री. शिंप; शिंपी; शुक्ति. [सं. शुक्ति]

शीम—स्त्री. (राजा.) शींव; सीमा; मर्यादा; हद्द. [सं. सीमा] **शीमधडा–ड्या–डी**–पु. शेजारी; शिंवधडा पहा.

शीर—स्त्रीन. एका बाजूस पात्या वळलेला माडाचा झांप.

शीर—स्त्री. १ शरीरांतील नाडी; अशुद्ध रक्तवाहिनी; धमनी; सामान्यतः रक्तवाहिनी; नस. २ मज्जातंतु; स्नायु; मांसदोरक; आंत्रदोरक. ३ पान, फळ वगैरेंतील रसवाहक तंतुसदृश भाग. ४ लाकडांतील रेषा, लकीर, रेघ, (यावरून) फळी, खांब, लांकूड याची कड. [सं. शिरा] **शिरा घेणें, शिरा किंवा शीर घेणें–काढणें–तोडणें–देणें**–शीर तोडून रक्त काढणें. **शिरा तानने, ताणणें–ताणून, तानून ओरडणें–बोलणें–भांडणें–रडणें–वाद करणें**, इ.–मोठयानें, जोरजोरानें हांका मारणें, बोलणें, भांडणें, तंडणें, ओरडणें शोक करणें, वादविवाद करणें इ०. **शिरा-शिर तोडणें**–घोडा खच्ची करणें. **शिरा निघणें**–कृश, रोड झाल्यामुळें शरीरावर शिरा स्पष्टपणें दिसूं लागणें. **शिरा फुगविणें**–रागानें, क्षोभानें शिरा तटतटून उठणें. (**म्हशीला, गाईला, घोडीला, बायकोला**) **शीर फुटणें**–दूध वाहूं लागणें. **घोडयाला, पोराला–शीर फुटणें**–जोरानें वाढीस लागणें. **शीरवाला**–वि. शिरा, रेषा उठून दिसणारा; खारकेसारखा (हिरडा वगैरे).

शीर—न. डोकें; मस्तक; शीर्ष; शरीराचा खांद्यापासून वरचा भाग; मुंडकें. [सं. शिरस्] **म्ह०** शीर सलामत तो पगडया पचास–मनुष्य जीवंत राहील तर अनेक गोष्टी मिळवूं शकेल. **शीरखंड, शीरटोप** वगैरे **शिरखंड, शिरटोप** इत्यादि शिर खालीं पहा. **शीरदळ**–रक्तपेशींचें जाळें; रक्तपेशींचा, शिरांचा समुदाय;

डोकें. **शीर मुंडणें**–संन्यास घेणें. **शीरगणती**–स्त्री. खानेसुमारी; मनुष्यांची मोजदाद.

शीर्ण—धावि. विस्कळित; मोडकेंतोडकें; अवयव निखळलेला; विकलगात्र; बिघडलेला; नासलेला. [सं.]

शीर्ष—न. मस्तक; डोकें; शीर. [सं. शीर्ष] **शीर्षाभिनय**–पु. डोकें हलवून केलेले अभिनय, हावभाव. उदा० अकंपित, धुत, विधुत, परिवाहित, आधुत, अवधुत, अंचित, निहंचित, परावृत्त, उत्क्षिप्त, अधोगत, लीलित व कंपित. **०पादी**–पु. जटरपादी प्राण्यांच्या वर्गांतील प्राणि. या प्राण्यांच्या डोक्याभोंवती आठ किंवा दहा भुजा असतात. **शीर्षासन**–न. डोकें खालीं टेकून पाय वर ताठ करून उभें राहणें. याचे तीन चार प्रकार आहेत. –संयोग ३४१.

शील—न. (कों.) शील.

शील—न. १ स्वभाव; अंगभूत गुणधर्म; उपजत गुण; देहस्वभाव. २ सुवृत्ति; सोज्वल स्वभाव, वर्तन, वर्तणूक, चारित्र्य; सद्वर्तन. (समासांत) –वि. युक्त; संपन्न; स्वभावतःच असलेला; उपजत कल असलेला; प्रवृत्तीचा. उदा० अध्ययन–कर्म–धर्म–दान–पुण्य–पाप–विद्या–पठन–विचार–व्यय–दया–कृपा–न्याय–स्नानसंध्या–गायन –सुकर्म – दुष्कर्म – अधर्म– अनुष्ठान–विषाद–शील. तसेंच सुशील; दुःशील; कुशील इ०. **शीलवान, शीलवंत**–वि. १ सुस्वभावी; सद्वर्तनी; सुवृत्त. २ उमदा; उत्तम जातीचा; जातवान; पाणीदार (घोडा).

शील—पु. धार लावण्याचा दगड. –बदलापूर १०३. [सं. शिला]

शील—स्त्री. चिलखत; बख्तर. 'शीलचा राउत.' –इपुस्त्रीपो १०. 'शिवबा शील करी अंगाला।' –पो १२. [अर. सिलाह्]

शीलवृत्ति—स्त्री. शिलवृत्ति पहा.

शीव, शींव—स्त्री. हद्द; मर्यादा; सीमा. [सं. सीमा] **शिवाणीं उभा न करणें, न राहूं देणें**–दूर अंतरावर ठेवणें; जवळ येऊं न देणें, जवळ उभा न करणें. **०करी–थडी–थडया–धड्या**–वि. शेजारी; पडोशी. **०शेजारी–सोयरा**–पु. शिवेजवळचा शेजारी; सीमेकडील मनुष्य. **०तकरार**–स्त्री. हद्दीसंबंधीं तंटा, भांडण. **०धोंडा**–पु. हद्दीवरील, हद्द दाखवणारा दगड. **०पूजन**–न. सीमांतपूजन; वराचें आपल्या गांवच्या सीमेवर (हल्लीं देवळांत किंवा मंडपांत) करावयाचें पूजन.

शीवड—पु. (गो.) एक जातीचा मासा.

शीवळ—स्त्री. शिवळ पहा.

शीस—न. मस्तक; शीर; डोकें. 'कां शीस खांडूनि आपुलें।' –ज्ञा ९.५००. [सं. शीर्ष] **०मणी**–पु. डोक्यांतील अलंकार, भूषण, दागिना. 'भुजंग शिरीं दीर्घवेणी। भाळीं शीस मणी कृष्ण मणी।' –जै १७.७२.

शीस, शींस—न. फुलाच्या मागें दिसणारा फळाचा दोडा; काकडी, भोंपळा वगैरे वेलावर फुलाबरोबर दिसणारी फळाची लहान आकृति. **०फूल, शींसफूल**–न. १ ज्याच्या मागें फळ धरूं लागतें, लहानसें बोंड दिसतें असें (काकडी, भोपळा वगैरे) वेलाचें फूल. याच्या उलट वायफूल=वांझें फूल. २ डोक्यांत घालावयाचें स्त्रियांचें भूषण. **०फूल–फुली**–वि. फळें धरणारें, वांझ नव्हे असें फळझाड.

शीळ—स्त्री. शिटी; शिऊळ. (क्रि० घालणें; वाजणें). [ध्व.]

शीळ—न. शील पहा. 'सज्जनाचें शीळ। स्वभाव जैसें।' –ज्ञा १३.२९१. [सं. शील]

शीळ—स्त्री. १ दगड; विशेषतः मऊ गुळगुळीत व सपाट दगडास म्हणतात; दगडाची चीप, पाटा, धार लावण्याचा दगड, स्नान करण्याचा दगड, धुण्याचा दगड, उंबऱ्याचा दगड वगैरे. –न. खार धरणें, किंवा मिठागर बांधणें याकरितां जो समुद्रकाठीं अथवा खाडींत बंधारा घालतात त्यांत मधून मधून द्वारें ठेवतात त्यांत दगड बसवावयाचा असतो त्या दगडावरून त्या द्वारांसहि म्हणतात. (क्रि० बांधणें; दडकणें; भरणें; मिळवणें; फुटणें). नंतर हीं द्वारें रक्षण करण्याकरितां एका मनुष्याची नेमणूक करतात त्यास शिळोत्तरा पाटील म्हणतात. या द्वारांत दगड बसवितात त्यासहि पाटील नांव देतात. खारीच्या तोंडासहि शीळ म्हणतात. [सं. शिला]

शीळवंत—पु. जंगमांतील एक वर्ग व त्यांतील व्यक्ति.

शु॥—(संक्षेप) शुद्ध, शुक्ल (पक्ष).

शुक—पु. १ पोपट; राघू; रांवा. 'जैसी ते शुकाचेनि अंग भारें।' –ज्ञा ६.७६. २ व्यासपुत्र; श्रीमद्भागवताचा वक्ता. 'ए–हवीं विषय जिणोनि जन्मले। जे शुकादिक दादुले।' –ज्ञा ११.१७३. [सं.] **०स्वामी**–पु. (ल.) अत्यंत कृश मनुष्य; पाप्याचें पितर. **०तुण्ड(हस्त)**–पु. (नृत्य) आंगठा, तर्जनी व अनामिका तळहाताकडे वळविणें व मधलें बोट व करंगळी ताठ उभी ठेवणें. **०नलिकान्याय**–पु. पोपटास धरण्याकरितां बांधलेल्या नळीवर पोपट बसला म्हणजे ती फिरून तो उलटा होतो व पडण्याच्या भीतीनें तीस घट्ट धरून बसतो. तीस सोडलें तर आपण मोकळें होऊं हें त्यास समजत नाहीं हा दृष्टांत. **०नासिक**–वि. पोपटाच्या चोंचीसारखें बांकदार नाक असलेला. **०नासिका**–स्त्री. पोपटाच्या चोंची सारखें बांकदार नाक. (इं.) रोमनोझ. **शुकाचार्य**–पु. (ल.) ब्रह्मचारी; व्रतस्थ. **शुकी**–स्त्री. पोपटाची मादी.

शुकर—न. सूकर; डुकर. 'तुका म्हणे घुबडा ऐसें । जन्म सरिसें शुकराचें । ' –तुगा २४६८. [सं. सूकर]

शुकरगुजार—वि. कृतज्ञ; आभारी; शुक्र पहा. [फा.]

शुका-क्का—पु. आज्ञापत्र; फर्मान; हुकूम; राजाज्ञापत्रिका. [अर. शुक्क]

शुकुर—वि. कुशल. –राव्यको ८.२६. शुक्र पहा. [फा.]

शुकुरवार—पु (अप) शुक्रवार पहा.

शुक्-क्क—उद्गा. मांजरास हांकून लावण्यासाठीं उच्चारावयाचा शब्द. [सं. षुक्-जाणें-भाअहा १८३५] **शुक्क असणें-होणें**-शून्य, निर्जन, स्तब्ध, शांत असणें. **शुक्क करणें**-निवारण करणें; प्रतिषेध, प्रतिबंध करणें. **शुक्क न करणें**-प्रतिबंध न करणें; सदर परवानगी, मोकळीक देणें. **शुक्कशुक्काट**-पु. स्तब्धता; शांतता; निर्मनुष्यता; शून्यता.

शुक्ति, शुक्तिका— स्त्री. १ शिंपी. 'कां शुक्ति ते शुक्ती । हे होय प्रतीति । ' –ज्ञा १३.११३८. २ मोत्यांचा शिंपला. ' निडाराचेनि कोंदाटें । मोतियें नावरती संपुटें । मग शिवणी जैशी उतटे । शुक्तिपल्लवांची । ' –ज्ञा ६.२६६. **शुक्तिमान्**-पु. सात कुलाचलांपैकीं एक पर्वत. सप्तपर्वत पहा.

शुक्र—पु. १ आकाशांतील एक तेजस्वी ग्रह. २ दैत्यगुरु. [सं.] **०वार**-पु शुक्रग्रहाचा दिवस: सात वारांपैकीं गुरुवार व शनिवार यांमधील दिवस **शुक्राचार्य**-पु. १ दैत्यांचा गुरु. हा एक डोळ्यानें अंध होता यावरून. २ (ल.) एका डोळ्यानें आंधळा मनुष्य; एकाक्ष. [सं] **शुक्री**-वि. पांढऱ्या फिकट-रंगाचें पाणी असलेली (माती).

शुक्र—न. वीर्य; रेत; धातु ' आणि शुक्रशोणिताचा सांधा । ' –ज्ञा १३.१०६. [सं.] **०दोष**-पु. वीर्यात होणारा बिघाड, विकार, रोग. **०मेह**-पु. मूत्रांतून शुक्रस्राव होणारा रोग. **०स्तम्भन**-न. १ वीर्यपात थांबविण्याची क्रिया; रेतस्खलन न होऊं देण्याचा उपाय. २ रेतस्खलन होऊं नये म्हणून घ्यावयाचें औषध. **शुक्राश्मरी**-स्त्री. शुक्रजन्य मूतखडा.

शुक्र—न. डोळ्यांतील फूल. –योग २.५३१. [सं.]

शुक्र, शुकर—पु. आभार; आभारप्रदर्शन. ' ईश्वरें पुन जैन्म केला त्याचा शुक्र कोठवर करावा. ' –रा ६.६२१. [अर. शुक्र] **०करना**-आभार मानणें. **०गुजार**-वि. कृतज्ञ; आभारी. **०गुजारी**-स्त्री. कृतज्ञता; आभारप्रदर्शन ' बडेसाहेबानें आम्हां पासून नवी डाकेबिसी [आपली शुक्रगुजारी व येहसानमन्दाचें विनंतिपत्र याजकरितांच लिहविलें. ' –पदमव ९९.

शुक्ल—पु. १ फक्त ब्राह्मणांच्याच येथील याज्ञिक करणारा, ब्राह्मणांचें पौरोहित्य करणारा, ब्राह्मणांकडीलच भिक्षा घेणारा ब्राह्मणांचा वर्ग; गुजर ब्राह्मणांतील एक वर्ग, त्यांचा उपाध्याय. –बदलापूर २५०. २ (ज्योति.) सत्तावीस योगांपैकीं चोविसावा योग. –न. डोळ्यांतील फूल; डोळ्याचा रोग. [सं.] –वि. १ पांढरा; श्वेत; शुभ्र. २ चांदण्याचा; ज्यामध्यें चंद्रकला वाढत जाते तो (महिन्याचा पक्ष); या पक्षांतील (तिथि). **०काष्ठ-शुक्लेकाष्ठ**-न. (अप, शुष्ककाष्ठ). १ नसतीव्याद, अडगळ, अडचण; टुमणें; समेमिरा; झेंगट; लचांड; झट; लिगाड. (क्रि० लावून घेणें). २ पुरुषांचें गुह्येंद्रिय; शिस्न. ३ खोडा. ४ ओढाळ गाईच्या गळ्यांत बांधतात तें लोढणें. **म्हण०** बोलायला गेलें सुपाट पार्यीं पडलें शुक्लेकाष्ठ. एका बाईनें विनाकारण अधिक बोलून आपल्या नवऱ्यावर खोडयांत पडण्याचा प्रसंग आणला या गोष्टीवरून. **०पक्ष**-पु. १ शुद्ध पक्ष; चांदण्याचा पंधरवडा; ज्या पंधरा दिवसांत चंद्राच्या कला वाढत जातात तो. २ (ल.) जातीमध्यें दोन पक्ष पडले असतां निर्दोष बाजूस, सत्य पक्षास म्हणतात; दुसरा कृष्णपक्ष-दोषी पक्ष. ३ प्रगति; वाढ; भरभराट; चागली बाजू. **०वृत्ति**-स्त्री. ब्राह्मणांकडेच पौरोहित्य करून किंवा प्रतिग्रह घेऊन निर्वाह करण्याची कृति, पद्धति; शुद्धाचरण. **०बिलावल**-पु. एक राग. या रागांत षड्ज, तीव्रऋषभ, तीव्रगांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी मध्यम संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. **शुक्लाष्टमी**-स्त्री. ज्येष्ठ शुद्ध अष्टमी. या दिवशीं शुक्ला देवीचें महात्म्य आहे. **शुक्लित**-न. वीर्य; रेत.–हंको.

शुचा—स्त्री. चिंता; काळजी; शोक; दुःख. ' अगा जगाही परौती । शुचा वाहे पै चित्तीं । ' –ज्ञा १८.६८७. [सं. शुच्]

शुचि—पु. १ आषाढ मास. २ शृंगार. –वि. पवित्र; शुद्ध; स्वच्छ; निर्मल. [सं. शुच्] **शुचित्व**-न. शुद्धता; स्वच्छता; पावित्र्य. ' तैसें शुचित्व नोहें । सज्जनांचे । ' –ज्ञा १२.१७४. **शुचिर्भूत**-वि. निर्दोष; पवित्र; शुद्ध: स्वच्छ. ' छंद हरिच्या नामाचा । शुचिर्भूत सदा वाचा । ' –तुगा २१८१. **शुचिष्मंत, शुचिष्मान्**-वि. पवित्र; शुद्धाचरणी. ' यावरी यादव सत्राजित । परम अनुष्ठानीं शुचिष्मंत । ' –ह २५.९.

शुचिस्रुवा—स्त्रीपु. अग्निहोत्र्याच्या पळ्या. ' पेशजी शुचिश्रुवे सोन्याचे विसाजी आपाजी याणी नेले ' –पेद ४.४४. [सं. शुचि+स्रुवा]

शुजा—वि. शूर; पराक्रमी. [अर. शुजा=शूर] **शुजाअत्-शुजात**-स्त्री. १ शौर्य; पराक्रम. २ शौर्यनिधी; एक पदवी. –इमं ६५. [अर. शुजाअत्]

शुंट, शुंठ—पुस्त्रीन. मठ; मद्दड; ढ; निर्बुद्ध. [सं. शुंठ्=आळस करणें]

शुंठ-ठी—स्त्री. सुंठ; वाळविलेलें आलें. [सं. शुंठी]

शुंडा, शुंडादंड—स्त्री. सोंड (हत्तीची). 'गगनगजाचे शुंडादंड।' –एरुस्व १.४४. [सं. शुण्=चालणें] **०धारी**–पु. प्राण्यांच्या एका वर्गाचें नांव. यांत हत्ती येतो. **०यंत्र**–न. अर्क काढण्याचें यंत्र; आसुतिपात्र; बकयंत्र; बकनळी.

शुर्णे—न. (गो.) कुत्रें; सुणें. [सं शुनस्]

शुत—उद्गा. मांजरें, कोंबडीं यांस हांकून लावतांना उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

शुतर, शुतुर—पु. उंट. [फा. शुतुर] **०खाना**–पु. उंटखाना; उंटांचा कारखाना. **०नाल**–स्त्री. उंटावरून वाहून न्यावयाची तोफ. **०बान**–पु. उंट हांकणारा. **०सवार-स्वार**–पु. उंटावर बसणारा.

शुतु—न. (मद्रास) पायांतील जोडवें. [तामिळ]

शुद्द—क्रि. झालें; घडलें; गेलें. उदा० मोर्तबशुद. [फा. शुद्-होतें, घडलें] **शुद्दगी**–स्त्री. होणें; होण्याची क्रिया. –आदिलशाहीफर्मानें. **शुदह्**–धावि. झालेला. –आदिलशाहीफर्मानें.

शुदामद, शुदामत—स्त्री. वहिवाट; पद्धति; चाल. 'कानगोह याचे दप्तरी शुदामद आहे.' –रा ६.५५४. [फा. शुद+आमद]

शुद्ध—न. ब्रह्म; चैतन्य. 'शुद्धीं अहंकार अळुमाळ। उठतां शुद्धासि करीं शबळ।' –एभा १३.४३२. –धावि. १ निर्मल; पापरहित; दोषरहित; पवित्र; स्वच्छ; निष्पाप. २ शोधित; संस्कारादिकानीं पवित्र, निर्मल केलेला; पावन केलेला. ३ निर्दोष; बिनचूक; चोख; बरोबर; अव्यंग. (व्यक्ति, लेखन, भाषण, वर्तन, क्रिया वगैरे). ४ एकाकी; साधा; विशेषणरहित. 'कांदा भक्षूं नये असा एक निषेध केला असला म्हणजे शुद्धाचा निषेध सर्व जातीवर जाईल'. ५ केवळ; फक्त; नुसता; निवळ. 'त्याची फ्रान्सच्या रणांगणावर शुद्ध लांडगेतोड चालली होती' –अस्पृ २. ६ शुक्ल; पांढरें; चांदण्याचा (पक्ष). ७ चांगला; शुभ; (कुयोगादि) दोषरहित; पवित्र (दिवस, तिथि). ८ योग्य; न्याय्य; बरोबर; संमत; 'कीं नृपशुद्ध युद्ध हा करितो।' –मोकर्ण १३.१७. याअर्थी अनेक समासांत हा शब्द येतो. उदा० आकारशुद्ध, आचारशुद्ध ९ अव्यंग; निरोगी; सुदृढ; घडघाकट. १० साक्षात्; मूर्तिमंत. 'सुमनें तीच्या रतीच जी शुद्ध।' –कर्म २. [सं. शुध्=स्वच्छ करणें] **०अपूर्णांक**–पु. (गणित) साधा अपूर्णांक. **०कल्याण**–पु. एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत व तीव्र निषाद हे स्वर लागतात आरोहांत मध्यम, निषाद वर्ज्य, अवरोह संपूर्ण. जाति औडुव-संपूर्ण. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. याचे भेद–कामोदकल्याण, जयकल्याण, भूपाळी कल्याण, यमन कल्याण, श्याम कल्याण, सावनी कल्याण, हमीर कल्याण, हेमक कल्याण इ० **०जाति**–स्त्री. (संगीत) शुद्ध स्वरांवरून तयार झालेली जाति. या सात आहेत–षाड्जी, आर्षभी, गांधारी, मध्यमा, पंचमी, धैवती व नैषादी. **०तान**–स्त्री. (संगीत) सप्तस्वरांच्या क्रमांत बदल न करतां घेतली जाणारी तान. **०पक्ष**–पु. शुक्लपक्ष; चांदण्याचा पंधरवडा. **०प्रीति**–स्त्री. निर्व्याज प्रेम; अहेतुक प्रेम. याहून भिन्न भयप्रीति, काम्यप्रीति इत्यादि. **०भोजन**–न. निरामिष, निर्मांस भोजन. **०मति**–वि. सरळ मनाचा; आंतबाहेर नसलेला; निष्कपट. **०मल्लार**–पु. (संगीत) एक राग. या रागांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत हे स्वर लागतात. जाति औडुव औडुव. वादी मध्यम, संवादी षड्ज, गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. याचे प्रकार पुढें दिल्याप्रमाणें आहेत–गौडमल्लार, नटमल्लार, मीरामल्लार, रामदासीमल्लार, मियामल्लार, मेघमल्लार, सूरदासीमल्लार, चर्ज्यूमल्लार, देसमल्लार, रूपमंजरीमल्लार वगैरे. **०मार्ग**–पु. सनातनधर्म; परंपरागत धर्म; परंपरागत मार्ग; पवित्र, सत्य, ऋजु मार्ग. 'विरक्त शुद्ध मार्ग सांगावा।' –दा २.९.३७. **०मुखी**–वि. पांढऱ्या कपाळाचा; गंध न लावलेला. **०राग**–पु. (संगीत) जो राग आपल्या नियमबद्ध स्वरांनीं रंजक होतो तो. **०लेखन**–न. व्याकरण नियमानुसार जें लिहिलेलें असतें, लिहावयाचें असतें तें. **०वृत्ति**–स्त्री. १ योग्य, अधिकारानुरूप व्यवसाय, धंदा: ब्राह्मणाचा धंदा–भिक्षाटन. २ निष्कपट, निष्पाप, सरळ स्वभाव, वर्तन. –वि. निष्कपट; सरळ; निष्पाप. **०शब्दयोगी अव्यय**–न. (व्या.) ज्या शब्दयोगी अव्ययांस शब्दांस जोडल्याशिवाय स्वत:चा अर्थ नसतो व जीं जोडतांना शब्दांचें सामान्यरूप होत नाहीं तीं. उदा० च, हि. **०शैव ब्राह्मण**–पु. गुरव. –केसरी १.९.३६. **०सत्त्व**–पु. रजोगुण अथवा तमोगुण यांच्या प्रभावानें मिश्र न झालेला सत्त्वगुण. 'आपुले आर्तीचें अंजन। शुद्ध सत्त्वाचें पत्र जाण।' –एरुस्व ३.१. **०समाचार**–पु १ कुशलवृत्त; सुवार्ता: खुशालीची बातमी. २ शुद्धि; भान; मन ठिकाणावर असणें. **०सामंत**–पु. (संगीत) एक राग. या रागांत षड्ज, कोमलऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत हे स्वर लागतात. आरोहांत गांधार, निषाद वर्ज्य, अवरोहांत निषाद वर्ज्य. जाति औडवषाडव. वादी षड्ज, संवादी मध्यम. गानसमय दिवसाचा पहिला प्रहर. **०सारंग**–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम. तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव षाडव. वादी ऋषभ, संवादी पंचम. गानसमय माध्यान्ह. या रागाचे प्रकार:–बडहंस, मियारंग, लंकादहन, बिंद्राबनी, मधुमाद, सावंतसारंग इत्यादि **०स्फटिक**–पु. १ (शब्दश:) निवळ, स्वच्छ, पांढरा स्फटिक. २ (ल.) निरक्षर, निष्कांचन, अक्षरशत्रु, ढ, कफल्लक इसमास

म्हणतात; तसेंच वस्त्रहीन, अर्थहीन, सर्वस्वीं नागवलेला अशा गृहस्थासहि म्हणतात. **०स्वर**–पु. (संगीत) जुन्या मताप्रमाणें बावीस श्रुतींपैकीं ४, ७, ९, १३, १७, २०, २२, या श्रुतींस ठेवलेलीं नांवें. नव्या मताप्रमाणें १, ५, ८, १०, १४, १८, २१ या श्रुतींची नांवें. दोन्ही पद्धतींत सा, रे ग, म, प, ध, नि हींच नांवें आहेत. **०स्वरूप**–न. ब्रह्म. **०ज्ञान**–न. ब्रह्मज्ञान; अपरोक्षज्ञान. **शुद्धद्वैती**–पु. एक संप्रदाय. मायाविरहित म्हणजे शुद्ध जीव व परब्रह्म हीं एकच आहेत असें मत. –गीर १७.

शुद्ध—स्त्री. शुद्धि; अपभ्रंश. शुद्धि पहा. **०बुद्ध**–स्त्री. शुद्धि व बुद्धि; ज्ञान; स्पष्ट जाणीव. –वि. १ (ल.) शुद्ध स्फटिक पहा. निरक्षर; निर्बुद्ध; ढ. २ खलास; निकाल; शून्यवत्. 'घृत नवनीत दधिदुग्ध। खाऊन केलें शुद्धबुद्ध।' –ह ६. ११७.

शुद्धान्त—पु. कक्ष्याबंध. –राव्यको ७.१७.

शुद्धि—स्त्री. १ शुद्धता; स्वच्छता; पावित्र्य; निर्मलता; निर्दोषता; निष्पापता. 'तया काळातें नुलंघणें। देशशुद्धिही साधणें।' –ज्ञा १८.६३६. २ शोधन; स्वच्छ, निर्मल, पवित्र करण्याची क्रिया. उदा० देहशुद्धि; पात्रशुद्धि; स्थलशुद्धि. ३ बरोबर, बिनचूक, निर्दोष करण्याची क्रिया, किंवा तशी स्थिति; निर्दोषता; निष्पापता; बिनचूकपणा. ४ ऋजुता; सरळपणा; चांगलेपणा; अशुभता; अमंगलता यांपासुन अलिप्तता. उदा० दिनशुद्धि; नक्षत्रशुद्धि. ५ देहभान; जागरूकता; सावधानता; स्मृति; चेतना; आठवण; सावधपणा; मूर्छेना, बेशुद्धि, भ्रांति, भ्रम यांपासुन अलिप्तता. 'यांची कां रे गेली बुद्धि। नाहीं तरायाची शुद्धि।' –तुगा ३५५. ६ शोध; तपास; विचारणा; खबर; बातमी; वार्ता. 'त्यानें सांगितली त्याला माझी शुद्धि। त्या कवीची बुद्धि समदृष्टि।' –मोअभंग (नवनीत पृ. २६०). 'जगचि हें होय जाये। तो शुद्धिही नेणें।' –ज्ञा ५.७९. [सं. शुध्] **शुद्धीवर आणणें**–देहभानावर आणणें; मार्गावर आणणें; योग्य दशेप्रत आणणें. **शुद्धीवर येणें**–देहभानावर येणें; सावध होणें; योग्य मार्गावर येणें; दोष, व्यसन टाकून देणें. **०पत्र**–न. १ प्रथांतील चुकांची दुरुस्ती दाखविणारें पान, पत्रक; शोधपत्र. २ एखाद्या मनुष्यास पातकक्षालनार्थ प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घेतल्याचा दाखला; परधर्मांतील गृहस्थास प्रायश्चित्तादि विधीनें शुद्ध करून स्वधर्मांत अगर जातींत घेतल्याबद्दलचें प्रमाणपत्र. **०सूची**–स्त्री. शुद्धिपत्र; शोधपत्र; चुका व त्यांची दुरुस्ती यांचें पत्रक.

शुध—वि. (अप.) शुद्ध पहा. 'अति आदरें शुध क्रीया घरावी।' –बा. मनाचे श्लोक १०५. 'रुपें सुंदरू जाहला शुधपक्षी।' –रामदासी खं. १ पृ. १८. **शुधी**–स्त्री. (अप.) शुद्धि पहा. 'वेळ कठिण मोठी तेव्हांची कैकांच्या हरल्या शुधी।' –होला. –ऐपो ३८६. 'तया रावणें सर्व सांडूनि शुधी।' –राक खं. १. पृ. १४.

शुनक—न. कुत्रें. 'शौरि म्हणे राजेंद्रा यद्यपि बलवान् तथापि शुनकानें।' –मोउद्योग नवनीत ३०६. [सं. शुनस्] **शुनी**–स्त्री. कुत्री. 'शुनी वसवसोनि पाठीं लागे।' –एभा १३. २०५. **शुनें**–न. कुत्रें; सुणें.

शुन्य—न. शून्य पहा.

शुपका—पु. शिपका पहा.

शुफा—पु (कायदा) प्रथम खरेदीचा हक्क; अग्रक्रय हक्क; शेजाऱ्याचा लगतची जमीन विकत घेण्याचा प्रथम हक्क. [अर. हक्क इ–शुफा]

शुबाह्, शुभह्—पु. संदेह; संशय; वहीम. 'शायद गरज्गो मनुष्याचे सांगण्यावरून शुबाह वस्वास राजे साहेबांचे अन्तःकरणांत प्राप्त होईल.' –रा १०.२५१. 'याच चालीनें तर्फेन दिलांत शुभह् आणितील.' –पया ४७८१. [अर. शुब्हा]

शुभ—न. १ सुदैव; कल्याण; अभ्युदय; ऐश्वर्य; सुखकारक स्थिति. २ (ज्यो.) अनुकूलता; कृपादृष्टि; कल्याणकारकता (तिथि, युति वगैरेची). ३ हितकारकता; लाभदायकता (एखाद्या वचनाची अथवा दिग्दर्शक गोष्टीची). –पु. (ज्यो.) सत्तावीस योगांपैकीं तेविसावा योग. –वि. १ मंगलदायक; लाभदायक; सुखकारक; चांगलें; सुदैवी; सुपरिणामी (कृत्य, विधि, शकून, चिन्ह, योग). २ मंगल; उत्सवरूपी; समारंभाचे (विधि, प्रसंग, संस्कार वगैरे). याच्या उलट अमंगल; अशुभ; श्राद्ध, पुण्यतिथि, वगैरेसंबंधीं. ३ सामान्यतः चांगलें; बरें; हवेसें. 'अशुभस्य कालहरणं· शुभस्य शीघ्रम्।' [सं. शुभ्=शोभणें, प्रकाशणें] **म्ह०** शुभ बोल रे नाऱ्या, मांडवास आग लागली. **०कर, शुभंकर**–वि. शुभदायक; मंगलकारक; हितकर; सुखकर. **०कर्म–कार्य**–न. मंगल समारंभ; उत्सव; कल्याणकारक संस्कार, विधि वगैरे (उदा० लग्न, चौल, मुंज वगैरे). **०कृत्य**–न. १ (शब्दशः) चांगलें कार्य; मंगलकार्य. २ (सांकेतिक) मैथून. **०गा**–स्त्री एक प्रकारची लगाम. –अश्वप १.१८५. **०ग्रह**–पु कल्याणकारक, सुखकारक ग्रह; बुध, शुक्र व गुरु. **०चिंतक**–वि. चांगली इच्छा करणारा; चांगलें चिंतणारा; बरें होईल अशी इच्छा करणारा. **०चिंतन**–न. चांगलें होवो अशी इच्छा; कल्याण इच्छिणें. **०चिन्ह–लक्षण**–न. मंगलप्रद, कल्याणकारक खूण, शकून, दिग्दर्शक गोष्ट. घोडयाचीं कांहीं शुभ चिन्हें–खुंटेगाड, देवमण, पंचकल्याण, रणशूर, श्यामकर्ण, गोम (सुलटी, शिरोमुखी), ब्रह्मिंग, गंगापाठ, कैरे डोळे, जयमंगळ, कंठाभरण, कुशावर्त,

सप्तदंती, बाहालकांचन, बदकमुख, पर्वती, चिंतामणी, मेखलामुख, अष्टमंगळ, हयकंठी, अधोमुखी गोम इत्यादि. शिलावर्त, पोटावर्त इ०हीं अर्धवट अथवा मध्यम गुणकारी व इतर अशुभ चिन्हें असतात तीं अशुभ चिन्हें या शब्दांत दिलीं आहेत. **०वर्तमान**–न. १ चांगली बातमी; सुवार्ता; मंगलवार्ता; संदेश. २ (ख्रि.) मॅथ्यु, मार्क, ल्यूक व जॉन यांनीं लिहिलेले नव्या कराराचे भाग. **०वार्ता**–स्त्री. मंगलदायक, कल्याणकारक, सुखकारक बातमी, वर्तमान, हकीकत. **०वेळ–ळा**–स्त्री. मंगलदायक वेळ; दिवसांतील कांहीं विशिष्ट अनुकूल काल. वेळ पहा. **शुभा**–स्त्री. १ पार्वतीचें नांव. २ गोंवर या रोगास म्हणतात. ३ (सांकेतिक, अशुभ सूचना टाळण्याकरितां) गोंवऱ्या, शेणी यांस म्हणतात. 'बळें शुभा धबाबिती। कित्येक ढेंकळें भिती।' –बसवकृत महाबळभट चरित्र १६. 'शुभा वेंचोनि देशील मातें। तरी पानगे करून भक्षूं येथें।' –भवि ५३.७९. 'शुभानावें विकती शेणी।' –निगा २८१. 'येका शुभा येकवटती।' –दा ६.९.७. **शुभांगी**–स्त्री. सुंदर स्त्री; रूपवती स्त्री. **शुभाचार**–पु. शुद्ध, पवित्र आचरण, वागणूक. 'शुभाचारें होती नारी।' –गुच ११.८. **शुभानना**–स्त्री. सुंदरी; रूपवती, देखणी स्त्री. **शुभावेळ**–स्त्री. शुभवेळ पहा. **शुभाशुभ**–वि. (शुभ+अशुभ) बरेंवाईट; मंगल व अमंगल; ऐश्वर्य अथवा दारिद्र्य; पापपुण्यात्मक. 'तैसीं शुभाशुभ कर्में। जियें निफजती प्रकृति धर्में।' –ज्ञा ३.१७८. **शुभासन**–न. मंगलकारक आसन, बैठक, जागा; सुंदर बैठक; शकुनाची जागा. 'शुभासनी रुक्मिणी बैसलीसे।' –सारुह ८ ६२. **शुभेच्छा**–स्त्री. ज्ञानी जीवाच्या सप्तभूमिकांतील पहिली भूमिका, ही मुळें अनुताप होऊन साधनचतुष्टयसंपन्नता येऊन गुरूपदेशपात्रता येते; चांगली मंगलदायक इच्छा.

शुंभ––पु. १ एका राक्षसाचें नांव. यास दुर्गेनें मारलें. २ (ल.) मठ्ठ, मद्दड, मूर्ख मनुष्य; बुद्धिहीन, मतिमंद पुरुष. 'शठ शुंभ कातरू।' –दा २.३.२९. [सं. शुंभ्=शोभणें]

शुभ्र––वि. पांढरें; धवल; श्वेत; सफेत. [सं.] **शुभ्रा**–पु. (सांकेतिक) रुपया. **शुभ्रांशु**–पु. चंद्र. 'शुभ्रांशूदय होतां जाउनियां शत्रुच्या पुरी माजी।' –मोरामायणें १.४४. **शुभ्रीकरण**–पांढरें करणें; ओपविणें; रंगहीन करणें. **शुभ्रोष्ण**–वि. पांढरें होईपर्यंत तापविलेलें. –पदाव २२. **शुभ्रोष्णता**–स्त्री. घन पदार्थ शुभ्र होई इतकी उष्णता. –रसा.

शुमार––पु. (रूढ) सुमार पहा. शुमार हें रुप शुद्ध आहे परंतु प्रचारांत सुमार हेंच आढळतें. [फा. शुमार]

शुरका––पु. अने. भागीदार; पातीदार; वाटेकरी. 'तीन शरिकांपैकीं येकासी नमूद झाल्यास त्यानें दोन शुरकांस इतला द्यावी.' –रा ७.८. [अर. शिर्क=भागीदारी]

शुरत––स्त्री. कीर्ति; नांव. [अर. शुहरा=कीर्ति]

शुरवात––स्त्री. सुरवात पहा. आरंभ.

शुरा––पु. कीर्ति; नांव. [अर. शुहरा=कीर्ति]

शुरू––पु. १ प्रारंभ; आरंभ. २ अरबी सन. –वि. आरंभिलेलें; चालू झालेलें. सुरू पहा. [अर. शुरू=आरंभ]

शुरू––पु. एक झाड; सुरूचें झाड. [फा. सर्व]

शुरू, शुरूंवुरू––वि. (रूढ) सुरुंवुरू पहा.

शुल्क––न. १ मुलीबद्दल वराकडून घेतलेलें द्रव्य; हुंडा. २ जकात; कर; दस्तुरी. ३ अहेर; (कायदा) विवाह प्रसंगाखेरीज मिळालेलें स्त्रीधन. –धका ६१. ४ घरगुती काम, घरचीं भांडीं वापरण्याबद्दल, दुभत्या जनावराची चाकरी केल्याबद्दल मिळणारा मोबदला, अवांतर प्राप्ति. [सं. शुल्क्=देणें]

शुल्ली––स्त्री. (तंजा.) जळाऊ काटक्या; ढलपी. [तामिळ–शुल्ली]

शुशुमार––पु. सुसर; मगर. 'शुशुमार घडियाळ मत्स्य मगर। कूर्म करमीन जळविखार।' –आदि २९.७७. 'नेणसि भव–शुशुमारा' –अ मुपद ४१. [सं. शिशुमार]

शुश्रूषण–षा––नस्त्री. १ सेवा; चाकरी; परिचर्या. 'ययाचें जें शुश्रूषण। तें शूद्रकर्म।' –ज्ञा १८.८८३. २ श्रवण करण्याची इच्छा. [सं. श्रु=ऐकणें]

शुषिरवाद्य––न. पोकळ वाद्य; पावा, अलगुज, मुरली, सनई वगैरे. [सं.]

शुषुप्ति––स्त्री. सुषुप्ति पहा. निद्रा.

शुष्क––वि. १ कोरडें; वाळलेलें; सुकलेलें. 'शुष्क काष्ठीं गुरगुरी। लाज हरि न धरितां।' –तुगा ३७५३. २ (ल.) रोड (शरीर); कृश. [सं. शुष्] **०अन्न**–न. कोरान्न; कोरडें अन्न; शिधा; धान्य. 'तयेसि म्हणे बाहुक। आम्ही करूं स्वयंपाक। शुष्क अन्न देईंजे सम्यक। आम्हालागी।' –कथा १. १०.१३५. **०ऊर्ध्वपात**–न. (शाप) कोरड्या पदार्थांस उष्णता देऊन केलेलें ऊर्ध्वपातन. (इं.) ड्राय डिस्टिलेशन–सेंपू २.६९. **०काष्ठ**–न. चुकीनें शुक्ल काष्ठ पहा. **०कूप**–पु. कोरडी विहीर. **०वाद**–पु रिकामा, निष्फळ वाद, चर्चा; कोरडा वाद. 'शुष्कवाद वृथा गोष्टी। त्यांतही वाग्वाद उठी।'–एभा १८.२०९. **०वैर**–न. १ अकारण शत्रुत्व; अहेतुक वाकडेपणा. २ निष्फळ, बेफायदा शत्रुत्व, भांडण. ३ शत्रुत्वाचा आविर्भाव; दिखाऊ भांडण. **शुष्काशुष्की**–क्रिवि. रिकामपणीं; निष्फळ; बेफायदा; निरुपयोगी (श्रम करणें, काम करणें, यातायात करणें, परिश्रम घेणें). **शुष्केष्टि**–स्त्री. अभ्यासाकरितां, शिकण्याकरितां, प्रत्यक्ष अनुभव घेण्याकरितां, करावयाच्या संस्कार, विधि अथवा प्रयोगाची तालीम, मांडणी; पूर्व प्रयत्न. [सं. शुष्क+इष्टि] **शुष्कोपचार**–पु.अव.

१ कोरडे, निष्फळ, व्यर्थ उपाय, योजना; बेफायदा तरतुद. २ (ल.) निरर्थक, पोकळ, प्रतिकार, आश्वासन, शुभेच्छाप्रदर्शन शुभचिंतन.

शुहदा—पु. शठ; सोदा; लुच्चा; हरामी; उडाणटप्पू. [हि. अर. शहीद=धर्मवीर अने.]

शुहूर—पु. अरबी सन; एक कालगणना. –अदिलशाही फर्मानें [अर. शुहूर=महिने, शहर्=चांद्रमास यांचें अनेकवचन; सं. सौर]

शूक—पु. न. १ कुसळ; कूस (गवत, धान्य यांचें). २ सड; कंटक; काटा. ३ सुरवंट; एक कुसळांचा किडा. [सं.] **०दोष**–पु. १ ज्यामध्यें कळा, शिलक, चमक, टोंचणी लागते असा रोग (कुष्ठ रोगाची पूर्वावस्था). २ सुरवंट घातलेला लेप, मलम वापरल्यामुळें होणारा रोग. (असा लेप बाजीकरणांत लावतात). **०धान्य**–न. ज्यास पुढें कुसळ असतें अशा जातीचें धान्य (भात वगैरे; याच्या उलट शमीधान्य).

शूकर—पु. डुकर. **शूकरी**–स्त्री. डुकरीण. 'शाक्तीची शूकरी माय। विष्टा खाय बिदीची।' –तुगा ४१२. [सं. सूकर]

शूद्र—पु. चातुर्वर्ण्यांतील चवथा वर्ण व त्या वर्णातील व्यक्ति. इतर तीन वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे होत. हा वर्ण विराट् पुरुषाच्या पायांपासून उत्पन्न झाला अशी समजूत आहे. २ (ल.) हा शब्द उपसर्ग रूपानें दुसऱ्या शब्दांस लाविला असतां त्या शब्दानें व्यक्त होणाऱ्या पदार्थाचा काळसर, धूसर, असा प्रकार दर्शविला जातो. उदा० शूद्र हिरा=काळसर, मंद तेजाचा हिरा. तसेंच शूद्र भांग–सबजी–पिंपळ=काळी भांग–सबजी–पिंपळ वगैरे. [सं.] **०दोक**–न. शूद्राचा स्पर्श झालेलें वस्त्र, पात्र, पाणी वगैरे. [शूद्र+उदक] **०मुखी**–वि १ पांढऱ्या कपाळाचा; कपाळास गंध नसलेला. २ पांढरे पायांचा व कपाळावर कोणतीहि खूण, चिन्ह नसलेला (घोडा). **०लोक**-वि. शूद्राचा स्पर्श झालेलें वस्त्र, पात्र, पाणी वगैरे. **शूद्री**–स्त्री. शूद्राची स्त्री; शूद्र जातीची स्त्री. –वि. शूद्रासंबंधी, शूद्राचें (भाषा, वेष, रीत, विधि वगैरे). **शूद्रोदक**–न. शूद्रदोक पहा.

शून्य—न. १ अभाव; राहित्य; नास्तित्व; रिक्तता; पोकळी. २ संख्येचा अभाव दाखविणारें चिन्ह; पूज्य. ३ अनुस्वार, विसर्ग दर्शक चिन्ह. ४ आकाश; अवकाश; पोकळी. ५ (वेदांत) निराकार ब्रह्म. 'आपुलिया साटोवाटीं। शून्य घेती उठाउठी।' –ज्ञा १२.५८. –वि. अभावात्मक; रिक्त; रिकामें; खाली; विरहित. (समासांत) द्रव्य–ज्ञान–युक्ति–अर्थ–जल–शक्ति–वृक्ष–पुष्प–पर्ण–शून्य. २ नग्न; उघड; निर्वस्त्र; पात्रादि विरहित; वस्तुविरहित; पोकळ; उघडेबोडकें. ३ उजाड; निर्जन; सुनें; बेचिराख. (समासांत) शून्य–मंदिर–गृह–प्रांत–स्थल. 'धावोनि ये उटज केवळ शून्य पाहे।' मोरामायण १.४२५. ४ बधिर; चेतनारहित; संज्ञाविरहित. 'तो आपल्या शोकावेगानें इतका शून्यचित्त झाला होता...' –मायेचा-बाजार. (वाप्र.) **शून्यस्थानीं पडणें**–निष्फल, निरर्थक होणें; वाऱ्यावर जाणें. 'परि जेवणार ते रोगिष्ट। तरि ते सुगरिणीचे कष्ट। शून्यस्थानीं पडियेले।' [सं. शुन्=जाणें] समासशब्द **०ख्याति**–स्त्री. ख्याति पहा. **०दृष्टि**–स्त्री. १ निर्विकार, चेतनारहित दृष्टि. 'तिच्याकडे तो शून्यदृष्टीनें पहात बसला.' –मायेचा बाजार. २ (नृत्य) एक अभिनय. डोळ्यांतील बुबुळें स्तब्ध व एका रेषेत ठेवणें, पापण्या निश्चळ दाखविणें. हा चिन्तादर्शक आहे. **०देह**–वि. बधिर, चेतनारहित अंग झालेला. विशिष्ट रोगानें पीडिलेला. **०परिकर्माष्टक**–न. (गणित) शून्यासंबंधी बेरीज, वजाबाकी, गुणाकारादि आठ क्रिया. परिकर्माष्टक पहा. **०मंदिर**–न. मूर्ति विरहित देऊळ; मशीद 'श्री शालिग्रामशिळा यवनाचे शून्य मंदिरीं पडली।' –स्फुटआर्या. **०मस्तक-की**–वि. ज्याचे तीन किंवा चार पाय पांढरे असून डोक्यावर (किंवा कानाजवळ) भोंवरा वगैरे कोणतेंहि चिन्ह नसतें असा (घोडा). –अश्वप १.९७. **०लब्धी**–स्त्री. १ भाज्यापेक्षां भाजक मोठा असल्यास भागाकार शून्य येतो ती. २ (अर्वाचीन) अत्यंत सूक्ष्म संख्यांचें गणित. 'शून्यलब्धी पर्यंत माराकूट करून मजल मारा.' –नि १०३०. **०लिंग**–न. निराकार परमात्म्याचें, ब्रह्माचें, चिन्ह खूण. 'जे शून्यलिंगाची पिंडी। जे परमात्मयाची करंडी।' –ज्ञा ६.२७३. **०वाद**–पु. जग हें केवळ अभावात्मक आहे, म्हणजे कांहीं नाहीं म्हणजेच ब्रह्म असें मत. **०वादी**–पु. शून्य वादाचा पुरस्कर्ता. **०वेला-वेळ**–स्त्री. (ज्योति) मध्यान्ह, मध्यरात्र, व संध्याकाळ या वेळांस संज्ञा. कारण यावेळीं केलेलीं कृत्यें निष्फळ होतात. **०शेज-सेज**–स्त्री. माया. **०सिद्धान्त**–पु. पदार्थमात्र नाशिवंत म्हणून नाहींतच व ब्रह्महि असतें तर प्रत्ययास येतें, ज्या अर्थी प्रत्ययास येत नाहीं व जें नाहीं तेंच ब्रह्म हा सिद्धान्त. शून्यवाद पहा. **०हृदय**–वि. १ संज्ञा, जाणीव नाहींशी झालेला २ निष्ठुर; क्रूर; (मृदु) भावना नाहींशा झालेला; अन्तःकरण नसलेला. ३ मन, इच्छा, वासना नष्ट झालेला; वासनांच्या पलीकडे गेलेला; अतींद्रिय. **शून्याकार**–वि. १ अभावरूप; ओसाड; निर्जन; उध्वस्त; शून्यरूप. २ स्थलकालादि मर्यादा नसलेला; निराकार; सर्वव्यापी, (प्रसरणशीलतेनें); सर्वनाशी (आवरणशीलतेनें) (ब्रह्म). **शून्याकृति**–वि. अक्रिय; नाकर्ता. 'लॉर्ड लान्सडौनसारखे शून्याकृति व्हाइसरॉय आले कीं...निरगैल यजमान आमचे डोक्यावर बसतात.' –टिले १.१.२८६. **शून्यतुल्य**–वि. निरुपयोगी; निर्मालयवत्. **शून्यालय**–न. मशीद–(कवींयांचें) आत्मवृत्त १४.

शूर—पु. वीर; पराक्रमी पुरुष; योद्धा; लढवय्या. –वि. १ पराक्रमी; शौर्ययुक्त; युद्धकुशल. २ धीट; धाडसी; साहसी;

निर्भय; उदार; धीर. ३ कोणत्याहि गुणांत अग्रेसर; विशेषत्वानें एखादा सद्‌गुण असलेला. उदा० (समासांत) दानशूर; कर्मशूर; रण–आरंभ–वाद–परोपकार–गृह–गान–स्नान–भोजन–शयन–प्रवास–शूर. [सं.] ०सेन–पु. एका देशाचें नांव. मथुरेच्या आसपासचा प्रदेश.

शूर्प—न. सुप; धान्य पाखडण्याचें बांबूचें साधन. ' वंशजहि शूर्प न गुणें लंघी सभ्यादृताशुभ व्यजना । ' –मोकर्ण (नवनीत पृ. ३३४.) [सं. शूर्प्=मोजणें] ०कर्ण–पु सुपासारख्या कानांचा, गणपति. ' शूर्पकर्ण षण्मूख जयाचे नवलपरीचे सुत । ' –(प्रभाकर) –लक्ष्मी–पार्वती संवाद. ०णखा–नखा–स्त्री. १ रावणाची बहीण. २ (ल.) कुरूप स्त्री; कजाख स्त्री.

शूल–ळ—पु. १ एक हत्यार; भाल्यासारखें हत्यार. ' मधुनामकासुराला पूर्वी जो अर्पिला शिवें शूळ । ' –मोरामायण १.१५९;२८५. २ तीक्ष्ण अग्राचा लोहस्तम्भ (अपराध्यास मारण्याकरितां); सुळ. ३ तीक्ष्ण, तीव्र वेदना; तिडीक; कळ. ४ मेख; खिळा; टोंचणी (लोखंडी). ५ (ज्यो.) सत्तावीस योगांतील नववा योग. ६ (आगरी) भातशेतींत उगवणारें एक तण; बेणण. [सं.] ०गव–पु. एक स्मार्त पशुयज्ञ. –ज्ञाको श ९१. ०पाणि–णी–पु. महादेव; शिव; शंकर. ' कंठ शीतळ जपतां शूळपाणी । राम जपे अविनाश भवानी । ' –तुगा ३९८. **शूळी**–पु. महादेव; शंकर. ' गरळजळित शूळी रामनामें निवाला । ' –दावि १६९.

शृंखला–ळा—स्त्री. सांखळी; बेडी; लोखंडी कडयांची बनविलेली माळेसारखी दोरी. [सं.] ०बंध–पु. १ सांखळीनें बांधून केलेलें निरोधन. २ (नृत्य) नर्तकांनीं एकमेकांच्या हातांत हात घालून रांगेनें उभें राहून केलेलें नृत्य. [सं.] ०बंधन–न. सांखळीनें, बेडीनें बांधून केलेली अटक.

शृंग—न. १ जनावराचें शिंग. २ पर्वताचें शिखर. ' महत्त्वाद्रीच्या शृंगीं बैसावया । ' –ज्ञा १७.२४२. ३ चंद्राच्या कोरेचा निमुळता भाग; उभें टोंक. ४ (ल.) भांडण उपस्थित करण्याकरितां केलेलें चिडखोर, टोंचणीवजा भाषण, कृत्य; उपस्थित केलेला मुद्दा वगैरे; तंट्याचें निमित्त. ५ एक वाद्य; शिंग. ' टाळ मृदंग मोहरिया । पांवे शृंगें घुमरिया । ' –ह १०.१४०. [सं.] ०ऋषी–पु. एक मुनि; पर्जन्य पडावा म्हणून याची प्रतिमा करून आराधना करितात; दशरथाचा जामात. ०ग्राहिका–स्त्री. (न्यायशास्त्र) समुदायाचें एकदम ग्रहण न करितां प्रत्येक पृथक् व्यक्तिद्वारा समुदायाचें ग्रहण; एखाद्या गोष्टीनें व्यक्त होणारी सर्वसाधारण सामुदायिक कल्पना घेण्याऐवजीं तींत व्यक्त होणारे निरनिराळे महत्त्वाचे मुद्दे पृथक्‌पणें विचारांत घेणें. **शृंगापत्ति**–स्त्री. (न्यायशास्त्र) दोन वैकल्पिक गोष्टींपैकीं कोणतीचाहि स्वीकार केला असतां अनिष्ट घडून येण्याची परिस्थिति. (इं.) डायलेमा. [से.] **शृंगाटक**–पु. चौक. ' समस्त शृंगाटक नोप देती । ' –सारुह ६.३. [सं.] **शृंगी**–पु. शिवाचा अनुचर; गण. –स्त्री. एक वाद्य; शिंगी. ' शृंगी खेंची करि जागृत मित्रसेना । ' –वामन (नवनीत पृ. ९२.) –वि. १ शिंग असणारा. २ शिखर असलेला. ३ ज्याच्या शेंडींत किंवा कानांच्या मधील भागांत मांसाचा खिळा दिसतो असा (घोडा). –अश्वप १.९३.

शृंगार—पु. १ नवरसांपैकीं एक रस. (प्रेम, कामभावना वगैरेंचें वर्णन करणारा). ' देशियेचेनि नागरपणें । शांतु शृंगारातें जिणें । ' –ज्ञा १०.४२. (समासांत) शृंगार–लीला–रस–सुख–विनोद–शास्त्र–गृह–प्रिय–भाव–संभाषण–मत्सर इत्यादि. २ अलंकार; भूषण; शोभा; थाट. ' अगा बालका लेववि जे लेणें । तया शृंगारा बाळे काई जाणे । ' –ज्ञा १०.५८. ३ (स्त्रियांनीं केलेले) प्रेमदर्शक हावभाव, आविर्भाव; लज्जादि प्रदर्शन; नखरा, चाळे वगैरे. ४ स्त्रीपुरुषांचा कामुक व्यवहार. [सं.] ०कलह–पु. प्रेमकलह; प्रेमाचें लटकें भांडण. ०गळेसरी–स्त्री. एक गळयांतील भूषण, दागिना. ०चेष्टा–स्त्री. १ (स्त्रियांनीं केलेल्या) कामुक चेष्टा, चाळा; प्रेमविषयक हावभाव, खेळ. २ स्त्रियांचा नखरा; प्रेमप्रदर्शन; प्रेमविलास. ०पट्टी–स्त्री. घराच्या पुढील दरवाजाच्या चौकटीच्या वरच्या बाजूस गणेशपट्टीच्या वर बसविलेली कोरीव काम केलेली पट्टी. ०पण–न. शोभा. ' मग न चालतें कळेकेंवीण । शशिबिंब जैसें परिपूर्ण । तैसें चोखी शृंगारपण । मनाचें जें । ' –ज्ञा १७.२३०. ०पेटी–स्त्री. स्त्रियांची फणी–करंडयाची सुंदर पेटी. ' तुम्ही माईला तेवढी शृंगारपेटी आणलीत । ' –बहकलेली तरुणी १९. ०मराळिका–मराळी–स्त्री. सुंदर स्त्री; रूपवती. [शृंगार+मराळिका=हंसी] ०मुरड–पु. शृंगारोपभोग. ' शृंगार मुरड उत्तम जन । तेथें भोग भोगितसे । ' –नव ११.६४. ०लज्जा–स्त्री. प्रेमविषयक वरवर दिसून येणारी लाज, विनय; ओढूनताणून आणलेला बुजरेपणा, नखरा; कामुक लज्जेचा आविर्भाव. ०लालन–न. (स्त्रियांनीं केलेले) कामुक चाळे, चेष्टा; प्रेमयुक्त लाड, कौतुक, हावभाव. ०साज–पु. स्त्रियांचा गळयांतील एक दागिना. **शृंगारणी**–स्त्री. सजवणूक; आरास; शोभा; साज **शृंगारणें**–स्त्री. सुशोभित करणें; सजविणें; नटविणें; शोभविणें; भूषविणें. **शृंगा(घा)रिक**–वि. १ शृंगारासंबंधीं. २ शृंगारी; शृंगाराचा भोक्ता. ' शृंघारिक नवरसिक । यामध्यें सांडावे येक । ' –दा १४.५.२१. **शृंगारित**–वि. सजविलेला; नटविलेला; भूषविलेला; शोभायमान; सुशोभित. **शृंगारी–क**–वि. १ शृंगारशास्त्रांत निपुण. २ कामुक; वैषयिक; प्रेमासक्त; कामी. ३ शृंगारासंबंधीं; प्रेमविषयक. ४ (कों.) घराच्या बांधणीचा एक प्रकार आहे त्या प्रकारचा.

शृंगारिलें–धावि. १ शोभविलेलें; भूषविलेलें. २ नकली; मुलामा दिलेलें; वरवरचें. 'काय आगीपासीं शृंगारिलें चाले। पोटींचें उकले कसाबाशीं।' –तुगा २८०६.

शृंगारवेली—स्त्री. एक जात (वादक, नर्तक?). 'वाद्यधारी शृंगारवेली।' –नव ११.७०.

शृगाल-ळ—पु. कोल्हा; जंबूक. [सं.] **शृगाली**–स्त्री. कोल्ही.

शृघारी—वि. शृंगारी पहा. 'शृघारियां देवांचा रतिरसु।' –शिशु १५६.

शृजणें—क्रि. (प्र.) सृजणें पहा. निर्माण करणें.

शृत—धावि. शिजलेलें.

शें—वि. शंभर; शत; शतकवाचक शब्दापुढें या शब्दाचा विशेषतः उपयोग होतो. उदा० दोनशें, तीनशें, पांचशें वगैरे. 'त्या सुहृदंगांतुनि वृषशर काढी सानुकंप शौरी शें.' –मोकर्ण ५०.१ [सं. शतम्] **शेंकडा**–पु. शंभर वस्तूंचा गट, समुदाय; शंभरी. –क्रिवि. दर शंभरास; प्रत्येक शंभर वस्तूंस वगैरे. 'शेकडा आठ आणे व्याज.' **शेकडों-शः-शा**–क्रिवि. शतशः; शंभरांनीं; शेंकडयांनीं.

शे—क्रि. (खा.) आहे. [गुज. छे; सं. अस्ति]

शेऊर—स्त्री. (राजा.) एक झाड; शेवरी पहा.

शेऊळ—स्त्री. शीळ. 'कामू शेऊळ घालूं लागला.' –बाळ ७०. [ध्व.]

शेऊळ—स्त्री. (कु.) शेवाळ.

शेएंशीं—वि. (राजा.) ऐंशीं अधिक सहा. ८६ शायशी. [सं. षडशीति]

शेक—पु. १ धग; झळ; विस्तवाची उष्णता; ऊब; कपडयानें, गरमपाण्यानें, पानांनीं औषधांनीं वगैरे शरीराच्या एखाद्या भागास दिलेली ऊब, उष्णता वगैरे. 'अग्नी पेटवूनी एक्या ठायीं। शेक घेती व्यवसायी।'–नव २५.८. २ शेकोटी; आगटी (शेकण्याकरितां काटक्या पानें वगैरेची केलेली). ३ (कों.) शेती वगैरेच्या वहितीसाठीं दिलेल्या बैल वगैरे जनावराबद्दल घ्यावयाचें भाडें, मोबदला. (क्रि० देणें; घेणें.) [सं. सेक भाइअह १८३४] **०लागणें**–झळ लागणें; चट्टा बसणें; नुकसान होणें; पैसा खर्च होणें. **शेकणें**–उक्रि. १ शेक देणें, घेणें; ऊब देणें, घेणें. २ (ल.) अंगावर बाजू येणें; चट्टा बसणें; एखाद्या व्यवहारांत नुकसान येणें. **शे-(शें)कणी**–शेक देण्याची क्रिया. **शेकशेगडी**–स्त्री. बाळबाळंतीण, आजारी मनुष्य वगैरेस शेक देणें, इतर उपचार करणें वगैरेबद्दल सामान्यपणें योजतात. (क्रि० करणें.) **शेकाटणें**–अक्रि: शेक घेणें; शेकाटा घेणें; **शेकाटा**–पु. शेक; उबारा; धग.

शेकाटी-कुटी-कोटी–स्त्री. शेक; आगटी; शेकण्याकरितां पेटविलेला काटक्या, गवत वगैरे पानांचा विस्तव, जाळ, आग. **शेकावणें**–अक्रि. १ पोळणें; भाजणें; जाळ लागणें; अंगास ज्वाला वगैरेनीं इजा होणें २ (ल.) बाजू अंगावर येणें; चट्टा बसणें; नुकसान येणें, होणें.

शेक—स्त्री. (राजा.) भाजी; शाक पहा. 'शेकेक=भाजी पाला.'

शेकचिल्ली—पु. प्र. शेखचिल्लि; वेडापीर; उल्लु मनुष्य.

शेकट-शेकटणी—शेगट, शेगटवणी पहा.

शेकडू—वि. कडवट; कडसर; किंचित् कडू.

शेकदार-री—पु.स्त्री. (प्र.) शेखदार–री पहा.

शेकरा-री-रू—पुस्त्रीन. खारीच्या जातीचा एक प्राणी.

शेंकरें—वि. (कों.) कुजकें; घाणेरडें. 'भेंकरें नि गांडीहारनें शेंकरें.' –लोक २.५७.

शेकलें—न. (गो.) स्त्रिया नाकांत घालतात तो सोन्याचा दागिना; सुंकलें.

शेकाटा-टी—पु.स्त्री. लांब बांबू; लांब काठी (कळकाची वगैरे). [सं. शाखा]

शेकान्शेक—क्रिवि. (गो.) या टोंकापासून त्या टोंकापर्यंत; येथून तेथपर्यंत. 'शेकान् शेक पानां दवर.' येथपासून तेथपर्यंत पानें मांड. [शिखर+शेवट]

शेकार—पु. १ घराचें छपर; पेंढा, गवत वगैरे घालून घरावर केलेलें आच्छादन; (वांसे, व ओमण सोडून) छपराचा भाग. २ छपरांचें सामान; गवत, झांप वगैरे. ३ (क) कवलें; छपरांचें इतर सामान; **शेकारणी**–स्त्री. घरांचें छपर घालण्याचें काम; कवलें चाळणें वगैरे. **शेकारणें**–उक्रि. घरावर छपर घालणें; कौलें वगैरे चाळणें.

शेकीं—क्रिवि. शेखीं पहा. शेवटीं; अखेरीस. 'कित्येक लोक उद्धरिले शेकीं।' –सप्र ८.१०.३९.

शेकें—न. (गो.) कोंबडयाचा तुरा. [सं. शेखर]

शेख—वि. शेष; बाकीचा; राहिलेला. 'विरुळेआं शेखेंसी सरीसा।' –दाव ३८९. [सं. शेष]

शेख—पु. पीर; वृद्ध; साधु; विद्वान्. [अर. शैख] **०चिल्ली**–पु. बेडसर, भ्रमिष्ट मनुष्य; तपस्वी; औलिया; स्वैर मनुष्य. **०दार**–पु. खेडयांवरील वसुली कामदार; तर्फेचा अधिकारी. **०दारी**–स्त्री. शेखदाराचें काम, हुद्दा. **०सल्ली विचार**–पु. मनोराज्य. 'परंतु या शेखसल्ली विचाराचा आज काय उपयोग?' –एका शिपायाचें आत्मवृत्त ३४४. **शेखी**–स्त्री. प्रौढी; बढाई; ऐट; तोरा; फुशारकी. (क्रि०मिरवणें; चालवणें; लावणें; करणें) 'मोठी आली तीन परीक्ष्यांच्या नवऱ्याची शेखी मिरवायला' –पकोघें.

[फा. शैखी] **शेखीशोखी**–स्त्री. गर्विष्ठपणा; चढेलपणा; उन्मत्तपणाची वागणूक. ' मिरजेस फौज गुंतली यामुळें हैदर नाइकानें शेखीशोखी केली आहे. ' –ख १.२३८.

शेखर—पु. डोक्यावरचा तुरा; मुगुटावरील तुरा. [सं.] **शेखरीभूत**–वि. श्रेष्ठ प्रतीचें; प्रमुख; मुख्य. ' त्याकाळीं त्या मगध देशास शेखरीभूत अशा नगरीचें पाटलीपुत्र हेंच नांव सर्वतोमुखीं होतें. ' –चंद्रगुप्त २१.

शेखीं—क्रिवि. शेवटीं; अखेरीस; पर्यवसानीं. ' जीवा ऐक्य होय शेखीं। ' –विपू २.९६. ' शेखीं अनुसरेल पंचत्वा ' –ज्ञा ३.२.८. [सं. शिखा; शेखर]

शेंग, शेंगळ, शेंगाळीं—पुस्त्री. एका माशाचें नांव,

शेग—स्त्री. (राजा. कुण.) रांग; ओळ (एका टोंकापासून सरळ). [शिखर, शेख, टोंक] **शेगाडी**–क्रिवि. (कु.) (सरळ रेषेनें) वर–खालीं. **शेगान्शेग**–क्रिवि. (माल) या टोंकापासून त्या टोंकापर्यंत; येथपासून तेथपर्यंत; सपशेल; पूर्णपणें.

शेंग—स्त्री. अरुंद, लांबट व आंत दाणे असलेलें फळ; फल्ली; शिंबा. [सं. शिंबा] **म्ह०** सारी रात्र जागली शेंगा वांगीं रांधलीं= अल्प फळाकरितां घेतलेले प्रमाणाबाहेर कष्ट, श्रम.

शेगट—पु. एक झाड; शेगवा; शेवगा. याच्या शेंगांची भाजी करतात. [सं. शिग्रु; प्रा. शेग्गू–शिग्गू] **शेगटवणी**–स्त्री. शेगव्याच्या झाडाचा पाला किंवा शेंगा उकळून काढलेलें पाणी. **शेगटी**–स्त्री. लांब शेंगा येणारी शेगव्याची जात.

शेंगटी—स्त्री. (कु.) एका माशाचें नांव.

शेगडा–रा–शेगरें—पु.न. (लोहार, सुतार) घांसण्यासाठीं वस्तु घट्ट धरून ठेवण्याचें साधन, हत्यार; पकड.

शेगडी—स्त्री. शेक घेण्यासाठीं विस्तव ठेवण्याचें पात्र; कंगरी; आगटी. [सं. शकटी]

शेगवा, शेंगूल—पु. शेगट; शेवगा. याच्या शेंगांची भाजी करतात.

शेगाडा–डी—पुस्त्री. (कु.) शेकाटा पहा. लांब बांबू, वेळू; काठी.

शेंगोळी–ळें—स्त्रीन. हरभऱ्याची डाळ, मुगाची डाळ, उडदाची डाळ वगैरे डाळींच्या भरडयाचे तोंडी लावावयास केलेले मुटके, मुटकुळीं. [शेंग]

शेंघ—स्त्री. (कों.) शेंग पहा.

शेचाळ, शेचाळीस—वि. ४६ संख्या.

शेज—स्त्रीन. १ रांग; ओळ; बाजू; क्रम. ' धर्माशीं नीतिशीं। शेज धरी। ' –ज्ञा ४.५३. २ मळवट; विवाहादि मंगल प्रसंगीं कपाळावर गंधाचा लेप करतात (अक्षता लावण्याकरितां) ती; (क्रि० भरणें; लावणें). ३ शय्या; अंथरूण; बिछाना; निजण्याकरितां तयार केलेली गादी वगैरे घालून मऊ जागा. ' डोळा नलगे शेजेसी । निद्रेमाजी देखे कृष्णासी । ' –एरुस्व ५.३०. ४ मोहरमांतील मखर. [सं. शय्या; प्रा. सेजा; गु. शेज; हि. पंसिं. सेज] (वाप्र.) **शेज घेणें**–(चांभारी) जोडयाच्या कडेचा भाग छाटणें, व्यवस्थित करणें. **शेज पडणें–लागणें**–रांगेस लागणें; क्रमप्राप्त होणें; सुरू होणें. **शेजेस घालणें**–नवरानवरीस एकत्र निजविणें. **शेजेस येणें**–१ लवंडणें; झोंपण्याकरितां बसणें (घोडा). २ भरून येणें; खपली धरणें; माठळणें (जखम) **शेजारती–शेज आरती**–स्त्री. रात्रीं निजावयास जाण्यापूर्वी देवाची करावयाची आरती. **शेजओटी**–स्त्री. ब्राह्मणांमध्यें गर्भाधानप्रसंगीं रात्रौ माहेरचीं माणसें मुलीची ओटी भरतात ती. –बदलापूर २०७. **शेजघर**–न. शय्यागृह; निजण्याची खोली, जागा. **शेजार**–न. १ शय्यागार; निद्रागृह; निजण्याची खोली, जागा. ' दुधाचीं शेजारें । क्षीराब्धी ऐसीं मनोहरें। ' –ज्ञा ९.३९०. २ बिछाना; शय्या. ' जाले आपुले शेजार। तेथें हृदयाच्या शेजारीं। ' –विपु २.९४. [सं. शय्यागार] **शेजोट**–पु. १४–२० माणसें बसुं शकतील असा चौरंग.

शेजंर—रें–न. १ (व.) लहान ढीग.–वशाप. (फे १९३५) २ (माण.) खळयाचे भोंवतीं मंडलाकार कडब्याच्या पेंढया उभ्या करतात तें. ३ बियाचीं कणसें ठेवण्याकरितां केलेला लांबट मुडा. ४ पेरणीचें बीं स्वतंत्रतेनें मळण्याकरितां मुख्य खळयाच्या शेजारीं करतात तें लहानसें वेगळें खळें.

शेजा—पु. दिंडीदरवाज्यावर बांधलेली लहानशी खोली; घराच्या गच्चीवर बांधलेली लहान खोली; सज्जा. [सं. छाया]

शेजार—पु. १ पडोसीपणा; निकटवर्तित्व; लगतचें घर, जागा, आवार; सामीप्य. २ शेजारी; पडोसी; लगतच्या घरांत राहणारा. [शेज] **०धर्म**–पु. शेजाऱ्यासंबंधीं वागणुकीची रीत, पद्धति, नियम. **०पाजार**–पु. शेजार; जवळ वास्तव्य; सामीप्य. [शेजार द्वि] **शेजारी**–पु. शेजारीं राहणारा; लगतच्या घरांतील मनुष्य; पडोसी. **शेजारीण**–स्त्री. शेजाऱ्याची बायको; शेजारीं राहणारी स्त्री. वाप्र. घेग शेजारणी वीख–स्वतःच्या प्रतिज्ञेप्रमाणें बोलण्याप्रमाणें वागणूक न घडलेल्या शेजारणीस टोंचून बोलण्याचा वाप्र. **शेजारीपाजारी**–पु. १ सामान्यतः शेजारी; शेजारच्या घरांत राहणारा. २ जवळपासचा मनुष्य; आजूबाजूच्या लोकांस वापरावयाचा सामान्य शब्द. **शेजारीं**–क्रिवि. संनिध; जवळ; बाजूला; लगत; समीप. ' बा तूं बसत होतास मम शेजारीं। मर्यादा रक्षीत होतास अंतरीं। ' –नव २२.१६४. **शेजारून**–अ. जवळून. **शेजिया**–वि. जवळचा. ' कीं हा एथ असतुचि गेला। शेजिया गांवा। ' –ज्ञा ९.५२३. **शेजी**–स्त्री. शेजारीण. **म्ह०** १ शेजीवी सरेना आणि घडीभर पडेना. २

शेजीनें दिलें बोट त्यानें काय भरेल पोट. ३ शेजीचं उसनं सवेंच देणं. **शेजीं-जे**–क्रिवि. जवळ; समीप. 'तंव ते छाया सुशीतळ। शेजी सरोवर निर्मळ।' –कथा २.४.१००. **शेजुटणें**–न. (कों.) विवाहप्रसंगीं वरवधूंचीं शेज भरणें, त्यांनीं सुपारी लपविणें, विडी तोडणें वगैरे विधींस म्हणतात. **शेज्हार-री**–शेजार-री पहा.

शेट—पु. सावकार, व्यापारी, उदमी, कारागीर, सोनार, कासार वगैरे यास स्वतंत्रतेनें किंवा त्यांच्या नांवापुढें लावावयाचा शब्द. 'ऐसा तूं विठ्ठला जालाशी रे शेट। करूनि बोभाट वेसी जना।' –ब ४९०. २ जो मनुष्य कलावंतीण बाळगतो त्यास म्हणतात. 'त्यांच्या यारास मुंबईतील शेट असें म्हणतात.' –व्यनि १. [सं. श्रेष्ठ–श्रेष्ठिन्] **म्हण०** शेट सवाशेर आणि लिंग अडीच शेर=लिंगायत व्यापारी गळ्यांत लिंग घालतात त्यावरून वरवर दिसणाऱ्या देखाव्यापेक्षां ज्याची प्रत्यक्ष योग्यता कमी आहे अशा इसमास म्हणतात. **०कार**–पु. (गो.) व्यापारी; सावकार. **०की**–स्त्री. शेटयाचा हक्क. बाजारांत उपयोगांत आणलेलीं धान्याचीं मापें सरकारी शिक्क्याचीं आहेत कीं नाहींत हें तपासणें, पेठेची व्यवस्था ठेवणें, या कामाबद्दल दुकानदाराकडून (येणाऱ्या मालावर) शेटयास मिळणारें उत्पन्न व तें मिळण्याचा हक्क. हा हक्क साधारण मणामागें पाव आणा असे. –आडिवऱ्याची महाकाली १३. **०जी**–पु. शेट यासच गौरवानें म्हणतात. **०शाई**–स्त्री. शेठजीचा तोरा, ढब, ऐट, प्रतिष्ठा; सावकारीचा मान; दर्जा; हुद्दा. (क्रि० करणें; लावणें; मिरवणें; मोडणें; आणणें; दाखवणें.) **०शाई मोहर**-स्त्री. एक प्रकारची विवक्षित मोहोर (सोन्याचें नाणें). **०सावकार**–पुअव. व्यापारी, सावकार, उदीमी यांस सामान्यपणें योजावयाचा शब्द. **शेटाई**–स्त्री. शेटजीपणाची ऐट, दिमाख, तोरा, डौल, पदवी, हुद्दा, थोरवी. **शेटाणी**–स्त्री. सावकार, व्यापारी याची स्त्री. **शेटी**–पु. शेट पहा. **शेटे-शेट्या**–पु. १ पेठ, बंदर, गांव वगैरे ठिकाणीं मापें, वजनें, दरदाम इत्यादिकांची चौकशी, तपासणी वगैरे करणारा अधिकारी. नवीन पेठा वसविणें हेंहि यांचें काम असे. –थोमारो २.२८७. 'शेटे महाजन ऐका कोणी। घोंगडियाची करा शोधणी।' –तुगा ३७१. २ व्यापारी जातीच्या प्रमुख मनुष्यासहि म्हणतात.

शेंट, शेंटकूल—न. १ पुरुषाच्या जननेंद्रियावरील केस; शष्प; २ कःपदार्थ; तिरस्कार दर्शविण्याकरितां ग्राम्य भाषेंत हा शब्द योजलेला आढळतो. 'त्याला काय शेट समजतें.' [सं. शिट्=अनादरे' पाणिनी धातुपाठ] **शेंटळणें-शेंटाळणें**–अक्रि. १ गुह्येंद्रियावर केंस उगवणें; वयांत येणें; तारुण्यांत येणें. २ अवज्ञा करणें; तिरस्कार, तिटकारा दाखविणें; अवहेलना करणें; झिडकारणें. 'तुझी आज्ञा शेंटाळली तो मला काय मानतो।' ३ बनविणें; फसविणें; चकविणें; चेष्टा करणें.

शेठ, शेठजी, शेठाई, शेठाणी, शेठी, शेठ्या—शेट, शेटाणी, शेटी, शेटया, पहा.

शेठ, शेठकूल—शेंट, शेंटकूल पहा.

शेड—स्त्री. १ फांक; फोड; चिरफळी; उभा लांबट कापलेला तुकडा (फळाचा). २ (माड, पोफळ, सुरमाड वगैरे झाडाची) तांत, तंतु; हिरका; (बांधावयाकरितां काढलेली सालीची वगैरे) चिरफळी, सोप, सोपट. [सं. च्छेद]

शेड—स्त्री. (विणकाम) मागावर कापड ताणण्यास लागणारी धनुष्याकृती काठी.

शेंड-डी—स्त्री. (कु.) मासे मारण्याचें (फेंकण्याचें) जाळें.

शेंडगळणें—सक्रि. (बे.) शेंडे, कणसें तोडणें. [शेंडा]

शेडगांव पेडगांव—न. वादी प्रतिवादींचे मुद्दे पूर्णपणें ऐकल्याशिवाय अर्धवट केलेला निकाल, अगर समेट; अनिश्चित, संशयास जागा असलेला निर्णय, समजूत.

शेंडफळ—न. शेंडेफळ; अखेरचें मूल.

शेडमाती—स्त्री. पिंवळसर पांढुरकी, चिकण माती. **शेडी, शेड्डु**–स्त्री. शाडू; पांढरी चिकणमाती.

शेंडवल, शेंडवेल—स्त्रीपु. एक जातीची शेंगा येणारी वेल.

शेडा—पु. १ दोरीचा तुकडा; दोरखंड; देठ; बारीक सांखळी; घडयाळाची सांखळी. २ (कों.) जाडा, बळकट दोर; मोठें दोरखंड.

शेडा—पु. एक प्रकारचा रंग; दाट तपकिरी किंवा पिंगट रंग; भुरा रंग. –वि म्हैस,बकरें वगैरेचा रंग; भुरकट; म्हैशीच्या रंगाचें.

शेडा—पु. (अंधुक उजेडामुळें किंवा मंददृष्टीमुळें दिसणारी) एखाद्या गोष्टीची छायारूप आकृति; काळसर झांक. [सं. छाया]

शेडा—पु. एक प्रकारचें गवत; हरळीसारखें गवत; शेडेंगवत; (व.) जाड गवत; उदा० घोडशेडा. [सं. तृणाढ्य]

शेडा—पु. निशाण; ध्वज. 'दोन्हीकडील शेडे दोन उभे करावे' –वाडबाबा ३.४९. शेंडा अर्थ २ पहा.

शेंडा—पु. १ शेवट; अग्र; शिखर; टोंक. 'गुरुसुत नाराव्याचा भीमललाटांतरीं शिरे शेंडा।' –मोकर्ण १०.५. २ झेंडा; निशाण. 'फेडून नवस माहोरास, केले लाहोरास जिंकीत शेंडे।' –ऐपो ४१८. [सं. शिखंडक; हिं. छेंडा] **शेंडागोंडा**–पु. भाजी वगैरेच्या डिकऱ्या, झुबके, शेवटची पानें, कोंवळया डिऱ्या. (सामान्यतः) 'रानांत गेल्यास कांहीं शेंडागोंडा तरी मिळेल.' [शेंडा+गोंडा] **शेंड्यागोंड्यास येणें**–पोटरीस येणें; कणसें बाहेर पडण्याच्या स्थितींत असणें; पसवणें. **शेंडाबुडखा**–पु.

१ वरचा व खालचा भाग; अग्र व मूळ; आरंभ अंत–पहिला व शेवटचा भाग. २ आरंभापासुन अंतापर्यंतचा सर्व भाग; समूळ व साग्र. 'त्याचे पंचाइतीचा झाडून सारा शेंडाबुडखा मला ठाऊक आहे.' **शेंडाबुडखा करणें**–झाडाची छाटाछाट करणें. **शेंडा बुंधा–शेंडामुंधा**–पु. शेंडाबुडखा. **शेंडा ना बुडखा**–पूर्ण अभाव; नास्तित्व; समूळ नसण्याची स्थिति. 'मोरोपंताचे ग्रंथ उगीच चाळून जो पाहील त्यास सुद्धां कळून येईल कीं वरील गोष्टीस शेंडा ना बुडखा.' –नि. **शेंडामोरा**–पु. (राजा.) लहान मुलाच्या टाळूवरील न काढल्यामुळें वाढलेले व तोंडावर येणारे केंस; पुढील जावळ. (क्रि० बांधणें; सुटणें; पडणें). [शेंडा+मोहरा] **शेंडेछाट** पु. शेंडयाची छाटणी; झाडाझुडपांची केलेली छाटाछाट (नीट दिसावें, किंवा वाढावें म्हणून). **शेंडेधान्य**–न. शेत कापून झाल्यावर जे धुमारे फुटतात त्यांवर आलेल्या कणसांचें धान्य. **शेंडे(ड्ये)नक्षत्र**–न. धूमकेतु. 'हें शेंडेनक्षत्र या उत्पाताचें सूचक होय'–नि २४६. **शेंडेपालवी**–स्त्री. शेंडी पालवी पहा. **शेंडे(ड्ये)फळ**–न. १ मोसमाच्या अखेरीअखेरीस आलेलें फळ; अखेरच्या बहाराचें फळ. २ (ल.) म्हातारपणांत झालेलें अपत्य. ३ झाडाच्या शेंडयावर, उंच फांदीच्या टोंकाला धरलेलें फळ. ४ (ल.) अखेरची गोष्ट; काम सरतां सरतां करावयाची गोष्ट. 'असेंब्लीच्या कामाला अवधीं दोन शेंडेफळें राहिलीं होतीं.' –सासं २.१७०. **शेंडेसलाम**–पु. अनोळखी मनुष्यानें केलेला नमस्कार; दुरून केलेला नमस्कार; बोलाचाली न होतां केवळ परस्पर केलेला नमस्कार.

शेंडी—स्त्री. १.डोक्यावरील केसांचा झुपका; शिखा. 'सन्मनीं वाधेकीं जशी शेंडी.' २ डोक्यावरील तुरा; कलें; मोराच्या डोक्यावरील पिसें. ३ धूमकेतूची शेपटी. ४ घोडयाच्या टाळूवरील केस; झुलपें. ५ तेल्याच्या घाण्याच्या किंवा चरकाच्या मधल्या लाटेच्या टोंकाचा भाग; बोंड. ६ सोललेल्या नारळाच्या देंठाकडील काथ्याचा झुबका. ७ (कु.) तडीस पागण्याचें जालें. ८ मक्याच्या कणसांवरील तंतूंचा झुबका. ९ (चांभारी) तजास मधोमध ठेवलेलें टोंक. [सं. शिखंडिका; प्रा. शिहण्डिआ] **शेंडी फुटणें**–अंदाजापलीकडे खर्चाची रक्कम वाढणें; अपेक्षेपलीकडे कोणतीहि गोष्ट जाणें, वाढणें; एखाद्या कामांतून दुसरें, किरकोळ काम निघणें. **शेंडी राखणें**–लहान मुलास प्रथम शेंडी ठेवण्याचा विधि करणें; चौल करणें. **शेंडीस गांठी देणें**–गुरु, शिक्षक, वडील मंडळी यांच्यावर उलटणें, त्यांवर कडी करूं पहाणें, त्यास अक्कल शिकविणें, त्यांचा उपमर्द करणें; वरचष्मा करणें. **(एखाद्याच्या हातीं) शेंडी सांपडणें–गुंतणें**–कचाटयांत, तडाख्यांत सांपडणें; अडचणीत येणें; दुसऱ्याच्या आहारीं जाणें. **शेंडीस फूल बांधणें**–एखाद्या मनुष्यास चढवून आपलासा करून घेणें; एखाद्याची स्तुति करून आपलें काम साधणें; खुशामत करणें. **०धर्म**–पु. हिंदुधर्म. **०पालवी**–स्त्री. १ झाडांच्या शेंडयाचीं पानें; टिकशी; अग्राचा पानांचा झुबका. (क्रि० येणें; फुटणें). २ (ल.) म्हातारपणांत झालेलें अपत्य. **०शृंगी**–वि. शेंडीखालीं भोंवरा असलेला (घोडा). हें अशुभ लक्षण आहे. **०शेपटी**–स्त्री. (झाडाचा) अखेरचा भाग; अगदीं शेवटचीं पानें वगैरे (बागवान आपल्या कामाबद्दल म्हणतात). (यावरून लक्षणेनें) गाळसाळ; अखेरचा टाकाऊ भाग; करावयाचें शेवटचें, कमी महत्वाचें काम; ऊरपूर; आवरसावर. (क्रि० राहणें). 'काम बहुत करून आटपलें, शेंडीशेपटी मात्र राहिली.'

शेंडें—न. १ भातावर पडणारा एक रोग. २ एक प्रकारचें गवत.

शेंडी—स्त्री. (व. ना.) बकरी; शेरडी; शळी. [शेरडी]

शेण—न. १ गाय, म्हैस, बैल वगैरेंची विष्ठा, पुरीष. २ फळें, फुलें, पानें कुजून गोळा झालीं म्हणजे त्यांस म्हणतात. –स्त्री. १ शेणी; गोवरी; वाळलेला शेणाचा पोहो. २ (बे.) गुळाची ढेप. [सं. शकृत्; शकन्; तृ. शक्ना; प्रा. छाण; गु. छाण; सिं. छेणु; छेणो; सं. छगण–शगण–शअण–शाण–श्याण–शेण. –रा. ग्रंथमाला] **म्ह०** पडलेलें शेण माती घेऊन उठतें. **शेण खाणें**–मूर्खपणाचें, निष्फळ, भलतेंच कृत्य करणें. केलें खाणें पहा. 'मग शेण खायला मला कशाला आणलें?' –नामना २१. **शेणाचा दिवा लावणें**–दिवाळें काढणें. **शेणई**–पु. शेणवी पहा. **शेणकई, शेणकाई, शेणकी, शेणखा(खा)ई**–स्त्री. १ शेण टाकण्याकरितां केलेली खांच,खड्डा; उकिरडा. २ (देशावर) शेणाची रास, ढीग. **शेणकला–काला**–पु शेणखळा पहा. **०कुंडा**–पु. (राजा.) घरधंदा; घरकाम; रोजचें व्यवहारांतील शेणगोठा करणें, झाडणें, सारवणें, दळणें, कांडणें वगैरे काम. **०कूट–कूर**–न. १ गोवरीचा तुकडा; शेणीचा तुकडा. २ वाळलेल्या शेणाचे तुकडे, चुरा वगैरे; गोवर. **०कूर**–न. शेणगोठा पहा. **०कोंडा**–पु. शेणांत भाताचें तूस किंवा कोंडा घालून लावलेल्या गोवऱ्या. **०खंड–खुंड**–न. शेणकूट; गोवरी; गोवर. **०खळा**–पु. १ सारविण्याकरितां पाणी घालून कालविलेलें शेण. २ फळें, पानें, फुलें कुजून, नासून जो गोळा होतो तो. **०खळी–खाई**–स्त्री. शेणकई पहा. **०खुंड**–न. १ गोवरीचें खांड; गोवर. –पु. २ (ल.) (निंदार्थी) शेणवी. **०गंड**–पु. (निंदार्थी) शेणवी. **०गाईर**–स्त्री. (राजा.) शेणकई. **०गोटा**–पु. १ शेण (सामान्यतः). २ शेणानें सारवणें, झाडलोट वगैरे कामांस योजावयाचा सामान्य शब्द. यासारखेच शेणशेणकूर, सडासंमार्जन, सडासारवण, वारासार, झाडलोट, चूलपोतेरें, शेणपोतेरें, शेणपाणी, शेणसडा इत्यादि शब्द

व्यापक अर्थानें योजिले जातात. **०गोठा**–पु. गुरांच्या गोठ्यासंबंधीं सामान्य कामांचा दिग्दर्शक शब्द; शेण काढणें, झाडणें, गोठा साफ करणें इत्यादि कामें; गोठापाणी. **०गोळा**–पु. १ खरकट्यावर लावण्याकरितां किंवा इतर कामांकरितां घेतलेला शेणाचा गोळा; शेणाचा लगदा. **शेणगोळे घालणें**–अव्यवस्थितपणें केलेलें काम तपासून दुरुस्त करणें. **शेणणें**–अक्रि. १ शेण टाकणें; हगणें; लेंडी टाकणें. २ डोळ्यांस पू येणें; चिपडें येणें. **०थापणारा**–पु. आळशी, निरुपयोगी, रिकामटेकडा मनुष्य; नाकर्ता, नपुंसक मनुष्य; षंढ. **०दिवा**–पु. दिवाळें काढल्याची खूण म्हणून लावावयाचा शेणाचा दिवा. 'दिवाळ खोरीचा शेणदिवाच लावणें होय.' –के २०.९.३०. **शेणप**–पु (कों.) शेणकला, शेणखळा पहा. **शेणपा–पोह–पोहो–पोव, शेणाचा पोहो**–पु. १ शेणाचा गोळा, लगदा; पोहो; एका वेळीं जनावरानें केलेली विष्टा. २ (ल.) लट्ठ परंतु दुर्बल, जड, मट्ठ जनावर; दुर्बल, नाकर्ता, नालायक मनुष्य; षंढ; नपुंसक. **०पाटी**–स्त्री. शेण वाहून नेण्याची टोपली. **०पाणी**–न. १ शेणखळा; पाण्यांत कालविलेलें शेण. २ शेणगोटा, सडासंमार्जन वगैरे घरगुती कामासंबंधीं व्यापक अर्थानें योजावयाचा शब्द; गोठापाणी. **०पुजा**–स्त्री. शेणमार पहा. **०पुंजा**–पु. १ शेणगोळा करणारा इसम. २ शेणगोळ्यासारखा मनुष्य; हलक्या दर्जाचा मनुष्य; नीच, हलकट मनुष्य. **०पुंजी**–स्त्री. गोंवऱ्या लावणारी स्त्री; हलकट, नीच स्त्री. **०पुडी**–स्त्री. वाळलेल्या शेणाचे तुकडे, चूर; गोवर. **०पोतेरें**–न. शेणखळ्याच्या बोळ्यानें जमीन सारवणें. (क्रि० करणें). **०भोंवर**–पु. शेणकिडा; शेणावरील माशी; शेणावरील भुंगा. [सं. शेण+भ्रमर] **०माती**–स्त्री. (ना.) धुळवड. **०मार**–पु. एखाद्याची अप्रतिष्ठा व्हावी म्हणून त्यावर केलेला शेण, चिखल इत्यादिकांचा मारा. **शेणवड**–स्त्री. (कों.) १ धुळवड; शेण, माती वगैरे फेंकणें, मारणें. २ धुळवडीच्या दिवशीं एकमेकांवर फेंकण्याकरितां केलेली शेण, माती वगैरेची राड, गारा. **शेणवडणें**–अक्रि. शेणवड करणें. **शेणवणी**–न. शेण कालविलेलें पाणी. **शेणविरणें**–अक्रि. राब करण्यासाठीं शेतांत शेण पसरणें. **०सडा**–पु. १ पाण्यांत शेण कालवून तें जमिनीवर शिंपणें, उडविणें. (क्रि० टाकणें). २ फळें, फुलें, पानें कुजून त्यांचा झालेला गोळा; शेणखळा. ३ गर्दीमध्यें माणसांवर उडविलेलीं फुलें, पैसे, कवड्या वगैरे जमीनीवर पडून पसरलेलीं दिसतात तो. ४ लढाईमध्यें भयंकर कत्तल झाल्यामुळें जमीनीवर सांडलेला रक्ताचा स्राव, मांसाचे छिन्नभिन्न तुकडे वगैरे. 'त्या अडचणींत पांचशें मनुष्यें ठार झालीं, तैशीच घोडींहि पडलीं, तैसेच जखमीहि झाले, केवळ शेणसडा होऊन गेला.' –भाब ७९. 'केला शेणसडा त्याच्या फौजेचा.' –गापो ३. **०साऊळ**–स्त्री. पोफळीची अळी खणून तिच्या मुळाशीं शेण घालतात तें. **०सूप**–न. शेण भरून टाकण्याचें सूप, शिपतर. **शेणाडी**–स्त्री. शेणकई. **शेणामेणाचा**–वि. दुर्बल; निःसत्त्व; अशक्त; हलका; पोकळ; वरपांगी; लिबलिबीत; मऊ, सोपा वगैरे (इमारत, वस्तु, धंदा, प्राणी, मनुष्य यांच्या बाबतींत.) तिरस्कार, उपेक्षा दाखविण्याकरितां योजतात. 'दिवसेंदिवस शेणामेणाचे ते लोखंडाचे होत चालले.' –भाब ५९. **शेणामेणा लोखंडाचा**–वि. प्रथम फारच दुर्बल, शिथिल परंतु नंतर कांहींसा दृढ, त्यानंतर फारच दृढ असा (व्यवहार, भाषण वगैरे). **शेणार काढप**–(गो.) जमीनदोस्त करणें; नुकसान करणें. **शेणारा**–पु. गोंवऱ्यांचा लिंपलेला ढीग, रास. **शेणी**–स्त्री. १ गोवरी; थाबडा; शेणाचा वाळविलेला गोळा. २ शेणाचे वाळलेले पोहो (अव.) 'नामयाची जनी सवें वेची शेणी.' –तुगा ३६९१. ३ अग्निहोत्र्यानें होमाकरितां शेणाचे वाळविलेले गोळे. ४ (राजा.) (सांकेतिक) दुंडा पैसा; ढबू पैसा. **(वर) शेणी रचणें**–जाळणें; नाहींसें करणें 'लोकलाजेवरी रचिल्या शेणी.' –मध्व २२८. **०पाणी**–न. सडा घालणें, शेण्या घालणें, पाणी आणणें वगैरे काम. (क्रि० करणें). **शेण्या**–पु. शेणाचा पोहो. –वि. डोळे आले असतां कमी खुपतो पण पू बाहेर येतो त्या विकारास म्हणतात. **शेण्या खैर**–पु. खैर झाडाची एक जात. **शेण्यासाप**–पु. एक काळा विषारी साप.

शेणई–य, शेणवई–वयी–वै—पु. शेणवी पहा.

शेणगा–गी—पु. हवालदाराच्या हाताखालचा नाईक. [सं. सेना]

शेणवी—पु. एक ब्राह्मण जात; सारस्वत; मुख्यतः लेखन व्यवसाय करणारी एक जात. इतर रूपें शणै; शानई; शणई. [सं. सेनापति; प्रा. सेणावइ, शाण्णवी]

शेणचें—अक्रि. (गो.) गहाळ होणें. शेणुक=सांडायाला.

शेणणी, शेणणें—स्त्री.क्रि. (प्र.) शेंदणी–शेंदणें पहा.

शेणी–नी–शेणें—स्त्रीन. (राजा.) (लोहार) छिनी. [सं. छिद्]

शेणो—वि. (राजा.) शहाणा.

शेत—न. १ धान्य वगैरे लावण्याची जागा; क्षेत्र; लागवड केलेली जमीन. २ पीक; उगवलेलें, पिकलेलें उभें धान्य. ३ शेतकाम; कृषिकर्म; धान्य पिकविण्याचें काम; शेती. ४ नवरात्रांत किंवा चैत्रांत रहू करतात तो; भांड्यांत रुजत घातलेलें धान्य व त्याचे अंकुर. ५ (ल.) उपजीविकेचें साधन; धंदा; व्यवसाय. पोटाची तजवीज. [सं. क्षेत्र; प्रा. छेत्त] **शेत उतरणें**–कणसें लांगलीं बाहेर पडून भरणें; कणसें, चांगलीं येणें. **शेत घरांत**

ठेवणें-असणें-करणें-खंडानें न देतां शेताची मशागत स्वतः करणें. **शेत तोडणें**-कोंवळ्या भाताच्या रोपावर रोग पडणें-कृषि २३६. **शेत सोसणें**-भात रोप्याचे केसर पांढरे पडणें; शेत सुकणें, वाळणें; एक रोग. [सं. शुष्] **(भरल्या) शेतांतून काढणें-ढकलणें-उठविणें**-लाभ होण्याच्या ऐनवेळीं काढून लावणें; हातातोंडाशीं आलेला घास काढून घेणें. **०आडगरा**-पु. वि. नाचणीची एकजात. **०एरंड**-पु. एरंडीचें झाड; सुरती एरंडीचें झाड; सुरती एरंड; मळा एरंड दुसरा मोगली एरंड, वईएरंड. **०करी**-पु. १ शेतीवर निर्वाह करणारा; शेताची मेहनत करणारा; कृषीवल. २ शेताचा मालक, धनी. ३ शेती; खंडकरी; शेतावर काम करणारा; कर्दा; कूळ. **०कापशी**-स्त्री. शेतांत पेरावयाचें, उगवणारें कापशीचें झाड. **०काम**-न. शेतीचें काम, धंदा. **०कामी-काम्या**-वि. शेतावर काम करणारा; शेतकीच्या कामीं येणारा, उपयोगी पडणारा; कृषीवल. **०खप्या**-पु. १ केवळ शेतकाम ज्याला माहीत आहे, इतर कांहीं विद्या नाहीं असा मनुष्य; अडाणी, गांवठी मनुष्य; गांवढा. २ शेतकाम करणारा परंतु ज्याचा वास्तविक धंदा शेतकीचा नव्हे, असा ब्राह्मण वगैरे मनुष्य. **०खेत**-न. जमीनजुमला; शेती; वतनवाडी. **०गणा**-पु. शेतजमीनीचा समुदाय; लागवडीची जमीन. **०गहूं**-पु. गव्हाची एक जात; पाणी न देतां शेताच्या ओलीवर येणारा गहूं. **०गी**-स्त्री. शेतकाम; कृषिकर्म; जमीनीची मशागत, लागवड वगैरे. 'वेठीचे उपद्रवामुळें रयत परागंदा होत्ये, शेतगी होत नाहीं.' -वाडसमा ३.२२४. **०घर**-न. शेतांतील घर; शेतकामासाठीं शेतांत बांधलेली झोपडी वगैरे. **०जमीन**-स्त्री. लागवडीखालील जमीन. **०पेढी**-स्त्री. शेतकऱ्यास कर्ज देणारी सहकारी पतपेढी. **०पोत**-न. १ सामान्यतः शेती; शेतीखालील जमीन; शेतीवाडी; जमीनजुमला. २ शेतीचीं कामें; कृषिकर्म. [शेत द्वि.] **०वाडी**-स्त्री. शेतभात; शेतीवाडी. **०भात-शेतीभाती**-नस्त्री. शेती; शेतजमीन; शेतीवाडी; सामान्यतः शेतीची जमीन व लागवडीचीं कामें यांस व्यापक संज्ञा. **०मळा**-पु. शेती, बागायत वगैरे; जिराईत व बागाईत शेती यांस सामान्य व्यापक संज्ञा. **०माल**-पु. शेतींत पिकणारा माल. **०वड, शेताड**-स्त्री. १ लागवडीची जमीन गांवासभोंवतीची. **०वड-वडा**-१ पु. एक फुलझाड; दुधाणी, कुंभा पहा. २ एक झुडुप. **०वस्ती**-स्त्री. १ (हंगामांत) शेतावरील वास्तव्य, राहणें. २ शेतकरी लोकांची वस्ती, गांव, खेडें; गांवढें गांव. **०वळी**-स्त्री. चांभार लोकांत मामानें बाशिंग बांधल्यावर वर शेजारच्या घरीं जातो हा विधि. **०वाडी**-स्त्री. शेती, लागवडीखालील जमीन, कुरणें, बागायत, आवार, वाडगें वगैरे शेतीसंबंधीं जमीनीस व्यापक शब्द. **०वारपत्रक-वारी**-नस्त्री. गांवासंबंधीं कुळकर्णी किंवा तलाठी यानें ठेवावयाचें सर्व जमीनीचें शेतांच्या अनुक्रमानें नोंदणीपत्रक, तक्ता. **०वाळूक**-न. शेतांत होणारें एक काकडीसारखें वेलाचें फळ; चिबूड. **०सनदी**-वि. लष्करी अथवा इतर सरकारी कामाबद्दल पूर्वी सनदेसह शेत मिळत असे, तसें शेत धारण करून नोकरी करणारा. **०सनदी शिपाई**-पु. लष्करी नोकरीबद्दल शेताची सनद मिळालेला सैनिक. 'जेथें किल्ले आहेत तेथें किल्लेदार शेतसनदी शिपाई ठेवीत.' -नि १०६१. **०सरी**-स्त्री. शेती, पिकें वगैरेस सामान्य व्यापक संज्ञा. 'शेतसरी पिकली.' **०सारा**-पु. जमीनीवरील कर; शेतीवरील कर, महसूल. **०हेत**-न. जमीनजुमला; शेतवाडी. **शेतकी**-स्त्री. १ शेतकाम; शेतकऱ्याचा धंदा, व्यवसाय. २ पीक; उभें पीक; शेत. **शेताड-डी**-शेतवड पहा. **शेती-क**-स्त्री. १ शेतकी; शेतजमीन. २ शेतलागवडीसंबंधीं कामें. **शेती**-पु. शेताचा मालक, धनी. -स्त्री. शेतजमीन; शेतकी. **शेती पाऊस**-पु. पिकांना योग्य असा पाऊस. **शेतीभाती**-स्त्री. शेतवाडी, जमीन पहा. २ शेतीचीं कामें.

शेतखाना—पु. शौचकूप; शौचाची जागा; पायखाना; संडास. [फा. सिहहतखाना=आरोग्यगृह]

शेताळ, शेतालीस—वि. शेहेचाळीस. ४६ संख्या. 'विप्र तरला गती शेताळ।' -दावि ७.२.४६. [सं. षट्चत्वारिंशत्]

शेतुक—न. (कु.) एक जातीचा लहान मासा.

शेंद—स्त्री. १ नारळाचें बेलें; डहू. २ बेल्याच्या आकाराचें फळ.

शेंदड—स्त्री. एक चिबडीसारखा वेल; शेंदाड, शेंदणी. -न. शेंदाड; वरील वेलाचें फळ.

शेंदडशिपाई, शेंदाडशिपाई—पु. पराक्रमाच्या गप्पा, पोकळ बाता मारणारा सैनिक; बाताडया; पोकळ डौल मारणारा.

शेंदणी—स्त्री. शेंदाड; एक चिबूडासारखा वेल व तिचें फळ. 'बहुत दिलें घेतलेंत तरि त्या कमसल कडु शेंदणी। रक्त मांस मद भरित सुरुप मीं जर्सी हिरकणी कोंदणी।' -प्रला १५३.

शेंदणी—स्त्री. (कों.) शेंदण्याची, पाणी ओढून काढण्याची दोरी.

शेंदणें—न. १ पाणी काढण्याचा पोहरा, काढणें, बालदी वगैरे. २ शेंदणी वेलाचें फळ. -उक्रि. १ पाणी किंवा एखादा जड पदार्थ. खालून दोरीनें ओढून वर घेणें. २ (व.) अडणें. 'माझा चेंडू त्या भितीळा शेंदला.' -उक्रि. चिरा पाडणें; किंचित् कापणें (कोयत्यानें फणस वगैरे). **शेंदीव**-वि. शेंदून काढलेलें. [पाणी] 'शेंदीव, भरीव आणि सांचीव पाणी.'

शेंदरी—स्त्री. १ जोंधळ्याची एक जात; नाचणीची एक जात-कृषि २८३. २ शिंदीच्या पानांची हातरी. ३ एक हलक्या किंमतीचें, लुगडें; तांबडया अलवणाचें पातळ. ४ एक झाड.

माकडाच्या तोंडासारखें झाड. ५ एक तांबडी फुलें येणारें झाड. **शेंदरी-रा-ऱ्या**–वि. १ शेंदुराच्या रंगाचा. २ या रंगाचा आंबा. [शेंदूर]

शेंदव, शेंदव—न. १ सैंधव; शेंदेलोण. २ खारटपणा; लोणा (जमीनीचा); खारट पाझर. 'खाडीच्या पाण्याचा एथपर्यंत शेंदवं मारतो म्हणून एथच्या विहिरीचें पाणी खारें.' ३ मीठ, गूळ वगैरेस सुटणारा पाझर.

शेंदवली—स्त्री. एक वेल. **शेंदवलें**–न. त्या वेलाचें फळ.

शेंदाड-डें—न. १ चिबूड; फूट. 'पाहेपां शेंदाडें पिकलीं' –परामा १४.३. **शेंदाड**–स्त्री. चिबडीचा वेल.

शेंदूर—पु. शिस व प्राणवायु यांच्या संयोगानें होणारा एक रंग. [सं. सिंदूर; प्रा. सिंदूरा-सेंदूरो; हिं. सेंदूर] ०**उतरणें**–१ मूर्तीवरील शेंदुराचें कवच सुटून पडणें; कवच टाकणें. २ (ल.) अपमान करणें; अवज्ञा, अवहेलना, अनादर करणें; मानहानि करणें. ०**विकार**–पु. घोगरा, बसलेला आवाज. (शेंदूर खाण्यांत आल्यामुळें झालेला).

शेंदेलोण-शेंधेलोण-शेंदीलोण—न. सैंधव; मीठ; शेंदेमीठ; एक क्षार; खाणीचें मीठ. [सं. सैंधव+लवण]

शेन—पु. ससाणा पक्षी. [सं. श्येन] **शेनी**–स्त्री. ससाण्याची मादी.

शेन—पु. (गो.) पावसाचा थेंब.

शेन—अ. शी पहा.

शेनणी-णें—प्र. शेंदणी-णें पहा.

शेनिश्चय—पु. पक्का विचार; ठराव; निकाल; शहानिशा; मनाची खात्री, समाधान. (क्रि० करणें.) शहानिशा पहा. [सई+निश्चय]

शेनोडी—स्त्री. (व.) शिंदीच्या पात्यांचें लहान टोपलें.

शेनोत, शेनवत—न. (गो.) केळीच्या पानाचा विडी करण्याकरितां केलेला लहान तुकडा.

शेन्नी—स्त्री. बडीशोप; ओव्यासारखें एक धान्य; बीं.

शेप, शेंप—स्त्री. शेपूट; पुच्छ; शेपटी. [सं.] सामाशब्द–०**किडा**–पु. शेंपटासारखा भाग असणारा किडा. यास पाय नसून हा सरपटत चालतो. ०**खळी**–स्त्री. विण्याच्या सुमारास जनावराच्या शेपटीजवळ खळगी पडते ती. ०**चौरी**–वि. शेपेचा चौरीसारखा गोंडा असलेली (मेंढी). ०**कल्याणी**–वि स्त्रीलंपट; कामातुर; विषयी.|(स्त्री). ०**मोडया**–वि. १ केवळ शेंपूट पिळवटली असतांच चालणारा. २ (ल.) मट्ट; आळशी; नालायक; कामचुकार. ०**रूट**–न. एक जातीचें गवत. ०**ळा**–पु. १ एक किडा. २ मोठी ऊ. **शेपट**–स्त्री. अतिशय जोरानें हांकणें, पाठीस लागणें; दामटणें; धावडवणें. (क्रि० काढणें.) **शेपटणें**–उक्रि. शेपट काढणें, दमविणें. **शेपटणें**–उक्रि. शेपूट पिळणें. **शेपटा-शेंपडा**–पु. १ लांब शेपटी; लांबलचक पुच्छ. २ (ल.) पाठीवर मोकळी सोडलेली वेणी. **शेपटी-शेंपटी-शेंपडी-शेंपुडी**–स्त्री. १ पुच्छ; शेंपूट. २ (ल.) जनावर; गाय; म्हैस वगैरे. **शेपटी**–स्त्री. (ल.) फोकाटी; छडी; शिरपुटी; शिपटी. **शेपाटणी**–स्त्री. शेपट; शक्तीपेक्षां जास्त श्रम देणें. (क्रि. काढणें.) **शेपाटणें**–उक्रि. शेपटी पिळणें; धावडवणें; दमविणें; फोकलणें; शिरपटणें; चमकाविणें. **शेपडावणें**–उक्रि. (मा.) झोडपणें; मारणें. **शेपाळ**–वि. पुच्छ असलेला; शेपटीचा. **शेपाळणें**–क्रि. शेपटी पिळवटणें; कुदलणें; दमविणें; दामटणें. **शेपूट-शेंपूट**–न. १ पुच्छ; शेपटी. २ (ल.) टोंक; अग्र; अखेरचा भाग. ३ (ल.) जनावर; पशु; गाय, म्हैस वगैरे. 'दर शेपटास तीन रुपये पडतात.' –के २५ ७.३७. [सं. शेप] ०**अडकणें**–एखाद्या अडचणींत गुंतून राहणें; भानगडींत सांपडणें, तींतून बाहेर पडण्यास कठीण जाणें; अडकून जाणें. ०**घालणें**–भिऊन पळणें; भितेरेपणा दाखविणें; घाबरून निसटून जाणें. ०**ठेवणें**–(एखाद्या कामाचा, गोष्टीचा, क्रियेचा) अखेरचा भाग पूर्ण न करतां अर्धवट ठेवणें; थोडीशी शिल्लक, बाकी ठेवणें. ०**राहणें**–अवशेष, शेवटचा भाग, अखेरची गोष्ट मागें राहणें, पडून राहणें. ०**लांबविणें**–लांबण लावणें; दिरंगाई करणें; मागची बाकी सारखी वाढवीत राहणें. ०**हालविणें**–लोभीपणा करणें, हावरेपणा करणें; खुशामत करणें.

शेप—न. शिस्न. [वैसं. अपयामि शेपम्–ऋ १०, **शेपाळा-ळ्या**–वि. स्त्रीलंपट; कामी; विषयी; छंदी. **शेपाळू**–स्त्री. छिनाल, विषयी, कामुक स्त्री.

शेप—स्त्री. बडीशोप; बाळंतशोप; एक ओव्यासारखें धान्य, बीं. **शेपट**–वि. बडीशोपेसारखा वास येत असलेलें. **शेपा-प्या**–वि. १ शोप्या; बडीशेपेसारखा वास येत असलेला. (आंबा वगैरे.) २ एक जातीचा तांदूळ. **शेपू**–स्त्री. बाळंतशोपेचें झाड; याची भाजी करतात. [सं. शतपुष्पा] **शेप्याघुडा-डया**–वि. एका जातीचा तांदूळ.

शेप—न. एक फळ. 'शेपें शिताफळेंही खरबुज खिरणी सुंदरें तूत बोरें।' –सारुह ३.४९. [फा. सेब=सफरचंद]

शेपरणें, शेपारणें—शेफरणें-शेफारणें पहा.

शेफ—न. पुरुषाचें जननेंद्रिय; शिस्न. [वैसं. शेप]

शेफ—स्त्री. तरवारीचा एक प्रकार. –संव्या ६७.

शेफरणें, शेफारणें—अक्रि. फुगणें; चढून जाणें; मिजास करणें; फुशारणें; गर्व चढणें. [शेप]

शेंब, शेम—स्त्री. १ श्लेष्मा; शेंबूड; नाकांतून होणारा स्राव २ आंतड्यांतील मळ, स्राव, विष्टा; आम; आंब. ३ घोड्याच्या नाकांतून होणारा स्राव, मल, निर्यास. ४ नाकांतून स्राव होण्याचा

रोग (घोड्याचा); शेंबा. [सं. श्लेष्मन्; प्रा. सिंभ] **शेंबडा-ड्या, शेंबडेरा**–वि. १ शेंबूड असलेलें; शेंबडानें भरलेलें; चोंदलेलें (नाक). २ शेंबडानें भरलेलें नाक असलेला. ३ (ल.) अज्ञान; कळत नसलेला; अल्पवयीन. **शेंबा**–पु. १ घोड्याच्या नाकांतून होणारा स्राव. २ या स्रावाचा रोग. **शेंबूड**–पु. १ नाकांतील वाहणारा श्लेष्मा, चिकट बुळबुळीत स्राव, मल, घाण. हा वाळून खपली धरल्यास त्यास मेकूड म्हणतात. २ (ल.) दिव्याची काजळी, मस. [सं श्लेष्मोदक–भाइअह १८३३] **म्ह०** मी हसत्ये लोकां शेंबूड माझे नाका. **शेंबुडांत लोळणें**–(ल.) संसारांत गुरफटून राहणें. **शेंबूड फेडणें**–नाक शिंकरून टाकणें. **शेंबूडकिडा**–पु. (बे.) गोगलगाय; पीक; पिकळी.

शेंब-बी—स्त्री. धातूचें टोपण; (काठी, छत्री, खांब, पलंगाचा खूर, शिंग, बाण यांच्या) टोंकाला मजबुतीसाठीं बसविलेली धातूची, विडी, वेढें, मायणी, टोपण वगैरे. लोहंगीचें वेढें वगैरे. नरसाळ्याची निमूळती नळी.

शेंबय—उद्गा. (गो.) शाबास ! वा ! शिमग्यांत पोस्त मागावयाच्या वेळीं योजावयाचा शब्द.

शेंबरटी-शेंबी-शेंबारटी—स्त्री. एक कांटेरी वेल.

शेंबला—पु. शेमला पहा.

शेंबा—पु. (कु.) (सोनारी) पत्र्याला कोंच आणण्याचें साधन. [शेंबी]

शेंबाट्या—वि. (चिपळूण) हलकासलका; कोणीतरी; कमी दर्जाचा. ' वकील शेंबाट्या असला तरी चालतो. '

शेंबें—न. (व.) नासधूस; मोडतोड. ' मातीच्या चित्राचें त्यानें शेंबें शेंबें केलें तेव्हां त्याचें समाधान झालें. '

शेंबें—पुअव. शेताच्या सरहद्दीचे दगड (सर्कल इन्स्पेक्टरनें कायम केलेले). [सं. सीमा]

शेंभरें—वि. (गो.) शंभर.

शेम—स्त्री. शेंब पहा.

शेमट-टी—पुस्त्री. एक जंगली झाड. याचीं पानें आंब्यासारखीं लांब असून चिंचोक्याहून लहान चपटीं फळें येतात. –वगु ५.९१.

शेमणें—न. लिंग; पुंजननेंद्रिय. [सं शिस्न]

शेमला—पु. डोकीला बांधावयाच्या पटक्याचा, रुमालाचा पदर; शेवट; कमरबंदाचा शेवट. [अर. शम्ला]

शेमली—स्त्री. (कु.) शेंब पहा.

शेमलें—न. एक वेलीवजा झाड.

शेमेजणें—अक्रि. थोडथोडा घाम येणें; घामानें ओलें होणें, भिजणें; घाम बाहेर येऊं लागणें. ' चार दिवस घाम आला नाहीं आतां याचें अंग घामानें शेमेजलें आहे. ' [सं. स्वेद ?]

शेम्न—न. (ग्राम्य) शेमणें; शिस्न; पुरुषांचें जननेंद्रिय.

शेय्या—स्त्रीअव. (खा. अप.) शेवया.

शेर—स्त्री. (कों.) पक्ष्याची विष्ठा; शीट; छीट. **शेरणें**–अक्रि. पक्ष्यानें विष्ठा टाकणें; शीट टाकणें.

शेर—पु. चिकाडा; काडेहुरा; निवली; एक कुंपणास लावावयाचें काडयाकाडया असलेलें चिकाळु झाड. [फा. शीर=दुध] **शेरताटी-ताट-ताड**–स्त्री. शेराच्या झाडांची रांग, ओळ, कुंपण.

शेर—पु. १ पदार्थ तोलावयाचें किंवा मापावयाचें एक प्रमाण, माप. याचें माप पूर्वी निरनिराळ्या भागांत निरनिराळें असे. पुढें दिलेले आंकडे रुपये भाराचे आहेत. बेळगांव–२३.०९, मद्रास–२४.३, मदुरा–२४.९१, मंगळूर–२३. ८५, म्हैसुर–२३.८५, पांदिचरी–२३.६२, त्रिचनापल्ली–२३.१७, नगर–७६.५६, सिंध–७२ ४६, माळवा–७३.८९, अजमेर–७४. ९७, पुणें–७६, रत्नागिरी–२९, चिपळूण–३०, वेंगुर्ले–२७॥, मालवण, दापोली, मुंबई–२८, राजापूर–२९, बंगाली–८०, फर्काबाद–११०, लखनौ–९५.८२, मालधा–९५.६६, काशी–१०५. सध्या ८० भारांचा शेर सर्वत्र करण्यांत आला आहे. २ जासुद, शिपाई, बेगारी वगैरेस पोटाकरितां जें धान्य, शिधा देतात तो. ३ रोजचें अन्न; नित्यवृत्ति: उदरनिर्वाहाचें साधन. (क्रि० उठणें; उडणें; काढणें; चालणें; तुटणें; मिळणें; लागणें). ४ आलुतेंबलुतें. –गांव १०३. **म्ह०** शेर शिजविला आणि विस्तव विझविला=स्वत:चें थोडेसेंच काम चटकन आटोपून दुसऱ्यास दिरंगाई बद्दल दोष देणाऱ्यास म्हणतात. २ थोडक्यांत कारभार आटोपणाऱ्या घरधनिणीस म्हणतात. शेरास सव्वाशेर=प्रतिपक्षापेक्षां वरचढ; चोरावर मोर. **०पीठ-शिधा-नपु.** भत्ता; शिधा; शिपाई, बिगारी यास दिलेलें धान्य. **शेरका**–वि. १ शेरभर धान्य मावेल असा. २ शेरभर वजनांत भरेल असा. ३ शेरभर धान्य, तांदुळाचा भात शिजेल असें. **शेरभरकोंडा**–पु. एक मुलींचा खेळ. –मखेपु २५८.

शेर—पु. १ वाघ. –राज्य ३.२२. २ सिंह. **३**–वि. जबरदस्त; धृष्ट; धीट; शूर; पराक्रमी; धाडशी; अंमल, सत्ता गाजविणारा. ' परंतु ऐशा बखेडियांनीं दुश्मन शेर होतात. ' –रा १२ ८३. ' मागती गिलचे शेर झाले. ' –भाब १०८. –राज्य ८.६०. [फा. हिं. शेर=सिंह] **०खोर**–वि. उन्मत्त. ' तऱ्हेवाईक शेर खोर... लोक हुजरातींत एकंदर ठेवूंच नयेत. ' –मराभा १४. **०पणा**–पु. सामर्थ्य; जबरदस्ती; जोरावरी. –रा ८.४. **०बाजी-बाजू**–स्त्री. सरशी; वर्चस्व. ' हे आपले ठायीं आपली बहुत शेरबाजी मानतात. ' –जोरा ११५.

शेरंडावणें, शेरडावणें—अक्रि. शेकारणें;[1] फुगणें; ताठा भरणें.

शेरडी—स्त्री. शेळी; बकरी. **शेरडूं**–न. बकरें (शेळी किंवा बोकड). **शेरडूक**–न. (तिरस्कार) बकरें; करडूं; कोंकरूं. **शेरडुकी**–स्त्री. शेळी. **शेरडुकया**–पु. धनगर; शेळया पाळणारा.

शेरडी—वि. एक जातीचा ऊंस (गुजराथमधील).

शेरणी—स्त्री. १ नवस फेडण्याकरितां वाटलेली मिठाई, प्रसाद, खिरापत. 'यात्रेकरू गरुडाची पूजा करून शेरणी वाटतात.' –तीप्र. ४८. २ देवापुढें ठेवण्याकरितां किंवा भेट देण्याकरितां तयार केलेली गुळाची लहान ढेप. ३ नजराणा; दंड. 'तुमचे माथां वतन संबंधे शेरणी दुतर्फा रुपये ५०० करार केले असेत.' –वाडशाछ १.२८३. [फा. शीरीनी–शिर्नि=गोडी; मिठाई; प्रसाद. सं. श्रेणी–शेरणी –भाअ १८३३.]

शेरणी—स्त्री. १ नदीकांठीं वाढणारें एक झुडुप. 'शेरणीचीं बेटें व पाणि याची झील.' –भाब ५६. २ दुसरें एका जातीचें झुडुप. थोर शेरणी. **शेरणबेट**–न. शेरणीच्या झुडपांची गर्दी.

शेरणी—स्त्री. (व.) एक कुष्ट रोग. 'त्याच्या अंगावर शेरणी फुटली.'

शेरब—न. एक प्रकारचें पिस्तुल. 'हे लोक शेरब वापरीत.' –हिंलइ २२७.

शेरवड—न. (कु.) एक बारीक पांढऱ्या पानांचें झाड.

शेरवा—पु. कोंबडयाच्या मांसाचा रसा; शिरवा.

शेरवान–नी—पुस्त्री. एक प्रकारचा अंगरखा. 'कृष्णरावांनीं अंगातील पिवळा शेरवान काढून त्यांच्या हातीं दिला.' –कोरकि १२६. [फा.]

शेरवी—स्त्री. एक जातीचा समुद्रांतील मासा.

शेरा—पु. दर; सरासरी; सामान्य प्रमाण; मध्यम प्रमाण. [अर. शराह्=दर, पगार, भत्ता] **शेरेकरी**–पु. शेऱ्याप्रमाणें पगार, वेतन मिळणारा मनुष्य.

शेरा—पु. १ नियम; कायदा; पद्धति; घालून दिलेली रीत; रूढी; प्रचार; परंपरा; धारा. २ (कोर्टदरबारीं) पत्र, अर्ज वगैरेच्या खालीं लिहिलेलें उत्तर किंवा हुकूम. 'आपण म्हणतां तसें आम्हांस करतां येत नाहीं असा शेरा मिळाला.' –टिले ४.४.९१. निकालाचा लेख याअर्थी शेरेअर्जी; शेरेयाद; शेरेहुकूम; शेरेपत्रक हे शब्द रूढ आहेत. येथें अर्ज, याद, पत्रक व त्यांवरील लिहिलेले हुकूम असा अर्थ होतो. ३ नकल करून घेतल्यावर मूळ कागदावर तशा अर्थाचा लिहिलेला लेख. ४ तपासनीसानें कागदावर आपलें मत व्यक्त करणारा लिहिलेला लेख. ५ कोणत्याहि कामासंबंधीं नियम, पद्धती वगैरे घालून देणारा लेख; दिग्दर्शक यादी; नियमावली. ६ टीका. ७ शिफारस. 'शेरे झटती लोकलोकांचे।' –ऐपो २३८. [अर. शरआ=नियम]

शेरा—पु. पीरावर बांधलेल्या माळांचा पुंज; चादर [अर. शरआ=नियम]

शेरा—पु. अखेरी; टोंक; शेवट. [सं. शिरस्]

शेरिया—पु. (विणकाम). दोन थोक, आठ कळया किंवा २४ फाळे इतक्या प्रमाणाचें रेशीम.

शेरिया—स्त्री. (गुज.) अंबाडी.

शेरी—स्त्री. बोळ; गल्ली; आळी; अरुंद गल्ली. [सं. शिरस्=टोंक]

शेरी—स्त्री. १ जमीन महसुलाकरितां घ्यावयाचा धान्यावर दरमणीं दोन शेरप्रमाणें कमाविसदार आपला हक्क म्हणून घेत असे ती; तसेंच सरकारी कामगारांस अडशेरी वांटणारा कामगार आपला हक्क म्हणून जें धान्य घेत असे ती. २ **शेरी जमीन**–स्त्री. सरकार किंवा संस्थानिकांच्या खासगी मालकीची जमीन. अशी जमीन गांवाच्या क्षेत्रांत सामील केलेली नसे. तसेंच सरकारजमा झालेली किंवा लागवडीकरितां पूर्वी दिलेली परंतु परत आलेली जमीन याच सदरांत सामील होते. कांहीं भागांत जमीनीच्या मालकांकरितां वाहिलेली जमीन किंवा खोती गांवांत खोताकरितां फुकट वाहिलेली जमीन यांसहि शेरी म्हणण्याची पद्धति आहे. 'शेरी रुपये २५ दरसाल।' –वाडबाबा २.८७. **०करी-शेरकर**–पु. शेरी जमीनीची लागवड करणारा; शेरीचा मक्तदार, खंडकरी. **०बाब**–स्त्री. शेरी जमीनीपासुन आलेला ऐनजिनसी किंवा नगदी वसुल.

शेरूक—न. (कु.) एका पक्ष्याचें नांव.

शेरें—न. नदींतील एका माशाचें नांव.

शेल—न. टोंक; शल्य. 'तैसा नोहोटे दुर्वाक्य शेलीं। सेलिला सांता।' –ज्ञा १३.४९६. [सं. शल्य]

शेल—न. १ (व.) शेवट; अखेरी; टोंक; शेंडा. 'शेल पुरल.'=शेवट झाला. 'आम्ही शेल्या लोक गेलों'=आम्ही शेवटपर्यंत गेलों. २ (गो.) काथ्याची लांब दोरी; कासरा. ३ (हेट.) नारळाचा घड; नारळाचा देंठ. ४ (ल.) उच्चपद; उत्तम भाग; शिर; गळा. [सं. शैल; गु. छेल्ला]

शेल—वि (खा.) समांतर (जूं).

शेलका, सेलका—वि. १ उत्तम; उत्कृष्ट; मुख्य; निवडक; श्रेष्ठ; वेंचक; पसंत; सुरेख. सामान्यतः या अर्थी व्यापक अर्थानें व क्रियाविशेषणाप्रमाणेंहि उत्तम रीतीनें, बरोबर, नेमका, अचूक या अर्थी उपयोग होतो. 'हरिजन म्हणेल अर्थ प्रणतां याया न सेलका नाहीं।' –मोशांति ७.१२०. [सं. शिल्=वेंचणें]

शेलणें-नें—न. झाडांस पोंडांतून पाणी उडविण्याचें सुपासारखें लांकडी साधन.

शेलणें—सक्रि. १ (महानु.) विंधणें; जखम करणें. 'नवनिशित तिहीं शेलित्व यादवातें।' –गस्तो ५७. २ (कों.) सोलणें; शेंगा वगैरे फोडणें. [सं. शल्य]

शेलभेल—स्त्री. मिसळ; मिश्रण; संकर; खिचड-मिचड; गिजगिंदा. [भेल द्वि.]

शेलवंट-टी—स्त्री. १ एका जातीचें झाड. २ कोंकणांत सर्वत्र आढळणारी एक वेल. –न. वरील झाडाचें फळ.

शेला—पु. अंगावर घ्यावयाचें एक उंची वस्त्र; हा पूर्वी चार पट्टी एकत्र करून तयार करीत. हा मानाच्या वस्त्रांत असे. 'शेले शालू साडया क्षीरोदक लांब रुंद पाटावें।' –द्रौपदी वस्त्रहरण. [सं. चैल. हिं. शेला] **०घालणें**–दुखवटयाचीं वस्त्रें देणें. **शेलकट-खंड-गट**–न. भिकार, जुना, जाडाभरडा शेला (तिरस्कारार्थी). **शेलकाट**–न. (सातारा) मुसलमान स्त्रिया अंगावर पांढरी चादर घेतात ती. **शेलपाटी**–स्त्री. शेला व पाटी, (गांवच्या पाटलाचा हक्क, मान). 'शेलपाटी दर बुडास मोकरर १॥ मण.' –वाडशाछ १.१४४. **शेला पागोटें**–न. १ शेला व पागोटें; बहुमानाचीं वस्त्रें; अहेराचीं वस्त्रें. पूर्वी बहुमानार्थ शेला व पागोटें देण्यांची चाल असे. २ सरकारी अधिकाऱ्यांचा एक हक्क, कर. **शेला पागोटें करणें**–पोषाख करणें. **शेलारी**–स्त्री. एक उंची लुगडें; भारी किंमतीची साडी; शालू. 'एकांतांत गांठितां घरून बळकट करीं शेलारीला।' –प्रला १६७. **शेलावाटी**–स्त्री. लग्न किंवा म्होतूर लावावयाच्या वेळीं पाटलास द्यावयाचा शेला व वाटीचा मान; एक हक्क; कर. **शेले सांबळीचा**–वि. शेला व शेमला असलेला; अकडबाज; ऐटबाज. 'तेथें दोनशत धनुर्धर। तीनशत उभे खांडेकर। शेलेसांबळीचे झुंझार वीर। पांचशतें पैं।' –कथा ४. ६.१७५.

शेला—पु. (कु.) नारळाची पेंड; नारळाच्या पोईचा देंठ. शेल पहा.

शेलाटा-टी—पु स्त्री. उंच व सडपातळ; सडसडीत पण रेखीव व मजबूत (मनुष्य, झाड, काठी). 'पोरगा शेलाटा होता.' –खरा देशभक्त. [शेल]

शेलाटी—स्त्री. १ एका झाडाचें नांव. २ (ल.) उंच सडपातळ स्त्री.

शेलाटी—स्त्री. (पुणें.) जोड जूं.

शेलारें—न. कोरफड, धायपात वगैरेमधून येणारा तुरा, झुबकेदार दांडा. [शेल]

शेली—स्त्री. १ टोंक; अग्र; झाडाचा शेंडा. २ (कु.) नारळाच्या पेंडीचा देंठ. ३ (ल.) मान; गळा. 'कापुनि घ्याया आलों शेली।' –र ५०. [शेल]

शेली—वि. (नंदभाषा.) सहा; ६ संख्या.

शेलू—स्त्री. १ एक झाड. –पु. २ त्याचें फळ. हिरवा रंग करण्याच्या कामीं याचा उपयोग होतो.

शेलें—न. नारळाच्या पोयींतून येणारा फुलांचा घोंस. –कृषि ७४८. [शेल]

शेलें—न. १ जूं; जोखड (हें धुरीस पक्कें केलेलें असतें). २ (ल.) भार; ओझें; जबाबदारी (क्रि० गळयावर, वर–शेलें असणें, होणें, पडणें, घालणें, देणें). ३ बाजू; पक्ष; प्रतिपक्षी (खेळ, युद्ध यांतील). [शेल]

शेले भाल्यानिशीं—शिले भाल्यानिशीं पहा.

शेव—स्त्री. एका फळझाडाचें नांव. –न. या झाडाचें फळ; सफरचंद. [अर. सेब] **शेवीचें झाड**–न. शेव.

शेव—स्त्री. एक खाद्यपदार्थ; हरभऱ्याच्या डाळीचें पीठ छिद्रयुक्त पात्रांतून पाडून तळून करतात तो पदार्थ. **०कंड-कुंड-खंड**–न. शेवेचा तुकडा. **०गांठी**–स्त्री. गुजराथी शेवेचा प्रकार.

शेव—पु. १ टोंक; सीमा; अखेरीचा भाग; कड; शेवट (गांव, शेत, जाळें, वस्त्र वगैरेचा); शीव; शिवेवरचा आसमंतातचा भाग, २ पदर; टोंक; शेवटचा भाग (वस्त्राचा). 'कांहीं एक हंसून शेवशिरिंचा घेती कीं आलिंगना।'–गंगाधर, रस कल्लोळ ८१. ३ (ल.) संबंध; धागादोरा; (तपास, गुन्हा वगैरेचा) 'वादळाचा शेव हंयसर लागला.' 'शहराचा शेव' ४ माडी काढावयासाठीं पोगीस जो छेद पाडतात तो. [सं. सीमा; शेप] **शेव घालणें**–१ वस्त्राचा पदर हालवून बोलावणें. २ पदरानें दिवा मालविणें. **शेव घेणें**–ओसरणें; कमी होणें; खालीं जाणें, (पूर, रोग, दुखणें वगैरे). **शेव देणें-पोहोंचवणें**–साथ करणें; सूर धरणें (गवयाची). **शेव बाधणें**–(कु.) सहवासामुळें पीडा होणें; वाईट संगति लागणें. **शेव लावणें**–अनुमोदन देणें. मदत करणें; सहाय करणें; हात देणें. **शेव लावणें**–जमीन उकरली न जातां वरवर खुरपणें, खरडणें. **शेव येणें**–पदर येणें; स्त्री ऋतुमती होणें.

शेव—स्त्री. भाजीपाला वगैरे विकावयास आला असतां त्यावर घ्यावयाचा ऐनजिनसी कर (एक जुडी किंवा मूठभर). **शेवसबजी**–स्त्री. भाजीपाल्यावरील कर. 'शेवसबजी व वानगी देशमुखांचे निमे करार केली असे.' –वाडबाबा ३.३. [फा.]

शेव—क्रिवि. १ उभ्या लंबरेषेंत; सरळ खालीं (क्रि० चालणें,) धरणें. याच्या उलट करळ. २ (व.) हलकेच, सौम्यपणें. –वि. (वि) ठेंगणें.

शेवई-य—स्त्री. गहूं किंवा तांदूळ यांचें पीठ भिजवून त्याची केलेली बारीक व लांब वळी. यांची खीर करतात. [शेव] **शेवगो**-पु. (कु.) शेवया गाळण्याचें यंत्र.

शेवक—पु. प्र. सेवक पहा.

शेवक—न. (गो.) नारळाच्या पेंडीचे नारळ काढून घेतल्यावर रहातो तो देंठ. [शेव]

शेवगा—पु शेगट; एक झाड; याच्या फुलांची व शेंगांची भाजी करतात. [सं. शेगुल शिग्रु: शिग्राव-वाग्भट. गु. सरघवो]

शेवगा-गो—पु. शेवया, कुरड्या घालण्याचें पात्र. [शेव]

शेवट—पु. अखेर; परिणाम; अंत; समाप्ति; अंतिम अवस्था. १ -न. टोंक; अग्र; कड; कडेचा भाग; अंतिम भाग. २ बंदुकीचा तोडा. [सं. सीमन्-सीमा] **शेवट घेणें**-अखेरीस नेऊन पोंचविणें; संपविणें; समाप्त करणें; अखेर करणें. **शेवटचा**-वि. १ अखेरचा; अंतिम. २ सर्वांत धाकटा. **शेवटचा आदितवार**- पु. कधींहि न येणारा दिवस. **०च्याआदितवारी** कधींहि नव्हे; कदापि न; केव्हांहि नाहीं. **शेवटचा पालखी**-स्त्री. प्रेताची तिरडी. **शेवटच्या बांधण्यास पाणी मोडणें**-अखेरच्या अटी सांगणें; कमाल मागणी करणें; अंतिम हेतु कळविणें. **सरशेवटीं**-अखेरीस; सर्व संपल्यावर; अंतिम अवस्थेमध्यें. **शेवटणें**-अक्रि. १ टोंक काढणें; बोथट झालेलें टोक (छिनी वगैरेचें) तीक्ष्ण करणें; धार लावणें. ' पहार शेवटायला हवी होती. ' २ घोडयास वगैरे चाबकाच्या अग्रानें किंचित मारणें. ३ (राजा.) टोंकास, शेवटास लागणें; चाटून, घांसून जाणें (गोळी, तीर, नेम वगैरे). ४ शेवट लावणें; संपविणें; पूर्ण करणें (हिशोब, व्यवहार वगैरे). ५ शेवटीं येणें. अखेरीस होणें, घडून येणें. ' परिपरिणामीं शेवटे। अवश्य मरण। '-ज्ञा १८.२४९ **शेवटता**-क्रिवि. निसटता; घांसून जाणारा; चाटून जाणारा; चुटमुटका. (क्रि० लागणें; जाणें). **शेवटला-टील**-वि. अखेरचा; अंतिम; शेवटचा. **शेवडा**-वि. (राजा.) गांवाच्या शेवटीं राहणारा. शेवडे हें आडनांव परांजपे, आपटे, गोखले या चित्पावन व एका कऱ्हाडा घराण्याचें आहे. **शेवटोर**-क्रिवि. शेवटपर्यंत; अखेरपावेतों. ' सकळ राज्य तंत्रहि डबीर नारोपंताचे स्वाधीन करून शेवटोर ही चालवीत आले ' -तंजावर शिलालेख ९६.२३. [शेवटवर]

शेवटा-टो—पु. (गो.) एक रुचकर मासा.-सह्याद्रि १४६.

शेवटा—पु. कुंभाराचें चाक ज्यावर आधारलेले असतें तो निमुळता भाग. [शेवट]

शेवडा—पु. शेव या नांवाचा कर वसूल करणारा अधिकारी. [फा. शेव]

शेवडा—पु. एक गोसाव्याचा पंथ; जैन यति. ' जंगम शेवडे आणि फकीर। ' [सं. सेवा; गु. शेवडो; सिं. सेविडो]

शेवडा—पु. एका जातीचा मासा.

शेवडी—स्त्री. चर्म; कातडी. -हंको.

शेवडी—स्त्री. (गो.) सुपारीच्या किंवा नारळाच्या झाडाचें नुकतेंच फुटलेलें चुडत.

शेवडी—स्त्री. टोंक; अखेर. ' तो गांवाच्या शेवडीला राहतो. '

शेवंडें—न. एक जंगली फूल.

शेवण—न. एक जातीचा मासा.

शेवती-शेंवती-शेवंती—स्त्री. १ एक फुलझाड. २ एक झाड. [सं. सेमंती] **शेवतें**-न. १ शेवंतीचें फूल. २ शेवतीच्या फुलासारखें डोक्यांत घालावयाचें सोन्याचें फूल.

शेवती—स्त्री. (अप.) वर वधूच्या गांवीं आला असतां त्यास सीमेवर समोरें जाऊन त्याचा करावयाचा सत्कारसमारंभ; श्रीमंती. [सं. सीमांतपूजन] **शेवतीपूजन**-न. सीमांतपूजन **शेवती देणें**-सीमांतपूजन करणें. ' कृष्णास पूजन शेवती। देता न कळे दिवसराती। ' -एरुस्व १५.११.

शेवतें-शेंवतें-शेवता—नपु. बिब्बा दिव्यावर धरून तापवून त्याच्या तेलाचा दुधांत अगर नुसता खालीं पाडलेला थेंब (औषधाकरितां). (क्रि० पाडणें; टाकणें).

शेवतेवाघळी—स्त्री. तांबडया पाठीचा एक मासा.

शेवत्रा—पु. स्पर्श; संसर्ग; शिवाशिव. [शिवणें]

शेवपा-प्या—वि. शेपा; शेप्या पहा. बडिशोपेसारखा वास येत असलेला (आंबा). -कृषि ६७८.

शेवर—पु. शेवरीचें झाड.

शेवरा-शेंवरा-ऱ्या—पु. शेवरीच्या जातीचें एक झुडुप [सं. शाखोट]

शेवरी-शेंवरी—स्त्री. १ एक झुडुप. २ मऊ कापूस येणारें एक झाड; सावरी [सं. शाल्मली; प्रा. सामरी, सिंबाली; हिं. सेंबल, सेमल]

शेवरा—पु. नाचणीची एक जात. हिचा दाणा भुरा असून ही गवीं आहे. -कृषि २८३.

शेवरी—स्त्री. (अशिष्ट) शेवयांचा पुंजा, जुमडा. [शेवई]

शेवरें—न. भुइछत्री; अळंबें.

शेवल, शेवाल—पु. शेवळ, शेवाळ पहा.

शेवळ—न. (गो.) शेल; नारळ काढून घेतल्यावर राहिलेला पेंडीचा देंठ.

शेंवसर, शेवसरणें—शिवसर, शिवसरणें पहा.

शेवा—स्त्री. (अप.) सेवा पहा. चाकरी.

शेवा—पु. करवंद वगैरे झाडाची कुंपणाकरितां लावावयास आणलेली कांटेरी फांदी. [शेव]

शेवळ, शेवाळ, शेवाळी—पु.न.स्त्री. १ पाण्यावर किंवा ओलसर जागेंत उगवणारी हिरवी मऊ वनस्पती. २ पाण्यांत उगवणाऱ्या शेवाळीसारख्या कांहीं झुडपांस सामान्य नांव. उदा० हड, गोंडाळ, नीळ. [सं. शैवाल; बं. शेयाला; हिं. शेवाल] **शेवाळणें**–अक्रि. १ शेवाळीनें युक्त होणें; शेवाळ उगवणें; (दात) बुरसणें; बुरशी येणें. २ (ल.) गुबगुबीत होणें; गोंडस दिसूं लागणें; पोसणें; पुष्ट होणें. **शेवाळें**–न. शेवाळाचे लांब तंतु. –वि. शेवाळलेलें; शेवाळीनें युक्त. 'तें पंचक्रोश होतें शेवाळें। म्हणोनि शंभु स्थापिला स्वलीळें।' –कथा २.१६.१२६. **शेवाळें**—न. लोत नांवाच्या कंदाच्या झाडाचा देंठ. याच्या तुऱ्याची भाजी करतात. **शेवाळ-शेवाळें खरबूज**—न. खरबुजाची एक जात. 'दाळ दिंड शेवाळ वाळकें' –अमृत ३४. **शेवाळलेली**—वि. गाभण; गरोदर. 'त्या वनस्पती शेवाळलेल्या मेंढ्यांच्या दृष्टीसमोर बांधून ठेवल्या.' –व्हेनिसचा व्यापारी ३०. **शेष**—पु. नागांचा राजा; यास सहस्र मुखें असुन याच्या डोक्यावर पृथ्वी आहे अशी समजूत आहे. 'शेषकूर्म वाऱ्हाव जाले।' –दा २०.८. [सं.] **०कन्या**–स्त्री. सुलोचना; इंद्रजिताची स्त्री. **०तूलिका**–स्त्री. सर्पशय्या; सर्पाची गादी. **०मणि**–पु. १ शेषाच्या डोक्यावरील रत्न. २ पाचेच्या खाणींत पाचेपेक्षां फिका स्फटिक सांपडतो तो. **शेष**—पु. बाकी; ऊर्वरित भाग; अवशिष्ट भाग; अंश. 'शेष असा वरिली रणरंगीं रंगोनि हानि शांतनवें।'–मोभीष्म १२. २५. [सं. शिष्] (समासांत) रोगशेष; ऋणशेष; अभिशेष. **०खंड**–पु. राहिलेला भाग; अवशेष; अंश. **०जाति**–स्त्री. (गणित) बाकी सामील केलेली. **०पूरण**–न. न्यून भरून काढणें; बाकी भरून काढणें; पुरें करणें. **०पूर्ति**–स्त्री. न्यूनतापुरणा; न्यूनपूरणानंतरची संपूर्ण अवस्था. **शेषाधिकार**–पु. अविभक्त कुटुंबाची मिळकत कोणी हिस्सेदार मयत झाल्यास इतर भागीदारांस मिळावयाचा हक्क, अधिकार. **शेषाधिकारी**–वि. अविभक्त कुटुंबांतील कर्त्या माणसानंतर ज्याकडे कुटुंबाची मालमत्ता यावयाची असते तो. **शेष्य**–वि. शिल्लक ठेवावयाचें; ऊर्वरित; मागें ठेवावयाचें; बाकी रहावयाचें.

शेंस, शेंसपाट—स्त्री. (राजा.) १ शेज पहा. मळवट; मंगलप्रसंगीं कपाळावर गंध, कुंकू, दहीं वगैरेचा पट्टा ओढून वर तांदूळ डकवितात तो. (क्रि० भरणें). 'सुग्रीवास दिधली निर्धारीं। शेंमपाट भरोनिया।' –रावि १८.३४. २ देवदासीचें देवाबरोबर लग्न लावावयाचा विधि. (क्रि० घालणें). [सं. शीर्ष] **शेंसफूल**–न. शीसफूल पहा. **शेंसभरप**–न. (गो.) ओंटी भरणें. **शेंसमारप**–क्रि. (गो.) संचार होणाऱ्या माणसाच्या अंगावर तांदूळ टाकणें. **शेंसवंत**–न. महारांत पाटाचेवेळीं तीन वेळां कपाळास कलश लावण्याचा विधि. **शेंसविधि**–पु. तरुणस्त्रीचा विधियुक्त कौमार्यभंग; वेश्याकर्माचा दीक्षाविधि. **शेंसेकायत**–वि. शेंसविधि केलेली (स्त्री).

शेंसगांठ—स्त्री. सरकगांठ; निसरगांठ; सरकफांस; सुरगांठ. **शेंसमणें**—अक्रि. अर्धवट वाळणें; आंबटओलें होणें. [सं. शुष्]

शेसरा, शेंसरा—पु. सरकफांस; शेंसरगांठ. **शेंसरगांठ**–स्त्री. सरकगांठ; निसरगांठ.

शेसावणें—अक्रि. (व.) सोस वाटणें; उत्कंठा वाटणें. 'भाकरीसाठीं शेसावला.'

शेसाळणें—अक्रि. १ राग, त्वेष इत्यादिमुळें संतापणें, जळफळणें (मनुष्य, प्राणी). २ (ल.) खवळणें; क्षोभणें; जोराजोरानें, सोसाट्यानें येणें, वाहणें (वारा, पाऊस, आग). ३ शिवशिवणें; उतावीळ होणें; फुरफुरणें (मारावयास हात, चावावयास दांत, बोलावयास जीभ वगैरे). [सं. ईर्षालु] **शेसाळा**–पु. क्रोध; राग; त्वेष; क्षोभ; चेव; उत्कंठा; उतावीळपणा (मनुष्य, प्राणी, मन, अवयव यांचा). 'शेसाळे शेसाळे शेजारा पिसाळे.' [सं. ईर्षालु] **शेसाळणें**—अक्रि. फुसफुसणें; फुत्कारणें; खेकसणें; घुसमुसणें (साप, मांजर, मनुष्य वगैरे).

शेंसुर, शेंसुरणें—शिवसुर, शिवसुरणें पहा.

शेहत्तर—वि. शाहात्तर. ७६ ही संख्या. [सहा+सत्तर]

शेहर-हेर—न. शहर पहा. 'शेहेर सातारा मोडकळीस आला होता त्याची वसाहत केली.' –मदरु १.१६४.

शेहेचाळीस—वि. ४६ संख्या. [सं. षट्-चत्वारिंशत्]

शेळ—स्त्री. शीळ; सर्प, पाल वगैरेचा शिळीसारखा आवाज. (क्रि० घालणें; वाजवणें; वाजणें). 'काम करणाऱ्या मुंग्या एक प्रकारची शेळ वाजवून लागल्याच जास्त मेहनत करूं लागतात.' –मराठी सहावें पुस्तक पृ. १३. [ध्व.]

शेळ—स्त्री. (राजा. कों.) १ जिच्यामध्यें उन्हाळ्यांतहि ओलावा राहतो अशी भातजमीन. २ पाऊस पडल्याबरोबर लावतां यावें याकरितां पाणथळ जमीनींत केलेलें भाताचें रोप; **शेळीचा तरवा**–पु. अशा तऱ्हेनें केलेलें रोप, व अशी जमीन. [सं. शीतल]

शेळ—स्त्री. १ (कु.) संध्याकाळची वेळ. २ (कु.) लहान मुलांस थंडाईसाठीं सकाळीं घालावयाचें पाणी, किंवा औषध. [सं. शीतल]

शेळ—स्त्री. (गो.) थंडी; ओल. [सं. शीतल]

शेळउंडी—स्त्री. (गो.) शिळा भात पाण्यांत कालवून करतात तें खाद्य. [शिळी+उंडी]

शेळकुंड—न. (कु.) गोंवरी.

शेळणें—न. शेलणें पहा.

शेळणें—अक्रि. (कु. कों.) शिळें होणें; गारठणें. [सं. शीतल; म. शिळा].

शेळभेळ—स्त्री. शेलभेल पहा.

शेळमोडो—वि. (गो.) थंडपणा, गारठा मोडलेला, कमी झालेला.

शेळवंडी—स्त्री. सासरीं अगर माहेरीं आलेल्या मुलीवरून ओंवाळून टाकतात ती तांदुळांची अगर भाताची मूठ, व ही ओंवाळून टाकण्याची क्रिया. [शिळी+उंडी]

शेळसप्तमी—स्त्री. शिळा सप्तमी पहा.

शेळसभा—स्त्री. (राजा.) विरोधी पक्षांच्या मित्रांची तडजोड करण्याकरितां भरविलेली सभा. [शीतलसभा]

शेळा—न (कु.) शहाळें; कोंवळा नारळ.

शेळी—स्त्री. बकरी. [सं. छाग-छागलिका; प्रा. छागलिआ] **म्ह०** 'शेळी जाते जिवानिशीं खाणारा म्हणतो वातड= एखाद्यानें जीव तोडून झटावें पण दुसऱ्यानें उलट नांवें ठेवावीं अशा प्रसंगीं योजतात. **शेळकया**-पु. शेळया चारणारा; धनगर. **शेळडू**-न. शेरडूं; करडूं; कोंकरूं. **शेळीचा भाऊ**-पु. (कों.) १ बोकड. २ (ल.) उर्मट; मगरमस्त. **शेळीचे गलूल**-पु. अजागळ. **शेळ्या मेंढ्या**-पु. बुद्धिबळांतील एक डाव. हत्ती हे वाघ समजून व इतर सर्व मेंढ्या समजून खेळावयाचा खेळ. **शेळ्या वाघ**-पु. एक मुलांचा खेळ. -मखेपु ११९.

शेळी—स्त्री. (गो.) सहाण; वस्तऱ्यास धार लावण्याचा न्हाव्याचा दगड. [सं. शिला]

शेळी, शेळें—वि. (गो.) शिळें.

शेळू—स्त्री. (राजा.) शिवळ; जोखडाच्या टोंकास असलेल्या भोंकांत घालावयाची खुंटी. (अव.) शेळवा.

शेळू—स्त्री. (राजा.) शिऊळ; शीळ; शेळ; शिटी. (क्रि० घालणें; वाजणें; वाजवणें. [ध्व.]

शेळो, शेवाळो—पु. (गो.) शेवाळ.

शेळोणी—स्त्री. शीळ; शिटी. [ध्व.]

शेळोताप—पु. (कु.) विषमज्वर.

शेळोंदरा-द्रा—वि. काळुंद्रा; काळा कुळकुळीत; काळाकुट्ट; कोळशासारखा काळा. [सं. शिला]

शैघ्र्य—न. शीघ्रता; त्वरा; चपळाई; जलदी. [सं. शीघ्र]

शैत्य—न. १ थंडी; थंडपणा; गारठा; गारवा. 'नाशी चंडकर जसा समस्त शैत्यातें।' -मोकर्ण २२.१५. २ हींव; सर्दी; थंडीचा विकार. [सं. शीत] **शैत्यपित्त**-न. १ थंडीपासून व पित्तापासून होणारा विकार. २ कफ व पित्तकर प्रकृति. [सं.]

शैथिल्य—न. शिथिलता; ढिलेपणा; सुस्ताई; हलकपणा. [सं. शिथिल]

शैन्य—न. (अप.) सैन्य; सेना. 'मृत्तिकेचें शैन्य केलें।' -दा ८.१.३२. 'शैन्य अवघेचि मरावें।' -दा ८.८.३९. [सं. सैन्य]

शैय्याविर्णे—अक्रि. निजावयास घेणें; वर निजणें. 'मंचक समर्थें शैय्याविला पवित्र।' -सप्र ८.८.२८. [सं. शय्या]

शैल—पु. पर्वत; डोंगर. 'वोहळलया शैलाचें सर्वांग जैसें।' -ज्ञा ११.२४७. (अप.) शैल्य. -वि. पर्वतासंबंधीं; डोंगरासंबंधीं. [सं.] **०कक्षा**-स्त्री. पर्वताची बाजू. 'शैल-कक्षानिकुहरें। जळाशय परिसरे।' -ज्ञा १३.६१३. **०थाटें**-क्रिवि. पर्वताप्रमाणें. 'धडधड भुमि तेणें लोटली शैलथाटें।' -माधवरामायण बालकांड २७.

शैली—स्त्री. पद्धति; रीत; तऱ्हा; धाटणी; खुबी. (वागण्याची, बोलण्याची, लिहिण्याची वगैरे). [सं.]

शैली—स्त्री. (एका प्रकारच्या बुद्धिबळांच्या खेळांतील) राणी व प्रधानाची बायको. **०बाजी**-स्त्री. एक प्रकारचा बुद्धिबळांचा खेळ. यामध्यें दोन शैली असून पटावर शंभर घरें असतात.

शैलूष—पु. नट; नाडेभोरपी; दोरावर खेळ करणारा; कोल्हाटी. [सं.]

शैलेयक—न. शिलेवर उगवणारी वनस्पति. 'शैलेयक आणि हरळी यांचें अंजन नेत्रांत घालावें।' -अश्वप २.३०. [सं.]

शैल्य—न. शल्य याचा अपभ्रंश. शल्य पहा.

शैव—पु. शिवभक्त. 'शैव यासी म्हणती सदाशिव।' -ह ३४.१७७. -वि. १ शिवोपासक; शिवाची पूजा करणारा; एका विशिष्ट पंथांतील. २ शिवासंबंधीं. [सं. शिव]

शैवल, शैवाल—न. शेवाळ पहा. 'वारिति अन्योन्य सैन्य शैवाला।' -मोभीष्म ५.३४. [सं.]

शैशव—न. बाल्य; लहानपण; बालावस्था. [सं. शिशु]

शोक-की—पु. शौक-की पहा.

शोक—पु. १ दुःख; पीडा; खेद. २ आक्रोश; आकांत; रडारड; विलाप. (समासांत) शोकातुल; शोकाकुलित; शोकातुर; शोकान्वित; शोकार्त्त; शोकाविष्ट; शोकाक्रांत; शोकग्रस्त; शोकनिवृत्ति; शोकभंग. [सं. शुच्]

शोकणें—उक्रि. १ शुष्क करणें; सुकविणें; कोरडें करणें; शोषणें. २ शुष्क होणें; सुकणें; कोरडें होणें; वाळणें. 'तृषेनें शोकलें शरीर।' –दा १३.९.१४. [सं. शुष्]

शोकणें—अक्रि. सवकणें; शोक लागणें. 'तुझ्यारे मीं ममतेला शोकलें।' –होला ११५. [अर. शौक]

शोख, शोखणें—शोष, शोषणें पहा. 'आतां धैर्याचा समुद्र शोखला।' –भाए ९४. 'राक्षसी पूतनेचें शोखण।' –दाव ३३५. [सं. शुष्]

शोख—पु. प्रेम; आवड; नाद. 'इतकें राजेश्री बाबासाहेबांचे शोखासाठीं येथें राहणें जालें.' –रा ६.५०३. [अर. शौक] **शोखीन, शौकी**–वि. रंगेल; अभिरुचियुक्त; ललितकलांचा भोक्ता.

शोखी—स्त्री. १ ऐट; अमर्यादा; दांडगाई; जुलूम; औद्धत्य. 'शेंपन्नासानिशीं वाढून यावें अशी शोखी त्याची होती ती तूर्त मोडली.' –ख ७.३५९९. २ बंड, दांडगाई. 'कर्नाटकांत हैदर नाइकानें शोखी केली.' –ख १.९७. [फा. शोखी]

शोचणें—उक्रि. दुःख करणें; खेद करणें; शोक करणें. 'तरी सांग काय शोचावें। एथ तुवां।' –ज्ञा २.१७८. [सं. शुच्] **शोचनीय**–वि. दुःखदायक; दुःखप्रद; खेदकारक. **शोच्य**–वि. १ दुःखदायक; शोक करण्यास योग्य. २ शोकग्रस्त; शोकाकुल. 'जे ब्रह्म करी जीवा। शोच्यातें।' –ज्ञा १३.३६९. **शोच्यता**–स्त्री. १ शोकाकुलता; खेद; दुःख. 'हे शोच्यता अन्हेरी। पंडुकुमरा।' –ज्ञा २.२१. २ अयोग्यता; खेदकारकता.

शोण—वि. रक्त; तांबडा. [सं.शो=रंगविणें] **०नद-भद्र-भद्रा**–पुस्त्री. पाटणाजवळ गंगेस मिळणारी एक नदी.

शोणित—न. रक्त; रुधिर. 'आणि शुक्र शोणिताचा सांधा। मिळतां पांचांचा बांधा।' –ज्ञा १३.१०६. –वि. तांबडें. [सं.]

शोथ—पु. सूज. [सं.] **०व्रण**–पु. सुजून आलेला फोड, गळूं.

शोदा, शोदेगिरी, शोदेशाई—सोदा, सोदेगिरी इ० पहा.

शोध—पु. १ धुंडाळणें; हुडकणें; पहाणें. २ चौकशी; तपास; विचारपूस. ३ परीक्षा; निरीक्षण; बारकाईनें पहाणें. ४ चौकशी; तपास वगैरेचा निकाल, फळ, परिणाम; निरीक्षणापासून बनलेला निश्चय. ५ चुकीची दुरुस्ती; गाळलेला मजकूर घालून केलेली शुद्धि; गळलेला अगर चुकीचा शब्द सुधारून समासांत लिहिण्याची क्रिया. 'कोठें कांहीं कोठें कांहीं। शोध ठायीं स्थळासीं।' –तुगा २६२०. ६ शुद्ध करणें; स्वच्छ करणें; दुरुस्त करणें वगैरे. शोधन पहा. [सं.शुध्=शोधण, शुद्ध करणें] **शोध ठेवणें**–लक्ष्य ठेवणें, चौकशी करणें, तपास करणें; विचारपूस करणें; नजर ठेवणें. **शोधक**–वि. १ चौकस; शोधणारा; हुडकणारा; धुंडाळणारा. २ तपास, चौकशी करणारा; नजर ठेवणारा. ३ शुद्ध करणारा; दुरुस्त करणारा. 'जे यावाचूनि शोधक आन नसे।' –ज्ञा १८.१३८. ४ (गणित) बाद करावयाचा, ऋण (अंक). **शोधणूक**–स्त्री. शोध; तपास; परीक्षा. **शोधणें**–उक्रि. १ धुंडाळणें; हुडकणें; शोध करणें. 'मग तळवे तळहाती शोधी।' –ज्ञा ६.२३२. २ चौकशी, तपास करणें; निरीक्षण करणें; परीक्षा करणें. 'जाणोनि शोधावीं चित्रें' –दा। ११.१०.२२. ३ शुद्ध करणें; निर्मल करणें. 'तुझ्या बहुत शोथिले अघनिधि...।' –केका ३. ४ दुरुस्त करणें; चुका काढून टाकणें; निर्दोष करणें. **शोधन**–न. १ शुद्धि; स्वच्छ, शुद्ध, पवित्र, निर्मल करणें. २ (गणित) वजाबाकी. ३ ऋणादान; कर्जफेड. ४ जखम धुण्याची क्रिया. **शोधनीय**–वि. शुद्ध करावयाचा; पवित्र करावयाजोगा. **शोधपत्र-पत्रक**–न. शुद्धिपत्र; ग्रंथांतील शुद्धाशुद्ध दाखविणारें पृष्ठ. **शोधामणी**–स्त्री. (बडोदें) १ कागदपत्र वगैरे शोधण्याची क्रिया. २ पूर्वीचे कागदपत्र शोधण्याकरितां द्यावा लागणारा पैसा, शुल्क; फी. 'नकला मागण्याचे अर्जाबरोबर येणारी शोधामणी...' –कलावंतखातें वियम. **शोधारणें**–सक्रि. शुद्ध करणें 'पाठीं सात्विकें धीरेंतेणें। शोधारलीं तिथें करणें।' –ज्ञा १८.१०१८. **शोधित-शोधीव**–वि. शुद्ध, स्वच्छ केलेलें. 'आतां जे कां अमायिक। शोधितसत्त्वाचे सात्त्विक।' –एभा ३.३३०.

शोधणें—न. गाळण्याकरितां, पुसण्याकरितां, स्वच्छ करण्याकरितां वापरावयाचा कापडाचा तुकडा; फडकें; हात पुसावयाचें फडकें. [सं. शुध्]

शोधा, शोधेगिरी, शोधेशाई—सोदा वगैरे पहा.

शोप, शोंप—स्त्री. बडीशोप; बाळंतशोप. **शोपट, शोपा, शोप्या**–वि. बडीशोपेसारखा वास येत असलेला.

शोफ—पु. १ सूज; शोथ. २ फोपशेपणा; थोथिल. [सं.]

शोबन—न. (अप.) शोभन; मंगलकार्य. 'तुझें घरीचें शोबन' –वेसीस्व ९.११९. [सं. शोभन]

शोभ—स्त्री. शोभा; कांति. 'तेणें घनश्यामता शोभ। अतिसप्रभ साजिरी।' –एभा ३०.१९३.

शोभणी—स्त्री. शोभनी पहा.

शोभणें—अक्रि. १ सुंदर, चांगलें, सुरेख दिसणें; कांतिमान, तेजयुक्त, तेजस्वी, सौंदर्ययुक्त असणें. 'शोभेत कानीं जडिता निराळ्या।' –सारुह ६.२४. २ साजणें; योग्य, शोभायमान दिसणें; ठीक होणें; युक्त दिसणें. 'हें लहान मुलांनांच शोभून जातें.' –नीतिशास्त्र ७७. 'शोभेल तें करावें पचेल तें खावें.' [सं. शुभ्] **शोभन**–न. १ विभूषण; सुंदर, तेजस्वी, कांतिमान

दिसणें, असणें, करणें. २ मंगलकार्य; उत्सव; समारंभ; 'सिद्धी न पवेची गे शोभन। वायां गेलें वरमायपण।' –एरुस्व १२.६. ३ (सांके.) गर्भाधान; फळशोभन; मैथुन. 'शोभनासि नेल्या वस्त्रें पेटया।' –निगा १८२. ४ (सांके. शुभ शब्द) इन्धन; शुभकर्मासाठीं, होमासाठीं वगैरे वापरावयाचें सरपण, जळण. –पु. सत्तावीस योगांतील पांचवा योग. ०पत्रिका–स्त्री. लग्नचिट्ठी. 'राजा शोभनपत्रिकेसी। अति उत्छायें पाठवी।' –वेसीस्व ६.११. **शोभनिक**–वि. शोभा देणारें. 'मुखामुख शोभनिक। श्लेष्मागमनें शिणलें नाक।' –एरुस्व ७.२६. **शोभनीय**–वि. सुंदर. **शोभमान**–वि. सुंदर; चकचकीत; तेजस्वी; तेजःपुंज; कांतिमान: दीप्तिमान. **शोभवणा**–वि. सुंदर; देखणा; दिखाऊ. **शोभविणें**–सक्रि. सुशोभित करणें; सजविणें; शृंगारणें; सौंदर्ययुक्त करणें. **शोभा**–स्त्री. १ सौंदर्य; सौष्ठव; दर्शनीयत्व; देखणेपणा. २ तेज; कांति; तजेला; प्रभा; रूप. 'संपत्ति जातांच दारिद्र्याची शोभा दिसूं लागली'. ३ सौंदर्यवर्धक वस्तु, अलंकार, भूषण, पदार्थ. **शोभा करणें**–क्रि. भूषविणें; (उप.) व्याजोक्तीनें, फजीती करणें; अपमान, अवहेलना करणें; 'चिंतोपंत वगैरे तीन असामींस शोभा करून किल्लयावर टाकणार.' –ख ५११०. **शोभा होणें**–फजिती होणें. 'तुमची नकोका शोभा व्हायला?' –भा २५. **शोभाथिर्णे**–अक्रि. शोभणें; सुंदर दिसणें 'म्हणोनि ते शोभाथिले।' –रास ४.५४. **शोभादायक**–वि. भूषविणारा; शोभा देणारा. 'परि विद्येसम एकहि शोभादायक नसे अलंकार.' –विद्याप्रशंसा. **शोभायमान**–धावि. (प्र.) शोभमान; शोभणारा; सुंदर; सुशोभित. [सं. शोभमान] **शोभित**–धावि. सुशोभित; भूषित; सजलेला; थाटलेला. **शोभिवंत**–वि. शोभायुक्त; सुंदर; देखणा; सुरेख; तेजस्वी.

शोभांजन—पु. एक झाड. याच्या पानांची, फुलांची व शेंगांची भाजी करतात व कोंवळया मुळयांचीहि भाजी करतात.

शोभनी–णी—स्त्री. १ देवी पार्वती अथवा गौरीचें नांव. २ विवाहादि मंगलप्रसंगीं जी सजविलेली व आंत दिवा धरलेली रोंवळी धरतात ती. ३ (सांके.) बाहेरख्याली, व्यभिचारी स्त्री. [सं. शुभ्]

शोर—पु. आवाज; ओरड; गलबला; गलका. 'जशी कोयळ करिती शोर।' –अफला ७७. –चित्र ४४. [फा. शोर]

शोरा—पु. १ सोरमीठ. २ सोरमिठाचें आगर; दलदलीची नापीक जमीन. [फा. शोर=खारट]

शोष—पु. १ कोरड; रुक्षता; अनार्द्रता; कोरडेपणा; वाळलेपणा. २ सुकणें; वाळणें; आर्द्रता नाहीशी होणें; ओलावा नाहींसा होणें याची क्रिया. ३ शोषक गुण; आर्द्रता आकर्षण करून घेण्याचा धर्म; ओलावा ओढून घेण्याचा गुण (राख, चुना वगैरेंचा). ४ अवर्षण; शुष्कता; जलादिकांचा अभाव (पाण्याचा शोष). ५ भयंकर तहान; तृषा; घशास पडलेली कोरड. ६ कफक्षय. ७ (ल.) लोभ. 'शरीर क्षीण झालें निःशेष। तरी वित्ताचा शोष शमेना।' –एभा २३.४१२. [सं. शुष्=कोरडें होणें, सुकणें] **शोषक**–वि. शोषून घेणारा; आर्द्रता ओढून घेणारा; कोरडें करणारा. **शोषण**–न. शोषून घेण्याची क्रिया; कोरडें करणें; सुकविणें; शुष्क करणें. **शोषणीय**–वि. शोषण करण्यास योग्य, पात्र; शुष्क करावयाचें. **शोषणें**–उक्रि. १ शोषून घेणें; सुकविणें; आर्द्रता, ओलावा वगैरे आकर्षण करून घेणें; कोरडें करणें. २ प्राशन करणें; घटाघट पिणें; पिऊन टाकणें. ३ (ल.) ओढून घेणें; रिकामें करणें; खलास करणें; आटविणें; संपविणें. –अक्रि. सुकणें; आटणें; कोरडें होणें; शुष्क होणें; वाळणें; रोडणें (शरीर, जमीन, फळें वगैरे). 'मी सूर्याचेनि वेषें। तपें तै हें शोषे।' –ज्ञा ९.२९६. **शोषित**–धावि. १ शोषलेलें; सुकलेलें; शुष्क झालेलें. २ (ल.) कोरडा केलेला; जवळचें सर्व नाहींसे झालेला; नागवलेला. ३ ओढून घेतलेलें; ग्रस्त झालेलें; जिरवलेलें. **शोष्य**–वि. शोषण्यास योग्य, शक्य.

शोहरत—स्त्री. प्रसिद्धी; आवाई; कीर्ति; ख्याति. 'तमाम लोकांत शोहरत जाली कीं यास पादशाहानीं बोलाविलें आहे.' –दिमरा १.१२८. 'सरकार फौजेची आमदानी व शोहरत ऐकून...'–दिमरा १.२८५. [अर. शुहरत्=प्रसिद्धी]

शोहरा—पु. कीर्ति; प्रसिद्धी. 'सभा तपके दाखवून शोहरा करितीळ.' –पया ४६६. [अर. शुहरा=कीर्ति]

शौ—उद्गा. (गो.) कोंबडयांस हांकतांना उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

शौक—पु. १ मनाचा कल; आवड; छंद; नाद. २ इष्क; विलास; विषयासक्ति. [अर. शौक] **शौकी**–वि १ नादी; छंदी; लज्जत असलेला. २ विलासी; विषयी; इष्कबाज. [अर] **शौकीन**–वि. शोकी; हौशी. 'ख्याली खुशाली करणाऱ्या शौकीन मंडळीचा गॅरिक ज्या मंडळींत होता तीसच तो मिळून लाभला.' –नि ६६२. **शौख**–पु. शौक पहा.

शौकत—स्त्री. ऐश्वर्य; भव्यपणा; मोठा दर्जा; मानसन्मान. –आदिलशाही फर्मानें [अर]

शौच—न. १ शुद्धि; दोष, मल यांचें क्षालन; संमार्जन; प्रायश्चित्तादि विधीन दोषापहरण (आंतर किंवा बाह्य). २ स्वच्छता; पावित्र्य; शुद्ध स्थिति; शुचित्व. ३ मल; पुरीष; मलोत्सर्ग; मलशुद्धि. [सं. शुच्=शुद्ध करणें] ०कूप–पु. संडास; पाय खाना; शेतखाना. ०विधि, शौचाचार–पु १ मलोत्सर्ग; बहिर्दिशागमन; मलशुद्धि. २ प्रातर्विधि; हातपाय, तोंड धुणें; स्नान

आचमन करणें. **शौच्य**–न. शौच पहा. 'शौच्य आचमन करणें।' –दा ११.३.१६.

शौंड—वि. समर्थ; योग्य; बुद्धिवान; हुषार; लायक. [सं.]

शौद्र—पु. उच्च वर्णीयास शूद्र स्त्रीपासून झालेला पुत्र. –वि. शूद्रासंबंधी. [शूद्र]

शौर—पु. शहाणपण; विवेक; सुमार; धोरण. 'त्यामध्यें कांहीं शौर राहिला नसे.' –पारसनीस ब्रच २३८. [अर–शुहरा]

शौरत—स्त्री. पराक्रम; धाक; हल्ला; प्रख्याति. 'त्याणीं आपले फौजेस लेहून वेढा उठविला किंवा फौजेचे शौरतीनें उठला.' –ख ८.३९२४. [अर. शुहरत्]

शौरा—वि. शूर; पराक्रमी. 'लोहांचा विसुरा। बलिभद्रु नव्हे शौरा।' –शिशु ८९३. [शूर]

शौरी—विना. कृष्ण. 'शौरि म्हणे राजेन्द्रा यद्यपि बलवान् तथापि शुनकानें।' –मोउद्योग. [सं.]

शौर्य—न. पराक्रम; शक्ति; सामर्थ्य; धैर्य; वीर्य. **शौर्यादार्यविद्यानिधान**–न. राजा, वीरपुरुष, योद्धा वगैरेस लावावयाचें बहुमानार्थी उपपद, पदवी.[सं. शौर्य+औदार्य+विद्या+निधान]

शौहरत—स्त्री. प्रसिद्धी; कीर्ति; आवई. 'तूर्त सुभेदारी औरंगाबादेची हफीजुदीखान सा. खानाचा नातु त्याचे नावे शौहरत आहे.' –पेद १०७४. [अर. शुहरत्]

श्म(श्म)शान—न. मसण; प्रेतें जाळण्याची, पुरण्याची जागा. [सं.शव+शयन] **०कर्म**–न. प्रेतसंस्कार; उत्तरक्रिया; दहनविधि. **०निद्रा**–स्त्री. मृत्यु; मरण. (अखेरची झोंप). **०भट**–पु. प्रेतसंस्कार करणारा ब्राह्मण; प्रेतदहनप्रसंगीचे मंत्र सांगणारा ब्राह्मण. **०भाजन**–न. १ प्रेताभोंवतीं ज्या भांडयानें पाणी फिरवितात तें भांडें, मडकें. २ (ल.) टाकाऊ, निरुपयोगी, क्षुद्र वस्तु. **०भूमि-मी**–स्त्री. मसण; मसणवटा; प्रेतें जाळण्याची किंवा पुरण्याची जागा. **०भोजन**–न. प्रेतसंस्काराच्या वेळीं स्मशानांत करावयाचें जेवण; उत्तरक्रियेच्या अथवा और्ध्वदेहिकाच्या वेळीं ब्राह्मणांस घालावयाचें मृताच्या प्रीत्यर्थ जेवण. **०मित्र**–पु. मरणापर्यंत, स्मशानांत जाईपर्यंत ज्याची मैत्री टिकते असा सोबती, सहचर (जन्मोजन्मींचा मित्र नव्हे). **०मैत्री**–स्त्री. मरणापर्यंत टिकणारें साहचर्य, सख्य. **०रुदन-रोदन**–न. १ स्मशानांतील रडणें; वायफळ, वृथा केलेला शोक (स्मशानांत कोणी ऐकून सांत्वन करूं शकत नाहीं याकरितां). २ केवळ तात्कालिक शोक; मनापासून नव्हे पण वरवरचा शोक. **०वास**–पु. स्मशानांत राहणें; जगापासून अलिप्त राहणें; सर्व संग परित्याग करणें; सर्व सोडून एकटें राहणें. **०वासी**–वि. १ स्मशानांत राहणारा. २ शंकराचें विशेषण. 'स्मशानवासी भूषण भयंकर पिंगट मुगुटीं जटा।' –प्रभाकर लक्ष्मीपार्वती संवाद.

०वैराग्य–न. एखाद्याच्या मरणामुळें उत्पन्न झालेली तात्कालिक विरक्ति; संसाराबद्दल केवळ स्मशानांत उत्पन्न झालेली उदासीनता. प्रेतदहनास आलेल्या मनुष्यास वाटणारी संसाराबद्दलची असारता. **०विरक्त**–वि. वैरागी; स्मशानविरक्ति झालेला. **०विरक्ति**–स्त्री. स्मशानवैराग्य. **०साधन**–न. पिशाच्चादिक वश व्हावें म्हणून स्मशानांत केलेलें जपजाप्य; मंत्रांचा प्रयोग वगैरे.

श्मश्रू—स्त्रीन. १ मिशा; दाढीमिशा; कल्ले वगैरे. २ सामान्यतः हजामत; तोंडावरचे केंस. **०ल**–वि. दाढीमिशा असलेला.

श्या—शंभरांस; शें याचें सामान्यरूप. 'पैं जे वानी श्या तुका। तेचि वेगळिक वाला येका।' –ज्ञा १२.७५. 'श्यां नये सहस्रां नये। लक्ष कोडीलागीं नये।' –तुगा.

श्यांग—स्त्री. (कु.) (प्र.) शेंग.

श्याड—स्त्री. (कु.) शेड; फांक.

श्याम—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, तीव्र मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत धैवत वर्ज्य. जाति षाडव–संपूर्ण. वादी ऋषभ. संवादी पंचम. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर. २ (मुखराग) (नृत्य) बीभत्स, भयानक व करुणरसाचा अभिनय दाखविण्याच्या वेळचें तोंडावरील तेज. –वि. १ सांवळा; मेघवर्ण; काळा; निळा; अस्मानी. 'चंद्रबिंबिं श्यामरेखा।' –एरुस्व ७.१५. [सं.] **०कर्ण**–पु. फक्त कान व पुच्छ काळें व बाकी पाढरें अंग असा घोडा; काळ्या कानांचा घोडा. हा अश्वमेधास युक्त आहे. **०कल्याण**–पु. (संगीत) एक राग. कल्याण रागांतील एक भेद. **०चंद्र**–पु. शुक्ल पक्षांतील द्वितीयेचा चंद्र. 'श्यामचंद्राची सपोष कोर। तैशी चुबुका अति सुंदर।' –एभा १४.४७६. **श्यामल–ळ**–वि. गर्द निळा; काळासांवळा. 'एकें नवजलद श्यामळें। एकें चांपे गौरी केवळें।' –ज्ञा ११.१३५. **श्यामता**–स्त्री. काळेपणा. 'निढळी प्रभा श्यामतेची। तोचि कस्तुरी मळवट।' –एरुस्व ७.१४. **श्यामशबल**–पु. १ यमाच्या द्वारीं श्याम व शबल असे दोन कुत्रे आहेत ते. २ (ल.) दुष्ट लोकांची, चांडाळांची दुक्कल, जोडी. [सं.] **श्यामिका**–स्त्री. १ काळेपणा; काळा रंग; नीलिमा; सांवळेपणा. 'तैसीं श्यामिका अंतराळीं। देखिली तेणें।' –शिशु २५०. 'आणि नसतीचि श्यामिका। व्योमीं दिसे तैशी दिसो कां।' –ज्ञा १५.२४२. २ धातूंतील हिणकस भाग; रत्नांतील दोष; काळेपणा.

श्यामाक—पु. सांवा नांवाचें धान्य. 'श्यामाक दूर्वाब्जे विष्णुकांता। पात्रपात्रीं दे द्रव्य शुद्धता।' –एभा २७.१७५. [सं.]

श्याय—न. चुन्याचा फरशीसारखा उपयोग करणें. 'चुन्याच्या अशा रीतीच्या उपयोगाविषयींची माहिती आपणांस

शिल्परत्नांतील चौदाव्या प्रकरणांत सांपडते. त्यांत फरशीच्या अशा उपयोगास श्याय हें नांव दिलें आहे।' –केसरी ५. १.३७.

श्याल-लक—पु. बायकोचा भाऊ; शालक; साला; मेहुणा. 'श्यालें तुझ्या नृपाळा...' –मोकर्ण १५.१६. 'धर्म म्हणे श्यालक हो, प्रसवावे सद्यशोर्थ सुत नातें।' –मोभीष्म ३. १९. [सं.]

श्येन—पु. बहिरीससाणा; ससाणा पक्षी. [सं.] **श्येनी**–स्त्री. ससाण्याची मादी.

श्रद्धा—स्त्री. १ पूज्य बुद्धि; आदर; भक्ति; भाव; निष्ठा. २ आस्तिक्यबुद्धि; विश्वास. 'मग श्रद्धायुक्त। तेथिंचे आराधन जें उचित।' –ज्ञा ७.१४९. ३ इच्छा; अभिलाष; हेतु. 'हो कां वामिलिया मिष्टान्ना। परतोनि श्रद्धा न धरी रसना।' –एभा २०.१०१. 'पहा हो भिकारिणीची चेष्टा। श्रद्धा करितसे राज्यपदा।' –कथा १.५.१२. [सं. श्रत्+धा=ठेवणें] **०जाड्य**–न. श्रद्धेबद्दलचा हट्ट; एखाद्या गोष्टीवर विरुद्ध प्रमाण दिसलें तरी हट्टानें विश्वास ठेवणें. **०भक्ति**–स्त्री. १ ईश्वरासंबंधीं प्रेम व विश्वास; निष्ठा व आदर; अंतःकरणांत दृढभाव व बाहेरून पूजा, सत्कार वगैरे. (क्रि० करणें; ठेवणें; असणें). **श्रद्धालु-ळू, श्रद्धान, श्रद्धावान**–वि. श्रद्धा ठेवणारा;भाविक;विश्वासी. **श्रद्धेय**–वि. श्रद्धा ठेवण्यास योग्य; विश्वसनीय; विश्वासार्ह.

श्रद्धा—स्त्री. (प्र.) शर्धा. अपानद्वारा सोडलेला वायु; पाद; पदेन. (क्रि० सोडणें; करणें; सरणें; सुटणें; होणें). 'श्रद्धा करिती अधोद्वारें। नाकीं तोंडीं भरे दुर्गंध।' –एभा २३.५५८. [सं. शृध्=पादणें]

श्रम—पु. १ कष्ट; आयास; मेहनत; राबणूक; दमणूक. २ दुःख; खेद; त्रास; कंटाळा; कटकट. 'देवा होय श्रम दुर्जनांचा।' –तुगा १५. [सं. श्रम्] (वाप्र.) **श्रम टाकणें**–दुःखपरिहार होणें; कष्ट वाटेनासे होणें. 'तो स्वामीच्या देखिले आश्रमातें। कांहीं चित्तें टाकिलें हो श्रमातें।' **–श्रम मागून घेणें**–घडलेल्या श्रमाबद्दल क्षमा मागणें; खेद व्यक्त करणें. 'घडले श्रम मागून घेतों।'–पला २०.४१. **०कर्म**–न. कष्टाचें, मेहनतीचें, राबावयास लागणारें काम; पुष्कळ कष्ट, मेहनत, त्रास घेऊन केलेलें काम. **श्रमणें**–अक्रि. कष्टी होणें; दमणें; थकणें; भागणें; त्रासणें; कंटाळणें; खेद होणें. **श्रमविकल**–वि. दमलेला; थकलेला; भागलेला; दुःखी; कष्टी. **श्रमविणें**–सक्रि. कष्ट देणें; त्रास देणें; थकविणें; दमविणें [श्रमणें प्रयोजक] **श्रमविनोदन**–न. श्रमपरिहार –स्वभावचित्रें ४२. **श्रमविभाग**–पु. श्रमांची, कष्टांची, मेहनतीची वांटणी; अनेकांनीं एका गोष्टीच्या सिद्धयर्थ सहकार्यानें श्रम घेणें, काम करणें. **श्रमसहिष्णु**–वि. कष्टाळू; सहनशील.

श्रमित, श्रमी–धावि. थकलेला; दमलेला; भागलेला; कष्टी; दुःखी; त्रासलेला. 'हें वर्तमान पुण्यास नानासाहेब व भाऊसाहेब यांस कळतांच बहुत श्रमी जाहले' –भाब १७. २ असंतुष्ट; नाराज; नाखुष; इतराज. 'गोविंदपंत यांजवर बहुतच श्रमी झाले.' –भाब ४९.

श्रमण-क—पु. बुद्धयति; संन्यासी. [सं.]

श्रय—न. (प्र.) श्रेय पहा.

श्रवण—न. १ ऐकणें; श्रुत होणें; ऐकण्याची क्रिया. 'श्रवणमात्रेंचि देख। निजात्मसुख पावती।' –एभा २.१०४. २ कान; श्रवणेंद्रिय. 'किती श्रवण झांकिती।' –केका ३०. 'मीमांसा श्रवणस्थानीं।' –ज्ञा १.१९. ३ सत्तावीस नक्षत्रांतील बाविसावें नक्षत्र. [सं. श्रु=ऐकणें] **०द्वादशी**–स्त्री. श्रवणनक्षत्रयुक्त भाद्रपद किंवा फाल्गुन महिन्यांतील शुद्ध द्वादशी. **०पुट**–न. कान. 'श्रोतयांचीं श्रवणपुटें।'–दा ४.२.१२. **श्रवणीय**–वि. ऐकण्यास योग्य. **०भक्ति**–स्त्री. नवविधा भक्तीपैकीं एक प्रकार. 'असार तें जाणोनि त्यागावें। या नांव श्रवणभक्ति।' –दा ४.१.२९. **श्रवणें**–सक्रि. ऐकणें. 'वरि श्रवणिलि फलांची श्रुति।' –दाव ४१६. **श्रवणाचें श्रवण**–न. कानांतील ऐकण्याचें इंद्रिय. 'अंतरीं उघडोन श्रवणाचें श्रवण। श्रवण करोत पंडित जन।' **श्रवणीय**–वि. ऐकण्यास योग्य.

श्रवण—न. कर्ण; काटकोनत्रिकोणाची कर्णरेषा. [सं.]

श्रांत—वि. दमलेला; थकलेला; कष्टी; कंटाळलेला. 'त्यांच्या भारामुळेंच आत्मा श्रांत होऊन दृश्य जगांत आकर्षिला जातो.' –सासं २३८. [सं. श्रम्] **०संवाहन**–न. थकलेल्याचे श्रम परिहार. दमलेल्यास विश्रांति. **श्रांति**–स्त्री. दमणूक; कंटाळा; शीण.

श्राद्ध—न. मृत पितरांस उद्देशून पुत्रादिकांनीं करावयाचें ब्राह्मणभोजन, पिंडदान वगैरे कर्म. [सं.] **ब्रह्म०** विकत श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणें–नसती पीडा मागें लावून घेणें.

श्राद्ध—वि. श्रद्धा ठेवणारा; विश्वासी; भाविक.

श्राप, श्रापगुण, श्रापग्रस्त, श्रापणें, श्रापित—शापमध्यें पहा. 'कोणी येकास श्राप जो।' –दा ३.७.१५.

श्रामक—वि. श्रम करणारा; कष्ट करणारा; तत्पर; दक्ष; कामसु; कष्टाळु.

श्राव—पु. (प्र.) स्राव पहा. पाझर; झिरपा; ठपकणें. **श्रावणें**–अक्रि. ठिबकणें; पाझरणें.

श्रावक—पु. जैनधर्मी गृहस्थ; जैनमतानुयायी. [सं.]

श्रावड—स्त्री. (कों.) एक झुडुप. यास रुपेरी पानें येतात तीं मंगळागौरीस वाहतात. –न. या झुडुपाचें पान.

श्रावण—पु. चैत्रापासून पांचवा महिना. हिंदु पंचांगांतील एक महिना. **०कांकडी**–स्त्री. श्रावणांत लागलेली कांकडी. ही

अपूर्व म्हणून प्रथम देवब्राह्मणांस अर्पण करून मग खातात. **०घेवडा**–पु. एक घेवड्याची जात; अडीचमासा. **०पाटी**–स्त्री. विवाहानंतरच्या पहिल्या श्रावण महिन्यांत वराकडून वधूकडे जी खेळ वगैरे भरून पाठवितात ती पाटी. –ऐरापुप्र १७८. **०मासदक्षिणा**–स्त्री. शिवाजी महाराजांनीं श्रावण महिन्यांत ब्राह्मणांस दक्षिणा वांटण्याची पद्धति सुरू केली. ती पुढें सेनापति दाभाडे व त्यानंतर पेशव्यांनीं चालविली. यांतून पुढें दक्षिणा प्रैझ कमिटी स्थापन झाली. **०सण**–पु. १ विवाहानंतर वधूसाठीं पहिल्या श्रावण महिन्यांत करावयाचा समारंभ. २ श्रावणपाटी. **०सर–सरी–पावळी**–स्त्री. १ श्रावण महिन्यांत एका पाठोपाठ येणाऱ्या पावसाच्या सरी; झडीचा पाऊस; थांबून थांबून सारखा पडणारा पाऊस. २ (ल.) मधूनमधून वरचेवर सारखें होणारें भांडण, कज्जा, तंटा. **श्रावणा–णी**–वि. श्रावण महिन्यांतील किंवा श्रावण महिन्यासंबंधीं. **श्रावणी**–स्त्री. १ श्रावण महिन्यांत प्रतिवर्षी ब्राह्मण जें उत्सर्जन, उपाकर्म, यज्ञोपवीत धारणकर्म करतात तें. २ श्रावणांतील पूर्णिमा.

श्राव्य—वि. श्रवण करण्यास, ऐकण्यास, योग्य; ऐकण्याजोगें; ऐकावयाचें; ऐकूं येईल असें. 'हितसत्य श्राव्य तें वदे शस्य.'–मोकर्ण (नवनीत पृ. ३३५.) **श्राव्यत्व**–न. ऐकण्याविषयीं योग्यता. 'श्राव्यत्वें तरी माधुर्य. पार्यीं घाली.'–ज्ञा १६.११८.

श्रिंगार, श्रिंगारणें—शृंगार, शृंगारणें पहा.

श्रिमाटु—पु. (महानु.) मद; मस्ती. 'तंव तुज सवया थोर आला श्रिमाटु.' –गस्तो ३३. श्रीमाठ पहा.

श्री—स्त्री. १ लक्ष्मी. 'श्रियेचीं राऊळें.'–ज्ञा १६.२००. 'श्रियेसारखिया दासी. घरीं जियेतें.'–ज्ञा ९.३७३. २ ऐश्वर्य; संपत्ति; कांति; शोभा. 'श्रीची प्राप्ति झाली म्हणजे गची बाधा होते.'–गुप्तमंजूष ४. ३ जगांतील तीन पुरुषार्थ–धर्म, अर्थ, काम, समुच्चयानें. 'श्री हरील शकुनी ती'–मोसभा ३.४३. ४ देवता, तीर्थें, धर्मग्रंथ, गुरु वगैरेच्या नांवापूर्वी आदरार्थ योजावयाचें उपपद; ग्रंथ, पत्र वगैरेच्या आरंभीं लिहावयाचा शुभदर्शक श्रीगणेशायनमः याचा संक्षेप. ५ ऐश्वर्य, वैभव, सौंदर्य वगैरेचा द्योतक म्हणून अनेक शब्दांपुढें हा शब्द जोडतात. उदा० गर्भश्री, गृहश्री, जयश्री, जलश्री, यशश्री, वनश्री, वीरश्री इ० ६ (सांके.) काशीक्षेत्र. 'आपण श्रीहून कधीं आला.'–पया १३. ७. –पु. शंकराचार्य यांस उद्देशून उपयोग. 'या उत्सवास करवीर पीठाचे श्रीहि उपस्थित होते'–केसरी १७.५.३०. [सं.]

श्री—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य. जाति औडुव–संपूर्ण. वादी ऋषभ, संवादी पंचम, गानसमय सायंकाल.

श्री.—१ (संक्षेप) श्रीमंत. २ श्रीयुक्त, श्रीयुत. ३ श्रीमती. यांचा संक्षेप.

श्रीक—पु. (शाप). एक धातु. (इं.) सिरियम.

श्रीकंठ—पु. शंकर; महादेव. [सं.]

श्रीकरणाधिप, श्रीकरणी—पु. देशांतील जमाबंदीचा मुख्य अधिकारी. [सं.]

श्रीकांत—पु. विष्णु; लक्ष्मीपति. 'तयाचें स्वरूप आइक म्हणे । श्रीकांतु तो ।'–ज्ञा १७.३४१. [सं.]

श्रीकार—पु. १ ग्रंथ, पत्र, लेख वगैरेच्या आरंभीं काढावयाचें शुभदर्शक श्री हें अक्षर. २ व्यापारी वगैरे लोकांत मालावर मंगलदर्शक श्री अक्षराचें चिन्ह करतात तें. ३ हिशेब, लेख वगैरेचें शीर्षक. [सं.]

श्रीखंड—न. १ दह्याचा चक्का, साखर, केशर मिळून केलेलें एक पक्वान्न, खाद्य पदार्थ. २ चंदन. 'श्रीखंड खंडें बुका.'–सारुह ३.४२. ३ भांगेचा एक पदार्थ. [सं. श्रीखंड; प्रा. छिहंडअ; गु. सिखंड]

श्रीगड—पु. त्र्यंबकेश्वरचा किल्ला. –शिदि १५२.

श्रीगिरि—स्त्री. छत्र. शिरगीर पहा. 'पालवछत्रां श्रीगिरी । नाहीं (तेथ) अंतु ।'–आद्य मराठी कवियित्री पृ ३४.१. 'वरी श्रीगिरीछत्र झळरी । ध्वजा पताका अंबरीं ।'–कालिकापुराण ६.२०.

श्रीगणेशा—पु. (ल.) कार्यारंभ; पहिला धडा; सुरवात. [श्रीगणेशायनमः याचा संक्षेप]

श्रीचक्र—न. एक तांत्रिक चक्र. [सं.]

श्रीद—पु. कुबेर. [सं.]

श्रीदर्शन—न. देवतेचा साक्षात्कार; देवतेचें प्रत्यक्ष दर्शन.

श्रीधर, श्रीनिवास, श्रीनाथ, श्रीवर, श्रीवल्लभ—पु. लक्ष्मीचा पति विष्णु यांचीं नांवें. अशीं अनेक आहेत.

श्रीनिकेतन—न. विष्णूच्या छातीवरील, लक्ष्मीच्या निवासाचें चिन्ह. 'श्रीवत्स श्रीनिकेतन । हृदयीं दोन्हीं भागीं जाण.'–एभा १४.४८१. [सं.]

श्रीपति—पु. १ विष्णु; कृष्ण, 'मागां बाळपणीं । येणें श्रीपती.'–ज्ञा १३.१८२. २ धनवान् मनुष्य; श्रीमंत मनुष्य. [सं.]

श्रीपाद—पु. संन्यासी. 'श्रीपाद जाले द्रव्याभिलाषी.'–स्वादि ९.१.८०. 'कोप आला श्रीपादासी । दंडें वेदयेसी ठोकिलें.'–एरुस्व १८.२५. [सं.]

श्रीपूर—न. कोल्हापूर.

श्रीफल–ळ—न. १ नारळ; प्रसाद म्हणून दिलेला किंवा देवतेस अर्पण केलेला नारळ. 'जेथें जंबूफळांचे समुदय पिकले

घोसही श्रीफळांचे ' –र गजेंद्रमोक्ष १२. २ एक विशिष्ट बंगाली फळ. [सं. श्री+फल; शिरःफल] **श्रीफळ देणें**–निरोप देणें; नोकरीवरून दूर करणें. ' सीतारामभाऊ व त्यांचे बंधु तात्या यांनांही श्रीफळ दिलें ' –विक्षिप्त ९.४४.

श्रीमंत—पु. १ राजा; महाराज. २ पेशवे सरकार; गादीनशीन पेशवा. ' गेले श्रीमंत तिच्या गांवास । ' –बिक १४. ३ संस्थानिक. –वि. धनवान्; संपत्तिमान्; ऐश्वर्यवान; पैसेवाला. [सं.]

श्रीमन्महा—पु. आरंभ; सुरवात. ' माहुलीचा कोट घेऊन या रणयज्ञाचा श्रीमन्महा करण्यांत आला. ' –केसरी २८.७.३६. [कोणत्याहि विधीच्या आरंभीं म्हणावयाच्या श्रीमन्महागणाधिपतयेनमः याचा संक्षेप]

श्रीमंतपूजन—न. सीमांतपूजन याबद्दल चुकीचा प्रयोग. शेवती पूजन असेंहि म्हणतात.

श्रीमंताचा नातु—पु. श्रीमंतीची ऐट आणणारा धनहीन मनुष्य.

श्रीमंती—स्त्री. ऐश्वर्य; संपत्ति; श्रेष्ठपणा; समृद्धि. –वि. श्रीमंत लोकांसंबंधी, श्रीमंतांत रूढ (चाल रीत, भाषा, पद्धति वगैरे).

श्रीमद्—पु. संपत्तीचा, ऐश्वर्याचा गर्व, ताठा, आढ्यता. **श्रीमदांध**–वि. ऐश्वर्याच्या गर्वामुळें आंधळा झालेला; संपत्तीची आढ्यता बाळगून बेगुमानपणें वागणारा.

श्रीमाठ—पु. संपत्तीचा गर्व; लक्ष्मीमद; अहंकार; अभिमान. ' तै मीचि का कर्मठ । ऐसा न ये श्रीमाठ । ' –ज्ञा १४.३५८. [श्रीमद]

श्रीमान्—पु.वि. संपत्तिमान्; ऐश्वर्ययुक्त; आदरणीय; वंद्य; मान्य; पूज्य; दैववान्. याचें समासाच्या आरंभी श्रीमत् असें रूप येतें. उदा० श्रीमन्नारायण; श्रीमच्छंकराचार्य; श्रीमद्भागवत.

श्रीमुख—स. १ भगवंताचें तोंड; तेःजपुंज कांतिमान चेहरा, चर्या. ' ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें । निघतीबा एकसरें । ' –ज्ञा ११. १७७. ' तुका म्हणे माझ हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें । ' २ (उप.) थोबाड; मुसकट; तोंड. उदा० फारसा बोललास तर श्रीमुखांत मारीन. ', ' गरुड ताडिला श्रीमुखावरी । ' –गरुडगर्वहरण.

श्रीमुद्रा—स्त्री. वैष्णव लोक आपल्या चेहऱ्यावर उठवून घेतात तीं विष्णुसंबंधीं चिन्हें प्रत्येकी. हीं शंख, चक्र, गदा, पद्म व रामनाम अशीं असतात. ' ठसे श्रीमुद्रांचे । ' –दा ५.१.२७. [सं. श्री=विष्णु+मुद्रा=चिन्ह]

श्रीयुत—वि. श्रीमंत; कोणत्याहि गृहस्थाच्या नांवापूर्वी आदरार्थी योजावयाचा शब्द. [सं.]

श्रीरंग—पु. श्रीकृष्ण; विष्णु. ' जो संवादला श्रीरंगु । अर्जुनेसी । ' –ज्ञा १.५०. [सं.]

श्रीरंजनी—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, तीव्र धैवत, कोमल निषाद, हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ, पंचम वर्ज्य. अवरोहांत पंचम वर्ज्य. जाति औडुव–षाडव. वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर.

श्रीराग—पु. (संगीत) एक राग. श्री पहा. ' कल्याण गोडी श्रीराग । मुरलींत आळवी श्रीरंग । ' –ह १०.११७. [सं.]

श्रीराज—पु. विष्णु; कृष्ण. ' तैसें अर्जुनाचेनि व्याजें । गीता प्रकाशूनि श्रीराजें । ' –ज्ञा १८.१४७०. [सं.]

श्रीवत्स—न. १ विष्णु. २ विष्णूच्या हृदयावरील पांढऱ्या केसांचा भोंवरा. यासच विष्णूच्या हृदयावरील भृगूच्या लताप्रहाराचें चिन्ह म्हणतात. यासच श्रीवत्सांक, श्रीवत्सलांछन असेहि प्रतिशब्द आहेत. ' श्रीवत्स श्रीनिकेतन । हृदयीं दोहीं भागीं जाण । ' –एभा १४.४८१. ' सकळ भूषणांचें भूषण । ब्राह्मणाचा दक्षिण चरण । हृदयीं वाहे नारायण । श्रीवत्सलांछन गोविंद । ' –एरुस्व १.६८. ' हृदयीं श्रीवत्स लांछन । मिरवी भक्तांचें भूषण । ' –तुगा ७२६. **श्रीवत्सलांछन**–वि. वरील चिन्ह धारण करणारा (विष्णु). ' दक्षिणांगीं विप्रचरण । श्रीवत्सलांछन गोविंद । ' –एभा ३०.२०२.

श्रीविठ्ठल—पु. पंढरपूरचें दैवत; विठोबा. याची विठाई, विटया, विठबा, विट्ठल, इटाल, इठाल, ठाल, विठाबाई अशीं अनेक रूपें साधुसंतांच्या ग्रंथांतून व यात्रांतून ऐकूं येतात. हीं विष्णूचींच प्राकृत रूपें आहेत. –ग्रंथमाला–चौऱ्याशिचा शिलालेख शके ११९५ पृ. ७.

श्रीविद्या—स्त्री. मंत्रतंत्रविद्या. ' श्रीविद्येंत आई पट्टाभिषिक्त आहे. ' –बाय २.४. [सं.]

श्रीवेष्टन—न. वस्त्र. ' येक श्रीवेष्टन त्यास दिल्हे. ' –पेद २०.५४. [सं.]

श्रीवैष्णव—पु. विष्णूची उपासना करणारा एक पंथ किंवा त्यांतील व्यक्ति. [सं.]

श्रीशमुद्रा—स्त्री. श्रीमुद्रा पहा. ' आंगोआंगी लाविती श्रीशमुद्रा । ' –सारुह ६.४७.

श्रीवर्धनी—वि. श्रीवर्धन गांवची, श्रीवर्धन गांवासंबंधी (रोठा सुपारी इ.) [सं.]

श्रीवृकी—वि. ज्याचे छातीवर चोहोंकडे चार व कंठाचे ठिकाणीं चार असे आठ भोंवरे असतात असा (अश्व). हा शुभ आहे. [सं.]

श्रीस्टी—स्त्री. (प्र.) सृष्टि. 'दुसरी श्रीस्टी करूं आदरिली।' –उषा ७३.

श्रीहट, श्रीहाट—न. (योग.) तालुस्थानचा मुख्य बिंदु; ब्रह्मरंध्र. 'क्रमोनियां श्रीहट। आली उद्धट ब्रह्मस्थाना।' –एभा ६.१२९. 'दुसरें जें कां श्रीहाट। उदकांचे मूलकपाट।' सिसं ७.२६१. [सं.]

श्रुत—धावि. १ ऐकलेलें; ज्ञात; प्रख्यात; प्रसिद्ध. 'किंबहुना ऐसें पूर्वी। इष्ट ना श्रुत।' –ज्ञा ११.५८८. २ ज्यानें ऐकिलें आहे असा. ३ श्रुतींत, वेदशास्त्रांत पारंगत. ४ श्रुतींनीं, धर्मशास्त्रानें विहित. [सं. श्रु=ऐकणें] **श्रुत करणें**–ऐकविणें; सांगणें; कथन करणें; सुचविणें; कानांत सांगणें. **श्रुतकीर्ति**–वि. प्रसिद्ध; प्रख्यात; विख्यात. [सं.] **श्रुताधीत**–वि. वेदाध्ययन केलेला; श्रुति वगैरे पढलेला; बहुश्रुत व पढीक. 'ते श्रुताधीतही न होतु कां। परि मजसीं तुकितां तुकां। तुटी नाहीं।' –ज्ञा ९.४४९. [सं.]

श्रुति—स्त्री. १ ऐकणें; श्रवण; ऐकण्याची क्रिया. २ श्रवणेंद्रिय; कान. 'शकुने पुरुषोक्तोनें भ्याल्या श्रुति कांपतील न सुयाते।' –मोसभा ४.६०. ३ वेद. 'जे श्रुतित्रयातें जाणोनि। शतवरी यज्ञ करूनि।' –ज्ञा ९.३१०. 'मळे कलियुगीं श्रुती।' –केका ९६. ४ वार्ता; बातमी; आवई. ५ (संगीत) स्वर; अखंड, स्पष्ट व मधुर या गुणांनीं युक्त गायनोपयोगी नाद. या श्रुती २२ आहेत त्या:–तीव्रा, कुमुद्वती, मंदा, छंदोवती, दयावती, रंजनी, रक्तिका, रौद्री, क्रोधा, वज्रिका, प्रसारिणी, प्रीति, मार्जनी, क्षिती, रक्ता, संदीपनी, आलापिनी, मदंती, रोहिणी, रम्या, उग्रा, क्षोभिणी. ६ काटकोन त्रिकोणाचा कर्ण. ७ (अर्थ दोनवरून ल.) आधार; शासन; नियम. 'परंतु या गोष्टीस कांहीं श्रुति आहे?' ८ वीणा. 'गर्जती गंभीर। टाळ श्रुति मृदंग।' –तुगा २६५८. [सं. श्रु=ऐकणें] **०कटु**–वि. कर्णकटु; कानाला न सोसणारें; कर्कश; बेसुर. **०पथ**–पु श्रवणमार्ग; कर्णरंध्र; कान. **०मत**–वि. १ वेदमान्य. २ कर्णमधुर. 'श्रुतिमत यन्निष्ठ जेधिं सुरचरग।' –मोआदि १.२.

श्रूयमाण—वि. ऐकण्यास योग्य; ऐकावयाजोगें; ऐकूं येत आहे असें; ऐकूं येण्यासारखें. [सं.]

श्रेढी—स्त्री. (गणित) मालिका; रांग; ओळ; जेव्हां कोणा-एका नियमानें एकसारख्या अनुक्रमानें संख्या वाढत किंवा कमी होत असतात तेव्हां त्या ओळीस श्रेढी म्हणतात. –छअं १३६३. गणितश्रेढी, भूमितिश्रेढी. [सं. श्रेधी] **श्रेढीफल**–न. अशा मालिकांची बेरीज.

श्रेणी—स्त्री. ओळ; रांग; मालिका; पंक्ति; पंगत. 'जेथ यातनांची श्रेणी।' –ज्ञा १६.३७४. 'उचलोनि दोघीं जणीं। वीरश्रेणी आणिल्या।' –एरुस्व १२.२६, [सं.]

श्रेणी—स्त्री. अधिकारयुक्त महाजन मंडळ; पेढी. 'गोवर्धनांत राहणाऱ्या श्रेणीकडे दोनहजार कार्षापणांची रक्कम अनामत ठेविली' –केसरी १८.५.३७.

श्रेधी, श्रेधीफल—श्रेढी, श्रेढीफल पहा.

श्रेभ्य—वि. सभ्य (अपभ्रंश). 'जेवि धांवती श्रेभ्य गृहस्थ।' –दावि १३.१३. **श्रेभ्यता**–स्त्री. सभ्यता (अपभ्रंश). 'ते श्रेभ्यताहि सर्वो न कळे।' –दावि २.३०.

श्रेय—न. १ शुभ; हित; लाभ; कल्याण; ऐश्वर्य; चांगुलपणा. 'तरी ज्यानें मी श्रेय म्हणजे कल्याण पावेन तेवढें एकच निश्चित करून मला सांगा.' –गीर ६४३. २ पुण्य; सुकृत; फल. [सं. श्रेयस्] **श्रेयस्कर**–वि. १ हितकर; लाभदायक; कल्याणकारक. २ पुण्यकारक. **श्रेयस्संपादन**–न. १ कल्याणप्राप्ति, उपकार-अपकारादि कृत्यांचें फलग्रहण. २ पुण्यप्राप्ति. दक्षिणादि दानानें परकृत कृत्यांचें फलग्रहण. **श्रेयस्संपाद्य**–न. श्रेयःसंपादन याचा अपभ्रंश. **श्रेयान्**–वि. श्रेष्ठ; उत्तम; वरिष्ठ; मुख्य. 'गोठगस्ते यांच्यापैकीं श्रेयान् अंमलदाराचे हस्ते होत जावा' –अहेर बहुमान नियम पृ. १९. **श्रेयोर्थी**–वि. १ शुभेच्छा प्रदर्शित करणारा; कल्याण इच्छिणारा; चांगली इच्छा असणारा; बरें व्हावें असें इच्छिणारा; अभ्युदयेच्छु; शुभेच्छु. २ पुण्याची इच्छा करणारा; शुभफलाकांक्षी; कर्मफळाची प्राप्ति इच्छिणारा. **श्रेयोवाद**–पु. आशीर्वाद; आशीर्वचन; शुभकारक भाषण. **श्रेयोवान्**–वि. ऐश्वर्ययुक्त; शुभ; उत्कर्षकारक; समृद्धियुक्त.

श्रेष्ठ—पु समर्थ रामदास यांचे वडील बंधु रामीरामदास गंगाधर स्वामी. –वि. उत्कृष्ट; उत्तम; वरिष्ठ; मुख्य; ज्येष्ठ. 'कीं श्रेष्ठेनें घडा घातला। रेवांतासी।' –शिशु ९९४. 'ज्येष्ठ श्रेष्ठ नृपा तूं न धरावे बोल हे मनीं कांहीं।' –मोसभा ४.६३. [सं.] **०अर्धांग**–न. पत्नी. (इं.) बेटरहाफ. –आगरकर. **श्रेष्ठाचार**–वि. उत्तम; उत्कृष्ट तऱ्हेची वागणूक, रीति, पद्धति. **श्रेष्ठायत्त कुटुंब**–न. ज्येष्ठ मनुष्यास सर्वाधिकार असलेलें कुटुंब. (इं.) पॅट्रिआर्चल फॅमिली. –आगरकर. **श्रेष्ठ्य**–न. श्रेष्ठत्व.

श्रोणवी—स्त्री. भूमि; पृथ्वी. 'जैसी कां श्रोणवी। संग्रामीचि।' –ज्ञा १४.३३८. [सं. श्रोण=गोळा करणें]

श्रोणि-णी—स्त्री. ढुंगण; कुल्हे; नितंबभाग; कंबर. (इं.) पेल्व्हिस. [सं. श्रोण्=संचय करणें] **०फलक**–पु. १ कुल्हे; ढुंगण; नितंब; कंबर. २ नितंबास्थि; माकडहाड. (इं.) ऑसिउनोमिनेट. झुलॉजी. **०मंडल**–न. नितंबमंडळ. (इं.) पेल्व्हिक-गर्डल.

श्रोणित—न. शोणित; रक्त. 'मग काढिला वोजां श्रोणिताचां।' –भाए ७६१. [सं. शोणित]

श्रोतव्य—वि. ऐकावयाचें; ऐकावयास योग्य; ऐकण्याजोगें. [सं. श्रु=ऐकणें]

श्रोता—पु. ऐकणारा; श्रवणेच्छु; ऐकावयास आलेला, बसलेला; श्रवण करणारा. 'श्रोतेन पुसिलें बरवें।' –दा ४.१.४. [सं. श्रु] **श्रोतृसमाज**–पु ऐकण्यास आलेले लोक; पहावयास आलेल्या लोकांचा समुदाय; सभ्य. (इं.) ऑडियन्स.

श्रोत्र—न. कान; श्रवण; श्रवणेंद्रिय; कर्ण; कर्णेंद्रिय. 'श्रवण करितां माझें श्रोत्र। अधिकाधिक भुकेले।' –एरुस्व १.६. 'श्रोत्रादि इंद्रियें आवरितीं।' –ज्ञा २.३०४. [सं.] **श्रोत्रिय-त्रीय, श्रोती, श्रोत्री**—पु. १ वेदवेत्ता; वैदिक ब्राह्मण; श्रुतिपारंगत ब्राह्मण. 'श्रोत्रीय कुटुंबी निर्धन।' –मुसभा (नवनीत पृ. १७५). 'जे परब्रह्मण्य श्रोत्री।' –ज्ञा ६.४४९. २ अग्निहोत्री; यज्ञ करणारा. [स. श्रुति]

श्रौत—वि. १ श्रुतिविहित; वेदविहित; वेदप्रोक्त. २ वेदासंबंधी; श्रुतिसंबंधी (विधि, वाक्य, कर्म). [सं.] **०कर्म**–न. वेदविहित कर्म. 'यावरी श्रौतकर्म विधान। परी यागार्थ पशुहनन।' –एभा १८.४०. **०समो**–पु. श्रुतीचा संकेत; श्रुतिसमय; वेदांचा सिद्धांत. 'तें सुकृत ऐसें म्हणे। श्रुति समो।' –ज्ञा १४.२६०. [सं. श्रुति + सम] **श्रौतादिक**–वि. श्रुतिस्मृतिपुराणोक्त. 'निर्वाळलीं होमधर्में। श्रौतादिकीं।' –ज्ञा १६.४०३. **श्रौती**–पु. श्रुतिनिपुण; श्रुतिपारंगत; श्रौत जाणणारा; श्रुतिविशारद; वेदज्ञ; वेदवेत्ता. [श्रुति]

श्लथ—वि. १ ढिला; शिथिल; सैल; लटपटीत; घट्ट न बनलेला; न आवळलेला. २ विखुरलेले; पिंजारलेले (केस वगैरे). [सं. श्लथ्]

श्लाघणें—उक्रि. स्तुति करणें; धन्य मानणें; आनंद मानणें; वाखाणणें; मोठेपणास चढणें. 'आइकोनि श्लाघत असो अंतःकरणीं।' –ज्ञा ६.१४२. 'म्हणोनि विश्वरूप लाभें श्लाघे।' –ज्ञा ११.६२३. [सं. श्लाघ्] **श्लाघनीय, श्लाघ्य**–वि. स्तुत्य; वाखाणण्याजोगा. **श्लाघा**–स्त्री. स्तुती; बढाई; डौल; थोरवी; गौरव; प्रशंसा. **श्लाघिजणें**–अक्रि. श्लाघ्य होणें. 'तरीच हरिदास म्हणवितां श्लाघिजे' –तुगा ११०३. **श्लाघ्यता**–स्त्री. गौरव; थोरपणा; मोठेपणा. 'ऐसिये श्लाघ्यतेचा नोहे। तोषु जीवीं।' –ज्ञा १८.१६७. **श्लाघ्यवाणा**–वि. १ योग्य; स्तुत्य; चांगलें; लाभदायक. 'म्हणिजे होय श्लाघ्यवाणें। सर्व कांहीं।' –दा ६.१.३. २ (अशिष्ट चुकीनें श्लाघ्य याच्या विपरीत अर्थी) गरीब; कींव करण्याजोगा; लाजाळू; लाजिरवाणा.

श्लिष्ट—वि. द्व्यर्थी; श्लेष असलेलें; श्लेषविशिष्ट; घरसोडीचें; घोटाळ्याचें. [सं. श्लिष्]

श्लीपद—न. पायांकडून येणारी सूज. [सं.]

श्लेष—पु. १ व्यर्थी शब्द; शब्दांचें अनेकार्थत्व; एक शब्दालंकार; व्यर्थी वर्तन; अनिश्चितार्थी शब्दयोजना. 'वरें बाहें पांगुरता। तरि हा श्लेषु घडता।' –ऋ ६९. 'श्लेषयुक्त शब्दाच्या एका अर्थाबरोबर दुसराहि अर्थ सुचून चमत्कृति उत्पन्न करितां येते.' –जन्मरहस्य २१. २ आलिंगन; मिठी; कवटाळणें. (क्रि० घेणें). [सं. श्लिष्=आलिंगणें] **श्लेषार्थ-श्लिष्टार्थ**–पु. वाच्य अथवा उघड अर्थाहून निराळा अर्थ; व्यर्थी शब्दयोजना करून सुचवावयाचा स्पष्टार्थाहून वेगळा अर्थ, गूढ अर्थ. **श्लेषोक्ति**–स्त्री. एक अलंकार; व्यर्थी शब्दयोजना करून साधावयाचा अलंकार. उदा० 'औषध नलगे मजला, ऐकुनि जननी बरें म्हणुनि डोले।' –र. (यांतील 'नलगे' शब्द)

श्लेष्मा—पु. १ कफ; शेंबूड. 'मुखा मुख शोभनिक। श्लेष्मागमनें शिणलें नाक।' –एरुस्व ७.२६. 'देह आंतबाहेरि श्लेष्माआते।' –ज्ञा ८.२१३. २ कफविकार; कफाच्या आधिक्यामुळें झालेला व्याधि. ३ सर्दी; पडसें; शैत्य. [सं. श्लेष्मा] **श्लेष्मपुरी**–स्त्री. शेंबडानें भरलेलें नाक. 'गळतसे नाक श्लेष्मपुरी।' –तुगा ३१७३. [सं.] **श्लेष्मातक**–पु. भोंकरीचें झाड. [सं.] **श्लैष्मिक**–वि. कफकारक; कफासंबंधी.

श्लोक—पु. १ पद्य; कविता; विशिष्ट प्रकारची पद्यरचना. २ स्तुति; कीर्ति. उदा० सुश्लोक; पुण्यश्लोक. [सं. श्लोक्=जुळणें]

श्वः—क्रिवि. उद्यां; उदयीक. 'तरी श्वः म्हणिजे उखा।' –ज्ञा १५.१११. [सं.]

श्वा—पु. कुत्रा; श्वान. समासांतील रूप श्व. [सं. श्वन्] **श्वदंत**–वि. (प्राणिशास्त्र) कुत्र्यासारखे सुळे दांत असलेला. (इं.) कनाइन. **श्वपच, श्वपाक**–पु. अत्यंज; चांडाल; कुत्रा शिजवून खाणारा; क्षत्रियापासून उच्च जातीच्या स्त्रीच्या पोटीं जन्मलेला. 'तुका म्हणे खंडी देव भक्तपण। वरिष्ठ त्याहूनि श्वपच तो।' –तुगा २८९१. 'कीं हा श्वपचु हा द्विजु।' –ज्ञा ५.९३. **श्ववृत्ति**–स्त्री. नीच सेवा; श्वानवृत्ति पहा. **श्वशुर**—पु. सासरा; नवऱ्याचा किंवा बायकोचा पिता. [सं.] **श्वश्रू**—स्त्री. सासु; सासऱ्याची स्त्री. [सं.] **श्वसणें**—अक्रि. श्वास घेणें. 'ऐसें श्वसोंहि नये कांहीं।' –ज्ञा ११.२९९. [सं. श्वस्] **श्वसन**–न. श्वास पहा. **श्वान**—पुन. कुत्रा. 'श्वान हे लागे पाठी आशा बहु दारुणा।' –तुगा ३४९. 'ना तरी हे धेनु हें श्वान।' –ज्ञा ५.९४. [सं. श्वन्] **०चेष्टा**–स्त्री. कुत्र्याचे चाळे. **०निद्रा**–स्त्री. कुत्र्याची झोंप; किंचित् आवाजानें किंवा स्पर्शानें भंग पावणारी झोंप. **०पुच्छ**–न. १ कुत्र्याचें शेंपूट. २ (ल.) कधीं

सरळ न होणारी, नेहमी वांकडी राहणारी वस्तु; ज्याचें मन कधीं बदलत नाहीं असा पूर्वग्रहदूषित मनुष्य; वाकडयांत शिरणारा. **०पुच्छवत्**–वि. नेहमीं वांकडा, हट्टी, एककल्ली (स्वभावाचा). **०मैथुन**–न. १ कुत्र्याचें झोंबट. २ (ल.) प्रारंभीं सुखकर पण परिणामीं दुःखदायक गोष्ट. **०लाड**–पु. कुत्र्याचा लडिवाळपणा; पुढें पुढें करणें; खुशामत. **०वृत्ति**–स्त्री. १ कुत्र्याची रीत. २ (ल.) पुढें पुढें नाचणें; तोंडपुजेपणा; हांजी हांजी; खुशामत. ३ नीच सेवा; दुष्ट मनुष्याची चाकरी. **०वैखरी**–स्त्री. १ कुत्र्याचें भोंकणें; गुरगुरणें. २ (ल.) क्षुल्लक प्रसंगीं मोठमोठ्यानें संतापून आरडाओरड करणें; जोराजोरानें, तावातावानें बोलणें. 'भिक्षा द्यावयासि नसेल जरी। आंवरून धरावी श्वान वैखरी।' **०वैर**–न. कुत्र्यासारखा द्वेष; स्वजनांचा, नातलगांचा द्वेष, हेवा, शत्रुत्व. **०शूरत्व**–न. कुत्र्याचें शौर्य; प्रतिकार नसेल तेथें जोराचा हल्ला करणें; शौर्याचा आव आणून चालून जावयाचें पण अंगावर आल्यास पळ काढावयाचा अशी रीत. **०स्वभाव**–पु. कुत्र्याचा स्वभाव; चिडखोरपणा; तुसडेपणा; वसवस. **श्वानी**–स्त्री. कुत्री.

श्वापद—नपु. १ हिंस्र पशु; मांसभक्षक पशु. २ सामान्यतः कोणतेंहि जंगली जनावर. 'दाट न रिगे श्वापद। शुक हन षट्पद।' –ज्ञा ६.१७६. [सं. श्वापाद]

श्वास—पु. १ नाकानें किंवा तोंडानें आंतबाहेर घेतलेला किंवा सोडलेला वायु. २ दम; सुस्कारा; धांपा. ३ दमा; घरघर. [सं. श्वस्] **०कास**–पु. दमा; कफविकारानें कोंडलेला श्वास. **०कुठार**–पु. दम्यावरील औषध, रसायन, मात्रा. **०दाटी**–क्रिवि. धांपा टाकीत; सुस्कारा सोडीत; दम कोंडून. 'जैसी वत्सालागीं श्वासदाटी। धेनु जाय।' –कथा २.७.१७९. **०नलिकामार्ग**–पु. शरीरांतील ज्या मार्गानें वायु आंत बाहेर येतो जातो ती नळी; ज्या नळींतून फुफ्फुसांत हवा जाते ती नळी. (इं.) वुइंडपाइप. **श्वासावरोध**–पु. दमा; कफविकार. **श्वासोच्छ्वास, श्वासोश्वास**–पु. वायु शरीरांत घेणें व सोडणें.

श्वित्र—न. कुष्ठ; कोड. [सं.]

श्वे श्वे—सना. स्व, स्व; आपआपल्या. 'श्वे श्वे सदना गेले जन।' –दावि २३.६८. [सं. स्व]

श्वेत—पु. सेतु (अपभ्रंश). 'श्वेतबंद रामेश्वर।' –दा २०.७.३.

श्वेत—वि. पांढरा; शुभ्र; शुक्ल; धवल. 'श्वेतपीत त्रिगुणवास।' –एरुस्व १७.१०. [सं. श्वित्=पांढरें होणें] **०कुष्ठ**–न. पांढरें कोड. **०कृष्ण होणें**–काळें पांढरें पडणें; मरणें. **०द्वीप**–न. पृथ्वीचा एक भाग; खंड. **०प्रदर**–पु. पांढरी धुपणी; एक रोग. **०मणि**–पु स्फटिक. **०वचा**–स्त्री. वचा पहा. एक झाड, याची मुळी पांढरी असते. **०वाह-वाहन**–पु. अर्जुन. **श्वेतांजनी**–वि. आंग एकरंगी पण फांसोळीला पांढरा रंग असलेला (घोडा). –अश्व १.९७. **श्वेतांबर**–पु. जैनांतील एक पंथ.

श्वेतु—पु. (अपभ्रंश) सेतु पहा.

श्वेद—पु. (अप.) स्वेद पहा. 'श्वेद रोमांच स्फुरण।' –दा २.७.३८.

ष

ष—देवनागरी लिपींतील ३१ वें व्यंजन; याच्या अवस्था पुढीलप्रमाणें:—पहिली ख्रि. पू. २ रें शतक घोसुंडी शिलालेख, दुसरी इ. स. दुसरें शतक मथुरा, सांरनाथ इ० लेख, तिसरी इ. स. ६ वें शतक, मंदसोर लेख, चवथी तोरमाण लेख.

षट्, षड्, षण्, षष्—वि. सहा संख्या; समासांतहि उपयोग करतात [सं. षट्] (पुढील सामाशब्द 'षट्' या पदार्शी जोडून झालेले आहेत). **०क**–न. सहांचा समुदाय. **०कर्ण**–वि. सहा कानांचा. **०कर्णी**–क्रिवि. तीन इसमांच्या कानीं गेलेली. म्हणजे प्रसिद्धीस, उघडकीस आलेली (दोन माणसांत केलेला म्हणजे चार कानीं गेलेला, गुप्त विचार उघड होत नाहीं, तीन इसमांस तो कळला तर तो फुटतो). (क्रि० होणें; फुटणें). **०कर्म-कर्मे**–न अव. १ ब्राह्मणांचीं, अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह हीं कर्में. २ जारण, मारण, उच्चाटन, मोहन, स्तंभन, विध्वंसन हीं मंत्र व तंत्र विद्येतील कर्में. ३ ब्राह्मणाच्या उपजीविकेचीं सहा साधनें–कणवृत्ति, प्रतिग्रह, याचना किंवा भिक्षावृत्ति, कृषि, वाणिज्यवृत्ति, गोरक्ष, वार्धुषिकवृत्ति (सावकारी). ४ (हठयोग) धौती, कपालभाति, त्राटक, नेति, बस्ति, नौली. **०कर्मी**–वि. षट्कर्में करणारा. **०कोण**–पु. १ सहा कोनी आकृति. २ इंद्राचें वज्र. –वि. सहा कोनांचा. **०चक्र**–पु.अव. (हटयोग) देहाच्या ठायीं असलेलीं सहा पद्माकार चक्रें–मूलाधार किंवा आधार, लिंग, नाभी, हृत्, कंठ, मूर्ध. यांना पद्में अर्धेहि म्हणतात. हीं देहाच्या मधील नाडीवर असतात. या नाडीस भागीरथी म्हणतात. तिच्या दोन्हीं बाजूंस दोन नाडया यमुना व सरस्वती या नांवाच्या आहेत. या चक्रांना आणखीहि इतर नांवें आहेत तीं–कूर्म, अनंतशेष, आधार, अनाहत, अधिष्ठान, नाभी, जठराग्नि, मणिपूर किंवा पद्म, मानस, कर्पूर (याचे शेवटास ब्रह्मरंध्र असतें), गरुड, गोल्हाट, त्रिगांति इ० (क्रि० भेद करणें). **०दर्शनें**–न.अव.

सौर, शाक्त, गाणपत्य, शैव, वैष्णव, स्कांद; किंवा सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा व वेदांत. ०पद-पदी-पुस्त्री. १ भ्रमर, भुंगा. २ ऊ. ३ (ल.) घोडेस्वार (घोडयाचे चार व स्वाराचे दोन मिळून सहा पाय म्हणून). –वि. सहा पायांचा (ऊ, टोळ, भुंगा इ०). –स्त्री. सहा चरणांचें कडवें असलेली कविता. ०प्रमाण–न. जीव आणि अंतःकरणपंचक मिळून सहांचें प्रमाण. ०प्रज्ञ–वि. गुण, संपत्ति, सुख, ब्रह्मानंद, जगाची प्रकृति, ब्रह्मज्ञान जाणणारा. अर्थ, पुरुषार्थ पहा. ०बाहु–वि. सहा हातांचा, षड्भुज. ०शास्त्रें–न.अव. १ (षडंगें) छंद, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष, शिक्षा, कल्पसूत्र. २ दोन न्याय, दोन मीमांसा, सांख्य, योग; किंवा (षड्दर्शनें) न्याय, वैशेषिक, मीमांसा, वेदांत, सांख्य, पातंजल योग. ०शास्त्रसंपन्न-शास्त्री–वि. १ वरील सहा शास्त्रें जाणणारा. २ (ल.) विद्वान, पंडित. (पुढील सामाशब्द 'षड्' या पदास जोडून आहेत). ०अंग, षडंग–न. १ दोन हात, दोन पाय, कमर, डोकें हीं शरीराचीं अंगें. २ वेदांचीं व्याकरण, छंद, ज्योतिष, निरुक्त, कल्पसूत्र, शिक्षा हीं उपांगें. ३ –वि. सहा अवयवांचा, अंगभूत वस्तूंचा. ०अंगन्यास–पु. हृदय, शिर, शेंडी, शरीर, नेत्र, यांना स्पर्श करून टाळी वाजविणें (पूजा, जप, मंत्रसिद्धि इ० प्रसंगीं म्हणतांना. ०गुण–पु.अव. संपूर्ण ऐश्वर्य, धर्म, यश, श्री, ज्ञान, वैराग्य हे किंवा धर्म, वीर्य, कीर्ति, द्रव्य, दान, वैराग्य, हे ईश्वराचे संपूर्ण गुण, या गुणांनीं संपन्न तो. षड्गुणैश्वर्य संपन्न–पु. ईश्वर, देव. –वि. १ संधि, विग्रह, यान, आसन, द्वैधीभाव, समाश्रय ही राजनीतीचीं मुख्य अंगें असलेला. २ कोणत्याहि सहा गुणांचा किंवा तत्त्वांचा समुदाय असलेला. ०अंगुल-ली(ळी)–वि. सहा बोटांचा. ०ग्रही–स्त्री. एका राशींत सहा ग्रहांची युति. ०अब्द–न. सहा दिवसांचें प्रायश्चित. ०अक्षर–न. 'कांहीं येत नाहीं'. एखाद्या मूर्खास थट्टेनें योजावयाचा शब्द. ०अक्षरी मंत्र–न. १ सहा अक्षरांचा कोणताहि मंत्र. २ मूर्ख, शंख, अज्ञानी. ०आनन–पु. १ कार्तीकस्वामी. २ –वि. सहा बाजूंचा. ०ऊर्मि–स्त्री.अव. शोक, मोह, क्षुधा, तृषा, जन्म, मरण. ०ज–पु. (संगीत.) सात स्वरांपैकीं पहिला स्वर; गाण्याचे प्रारंभीं, गायक आपल्यास योग्य असा जो ध्वनि मापून घेतो तो. यास ३६ इंच लांबीच्या तारेचा ध्वनि व २४० आंदोलनें पाश्चात्य शास्त्रकारांनीं धरिलीं आहेत. [सं. षट्+ज] ०ज ग्राम–पु. (संगीत) आठ शुद्ध स्वरांचा समुदाय. ०वृर्शनें–न.अव. 'षट्दर्शनें' पहा. ०भांतर–न. सूर्यचंद्राचें अवरोधन; दोहोंमध्यें पृथ्वी येणें. ०भाव-विकार-रिपु-वैरी-अरि-वर्ग–पु.अव. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर हे मनुष्याच्या मनाचे शत्रु समजले गेलेले सहा विकार. ०भाव–पु.अव. जायते (जन्म), अस्ति (अस्तित्व), वर्धते (वाढ), विपरिणमते (प्रौढ होणें), अपक्षीयते (क्षीणता), नश्यति (मृत्यु) हे शरीराचे विकार. ०भुज–पु. १ षट्कोण. २ –वि. सहा हातांचा किंवा बाजूंचा. ०रस, षड्रस–पु. १ कटु, अम्ल, मधुर, लवण, तिक्त, कषाय हे अन्नाचे रस. २ –वि. स्वादिष्ट, रुचकर (अन्न); असल्या अन्नाच्या मेजवानीस 'षड्सभोजन' म्हणतात. ०षड्रिपु–वरील 'षड्भाव' पहा. ०वर्ग–पु. १ 'षड्भाव' पहा. २ –वि. सहा वस्तूंचा समूह. ०शास्त्री-शास्त्रें–पु न. षट्शास्त्री पहा. षडस्र–न. १ षट्कोण. २ –वि. सहा कोनांचा. षड्ऋतु–पु.अव. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरत्, हेमंत, शिशिर. षडैश्वर्य–न. 'षडगुणैश्वर्य' पहा. (पुढील शब्द 'षण्' शीं योजलेले आहेत). ०मास–पु. सहा महिन्यांचा काल. सहामाही. ०मास्य–वि. सहा महिन्यासंबंधीं. ०मुख–पु. षडानन पहा. ०मुखी-मुद्रा–स्त्री. (हटयोग) कानांचीं २ भोंकें, २ डोळे, २ नाकपुडया या हातांच्या बोटांनीं दाबून करावयाची एक मुद्रा. (यापुढील शब्द 'षष्' शीं योजलेले आहेत). षष्ठ–वि. सहावें. षष्ठी-ष्ठी–स्त्री. १ पंधरवडयांतील सहावी तीथ. २ सहावी विभक्ति. ३ दुर्गादेवी, सटवी. ४ (ल.) फजीती. –वि. ५ साठ. षष्ठीपूजन–न. प्रसूतीच्या सहाव्या दिवशीं दुर्गा व इतर देवता यांची करावयाची पूजा. षाडव (राग)–पु. ज्यास सहा स्वर लागतात व एक वर्ज्य असतो असा राग. षाडव औडुव–पु. ज्याच्या आरोहांत सहा स्वर व अवरोहांत पांच स्वर लागतात तो राग. षाडवतान–स्त्री. सहा स्वरांची तान. षाडव-षाडव–पु. ज्याच्या आरोहांत सहा व अवरोहांत सहा स्वर असतात असा राग. षाडव-संपूर्ण–पु. ज्याच्या आरोहांत सहा व अवरोहांत सात स्वर असतात तो राग.

षंड-ढ—पु. १ नपुंसक माणूस. २ हिजडा; क्लीब; खोजा. ३ वळू; सांड; बैल. [सं. षण्=दान करणें]

षादमानी—स्त्री. शादमानी पहा.

षोक, षोकी—शौक, शौकी पहा.

षोडश—वि. सोळा (संख्या). [सं.] ०पदार्थ–पु.अव. (तर्कशास्त्र) या शास्त्रांतील १६ विभाग:—प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टांत, सिद्धांत, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंडा, हेत्वाभास, छल, जाति, निग्रहस्थान. कांहींच्या मतें सोळांच्या ऐवजीं सात विभाग आहेत; त्यांना सप्तपदार्थवादवादी म्हणतात. व बरऱ्यांना षोडशपदार्थवाद–वादी म्हणतात. ०महादानें–न.अव. सोळा प्रकारचीं मोठमोठीं दानें. १ तुला पुरुष (हा शब्द पहा). २ हिरण्यगर्भ–ब्रह्मदेवाची सोन्याची प्रतिमा. ३ ब्रह्मांड=सोन्याचा पृथ्वीचा गोल. ४ कल्पवृक्ष, या

झाडाची प्रतिमा. ५ गोसहस्र=हजार गाईंचें दान. ६ हिरण्य कामधेनु=कामधेनूची सोन्याची मूर्ति. ७ हिरण्याश्व=सोनेरी घोडा. ८ हिरण्याश्वरथ=सोनेरी रथ व घोडा ९ पंचलांगलक=पांच नांगरांचें दान. १० धरा=जमीन इनाम देणें (जमीन विकत घेण्यास पैका देणें). ११ विश्वचक्र=एकाच्या बाहेर एक अशा सोळा फेऱ्यांचें एक सोनेरी चक्र. १२ कल्पलता=एक सोनेरी वेल. १३ सप्तसागर=या सात समुद्राचे प्रतिनिधी म्हणून दूध, दहि मध, तूप इ० देणें. १४ रत्नधेनु=रत्नांची बनविलेली गाय. १५ महाभूतघट=महादेव किंवा विष्णु यांच्या नांवानें द्यावयाची सोन्याची घागर. १६ (काम) धेनु. ०संस्कार-पु.अव. संस्कार पहा. षोडशोपचार-पु १ देवाच्या पूजेचा प्रकार किंवा विधि:-आवाहन, आसन, पाद्य, अर्घ्य, आचमन, स्नान, वस्त्र यज्ञोपवीत (उपवस्त्र), गंध, पुष्प, धूप. दीप, नैवेद्य, दक्षिणा, प्रदक्षिणा, मंत्रपुष्प. २ (ल.) कोणतेहि सोळा प्रकार, कामें.

स

स—व्यंजनमालेंतील बत्तीसावें अक्षर. अक्षरविकास-या अक्षराच्या पांच अवस्था दृष्टीस पडतात. पहिली अशोकाच्या गिरनार लेखांत; दुसरी खिस्तपूर्व पहिल्या शतकांतील मथुरा येथील जैन लेखांत; तिसरी पांचव्या शतकांतील करडांडाच्या लेखांत, चवथी त्याच शतकांतील बिलसद येथील स्तंभावरील लेखांत व पांचवी सहाव्या शतकांतील उष्णीषविजयधारिणी ग्रंथातील वर्णमालेंत आढळते. -ओझा.

स—अ. नामाच्या पूर्वी स आला असतां त्याचा सहित, बरोबर, युक्त असा विशेषणरूप अर्थ होतो. उदा० सकुटुंब; सगुण; सकाम; सदोष; सजल; सकपट इ०. अशा प्रकारचे शब्द संस्कृत शिवाय निवळ मराठी शब्दाच्याहि पूर्वी स येऊन झालेले आढळतात. उदा० सकस, सकुडी इ०. २ (व्या.) द्वितीया विभक्तीचा प्रत्यय. उदा० गांवास. विशेषत: कोकणांत राजापुराकडे द्वितीया विभक्तीचा दुसरा जो ला प्रत्यय त्याचा उपयोग न करतां केवळ स प्रत्ययाचाच उपयोग करतात. ३ (व्या.) चतुर्थी विभक्तीचा प्रत्यय; साठीं, स्तव. 'जाणत्यास करावा उपकार।' -दा १८.२.४.

स—पु. (ल.) सोदा; लुच्चा; लबाड (सोदा या शब्दांत आरंभीं स हें व्यंजन आहे यावरून).

सा—(संक्षेप) १ साष्टांग. २ संमत. ३ सरकार. ४ सबब.

सो—(संक्षेप) १ सेवेसी-शी. २ संबंधी. ३ साहेब. ४ सेकीन.

सौ—(संक्षेप) सौभाग्यवती.

स आदत—स्त्री. सुपोषण; सुख. -आदिलशाही फर्मानें [फा.]

स आदमंद—वि सुदववान् [फा]

सइ—स्त्री. आठवण; स्मृति. [सं स्मृति; प्रा. सई]

सइत्य—शअ. सहित; सह; बरोबर. 'सुप्रसन्ना देवी राणी सइत्य।' -वसा ४. [सं. सहित]

सइर, सईर—वि. स्वैर; स्वच्छंदी. 'दास म्हणावया न वळे रसना। सइर वचना वासगळे।' -तुगा २९७८. **सइराट**-क्रिवि. स्वैरपणें; इकडेतिकडे; भलतीकडे. [सं. स्वैर; प्रा. सइर]

सइल, सईल—सैल पहा. **सइलावणें**-क्रि. सैल, ढिलें होणें. 'चौकडयाचे मोती विस्कटती सइलावल्या तारा।' -सला ८१.

सइली, सईवर—सैली, सैंवर इ० पहा.

सई—स्त्री. आठवण; स्मृति; सय. [सं. स्मृति; प्रा.]

सई—स्त्री. (काव्य) सखी; मैत्रीण 'आतां सई यशोदेचे द्वारीं हा कोण रथवाला।' -होला ११. 'सईसई, गोविंदा येतो। मजवर गुलाल टाकीतो।' [सं. सखी; प्रा. सही; गुज. सही; हिं. पं. सिं. सहेली; सखि-सहि. सइ-ई; -भाअ १८३४]

सई—स्त्री. १ संमतिदर्शक अथवा आंतील सजकूर कबूल असल्याबद्दल एखाद्या रोख्याच्या,लेखाच्या अथवा पत्राच्या शेवटीं लिहिलेलें स्वत:चें नांव, स्वाक्षरी, सही. (क्रि० करणें). २ प्रयत्न; खटपट; मेहनत 'माझे कार्याविषयीं तुम्ही मध्यस्तापासीं सई करावी.' -रा १०.१६०. ३ लहान मुलास खेळवितांना प्रेमानें त्याच्या कपाळास आपलें कपाळ लावून लहानसा दिलेला ठोसा; -वि. १ जिंकलेला; ताब्यांत घेतलेला; जित. 'येरवी वसई सई होती असें नवतें व टोपकर अग्निरूप होते.' -पया ४९. २ फाजील; फालतू; पुरून अधिक उरलेला. -अ. खरोखर, बरोबर, खरेंच या अर्थानें हा शब्द योजितात उदा० 'तो मूर्ख तर सई परंतु चोर नाहीं; पाऊस पडला सई परंतु भुई काहीं भिजली नाहीं. तसेंच, कर तर खरा, पहा तर खरा या अर्थीहि योजितात. उदा० तूं आधीं माग तर सई मग तो देवो कीं न देवो; औषध खा तर सई मग गुण तर पाहतोंच आहोंत. त्याचप्रमाणें अर्थात, खचित, व निदानपक्षीं, बस, पुरे या अर्थानेंहि उपयोगांत आणिला जातो. [अर. सहीह्=निर्दोष; अर. सभय] (वाप्र.) **सई करणें**-१ सर करणें; कबज्यांत, ताब्यात घेणें. किल्ला राज्य सई करणें=किल्ला, राज्य हस्तगत करणें. 'किल्ला सई करून देतों तुला।'-ऐपो ५३. २ आक्रमण करणें; एखाद्या ठिकाणास जाऊन पोंचणें. 'आपण संध्याकालपर्यंत मकाण सई करू.' (कोणही एक माल) **सई करणें-सई म्हणणें**-एखादा जिन्नस घेण्याचें कबूल करणें, निश्चित ठरविणें. सामाशब्द- **सईन**

शिक्का–पु. एखाद्या दस्तऐवजावर, रोख्यावर केलेली सही व शिक्का. (क्रि० घालणें; देणें; पडणें). **सईसाक्ष**–स्त्री. एखाद्या महत्त्वाच्या रोख्यावर, दस्तऐवजावर सही करणें व साक्ष घालणें. (क्रि० करणें; घालणें; पडणें; होणें). **सईसूद**–वि. कायदेशीरपणा येण्यासाठीं ज्यावर सही, साक्ष इ० घातलीं गेलीं आहेत असा (रोखा खत, दस्तऐवज).

सई—स्त्री. (कर.) खेळतांना बैदूल, गोटी टाकण्यासाठीं केलेला खळगा; गल; बद. **सईभरणें**–(कर.) गलींत गोटी टाकणें.

सईफ—स्त्री. तरवार, सैफ. 'सईफ आहे ते तर्वार रामसिंगास सांगून मागावी.' –रा १२.६२. [अर. सैफ्]

सईभ—पु. युक्ति; शक्कल; क्लृप्ति. 'फिरंग्यास सक्ती पोहोचावून अगर सईभानें मुलुख जप्त करून...' –थोमारो १.२४.

सईम—वि. १ स्वतःच्या अंगचा; स्वतःच्या शरीरासंबंधींचा; नखशिखांत असा. २ (ल.) अखंड; अविच्छिन्न; सलग. [सं. स्वयं]

सईल—वि. सारखा. –नागा ११.२९.

सईस—पु. (व.) मोतद्दार; घोडयाची चाकरी करणारा; घोडयांची गाडी चालू असतां घोडयांपुढें धावणारा इसम. [अर. साईस]

सईसुमार—पु. एखाद्या गोष्टीविषयीं, कार्याविषयीं सारासार, ग्राह्याग्राह्य विचार; कोणत्यावेळीं किती बोलावें, खावें, प्यावें इ० संबंधीचा सुमार; अंदाज; अटकळ [अर. सहीह्+फा. शुमार]

सउंदर—पु. मोटेच्या सोंडेचा दोर; (प्र.) सौंदर, सोंड दोर पहा. [सोंड+दोर]

सऊ—वि. (खा.) संपूर्ण; सर्व; सगळा. –भात्रै ७. १ ते ४ [गुज. सउ]

सऊमास—न. मृदु, सहज पचणारें, कोंवळें मांस. [सकुमार+मांस] **सऊअंग**–न. मृदु, नाजुक शरीर. [सकुमार+अंग]

सऊळ—वि. मचूळ; किंचित् खारट (पाणी, पातळ पदार्थ).

सए—संबोधन. (महानु.) सये. 'खांदावरि कावडि पडिभरें चालतु। तो खेळे वनांतु। दत्तु सए।' –आद्य मराठी कवयित्री–मातृकीस्वयंवर २. [सं. सखी]

सक—पु. सहांचा समुदाय; सहा ही संख्या. विशेषतः खेळावयाच्या फाशांवरील दानांत व उजळणींतील पाढयांत; क्वचित सके असें अनेकवचनीहि रूप येतें. उदा० तीन सके अठरा. [सं षट्क] **सकरेजा**–पु. दुफाशीं खेळांत फाशांवरील (सहा व एक मिळून) सात हें दान. [सक=सहा+रेजा=पगडा, एक]

सक—पु. वर्षगणना; शक; विशेषतः शालिवाहन शक. –शक ४९० मधील मंगळवेढें येथील भोज–ताम्रपट. [शक]

सकइणें—क्रि. शकणें; शक्य होणें. 'आवडी न पुरे मायबापासीं। घडों का येविसीं सकईल।' –तुगा ९५८. [शकणें]

सकंकण—वि. कंकणासहित; हातांत कंकण असलेला. 'तेव्हां सांवळा सकंकण। चारी बाह्या पसरूनि श्रीकृष्ण।' –एभा ३१. ५२९. [सं. स+कंकण]

सकट—क्रिवि. १ सगळें; समग्र; सर्वच्या सर्व; एकंदर; २ (एखादें मनुष्य अथवा वस्तु या) सह; सहित; सुद्धा; सहवर्तमान; बरोबर; मिळून. 'तेणें संग्रहे होय नाशु। देहासकट।' –भाए ३६८. ३ निवड न करतां जसें हातास येईल तसें; सरभेसळ. 'की देवा सरस निरस न पाहतां सकट शरण उद्धरिजे' –भक्तमयूरकेका १३३. ४ एकदम. 'त्वत्तात शरवात ध्वंसुनि सर्वांसही पळवि सकट।' –मोभीष्म १०.११४. [सं. सकृत्=एकवार] **म्ह०** सकट घोडे बारा टक्के. **सकटनिकट, सकटाखालीं, सकटांत, सकटामध्यें**–क्रिवि. सरसकट; निवड न करतां, सरभेसळीनें; हातास येईल तसें. 'या लुगडयाची वेगळी किंमत केली नाहीं, दहा लुगडीं शंभर रुपयांस घेतलीं त्या सकटांत हें आलें आहे.' **सकटसंकांत**–स्त्री. अपराधी, निरपराधी याची चौकशी न होतां सर्वांवर ओढवलेलें संकट, झालेली शिक्षा. (क्रि० बसणें; बसविणें येणें). 'अन्याय केला असेल त्यासच मारा सर्वांवर सकटसंकांत बसवूं नका.' **सकटा**–वि. समग्र; संपूर्ण; सर्व. 'भणौनि पांगुरुविला सकटा। मीषे झळंबाचेनि।' –ऋ ६८.

सकट—नस्त्री. (हिं.) हुक्क्याची नळी.

संकट—न. अडचण; कठिण प्रसंग; प्रतिकूल परिस्थिति; कसें करूं काय करूं इ० मनास लागणारी विवंचना; आपत्ति; अरिष्ट; त्रास. [सं.] **०घालणें**–एखादी वस्तु प्राप्त होण्यासाठीं हट्ट धरणें. 'मी तुला कांहीं संकट घातलें नसतां...' –नामना ७३. **संकटासमोर उभा राहणें**–संकटास तोंड देणें; येईल तो बिकट प्रसंग सहन करण्यास तयार असणें. **संकटा**–स्त्री. १ एक योगिनी. २ संकट आणणारी एक देवता. (क्रि० येणें; गुदरणें, पडणें). 'आम्हावर संकटा गुदरली.' **संकटी चतुर्थी–चौथ**–स्त्री. (प्र.) संकष्ट चतुर्थी, संकष्टी पहा.

संकट—वि. अरुंद, संकोचित; अडचणीची (जागा, स्थल),

सकंटक—वि. कांटे असलेला, कांटयांनीं युक्त असा. कांटयाळ (झाड, झुडुप). 'उपरि सकंटक साचे परंतु साचे जयांत सुरसाचे' –र. [सं.] **सकंटकतनुसंघ**–पु. अपृष्ठवंश प्राण्यांच्या विभागाच्या संघापैकीं एक संघ. या प्राण्यांच्या शरीरावरील कवचाच्या तगटांना हालणारे किंवा अचल असे कंटक असतात. या संघांतील प्राणी समुद्रांत राहतात व त्यांची हालचाल मंदगतीनें होते. –झाको (स) १.

सकरतार—पु. चिटणीस; सेक्रेटरी. 'मेहेरबान गोल्डस्मिथ सरकारचे सकरतार होते.' –इनाम १३. [इं. सेक्रेटरी]

सकटमळ—स्त्री. बाजरी इ० आखूड काडाच्या धान्याची काडासकट केलेली मळणी; सगळमळ पहा.

सकडतरू—पु. कांटेरी झाड. (महानु.) 'खुडी वो च्यूतांकुरू। हे खुपती सकडतरूं।' –शिशु ८३८. [सं. सकंटकतरु]

सकडा—पु. सहांचा समुदाय. फळें इ०च्या खरेदी-विक्रीच्या प्रसंगीं योजितात. [सं. षट्क]

सकण—वि. भरगच्च; ठेंचून भरलेलें; पुष्कळ दाणे असलेलें (कणीस); भरदार कणसें असलेलें (पीक) [स+कण]

सकणव—वि. सदय; दयार्द्र अंतःकरण असलेला. 'हा भावो सकणवे। धरूनि श्रीहरी।' –ज्ञा १७.१२३७. [स+कणव] **सकणवपण** –पु. सदयता; दयाळूपणा. 'तैसें दुःखितांचें शिणणें। हिरता सकणवपणें।' –ज्ञा १६.१५५.

सकणें—क्रि. शकणें; समर्थ, शक्त होणें, असणें. 'वाणी स्तवों काय सकेल तुला।' –निमा १.६०. [शकणें]

सकत—स्त्री. (कुण.) शक्ति; सामर्थ्य; बळ; ताकद; जोर. [सं. शक्ति]

सकत—वि. (व.) टणक; कडक; कठिण. [सख्त]

सकत जमीन–स्त्री. मृदु नसलेली, कठीण जमीन.

सकताळ—पु. (व.) नागरमोथा.

संकथन—न. १ एकमेकांशीं केलेलें संभाषण; संवाद. २ (ल.) सभा; संमेलन. [सं.]

सकनळी—स्त्री. (गो.) गाय, म्हैस इ० चारा खाणाऱ्या पशूंनीं चारा खाल्ल्यावर तो पोटांत उतरण्याची घशांतील नळी.

सकमार—वि. (राजा. कुण.) नाजूक. (प्र.) सुकुमार पहा.

सकर—पु. वाळूचा खडा. सकारी, सकिरा पहा. 'नरदेह धुतला पवित्र शेला उडून जाईल जसा सकर।' –अफला ६३. [सं. शर्करा]

संकर—पु. १ भिन्न जातींच्या अनेक पदार्थांचें मिश्रण; मिसळ; सरभेसळ; भेदभावराहित्य. २ अशा प्रकारें अनेक पदार्थ, वस्तू एकत्र होऊन बनलेला पदार्थ, जाति इ०. (समासांत) वर्णसंकर; जातिसंकर. [सं.] **संकर अलंकार**–पु. (साहित्य) दोन किंवा अधिक अलंकार एकाच पद्यांत आले असतां त्यास संकर अलंकार म्हणतात. याचे अंगांगीभाव किंवा मुख्य गौणभाव संकर, संदेहसंकर आणि एकप्रतिपाद्य किंवा एकवाचकानुप्रवेशरूप संकर असे तीन प्रकार आहेत. **संकरजाति**–स्त्री. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार जातींतील अनुलोम विलोम अशा प्रकारच्या संबंधापासुन उत्पन्न झालेली जात.

सकरकिडा—साखरकिडा पहा.

संकरट, शेंकट—न. (गो.) वाळवंट. [सं. शर्करा=वाळू]

सकरटेटी—स्त्री. (गुज.) खरबूज. –कृषि ५७२.

सकरनातें—सक्करनातें पहा.

संकरा—पु. (संगीत) गायनांतील एक राग. (प्र.) शंकरा राग पहा.

सकराई—स्त्री. हुंडी स्वीकारण्याबद्दल द्यावें लागणारें व्याज किंवा बट्टा. [सं. स्वीकार] **सकरा(क्रा)ई नकरा(क्रा)ई**–स्त्री. हुंडी खडी राहिल्यास त्याबद्दल नुकसानभरपाईदाखल हुंडी लिहिणारापासुन घेतला जाणारा पैका. हा शेंकडयावर आकारला जातो.

सकरुण—वि. दयाळु; सदय; कोमल अंतःकरणाचा. 'तो ज्ञानदानीं सकरुणु। भजिजे गुरु।' –ज्ञा १७.२०८. [सं.]

सकरूबोवा—पु. (व.) श्रावणमासांत शिराळशेटाबद्दल करण्यांत येणारा सण. शिराळशेट पहा.

सकर्मक—वि. (व्या.) ज्यास कर्म आहे असें; व्याकरणांत, वाक्यांत कर्माशिवाय ज्याचा अर्थ पूर्ण होत नाहीं असें (क्रियापद). [सं.] **सकर्मकर्तरी प्रयोग**–पु. जेथें सकर्मक क्रियापदाचा योग असुन कर्त्याच्या अनुरोधानें क्रियापदाचें रूप असतें असा प्रयोग.

सकर्दम—वि. चिखलानें भरलेलें, लडबडलेलें. 'सकर्दम सरोवरु। अवलीकूनि चकोरु।' –ज्ञा १.२३१. [सं. स+कर्दम]

संकर्षकबिंदु-केंद्र—वि. १ ज्या बिंदूकडेअ नेक वस्तू आकर्षिल्या जातात असा बिंदु. 'तूं संकर्षकबिंदुच केवळ हे अंतःसृष्टि।' –टिक १८३. २ ज्या बिंदूंत अनेक किरण वगैरे एकत्र होतात असा बिंदु. (इं.) फोकस. [सं.]

संकर्षण—पु. १ संध्येंतील केशवादि चोवीस नांवांपैकीं तेरावें नांव; विष्णूचें एक नांव. २ शेष; बळिराम. 'करून साष्टांग नमन। पुढें चालिला संकर्षण। देवकीच्या उदरीं येऊन गर्भ राहिला सातवा।' –ह ३.२७. ३ (ल.) शिष्यांचा दिवाण बाळोबा तात्या पागनीस. ४ (योग.) चार व्यूहांतील एक व्यूह. –न. १ आकर्षण; ओढ; खेंचण्याची क्रिया. २ जमीन इ० नांगरण्याची क्रिया. [सं. सम्+कृष्]

संकर्षदेश—पु. केंद्र. किरण जेथें केंद्रीभूत होतात तें स्थान. (इं.) फोकस. प्रकाशाचे किरण कनीनिकेच्या द्वारें नेत्रांत येतात तेव्हां नेत्ररसांतून जातेसमयीं वक्रीभवन पावून शेवटीं नेत्रांतील दर्पणावर संकर्षदेशांत एकत्र होतात.' –मराठी ६ वें पुस्तक पृ. १०३.

सकल—वि. १ सर्व; संपूर्ण; सगळा. २ परिपूर्ण; पूर्णत्व पावलेला. [सं.] **०गुणसंपन्न**–वि. सर्व प्रकारच्या उत्तम गुणांनीं युक्त असा. [सं.] **०गुणालंकरण**–वि. उत्तम प्रकारच्या गुणरूप अलंकारांनीं शोभणारा. एखाद्यास पत्र लिहितांना

आरंभींच्या मायन्यांत लिहितात. [सं.] **०वेत्ता, वेद**–वि. सर्वज्ञ; सर्व प्रकारचें ज्ञान असलेला.

सकल—वि. १ (प्र.) सखल; खोलगट (जमीन, जागा) २ ठेंगणा; खुजा. ३ आंखूड. –शभ्र. (गो.) खालीं.

सकल—पु. खोटें नाणें पाडण्याकरितां तयार केलेल्या सांच्याचा अर्धा भाग; अर्धा च्छेद; एक भाग; तुकडा. 'खालच्या सकलांतील खळगा व पन्हाळी यांशीं मिळतें असें भोंक व पन्हाळी वरच्या सकलांत पाडतात.' –गुजा १४४. [से. शकल]

संकलन—न. अनेक संख्यांचें एकत्रीकरण; बेरीज; मिळवणी. २ मिश्रण; भेसळ; सरमिसळ. ३ अनेक वस्तू एका जागीं रचून केलेली रास; ढीग. ४ संचय; संग्रह; एकत्र केलेला सांठा. [सं.] **सकलि(ळि)त**–वि. १ एकत्र जमा केलेलें; गोळा केलेलें. २ मिसळलेलें; मिश्र केलेलें. ३ विस्तार कमी करून थोडक्यांत आणलेला; संक्षिप्त; सारांशरूपानें थोडक्यांत लिहिलेला (ग्रंथ, भाषण). 'यालागीं गुणसन्निपात। सांगितला संकलित।' –एभा २५.१५०. ४ ज्याचें आकलन केलें आहे असा; आकलित. 'कीं जाति वेव्हारा परौता। जेया परिकर्म संकळितां।' –ऋ १४. [सं.] **संकलै**–स्त्री. मिश्रण; मिसळलेली स्थिति. 'सामान्य आणि विशेषा। संकलै कीजेल देखा।' –माज्ञा १३.१२३. [सं. संकलन]

संकला—पु. घोडयाच्या डोळयांस होणारा एक विकार. यानें घोडयाच्या डोळयांस गरमी होते व ते लाल होतात. –अश्वप २.१२१.

सकलात-द—स्त्री. लोंकरीचें, उंची, तलम व शेंदरी किंवा निळया रंगाचें कापड. [अर. सकलात्; तुर्की इस्केरिएट; इं. स्करिएट; इटा. स्कॅरिआलटो; फ्रें. स्कॅरिएट] **सकलाती-दी**–वि. सकलाती कापडाचा केलेला (अंगरखा, टोपी).

संकल्प—पु. १ मनोदय; हेतु; मनांतील विचार, इच्छा; 'सत्य संकल्पाचा दाता भगवान' –तुगा. २ निश्चय; निर्धार; अमुक गोष्ट करीनच करीन असा कायम बेत; प्रतिज्ञा. 'मारितो अरीला... प्रभुजी संकल्प हा मनें वरिला।' –मोकर्ण ४३.४२. ३ एखादें व्रत, संस्कार, विधि इ० आरंभितांना अमुक एक फल मिळावें म्हणून मी हें कर्म करतों अशा प्रकारें त्या कर्माचा उच्चार करून हातांत पाणी घेऊन तें सोडण्याची क्रिया; एखाद्या तीर्थाच्या ठिकाणीं स्नान करतांना, किंवा एखादी वस्तु दान करतांना, तसेंच ब्राह्मणभोजनारंभीहि असें उदक सोडतात. 'सांगुनि संकल्प सोडवी पाणी।'–मोवन ८.२९. 'यजमान धर्मसंस्काराला सिद्ध झाला पण सकल्पाचा उच्चार करीत नाहीं' –केसरी १२.७.३०. ४ मानसिक कर्मप्रवृत्ति; मनोविकार; वासना. 'घेऊनि विद्याशस्त्र लखलखित। संकल्पपशूचा करूनि घात।' –एभा १९.७६.५ अंत:स्फूर्ति; स्फुरण. 'मूळ माया जाणीवेची। मूळींच्या मूळ संकल्पाची।' –दा १५.७.२. ६ (चुकीनें) विकल्प; संशय. 'हें देखोनि संकल्पीं पडियला।'–दावि ७.२.२८. **संकल्पणें**–१ बेत करणें; ठरविणें; निश्चित करणें. २ (एखादें काम इ० एखाद्यावर) सोंपविणें; हवाली करणें. माथीं मारणें. ३ योजणें; कामीं लावणें; अर्पण करणें. 'जीवित संकल्पिलें तुझ्या-ठायीं' –मोकर्ण ४२.३६. **०बद्ध**–वि. कोणतेंहि कर्म करण्याचा संकल्प केल्यासुळें तत्परतंत्र झालेला. **०विकल्प**–पुअव. कल्पना व संशय; डळमळित स्थिति; शंकाकुशंका. 'संकल्प विकल्प निमाला। मनेंसी बुडाला मनोरथु।'–एभा ९.४२७. **०विहंग**–पु. मनोरूप पक्षी; मनोरथ; मनांतील हेतु. **संकल्पित**–धावि. १ योजिलेलें; निश्चित; ठरविलेलें; ठराविक. २विधिनियत; ब्रह्मघटित. 'जें संकल्पित घडेल सत्वर तें।' –मोउद्योग (नवनीत पृ.३११).

सकल्या फणस—पु. कापा नव्हे व बरकाहि नव्हे असा मध्यम प्रकारचा फणस.

सकवार—वि. सुकुमार; नाजूक; मृदु; हलका; सुंदर. [सं. सुकुमार] –पु. एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ.

संकष्ट—न. (अप.) संकट पहा. अडचण; विघ्न. 'त्राहे त्राहे चक्रपाणी। संकष्ट हरी समर्था।' –मुविराट ३.२६. –वि. १ बिकट; श्रमाचें; अडचणीचें; पीडादायक; दु:खदायक (काम). २ कष्टाळू; सोशिक; श्रमी (मनुष्य). ३ त्रासलेला; अडचणींत असलेला; दु:खी. **०चतुर्थी-संकष्टी चौथ, संकष्टी**–स्त्री. प्रत्येक महिन्यांतील बद्य चतुर्थी. या दिवशीं विनायकाचें व्रत करावयाचें असतें. शुद्ध चतुर्थीस विनायकी चतुर्थी म्हणतात.

सकस—वि. कसदार; दमदार; भरीव; पौष्टिक; सत्त्वयुक्त (अन्न, औषध, पदार्थ). [स+कस]

सकस—वि. कठिण; मजबूद; श्रमाचें; घट्ट. [सखत अप.]

सक(ल)ळ—वि. १ सर्व; संपूर्ण; अवघा. २ एकूणएक; सर्वांच्या सर्व. [सं. सकल] **सकळिक-ळीक**–वि. सर्व; अवघे; एकूणएक. 'उठा उठा हो सकळिक'–गणपतीचीभूपाळी. **सकळै**–स्त्री. मिश्रण; कालवाकालव. 'सामान्य आणि विशेष। सकळै कीजेल देवा।' –ज्ञा १३.३२२. [सकळाई]

सकळ, सकळवेळीं, सकळा—क्रिवि. १ सकाळच्यावेळीं; सकाळींच; लवकर. २ वेळेच्या पूर्वीच; अगदीं वेळेवर; योग्य अवधि असतां. 'तूं चाकरी सोडणार तर मला सकळवेळीं सांग म्हणजे दुसरा कोणी पाहीन.' [सं. उष:काल; सुकाल]

संकळणें—अक्रि. संक्षिप्त करणें; थोडक्यांत आणणें; सारांश काढणें. संकलन पहा. [स. संकलन] **संकळीत**–वि. (अप.) संकळीक. संक्षिप्त; सारभूत; थोडक्यांत आणलेलें. –क्रिवि. थोडक्यांत; संक्षेपानें; साररूपानें; सारांशानें. 'तें सकळहि निरोपिलें।

संकळीत मात्रें।' –दा १.१.२७. **संकळीत बोलणें**–(व.) संदिग्ध बोलणें.

सका—पु. सखा; मित्र. 'एवं तो धृतराष्ट्र पुत्र अवधी घेवोनि सेना सका।' –वामनविराट ५.१९. [सं. सखिन्]

सकाम—वि. १ वासना, इच्छा असलेला; विरक्त नव्हे तो; इच्छायुक्त. 'जयालागीं देव सकाम।' –ज्ञा ६.४५५. 'जेथीच्या जन्मा देव सकाम।' –एभा ५.४४३. २ सहेतुक; स्वार्थी; लाभाची इच्छा धरून केलेलें (काम, कृत्य, कर्म). 'सकाम साधन सर्वहि सांडा।' ३ विषयी; लंपट; कामी. 'जैसी सकामा न जिणवेची वनिता।' –ज्ञा ७.९६. –क्रिवि. इच्छा धरून. 'हें परिसोन भीष्मकोत्तम। दर्शना सकाम उठिला।' –एरुस्व ६.१. [सं. स+कम्=इच्छा करणें]

सकार—पु. (स्वीकार) १ हुंडी पत्करणें; पटणें; मान्यता. २ हुंडी पत्करल्याचा, स्वीकारल्याचा, पटल्याचा शेरा. [सं. स्वीकार] ०**मारणें**–स्वीकारल्याचा शेरा मारणें. **सकारणें**–उक्रि. स्वीकारणें; मान्य करणें; पटवून घेणें; तसा शेरा मारणें. **सकाराई**–स्त्रि. हुंडी स्वीकारण्याबद्दलचा आकार; हुंडणावळ; वटवणावळ.

सकार, सकारपूर्वक—पु. (सांकेतिक) सखारामबापू बोकील यांबद्दल वापरीत. 'सकारपूर्वक होणार' –ख १४२८. ०**विल्हा-ल्हे**–पु. (सांकेतिक) सोदा; सोदा या वर्गातील; शठ; लबाड; कपटी.

सकारा—पु. (हेट.) लहान खडा; वाळूचा खडा. (अव.) सकारे=खडे. [सं. शर्करा=वाळू]

संकासुर—पु. १ शंखासुर; एका दैत्याचें नांव. २ एक झाड व त्याचें फूल; राजतुरा. ३ (कों.) शिमग्यांत शंखासुराचें सोंग आणतात तें. [सं. शंखासुर]

सकाळ—स्त्री. प्रातःकाल; सूर्योदयापासून माध्यान्हापर्यंतचा काल. [सं. उषःकाल; सत्काल–भाअ १८३३] **सकाळचा तारा**–पु. शुक्र सूर्याच्या अगोदर उगवतो त्या वेळेस त्यास म्हणतात. **सकाळ-ळा-ळीं**–क्रिवि. १ उदयीक; दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं. २ प्रभातीं; लवकर प्रातःकाळीं. **सकाळ बकाळ**–क्रि. (ना.) लवकर; झटपट; न रेंगाळतां. **सकाळवणी-वाणी**–क्रि. लवकर; वेळेवरच; झटपट; उशीर होण्यापूर्वीच; अगोदरच. **सकाळसंध्याकाळ, सकाळसांज**–क्रिवि. सकाळीं व सायंकाळीं; दोन्ही वेळीं; सायंप्रातः. **सकाळें**–क्रिवि. योग्य काळीं; त्वरेनें. 'अमर अमृतपान करितां। मरताती सर्वथा सकाळें।'–एभा ११.१३१३. 'सत्त्व शुद्धि होईल सकाळें।' –गीता १२.४७६.

सकिरा—पु. रेंव; कंकर; खडा; वाळूंतील गोटे. [सं. शर्करा]

सकी—स्त्री. (कुस्ती) एक डाव. आपल्या एका हातानें जोडीदाराचा हात धरावयाचा व त्याच बाजूच्या पायांत आपला पाय घालून झोंक देऊन पाडणें. [सखी]

सकी—स्त्री. (गो.) कवडी.

संकीर्ण—पु. १ (ताल) पहिला विभाग नियमानें नऊ मात्रांचा असणारा दक्षिणेकडील एक ताल.

संकीर्ण—धावि. १ मिश्रित; एकत्रित; मिसळलेलें; गोंधळ झालेलें. २ दाटी झालेलें; गर्दीचें; घोळका, गर्दी, दाटी झालेलें (घर, खोली). ३ संकलित; एकवटलेलें. 'आरंभी पडिलीं होतीं तयाकरीं। संकीर्ण त्या नारीनर लोक।' –तुगा ५४. ४ आकुंचित; थोडक्यांत आणलेलें; संक्षिप्त. 'मूळ संकीर्ण कृष्णवेणी।' –रावि २. ५ क्षीण झालेलें; ऱ्हास पावलेलें; अंधुक झालेलें; अंतकाळचें (ज्योति, जीव, प्राण). अल्प; थोडें. 'अन्नवस्त्र संकीर्ण घरीं। कुटुंब बहु आहे पदरीं।' –भवि १८.१३४. ६ मिश्र जातीचा, रक्ताचा; संकर झालेला; कडू. [सं.] ७ (संगीत) अन्य रागांच्या मदतीनें रंजक होणारा (राग).

संकीर्तन—न. स्तवन; स्तुति; गौरव; गुणवर्णन; परमेश्वराचें नामोच्चरण. **संकीर्तित**–वि. स्तविलेला; स्तुति केलेला; गौरव, गुणवर्णन केलेला. [सं.]

सकु—पु. शक. –शिलाहार ताम्रपट, शके १०४९.

संकुचित—वि. संकोचित पहा. आकुंचित.

सकुटन—न. (कों.) सांकटणें पहा.

सकुटुंब—वि. कुटुंबसहित.

सकुडी—क्रिवि. सदेह; शरीरासहित. [स+कुडी=देह]

सकुमार—वि. सुकुमार पहा. **म्ह०** सकुमार सऊ घोरपडी इतकी मऊ–नाजूकपणाचा आव आणणाऱ्या स्त्रीस म्हणतात. **सकुमाराची राशी**–अत्यंत सुकुमार; नाजूक.

संकुल—वि. दाट; गर्द; व्याप्त; संकीर्ण. [सं. सं+कुल्] **संकुलित**–धावि. मिसळलेलें; एकत्र केलेलें; मिश्र.

सकुली—स्त्री. करंजी. –एभा (पाठभेद) २७.२९१. [सं. शष्कुली]

सकुल्य—वि. एकाच कुळांतील; भाऊबंद; आप्त; नातेवाईक. [स+कुल]

संकुळी—स्त्री. समुदाय.

सकून—पु. शकुन पहा. [सं. शकुन]

सकृत्—क्रिवि. एकदां; एकेवळ; एकवार; ताबडतोब. 'ज्यांसि सकृत् ताडुनिया ध्वनिला जन एक मास वरि परिसे।' –मोसभा १.८९. [सं.] ०**ग्राही**–वि. ताबडतोब ग्रहण करणारा; चाणाक्ष; चलाख; तीक्ष्ण बुद्धीचा. ०**दर्शनीं**–क्रिवि. १ पाहतांक्षणींच; प्रथमदर्शनीं; पाहिल्याबरोबर. २ प्रथमच; मूळारंभीं; प्रारंभींच.

सकृप—वि. कृपाळु; दयाळु; सदय. 'तो म्हणतसे सकृपु । ऐसें राया ।' –ज्ञा ४.२१०.

सके-कें—सक पहा. [सं. षट्क]

सकेकरी—पु. पाणी देणारा, पाणी शिंपडणारा नोकर; भिस्ती. 'वरुण ज्याचा सकेकरी ।' –स्वादि ६.४.४१. सक्का पहा. [अर. सक्का=भिस्ती]

संकेत—पु. १ व्यवस्था; निश्चिति; स्थापना; नियतता. २ सहमत; योजना; करार; कबुली; वायदा; बोली; ठराव. ३ पूर्वनिश्चिति; तरतूद; योजना. ४ खूण; इशारा; चिन्ह; अर्थगर्भ हालचाल; सूचक अंगविक्षेप, दृष्टिक्षेप वगैरे. 'सुमित्रा सुतालागिं संकेत केला ।' –राक १.१७.७४. ५ प्रेमीजनांचा बेत; निश्चित स्थान; योजना. 'तो करी संकेत गोपीसवें ।' –तुगा ९४. ६ शर्त; अट; ठरविलेलें कलम, गोष्ट. ७ शब्दाची विशिष्ट अर्थज्ञापक शक्ति. [सं. सम्+केत=आमंत्रण करणें] ०**कुंज**–पु. प्रियजनांचें मीलनस्थान, क्रीडास्थान. ०**शब्द**–पु. (व्या.) नाम; पदार्थवाचक शब्द. ०**समीकरण**–न. ज्या समीकरणांत अज्ञात अक्षराबद्दल विशिष्ट एकच किंमत घातली असतां खरें असतें असें. उदा० क्ष+५=१० म्हणजे क्ष=५. ०**साह्यकारी**–पु. दोस्त; मित्र; सोबती. ०**स्थान**–न. प्रेमीजनांचें परस्पर भेटण्याचें योजलेलें स्थल. **संकेतार्थ**–पु. (व्या.) एका क्रियेची सिद्धि दुसऱ्या क्रियेवर अवलंबून आहे असा बोध करणारें क्रियापदाचें रूप. उदा० जर तो आला तर मी जाईन.' –मभाव्या १६१. **संकेतित**–धावि. निश्चित; योजिलेलें; ठरविलेलें; नियोजित. **संकेती**–वि. ठरल्याप्रमाणें वागणारा; नियमानें चालणारा.

सकेरा—पु. रेंव; खडा; कंकर; वाळूंतील खडा. [सं. शर्करा]

सकेशा—स्त्री. केस असलेली विधवा स्त्री. वपन न केलेली विधवा. [सं.]

संकेश्वर—पु. संकासुर पहा. राजतुरा; एक फुलझाड व फूल.

संकोच—पु. १ आकुंचन; आंखडणें; आकसणें; एकत्र ओढलें जाणें; मिटणें; चिरमुटणें; अवटरणें. 'आपलिया संकोच विकाशा । आपणचि रुप वीरेशा ।' –ज्ञा १५.५५३. २ अरुंदपणा; निमूळतेपणा; जागेची दाटी; गर्दी; मोकळेपणाचा अभाव; निरुंदपणा; (जागा वगैरे) प्रशस्त नसणें; आवळपणा (भांड्याचा). ३ जागा मोकळी, प्रशस्त नसल्यामुळें होणारी अडचण; दाटी; दाटणी. 'मला येथें संकोच होतो, स्वस्थ लिहवत नाहीं.' ४ (ल.) मनावर निर्बंध घातला गेल्यामुळें विकारांची होणारी दाटी; स्वातंत्र्याभाव; मनमोकळेपणाचा अभाव; मनाचा खोलपणा. ५ लज्जा, विनय, भीड, मर्यादा वगैरेमुळें वागणुकीवर पडणारा निर्बंध, दाब; अडचणल्यासारखी वागणूक. (क्रि० वाटणें, होणें). [सं. सं+कुच्] **संकोचणें**–अक्रि. १ आकुंचित होणें; लहान होणें; आंखडणें 'आणि गंगा शंभूच्या माथां । पावोनि संकोचे पार्था ।' –ज्ञा १६.२०५. २ दाब पडणें; प्रतिबंध वाटणें; अडचणणें. ३ मोकळेपणानें न वागणें; दुरून असणें; बेताबातानें असणें; निर्बंधित वर्तन करणें. ४ भीड, मर्यादा, लज्जा यांनीं मोकळेपणा न वाटणें; लाजणें; **संकोचन**–न आखडणें; आकसणें; मिटणें; दाटणें; कोंडणें; अडचणणें; कोताई; दाटी; चिंचोळेपणा. **संकोचित**–धावि. १ आंखडलेलें; आकसलेलें; आकुंचित; दाटलेलें; एकत्र आलेलें. २ अरुंद; चिंचोळे; आवळलेलें; अडचणलेलें; प्रशस्त नसलेलें; दाटीचें. ३ निर्बंधित; नियंत्रित; रेखलेलें. ४ दबलेलें; निरुद्ध; भिडस्त; शरमिंदा; लज्जित; विनत. ५ (सामान्यतः) आशंकित; बुचकळ्यांत पडलेलें; सांशंक; भीतिग्रस्त. **संकोची**–वि. भिडस्त; लाजाळू; मागें राहणारा; मनमोकळा नव्हे असा.

सकोटण-न, संकोटण-न–न. सांकटणें; ज्यावर एखादी वस्तु सांकटावयाची, खापलावयाची असते तो आधाराकरितां घेतलेला ठोकळा. [सांकटणें]

सकोमळ—वि. मृदु; नाजुक; लुसलुशीत; कोमळ. 'सकोमळ सरिसे । सुबुद्ध राहती आपैसे ।' –ज्ञा ६.१८३. [सं. सुकोमल]

सकोवत—सखावत पहा.

सकोली—स्त्री. (व.) प्रेताची तिरडी.

सकोश—वि. (प्राणिशास्त्र) ज्याला पिशवी असते असा (प्राणिवर्ग). –प्राणिमो ४८. [सं.]

सक्करनातें—न. १ जवळजवळच्या आप्तांमध्ये असलेली सलगी; दाट स्नेह; लोभ. २ पत्नीच्या आप्तांबद्दल वाटणारा लोभ, आपुलकी, आपलेपणा. [सक्कर=साखर+नातें]

सक्करपारा—पु. (व). जरदाळू.

सक्करिया—न. रताळें. –कृषि ५५० [गुज]

सक्कस—वि. कठिण; बळकट. सकस पहा. [अर. सखत; स+कस]

सक्का—पु. भिस्ती; पाणी देणारा नोकर. 'पखाली व सके यांजकडून पाणी पोहोंचवीत होतों.' –मदबा २.१२२ 'सक्का तु जलदः स्मृतः ।' –राव्य ३.३. [अर. सक्का=पाणी देणारा]

सक्त—धावि. १ संलग्न; जोडलेलें; युक्त. २ (ल.) रममाण. अधीन; निमग्न; नियुक्त; गढलेलें; तत्पर. 'सक्त ब्राह्मण भजनीं आहे त्याचाचि सत्य हा भक्त' –मोप्रभा १.१००. [सं.] **सक्ति**–स्त्री. १ संयोग; जोड; संबंध. २ अधीनता; निमग्नता; अनुरक्ति.

सक्त, सख्त, सकत—वि. कठिण; मजबूत; कणखर; कठोर; कडक; जुलमी; कष्टप्रद; दुःखकारक. 'पोलाद इतकें सक्त करतां रेतें कीं...' –पदाव १२१. 'ऐशा तीन सबबेनें बायका आपला

दील सक्त करून जातात' –ऐटि २३३. [अर. सख्त्] ०गो– वि. बोलण्यांत निष्ठुर. ०गोई–स्त्री. निष्ठुरपणा. ०पाठयाळ– वि. १ कणखर; मजबूत; सशक्त (पशु). २ (ल.) सोशीक; कष्टाळू; काबाडकष्ट करणारा. 'तुझ्या घरांत बायको सक्तपाठयाळ आहे म्हणून तुला वेळेवर भाकर मिळते.' ०भीड–स्त्री. विशेष आग्रहाची विनंति; निकडीची मध्यस्थी. (क्रि० घालणें). 'तुम्ही सक्त भीड घातली म्हणून माझें काम झालें.' ०मजुरी–स्त्री. १ कष्टाचें काम; मेहनतीचें काम; तुरुंगांत कैद्याकडून करून घ्यावयाचें श्रमाचें काम. २ कैद; असें काम करावयाची शिक्षा. ०रद्दबदली–स्त्री. निकडीची, आग्रहाची, जरूरीची विनंति, मध्यस्थी. **सक्ती**–स्त्री. १ जबरी; जुलूम; कष्ट; दुःख. २ कडकपणा; कठोरता; निष्ठुरता.

सक्तु—पु. १ एक धान्य; यव. २ सातूचें पीठ; सत्तू; सतवा.

सक्तनह—वि. रहिवाशी. –आदिलशाही फर्मानें. [अर. साकीन]

सक्याण—न. कणसें काढून घेतल्यानंतरचा कडबा, घाट.

सक्रंदन—न. १ कापाकापी; मारामारी; कत्तल. २ (ल.) धसकाफसकी; ओढाताण; वाईट रीतीनें वागविणें. [सं. सं+क्रंदन.]

सक्रद्दर्शनी, सक्रदर्शनी—सकृद्दर्शनी पहा.

संक्रम-संक्रमण—पु. न. १ गमन; पुढें जाणें; चालू लागणें; गति; प्रवास; स्थलांतर. २ एका राशींतून दुसऱ्या राशींत जाणें (सूर्य अथवा ग्रहाचें); संक्रांति. [सं. सं+क्रम्]

संक्रमण, संक्रमणगणित—न. दोन संख्यांची बेरीज व वजाबाकी दिली असतां त्या दोन संख्या शोधून काढण्याची रीत, क्रिया. **संक्रामक**–वि. स्थलांतर करणारा.

सक्राई नक्राई—सकराई नकराई पहा.

संक्रांत—स्त्री. १ (अप.) संक्रांति पहा. २ (ल.) संक्रांत एका दिशेनें येते दुसऱ्या दिशेकडे जाते व तिसऱ्या दिशेकडे पाहते यावरून अशा तऱ्हेनें विचित्रपणानें वागणाऱ्या मनुष्यास विनोदानें म्हणतात. तसेंच संक्रांत अशुभफलदायी असते यावरून अनिष्ट मनुष्यासहि म्हणतात. –धावि. पुढें गेलेला; ओलांडून गेलेला; पलीकडे गेलेला. [सं.] ०फळ–न. (ज्यो.) प्रत्येक राशींतून सूर्य गेला असतां त्या त्या राशीस किंवा त्या कालास अनुसरून इतर राशींस मिळणारें शुभाशुभ फल. ०बसणें–(ज्या राशींतून सूर्यसंक्रमण होतें त्या राशीस अनिष्ट फल मिळतें या समजुतीवरून) अनिष्ट काल प्राप्त होणें; अशुभ होणें. **संक्रांति**–स्त्री. १ सूर्याचें (किंवा ग्रहाचें) एका राशींतून दुसऱ्या राशींत गमन. २ एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींत जाणें; स्थित्यंतर; स्थलांतर वगैरे. [सं. सं+क्रम्=जाणें]

सक्रोबा—पु. (व). शिराळ शेट.

सक्लेश—वि. श्रमदायक; पीडाकारक; कष्टकर. 'तें काम्य कर्म सक्लेश। जाणावें येथ राजस।' –ज्ञा १८ ६१०.

सख—पु. मित्र; सहचर; सखा. विशेषतः समासाच्या उत्तरपदीं, जसें- इंद्रसख; मरुत्सख; तत्सख. [सं. सखिन्]

सख—पुन. सहांचा संच, समुदाय, गट. 'बे सख बारा.' सक पहा. [सं. षट्क] ०रेजा–पु. दुकांशी खेळांतील एक दान; एका फाशांवर सहा आणि दुसऱ्यावर एक असला म्हणजे होतें.

सखई—शअ. संबंधीं; विषयीं; करितां. 'तरी तैसाचि मदनेलेचां सखई। बोलिला होता।' –ख्रिपु २०.४०.७९

संखजिरें—न. (प्र.) संगजिरें पहा.

सखत, सखती—सक्त, सक्ति पहा.

सखया—संबोधन सख्या; मित्रा; प्राणनाथा. 'सखया रामा विश्रांति तुझिये नामीं।' [सं. सखिन्]

सखर—वि. चांगलें; उपयुक्त; दाट; ठाशीव; घट्ट विणीचें, पोतांचें. 'बहुत सखर सेले चांगले आठ गोली।'; 'यांचे वस्तु आपले सखरा होऊन साध्य घडावयाचें नाहीं.' –राजे संभाजी चरित्र १४. [स+खर] ०निखर–वि. उत्तममध्यम; बरीबाईट; उंचसखल (जमीन).

सखल—न. १ उताराची, खोलगट जमीन; लवण; खांच; खळगा. २ खळगी; खांच (जमीन, लांकूड, दगड वगैरेतील). –वि. १ खोलगट; उताराची; खड्ड्यांतील; खोल (विहीर, खड्डा). २ कमी उंच; ठेंगणा. ०वट–वि. १ थोडें सखल; खोलगट; उथळ (जमीन). २ खळग्याचा, कमी उंच. **सखलाट**–वि. (गो.) खालची; तळची. **सखळी**–स्त्री. (गो.) देवालयाच्या सभोंवार असलेली भिंत व तेथपर्यंतची खोलगट जागा.

सखलात–त्त—स्त्री. बनात; लोंकरीचें कापड; जाड लोंकरीचें कापड. [तु. फा. सक्लात सकलात पहा] **सखलाती–दी**–वि. बनातीचें.

सखल्या फणस—सकल्या फणस पहा.

सखवार—वि. सकवार; सुकुमार. 'वाढीति त्या गजगती सखवार नारी।' –सारुह ६.७७. [सं. सुकुमार]

सखा—पु. सोबती; मित्र; सहचर; स्नेही. 'सख्याचें उद्धन। सखा साहे निवांत।' –ज्ञा ११.५७४. [सं.] **सखा-सखासोयरा, (विरू) सगा**–सगासोयरा पहा. **सखा-सख्खा**–वि. प्रत्यक्ष, संबंधाचा, जवळच्या संबंधाचा: चुलता, मामा, आत्या वगैरेच्या मार्फत संबंधाचा नव्हे. 'याचा वधी जो चुलता सख्खारे।' –वामन नृसिंहावतार, (नवनीत पृ. १२६.

'मणिला कंठीं बांधुनि माझा सख्खा प्रसेन जो चुलता।' –मोकृष्ण ८३.१०४. **सखित्व**–न. मैत्री; स्नेह. |**सखी**–स्त्री. १ मैत्रीण; सोबतीण. २ शिमग्यांतील शृंगारिक लावणी. ३ लावणीच्या प्रारंभीं म्हणावयाचे श्लोक वगैरे गाणें.

सखा—पु. सखाराम याचा संक्षेप. सखारामबापू बोकील. **सखा देवा विठ्ठला**–पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांपैकीं तीन शहाणे; सखारामबापू बोकील, देवाजीपंत चोरघोडे व विठ्ठलसुंदर, अर्धे शहाणे नाना फडणवीस.

सखावत्, सकोवत—स्त्री. औदार्य; दानधर्म. 'सकोवतीचा माल आहे.' –रा १५.१३७. [अर. सखावत्]

सखी—वि. धर्मात्मा; उदार; दानधर्म करणारा. [अर. सखी] **सखीचा लाल**–पु. अतिशय उदार मनुष्य; धर्मात्मा.

सखून—पु. शब्द; वाणी; वचन; जबान; भाषण. 'ही दानाई ईश्वरांनीं ज्यास बक्षीस केली त्यांचे सखुनाची पास ठेवणें लाजीम.' –रा ५.८६. [अर. सखन, सखून=भाषण, वाणी तुल० सं. शकुन]

सखेद—क्रिवि. दुःखानें; खेदमुक्ततेनें; खेदानें. 'मग सखेद असे बोलतु।' –ज्ञा १.१९२. [सं. स+खेद]

सखोल—वि. १ अतिशय खोल; फार खोल. २ गंभीर; गूढ; खोल अंतःकरणाचा. 'सभ्य सखोल सात्त्विक।' –दा १४.८.७. 'प्रभू सखोल हृदय आपुले।' –ज्ञा १.६३. [स+खोल]

सख्त—वि. सक्त पहा. कठीण कडक. [अर.सख्त] ०**गो**–वि. वाचानिष्ठुर; कठोरवाणीचा. 'शाहाजी सख्तगो फार यास्तव कोणाशीं बनत नाहीं.' –दिमरा २.२३. ०**गोई**–स्त्री. निष्ठुर भाषण; कठोर वाणी. **सख्ती**–स्त्री. सक्ती पहा. जुलूम; क्रूरता; निष्ठुरता; कडकपणा.

सख्य—न. १ मैत्री; स्नेह; मित्रत्व. (समासांत) साधुसख्य; स्त्रीसख्य; सत्सख्य. २ देवाशीं संघटन; नवविधाभक्तिपैकीं एक प्रकार; सख्यभक्ति. 'अर्चनं वंदनं दास्यं सख्य मात्मनिवेदनं।'

संख्य—न. युद्ध. [सं.]

संख्या—स्त्री. १ अंक; आंकडा; आंख. २ गणना; मोजदाद; इयत्ता. 'संख्या न करवे कोणासी।' –ज्ञा ७.१६३. [सं.] ०**मोजणें**–नणना करणें; मोजदाद करणें; रकम किती तें काढणें, सांगणें. **संख्यात**–धावि. मोजलेलें; गणलेलें. **संख्यान**–न. मोजण्याची क्रिया; गणन. **संख्यावत्-वान्**–वि. विद्वान्; संख्या जाणणारा. 'चांद्र शरन्मानें हे संख्या संख्यावदातृता घडती।'– मोविराट ४.६४. **संख्यावाचक**–वि. संख्या दाखविणारा विशेषणांचा एक प्रकार; एक, दोन, तीन वगैरे. **संख्याविशेषण**–वि. संख्या दाखविणारा विशेषणांचा प्रकार. याचे संख्यावाचक, संख्यापूरक, संख्यावृत्तिवाचक व संख्यांशवाचक असे चार प्रकार आहेत.' –मभाव्या १३८. **संख्येय**–वि मोजण्याजोगें; गणना करावयाचें; गणण्यास शक्य.

संख्या सोमल—पु. सोमलाचा एक प्रकार; एक औषध. –अश्वप २.२९०.

संग—पु. १ सहवास; जोड; संगति; ऐक्य; संबंध; सोबत; आसक्ति; संयोग; मैत्री. (समासांत) सत्संग; खलसंग; साधुसंग; अंगसंग; स्त्रीसंग; गुरुसंग; विधवासंग. 'म्हणऊनि संगु जेव प्रकृतीचा।'–ज्ञा ३.६३. २ स्त्रीपुरुषसमागम; मैथुनसंबंध. [सं. सम्+गम्=जुळणें] ०**चर-चारी**–वि. १ सहचर; बरोबर असणारा; सहवासी; संगती. २ समूहचर; संघ करून राहणारा; कळपांत राहणारा. ०**दोष**–पु. संसर्गदोष. 'जे संगदोषें हा लौकिक। भ्रंशु पावे।' –ज्ञा १.२५७. **संगें-संगे**–क्रिवि. बरोबर; संगती; सोबतीनें.

संग—पु. दगड; धोंडा; फत्तर. [फा. संग] **संगई-संगी**–वि. दगडी; संगीन. 'कारंजाचे आंगें संगी फरशीवर जमीनीस आले.' –पया ४४५. ०**तरास-त्रास**–पु पाथरवट; घडगकाम करणारा. 'मग वाटिली कामवट। संगत्रास पाथरवट।' –कालिका १९ ३६. ०**बर्सरि**–पु. एक धातुविशेष; सरका...राव्यको २.२२. ०**मरवर**–पु. आरसपानी दगड; एक पांढरा विशिष्ट दगड. ०**मरवरी**–वि. आरसपानी दगडाचा; आरसपानी. ०**सार**–पु. दगडांनीं ठेंचून मारणारा. [फा.] ०**सारी**–स्त्री. दगडांनीं ठेंचून मारण्याची क्रिया. [फा.]

सगई—स्त्री सोयरीक; आप्तसंबंध. [सगा]

संगजिरें-रा—नपु. शंखजिरें; एक औषधी द्रव्य.

सगट, सगटनिगट—क्रिवि. सकट; सारखें; भेदाभेद न पाहतां; सरसकट; सर्वे. 'निंदका वंदका सगट सांभाळी।'–रामदासी अभंग (नवनीत पृ. १५४.) 'नरपशुतनु मानसिल सगट।' –राला १०१. 'सगट लोकांचा जिव्हाळा मोडूं नये।' –दा १५.१.३१. –शब्र. बरोबर; सह; एकत्र. 'रथासगट देईल घावे।' –उषा ७०.

संगटणें—अक्रि. एकत्र होणें; एकवटणें. 'दलबादल डेऱ्यांत श्रीमंतांसन्निध संगटले।' –ऐपो ३९५. [सं. सं+गम्]

सगटाई—स्त्री. सरभेसळ; एकत्रितपणा; क्रमराहित्य; समूहावस्था. **सगटाइचा-नें-खालीं**–एकत्रितपणें.

सगडी—स्त्री. शेगडी. 'चिंतेची सगडी जिवासि रगडी...' –आ सुदाम ४९६.

संगडी—पु. सोबती; संवगडी. 'श्रीरामा वृषभ असे संगडि तिकडे गणात ज्या राम असे।' –मोकृष्ण ५९.८. [सं. सम्+गम्]

संगणमत-मती—संगनमत-मती पहा.

संगणें—(विरू.) सांगणें पहा. 'तोहि शिणला निःशेष। वस्तु न संगवे।' –दा १.५.११.

सगत—स्त्री. (गंजिफा) उजव्या हातच्या खेळगडयाकडून आलेली देणी.

संगत-ति—स्त्री. १ सहवास; सोबत; साहचर्य; स्नेह. 'उत्तम संगतीचें फळ सुख। अद्धम संगतीचें फळ दुःख।' –दा १७.७.१७. २ संयोग; मिलाफ; जोड; जमाव; मेळ; लाग; ३ ऐक्य; संबंध; जुळणी. ४ पूर्वापरसंबंध; अनुरोध. 'होईल श्लोकसंगति भंगु। म्हणऊनियां।' –ज्ञा ५.६६ [सं. सं+गम्=जाणें]

संगत—वि. संबद्ध; युक्त; अनुयोगी. **संगत(ति)गुण-संगगुण**-पु. साहचर्यानें उत्पन्न होणारा गुणदोष; सहवासानें लागणारें वळण, होणारा परिणाम. **संगतवार**-वि. संबद्ध; युक्त; अनुसरून असलेलें. **संगतसोबत**-स्त्री. १ स्नेह; मैत्री; सोबत; सहवास. २ स्नेही; सोबती; बरोबरची मंडळी. **संगति(त)दोष, संगदोष**-पु स्नेहामुळें, संसर्गामुळें जडलेला दुर्गुण. **संगतीं-संगतें**-क्रिवि. बरोबर; सह; सोबतीनें. **संगतीं जाणें**-१ सती जाणें; सहगमन करणें. २ संग करणें; रत होणें. **संगतीसोबती**-पु. स्नेही; मित्र; दोस्त. **संगाती**-पु. स्नेही; सोबती; मित्र; दोस्त. **सांगाती-तें, संगीं**-वि. बरोबर; सह. 'संध्याकाळीं आपल्या-मुलासांगातीं लहान डोंगरीवर बसला.' –नि २९. **संगी**-पु. मित्र; स्नेही. 'बोलिलें सकळ संगीयासी।' –प्र २ ६४. –वि. १ संगति धरणारा; संबद्ध; युक्त. उदा० साधुसंगी; गुणसंगी; स्त्रीसंगी; दुष्टसंगी; सत्संगी. २ संगतवार; यथार्थ. 'तंव परमार्थ हा संगी न म्हणे।' –सिसं ४.७३. **संगीक**-वि. बरोबरचा; सह-चर. 'संगीक समुदाया ठेऊनि दूर' –दावि १०९. **संगीकारी**-वि. बरोबरचा; अनुचारी; सोबतचा. 'दोन तीन दिवसांवरी। तस्कर असतां संगीकारी।' –गुच १०.२१. **संगें**-क्रिवि. बरो-बर; सह; सहित; सान्निध्यांत. 'संगें महमदसाहेब इमानी सर-दार।' –ऐपो १७०. **संगेमंगे**-क्रिवि. स्नेहानें; सोबतीनें; एकत्र; मित्रत्वानें. [संगें द्वि.]

सगद्गद—वि. गहिंवर आलेला. 'येथ सगद्गदें बोलें। अर्जुनें जी म्हणितलें।' - ज्ञा १५.४६१. [सं.]

सगंध—वि. सुवासिक. [सं.]

संगनमत—न. संकेत; परस्पर विचार करून केलेला निश्चय; परस्पर सहाय्याकरितां केलेला बेत, योजना; सहकार; संघटन. **संगनमती**-पु. एखादें कार्य साधण्याकरितां संकेत करणारा जमाव, संघ, पक्ष; विचारविनिमय करून ऐक्य केलेली मंडळी.

सगपण—न. आप्तपणा; नातें [सं. सखा; म. सगा]

सगबहीण-स्त्री. मानलेली बहीण. 'आठवण करुनी, करुनि घातली ती, भाजिही सगबहिणी घरची।' –काव्यकेतकी ६४. [सगा+बहिणी]

संगम—पु. १ ऐक्य; संयोग; भेट; संमेलन; मिलाफ; एकत्र येणें; एका ठिकाणीं मिळणें; एकत्र होणें. उदा० 'नद्यांचा संगम, रस्त्यांचा संगम. 'पैं जीव परमात्मा संगमा।' –ज्ञा ६.४८०. २ (ज्यो.) ग्रहांची युति, एकत्र येणें. ३ (जरतार) हलक्या जरताराचा एक प्रकार.

सगर, संगर—पुस्त्री. पाऊलवाट; सावजांचा मार्ग. 'भवा-टवीचा सगरा। जीवाकरितां येरझारा।' –ऋ ६.

सगर, संगर—स्त्रीन. वस्त्राचें अंग व कांठाची रेशमी वीण यांमध्यें एक निराळ्या रंगाची रेघ विणतात ती.

संगर—पुन. युद्ध; लढाई. [सं.]

सगरकूप—पु. काशींतील एका विहिरीचें नांव (सगर राजानें खोदलेला). [सं.]

संगरग—पु. (गो.) समुद्रांतून प्रवास करणारा. [सारंग ?]

संगरणी—स्त्री. (अप.) संग्रहणी पहा. हगवण.

संगरात—पु. (अप.) संगतरास; पाथरवट; अश्मभेत्ता –राज्यको ७.१४. [फा. संगतरास]

सगर्भ-र्भ्य—पु. सख्खा भाऊ. [सं.] **सगर्भ**-वि. गरोदर; गर्भिणी. [सं.] **सगर्भप्राणायाम**-पु. प्रणवयुक्त प्राणायाम.

सगलंकृत—वि. गिलंकृत याचें चमत्कारिक रूप. [सं. स+गल=गळा+कृत=केलेलें]

संगव—पु. दिवसाचे पांच विभाग केले असतां दुसरा भाग. सात घटिकेपासुन बारा घटिकेपर्यंतचा काल; वांसरें पिण्यास सोड-ण्याची वेळ: दोहनकाल. [सं. सं+गो=गाय]

संगवई-यी—पु. १ बालमित्र; बाळपणापासूनचा सोबती. २ सहचर; सहकारी; सहभागी. 'नानासारखे वीर संगवये।' –ऐपो २२६. ३ सोबती; वाटाड्या; मार्गदर्शक. [संग+वय]

संगसंगा—पु. १ तो करीत नाहीं तर मी कां करीन अशा अर्थानें धरलेला मत्सर, स्पर्धा, असूया; अशा स्पर्धेनें केलेलें कृत्य वगैरे. २ दुसऱ्याची पद्धत पाहून केलेलें कोणतेंहि सामाजिक, लौकिक कृत्य. –क्रिवि. बरोबर; एकत्रित; सह; सोबतीनें. [संग]

संगळणें—अक्रि. (व. ना.) सांचणें; जमणें; एकत्र होणें. [संकलन]

सगळमळ, सगटमळ, सगडमळ—स्त्री. केवळ कणसें न कापतां सर्व पिकाची केलेली मळणी. [सगळा+मळणें]

सगळा—वि. १ सर्व; सकल; एकूणएक. २ पूर्ण; पुरा; सर्वांच्या सर्व. [सं. सकल; प्रा. सगल; हिं. पं. सगला; गु. सगळो]

संगळा—पु. (ना.) ढीग; रास; गोळा. [संकलन]

सगा—पु. १ स्वकीय; नातेवाईक; आप्त; नातलग. २ मित्र; सोबती. –वि. स्वकीय; जवळचा; सख्खा (चुलत, सावत्र नव्हे). [सं. स्वक, सखा; प्रा. सक] **सगाई**–स्त्री. १ नातें. २ सोयरीक; विवाहसंबंध; वाङ्निश्चय. **सगासो(इ)यरा**–पु. स्नेहीसोबती; नातेवाईक; आप्त; सोयराधायरा; इष्टमित्र.

सगा—पु. सगुणी. कवडी पहा.

सगात्र—वि. ठोसर; घट्ट, मजबूत, 'जैसे सगात्र सघन। होती पर्वतीचे पाषाण।' –भाए ५४९. [सं. स+गात्र]

संगितरंगित—वि. सुसज्ज; सुखसोयींनीं भरलेला; परिपूर्ण. 'महाल चोखट संगित रंगित। ते सांडुनि विपिनीं पडाल दुःखित।' –नव १७.१४३.

संगिन—वि. संगीन पहा. दृढ; घट्ट. 'कुच संगिन पाहून बसुन मनीं गजबजती।'–होला ५९.८७. **संगिनात**–स्त्री. लवाजमा; स्वारशिबंदी; मजबुती. 'वडिलीं त्याबराबर आपली संगिनात देऊन सुरक्षित त्या स्थळास पाठवून लग्नसिद्धि झाल्यावर ...' –वाडशारो १.८६.

संगिनमाक—पु. घोडयाच्या आयाळींतील भोंवरा. –अश्वप १.१०३.

सगी—स्त्री. सुवागी; सवागी; टांकणखार; कडयाखार; सोनार सोनें वितळविण्याकरितां वापरतात तो क्षार.

संगीत—न. १ वाद्यसहित गायन; गाणें–बजावणें; गायनवादन. २ गायनवादनाचीं साधनें. ३ गायनवादन नर्तनशास्त्र; स्वरशास्त्र; गायनकला. –वि. १ गायनयुक्त; ज्यांत गाणें, पदें आहेत असें (नाटक). [सं. सम्–गा–गी]

संगीत—वि. समर्पण; व्यवस्थेशीर; व्यवस्थित; यथायोग्य. 'संगीत चालिला तरी तो व्याप' –दा १९.७.२५. 'उत्तरासी संगीत उत्तरें।' –दा १९.१०.६. [सं. सम्+गम्]

सगीन, संगीन—वि. १ (कों. कुण.) जड; अवजड; भारी. २ संपूर्ण; पूर्णपणें असलेला. 'सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा संगीन अभ्यास मी प्रिटोरियामध्यें केला.' –महात्माजींचे सत्याचे प्रयोग १५५. [सं. सघन; फा. संगीन]

संगीन—वि. १ दगडी; चिरेबंदी. २ वजनदार; जड; मजबूत. 'करार झालेया पेस्तर तुम्हांस संगीन जाईल.' –रा १५. १३६. 'संगीन कुच भरदार सजिव सजदार गुलगेन्द उसासले।' –प्रला ११३. ३ (ल.) यथास्थित; व्यवस्थित. 'मग सुखशयनी निद्रा पहुडी। कोण संगीन करीलजी।' –नव १७.१६३. 'संगीन ज्याचा सुरताल रे।' –प्रला १८०. 'भाग्य राजाचे संगीन।' –इपुत्रिपो ५. ४ (ल.) पूर्ण; जव्यत; साग्र. 'रजपुतास बन्दगीत आणून फौज संगीन तयार करविली.' –रा ६.५८९. 'त्यासंबंधीं साग्रसंगीन हकीकत सांग.' –कोकि ७०१. ५ एक सारखा; अखंड; सतत. 'झांगड नौबत वाजती दणादण भेर वाजे संगीन.' –ऐपो १०९. [सं. संग=दगड]

संगीन—स्त्री. बागनेट; बंदुकीच्या टोंकास लावलेलें तीक्ष्ण हत्यार; (इं.) बेयोनेट. 'संगीन खोंवूनी चाले।' –मराठ्यांची संग्रामगीतें १२८. [तुर्की. सुंगु=भाला; फा. संगीन]

सगुण—वि. १ रूपगुणसंपन्न; साकार; प्रत्यक्षानुभूत. निर्गुणाचे उलट. सत्त्व–रज–तमादि गुणयुक्त. २ सफल. 'परी ठेलियाहि सगुण जहालें। ऐसेंचि मानी।'–ज्ञा २.२७०. **०दर्शन**–न. प्रत्यक्ष दर्शन; साक्षाद्दर्शन. 'मनामाजि आलें सगुणदर्शन.'–रामदासी २.५९५. **०निवेदन**–न. सर्व कर्ता परमेश्वर आहे, आपला देह परमेश्वररूप आहे ही भावना. 'कर्ता राम मी नव्हे आपण। ऐसें सगुणनिवेदन।' –दा ६.७. **०ब्रह्म**–न. मायाब्रह्म; प्रकृतियुक्त पुरुष; केवल, निर्गुणब्रह्म नव्हे तें. **०रूप**–न. साकार व सावयव परमेश्वराची मूर्ति; देवतेची प्रतिमा, चित्र वगैरे. **०साक्षात्कार**–पु. देवतेचें प्रत्यक्ष साकाररूपांत दर्शन; प्रत्यक्ष दर्शन. याचे उलट निर्गुणसाक्षात्कार अथवा आत्मसाक्षात्कार–म्हणजे परमेश्वररूपाचें ज्ञान; सर्व विश्व ब्रह्मरूप आहे ही जाणीव; अंतर्ज्ञान. **०साक्षात्कारी**–वि. देवतेचें प्रत्यक्ष दर्शन झालेला. **सगुणोपासक**–वि. साकारदेवतेची, प्रतिमेची, मूर्तीची उपासना करणारा. **सगुणोपासना**–स्त्री. साकारदेवतेची भक्ति.

सगुणी, सगुणीकवडी, सगुण्या; सगा—स्त्री. स्त्री.पु. तळाशीं सपाट व पृष्ठभाग फुगीर व गोलाकार असलेली कवडी. ही समईत घातली असतां तेल कमी जळतें अशी समजूत आहे.

सगु(गू)न—पु (व.) शकुन पहा. [शकुन] **०घागर**–स्त्री. शकुनघागर.

संगू—पु. १ भिडू; गडी; सोबती; जोडीदार (खेळांतील). २ मित्र; सखा; प्रियकर. 'चातकपक्षी चाहाती जसे मेघांच्या बिंदूला। तशा त्या लक्षितात संगुला।' –प्रला २१५. –क्रिवि. (खेळांत) भिडूभिडू; जोडीनें; एकत्र [सं. संगम्] **०भंगू**–पुअव भिडू; सोबती; मित्र; संवगडी; जोडीदार. [संगू. द्वि.]

संगृहीत—धावि. जमविलेलें; सांठविलेलें; एकत्र केलेलें; रचलेलें, घेतलेलें [सं.]

सगोत्र—पु. एका गोत्रांतील; आप्त; नातेवाईक; एकाच पुरुषाचे वंशज. [सं. स+गोत्र=कुल]

संगोपणें—सक्रि. पालन करणें; जपणें; संभाळणें; पोसणें. 'जो सर्व क्षेत्रातें संगोपोनि असे।' –ज्ञा १३.८. [सं. सं+गुप्]

संगोपन—न. पालन; जोपासना; यथायोग्य सांभाळ; जपणूक. (–अप.) संगोपान, संगोपंगन. 'मधुरसोद्देशें। मधुकरी जचे जैसें। गृहसंगोपन तैसें। करी जो गा।' –ज्ञा १३.७८६. **संगोपित**–धावि. पालन केलेला. **संगोपिता**–पु. पालक; संर-

क्षक. 'अशा मज असाधुला इतर कोण संगोपिता।'–केका ९३.

सग्गड—स्त्री. (काशी) मोठी ढकलगाडी.

सग्गा—(खा.) सगा पहा.

संग्रह—पु. १ सांठा; संचय; जमाव; रास; ढीग. २ एकीकरण; ग्रथन; संघटण; समाहृति; एकत्र आणण्याची क्रिया. उदा० काव्यसंग्रह; लोकसंग्रह. ३ धरणें; घेणें; पकडणें. [सं. सम्+ग्रह] **संग्रहण**–न. जमविणें; संग्रह करण्याची क्रिया; सांठवण. **संग्रहणें**–अक्रि. जमविणें; गोळा करणें. 'क्रीडला तें मुनिनाथें। संग्रहिले अवधे।' –रास १.७. 'विद्यावंत ज्ञानी पंडित। ते संग्रहावे देऊन धन अमित।' –पांप्र ३७.७६. **संग्रही**–वि. १ संग्रह करणारा; सांठा करणारा; जमविणारा. २ लोभी; कृपण; द्रव्यास करणारा; आशाळभूत. **संग्रहीं असणें-राहणें**–१ जवळ असणें; ताब्यांत असणें; साठ्यांत असणें. २ पदरीं असणें; अवलंबून असणें; परिवारांत असणें. 'स्वल्पकाळींच संग्रहीं राहती' –दावि २५. **संग्रहीत**–धावि. सांठविलेलें; गोळा केलेलें; संचय केलेलें. **संग्राहक-संग्राही**–वि. संग्रह करणारा. **संग्राह्य**–वि. संग्रह करण्यास योग्य, इष्ट, शक्य.

संग्रहणी—स्त्री. हगवण; अतिसार; अतिशय रेच होणें; मलसंग्रहामुळें होणारा रोग. (अप.) **संग्रणी, संग्राणी**–[सं.]

सग्राम—पु. शिग्राम पहा. एक प्रकारची गाडी. 'येति खाशा बाया बसुन सग्राम मेणा।' –गापो ४१.

संग्राम—पु युद्ध; संगर; लढाई. 'झुंजाची आवडी धरती। परी संग्रामीं धीर नव्हती।' –ज्ञा १.१७३. [सं.] **०जित**–वि. युद्धांत जिंकला गेलेला; पराभूत; पराजित; लढाईत हरलेला. **०जित्**–वि. युद्धांत जिंकणारा; विजयी. 'परमप्रतापी। संग्रामजित्।'. [सं.] **०सौर**–वि. युद्धांत शूर; विजयी. 'गेले बहुत संग्रामीं। संग्राम सौरे।' –दा १.९.४७.

सग्री—वि. सगर पहा. (विणकाम). पोत कोणताहि, कांठ रेशमी पण त्यांत नक्शी नसुन पिंवळया अगर पांढऱ्या काड्या असतात असें वाण.

संघ—पु. समुदाय; समाज; समूह; जमाव (प्राणी अथवा वस्तूंची एकत्रित संख्या). [सं. सम्+हन्] **०जीवि**–वि. समाजावर जगणारा; मनुष्यसमुदायावर उपजीविका करणारा (भिक्षेकरी, हमाल, भाट, नट, कथेकरी, वगैरे अनुत्पादक धंदे करणाऱ्यांस संज्ञा). **संघट**–पु. समुदाय. 'मद मुखाचिया संघटा।' –ज्ञा ११.३९४. **संघशः**–क्रिवि. गटानें; समुदायानें; संघशक्तीनें; समूहामार्फत. **संघशक्ति**–स्त्री. ऐक्य; एकजुटीचें सामर्थ्य. 'त्यांची संघशक्ति कायम राहिली तर चळवळीस जोर मिळेल।' –टिले ३.३.२. **०सत्तावाद**–पु. सर्व वस्तुजात राष्ट्राच्या मालकीचें करणें हें तत्त्व. (इं.) कम्यूनिझम. **संघीकरण**–न. संग्रथन; संघटन; संयुक्तीकरण. हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांचा कारभार एकसूत्री धोरणानें चालविणें. –केसरी १४. ८.३६.

संघटण-टून-टन, (अप.) **संघष्टण, संघष्टन, संघृष्टन, संघटणें**—न. १ निकट संबंध; सलगीचें वर्तन. 'तुका म्हणे जिणें। भलें संत संघटणें।' 'आमचें त्याचें संघष्टण विशेष असेल नाहीं?' –भाबं ४. २ भेट; मीलन; एकत्र येणें; संयोग; जुळणी; स्पर्श. 'तुका म्हणे जरी अग्नि झाला साधु। तरी पडे बाधु संघष्टणें।' –तुगा ६५२. ३ घट्ट मिठी (मल्लांची कुस्ती-मध्यें, प्रियजनांची आलिंगनांत); भीड; विळखा; बिलगणें. ४ संघर्षण; घांसाघास. [सं. सम्+घट्] **संघटणें**–अक्रि. भिडणें; भेटणें; एकत्र येणें; बिलगणें. 'हृदयीं हालितल्या चरणें। बळें संघटे पादसंधीं।' –मुआदि ९.५१. "जैसी परिव्राजकाबरी। राजदासी संघटे।' –मुरंशु २३५. 'रथाजवळी रामरूप संघटले।' –रावि ३२.१२०. २ मावणें; सामावणें. 'हें देखोनि दुर्योधना। परमानंद न संघटे।' –मुआदि ३१.११६. **संघटना**–स्त्री. जमाव; जुळणी; एकत्रीकरण; संयोग. **संघट्ट**–पु. घर्षण. 'मंदरभ्रमणीं तरुसंघर्टे। वन्हि पेटला धडधडाटें।' –मुआदि ४.१०८.

सघन—वि.क्रिवि. दाट; घट्ट; गर्द; गच्च; निबिड. 'असो ऐसी सभा सघन। कलिंगा दृष्टीनें पाहोन।' –नव २०.९२. 'तैसें गगनीं असे सघन।' –दा १३.६.१८. [सं.]

संघर्ष, संघर्षण—पुन. १ घांसणी; घासाघास; घसट; घर्षण. २ (ल.) स्पर्धा; कलह; विरोध; झुंज. **संघर्षणें**–क्रि. १ घांसणें; चोळवटणें; खरडणें. २ झगडणें; झटापट करणें; भांडणें; स्पर्धा करणें; कलह, युद्ध करणें. **संघर्षित**–धावि. घांसाघीस केलेलें.

संघाट—पु. समूह; जमाव; थवा. 'चालती संघाट काटीयांचे।' –निगा ३२५. [सं. संघट्] **संघाटण**–न. संघटण पहा. युद्ध; द्वंद्व. 'काल बहुत श्रमला कृष्ण। वत्सेसीं करितां संघाटण।' –निगा १६. **संघाटी**–स्त्री. सांगड; युगुल.

संघात—पु. १ समुदाय; समूह; मेळ; जमाव. 'इतुक्यांत प्राप्त झाला मन्मथ। संगें वायु आणि दुसरा वसंत। ऐसा तिघांचा संघात।' –कथा १.४.११. २ नरकाचा एक भाग. ३ वध. [सं. सम्+हन्] **संघातक**–पु. (नृत्य) पांच करणांचा समूह.

संघारणी—स्त्री. झांपड; झडप; झांकणी. 'वरुणावरीं करी संघारणी।' –उषा ६९. [सं. सम्+हृ]

संघारणें—सक्रि. मारणें. 'संघारले दळभार।' –उषा १७. ४७. [सं. सम्+हृ]

संघ्राणी—स्त्री. संघ्रहणी पहा. हगवण.

सच—वि. सत्य; खरें. [सं. सत्य; हिं. सच]

संच—पु. १ साधन; सामुग्री; जोड; साहित्य; उपकरण संग्रह. २ संग्रह; सांठा; ढीग; रास. ३ आकार; बांधा; ठेवण. 'मग शरीरसंचु पार्था। अशेषहि सर्वथा।' –ज्ञा ६.१९८. ४ (ल.) मेळ; संगति; एकवाक्यता. 'बोलण्यांत कांहीं संच नाहीं.' [सं. संचय] **संचक**–वि. संग्रही; लोभी; कृपण. 'ना तरी उदासीनें दैवें। संचकाचीं वैभवें।' –ज्ञा ११.४१२. २ संचित कर्ते; सांठविणारे. 'ऐसे परमार्थु संचकु। जे नव्हेति आत्मवंचकु।' –ऋ १६.

सचकार—पु. १ विसार; बयाणा; आगाऊ घेतलेली रक्कम. २ वकिलाचा बयाणा. [सं. सत्यकार] **सचकारणें**–क्रि. स्वीकारणें.

सचकित—वि. आश्चर्यचकित; विस्मित; चकित. [स+चकित]

सचणी—स्त्री. १ (रत्ना. सावंतवाडी) कुळांस लागवड करण्यास उत्तेजन देण्याकरितां खोतानें द्यावयाची रक्कम. २ (कों.) गवत, गोवऱ्या, कवळ वगैरे गोळा करण्याची खोताकडून सुरुवात. [सं. संचयन]

संचणी—स्त्री. (कों.) जमीनीची तरमबंदी; साऱ्याचा टराव. [सं. संचयन]

संचणें—उक्रि. सांठणें; भरून राहणें; एकत्र होणें; जमा होणें. 'तोचि परमात्मा संचला। आधींचि आहे।' –ज्ञा ६.८४. 'सिद्धचि अंतरीं संचली। चतुर्विद्या प्रकारें।' –दा १.३.१३. [सं. सम्+ची] **संचय**–पु. सांठा; संग्रह; जमाव; रास; ढीग. 'हा कर्मसंचयो।' –ज्ञा १८.५१२. **संचयन**–न. सांठवणी; संग्रहण; जमवणूक. **संचयी**–वि. संग्रही; सांठा करणारा.

सचंतर-सचंत्र—वि. (अप.) स्वतंत्र; मुक्त; मोकळा. [सं. स्वतंत्र]

संचत-ती—स्त्री. (गो.) (अप.) संतति. [सं.संतति]

संचरणें—अक्रि. १ प्रवेश करणें; शिरणें; रिघाव करणें. २ भिजणें; मुरणें; आंत जाणें. 'कीं संचरलें हलाहल। हृदयीं वाटे दशरथा।'–रावि ४.५०. ३ व्यापणें; शिरून राहणें; भुताखेतादिकांचा शरीरांत प्रवेश होणें; अंगांत येणें. 'काम संचरलें नेणों देहीं।' –दावि ३४. 'ते योगनिद्रा न संचरे।' –विपू १.१०४. ४ संचार करणें; फिरणें. ५ चुकणें; भलतीकडे जाणें; स्खलन होणें; मार्ग भ्रष्ट होणें. [सं. सम्+चर] **संचरित**–धावि. शिरलेला; व्यापलेला; प्रवेश केलेला.

सचवटी—स्त्री. सचोटी पहा. प्रामाणिकपणा; नेकी.

संचळ, संचळखार—नपु. पादेलोण. [सं. सौवर्चल]

संचा—पु. सांचा; यंत्र.

सचाड—वि इच्छायुक्त; कामयुक्त; सकाम. 'कामिनी चरणांलागीं सचाडें।' –शिशु २९४. 'आणि सचाडाचिये परी।' –ज्ञा १३.५२४. [स+चाड]

संचार—पु. १ हिंडणें; फिरणें; भ्रमण; वापर. 'जेथें संचार राक्षसांचा।' –गुच २९.८. २ अंगांत येणें; भूतपिशाच्चादिकांनीं व्यापणें. 'भूतसंचार, विषयसंचार, वातसंचार.' 'भूतसमंधीं संचार अंगीं वसे।' –दा २.३.२४. 'देखा मंत्रजु बरळु जाय। मग तेथ का तैसा संचारु होय।' –ज्ञा १.१९०. ३ प्रवेश; रिघाव; गति. 'म्हणोनि वर्तता तेथ पापा। संचारु नाहीं।' –ज्ञा ३.८१. ४ दृगान्वय; स्खलन; दोष; विस्तार; विषयांतर. 'आत्मस्तुती होतां। संचार असे।' –ज्ञा १२.२१७. ५ पाठांतरांतील चूक; दोष (क्रि० जाणें). [सं. संचर्] **संचारणें**–उक्रि. प्रवेश करविणें; शिरकावणें; घुसविणें. –अक्रि. संचरणें पहा. **संचारलेखन**–न. मध्यस्थाकडून आपोआप केलेलें लेखन. (इं.) ऑटोमॅटिक राइटिंग. **संचारिका**–स्त्री. मध्यस्थ स्त्री; दूती. **संचारित**–धावि. गति दिलेलें; भ्रामित; व्यापिलेलें; घुसलेलें. **संचारी**–पु. (संगीत) चीजेचा तिसरा भाग. **संचारी वर्ण**–पु (संगीत). स्थायी, आरोही व अवरोही यांच्या मिश्रणानें झालेला वर्ण.

संचिणें—उक्रि. सांठणें; जमणें; गोळा होणें; एकत्र होणें. [सं. सं+ची] **संचित**–न. पूर्वजन्मार्जित पाप-पुण्य; एकंदर कर्मांचा सांठा; अदृष्ट; अपूर्व. 'संचित म्हणजे एकंदर कर्मांचा जो सांठा...' –गीर २६८. 'तिचीं ठकवुनी हरी संचितें।' –केका १०५. 'मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें।' –राम –धावि. सांचलेलें; सांठविलेलें. **संचितोदक**–न. सांचवणी; सांचलेलें पाणी. **संचेय**–वि. सांठविण्यास योग्य, शक्य, पात्र.

सचिंत—वि. चिंतायुक्त; काळजीनें व्याप्त; काळजींत असलेला. 'परम सचिंत द्विपंचवदनं।' –रावि

सचिल, सचील—न. सचैल स्नान. 'न फिटे केलया सचिल।' –गीता २.१५८९. –वि. (अप.) सचैल; सवस्त्र; अंगावरील वस्त्रासह (स्नान). [सं. स+चैल=वस्त्र]

सचिव—पु. १ प्रधान; मंत्री; सल्लागार. 'देती सुखा सचिव नीति' –मोवन १३.८६. २ अष्टप्रधानांतील एक अधिकारी; सुरनीस. ३ सहचर; सोबती; मित्र. [सं.]

संची—स्त्री. (प्र.) चंची; पानसुपारी ठेवण्याची कप्प्यांची विशिष्ट पिशवी.

सचून—न. रेशमाची एक जात.

सचेतन—न. चित्त; आत्मस्वरूप. 'सचेतनी बाणे पणें। देहासकट आटणें।' –ज्ञा १३.५०६. –वि. सजीव; जीवंत; चेतनायुक्त. 'लोहो करी सचेतन।' –ज्ञा १३.१३९. [सं.]

सचेल, सचैल—वि. पोषाख केलेला. –क्रिवि. अंगावरील वस्त्रासह; पोशाखासुद्धां. –न. सवस्त्र स्नान. 'मुख देखोन विरक्ताचें । सचैल करी ।' –ज्ञा १३.७०५. [सं. स+चैल]

सचेष्ट—वि. सजीव; जीवंत; चेतनायुक्त. [सं. स+चेष्टा]

सचोटी—स्त्री. प्रामाणिकपणा; इमान; नेकी; खरेपणा; चोखपणा. [सं. सत्य]

सच्चर्या—स्त्री. चांगली वर्तणूक, वागणूक. [सं. सत्+चर्या]

सच्चा—वि. खरा; प्रामाणिक; विश्वासु; खात्रीचा. [सं. सत्य; प्रा. सच्च; हिं. सच्चा]

सच्चिदंश—वि. प्राण्यांतील चेतना, बौद्धिक, तात्त्विक भाग; जीवांश. [सं. सत्+चित्+अंश]

सच्चिदानंद—पु. सर्व विश्वव्यापी पुरुष; त्रिकालीं असणारा; सत्यज्ञान व आनंदयुक्त परमेश्वररूप; ईश्वराचें निर्गुण रूप; परमात्मा. [सं. सत+चित्+आनंद]

सच्चिद्घन—पु. जीवात्मा. –वि. खऱ्या ज्ञानानें, बुद्धिनें, अस्तित्वानें परिपूर्ण. [सं. सत+चित्+घन]

सच्छिद्र—वि. छिद्रमय; भोंकें असलेलें. (इं.) पोरस. [सं. स+छिद्र]

सज—पु. १ साज; संच; सरंजाम; सामुग्री; समूह. 'झळकति सज जेथें गोठ हे सोनियांचे ।' –सारुह ८.७५. २ डौल; ढब; शोभा. उदा० सजदार, सजधज. [साज]

सज—क्रिवि. (अप.) सहज. 'अवो या चौघांच्या सज अनुमतें चालसि जयीं ।' –सारुह ७.१४८.

संज—वि. सज्ज पहा. 'देषा संज करीती रथ ।' –उषा २०.

सजगणी, सजगाणी—स्त्री. १ दुंडा पैसा; ढबू पैसा; सहा रुके. २ जमीनीचें एक प्रमाण, सहा रुके किंवा तीस बिघे. ३ कसबीण. –महिकावती बखर १२.

सजगुरा—पु बाजरी; एक धान्य. 'समर्थें सजगुऱ्याचें धोपट ।' –सप्र ८.१८. [का. छज्जे=बाजरी]

सज्जड—वि. मजबूत; घट्ट. [स+जड]

सजण-णा, सजन—पु. १ प्रियकर; सखा; वल्लभ; मित्र; प्यार; नायक. 'आईकतां गुण तुझे सजणा न धाले ।' –सारुह ५.९२: २ सोयरा; नातलग. 'सोयरा सजण हाच असावा ।' –सारुह ४.१०६. [सं. स्वजन] **सजणी-नी** स्त्री. १ सखी; मैत्रीण; विश्वासु स्त्री. २ नायिका; प्रिया; वल्लभा. 'तुवां सजणे हा समाचार घेतां ।' –र ५२. [सं. स्वजनी]

सजणी—स्त्री. तयारी; नट्टापट्टा; पोशाख वगैरे; थाट; विभूषण. [सजणें]

सजणें—अक्रि. १ तयार होणें; सज्ज होणें; सर्व सामुग्रीसह सिद्ध होणें; सर्व पोशाख वगैरे ठाकठीक करून असणें. 'सजली त्या द्यावया स्वसुताचाहि बली ।' –विक ६०. २ योग्य, व्यवस्थित, बरोबर, दुरुस्त होणें, असणें. ३ शोभणें; खुलणें; अलंकृत होणें; नटणें; शृंगारणें. 'कैवल्यहि तैसें न सजे ।' –ज्ञा १५.१३. 'असेल सजली यथारुचि तयीं स्वयोषा करें ।' –केका ३६. ४ अनुकूल होणें; जमणें; योग्य होणें. 'पदातु संघात तुझें सजेना ।' –सारुह १.२४. 'म्हणौनि केलें तें सजेना ।' –दा १२.२.६. वरील सर्व अर्थी सकर्मक रूपांतहि वापरतात. [सं. सज्ज] **सजदार**–वि. शोभिवंत; थाटामाटाचा; शृंगारलेला. 'स्वरूप सजदार लक्षतें येकचि नामी ।' –होला १२२. **सजविणें**–उक्रि. १ तयारी करणें. २ शृंगारणें. **सजाई, सजावट**–स्त्री. थाट; शृंगार; शोभा; व्यवस्था; रचना.

सजल-ळ—वि. पाण्यानें युक्त; जलयुक्त. 'जैसें चंद्रा आड आभाळ । सदट दाटे सजळ ।' –ज्ञा ८.२२९. [सं. स+जल]

सजल—स्त्री. १ व्यवस्था; रचना; जुळणी. (क्रि० करणें; लावणें; बसविणें; होणें; लागणें; बसणें). २ युक्ति; योजना; कल्पना; पद्धति. (क्रि० काढणें; योजणें; रचणें; पाडणें). [अर.]

सजहुमा—पु. एक अलंकार. 'सर्जे तोडर पांखरा सजहुमे कंडे पटे चांगले ।' –सारुह ३.४५.

सजा—पु. (विरू.) सज्जा पहा.

सजा-झा—स्त्री. शिक्षा; पारिपत्य; दंड; ताडन; कैद. (क्रि० देणें). 'ही गोष्ट लटकी जाली तरी पातशा मज सजा पोचविते.' –रा १५.४. [फा. सझा]

सजावार—क्रिवि. योग्य रीतीनें; पद्धतशीर. –मराचीथोरा ६४. [फा. सझावार] **सजावल**–पु. वसुल, तगादा करणारा; ढालाईत. 'प्रस्तुत नबाबाचे सजावल येऊन त्याची सुटका होईल तर करणें ।' –खरे १.४१९.

सजाइती-ईत—वि. किंमत न ठरवितां पसंत न झाल्यावर परत करण्याच्या बोलीनें आणलेला (जिन्नस); जांगड.

संजात—धावि. चांगला झालेला; उत्पन्न केलेला; प्रेरलेला. 'जे मी संजात ग्रंथलों देख । आचार्यें कीं ।' –ज्ञा १८.१७६९. [सं.]

सजाति-तीय—वि. एकाच जातीचा, प्रकारचा, तऱ्हेचा, कुलाचा, वंशाचा. [सं. स+जन्]

संजाप-फ-ब—पु. १ वस्त्राचा रंगीत कांठ; किनारी; मगजी; नक्षीदार पट्टी. 'संजाप सोडुनि पगडी बनारसी ।'

–अमृत १२३.७८. २ (ल.) शेंडीभोंवतालचा घेरा. ३ (ल.) पुरण न भरलेला पोळीचा, साटोरीचा कांठ. [फा. संजाफ] **संजाप(ब)दार-संजापी-फी-बी**–वि. १ कांठ असलेलें; किनारीदार. 'भर्जरी झूल हत्तीला संजाब्दार।' –होपो ६. २ घेरेदार. **संजाबी विडा**-पु. सभोंवती केळीच्या पानाचा घेर असणारा एक प्रकारचा दरबारी विडा.

सजायत-ती, सजायीत—संजाइती पहा.

सजावचें—सक्रि. (गो.) खात्री पटविणें. [सजविणें]

संजिद—वि. गंभीर; जड; वजनदार. [फा. संजीदा= वजनदार, जड] **संजिदगी**–स्त्री. गांभीर्य; वजन; दाब.

सजीखार—पु. (विरू.) सज्जीखार पहा.

सजीव—वि. जिवंत; सचेतन; सप्राण. [सं. स+जीव्] **०कोटी**–स्त्री. प्राणिवर्ग. **०ता**–स्त्री. टवटवी; तजेला; जीवंतपणा. –एभा ८.१७८.

संजीवन—न. १ पुनरुज्जीवन; मृताचें पुनरुत्थापन. २ मृतास जीवंत करण्याचें मंत्र, तंत्र, अमृत वगैरे साधन. ३ (ल.) पुन्हां ऊर्जीत दशेस आणणें. [सं. सम्+जीव्] **०विद्या**–स्त्री. मृत मनुष्यास जिवंत करण्याचा मंत्र, युक्ति. 'प्रेमाचा सन्मान होत नाहीं तेथें संजीवन विद्या नांदत नाहीं।' –विद्याहरण ४९. **०होणें**–सजीव होणें; जिवंत होणें; प्राणलाभ होणें. **संजीवनी**–स्त्री. १ मृतास जीवंत करण्याची विद्या, युक्ति, मंत्र. 'तुका म्हणे माझ्या विठोबाचे पाय। संजीवनी आहे हृदयामाजी।' –तुगा ८१०. २ मृतास जिवंत करण्याचा गुण असलेली एक वेल, औषधी; अमृतवल्ली. 'जरी परमाणू एवढें। संजीवनी मूळ जोडे।' –ज्ञा १८.८३६. ३ (सांकेतिक) अमृतवल्ली यावरून अमृतराव पेशवे यांस हा शब्द योजीत. 'संजीवनी व बायका (शिंद्यांच्या) एक आहेत।' –ख ५४५३. **०गुटिका**–स्त्री. बावडिंग, सुंठ वगैरेचें मिश्रण केलेलें एक औषध; गोळी. **०मणी**–पु. मृतास जिवंत करण्याचें सामर्थ्य असलेला एक काल्पनिक मणी, रत्न. **०मंत्र**–पु. मृतास जिवंत करण्याचें सामर्थ्य असलेला एक मंत्र. **संजीविनी**–स्त्री. संजीवनी.

संजुकता, संजुगता—वि. १ योग्य; व्यवस्थित; बरोबर; जुळणारा; शिस्तबार; पद्धतशीर (राज्य, संस्थान, कारभार). २ आटोपशीर; आटोक्यांतील; प्रमाणशीर; नेमस्त (काम, धंदा, व्यवसाय). [सं. सम्+युज्] **संजुगणें**–क्रि. (माण.) असेल त्यांत चालविणें; समाधान मानणें; प्रमाणांत, व्यवस्थित रीतीनें काम करून घेणें.

संजुगाई—स्त्री. एक ग्रामदेवता. 'वडजाई, वाघजाई, संजुगाई इत्यादि देवतांच्या बाबतींत...' –खेया.

संजुतपत्र—न. परस्पर विरुद्ध पक्षांत समेट झाल्याबद्दलचा लेख, कागद. [सं. सम्+युति]

संजुदा—वि. तयार; जय्यत; पूर्ण; सज्ज. 'परंतु माहाड जागा जाण्याचा शामल संजुदा व इंग्रेजाची मदत.' –पेद ३. १२८. [सं. सम्+युज्] **संजूद**–वि. सज्ज; तयार. 'सिलेभार संजूद ते राउतांचे।' –राक १.२.१५.

संजोक-ग—पु. सांठा; संचय; संच. [सं. संयोग]

संजोगणी—स्त्री. १ तयारी; तरतूद; जोडणी; पुरवठा; पर्याप्ति; संचय; सिद्धता; सामुग्री. २ संपादणी. 'आतां असो हे संजोगणी। प्रभावतीसी सांगे हरिणी।' –कथा १.७.२३२. [सं. सम्+युज्] **संजोगणें**–उक्रि. सिद्ध करणें; सज्ज करणें; तयारी; तरतूद करणें. 'पाखरिले वारू रथ। संजोगिले गुढरीले हस्ती।' –आद्य मराठी कवियीत्री–उ ४८.२. 'ते वेळीं रथ संजोगिला। अक्रूर मथुरेबाहेर निघाला।' –कथा ४.६.६५. 'रथ शिबिका संजोगून। तत्क्षणीं निघाले।' –भारा किष्किंधा ८.९६. –अक्रि. १ संपादणें; पुरवून घेणें; पुरवठ्यास येणें. २ (बा.) सुप्रणपणानें करणें; टापटीपीनें वस्तु पुरवठ्यास आणणें. **संजोगी**–पु. यतिधर्म न पाळणारा साधु; घरभारी गोसावी.

संजोग—पु. परिस्थिति; बनाव; घटना. 'अशा संजोगांत शहरचा बंदोबस्त पोलिसांकडून होणें शक्य नाहीं.' –नानासाहेब शिंदे यांचें आत्मवृत्त २६७.

संजोडा—वि. जोडलेला; जुंपलेला. 'चतुरंगा परिवारा। संजोडिया रहंवरा।' –ज्ञा ११.३९७.

सज्ज, सज्जित, सज्य—वि. १ तयार; सिद्ध; तत्पर; शृंगारलेला; भूषविलेला; सजविलेला; साधनयुक्त; पोषाख केलेला. 'आयताही व्यापारीं। सज्ज न होय।' –ज्ञा १३.१११७. २ जोडलेला; जोडून तयार (रथ, धनुष्य, वगैरे). [सं. षस्ज्–जाणें] **सज्जणें**–उक्रि. १ सज्ज करणें; तयार करणें, होणें. 'बलें सज्जतां अंगतेज। निस्तेज झालें ते काळीं।' –मुआदि ४१.५२. २ जोडणें; सिद्ध करणें. 'भ्रूचाप सज्जूनि आकर्ण।' –मुआदि ४.१३७. **सज्जात**–स्त्री. तयारी; साज; शोभा; पोषाख; साधनसामुग्री.

सज्जदनिशीन—वि. गादीवरील; मठाधिपति; खानकामधील व्यवस्थापक. –धका ८२.

सज्जन—पु. १ शीलवान्, सात्त्विक, गुणी मनुष्य. 'आतां नमूं संत सज्जन' –शनि २ सखा; मित्र. 'तूं माझा सज्जन मी तुझी सांगाती।' –ब ५२५. ३ रामदास; समर्थ. 'हें असो नाशिकीं असतां सज्जन।' –दावि ८२. [सं. सत+जन] **०गिरि**–पु. सज्जनगड; परळीचा किल्ला. 'सज्जन गिरिवरि मोक्ष प्रदानी।' –स ६.९.

सज्जा—पु. १ घराच्या सर्वांत वरील मजल्यावर केलेली हवाशीर खोली, बंदिस्त जागा; चंद्रशाला. २ खिडकीपुढें काढलेली उघडी जागा; गॅलरी. ३ नाटकगृहांतील दुसऱ्या मजल्यावरील कठड्याजवळील जागा; गॅलरी. ४ लागवडीखालीं असलेल्या शेतजमीनीचा लांबलचक पट्टा. ५ जकातीकरितां पाडलेले प्रांत, विभाग उदा० पुणें सज्जा; नगर सज्जा. [हिं. छज्जा. सं. छाया ?]

सज्जाखार, सज्जीखार—पु. एक प्रकारचा क्षार; सिंधुकर्बनत्रित; एक अलकली; टांकणखार. [सं. सजिकाक्षार; प्रा. सज्जिआखार; हिं. साजीखार]

सज्जाद—पु. १ मुसलमानांचा प्रार्थनेकरितां बसावयाचा गालिचा, चटई. २ गादीवर बसणारा हक्कदार. –आदिलशाही फर्मानें. [अर. सज्जादह्]

सज्जुरा—पु. बाजरी; सजगुरा पहा. ' कोणी घोडीं सज्जुऱ्यांत सोडून चारीत बसले. ' –भाव १२५.

सट—स्त्री. १ शुद्ध व वद्य पक्षांतील सहावा दिवस; षष्ठी. (व.) विशेषतः मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी हा खंडोबाचा दिवस; चंपाषष्ठी. २ एक देवता; सटी; दुर्गा देवता. ३ या देवतेची उपासना, पूजा. ४ षष्ठिपूजा. ही बाळंतिणीच्या सहाव्या दिवशीं करतात. [सं. षष्ठी] **सटवणी**–न. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी अथवा चंपाषष्ठीच्या सुमारास पडणारा पाऊस. **सटवणें, सटावणें**–अक्रि १ षष्ठी देवतेची बाधा होणें; मूल जन्मल्यापासून सहाव्या दिवशीं मृत होणें, अगर, आजारी पडून त्या योगानें पुढें मरणें. ' अहारे अर्जुना सटवलें बाळा. ' –ह ३६.१३३. २ (ल.) नाश पावणें; क्षय पावणें. ' गुरु भक्ति ते सटवली । एकाएकीं । ' –दा ५.२.६०. ३ गर्भपात होणें; नासावणें. ' बंध्यागर्भ सटवे संपूर्ण । तैं जन्ममरण मुक्तांसि । ' –एभा २२.४०८. **सटवला**–वि. सटवीनें मारलेला; जन्माच्या सहाव्या दिवशीं मेलेला, बाधा झालेला. ' सटवल्याचें बारसें । कोणी न करितीचि उल्हासें । ' –एभा २८.११४. **सटवा**–वि. वाईट. **सटवाई, सटवी**–स्त्री. १ षष्ठी देवता; सटी; एक क्षुद्रदेवता; ही लहान मुलांस उपद्रव देते. हिची मूल जन्मल्यानंतर सहावे दिवशीं पूजा करतात. ' येक म्हणती सटवाई । ' –दा १३.८.१२. ' तेवींचि सटवीचिये रातीं । न विसंबिजे जेवीं वाती । ' –ज्ञा १८.८३७. २ (ल.) कुटाळ, दुष्ट स्त्री; एक स्त्रियांस उद्देशून वापरावयाचा अपशब्द. ' माझ्या पार्यीं कांग म्हणून सटवे ? ' –बावं २.२. ३ (ल.) (व.) सटवीची बाधा. **सटवीचीं अक्षरें, सटवीचें लिहिणें**–नभव. ब्रह्मलिखित; सटवीनें मुलाच्या कपाळावर लिहिलेला लेख; प्रारब्ध. **सटवीपूजन**–पु. षष्ठी देवतेचें मुलाच्या सहाव्या दिवशीं करावयाचें पूजन. **सटवामद्दारी**–पु. अर्धवट, बावळट मनुष्य. **सटावणी, सटावणें**–सटवणी–णें पहा. **सटी**–स्त्री. सट पहा. षष्ठी देवता. ' आणी वाचून जाते सटी । ' –दा १०.६.३४.

सटक—स्त्री. सुताची दोरी. –चित्र्याची माहिती २३.

सट–कण–कन–कर–दिनीं–दिशीं—क्रिवि. १ त्वरेनें; एकदम; झटकन; पटकन. २ फळांतून बी उडते त्याप्रमाणें आवाज करून. [ध्व.]

सटकणें—अक्रि. झपाट्यानें बाजूला होणें; चटकन दूर होणें; निसटणें; सुरुवात करून मधूनच नाहींसें होणें; वचनांतून मुक्त होणें. [ध्व. सट्] **सटकपावली**–स्त्री. झटकन् निघणें, चालूं लागणें, निसटून जाणें. (क्रि० करणें).

सटका—पु. १ झटका; हिसका. (क्रि० मारणें; देणें; बसणें). २ जोराचा धक्का, फटका, तडाखा. ३ (बडोदें) चित्र्याच्या कंबरपट्ट्यास बांधलेली दोरी. –चित्र्याची माहिती ३२.

सटकावणें—सक्रि. झटकणें; ठोकणें; खरडपट्टी काढणें.

सटक्यासटक्या—वि. क्षुल्लक, कफल्लक (मनुष्य); असा तसा; कोणी तरी. ' अग हा सटक्या बटक्या लटक्याच गोष्टी करी । भात भुजाया खापर मिळेना पहा तयाच्या घरीं । ' –पला ११.२५.

संटणें—उक्रि. मावणें; सांठणें; सांठविणें; आवरणें. ' ऐकोनि रेभेच्या वचना । हर्ष न संटे शक्रमना ' –मुरंशु १. ' देहबुद्धीची अर्गळा । स्वरूपीं न संटे । ' –अमृ ८.४.

सटपट, सटफट—स्त्री. जळफळाट; जोराची शिव्याबाजी; खरडपट्टी. **सटपट–टां, सटफट–टा**–क्रिवि. झटपट; जलदीनें; लवकर; गडबडीनें. (क्रि० करणें; बोलणें). [ध्व–सट+फट] **सटपट्या–फट्या**–वि. जोरजोरानें, मोठ्मोठ्यानें तावातावानें शिवीगाळ करणारा.

सटबट—स्त्री. (व.) खटपट; व्यापार; उद्योग. ' कांहीं तरी सटबट चालू असते. ' [ध्व.]

सटर—न. धोटा. (इं.) शटल.

सटरफटर—न. किरकोळ; बारिकसारिक; राहिलें साहिलेलें; लहान जिन्नस, वस्तु, सामान.

सटल–ली—स्त्री. १ सटकणें; झुकांडी; झटकन निघून जाणें; वचन किंवा करारांतून निसटणें. (क्रि० खाणें). २ सत्यापासून ढळणें; थाप्पा; बाता; गप्पा. (क्रि० मारणें; हांकणें.) ३ (व.) हयगय. ' जरा सटली केली कीं काम बिघडलें. ' **सटली–ल्या**–वि. १ निसटणारा; झटकणारा. २ सत्यापासून ढळणारा; थापाड्या.

सटसट–टां, सटाटां, सटासट—क्रिवि. १ झटपट; जलदीनें. २ पावसाच्या वगैरे आवाजासारखा आवाज करून. [ध्व.]

सटसटीत—वि. फळफळीत; रुक्ष; फडफडीत; टणक; कडक (भात, डाळ वगैरे).

सटा—स्त्रीअव. केसांचे सड; जटा; घोडयाची आयाळ. 'नृसिंहाच्या दीर्घा पिंवळट सटा पिंगट पिशा.' –नृहरिदर्पण. 'वर्णाया योग्य कशा होती जयाच्या सटा सुराभ्रांस कशा।' –मोकृष्ण ३७.२.

सटारणा, सटारा—वि. अवाढव्य; अचाट; भव्य; प्रचंड; विशाल; मोठा.

सटालणें—अक्रि. निसटणें; झटकणें.

सटाली-ल्या—सटली-ल्या पहा.

सटी—स्त्री. सट, सटवी पहा. 'ब्रह्मा लिहितो अदृष्टीं। आणि वाचून जाते सटी।' –दा १०.६.३४.

सटीक—वि. व्याख्येसहित; टीका, भाष्य, व्याख्या, विवरण जोडलेलें. [स+टीका]

सटीप—वि. टीपा जोडलेलें.

सटीसामाशीं—क्रिवि. १ कधीं तरी; केव्हां तरी. २ प्रसंगानें; क्वचित् प्रसंगीं. [सं. षष्ठ+षण्मास]

सटीसावत्र—न. मत्सर; हेवा; द्वेष (विशेषतः स्त्रियांचा) [सटी+सापत्न]

सटेगोपाळ—पु. लबाड; धूर्त; फसव्या; केव्हांहि हातावर तुरी देऊन निसटून जाणारा. [सं. शठ+गोपाळ] **सटेगोपाळी**–स्त्री. लबाडी; दगलबाजी; फसवणूक.

सटेल—न. (विणकाम) घोटा. (इं.) शटल.

सटोल—वि. अडमुठा; आडदांड. [शठ]

सट्टक—स्त्री. (व.) खरडपट्टी; तासडपट्टी. [सटकणी]

सट्टक—पु. एक नाटिकेचा प्रकार. 'जो नाटिका समानचि सट्टक बहुधा तयास बुध म्हणती।' –कर्पूरमंजरी १.५.

सट्टल-ली—स्त्री. सटल पहा.

सट्टा—पु. १ सौदा; व्यवहार; विनिमय. २ जोखमीचा व्यापार, व्यवहार; पुढें मालाची किंमत चढेल किंवा उतरेल याचा अंदाज बांधून आगाऊ केलेला व्यवहार. ३ मक्ता; कंत्राट; ठेका. [देप्रा. सट्ट=विनिमय; हिं. सट्टा] **सट्टाबट्टा**–पु. व्यापारी व्यवहार; देवघेव; विनिमय; अदलाबदल; सराफी. **सट्टेबाजी**–स्त्री. सट्टा करण्याचा नाद, खोड, व्यसन. **सट्टी**–स्त्री. (व.) वशिला; शिफारस; संधान. 'त्यानें कोणीकडून सट्टी लावली कळलें नाहीं पण नोकरी मात्र शानदार पटकावली.'

सट्टूबट्टू—पुअव. (तिरस्कारार्थी) स्नेहीमंडळ; स्नेही-सोबती; मित्र. [सं. बटु द्वि.]

संटया—पु. (ना.) सडा; निःसंग.

सट्टयागट्टया—पु. (ना.) चीजवस्त; पसारा. 'त्यानें सट्टयागट्टया गुंडाळला व पळून गेला.'

सठ—स्त्री. सट पहा. [सं. षष्ठी] **सठवणें, सठावणें, सठळणें, सठवाई, सठवी, सठवीपूजन**–सटवणें, सटवाई वगैरे पहा.

सठवा—पु. (गु.) साठ दिवसांत तयार होणारा, गुजराथमधील एक ज्वारीचा प्रकार. –केसरी १३.१०.३६.

सठी—स्त्री. सट पहा. **सठीसामाशीं**–सटीसामाशी पहा.

सठी—स्त्री. कचोरा.

सड—पु. १ धस; ठोंब; खुंट; ज्वारी वगैरे कापल्यानंतर शेतांत राहणारा बुडखा, खुंटारा, धसाडी, शल्य. २ (ल.) (अश्लील) जननेंद्रिय; (बैल किंवा रेडा यांचें) लिंग. ३ (ल.) आंचळ; स्तन; आसड; थान. ४ (डुकराचा किंवा इतर प्राण्याचा) राठ केस. **सड आवळणें**–शेळीचे स्तन कोंकरानें दूध पिऊं नये म्हणून बांधून ठेवणें.

सड—स्त्री. १ पद्धत; तऱ्हा; वहिवाट; रूढ गोष्ट. (क्रि० येणें; चालत येणें; चालणें; पडणें.) 'ही सड कारकुनांनीं मुसलमान ग्रंथकारांपासुन घेतली आहे.' –विवि. १८९६. ८.१४८. २ साक्षीदाराची तोंडी अगर लेखी जबानी; पुरावा; दस्तऐवज; कागदपत्र; जुना पुरावा. 'कसबे पैठण येथील सड आली.' –बाडसमारो ६.३२५. ३ (कु.) खोबण; खांच; खचरा; कातरा; खाप. [फा.]

सड—स्त्री. तांदुळ कांडण्याची क्रिया. [सडणें]

सड—वि. सडा; बोजा नसलेला. 'भाऊचे घोडे सडबेधड गारदी पुढें बिनी धरती।' –ऐपो १८४.

सडक—स्त्री. १ रस्ता; तयार केलेला रस्ता. २ दोर; लांब व जाड दोर (गाडीवर ओझें वगैरे बांधण्याचा); मोजण्याचा, पाणी शेंदण्याचा लांब दोर; सखलादीची पट्टी. ३ जुगदान, बटवा, वगैरेस लावलेली दोरी. ४ रेशमी गोप; रेशमी गोंड्यासकट दोरी (तरवार, खंजीर वगैरेस लावलेली, पागोट्याची बिरीद) चवरी. 'ढळतु फरारे पताका। मिळतु चवरें सडका।' –शिशु १०१७. 'कलाबतूच्या सडका' –पुरवणी ऐरापुप्र ९.५०५. ५ लांब व सरळ तरवार. 'चाळीस हजार सडक करनाटकची चमकती।' –ऐपो १०७. 'सडका पाश भिंडिमाळा थोर। घेऊन पुढें धांवती।' –ह २२.३१. ६ (ल.) उंच, सडपातळ मनुष्य. ७ पदराच्या दशा. 'चोखाळपणें झळकती। पालव सडका।' –ह्रा १.९. ८ केसांच्या जडा, बटा; केसांचीं वेणी. 'धन नाहीं करीं अडका। जरेनें कच होतील सडका।' –राला ११५.९९. 'सडकेला कलगीवर जडल्या तारा।' –होला ८१.११९.–वि. १ सरळ; थेट; सौधा (रस्ता; पंक्ति; रांग; ओळ). २ ताठ, उभा (मनुष्य, झाड,

स्तम्भ). ३ धोपट; उघडउघड; स्पष्ट; खणखणीत; रास्त (उत्तर, आरोप; शिवी वगैरे). ४–विक्रिवि. बेधडक; एकदम; धडाक्यानें; बेपर्वाईनें; मुद्दाम; धूम; (पिणें; सेवन करणें; जुगार खेळणें वगैरे व्यसनासारख्या गोष्टी करणें). [सं. सरल=सरळ] **म्हo** लालाभाई चुरमा आणि शेटजी सडक. **साती सडका**–सर्व जरूर त्या गोष्टी, सर्व गोष्टी. 'साती सडका मक्ता केला.' **सडकपातळ**–वि. सडंपातळ; सडसडीत.

सडकणी—स्त्री. जोरजोरानें चोप देणें; मारणें; दणकावणी; धपकावणी; घाव घालणें; कुटणें (धान्य वगैरे). [सडकणें]

सडकणें—उक्रि. १ गारा, पावसाचे मोठे थेंब, खडे वगैरेनीं मारणें. २ दोरी, छडी वगैरेनीं ताडण करणें. ३ लाथ, दुगाणी वगैरे झाडणें. ४ लांकूड, दगड वगैरे साफ न करतां सुमाराचा आकार येईल असें कुऱ्हाड किंवा सुतकी वगैरेनीं सरासरी तासणें. ५ धुवावयाचें वस्त्र दगडावर जोरजोरानें आपटणें. ६ मळ, कीट निघून जावें म्हणून धातूचा तुकडा ऐरणीवर घणानें जोरानें ठोकणें. ७ सरासरी बारीक अंश वेगळा होई असें मोठ्यानें पाखडणें, उभळणें. सामान्यतः कोणतीहि गोष्ट सरासरी घाईघाईनें जोरजोरानें, निष्काळजीपणानें करणें. [ध्व?]

सडकणें—अक्रि. निसटणें; पळ काढणें; पळून जाणें; नाहींसें होणें. सटकणें पहा.

सडका—पु. (पावसाच्या मोठ्या सरीचा होणारा) सड्‌सड् असा आवाज. [ध्व.]

सडका—वि. नासका; कुजका; सडलेला; बिघडलेला. [सडणें] **सडका पाय**–पु. सडलेला, बिघडलेला पाय. ज्यामुळें सर्व पदार्थ नासण्याचा, बिघडण्याचा संभव असतो असा वेगळा काढलेला त्याचा सडलेला, बिघडलेला भाग. (क्रि० ठेवणें; राखणें; राहाणें; तोडणें; काढणें; कापून टाकणें). **सडका बोंबील**–सडेल बोंबील पहा.

सडकाशी—स्त्री जमीनीच्या मशागतीचा एक प्रकार. –केसरी ४.१२.३६. [सड+काशी, काशा?]

सडकीव—वि. अर्धवट, साधारण सरासरी घडलेला (दगड; दगडकाम, लाकूड, लाकूडकाम). 'कमानीचे दर्शनी दगड सडकीव असावे.' –मॅरट ८१४. **सडकीव जोतें**–न. टाकी न लाविलेल्या, माठीव नसलेल्या दगडांचें जोतें.

सडकून—क्रिवि. रगडून; सपाटून, अतिशय, पुष्कळ. हें अव्यय क्रियापदाबरोबर जोर, तीव्रता, आवेश, अतिशयता, वगैरे दाखविण्याकरितां जोडतात. याच अर्थी कचकावून, कचकून, खसाटून, दपडून, रपाटून वगैरे अव्ययेंहि जोडण्याचा प्रघात आहे. [सडकणें]

सडकोळा—वि. (राजा. कों) काटकोळा; रोडका; कृश.

सडगर—पु. (कर.) कष्ट; श्रम; त्रास. 'किती करावेत तुझे सडगर?'

सडगल—स्त्री. नवे लावणीची पानवेल.

सडगळ—वि.पु (व.) मोठाधाटा.

सडगा—पु. सोटा; टोणपा; सोडगा; काठी. [सोडगा अल्पार्थी]

सडगाण—स्त्री. (ना.) सडा. 'आंबराईंत कालच्या वादळानें आंब्यांची सडगाण पडली होती.' [सडघाण?]

सडघाण—स्त्री. सडलेली, नासकी, कुजकी स्थिति. (अन्न, फळें, वस्तू वगैरेंची). [सडणें+घाण]

सडण—न. १ कांडण; कुटणें; मुसळानें घाव घालणें. २ कांडण्यासाठीं, घाव घालण्यासाठीं घेतलेलें धान्य (तांदूळ, डाळ, वऱ्या इ०). [सडणें] **सडणावळ**–स्त्री. सडण्याची, कांडण्याची मजूरी, मोल. **सडणी**–स्त्री. कांडण; कुटण्याची क्रिया. **सडणें**–उक्रि. धान्यावरील तूस, फोलकट, कोंडा वगैरे काढून टाकण्यासाठीं, कांडणें, कुटणें, मुसळ वगैरेनें घाव घालणें. [सं. सद्]

सडणें—अक्रि. कुजणें; नासणें; बिघडणें; खराब होणें. [सं. शद्; प्रा. सड; हिं. गु. सडना]

संडणें—सक्रि. सोडणें; टाकणें; त्याग करणें. 'अद्यापि वेधली पृथ्वी। न संडी गंधु हे।' –ऋ २२. 'परी नेणिवेर्तें नसंडिसी।' –ज्ञा २.१०.३०. [सांडणें]

सडताळा—पु. दोर; काढणी; सडक. –चित्र्याची माहीती २२.

सडधोपट—क्रिवि. (विरू.) सरधोपट पहा.

संडपडणें—अक्रि. (व.) लट्ट होणें. –वशाप ८.५१.२४५.

सडपातळ, सडंबला—वि. किरकोळ अंगाचा; काटकोळा; रोडका; कृश.

सडमिसळ—वि. (विरू) सरमिसळ पहा.

सडशिंग—पु. सडा मनुष्य; फटिंग; सडेसोट; अविवाहित मनुष्याबद्दल विनोदानें योजतात.

सडसंड-डा—क्रिवि. पावसाच्या आवाजाप्रमाणें आवाज करून (छडी वगैरेनीं मारणें, झोडणें). [ध्व]

सडसडणें—अक्रि. सडसड आवाज करून पडणें; तडतडा मारणें, झोडणें. [ध्व.]

सडसडीत—वि. १ फडफडीत; रुक्ष; मोकळा व फळफळीत (भात वगैरे). २ उंच व सडपातळ; अंगासरसा व पीळदार (मनुष्य); सरळ व न विस्तारलेला म्हणून दिसावयास चांगला (वृक्ष);

सडसाक्ष-क्षी—स्त्री. लेखी किंवा तोंडी पुरावा; दस्तऐवज; दाखले, प्रतिज्ञालेख, जबान्या, वगैरेस व्यापक संज्ञा. सड पहा. [सड+साक्षी]

सडा—पु. १ शेणमाती, रंग वगैरेचा दाट वर्षाव. (क्रि० घालणें; टाकणें; देणें; शिंपणें). 'घोसाळा कांकणाचा हातीं। नारी सडे घालीताती।'–शिशु ५९०. 'सदा सडे समार्जनें। घरीं तुळशीचीं वृंदावनें।'–कथा २.४.१२२. 'करुनि सडा संमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षी'–घनश्यामाची भूपाळी. २ (ल.) पखरण; विखरण; उधळणी (फुलें, फळें, रुपये, नाणीं वगैरेची–देवतेवर, माणसांच्वा गर्दीत वगैरे). 'जो ग्रंथ हातीं घ्यावा त्याच्या पृष्ठो पृष्ठीं हा सडा सांपडेल'–नि ७९२. 'दिव्य सुमनांचा सडा तो विराजे चहूंकडा।'–भारा बाल ११.२९१. 'होता सडा फुलांचा पडला।'–विक १००. ३ शेणसडा. **सडासंमार्जन, सडासारवण**–न. केर काढणें, सडा टाकणें वगैरे; झाडसारव; झाडलोट; सकाळचें शुद्धीचें काम.

सडा—पु. डोंगरपठार; डोंगरसपाटी; डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन. 'तालुकियांत सडा आहे त्ये जागा बाहेरून माती आणून ...'–वाडसमारो ६.२४६. 'सडे पठारीं राहिले स्वस्थ।'–दावि ६२.३५.

सडा—पु. नाडा; रस्सी; वळलेली सुताची दोरी; सुतळी. 'मी वावडी तूं एक सडा नको मारूं आढा'–सला २. 'वावडीला जसा सडा मागें खेंचीत असतो...'–सासं २.४१८. **सडया**–पु. (कों.) पाणी काढण्याची दोरी.

सडा—वि. एकटा; मोकळा; वेगळा; स्वतंत्र; कांहीं एक मागें ब्याद नसलेला; फटिंग; रिकामा; कामांत न गुंतलेला; उपयोगांत नसलेला; ओझें नसलेला; भाडयानें न दिलेला (गाडा, जनावर वगैरे). 'आंत कानडा लोक फाकडा, शिपाई सडे तलवार'–ऐघे १८३. ०**कारभार**–पु. मोकळा, सरळ, उघड व्यवहार; बिन घोटाळयाचा व्यवसाय, धंदा; धोपट मार्गी काम, देवघेव, व्यवहार वगैरे. ०**धस**–वि.पु. १ धसकनंदन; धसकटराव; एकदम पुढें घुसणारा, अविचारी, उतावीळ (मनुष्य). २ सडा फटिंग; सडेसोट; आगापिच्छा नसलेला; मागें कोणताहि व्याप, घरबंद नसलेला (मनुष्य). ०**फटिंग**–पु. बायकापोरें, लागाबांधा, इ०. कांहींएक व्याप, पाश नसलेल्या मनुष्यास विनोदानें म्हणतात. ०**फोक**–वि. सरळ व तरतरित; सडपातळ व देखणा; अंगासरसा व नीटस (मनुष्य). ०**मफलीस**–वि. अविवाहित, एकटा व गरीबींतील मनुष्य; काबाडकष्ट करून एकटा राहणारा. [सडा+अर. मफलीस=गरीब] ०**साटा-साट्टा-साठ-सोट**–वि. १ निःसंग; बायकापोरें नसलेला; एकटा. २ फांद्या नसलेला (वृक्ष). **सडी**–स्त्री. १ एकटी. 'मोठे श्रीमंत बाईसाहेब सडी पाहिली।'–ऐपो ११५. **सडी आयती**–स्त्री. निःसंगपणा; संगराहित्य. 'ऐसा शरिरास संभोगाचिये राती। माजीं धांवतां सडिया आयती। तंव कर्मक्षयाची पाहाती। पाहांट जाली।'–ज्ञा ७.१३०. **सडी फौज**–स्त्री. तोफखाना, बुणगें वगैरे लटांबर बरोबर नसलेली, लढाईच्या तयारीनें निघालेली फौज; हलकीं हत्यारें घेऊन जाणारी फौज. **सडी बायको**–स्त्री. मूल नसलेली स्त्री; अंगावरील मूल नसलेली स्त्री. **सडीसांड-साट-सांट**–स्त्री. १ मूल नसलेली स्त्री; वांझ स्त्री. 'सडीसाट नयन किती वाट पहाति घनदाट अजुनि तरि हाट धरूनि शिघचढेल'–राला ६७.५७.२ एकटी स्त्री; जिला कोणी नातेवाईक नाहीं अशी स्त्री. **सडीसाक्ष**–क्षी–स्त्री. मुखजबानीचा पुरावा. सडसाक्ष पहा. 'वाद्याकडे चालविल्यास सडीसाक्ष पडणार नाहीं.'–वाडबाबा २.३६. **सडीस्वारी-सडेस्वारी**–स्त्री. बरोबर लवाजमा न घेतां निघालेली स्वारी. 'केलें सैन्य तयार सडीस्वारी संगें घेऊन।'–ऐपो ४४५. 'फौजेंत केली ताकीद सडेस्वारीला।'–ऐपो २८३. **सडेलडधु, सडेसांठ-ट**–वि. सडासोट; फटिंग; अविवाहित; स्त्रीपुत्रादि परिवार नसेलला. **सडेसोट**–पु. सडासोट; एकटा; फटिंग. **सडेसोट पणा**–पु. बेमुर्वतखोरपणा; रोखठोकपणा. **सडेहुंपट-हुप्पा**–पु. १ ज्यांत मादी व पिलें नसतात अशा वानरांच्या टोळीचा मुख्य, नायक. २ अविवाहित मंडळींतला; ब्रह्मचारी.

संडा—वि. उंच व बळकट; धिप्पाड; दांडगा.

सडाई—स्त्री. सडणावळ; कांडणावळ.

सडाका—पु. सडसड आवाज होई असा दोरी वगैरेचा फटकारा; पाऊस वगैरेचा वर्षाव, तडाका, छिडकाव. [ध्व.]

सडाडां, सडसड-डां—क्रिवि. सडसड असा आवाज करून (पाऊस, छडी, चाबूक यांच्याप्रमाणें). [ध्व.]

संडास—पु. पायखाना. शौचकूप; शेतखाना. [हिं. सं.]

सडिव—वि. सडिक; कांडलेलें; कुटलेलें. 'नानापरीच्या आवडी। सडिवा सोलिवा परवडी।'–एभा २५.३७४.

सडिवा—पु. विकार; रोग; सडी पहा. 'विषयांचे या पायारवां। सर्वें लागे शृंगाराचा सडिवा।'–भाए १८०. [सडणें]

सडी—स्त्री. १ मनुष्य व पशू यांस होणारा एक रोग; क्षय. २ जखमेवर माशा बसुन टाकतात तो पांढरा निर्यास; असडी. [सडणें]

सडी—स्त्री. बांबूचें कुसळ; धसडी; खुंट. सड पहा.

सडी—स्त्री. पुराव्याकरितां घेतलेली लेखी किंवा तोंडी जबानी. सड पहा. 'प्रथकोंकारें सडया लिहून घेतल्या.'–वाडसमारो ७.२०४. ०**पत्र**–न. दाखला; साक्षीपत्र. 'दाखला लेहून आणलें तें सडीपत्र.'–भाअ १८३४.

सडी—स्त्री. (कों.) (खडसा व रुमणी यांत बसविलेलें.) इसाड घट्ट राहण्याकरितां इसाडा बरोबर खालच्या बाजूनें मारलेली खुंटी.

सडीक—वि. १ कांडलेले; सडलेले (तांदूळ, डाळ वगैरे). २ गोवारीची जात. –कृषि ६१४. कांडलेल्या बियांपासून उप्पन्न

झालेल्या गोवारीच्या शेंगा (या लवकर शिजतात). ३ सालासुद्धां शिजणारी (वालपापडी, मेहंदळ वगैरेची शेंग). ४ भीड, मुरवत ठेवण्याकरितां पडदा ठेवून, संकेतानें बोलावे तसें न करतां स्पष्ट, शिवी, उत्तर, प्रत्युत्तर वगैरे करून.

सडीव—वि सडीक अर्थ १ पहा.

सडेतोड—वि. १ जिथल्यातिथें, ताबडतोब, तडकाफडकी निकाल देण्यासारखा; फटकळ; कामाचा उरक असणारा. २ निराळा; एकटा; सुटा; निःसंग; निःस्पृह. [सडा+तोडणें]

सडेमुंडली—स्त्री. एक औषधी मुळी, कंद.

सडेल—वि. सडलेलें; कुजलेलें; नासकें; कुजकें. ०**बोंबील**—पु. अत्यंत कृश; कुरुप (मनुष्य). ०**भात**—पु. १ बिघडलेली, पुवळलेली जखम. २ रक्तपित्तामुळें बिघडलेला मांसल भाग. ३ (ल.) घाणेरडा, ओंगळ मनुष्य. ०**मदार**—पु. सडेल बोंबील पहा.

सडोळ—वि. डोळस. 'ते तेथींचें सडोळपण।' –गीता २.६६०. [स+डोळा]

सडथा—वि. १ क्षीण होत जाणारा; क्षयी; झिजत जाणारा. २ खपल्या पडणारी (जखम, क्षत). [सडणें]

सडथा—पु. (सुतार) किंकर्‍या; विंझणें; सुतारांचें एक हत्यार. [सडा]

सढळ—वि. उदार; अघळपघळ; घळमळीत; सैल; मोकळाचाकळा. 'बोलूनचालून हाताचा सढळ'. [सं. शिथिल; प्रा. सिढिल; हिं. ढिला. सं. श्रद्धावत्-सड्ढाल-सढाळ-भाअ १८३२.]

संढाल—पु. सरकारी सारा, दंड वगैरे कोणताहि बोजा योग्य प्रमाणांत नसून देणें अवश्य अशा वेळीं लोकांनीं तो आपसांत प्रमाणशीर वांटून घेऊन तयार केलेलें खाजगी पत्रक.

सढील—वि. शिथिल; सईल; ढिलें. 'सेनास्त्रियेचें धैर्यवस्त्र। सढील झालें झगडतां।' –मुआदि २३.१४१. [सं. शिथिल]

सण—पु. १ उत्सवप्रसंग; उत्सवदिवस; आनंदाचा दिवस. २ उत्सवप्रसंगीं केलेली चैन, मौज, जेवणावळ वगैरे. 'रीण काढून सण करणें.' ३ सणाच्या दिवशीं विशेषतः दसरा, दिवाळी वगैरे प्रसंगीं आश्रितांना वाढून द्यावयाचें जेवण, शिधा वगैरे. ४ विवाहोत्तर जांवई वगैरेस किंवा इतर नातेवाईकांस दिवाळी, शिमगा वगैरे प्रसंगीं द्यावयाच्या मेजवान्या, भेटी, देणग्या, पोषाख वगैरे. [सं. क्षण] ०**करी**—पु. कारू, बलुतेदार, आश्रित वगैरे सणाच्या दिवशीं ज्यांस वाढणें शिधा वगैरे द्यावयाचा असतो ते ०**वई**—स्त्री. सणाच्या दिवशीं शेतकऱ्यांकडून बलुतेदारांस मिळावयाचें धान्य. (क्रि० देणें; मागणें; घालणें.) ०**वार**—पु. १ सणाचा दिवस. २ सणाच्या दिवशीं वधूवरांकडे परस्पर पाठवावयाचे अहेर, देणग्यावगैरे. (क्रि० करणें; देणें.) ०**सुदी-सुदीस-सूद**—स्त्रीपु. सणवार; सणाचा दिवस. **सणु-णू**—पु सण; उत्सव.

सण—पु. ताग. 'भक्षितो सण कसा कडबा हो।' –किंगवि २२. [सं. शण] ०**काडी-कांडी**—स्त्री. १ तागावरील वाख काढून घेतल्यावर राहणारी काडी. २ अंबाडी भेडी यांवरील दोर काढून घेतल्यावर राहणारी काडी. ३ (ल.) आगकाडी. **सणाकी**—स्त्री. (गो.) तागाची वस्तु.

सणई—स्त्री. एक अलगुजासारखें पोकळ नळीचें केलेलें वाद्य.

सणक—स्त्री. कळ; वेदना; तिडीक. शिनीक पहा. (क्रि० निघणें; उठणें; चालणें.) [ध्व. सण्] **सणका**—पु. १ चमक; वेदना, तिडीक; ठणका धमक पहा. (क्रि० निघणें; उठणें; चालणें.) २ गोळी बाण वगैरेचा शिळीसारखा आवाज. [ध्व]

सणक—स्त्री. (ना.) लहर; हुक्की. **सणकी**—वि. लहरी.

सण-कण-कन-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि. वेगानें जाणारी बंदुकीची गोळी, बाण, छडी किंवा चाबकाचा मार, दुःखाचा वेग, तिडीक, कळ वगैरेचा उद्रेक यांच्या प्रमाणें आवाज करून. [ध्व.] **सणकणें**—अक्रि. सणकन् आवाज करून जाणें. शीळ घालणें, गाणें; तिडीक निघणें. [ध्व]

सणकी—स्त्री. (माण.) चारी पाय पांढरी असलेली मेंढी.

सणग, सणंग सनग—न. विणलेलें वस्त्र; वस्त्राचा तागा, नग; उंची वस्त्र. 'हें गीतारूपी सणंग अव्वलपासून अखेरीपर्यंत अत्यंत योगयुक्त चित्तानें सलग विणलेलें आहे.' –गीर ४६२. [नग] **सणगावर**–क्रिवि. मुद्देमालासह. 'सणगावरी मुकुंदा। धरूनि एकदां आणागे।' –ह ८.१६१.

सणगर—पु. घोंगडया विणणारी एक विणकर जात. [सं. शण+कृ]

सणगारणें—सक्रि. (कुण अप.) शृंगारणें. 'वधूला सणगारतात.'' –मसाप ४.२५५.

सणण-सणणण—क्रिवि. बाण, बंदुकीची गोळी, शीळ, गाणें, वगैरेच्या आवाजासारखा आवाज करीत. [ध्व.]

सणतिवार—पु. सणाचा, उत्सवाचा, आनंदाचा दिवस. [सण+तिथिवार]

सणब—पु. (गो.) सण; ताग. [सं. शण]

सणबिया—स्त्री.अव. (गो.) अळशी; जवस. 'सणीबियांची पापां' अळशीचें पोटीस.

सणसण-णां—क्रिवि. सणकन-कर वगैरे पहा.

सणसण—स्त्री. गाणें, शीळ घालणें, बाण जाणें, गोळी जाणें वगैरेचा आवाज. **सणसणणें**–अक्रि. १ सणसण असा आवाज करणें. २ हातास वगैरे झिणझिण्या, स्फुरण येणें. (कठिण पदार्थावर आघात करतांना, टोला मारतांना). [ध्व.]

सणसणाट–पु सणसण असा अतिशय आवाज; सणकारा; झणकारा. **सणसणीत**–वि. १ सणसण आवाज होईइतकें तापलेलें, उकळतें (पाणी, दूध, तेल वगैरे). २ झणझणीत; अतिशय तिखट (भाजी, पदार्थ). ३ घट्ट; दाट; भक्कम; दणगट; पीळदार (कापडाची वीण, बांधलेला गट्ठा, दोरा, मनुष्य, जनावर वगैरे) ढिलें, सईल, गबाळ नव्हे असें. ४ स्पष्ट; खडखडीत; साफ; सडेतोड; खणखणीत (नकार. उत्तर, जबाब, भाषण, जाबसाल वगैरे). ५ खडखडीत; चुरचुरीत (वाळलेलें वस्त्र वगैरे). ६ खणखणीत; स्पष्ट आवाज करणारें; चोख (नाणें, भांडें वगैरे). **सणसर**–वि. १ कणखर; मजबूत; भक्कम; ताठ; पीळदार (दोरा, वस्त्र, मनुष्य, जनावर, गट्ठा, ओझें वगैरे). 'त्याचा प्रत्येक अवयव सणसर होता.' –वज्राघात १०८. २ खडखडीत; स्पष्ट; सडेतोड; साफ (भाषण उत्तर वगैरे). ३ जोरदार; भरींव; मुबलक (पाऊस, पीक वगैरे). **सणसरून**-क्रिवि. (माण.) सडकून. **सणाटा**–पु. सनाटा पहा. **सणाण**–पु. बाण, बंदुकीची गोळी, गाणें, शीळ वगैरेचा सीत्कार, आवाज. **सणाणणें**–अक्रि सणसण आवाज करणें. **सणाणा, सणाणें**–वि. तीक्ष्ण; तीव्र; 'कांटे देखोनि सणाणे।'–ज्ञा ७.१७२. 'शस्त्र केलें जी सणाणें।' –एभा १२.५८६. 'नखें देखोनि सणार्णी' –मुआदि ६.३७ **सणासणी**-स्त्री. शस्त्रांची खणाखणी; बाण, गोळ्या वगैरेंचा भडिमार. 'मारामारी, हणाहणी, सणासणी झाली तों अंताजीपंतास सहेनासें जालें.' –भाब ३३. **सणाटणें**–अक्रि. (ना.) १ ताप चढणें. २ चोपणें.

सणी—स्त्री. १ ढबू पैसा; दोन पैसे; पैशांची दुक्कल. सहा रुक्यांचें नाणें. 'भणाण सारा दणाण जाला कणा पावती सणी।' –ऐपो ३७०. २ जमीन मोजणीचें एक माप–सहा रुंके. सजगणी पहा.

सत्—पु साधु; पवित्र पुरुष. –न. १ त्रिकालाबाधित अस्तिरूपी तत्त्व; ब्रह्म. –वि. १ वास्तविक; यथातथ्य; खरें; यथास्थित. २ योग्य; रास्त; उत्तम; गुणवान्; खरें; चांगलें; ऋजु; (हा शब्द बहुधा समासांत येतो उदा० **सत्कर्म, सत्कल्पना, सत्कृत्य, सत्संग, सत्पुरुष, सद्गुण, सद्विद्या, सद्वासना, सत्सेवा, सदाचार, सद्गति, सद्गुरु** वगैरे). [सं.] **सत्कर्म**–न. चांगलें काम; पुण्यकृत्य. **सत्कवन, सत्कविता**–नस्त्री. चांगलें काव्य; धार्मिक काव्य; पवित्र गीत. **सत्कवि**–पु. चांगला कवि; संतकवि; प्रतिभावान कवि. **सत्काल**–पु. योग्य काल; पुण्यकर्मांत घालविलेला काल. **सत्कालक्षेप**–पु. पुण्यकृत्यांत वेळ घालविणें; सत्कृत्यांत खर्च केलेला वेळ. **सत्काव्य**–न. चांगलें काव्य; धार्मिक, नीतिपर काव्य; उत्तम प्रतीची कविता. **सत्कीर्तन**–न. उत्तम पुरुषांचें गुणगान्; सज्जनांची स्तुति. **सत्कृति**–स्त्री. पुण्यकृत्य; चांगलें काम; योग्य काम; धार्मिक कार्य. **सत्क्रिय**–वि. चांगल्या कृतीचें; वर्तनाचें. **सत्क्रिया**–स्त्री. १ चांगलें कर्म; चांगली कृति. 'हे सत्क्रियाचि आचरावी।' –ज्ञा २.२६६. २ आदर; सन्मान. **सत्ख्याति**–स्त्री. ख्याति पहा. **सच्चर्चा**-स्त्री. धार्मिक बाबींसंबंधीं खल; पुण्यकारक वादविवाद; चांगल्या प्रकारचा वाद, खल. **सत्तम**–वि. सर्वश्रेष्ठ; सर्वोत्तम; सर्वोत्कृष्ट. 'शबरास म्हणे नृपसत्तम।' **सत्तीर्थ**–न. १ विशेष पुण्यदायक क्षेत्र, यात्रेचें ठिकाण; पुण्यभूमि. २ आदराचें, भाव असलेलें ठिकाण, जागा, व्यक्ति. **सत्पथ**–पु. चांगला, योग्य, सरळ, पुण्यकारक मार्ग; सन्मार्ग. **सत्पात्र**–वि. योग्य; लायक; कोणतेंहि दान करण्यास, मान देण्यास, सन्मान करण्यास योग्य (मनुष्य). **सत्पात्रीं दान**–न. योग्य, पुण्यशील पुरुषास दिलेली देणगी. **सत्पाळ**–वि. (राजा.) कसदार दुधाची; चांगलें लोणी येणारें दूध देणारी (गाय, म्हैस वगैरे). **सत्पुत्र**–पु. १ गुणी, कर्तव्यदक्ष मुलगा. २ त्रैवर्णिक स्त्रीपासून झालेला मुलगा. **सत्पुरुष**–पु. पुण्यवान्, उदार, धार्मिक मनुष्य; साधु; संत. **सत्प्रचीत, प्रचीति**–ती–स्त्री. वास्तविक, चांगला अनुभव. **सत्प्रिय**–वि. १ सत्पुरुषांस, साधुसंतांस, चांगल्या लोकांस आवडणारा. २ साधुसंताबद्दल, चांगल्या गोष्टींबद्दल व्यक्तींबद्दल आवड असणारा. **सत्शिष्य**–पु. निष्ठावान, श्रद्धावान् शिष्य. **सत्शूद्र**–पु. १ आपल्या धर्माप्रमाणें योग्य तो आचार पाळणारा शूद्र जातीतील मनुष्य. २ गवळी व न्हावी यांचे आचार इतर शूद्रांपेक्षां चांगले असतात म्हणून त्यांस म्हणतात. **सत्संग–सत्संगति**–पुस्त्री. साधुसंतांशीं, पुण्यवान् पुरुषांशीं, सद्गुणी माणसांशीं सहवास, मैत्री, संबंध वगैरे. 'सत्संगति सत्फळदा सुज्ञासि पचे पचे न येरा हे।' –मोवन ८.७. 'सत्संगें देव सांपडला।' –दा १८.८.१३.

सत—न. सत्त्व याचें संक्षिप्त रूप. सार; सद्गुण; तत्त्व; बल; सामर्थ्य; तेज. (वाप्र.) **सत घेणें, सोडणें, सतास जागणें**–सत्त्व पहा.

सत—न. (राजा.) सत्य; देवाशपथ, देवाघरचें फूल घेऊन सांगणें. [सत्य] **सतनागत**–निरुपाय; नाइलाज; दुसरा मार्ग नसणें; कांहीं इलाज न चालणें. 'नवऱ्याला नवरीवांचुन सतनागत'. **सतपत**–स्त्री. (व्यापार) साख व पत; चांगला लौकिक; सचोटी व पत; विश्वासुपणा. [सत+पत] **सतीपतीचा**–वि. नेकीचा; सचोटीचा; विश्वासु. **सतीपतीनें**–क्रिवि. नेकीनें; सचोटीनें.

सत—अ. साताची पट दाखविण्याकरितां योजितात. तीन सतें एकवीस. [सं. सप्त]

संत—पु. १ साधु; पुण्यपुरुष; सत्पुरुष; सज्जन. 'जो जाणेल भगवंत। तया नांव बोलिजे संत।' –दा ६.१.१६. २ सामान्यतः धार्मिक आचारविचार पाळणारा सदाचारी मनुष्य; शुद्धाचरणी व्यक्ति. –न. ३ ब्रह्म. 'सदा संत आनंतरूपी भरावें।' –राक १.११.३. –वि. नित्य; शाश्वत; स्थिर; अक्षय; टिकाऊ; त्रिकालाबाधित. 'असंत नव्हे तें संत।' –दा १७.२.२. [सं.सत्]

संत—वि. स्थिर; शांत; सौम्य; गंभीर; मृदु; नरम. 'तें असंतचि असिजे जगें। मानिजे संत।' –ज्ञा १५.१३३. 'तसेंच संत वायूंतल्यापेक्षां वाहत्या वायूंत पाणी जलद सुकतें।' –मराठी सहावें पुस्तक पृ. १६०. [सं शांत]

संत असंत, संतासंत—वि. बरेंवाईट; सत्यमिथ्या; खरें खोटें. 'संत असंत कर्में अर्जुनी।' –विपू ६.३. 'ऐसेनि संतासंतें। कर्में प्रवृत्तिस्तव होतें।' –ज्ञा १३.९७५. 'शिष्य पाहिजे संतासंत। विचार घेता।' –दा ५ ३.२७. **संतकी**–स्त्री. साधुत्व; साधुपणा. **संतचार**–पु. संताचा आचार, वागणूक; संतपणा. 'वेदशास्त्र संतचार कल्पना घेती साधुजन।' –ऐपो ३८९. **संतडा**–पु. (तिरस्कारवाचक) संत. **संतमंडळी**–स्त्री. वारकरी पंथ; विष्णुदास. **संतमार्ग**–पु. सज्जनांचा आचारक्रम, वागणूक, साधु लोकांची रीत, पद्धति, मार्ग. **संतमाळिका**–स्त्री. गुरुशिष्यपरंपरेनें चालत आलेल्या साधुपुरुषाची परंपरा; संताचा संघ; संतांची वंशावळ. **संतसज्जन**–पु.अव. (व्यापक अर्थानें) साधुपुरुष; सद्गुणी लोक; पुण्यपुरुष; साधुमंडळी. **संतावलि**–स्त्री. साधुसंतांच्या नांवांची पद्यमय यादी; साधुसंतांची नांवें असलेलें काव्य. [सं.] **संती**–वि. संतासंबंधी; साधुविषयक (रीति, वेष, पोशाख, राहणी वगैरे).

सतका, सत्का, सद्का—पु. ओंवाळून टाकलेली वस्तु; कुरवंडी करून टाकलेली वस्तु, द्रव्य. 'जिवाचा सतका माल व इजतीचा सतका जीव यैसे आहे.' –पेद ३.१३५. 'सतका रुपये पांच केला.' –पेद १८.३३. 'कित्येक तेथें सतखे करीती।' –सारुह ७.५५. [अर. सद्का=अर्पण केलेली वस्तु] **०मतका**–पु. अमावस्येस अनिष्ट निवारणार्थ उडदाची डाळ, पीठ, मीठ, तेल, मिरच्या वगैरे जिन्नस मांगास देतात तें.

सतंजय—पु. एखादा मनुष्य शिकला वगैरे म्हणजे हा वाक्प्रचार वापरतात. याचा अर्थ खरें आहे, सत्य आहे, खरें होवो, खरोखर, रास्तपणें असा होतो. [सत्य+जय किंवा शतायुषी हो, चिरंजीव हो असाहि होतो. शतंजीव सत्यंजो असाहि एक याचा पर्याय आहे.]

सतत, संतत—वि. नित्याचा; नेहमीचा; शाश्वत; कायमचा; टिकाऊ. –क्रिवि. नेहमीं; नित्य; एकसारखें; निरंतर; अखंड. 'तयासि सुलभ मी सतत। म्हणऊनि देहांतीं निश्चित।' –ज्ञा ८.१३९. [सं. सतत] **सततज्वर**–पु. चढउतार होणारा ताप; सारखा मधूनमधून येणारा ताप; विषम. **संततज्वर**–पु. अंगांत सारखा राहणारा ताप; कमिजास्त न होणारा ताप. **संततधार**–स्त्री. १ एकसारखा चालू राहणारा प्रवाह; पावसाची सारखी झड. २ देवावर अखंड अभिषेकाची धार धरतात ती. ३ (ल.) एकसारखी चालत आलेली रूढी, आचार, कल्पना. **संततस्मरण**–न. चिरकालीन स्मृति; कायमची आठवण; नेहमीं वरचेवर होणारी, कधीं न बुजणारी आठवण. **संताभ्यास**–पु. खंड न पडतां चालविलेलें अध्ययन; कायमची संवय.

संतत—स्त्री. अपत्य; वंश; कुल; मुलेंबाळें; परंपरा; गोत्र. [सं. संतति] **०संपत**–स्त्री. अपत्यें व धन; मुलेंवाळें व द्रव्यादि अभिवृद्धि. 'आमचे लोक सुधारतील तर संततसंपत यांचा विरोध जो आमच्यांत वाटतो तो नाहींसा होईल.' –नि ६१. [संतति+संपती]

संतत, सतंत—वि. स्वतंत्र; पृथक्; निराळा; अलग. 'म्हणोनि शुद्ध ज्ञान ते संतत।' –दा ५.६.९. 'कोणी सुना कोणी लेंकी। कोणी एकी संतता।' –तुगा १५१. [सं. स्वतंत्र]

संतति–ती—स्त्री. १ अपत्यें; पुत्रपौत्रादि विस्तार; वंश; मुलेंबाळें. 'कां वांझेची संतती। वानणें जैसी।' –ज्ञा १५.८०. २ (ल.) परंपरा; विस्तार; माळ; रांग; ओळ. 'मग कोरडियेचि आशेची संतती। वाढळें वाढळें होती। कोश किडे।' –ज्ञा १६. ३३८. [बं. सम्+तन्]

सततीस—वि. सदतीस; तीस व सात ही संख्या. [सं. सप्तत्रिंशत्] **सततिसावें**–न. (सांके) छत्तीस तत्त्वापलीकडील ब्रह्म. 'छत्तीस सततिसावें। चोविसां पंचविसावें। तिन्ही नुरोनि स्वभावें। चतुर्थ जें।' –ज्ञा १४.२२४.

संतप्त—धावि. १ अतिशय तापविलेलें, उष्ण केलेलें. २ (ल.) संताप आलेला; अतिशय रागावलेला; त्रासलेला; जळफळणारा; क्षुब्ध. ३ अतिशय पीडलेला, त्रासलेला, गांजलेला; दुःखी; कष्टी; शोकग्रस्त. 'पैं हरूनि कफवात। जैं देहीं आटोपे पित्त। तैं करी संतप्त। देह जेवीं।' –ज्ञा १४.१९६. [सं. सम्+तप्] **संतप्त सोनें**–वि. तापलेलें सोनें लाल व सुंदर दिसतें म्हणून त्यांची गौर, सतेज अंगकांतीला नेहमीं उपमा देतात. 'संतप्त सोनें जसी। जोतियाची सीता।'

सतफळ—न. (कु.) समुद्रफळ (लहान मुलांच्या बाळकडूंत वापरतात).

सतम—पुन. १ कहर; जुलूम; धुमाकूळ; धांगडधिंगा; जबरदस्ती; धडपड. 'शिपाई दिवाणासारखा दिसतो पण वाघावर सतम केलें' –ऐस्फुलें २४. 'बाहेर पडण्यासाठीं सतम केला.' २ रेलचेल; लयलूट; पराकाष्ठा; अनर्थ; अतिरेक. [फा. सितम्]

सतमी—स्त्री. १ गलबतावरील मालाची नोंद केलेला अधिकाऱ्याचा दाखला, परवाना. 'सतमी न दाखवील तर ते जिन्नस, बारदान व गलबत जप्त होईल'–न्यायाब्धिसेतू २३२ २ जाहिरनामा; पत्रक. [फा ?]

सतरंग, सतरंज—पु. बुद्धिबळांचा खेळ. 'गंजीफा सतरंज चोपट नवे ते नदैही सांगजे।' –सारुह ३.४६. [सं. चतुरंग; फा. शतरंज, सदरंज]

सतरंजी, सत्रंजी—स्त्री. १ बिछाइतीचें जाड, रंगीबेरंगी पट्टेदार कापड. २ (मल्लविद्या) एक कुस्तींतील डाव; हरणफास; जोडीदाराच्या पिंडरीवरून आपला एक पाय घालून दुसरा त्याच्या मानेवरून आणून दोन्ही पायांस तिढा देऊन त्यास चीत करणें. [फा. शत्रंजी]

सतरा—वि. दहा अधिक सात ही संख्या. १७. [सं. सप्तदश; प्रा. सत्तरह; हिं सत्रह; पं. सतारा; सिं. सत्रहं; गु. सत्तर; उरिसतर; बं सतेर] **सतरा पंधरा गोष्टी सांगणें**–विसंगत, असंबद्ध, बोलणें; बडबडणें; भाकड कथा सांगणें. **सतरा गुणांचा खंडोबा**–अनेक रोग किंवा दुर्गुण असलेला. **सतरा जणांच्या डोक्यांस पाणी लावून ठेवणें**–(न्हावी हजामत करण्यापूर्वी पाणी लावतो यावरून). अनेकांची खुशामत करणें. **सतरा फणगाटे फोडणारा**–अनेक आक्षेप घेणारा; बयादखोर. **सतरावो**–स्त्री. चंद्रबिंब; ज्या मूळ चंद्रबिंबावर त्याच्या सोळा कला अधिष्ठित होतात ती मूळचंद्राची आकृति, बिंब. 'आंवसेचिये दिवसीं। सतराविये अंशीं।' –अमृ ७.१५३; –ज्ञा १५.२७२.

संतर्पण—न. १ इच्छातृप्ति; समाधान; इच्छितप्राप्ति. अन्नादिक देऊन तृप्त करणें. 'ब्राह्मण संतर्पण। स्वस्ति वाचन विधीचें।' –एरुस्व ५.२१. २ एक खाद्य पदार्थ; डाळिंब, द्राक्षें, खजूर, साखरेसह पाण्यांत कुसकरून भाताच्या लाह्यांचें पीठ व मध घालून करतात. –योग १.१७३. [सं. सम्+तृप्] **संतर्पणें**–उक्रि. तृप्त करणें; इच्छापूर्ति करणें; संतुष्ट करणें. **संतर्पित**–वि. तुष्ट; तृप्त; इच्छापूर्त.

सतल-लें—न. धातूचें मोठें भांडें; सतेल पहा.

सतवटी—स्त्री. खरेपणा; नेकी, प्रामाणिकपणा; सचोटी; इमान. [सत्य]

सतवा—पु. सातूचें पीठ [सं. सक्तु]

सतविणें—सताविणें पहा.

सतशील—वि. सत्यशील; प्रामाणिक; सद्वर्तनी.

सतसय—क्रिवि. (कों.) सारखा; ओळीनें; रांगेनें; न तुटतां: अखंड. 'या वेशीपासून त्या वेशीपावेतों सतसय घरें लागत गेलीं आहेत.'

सतसल—वि. (विरू.) सपसळ पहा.

सतसष्ट—वि. सदुसष्ट पहा. साठ अधिक सात ही संख्या.

सता—पु. सती या शब्दाचें पुल्लिंगी रूप. 'खरेंच निघल काय सता पाह्यला थेट घेतली प्रेतकळा। तेव्हां तो तिजला झोंबूं लागला नार उघडून पाहे डोळा।' –पला ८.१७. [सं. सत्]

संता—स्त्री. प्र. संथा पहा. –नि ८४५.

संताई—स्त्री. एक क्षुद्र देवता. 'संताई देवी म्हणे संत महंता।' –सप्र ६.२५. [संत+आई]

सताड—वि. (राजा.) ताठ; सरळ; उभें; अगदीं सरळ. –क्रिवि. अगदीं; साफ; पूर्णपणें. 'दार सताड उघडें टाकलें.' [स+ताड]

संतान—न. १ संतति; मूलबाळ; लेकरूं; वंशवृद्धि. 'नको देऊं देवा पोटीं हें संतान।' –तुगा ११०९. २ उत्पत्ति. 'तरी कोणाचे न संतानें। निफजती या उन्मळणें। काय फुंकिलिया गगनें। जाइजैल गा।' –ज्ञा १५.२२०. [सं. सम्+तन्] **०काम**–पु. पुत्रेच्छा; संततीची इच्छा. –वि. संततीची इच्छा असणारा. **०गोपाल**–पु. पुत्रप्राप्तीकरितां जपावयाच्या एका मंत्राचें नांव. **०धन**–न. संततीरूपी द्रव्य, संपत्ति. **०बीज**–न. १ वंशाचा मूळ पुरुष. २ अनेक वर्षें संततीशिवाय गेल्यावर झालेलें प्रथम अपत्य. ३ दत्तक पुत्र. ४ वीर्य; रेत; **०मार्ग**–पु. १ पुत्रप्राप्तीकरितां योजावयाचा उपाय (देवधर्म, देवतेस प्रदक्षिणा घालणें वगैरे). २ (उप.) व्यभिचार; जारकर्म. **०वृद्धि**–स्त्री. अपत्यांची वाढ; मुलाबाळांचा परिवार बाढणें; कुटुंबाची वाढ. **संतानोपचार, संतानोपाय**–पु. संतानमार्ग पहा.

संतानु—पु. वृक्ष; पसरलेलें झाड. 'तूं पांथ तापस छाया घनु। होसि परमार्गिचा संतानु।' –ऋ ५०. [सं. सम्+तन्]

सताप, सतापाचें झाड—पुन. एक औषधी वनस्पती. याचा पाला खोकल्यावर देतात.

संताप—पु. १ अतिशय आग; अत्यंत उष्णता; ताप; दाह; (अग्नि, ज्वर, क्रोध, तृष्णा, वगैरेमुळें होणारा). 'हें असो संतापु कैसा। चंद्र न स्मरे जैसा।' –ज्ञा ५.९२. २ क्रोध; राग; त्वेष; आवेश. ३ त्रास; यातना; दुःख; शोक; मनाची अस्वस्थता; उद्वेग; 'सर्वांगा कांटाळा आला। अति संतापु उपनला।' –ज्ञा १.१९७. [सं. सम्+तप्] **०ज्वर**–पु. त्वेष, आवेश, क्रोध, मनाचा उद्रेक, अस्वस्थता इत्यादिमुळें येणारा ताप. **०दुःखणें**–न. अतिशय राग, त्वेष, मनोविकारांची प्रबलता यांमुळें होणारी पीडा, व्याधि. **संतापणें**–अक्रि. १ आग, दाह, होणें; रागानें जळणें; क्षुब्ध होणें; क्रोधाविष्ट होणें; संतप्त होणें; कातावणें. २ त्रासणें; कंटाळणें; अस्वस्थ होणें; दगदग होणें. 'पश्चात्तापामुळें राजा। संतापला बहुसाल।' –मुआदि ७.११९. **संतापन**–न. १ संतापयुक्त होणें; आग, दाह होणें;

जळणें. २ त्रास; पीडा; क्षुब्धता. **संतापविणें**–उक्रि. त्रास देणें, करणें; दुःख देणें; कष्टविणें; क्षोभविणें; राग आणणें '. **संतापित**–धावि. १ त्रासलेला; तापलेला; कावलेला. २ कामादि मनोविकारांनीं पीडलेला. **संतापी**–वि. त्रासिक; चिडखोर; रागीट; तामसी.

सतार–वि. १ सरळ. 'दोहीं सुनै सरिसे सतार। जैसे अमृताचे परांकुर।' –ऋ ८०. २ उज्ज्वल. 'तिक्ष्ण सतार तरळ नएन।' –आद्यमराठी कवयित्री उ. २११. [सं. स+तारा]

सतार—स्त्री. एक तंतुवाद्य; तारा ७, तीन तांब्याच्या चार पोलादी, पहिल्या दोन षड्ज स्वरांत, पुढील मुख्य तार (कोमल) मध्यमांत चवथी पंचमांत, पांचवी खरज पंचमांत, सहावी षड्ज स्वरांत, सातवी तारसप्तकांतील षड्ज स्वरांत. पडदे १८ अगर २४. १८ पडद्यांचा चलथाट, २४ पडद्यांचा अचल थाट; याशिवाय तरफेच्या तारा ११ पडद्याखालीं लावतात. [फा. सितारा=तीन तारांचें वाद्य; यास पूर्वी तीनच तारा असत]

सताल-लें—न. पसरट तोंडाचें मोठें भांडें. सतेल पहा.

संताव–स्त्री. (व.) बागायती झाडांस फळें येण्याकरितां पाणी बंद करून ऊन खाऊं देतात ती क्रिया. [संताप]

सताव(वि)णें—उक्रि. त्रासविणें; दुःख देणें; पीडा देणें; गांजणें; छळणें; त्रास देणें; चेष्टा करणें; उद्वेग आणणें. [सं. सम्+त्रस्]

संताविणें—उक्रि. शांत करणें; स्थिर करणें; शांतवन करणें; संथ करणें [शांत]

संतावें-ळें—न. १ संतगिरी; महंतगिरी; बुवाबाजी; साधुपणा; संसाराकडे दुर्लक्ष करून संतपणाकडे लक्ष देणें. २ साधूंचा मेळा; संतांचा संघ. ३ ऐहिक गोष्टींच्या प्रामाणिकपणाबद्दल विवेचन; संसाराच्या क्षणभंगुरत्वाबद्दल प्रवचन, व्याख्यान.

सतिकें—क्रिवि. वास्तविकतः; खरें पाहूं जातां; खरेपणानें. 'म्हणौन संसाररूंख सतिकें। वावोचिगा।' –ज्ञा १५.२२३. 'नव्हेचि सतिकें वाचिक।' –अपरोक्षानुभव. [सं. सत्य]

सतिसप्तमी—स्त्री. अमुक गोष्ट असतांना असा धातुसाधितानें बोध होतो त्यावेळीं हा भाषाप्रयोग होतो. हा प्रयोग संस्कृत भाषेंत विशेष रूढ आहे. 'मृतेभर्तरि' [सं. सति+सप्तमी]

सती—स्त्री. १ पतिव्रता; साध्वी; तपस्विनी. 'सती आणि सत्पुरुख। दानशील याज्ञिक।' –ज्ञा १६.४०२. 'सतीला नाहीं बती हत्ती आहे शिंदळीच्या वरीं।' –पला १२.२८. २ पति मृत झाला असतां त्याच्या प्रेताबरोबर सहगमन करणारी स्त्री. ३ पार्वती. ४ स्त्री; पत्नी. 'कशी नलसतीच होय दमयंती।' –र २. **सती जागविणें**–सती गेलेल्या स्त्रीच्या चितेवर पहारा करणें. **सती जाणें**–मृतपतीबरोबर सहगमन करणें. **सतीचा लाल**–पु. १ शब्दशः पतिव्रतेचा पुत्र. २ (ल.) सत्पुरुष; पवित्र मनुष्य. सखीचा लाल या हिंदी वाक्प्रचारावरून चुकीनें. **सतीचें वाण**–न. सती जाणाऱ्या स्त्रीनें त्या प्रसंगीं दिलेलें वाण. यावरून कधीं न मोडतां येणारें वचन; दृढ प्रतिज्ञा; प्राणावर बेतली असतांहि न मोडणारा निश्चय. 'सतीचें तें घेतां वाण। बहु कठिण परिणामीं।' –तुगा ३४१९. 'लाविला जिव्हारीं बाण, घेऊन सतीवाण प्राण देतें' –प्रला १०८. **सतीचें वाण घेणें-उचलणें-स्वीकारणें-अंगीकारणें**–वरील प्रमाणें दृढप्रतिज्ञा करणें; एखादी गोष्ट पतकरणें. 'बा निःशंक सतीचें घेवूनि सतीच हर्षती वाण.' –मोशल्य २.३५. **सतीचें वाण ठेवणें-मांडणें**–वरील प्रमाणें प्रतिज्ञा करावयास सांगणें; पैजेचा विडा मांडणें. [सं.]

सतीर्थ, सतीर्थ्य—पु. गुरुबंधु; सहाध्यायी.

सतुक—विक्रिवि. सत्य; खोखरीचें. 'तैसी तियें सतुकें। आथी काई।' –अमृ ७.२०७. 'तेवीं अविद्याकाळीं सतुकें। अविद्या नाहीं।' –अमृ ६.३१. [सं. सत्य]

संतुनी—स्त्री. साध्वी; संतीण. 'बहिणी म्हणे पुढें चालवी तेथुनी। पायवो संतुनी महादेव।' –ब ७.१०. [संत]

सतुवा—पु. सातूचें पीठ. [सं. सक्तु]

सतुष—वि. कोंडा असलेलें; असडी; सालपटासह (धान्य). [सं. स+तुष]

सतुषष्ट, सतषष्ट, सतुसष्ट-ष्ठ—वि. सदुसष्ट; साठ व सात ही संख्या. ६७. [सं. सप्तषष्टिः]

संतुष्ट—वि. तृप्त; समाधानी; आनंदित; खूष. [सं. सम्+तुष्] **संतुष्टणें**–अक्रि. तृप्त होणें; समाधान पावणें; संतोषणें. **संतुष्टाई, संतुष्टी**–स्त्री. तृप्ति; समाधान; आनंद; खुषी; संतोष. 'मग संतुष्टीच्या ठायीं। कुंठें सहजें।' –ज्ञा ३.४९.

सतूप—न. चेहरा तुळतुळीत दिसावा म्हणून नट वगैरे लोक लावतात तो स्निग्ध पदार्थ; मवारी. [स+तुप]

संतृप्त—वि. १ पूर्णपणें समाधान पावलेला; धालेला; तृप्त झालेला; संतुष्ट; आनंदी. २ (शाप.) एखाद्या द्रावणांत एखादा पदार्थ शक्य तितका पूर्णपणें विद्रुत केलेला आहे असा. (इं.) सॅच्युरेटेड. [सं. सं+तृप्] **संतृप्ति**–स्त्री. पूर्ण समाधान; तुष्टि.

सतेज—वि. तेजस्वी; चकचकीत; टवटवीत; तजेलेदार. [सं. स+तिज्=तीक्ष्ण करणें] **सतेजस्क**–वि. सतेज पहा.

सतेल-लें— न. रुंदट तोंडाचें व खोलगट मोठें भांडें; गिंडी. 'चरुरंगाचें सतेल।' –वाडसमारो ३.१६०.

संतोख—पु तृप्ति; आनंद; संतोष. [संतोष]

सतोटी—स्त्री. सचोटी पहा. नेकी; प्रामाणिकपणा.

सतोबा—पु. सत्यवक्ता; सत्यभाषी; खरें बोलणाऱ्या मनुष्यास म्हणतात. [सत्य+बावा]

संतोला—पु. वजन उचलण्याचा अभ्यास करण्याकरितां वापरावयाचें मुद्गलासारखें लांकडी साधन. [सम+तोल]

संतोष—पु. १ तुष्टि; आनंद; आल्हाद; सुख. २ तृप्ति; समाधान (योगधर्म). ३ आनंदी वृत्ति; प्रसन्नता. [सं. सम्+तुष्] **संतोषण**–न. संतोष. ' वायसा न होय संतोषण '–सिसं ५.५८. **संतोषणें**–अक्रि. संतोष पावणें; समाधान होणें. **संतोषदान**–न. चिरिमिरी; देणगी. ' रेल्वेच्या सेवाचाकरीचा उपयोग करून घेणाऱ्या सर्वसामान्य जनतेकडून संतोषदान मागण्याची व स्वीकारण्याची रेल्वेच्या नोकरवर्गास मनाई आहे. ' **संतोषपट्टी**–स्त्री. पुत्रजन्मादि उत्सवानिमित्त राजानें शेतकऱ्यांवर बसविलेला कर. **संतोषविणें**–उक्रि. तुष्ट करणें; संतोष देणें. **संतोषाच्या कोटी**–स्त्रीअव. अतिशय आनंद. ' तें श्रवण करून संतोषाच्या कोटी जाहल्या. ' –इमं २००. **संतोषित**–वि. तृप्त; संतुष्ट. **संतोषी**–वि. समाधानी; आनंदी वृत्तीचा; तृप्त; प्रसन्न.

सत्कण्या—स्त्रीअव. भात कांडतांना विरून अतिशय कण्या झाल्या असतांना त्यांस म्हणतात. [सात+कणी]

सत्का—पु.सतका पहा. ओंवाळणी; ओवाळून टाकलेली वस्तु. ' सत्के व खैरात बहुत झाली. '–इमं १७९. ' पुतळाबाई वरुनि। सत्का उतरून नांव दिलें। ' –गापो ११९. [अर. सदका] **सत्कामत्का**–पु. मांग लोकांस अमावस्येच्या दिवशीं उडदाची डाळ, राळे किंवा इतर धान्य, पीठ, मीठ, मिरच्या तेल वगैरे जिन्नस देतात ते. –गांगा १०४.

सत्कार—पु. १ आदरातिथ्य; मानसन्मान; मानमरातब; बहुमान. २ आदर; पूज्यता. [सं. सत्+कृ] **सत्कारणें**–उक्रि. मानपान करणें; आदरातिथ्य करणें. **सत्कारित, सत्कृत**–वि. आदरसत्कार केलेला; मान दिलेला; पूज्य मानलेला.

सत्कार—पु. सत् हा शब्द; अस्तित्वाचक शब्द. ' तो प्रणवो आदिवर्णुबुजा। आणि तत्कारु जो दुजा। तिजा सत्कारु। ' –ज्ञा १७.३४२. [सं.] **सत्कारवाद, सत्कार्यवाद**–पु. कार्य प्रकट होण्याच्या पूर्वी त्याचें कारणामध्यें अस्तित्व मानणारें निरीश्वर सांख्य मत. ' मग सहजें सत्कारवादु। तो पद्मकरु वरदु। धर्म प्रतिष्ठा तो सिध्दु। अभय हस्तु। ' –ज्ञा १.१३; –गीर १५३.[सं.]

सत्तर—वि. ७० ही संख्या. [सं. सप्तति; प्रा. सत्तरी]

सत्ता—पु. १ फाशांवरील सातांचें दान. २ पत्त्यांतील सात ठिपके असलेलें पान. [सात]

सत्ता—स्त्री. १ अस्तित्व; असणेंपणा; स्थिति; सत्तत्व. ' तरी केवळ जे सत्ता। ते पुरुष गा पांडुसुता। ' –ज्ञा १३. ९६५. ' स्वयें तीस नाहीं सत्ता। ' –वामन निगमसार? २. ९४. (ग्रंथ भाग ४.) ' सत्ता प्रकाश सुख। या तिही तिहीं उणे लेख। ' –अमृ ५.१. २ अधिकार; प्रभुत्व; मालकी; अंमल. ' मज मागें राज्य करा दोघे, कोणास हो नको सत्ता। ' –मो सभा ३.४६. ३ शक्ति; सामर्थ्य; प्रभाव. (समासांत) कालसत्ता; प्रभुसत्ता; ईश्वरसत्ता. ४ जुलूम; करडा अंमल. ' देवीं ब्राह्मणीं सत्ता करी। ' –दा २.१.६८. **म्ह०** १ काडीची सत्ता लाखाची मत्ता बरोबर नाहीं. २ सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं. ' **सत्ता करणें**–न. १ हक्क सांगणें; अधिकारानें मागणें. २ अंमल, अधिकार गाजविणें. **०धारक–धारी–धिकारी**–धाना १ अधिकार, प्रभुत्व, मालकी वगैरे असलेला मनुष्य; सत्ताधीश. २ हक्क बजावणारा; अधिकारास चिकटून राहाणारा. **०धारण** -न. मालकी, प्रभुत्व गाजविणें; हक्कांची बजावणी करणें; अधिकाराचा स्वीकार करणें. **०धीश**–पु. प्रभु; राजा; अधिकारी; अंमलदार; अधिकारास्थित; पदाधिष्ठित. **०निवृत्ति**–स्त्री अधिकाराचा त्याग; हक्क, पदवी, उच्चपद सोडून देणें; स्वत्वनिवृत्ति. **०पुरुष**–पु. प्रभु; राजा; स्वामी; मालक; सत्ताधीश; धनी. **०प्रकाश**–पु. अस्तित्व व भास; सत्त्व आणि चेतना. ' तेवीं सत्ताप्रकाशु जगा। आपणचि जो। ' –ज्ञा १५.५५२. **०मत्ता**–स्त्री. हक्क व पदवी; अधिकार; मालकी; प्रभुत्व. [सत्ता द्वि.] **०वान्–वंत**–वि. प्रभुत्व, मालकी, अधिकार असलेला. **०सामान्यत्व**–न. सर्वत्र अस्तित्व; सर्वत्र स्थिति. ' सर्व पदार्थांत याप्रमाणें नित्यरूपानें सदैव असणें यासच संस्कृतांत सत्तासामान्यत्व असें म्हणतात. ' –गीर २१३. **०साहेबी**–स्त्री. अधिकार व प्रभुत्व; हक्क व स्वामित्व, अंमल व मालकी. [सं. सत्ता+फा. साहेबी] **सत्तेचा**–वि. १ मालकीचा; हक्काचा; अधिकारांतील; धनीपणाचा. ' हें घर माझें सत्तेचें आहे. ' २ (उप.) हक्कानें असणारा; अधिकारानुरूप. ' हा कामाला नसून जेवणाला तेवढा मात्र सत्तेचा असतो '. **सत्तेवाईक**–वि. १ मालकीचें; स्वतःचें. ' आपला जो सत्तेवाईक पदार्थ तोच दुसऱ्यास द्यावा. ' २ अधिकारांतील; कार्यक्षेत्रांतील; अंमलाखालील. ' हें घर तुमचें सत्तेवाईक आहे कीं भाडयाचें. '

सत्तावन—वि. ५७ ही संख्या. [सं. सप्तपंचाशत्]

सत्तावीस—वि. २७ ही संख्या. [सं. सप्तविंशति]

सत्तीस—वि. छत्तीस पहा. ' अभीन्नवी सत्तीस दृष्टी। तरि सर्वांगें घेऊनि आटी। ' –भाए ४५३.

सत्तु—पु. १ सातु; जव. २ सातूचें पीठ; गहूं, हरभरे, सातु यांचें भाजून केलेलें पीठ. [सं. सक्तु]

सत्तूर—पु. दोहों बाजूंस धार असलेला कोयता.

सत्तेचाळ-चाळीस, सत्तेताळ-ताळीस, सत्येताळ-ताळीस—वि. ४७ ही संख्या. [सं. सप्तचत्वारिंशत्]

सत्तोबा-पंत—पु. (उप.) खरेपणाचा आव आणणारा; प्रामाणिकपणाचें ढोंग करणारा. [सत्य]

सत्तमी—पु. उत्तरहिंदुस्थानांतील एक पंथ.

सत्पंथ—पु. एक महाराष्ट्रांतील पंथ. इमामशहानें स्थापन केलेला. **सत्पंथी भावसार**-पु. भावसार जातींतील सत्पंथाचे अनुयायी.

सत्य—न. १ खरेपणा; सचोटी; प्रामाणिकपणा; नेकी; इमान. 'विपत्तींतहि सत्पुरुष आपलें सत्य सोडीत नाहींत'. २ वास्तविकता; वस्तुस्थिति; अस्तिभाव. ३ प्रतिज्ञा; शपथ; दिव्य. ४ चार युगांतील पहिलें युग. याची वर्षसंख्या १७२८००० वर्षें आहे. ५ अस्तिपक्षीं, होकारार्थी, उदार (खरोखर, खरेंच, अवश्य, होय याप्रमाणें). -वि. १ खरें; वास्तविक; ऋत; अनृत, खोटें नव्हे तें; काल्पनिक तार्किक नव्हे असें. २ प्रत्यक्ष; हयात; जिवंत; अस्तित्व, चेतना असलेलें ३ अस्सल; मूळ; नकली नव्हे तें. ४ खरा; खरें बोलणारा. ५ सचोटीचा; प्रामाणिक; कपटी, लबाड नव्हे असा; विश्वासु; नेकीचा. **सत्य उपाय**-वि. सत्यसंध; नेकीनें चालणारा. 'परम गहन, अति सुशील, सत्यउपाय, सत्य अंतरीं।' -ऐपो ३१९. **सत्यंकार**-पु. १ सत्यप्रस्थापन; खरें करणें; स्वीकार; मान्यता; रुजू करणें. २ सचकार; विसार. -शर. **सत्यजय**-सतंजय पहा. **सत्यत्वग्रह**-पु. खरेपणानें घेणें; खरें मानणें; विश्वास ठेवणें. याचे उलट मिथ्यात्वग्रह. **सत्यदर्शी**-पु. ब्रह्मज्ञान झालेला; ब्रह्मतत्त्व स्वात्मत्वें अवलोकन करणारा. **०धूत**-वि. सत्यानें पवित्र झालेलें. 'सत्यधूत बोलिजे। देखावें तें देखिजे।' -ज्ञा ६.४४५. **०नारायण**-पु एक देवता; या देवतेस नवस केला असतां तो फेडण्याकरितां या देवतेचें करावयाचें पूजन. **०नाश-नास**-पु. सर्वनाश; सर्वस्वी हानि; उच्छेद; समूळ नाश; विनाश; प्रलय; निःपात; निधन. **०निष्ठ**-वि. सत्यास न सोडणारा; सत्यास धरून राहणारा. **०प**-पु ब्रह्मदेव; सत्यलोकाधिपति. **०पांड**-न. ब्रह्मांड. 'वेष्टा धनंजयाला आत्मयशें सत्यपांडवेष्टाया।' -मोद्रोण २.२०. [सत्यप+अण्ड] **०प्रतिज्ञ**-वि. वचन पाळणारा; शब्द खरा करणारा; करारास अनुसरणारा, न मोडणारा. 'सत्यप्रतिज्ञ पांडव लागूं देती न आपगा शब्द।' -मोविराट ४.६३. **०युग**-न. चार युगांतील पहिलें युग. वर्षसंख्या १७२८०००. **०रूपी-स्वरूपी**-वि. सत्य हेंच ज्याचें शरीर आहे असा (परमेश्वर, देव, देवता) **०लोक**-पु. ब्रह्मलोक; ब्रह्मदेवाचें वसतिस्थान. 'झळंबती सत्यलोकींचे हुंडे। घाये गडबडती धोंडे।' -ज्ञा ७.८०. 'मशक त्यापुढें सत्यलोक।' -एरुस्व ३.१४. **०लोक-नायक-नाथ**-पु. ब्रह्मदेव. 'ऐसें सत्यनायकु। बोलता जाहला।' -ज्ञा ३.९३. **०लोकेशबाळा**-स्त्री सरस्वती; ब्रह्मदेवाची कुमारी. 'ऋषी पातला तेथ संतोषकाळा। सुखें शांतवी सत्यलोकेशबाळा।' -मुरामायणबाल. **०वक्ता-वचा-वादी-भाषी**-वि. खरें बोलणारा; सत्यवचनी. **०व्रत**-वि. सत्यास धरून राहणारा; खरें न सोडणारा; खऱ्यापासून न ढळणारा. **०शील**-वि. खरेपणानें वागणारा; सत्याची चाड बाळगणारा. **०संकल्प**-पु. अढळविचार; सत्यमार्गानें चालण्याचा निश्चय. 'मना सत्य संकल्प जीवीं धरावा।' -राम. 'सत्य संकल्पाचा दाता भगवान।' -वि. खरेपणानें वागण्याचा निश्चय केलेला; सत्यास धरून वागण्याचा निश्चय असणारा. **०संध**-वि. सत्यप्रतिज्ञ; सत्यव्रत; खऱ्यास अनुसरणारा; सत्यापासून न ढळणारा. **०सेतु**-पु. ज्याच्याकडे जाण्यास सत्य हाच पूल, मार्ग आहे असा (परमेश्वर). 'प्रेमळ जन प्रांजळु। सत्यसेतु सरळु। कलानिधि।' -ज्ञा १२.२४३. **सत्या**-स्त्री. शपथ. **सत्याग्रह**-पु आत्मिक बलानें अन्यायाशीं झगडून सत्याची बाजू संभाळणें; सत्य गोष्टीबद्दल कोणत्याहि विरोधास न जुमानतां सर्व मर्यादा संभाळून, सविनय मार्गानें झुंजत राहणें, **सत्यानाश**-पु. सत्यनाश पहा. **सत्यानृत**-न. खरेंखोटें; सामान्यतः जगांतील व्यवहारांत जो बरावाईट प्रकार चालतो त्यास अनुसरून हा शब्द वापरतात. [सत्य+अनृत=खोटें] **सत्यापलाप**-पु. सत्याचा अभाव; खरेपणा नसणें; खरें लपविणें. 'परंतु त्यांच्या सिद्धान्तांत सत्यापलाप बराच आहे.' -इं. रा. इ. मूळतत्त्वें फाळके ३१०. [सत्य+अपलाप] **सत्योत्तर**-न. सरळ खरें बोलणें; सत्यास स्मरून सांगणें; देवास स्मरून सांगणें; दिव्य. २ -क्रिवि. शपथेवर; प्रतिज्ञापूर्वक; सत्यास स्मरून; खरोखर. 'असो वक्तृत्वाचा अधिकार। अल्पास न घडे सत्योत्तर।' -दा ४.२.२४. [सत्य+उत्तर] **सत्योत्तरें**-क्रिवि. शपथेवर; प्रतिज्ञापूर्वक; सत्यास स्मरून.

सत्या—पु. पत्त्यांमध्यें सात ठिपके असलेलें पान. [सात]

सत्या—स्त्री. सत्यभामा. (संक्षिप्त). **सत्यापति**-पु. श्रीकृष्ण.

सत्या—पु. एक प्राणि. -अश्व २.५.

सत्याणव—वि. ९७ ही संख्या. [सं. सप्तनवति]

सत्यात्तर—वि. ७७ ही संख्या. [सं. सप्तसप्तति]

सत्यायशीं-सत्यायंशीं—वि. ८७ ही संख्या. [सं. सप्ताशीति]

सत्याल—न. सेतल पहा.

सत्याहत्तर-सत्याहात्तर—वि. ७७ ही संख्या. [सं. सप्तसप्तति]

सत्येचाळ-चाळीस-ताळ-ताळीस—वि. ४७ ही संख्या. [सं. सप्तचत्वारिंशत्]

सत्र—न. १ अनेक दिवस चालणारा यज्ञ. २ नामसंकीर्तन; भजन; नाम सप्ताह; ईश्वराचें गुणसंकीर्तन वगैरे. ३ अन्नछत्र; ब्राह्मण, वाटसरू वगैरेस अन्नदान व असें अन्नदान करण्याची जागा. ' जैसें सत्रीं अन्न झालें । कीं सामान्या वीक आलें । ' –ज्ञा १३. ७००. ४ दानधर्म; भिक्षा वाढणें वगैरे. ५ (ल.) यज्ञ. या अर्थावरून मारामारी, कापाकापी, कत्तल. [सं. सत्र=विस्तार करणें] **०प**–पु. यज्ञकर्ता. ' श्रीरामासि विलोकितां बहुसुखी होती मुनी-सत्रप । ' –मोकृष्ण १४.७८. **०शाला**–स्त्री. अन्नछत्र.

सत्रंग—सतरंग पहा. बुद्धिबळांचा खेळ. [सं. चतुरंग; सिं. सत्रज; फा. शत्रंज] **सत्रंजी, शत्रेंज**–सतरंजी पहा. ' त्याजवरी खून न जाहले, मग शत्रेंज केली ' –वाडसनदा ७०.

सत्रप—पु. सुभेदार; मंडलाधिकारी.

सत्रा—वि. १७ ही संख्या. [सं. सप्तदश] **सत्रागुरू**–पु. गुरु, मंत्रगुरु, यंत्रगुरु, तंत्रगुरू, देवगुरु, जगद्गुरु, कुलगुरु, वस्तादगुरु, राजगुरू, मालिकागुरु, विद्यागुरु, कुविद्यागुरु, असद्गुरु, यातिगुरु, मातागुरु, पितागुरु, राजागुरु. **सत्रा चवकशा**–(वाप्र.) फाजील चवकशी, विनाकारण वाजवीपेक्षां जास्त माहितीची विचारपूस.

सत्राजित—पु स्यमंतक मणि ज्यास प्रथम मिळाला तो मनुष्य. सत्यभामेचा पिता. ' सर परता आतां वो हरि । म्हणे सत्राजिताची कुमारी । ' –तुगा १४२. [सं.]

सत्रावी—स्त्री. जीवनकला; चंद्राच्या सोळा कला जीवर अधिष्ठित असतात ती मूळची कला, चंद्रबिंब; अकुल; ब्रह्मस्थानचें अमृतसरोवर; अमृतकला; कुंडलिनी. ' जे मोक्षश्रिया महामंगळा । जे सत्रावी जीवन कळा ' –दा १.३.१०. ' कां सत्रावीचें स्वानंदनीर । सेविती जैसे योगेश्वर । ' –ह ६.८५. ' सत्रावीचा पाजुनि पान्हा । ' –बयाबाई –राजबाडे ९०.[सत्रा]

संत्रा—पु. नारिंग. [फा. हिं. संगतरा; सिं. संत्तिरो]

सत्राण—पु. अवशिष्ट त्राण; जोर; बल; शक्ति; दणकटपणा; घट्टपणा; कस; सत्त्व; मजबुती; रग; धमक; दम (जीर्ण वस्त्रांतील, उपयोगलेल्या वस्तूंतील, वयातीत मनुष्यांतील वगैरे). [सं. स+त्राण] **सत्राण-णें**–क्रिवि. आवेशानें; जोराच्या प्रयत्नानें; एकवटलेल्या शक्तीनें; सर्व बळ वेंचून; मोठ्या दमानें. ' सत्वाची सुटे सत्राण । वाहुटळी । ' –ज्ञा १५.१८३. ' सत्राणें उड्डाणें हुंकार पदनीं । ' –मारुतीची आरती. ' वृक्षा भोवंडून सत्राणें । भीमा उजू टाकिला । ' –मुआदि ३७.३०. ' डमढेरे धरे सत्रानें । ' –ऐपो २६७.

सत्री—स्त्री. (गो.) छत्री. [सं. छत्र] **सत्रीसूर्यपान**–न (गो.) चवरी, अबदागीर.

संत्री—पु. हत्यारबंद पाहारेकरी. ' माजिस्ट्रेटनें पुष्कळ संत्री लोक आणवून...उभे केले ' –तीप्र ११२. [इं. सेंट्री]

सत्त्व—न. १ प्रत्येक वस्तुजातांत असलेल्या तीन गुण किंवा धर्म यांपैकीं (सत्त्व, रज, तम) पहिला. हा सर्व सद्गुणांचा द्योतक आहे. ' सत्त्वाथिलियां आंतु । सत्त्व मी म्हणे अनंतु । ' –ज्ञा १०.२८७. २ अस्तित्व; स्थिति; भाव; अर्थत्व. ३ पदार्थ; वस्तु; द्रव्य (ज्याविषयीं कांहीं गुणधर्मांचें विधान करतां येईल असें द्रव्य, वस्तु). ४ कस; सार; अर्क; सारभूत अंश; तत्त्वांश. ' नराच्या ठायीं नरत्व । जें अहंभाविये सत्त्व । ' –ज्ञा ७.३५. ' गुळवेलीचें सत्त्व '. ५ बल; तेज; अभिमान; शक्ति; तत्त्व; जीवंतपणा; पाणी. ' दिसतें सत्त्व असें कीं पडतां न चळेल हेमनगहि वर । ' –मोवन ४.२६०. ६ स्वभाव; स्वभाविक गुणधर्म. ' सत्त्व टाकिती भाग्यवंत सकळ । चोर पुष्कळ सुटले । ' –ह २९.३२. ७ खरेपणा; सद्गुण; थोरपणा. ' आलिया अतितां म्हणतसां पुढें । आपुलें रोकडें सत्त्व जाय । '–तुगा१२४८. ' याचें स्थिर असो सदा सत्त्व । ' –मोसभा ६.४२. [सं. अस्] **सत्त्व घेणें-पाहणें**–कसून परीक्षा घेणें; प्रचीति घेणें; एखाद्याचा बाणा किंवा अभिमान किती टिकतो याची परीक्षा पाहणें. **सत्त्व सोडणें**–बल, कस, जोर, भरीवपणा, स्वाभाविक गुणधर्म नाहींसे होणें (जमीन, औषध, मंत्र, देव, मूर्ति वगैरे संबंधीं योजतात). **सत्त्वास जागणें**–सत्त्व राखणें; अडचणीच्या प्रसंगींहि आपला मूळ स्वभाव, सद्गुण, अभिमान, नीतिधैर्य, वर्तन यांपासून न ढळणें. ' सत्परिचयेंच जडही समयीं सत्त्वास जागलें हो तें । '–मो. **०गुण**–पु. पदार्थमात्रांतील तीन गुणांपैकीं पहिला गुण. ' शुद्ध नेणीव तमोगुण । शुद्ध जाणीव सत्त्व गुण । ' –दा २०.३.७. **०गुणी**–वि. सत्त्वगुण ज्यांत विशेष आहे असा. **०धीर**–वि. सत्य, इमान, औदार्य, पातिव्रत्य इत्यादि सद्गुण निश्चयानें राखणारा; सत्त्व कधींहि न सोडणारा; सद्गुणी; धैर्यशील; दृढनिश्चयी. **०निष्ठ**–वि. सत्त्व न सोडणारा; सद्गुणी; सचोटीचा; प्रामाणिक वगैरे. **०पर**–वि. सत्त्वास जागणारे. ' जे जे असा सत्त्वपर । ' –उषा ६२. **०मूर्ति**–स्त्री. सत्त्वशील; सत्त्वनिष्ठ, सद्गुणी; प्रामाणिक असा मनुष्य. **०रक्षण**–न. सद्गुण, सत्य, मान, इत्यादि गुणांचें परिपालन; अडचणींतहि सत्त्व न सोडणें. **०वान-वंत**–वि. सत्त्वगुणी; बल, धैर्य, कस, सार, तत्त्व असलेला. **०शील-सीळ**–वि. १ सद्गुणी; प्रामाणिक; नीतिनियमानें वागणारा, सत्प्रवृत्त. ' पवित्र आणि सत्त्वसीळ । ' –दा १.८.१९. २ ज्यांतील कस, किंवा गुणधर्म दीर्घ कालपर्यंत टिकतात असा (पदार्थ, वस्तु). **०शुद्ध**–वि. शुद्ध केलेलें; आंतील निकस भाग

काढून सतेज केलेलें (औषध वगैरे). **०शुद्धि-शोधन**-स्त्रीन. औषधी, अथवा वनस्पती वगैरेंची विशुद्धि, स्वच्छ करणें; निकस भाग काढून टाकून सतेज करणें. 'तैसी ते सत्त्वशुद्धि। आगळी ज्ञानेंसी वृद्धि।' -ज्ञा १४.२२२. २ अंतःकरणशुद्धि.' आतां सत्त्व शुद्धि म्हणिजे। ते ऐशा चिन्हीं जाणिजे। तरी जळे ना विझे। राखोडी जैसी।' -ज्ञा १६.७४. **०संपन्न**-वि. सद्गुणी; सद्वर्तनी: बलयुक्त; सत्त्वांशानें परिपूर्ण. **०स्थ**-वि. १ सद्गुणी; नीतिमान्; सदाचारसंपन्न. २ पथ्यकर; पुष्टिकारक; हितकर; शक्तिवर्धक (अन्न, पदार्थ वगैरे) **०हरण**-न. (शब्दशः व ल.) सद्गुण, उत्कृष्टपणा, शील, कीर्ति, मान वगैरेची नागवणूक, हिरावून घेणें; त्याचा त्याग करणें; सदाचाराविषयीं लौकिकाची हानि. **०हानि**-स्त्री. (शब्दः व ल.) सद्गुण, सत्यनिष्ठा, निष्कर्ष, सार वगैरेचा नाश. **०हीन**-वि. निकृष्ट; निकस; गुण, तेज, बल रहित; निःसत्त्व; तेजोहीन; तत्त्वभ्रष्ट. 'सत्त्वहीन मी बहुतापरी। बुद्धि अधोर असे, माझी।' **०क्ष(क्षे)मु**-वि. सत्त्वगुणसंपन्न. 'देहीं सत्त्वक्षेमु। आरु जैसा।'-भाए ३३५. **सत्त्वागळा**-वि. सात्त्विक; 'सत्त्वधीर सत्त्वागळी।'-दा १.८.२२. **सत्त्वाथिला**-वि. सत्त्वस्थ; सद्गुणी; सत्त्वगुणयुक्त; सात्त्विक. 'सत्त्वाथिलिया आंतु। सत्त्व मी म्हणे अनंतु।'-ज्ञा १०.२८७. 'सत्त्वाथिला शिबिनृपाळा।'-आशिबि ६६.४. 'त्यागुणें विष्णुभक्त सत्त्वाथिला'-ह ३४.१०. **सत्त्वान्न**-न. पथ्यकर व पौष्टिक खाद्य. **सत्त्वापत्ति**-स्त्री. ज्ञानी जीवाच्या सप्तभूमिकांतील चौथी भूमिका. -हंको. **सत्त्वाशुंठी**-स्त्री. १ निरनिराळीं औषधी द्रव्यें घेऊन तयार केलेली एक प्रकारची सुंठ. २ आंतील सर्व कस कायम राहील अशा प्रकारें आल्याची बनविलेली सुंठ. ३ ज्यास नेहमीं औषधें द्यावीं लागतात असें रोगट मूल (विशेषणाप्रमाणें उपयोग). **सत्त्वाश्रित**-वि. सद्गुणी व सचोटीचा; प्रामाणिक; विश्वासु; नीतिमान; शुद्ध वर्तनाचा. **सत्त्वाची चांगुणा**-स्त्री. साध्वी, सद्गुणी स्त्री. [श्रियाळस्त्री चांगुणा या विशेषनामावरून] **सत्त्वाची सावित्री**-स्त्री. पतिव्रता व सद्गुणी स्त्री. [सावित्री या प्रसिद्ध पवित्रता स्त्रीवरून]

सत्वर—वि. चपल; चलाख; तडफदार; वेगवान; जलद. -क्रिवि. जलदीनें; लौकर; ताबडतोब; शीघ्र. [सं. स+त्वरा] **सत्वर होऊन**-क्रिवि. उत्सुकतेनें; तडफेनें; ताबाडतोब; जलदीनें; चपलतेनें; उतावीळपणें. **सत्वरी**-क्रिवि. जलदीनें; ताबडतोब; लवकर.

सत्सष्ट—वि. सतसष्ट; सदुसष्ट; ६७ ही संख्या [सं. सप्त षष्टि]

सत्ळी— पुस्त्री. सळई; शलाका; शल्य. 'तो सुरणांतु सत्ळी घालावा.' -वैद्यक बाड ८१.८८.

संथ—वि. मंद; सावकाश चालणारा; धिमा; थंड. [सं. शम्-शांत-संथ] **संथावणें**-उक्रि. १ शांत, स्थिर करणें; शांतवन करणें; २ संथ, थंड, मंद होणें; अतिशय सावकाश चालणें.

संथळ—न. सपाट जमीन; मैदान; पठार; एका पातळींतील जागा, जमीन. [सं. सम+तल, स्थल-स्थळ]

संथा—स्त्री. पाठ; रोजचा अध्ययन करावयाचा थोडा थोडा भाग; पठनक्रिया; घोकंपट्टी. (क्रि० देणें; घेणें; पाठ केलेला विषय). 'वक्ता सभास्थानीं उभा राहिला कीं तो आपल्या संथेस आरंभ करतो.'-नि ३२५. [सं. सम्+स्था]

सथाउं, सथावां—वि. आवेशयुक्त; जोरदार; जलद; चपल. 'तो सथाउं धोटा। न साहे आंगा सानटा।' -शिशु ५७२. 'नीगतां सथावां गतीं। आसुडितां दोहो हातीं।' -शिशु ५३३. [?]

सद्—स्त्री. सभा; समुदाय. 'सावित्रीनें कथिलें तें वृत्त अशेष साधुसद नमुनीं।' -मोवन १३.१०२. [सं.] **सदस्य**-पु. १ सभासद; मंडळींतील, सभेंतील व्यक्ति. २ यज्ञांतील एक ऋत्विज.

सद—वि. शंभर. -आदिलशाही फर्मानें. [फा.]

संद—स्त्री. सांधा; फट; चीर. 'जे मग बाळुन संद भरिजे' -वैद्यक बाड १०.८२. [सं. सम्+धा]

संदक, संदूक—स्त्री. पेटी. 'नररत्नाचे संदक' -वेसीस्व ९.५५.

सदका—पु. दानधर्म; ओंवाळून टाकलेली वस्तु. सत्का पहा. **गाढवाचा सदका-शाहण्याचा सदका**-कुचकामी, निरुपयोगी, क्षुल्लक वस्तु; क्षुल्लक, क्षुद्र, कुचकामी मनुष्य अशा अर्थीहि हा शब्द वापरतात. उदा० मोठा शेला देणाऱ्याचा सदका मला ठाऊक आहे ? [अर. सदका]

सदगरम—वि. (ना.) (प्र.) सरदगरम; समशीतोष्ण; सौम्य; कोंबट. [सर्द+गरम]

सदट—वि. १ सघट; बळकट; घट्ट; सुदृढ. 'वोळखी होता सदट। सुटोनि गेला अंतःपट।' -कथा ६.१४.६१. 'जैसें चंद्रा आड आभाळ। सदट दाटे सजळ।' -ज्ञा ८.२२९. २ मोठा; भारी; जड. [सं. सदृढ]

सदंड—वि. दंड हातांत असलेला. 'तशी न इतरास भी जरि सदंडही हाकिती।' -केका ५४. [सं.]

सदतीस—वि. सततीस पहा. ३७ ही संख्या. [सं. सप्तत्रिंशत्]

सदन—न. घर; वसतिस्थान; निवासस्थान; गृह. 'मातें भजतां सदना। माझिया येती।' -ज्ञा ९.४७४. [सं.]

सदन्न-न—न. चांगलें अन्न; पौष्टिक अन्न. 'ऐसेनि कहीं विपायें। सदन्ना वरपडा होये। तरी घाणी सुटे तंव राहे। व्याघ्रु

जैसा।' –ज्ञा १७.१५८. 'न म्हणे शिळें उन्ह। सदन कां कदन।' –भाए २७७. [सं. सत्+अन्न]

संवपड, संवपडीत—वि.स्त्रीन. सनवदपडीत, सनवातपडीत पहा.

सदंभ—वि. दांभिक; ढोंगी; पोकळ डौल आणणारा. [सं. स+दंभ]

सदभ्यास—पु. चांगली संवय; चांगला अभ्यास; सदाचार. 'तेंवि सदभ्यासें निरंतर। चित्तासि परमपुरुषाची मोहर।' –ज्ञा ८.८२. [सं. सत्+अभ्यास]

सदमा, सध्मा—पु. अनर्थ; धक्का. 'त्याचे चालीचा वोघ पहावा तोंच जो सदमा गुजरला हा जाहीरच आहे.' –ऐटि ३.१७. [अर. सदमा]

सदमुख, सदनुषु—क्रिवि. सन्मुख; समोर. 'बैसला ईश्वरा सदमुषु।' –उषा ९७. [सं. सत्+मुख]

सदय—वि. दयाळु; कृपाळु. [सं. स+दया] **सदयता**–स्त्री. कृपाळुपणा; दयाळुपणा. 'कैसी नेणो सदयता। उपनली तेथें चित्ता।' –ज्ञा १.२०५.

सदर—स्त्री. १ मुख्य सभा; राजसभा; राजसभास्थान; मुख्य कचेरी. 'दुसरे दिवशीं राजे सदरेंत बैसले.' –सभा १२. २ मुख्य, वरिष्ठ, श्रेष्ठ कचेरी, न्यायासन. उदा० सदर अदालत; सदर निजामत –न. १ रकाना; कलम (हिशोबांतील). २ बाब; विल्हा; प्रकरण; खातें. –क्रिवि. सर्वसाधारण; सामान्यपणें; कोण तीहि मर्यादा न घालतां; पूर्णपणें; सरास. उदा० सदरपरवानगी, सदरराजा, सदरताकीद, सदरहुकूम, सदरमाफी. –वि. मुख्य; वरिष्ठ; श्रेष्ठ (समासांत). उदा० सदरहबालदार, सदरअंमल, सदरजमादार. [अर. सद्र] **सदरेस असणें**–नोकरीस असणें; दिमतीस असणें. **०अदालत**–स्त्री. दिवाणी कोर्ट. **०अमीन**–पु. दिवाणी कोर्टाचा न्यायाधीश (सध्याच्या सबजज्जाच्या हुद्याचा). **०असामी**–स्त्री. ऐपतदार, वजनदार गृहस्थ. **०कनज्यास्ती**–स्त्री. हिशोबांतील, दोन सदरांतील फरक, अंतर. **०घडणी**–स्त्री. जमाखर्चाची सदरवार, खातेवार मांडणी. **०जुमला**–पु. खात्याची, सदराची एकुणात, वट बेरीज. **०ताळा**–पु. सर्व खात्यांच्या रकमांचा मेळ; सर्व खात्यांची एकुणात. **०प्रमाणें**–क्रिवि. वर दिलेल्याप्रमाणें; वर उल्लिखित पद्धतीनें, रीतीनें. **०बजार–बाजार**–पु. ब्रिटिश लष्करी छावणींतील बाजारास सामान्यतः म्हणतात. **०बारगीर**–पु १ न्यायकचेरींतील पहारेकरी; कचेरींतील पाह-यावरील घोडेस्वार. २ (ल.) निरुपयोगी, बेकामी इसम; शोभेकरितां बाळगलेला मनुष्य. **०भेट**–स्त्री. सरकारी अधिकाऱ्यांस देणगी म्हणून गांवच्या साऱ्यावर अधिक घ्यावयाचा एक कर. **०मुखी**–अप. शूद्रमुखी पहा. **०रकम**–स्त्री. खात्याची, रकान्याची एकुणात; एखाद्या मुख्य बाबीची एकूण रक्कम. **०वार**–क्रिवि. कलमवार; खातेवार; बाबवारीनें. **०हजारी**–पु. हजार लोकांवरचा अधिकारी. **सदरेची खोली**–स्त्री. दिवाणखान्याच्या पुढील खोली; उपसभागृह; सभासीमगृह. सभागृहाजवळील लहान दालन. **सदरेवर**–क्रिवि. उघड्यावर; मोकळ्या जागीं; पठारावर. घांटमाथा सदरेवर सरंजाम पाठऊन ...' –वाड दुवा ५.९३. **सदरेस**–क्रिवि. कचेरींत; दरबारांत; सभेस. 'अमृतसिद्धि योगाचे मुहूर्तें सदरेस येऊन बैसले.' –वाडशारो १.३७.

सदर—स्त्री. सरहद्दबद्दल चुकीनें उपयोग. शीव; सीमा; दिशा. –पया १९२; –शिदं २८५.

सदर—वि. (व.) सर्व; सगळें. [अर. सद्र]

सदरहू—क्रिवि. प्रत्येक कलमाप्रमाणें; कलमाबरहुकूम; निर्देशिल्याप्रमाणें; वरच्याप्रमाणें; उपरि निर्दिष्ट केल्याप्रमाणें; पूर्वप्रमाण, उपर्युक्त [अर. सद्र, फा. सदहू] **सदरहू प्रमाणें**–क्रिवि. सदरप्रमाणें; कलमवार दर्शविल्याप्रमाणें; वरीलप्रमाणें.

सदरा—पु अंगरखा, कोट, यांच्या आंत घालावयाचा कपडा; पातळ पैरण. [अर. सुद्रा]

संदर्भ—पु. १ (कथानक, कथाभाग, व्यक्ति, वाक्यांतील भाग यांचा) संबंध; अनुसंधान; संगति. २ योजना; बेत; कल्पना; संधान (विवाहसंबंध घडवून आणण्यासंबंधी). ३ सूत्र; शिल-शिला; बोलाचाली; मसलत (तह वगैरेसंबंधी). ४ गुंफण; जोडणी; रचना; ग्रथन. [सं. सम्+दृभ्=रचणें] **०विरुद्ध**–वि. विसंगत; असंबद्ध; विजोड; न जुळणारें. **०शुद्ध**–वि. सुसंगत; संबद्ध; संलग्न; सजोड; सहज जुळणारें, मिळणारें. **०शुद्धि**–स्त्री. सुसंगति; योग्य जोड, मिलाफ; सरळ, योग्य, जुळणारा संबंध.

संदल—न. एक विशिष्ट प्रकारचें भांडें. [सं. सम्+दल]

संदल—न. चंदन. [अर. संदल] **संदली**–स्त्री. एक तऱ्हेची खुर्ची. –पु. खोजा; षंढ. –वि. चंदनी रंगाचा (घोडा). –अश्वप १.२८.

संदल—पु. (व.) पीराचा उरूस, उत्सव. [अर. संदल]

संदला—पु. (प्र.) संधला. १ दरजा वगैरे भरण्यासाठीं, गिलावा साफ करण्यासाठीं मुद्दाम गाळून व धोदून तयार केलेला चुना. २ अशा चुन्याचा लेप. [सं. सम्+धा]

सदलाबदल—स्त्री. (प्र.) अदलाबदल पहा.

संदंश (हस्त)—पु. (नृत्य) आंगठा व तर्जनी यांचीं अग्रें जवळ आणणें व बाकीचीं बोटें उभीं पसरून तळहात खोलगट करणें. [सं.]

संदष्टक (अधर)—पु. (नृत्य) अधर चावणें. [सं.]

संदष्टत्व—न. (संगीत) गातांना दांत खाणें. [सं.]

सदसत्—वि. १ खरेंखोटें. २ वास्तविक किंवा अवास्तविक; अस्तित्वांत असलेलें किंवा नसलेलें; वास्तव अथवा अवास्तव. [सं.] **सदसद्विचार-सदसद्विवेक**-पु. बरें कोणतें, वाईट कोणतें, खरें कोणतें, खोटें कोणतें यासंबंधीं विचार. [सं.] **सदसद्विचारशक्ति**-स्त्री. खरें कोणतें खोटें कोणतें यासंबंधीं विचार करण्याची मानसिक शक्ति; मनोदेवता. (इं.) कॉनशन्स. [सं.] **सदसन्निर्णय**-पु. योग्यायोग्य यासंबंधीं निश्चय; बरें वाईट कोणतें याची निवड. 'त्या ठिकाणीं सदसन्निर्णय व विचारशक्ति यांची प्रतिष्ठा व मातब्बरी ती काय राहिली.' -पार्लमेंट १८०.

सदसद्—वि. (व.) नरम; लिबलिबित.

सदसष्ट—वि. सतसष्ट; ६७ ही संख्या. [सं. सप्तषष्टि]

सदसी—पुस्त्री. तलवार. 'नाहीं अद्यापि झळकला सदसी।' -मोविराट ३.३७. [सं. सत्+असि]

सदळ—वि. दाट; जाड; ठोसर. 'सपुर स्वोजिएचें चोखट। फेडुनि सदळ कांठ।' -ऋ ८०. [सं. स+दल]

सदा-दां—क्रिवि. नेहमीं; सदोदित; निरंतर; सतत. 'हा सदां पाणिबुडा। युधिष्ठिरूं साबडा।' -शिशु ८९४. 'सदा सर्वदा योग तूझा घडावा।' -राम. सदाकष्टी, सदादुःखी, सदाभोगी, सदारडया, सदारोगी, सदानंदी, सदाशुचि, सदासुखी असे याचे समासहि होतात. **म्हo** १ सदा पीक सदा भीक = कुणब्याचें कितीहि पीक आलें तरी दारिद्र्य जात नाहीं. २ सदा मरे त्याला कोण रडे = दुःखाची कांहीं काळानें संवय होते या अर्थी. **सदा त्रिकाळ**-नेहमीं; सतत; निरंतर; तिन्ही त्रिकाळ; सकाळ, दुपार, संध्याकाळ (विशेष जोर दाखविण्याकरितां योजतात). **सदाकदा, सदानकदा, सदाकाळ**-क्रिवि. नेहमीं; निरंतर; सतत; सदोदित. **सदावक्र**-वि. नेहमीं वांकडा, दुर्मुखलेला, रुसलेला, हट्टी; कष्टी; उदास. **सदा खाटलेकरी**-वि. बिछान्यास खिळलेला. **सदागति**-वि. नेहमीं भ्रमण करणारा; सारखा गतिमान असणारा (हवा, वारा). **सदातन**-वि. चिरंतन; शाश्वत; निरंतरचा; कायमचा. **सदाफळ**-वि. नेहमीं फळें देणारें. 'झोडती दाटें झाडें। सदाफळ तीं।' -ज्ञा ६.१७३. **सदासर्वदा**-क्रिवि. नेहमीं; सतत. **सदासिद्ध**-वि. शाश्वत; चिरंतन (परमेश्वर).

सदाकत—स्त्री. प्रामाणिकपणा; विश्वास. [अर.] **सदाकत-दस्त-गाहू**-वि. विश्वासपात्र; प्रामाणिकपणाचा निधि; (एक पदवी). 'सदाकत् दस्तगाहू नरसिंगराव तमाजी.' -पया ४६७.

सदागुलाब—पु. एक प्रकारचें गुलाबाचें झाड व फूल. [सं. सदा+फा. गुलाब]

सदाचरण—न. योग्य वर्तन; चांगली वागणूक; नैतिक वागणूक; शिष्टाचार. [सं. सत्+आचरण] **सदाचरण-णी**-वि. योग्य वर्तन करणारा. **सदाचार**-पु १ योग्य, नीतिपर, शिष्टपणाची वर्तणूक, वागणूक. २ चांगली पद्धति, वहिवाट, रूढि; शास्त्रसंमत, शिष्टसंमत वागण्याची रीत, पद्धति, चाल. ३ (मनु.) सरस्वती व दृषद्वती या दोन नद्यांच्या मध्यें राहणाऱ्या लोकांची जी आचारपद्धति, वागण्याची रीत, रूढि, चाली वगैरे ती. [सं. सत्+आचार] **सदाचार-री**-वि. सद्वर्तनी; चांगली वागणूक असणारा.

संदाणी, संदान—स्त्रीन. लोहाराची मायणी, विडी, कडया वगैरे करण्याची लहान ऐरण. शिंगाडा व सामान्य ऐरणीहून भिन्न. संधन पहा. [फा. सन्दान; सं. सम्+धा]

सदाफुली—स्त्री. एक वेल व फुलझाड, हीं नेहमीं फुलें देतात.

सदार—वि. ऐपतदार; देण्यालायक; नादार याच्या उलट. **सदारी**-स्त्री. ऐपत; देण्यास लायक असण्याची स्थिति; संपन्नता. [फा. दार्]

सदारत्—स्त्री. मुख्य प्रधानकी; मुख्य प्रधानपद. [अर. सदारत्]

सदावर—वि. (व.) योग्य; ठीक. 'यांचें बोलणें सदावर दिसतें.'

सदावर्त—न. अन्नछत्र; अन्नसत्र; आल्यागेल्यास अन्न देणारी संस्था. 'म्हणे जीव गेला मीन नाथ। तरी यांचें घालो सदावर्त।' -नव २२.१३९. [सं. सदा+व्रत किंवा वृत्ति] **सदावर्ती**-वि. सदावर्तासंबंधी.

सदावील—क्रिवि. नेहमीं; सदोदित. [सदा+वेळ]

सदाशिव—पु. शंकर; शिव; महादेव. [सं.]

संदाळणें—उक्रि. घट्ट बांधणें; घट्ट ठेंचून पुरणें, रोवणें; भोंवतीं दगड, माती घालून ठोकून घट्ट बसविणें. [सं. सम्+धा]

संदिग्ध—वि. संशयित; अस्पष्ट; अनिश्चित. [सं.] **०मति**-वि. १ संशयित बुद्धीचा; संशयात्मा; नास्तीक. २ साशंक मनाचा; अनिश्चित बुद्धीचा; विकल्पी. **०लेख्य-लेख**-नपु. (कायदा) संशयित अर्थाचें लिखाण, दस्तैवज. **संदिग्धार्थ**-पु. १ शंकास्पद स्पष्टीकरण, विवेचन; अनिश्चित विवरण; सुस्पष्ट नव्हे असें भाष्य, टीका. २ संशयित कर्ज; विवादित कर्ज.

संदिष्ट—धावि. सांगितलेलें; निवेदिलेलें; निर्दिष्ट केलेलें; आज्ञापिलेला (संदेश, माहिती, बातमी).

संदिसां-सें—क्रिवि. आतांच; यावेळीं; याक्षणीं; नुकतेंच. 'वांझपण संदिसें गेलें।' -दा ३३.३९. [सं. सद्यः; सद्यशः]

सदी—स्त्री. शतक. 'बारावी सदी आजच भरली म्हणून बहुत खेद केला.' –चित्रगुप्त १०९. [फा. सदी; तुल सं.शतम्]

सदी-ही—स्त्री. भरभराट; अनुकूल काल; संपन्नता; सुदैव: यशस्विता. [अर]

सदीं—क्रिवि. नेहमीं; नित्य; सतत; सदा. [सं.]

संदी—वि. (प्र.) सनदी पहा.

संदी—स्त्री. सांद; कोनकोपरा; अडचणीची जागा; सांध्याची जागा. 'दोहो देवळांचिए संदी।' –ऋ ११५. [सं. संधि]

संदीकळासु–स्त्री. सांध्याची कळाशी; सांध्यार्चीं हाडें. 'संदीकळासु गडबडी।' –भाए २०४.

संदीपनी—स्त्री. (संगीत) १ सोळाव्या श्रुतीचें नांव. –पु. २ श्रीकृष्णाच्या गुरूचें नांव. [सं. सम्+दीप्]

संदीवाल—पु. एक हुद्दा; अधिकार. 'हजारी संदीवाल व जमातदार दहा पंधरा यांस वस्त्रें.' –वाडबाबा ३.७७. [अर.]

सदीस—क्रिवि. दिवसभर; सतत; नेहमीं. [स+दिवस]

संदु—पु. (अप.) छंद; नाद. 'नाहीं आर्ति निर्वेदु। न संडी विषयसंदु।' –ऋ ७. [सं. छंद]

संदुक-दूक—स्त्री. पेटी. 'संदुक मांदुसा अलंकार।' –वेसीस्व ७.६. [अर. संदूक]

सदुक्ति—स्त्री. चांगलें भाषण. –एभा ३१.२५०. [सं.]

सदुतें—वि. सिद्ध; तयार. 'बंदुका दारुगोळा आदिकरून आरमारी प्रयोजनी सामान यथेष्ट व सदुतें करावें.' –मराआ ३४. [सं. सिद्ध; फा. इस्तेदाद]

सदुसष्ट—वि. ६७ ही संख्या. [सं. सप्त+षष्टि]

सदृढ—वि. बळकट; मजबूद; भरीव; गच्च; घट्ट. [सं. सु+दृढ]

सदृश—वि. सारखा; सम; तुल्य. (समासांत). एतत्सदृश; तत्सदृश; पितृसदृश. [सं.]

सदे—क्रिवि. शेंकडा; दरसदे=दरशेकडयास. [फा. सदि=शंभर]

सदेठ—क्रिवि. देंठासह; डेंखासकट. 'मिथ्या बादार्चीं अपक्व फळें।... सदेठीं झड पूर्वकांळें।' –एभा १०.२२३. ११.६६९.

सदेव-वा—क्रिवि. नेहमीं, सतत; सदैव. 'त्या गोपिकाही असती सदेवा।' –सारुह ४.२१. [सं. सदा+एव]

सदेव—वि. दैववान्; भाग्यशाली. 'आतां ऐका सदेव लक्षण। सौख्यदायक।' –दा १९.४.१. २ उत्तम शाहणा. 'ऐक सदेवपणाचें लक्षण।' –दा ११ ३.२४. [स+दैव]

सदेश—वि. एकाच देशचा; तद्देशीय. [स+देश]

संदेश-सा—पु. निरोप; बातमी; वृत्त; वार्ता; आज्ञा. 'येके दिवशीं संदेश केला।' –सप्र ७.२८. [सं सम्+दिश्] **०हर**–पु. वार्ताहर; बातमीदार; निरोप्या; जासूद.

संदेसा—संदिसा पहा.

संदेह—पु. संशय; शंका; अनिश्चितपणा; साशंकता. 'तैसें तोडावया संदेह। तीख जैसें का लोह।' –ज्ञा १६.११८. [सं.]

संदेही–वि. संशयी; गोंधळलेला; शंकेखोर.

सदैव—क्रिवि. नेहमीं; सतत; नित्य; सर्वकाळ; सदोदित. [सं. सदा+एव]

सदैव—वि. दैववान्; नशीबवान; भाग्यशाली. 'परी फळला मनोधर्म। सदैवांचा।' –विपू ७.१५४. [सं. स+दैव] **म्ह०** सदैवाची दशी नरदेवाचा पालव (लागावा).

सदोदि(दी)त—क्रिवि. नेहमीं; सतत; सदा. 'तेणें ब्रह्मरसे राजमठ। देखों सदोदीतु।' –ऋ ४३. [सं. सदा+उदित]

संदोर—पु. (व.) मोठा दोर; परित्यावर घातलेलें तागाचें मोठें चऱ्हाट. सौंदर. [सौंड+दोर]

संदोली—स्त्री. पेटी; संदूक.

सदोष—वि. १ दोषयुक्त; अपुरा; उणीव, कमीपणा, न्यून असलेला. २ चुकीचें; सापराध; गुन्हेगारीचें. [सं. स+दोष]

संदोह—पु. समुदाय; समूह; जमाव; रास; ढीग; निधि; सांठा. उदा० आनंदसंदोह; दुःखसंदोह. [सं.]

सद्गत—स्त्री. (सद्गति याचा संक्षेप). उपाय; मार्ग; तरणोपाय; गत्यंतर; इलाज; सोडवणूक; सोय; आश्रयस्थान. 'कारकुनास चाकरी केल्याशिवाय सद्गत नाहीं'. सतनागत या वाक्प्रचाराचाहि हाच अर्थ आहे. [सद्गति]

सद्गति—स्त्री. चांगली गति; मरणोत्तर सुखावह अवस्था; गोक्षप्राप्ति; स्वर्गप्राप्ति; सुस्थितींत, उच्च जातींत पुनर्जन्म; परलोकप्राप्ति; मरणोत्तर कोणतीहि चांगली दशा. 'होतां वृथा प्रतिज्ञा सद्गति न घडो मला घडो पतन।' –मोकर्ण ३५.४६. [सं. सत्+गति]

सद्गद—वि. अवरुद्ध; सद्गदित; कंठ दाटून आल्यामुळें अडखळलेली (स्थिति). 'मग म्हणतसे प्रसीद प्रसीद। वाचा होतसे सद्गद।' –ज्ञा ११.५६८. [सं. सत+गद]

सद्गदित—वि. दुःख, शोक वगैरेमुळें कंठ दाटून आलेला; कंठ भरून आलेला; दुःखाकुल; शोकाकुल; बाष्पसंयुत. [सं.]

सद्गीत—न. आध्यात्मिक, पवित्र, देवादिकांसंबंधीं गाणें, स्तोत्र, सूक्त, भजन. [सं.]

सद्गुण—पु. विद्या, कला, शौर्य, सहिष्णुता, उपकारकता इत्यादिसारखा उत्तम गुण; चांगला गुणधर्म; चांगलें तत्त्व. ['सं. सत्+गुण्=मोजणें]

सद्गुरु—पु. आध्यात्मिक ज्ञानाची प्राप्ति करून देणारा, ईश्वरप्राप्तीचा मार्गदर्शक, अज्ञान नाहींसें करणारा उपदेशक, चांगलें ज्ञान, विद्या, उपदेश देणारा गुरु. [सं. सद्+गुरु]

सद्गृहस्थ—पु. प्रतिष्ठित, भला, प्रामाणिक, विश्वासु, सन्मान्य, सद्वर्तनी, प्रेमळ, सौम्य मनुष्य. [सं. सत्+गृहस्थ]

सतजबाब—पु. (कायदा) उत्तरपक्ष; कैफियत; सयुक्तिक प्रत्युत्तर. [सं. सत्+फा. जबाब]

सद्दट—वि. सदट, सघट पहा. घट्ट, मजबूत. ' दंत शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट । ' –दा १.२.१५.

सद्दर—वि. (खा.) सदर पहा. सर्व; परिपूर्ण.

सद्दा—पु. मोहरमांत ताबुतांच्या पुढें नेतात तीं निशाणें. [अर. शद्दा]

सद्दी—स्त्री. शतक; शेंकडा. [फा. सदि=शतक; तुल. सं. शतम्] **दरसद्दे**–क्रिवि. दरशेंकडा. ' वसुल देत आहेत त्यापैकीं दरसद्दे चाळीस... ' –वसईची मोहीम.

सद्दी—स्त्री. चलती; भरभराट; भाग्यकाल; अनुकूल परिस्थिति; सुदैव; सद्भाग्य; वैभवकाल; उत्कर्षकाल. ' रोमन लोकांनींहि दीड हजार वर्षे राज्य भोगल्यावर त्यांची सद्दी संपली. ' –नि ६६. ' होते शिपाई जबर सद्दी कैकांनीं पाहिली । ' –ऐपो ४२३. [अर. सअद=चलती; ग्रहाची शुभदृष्टि; शुभवेला]

सद्धर्म—पु. १ चांगला गुणधर्म; सुलक्षण. २ चांगला धर्म; चांगला नियम, वृत्ति, विधि. ३ सदाचार; चांगली वागणूक; सदाचरण; न्याय्य वर्तन. [सं.] **सद्धर्म बाळगणें-संभाळणें-राखणें**–धार्मिक विधि, नियम, व्रत वगैरे आचरणें. **सद्धर्म सोडणें-टाकणें**–धार्मिक विधि, रूढी, व्रतें, नियम यांचा त्याग करणें. **सद्धर्मानें वागणें-चालणें-राहणें-असणें**–न्याय, योग्य, रास्त वर्तन करणें; सदाचारी होणें. **सद्धर्माला जागणें**–योग्य, प्रामाणिक, नैतिक आचरण ठेवणें. **सद्धर्मास येणें**–नैतिक, धार्मिक, प्रामाणिक वर्तनाच्या कसोटीस उतरणें; योग्य, रास्त दिसणें, वाटणें. **सद्धर्मावर टाकणें-घालणें-लोटणें-सोडणें**–एखाद्याच्या सदसद्विवेकबुद्धीवर अवलंबून ठेवणें; सदसद्विवेकबुद्धीचा आश्रय घेणें; सद्बुद्धीवर सोंपविणें. **सद्धर्मी**–वि. सद्गुणी; न्यायी; नीतिमान; योग्य वर्तनाचा.

सद्धया, सद्धयां—क्रिवि. आतांच; या क्षणीं; या घटकेस; यावेळीं; सांप्रत. [सं. सद्यः]

सद्बुद्धि—स्त्री. १ चांगली, शुद्ध बुद्धि, मन, विचार. २ सत्प्रवृत्ति; नीतिपरायणता; न्यायपरायणता; योग्य दिशेकडे कल. –वि. चांगली बुद्धि, प्रवृत्ति, विचार, मन असलेला. [सं. सत्+बुद्धि]

सद्भक्त—पु चांगला भक्त; शुद्ध अंतःकरणानें, अनन्य, एकनिष्ठपणें भक्ति करणारा; मनापासुन स्नेह, मैत्री करणारा. [सं.] **सद्भक्ति**–स्त्री. अन्तःकरणापासुन, अनन्य भक्ति, भाव, प्रेमळपणा, लोभ. –वि. अन्तःकरणपूर्वक लोभ, प्रेम करणारा; भाव ठेवणारा.

सद्भाव—पु. १ अस्तित्व; स्थिति. ' म्हणोनि अज्ञान सद्भावो । कोणे परी न लाहो । ' –अभृ ७.२९३. २ साधुत्व; सद्गुणीपणा; सुस्वभाव; सुशीलता. ३ चांगली मनोवृत्ति; श्रद्धा; सद्वृत्ति. ' जे इये स्वप्नींहूनि सद्भावा । नेदावें निर्घो । ' –ज्ञा ११.६३७. ४ सत्य, योग्य अनुभव; प्रतीति. ' हें आलें मज सद्भावा । आतां तूंचि सर्व । ' –ज्ञा ११ ५३६. [सं. सत्+भाव]

सद्म—न. गृह; घर; सदन. ' धरी सद्म मानी जया नित्य पद्मा । ' –वामन, भरतभाव. [सं.]

सद्य, सद्यः—क्रिवि. १ तात्काल; त्वरित; क्षणांत; ताबडतोब; सांप्रत; या क्षणीं. ' अपूर्व फळें अर्पी सद्य । तो सत्त्वगुण । ' –दा २.७.२९. ' न देववे जाशिल सद्य पापा । ' –वामन, वामनावतार १५. २ (चुकीनें) साजुक; ताजें; अलीकडील; नुकेंच. [सं. सद्यः] **सद्यःपक्ष**–पु. (विधिसंबंधीं) १ मुख्य कर्माचीं उपांगें आधीं किंवा मागाहून न करतां तत्तत्प्रसंगीं करावीं असें मानणारा पक्ष. २ अशा तऱ्हेनें कर्माचा अपकर्ष किंवा एखादें कर्म मुख्य कर्मापूर्वी करण्याची क्रिया. –वि. ताजें; अलीकडील; नवें; साजूक. **सद्यःप्रतीति**–स्त्री. मरणानंतर मोक्ष अथवा स्वर्गप्राप्ति मिळण्याऐवजीं याच देहांत, याच जन्मीं तिचा अनुभव मिळणें. **सद्यस्क, सद्यस्काल, सद्यस्कालीन**–वि. सांप्रतचें; ताजें; नवें; आजकालचें. **सद्यस्तप्त-च्त्**–वि. अगदीं ताजें; गरमागरम; नुकेंतच केलेलें (पदार्थ वगैरे); नवीनच बाहेर पडलेलें (काव्य ग्रंथ, वगैरे) **सद्या**–वि. प्र. सद्यस्क. ताजा; सांप्रतचा; नवीन; अर्वाचीन. **सद्या-द्यां**–क्रिवि. तात्काळ; त्याच क्षणीं; क्षणांत; याच क्षणीं; ताबडतोब; तेव्हांच. ' चक्रानें भस्मसद्या करुनि उडवितां त्या महापापिणीचें । ' –मो अंबरीष. (नवनीत पृ. २६३) **सद्योव्रण**–पु. ताजी जखम; नुकेंतच पडलेलें क्षत, व्रण.

सद्र—सदर पहा.

सद्रव—वि. आर्द्रतायुक्त; ओलसर; ओलावा असणारा.

सद्री—स्त्री (गो.) सुत व लोंकर यांनीं विणलेलें कापड; अर्धसुती, अर्ध लोंकरी कापड.

सद्वंश—पुः चांगलें घराणें; उत्तम कुल. –वि. चांगल्या कुलांतील, वंशातील.

सद्वस्तु—न. (चांगली वस्तु) १ (ल.) परमेश्वर; परब्रह्म. ' सद्वस्तु दाखवी सद्गुरु । ' –दा ४.४५. २ –स्त्रीन. चांगला मनुष्य, पदार्थ.

सद्वासना—स्त्री. चांगली इच्छा; सत्प्रवृत्ति; चांगल्या गोष्टींकडे कल. [सं.]

सद्विद्या—स्त्री. चांगली विद्या, ज्ञान. 'अमृत मुखांत मायसी ओती । ती सद्विद्या...' –मोउद्योग ३.५४. [सं.]

सद्वियोग—पु. (चुकीनें) चांगला उपयोग; योग्य विनियोग. 'उमरावत गीर गोसावी येथें असतां त्याचा सद्वियोग होऊं नये हें चांगलें नाहीं.' –भाब ६९. [सं. सद्व्यय, किंवा सद्विनियोग बद्दल]

सद्विवेक—पु. १ सारासार विचार; न्यायबुद्धि. 'विरक्तास भूषण सद्विवेक.' २ तारतम्य; योग्यायोग्य निवड करण्याची शक्ति. 'कीं क्रोध ऊर्मि दारुण सद्विवेकें आवरिजे।' **सद्विवेकी**–वि. न्यायी; तारतम्य जाणणारा; सुज्ञ; समंजस योग्यायोग्याची बरोबर निवड करणारा; विचारी.

सद्वुपासना—स्त्री. (अप.) सदुपासना. योग्यतेची भक्ति. 'सद्वुपासना सत्कर्म।' –दा ५.३.१२. [सं. सत्+उपासना]

सद्वृत्त—न. चांगली वागणूक. –वि. १ सदाचरणी; सत्प्रवृत्तीचा; सद्वर्तनी; चांगली वागणूक आहे असा. २ गोल; वाटोळा; सुंदर, गोल आकाराचा. [सं. सत्+वृत्त+वृत्ति]

सद्वैद्य—पु. चांगला वैद्य; योग्य औषधोपचार करणारा, मर्मज्ञ भिषक्. 'सद्वैद्यें जैसें दोषा। अंगलीना।' –ज्ञा १६.४२.

सद्व्यय—पु. योग्य खर्च; उपयुक्त विनियोग; चांगला उपयोग; फायदेशीर खर्च. [सं.]

संध—स्त्री. १ ऐक्य; मिलाफ; संयोग. २ सांधा; जोड; शिवण. ३ फट; चीर; भेग. ४ अवधि; मधला वेळ. ५ गांठ; पेर; सांधा. ६ (ल.) योग्य वेळ; आणीबाणीची वेळ; ऐन प्रसंग 'ढकलुन देतांक्षणीं साधली संध शिपायाला।' –ऐपो ३१५. ७ मैत्री जुळणें; संबंध दृढ होणें; तह; समेट; तडजोड; पुनर्मीलन. [सं. सम्+धा] –वि. धारण करणारा; युक्त, तद्विशिष्ट; रुळलेला; निगडित; संबद्ध. उदा० कपटसंध; वरसंध; अनृतसंध; सत्यसंध.

सधट—वि. १ सबंध; पूर्ण; सगळा; अच्छिन्न; असगा (वस्त्र, काष्ठ, दगड, वस्तु, शेत, मार्ग). 'ते शर रुतले सघट। रावणहि सोडी शर तिखट।' –रावि ३२.१०१. २ (ल) सरळ; अचूक; निर्दोष (भाषण, वर्तन, योजना, काम). ३ विक्रिवि. सरळ; समोर; सीधा; थेट. ४ –विक्रिवि. स्पष्ट; रोकडा; रोख ठोक; साफ; निक्षून (उद्दामपणें, उद्धटपणें). ५ –विक्रिवि. घट्ट; मजबूत; दाट. [स+घड]

सधन—वि. संपन्न; श्रीमंत; द्रव्यवान. [सं. स+धन] **सधनता**–स्त्री. श्रीमंती.

संधन—स्त्री. एक प्रकारची ऐरण. संदान पहा. संधन, वटांगण व खुरा हीं ऐरणीचींच नांवें आहेत. यांपैकीं संधन ही जिनगर, वटांग व खरा हीं नालबंद वापरतात. [सं. सम्+धा]

सधर—वि. बळकट; न हालणारा; आश्रययुक्त; स्थिर. 'म्हणोनि बुद्धियोगु सधरु। तेथ अर्जुना होई स्थिरु।' –ज्ञा २. ७२६. –एभा ३.८९; ५.३६१. [सं.]

सधर—सदर पहा. 'सांगूं सधरीचा समाचार।' –दावि ७.२.१.

सधर्म—वि. १ एकाच धर्माचे; एकाच पंथांतील, संप्रदायांतील. २ एकच गुणधर्म असलेले; एकाच लक्षणाचे. [स+धर्म]

सधर्मिणी—स्त्री. विवाहित स्त्री; पत्नी.

संधला—पु. १ दरजा भरणें, गिलावा करणें वगैरेकरितां चांगला गाळून व घोटून तयार केलेला चुना. २ अशा चुन्याचें काम, गिलावा, अस्तर. [सं. सम्+धा]

सधवा—स्त्री. सुवासिनी; सौभाग्यवती; पति जिवंत असलेली स्त्री. [सं. स+धव]

संधान—न. उपाययोजना; शक्ति, युक्ति, साधनें यांची योग्य तरतूद व योजना; एखादें कार्य घडवून आणण्याच्या कामीं प्रयत्न, बुद्धि व शक्ति यांचा योग्य मिलाफ करून योजना. २ योग्य रीति, मार्ग, पद्धति (एखाद्या कार्याच्या सिद्धयर्थ). ३ नेम; निशाण; लक्ष्य. 'रिपुकंठीं हा शर लागेल या न संधानें।' –मोकर्ण ४७.७०. ४ कल, प्रवृत्ति, रोंख (मन, इच्छा, डोळा वगैरेचा). ५ मनाची धारणा; लक्ष्य; अवधान; ध्यान. 'मूळ ग्रंथाचें संधान राखून मग आपलें राखायचें' –नि १९६. ६ कावा; कपट; युक्ति. 'चोर डाक होती गिलचांची नाहीं कळलें संधान।' –ऐपो ११८. 'करिता जाहला घोर संधान।' –रावि ३२.११. ७ घबाड; डबोलें; ठेवा. 'आम्हांस मार्गांत कांहीं चागलेसें मोठें संधान साधेना.' –विवि ८.८.१५४. ८ सुमार; समय; संधि. 'दसऱ्याच्या संधानास मी तुमचे गांवीं येईन.' ९ वग; वशिला; सूत्र. [सं. सम्+धा] **संधानी**–वि. हुशार; धूर्त; युक्तिबाज; कावेबाज; संधान लावणारा, बांधणारा.

संधान—स्त्री. (कुलाबा) बैलगाडीची शिवळ.

संधि-धी—पुस्त्री. १ जोडणी; ऐक्य; मिलाफ. २ सांधा; जोड; शिवण; सांध्यांची रेषा, बिंदू. 'अस्ति यंत्र कीडिकीडी। संधि कळासु कडकडी।' –भाए २०४. 'बैसलो संधि भागीं तुज धरूनि चित्तीं' –तुगा ३२०. ३ चीर; भेग; फट; खांच; खंड. 'भयें दडताती संधींत' –नव २४.१३४. ४ अवधि; मधील काल; अवसर; अवकाश. ५ गांठ; पेर; कांडें; जोड ६ वर्णांचा योग; स्वर किंवा व्यंजनें यांचा जोड, मीलन; सामासिक शब्दाच्या अंत्य व प्रारंभींच्या वर्णांचें मेलन. ७ लक्ष्य; दृष्टि; डोळा; इच्छा; उद्देश. 'भिक्षुक पैक्यावर संधि ठेवून यजमानाचें आर्जव करितो.' 'करून आले दक्षिण संधी।' –ऐपो २६७. ८ युग, मन्वंतर, कल्प वगैरेपैकीं एक संपूर्ण होऊन दुसरें लागण्याच्या

मध्यंतरींचा काल; संधिकाल. ९ चोरानें भिंतीस पाडलेलें भोंक, बीळ, बिवर, भुयार, खिंड, भगदाड. १० योग्य वेळ; योग्य समय; ऐन वेळ; आणिबाणीची वेळ; अनुकूल वेळ. 'यास्तव मोठ्या संधीस सुज्ञांनीं दोहोंच्या स्थितीकडे लक्ष्य द्यावें.' –नि १. ११ (ल.) समेट; तह; सलाह; ऐक्य; मिलाफ; तडजोड (मैत्री, नातें, सख्य वगैरेची). 'मज बरोबर संधि करावयास आली होती.' –कर्म २. –एभा १९ १५६. [सं. सम्–धा=ठेवणें] **०काल**–पु. दोन कालांच्या मधील अवधि. 'आयुष्याच्या अशा संधिकालावर तुम्ही उभे आहांत.' –केले १.३७३. **०ग**–वि. प्रत्येक सांध्यांतून जाणारें, भिनणारें (रोग, विष, औषध वगैरे). **०गत**–वि. सांध्यांत असलेला, शिरलेला (वायु, वात, रोग वगैरे). **०पाद**–पु. ज्यांच्या पायांस सांधे असतात असे प्राणी. उदा० डांस, ढेंकूण, उवा, पिसवा, मुंग्या, खेकडा वगैरे. (इं.) अँथ्रोपोडा. **०प्रकाश**–पु. सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर बराच वेळ जो प्रकाश दिसतो तो. **०प्रकाशराग**–पु. (संगीत) संधिप्रकाशाच्या वेळीं गाइला जाणारा राग. यांत ऋषभ कोमल व गांधार, निषाद हे स्वर तीव्र असतात. **०फुटणी**–स्त्री. १ संधिवाताचा रोग, कळा. २ (सढळपणें) सांध्यांत झालेलें गळूं, उठाणूं. **०बंध-बंधन**–पुन. स्नायुरश्मि; सांध्यांना बांधणारे स्नायूचे दोर. (इं.) लिगॅमेंट. **०भंग**–पु. १ संधिवातामुळें सांधे धरणें, दुखणें. २ सांधा मोडणें, निखळणें. **०वात-वायु**–पु. ज्यामुळें शरीराचे सांधे धरतात, दुखतात असा रोग. (इं.) रुमॅटिझम्. **०विग्रह**–पु. तह किंवा युद्ध; मैत्री किंवा कलह; मिलाफ अथवा बिघाड; जोड किंवा तोड. **०वेला**–स्त्री. संधिकाल; दिवस व रात्र यांच्या मधील काल; कोणत्याहि दोन कालावधींमधील अवकाश. उदा० पौर्णिमा, अमावास्या; कालाचा कोणताहि अवधिदर्शक शब्द. उदा० सकाळ; दुपार; संध्याकाळ. **०संकोच**–पु. सांधे धरण्याचा रोग; संधिवात. **०स्फोट**–पु. १ सांध्यांस फूट, कळ लागणें. २ सांध्यांच्या ठिकाणीं फोड, सूज, आवाळू होणें.

सधिन—न. (व.) तूप. –वशाप ९.५१.२९८.

संधिनी—स्त्री. गर्भिणी गाय. –धर्मसिंधु १३०. [सं.]

संधी—संधि पहा.

सधीर—वि. धीरयुक्त; गंभीर; धैर्याचा. 'तैसें सधीरपरी विरमलें। हृदय तयाचें।' –ज्ञा २.३. [स+धीर]

संधेव—पु. (गो.) संदेह; संशय; मनाचा गोंधळ. [सं. संदेह]

संधेवीं, संधेवींसा—क्रिवि. आतां; सांप्रत; नुकताच, आतां (येणें, आगमन, गमन). [सद्यः?]

सध्या-ध्यां—क्रिवि. याक्षणीं; तात्काळ; आतांच; त्वरित, 'साधूसीं गांजितां झालें सध्यां फळ' –मोअभंग (नवनीत पृ.२५७).

'पाहें माझी सध्यां प्रतीती।' –मुआदि १६.१८६. [सं. सद्यः] **म्ह०** सध्याच साळी पिकवी दुकाळी=रोज प्रथम अन्न मिळविणें व नंतर खाणें या अर्थी; उत्पन्नभक्षी. गौतमऋषि एका दुष्काळांत रोज धान्य पिकवीत व भक्षण करीत अशा कथेवरून.

संध्या—स्त्री. १ दिवस व रात्र यांमधील संधिकाल. २ त्रैवर्णिकांनीं प्रातःकाळीं, माध्यान्हीं, व सायंकाळीं करावयाची दैनिक प्रार्थना, उपासना. 'हळीं संध्या करणें हें ब्राह्मणानां नांवच नाहीं.' –टिले ४.१४१. ३ दोन युगांमधील संधिकाल. ४ संधिप्रकाश; तिन्हिसांजा; उषःकाल. 'सुदती दिती कामार्ता गांठीं संध्येंत काश्यपा...' –मोमंत्र ३.५२. ५ कालावधि; अवकाश. उदा० सकाळ; दुपार; सायंकाळ; तिसरा प्रहर. [सं. संध्या] **०काल-काळ**–पु. सायंकाळ; सूर्यास्तसमय. **०कालचा तारा**–पु शुक्र ज्यावेळीं सूर्यास्तानंतर पश्चिमेकडे दिसतो त्यावेळीं त्यास म्हणतात. **०काळीं**–क्रिवि. सायंकाळीं; सूर्यास्तानंतर. **०काळी**–स्त्री. एक फुलझाड व त्याचें फूल; गुलबाशी. **०पात्र**–न. ताम्हन; संध्या करतांना पाणी सांडावयाचें भांडें. **०भट**–पु. न्यायशास्त्राचा मुतालिक. –शिदि ४३७. **०मठ**–पु. संध्या करण्याकरितां बांधलेली जागा, इमारत, घर. 'संध्यामठ भूयेरी। पायरिया नदीतीरीं।' –दा २.७.२२. **०राग**–पु १ सायंकाळच्या वेळीं आकाशांत दिसणारा तांबूस रंग. 'नातरी संध्यारागींचे रंग।' –ज्ञा ६.२५४. 'कीं संध्यारागें गवसलें। निववितें पूर्णचंद्र प्रकटलें।' –ऋ २१. २ (संगीत) संध्याकाळच्या वेळीं गावयाचा राग. **०वंदन**–न. त्रैवर्णिकांनी करावयाची संध्योपासना.

सध्यान्न—न. (अप.) सिद्धान्न; शिजविलेलें अन्न. 'सध्यान्न पात्रें देखिलीं।' –सप्र १५.१७. [सं. सिद्धान्न]

सन—पु. वर्ष; शक; साल. 'सन १८५२ साली.' [अर. सना] **०वात**–क्रिवि. सालवार; अनेक वर्षे थकलेला. 'सनवात बाकी सन तीसापैकीं.' –वाडबाबा ३.२२८. [अर] **०वदबाकी-वातबाकी-वादबाकी**–स्त्री. अनेक वर्षे थकलेली सरकार देण्याची बाकी; चिरशेष. **०वदपडीत-वातपडीत-वादपडीत**–वि. अनेक वर्षे पडीत राहिलेली (जमीन).

सनई—स्त्री. पिपाणीसारखें एक मधुर वाद्य; नागसर: तुतारीसारखें वाद्य. 'सनया नफेरिया बुरंगें।' –मुवन १२.५९. [सं. स्वन; सुनादी; फा. सुर्ना; ब. सुर्नाय्]

सनक—स्त्री. लहर. [शिणका] **सनकी**–वि. लहरी.

सन-कन-कर-दिशीं-सनकणें-सनका—सणकन, सणकणें वगैरे पहा.

सनकाडी-कांडी—स्त्री. सणकाडी पहा. अंबाडी, ताग यांवरील साल सोलून काढल्यावर राहिलेली काडी. 'मग मुनी म्हणे गा ऐक। राळ सनकाडिया लाख।' –कथा ५.१२.२.

सनकादिक—पुअव. सनक, सनंदन, सनत्सुजात व सनत्कुमार हे ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र. 'जे सनकादिकीं सेविजे । आदरेसीं ।' –ज्ञा १.५५. [सं.]

सनंग—न. सणंग पहा. १ कापडाचा तागा, ठाण, नग. २ (अशिष्ट) विक्रेयवस्तु, जिन्नस, माल, नग (स्त्री, जनावरवगैरे).

सनगर—स्त्रीपु कर्नाटकांतील धोंगडया, कांबळीं विणणारी एक जात व तींतील व्यक्ति. [सं. शण–सण+कार]

संनत(करण)—न. (नृत्य) उडी मारून व पायांच्या पुढच्या बाजूस स्वस्तिक करून हात थोडे वांकविणें. [सं.]

सनत्कुमार—पु. सनकादिक पहा.

सनद—स्त्री. अधिकारपत्र; प्रमाणपत्र; राजपत्र; शासनपत्र; परवाना; मुख्यत्यारनामा. [अर. सनद्] **०अस्नाद**–स्त्री.अव. सनदा वगैरे. 'फितूरमध्यें सनद अस्नाद जळोन गेलीं' –गोइसा १२. 'ते मोजीब सनदअस्नाद...'–वाडथोमारो ९.६५. [अर. सनद्+सनद्चें अनेकवचन] **०मुताबिक**–क्रिवि. सनदेप्रमाणें. **०शीर**–वि.क्रिवि. सनदी; कायद्यास धरून; नियमबद्ध; पद्धतशीर. 'गव्हर्नर आणि सनदशीर राज्यकर्ता या दोहोंत पूर्ण साम्य आहे काय?' –मस्व ९२. **सनदापत्र**–न. राजपत्र; शासनपत्र; अधिकारपत्र. **सनदा पाहणी**–स्त्री. राजपत्रांची तपासणी. **सनदी**–वि. १ सनदेप्रमाणें; सनदशीर; राजपत्राप्रमाणें अस्तित्वांत आलेला. 'हे मोख्तसर जमीनदार व पातशाही सनदी जमीदार आहेत.'–रा १५.१००. २ लेखाचा आधार असलेलें; सरकारनें नेमलेले; खरे हक्कदार. 'आरब लोक हबशी ऐका शिपाय सनदी न्यार।'–ऐपो ३४१. 'सनदी तेथें कोण वदा।'–केक १०७ **०इनामदार**–पु. ज्यास सनद, राजपत्र आहे, राजानें नेमलेला आहे असा इनामदार; याच्या उलट जारी इनामदार.

संनद्ध—वि. सज्ज; बांधलेलें; संलग्न; तयार. [सं.]

सनपणें—क्रि. उपमेस येणें.

सनपात—पु. सन्निपात. 'सनपातें बरळतसे।'–दा ९.३.३८. [सं. सन्निपात]

सनम्र—वि. सविनय; सविनीत; विनयशील. [सं.]

सनय–यी—स्त्री. १ सनई पहा. २ घोडयाच्या दांतास सनया म्हणतात. –अश्वप १.११८.

सनर—स्त्री. (व.) वाट; रस्ता.

सनला—पु. संदला, संधला पहा.

सनागर—वि. सुंदर; चांगला. 'कीं निराळीं बोल देखसी सनागर।' –ज्ञा ५.१४१. 'सर्वांगीं अळंकार। शोभले सनागर।' –स्वादि ७.५.१७. [स+नागर]

सनाटा–ट—पु. १ झणाटा; सपाटा; सोसाटा; जोराचा आवाज (वारा, पाऊस, गारा, वणवा, धपाटा, उकळी वगैरेच्या आवाजासारखा). (क्रि० बसणें; लागणें; बसवणें; लावणें; मारणें). २ आवेश; जोर; सपाटा; तडाखा; (लिहिणें, पाठ म्हणणें, गाणें, वाद करणें, वगैरेचा). ३ सणसणाट; दणदणाट; टणत्कार; दणका (बंदुकीची गोळी, बाण, दगड, धनुष्यें वगैरेच्या आवाजांचा). ४ याच अर्थी जोर, आवेश, तीव्र वेग वगैरे दाखविणारे तडाखा, झपाटा, भराटा, भरका वगैरे सर्व शब्द तत्तद्विशिष्ट ध्वनीवरून बनलेले आहेत. –पु. किंवा वि. १ फार मोठा; जबर; राक्षसी; अवाढव्य; अफाट; बेफाम; विस्तीर्ण; दांडगा; प्रचंड (पर्वत, खडक, वृक्ष, इमला, गलबत, हत्ती, नाग, मनुष्य वगैरे). उदा० सनाटा बाजार, देश, शेत, रान, गांव, व्यापार, सावकारी वगैरे). २ भरपूर, मुबलक, रेलचेल पीक, बहार. **रागाचा सनाटा**–पु. रागाचा झपाटा, आवेश, उमाळा वगैरे. (क्रि० येणें). [ध्व.] **सनाटून**–क्रिवि. झपाटून; जोरानें; तीव्रतेनें; झपाटयानें; आवेशानें; दणकून; झणझणून; सणसणून.

सनातन—वि. शाश्वत; चिरकाल; अव्याहत; अबाधित; पुरातन कालाचें; अनादिसिद्ध. [सं.] **०धर्म**–पु. अनादिकालापासून चालत आलेला, परंपरागत धर्म.

सनाथ—वि. ज्यास प्रभु, मालक, आश्रय, संरक्षक, मित्र आहे असा; धन्य. 'मज वोळगे पसायदान। दीजो जी सनाथु होईन।' –ज्ञा १६.४७३. [सं. स+नाथ] **सनाथा**–स्त्री. सुवासिनी स्त्री; सौभाग्यवती, पति जीवंत असलेली स्त्री.

सनाद—वि. १ नादयुक्त; आवाज करणारें; स्वभावतः आवाज उत्पन्न करणारें. उदा० वाद्याची तार, धातूची तबकडी वगैरे. २ वाजणारा; आवाज काढणारा. [सं. नद्=आवाज करणें]

सनानां—न. (कु.) भाताची एक जात.

सनाभ—वि. ज्याच्या उजव्या व डाव्या दोन्ही समासांवर भाष्य, टीपा लिहिल्या आहेत असा (ग्रंथ). [सं. स+नाभि]

सनाभि—पु. १ नातेवाईक; भाऊबंद; सपिंड. २ सहोदर; सख्खा भाऊ; एकाच आईपासून झालेला. [सं. स+नाभि]

संनाह—सन्नाह पहा.

संनिकर्ष—पु. सान्निध्य; समीपता; सामीप्य; शेजार; जवळ असणें. [सं.] **संनिकर्षण**–न. जवळ ओढणें, करणें, आणणें. **संनिकृष्ट**–वि. जवळचें; संनिध असलेलें. 'कार्य कारणांचे परंपरेंत अखेरचें जें कार्य त्याच्या संबंधानें उपांत्यास संनिकृष्टकारण असें म्हणतात' –न्यायपद्धति १२७.

संनिध, सन्निध-सनीध—क्रिवि. शेजारीं; जवळ; समीप. 'सन्निध बैसोनि आपण। दिवलें भोजन यथा रुची।' –एरुस्व ३.२५. [सं.]

संनिधान, सन्निधान—न. सान्निध्य; सामीप्य; शेजार; जवळीक. 'तया सन्निधानाची बेडी । जया नव्हेचि वरिपडी ।' –भाए ५०. 'यासी करावें संनिधान । निहाळावें सुंदर वदन ।' –रासपं १.५५९. [सं. सम्+नि+धा]

सनीज—स्त्री. नवारीची बांधणी; पट्टा; बंद. 'सनीजा, चापी बंदुखाच्या' –वाडसमा ४.२८. [फा.]

सनीन—पु. घोडयाच्या डोक्यावरील तुरा; अश्वशृंग. [फा.]

सनीन—स्त्री. (प्र.) संगीन पहा. बंदुकीच्या शेवटीं जोडावयाचें अणीदार शस्त्र.

सनेधान—न. संनिधान पहा. 'चढते वाढते सनेधान ।' –दा १२.२.२७.

सनोळख—वि. ओळखीचा; माहितीचा; परिचित. 'जें जगचि सनोळख । जगेंसीं जुनाट सोयरीक ।' –ज्ञा १३.३५७. [स+ओळख]

सन्नटा, सन्नाटा—वि. सनाटा पहा. **सन्नाटून**–सनाटून पहा. **सन्नावणें**–अक्रि. तडाखा मारणें.

सन्नति—स्त्री. आदरपूर्वक नमस्कार; नमन. [सं.]

सन्नद्ध, सन्नध—वि. सज्ज; तयारः सिद्ध; सायुध. 'सन्नद्ध करतां दळभार । येथें लागेल उशीर ।' –एरुस्व ५.१. [सं. सत् +णह्–बांधणें]

सन्नाह—पु. (तंजा.) साहित्य; सामानसुमान; सरंजाम. 'वर लिहिल्याप्रमाणें सन्नाहही बरोबरी घेऊन युद्धास आला.' –मऐशि १५०७. [सं.]

सन्नाह—पु. चिलखत; ढाल. [सं.]

सन्निपात—पु. १ मिश्रण; मिसळण; एकंकार. २ एकत्र होणें; मिळणें; जमा होणें; गोळा होणें; समाज; समूह; समुच्चय. ३ जोडणी; जुळणी; संबंध; मिलाफ. ४ पतन; आगमन; अवतरण. ५ एक रोग; कफ, वात, पित्त यांचा एकत्र जोर. 'तेवी परमार्थ जिही दुरावला । तयालागीं झाला सन्निपात ।' –तुगा ३११०. [सं.]

सन्निभ—पु. गोमेद. –पदाव ७८. [सं]

सन्निविष्ट—धावि. १ पूर्णपणें प्रविष्ट झालेला; आंत बसलेला. २ (ल) मग्न; गुंग; गुंतलेला; गढलेला; व्यग्र (अभ्यास, काम वगैरेमध्यें). ३ निष्णात; निपुण; पारंगत. [सं.]

सन्निवेश—पु. १ अंतःप्रवेश; पूर्ण शिरकाव. २ पूर्ण व्यग्रता; मग्नता. ३ नैपुण्य; कौशल्य; पूर्ण ज्ञान. [सं.]

सन्निहित—धावि जवळ; शेजारीं; सन्निध; आसपास. [सं.]

सन्मति—स्त्री. चांगली बुद्धी; सुविचार; योग्य प्रवृत्ति. –वि. सुविचारी; चांगल्या मनाचा, बुद्धीचा; नीतिमान; समजदार. [सं.]

सन्मात्र—न. ब्रह्म. [सं.]

सन्मान—पु. आदर; सत्कार; मान; पूज्यता. **सन्मानणें**–उक्रि. मान देणें; आदर करणें; सत्कार करणें. **सन्मानदार**–पु. आदरणीय मनुष्य; अधिकारी मनुष्य. 'नेघेचि तो मंद विलासु । भुलोनि सन्मानदाराच्या सुखासु ।' –ब ३९१. **सन्मानित, सन्मानी**–वि. मान्यता पावलेला; ज्याचा आदर झाला आहे असा; पूज्य समजलेला; सत्कारित. **सन्मान्य, सन्माननीय**–क्रि. आदरणीय; पूज्य; मान करण्यायोग्य; पूजाई. [सं.]

सन्मार्ग—पु. चांगला, योग्य मार्ग, रस्ता, रीत, पथ. [सं.]

सन्मुख—पु. (सांके. करवीर) न्हावी; हजाम (हा नेहमीं पुढें असतो म्हणून.) –विक्रिवि. संमुख; समोर; पुढें. 'जेथ भीष्मद्रोणादिक । जवळिकेचि सन्मुख ।' –ज्ञा १.१७५. 'सन्मुखें विमुख जगेंसीं । न घडे तुला ।' –ज्ञा ११.५३१. [सं.] ०**काल**–पु. अनुकूल, शुभ काल, वेळ, प्रसंग; उत्कर्षाचा समय.

सन्यपात—पु. (प्र.) सन्निपात पहा. 'सन्यपाताचेनि दुःखें ।' –दा ५.६.६४.

सन्या—पु. (व.) अर्धा आणा.

सन्या—क्रिवि. (व.) शानि पहा. 'जाऊनसन्या उपयोग काय.'

संन्याव—पु. योग्य न्याय; रास्त गोष्ट. 'अन्यावो तो सन्यावो करुनि दाखविला.' –पंच ३.१८. [सं. सत्+न्याय]

संन्यास—पु. १ सर्वस्वाचा त्याग; सर्व त्याग. 'माझ्या स्वरूपीं धनंजया । संन्यासु कीजे ।'–ज्ञा १८.१२६०. २ चतुर्थाश्रम. **संन्यासिणें**–क्रि. टाकणें; त्याग करणें. 'हे संन्यासिले अवगुण । जिया वाचा ।' –ज्ञा १३.२७१. **म्ह०** संन्यास घेऊन आईचा उतराई होणें–पुत्रानें संन्यास घेतल्यास आईस सद्गति मिळते अशी समजूत आहे या वरून. **संन्यस्त**–वि. १ त्यक्त; सोडलेला; टाकलेला. २ संन्यासी. संन्यास घेतलेला. **संन्यासी**–पु. १ सर्वस्वाचा त्याग केलेला. २ यति; चतुर्थाश्रमी.

सन्शेव—पु. (राजा. कुग. अप.) संशय पहा. –मसाप २.१०६.

सनसनणें, सनसनाट, सनसनीत, सनसर, सनानणें—सणसणणें वगैरे पहा. 'एणें बोलें सनानली ।' –शिशु १८६.

सन्सरणें—अक्रि. (माण. अप.) संचरणें; संचार होणें.

सप—पु. पूर्ण नाश. सप्पा पहा.

संप—पु. एकजूट; संघटण; संघ; एकोपा; ऐकमत्य. 'बेडयाच्या लोकांनीं आणाशपथा घेऊन असा संप करून गेल्यास

खरोखर मारपीट चुकली जाणार आहे.' –विक्षिप्त १.१०९. [सं. षप्–समवाये] **संप करणें, संपावर जाणें**–कामगारांनीं एकमत करून काम बंद पाडणें; हरताळ पाडणें.

सपक—वि. अळणी; बेचव; नीरस; पाणचट. 'उपशम परम मधुर परि लागे केवळ तिला सपक राया' –मोउद्योग १३. १८२. 'एक ऋतूंतील फळें दुसऱ्या ऋतूंत सपक लागतात' –नि ९३१. [का. चप्पगं] **सपक पिठलें**–न. १ (तंजा.) दोडके व पडवळ यांचे वंजन घालून केलेली मुगाची आमटी. २ अळणी; कमी मीठ तिखट असलेलें पिठलें.

सपका—पु. हबका; जोराचा शिंतोडा, शिटकाव. 'नाना फडणविसांनीं बोवांच्या तोंडावर सपका मारला.' –लेलेग्रंथमाला. [ध्व.]

सपकल-खल—वि. सवखल, चबखल पहा.

संपच्छ(त्शु)नवार—पु. श्रावणांतील शनिवार. [सं. संपत्+शनिवार]

संपच्छु(त्शु)क्रवार—पु. श्रावणांतील शुक्रवार.

सपट-टें—न. (ना.) सपीठ. [सं. सम्+पिष्ट]

सपटोळी—स्त्री. सापटोळी पहा.

सपडप—विक्रिवि. सुशोभित; सुभूषित; सवस्त्रभूषण. 'तैसीं निरर्थकें जल्पें । होऊनियां सपडपे।' –अमृ ६.१००. [स+पडप]

संपणें—अक्रि. १ खर्च होणें; निःशेष होणें; व्यतीत होणें; खलास होणें; सरणें. २ शेवट होणें; अंतास, शेवटास जाणें; समाप्त होणें. 'जें संपता श्लोकीं देवो । बोलिले ऐसें।' –ज्ञा १८.६०. ३ (ल.) मरणें; निकाल होणें; निकालांत निघणें. [सं. समापन]

संपत्, संपत्ति—स्त्री. १ धन; संपदा; श्रीमंती; मालमत्ता; २ संपादणी; प्राप्ति; कमाई; लाभ; फायदा; मिळकत. 'तुमचे योगानें आम्हाला इष्टफलसंपत्ति झाली.' ३ ऐश्वर्य; उत्कर्ष; ४ श; अभ्युदय; वैभव. [सं.] **संपत्तिमान्-वान्**–वि. श्रीमंत; सधन; ऐश्वर्ययुक्त; धनिक; संपन्न.

संपत्-शनवार, संपत्-शुक्रवार—संपच्छनवार, संपच्छुक्रवार पहा.

सपत्न—पु. १ सावत्र. २ (ल.) शत्रु; वैरी; विरुद्ध पक्षाचा मनुष्य. 'धनुस्पर्श केला संपत्नीं कुभावीं' –मुरामायण, बालकांड. [सं.]

सपत्नी—स्त्री. सवत. [सं. समान+पति]

सपत्नीक—वि. स्त्रीसह; बायकोसह; सभार्या. [सं.]

संपदा—स्त्री. १ धन; दौलत; पैसा; द्रव्य. 'संपदा बहु आलियावरी। सोयरे जमा होति त्या घरीं।' २ ऐश्वर्य; वैभव; श्रीमंती; उत्कर्ष. [सं.]

सपन, सप्न—न. (अप.) स्वप्न पहा. 'सपन झाल खर। –ऐपो १२१.

संपन्न—धावि. १ युक्त; सहित; (समासांत) विद्या-पुत्र-शास्त्र-ज्ञान-धन-गुण-पुण्य-संपन्न. 'अहो संपन्न सर्व गुणें।' –तुगा. ७१४. २ श्रीमंत; ऐश्वर्ययुक्त; वैभववान्; उत्कर्षयुक्त. ३ अर्जित; मिळविलेलें; संपादिलेलें; कमाविलेलें. 'आतां देह वाचा चित्तें। यथासंपन्नें वित्तें।' –ज्ञा १६.८५.

सपर-सपरि-री—स्त्री. (व.) छपर; छपरी; आच्छादलेली पडवी. छपरी पहा.

सपरिकर—वि. परिवारासह. 'स्नान भोजन अलंकार। सांग पूजा सपरिकर।' –एभा २७.१३३.

सपरिवार—वि. लवाजम्यासह; इतमामासह; नोकर चाकरांसह; आप्त, इष्ट, मित्र यांसह.

संपर्क—पु. १ स्पर्श; संसर्ग; संबंध. 'मग ज्ञानाग्निसंपर्कें। कडसिलें विवेकें।' –ज्ञा १.५२. २ संयोग; मिश्रण; सहवास; एकत्रितपणा. [सं. सम्+पृच्=स्पर्श करणें]

सपर्यंत—वि. संपूर्ण; साग्र; शेवटपर्यंत; सान्त. 'हर्यंतःकरणासचि ठावा तद्योग जो सपर्यंत।' –मोकृष्ण ८६.७. [सं. स+परि+अंत]

सपर्या—स्त्री. पूजा; उपचार. 'नाना पुष्पें फळें सपर्या श्रीगुरु राया।' –सप्र १५.२३. [सं.]

संपल—पु. १ (जरतार) (मसेराइज् सिल्कचा) कृत्रिम-रेशमाचा चौकोनी बिणलेला गोफ. २ नमुना. (इं.) सँपल.

सपल्लव—वि. १ पानांसहित; पानांचे झुबके असलेला. २ सविस्तर; सभाष्य. 'तेथ विधिनिषेधीं सपल्लव। वेदवाक्यांचे अभिनव।' –ज्ञा १५.१५७. [सं. स+पल्लव]

संपविणें—उक्रि. १ खर्चून टाकणें; निःशेष करणें; सरविणें; खलास करणें. २ शेवट करणें; पूर्णतेस नेणें; समाप्त करणें; उरकणें; सिद्धीस नेणें. [संपणें प्रयोजक] संपविणें-सोपविणें याबद्दलहि चुकीनें हा शब्द वापरतात. 'आज दूर्वा आणण्याचें काम तुजकडे संपविलें आहे' –रत्नकांता ३.३.

सपशेल-लां, सपशैल-लां, सपसल-लां, सपसेल-लां, सपसैल-लां—क्रिवि. १ विस्कळितपणें; अव्यवस्थितपणें (क्रि० पडणें; कलंडणें; निजणें; अंग टाकणें, भार टाकणें; बसणें). २ अस्ताव्यस्त पसरलेला, (पडलेला, विखुरलेला); विस्कळितपणें उडालेला (एखादी पडलेली इमारत, वगैरे). ३ पूर्णपणें; निखालस.

सपसप-पां—क्रिवि. १ भरभर; झपझप; झपाट्यानें; पटापटां. (क्रि० करणें; बोलणें; देणें; आटपणें). २ गर्दीनें; निष्काळजीपणानें; हलगर्जीपणानें. ३ तडाक्यानें; चपळाईनें; झटक्यासरसें.

सपस्कर—पु. सोपस्कार पहा.

सपळ—पु. (बे.) आवाज. [का. सप्पळ=आवाज]

सपक्ष—वि. १ पंख किंवा पिसें असलेला. २ एकाच बाजूस, फळीस असणारा; एकाच पक्षांतील; ३ (न्यायशास्त्र) नेहमीं अस्तिपक्षीं, समवायी असणारा. उदा० महानस हें अग्नियुक्त सदोदित असतें म्हणुन सपक्ष तर त्याच्या उलट नदीचा डोह कधींच अग्नियुक्त नसतो म्हणून तो विपक्ष. ३ साधार; ग्रंथप्रतिपादित; मागें आश्रय आहे असें (तत्त्व, व्यक्ति वगैरे).[स+पक्ष]

सपा—पु. छापा पहा. 'तिनदां गेला सपा घालाया भाऊसाहेबावर.' –ऐपो ३४३.

सपा—क्रिवि. पूर्णपणें; सपाइ पहा. 'तव कृपेची दृष्टी असतां। सपा मिरवूं सवे क्षमिता।' –नव २३.१११.

सपाइनि—क्रिवि. पूर्णपणें; सर्वस्वीं. 'कैसी वो मानुसें। सपाइनि परंवसें।' –शिशु २१६.

सपाई-ईं-यी—विक्रिवि. यच्चयावत्; संपूर्ण; सर्वथैव; साफ; सपशेल. 'तया देहा म्हणती भेटी। हे सपायी निर्जिव गोष्टी।' –ज्ञा १३.१०९७. –एभा २३.३१६. [सं. स+पाद]

संपाक—पु. स्वयंपाक; अन्न शिजविणें; उकडणें; रांधणें. [स्वयंपाक]

सपाखर—वि. कृपाळु; सदय. 'हे निःशंकपणें सपाखरे। पंचानन।' –ज्ञा ९.२०५. [स+पाखर]

सपाट—वि. १ समतल; एका पातळींत असलेलें; गुळगुळीत; खांच खळगे, उंचवटे नसलेलें; समान; सारखें. २ कांठाबरोबर सारखें केलेलें; शीगलोट; शीग मारलेलें (धान्याचें माप वगैरे). ३ स्थिर; शांत; समपातळींत 'आणि उदक सहज सपाट जाहलें।' –ज्ञा २.१०७. ४ नष्ट; नाहींसें. 'हांक मारितांचि भीमें। कपट होय सपाट।' –मु सभा १४.३६. 'मतें मतांतरें सगट। प्रत्यये बोलोन करी सपाट।' –दा १५.२.१७. [सं. स+पृष्ठ] **सपाट करणें**–नाश करणें; नायनाट करणें; धुळीस मिळविणें. 'वाटे न द्विज, करितो, विश्वासि सपाट अंधकाराती।' –मोकर्ण ३५.२६. 'ममश्रोती आलिया नीट। त्याचें करीन सपाट। यमलोकीं मिरवीन।' –नव १४.१८१. **सपाट होणें**–साफ होणें; नाहींसा होणें. 'जेणें होती सपाट संशय।' –एभा २९.५१९. **सपाटं सुपली**–चपटया नाकास विनोदानें म्हणतात. नकटया नाकाचा; बसकट नाकाचा. **सपाटी**–स्त्री. १ समपातळी; सपाटपणा; सरळपणा; समपृष्ठत्व. २ सपाट मैदान; एका पातळींतील जमीन, पठार; ओटा.

सपाटणें—झपाटणें पहा.

सपाटा—पु. १ झपाटा पहा. –वि. (वस्तूच्या पूर्वी) अवाढव्य; अगडबंब; फार मोठा. 'सपाटा डोंगर, सपाटा धोंडा, सपाटा वाडा, इमारत, घर; सपाटा साप.' 'एका सपाटया पेटींत्यांत तो बसला.' –नि ३३८. 'मोठा सपाटा बुंधा बनणार.' –नि ३७१. २ जोरदार; रेलचेल; भरपूर. 'सपाटा पाऊस, सपाटा पीक, सपाटा ऊंस.' **सपाटा(टे)बंद**–क्रिवि. जोरानें; सपाटयानें; एकदम. **सपाटया**–वि. सपाटा पहा. **सपाटून**–क्रिवि. झपाटयाचा; जोराचा; आवेश युक्त. 'सपाटून पाऊस पडणें.'

सपात—वि. (राजा.) सलग.

सपातजोडा—पु. (चांभारी) एक प्रकारचा साधा मारवाडी पद्धतीचा जोडा. हा स्त्रिया वापरतात.

संपात—पु. १ संयोग; संमीलन; भेट; संगम (रस्ते, नद्या वगैरेचा). २ टक्कर; तडाखा; धडाका; प्रहार. ३ विषुवद्वृत्त क्रांतिवृत्तास ज्या ठिकाणीं छेदितें ते बिंदू प्रत्येकी. ४ सूर्याचें या छेदबिंदूशीं गमन. 'मेषसंपात; तुला संपात.' ५ हुतशेष; अग्नीस आहुति दिल्यानंतर हवनीय पात्रांत राहणारा अवशेष. [सं. सम्+पत्] **०चलन**–न. अयनचलन; संपातबिंदूंचें हळू हळू स्वस्थानापासुन दूर सरकणें; मागें जाणें. **०बिंदू**–पु. संपात अर्थ ३ पहा. **०रेषा–रेखा**–स्त्री. १ स्पर्शरेषा; वर्तुलास चाटून जाणारी रेषा. २ क्रांतिवृत्ताच्या पातळीस विषुवाची पातळी ज्या रेषेंत छेदिते ती रेषा. –सूर्यमाला १२.

सपातळ—वि. पातळ; झिरझिरीत. 'म्हणोनि तैं तैसें बोलणें। नव्हे सपातळ आड लावणें।' –ज्ञा ६.११४.

संपादक—पु. १ वर्तमानपत्र, मासिक, मोठा ग्रंथ याची मांडणी, जुळणी करणारा जबाबदार लेखक. २ एखादा जुना ग्रंथ प्रती तपासून टीपा वगैरे देऊन तयार करणारा. –वि. १ मिळविणारा; कमावणारा; अर्जन करणारा. २ वतन, जहागीर, हक्क, मालमत्ता वगैरे प्रथम मिळविणारा, संपादन करणारा. ३ विवाहादि समारंभाचा मुख्य शासक, व्यवस्थापक, कार्यकर्ता, कारभारी. [सं. पादणें]

संपादणी, संपादणूक—स्त्री. १ अर्जन; मिळविणें; पैदास; कमाई; साधना; सिद्धि. २ बतावणी; निर्वाह; निभावणूक; वेळ मारून नेणें; पुढें केलेली सबब, सोंग पार पाडून नेणें, निभावणें. 'आपुलेचि बोल वाउगे। त्याची संपादणी करणें लागे।' –दा १.६.२१. 'तुम्ही लटक्याच वार्ता सांगोन। संपादणी करतां गे।' –ह २७.१८. 'समर्थपणें हे करा संपादणी। नसतेंचि मनीं धरिल्याची।' –तुगां १२९९. ३ नक्कल; सजावट (हरिदास एखाद्या गोष्टीची करतो तशी); योग्य तऱ्हेनें उभारणी. ४ पात्राचें सोंग; सोंगाची बतावणी; हुबेहुब नक्कल; सोंगास अनुसरून हावभाव. 'नट जैंवी करी जाया वेषें संपादणी।' –सिसं ५.१४३. ५ व्यवस्था; समारंभाची साधना, सिद्धि; योग्य तऱ्हेनें कार्याची उठावणी, पार पाडणें. [सं. सम्+पद्] **संपादणें**–उक्रि. १ अर्जन करणें; मिळविणें; प्राप्त करून घेणें. २ सिद्धि करणें; तडीस

नेणें; पार पाडणें; उरकणें. ३ बतावणी करणें. ' नट नाटय बरें संपादूं जाणसी वो । ' –तुगा १४२. **संपादन**–न. १ संपादणें; मिळविणें; जोडणें; प्राप्ति. २ सिद्धि; साधना; कार्यपूर्ति. ३ बतावणी; निभावणी. **संपादनी-संपादनूक**–वि. संपादणी, संपादणूक पहा. **संपादित**–वि. मिळविलेलें; प्राप्त; सिद्ध.

सपासप-पां—क्रिवि. झपाझप; चपाचप; खसखस; जोरानें; त्वरेनें; झपाटयानें (क्रि० मारणें; तोडणें; तासणें). [ध्व.] **सपासपी**–स्त्री. झपाझपी; खसाखसी; जोराची, त्वरेची, झपाटयाची क्रिया (मारणी, तोडणी, तासणी वगैरे).

सपाळ—वि. (राजा.) उत्तम व पुष्कळ दूध देणारी (गाय वगैरे).

सपिठी—स्त्री. सपीठ पहा.

सपिंड—पु. १ श्राद्धामध्यें ज्यास पिंड मिळण्याचा किंवा देण्याचा अधिकार आहे असा आप्त, नातेवाईक, संबंधी. आपल्या पासुन पितृद्वारा वरील सातपिढयापर्यंत पूर्वज व त्या प्रत्येकाची ७ पिढयांपर्यंत संतति. [सपिंड नातेवाईक. हे तीन प्रकारचे असतात– १ ज्यांचें अशौच धरावें लागतें असे. २ ज्यांच्याशीं विवाह वर्ज्य आहे असे व ३ जे दायभागांत अंशभाक् असतात असे. **अशौच सपिंड**–पित्यापासुन सात पिढयापर्यंत जे पुरुष त्यांचे सगोत्र वंशज व तसेच ज्यास पिंड देण्याचा किंवा घेण्याचा अधिकार आहे असे पुरुष. **विवाहसपिण्ड**-पित्यापासुन सात पिढयापर्यंतचे व मातेपासुन पांच पिढयापर्यंतचे पुरुष. **दायसपिण्ड**–१ पिता, पितामह, प्रपितामह, व पुत्र, पौत्र, प्रपौत्र व दौहित्र; मातामह प्रमातामह वृद्धमातामह व त्यांचे पुत्र पौत्र व प्रपौत्र.] २ खडा; ढेंप. ' तेआंचे सपिंड काढावें चिरें । पुरुख प्रमाणें । ' –एभा १६. १८; –शिशु ७९७. [सं स+पिंड्=गोळा करणें] **सपिंडी**–स्त्री. मृतमनुष्या संबंधी बाराव्या दिवशीं करावयाचें श्राद्धकर्म.

सपिती, सपीति, संपीति—स्त्री. सहपान; एकत्र पान करणें. ' दहाव्या दिवशीं आपल्या धर्माधिकाऱ्यासह सर्व जात सपितीसाठीं प्रेताच्या घरीं जमते. ' –आगर ३.१५८. [सं. स+पा=पिणें]

सपिली—क्रिवि. पोराबाळांसह; समूळ; अजीबात. ' तेव्हां प्रत्याहारें खाती केली । विकारांची सपिली बोहलीं । इंद्रियें बांधोनि आणिलीं । हृदयांआंतु । ' –ज्ञा ९.२१५. [स+पिलुं]

सपीट-ठ—न. गव्हाचें बारीक पीठ; गहूं ओलवून दळून करतात तें बारीक पीठ. [सं. सपिता; संपिष्ट]

सपील—स्त्री. (व.) गांवाभोंवतालची भित; तट; परकोट. सफेली पहा.

सपील—वि. (कों.) गाय किंवा म्हैस यांचें सर्व दूध पिणारें (वासरूं); जिचें दूध मालक काढीत नाहीं, सर्व वासरास पाजतो अशा गाईचें (वासरूं). –क्रिवि. सर्व दूध पिण्याकरितां ' वासरूं सपील सोडलें, प्यालें. ' [सं. स-सर्व+पा–पील]

सपुट—वि. (कों.) १ जिवंत; सजीव; भरदार (लिख वगैरे.) याच्या उलट पोली, पोकळ, निर्जीव. २ भरदार; भरलेली (शेंग-वगैरे) [सं. स+पुट]

संपुट—न. १ पुड; करंडा; संबळी; दोन्ही तोंडें एकावर एक ठेवून मिटावयाची करंडी, भांडें; शिंपला. ' निडाराचेनि कोंदाटें । मोतिये नावरती संपुटें । ' –ज्ञा ६.२६६. ' ज्ञानवैराग्य शुक्ति संपुटी ' –एरुस्व १.४०. २ मिटलेली ओंजळ; एक उताणा व त्यावर एक उपडा हात ठेवून केलेली पोकळ मूठ. ' ठेविती ललाटावरी बरवे । करसंपुट । ' –ज्ञा ११.३३६. ३ (व.) उभा जांब; प्याला. ' पाणी प्यावयास तेवढें संपुट आण. ' ४ (खा.) पाणी भरण्याचें पंचपात्र. [सं.] **संपुटीकरण**–न. दोन पदार्थांच्या पोकळींत बंद करणें, पकडणें.

सपुत, सपूत—पु. १ सुपुत्र; चांगला मुलगा. २ परिपूर्ण; भरीव. ' सपुत वाघापरी गुरकती । ' –ऐपो २२३. –वि. पुत्र असलेला; सपुत्र. [सं. स+पुत्र]

सपु(बु)दा—वि. (कर) आधार; पाठिंबा; पुरवठा. ' मागें कोणी तरी सपुदा असल्याशिवाय मोठीं कामें पार पडत नाहींत. ' [सं. स+पुर्]

सपु(पू)र—वि. बारीक; सूक्ष्म; निमूळता ' येऱ्हवीं सपुरपण तयाचें पाहावें । ' –ज्ञा ८.१६. ' रेखिलीं परिकरें । सपुरें सर्वतोभद्रें । ' –ऋ ७३. ' जेथ साहित्य वाणें सपूर । उजाळाचें ' –ज्ञा १.६.

सपुरता—वि. पूर्ण; संपन्न; पुरेसा; भरपूर. ' सर्वांगुणीं सपुरता । ऐसा पिता असोनि । ' –तुगा १४११. ' तेहीं केलिया आदर । आमचा मनोरथ सपुर । ' –निमा १.१७२. [सं स+पुर्]

संपुष्ट—न. देव ठेवण्याचें पात्र; डबी. संपुट पहा. ' न माये ब्रह्मांडीं तो संपुष्टासनीं । ' –तुगा ४७८. [सं. संपुट] **संपुष्टांत येणें**–१ (ल) संकोच पावणें; आंखडणें; कमी होणें. २ मुठींत सांपडणें; कबज्यांत येणें.

संपूर्ण—न. एखाद्या विधीची समाप्ति व त्या कालचा समारंभ, ब्राह्मण भोजन वगैरे; उद्यापन. –वि. १ सर्व; सगळें; प्रत्येक; एकूणएक; सकल. २ पूर्ण; असगें; सर्वेच्या सर्व; समग्र. ३ समाप्त; पूर्ण झालेलें; संपलेलें. **संपूर्ण कळावंतीची खाण**–स्त्री. सर्वगुणसंपन्न मनुष्य; सर्वकलाकुशल इसम. **संपूर्णता**–स्त्री. १ समाप्ति; सिद्धि; शेवट; पूर्णपणा. २ उद्यापन; सांगता. **संपूर्ण तान**–स्त्री. (संगीत) सात स्वरांची तान. **संपूर्ण राग**–पु. ज्या रागास सात स्वर लागतात व कोणताहि स्वर वर्ज्य नसतो असा राग.

संपृक्त—वि. (शाप.) ज्या द्रवामध्यें एखादा पदार्थ शक्य तितका पूर्णपणें विद्रावित केला आहे असा (द्रव) (इं.) सॅच्युरेटेड.

सपृष्ठवंश—वि. (शाप.) ज्याच्या पाठीला कणा आहे असा (प्राणि) (इं.) व्हर्टिब्रेट [सं.]

सपेली—स्त्री. सफेली पहा.

सपोट, सपोटी—क्रिवि. जेवणखाण सुद्धां; खाऊनपिऊन. याचे उलट कोरडा (नोकर ठेवावयाचे वेळीं कोरडा किंवा जेवणासह पगार ठरवितात). **सपोटी**–वि. जेवणासह; खाऊनपिऊन. याचे उलट निपोटी म्हणजे कोरडा, जेवण वगैरे न धरतां पगार वगैरे).

सपोत—वि. चांगल्या, बारीक पोताचें (कापड). 'ऐसीं भीतभेगा नेहटी। सपोतें मांजिठीं।' –ऋ ६९.

सपोल—वि. पोकळ; निष्फळ; व्यर्थ.

सपोश-ष-स—वि. पुष्ट; लठ्ठ; पोसलेला. 'जो गुरुप्रेमें सपोषु'। –ज्ञा १३.४४२. 'सरळ बाहू सपोश।' –एरुस्व १५.५३. [सं. स+पोष]

सपोळा—पु. एक प्रकारची वावडी, पतंग.

सप्टेंबर—पु. इंग्रजी वर्षाचा नववा महिना. [इं.]

सप्त—वि. सात ही संख्या. [सं.] **०ऋषि**–पुअव. १ प्रत्येक मन्वंतरांतील सात ब्रह्मर्षि. यांच्या नांवांबद्दल एकवाक्यता नाहीं. सध्याच्या मन्वतरांतील सप्तर्षि–कश्यप, अत्रि, भरद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि व वसिष्ठ. अन्यत्र. मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्ति–स्त्य, पुलह, ऋतु व वसिष्ठ अशीं नांवें आढळतात. सप्तर्षि अथवा ऋक्ष नक्षत्रांतील हे सात तारे आहेत. 'कश्यपादि प्रसिद्ध। सप्तऋषी।' –ज्ञा १०.९२. २ (सांकेतिक) सातारा शहर. 'पानगांवचा राजा सप्तऋषीस येत आहे.' –रा ८.१८३. 'सप्तऋषि गिरिवरी माझी प्रतिष्ठा' –सप्र ५.१३. **०क**–न. १ सातांचा समुदाय. २ –वि. सातवा. **०कंचुक**–वि. (पंचमहाभूतें अहंकार व महत्तत्त्व हीं) सात आवरणें, वेष्टणें असलेला. 'त्यामध्यें सप्तकंचुक पिंड।' –दा १६.७.१५. 'सप्तकंचुक ब्रह्मांड।' –दा १५.८.२९. **०कर**–पु. अग्नि. **०करनेत्र**–पु. शिव; अग्निनेत्र. **०करणें**–नअब. (ज्यो.) बव, बालव, कौलव, तैतिल, गर, वणिज व विष्टि. हीं सात करणें. **०कुलाचल**–पुअव. सात मोठे पर्वत. महेन्द्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, गंधमादन, विंध्य, पारियात्र **०कोण**–पु सात कोण असणारी सरळ रेषांनीं मर्यादित आकृति. **०क्या**–वि. सात, सात दिवसांची अगर वर्षांची मर्यादा धरून तप करणारा. 'नव नाडी, बावन आड, तेथें एक सप्तक्या ब्राह्मण तप करीत आहे' –काहणी. विष्णूची. **०खणी**–पु.स्त्री. सात खणांचा महाल. 'तया मागें सप्तखणी। शोभे कनक बालार्कवर्णी।' –कथा १.६.१५६. **०गणी–गाणी**–स्त्री. दुंडापैसा; ढबू पैसा. **०गोदावरी तीर**–न. गोदावरी ज्या प्रदेशांत सप्तधा होऊन समुद्रास मिळते तो प्रदेश. **०ग्रही**–स्त्री. सात ग्रहांची एका राशींत युति. **०चिरंजीव**–पुअव. अश्वत्थामा, बलि, व्यास, हनुमान, बिभीषण, कृप व परशुराम हे सात पुरुष मरणातीत आहेत अशी समजूत आहे. **०चैतन्य**–न. मुख्य, शाश्वत अथवा ब्रह्मचैतन्य व इतर सहा मायिक चैतन्यें तीं –ईश, जीव, प्रमाण, प्रमातृ, प्रमेय, फल. **०जिह्व**–पु अग्नि. **०ति**–वि. ७० ही संख्या. **०दंती**–वि. सात दांत असलेला (घोडा) (कुलक्षणी). **०दश**–वि. १७ ही संख्या. **०द्वीप**–पुअव. पृथ्वीचे सात मोठाले विभाग. जंबु, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक व पुष्कर. 'नव खंडें सप्तद्वीपें। छपन्न देशींच्या रायांचीं स्वरूपें।' –ह २८.६४. **०द्वीपवती–द्वीपा**–स्त्री. पृथ्वी. 'आले सप्त ही सागर। सहित सप्तद्वीपवती।' –भूपळी विष्णूची. **०धा**–क्रिवि. सात प्रकारचा, सात ठिकाणीं; सात प्रकारांनीं. **०धातु**–पुअव. शरीरांतील सात रस, रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र. अन्यत्र–वसा, रुधिर, मांस, मेद, मज्जा, अस्थि व स्नायु. अन्यत्र–अस्थि, नाडी, मज्जा, मांस, त्वचा, रक्त व नख आणि केश मिळून. 'मग सप्त धातूंच्या सागरीं। तहानेला घोंट भरी।' –ज्ञा ६ २३५. या सप्तधातूंचे मल अथवा उपधातु. रस–कफ; रक्त–पित्त; मांस–नाक, कान, डोळे यांचा स्राव; मेद–घाम; अस्थि–केश व नखें; मज्जा–स्निग्धता; शुक्र–ओज. २ सोनें, रुपें, तांबें, कथिल, नाग, तीक्ष्ण व कासें. अन्यत्र–सोनें, रुपें, तांबें, शिसें, जस्त, पितळ, लोखंड. **०धान्यें**–नअव. सातू, गहूं, साळ, तीळ, राळे, सावे, हरभरे. **०नद**–पुअव. शोण, सिंधु, हिरण्यवाह, कोक, घर्घर, लोहित व शतद्रु. यांपैकीं दोहोंबद्दल ब्रह्मपुत्र व शिवनद धरतात. **०पदार्थ**–पुअव. न्यायशास्त्रांतील सात पदार्थ–द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय व अभाव. **०पदी–पदीक्रमण**–स्त्रीन. विवाहविधीमध्यें लाजाहोमानंतर वधूवरांनीं समागमें सात पावलें जाण्याचा विधि. 'विवाह होम झाला संपूर्ण। सप्तपदी पाणीग्रहण।' –एरुस्व १६.२६. **०पर्ण**–पु. एक वृक्ष. –न. एक खाद्य द्राक्षें, डाळिंब, खजूर यांचा रस व साखर, मध व तूप व इतर मसाला घालून केलेलें. –वि. सात पानांचें (झाड). **०पर्वत**–पुअव. सप्त कुलाचल, पहा. **०पाताल**–न.अव. अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल, व पाताल. 'अतळ वितळ, सुतळ महातल आणि तळातळ। रसातळ आणि पाताळ। सातवें तें।' –कथा ६.४.७९. **सप्तपाताळी घालणें–पडणें–जाणें**–पुन्हां केव्हांही डोकें वर काढतां येऊं नये अशी अवस्था होणें. **०पुऱ्या**–स्त्रीअव अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जयिनी), व द्वारावती –एभा १८.

१५०. 'सप्तपुऱ्या तीर्थें अगार्धें। जेथें वसती ब्रह्मवृंदें।' –ह. ३३.१०१. **०पुंजा**–स्त्रीअव. विवाहविधीमध्यें सप्तपदीसाठीं घातलेल्या तांदुळाच्या सात राशी. 'सप्तपुंजा भोंवती बाळें।' –वसा ५१. **०प्रकृति-धाप्रकृति-विधा प्रकृति**–स्त्रीअव. प्रकृति पहा. १ सात स्वभावधर्म. २ राज्याचे मुख्य सात आधार–राजा, मंत्रि, नगर, भूमि, कोश, सेना, मित्र. **०भूमिका**–स्त्रीअव. १ ज्ञानी जीवाच्या सात भूमिका–शुभेच्छा, विचारणा, तनुमानसा, सत्त्वापत्ति, असंसक्ति, पदार्थाभाविनी व सुर्यावगाहिनी. २ भक्ति, ज्ञान, वैराग्य व सलोकता, समीपता, सरुपता व सायुज्यता. 'सप्तभूमिका परब्रह्मीं' –सप्र ७.४२. **०भूषणें**–नअव. पुरुषार्चीं सात भूषणें. 'पुरुषांलागीं सप्त भूषणें। तिन्हीं वस्त्रें कनकवर्णें। द्वादशांगीं अलंकार लेणें। स्त्रियांस देणें तैसेंचि।' –ह ३४.६२. **०म**–वि. सातवा. **०मातृका**–स्त्रीअव. ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, बैष्णवी, वाराही, इंद्राणी व चामुंडा. **०मी**–वि. १ पंधरा तिथींपैकीं सातवी तिथि. २ सातवी विभक्ति. **०मृत्तिका**–स्त्रीअव. गज, अश्व, रथ, चतुष्पथ, गोष्ठ, वल्मीक व हाट अथवा संगम या सात ठिकाणची विधीकरितां लागणारी माती. **०रंग**–पुअव. तांबडा, नारिंगी, पिंबळा, हिरवा, निळा, पारवा, जांभळा हे सूर्यकिरणाच्या पृथक्करणानें किंवा इन्द्रधनुष्यांत दिसणारे रंग. **०रात्र**–न. सात रात्रींचा काल. **०राशिक**–न. त्रैराशिकाप्रमाणें सात राशींचें गणित. **सप्तर्षि**–पुअव. सप्तऋषि पहा. **०वारा**–पु. (नाविक) सप्तऋषींकडून वाहणारा वारा. **०लोक**–पुअव. भूलोक (पृथ्वी); भुवर्लोक (पृथ्वी व सूर्य यांमधील), स्वर्लोक (सूर्य व ध्रुव यांमधील इंद्रादि देवतांचा), महर्लोक (सूर्य व नक्षत्रांचा), तपोलोक (तपस्वी लोकांचा), जनलोक (ब्रह्मदेवाच्या मानसपुत्रांचा) व सत्यलोक (ब्रह्मदेवाचा). **०विध लक्षण-व्यसनें**–नअव जारण, मारण, विध्वंसन, स्तंभन, मोहन, वशीकरण व उच्चाटण. 'जारण मारण विध्वंसन। स्तंभन मोहन, वशीकरण। उच्चाटण हें सप्तलक्षण।' –विपु १.५३. 'सप्तवेसनीं जयाचें मन। तो एक मूर्ख।' –दा २.१.१६ **०शती**–स्त्री. १ मार्कंडेय पुराणांतील सातशें श्लोकांची देवीची स्तुति; चंडीपाठ. २ सातशें श्लोकांचा ग्रंथ; भगवद्गीता. 'कीं गीता हे सप्तशती। मंत्रप्रतिपाद्य भगवती।' –ज्ञा १८.१६६६. ३ हालाची गाथासप्तशती. **०शैल, सप्ताद्रि**–पुअव. सप्तकुलाचल पहा. **०समुद्र-सागर**–पुअव. क्षार, इक्षुरस, सुरा, घृत, क्षीर, दधि व शुद्धोदक समुद्र. 'इयेवरी सप्तसागर। मध्यें मेरू महा थोर।' –दा ४.१०.१४. **०सूर**–पुअव. षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाद हे संगीतांतील सात सूर. **०स्कंध**–पुअव. वायुमंडलाचे सात भाग. आवह अथवा अवाह (भूमिपासुन मेघमंडलापर्यंत), प्रवह अथवा प्रवाह (मेघमंडलापासुन सूर्यमंडलापर्यंत), उद्वह (तिसऱ्या मंडलांतील), सह (चंद्रमंडलापासुन नक्षत्रमंडलापर्यंत), विवह अथवा वैवह (नक्षत्रमंडलापर्यंत), षठापरा (शनिमंडलापासुन सप्तर्षिपर्यंत), परिवाह (सप्तर्षिपासुन ध्रुवापर्यंत). **०स्वर**–पुअव. सप्तसूर पहा. **०स्वर्ग**–पुअव सप्तलोक पहा. **०हरीतकी**–स्त्री. अव. हरडयाच्या सात जाती. विजया, रोहिणी, पूतना, अमृता, चेतकी, अभया व जीवंती; अन्यत्र–अभया, चेतकी, पथ्या, पूतना, हरीतकी, जया व हैमावती. **०क्षार**–पुअव. (सात औषधी क्षार) तिल, अपामार्ग, करंज, पलाश, अर्क, यव, चिंचा. यांवद्दल पाठभेदहि आढळतात, अष्टक्षार पहा. **सप्ताद्रि**–पुअव. सप्तकुलाचल पहा. **सप्तावस्था**–स्त्रीअव. अज्ञान, आवरण, विक्षेप, परोक्षज्ञान, अपरोक्षज्ञान, शोकभंग व निरंकुशा तृप्ति. **सप्ताश्व**–पु. ज्याचे रथास सात घोडे आहेत असा; सूर्य. **सप्तास्र**–पु. सप्तकोन. –वि. सप्तकोनी. **सप्ताह**–पु. १ सात दिवसांचा काल; आठवडा. २ **सप्ताह पारायण**–न. सात दिवसांत एखाद्या ग्रंथाचें वाचन. **सप्तोपचार**–पुअव. वैद्यक शास्त्रांतील सात निरनिराळे उपचाराचे प्रकार. पाचन, रेचन, क्लेदन (स्वेदन), शमन, मोहन, स्तम्भन, वर्द्धन.

सप्त—वि. लिखित; निश्चित. 'हा अहदनामा सप्ता जाहला आहे.' –पे ६१. [अर. सबत्=स्थैर्य] **सप्तसूद**–वि. शाश्वित झालेलें. [अर. सबूत=कायमपणा, स्थैर्य]

सप्ताल–लू–ळ–ळू—न. एक विशिष्ट फळ. (इं.) पीच. 'सप्ताळें ऊंस पुंडे कविठ कमरखें वाळकें सुक्ष्म बोरें.।' –सारुह ३.४९. [फा. शफ्तालू=एक फळ]

सप्र—न. स्वप्न पहा.

संप्र—संपन्न पहा. 'संप्राचा घरीं न बसावें।' –सूत्रपाठ १६२.

सप्पक—वि. (बे.) सपक पहा.

सप्पर—न. (व.) (प्र.) छप्पर पहा.

सप्पा, सप्फा—पु. १ सपाटा; तडाखा; थप्पड; चपराक. (क्रि० मारणें; देणें). २ पूर्णनाश; उध्वस्तता; ओसाडी; दाणादाण; रुक्षता; वैराणपणा (जाळपोळ, बंडाळी इ० मुळें प्रदेशाचा). निकाल; पूर्णक्षय; समूळ नाश (लोकवस्ती, वंश, कुल, गुरेंढोरें वगैरेचा सांथ, रोग वगैरेमुळें); पार संपणें; खपून जाणें; सरणें (एखादापदार्थ, संपत्ति, जिंदगी-खाण्यामुळें, उधळपट्टीमुळें वगैरे). (क्रि० वळणें; उडणें; होणें; वळवणें; उडवणें; करणें). [अर. सफ्फ=रांग, ओळ; ध्व.] –क्रिवि. अगदीं; समूळ; पूर्णपणें; मुळींच. 'तो तर माझें बोलणें सप्फा ऐकत नाहीं.'

सप्रचीत, संप्रचीत—वि. अनुभविक; अनुभवसिद्ध; अनुभवाचें; प्रचीतीस आलेलें. [स+प्रचीति]

संप्रति—क्रिवि. सांप्रत; सध्यां. [सं.]

सप्रतिबंध—वि. अडथळा, हरकत, बंधन, मर्यादा असलेला. **०दाय**–पु. मुलगा, नातू, किंवा पणतू नसल्यास मालमत्तेचा वारसा इतर वारसाकडे जावयाचा तो **०व्यापार**–पु. संरक्षित व्यापार.

संप्रदान—न. १ अर्पण करणें; प्रीत्यर्थ करणें; स्वाधीन करणें. २ कर्ता स्वनिष्ठ क्रियेच्या कर्मानें किंवा स्वनिष्ठ क्रियेनें ज्या कारकरूप अर्थाति अभिसंबंध करतो असें जें कारण तें; चतुर्थी विभक्तीचा अर्थ. 'ब्राह्मणास गाय दिली, मुलासाठीं रडतो.' येथें ब्राह्मण व मूल हीं संप्रदानें. [सं. सम्+प्र+दा=देणें]

संप्रदाय—पु. १ चाल; रीत; वहिवाट; शिरस्ता; प्रघात. २ प्रचार; वाक्प्रचार; बोलण्याची रूढी; म्हण. ३ परंपरागत अथवा प्रमाणभूत तत्त्व. ४ (धर्म, तत्त्वज्ञान) मार्ग; पंथ; मत. 'गुरु संप्रदाय धर्म। तेचि जयाचे वर्णाश्रम।' –ज्ञा १३.४४४. [सं. सम्+प्र+दा] **०शुद्ध**–वि १ रीतीस, वहिवाटीस, रूढीस धरून असलेलें; रीतसर; प्रघातानुरूप. २ रास्त; योग्य; तत्त्वाप्रमाणें; पायाशुद्ध (कार्य, चाल). **संप्रदायी**–वि. विशिष्टपंथास अनुसरणारा; विशिष्टमताभिमानी; विशिष्ट मार्गाचा अवलंब करणारा. **संप्रदायीक**–वि. (प्र.) सांप्रदायिक संप्रदायास, पंथ, मार्ग, रूढी वगैरेस अनुसरून असलेलें.

संप्रधार—पु. विचार; निश्चय; निर्णय. 'ऐसा करूनि संप्रधारू। मानसी आला विचारू।' –कालिका १०.१५. [सं. सम्+प्र+धृ] **संप्रधारणा**–स्त्री. विचार.

सप्रभ—वि. तेजस्वी; प्रभायुक्त. 'तेणें घनश्यामता शोभ। अति सप्रभ साजिरी।' –एभा ३०.१९३. [सं. स+प्रभा]

सप्रभव—वि. सामर्थ्यासह; शक्तीसहित; पराक्रमी. 'संपादिलें सप्रभव। श्री गहिनीनाथा।' –ज्ञा १८.१७५६. [सं. स+प्रभव]

सप्रयुक्त—क्रिवि. युक्तीनें; बऱ्याबोलानें; नीटपणें. 'सप्रयुक्त राऊत हातीं न देत तरी हल्ला....' –इमं १७१. [स+प्र+युक्ति]

सप्रयोजन—वि. सकारण; आवश्यक; जरूरीचें; योग्य. [सं. स+प्रयोजन]

सप्रवर, संप्रवर—त्रि. दोन अधिक घराण्यांतील प्रवर (मूळ पुरुष, कुलांतील श्रेष्ठ पुरुष) एक असणें; दोघांचे प्रवर समान असणें. –वि. ज्यांच्या प्रवरांमध्यें एखादा प्रवर सामान्य आहे अशीं (कुलें).

संप्रसारण—न. (व्या.) य, व, र, ल, यांचे जागीं इ, उ, ऋ, ऌ या स्वरांचा आदेश होणें ही क्रिया. [सं.]

संप्रज्ञात—वि. सविकल्प. **०समाधि**–पु. सविकल्प समाधि; ज्यामध्यें प्रपंचाचें भान राहतें असा समाधि. 'जेथ उल्हासे विगुंतलें मन। ते संप्रज्ञात समाधि जाण।' –एभा ९.१४९. [सं.]

संप्राती—पु. (तंजा.) जमीनदाराच्या पदरीं असलेला हिशेबनीस व मुखत्यार (चोळ, पांडय राज्यांतील). [सं. सम्+प्रति]

संप्राप्त—वि. १ पूर्णपणें मिळविलेलें; स्वाधीन झालेलें; पूर्ण केलेलें; पार पाडलेलें; सिद्ध. २ जवळ आलेला; प्राप्त झालेला; भरलेला (ज्वर, आजार, झटका वगैरे). [सं. सम्+प्र+आप्] **संप्राप्ति**–स्त्री. १ पूर्ण प्राप्ति; सिद्धता; पूर्णता; स्वाधीनता. २ (रोगाचें वगैरे) आगमन; भर.

संप्रु(प्रू)ण—वि. (अप. प्र.) संपूर्ण. 'संप्रुणाच्या दिवशीं नव्हते का आलें.' –मोर १५. 'पाचां उतरीं सुफळ संप्रूण.' –कहाण्या.

सप्रेम—वि. प्रेमयुक्त; स्नेहयुक्त; स्नेहभरित; प्रेमपूर्ण. 'सप्रेम नृत्य करितात.।' सप्रेमकीर्तन–भक्ति–भाव–स्तवन–भजन–नामोच्चरण–दान–दर्शन–चुंबन–आलिंगन–अश्रुपात–पान्हा–हृदय–अंतःकरण–भाषण–कवन वगैरे. अशा अनेक वाक्प्रचारांत हा शब्द आढळतो. –क्रिवि. प्रेमपूर्वक; प्रेमानें; स्नेहानें.

सफ—पु. कत्तल; मारामारी; विध्वंस; नाश. [अर. सफ्फ्= ओळ, रांग] सफका पहा. **०जंग**–पु. निकराचा हल्ला. 'इकडून चढून सफजंग घेऊन. ...' –पेद २१.२७.

सफई—स्त्री. सफाई पहा.

सफर—न. मुसुलमानी वर्षातील दुसरा महिना. [अर.]

सफर—स्त्री. १ प्रवास; जलपर्यटण; गलबतावरील फेरी, खेप. २ खलाशाचा धंदा; दर्यावर्दी. ३ दर्यावरील फेरीबद्दल मजूरी, वेतन. [अर. सफर्] **सफर साधणें**–प्रवासाचा हेतु साध्य होणें; कार्यसिद्धि होणें; शिकार साधणें. **सफरनामा**–पु. प्रवासवर्णन. **सफरी**–पु दर्यावर्दी; गलबतावरील नोकर; खलाशी; जलपर्यटन करणारा.

सफरचंद–जंग—न. एक गोड नारिंगाएवढें फळ; सेव.

सफरजंगी—स्त्री. (प्र.) सफेजंगी. तुंबळ युद्ध; भयंकर, निकराची लढाई. (क्रि० झडणें; उडणें; होणें; चालणें). [फा. सफ+जंग]

सफरदायी—पु. नायकिणीच्या मागें सारंगी वाजविणारा.

सफरा—पु. घोड्याचा एक त्वग्रोग. –अश्वप २.२३४.

सफरिन—न. सुमारें आठ आणे किंमतीचें नाणें. [पोर्तु.]

सफल–ळ—वि. १ फलयुक्त; फळें येणारा (वृक्ष वगैरे). 'सफळ देखोनि दिव्य द्रुम। बहु धांवति जेवीं विहंगम।' २ (ल.) लाभदायक; फलदायी; फायदेशीर; यशस्वी; फलद्रूप; प्राप्ति देणारा (धंदा, व्यवसाय, काम). 'केले उद्यम सदां सफल।' –ज्ञा १०.१६८. [सं. स+फल्=उत्पन्न होणें] **सफळ**

अंडें–न. कोंबड्यांतील नरमादी यांच्या संबंधापासुन मिळणारें अंडें. हेंच उबविण्यास योग्य असतें. **सफळित**–धावि. फलद्रूप; यशस्वी. –एभा २३.३१७.

सफा—स्त्री. १ रांग; ओळ. २ कतल; सफ पहा. [अर. सफ=रांग, ओळ]

सफा—वि. शुद्ध; साफ; छान; सुंदर. ' दरखणास मेहेरप । काम काय सफा । गंजिफा दुपारवर खेळली । ' –प्रला २२९. [अर. सफा=स्वच्छता] **सफाचट**-वि.क्रिवि. १ साफ; गुळगुळीत (हजामत). २ अजीबाद.

सफाई—स्त्री. १ तजेला; जिल्हई; तकाकी; चकाकी (घासुन आणलेली). २ (ल.) स्वच्छता; शुद्धता; व्यवस्थितपणा; नीटनेटकेपणा. ३ कौशल्य; चलाखी; हातोटी. ४ समेट; दिलजमाई; अंतःकरणशुद्धि (वांधा, संशय, हेवादावा काढून टाकलेली); जुळणी; व्यवस्थित मांडणी; दुरुस्ती (हिशेब वगैरेची, परस्परांची समजूत, अटीबद्दलची वगैरे). –क्रिवि. पूर्णपणें; सपशेल; अगदीं; समूळ; अजीबात; साफ. (क्रि० बुडणें; नाश होणें; जाळणें; वगैरे). [अर. सफाई] **सफाईदार**–वि. स्वच्छ; गुळगुळीत; लखलखीत; सुंदर. **सफाईगिरी-दारी**–स्त्री. स्वच्छता; चकाकी; गुळगुळीतपणा; जिल्हई. **सफाईबंद**–क्रिवि. साफ;समूळ; निर्मूळ; अगदीं; अजीबात. ' जमीनीबरोबर कलमास जे फाटे फुटतील ते सफाईबंद कापून काढून टाकिले पाहिजेत. ' –कृषि ६८९.

सफाप—स्त्री. कांच; स्फटिक [फा.]

सफार—वि. (व.) सपाट; समांतर.

सफांशी—वि. फांसा असलेलें; नेढें असलेलें (पुतळी, पदक, नाणें). [स+फांसा]

सफील—स्त्री. सफेली पहा.

सफेजंग-गी—स्त्री. १ सैन्य; फौज; सज्ज सेना. २ निकराची लढाई; दारुण युद्ध; खडाजंगी; घोर युद्ध. ' सफेजंग होऊन गेली. ' –भाब ६४. ' उभयतां चिरंजिवांनी सफेजंगी केली. ' –ख १.२८. ३ उध्वस्तता; सत्यनास. [अर. सफ+जंग पहा] **सफेजंगबहादर**-वि. रणशूर; शौर्यधुरंधर (एक किताब). तुकोजी आटोळ यास ही पदवी होती. –पया ९८. मराचिथोरा ५२.

सफेत—वि. पांढरा; शुभ्र; श्वेत. विशेषतः पांढरा या शब्दास जोडून येतो. उदा० पांढरा सफेत. ' सफेत कलंदर फकीर.। ' –भज ४६. [फा. सफेद्; सं. श्वेत] ०**मुसळी**-स्त्री. एक औषधी जिन्नस; पांढरी मुसळी. ०**मोरचूद**-पु. पांढरा मोरचूत. **सफेता**-पु. पांढरा रंग; शिशाचें कर्बनत्रित. **सफेती**-स्त्री. १ शुभ्रता; पांढरेपणा; श्वेतता; धवलिमा. २ पांढऱ्या रंगाचा हात. ' पाचव्या मजल्यावरतीं सफेतीचा थाट ग. ।' –प्रला ९४.

सफेद, सफेद मुसळी, सफेदा, सफेदी—सफेत वगैरे पहा.

सफेल-ली—स्त्री. १ तटाची भित; परकोट. ' इकडील अलंग फोडून पलीकडील सफेल फोडून गोळा पार झाला. '–होकै २०. ' सफेलीचें काम चालीस लावणें म्हणोन आज्ञा. '–पेद १. ७. २ घराच्या पुढील किंवा वरील चुनेगच्ची, ओटा वगैरे. ' सफेलीचे वाडयांतील जो पोर आहे त्यानें ती फुस लावून नेली. ' –बाळ २.१०. [अर. फसील्]

सफै—क्रिवि. (व.) सफाई पहा.

सफोल—वि. निष्फळ; व्यर्थ; पोकळ. ' सांगतांचि सफोल । होतसे वाचा । ' –ज्ञा १६.३१३. [स+फोल]

सफर-री—सफर-री पहा.

सब्-ब—वि. सर्व; समस्त; सगळें. [फा. सं. सर्व] **म्ह०** १ सब सोनारकी एक लोहारकी. २ सब घोडे बारा टक्के. **सबदस्त**-वि. समस्त; सर्व. **सब्बकहीं**-क्रिवि. चोहोंकडे; सर्वत्र.जुनीं. **सबहाल**-पु. बित्तंबातमी.

सबकल-खल—वि.क्रिवि. बरोबर; ठीक; बेतानें; जोगतें; जुळेसें; नियमित; परिमित. सपखल चबखल पहा.

सबज—वि. हिरवा; सबजासारखा रंग. ' सबज पोशाख. ' –पेद ६.५८. ' दरोबस्त काम एकरंगी सबज रंगाचेंच जालें आहे. ' –ऐकिप्र ६२. [फा. सब्ज्]

सबजा—पु. १ एक तुळशीसारखें रोप. ' तुळशीपत्रें सुकलीं सबजा ये सकलां वरती । ' –विक ९०. २ घोडयाचा रंग. [फा. स्पब्झा] **सबजाजर**-पु. कुरण; गायरान.

सबजी—स्त्री. १ हिरवेपणा; हिरवळ; टवटवी. २ भाजी; भाजीपाला; पालेभाजी. ३ भाजीपाला, फळफळावळ वगैरेवरील कर. ' शेवसबजी व वाणगी देशमुखाचे निमे करार केली असे. ' –वाडबाबा ३.३. ४ भांग (पाला किंवा पेय). [फा. सब्झी] ०**फरोष**-पु भाजीविक्या. ०**मंडी**-स्त्री. भाजीबाजार.

सबजया—वि. काळे पांढरे ठिपके असलेला (घोडा).

सबत—स्त्री. सिद्धता. –आदिलशाही फर्मानें. [फा. सबूद=टोपली]

सबतुटी—स्त्री. (सोंगटयांचा खेळ) सर्व मरून एकटीच राहिलेली सोंगटी. **म्ह०** सबतुटी आणि भलताच कुटी.

सबंद-ध—वि. १ बांधलेलें; बंधन, वेष्टन यांसह; दोरी वगैरेनीं आवळलेलें. २ (ल.) पूर्ण; सर्व; संपूर्ण; अविभक्त; सगळा; सलग. ' गुळाची ढेप सबंध वजन केली तर अधिक भरेल. ' [सं. स+बंध] **म्ह०** सबंध गलबतांत सुपारी=एखाद्या मोठ्या कामांत अत्यंत अल्प भाग घेऊन श्रेय मिळविणें. ०**वहीत**-वि. सर्वच्या सर्व लागवड केलेली; कोणताहि भाग न वगळतां कसलेली (जमीन). याच्या उलट पोटवहीत.

संबद्ध—धावि. जोडलेलें; निगडित; नातें असलेलें; तद्युक्त.

संबंध—पु. १ संयोग; संसर्ग; नातें; योग; धागादोरा. २ (ल.) विवाह; लग्न. 'रेवतीबाई रामरावाच्या द्वितीयसंबंधाच्या पत्नी होत्या.' –कोरकि ४२९. ३ मृत ब्राह्मणाचें पिशाच्च. [सं. सम्+बंध्=बांधणें] **संबंधन**–न. जोडणें; संयोजन; संयोग; परस्परांस निगडित करणें. **संबंधम्**–पु. मल बारांत नायर लोकांत प्रथम विवाहविधीनंतरचा जो स्त्रीपुरुष व्यवहार होतो तो. **संबंधी**–पु. आप्त; नातेवाईक; नातलग. 'मूर्खें म्यांच बुडविले संबंधी बंधु आप्त शोकांत।' –मोभीष्म ११.२. –वि. संबंधाचा; नात्याचा; संबंध असलेला; संयोजित; निगडित; युक्त; तद्विषयक. उदा० ग्राम–पुण्य–सुख–पाप–गृह–संबंधी. **संबंधीक**–वि. १ संबंधाचा; विषयींचा; संयोजित. २ राक्षसी स्वभावाचा. ३ पिशाच्च, संबंध विषयक. **संबंधी सर्वनाम**–न. सर्वनामाचा एक प्रकार; दुसऱ्या नामाशीं अथवा सर्वनामाशीं संबंध असणारें किंवा दाखविणारें सर्वनाम.

सबनीस—पु. दरकदाराचा मुख्य कारकून; शिबंदी व सरकारी नोकर यांस पगार वाटून त्याचा हिशोब व लिहिणें करणें; दफ्तरदार; सेनालेखक. 'सबनिसांनीं लष्करची जमा, सुदती, तैनात, हजीरगणती करणें ते सरदार, मुजुमदार, कारभारी यांस बसवून त्यांचे विचारें करावी.' –वाडसनदा २६. [फा. सफ्नवीस्] **सबनिशी**–स्त्री. सबनिसाचें काम व हुद्दा. 'किले मजकूर येथील सबनिशी पेशजीपासुन आपल्याकडे आहे.' –समारो ६.१५३.

सबब—स्त्री. कारण; निमित्त; प्रयोजन; हेतु. 'ऐशा तीन सबबीनें बायका आपला दिल सक्त करून सती जातात.' –ऐटि १.३३. –क्रिवि. कारणानें; म्हणून; मुळें. 'त्यानें शिव्या दिल्या सबब म्यां तोंडांत मारली.' [अर. सबब्]

सबर—वि. सगर्भ; गाभण (घोडी किंवा गाढवी). [सभर]

सबर—पु. धीर; सबुरी. 'सबर व विवेक करावा.' –पया ४६७. [अर. सब्र्]

सबर—स्त्री. कोरफडीची एक जात. [अर. सब्र्]

सबर—वि. श्रीमंत; थोर. [सभर]

सबरनिबर—वि. चांगलें–वाईट; निवडक नव्हें असें; सरमिसळ. –पया ८०.

सबराभरित—वि. सर्वव्यापक; सबाह्य अभ्यंतरित. –ना. ९८४. –ए २१०५. सभराभरित पहा.

सबराद—पु. (व.) सोस; हव्यास.

सबल–ळ—वि. १ सशक्त; सामर्थ्यवान; बलवान; जोमदार; बळकट; मजबूत. २ सैन्यासह. 'सबल सचिव तो भूपति मृगया करितां वनीं बहु श्रमला।' –मोआदि ३२.३. ३ पुष्कळ; अमित. 'किंवा धन वेंचूनि सबल।' –कथासा ७.५९. [सं. स+बल]

सबलस—वि. सपशेल लोटांगण घातलेला; दंडवत घातलेला. 'सबलस गौळणी गाऱ्हाणें देती हरीचें।' –भज ८.

सबसणीस—क्रिवि. (राजा.) घट्ट; मजबूत; न हालेसा; पक्का; न उलटेसा. (क्रि० बसवणें; ठेवणें; बसणें–एखादी वस्तु).

सबसब–बां—सपसप पहा.

सबसल–लां, सबसेल–ला, सबसैल–लां—सपसल पहा.

सबळ, संबळ—स्त्री. शिदोरी; अन्नसामुग्री. 'आणि प्रिय आलिया स्वभावें। सबळ उरे वेंचें ठाउवें नव्हे।' –ज्ञा १८.५९१.

सब(ब्ब)ल–ळ–सबळ–संबळ—पुस्त्री. १ तोंडाशीं दुभागलेली मोठी पहार; सामान्यतः पहार. २ तोमर; छेळणें; भाल्यासारखें एक शस्त्र. कांहींच्या मतें संबळ हा शब्द पुल्लिंगी असुन फक्त मोठी पहार हा अर्थ दाखवितो व सबळ हा स्त्रीलिंगी असुन दुधारी पहार किंवा छेळणें दाखवितो. 'कौतुकें जें जें जल्पे। तें सबळाहूनि तीख रुपे।' –ज्ञा १३.६६२. [स+बल]

सबळ—वि. बलयुक्त. सबळ पहा.

सबळ—वि. (प्र.) शबल. औपाधिक; मायिक; मिश्र; गढूळ. 'त्यांतही शुद्ध आणि सबळ।' –दा २.५.३. [सं. शबल]

संबळ—पु गोंधळी वगैरेंचें एक मृदंगासारखें वाद्य. याचे दोन भाग असतात–एक पडगा किंवा पडगी अथवा झील. हें लहान असुन उच्च स्वर काढतें व दुसरें बंब, घूम किंवा धम. हें मोठें असुन खालचा स्वर काढतें. **संबळ्या**–पु. संबळ वाजविणारा.

सबळी—वि. (बुद्धिबळें) ज्यांत जोर असलेलींहि मोहरीं मारलेलीं चालतात असा बुद्धिबळें खेळण्याचा प्रकार; निजोरी; जोरी डावाच्या उलट.

संबळी—स्त्री. देव व देवार्ची उपकरणीं ठेवावयाची वेताची करंडी, पेटी. 'पिंड ब्रह्मांडाची उघडूनि संबळी रे। देव न पूजी त्याची जननी धुंबळी रे।' –मध्व १७९.

सबळें—क्रिवि. १ सवेंच; लागलीच. २ बळें करून; जोरानें. [स+बळ]

सबां—वि. सात. मुसलमानी वर्षगणनेंत योजतात. [अर. सबां]

सबाध—वि. दोषयुक्त; सदोष; उणीव, न्यून, कमतरता, अपुरेपणा असलेलें (म्हणणें, पद्धति वगैरे). 'संसारभये सबाध। जिवा ययां।' –ज्ञा १८.६९८. [सं. स+बाधा]

सबाय—स्त्री. (नाविक) शिडाची काठी सरूं नये म्हणून बांधलेली दोरी.

संबार—पु (खा.) चटणी. [सं. संभार]

संबाहणें—उक्रि. संवाहणें; चोळणें; मर्दन करणें. 'परिमार्जुनी केश वसनीं। संबाहिले सुस्नेहें।' –मुसभा ६.१६. [सं. संवाहनम्]

सबाह्य—वि कायिक व मानसिक. –क्रिवि. अंतर्बाह्य; आंतून व बाहेरून. 'जैसें सबाह्य जळडोहीं बुडालिया घटा।' –ज्ञा ७.१३३. [सं. स+बाह्य]

सबाह्याभ्यंतर—न आंतील व बाहेरील भाग; अंतस्थ हेतु व बाहेरील क्रिया, वागणूक 'या पुरुषाचें सबाह्याभ्यंतर मला कळलें आहे.' –क्रिवि. १ बाहेरून व आंतून. 'सबाह्याभ्यंतर समदृष्टि।' –एरुस्व १.५९; 'तैसें म्यां जग धरिलें। सबाह्याभ्यंतरीं।' –ज्ञा ७ ३२. २ प्रत्यक्ष व मनापासून; अंतःकरणपूर्वक व बाह्यतः; उघड व मनापासून. [सं. स+बाह्य+अभ्यंतर]

सबिना—पु. छविना पहा. 'राजे सर्व सबिन्यासहित तानाशा पातशहाचे शादमहालास दाखल जहाले.' –मदरु १.९५.

सबील—स्त्री. रस्ता; मार्ग; पद्धति. [अर. सबील] **सबील करणें**–कसेंहि करून, भीक मागून अगर उसने घेऊन पैसा उभा करणें; द्रव्य गोळा करणें. 'खर्च तोडून अदवानीवर सबील करावी.' –रा ५.१८७.

सबुडबुडी—क्रिवि. समूळ; संपूर्ण; सहज. 'बेडूक सर्पाचिया तोंडीं। जातसे सबुडबुडीं।' –ज्ञा १३.७३०.

सबुदा—पु. (कर.) बेगमी; पुरवठा; सांठा. 'यंदा धान्याचा सबुदा चांगला केला पाहिजे.' [सं. सुपूर्ति; सुबत्ता? फा. सबूद=टोपली]

सबुद्धि—स्त्री. पूर्ण जाणीव; ज्ञान; समज. [सं.]

संबुद्धि—स्त्री. ऐकमत्य; सहमत. 'संबुद्धि घेता समान श्रीहरि। शमदम वैरी हरि झाला।' [सं.]

सबुरी, सबूर—स्त्री. शांति; धीर; दम; सहनशीलता; सहिष्णुता; मुलाहिजा; तहकुबी. 'परंतु ते दिवशीं सबूर करविली.' –ख ६.३१. [फा. सबूरी] **सबूर**–वि. सधीर. –ऐटि ५.१. –उद्गा. थांब; धीर धर. [अर. सबूर्] **सबुऱ्या**–वि. धीराचा; दमदार; सहनशील. –क्रिवि. अवसान घेऊन; दम खाऊन जोरानें; सर्व सामर्थ्य एकवटून. (क्रि० डसणें, डंख मारणें, फेंकणें, मारणें).

सबुली—स्त्री. (व.) पुरावा. [सबल]

सबे(वे)रे—क्रिवि. सकाळीं; प्रातःकाळीं. [सं. सुप्रहरे]

सबैन—वि. सत्तर; अरबी वर्षगणनेंत योजतात [अर. सब्ईन]

संबोखणें—अक्रि. १ हांक मारणें; पुकारणें. 'मग श्रीकृष्णें संबोखून। सावध केलें पार्थासी।' –पांप्र. २ समजूत करणें; शांतवन करणें; आश्वासन देणें. 'येणें परी जननी जनकां। संबोखीत पुत्र निकां।' –गुच ३०.५६. 'मग ते रावणें संबोखिली।' –रावि १४.१३७. [सं. सम्+बुध्]

संबोधणें—उक्रि. हांक मारणें; उद्देशून बोलणें; बोलावणें. [सं. सम्+बुध्] **संबोधन**–न. १ हांक मारणें; उद्देशून भाषण, आमंत्रण. २ (व्या.) आठवी विभक्ति; संबोधन विभक्तीचा अर्थ–हे, अरे, अहो. ३ विशेषण; उपपद; पदवी. 'तो सुज्ञ आहे, थोर आहे, धीट आहे एवढीं संबोधनें कशाला! ४ (चुकीनें) उदाहरण. **संबोधित**–वि. उद्दिष्ट; उद्देशिलेला.

सबोंब—वि. सुशोभित. 'तेथ मेधारसें सगर्भ। आस्थापत्रीं सबोंब।' –ज्ञा १५.१८७.

सब्बां, सब्बैन—सात, सत्तर; सबां, सबैन पहा. [अर. सब्अ, सब्ईन]

सब्रह्मचारी—पु. सहाध्यायी. [सं.]

सभय—वि. १ भ्याालेला; भयभीत; साशंक; भीतियुक्त. २ भीतिदायक; भयंकर; धोक्याचा. [सं.]

सभर—वि. सबर; गाभण; सगर्भ (घोडी किंवा गाढवी). –क्रिवि. भारासहित; जोरानें; सपाट्यानें; अवजडपणें (पडणें, टोला बसणें, काठी मारणें).

संभरण—न. पोषण. [सं.]

सभराभरित—वि. जिकडे तिकडे भरलेला; अंतर्बाह्य व्यापक; सर्वत्र पसरलेला. 'नभाचें परि सभराभरित।' –रंयो ५.१८२. 'आकाश जैसें सभराभरित।' –सिसं ७.४२. [सं. सभर+भरित]

सभर्तृका—स्त्री. १ सुवासिनी; पति जिवंत असलेली स्त्री. २ पतीबरोबर असलेली स्त्री; भर्त्यासहित पत्नी. [सं.]

संभव—पु. १ अस्तित्वाची शक्यता. योग्यता, पात्रता; शक्यता; संभवनीयता. २ अंदाज; शंका; संशय. 'ही गोष्ट संभवानें लिहिली आहे.' –मराठी सहावें पुस्तक (१८७४) पृ. १६. 'तूं तिकडे रहावयास जाणार असा मला संभव येतो.' ३ अनुसंधान, धोरण; धरबंध; सुमार. ४ जन्म; उत्पत्ति; निपज; अस्तित्वांत येणें. 'हेचि हेतु संभवा। कर्माचिया।' –ज्ञा १३.९६७. 'शिवसंभव.' (समासांत) गर्भसंभव, रोगसंभव, कफसंभव इ० हे तत्पुरुष समास व पद्मसंभव, योनिसंभव, सूर्यसंभव, काष्ठसंभव, मृत्संभव हे बहुव्रीहि समास. ५ मिश्रण; संमेलन; समाहार; एकीकरण. [सं. सम्+भू=होणें] **संभवणें**–अक्रि. १ शक्यता असणें, असण्याचें सामर्थ्य, पात्रता, योग्यता असणें. 'म्हणशी नैष्कर्म्य होआवें। तरी एथ तें न संभवे।' –ज्ञा ३.७७. २ अनुबद्ध, अनुयोगी असणें. ३

उत्पन्न होणें; प्रसवणें; जन्म होणें; अस्तित्वांत येणें, असणें. 'वरि ज्ञानकर्में संभवे। ऐसेंकें जोडे।' –ज्ञा १३.४७२. **संभवदुक्तिक**–वि. शक्य म्हणण्यासारखी. 'पिशाच कोणाच्या स्वाधीन असणें संभवत नाहीं व तें दृष्टीस पाडावयाचें कोणांत सामर्थ्य असेल ही गोष्ट संभवदुक्तिक म्हणतां येणार नाहीं.' –नि २१२. **संभवनीय**–वि. होण्यासारखें; घडण्यारखें; शक्य. **संभववारस**–पु. उत्तराधिकारी. (इं.) रिव्हर्शनर. **संभवि, संभाव्य**–वि शक्य; होण्यासारखें. 'आमचें म्हणणें अधिक संभवि दिसतें.' –विवि १८७६.२.२४. **संभवी**–वि. उत्पन्न करणारी. 'ते दैवी सुख संभवी।' –ज्ञा १६.६७.

सभंवता, सभंवतालां, सभंवती––क्रिवि. भोवतीं; सर्व बाजूंनीं; सर्भोवार; सगळीकडे; चोहोंकडे. 'तो सभंवता देखुनी रणरंग.।' –गीताचंद्रिका २०.

संभहु––पु संभव; सांठा; भर. 'हा तंवचि आदर बहु। जंव सुकृतांचा संभहु।' –ऋ २९. [सं. संभव]

संभळ––न. संबळ पहा. संबळी पहा.

सभा––स्त्री. १ ज्या ठिकाणीं विद्वान्, पंडित, गुणीजन, राजे लोक वगैरे जमतात, बसतात अशी जागा; दरबार; मंत्रगृह; 'राजसभा, ब्रह्मसभा.' 'सभे शिशुपाळ घेतला प्राणें।' –मुसभा १२ १४४. २ समाज, मंडळी; जमाव; समुदाय; बैठक; आखाडा; मेळा. ३ सभेसंबंधी गाणें. 'तेचि सभा गातों सभेमधि तेचि सभा गातो' –पला २०.४०. ४ शाळा; धर्मशाळा; दालन. 'एका सभेंत रात्रौ निजला...।' –मोवन ४.१११. **सभाजिंकणें**–वादविवादांत यश मिळवणें; फड मारून नेणें; आपलें म्हणणें खरें करणें. **सभाकंप**–पु. सभेमध्यें भरणारें कांपरें; लाजाळूपणा; संकोच. २ मन अपराधी असल्यामुळें वाटणारी भीति व त्यामुळें होणारा थरकांप, गोंधळ. **सभांगण**–न. १ सभेची जागा. २ रंगण; चौक; मोकळी जागा. 'सजूनि वर वल्लभी तव सभांगणीं नाचतो' –केका ११४. **सभांगना**–स्त्री. वारांगना; कलावंतीण; नायकीण. 'तक्तराव जिलेवंत नाचती सभांगना आनंदांत' –ऐपो १९९. **सभागृह**–न कचेरी; दिवाणखाना; सभेची जागा; दरबारची जागा. **सभाचातुर्य-कौशल्य-पाटव**–न. शिष्टाचार; सभ्यता; रीतरिवाज; चार मंडळींत वागण्याची योग्य पद्धति व त्यांत दिसून येणारी चांगली बुद्धि. **सभाजन**–पु. १ सभेंतील सदस्य; मंडळी; समाज; लोकसमुदाय. २ सभासद; सभेंत बसणारा गृहस्थ. **सभादीप-दीपक-दिवा**–वि. १ श्रावणीच्या दिवशीं ब्राह्मणास अग्निसमक्ष सुवासिनी दान करतात तो दिवा. २ सभादीप दान करण्याचा विधि. ३ (ल.) सभाभूषण; सभेचा अलंकार. **सभाधिकारी**–पु. सभेचा नेता; अध्यक्ष. **सभाधीट**–वि. सभेमध्यें न भितां, न गोंधळतां भाषण करणारा. **सभाधूर्त**–वि. सभेमध्यें, दरबारांत वाद, मसलत, मध्यस्थी वगैरे कामांत प्रवीण, वाकबगार, हुशार; सभाकुशल–चतुर–पटु हे पर्याय शब्द आहेत. **०धैर्य**–न. सभेंतील धीटपणा; आत्मविश्वास; धिटाई. **०धौर्त्य**–न. सभेंतील धूर्तता, चातुर्य, कौशल्य. **सभाध्यक्ष, सभानायक, सभापति**–पु. सभेचा प्रमुख, मुख्य, नेता, पुढारी, अध्यक्ष, मुखर, उपद्रष्टा. **०नियम**–पु सभेसंबंधीं कायदा, निर्बंध, काम चालविण्याविषयीं पद्धति. **०नीति**–स्त्री. सभेसंबंधी नियम, निर्बंध, कायदा, पद्धति. **०पाण्डित्य**–न. तादृश अंगीं विद्यादि असोनसो पण सभादिकांमध्यें भाषणादि करण्याचें सामर्थ्य. केवळ सभेमध्यें ज्ञानाचें प्रदर्शन; वरकरणी दाखविण्याची विद्वत्ता. **०प्रवेश**–पु. १ सभेच्या कामास आरंभ, सुरुवात. २ सभासदाचा सभेमध्यें येण्याचा पहिला प्रसंग; नवीन सभासदास सभेंत दाखल करून घेणें. **०भीत**–वि. सभेमध्यें लाजणारा; संकोच वाटणारा; धीटपणा नसणारा. **०भीति**–स्त्री. समाजाची, मंडळीची भीति, भीड, लाज, संकोच; सभेमध्यें घाबरण्याची सवय. **०भीरू**–वि. सभेमध्यें लाजणारा; संकोची. **०भूषण**–न. सभेचा अलंकार; पंडित, विद्वान मनुष्य; सभेमध्यें शोभणारा. **०मंडन**–न. १ सभेची रोषणाई; सभास्थानाचें अलंकरण. २ सभेचा अलंकार; पंडित, विद्वान मनुष्य; सभेला शोभा आणणारा विद्वान. **०मंडप**–पु. १ सभास्थान; सभेची जागा; मंत्रगृह; दिवाणखाना. २ मंदिराच्या गाभाऱ्यापुढें कीर्तन–पुराणादिकांकरितां बांधलेली आच्छादित जागा. ३ गाभाऱ्यापुढील मोकळी जागा. **०मोहन**–न नजरबंदी; सभेस चकविण्याची, भुलविण्याची विद्या. 'सभा मोहन भुरी चेटकें। साबरी मंत्र कौटलें अनेकें।' –दा ५.२.२. **०रंजन**–न. सभेची करमणूक; मंडळींचें मनोरंजन. **०रत्न**–न. सभाभूषण; सभेचा अलंकार. **०लंकार**–पु. सभारत्न. **०व्यवस्थापक**–वि. सभेची व्यवस्था ठेवणारा; शिस्त राखणारा; सभा व्यवस्थितपणें चालविणारा. **०व्यवस्थापन**–न. सभेची व्यवस्था, व्यवस्थित मांडणी, व्यवस्थित कार्य, शिस्त, देखरेख. **०शूर**–वि. सभेंत किंवा मंडळींत धीट; आत्मविश्वासी; सभेमध्यें पराक्रम गाजविणारा. **०संकेत**–पु. सभेचे नियम, पद्धति, रूढि. **सभासद**–पु. १ सदस्य; सभेचा प्रत्येक घटक; सभेमध्यें बसलेला प्रत्येक इसम. २ (ल.) लोकांच्या फिर्यादी दाखल करून घेणारा कचेरींतील कामगार. ३ सभास्थान; सभामंडप; सभामंडळ; बैठक. 'तूं या विश्वाची अनादि आदी। बैसर्सी जिये सभासदीं। तेथें सोयरिकीचिया संबंधीं। रळी बोलों।' –ज्ञा ११.५४४. ४ पंच; न्यायदानाच्या कामीं मदत करणारा अधिकारी. 'सभासद भलेलोकीं सांगितलें कीं' –भाइ-समं २.६३. **०स्थान**–न. सभेची जागा; सभागृह, मंडप,

०स्फूर्ति–स्त्री. सभेमध्यें प्रसंगावधान; सभेमध्यें भाषण करतांना येणारें अवसान, स्फुरण. **०क्षोभ**–पु. सभेमध्यें गांगरून जाणें; सभेमध्यें घाबरणें, घोंटाळणें. 'किंवा सभाक्षोभ तयास झाला.' –सारुह ६.९५. **सभोचित**–वि. सभेमध्यें करावयास, मंडळींत करण्यास योग्य; बैठकींत करण्यासारखें. **सभ्य**–पु. १ सभासद; प्रेक्षक. सभेंतील योग्य मनुष्य. 'तैं गुणदोष सायिखेंडें। सभ्युं जैसा।' –ज्ञा १४.३४३. 'भरत कुल धर्म न बुडो सभ्याला पूस एकदां जागा।' –मोसभा ४.१०३. 'न वदति सभ्य न पांडव।' –मोसभा ५५८ २ पंचाग्निपैकीं एका अग्नीचें नांव. –वि. संभावित; प्रतिष्ठित; शिष्ट; सज्जन.

सभागती—क्रिवि. (ना) सहज. 'मी सभागती तेथें गेलों.' [स्वभाव+गती]

सभागी-ग्य—वि. १ भाग्यवान; यशस्वी; दैववान्. 'सभाग्य साधूनि जाय निधि आणि अभाग्य मागें मृत्तिका शोधी.' –भाब १६. –एभा १८.२५. २ शुभ; लाभदायक. [सं. स+भाग्य]

सभागी-गीं—वि. १ (व.) रास्त; योग्य; बरोबर; ठीक. 'तुमचें म्हणणें सभागी आहे. २ क्रिवि (व.) उतारानें; सखल मार्गानें 'सभागीं पाणी उतरून गेलें' [स. सम+भाग]

सभाजन—न. १ पारितोषिक; देणगी; काम–चाकरीबद्दल बक्षिस, उपाद्दार. २ पूजन; सत्कार. 'विश्वामित्र सभाजन करी।' –मोरामायण १.२३४. **सभाजित**–धावि. सत्कारित; पूजित. **सभाजणें**–उक्रि. सन्मान करणें; पूजणें; आदरसत्कार करणें. 'प्रकटुनि साधूंत जपा घेतो अभ्यात्मजु सभाजून।' –मोभीष्म ११.९०. [सं. स+भाज्]

संभार—पु. १ सामग्री; साहित्य. 'तिथें कुंडमंडपवेदी। आणिकहि संभारसमृद्धि।' –ज्ञा १७ १७९. २ संग्रह; सांठा; समुदाय. 'तैसें सर्व भावसंभारें। न धरत प्रेम एकसरें।' –ज्ञा ११.६८८. 'काढोनि पुस्तकांचा संभार।' –शनि १०. (समासांत) अश्वसंभार, गजसंभार, शस्त्रास्त्रसंभार. ३ (व.) कोथिंबीर ४ लोणच्याचा वगैरे मसाला. [सं. सम्+भृ]

संभावना—स्त्री. १ संभव; शक्यता; साहजिकता. २ धोरण; समज; शक्यतेसंबंधीं अनुमान, कल्पना. ३ अंदाज; अनुमान; तर्क; कल्पना; अटकळ. ४ समज; गृहीतार्थ. ५ बतावणी; आव. ६ आदरसत्कार; बहुमानपुरस्कार वागणूक; विदागी; देणगी; दक्षिणा; गौरव; प्रतिष्ठा. 'तरी संभावने जिये। जो मानाची वाट पाहे।' –ज्ञा १३.६५६. ७ औचित्य; सुसंगतता; योग्यपणा; सुसंबद्धता. ८ (व्या.) शक्यार्थ. [सं. सम्+भू=होणें] **संभावनीय**–वि. १ होण्यासारखें; शक्य. २ आदरणीय; सत्काराई सन्मान्य. **संभाविणें**–उक्रि. संभावना करणें; आदर करणें; सत्कारणें; मान देणें. **सभावित**–वि. १ शक्य; संभवनीय; होण्यासारखें. २ सुसंगत; सुसंबद्ध; योग्य; युक्त. ३ सभ्य; पतीचा: सन्मान्य; वजनदार; कीर्तिमान; प्रतिष्ठित; 'रूपसा उदयलें कुष्ट। सैभाविता कुटीचें बोट।' –ज्ञा १६.१७८. **संभाव्य**–वि. शक्य; होण्यासारखें; संभवनीय. **संभाव्यमान**–वि. ज्याच्या शक्याशक्यतेबद्दल विचार चालू आहे अस; ज्याच्यावद्दल भवतिनभवति चालू आहे असें; सामान्यतः शक्य.

सभावीं—क्रिवि. सहज; स्वाभाविक. 'तरि सभावीं होईल मेल्हवनें। या कळेवरासि।' –भाए ८०. [स्वभाव]

संभाषण—न. संवाद; बोलाचाली; परस्पर बोलणें; वचन प्रतिवचन; खलबत; चर्चा; बोलणें. [सं.]

संभाळ—पु. रक्षण; प्रतिपाळ; पालन; संगोपन. [स. संभार] **संभाळीं करणें**–हवालीं करणें; स्वाधीन, सुपूर्त करणें. **संभाळणें**–उक्रि. १ रक्षण करणें; पाळणें; पोसणें; संगोपन करणें; आश्रय देणें; काळजी घेणें. २ धारण करणें; सोसणें; सहन करणें; वाहणें. (भार, कार्याचा बोजा ओझें). ३ –अक्रि. जपणें; काळजी येणें; सावध राहणें. 'संभाळ, अपथ्य केलेंस तर दुखणें वाढेल.' ४ जाणीव असणें; वाटणें; समजणें. 'डाग दिला तरी संभाळत नाहीं मग चिमटा कोठला संभाळावयाला.' **संभाळून घेणें**–वागवून घेणें; चालवून घेणें; सोसणें; खपवून घेणें; काणा डोळा करणें.

संभाळू—स्त्री. निरगुडी. 'काळे दाणे, कालोंजी, संभाळूचीं पानें एरंडेलांत द्यावीं' –अश्वप २ १०४.

सभीत—क्रिवि. (कों.) पुरतेपणीं भिजलेलें; थबथबलेलें; चिंब भिजलेलें. (क्रि० भिजणें; होणें, असणें.)

संभूत—वि. १ सुसंबद्ध; योग्य; सुसंगत; सयुक्तिक; (यावरून शक्य). २ उत्पादित; जन्मलेलें. [सं सम्+भू] **संभूत-ति-संभूतवार्ता**–पुस्त्री. १ संभव; शक्यता; यत्किंचित् सुगावा; माहिती; दखलगिरी; कांहीं तरी बोलवा वगैरे वरून शक्यता वाटण्यासारखी स्थिति. 'त्यास या गोष्टीचा हुजूर संभूत नाहीं.' –दुबा २.८२. 'बेफाम होतें लष्कर नव्हती कांहीं वार्ता संभूत।' –ऐपो ४०१. 'श्रीमंतांचे लग्नाची संभूत देखील आम्हास दखल नाहीं.' –ख ४२२. 'तें उत्पन्न खाणाऱ्या मनुष्यास इन्साफ होण्याच्या वेळाची संभूत वार्ताहि ठाउक नसती' –इनाम ७२. **संभूति**–स्त्री. १ शक्यता; होण्यासारखी स्थिति; संभव. २ सुसंगतता; सयुक्तिकता; सुसंबद्धता; जुळणी. ३ जन्म; उत्पत्ति; पैदास; निपज.

संभूयसमुत्थान—न. पातीदारीचा धंदा; भागीदारी; संयुक्त भांडवलाचा व्यापार. [सं.]

संभोखणें—संबोखणें पहा. शांतवन करणें. 'तैंव योसे मधुरांवचनीं। स्वामिणीनें संभोखुनी।' –क्रिपु २.१२.५३.

संभोग—पु. १ उपभोग; विषयोपभोग; रतिसुख; मैथुन. 'सितेसुंदरी लागी संभोग द्यावा' –राक ४२ २ उपयोग; वापर; सेवन. 'जो श्रद्धेचेनि संभोगें । सुखिया झाला ।' –ज्ञा ४.१८८. ३ शृंगाररसाचा एक प्रकार; संभोगशृंगाराचे उलट विप्रलंभ शृंगार. [सं. सम्+भुज्] **संभोगणें**–उक्रि. उपभोगणें; सेवन करणें (विशेषतः स्त्रीसुख) **संभोगी**–वि. १ उपभोक्ता; भोक्ता; सेवन करणारा; उपयोग करणारा; वापरणारा. २ विषयी; लंपट; चैनी; रंगेल.

सभोंवता, सभोंवताला, सभोंवती, सभोंवर, सभोंवार—क्रिवि.शअ. सर्वबाजूनीं; सगळीकडे; चोहींकडे सर्व दिशांनीं; सगळीकडून.

सभ्रम—वि. भ्रांतिष्ट; वेडा. 'जे माझिया भूली सभ्रम। नेणती लोक।' –ज्ञा ९.३६३. [स+भ्रम]

संभ्रम—पु. १ भ्रांति; गोंधळ; घोंटाळा; गडबड; मोह. 'ना तरी महासिद्धिसंभ्रमें। जिंतला तापसु भ्रमें।' –ज्ञा १ २७१. 'मग लोपिला अद्भुतु। संभ्रमु तो।' –ज्ञा १.१५१. २ औत्सुक्य; तीव्र इच्छा; आकांक्षा; उत्कंठा. 'मग संभ्रमें दिठीसेने । घालितसे ।' –ज्ञा १.१६७. ३ आदर; सन्मान; स्तुती. 'अथवा संभ्रमाचिया आयती । स्नेहे जैसा ये व्यक्ति ।' –ज्ञा १३.१८१. 'नावडे लौकिक संभ्रम ।' यावरून डौल, नटापट्टा, ऐट. ४ भ्रमण; गरगर फिरणें; भोंवरा; चक्राकार गति 'संसारसंभ्रमें आशा लागे पाठीं । तेणें जीवा साठी होईल तुझ्या ।' –तुगा २७१३. ५ पसारा; अवडंबर. 'आणिकही नाना संभ्रम । व्रतांचे ते ।' –ज्ञा १८.९९. ६ चूक; हयगय; गोंधळ; गैरसमज [सं. सम्+भ्रम्] **संभ्रमी**–वि. सन्मान्य; सत्कारित; आदर केलेला. **संभ्रांत**–वि १ गोंधळलेला; गडबडलेला; घोटाळा उडालेला; भ्रांतिष्ट. 'येतुलेया सर्ली । सभ्रांताच्या पोटीं ।' –ज्ञा १३.९०६. २ व्यग्र; उत्कंठित; आवेशपूर्ण; त्रस्त

संभ्रम—पु (प्र.) समारंभ. 'हाचि हवन संपदेचा संभ्रमु।' –ज्ञा ८.५१. 'होतें श्रीकृष्णविंदान । जे संभ्रमें पर्णावी रुक्मिणी।' –एरुस्व १४.३०.

संभ्रांतअहंकार—पु. (नृत्य) विक्षिप्तकरण पुढच्या बाजूस हात फेकून करणें. मग डावा पाय सूची करून डावा हात विक्षिप्त करणें, व वक्षःस्थलावर ठेवणें नंतर त्रिक फिरवून नूपुर, आक्षिप्त, अर्धस्वस्तिक, नितंब, कटिहस्त व कटिच्छिन्न हीं करणें क्रमानें करणें. **संभ्रांतकरण**–न. (नृत्य) मांडीच्या मागें हात वळवून ठेवणें, नंतर त्याच हातानें मांडीस विळखा घालणें.

सम—संस्कृत उपसर्ग. याचे अर्थ. १ संयोग; मिलाफ; युक्तता; सहवास. उदा० संयोग, संमेलन. २ जमाव; समूह; संधान. उदा० संग्रह, संभार. ३ सौंदर्य; शोभन; उत्कृष्टता; ऋजुता. उदा० संमार्जन. ४ प्रकृष्टता; आतिशय्य; प्राशस्त्य; प्राचुर्य. उदा० समाराधन, संदीपन. ५ साहचर्य; एकसमयत्व. उदा० संगति, संमति.

सम—स्त्री. तालाची पहिली टाळी; तालाच्या प्रारंभींचें मुख्य ठिकाण; गायनवादनाचें महत्त्वाचें स्थान. –न. १ एक अर्थालंकार; यामध्यें दोन समान वस्तूंची तुलना केलेली असते. २कोणत्याहि आकाशस्थ उभ्या वर्तुळाचा ज्या बिंदूंत क्षितिजाशीं छेद होतो तो बिंदु. ३ (भूमिति) मध्यमप्रमाण. ४ साम्य; सारखेपणा. 'ऐसें बोधा आलें जया सम। तया कर्तव्य तें नैष्कर्म्य।' –ज्ञा ४. १२१. ५ ब्रह्म. –ज्ञा ६.४३. –वि. १ सारखा; तुल्य; समान; सदृश. उदा० समकाल, समदेश, सम-गति-कांति-गुण-गोत्र-जाति-धन-विभाग-शील-बल वगैरे. 'सकळकाळीं समा । सर्वरूपा।'–ज्ञा११.५३३. 'तुळे घालितां वो नये कनकरासी। सम तुकें एक पान तुळसी वो।' –तुगा १२१. २ एका पातळींतील; सपाट; सरळ; नीट; थेट; एकरूप. ३ दोन या संख्येनें विभाज्य (संख्या). ४ निःपक्षपाती; समदृष्टि; समान अधिकारी. ५ तटस्थ; मित्रत्व अगर शत्रुत्व नसलेला. ६ शांत. 'तैसा आत्मबोधीं उत्तमु। करितां होय जो श्रमु । तोही जेथें समु । होउनि जाय।'–ज्ञा १८. १०९४. [सं.] **०उदर**–न. (नृत्य) नृत्यप्रसंगीं श्वासोच्छ्वास अजिबात बंद ठेवणें. **०कपोल**–पु. (नृत्य) गालांची स्वाभाविक स्थिति. **०ग्रह**–पु. (ताल) गाण्यास व ताल देण्यास जेथें एकदम सुरुवात होते तें ठिकाण. **०चिबुक**–पु (नृत्य) खालचे-वरचे दांत मागें पुढें न होतील, हनुवटी सारखी राहील असे ठेवणें. **०दर्शन**–न. (नृत्य) दोन्ही डोळ्यांचीं बुबुळें एका रेषेंत ठेवणें. **०पाद**–न. (नृत्य) पायांची स्वाभाविक ठेवण; जुळलेले पाय. **०पुट**–न. (नृत्य) पापण्यांची स्वाभाविक स्थिति. **०मान**–स्त्री. स्वाभाविक स्थितींत मान ठेवणें. **०यति**–पु (ताल) गायनाचा प्रारंभ, मध्य व अंत या तीन ठिकाणीं लयीची गति सारखी ठेवणें. **०वक्षःस्थल**–न. (नृत्य) उरोभागाची स्वाभाविक स्थिति. **०अपूर्णांक**–पु. (गणित) छेदापेक्षां अंश लहान असतो असा अपूर्णांक. **०कर्णतुल्य चतुर्भुज**–पु. ज्याचे कर्ण व बाजू सारख्या असतात असा चौकोन; समचतुष्कोण; इं. स्क्वेअर. **०कर्णायत**–पु. दीर्घचतुरस्र; दीर्घ चौकोन. **०कक्ष**–वि. समान; बरोबरीचें; सारखे; जोडीचे. **०कालीन-क**–वि. एकाच काळचे; एकाच वेळचे; एककालीन. **०केंद्र**–वि. ज्यांचा मध्यबिंदु एक आहे अशीं (वर्तुळें). **०कोण**–पु. काटकोन; ९० अंशांचा कोन. **०खात**–पु. (भूमिति) चौरस घन पदार्थ. विटेसारख्या आकाराची आकृति. **०गुणन**–न. एका संख्येस त्याच संख्येनें गुणण्याचा प्रकार; संख्येचा वर्ग करणें. **०घटक**–पु (शाप.) सारख्या आकाराचे पदार्थ, (इं.) आयसोमेरॉइड. –वि. सारख्या आकाराचे, रूपाचे. (इं.) आयसोमेरिक. **०घटकत्व**–न. समरूपता. (इं.) आयसोमेरिझम्.

०घर–न. माजघर; मध्यगृह; मधलें दालन, वठार. **०चतुरस्र**–वि. (रूढ) समचौरस; चौकोनी; चारी कोन सारखे असलेला. –नपु. चारी कोन सारखे असलेली आकृति. [सं. सम+चतुर्+अस्र] **०चित्त**–वि. १ समतोल स्वभावाचा; समदृष्टि; मनाचा कल ढळूं न देणारा. २ तटस्थ; कोणत्याहि विशिष्ट बाजूस मनाचा ओढा नसलेला; उदासीन. **०चौरस**–समचतुरस्र पहा. **०च्छेद**–पु. (गणित) सारखा छेद; सामान्य छेद. –वि. ज्यांचे छेद सारखे आहेत असे (अपूर्णांक). **०च्छेदरूप**–न. ज्या-सर्व अपूर्णांकांस सामान्य असा एकच अंक छेदस्थानीं असतो असे अपूर्णांक. **०तळणें**–अक्रि. (सोनारी) सारखी तोलून मध्यावर खूण करणें (सोन्याची कांब वगैरे). [सम+तोलणें] **०ता**–स्त्री. १ सारखेपणा; बरोबरी. २ अभेदबुद्धि; समबुद्धि; तुल्य मानणें. 'पै भय आणि निर्भयता। अहिंसा आणि समता। तुष्टि तप पांडुसुता। दान जे गा।' –ज्ञा १०.८५. ३ निःपक्ष-पातपणा. ४ ब्रह्मरूपता; तादात्म्य. **०तुक**–वि. समतोल; सारख्या वजनाचें; सारख्या महत्त्वाचें; सारखें. 'तुका म्हणे तुजमध्यें एक भाव। समतुके भार घेऊं पावो उंच टाव।' –भज ३३. **०तुक भाव**–पु. बरोबरी; समतोलपणा. 'घ्या संभाळून समतुकभावें। आपणहि खावें त्याच तुकें द्यावें।' **०तोल**–वि. १ सारख्या वजनाचा; समभार. २ सारखा; सम; जोडीचा; बरोबरीचा; सारख्या गुणांचा, मोलाचा, रंगाचा, दर्जाचा. ३ शांत; सौम्य; न क्षोभ पावणारा (स्वभाव, प्रकृति). समाधान (प्रकृति). ४ सारख्या शक्तीच्या (प्रेरणा). –क्रिवि. दोहींकडे सारखा भार, वजन असलेला. 'होडीमध्यें समतोल बसावें.' **०पणा–अवस्था–स्थिति**–पुस्त्री. एखाद्या पदार्थावर सर्व बाजूंनीं कार्य करणाऱ्या प्रेरणा जेव्हां परस्पर समान असतात अशी स्थिति; तुल्यबलता; (इं.) इक्विलिब्रिअम. **०त्रिभुज**–पु. ज्याच्या तिन्ही बाजू सारख्या लांबीच्या आहेत असा त्रिकोण. **०त्रैराशिक**–पुन. **०त्रैराशि**–स्त्री. (गणित) ज्यामध्यें सम प्रमाणें असतात असें त्रैराशिक. याच्या उलट व्यस्त त्रैराशिक. **०त्व**–न समता पहा **०स्थळ**–न. सपाट जागा; मैदान; सपाटी. [सं. सम+तल] **०दर्शी**–वि. निःपक्षपाती; तटस्थ; कोणत्याहि एका बाजूस मनाचा कल नसलेला. **०दुःख–समदुःखी**–वि. ज्यांस एकाच प्रकारची पीडा, त्रास वगैरे आहे असा; दुःखाचा भागी-दार, वांटेकरी. **०दृष्टि**–स्त्री. समानवृत्ति; निःपक्षपातीपणा; निःस्पृहवृत्ति; तटस्थता. –वि. मध्यस्थ; तटस्थ; त्रयस्थ; सम-वृत्ति; निःस्पृह; उदासीन. **०द्विभुज त्रिकोण**–पु. ज्याच्या दोन बाजू सारख्या आहेत असा त्रिकोण. **०धात–समधातु**–वि. समशीतोष्ण; फार थंड नाहीं व उष्ण नाहीं अशी; निरोगी. 'तशी काया समधात सुगंधिक अमोल फुंदाची।' –प्रला ९०. [सं. सम+धातु] **०नख(करण)**–न. (नृत्य.) पाय जोडून नखें एका रेषेंत ठेवणें. **०नर**–समशंकु पहा. **०पाद(स्थान)**–न. (नृत्य.) सर्व अंग सरळ, सारखें व सौष्ठवांत ठेवून दोन्ही पाय एक ताल अंतरावर व एकाच रेषेंत ठेवणें. **०पाद भौमि-चारी**–स्त्री. (नृत्य.) दोन्ही पावलांत अंतर न ठेवतां तीं एक-मेकांस चिकटवून जमीनीवर एकाच रेषेंत ठेवणें. **०पादी**–वि. (प्राणि) दोन्ही पाय दोहों बाजूस सारखे असणारा (प्राणि). **०प्रमाण**–वि. (गणित) सारख्या प्रमाणांत वाढणारा अथवा कमी होणारा. –छप्र १८. **०फळि–ळी**–स्त्री. बरोबरी; स्पर्धा. 'तयासि मांडितां समफळी। न दिसे दुजा।' –कथा ४.१४. ५. –वि. समबल; समतोल. 'त्यासि युध्यचि समफळि। करणें आगळि। काय मूर्खा।' –ज्ञाप्र २७५. **०बुद्धि**–स्त्री. सारखे विचार; सारख्या भावना. –वि. १ सारख्या मताचे, कलाचे, वृत्तीचे. २ सर्वांबद्दल सारखीच वृत्ति असणारा; सम-दृष्टि; कोणासहि कमी अधिक, जवळचा दूरचा वगैरे न मानणारा. **०भाग**–पु सारखा वांटा, हिस्सा, पाती. **०भाग–समभागी**–वि. १ सारखा हिस्सा, वांटा, भाग असणारा; सारखा पातीदार. २ सारख्या प्रमाणाचे, आकाराचे, वजनाचे. **०भाव**–पु. १ सारखेपणा; समरूपता; साम्य; एकरूपता. २ बरोबरी; समता. ३ सारखा स्वभाव, वृत्ति, मनोधर्म, प्रकृति, घटना असलेला; साधर्म्य; प्रकृति-प्रवृत्तिसाम्य. –वि. १ सारखा; एकरूप; समवृत्ति; सारख्या स्वभावाचा. २ सहमत; सहकारी; सहोद्देशी. **०भारेषा**–स्त्री. ज्या ठिकाणीं वातावरणाचा दाब सारखा असतो अशी पृथ्वीवरील ठिकाणें दाखविणारी रेषा. **०भुज-चौकोन**–पु. ज्या चौकोनाच्या सर्व बाजू सारख्या असतात असा चौकोन. **०भुजत्रिकोण**–पु. ज्या त्रिकोणाच्या सर्व बाजू सारख्या असतात असा त्रिकोण. **०मंडल**–न. (ज्यो.) समवृत्त; खस्वस्तिक व पूर्व-पश्चिम बिंदू यांमधून जाणारें वृत्त. **०मात्र**–वि. सारख्या वजनाचा, आकाराचा, मापाचा. **०मिति**–स्त्री. १ मध्यम माप; दोन मापांमधील काढलेलें मध्यम माप. २ मापाचा सारखेपणा. **०मूल्यत्व**–न. (रसा.) मूल द्रव्यांचा इतर मूलद्रव्यांशीं संयोग होण्याच्या प्रमाणांतील सारखेपणा. (इं.) ईक्वलव्हलेन्सी. **०योग**–पु. उत्तम योग; चांगला जुळून आलेला प्रसंग. 'ऐशिया समयोगाची निरुती।' –ज्ञा ८.२२१. **०रस**–पु. ऐक्य; तादात्म्य; एकरूपता; ब्रह्मसारूप्य. 'म्हणे तुका समरशी मिळाला जर। तरी कोणासीं उत्तर बोलावें।' 'तेथ अवभृत समरशीं। सहजें जहालें।' –ज्ञा ४. १३८. –वि. १ समतोल वृत्तीचा, प्रकृतीचा, स्वभावाचा; शांत; गंभीर; सुमनस्क. २ समानधर्मी; सारख्या स्वभावाचा, गुण-धर्मांचा, वृत्तीचा. **०रसणें**–अक्रि. १ ऐक्य पावणें; तादात्म्य

पावणें; विलीन होणें; तल्लीन होणें. 'तदा महासुखासी समरसे तो।' २ एक होणें; मिसळणें; विरून जाणें; पूर्णपणें एकरूप होणें. 'जैसा लवणाचा पुतळा । समुद्रामाजीं समरसे।' –ह २१.२७. 'अलंकारीं हेम समरसे।' –यथादी २.१२५६. **०रस्य**–न. ऐक्यभाव. 'चित्तगुणी प्रवेशे । चित्तीं असती समरस्यें।' –भाए ६८२. **०रास**–स्त्री. शेतांतील पिकांची अविभक्त रास; एकत्रित संपत्ति; एकत्र मालमत्ता, जिंदगी. **०रूप**–वि. सारख्या आकाराचे, आकृतीचे, रूपाचे. **०रूप्य**–न. आकारसादृश्य; आकृतीचा, ठेवणीचा सारखेपणा. **०लंबचतुर्भुज**–पु. ज्याच्या दोन बाजू समांतर आहेत असा चौकोन. **०वय-वयी-वयस्क**–वि. सारख्या वयाचे, उमरीचे. **०वर्ति**–वि. समतेनें वागणारा, असणारा. **०विषम**–न. विसंगति; अप्रयोजकता. 'जो नावरे समें विषमें। चर्मचक्षूंचेनि चामें।'–ज्ञा १८.४०१. 'तेथ समविषम न दिसे कांहीं।'–ज्ञा ८.१७०.–वि. बेरेवाईट; अनियमित; योग्यायोग्य; सदोष. **०वीर्य**–वि. १ सारख्या गुणाचें; सारख्या तीव्रतेचें (औषध, वगैरे). २ सारखे पराक्रमी, प्रभावी, शूर. **०वृत्त**–न. (ज्यो.) सममंडल; खस्वस्तिक व पूर्व-पश्चिम बिंदू यांमधून जाणारें वृत्त. (इं.) प्राइम व्हर्टिकल. **०शंकु**–पु. (ज्योति.) समवृत्तावर सूर्य असतां पडणारी शंकुच्छाया किंवा त्याच्या अक्षांशत्रिज्या. **०शीतोष्ण**–वि. जेथें हवामानांत थंडी व उष्णता यांचें प्रमाण बहुधा सारखें असतें असा (प्रदेश). **०शीतोष्णकटिबंध**–पु. अयनवृत्त व ध्रुववृत्त यांमधील उत्तरेकडील व दक्षिणेकडील त्रेचाळीस अंशांचा पृथ्वीचा भाग. **०शील**–वि. सारख्या स्वभावाचे, प्रवृत्तीचे, वृत्तीचे; एकमेकांस अनुकूल. **०समान**–वि. १ अगदीं सारखा; तुल्य. 'तुकयाची समता जाण। शत्रुमित्र समसमान।' २ हुबेहुब; एकरूप. ३ सपाट; सारखी; समतल. 'समसमान साधुनि भुई।' –दावि २४.५०. **०सरी**–वि. सारखे. 'राव प्रधान समसरी। दोन पुत्र दोघांसी।' –शनि २८६. 'प्रपंच परमार्थ समसरी। होय श्रीहरिकृपें।' –ह २४.७६. [सम + सर] **०सीम**–वि. ज्यांची सीमा, मर्यादा सारखी आहे असे; एकाच ठिकाणीं संपणारे. [सम+सीमा] **०सूत्र**–न. (ज्यो.) समवृत्ताच्या ध्रुवबिंदूमधून जाणारें महावृत्त; क्षितिज. **०स्थल**–न. पटांगण; मैदान; सपाट जमीन; माळ. **०स्थान**–न. क्षितिजाचा उत्तर किंवा दक्षिण ध्रुवबिंदु. **०स्वभाव**–वि. सारख्या वृत्तीचा; सारख्या प्रकृतीचा; सजातीय; सारख्या घटनेचा; समान गुणधर्मांचा.

समई-य—स्त्री. धातूचा उभा दिवा; खालीं बैठक, वर चाडें व मध्यें नक्षीदार खांब असा दिवा; शणवई. [सं. संदीपिका; अर. शम्अ=दिवा]

समई—स्त्री. (ना.) लग्न.

समईं—क्रिवि. वेळेवर; समयास; वेळेस. 'समईं यावा चुकों नये। सत्त्वगुण सांडों नये।' –दा २.२.३१. [समय]

समईक—वि. (विरू) समाईक अनेकसत्ताक; बहुसाधारण; ज्यावर अनेकांचा हक्क, स्वत्त्व आहे असा; पातीचा, (धंदा, दुकान, व्यवहार), अनेकांच्या वहिवाटीचें (घर, जमीन).

समकणें—अक्रि. (रूढ) संवकणें पहा. सोकावणें; चटावणें; गोडी लागणें; संन्नयीचा होणें.

समग्र—वि. १ सर्व; प्रत्येकी सर्व. २ सगळा; संपूर्ण; सर्व; साग्र; सबंध. [सं.]

समज—पु. समुदाय; सांठा; संग्रह; लोंढा. 'चित्त समजीं बुडौनि ठेलें। विस्मयाचां।' –ज्ञा ११.१८६.

समज—पु. १ बोध; ज्ञान; आकलन; उमज; अवगमन. (क्रि० घेणें, धरणें). २ ग्रहणशक्ति; आंकलनशक्ति. ३ जाणीव; खातरी; समाधान; बरोबर आकलन; परिज्ञान. ४ ताकीद; माहिती. ५ शहाणपणा; हुशारी; अक्कल; बुद्धि. 'वरहि वरायास पाहिजे समज।' –मोउद्योग १.४१. ६ (ल.) धाक; दपटशा; मारठोक. [सं. सम्+मज्; हिं. समझ] **०उमज**–पु. पूर्ण जाणीव; पूर्ण ज्ञान; वास्तविक बोध. **समजणें**–सक्रि. १ जाणणें; बोध, आकलन होणें. २ माहीत होणें; ठाऊक होणें; उघड होणें; स्पष्ट दिसणें. ३ –अक्रि. पटणें; खात्री होणें; समाधान होणें; शंकानिरसन होणें. ४ सारख्या सारख्या दिसणाऱ्या गोष्टीमधील सारखेपणा व फरक कोणता हें नक्की आणि पक्केपणानें सांगतां येणें. **समजूं लागणें**–सज्ञान होणें; कळूं लागणें; कळण्यासारख्या वयांत येणें. **समजदार**–वि. १ सुज्ञ; विचारी; शाहणा; हुशार. २ चलाख; चांगली ग्रहणशक्ति असलेला. **समजपत्र**–न. वाद न करतां समजूत झाल्याचें वादी-प्रतिवादी यांचें संमतिपत्र. **समजवाली**–वि. समजूतदार; शाहाणी. 'तूं समजवाली साऱ्यांनीं जुट बांधावी।' –राला ७३. **समजविणें**–उक्रि. स्पष्ट करून सांगणें; समजाविणें पहा. **समंजस**–वि. १ समजूतदार; सुजाण; विवेकी; शाहणा; जाणता. २ बुद्धिवान; हुशार; तीव्र बुद्धीचा. ३ सद्गुणी; सज्जन; भला. ४ योग्य; लायख; बरोबर; शोभेसा. **समजस**–वि. समंजसचा अपभ्रंश प्रथमार्थी. **समजावण-णी**–स्त्री. १ समजूत; स्पष्ट करून सांगणें. २ मन वळविणें; समाधान करणें; समजूत पाडणें; खात्री करणें. (क्रि० करणें, होणें). 'करुनि स्तन्यपान। स्वबाळांचें समजावण।' –रास १.५७७. **समजावशी, समजाविशी, समजावीस, समजी**–स्त्री. योग्य प्रकारें समजूत पाडणें; वळणावर, ताळ्यावर आणणें; मनवळवणी; समाधान, खात्री करणें; शंका निरसन करणें;. एखाद्यासंबंधीं

मन ताळ्यावर आणणें. (क्रि० करणें; पाडणें; काढणें). 'समजाविशीस अर्धे मारवाड काबीज केलें होतें तें दरोबस्त त्यांजकडे दिलें.' –भाब १८. 'पडेल समजाविशी तशी करोत कां लाजशी।' –केका १५. 'बसल्या रुसुन समजाविसी करिसी बरी.' –होला ५८. 'ह्यासाठीं माझी समजी व्हावी.' –बाळ २.६८. 'पदर पसरून उभी समजीला.।' –प्रला १००. **समजाविणें**–उक्रि. १ समजूत घालणें; स्पष्ट करणें; फोड करून सांगणें; पटविणें. २ खातरी, समाधान करणें; मन वळविणें, ताळ्यावर आणणें. **समजीक, समजीस**–समंजस पहा. **समजीपत्र**–समजपत्र पहा. **समजूत**–स्त्री. १ ग्राहक शक्ति; बुद्धि; आकलनशक्ति. २ पूर्णज्ञान; जाणीव; बोध; आकलन. 'लोकांत समजूत व उपयुक्त ज्ञान यांचा बराच प्रसार झाला.' –नि ८. ३ खातरी; समाधान; मनवळवणी. समजाविशी पहा. ४ हुकूम; ताकीद; आज्ञा. 'सरकारचे सल्ल्यानें काम करण्यास त्यांस समजूत दिली.' –टिले १.१.१६०. ०**पाडणें**–तडजोड, एकमत, संधि करणें; समाधान करणें; खातरी करणें, पटविणें. ०**दार**–वि. समजदार; समंजस पहा. ०**पत्र**–न. १ आपसांत तडजोड झाल्याबद्दल संमतिपत्र, करारनामा, यादी. २ फिर्याद काढून घेण्याबद्दल पत्र, कागद, खत. **समजून उमजून**–क्रिवि. जाणून बुजून; मुद्दाम; बुद्धया; हेतुपुरस्सर; बुद्धिपुरःसर. **समजोती**–स्त्री. समजूत. 'मायबापाला करून समजोती।' –दावि ३५०.

समडी—स्त्री. (खा.) शमीचें झाड; सौंदड.

संमत, सम्मत—स्त्री. तरफ; दिशा; बाजू. 'कमळनैन सेकिन सम्मत निंब.' –रा १५.१७२. 'शेटे महाजन समतानिहाय.' –रा १५.१८९. [अर. सम्त्]

संमत, सम्मत—वि. अभिमत; मान्य; पसंत; कबूल. 'तुम्ही संमत जाला तेंच पुरे.' –ग्रंथमाला लक्ष्मीकल्याण १३. [सं. सम्+मन्] **संमत-संमति, सम्मत-सम्मति**–स्त्री. १ मान्यता; कबुली; पसंती. २ ऐकमत्य; सहमत; अनुमति; रुकार. **संमतिपत्र-क, सम्मतिपत्र-क**–न. १ अनुमतिदर्शक लेख. २ पंचांच्या निवाडयाची मान्यता असल्याबद्दल लेख.

. समंतत, समंतात्—क्रिवि. सर्भोवतीं; सर्भोवार; भोंवतालीं; आसमंतात. [सं. सम+तत्]

समंत्र-क—वि. मंत्र म्हणून केलेला; मंत्रोच्चारसहित (विधि, व्रत, कर्म). **समंत्रक दाह**–पु. मंत्राग्नि देऊन केलेलें प्रेतदहन.

समंद-समंद्—पु. संमंध पहा.

समदं-समदा—वि. १ सर्व; एकूणएक. २ संपूर्ण; सगळें. [सं. समस्त] **समदार**–क्रिवि. सगळीकडे.

समंद अबलख—वि. सर्वांग पांढरें व त्यांत जर्दा रंग व पांढरे पट्टे असलेला. (घोडयाचा रंग) **समंद काळा**–वि. सर्वांग काळें व लाल. **समंद बदामी शिनाजान्**–वि. सर्वांग बदामी, आयाळ, दूम, शेंडी हात पाय काळे. **समंद शियाजान्**–वि. सर्वांग पिंवळें, आयाळ, दूम, शेंडी, कानाचीं टोंकें व पाय काळे, ढुंगणावर पांढरे ठिपके (असा घोडा).

समदासी—स्त्री. (तंजा.) समजाविशी; समजूत. [समजणें]

समदुर—पु. (ना.) मोटेचा खालचा नाडा, दोर; सोंडदोर पहा.

समदुरी—न. (व.) मीठ; लवण. [सं. सामुद्रम्]

संमंध, समंध—पु. १ संबंध; नातें; आप्तपणा; सोयरीक; निकटपणा. 'समंध बडतां सोडून जावें।' –दा ११.५.११. 'दोघांस पडिला समंध.।' –दा ३.५.२६. २ ब्राह्मणाचें पिशाच्च. [सं. संबंध] **समंधी, समंधीक**–वि. १ नातलग; आप्त; निकट असलेला. २ पिशाच्चासारखा स्वभाव असलेला. ३ समंधासंबंधी; समंधाच्या जातीचा. **समंधकी**–स्त्री. पिशाच्चवृत्ति. –झांमु.

समना—पु. सामना; युद्ध. 'युद्धांत निश्चल मना समना कराया.' –वामनविराट ७.१६६. [सामना]

समनाबीर—पु. शमनाबीर पहा.

समनामीर—पु. शमनाबीर पहा. 'ग्रामदेवता समनामीर, पीर, पांढरीचीं दैवतें.' –गोपाळ गोविंद पटवर्धन चरित्र.

समन्वय—पु. स्वाभाविक क्रम; एकसारखा व्यवस्थित क्रम; सुयुक्तक्रम; जुळणी; जोड; योग; मिलाफ. [सं.] **समन्वित**–वि. स्वाभाविक क्रमप्राप्त; संगतवार; सयुक्तिक; योग्य क्रमाप्रमाणें असलेलें; जुळलेलें; युक्त; संबद्ध.

समन्स—न आव्हानपत्र; सरकारी बोलावणें; कोर्टाचें बोलाविणें. [इं. समन्स] ०**खटला**–पु. ज्या गुन्ह्यास सहा महिनेपर्यंत कैद किंवा दंड आहे असा खटला.

समभिव्याहार—पु. सहोल्लेख; एकत्र उल्लेख. [सं.] **समभिव्याहृत**–वि. सहोल्लिखित; एकत्र दिलेलें, बोललेलें, लिहिलेलें [सं.]

समय-यी—स्त्री. समई.

समय—पु. १ वेळ; काळ; प्रसंग; संधि; महत्त्वाची, आणि बाणीची वेळ; हंगाम; मोसम. 'नेणोनि या खेळा समय सम याच्या वेळा' –तुगा २३१. 'भोगोनि ऐश्वर्य कसें समर्थी दुर्योधनासि सोडावें।' –मोभीष्म १२.५८. २ (ल.) संकट; कठिण वेळ, प्रसंग. 'जो पावे समर्थी विशेष गणिका.' –र १६. ३ प्रतिज्ञा. शपथ; करार; ठराव. 'शांतनवें समय असा केला कीं करिन युद्ध

कुरुपार्था । ' –मोभीष्म ११.२४. [सं. सम्+अय्=जाणें] **(एकाद्या)वर समय पडणें, येणें**–कठिण प्रसंग येणें; संकट येणें; अडचणींत सांपडणें. **समयविशेषीं**–विशेष प्रसंगीं; योग्यवेळीं. **समयाचे शिरीं–समयास–समयीं–उपयोगी पडणें**–वेळेवर कामास येणें; योग्य प्रसंगीं साह्य होणें. **समय चुकणें**–संधि गमविणें. ' जरि काय मजकडे तूं आजि न येतास समय चुकतास । ' –मोभीष्म १२.३६. **समय साधणें**–वेळ साधणें; योग्य संधीचा फायदा घेणें; शत्रूशीं गांठ घालणें. ' रणांगणाचा समय साधिति । ' –ऐपो २१७. **०भाषण**–न. प्रासंगिक बोलणें; प्रसंगास अनुरूप बोल. **०भाषी**–पु. योग्य प्रसंगीं बोलणारा; वेळेवर योग्य तें सांगणारा, बोलणारा. **०रक्षण**–न. वेळ साधणें; योग्य वेळीं काम करणें; वेळ संभाळणें. **०वेत्ता**–पु. प्रसंग ओळखणारा; आणीबाणीची वेळ ओळखून वागणारा; योग्य वेळ, संधि जाणण्यास समर्थ; समयज्ञ. **०शीर**–क्रिवि. वेळेवर; योग्य प्रसंगीं; योग्यवेळीं; वेळींच; वक्तशीर. **०सूचक**–वि. १ योग्य वेळीं मनांत येणारे, सुचणारे, आठवणारे. २ हजरजबाबी; ताबडतोब योग्य उत्तर सुचणारा, देणारा; रोखठोक. **०सूचकता**–स्त्री. योग्य प्रसंगीं योग्य गोष्ट सुचण्याचा गुण; हजरजबाबीपणा. **०स्फूर्ति**–स्त्री. योग्य प्रसंगीं योग्य गोष्ट आठवण्याचें, सुचण्याचें सामर्थ्य; प्रसंग पडेल त्यावेळीं योग्य ज्ञान प्रकट होणें; योग्य वेळीं उपाय, ज्ञान वगैरे सुचण्याचें सामर्थ्य. **०ज्ञ**–वि. काळ, वेळ ओळखणारा; प्रसंगानुसार योग्य वर्तन करणारा. **समयातीत**–वि. योग्य वेळ टळली आहे असा; संधि, प्रसंग निघून गेलेला.

समयानसार, समयानुसार—क्रिवि. प्रसंगानुसार; प्रसंगोपात्त; वेळेस साजेसें; प्रसंगास योग्य, इष्ट असें. **समयो**–पु. समय. ' कोण समयो येईल कैसा । ' –दा ३.१०.३९. **समयोचित**–वि. प्रसंगास योग्य; वेळेस अनुरूप; प्रसंगास अनुसरून, शोभणारें; प्राप्तावसर.

समर—पुन. युद्ध; संग्राम; लढाई. ' अर्जुन बोलिला समरीं । ' –ज्ञा १.२६८. [सं.] **समरंग**–न. समरांगण. ' झुंजत प्रपंचेशीं समरंगीं । ' –ज्ञा ६.४७५. **समरं(रां)गण**–न. युद्धभूमि; लढाईची जागा. ' समरंगणा आला । रामें रावण देखिला । ' –तुगा ३९३. **समरधीर**–वि. युद्धामध्यें धीट; शूर. **समरभूमि**–स्त्री. रणांगण; युद्धभूमि; रणक्षेत्र. **समरविजयी**–वि. युद्धांत जय मिळालेला; विजेता; जेता.

समरासमोर—क्रिवि. (प्र.) समोरासमोर पहा. परस्परांपुढें.

समर्घ—वि. स्वस्त; सवंग; सोईस्कर किंमतीचें. ' कां समर्घीचि विकणें । महर्घी वस्तु । '. –ज्ञा १८.८८१. [सं. सम्यक्+अर्घ]

समर्थ—वि. १ सशक्त; बळकट; कार्यक्षम; लायख; पात्र; श्रीमंत; धनवान; ऐश्वर्यवान. ' ऐसी हे समर्थ पदवी । ' –दा १८.१०.४६. २ समानार्थ; सारख्या अर्थाचें. [सं. सम्+अर्थ्] **म्ह**० १ समर्थांचीं पाळीं उघडत तों दुर्बळांचे प्राण जातात. २ समर्थाच्या घरचें श्वान, त्यासि सर्वही देती मान. **०स्पर्धा**–स्त्री. मोठ्याशीं, बलवानाशीं, ऐश्वर्यवंताशीं चुरस, चढाओढ, झुंज, द्वंद्व.

समर्थणें—सक्रि. प्रतिपादणें; बोलणें; सिद्ध करणें; बाजू घेणें. ' आतां मातें पावती हे कवण । समर्थणें । ' –ज्ञा ९.४८३. **समर्थन**–न. प्रतिपादन; पुष्टि देणें; पक्ष, बाजू घेणें; सिद्धता; व्यवस्थापन. **समर्थनीय**–वि. प्रतिपाद्य; निर्वाह्य; पोषणीय; प्रमाणांनीं सिद्ध करण्यासारखें; प्रतिपादनीय; स्थापनीय. **समर्थित**–धावि. सिद्ध; स्थापित; प्रतिपादित.

संमर्द, सम्मर्द—पु. गर्दी; दाटी; तुडवातुडव; चेंगराचेंगरी; घर्षण. [सं. सम्+मृद्]

समर्पक—वि. योग्य; बरोबर; उचित; शोभेसें; जुळण्यासारखें; यथास्थित; चोख. –उत्तर, निकाल, कारण, सबब, शोध, प्रमेय, पद्धत, रीत, कल्पना, वाद, न्याय, युक्ति, तोड, भाषण, प्रश्न, वाक्य. इ. शब्दांबरोबर उपयोग होतो. ' समर्पक वाणी । नाहीं ऐकिजेसी कानीं । ' –तुगा ५५९. [सं.]

समर्पण—न. देणें; दान; बक्षीस करणें; अर्पण; वाहणें. [सं. सम्+अर्प्] **समर्पे(पि)णें**–उक्रि. १ देणें; दान करणें; बक्षीस देणें; अर्पण करणें; वाहणें. ' आतां ओंकारें आदरिलें । तत्कारें समर्पिलें । ' –ज्ञा १७.३७३. ' समर्पूं शरीरें स्वहस्तें । '. २ देऊन टाकणें; सढळपणें देणें; ओपणें. ' हृदयीं समर्पिती वज्रमुष्टी । ' **समर्पित**–धावि. वाहिलेला; दत्त; अर्पिलेला; देऊन टाकलेला.

समर्याद—वि. १ मर्यादित; ठराविक; निश्चित; प्रमाणबद्ध. २ सविनय; अदबशीर; शिस्तवार. [सं. स+मर्यादा]

समला—पु. पागोट्याचा, फेटयाचा, डोकीच्या रुमालाचा, कमरबंदाचा पाठीवर लोंबणारा पदर; घोस. ' शिरिं समले लाउन निकरानें । ' –ऐपो १०८. ' शिलेपोस पलटणें लाविती पठाण जरिचे समले । ' –प्रला ४७. [फा. शम्ला] **समलेदार**–वि. समला आहे असा (फेटा).

समलातीपत्र—न. मदतीस बोलावण्याकरितां लिहिलेलें पत्र. [अर. शामिलात]

समवाय—पु. १ समुदाय; जमाव; समूह. ' तरी तयांचिया समवाया । अनुरूप धनंजया । ' –ज्ञा १८.१२९०. २ (न्याय.) नित्यसंबंध; निकट संबंध; सतत संबंध; संयोग. ' तेथ तंतु समवाय पटीं । ' –ज्ञा ९.१०६. ३ समष्टिरूप;

व्यापकत्व. 'परी मातें नेणती समवायें।' –ज्ञा ९.३४४. [सं.] **समवायिकारण**–न. (न्याय.) उत्पत्तिमूलक, निकट, नित्य संबंध असणारें कारण; उदा० माती हें घटाचें, तंतु हें पटाचें.

समवाव—पु समवाय पहा. समुदाय. 'ऐसा सावध हा समवावो।' –ज्ञा ८ २११.

समवेत—शअ. सह; सहित; बरोबर. 'बहुत ऋषि समवेत।' –रावि. 'रखु माई आपणसमवेत।'–तुगा ४६६. –धावि. १ समवाय संबंधानें अन्वित; संबद्ध; आनुषंगी; सहस्थित. २ जमलेलें; एकत्रित; मीलित; मिश्रित; युक्त.

समशेर—स्त्री. १ तलवार; खड्ग; कृपाण; एक शस्त्र. २ चंगकांचनी गंजिफांतील आठवा रंग. [फा. समशेर] **०बहादुर**–पुवि. १ तलवार बहादूर; तरवार वापरण्यांत पटाईत; शूर; पराक्रमी. २ मस्तानीच्या मुलाचें नांव. ३ गायकवाडांचा किताब. **समशेरा-समशेरी**–स्त्री. तरवारीची काटाकाटी; खणाखणी. 'लडाई बरे वजेनें समशेरासमशेरी जाहली.' –रा १.२४४. **समशेर करणें**–तरवार गाजविणें; पराक्रम करणें. 'ज्यांनीं ज्यांनीं समशेर केली।' –ऐपो २३७. **समशेरी**–वि. १ चंगकांचनी गंजीफांतील समशेर रंगाचें, बाजूचें. २ पुतळीचा एक प्रकार. या पुतळीच्या दोन्ही बाजूंवरील बाहुल्यांचीं डोकीं एकाच दिशेस असतात.

समश्या—स्त्री. समस्या; अट; आकांक्षा; हेतु. 'परशरामाची पुरविली समश्या पूर्ण।' –स्वादि १.२.६२. [सं. समस्या]

समश्रुकीत—वि. धड; चांगला; सुरेख. 'समश्रुकीत असतां वाचा। घोष न करिसी कां नामाचा।' –तुगा ४३८६.

समष्टि—स्त्री. १ व्यष्टींचा समूह; सामग्र्य; समुदाय; अनेक घटकांगांनीं संपूर्ण; संगृहीत, समाविष्ट स्थिति. 'ईश्वरोपाधि समष्टि जीवोपाधि व्यष्टि.' २ ब्रह्मांड. **०ग्रह**–पु. संपूर्णत्वानें, एकत्वानें जाणीव, ज्ञान; समूह रूपानें ज्ञान. याच्या उलट पृथक्त्वानें जाणीव म्हणजे व्यष्टिग्रहं.

सम(मा)सकी—स्त्री. सहा महिनेच दूध देणारी; दरवर्षी विणारी (गाय, म्हैस, वगैरे). [सहा+मास]

समसम—स्त्री. १ कटकट; रुखरुख; निकडीचा त्रास; काळजी. (क्रि० लागणें; चुकणें; टळणें; सुटणें; जाणें; तुटणें; सरणें). २ व्यग्रता; अस्वस्थता; उद्वेग; चिंता. 'कदा समसम नाहीं पोटीं। यथालाभ संतुष्टि या नांव।' –एभा १९.४१०. [सणसण अनुकरण] **समसमि(मी)त**–वि. खरमरीत; कडक; तीक्ष्ण. 'कैसी समसमित नवाई। भुकेलेपणाची।' –ज्ञा ११. ४२९. 'एक वज्रा आणिया दोन्ही। तैसे चञ्चू समसमीत।' –मुआदि ६.३७.

समसा—वि. सरळ; सम; सारखा. 'वरि समसा उरु। जेथ कामु न लाहे क्रिया करूं।' –ऋ ८८.

समसाळी—स्त्री. (बे.) भाताचा एक प्रकार.

समस्त—वि. १ सर्व; सगळे; सर्वजण. 'तो दलभार समस्तु। संभ्रमेंसीं।' –ज्ञा १.१७६. २ सामासिक; अनेक पदांचा समास होऊन झालेला (शब्द). ३ संपूर्ण; सबंध; सगळा; असगा. ४ युक्त; मिश्र; समाविष्ट; अंतर्भूत; संगृहीत. **०राशिक-राशिगणित**–न. (गणित) बहुराशिक.

समस्या—स्त्री १ आकांक्षा; अंदाज; अपेक्षा. 'न सांभाळवे समस्या आपुली।' –ज्ञा ११.९२. २ पूर्ण करावयास दिलेल्या श्लोकाचा अपेक्षित किंवा दिलेला भाग. ३ शंका. 'ऐसी केली द्विजाची पूर्ण। समस्या देवें।' –कथा ६.२०.९८. ४ कूट; कोडें; सांकडें; कठिण प्रश्न. (क्रि० घालणें; पुरवणें). 'गणपतिपूजनावांचून लग्न होत नाहीं तर महादेवाचे लग्नांत कसें केलें अशी त्यानें मला समस्या घातली.' [सं.] **०पूरण-पूर्ती**–नस्त्री. समस्या पुरी करणें; दिलेला अर्धा श्लोक पूर्ण करणें; कोडें सोडवणें.

समळ—वि. मळकट; घाणेरडें. –एभा ७.१३७; २५.४०८.

समळ-समळी-समळ्या, संबळ—संबळी, संबळ्या पहा.

समळट—वि. सपाट; समपृष्ठ; सारखा. 'तळीं पडती पर्वत गिरि। अवघें समळट होईल वसुंधरी।' –ख्रिपु १.३६.३३. [सं. समतल]

समक्ष—शअ. प्रत्यक्ष; देखत; समोर. –क्रिवि. समोरासमोर 'त्याची माझी समक्ष गांठ पडेल तेव्हां सांग.' [सं. सम्+अक्षिन्] **समक्षता**–स्त्री. १ प्रत्यक्षता; समोरील स्थिति; दृष्टि समोर असणें; उपस्थिति; हजेरी. 'पत्रावर समक्षतेच्या सह्या कराव्या.' –ऐरापुप्र ३. २ भेट; प्रत्यक्ष भेट. 'बापू नानांची समक्षता झाली. यावर परस्परें बोलण्यांत येईल.' –इऐ ६३. **समक्षासमक्ष**–शअ. देखत; समोरासमोर; उरूबरू. 'तुम्ही तिलाच समक्षासमक्ष विचारून टाका.' –भाबं १३. –स्त्री. प्रत्यक्षता; उपस्थिति; हजेरी.

समक्षा—स्त्री. १ समस्या या अर्थी त्या शब्दाचा अपभ्रंश. २ साक्षात्कार; देवाचें प्रकटीभवन; प्रत्यक्ष देखावा; दृश्य भास; प्रचीति.

समा—पु. (कों.) १ एक पिशाच्चदेवता; समंध. २ पूर्ण भरतीचो वेळ; चंद्र मध्यान्हीं आला असतां भरती पूर्ण होऊन १२ मिनिटें पाणी तसेंच राहतें त्यास म्हणतात. ३ (ल.)

भर; मध्य; हंगाम; मोसम; शिखर; पराकाष्ठा. ४ मतैक्य; एकोपा; मेळ. [सं.]

समा—पु. गानानंद; गायन ऐकणें; गानामुळें लागणारी तंद्री (दरवेशी वगैरे लोकांची). [अर. समा]

समा—स्त्री. वर्ष; संवत्सर. [सं.]

समा—स्त्री. १ आकाश. –आदिलशाही फर्मानें. २ लगामाचा एक प्रकार. [अर. समा]

समाइणें—अक्रि. मावणें; एकत्र येणें. 'दाटोवाटी समाइले।' –उषा ११. [सं. सम्+मा]

समाईक—वि. १ अविभक्त; अनेकस्वामिक; अनेकांच्या मालकीचा; (माल, जमीन, वतन, हक्क). २ पातीचा; भागीदारीचा (धंदा, व्यापार). [सं. सम्+ईं=जाणें] **०कुटुंब**–न. ज्याची सर्व जिंदगी एकत्र असून वांटे झाले नाहींत असें कुटुंब; अविभक्त कुल.

समाकुल-ळ—वि. समस्त; सर्व; सगळा; सबंध. 'अथवा दशदिशा समाकुळ। दिशाचक्र।' –ज्ञा ११.३१५. विशेषतः एखादा समाज, जात, राष्ट्र, लोक, गांव यासंबंधीं हा शब्द योजतात. उदा० समाकुल पांढर सर्व गांव; लहानापासून थोरापर्यंत सर्व. तसेंच समाकुळ देश, प्रांत, परगणा, कसबा, गांव, फौज, सभा, मंडळी, पंचाईत, जमात, जथा, वगैरे. याप्रमाणेंच समाकुळ असाम्या, शिपाई, कारकून वगैरे. 'त्या निकालपत्रावर दफातदार व समाकुळ पांढरीच्या साक्षी झाल्या.' –पेशवेकालीन महाराष्ट्र ४७६. [सं. सम्+आकुल]

समाकुळ-कूळ—वि. व्याकुल; व्यग्र; हैराण. [सं. सम्+आकुल]

समाक्रांत—धावि. व्यापलेलें; आक्रमण केलेलें; पादाक्रांत केलेलें; पराभूत; व्याप्त. [सं. सम्+आ+क्रम्]

समागत—धावि. प्राप्त; आलेला; येऊन पोहोंचलेला; जवळ आलेला. [सं. सम्+आ+गम्]

समागम—पु. १ सहवास; संगत; संयोग; संपर्क; सहस्थिति. २ अनुगमन; सती जाणें. ३ संभोग; मैथुन. [सं. सम्+आ+गम्]

समाचरण, समाचार—नपु. सद्वर्तन; चांगली वागणूक, वर्तणूक. [सं. सम्+आ+चर्]

समाचार—पु. १ चौकशी; परामर्श; विचारपूस; काळजी, देखरेख वगैरे. २ बातमी; वार्ता; हकीकत; वृत्त. **०घेणें**–१ चौकशी, विचारपूस करणें. २ (ल.) मारणें; ठोकणें; खरडपट्टी काढणें.

समाज—पु. १ सभा; समूह; जमाव; मंडळी. 'तूं त्रैलोक्याधीश सुरराजा। देवसमाजा सुखी करी।' –भारावाल ११. २२८. २ समुदाय; सांठा; संग्रह; गर्दी. 'चित्त समाजीं बुडोनि गेलें। विस्मयाचिया।' –ज्ञा ११.१८६. [सं.] **०धारणा**–स्त्री. लोकांचें स्वास्थ्य; लोकसमूहाचें पोषण, रक्षण वगैरे. **०वाद**–पु. संपत्तीचें उत्पादन व विभजन समाजाच्या मालकीचें ठेवणें.' –केसरी २१.५.३७. **०शासन**–न. १ समाजाचें नियंत्रण, नियमन. २ समाजाकडून होणारी शिक्षा. –गांगा २४७. **०शास्त्र**–न. समाजाची उत्पत्ति, सुधारणा, परिस्थिति, इतिहास वगैरे विषयांचें विवेचन करणारें शास्त्र. –ज्ञाको स ६६. **०सत्तावाद**–पु. संपत्तीच्या उत्पन्नाच्या साधनांची मालकी लोकशाहीच्या तत्त्वानुसार बनलेल्या सरकारच्या हातीं देऊन त्या साधनांच्या सर्वांच्या न्याय्य फायद्याकरितां सहकरितेनें उपयोग करावा असें प्रतिपादन करणारें मत; समाजाचें राज्यतंत्रावरील वर्चस्व प्रतिपादणारें मत. **समाजिक**–वि. (प्र.) सामाजिक. १ समाजासंबंधी; लोकसमुदायविषयक; २ समाईक; अनेकसत्ताक; संयुक्त अधिकारांतील.

समाटणें-समाटून घेणें—अक्रि. (माण.) परका व आपण एक समजणें; दुसऱ्याशीं मिळतें घेऊन कामें करणें. [सम]

समांतर—वि. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला; दोन रेषांच्या समोरासमोरच्या कोणत्याहि भागांत सारखें अंतर असतां त्यांस समांतर म्हणतात. (इं.) पॅरलल. [सं. सम+अंतर] **०द्विभुजचौकोन**–पु. ज्या चौकोनाच्या दोनच बाजू समांतर असतात असा चौकोन. (इं.) ट्रॅपिझॉइड. –महमा. **०प्रेरणा**–स्त्री. समांतर रेषांनीं गमन करणाऱ्या प्रेरणा, शक्ती. (इं.) पॅरलल फोर्सेस. **०बाजूचौकोन-भुजचौकोन**–पु. ज्या चौकोनाच्या समोरासमोरच्या बाजू समांतर असतात असा चौकोन. (इं.) पॅरललोग्राम. [सं.] **०रेषा**–स्त्री. ज्या दोन सरळ रेषा एकाच पातळींत असतात व कितीहि वाढविल्या तरी परस्परांस मिळत नाहींत त्यांस म्हणतात. **०संस्था**–स्त्री. पृथ्वीची सूर्याभोंवतीं आपला अक्ष नेहमीं समांतर ठेवून फिरण्याची स्थिति.

समाधान—न. १ मनाची शांति; तृप्ति; मनाचा संतोष. २ विश्रांति; स्वास्थ्य; आराम; दुःखनिवृत्ति; चिंताहरण. ३ (न्याय.) शंकानिरसन; आक्षेपखंडन; समजूत. ४ (वेदांत) एकाकारवृत्ति; मनाचें बाह्यगोष्टींपासून परावर्तन; ध्यानावस्था; चित्तैकाग्र्य. [सं. सम्+आ+धा] **०पत्र**–न. आप्तनिधनानंतर पाठवावयाचें शांतवनपर पत्र. 'शाहु छत्रपतींनीं दमाजीस समाधानपत्र लिहिलें आहे.' –शांरो ८०. **समाधानी**–वि. १ थोड्क्यांत तृप्त होणारा, संतोष पावणारा. २ शांत, संतोषीवृत्तीचा; तृप्त.

समाधि, समाध—स्त्री. १ चित्तैकाग्र्य; इंद्रियांचें दमन करून आत्मस्वरूपांत लीन होणें; एकतानता; तंद्री; इंद्रियवृत्तिनिरोध; योगांतील आठवें व शेवटचें अंग. 'ऐसिये सरिसिये

भूमिके । समाधि राहे ।' –ज्ञा ६.६. 'समाध उभ्यानें लागली तटस्थ।' –दावि ४५७. २ संन्याशानें स्वतःस जिवंतपणीं जलांत बुडवून घेणें, किंवा पुरून घेणें. ३ मृत संन्याशास जलांत बुडविण्याचा किंवा मातींत पुरण्याचा विधि, संस्कार. ४ संन्याशास पुरलेल्या भूमीवर बांधतात तें वृंदावन, थडगें. [सं.] ०**सुख**–न समाधिअवस्थेंत होणारा आनंद **समाधिस्त–स्थ**–वि. १ समाधि लावलेला; ध्यानमग्न; आत्मचिंतनांत मग्न, गढलेला. 'देह केला वाव समाधिस्थ।' –तुगा ७७३. 'वेदस्वरूपीं होय समाधिस्त।' २ समाधि घेतलेला; मृत; पुरलेला.

समान—पु. पंचप्राणांपैकीं एक वायु; नाभिस्थ असून अन्नरसाचा सर्व शरीरांत प्रसार करणारा वायु. 'सर्वांगीं व्यान नाभीं समान.।' –दा १७.८.१२. [सं.]

समान—वि. १ सारखें; तुल्य; बरोबरीचें; जोडीचें; एकाच योग्यतेचें. (समासत) समान–गोत्र–जाति–धर्म–दुःख–सुख–बल–सामर्थ्य–विभव–विक्रम–व्यसन. समानोद्देश, समानोद्योग इ०. २ सपाट; एका पातळींतील; गुळगुळीत. –एभा १४.४०६. ३ एकरूप; हुबेहुब; एकसारखें; तुल्यरूप; तसेंच. [सं. सम, मा=मोजणें] ०**कक्ष**–वि. बरोबरीचे; एकाच दर्जाचे; तुल्य; सारखे; जोडीदार. ०**कालीं–कालीन**–वि. समकालीन पहा. एकाच कालचे. ०**वयस्क**–वि. समवयस्क पहा. एकाच वयाचे. ०**वृत्ति–स्त्री.** १ समतोल वृत्ति; शांत वृत्ति; निःपक्षपातीपणा; अचल मनःस्थिति; समभाव. २ दुसऱ्याशीं मतैक्य; समताबुद्धि; सर्वांठायीं एकबुद्धि. –वि. सारख्या स्वभावाचा; सारख्याच कलाचा; सहमत. ०**शील**–वि. सारख्या मनोवृत्तींचे, स्वभावाचे, प्रवृत्तीचे; समस्वभावी. 'समान शील व्यसनेषु सख्यम्।' ०**स्कंध**–वि. सारख्या खांद्यांचे; सारख्या उंचीचे (ओझें ओढणारे बैल वगैरे). **समानांतर**–वि. १ समांतर; सारख्या अंतरावरील; ज्यामध्यें सारखाच फरक आहे असे. **समानांतर रेषा**–समांतररेषा पहा. **समानाधिकरण**–वि. १ ज्यांचा आधार, विषय, स्थान वगैरे एकच आहेत असे. २ (व्या.) एकाच विभक्तींतील. ३ (ल.) ज्यांचा आधार, पाया एकच आहे असे; सुसंगत; परस्परांशीं जुळणारे; सयुक्तिक. ०**बहुव्रीहि**–पु. ज्या बहुव्रीहि समासांतील दोन्ही पदांस विग्रहवाक्यांत एकच विभक्ति असते तो समास. **समानार्थक**–वि. एकाच अर्थाचे; सारख्याच अर्थाचे; त्याच अर्थी. **समानोदक**–वि. सपिंडाहून दूरचा पण ज्याला तर्पणाचा अधिकार आहे असा (नातलग). याचा संबंध सातव्या पिढीनंतर चौदा पिढ्यांपर्यंत पोंचतो. **समानोदर**–वि. एकाच आईपासून जन्मलेले; सोदर; सख्खे.

समान, सम्मान, संमान—वि. आठ. अरबी वर्षगणनेंत वापरतात. [अर. सामान]

संमान, सम्मान—न. कोर्टाचें बोलावणें. (इं.) समन्स.

संमान, सम्मान, सम्माानन—पु. सन्मान; आदर; सत्कार; पूजन. [सं सम्+मन्] **संमानित**–वि. आदरसत्कार केलेला; बहुमानित; पूजिलेला.

समानीन, सम्मानीन—वि. ऐशीं. अरबी वर्षगणनेसंबंधीं योजतात. [अर. समानीन्]

समापत्र—न. १ संमतिपत्र; मान्यतालेख; अनुज्ञापत्र 'सर्वी ही मिळोन समापत्र केलें.' –वाडबाबा २.३१. 'जुलमाचें समापत्र डांग्याची किल्ली म्हणोन केलें.' –समरो ३.६५. २ कबूली लेख. [सं. संमतिपत्र]

समापन—न. पूर्णता; समाप्ति; शेवट; अखेर. [स. सम्+आप्]

समापन्न, समापित—वि. समाप्त; संपूर्ण; शेवटास गेलेलें; पूर्ण झालेलें. [सं.]

समाप्त—वि. संपलेलें; पूर्ण झालेलें; उरकलेलें; शेवटास गेलेलें. [सं.]

समाप्ति, समाप्त—स्त्री. १ पूर्णता; शेवट; अखेर; संपलेली स्थिति. 'ग्रंथाची समाप्त त्याचे हातें.' –रामदासी २.१५. २ (ल.) मरण. [सं.]

समायिक—वि. समाईक पहा.

समायिक, सामायिक—वि. प्रासंगिक; प्रसंगोचित; प्रसंगप्राप्त; नैमित्तिक; कालानुकूल; कालसदृश. [सं. समय]

समायिणें—अक्रि. मावणें; व्यापणें; प्रवेश होणें; समाविष्ट होणें. 'हृदयीं हाचि न समाये। बुद्धीचें गिंवसूनि ठाये।' –ज्ञा ४.२०६. 'प्रतिध्वनि न समातु। उपजत असे।' –ज्ञा १.१२६. 'मनामध्यें न समाये।' –दा ७.७.२५. [सं. सम्+मा]

समार—पु (खा.) संभार पहा. १ मसाला. २ एक औत, हत्यार. –कृषि २५७

समारंभ—पु. १ उत्सव; सोहळा; (एखाद्या कार्याची, सार्वजनिक, प्रसंग, मेजवानी, मिरवणूक, वगैरेची) व्यवस्था, उद्योग, खटपट, जुळणी, योजना, रचना, मांडणी. उदा० लग्नसमारंभ; मुंजीचा समारंभ; ब्राह्मणभोजन, यज्ञ, युद्ध यांचा समारंभ. २ (ल.) अशा प्रसंगास लागणारी सामुग्री, तयारी, साधनसमुच्चय. 'आमच्या येथील विवाहाकरितां आपणांकडील सर्व समारंभ आम्हास द्या.' ३ आदर; सत्कार; मान (क्रि० राखणें, ठेवणें). ४ खटाटोप; आटाआट; आवेश. 'तैसा समारंभु सुणा। गेलाचि तो।' –ज्ञा १७.४१८. 'मग क्षोभला समारंभें। घाली तेथ।' –ज्ञा १५.४८७. [सं. सम्+आ+रभ्]

समाराधन–ना—नस्त्री. १ व्रत, उत्सव, सोहळा वगैरे प्रसंगीचें ब्राह्मणभोजन; मुक्तद्वार; भंडारा. 'समाराधनेसी जाऊं

नये।' –दा १९.२.१४. यार्ची समारत्ना, समाराज्ञा अशीं अपभ्रष्ट रूपें प्रचारांत आहेत. 'लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं आपल्याकडची समारत्ना झाली.' –सुदे ९२. 'कांहीं समाराज्ञा कां आहे इथें.' –पकोघे. २ मनधरणी; संतोषविणें. [सं. सम्+आराधन]

समारोप—नपुन. १ अग्निहोत्री कांहीं विधीसह आपल्या अग्नीवर अरणी शेकून अग्निहोत्र बंद ठेवतो त्यास म्हणतात. २ उपसंहार; शेवट; समाप्ति. [सं.]

संमार्ग—पु. दर्वी, स्रुवा इत्यादि यज्ञिय पात्रें दर्भाग्रांनीं साफ करणें. [सं. सम्+मृज्]

संमार्जन—न. १ स्वच्छ करणें; साफ करणें; झाडणें; पुसणें. २ पोतेरें, सडा, सारवण करणें; धुणें. 'अहा थोर वाउगें जाहलें। अमृतें संमार्जन म्यां केलें।' –ज्ञा ११.५३८. 'निज भाग्यें अमृत मिळतां संमार्जन त्याचें केलें।' –कीर्तन १.२६. [सं. सम्+मृज्–मार्जन] **संमार्जनी**–स्त्री. केरसुणी; खराटा; झाडू. 'संमार्जनीचा गुण हा पहावा।' –सारुह ८ १३.

समालोचन–ना—नस्त्री. निरीक्षण; परीक्षण; सर्वांगांचें अवलोकन; विवरण. 'तुलसीदासाच्या चरित्रावर विस्तृत समालोचना या अंकांत आली आहे.' –मनोरंजन १७.३. [सं.]

समावणें—अक्रि. १ मावणें; आंत राहणें. 'कीं श्रीमंत रुप या दृष्टीमाजीं समावलें।' –ऐपो २७१. २ प्रविष्ट होणें; अंतर्भूत होणें; सुखानें प्रवेश करणें, शिरणें. 'शेर दुधांत पावशेर पाणी समावेल.' 'शंभर पात्रांच्या सैपाकांत पांच पात्रें समावतील'. 'पाणी पाण्यांत समावतें, तेल तेलांत समावतें.' [सं. सम्+आ+इ; सम्+आप्]

समावर्तन—न. सोडमुंज; ब्रह्मचर्याश्रमाच्या समाप्तीच्या वेळीं करावयाचा विधि. [सं.]

समावा—पु. भांडें; पात्र. 'या चहाच्या समाव्यांत उंदीर पडून मेला आहे.' –चहापान नाटक.

समाविष्ट—धावि. १ मावलेला; अंतर्भूत; अंगभूत. २ प्रवेश केलेला; व्यापलेला; आंत राहिलेला (घर, वगैरे). ३ शिरलेला; व्याप्त; ग्रस्त (रोग, विकार वगैरेनीं).

समावेश—पु. १ मावणें; अंतर्भाव; अंगभूतता; संग्रह; (व्यक्ति, वस्तु, कामें, गोष्टी यांचा). 'शंभर ब्राह्मणांत या एकाचा समावेश करा.' २ प्रवेश; रिघाव; शिरकाव. 'या लहानशा खोलींत पन्नास मनुष्यांचा समावेश कसा होईल.'

समांश—पु. मध्यान्ह अथवा खस्वस्तिकापासून क्षितिजापर्यंतचा कंस; समलव. [सं.]

समांशी—पु. भागीदार; पातीदार; समान वाटेकरी. [सं. सम्+अंश]

समाश्रय—पु. आधार; आसरा; थारा; ठाव. [सं. सम्+आश्रय] **समाश्रित**–धावि. आधार, आसरा मिळालेला.

समास—पु. १ शब्दांची जोडणी; शब्दसंयोग; शब्दांचें संयुक्तीकरण. 'पैं गा समासां माझारीं। द्वंद्व तो मी अवधारी।' –ज्ञा १०.२७०. २ संयुक्त शब्द; जोड शब्द; सामासिक शब्द. ३ (चुकीनें) संयुक्त शब्दांचें स्पष्टीकरण, विग्रह. ४ लेखाच्या बाजूस कागदावर सोडतात ती कोरी जागा; कडा; कूस; मोकळी जागा. (इं.) मार्जिन. ५ संक्षेप. ६ (गणित) बेरीज. ७ अध्याय; प्रकरण. 'प्रसंग माने समास पोथी। बहुधा नामें।' –दा १२. ५.४. [सं. सम्+अस्=टाकणें, फेकणें] **०भावना**–स्त्री. (गणित) गुणाकारांची बेरीज करून केलेली रचना, पदयोजना. **०रेषा**–स्त्री. पोथीच्या पृष्ठावर दोहों बाजूंस कोरी जागा असते त्या ठिकाणीं मारलेल्या रेषा.

समांसमीना—स्त्री. सहा महिने दूध देणारी गाय किंवा म्हैस; दरवर्षी गाभण राहणारी व विणारी गाय किंवा म्हैस. –मोल. समसकी, सामासकी पहा.

समाहरण—न. एकत्र आणणें; मिसळणें; जोडणें; गोळा करणें. [सं. सम्+आ+हृ]

समाहार—पु. १ एकत्र जमाव; समूह; समुदाय; मिश्रण; जुळणी. २ अक्षरसमाहार; वर्णसमाहार; वर्णमाला; अक्षरमाला. ३ संक्षेप; सारांश. ४ (व्या.) समास; शब्दांची जोडणी. ५ शब्दांची अथवा वाक्यांची जोडणी, जुळणी; 'आणि' या उभयान्वयी अव्ययाचा अर्थ. ६ द्वंद्व समासाचा एक प्रकार. ७ सारखाच, एकाच प्रमाणांत असलेला आहार. ८ निरोध. 'किजैल इंद्रियांचा मारू। प्राणापानाचा समाहारू।' –भाए २३२. [सं. सम्+आ+हृ] **०द्वंद्व**–पु. द्वंद्व समासाचा एक प्रकार. या प्रकारांत समस्त पदांच्या अर्थाशिवाय आणखी तशाच प्रकारच्या पदार्थांचा अंतर्भाव होतो. उदा० भाजीपाला; चणेकुरमुरे. **समाहारी**–वि. एखाद्याच्या बरोबरीनें आहार असणारा; बरोबरीनें खाणारा.

समाहित—धावि. १ एकाग्र; समाधिस्थ; ध्यानस्थ; ध्याननिमग्न. २ इंद्रियें ताब्यांत असलेला; जितेंद्रिय. ३ एकत्र जुळविलेला, जोडलेला. ४ व्यवस्थित, नीटनेटका ठेवलेला; मांडणी केलेला. ५ पूर्ण केलेला; शेवटास नेलेला. ६ गोळा केलेला; जमा केलेला. ७ विचारासाठीं घेतलेला. [सं. सम्+आ+धा–हित]

समिठी—स्त्री. (महानु.) बुक्काबुक्की; हाताहाती; मारामारी. 'वज्रांगी वज्रमुठी निहनत समिठी होतसें।' –गस्तो ५९. [स+मिठी]

समिति–ती—स्त्री. १ युद्ध; लढाई. 'त्यांहीं गुरू जिंकाया केली ती प्रणतिमिष महासमिती।' –मोभीष्म ११.२४. २

मंडळी; पोटमंडळ; (इं.) कमिटी. 'समितीच्या बैठकीच्या वेळीं हजर राहून...।' –ऐरापु ३७८. **समितिंजय**–वि. युद्धांत जय मिळविणारा.

समिंदर—पु. समुद्र; सागर. 'समिंदरांत मास कसं जगत्यात जी?' –सुधन्वा १८. [समुद्र]

समिध, समित्-द्, समीध—स्त्री. होमास उपयोगी उंबर, पिंपळ, खैर वगैरे लांकडाचा तुकडा. 'मग वासनांतराचिया समिधा।' –ज्ञा ४.१३६. 'होते यदंश शेषश्वास ज्वलनांत हे समिद्धरणी।' –मोविराट ५.३. [सं. सम्+इन्ध्=पेटणें] **समिध शेकणें**–(स्मार्ताग्नीचा समारोप करतांना त्यावर समिध तापवून ठेवतात. त्यावरून) नांवाला करणें; विधिनिषेध न मानणें; बंद ठेवणें. 'तेव्हां कांहीं वर्षे या सभेची समिध शेकण्यास हरकत नाहीं.' –आगरकर ३.१२०.

समिद्ध—धावि. पेटलेला. 'होय खल शलभ लया समिद्ध रणीं।' –मोविराट ५.२. [सं.]

समिना—पु. चांदवा; वितान; अस्मानगिरि [फा. शामियाना]

संमिश्र—वि. मिसळलेलें; मिश्रित. [सं.] **संमिश्रण**–न. भेसळ; मिसळ; मिश्रण.

समी—स्त्री. (तंजा.) समयी; समई.

समीकरण—न. १ सारखें, समान, सपाट करणें; बरोबर करणें; तुल्य करणें. २ बेरीज; एकत्रीकरण. ३ (बीजगणित) दोन समान किमतीचीं पदें समोरासमोर मांडणें; तुल्य पदें. **०घालणें**–दोन तुल्यपदसंख्या दिलेलें उदाहरण करावयास सांगणें. **०बसविणें**–दोन तुल्य गोष्टींची सांगड घालणें; दोन गोष्टींची एकवाक्यता आहे असें सिद्ध करणें. **०सोडणें-सोडविणें**–दोन तुल्य पदसंख्या असलेल्या उदाहरणांतील अव्यक्ताची किंमत काढणें. **समीकृत**–धावि. १ बरोबर, सारखें, समान केलेलें. २ बेरीज केलेलें. ३ बीजगणितांत समीकरण रूपानें मांडलेलें.

समीचीन—वि. १ वास्तविक; सत्य; प्रत्यक्ष. २ योग्य, न्याय्य; युक्त; उत्तम. ३ विपुल; भरपूर; परिपूर्ण; रेलचेल. [सं.]

समीननिमीन—वि. समविषम; कमीअधिक. 'तेथ सत्त्वें आपुल्या आंगीं। समीननिमीन भागीं।' –ज्ञा १८.८२८. [सं.]

समीप—वि. जवळचा; निकटचा; लगतचा; अलीकडचा –क्रिविशअ. जवळ; निकट; सन्निध; लगत; शेजारीं. 'हें निद्रितां समीप। चेतां दुरी।' –ज्ञा १४.८८. [सं.] **समीपता**–स्त्री. १ जवळिक; निकटता; नैकट्य; आनंतर्य; संसक्ति; सान्निध्य. २ चार प्रकारच्या मुक्तींपैकीं एक (देवाशीं सान्निध्य, जवळ असणें). 'सलोकता समीपता। ते तंव पिसें सांडी सर्वथा।' –ज्ञा १.६६. 'समीप असावें हें समीपता।' –दा ४.१०.२४.

समीर-ण—पु. वारा; वायु; हवा. 'तंववरी तो समीरु।' –ज्ञा ८.११६. 'कां अफाटा समीरणा।' –ज्ञा १८.१६९८. 'सहाय तूं समीरण हो।' –मोविराट ३.७८. [सं. सम्+ईर्=जाणें]

संमीलन—न. एकत्र मिळणें; एकत्र होणें, येणें. [सं. सम्+मील्]

समीक्षण, समीक्षा—नस्त्री. १ सूक्ष्म शोध, तपास; छाननी; बारीक परीक्षा, तपासणी; अवलोकन; न्याहाळणें. २ आत्मविद्या; बुद्धि; सांख्यशास्त्र.

संमुख, सम्मुख—वि. अभिमुख; समोर; पुढें; तोंडासमोर. [सं. सम्+मुख] **संमुखीन**–वि. समोरचा; समोरासमोरचा.

समुचित—वि. योग्य; रास्त; न्याय्य; उचित; युक्त. 'गुरुसुत गांठुनि केला कलहहि होय प्रकार समुचितसा। –मोभीष्म ९.३५. [सं.]

समुच्चय—पु. १ सांठा; समूह; समुदाय; जमाव; ढीग; 'म्हणती तुवां पांडवा। हा चिन्ह समुच्चयो आघवा।' –ज्ञा १३.८६०. २ सभेनें दिलेला निकाल, केलेला ठराव, निश्चय. ३ (व्या) शब्दसमूह; समास; वाक्यांचें किंवा शब्दांचें एकीकरण. व, आणि, तसेंच या उभयान्वयी अव्ययांचा अर्थ. [सं. सम्+उद्+चि=गोळा करणें]

समुच्छेद—पु. समूळ नाश; पूर्ण नाश; उच्चाटण. [सं.]

समुत्कट—वि. अतिशय. [सं.]

समुत्कर्ष—पु. श्रेष्ठत्व; उत्कर्ष; भरभराट. [सं.]

समुत्थान—न. १ उठणें; उभें रहाणें. २ धंदा; उद्योग. **संभूयसमुत्थान**–पु. पातीचा धंदा. [सं.]

समुत्पादन—न. संपादन; उद्योग; उत्पन्न करणें. [सं.]

समुद, समुदाय-समुदाव—पु. १ जमाव; समूह; वर्ग; संघ. अनुयायी वर्ग; शिष्यवर्ग. 'बैसला मंत्रीसमुदाव।' –वेणासीता १.१८. 'बरेंवाईट सोसावें समुदायाचें' –दा. ११.५.१४. 'देखिला इत्यादि विचित्र समुद' –दावि १२.३२. २ समुच्चय; संग्रह; [सं.]

समुदा—वि. सर्व; सगळें. 'धैर्य वीर्य समुदें विरलेंसे।' –किंगवि ४०.६२. 'ते होतील हतप्रभाव समुदे तूझ्या प्रतापानळीं।' –निमा १.१. 'समाचार घेऊनि त्याचा समुदा।' –दावि १२५. [सं. समुदित]

समुदायी-ई—पु. शिष्य; अनुयायी. 'समुदायी मग गुप्त झाला।' –देख सप्र ३.७७. [सं.]

समुदित—धावि. १ जमलेलें; एकत्र केलेलें; जुळलेलें. [सं.]

समुदित—धावि. आनंदित; संतुष्ट. [स+मुदित]

समुद्र (अधर)—पु. (नृत्य) ओंठ वर उचलणें.

समुद्धर्ता—पु. उद्धार करणारा; मोक्षदाता. 'म्हणोनि गा भक्तां। नाहीं एकहि चिंता। तयातें समुद्धर्ता। आथि मी सदा।' –ज्ञा १२.९४. [सं.]

समुद्धृत तारा—स्त्री. (नृत्य) डोळे उचलणें, (वीर- व रौद्र रसाचा अभिनय). [सं.]

समुद्भव—पु उत्पत्ति –एभा १०.६९. [सं.]

समुद्र—वि. मोहरबंद; शिक्का असलेलें; मुद्रा असलेलें. [सं. स+मुद्रा]

समुद्र—पु. १ सागर; दर्या; अर्णव; उदकराशि; उदधि; जलधि. २ (ल.) अमर्याद सांठा; विस्तीर्ण, अफाट, अगणित असा समूह, पदार्थ वगैरे (उदा० देव, मानवी जीवित, भाषा, शास्त्र, शक्ति, सद्गुण) या कल्पनेवरून भवसमुद्र, गुणसमुद्र असे अनेक सामासिक शब्द बनतात. **म्ह०** समुद्रास दुखणें शिंपींत औषध. (वाप्र.) **समुद्राखालचा**–समुद्रकांठचा; किनाऱ्यावरील. **समुद्राचें अर्घ्य समुद्रास**–ज्या वेळीं मिळालेल्या देणगीपैकींच कांहीं परत देतात तेव्हां योजतात. **समुद्राचें मीठ डोंगराचे आवळे(मिळणें)**–परस्पर विरुद्ध किंवा परस्परांपासून फार दूरच्या वस्तू एकत्र आल्या असतां म्हणतात. **सातासमुद्रां पलीकडे**–अतिशय दूर; दुर्गमस्थळीं. **सातासमुद्रांपलीकडे ठेवणें**–अतिशय जतन करणें; दुष्प्राप्य स्थळीं ठेवणें; बहुमोल मानणें. **समुद्रांत जाऊन-पडून कोरडा-सुका**–१ अमूल्य संधि मिळूनहि ज्यास फायदा झाला नाहीं असा दुर्दैवी. २ दुष्कर्मांत गढून पुन्हां उजळ माथ्यानें हिंडणारा किंवा नीतीची बढाई मारणारा. **समुद्रांत सुई पाहणें,शोधणें**–अशक्य किंवा अप्राप्य गोष्टीसाठीं निष्फळ प्रयत्न करणें.सामाशब्द– **०कफ**–पु समुद्रफेस; एका माशाचें हाड. समुद्रमाणकी; सिंधुकफ; सुफेन. **०कमळ**–न. एक प्राणि. हा डेझी सारखा असतो.–प्राणिमो १४५. **०कर्कटी**–स्त्री. एक प्राणि.–प्राणिमो १३९. **०कांठ-कांठा किनारा-तीर**–पु. समुद्राच्या कांठचा, किनाऱ्याचा प्रदेश. **०गृह**–न. समुद्रकांठीं, किंवा खाडींत वगैरे बांधलेला बंगला; जलमंदिर; ग्रीष्मगृह. **०चतुष्टय**–न. चार समुद्र; पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर समुद्र. **०नारिंग**–न. एक प्राणि.–प्राणिमो १३९. **०पुष्प**–न. फुलासारखा एक प्राणि; समुद्रकमळ.–भूवर्णन, कावा मराठे ८३. **०फळ-ल**–न. एक औषधी फळ. याचें झाड समुद्रकिनारीं असून पानें बदामाच्या पानांसारखीं असतात. **०फेण-फेन-फेस-माणकी**–पुस्त्री. एक माशाचें हाड, पाठ; एक औषधी पदार्थ. –प्राणिमो ९५. **०मेखला**–स्त्री. पृथ्वी; वसुंधरा; भू (सभोंवती समुद्रांचें कडें आहे म्हणून). **०वलयांकित**–वि. समुद्रानें वेढलेली (पृथ्वी). 'समुद्रवलयांकित पृथ्वीचें दान। करितां समान नये नामा।' –तुगा २४९४. **०शोक-शोफ-शोष-सोक-सोख**–पु. एक औषधी वेल. [सं. समुद्रशोष] **०स्नान**–न. समुद्राच्या पाण्यानें केलेली आंघोळ. **समुद्राची दांडी**–स्त्री. समुद्रकिनाऱ्यावर जेथें लाटा फुटतात ती जागा; समुद्रकिनाऱ्या जवळ जो वाळूचा बांध तयार होतो तो. **समुद्रिय**–वि. समुद्रासंबंधीं; समुद्रविषयक; समुद्रोद्भव.

समुरी—वि. शिमरी; नकटी.

समुव्व—वि. उंच. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

समुवाव—पु (अप.) समुदाय. [सं. समुदाय]

समूर—क्रिवि. समोर पहा.

समूल-ळ—वि क्रिवि. १ मुळासहित. 'तेथ समूळ उपडती जातिधर्म.' –ज्ञा १.२५०. 'चंडवातें जैसी कर्दळी। उलथों पाहे समूळीं।' –एरुस्व १६.११४. २ (ल.) पाया, आधार, उगम, मूळ असलेलें (ग्रंथ, वाक्य वगैरे). [सं.'स+मूल]

समूह—पु. जमाव; समुदाय; कळप; ढीग. 'जेथ पावकादिक पावे। समूह वस्तूंचे।' –ज्ञा ११.१४२. [सं. सम्+ऊह]

समृध्द—वि. १ परिपूर्ण; भरलेला. २ संपन्न; भरभराटलेला. 'तेणें सादुकपणें ज्वाळा समृद्धा। मग वासनांतराचिया समिधा।' –ज्ञा ४.१३६. ३ वाढलेला; अधिक झालेला. [सं. सम्+ऋध्]

समृद्धि—स्त्री. १ परिपूर्णता; चंगळ; वैपुल्य; रेलचेल. २ ऐश्वर्य; भरभराट; संपन्नता; सुकाळ. 'मग समृद्धिजात आपैसें। घर रिघे।' –ज्ञा ६.३५४. [सं.]

समे—शअ. समयीं. 'भक्तिभावाचेनि प्रेमें। द्वारपाळ जाहला समे।' –एकनाथ गाधा ५४०. [समय]

समेट—पु सलोखा; ऐक्य; तडजोड; मेळ; भांडण, विरोध वगैरेचा शेवट; समजूत. [सं. सम्+इ] **समेटणें**–उक्रि. १ तडजोड करणें; भांडणतंटा मिटविणें, आवरणें; समजूत करणें; संधि करणें; सलोखा करणें. २ एकत्र करणें; जमविणें; गोळा करणें. –अक्रि. १ संपणें; थांबणें; पुरें होणें; निवृत्ति होणें; अखेर होणें; मिटणें (भांडण, तंटा, प्रकरण). २ एकत्र येणें; एकमत होणें; एकी होणें (विरुद्ध पक्षांची). ३ गोळा होणें; एकत्र जमणें; गर्दी होणें.

समेत—वि. जुळलेला; संलग्न; संबद्ध (विषय, गुण, क्रिया, कारक वगैरे). –शअ. सह; बरोबर; सहित; समवेत; युक्त. 'निज सैन्य समेत शल्य जो मामा.।'–मोकर्ण ७.४५. [सं. सम्+इ= जाणें] **समेत बाबती**–क्रिवि. बाबतीसह (परगण्याच्या अधिकाऱ्यांच्या हक्कांसह, ते हक्क धरून). 'त्या शेतास समेतबावती पांच मण भात पडतें.' **समेत जवाहिर**–क्रिवि. जवनाहिरासह.–पेद २०.२.

संमेलन—न. १ मेळा; एकत्र जमणें; जमाव. 'शाळेचें संमेलन.' २ मिश्रण; भेसळ; मिलाफ. 'जातींचें संमेलन.' [सं.]

समेसमान—वि. (प्र.) समसमान; अगदीं सारखें; एका सारखे; एकरूप; हुबेहुब; थेट सारखे.

समेळ—न. (रुढ.) संबळ; एक वाद्य. **समेळया**–पु. समेळ वाजविणारा. [सं. सम्+मील्]

समेळ—पु. समूह; जमाव; एक मताची, विचाराची मंडळी. 'संत मंडळी, प्रेमसमेळीं, देती आरोळी.।'–अकक २ शिवराम, रामजन्म २. [स+मेळ]

समो—पु. १ समता; मेळ; सारखेपणा; ऐक्य. 'शिष्यां देतां वांटे। अद्वैताचा समो फुटे।'–अमृ ९.७०. २ समय; वेळ. 'पाठीं रात्रीचा समो पावे। आणि आपैसाचि सांठवे।' –ज्ञा ८.१६८. ३ समूह; समुदाय. 'तें सुकृत ऐसें म्हणे। श्रोत समो।'–ज्ञा १४.२६०. [सं. समय]

संमोखणें, संबोखणें—सक्रि. १ सांत्वन करणें; समजावणें. 'येऊनी केव्हां भेटी द्याल। संमोखाल मज आतां।' –निगा २१६. 'राधा संबोखिली प्रीति आलंगून।' –तुगा १२१. २ हांक मारणें. [सं. सम्+बुध्]

समोर—क्रिविशब्द. १ पुढें; पुढल्याबाजूस, जागीं; अग्रभागीं. २ प्रत्यक्ष; देखत; समक्ष. ३ सरळ; थेट; नीट; उजू; (रस्ता, नदी, झाडें, घरें यांची रांग–याचे अर्थ सरळ रेषेंत किंवा बोलणाऱ्यापासून सरळ लंब रेषेंत असे दोन संभवतात ते बोलणाऱ्याच्या अंगविक्षेपावरून किंवा संदर्भावरून ओळखूं येतात). 'ही समोर चालली;' 'हा मार्ग समोर आहे.' 'ती वृक्षपंक्ति समोर लावली;' 'रेघ समोर आहे.' (कों.) सरळ उंच, थेटवर; सरळ उभा (खांब, काठी, खिळा). 'हा खिळा समोर मार.' [सं. संमुख; गु. सामुं–मो. पं. मुहेरें] **समोरचा, समोरला, समोरील**–वि. पुढचा; अग्रभागीं असलेला; प्रत्यक्ष; पुढील. 'समोरिलां घाईं। मजशीं जुंझतील काईं।' –शिशु ८९७. **समोरासमोर**–क्रिवि. एकमेकांपुढें तोंडें करून असलेले; परस्पर सन्मुख. **समोरी**–स्त्री. संमुखता; विरुद्धता; समोरील स्थिति; प्रत्यक्षता; समोरपणा. **समोरून**–क्रिवि. पुढून; देखत; समक्ष.

समोशी—स्त्री. (सोनारी) सिंहाच्या तोंडाचा ठसा.

समोष्णतावृत्त—न. ज्या ठिकाणांचें उष्णतामान सारखें असतें अशा स्थळांचा पट्टा. [सं.]

समोसरितपल्ली भौमिचारी—स्त्री. (नृत्य) तलसंचर पाय क्रमानें आंतल्या बाजूनें वर्तुळाकार फिरवून मागें टाकणें. [सं.]

संमोह—पु. भ्रम; भ्रांति; अविवेक; अज्ञान; मूर्च्छा. 'संमोह विभ्रम मासे। गिळित धैर्याचीं आविसें।' –ज्ञा ७.७७. [सं. सम्+मुह्]

सम्त—पु. १ भाग. २ मार्ग; दिशा. –आदिलशाही फर्मानें. [अर. समूत]

सम्नाबीर—शमनाबीर पहा.

संम्मत, सम्मतिपत्र, सम्मर्द, सम्मान, सम्मतित, सम्मार्जन, सम्मार्जनी, सम्मिश्र, सम्मिश्रण, सम्मुख, सम्मुखीन, सम्मेलन—संमत, संमतिपत्र, संमर्द वगैरे पहा.

सम्यक्—वि. यथार्थ; योग्य; रास्त; नीट; उत्तम; चांगलें. 'हा सम्यक् ज्ञानाचा रावो। उपायांमाजी।' –ज्ञा १६.५१. –क्रिवि. योग्य रीतीनें, तऱ्हेनें, पद्धतीनें; नीट; बरोबर; युक्त; चांगलें; यथार्थतेनें; उत्तम रीतीनें. [सं.] **०दंडन**–न. योग्य शिक्षा; न्याय्य दंड; रास्त शिक्षा; योग्य प्रायश्चित्त. **०वृत्ति**–स्त्री. १ सरळ वर्तन; न्याय्य वागणूक; रास्त कृत्य. २ योग्यपणें बजावलेलें कर्तव्य, कर्तव्यकर्म.

सम्राट्—पु. सार्वभौम राजा; सार्वभौम अधिपति; सर्वश्रेष्ठ भूपति. 'देवर्षि म्हणे नृप तो सम्राट् प्रभु राजसूय मखकर्ता।' –मोसभा १.४६. [सं.]

सम्शान—न. (राजा) स्मशान; मसण. [सं. श्मशान]

सय-ई—स्त्री. मैत्रीण; सखी; स्त्रीमित्र. 'कटाक्षांची छाया घनतर सये ज्यास पडली।' –सारुह ७.८२. 'रडों नकोचि थांब सये।' –मोविराट १.९०. [सं. सखि]

सय-ई, से—स्त्री. स्मरण; आठवण; स्मृति. 'घाम मुखीचा कोण पुशिल मग सय होइल घरची।' –प्रला १२४. 'ऐसी पुढील से घेतु।' –ज्ञा १.७९. [सं. स्मृति; प्रा. सुई]

सय—स्त्री. (व.) संवय; अभ्यास. [सं. स्मृति]

सय-ई—क्रिवि. सई पहा. मनासारखें, पसंत.

सयजन—क्रिवि. (खा.) खरेंच; खरोखर. 'सयजन त्यांच्या घरीं चोरी झाली असेल का?' [सं. सत्यम्; सत्येन]

सय—स्त्री. (गो) खोबऱ्याचा कीस.

संयत—धावि. मर्यादित; आंवरलेला; दमन केलेला; स्वाधीन ठेवलेला; संयमित [सं. सम्+यम्] **संयतात्मा**–वि. स्वतःवर ताबा असलेला; आत्मसंयमन करणारा. **संयति**–स्त्री. इंद्रियदमन; संयम; नियमन. 'एकां वैराग्यरवि विवळे। तंव संयति विहार केले।' –ज्ञा ४.१२८. **संयतेंद्रिय**–वि. जितेंद्रिय; इंद्रियनिग्रही.

सयतान, सैतान—पु. १ बायबलांतील ईश्वरविरोधी व्यक्ति; इब्लिस. २ भूत; पिशाच्च; वेताळ. ३ (ल.) भयंकर; क्रूर; उग्र; दुष्कृत्यें, कृष्णकृत्यें करणारा; विद्रूप; कुरूप (व्यक्ति). ४ (ल.) भयंकर वादळ; तुफान.

सयन—न. सैन्य (अप.) 'खासखेल सयन।' –ऐपो ७९.

सयनी—स्त्री. (ना.) सनई (अप.)

सयंपाक, सयंपाकघर, सयंपाकी, सयंपाकीण—स्वयंपाक, स्वयंपाकघर वगैरे पहा. 'तिकडे झाला सिद्ध सयंपाक।' –दावि ७.२.५५.

सयंभ—वि. (गो.) स्वयंभू पहा.

संयम–न—पुन. १ निर्बंध; बंधन; मर्यादा. २ निग्रह; दमन; आवर; आळा; दाब. 'तेथ संयमाग्नीचीं कुंडें।' –ज्ञा ८.५०. ३ व्रत; नियम. ४ (योग.) ध्यान, धारणा व समाधि मिळून होणारा निग्रह. [सं. सम्+यम्] **संयमनी**–स्त्री. यमपुरी; यमनगरी. **संयमित**–धावि. निग्रहीत; बंदिस्त; मर्यादित; नियमित. **सयमी**–पु. निग्रही; आपले विकार ताब्यांत ठेवले आहेत असा पुरुष; तपस्वी; योगी; जितेंद्रिय.

सयर—स्त्री. सहल; फेरी; चक्कर. 'सलाबतजंग दर्गाकुलीखानाचे बागेत सयरेबदल तिसरां प्रहरां गेले' –रा १.१७६. [अर. सैर]

सयरट, सयरावयरा, सय लावणें, सयली, सयंवर—सैरट, सैरावैरा इ० पहा.

सयली—स्त्री. सैली; सखि; स्त्री. 'सयली घेउनि संगें।' –अकक २. मृत्युंजय चरित्र २. [सं. सहचरी]

सयली—स्त्री. फकीराच्या गळ्यांतील दोरा, दोऱ्याची माळ, सैली. 'त्रिगुण गुणाचा येक गुण। याची सयली करूनी जाण।' –नागेशलीलामृत २३. [अर?]

सयसद्, सतसय—क्रिवि. (राजा.) सरळ ओळींत; रांगेनें; थेट; अत्रुटित. [सई+शुद्ध]

सयसुमार—सईसुमार पहा.

सयसुवाद—पु. (गो.) ताळतंत्र; घरबंध. 'तुझ्या बोलण्याला कांहीं सयसुवाद आहे का?'–सह्याद्रि ११५. [सई+सुवाद]

सया—पु शिया; महंमदाचा जांवई अली याचा अनुयायी. याच्या उलट सुनी. [अर. शियाह्]

संयान—न. बरोबर जाणें; सोबतीनें जाणें; साहचर्य. [सं. सम्+यान]

सयार—पु. चेटूक; कुयेडें; जादूटोणा; भुताटकी. **सयारीण**–स्त्री. डांकीण; चेटकी; जादुगारीण. 'म्हणे काम बागुल आइकैल। हे आशा सयारी देखैल।' –माज्ञा ११.५०५.

संयाव—पु. सांजा; रवा व साखर यांचा तुपांत केलेला पदार्थ. [सं. सम्+या]

संयुक्त, संयुत—धावि. १ जोडलेलें; सलग्न; सांधलेलें; संबद्ध. २ मिश्र; मिसळलेलें; एकत्र केलेलें. ३ संपन्न; सहित; युक्त. [सं. सम्+युज्] **०धातु-क्रियापद**–पुन. जोड धातु, किंवा जोड क्रियापद; दोन शब्द मिळून होणारा क्रियादर्शक शब्द. उदा० बोलून जाणें; गाऊं लागणें. **०पानें**–नभव. बेल, पळस, वगैरेसारखीं अनेक दलें असणारीं पानें. **०मिळकत**–स्त्री. अविभक्त मालमत्ता. **०संबंध-संयोग**–पु. असमवाय संबंध, योग; अगदीं निकटचा नव्हे पण जरा दूरचा संबंध. **०स्वर**–पु. ए, ऐ, ओ, औ हे स्वर.

सयुक्तिक, संयुक्तिक—वि. योग्य; सारासार विचारास पटणारें; सुसंबद्ध; सुसंगत; पद्धतशीर; मेळाचें. [सं.]

संयुति—स्त्री. सांधा; जोड; मीलन; एकत्रीकरण. २ (ज्यो.) दोन ग्रह एका राशींत येणें; युति. [सं. सम्+युति]

संयोग—पु. १ निकट संबंध; संघटन; मीलन; संगम; एकत्र होणें. २ मिश्रण; एकत्रीकरण; मिसळणें; बेरीज. ३ जोड; सांधा; जूग; एकोपा. [सं. सम्+युज्] **संयोगप्रीति**–स्त्री. (रसा.) पदार्थांतील परस्पराकर्षण; एकत्र होण्याची प्रवृत्ति; (इं) अफिनिटी. **संयोगभूमि, संयोगीभूमि**–स्त्री. दोन भूप्रदेश जोडणारा जमीनीचा अरुंद पट्टा; **संयोगित**–धावि. जोडलेलें; एकत्र केलेलें; संयुक्त; सांधलेलें. **संयोगी**–पु. ब्रह्मचर्यव्रताचा त्याग करून ज्यानें विवाह केला आहे असा गोसावी, किंवा बैरागी; घरभारी. –वि. जोडलेला; जुळलेला.

संयोजक—वि. १ जोडणारा; जुळविणारा; सांधणारा; योजना करणारा; नीट व्यवस्था लावणारा; व्यवस्थित घटना करणारा. २ सभेचा आमंत्रक; सभेचें कार्य करणारा; कार्यवाही. ३ (रसा.) योग्य परिस्थिति उत्पन्न करणारा. (इं.) अडॉप्टर. [सं. सम्+युज्] **संयोजन**–न. १ सांधणी; जोड; मिलाफ. संयोग. २ जुळणें; एकत्र करणें. **संयोजित**–धावि. जोडलेलें; सांधलेलें; एकत्र केलेलें.

सय्यद—पु. महम्मदचा मुलीकडील वंशज जो हुसेन त्याच्या वंशांतील मनुष्य; महंमदाची मुलगी फातमा हिच्या वंशांतील मनुष्य. [अर. सय्यिद]

सय्या, सय्या–पु. छक्का; पत्त्यांतील सहा ठिपक्यांचें पान.

सर—पु. १ डोकें. २ (ल.) मुख्य; श्रेष्ठ; वरचढ. 'या सर्वांवर हरिपंत सर आहे.' हुयापूर्वीहि मुख्य या अर्थी जोडतात. उदा० सरदेशपांडे; सरदेशमुखी; सर सुभेदारी इ. ३ (ल.) प्रमुख; नेता; चालक (संस्था, मंडळ वगैरेचा). ४ (गाय, म्हैस, वगैरे शब्दांनंतर योजल्यास) संख्या (डोकीं) दाखवितो. उदा० गाय सर एक, म्हैस सर तीन=एक गाय, तीन म्हैशी. 'बैल सर पांचशें पाठविले.'–रा १२८. प्राण्यांची संख्या दाखविणेंस सर व वस्तूंची संख्या दाखविण्यास सुमार शब्द योजीत. उदा० उंटें सर बारा, नारळ सुमार पंचवीस. **सर करणें**–जिंकणें; पादाक्रांत करणें (किल्ला, प्रदेश वगैरे); फते करणें; तडीस नेणें (काम, काज). [फा.

सर्]**०कान(नू)गो**–पु. देशपांडयासारखा एक अधिकारी. –रा १२.२१५ [फा.] **०कानगोपण**–न. सरकानगोपणाचें वतन. 'संस्थान मजकूर येथील सर मंडलोईपण व सरकानगोपणाचें नवीन वतन रामचंद्र बल्लाळ यास करून दिलें आहे.' –वाडबाबा ३.३५. **०कारकून**–पु. वरिष्ठ प्रतीचा कारकून. 'फक्त अष्टप्रधान सरकारकुनास पालख्या दिल्या.' –शिचप्र २२. **०खत**–न. १ सरकारकडे वेळोवेळीं भरणा केलेल्या रकमांची क्रमानें केलेली नोंद; पावती; कौलनामा. २ विक्रयपत्र; सरकारनें विकत घेतलेल्या मालाची पावती. **०खवास**–पु. मुख्य नोकर; अनुचराधिपति. 'सरदेशमुख म्हणून देऊन सरखवाशी व देहुडयांकडील चौकी पहारे व कारखाने यांस ...' –मराचिथोशा १०. **०खेल**–पु. १ खास पथकाधिकारी; स्वारांच्या पथकावरील अधिकारी; ध्वजवृंदाधिकारी. २ मराठेशाहींतीक एक पदवी; आंग्रे सरदारांची पदवी. 'तुळाजी आंगरे सरखेल यांजकडून अंमल दूर करून...' –वाडबाबा ३.५३. **०खेली**–स्त्री सरखेलाचा अधिकार, हुद्दा, पदवी, काम. **०खोत**–पु. मुख्य खोत. 'सर खोत व फुट खोत पुढें सुटीचा कज्या राहिला नाहीं.'–समारो १५५. **०गावडा**–पु. खेडयांतील एक कामगार, अधिकारी; धनगरांचा मुख्य. **०गुन्हो-रो**–पु. १ किल्ल्यावरील शिबंदींतील एक अधिकारी; जमादार. २ पंथाचा मुख्य, महंत. [फा.] **०चश्मा–चष्मा**–पु. प्रमुख; अध्यक्ष; चालक; पुढारी; धुरीण; नायक (सभा, मंडळ, खानें वगैरेचा). [फा.] **०तपासणी**–स्त्री. एखाद्या साक्षीदाराची हजर करणाऱ्या पक्षानें घेतलेली जबानी. **०तरम**–पु मुख्य मोजणीदार; शिरस्तेदार. 'हुजुर कचेरी हेची दोनी तटा। सरतरम तेथीचिया महान् लाटा।' –पैमा १.१९. **०ताज**–पु. मुख्य; प्रमुख [फा.] **०दफ्तर**–नपु. सरकारी कामकाज व तें करण्याचा अधिकार. भाइअ १८३४. **०देशपांडे–ड्या**–पु. देशपांडयांवरील मुख्य; मुख्य देशपांडे. **०देशमुख**–पु. देशमुखांतील मुख्य; सर्व देशमुखांहून वरिष्ठ पदवीदार. –वर्वे घराण्याचा इतिहास १७; –रा २१.५९. **०देशमुखी**–स्त्री. सरदेशमुखाचा हक्क; मोंगलांचे अंमलांतील प्रांतावर मराठ्यांनीं बसविलेला कर. हा उत्पन्नाच्या दशांश किंवा साडेबारा टक्के असे. ही बाब छत्रपतीची खासगीकडे खर्च होत असे. –थोमारो २.९१. **०देसगत**–स्त्री. सरदेशमुखी. 'तालुके नवलगुंद देखील सरदेसगत निसबत गोविंद भिकाजी.' –समारो ३.२५. **०नामा**–पु. पदवी; किताब; पत्रारंभींचा मायना; आडनांव. २ प्रास्ताविक मजकूर. [फा. सर्नामा] **०नोबत–नौबत–द**–पु. ज्यास स्वतंत्र नोबत, (नगारा) मिळाली आहे असा सैन्याधिकारी; सेनापति; सेनानी. 'जयसिंगराव निकम सरनोबत दिमत पागा हुजूर.' –समारो ४.५१. [फा.] **०पंत**–पु. मुख्य न्यायाधीश. 'या स्थापिलेल्या वरिष्ठ कोर्टामध्यें मुख्याधिपत्य सर पंत मोरो काशीनाथ अभ्यंकर यांजकडे दिलें होतें.' –बडोद्यातील राज्यकर्ते ३३९. **०परस्त**–पु. पालनकर्ता; पालक. [फा.] **०परस्ती**–पु. पालकत्व [फा.] **०पागा**–स्त्री. हुजूरपागा; मुख्य सरकारी घोडदळ. **०पागे–पाग्या**–पु. राज्यांतील सर्व पागांवरील मुख्य अंमलदार. **०पाटील**–पु. जिल्ह्याच्या वसूलीवर देखरेख करणारा व त्याबद्दल शेंकडा कांहीं तरी रकम मिळणारा अधिकारी. **०पेच**–पु. शिरपेच; पगडींत खोवावयाचा तुरा. [फा.] **०पोतदार**–पु. सर्व पोतदारांवरील मुख्य; मुख्य सरकारी खजिन्यावरील अधिकारी; नाणीं पारखून घेणारा कामगार. **०पोस**–पु. १ आच्छादन; झांकण; वरून पसरलेलें कापड, रुमाल. (अन्नाचें ताट, पगडी वगैरे वरील) 'कोणी सरपोसवरुन पसरिति।'–प्रला ११३.२३२. 'सरपोस जरी, बाराचा'–समारो४. ११९. २(ल.) गुप्तपणा; गुपित. 'आजपावेतो सरपोस राखिला.' –ख ९.५०४२. [फा.] **०बस्त–स्ता**–वि. १ बंद; लपविलेलें. २ कांहीं ठराविक सारा देणारा, सर्व सारा न देणारा (जहागीरदार). **०बागे**–पु. बागांवरील देखरेख कारणारा अधिकारी. 'ते सरदार ढमढेरे यांजकडे सरबागे म्हणून होते' –ह. ना. आपटे चरित्र. **०बांध**–पु. मुख्य बांध. –मसाप २.३.७८. **०बारगिरी–बारगी**–स्त्री. आधिपत्य; सैन्यांतील हुद्दा. 'पन्नास घोडियाचे सरबारगी तुम्हांसी दिली आहे. –रा १५.३९८. **०बुलंद**–वि. प्रमुख; कीर्तिमान; उच्चपदाधिष्ठित. **०मजमु**–स्त्री. मुजुमदारांवरील अधिकाऱ्याचें पद, अधिकार. 'साल मजकुरीं कमावीस तुम्हांस सांगितली त्याची सरमजमु मशारनिल्हेकडे सांगितली असे.' –वाडबाबा ३.७६. **०मंडलोईपण**–न. परगण्यावरील एका अधिकाऱ्याचें पद. 'व संस्थान मजकूर येथील सर मंडलोईपण व सर कानगोपणाचें नवीन वतन रामचंद्र बल्लाळ यास करून दिलें असे.' –वाडबाबा ३.३५. [सर+मंडलवाही+पण] **०मास्तर**–पु. हेडमास्तर; मुख्य शिक्षक. 'शाळेचे सर मास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ होते.' –नि ६५८. **०मुकादम–मोकदम**–पु सुभ्यांतील एक अधिकारी; मुकादमांवरील मुख्य. –शारो १४१. **०मुख्य**–पु. संस्थानचा, प्रांताचा मुख्य; होळकरांचा किताब. **०लष्कर**–पु. सेनाकर्ते; स्वतः सैन्य जमवून सेनापतीचें काम करणारा.–शिचप्र ६. **०सब्ज**–वि १ ताजा; हिरवा. २(ल.) तेजीचा; नशीबवान्. **०सब्जी**–स्त्री. (ल.) भरभराट; तेजी. 'ज्यांत पातशहाची सरसब्जी ते गोष्ट पातशहांस अर्ज करावी.'–दिमरा १.६२. **०वाद**–पु गोंधळ; घोंटाळा. **०सम्त**–पु. तरफेचा मुख्य. सम्मतचा मुख्य. **०सुभा–सुभेदार**–पु. सुभेदारांवरील मुख्य अंमलदार; त्याची पदवी, हुद्दा, अधिकार. **०हवलदार–हवाला**–पु. मुख्य हवालदार; एक सैन्यांतील अधिकारी. 'तालुके अंजनवेल येथील सर हवाला.' –समारो ३.१७.

सर—पु. बैलावरील कर. –बदलापूर ३६३.

सर—पु. आवाज; ध्वनि; साद. 'सरींची गुंतलें चित्त। म्हणौनि मुकला जीविता।' –भाए ३७२. [सं. स्वर]

सर—पु. दह्याचा घट्ट व स्नेहयुक्त भाग. –योर १.१५५. [सं.]

सर—पु. १ हार; फुलें, मणि, मोत्यें वगैरे दोरांत ओवलेली माळ; कंठा. २ अनेक पदरी हाराचा पदर; वळलेल्या दोराचा पदर; वादीचा पदर. ३ फटाक्यांची माळ; लड. ४ बैलाची शिंगदोरी; बैलाचा दोर; शिंगाजवळ किंवा गळ्यांत अडकविलेली सांखळी. ५ लांकडाचा लांब सोट; वांसा; लांब बांबू; मुसळाची सळई. ६ (व.) कणसाचा लांब देंठ; सरगुंडे वळण्याची काडी. ७ (ना.) पोटांतलीं आंतडीं. ८ (व.) पाठीचा कणा; नाकाचें उभें हाड. [सं.] ९ भात वगैरे धान्य वारवण्यासाठीं वरून सोडतात ती लांबट रास. 'सर घालणें, टाकणें.' [सं. सृ]

सर-री—स्त्री. १ एकदम जोराचा लोंढा, सोसाटा; उदा० पावसाची सर. 'नगीं मेघ जेवि सर घाली।' –मोकर्ण ३३.५७. वर्षलि वारि हरि दयासुधांबु सरी।' –मोकृष्ण ८१.८५. २ आवेश; आवेग; उकळी; हुंदका. उदा० रागाची सर, रडण्याची सर. ३ झटका; झपाटा; फेरी. उदा० तापाची सर; हिंवाची सर; पिशाचाची सर. 'वस्ती विराजू न पिशाच सर।' –नव १३.१२०. ४ उमाळा; उकळी; लहर. 'ममतेची, आनंदाची सर; हंसण्याची सर.' ५ साथ; फेरा; उदा० पटकीची, जरीमरीची, डांग्याखोकल्याची सर. ६ वाताची, भ्रमाची, वेडाची लहर. [सं. सृ=सरणें]

सर-री—स्त्री. १ बरोबरी; तुल्यता; योग्यता; साम्य. (क्रि० येणें; पावणें). 'विष अमृत, सत्य अनृतहि तूं पार्थे तया तुम्हां नसेचि सरी।' –मोकर्ण २७.१३. २ रांग; ओळ. 'बाबिलोनी नेला सरे धरूनु। युडेआंसवें।' –ख्रिपु १.३०.९६.

सर—वि. (महानु.) योग्य. 'ऐसें काइसें वो निढाळपण। सर नव्हे तुझें कारण।' –शिशु १७९.

सर—स्त्री. (गंजिफा) तलफ; राजाकरितां किंवा इतर हुकूम पडावा म्हणून केलेली खेळी. –वि. (पत्त्यांच्या डावांत) हात होईसें; हुकुमासारखें.

सर—न. सरोवर; तळें; तडाग. [सं. सरस्]

सर—पु. एक पदवी. [इं. सर]

सर—अ. अंश, किंचित् छटा, सादृश्य वगैरे दाखविणारा विशेषणांस लागणारा प्रत्यय उदा० काळसर, पिंवळसर. २ पर्यंत; पुरेपूर; कांठोकाठ. 'नदी वरसर भरली.' 'भांडें तोंडसर भरलेलें.' 'दिवाळयेसर वायदो करून बेतों.' –मसाप २.४.१११. **०खुश**–वि. पूर्ण आनंदी; सुखी; संतुष्ट. [फा.] **०गरम**–वि. १ कोंबट; किंचित् उष्ण; सोमट. २ संदिग्ध; अनिश्चित; मोघम. ३ उद्युक्त; मोहीमशीर. 'पर्गणे मज्कुरीचे आबादानीस व मामुरीस सरगरम असणें.' –वाडसनदा १४०. [फा.] **०गश्त**–स्त्री. मिरवणूक; सरघस. 'सरगश्त व मेहदीहि निघाली.' –रा ७.७८. [फा.] **०धोपट**–वि. सरळ; समोर; बेधडक; नीट; वांकडातिकडा नसलेला (रस्ता, नदी, भाषण, कृति, वागणूक). –क्रिवि. सरळपणें; उघडपणें; बेधडकपणें; खाडखाड; तडख; न अडखळतां; न गुंततां (लिहिणें, वाचणें वगैरे). **०निखर**–क्रिवि. सरसगट;गोळाबेरीज करून;एकत्रपणें. **०पाठ**–वि. सारखें. **०पाड**–स्त्री. सारखी योग्यता. 'तुम्हांस दोघां सरपाड आहे।' –सारुह ७.१०१. **०बसर-बासर**–विक्रिवि. १ कमीजास्त; थोडाफार फरक असलेला; बरावाईट; श्रेष्ठकनिष्ठ. 'सगळीं मोतीं एकसारखीं नाहींत सरबसर आहेत.' २ मिश्र; सळमिसळ; एकवटलेलें; एकत्र केलेला. 'ही चांगली साखर व ती नीरस साखर सरबसर करून वाढ.' ३ सरासरी; साधारण; मध्यमप्रतीचा. 'तिजाईसुट सरबसर पाहून द्यावी.' –समारो ४.१५७. **०मिसळ**–स्त्री. मिश्रण; एकत्रीकरण; मिसळणें. –वि.क्रिवि. मिश्रित; एकत्र; मिसळलेलें; मिश्र गुणांचें. 'दुराणी व हे सरमिसळ पळत येतात.' –भाब ७१. 'जळ विष सरमिसळ सळे...' –मोकृष्ण १६.२. **०रहा**–क्रिवि. मोकळेपणानें; अबाधितपणें; सावकाश; विनधोक; सरळपणें (चाललेलें काम, पद्धति). **०रास**–वि. निष्णात; निपुण; तरवेज; हुशार. –क्रिवि. एकंदरीनें; सरसकट; सामान्यतः. **०शेवट**–पु. अखेरी; अंत; शेवट; टोंक; अखेरीचा भाग **०शेवट-टीं**–क्रिवि. अखेरीस; अंतीं; शेवटीं; सरतेशेवटीं. **०सकट-सगट**–क्रिवि. एकंदरीनें; गोळाबेरीज करून; निवड न करतां; सरासरी; एकत्रपणें; सगळें; सर्वसामान्य. **०सट्टा**–क्रिवि. सरसकट; मागे पुढें न पाहतां; निवड न करतां. 'एखादा पुरुष सरसट्टा म्हणजे योग्यता न पाहतां ...दान करूं लागला...' –गीर ५४८०. **०सपाट**–वि. अगदीं सरळ व एका पातळींत; एकसारखें; एकरूप; अगदीं सपाट. 'सरसपाट जें निर्घोट। कठिनत्व खोट ज्यांत नाहीं।' –ज्ञाप्र ३४. 'त्या आत्मज्ञानादि सगट। अवघें झालें सरसपाट।' –स्वादि १२.४.७५. **०सपाटी**–स्त्री. एकसारखा सपाटपणा; समपातळी; उखरवाखर, उंचसखल नसलेली स्थिति; विस्तीर्ण सपाट मैदान. **०सलूख**–पु. विजय व तह; काबीज करून केलेला तह, शांतता-वगैरे. 'नेमाड माळवा मुलूख, करून सरसलूख मोडिले वीर।' –ऐपो ४१६. **०सहा**–क्रिवि. एकसारखा; भेद न करितां; सरसकट; बिनधोक. **०साल**–न. चालू सर्व वर्ष; सबंध वर्ष. **०साल-सालां-सालीना-सालें**–क्रिवि. सर्व वर्षभर; चालू सालीं, वर्षीं. 'चौकशीनें सरसालें खर्च करणें.' –थोमारो ९.३. **०सिधा-शिधा**–पु. कच्चा शिधा; धान्य; शेर. 'सरकारांतून शिपाई येईल त्यास खोत सरशिधा देईल.' –मसाप २.२.७. **०सुमार**–पु.

(प्र.) सईसुमार; सोईसुमार; सरासरी. **०हद्द**–स्त्री. सीमा; मर्यादा; शेवट.

सरई—स्त्री. जहाजाचा एक प्रकार; जलद चालणारें जहाज. 'फिरंगी गोवेकर याची सरई सरकारांत पाडाव आली आहे.' –समारो ६.७८. [ध्व.]

सरई—स्त्री. लांकडाचा चौकोनी तुकडा. [सर]

सरई, सराई—स्त्री. धर्मशाळा; उतरण्याची जागा.[फा.सरा]

सरई, सराई—स्त्री. सुगी; हंगाम; धान्याचा मोसम. [सं. शरद्]

सरक—पु फांस; पाश. –राव्य ९.४०.

सरकट—स्त्री. पावसाची लहान सर; पावसाची भुरभुर, भुरंगट; थोडीशी झड. (क्रि० पडणें; येणें). [ध्व. सृ]

सरकटणें—अक्रि. १ सरकणें; घसरणें; निसरणें. २ वस्त्राचे दोरे वगैरे सरून विरविरीत होणें; विसकटणें; उसकटणें. [सं. सृ–सरणें] **सरकटा**–वि. निसरडा; घसरडा. **सरकटें**–न. निसरडेपणा.

सरकटणें—अक्रि. १ रारसकट कोणतीहि गोष्ट करणें; एकत्र करणें, मिसळणें; गोलाकार करणें. 'तैसें कृत्याकृत्य सरकटित। आपपर नुरवित। कर्म होय तें निश्चित। तामस जाणा।' –माज्ञा १८.६२६. २ एकदम, एकत्र रगडणें, नाश करणें; सरसकट मारणें. 'आले देशोदेशींचे राये। तयांचें सांगावया जावों नलाहे। ऐसे सरकटित।' –ज्ञा ११.३९३. ३ गिरविडणें; लडबडणें. 'तैसें पिचडीं तोंड। सरकटिजेल।' –ज्ञा १३.५६१.

सरकणें—अक्रि. १ घसरणें; घरंगळणें; निसरणें. २ मागेंपुढें होणें; हलणें; सरणें; दूर होणें; बाजूला होणें; स्थानभ्रष्ट होणें; आजूबाजूस होणें. 'अमळ सरकून बसा.' ३ सरसावणें; पुढें जाणें; चालून जाणें; चाल करणें. 'दांडियांचां सरकौनि वारिके आंवरी।' –शिशु ५५२. [सं. सृ–सर] 'सरकीमिरकी चिमटा गणेशाची आढी.' सागरगोटे खेळतांना हलूं नये म्हणून घालावयाची आण. **सरकगांठ**–स्त्री. मागेंपुढें करून सईलआंवळ करतां येईल अशी गांठ; निसरगांठ. 'या गळफांसाची सरकगांठ ओढून मीं आपला गळा आंवळलाच.' –भाब १४३. **०पडदा**–पु. मागेंपुढें सरकावतां येणारा पडदा. 'नाटकांचे सुरवातीचा सरकपडदा उघडला.' –के १०.६.३०. **०पूल**–पु. पुढेंमागें ओढून काढतां घालतां येण्यासारखा खंदक वगैरेवरील पूल. 'त्यावेळीं सरकपूल मोडून ठेवल्याप्रमाणें बाजूस सरकला असल्याकारणानें.' –सासं २.४२. **०फांस**–पु. गांठ मागेंपुढें ओढून घट्ट-सईल करतां येण्यासारखा फांस; निसरफांस. **०शेंडा**–पु. (ना.) झाडाचा सर्वांत उंच शेंडा.

सरकत—स्त्री. पाती; भागी; भागीदारी; बटई; वांटणी; हिस्सा. 'टिपू सुलतानावर स्वारी कंपनी सरकार, नबाब, पेशवे या तिन्ही सरकारांनीं सरकतीनें केली.' –रा ७.१८. [अर. शिरकत्] **०दार**–पु. पातीदार; भागीदार; वांटेकरी. **०नामा**–पु. भागीदारीच्या व्यवहाराबद्दलचा करारनामा; वांटणीपत्र; भागीपत्रक. **०वांटणी**–स्त्री. १ हिस्सा; भाग; भागीदारांतील हिस्सेरशी. 'ठरीव व्याज किंवा सरकत वांटणीनें येईल तो नफा मिळेल.' –आगर ३.८५. २ (गणित.) हिस्सेरशी; पातीच्या व्यवहारासंबंधीं उदाहरणें. **सरकती–त्या, सराकती**–पु. पातीदार; भागीदार; वांटेकरी. **सरकती–सरिकती**–वि. भागीदारीचा; ज्यांत अनेकांचे हिस्से आहेत असा. 'ना कीं संसारू सरिकतीचा।' –ग्रंथराज २८.

सर-कन-कर-दिनीं-दिशीं—क्रिवि. सरकण्याचा, निसरण्याचा, घसरण्याचा, सर असा आवाज करून. [ध्व.]

सरक(का)विणें—उक्रि. पुढें, मागें करणें; बाजूस करणें; हलविणें; ढकलणें. [सरकणें प्रयोजक]

सरकश—वि. बंडखोर; अपराधी; आज्ञाभंजक. [फा. सरकश]

सरकस—स्त्री. घोडे, सिंह, वाघ व कसरती लोक वगैरेचा खेळ. [लॅ. सर्कस=वर्तुळ]

सरका—क्रिवि. (व) सरळ; थेट; नीट; पुढें. [सरणें]

सरका, सिरका—पु. एक आंबट पातळ रस. (इं.) व्हिनिगर. [फा. सिरका]

सरकांडी—स्त्री. (प्र.) सणकाडी पहा.

सरकार—नस्त्री. १ शासनसंस्था; राज्यसंस्था; देश, प्रांत, संस्थान वगैरेचा राज्यकारभार चालविणारी सत्ता. २ राजा; राज्यप्रतिनिधि; राज्याधिकारी; शासनसंस्थेचा प्रमुख; सत्ताधिष्ठित व्यक्ति. ३ (व्यापक) कोणतीहि कचेरी; जिल्हा, प्रांत, तालुका वगैरेची कचेरी; न्यायाधीश व त्याची कचेरी; तसेंच इतर कोणत्याहि खात्याच्या अधिकाऱ्यास व त्याच्या कचेरीस हा शब्द सामान्यतः लावतात. अंमलदार; अधिकारी वर्ग. 'सरकार म्हणजे येथील अधिकारी वर्ग, इंग्लंडचे लोक नव्हेत.' –टिव्या. ४ मालक; धनि; वरिष्ठ अधिकारी, व्यक्ति. 'सरकारचे घोडयावर मजसारख्यानें कसें बसावें.' 'सरकारस्वारी येत आहे.' –रत्नप्रभा २२. ५ प्रांत; देशविभाग. 'उत्तर सरकार' 'कोठें कोठें सरकार हा सुभ्याचा किंवा प्रांताचा पोटविभाग आहे।' –गांगा ४२. 'सरकार जुन्नर' –समारो १.६५. ६ (बंगाल) हिशेबनीस; घरचा कारभारी. [फा.] **म्ह०** सरकारचें तेल पदरांत घ्यावें. (वाप्र.) **सरकारकामास येणें**–

लढाईंत मरणें. सामाशब्द- ०**अमल-असामी**-पु. सरकारी अंमल, सत्ता; सरकारी मनुष्य. ०**अमली**-वि. सरकारावर अवलंबून; सरकारच्या आश्रित, ताब्यांतील, अधिकारांतील. याचे उलट परभारा अमली म्हणजे इतर सत्तेखालील. ०**खराब**-वि. सरकारी पडीत जमीन. ०**गुझश्त**-स्त्री. गोष्ट; हकीकत; इतिहास; परिस्थितीचा आढावा. ०**जमा**-वि. खालसा; सरकारांत सामील केलेलें; जप्त. 'मोरोपंतांना पन्हाळगडचें आपलें घर सरकारजमा करून पन्हाळगड सोडण्याची पाळी आली.' -भक्तमयूरकेका ६. 'पुस्तकें सरकारजमा करण्यांत आलीं असतीं.' -केले १.३७. ०**धारा**-पु. जमीन महसूल; सरकारी देणें; चावडी. ०**मह्शूर**-वि. १ कुप्रसिद्ध; सर्वांस माहीत झालेलें; लहानापासून थोरांस ठाऊक असलेलें. २ सार्वजनिक; सर्वश्रुत; सर्वज्ञात. ०**वाडा**-पु. राजप्रासाद; राजवाडा; राजमंदिर; राजाचें किंवा सरकारी अंमलदाराचें निवासस्थान; सरकारी कचेरी. ०**स्वारी**-स्त्री राजा; धनी; मालक; वरिष्ठ अधिकारी. **सरकारी**-वि. शासनसंस्थेसंबंधी; राज्यासंबंधी; राज्याच्या मालकीचें; राज्यव्यवस्थेसंबंधीचें; राज्यकचेरीसंबंधी. **सरकारी अमल**-पु. १ राज्यसत्तेचा अधिकार, हुकमत. २ शासनसंस्थेतील अधिकार, पद, स्थान. ०**असामी**-स्त्री. १ सरकारांतील अधिकाराचें स्थान, नोकरी. २ सरकारी अंमलदार, अधिकारी. ०**चिन्ह**-न. सरकारी निशाणी, शिक्का, खूण, मुद्रा. ०**जाहिरात**-स्त्री. सरकारनें काढलेला जाहीरनामा, प्रसिद्धिपत्रक. ०**तोहमत**-स्त्री. सरकारचा दोषारोप, किटाळ, आरोप, वहिम; घोरपड. ०**नोकरी**-स्त्री. सरकारांतील चाकरी, हुद्दा, अधिकार. ०**पाहुणा**-पु. (ल.) कैदी. 'सरकारी पाहुण्यांची बडदास्त सरकार नीट ठेवीत नाहीं.' -के १२.७.३०. ०**बोली**-स्त्री. सरकारमार्फत लिलांव चालला असतां सरकारतर्फे आरंभीं पुकारण्यांत येणारा किंमतीचा आंकडा. ०**रोखा**-पु. सरकारनें आपल्या हमीवर काढलेल्या कर्जाचा दस्तऐवज; सरकारी कर्जपत्र; ऋणपट.

सरकाळ-ळी-ळें—पुस्त्रीन. १ जोंधळा किंवा बाजरीच्या कणसाचा दांडा; कडब्याच्या ताटाचा अग्रभाग. 'नागदेव घुमट बांधाया सरकाळाचे गाडे.' -अकक २ उद्धवचिद्घन, नागनाथ चरित्र ४४. २ (विणकाम) कांडी; सुतकांडी. ३ बोथट बाण. [सर+कांडें]

सरकी—स्त्री. कापसाची बी. **सरक्या**-स्त्रीअव. (ल.) कापसाच्या बियांप्रमाणें झालेलें बुरसलेलें धान्य; वृद्धपणामुळें वुबुळावर पांढरेपणा आलेले डोळे. 'डोळे किरवे चांगले। वृद्धपणें सरक्या झाले.' 'डोळे सरक्या झाले.' -दावि १०.४. **सरकळा**-वि. सरकीसारखा; बुरा आलेला; पांढरेपणा आलेला. 'डोळे होती सरकळे। तोंडींहूनि लाळ गळे। उरावरी।' -भारा बाल ९.७६.

सरक्या—पु. सुतळी; दोरा; पतंगाचा सडा; शणसूत्र; तागाची दोरी. [सड, सर]

सरग—न. धान्याच्या राशींतील गाळसाळ राहिलेलें अखेरचें बारीक धान्य. [सरणें-संपणें]

सरगड—पुन. नुकताच लावलेला पानमळा; लावल्यानंतर एक वर्ष लोटलें आहे असा पानमळा.

सरगम—पु. (संगीत) रागास लागणाऱ्या स्वरांची रागवाचक सताल रचना. [सा, रे, ग, म]

सरगा, सरंगा—पु. एक समुद्रांत आढळणारा मासा. 'सरंगो फुलप. '=(गो.) नटणें थटणें.

सरंगा-गी—पुस्त्री. पतंग; विमान; बावडी.

सरगांठ—स्त्री. सुरगांठ; खेचली असतां सहज सुटणारी गांठ; निसरगांठ. -चित्र्यांची माहिती ३२.

सरग—पु. वस्त्राचें टोंक; ओचा; पदर. 'रुळतां वालिपेचा सरंगु दाटिला। मालगंठीवरी।' -शिशु ६२०.

सरगुंटलो—पु. एक मांसाचें पक्वान्न. 'संगित सरगुंटलो बाई.' -संगीत धोंटाळा ६.

सरगुंडे—पुअव. (व.) सपीटाच्या बोटव्यांचा, गव्हल्यांचा एक प्रकार. [सर+गुंडा=गोळी]

सरगोड—पु. (व.) अहंपणा; हांव; फुशारकी; बडेजाव. 'त्याला आपलाच मोठा सरगोड, मग लोकाला काय वाटेल तें पढावयाचेंच नाहीं.'

सरघा, सरघाली—स्त्री. मधमाशी. 'तो भीष्मावरि कोपे स्वमधुहराउपरि जेविं सरघाली।' -मोभीष्म ४.३७. [सं. सरघा+अलि]

सरजा—पु १ नथीच्या टीकेभोंवतीं कलिकाकार जो मोत्यांचा घेर बसविलेला असतो तो. 'नथ नाकांतील उडे तुरे सरजे फुंकरानें।' -प्रला ११२. 'वरचमचमाट सरजे चार।' -पला ३०.५४. 'सरजीनथ शोभतसे।' -नव २०.११३. २ तोडग्याच्या बंदुकीचा तोडा ठेवावयाचा लोखंडी आंकडा. ३ (ल.) बैलांच्या दावणींतील मुख्य बैल; म्होरक्या बैल. [फा. सराजह्] **सरजेदार**-वि. १ मोत्यांचा घेरा असलेली; सरजा असलेली (नथ). २ जकातदार; कर वसूल करणाऱ्यांचा मुख्य.

सरजा—पु. सिंह. 'भोंसल्या सरजा दलभंजन।' -ऐपो ७. 'वाघनख सरजाच्या पंजाला।' -ऐपो १९. [फा.]

सरंजाम—पु. १ सामानसुमान; साधनसामुग्री; हत्यारें-पात्यारें; उपकरणें. 'पोक्त सरंजाम माफिक ठेवावा.' -बाडशाछ २७१. २ सैन्य, किल्ल्याचा बंदोबस्त वगैरे राखण्याकरितां दिलेली

इनामी जमीन; पालखी वगैरे मान मरातब दिला असल्यास त्याच्या खर्चाकरितां दिलेलें इनाम. याचे चौथसरंजाम, जातसरंजाम व फौजसरंजाम असे तीन प्रकार असत. 'हनोज मुबादलि याचा सरंजाम जाला नाहीं.' –इमं ६५. 'सरंजामपट्टी सरकारातून जाहली.' –भात्रै ३. ३ जुळवाजुळव; तयारी; सिद्धता. 'सरंजाम करून डेरे राहुट्या बाहेर दिले.।' –ऐपो ३९६. [फा.] **०दार**–पु. ज्याच्याकडे सरंजामी इनाम आहे असा असामी. **०पट**–पु. सरंजामासंबंधीं पत्रक. **सरंजामी**–वि. १ सरंजाम म्हणून दिलेलें. २ सरंजाम धारण करणारा. **सरंजामी पद्धति**–स्त्री. १ फौजेच्या अधिकाऱ्यांस नक्त पगार वगैरे न देतां फौजेच्या खर्चाकरितां जहागीर देण्याची पद्धति. २ इंग्रज सरकारनें येथील देश्य राजांस कांहीं मुलूख अगर पैका घेऊन फौज पुरविण्याची पद्धति. **सरंजामी फौज**–स्त्री. इनाम जमीन, जहागीर वगैरे घेऊन सरकारकरितां लष्करी अधिकाऱ्यानें ठेवलेलें सैन्य.

सरट, सरड-डा-ड्क-डोका, सरढा—पु. १ एक पालीसारखा प्राणी. 'जैसें बाभुळीचें खोड। गिरबडूनि जाती सरड।' –ज्ञा १३.५६१. [सं. सरट] **म्ह०** १ सरडयाची घांव कुंपणापर्यंत. २ सरडयाप्रमाणें रंग पालटणें–आपलें स्वरूप, वागणूक वरचेवर बदलणें,

सरड—पु. (गो. कु.) सुरमाडाचा तंतु, दोर; भिरलमाडाचा तंतु. [सर]

सरडया देवमण—पु. घोडयाच्या अंगावरील एक शुभलक्षणी भोंवरा.

सरण—न. चिता; मृत मनुष्यास जाळण्याकरितां केलेली काष्ठादि रचना. 'गांवाबाहेर सरण रचिलें। बहुत काष्ठें आणूनी।' –ह ५.१०. [सं. शरण?]

सरणि-णी—स्त्री १ मार्ग; रस्ता; वाट. 'रश्मि छेदुनि दाविति अश्वांला पार्थशर कशा सरणी।' –मोकर्ण ३९.२८. २ सरळ रेषा; अखंडीत, नीट रेघ; रांग; ओळ; सांखळी; मालिका. 'तथापि त्या विचारांची सरणी शब्दांच्या रूपानें द्यावयाची.' –कोरकि ४५५. ३ (ल.) पद्धति; रीत; चाल; रिवाज; रूढी; शैली; धाटणी. (बोलण्याची, लिहिण्याची). 'दिसे सृष्टिची ही सरणी।'–विक २९. 'जे भाषांतरादि ग्रंथ भाषेच्या सरणीला अगदीं बरोबर उतरून ...' –नि ७. ४ एक कंठ रोग. [सं. सृ–सरणें]

सरणें—अक्रि. १ हलणें; चळणें; पुढें मागें होणें; बाजूला होणें; चालणें; जाणें; दूर होणें; निघणें; माघार घेणें; हटणें; जागा सोडून देणें. 'तंव भीमकी वदे आवेशीं। सर तूं हीं एकी धापसी।' –शिशु २२१. 'प्रासु सरली उदधि जळें।' –उषा.९७३७. **म्ह०** सर घोडया पाणी खोल. २ सरकणें; घसरणें; निसरणें; चळणें. 'वाट सरणें.' 'पाय सरणें.' ३ संपणें; खलास होणें; खर्च होणें; कमी होणें; नाहींसें होणें. 'कृपाचि सरली असेंहि न घडे जगन्नायकीं।'–केका ४. 'हारपलें दावूनि जैसा। मागु सरे वीरविलासा।' –ज्ञा १५.५८६. ४ चालणें; पुरें पडणें; प्रगति होणें; चालू राहणें. 'तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे।' –ज्ञा ९.३८०. 'पैक्यावांचून कोणाचें सरत नाहीं.' 'शेजीवांचून सरेना आणि घडीभर पडेना.' ५ शोभणें; योग्य दिसणें; साजेलसें असणें. 'कीं एकुहि न सरे तया मार्जी।' –भाए ६३०. 'हे कुडे न सरती बोल। साचाच्या गांवीं।' –अमृ ६.२१. ६ सरसावणें; उद्युक्त होणें. 'न म्हणों सरली सीता।' –विउ ७.६६. ७ कार्यभाग होणें, चालणें, पटणें, मान्य होणें. 'सांगें वातवर्षे आतपु थरे। ऐसें अभ्रच्छायाचि जरीसरे। तरी त्रिमाळिवें धवळारे। करावीं कां।' –ज्ञा ५.११४. [सं. सृ–सरणें] (ठाव) **सरणें**–मरणें; आटोपणें. 'ऐशा दोघांचा सरला ठावो' –उषा १६०३.

सरत, सरता, सरतें, सरोट, सरत्—नपु. (व. ना.) सरकी पेरण्याची बांचूची नळी; मोघण.

सरत—स्त्री. शर्यत; चढाओढ; अट; पैज; घोडदौड. [अर. शर्त]

सरता—वि. १ वंद्य; श्रेष्ठ; मान्य; कृतकृत्य. 'वाचां जना सुफळ करावें। तिहीं लोकीं सरतेआं होआवें।' –दाव ४६. 'रामानंद स्मरण करितां। केला सरता संतांत।'–देव संतमालिका १०. २ ग्राह्य; चालेलसें. 'जातींत सरता केला.' –महि बखर ५८. 'तुका म्हणे माती। केली कस्तुरीनें सरती।' –तुगा. ३ पूर्ण; योग्य; पुरेसें. 'म्हणे माझे सेवेप्रती। लक्ष्मीहि नव्हे सरती।' –रास १.८९२. 'तेंवीं तुम्हीं आपले कृपादानें करून। सरतीं वचनें करावीं।' –भवि १.७. 'कैसा सरता होईन मी.।' –रावि १. ४ शेवटचा; अखेरचा; शेवटला. 'हे पहिली ना सरती.।' –ज्ञा १८.१११३. ५ संपणारा; खर्च होणारा; आटोपणारा. 'जें सरतें जीवितवारी। तया औषधातें वैरी। काय जिव्हा न म्हणे।' –ज्ञा ६.३६८. 'प्राणी हे करितात आयु सरतें हें नेणवे अंतरीं।' –नवनीत पृ.१४१. **सरता पालव**–पु. अखेरीची स्थिति; शेवटची पालवी; शेवट; अखेर; शेवटचा भाग; हंगामाचा अखेर; ऱ्हास काल. 'तुम्हीं लग्नाचे सरत्यापालवी आला.' **सरतापुरता**–वि. पूर्ण; पुरा झालेला; संपलेला; सगळा; पुरा; भरपूर; पुरून उरण्याजोगा. 'तेचि भाग्यवंत। सरते पुरते धनवंत।' **सरतींपुरतीं, सरतेंपुरतें, सरतासरतीं**–क्रिवि. १ पूर्णपणें; भरपूर. २ अखेरीस; सरतेशेवटीं. 'तरी आतां सरतेंपुरतें। आपुल्या समान करा मातें।' –नव १७.८०. 'जे सावध होते परंतु सर्थ नें केली सरतासरती।'–ऐपो ३५८. **सरतेरात–त्र, सरतीरात्र**–क्रिवि. रात्र संपेपर्यंत; सारीरात्र; रात्रभर. **सरतेशेवट**–क्रिवि.

अखेरीस; शेवटीं; संपतांना; अखेरच्या वेळीं, प्रसंगीं; अंतीं. **सरतेशेवटीं, सरत्याशेवटीं**–क्रिवि. १ अखेरीस; शेवटीं; अंतीं. २ शेवटच्या जागीं; अखेरीच्या भागास; शेवटल्या भागीं, स्थळीं; कडेला; टोंकाला.

सरद—स्त्री. १ सरहद्द; मर्यादा; सीमा. २ (ल.) दिशा; बाजू; प्रदेश. 'यंदा दक्षिणेचे सरदेस पर्जन्य पडला नाहीं.' 'राजापुरी पावेतों सरद दर्याकिनारा मोकळा केला.' –सभासद ५२. ३ (ल.) ताब्यांतील प्रदेश; हद्दींतील प्रदेश; मर्यादित प्रदेश. 'अशास त्याचे सरदेंत त्याचा कौल व तुमचे सरदेंत तुमचा कौल.' –वाडशाछ १.१०६. ४ (ल.) रांग; ओळ (झाडें, टेंकड्या, घेरे वगैरेची). [फा. सरहद्द]

सरद—वि. १ थंड; गार; ओलसर; आर्द्र; दमट; सर्द; शीत (हवा, जागा, बागा वगैरे). २ शीतल; थंडावा आणणारें; ज्यापासुन थंडी होईल असें; दाहशामक (औषध, खाद्य, पदार्थ). [सं. शरद्; फा. सर्द] **सरद होणें, (मनांत) सरद होणें**–एखाद्याबद्दल रुष्ट होणें; नाखूष होणें; खट्टू होणें; खप्पा मर्जी होणें, **थंड पडणें**; वरमणें. **सरदणें**–अक्रि. १ दमट, ओलसर, थंड होणें; ओल येणें, (जागा, वस्तु). २ गारठणें; थिजणें: शरमणें. 'इंग्लिश सैन्य पार सरदून गेलें.' –इंप १८३. **सरदावणें–सरदेणें**–अक्रि. (राजा.) दमट, ओलसर होणें; सर्द होणें. **सरदगरमी**–स्त्री. १ सरदीनें मिश्र उष्णता; मध्यम उष्णता; थंडाव्यानें कमी उग्र भासणारी उष्णता (हवेंतील, पाण्यांतील वगैरे). २ प्रकृतींतील थंड उष्ण असा होणारा फरक; एक व्याधि. **सरदभात**–न. भाताची एक जात; एक जातीची साळ. सर्द पहा. **सरदी**–स्त्री. १ थंडी; ओलावा; आर्द्रता; दमटपणा; ओलसरपणा; ओल. २ शैत्य; थंडावा; सर्दी (प्रकृतींत थंडीचा प्रादुर्भाव, प्रकृति थंड असणें). ३ थंडी; शैत्य; सर्दी (प्रकृतींत शैत्याचा विशेष जोर होऊन ती नादुरुस्त होणें).

सरदा–धा—स्त्री. (प्र.) श्रद्धा. १ भाव; पूज्यता; विश्वास. २ आवड; लालसा; गोडी; इच्छा. [सं. श्रद्धा]

सरन्दाज—वि. हुशार; बुद्धिमान; डोक्याचा; धूर्त. 'अंताजी कालो उमर वरसे दहावर ल्याख शाहाणा लिहिणार सरन्दाज होता.' –भाद्विसंवृ ५२. [फा.]

सरदार—पु. १ बडा अधिकारी; मुख्य अधिकारी; प्रमुख; श्रीमंत व मातबर मनुष्य; पुढारी; मनसबदार; मानकरी; नेता. 'सरदारांनीं कारभार बिघडून दिल्यामुळें...' –समारो २.१०४. २ (ल.) (काशी.) उपाध्याय. ३ घराच्या कामावरील मुख्य गवंडी. [फा. सरदार] **सरदारकी, सरदारी**–स्त्री. १ सरदाराचा हुद्दा, पदवी, मान, अधिकार. 'सुरतेची सरदारकी करावी ऐशी आज्ञा.' –पदमव १९. २ मुत्सद्देगिरी; मसलत. 'शिपाइगिरीची रीत केली सरदारगिरीचा प्रकार न केला.' –पया ३२०. **सरदारी**–स्त्री. घोडयाच्या तोंडापासुन डोक्यापर्यंतचा लगामाचा भाग. –वि. सरदारासंबंधी; सरदारविषयक.

सरदावरदी—स्त्री. १ सरासरी; स्थूलमान; ठोकळमान; अनेक घटकांच्या मिश्रणामुळें उत्पन्न होणारे सामान्य गुणधर्म. २ वरदावरदी पहा. [फा. सर+आवर्द]

सरप—न. रत्न.

सरप—पु. (प्र.) सर्प पहा. साप. **०टोळी**–स्त्री. (कु.) सापसुरळी; चोंचीसारखें तोंड असलेला साप.

सरपट—स्त्री. साप गेल्यामुळें जमीनीवर उठलेला फरफटा; सापाची फरफट; एखादा पदार्थ ओढला असतां उठणारा फरकांडा, ओरखडा; ओढून नेलेल्या वस्तूचा मागें राहिलेला माग, चिन्ह, खूण. [सं. सृप्-सर्प]

सरपटणें—अक्रि. १ पोटानें पुढें सरणें; पोटानें फरपटणें; जमीनीबरोबर सरकत जाणें; खुरडणें. २ (पदार्थाच्या पृष्ठभागावरून) घसरणें; निसरणें; हळू हळू सरकत जाणें; अलगत घसरत जाणें. ३ निसरणें; घसरणें; सरणें; घरंगळणें. ४ ढुंगणानें पुढें सरणें; कुळ्यांनीं सरकत जाणें. [सं. सृप्] **सरपटया**–क्रिवि. सरपटत; खुरडत; रांगत; घसरत; निसरत.

सरपण—न. जळण; इन्धन; जळाऊ लांकडें; बयतन.

सरपोळी—स्त्री. (गो.) सरी; सांखळी. [सर्प]

सरफ—पु. खर्च; काटकसर. [अर. सर्फ=खर्च]

सरफ-इ-खास, सरफ-खास—पु. खास राजाच्या जातखर्चासाठीं तोडून घेतलेला प्रांत. 'त्यानीं खालशांतून व सरफखासांतून हात उचलावा.' –रा ५.५५७. [अर. सर्फ=खर्च+खास]

सरफखाना—पु. विड्याचें साहित्य ठेवण्याचें स्थान; तांबूलागार. 'आबदारखाना चिटणीस यांजकडे सरफखानासुद्धां अधिकार सांगितला.' –इमं ८८. [फा.]

सरफमईशत—स्त्री. पोटखर्च. 'तेथील महसुल बमय औलाद अहफाद सरफमईशत करोन दुवागोई दवाम दौलत अबद पैवंद मशगूल रहातील.' –रा २०.२८६. [अर. सर्फ+मईशत्=चरितार्थ]

सरफराज-जी—स्त्री. बढती; वाढ; शिफारस; स्तुति; प्रशंसा. 'कृपावंत होऊन तुम्हांस सरफराज केलें जाईल...' –वाडसमा १.१३४. 'जो जसा भार धरील तशी त्याची सरफराजी करावी' –मराआ १०. [फा.]

सरफळी—स्त्री. १ मुलांच्या कमरेंत घालावयाची एक प्रकारची सर्पाकृति सांखळी. २ गळयांत घालावयाची एकप्रकारची सांखळी. [सर्प]

सरफा—पु. लाभ; फायदा; नफा; प्राप्ति; हित. 'येणें करून तुमचा काय सर्फा आहे.' –रा १५.३६७. [अर. सरफ=खर्च] **सरफेवाईक, सरफेवार**–वि. फायदेशीर; लाभदायक; हितकर.

सरफांस—पु. सरणारा फांस; निसरफांस; सरकफांस; निसरगांठ. [सरणें+फांस]

सरबटणें—अक्रि. बरबटणें; लिडबिडणें. 'घनरक्तें सर्वे वदन सरबटुनि।' –मोमंभा ३.४९.

सरबडणें—अक्रि. फरपटणें, सरपटणें; सरकत जाणें; घसरत जाणें; चाटून जाणें. **सरबटता गोळा**–पु. टप खात जाणारा, भुइसरपट जाणारा तोफेचा गोळा; याच्या उलट अधांतरी गोळा. हवेंतून जाणारा गोळा.

सरबत—न. लिंब, आंबा, चिंच, साखर वगैरेपासून बनविलेलें मधुर पेय; (काशी) साखरपाणी. [अर. शरबत] **०खाना**–पु. सरबतें तयार करण्याची व ठेवण्याची जागा; यासंबंधीं खातें, कारखाना.

सरबती—वि. गव्हाची एक जात.

सरबत्ती—स्त्री. १ (तोफा, बंदुका, सुरुंग, फटाके वगैरेस वरचेवर) बत्ती लावून, पेटवून केलेला धूम धडाका; वरचेवर पेट विणें. (क्रि० देणें). २ (यावरून ल.) जोराचा भडिमार; धूमधडाका; मारा; झड; ताशेरा (क्रि० होणें; झडणें; उडणें; करणें; झाडणें; उडवणें). ३ (ल.) भांडणाचा; तंटयाचा स्फोट; कलह माजणें; जोराची बोलाचाली होणें. (क्रि० झडणें; उडणें). ४ (विनोदानें) (पानसुपारी देतांना, तूप वगैरे वाढतांना उडणारी) धांदल, धांवपळ, गडबड. [सर+बत्ती–वात]

सरबर-रा—स्त्री. बसोवरी; स्पर्धा. [फा. सरबर=प्रमुख, पुढारी]

सरबरा—ई–स्त्री. व्यवस्था; तरतूद, बंदोबस्त; पाहुणचार; (धंदा वगैरे) चालू करणें, गरजांची भागवणूक; व्यवस्था लावणें; निगा राखणें; आवरणें; चालविणें. सरभरा पहा. 'जें काम सांगाल त्याची सरबरा करूं' –रा ६.५६४. [फा. सरबराह्=सामुग्री; प्रवासखर्च]

सरबरीत—वि. पातळसर, घळमळित; फार दाट नव्हे फार पातळ नव्हे असा (आंबरस, पिठलें, कालविलेला भात, भाजी, चुना, चिखल वगैरे). [ध्व. सर]

सरबसर, सरबासर—वि.क्रिवि. १ सरासरी; मिश्रित; एकंदर; बिजोड; लहान मोठें एकत्र केलेलें. 'सगळीं मोत्यें सारखीं नाहींत सरबसर आहेत. 'तिजाईं सूट सरबसर पाहून द्यावी.' –धाडसमा १.२५७. २ मध्यम; सरासरी.

सरभंगी—पु जेवतांना पुढें मागें न पाहतां खूप खाणारा बैरागयांचा एक पंथ.

सरभरा—स्त्री. सरबरा पहा. चालविणें; व्यवस्था; मदत; निगा (धंदा वगैरेची). 'रुपये पाठविणें म्हणजे सरभरा होईल' –रा १६.२६६. **सरभरी**–वि. उपयोगी; मदत करणारा; सहाय्यक. 'बापु धोंडिये गुण प्रसंगामधीं केवळ सरभरी।' –होला ७७.११२.

सरम—पु एक मासा.

सरम—स्त्री. (प्र.) शरम पहा. लाज; लज्जा.

सरम, सरमट, सरमड, सरमाड—न. बाजरीचें काड, ताट, कडबा. 'कोणापासुन कडबा, कोणापासुन सरमड तर कोणापासुन बांसे' –खरादेश २८०. –कृषि २७७. **सरमाडी**–वि. सरमड काढून झालयावरचें शेत किंवा अशा शेतांतील. 'सरमाडी जमीन, शेत, वावर' 'सरमाडी हरभरा.'

सरमणें—अक्रि. विवेचन करणें; व्याख्यान करणें; विवरणें. 'जें ऐकतां सुख तुमां। तें सरमतां संतोषु आमां।' –ज्ञिवु १.१. १६८. [इं. सर्मन]

सरमस—स्त्री. गर्दी; गडबड; दाटी. 'सरमस वनितांची आणि त्या हो नरांची।' –माधवरामायण बालकांड ४५. भक ५१. [हिं. सरघस?]

सरमाळ—स्त्री. (गो.) समयांची, दिव्यांची माळ.

सरमो(मां)य—क्रिवि. यत्किंचित्तूंहि; बालाग्रहि. 'आइन्दा सरमोय वेगळेंपण दिसत नाहीं' –रा १०.२७८. [अर. सरिमूय]

सरय—पु. (व.) लहान नांगर.

सरया—वि. शुद्ध. –मनको.

सररर—क्रिवि. बाण, तीर, गोळी वगैरे सोडली असतां होणाऱ्या आवाजाप्रमाणें. [ध्व.]

सररास—सरिरास पहा.

सरल—न. (कु.) कोंडा, तूस, भातावरचें सालपट. **सरला-ल**–पु. भाताचा पेंढा; भात झोडल्यावर मळाऱ्याचा पेंढा.

सरल—पु. देवदाराच्या जातीचें एक झाड. 'सरल कुटजवट वृक्ष सातवण वृक्ष दाडिमी चांफा.' –गंगारत्नमाला–नवनीत पृ. ४३२. [सं.] **०द्रव**–पु. सरल झाडाचा सुवासिक पाझर, स्राव, चीक.

सरल-ळ—वि. १ समोर; उजू; नीट; वांकडातिकडा; तिरपा नव्हे असा; थेट. २ (ल.) निष्कपट; प्रामाणिक; नेकीचा; छक्केपंजे नसलेला (मनुष्य). ३ स्पष्ट; उघड; आडपडदा नसलेलें, निखालस (भाषण, शब्द). ४ सोपी; साधी; सुबोध (भाषा-सरणी, लेखनपद्धति, व्याख्यानपद्धति, काव्य वगैरे). 'आर्यकथा छंदानें आर्या छंदेंचि जन्मली सरलें।' –नवनीत पृ २५४. [सं]

०रेषा–स्त्री. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत दिशा न बदलणारी रेषा. **०रेषाकृति**–स्त्री. जी आकृति सरल रेषांनीं मर्यादित असते ती. **०रेषाकोण**–पु. दोन भिन्न दिशांनीं येणाऱ्या सरल रेषा एकमेकींस मिळाल्या म्हणजे होणारा कोन. **सरलता**–स्त्री. ऋजुता; सरळपणा; निष्कपटता; निर्व्याजता.

सरली—स्त्री. सर्दी; चिरफळी; चिरी; लांबट तुकडा (कागदाचा). –देशी नाममाला.

सरवजा—पु. सरवदा, सरोदा पहा.

सरवट—पु. १ सरवा करावयाच्या उपयोगी जमीनीचा तुकडा. २ एक जातीचें भात (हें तांबडें असतें व उपदून न लावतां केवळ पेरून करतात). 'सरवट भात हिरव्या जमीनीवर पेरतात.' [सरवा] **सरवट पटणी**–स्त्री. एक जातीचें पटणीचें भात.

सरवट—न. १ पावसाची मोठी सर. २ (कांहीं ठिकाणीं) पावसाची लहानशी सर. [सर]

सरव(वि)णें—सक्रि. (कु.) संपविणें. [सरणें प्रयोजक]

सरवदा-द्या-सरवजा-सरोदा—पु. (राजा.) सर्वदा पहा. डाकोता; भविष्य सांगणारा. 'जैताचिया चाडा सरवदेया हात वसुं नये.' –भाए २४०. 'ऐकागा ए भाई। सरवदा सांगतो काई।' –तुगा ३२७. 'दिवटा सरवदा भाकूनि गेला।' –दा ३.७.२९.

सरवर–न. (प्र.) सरोवर पहा. तळें. 'जे राजहंस सरवरीचे निवासी।' –बयाबाई रामदासी ९.

सरवळा—पु. सारोळा पहा. बेरजेचा ताळा पाहण्याची एक रीत.

सरवठा—पु. वोटवा; गव्हल्यांचा एक प्रकार. 'ते बोटवे सरवळे आणि मालत्यांला।' –सारुह ६.७७.

सरवा—पु. १ नुकतीच पिकाची कापणी केली आहे अशी जमीन; शेतांतील कणसें गोळा केल्यानंतर मधून मधून चुकून राहतात तीं; फळें, भाजीपाला वैगरे काढून घेतल्यानंतर जो पाठीमागें तुरळक अवशेष भाग राहतो तो. (क्रि० वेचणें). २ वरीलप्रमाणें राहिलेला अवशेष भाग गोळा करून ठेवतात तो. (क्रि० अटवणें, उरकणें, सपविणें). [सरणें+उरणें सरून उरलेला.] **सरव्याची तमाखू**–स्त्री. तमाखूचें मुख्य पीक काढल्यानंतर खुडलेलीं तमाखूचीं पानें; यासच खोडव्याची किंवा पांगशीची तमाखू म्हणतात.

सरवा—पु. झाडें, झुडपें काढून साफ करून लागवडीस आणलेला जमीनीचा भाग; अशा तऱ्हेनें नवीन लागवडीस आणलेल्या जमीनीस दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी सरवा शब्द लावतात, चवथ्या व पांचव्या वर्षी पडण शब्द लावतात. नंतर अजीबात पड टाकतात. **सरवेभात**–न. सरव्यांत केलेलें भाताचें पीक.

सरवा—पु. पावसाची सर.

सरशी, सरशी बाजू—स्त्री. १ वरचढपणा; श्रेष्ठता; जय; वर्चस्व. (क्रि० येणें; होणें; करणें). २ भरभराट; प्रगति; उत्कर्ष. (क्रि० येणें). [सरस=अधिक, श्रेष्ठ]

सरशीं—शअ. सह; बरोबर; सहित; जवळ; पाशीं; सन्निध. 'वना आलीस सरशी।' –वसा ६२. 'गुढया तोरणें उभवून केली मुंज प्रथम सरशीं।' –ऐपो ३०४. [सरसा=जवळ]

सरशी—पु. ताऱ्यासारखा मध्यें तोंड व सभोंवार फाटे असलेला प्राणी. –प्राणिमो ११६.

सरस—पु. प्राण्यांचीं शिंगें, नखें वैगरेच्या रांध्यापासून बनलेला एक चिकट पदार्थ. [फा. सेरेश]

सरस-सा—वि. १ श्रेष्ठ; वरिष्ठ; उत्कृष्ट; उत्तम; सुरेख; चांगला. 'सरस बासन वजनदार पाहुणे मेले बहुत फार।' –ऐपो १८५. 'हौदे अंबाऱ्या सरशा निरश्या।' –ऐपो २४०. २ वरचढ; वरच्या दर्जाचा; अधिक मोठा; जाडा; आकार, गुण, संख्या वैगरेनीं अधिक [सं. श्रेयस्] **सरसता-सरसाई**–स्त्री. १ श्रेष्ठपणा; उत्कृष्टता. २ वरचढपणा; आधिक्य.

सरसगिरी—स्त्री. बरसात; पावसाची सर येणें; वळिवाचा पाऊस पडणें. 'उष्ण काळांत सरसगिरी झाल्यास पाऊस पडों लागल्यास पाणी धरावें लागतें यास्तव गवंडे अलिकडे उष्ण काळांतच पाठवावे.' –वसईची मोहीम.

संरसण—न. सौरस्य; मैत्री. 'त्याचा तुमचा विवेक होऊन संरसण चाले तोच अर्थ केला जाईल.' –शाछ १.२४.

सरसणें—सक्रि. करणें; कृतींत आणणें; रचणें. 'कथा ऐकें ते तूं नवल ऋषिशृंगें सरसिलें।' –माधव-रामायण बालकांड ५.

सरसंदा—वि. सरसुंदा पहा.

सरसर-रां—क्रिवि. १ सर्प वैगरे प्राणी सरपटत जातांना होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज करून; निसरतांना, घसरतांना होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करून. २ झरझर; त्वरेनें; झटझट. 'सरसर गोविंदा येतो। मजवर गुलाल फेकितो।' [ध्व. सरणें]

सरसरणें—अक्रि. सरसर आवाज करून पुढें जाणें; घसरणें; निसरणें; झरकन्, त्वरेनें पुढें जाणें. 'स्वामी वचनें सरसरला।' –संग्रामगीतें. [ध्व. सरसर]

सरसव, सरसु—स्त्री. मोहरीसारखें एक धान्य; शिरस; शिरशी. –ऐरापु ३२४; –कृषि ३५४.

सरसा—वि. सरस पहा.

सरसा, सरिसा—वि. १ सारखा; समान; तुल्य. 'देखे संतासंती कर्मी। हें जें सरिसेपण मनोधर्मी।' –माज्ञा २.२७२. 'नावांसरशी करणी असावी.' –शअ. १ सन्निध; जवळ; समीप. 'घरासरशीं घरें लागलेलीं आहेत.' २ (वेग, सपाटा, आवेश, झटक) यांच्यासह; बरोबर. 'हांकेसरशी घाली उडी। स्तंभामाजी कडाडी।' 'वाऱ्यासरसा, हातासरसा, झपाटयासरसा, तडाक्यासरसा, उटण्यासरसा, बोलण्यासरसा.' –क्रिवि. १ बरोबर; सह; संन्निधभागीं; जवळपास. 'सख्या दोन्ही भागीं बसति सरसा सावधपणें।' –सारुह ६.८९. 'तुका म्हणे सरशी असों येणें बोधें।' –तुगा १९३. २ बाजूला; एकीकडे; मार्गातून दूर. (क्रि० काढणें; करणें; घालणें; निघणें; होणें; जाणें). ३ तात्काल; लागलीच; झपाटयानें. 'सत्य बोले देव भक्तिभाव जैसा। अनुभव सरसा आणुनियां।' –तुगा १८. 'मुलें मिळालीं सरसीं। क्रीडताती हरिसवें।' –ह ७.११९. 'नाम जपे सरसे।' –वेप ६७. ४ नीट; व्यवस्थित; सरसावून. 'पान खाऊन रंगेल अधर। पदर घे सरसा लाजून जरा।' –पला ३६. ५ पुढें; अग्रभागीं. 'या हो या झगडावयास सरसे व्हा मेळवा वाहवा।' –केक ५३. [सं. सदृश]

सरसून–शअ. बरोबर; जवळून; सह; लगटून; लागून. (क्रि० जाणें; चालणें; बसणें).

सरसाव(वि)णें—अक्रि. १ बाजूला होणें; निसटणें; सरकणें. २ पुढें जाणें; चालून जाणें; धिटाईनें चाल करणें. 'ज्ञाता जो सरसावला नवरसांमाझारिं शृंगारसा।' –र १७. ३ वाढणें; उभें होणें; अंगानें भरणें; जोमानें वर येणें. 'मदें मासें सरसाविला। सांदी सांदी भरोनि।' –दा ३.१.१६. 'एका वर्षांत ही पहा कशी सरसावली, आतां मोठी बायको दिसते.' ४ उद्युक्त होणें; तयार होणें; करावयास उटणें; आवेशानें पुढें होणें. –सक्रि. १ जवळ करणें; जवळ घेणें; सन्निध आणणें. २ बाजूला करणें; दूर करणें; सरकविणें. ३ पुढें करणें; सारणें. 'घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसावुनि वाती।' –घन:श्यामाची भूपाळी. ४ तयार करणें; ऊर्जित दशेस आणणें. 'पुण्यक्षेत्र सरसाविलें।' –रावि [सरसा]

सरसिज—न. कमल. [सं.] **सरसिजोद्भव**–पु. ब्रह्मदेव. **सरसिजोद्भवकुमारी**–स्त्री. सरस्वती.

सरसी, सरसी बाजू—सरशी पहा.

सरसुंदा-सोंदा—वि. जाणता; वयांत आलेला; सज्ञान. 'येईन बरोबर म्हणालें राहूं घरीं कशी सरसुंदी।' –पला १८. ४३. [सरस:+स्कंध:?]

सरसोवरशी, सरसोवर्षी—क्रिवि. चढाई करून; कुरापत काढून; चाल करून; धिटाईनें; आगळीक करून. पुढील वाक्प्रचारांस जोडून योजतात. –कज्जा करणें, जबाब देणें, शिव्या देणें, चालून येणें, अंगावर पडणें.

सरस्वती—स्त्री. १ ब्रह्मदेवाची पत्नी. २ ब्रह्मदेवाची कन्या; गणपतीची बायको. ३ वाग्देवता; गायन, कला वगैरेंची अधिष्ठात्री देवता. 'जरी प्रकटे सिद्ध सरस्वती। तरी मुकया आथी भरती।' –ज्ञा १ ७८. ४ वेद, शास्त्रें, वगैरे ग्रंथ; विद्या. ५ वाणी; वाचा; भाषा. ६ वर्षप्रतिपदा, दसरा वगैरे दिवशीं पाटीपूजनाकरितां मुलें पाटीवर रेषांची काढतात ती आकृति. ७ एक नदी; ही पंजाबांत आहे; तसेंच प्रयाग येथील त्रिवेणीसंगमामध्येंहि गुप्तरूपानें येऊन मिळते अशी समजूत आहे. अशी समजूत अनेक ठिकाणीं आढळून येते. उदा० महाबळेश्वर. 'मार्जी गीता सरस्वती गुप्त.' –ज्ञा ११.७. ८ सुंदर व अस्खलित, मधुरभाषिणी स्त्रीस म्हणतात. ९ (सांकेतिक) गुप्तपत्र. [सं.] ०**अनध्याय**–पु. आश्विन शुद्धपक्षांत मूल नक्षत्र असतां सरस्वतीचें आवाहन, पूजन वगैरे श्रवण नक्षत्रापर्यंत करतात तो काल ०**दान**–न. १ लेखी वचन; लेखी करार, लिहून दिलेला लेख (क्रि० देणें; लिहून देणें). २ तोंडी वचन; करार. (क्रि० देणें). ०**पूजन**–न. १ आश्विन महिन्यांत मूळ नक्षत्र असतां सरस्वतीचें आवाहन करून पूजा वगैरे करतात तें. २ दिवाळींतील वहीपूजन.

सरहंग—पु. सेनापति; देखरेख करणारा; मुख्य. [फा.]

सरहद्-द—स्त्री. सीमा; मर्यादा; शेवट. [फा]

सरळ—पु. (महानु.) एक भूषण; भांगांतील मोत्यांचा सर. 'मोतियांचे दुसरें। सरळाचेनि घसरें.' –शिशु ४०४. [सं. सरल]

सरळ—स्त्री. (कों.) भाताचा पेंढा; भात्याण; भाताचें काड. सरल पहा.

सरळ—वि. सरल पहा. [सं.] ०**व्याज**–न. सार्धे व्याज; केवळ मुदलावर घेतलेलें व्याज; याच्या उलट चक्रवाढ व्याज. **सरळणें**–अक्रि. १ सरसावणें; धिटाईनें पुढें येणें; तडखपणें पुढें जाणें. २ वाढीला लागणें; जोमानें वाढणें (मूल, रोप). **सरळ सोडणें**–क्रि. (गाई) गाईस खोंड झाला असतां तो चांगला सशक्त होण्यासाठीं गाईची धार न काढतां सर्व दूध खोंडास पाजणें. **सरळी**–स्त्री. १ पाण्यांत समोर मारलेली सुरकुंडी; पाण्यांत जोरानें सरळ जाणें. २ मोकळीक; स्वातंत्र्य. 'मग सुखें तुज सरळी। दिधली आहे।' –ज्ञा १२.११६.

संरक्षण—न. सांभाळ; रक्षण; राखण; निगा; जपणूक. काळजी घेणें. [सं. सम्+रक्ष्] **संरक्षक**–वि. काळजी घेणारा; रक्षणकर्ता; सांभाळणारा; रखवालदार; पहारेकरी. ०**जकात**–स्त्री. स्वदेशांतील उद्योगधंद्यांची वाढ व्हावी म्हणून आयात मालावर बसविलेली जकात, पट्टी, कर. **संरक्षणीय**–वि. रक्षण करण्यास

योग्य; राखण्याजोगें; जपण्यासारखें; सांभाळण्यासारखें. **संरक्षिणें**–उक्रि. राखणें; काळजी घेणें; जपणें; सांभाळणें; निगा राखणें. **संरक्षित**–धावि. रक्षण केलेला; सांभाळलेला. **संरक्ष्य**–वि. राखण्यास योग्य, शक्य, अवश्य.

सरा-सर—पु. १ लांब सरळ बांबू अथवा लांकूड; वांसा; तुळई; लांब सरळ सोंट. २ गाडयाच्या साटीच्या बाजूचीं वरचीं आडवीं लांब लांकडें (खालच्यास घोडे म्हणतात). ३ (विणकाम) वस्त्रांतील विरळ विणीची रेषा. [सं. सृ]

सरा—पु. १ (कों.) मद्य; दारू; मदिरा. 'स्त्रिया पुजुनि सरे देती। भलते स्त्रियेसी भलते जाती।' –तुगा ४२७७. 'सिंदी सरा तमाखू आफ भांगी.।' –स्वादि २.४.३१. [सं. सुरा]

सरा—पु. (खा.) सरवा पहा. अखेरची वेंचणी.

सरा—स्त्री. नदी. 'समुद्र होऊनि ओघु। सरे दाऊनि मागु। राहे जैसा।' –अमृ ५.२१. [सं. सृ=सरणें]

सराइंदा—पु. गायक; गवयी. [फा. सराइदन्=गाणें; सरा-इंदा=गायक]

सराई—स्त्री. धर्मशाळा; मुशाफरखाना; विश्रांतिस्थान. [फा. सराय्]

सराइ-सरांई—स्त्री. सुगीचा काल; हंगाम; मोसम; पिकें गोळा करावयाचा पर्जन्यानंतरचा काळ; हिंवाळा. 'सराई सर्वे-काळ। वायां न वजे घटिकापळ।' –तुगा ३६०. [सं. शरद्-शारदी]

सराई(इ)त—वि. निष्णात; पटाईत; कुशल; सुग्रण; पटु; तरबेज; दक्ष; सराव असलेला; अभ्यस्त; अनुभवी. 'सराइत होता बाजी ज्याचा मारा संभाळिला।' –ऐपो ७०. 'मी आहे सराईत सख्यारे बाळपणाची। पुरवावी हौस मनाची।' –पला २८. [सराव]

सराउ-ऊं,सराव—पु. अभ्यास; संवय; परिपाठ. 'मुग्धा गती विलासां सराऊं देती।' –शिशु ३४१. 'सराऊं न कीजे राज-कुमारीं। तरि तयां जैत कैचें।' –भाए ५३२. 'जैसा रणरंगीचा नटोवा। सराऊं करितुसें।' –शिशु १००४. [सं. सृ]

सराए—पु. राजवाडा; सराई. [फा. सरा]

सराकत, सराकतदार—स्त्रीपु. शराकत, शराकतदार पहा.

सरागणें—अक्रि. शोभणें. [सं. स+राग-रञ्ज्]

सराजमा—पु. (कर.) सरञ्जाम पहा.

सरांजामी—स्त्री. व्यवस्था. –आदिलशाही फर्मानें. [सरं-जाम]

सराटा—पु. १ गोखरू; एक औषधी वनस्पती व तिचें बीं. 'पारधी विंधी मृगा सराटे जेवीं महागजातें।' –ह १८.२९. 'खिरीमधे हा नसता सराटा।' –सारुह ८.१४. २ माड, पोफळ वगैरेचा हीर. कुसपट; अणकुचीदार ढलपा. ३ आवाजां-तील कंप; गाण्यांतील लांब तान; नादांतील लहरी, हेलकावा, कंपन, आंदोलन, हिसका. (क्रि० घेणें; वाजवणें; वाजणें). –पु. १ उलथणें; कलथा. २ खराटा; झाडणी; सळाथी. ३ तागाचें झाड; सणकाडी; पळहाटी. –कृषि ४७१. [सं. शर]

सराटी-ठी—उस्त्री. तीर; बाण; बाणजाल; शरजाल. 'फुलांचा सराटी। केउती जुंझाची गोष्टी।' –शिशु २६७. 'यालागीं शौचबुद्धीच्या सराटी। अहंकारातें त्राहटी.।' [सं. शर]

सराडणें—सक्रि. (व.) सराट्यांनीं, पळहाट्यांनीं आच्छा-दणें, छपरावर गवत टाकण्याच्या आधीं तें काड्या, तट्या वगैरेनीं आच्छादणें. [सरा]

सराद—न. श्राद्ध. 'घातलें वडलांचें सराद।' –ऐपो ८०. [सं. श्राद्ध, अप.]

सरानसरी, सरानसरी—क्रिवि. सरासरी पहा.

सराप—पु. सर्प. [सं. सर्प; म. साप]

सराप—पु. शाप. [सं. शाप; म. श्राप]

सराप—पु. सराफ. 'पांडुरंग तेव्हां सराप होवोनी।' –रामदासी २.११९. [सराफ]

सरापराज—वि. सर्फराज पहा. –आदिलशाही फर्मानें. [फा. सर्फराज]

सरापर्दह्—पु. राजाचा तंबू; अंतःपुर. –आदिलशाही फर्मानें. [फा. सरापर्दाह्]

सराफ—पु. १ पैशाची देवघेव, हुंडीचा व्यवहार, व्याजबट्टा, सोनें-चांदीचा वगैरे व्यवहार करणारा; पेढीवाला; सावकार. 'चाटी आणि सराफ सोनार। तेली तांबोळी आणि कांसार।' –जै १०.४०. २ (ल.) कृपण; कंजूष. [अर. सर्राफ्] **०कट्टा-काटा, सराफा**–पु. सराफांच्या दुकानांची रांग; सराफगल्ली; सराफी; सराफ बसण्याची जागा. **०खाना**–पु. सराफकट्टा; सराफाचें दुकान. 'देवढी बराबर सराफखाना।' –ऐपो २१५. **सराफडा**–पु. (निंदनें) सरा-फास उद्देशून निर्भर्त्सनापूर्वक योजावयाचा शब्द. **०हट्टा**–पु. सराफ बाजार; सराफांच्या दुकानांची रांग. **सराफाई-सराफी**–स्त्री. १ सराफाचा धंदा; सराफाचें काम; सराफाचें कसब. 'ही वारेवेळची सराफाइला दिली।' –ऐपो ३७१. २ कंजूष-पणा; काटकसर. 'प्रांतिक सरकारानें खात्यांत चांगली सराफी चालविली आहे.' –टिले १.१.५२४. 'यांत सराफी करूं नये.' –रा ६.५०९. –वि. सराफासंबंधी; सराफाच्या कामा-संबंधीं. सराफ बाजारांत कांहीं सांकेतिक शब्द प्रचारांत अस-तात तेः—रायडा = १ पैसा; समान रायडा = दोन पैसे; एक-वई रायडा = तीन पैसे; रामदास = १ आणा; मानाजी = १

रुपया; समानी = २ रुपये; एकवई = ३ रुपये; ऐरण = ४ रुपये; मुळु = ५ रुपये; चेट्टी = ६ रुपये; पवित्रु = ७ रुपये; ठाळ = ८ रुपये; वन = ९ रुपये; अवतार = १० रुपये; वागर = ११ रुपये; बाबरु = १२ रुपये; टिपरु = १३ रुपये; चोपडु = १४ रुपये; तळी = १५ रुपये. **सराफी कावा**-पु. १ सराफी धंद्यांतील कसब, कौशल्य, हुषारी. २ कंजूषपणा; काटकसर.

सराब—स्त्री. दारु; मद्य; मदिरा; सुरा. [अर. शराब]

सरामद—वि. मुख्य. –आदिलशाही फर्मानें. [अर. सर+आमद]

सराय—स्त्री. सराई पहा.

सरायंदा—पु. गायक; गवई. [फा. सरायंदा]

सरायनी—पु. शरायणी गज; जमीन मोजण्याचें माप.

सरारणें—अक्रि. सरसर आवाज करून जोरानें सरकणें, घसरणें; निसरणें; सरपटणें. [ध्व. सरसर] **सरारां**-क्रिवि. सरसर असा आवाज करून; भरभर; जोरानें; सोसाट्यानें. 'ज्वाळा लागती फणिवरा। तो आहाळोन सरारां। विष वमे।' –दा १३.४.४.

सराव—पु. अभ्यास; संवय; रावता. 'आणि जिभे सकळ शास्त्रांचा सरावो।' –ज्ञा १५.३९६. [सं. सृ] **सरावणें**–अक्रि. अभ्यास होणें; संवय होणें; रुळणें. 'विसुभाऊ फजीतीस सरावलेला आहे।' –अस्तंभा १९५.

सरावळें, सरावू—नपु. एक मातीचें भांडें; परळ; रुंद तोंडाचें मृत्पात्र. [सं. शराव]

सरासर—क्रिवि. साद्यन्त; पूर्ण; तमाम; एकंदर. [फा. सरासर्]

सरासर-रां—क्रिवि. सरसर पहा.

सरासरी, सरासरीस, सरानसरी—स्त्री. १ सामान्य प्रमाण; सरसकट पडणारें प्रमाण; सर्वांचें मिश्रण करून येणारें सामान्य गुणधर्म, लक्षण. (क्रि० करणें; बांधणें; होणें; बसणें; जमणें; मिळणें). २ (गणित) अनेक सजातीय संख्यांच्या बेरजेस त्यांच्या संख्येनें भागून येणारें प्रमाण. –क्रिवि. १ सामान्यतः; साधारणतः; सरसकटपणें; विशेष बारकाई, चिकित्सा न करतां; कसें तरी; यथाकथंचित्. २ अजमासानें; कल्पनेनें; साधारण अंदाजानें; ठोकळ मानानें; वरवर पाहतां; बिनचूक निश्चय न करतां. 'या घरास सरासरी हजार रुपये खर्च येईल.' ३ मध्यम मानानें; सर्वांचा सम प्रमाणानें हिशोब करून; सर्वांवर सारखें वांटून. ४ सर्वस्वी; पूर्णपणें; एकंदरींत. 'आधी तुम्हीच सरासरी हरामखोरी केलीत।' –रा १५.३७१. ५ (विशेषणाप्रमाणें) सामान्य प्रतीचें; मध्यम प्रतीचें कसेंबसें; चालचलाऊ. **म्हo** सरासरी गुडघाभर-नदीच्या पात्राचें एकंदर पाणी पाहून त्याची सरासरी काढलेली खोली. अर्थात् ही व्यवहारास निरुपयोगी आहे–कारण मध्यें पाणी खोल असणारच.

सराळणी—स्त्री. उंसाकरितां केलेली तिसऱ्या वेळची नांगरट [सरळ]

सराळी—स्त्री. सरळी पहा.

सरि—स्त्री. बरोबरी. सरी पहा. 'रत्नखचितें रम्यें सरि न पवति मेरू सीखरें।' –आद्य मराठी कवयित्री १६.४.

सरिखा—वि. सारखा पहा.

सरिगम—पु. स र ग म पहा. स्वरग्राम.

सरित्-ता—स्त्री. नदी. 'कीं सरितां ते सागरु। त्यजीं केवीं।' –ज्ञा २.६०. 'नें घे चातक सरिता सिंधू।' –तुगा ८५७. [सं.] **सरितेश्वर**–पु. समुद्र; सागर.

सरिफा—पु. लाभ; मिळकत; फायदा; नफा. [अर.] **सरिफेवार**–वि. लाभदायक; फायदेशीर. सरफा पहा.

सरिफि—स्त्री. बंदुकीचा चाप, कळ.

सरिया—स्त्रीअव. मालिका; सर. 'उभिलिया बकुळ सरियांच्या गुढिया।' –भाए ४४१. 'जैसिया जंत्रीं काढिलिया। इंद्रनिळांचिया सरियता' –कृ ९४. [एव. सरी]

सरिरास—क्रिवि. लागोपाठ; एकसारखें; ओळीनें; अप्रतिबंध क्रमानें; मोकळेपणीं; सुखानें. [अर. सरूर=सुख, आनंद]

सरिश्ता—पु. शिरस्ता पहा. **सरिश्तदार**–पु. शिरस्तेदार पहा.

सरिसा—वि. सारखा; समान; बरोबर; तुल्य. 'तथापि दोहीं ठायीं सरिसा। मोह कराल हा भंरवसा' –मुआदि ३ ८८. 'तरी न एति करीं सरिसे। प्रसंघेसी।' –शिशु १७. 'मार्गीं अंधासरिसा। पुढें देखणहि चाले जैसा।' –ज्ञा ३.१५६. –शअ. १ सह; बरोबर. 'भीमकी सरिसे धांवती।' –एरुस्व ६.५८. 'तत्काळ आला उमेसरिसा।' –कथा १.४.६१. 'तिअें सरिसां भांजिती। मळयानीळु।' –शिशु ७८२. 'शिरा जाळें सरिसा। गुंफौनि अस्थींचा पासा।' –शिशु ७५९. २ जवळ; संनिध. –क्रिवि. सारखें; दुरुस्त; नीट; पूर्ववत्; समोर. 'पडलें खचलें जेथें तेथें। तात्काळ सरिसें करिती तेथें।' –मुसभा ३ ७८. 'उटूनि दोन्ही आरसे। वोडविलीया सरिसे।' –ज्ञा १८.१५९६. [सं. सदृश; सरसा पहा] **सरिसेपण**-न. सादृश्य; तुल्यता; सारखेपणा. 'सरिसेपणें एकवटत इभ–। मस्तकावरी।' –ज्ञा १.१७.

सरी—स्त्री. १ धातूची तार. २ एक स्त्रियांचा सोन्याचा दागिना. 'सरीसरपी होय सरी गळांची।' –सारुह २.७२. 'दिसे जैशी सोनियाची सरी।' –ज्ञा ६.२८६. 'सरीचिताक भोंवरी।' –तुगा ३७७५. ३ बांबूची बारीक लांब काडी, सड. ४ वाफ्यांच्या

रांगेतील पाण्याचा पाट; बागेंतील वाफ्यांची रांग, दंड. ५ विणकामांत दोरे सरल्यामुळें पडणारी विरळ रेषा; दुस्ता. ६ भिंतीच्या माथ्यावरील रेषा, ओळ, रांग. ७ लग; खांबावरील सरा. ८ जात्याच्या वरच्या तळीवर वजन ठेवण्यासाठीं केलेला दगडाचा किंवा मातीचा वाटोळा पेंड. ९ जत्रु; मानेचें हाड. १० वाफ्यांतील मातीचा बांध: वाफ्याचे भाग पाडण्याकरितां घातलेला मातीचा वळ; पाटगा; चिरा. [सं. सृ-सर] **सरी मारणें**-(कांसारी) गोल भांड्यास कड, किनार काढणें, खोदणें. **सरी येणें**-(व.) गळ्याच्या हाडांत दुखणें; हसळी येणें. **सरीचा जोड**-पु. एक मुलींचा खेळ. -मुखेपु २८५.

सरी—स्त्री. बरोबरी; स्पर्धा; तुल्यता; जोड; उपमा.(क्रि० बेणें.)' नाहीं मजसी सरी पावे । ऐसें कोण्ही । ' -ज्ञा १६.३५९. ' शफरी ध्वज सरी न पवे । ' -ह २३.१२४.

सरी—स्त्री. (कर. व्यापारी) दोन आणे.

सरीक—पु. सरकती; भागीदार; पातीदार; वांटेकरी. शरीक पहा. ' तेथील आकार दोईल तो सरीकास देऊन बाकी उरला...' -वाडबाबा ३.२०७. ' सरीक नाहीं दुसरा । ' - तुगा ३६०.

सरीकत—स्त्री. शर्त; अट; तह. -शिदि २५.

सरीसर्वत्र—क्रिवि. सगळीकडे; सर्व ठिकाणीं; प्रत्येक ठिकाणीं.

सरीसुंदी—क्रिवि. (ना.) थेट; सरळ. ' सरीसुंदी नागपुराहून मुंबईलाच गेलों असतों. '

सरीसा—सरिसा पहा.

सरू—पु. (कों.) थरूं; दांडा; मूठ. [सं. त्सरु]

सरू—पु. सुरूचें झाड; एक सरळ वाढणारें सदा हिरवें व शोभिवंत दिसणारें झाड. ' माझा तूं लावण्याचा सरू । ' -पला ४.११. [अर.]

सरूचा, सरूदार—वि. सुरूच्या झाडाप्रमाणें सरळ, उभे. ' वेलबुटी सारखी खांब सरूदार कसे घडले । ' -प्रला ११९.

सरूडोरू करणें—(ना. व.) अनमान करणें; मागें पुढें करणें; कां कूं करणें. 'शाळा सोडण्यास सरूडोरू करतो.' [सरणें?]

सरूप—न. १ स्वरूप याकरितां चुकीनें. २ सौंदर्य.[सं. स्वरूप]

सरूप—वि. १ सारखे; एकाच स्वरूपाचे; एकाच तोंडवळ्यांचे; सदृश. २ (ल.) अभ्र; नक्ष. ' मग आपलें वजन... सरुप यांची इच्छा धरावी. ' -पेद ६.५६. [सं. स+रूप] **सरूपता**-स्त्री. १ सादृश्य; सारखेपणा. २ चार प्रकारच्या मुक्तींपैकीं एक; ईश्वरसादृश्य. ' सलोकता समीपता. सरुपता । ते तंव पिसें सांडी सर्वथा । ' -एरुस्व १.६६. **सरूप त्रिकोण**-पु ज्या त्रिकोणांचे तीनहि कोन परस्परांशीं सारखे असतात असे त्रिकोण. **सरूप प्रेरणा**-स्त्री. एक दिग्गामी प्रेरणा. [सं. स+रूप]

सरेकरी, सरेकार—पु. कलाल; दारू विकणारा.[सरा=मद्य]

सरेगाऊ—वि. सरळ. ' आलें सराटी सिंथितु । सरेगाऊ । ' -शिशु ९६४.

सरेमो, सर्मोय—पुन. वालाग्र; केस. ' करार केला त्यांस कसूर सरेमोग्रही यावयाची नाहीं. ' -पया ४२४. [अर सरिय]

सरेसाल—क्रिवि. वर्षभर; सबंध वर्षांतून; वर्षामधून. [सर साल पहा]

सरोक—वि. विनकिडीचा; चांगला. ' आपपृथ्वी हे पांच फोक । महाभूतांचे सरोक । सरले होती । ' -ज्ञा १५.९८.

सरोख-ष—वि. क्रोधयुक्त; सक्रोध; रागीट. -क्रिवि. रागानें. आवेशानें; क्रोधानें. ' मग सरोष बोलों आदरिलें । ' -ज्ञा २.८८;

सरोग—वि. रुग्ण; आजारी. ' तरी सरोगु काय जाणे । निदान रोगाचें । ' -ज्ञा ११ ९०.

सरोज—न. कमल. [सं. सरस्+ज] **सरोजनी**-स्त्री. कमल समूह. **सरोजिनी**-स्त्री. कमलिनी.

सरोता—पु. आडकित्ता.

सरोत्तर-री—क्रिवि. बरोबरीने; उद्धटपणें; उद्दामपणें. ' हीनजनासी बराबरी । बोल बोले सरोत्तरी । ' -दा २.१.५२. [सर+उत्तर]

सरोद-दा—पु. एक तंतुवाद्य; यास सात तारा असतात. मुख्य चार म, सा, सा, प या स्वरांत व बाकीच्या तीन सा, प व तार सा या स्वरांत मिळवितात. यास तर्फा असून हस्तिदंती तुकड्यानें हें वाजवितात. [सं. शारदा; फा. सुरोद्]

सरोदा-दी—पु. एक भविष्य सांगणारा भिक्षेकरी; डाकोण; सरवदा.

संरोध—पु प्रतिबंध; अडथळा; अटकाव. [सं. सम्+रुध्]

सरोबरी, सरोभरी—स्त्री. १ बरोबरी; तुलना; साम्य. ' तै गुणागुणिया धरावी । सरोभरी कीं । ' -ज्ञा १८.१९. २ स्पर्धा; चढाओढ; बरोबरी. ' जे मीपणाचा धरूनि रोध । सरोबरी करूं पाहे । ' -स्वादि ३.५ ३९. -क्रिवि. १ सारखेंच; बरोबर; सारख्या प्रमाणांत; समानतेनें. ' कीं दोहीं सिद्धी सरोभरी । निपजे यागु । ' -ज्ञा १६.९६. २ आदरानें; भरानें; आवेशानें; वेगानें; भरीस पडून. ' जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी । ' -अमृ १.२. ' तो भावाचिये सरोभरी । नव्हेचि काई । ' -ज्ञा १६.३८. [सर+भर]

सरोरुह—न. कमल; पंकज; सरसिज. [सं. सरस्+रुह्]

सरोवर—न मोठें तळें; मोठा जलाशय; तडाग. **सरोवर नहाणें**-सती जावयास निघालेल्या स्त्रीनें विधिपूर्वक तळ्यांत स्नान करणें.

सरोवरी—सरोबरी-भरीपहा. 'आतां सरोवरी तुजमज।' -तुगा १२१५.

सरोसर—पु. १ एक शिरोभूषण; एक दागिना. २ घोडयाचा डोक्यांत घालावयाचा एक अलंकार. याचे मुखपट्टा व कपाळपट्टा हे दोन भाग असतात. 'स्वामीनीं जरी सरोसर विकत घेऊन देणें म्हणून लिहिलें. ...' -पेद ७.२१. [फा.]

सरोसरोसा होणें—पुरेपुरेसा होणें; नकोसा होणें; थकून जाणें; कंटाळणें. [सरणें]

सरोळा—पु. १ सरवळा पहा. बेरजेचा ताळा पहाण्याची एक रीत. २ एक तऱ्हेचा बोटवा, गव्हला. [सरणें]

सरोळी—स्त्री. (बे.) तांदुळाच्या पिठांत दूध, मीठ वगैरे घालून सारस्वतांत करतात तें एक पक्कान्न. याप्रमाणेंच कायलोळी, दोशे, अंबोळी असे अनेक प्रकार आहेत.

सर्कत, सर्कती, सर्कस, सर्खवास, सर्गरम, सर्गश्त, सर्चश्मा, सर्ताज—सरकत, सरकता, सरकस सरखवास, सरगरम, सरगश्त, सरचष्मा, सरताज, वगैरे पहा.

सर्खील, सर्खेल—पु. सरखेल पहा.

सर्ग—पु. १ उत्पत्ति; जन्म; सृष्टि. 'सर्गस्थितिलयकर्ता ज्याचें घेतांचि नांव भव नाशी.।' -नरहरि, गंगारत्नमाला. २ अध्याय; खंड; प्रकरण. 'आपण रघूचे सर्ग वाचण्याऐवजीं स्वभाव शास्त्राचा अभ्यास केला असता तर बरें झालें असतें.' ३ स्वभाव. ४ त्याग. [सं. सृज्] **०बंध**-पु. खंडकाव्य; अनेक प्रकरणें असलेलें काव्य.

सर्ज—पु. शाल नांवाचें झाड. **०रस**-पु. शाल झाडाचा चीक.

सर्जा—सरजा पहा. १ एक दागिना; अलंकार; भूषण. 'सर्जे तोडर पांखरा सजहुमे कंडे पटे चागले.' -सारुह ३ ४४. २ सिंह. [फा. शर्झा=गर्जणारा, उग्र (सिंह)] **०राव, सर्जेराव**-पु. एक पदवी; किताब.

सर्जि, सर्जिका, सर्जिकाक्षार, सर्जिखार, सर्जेखार—पु. सज्जीखार; एक प्रकारचा खार. याचा साबणाप्रमाणें उपयोग करतात. **सर्जीभवन**-न. साबूमध्यें रूपांतर होणें.

सर्दी—स्त्री. कागद; कागदाचें पान. 'रामा, खोलींतील पातळ सर्दी फाडून एक तुकडा आण पाहूं.' -सोमणकृत खेडयांतील स्वभावचित्रें १५९.

सर्त—स्त्री. शर्त पहा. 'बडेखान पठाण भलामदै सर्तीनसी भांडला.।' -ऐपो ८०.

सर्द, सर्द, सर्दगर्मी, सर्दार, सर्दारी, सर्दी, सर्दी—सरद, सरदार, सरदी वगैरे पहा.

सर्दे—न. (गो.) खाजणांतील पावसाळी भाताचें पीक. 'वर्षाच्या कांठीं सर्दाचें व वायंगणाचें मिश्रण हजार भऱ्यांचें पीक देणारें भलें मोठें अफाट खाजण दिसलें.' -सह्याद्रीच्या पायथ्याशीं ९२. [सं. शरद]

सर्नाट—वि. (व.) सन्नाट; खूप जोराचा. **सर्नाटून**-क्रिवि. सन्नाटून; खूपजोरानें.

सर्प—पु. साप; नाग; सरपटणारा प्राणि. [सं. सृप्] **०कंकाळी**-स्त्री. एक वनस्पती. [सं.] **०टोळी**-स्त्री. सापटोळी; एक विषारी जनावर; हें झाडावर बसुन मनुष्यावर उडी मारतें. **०त्वचा**-स्त्री. सापाची कात; मेंग. **०दृष्टि-दंश**-स्त्रीपु. सापाचा दंश; साप चावणें. 'सर्पदृष्टि जालियावरी। तीन दिवसां उठवी।' -दा ९.८.७. **०मणि**-पु. सापाच्या डोक्यांत एक मणि असतो असा समज आहे तो. हा बिषमारक आहे अशी समजूत आहे. **०शीर्ष(हस्त)**-पु. (नृत्य) हाताचीं सर्व बोटें एकमेकांस जोडून अंगठा तर्जनीस जोडणें व सर्व बोटें उभीं करून थोडीं वाकवून हात उभा करणें. **०सत्र**-न. जनमेजयानें गेलेला सर्पांचा यज्ञ. **सर्पारी**-पु. नकुल; मुंगुस. **सर्पासन**-न. शलभासनाप्रमाणें जमीनीवर साफ निजून दोन्हीहात छातीचे बाजूला टेकलेले आहेत व डोकें वर केलें आहे असें आसन. -संयोग ३५३. **सर्पित (करण)**-न. (नृत्य) पाय अंचित करून मागचे बाजूस ठेवणें, हात रेचित करणें, डोकें एकदां या बाजूस व एकदां त्या बाजूस वळविणें. **सर्पीण**-स्त्री. १ सापाची मादी. २ घोडयास जीभ काढावयाची खोड. 'लगाम घेतां जीभ काढतो ती सर्पीण.' -अश्वप १.९५.

सर्पटणें, सर्पटयां—सरपटणें, सरपटयां पहा.

सर्पण—न. १ जळण; जळाऊ लांकडें. सरपण पहा. 'आंगें होउनि सत्तपोहुतवही तो सर्वदा सर्पण।' -मो अंबरीषाख्यान (नवनीत पृ. ३६०). [सं. श्रपण=शिजविणें]

सर्पळी—स्त्री. (गो.) सांखळी. [सर्प]

सर्पिल—वि. वाटोळी; चक्राकार; मळसुत्रासारखी. [सर्प]

सर्पोस, सर्फराजी, सर्फा, सर्फेवार, सर्बत—सरपोस, सरफराजी वगैरे पहा.

सर्बमोहर—वि. मोहरबंद; लाखबंद; सीलबंद. 'त्यांत कित्येक दफ्तरें सर्बमोहर व कित्येक बे मोहरेचीं याप्रमाणें लिहिलीं.' -रा ७; खलप २.९. [अर. सर्बमुहर्]

सर्बारी—पु. हमाल; भारवाहक; ओझेकरी. -राव्य ९.१०. [फा.]

सर्म—स्त्री. (गो.) बायकांची टोपी.

सर्यत—स्त्री. शर्थ; पराकाष्ठा. 'जे सावध होते परंतु सर्यत केली सरतासरती।' –ऐपो ३५८. [शर्त]

सर्व—वि. १ सगळा; सगळे भाग मिळून; सारी रास, संख्या, प्रमाण. २ प्रत्येकजण मिळून; सगळा गट; जमाव; समूह. ३ सगळा काल, अवधि, विस्तार वगैरे. ४ पूर्ण; संपूर्ण; अवघा: पुरता; परिपूर्ण; सबंध; न वगळतां पूर्णांश. [सं. सर्व; प्रा. सब्ब; सिं. सभु; पं. सभ; हि. सब. सं. षर्द्=जाणें] **०कर्ता**–वि. सगळें करणारा; उत्पत्तिकर्ता; सगळें बनविणारा; अवघ्याची रचना करणारा. **०काल**–क्रिवि. १ सगळा वेळभर; सर्व अवधि संपेपर्यंत; सर्व वेळीं; विवक्षित सगळा कालभर. २ सतत; नेहमीं; सर्वदा; सदोदित. **०कालीन**–वि. शाश्वत; सर्वकाल टिकणारें. **०खपी**–वि. १ ज्याच्या ठिकाणीं कोणत्याहि वस्तूचा उपयोगी अथवा निरुपयोगी, अवश्य अथवा अनवश्यक अशा सर्व वस्तूंचा खप होतो असा. २ ज्याला कोणतीहि, कसलीहि वस्तु चालते असा. ३ सर्वांकरितां खपणारा, काम करणारा; कोणासाठींहि परिश्रम करण्यास तयार असा. **०गत**–वि. सर्वव्यापक; सर्वव्यापी; सर्व ठिकाणीं ज्याचें अस्तित्व, वास्तव्य आहे असा. 'चैतन्य आहे सर्वगत। तें तत्त्वज्ञ संत। स्वीकारिती।' –ज्ञा २. १२६. **०गामी**–वि. सर्वव्यापक; सर्वत्र ज्याचें गमन आहे असा; सगळीकडे जाणारा. **०गुणसंपन्न**–वि. सगळ्या गुणांनीं युक्त; सर्व तऱ्हेनें पूर्ण; सर्व चांगल्या गुणांचें अधिष्ठान. **०जनीन**–वि. सार्वजनिक; सर्व लोकांसंबंधी. **०जाण**–वि. सर्वज्ञ; सगळें ज्ञान असणारा; सर्व जाणणारा. 'काय पूजातें मी नेणें। जाणावें जी सर्व जाणें।' –तुगा ११५८. **०जित**–वि. १ सर्व जिंकणारा; सर्वांचें दमन करणारा; सर्वांस ताब्यांत ठेवणारा. २ सर्वांहून श्रेष्ठ; वरिष्ठ. **०तः**–क्रिवि. १ सर्व दिशांनीं; सगळीकडे; सर्व बाजूंनीं; दशदिशां. २ सर्वत्र; पूर्णपणें; विश्वभर. **०तंत्रस्वतंत्र**–वि. अनिर्बंध; स्वैर. 'अशा अधांत्री व सर्वतंत्रस्वतंत्र लोकांनीं हिंदु महासभेच्या निर्णयाकडे पाहून नाकें मुरडावीं यांत आश्चर्य नाहीं.' –सासं २.१६४. **०तीर्थ**–पु. समुद्र; सागर. 'गंगा न सांडितां जैसा। सर्वतीर्थ सहवासा। वरपडा जाला।' –ज्ञा १८.९०९. **०तोभद्र**–पुन. १ देवता स्थापनेसाठीं एक विशिष्ट मंडल काढतात तें. २ चारी दिशांस द्वारें असलेला प्रासाद, राजवाडा, मंदिर. 'रेखिलीं परिकरें। सपुरें सर्वतोभद्रें।' –ऋ ७३. ३ सैन्यरचनेचा एक प्रकार; एक विशिष्ट व्यूह. ४ अनेक प्रश्नांस एकच उत्तर योग्य असतें असें कोडें, कूट. ५ एक प्रकारचें चित्रकाव्य; कोणत्याहि दिशेनें वाचलें तरी एकच प्रकारचा श्लोक व अर्थ येईल अशी रचना. **०तोमुख**–पु. एक सोमयाग, यज्ञ. –वि. सर्व बाजूंनीं तोंड असलेला; कोणत्याहि बाजूनें पाहिलें तरी समोर तोंड येईल असा (देवता, पाणी, आकाश, गोल). **०त्र**–क्रिवि. सर्व ठिकाणीं, स्थळीं, जागीं; सगळीकडे; सर्व दिशांस. 'ईश्वर सर्वत्र आहे.' –वि प्रत्येक; सगळे; सर्व. 'सर्वत्रांस दक्षिणा दिली.' **०था**–क्रिवि. सर्व बाजूंनीं; सर्व मार्गांनीं, दिशांनीं; सर्व उपायांनीं; पूर्णपणें; मुळींच; निःशेष; निश्चित; खचित; केव्हांहि. 'मज आपणपें सर्वथा नाहीं। मन बुद्धिठायीं। स्थिर नोहे।' –ज्ञा १.१९५. 'मना सर्वथा पापबुद्धी नको रे।' –राम **०थैव**–क्रिवि. केव्हांहि; सर्व प्रकारें, दिशांनीं, बाजूंनीं. **०दर्शी-द्रष्टा**–वि. सर्वसाक्षी; सर्व पाहणारा; ज्यास सगळें दिसतें असा. **०दा**–क्रिवि. नेहमीं; सतत; सर्वकाळीं. **०दुःखक्षय**–पु. सर्व दुःखांपासून मुक्तता; मोक्ष. **०धन**–न. (गणित) श्रेढींतील सर्व पदांची बेरीज. –छअं १७३. **०नाम**–न. (व्या.) स्वतः विशिष्टार्थद्योतक नसतां पूर्वापरसंबंधानें कोणत्याहि नामाबद्दल योजतां येतो असा शब्द. **०नियंता**–वि. सर्वांवर ताबा चालविणारा; सर्वांचें नियमन करणारा. **०न्यास**–पु. सर्वसंगपरित्याग; सर्वधन, कुटुंब, आप्तेष्ट, संसार वगैरे सर्व गोष्टी सोडून देणें; सर्व ऐहिक गोष्टी टाकून देणें, त्यांपासून अलिप्तता, मुक्तता. **०पाक**–पु. खीर; क्षीर. **०पित्री अमावास्या**–स्त्री. भाद्रपद महिन्यांतील अमावास्या (या दिवशीं सर्व पितरांचें श्राद्ध करितात यावरून). **०प्रायश्चित**–न. सर्व पातकांबद्दल एकाच वेळीं घ्यावयाचें प्रायश्चित्त; सर्व पापांचें परिमार्जन, क्षालन; सर्व दोषांपासून मुक्तता. 'सर्वप्रायश्चित्त घेण्याचा त्यांनीं जो निश्चय केला ...' –आगर ३.१३५. **०प्रिय**–वि. सर्वांचा आवडता; लोकप्रिय; विश्वमित्र. **०ब्रह्मी**–वि. सर्व विश्व ब्रह्मरूप आहे जसें केवळ तोंडानें बोलून एकंकार करणारा आचारभ्रष्ट. 'लेकुरें सर्वब्रह्मी झालीं.' –सप्र १९.४०. **०भक्ष-भक्षक-भोक्ता**–वि. वाटेल तें खाणारा; खाण्याच्या कामीं कोणताहि निर्बंध न पाळणारा; स्वच्छ अस्वच्छ, भक्ष्य, अभक्ष्य न पहातां अघोरीपणें खाणारा. अग्नि, शेळी, कावळा वगैरेसहि हा शब्द लावतात. **०भावें**–क्रिवि. काया-वाचा-मनें करून; सर्व भावयुक्त. 'तैसा स्त्रीदेहीं जो जीवें। पडोनिया सर्वभावें।' –ज्ञा १३.७९०. 'जगीं वंद्य तें सर्वभावें करावें' –राम **०भूतभूतांतर**–वि. सर्व वस्तूंच्या ठिकाणीं वास करणारा; सर्वव्यापी; विश्वव्यापी; विश्वव्यापक (ईश्वर). **०मय**–वि. सर्वव्यापी; सर्वगत (ईश्वर). **०मान्य**–वि. सर्वांस संमत, पसंत, कबूल. **०मान्य-मान्य इनाम**–न. सर्व कर माफ असलेलें इनाम; सर्वांना कबूल असें इनाम; गांवसंबंधी इनाम; याबद्दल सनद नसते. **०राष्ट्रीय कायदा**–पु. राष्ट्रांराष्ट्रांतील व्यवहार नियंत्रण करणारा नियम. **०रूप-रूपी**–वि. सर्वव्यापी; सर्वांचें स्वरूप आहे असा; विश्वरूपी (ईश्वर) 'अनादि अविकृतु। सर्वरूप।' –ज्ञा २.१५०. **०लिंगी**–

पु. कोणताहि विशिष्ट पंथ न अनुसरणारा बैरागी. **०वल्लभा**–स्त्री. वेश्या; वारांगना. **०विध**–क्रिवि. सर्वप्रकारें. **०वेत्ता–वेदी**–वि. सर्वज्ञ; सर्वसाक्षी; त्रिकालज्ञ. **०वेषी**–वि. बहुरूपी; अनेक प्रकारचे वेष धारण करणारा. **०व्यापक–व्यापी**–वि. सर्वत्र असणारा; विश्वव्यापी; सर्वत्र भासणारा **०व्रण**–पु. गळूं; करट. **०शः**–क्रिवि. सर्व दिशांनीं, बाजूंनीं, मार्गांनीं, रीतीनीं; पूर्णपणें; निखालस; दरोबस्त; निःशेष. **०शाक–ख**–स्त्री. १ अनेक प्रकारच्या भाज्या एकत्र करून केलेली भाजी. २ आलें. **०शास्ता**–वि. सर्वांवर सत्ता, अधिकार गाजविणारा. **०शोधी**–वि. सर्वांचें निरीक्षण करणारा; सर्व वस्तूंची परीक्षा घेणारा; जिज्ञासु; चिकित्सक; परीक्षक; शोंधक. **०संगपरित्याग**–पु. सर्वसंन्यास; सर्व ऐहिक वस्तूंचा त्याग; पूर्ण वैराग्य, विरक्ति. **०संग्रह**–पु. सर्व वस्तूंचा साठा, संचय; संकीर्ण, मिश्र संचय. **०सपाट**–क्रिवि. अभेद; सर्वत्र सम स्थिति; मोकळें. 'आत्मा नसतां सर्व सपाट चहूंकडे।' –दा १६.८.१०. **०संमत**–वि. सर्व मान्य; सर्वांस पसंत, कबूल असलेलें. **०समर्थ**–वि. सर्वशक्तिमान; सर्वसत्ताधारी; सर्वाधिकारी. **०सह**–वि. सर्व सहन करणारा; सर्व गोष्टींचा भार वाहणारा. **०सहवर्तमान**–वि. सर्वांसह; सर्वांस बरोबर घेतलेला; सर्वांनीं युक्त. **०साधन**–न. सर्व गोष्टींची सिद्धता; सर्व गोष्टी घडवून आणणें; सर्व कार्यें साधणें, करणें, बनाव बनविणें **०साधन–साधनी**–वि. सर्व गोष्टी साधणारा, सिद्ध करणारा, घडवून आणणारा. **०साधारण–सामान्य**–वि. सर्वांस लागू होणारा; सर्वांस सम असा; सर्वांचा समावेश करणारा. 'मला नाहीं तुमचे सर्वसामान्य सिद्धांत समजत.' –सुदे ३७. **०साक्षी**–वि. सर्व पाहणारा; सर्व भूतांच्या ठायीं असणारा; ज्यास सर्व दिसतें असा (ईश्वर). 'नसेन दिसलों कसा नयन सर्वसाक्षी रवि।' –केका ४. **०सिद्ध**–वि. सर्व परिपूर्ण; (सर्व गुणादिकांनीं युक्त; सर्व लक्षणांनीं युक्त; संपूर्ण; सर्वांग परिपूर्ण (ईश्वर). **०सिद्धि**–स्त्री. सर्व इच्छांची पूर्ति; सर्वकाम पूर्ति. **०सिद्धार्थ**–वि. सर्व इच्छापूर्ति झालेला; सर्व हेतु साध्य झालेला. **०सुखानंद**–वि. सर्व सुख व आनंद प्राप्त झालेला; सर्व सुखांचा आनंद ज्याच्या ठिकाणीं आहे असा (ईश्वर). **०सोंवळा**–वि. १नेहमींचा शुद्ध, सोंवळा, पवित्र. जन्मसोंवळा(एखादा मनुष्य स्नान न करतांच सोंवळें नेसला असतां त्यास उपरोधिकपणें म्हणतात). २ नेहमींच पवित्र, शुद्ध, सोंवळें असलेलें (रेशमी वस्त्र, धाबळी वगैरे) (हीं कधीं न धुतलीं तरी सोंवळीं मानण्यांत येतात यावरून). **०स्पर्शी**–वि. व्यापक; सर्वांचा समावेशक. 'एकंदर ठराव सर्वस्पर्शी समाधानकारक केला.' –केले १.३०९. **०स्व**–न. १ सर्व धन; सर्वसंपत्ति; सर्व मालमत्ता, चीजवस्त वगैरे; स्वतःच्या मालकीचें सर्व. 'सर्वस्व हारवावें की जिकावें न भीरु तूं पण हो.' –मोसभा ६.९५ २ तन, मन, धन; 'तैसें सर्वस्वें कर्म अनुष्ठी। परि फळ न सुये दिठी।' –ज्ञा १८.५९० मी सर्वस्वयां तैसें। सुभटांसी।' –ज्ञा १.१११. ३ तत्त्वांश; सार; **०स्वदंड**–पु. सर्व संपत्ति जप्त करणें; सर्व मालमत्ता खालसा करणें; सर्व हिरावून घेणें. **०स्वहर–हर्ता–हारक–हारी**–पु. सर्व धन हरण करणारा, घेणारा, लुबाडणारा. **०स्वहरण–हार**–नपु. सर्व संपत्तीची लूट; सर्व धन हिरावून घेणें; सर्व नाश. **०स्वामी**–पु १ सर्व विश्वाचा प्रभू; सर्व सत्ताधारी, जगत्पति; सार्वभौम. २ सर्वस्वाचा मालक, धनि; सर्व वस्तूंचा धनि. **०स्वीं–स्वें**–क्रिवि. १ तनमनधनेंकरून; सर्व वस्तुमात्रासह. २ पूर्णपणें; पुरतेपणीं; एकंदर; अगदीं; सर्व प्रकारें; निखालस. उदा० सर्वस्वीं सोदा, लुच्चा, लबाड, हरामी वगैरे. **०हर–हर्ता–हारक–हारी**–वि. सर्व हरण करणारा; लुबाडणारा. **०हरण**–न. संपूर्ण नागवणूक; नाडणूक. **०ज्ञ**–वि. सर्व जाणणारा; त्रिकालज्ञ; पूर्ण ज्ञानी; सर्वसाक्षी; सर्व वेत्ता. 'तुम्हां सर्वज्ञांच्या समाजीं। देयावें अवधान हे माझी। विनवणी सलगीची।' –ज्ञा ९.२. **सर्वंकष**–वि. सर्वांस कसोटीस लावणारा. **सर्वांग**–न. १ सर्व शरीर; देह; शरीराचे सर्व अवयव. २ सांगवेद; षडंगसहित वेद. **सर्वांगरोग–वात**–पु. पक्षघाताप्रमाणें सर्व शरीरास वातविकार होतो तो. –योर १.७५५. **सर्वांगासन**–न. साफ उतांणें निजून हात जमीनीवर टेकणें व त्यांवर जोर घेऊन खांद्यापर्यंतचा भाग व पाय वर उचलून ताठ करून स्थिर होणें. –संयो ३५०. **सर्वांगीण**–वि. सर्व शरीर व्यापणारा; सर्व अंगांसंबंधीं. **सर्वांगें**–क्रिवि. एकचित्तानें; एकाग्रतेनें. 'जो सर्वांगें श्रोता।' –दा ७.१.२८. **सर्वांची मेहुणी**–स्त्री. १ मुरळी; भावीण. २ वेडसर स्त्री. **सर्वांतर**–वि. सर्वांच्या अंतःकरणांत राहणारा. 'मज सर्वांतरानें कल्पिती। अरि मित्र गा।' –ज्ञा ९.१६६. **सर्वांतोंडीं**–क्रिवि. सर्वांमुखीं; प्रत्येकाच्या मुखांत; ज्याच्या त्याच्या तोंडांतून. **सर्वात्मना**–क्रिवि. १ मनोभावें करून; अंतःकरणपूर्वक; तनमनधनें करून. 'धन कामासि निजमुख। सर्वात्मना नाहीं देख।' –एभा २३.४३५. २ पूर्णपणें; सर्वस्वी; निखालस. 'हा सर्वात्मना लबाड आहे.' ३ मुळींच; अगदीं; केव्हांहि; कोणत्याहि तऱ्हेनें; साफ (नाहीं–निषेधार्थक शब्दाबरोबर उपयोग). 'मजपासून ही गोष्ट सर्वात्मना घडावयाची नाहीं.' –रा ३.३०१. **सर्वात्मा**–पु. सर्व प्राणिमात्राच्या ठिकाणीं असलेला जीवात्मा, चैतन्य, (ईश्वर). **सर्वाथाई**–क्रिवि. सर्वथा (अपभ्रंश). 'अशा पुण्यरूपें नृप न सोडी भोग सर्वाथाई।' –ऐपो ४०९. **सर्वाधिकार**–पु. पूर्ण सत्ता; सर्वांवर सत्ता, ताबा, वर्चस्व. **सर्वाधिकारी**–पु. प्रमुख; मुख्य; सर्वसत्ताधीश; (म्हैसूरच्या राजाचा हैदरपूर्वी मुख्य प्रधान). **सर्वाधीत**–

वि. सर्व अध्ययन झालेला; सर्व विषय शिकलेला; निष्णात. –शिदि ११८. **सर्वानुभूति**–स्त्री. सर्व जगाचा, अनेक प्रकारचा, अनेक गोष्टींचा अनुभव. **सर्वान्नभक्षक–भक्षी–भोजी**–वि. १ वाटेल तें खाणारा; सर्व प्रकारचें अन्न ज्यास चालतें असा. २ अघाशी; अघोरी. **सर्वाबद्ध**–वि. सर्व तऱ्हेनें स्वतंत्र; मोकाट; स्वैर; पूर्ण स्वतंत्र; असंबद्ध; नियमांनीं बद्ध नव्हे असें; विसंगत; (मनुष्य, चाल, वागणूक, कार्य, काव्य, भाषण वगैरे). **सर्वार्थी**–वि. सर्व वस्तूंची इच्छा करणारा; लोभी; महत्त्वाकांक्षी वगैरे. **सर्वार्थीं, सर्वार्थें**–क्रिवि. सर्व प्रकारानें; सर्वस्वी; हरतऱ्हेनें; प्रत्येक दृष्टीनें 'वैश्य व्यवसायांत जाण। दिसतो निपुण सर्वार्थी।' **सर्वाभ्य**–वि.क्रिवि. सर्व प्रकारें; सर्व तऱ्हेचा; सर्व कामांतील. 'सर्वाभ्य कारभारी.' –चित्र २. **सर्वारिष्ट**–न. सर्व जगावरील सामान्य संकट; सर्वसामान्य पीडा; अनेक लोकांस बाधक किंवा अनेक प्रकारचें संकट, पीडा, बाधा. **सर्वांशिक, सर्वांशी**–वि. सर्व भागांशीं संबंध असलेलें; एकदेशीयाच्या उलट. **सर्वांशीं**–क्रिवि. पूर्णपणें; सर्व प्रकारें; सर्व तऱ्हेनें. **सर्वांशीं संपूर्ण, सर्वावयवीं संपूर्ण**–वि. सर्व विभागांनीं, अवयवांनीं युक्त; परिपूर्ण; सबंध. **सर्वाशुद्ध**–वि. अनेक अशुद्धें असलेला; सर्व प्रकारें दोषयुक्त; चुक्यांनीं भरलेला (ग्रंथ वगैरे). **सर्वीय**–वि. सर्वांचा; सर्वांशीं संबंध असलेला; सगळ्यांचा; विश्वाचा; जागतिक. **सर्वें**–नभव. सगळीं. 'दुःख भोगिलें आपुलें जीवें। तेथें कैंचि होतीं सर्वें।' –दा ३.१०.४४. **सर्वेश, सर्वेश्वर**–पु. १ परमेश्वर; जगदीश. 'तया स्वधर्मी सर्वेश्वरीं। न भजेल जो।' –ज्ञा ३.१०४. २ सम्राट; सार्वभौम; सर्वाधीश. **सर्वेश्वर(री)वाद**–पु. विश्वांत सर्वत्र परमेश्वर भरलेला आहे असें मत. (इं.) पॅन थीइझम्. **सर्वैं**–क्रिवि. सर्वहि; पूर्णपणें; सर्वस्वीं. 'अकस्मात तै राज्य सर्वैं बुडालें।' –राम. **सर्वोत्कर्ष**–वि. अत्यंत महत्त्वाचें; सर्वोत्तम. 'सांप्रत हे येश आगाध श्रीनें आपले पदरीं सर्वोत्कर्ष घातलें.' –पेद ३.१८१. **सर्वोत्कृष्ट**–वि. १ अत्युत्तम; सर्वोत्तम; सर्वश्रेष्ठ (ईश्वर). २ सत्य; न्याय्य; रास्त. **सर्वोपकार**–पु. सर्वांचें कल्याण; सर्वांवर केलेले उपकार; जगदुपकार. **सर्वोपकारी**–वि. जगास कल्याणकारक: सर्वांस उपकारक, लाभदायक. **सर्वोपयोगी**–वि. सर्व कार्यांस उपयुक्त; कोणत्याहि कामास उपयोगी. **सर्वोपरी**–क्रिवि. सर्व प्रकारांनीं; सर्व रीतीनीं; सर्व पद्धतीनीं; सर्व तऱ्हांनीं. [सर्व + परी] 'समर्थ जाणोनि सर्वोपरी।' –मुआदि ३३.२ **सर्वोपरी**–वि. सर्वश्रेष्ठ; वरिष्ठ; उत्कृष्ट; उत्तम. 'शिखराथिलियां सर्वोपरी। मेरु तो मी।' –ज्ञा १०.२२७. –क्रिवि. श्रेष्ठपणें; वरिष्ठपणें; उत्तम रीतीनें. [सर्व + उपरि] **सर्वौषधि**–स्त्री. शतावरी; एक वनस्पति. **सर्व्यांस–ला**–सनाम द्वि. (अशिष्ट) सर्वांना. 'तो सर्व्यांला मुजरे करतो।' –ऐपो ४३१.

सर्वेणें—सरावणें पहा. 'नित्य हें जेवितां तेज प्रकाशत। सर्वेति गोमटीं ब्रह्मद्वारें।' –ज्ञागाथा १५९.

सर्वेदा—पु. एक भिक्षेकरी ज्योतिषि जात; दाकोचा; डाकोचा सरवदा पहा. 'दिवटा सर्वेदा भाकून गेला।' –दा ३.७.५९.

सर्वेरी—स्त्री. सरदारी. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

सर्वेली—स्त्री. चिलखताचें शिरस्त्राण; शिरश्चर्म. –राज्य ५.१७.

सर्वा—पु. (व.) सरवा पहा. अखेरचा वेंचा; मुख्य पीक, फळफळावळ वगैरे काढून घेतल्यावर शेतांत किंवा झाडावर जो अवशेष राहतो तो. –गांगा १००. [सरणें=संपणें]

सर्षप—पु. १ सरसु; शिरस; एक प्रकारची मोहरी; राई. 'पतिपदभजनें सर्षप मानी भवदुःखाभिध शैला।' –मोअंबरीष आख्यान (नवनीत पृ.३७४). २ वजन करण्याचें सुक्ष्म प्रमाण; मोहरीइतकें वजन.

सऱ्हास—क्रिवि. सररास, सरिरास पहा. सर्वत्र. 'सऱ्हास जनतेनें शुद्ध पंचांग चालू करावें.' –के १८.८.३६.

सल—नपु. १ शल्य; शस्त्रादिकाचें टोंक; कांटा; मांसांत रुतलेला अणकुचीदार पदार्थ; कूस. 'सल सिलका आणि सरातें।' –दा ३ ७.४. २ पोटांत न वाढतां राहिलेला गर्भ; गर्भाशयांत राहिलेला मृत गर्भ. 'सल आडवें गर्भपात।' –दा ३.६.४७. ३ (ल.) मनांत खुपत असलेलें अपमान वगैरेचें दुःख; दुःखकारक स्मृति; त्रासदायक गोष्ट; पीडाकारक निमित्त. 'सलें गेलीं चित्तीं भय दशमुखाच्याहि धसलें।' –मोरामायणें १.४१०. ४ वठलेलें झाड, शाखा. 'विसर विजती सलें। सलतीं तियें।' –ज्ञा १६.१४६. ५ बीं पेरलें असतां उगवलेला कोंवळा अंकुर हा विषारी असतो व जनावरानें खाल्ला असतां त्यास रोग होतो. किरळ पहा. 'सल खाऊन गुरें मेली.' ६ साल; त्वचा. 'कलियुगांत कोरडीं। चहुंयुगांचीं सलें सांडी।' –ज्ञा १५.१२९. ७ –स्त्री. (कों.) उसण; सलक. [सं. शल्य; प्रा. साल] **सल चढणें**–विषाद वाटणें. **सलीं लागणें**–पोटांत सल वाढल्यामुळें झिजून आजारी पडणें. **सलणें**–अक्रि. १ बोंचणें; टोंचणें; खुपणें. 'आंगीं देहाची लुती जिती। जेणें जाली तें चित्तीं। सलेना जया।' –ज्ञा १३.७३१. २ (ल.) न खपणें; सहन न होणें; डोळ्यांत खुपणें; मनाला टोंचून, लागून राहणें; रुखरुख लागणें (केलेल्या चुकीची, दोषाची). 'आचरणें खोटीं। अपराधाची केलीं सलताही पोटीं।' –तुगा १८८५.

सल—पु. कमरपट्टा; तरवारीच्या म्यानाची दोरी; कातड्याचा दोरा; वादी. –बदलापूर १८७. [फा. हिं. सल्लु]

सलक—स्त्री. उसण; शिलका; शिनक; कळ.

सलक-ख—स्त्री. १ सरबत्ती; फैर; शिलग (तोफा, बंदुका वगैरेची). 'जवळ येतांच तोफांची व गाडदी यांची सलक केली.' –ख ७ ३४८०. २ पावसाची जोराची सर. [अर. शल्क]

सलकडें—न. १ सल अथवा उसण उतरावी म्हणून धातूचें केलेलें मंतरलेलें कडें. २ पुरुषाच्या हातांत घालावयाचें सोन्याचें कडें. [सल+कडें]

सलकी—स्त्री. (का.) खोरें; फावडें.

सलग-गी—स्त्री. १ दाट मैत्री; संगति; विशेष परिचय. २ एकसारखी रांग; ओळ. 'घरांची सलग लागत गेली.' [सं. संलग्न]

सलग, सलंग—वि. एकसंधि; बिनजोड; बिनसांध्याचा; अखंड. 'सुंदरपणाचा सलंग बाण असावा लागतो.' –भाव २३.

सलगम—न. तांबडा मुळा; मुळ्याच्या आकाराचें तांबड्या रंगाचें एक भाजीचें मूळ.

सलगी—स्त्री. सलग पहा. १ मैत्री; दाट परिचय. 'मग अर्जुन म्हणे सलगी। देवा इयें संतजिन्हें हन आंगीं।' –ज्ञा ६.१३९. २ लडिवाळपणा. 'पायाशीं देवा सलगी केली।' –तुगा २६८. **सलगीचा**–दाट मैत्री असलेला; विशेष परिचित; घरोब्याचा.

सलग्न, सल्लग्न, संलग्न—वि. लागलेलें; अखंड; चिकटलेलें. 'अति सलग्न अवस्था तुर्या।' –दा १.३ ८. [सं. सम्+लग्न]

सलंछ—वि. लांछनास्पद; लज्जास्पद; लाजिरवाणें. 'जरी आवडी आथी साच। तरी जीवितहि सलंछ।' –ज्ञा १८.६४२. [सं. स+लांछना]

सलज्ज—वि. लज्जायुक्त; लज्जाशील; विनयशील; नम्र; लाजरा. [सं. स+लज्ज्=लाजणें]

सलतन, सलतनत, सलतान, सल्तना—स्त्री.स्त्री.नपु. १ चतुरंग सैन्य; सर्व साधनासह सैन्य. 'बुणगे व सलतनत दोन कोशावर उतरले.' –ख ९.४७९५. 'महाडिक सर्व सलतनत घेऊन येऊन महाराजांचें दर्शन घेऊन. ...'–थोरलेराजाराम चरित्र ४०. २ राज्य; राजसत्ता; पातशाही; सुलतानी. 'सारी सलतनत मराठियांच्या घरांत घातली.' –पेद २१.९६. ३ पसारा; सामान सुमान; रगाडा; बुणगें. 'बुणग्याचें सलतान भारी, आटोपून राहावयाची वरचेवर ताकद करितो.' –पेद १.४०. [अर. सलतनत, सलतान] **सलत(ता)नगर**-पु. चामडें कमविणारी जात; चर्मकार. 'जीनगर सलतानगर चर्मक। डोहर भाट बुरुड रजक।' –स्त्रादि ६.५.३८.

सलद—पुन. संदूक; पेटी; तिजोरी; शवपेटिका. 'फोडलीं सलदें मोडलीं कुलुपें आंत तुरे मोत्याचे रुपये पोशाग सोन।' –ऐपो ३३८.

सलद, सलदें, सळदें—न. (कों.) ताटी; शिरीं वगैरेंची ताटी; काटक्यांचें झडप (कुंपणाकरितां, फाटकाकरितां केलेलें).

सलबतखाना—पु. सरबतखाना पहा.

सलम—वि. १ पूर्ण; सगळें; अखंड; बिनजोड; निर्दोष. २ ढिला; सैल; शिथिल. [अर. सलम]

सलमा—पु. १ मखमल; उंची कापड. २ मऊ जरतार. 'मखमली सलम्याचें काम केलेला लोडाचा जोड.'–ऐरापुप्र १२. ६४८. [अर. सलीमी]

सलवडी—स्त्री. एक खेळ.

सलह, सला, सल्ला-ह्—पुस्त्री. १ समेट; संधि; तह; एकोपा. 'आजवर चालत आला सला।' –सला ३. २ उपदेश; मसलत; विचार; हितवाद. 'पुरंदरास तीन हजारांनिशीं रवाना करणें सला नाहीं.' –रा १०.७६. 'हे सलाह, उत्तम लिहिली.' –वाडदुवा ५०८२. –क्रिवि. बरें तर; तसें होऊं द्या; ठीक. 'सला, तुमचें का होईना.' [अर. सलाह्] **०अंदीस**–पु. उत्तम विचार करणारा. **०ऐन**-स्त्री. योग्य व इष्ट गोष्ट; ऐनसलाह्. 'नवाब साहेब खेमेदाखल जाले हे सलाह ऐन पडली.' –रा १९.१०४. **०कार-गार**–पु. सल्लागार; मसलत देणारा; दिलाची गोष्ट सांगणारा. –जोरा २९. **०तदबीर**-स्त्री. सल्लामसलत. 'जें होणें तें तर्फेनच्या इतल्यानें व सलाहूतद्बिरीनें व्हावें.' –रा १०.१६७. **०दौलत**–वि. राज्यास इष्ट; दौलतीस हितावह. 'दोघेहि फंदी व मकरी त्यांची उपेक्षा करणें सलाहदौलत नाहीं.' –रा १९.१००. **०नेक**–वि. हितावह; इष्ट; उपयुक्त; योग्य. 'सलाहनेक असेल त्याची आपण आज्ञा करावी.' –रा ५.२०५. **०मामला**–पु. सलामसलत; तहाची वाटाघाट. 'लढाई करावी, सल्ल्यामामल्याची गोष्ट करावयाची नाहीं.'–ख ४४१२. **०वक्त**–वि. समयोचित; प्रसंगास योग्य. 'आतां रहावें हें सलाहवक्त नाहीं.' –खरे ८.४३५१. **०सैल**–पु. फेरफटका; प्रवास वगैरे; मुशाफरी; स्वारी. 'तो दूर देश बंगाल मुलुख तेलंग गेलो सलासैल आलो करून।' –पला ४.१८. [सला+सहल]

सला, सल्ला—पु. बोटांतील वेढें, वळें; आंगठी.

सला—वि. (सांकेतिक भाजीबाजार) दहा.

सलाट—वि. भरपूर; लयलूट; समृद्ध. 'नारंगी सलाट लागल्या। डाळिंबी सुफल चांगल्या।' –प्रला १५४.

सलातीन—पुअव. राजपुत्र. 'पातशाही सलातीन आहेत त्यास उपोषणें पडतात.' –रा १०.२७४. [अर. सुलतानचें अनेक वचन]

संलाप—पु. भाषण; संभाषण; संवाद. [सं.]

सलाबत—स्त्री. १ छाप; वचक; दरारा; धाक; धास्ती; मजबुती; जरब; 'दत्ताजी शिंदे यांची दुराणीस सलाबत होती.' –भाब ६२. २ वर्चस्व; प्राबल्य; उत्कर्ष; दैवानुकूल्य. –वि. मजबूत; सुरक्षित. 'तो दुर्ग असाध्य सलाबत.' –भाब ३. [अर. सलाबत्] **०कुचा**–पु. एक प्रकारचा चर, खंदक. 'सलाबत कुचे खणावयास बेलदार लाविले आहेत.' –पेद १०.४३. **०पणा**–पु. १ हुकमत; वर्चस्व; छाप पाडण्याचा गुण. २ उत्कर्ष; भरभराट; यशस्विता; सुदैवीपणा.

सलाम—पु. मुसलमान लोकांत नमस्कार, रामराम या अर्थी अभिवादनार्थ योजतात तो शब्द. 'सलाम् अलय् कुम्.' =तुम्हांस शांति असो. [अर. सलाम्]. **०बादज सलाम**–उद्गा. अनेक नमस्कार; वन्दनापासुन वंदन. **सलामत**–क्रिवि. शांततेनें; सुखरूपपणें; सुरक्षितपणें –स्त्री. सुरक्षितपणा; 'श्रीमंत साहेबांस सलामत असावी म्हणजे बाकी फिकीर करीत नाहीं' –खरे ६.३१७७. **म्ह०** १ शीर सलामत तो पगडी पचास. २ कीरमोर खाई तारूं सलामत जाइ. **०बेसलामत**–वि.क्रिवि. विशेष सुरक्षित; सुखरूप 'ईश्वर त्यांस सलामत बेसलामत राखो.' –रा १२.३४. **सलामालकी**–स्त्री. १ औपचारिक परिचय; नमस्कार चमत्काराइतकी ओळख; साधारण ओळख; सुमाराचा सख्यभाव. २ नमस्कार चमत्कार; कुशल प्रश्न; रामरामी. **सलामी**–स्त्री. १ नमस्कार चमत्कार; रामरामी; परस्पर कुशल प्रश्न. २ साधारण ओळख; नमस्कारापुरती ओळख. ३ नाममात्र कर; सलाम करण्यापुरता कर, धारा, वसुल; मुजरा घेण्याइतका कर. ४ प्रथम सामना. ५ मेटीच्या वेळचा बहुमान; 'गायकवाड सरकारांस एकवीस तोफांची सलामी आहे.' ६ कुस्ती खेळतांना, दांडपट्टा वगैरे खेळतांना प्रथम मंगलार्थ करावयाचा हात. –वि. खालीं तोंड केलेली (तोफ); (यावरून) वांकलेली, कललेली (भिंत वगैरे). **सलामीचा हात**–सलामी अर्थ ६ पहा.

सलावनी—स्त्री. (व). पुटकुळी; लहान फोड. [सलणें]

सलास—वि. तीन. [अर.]

सलासीन, सल्लासीन, सल्लासैन—वि. तीस. [अर.]

सलिता-दा—पु. उंटावरची गोणी; उंटाचें ओझ्याचें खोगीर; उंटावरील ओझ्याची पिशवी; भारवेष्टन. 'उंटाचे सलिते शिवावयाबद्दल सुतळी.' –वाडबाबा ३.१६. 'दोर ललिते सहित कतारा त्या उंटाच्या तरारल्या।' –होला १५२. [हिं. शलिता]

सलिल—न. पाणी; जल; उदक. 'सलिलीं पय जैसें। एक होऊनि मीनलें असे।' –ज्ञा २.१२७. [सं.] **०राशी**–पु. समुद्र.

सलीद—वि, (व.) पातळ; सईल. 'सलीदसें पीठ भिजव.' [सं. शिथिल]

सलीपा—पु. (नाविक. होटकरी). गलबतांतील पाणी (घमत) बाहेर उपसून टाकण्यासाठीं केलेली पेटीसारखी जागा.

सलील—वि. खेळकर; गंमती; चेष्टेखोर. [सं. स+लीला]

सलील—वि. सोपें; सुलभ. [अर.]

सलींव— वि. सैलसर; ढिलें; शिथिल.

सलीस—वि. हलका; बेताचा; सहज सोसण्यासारखा, झेपण्यासारखा, पेलण्यासारखा. २ सोपा; सुलभ. [अर. सलीस]

सलूक-ख, सलोक-ख, सलुका-खा, सलोका-खा–पु. १ सभेट; मैत्री; सख्य; सरळ भाव. २ तह; शांतता; युद्ध तहकुबी. 'मोंगलाचा तूर्तच सलुका जाला.' –वाडबाबा ३.६५ 'नजीबखान रोहिल्यांचें हातें सलुका करून' –रा ६.३३० [अर. सुलुक्] **सलुकी-खी**–वि. शांततापप्रिय. 'नारो आपाजी शहाणे माणूस सलुखी, म्हणून त्यांणीं हें कार्य केलें.' –ख १.४५१.

सलून—पुन. १ आगगाडीचा मोठा डबा. 'दुसरा सलुन पाठविला महाराजा कारण।'–गापो २६. २ हजामतीचें दुकान [इं. सलून].

सलेप—वि. सदोष; मलिन; विकृत; बिघडलेला. 'आमुचियाचि दिढी सलेपा। जे सामान्यत्वें देखती।' –ज्ञा ११.२९१. [सं. स+लेप]

सलो—पु. द्वेष; छळ. [सं. छल]

सलोकता—स्त्री. चतुर्विध मुक्तींतील एक मुक्ति; देवलोकीं वास्तव्य. 'लोकीं रहावें ते सलोकता'। –दा ४.१०.२४. [सं.]

सलोखा-गा–पु. सलूक पहा.

सल्ल—न. सल पहा. 'तें जीवित सल्ल मीं मानी। पळपत विरहाग्नी।' –ऋ ६५. [सं. शल्य]

सल्लग्न—धावि. सलग्न पहा.

सल्ला—पुस्त्री. सला पहा. १ समेट; तह; युद्धतहकुबी. 'सल्ला ममता राजयांशीं करून...' –चित्र ७९. २ उपदेश; हितवाद; मसलत. 'सल्ला ऐकेना झाला. बिघोड।–ऐपो १२६. –क्रिवि. बरें तर. [अर. सलाह्] **०गार**–वि. हितवाद सांगणारा; मंत्री; सचिव. **०गारमंडळ**–न. सल्ला देणारी मंडळी. **०मसलत**–स्त्री. विचारविनिमय; खलबत; हितवाद; उपदेश. (क्रि० देणें; सांगणें; शिकवणें).

सल्लास—वि. तीन. [अर. सलास्] **सल्लासीन-सलासैन**–वि. तीस. अरबी वर्षगणनेंत योजतात.

सव—पु. ऋतु; यज्ञ; याग. [सं.] **सवांग**–वि. यज्ञांगभूत; यज्ञाचे उपयोगी. 'शुद्ध सवांग कुशनलद, परि उपभोगोचितत्व नलदासी।' –मोवन ४.७५.

सव—स्त्री. (अप.) चव; रुचि; स्वाद. चव पहा.

सव—स्त्री. उत्तरदिशा. [सं. सव्य=डावा] **सवचा सवेचा**–वि. उत्तरेकडील; उत्तरदिशेचा.

सवई, संवई, सवंय—स्त्री. १ अभ्यास; परिपाठ; राबता २ आसक्ति; चट; लालसा. ३ तयारी; लायकी; नैपुण्य; प्रावीण्य. (क्रि० पडणें; लागणें; पाडणें; लावणें). [सं. समय; सव्य; पु= आनंद होणें]

सवकणें, संवकणें, सवकावणें—अक्रि. गोडी लागणें; चट लागणें; संवय होणें; आसक्ति उत्पन्न होणें; अभ्यास होणें; राबता पडणें.

सवका—वि. (व.) संपूर्ण; पुरा. 'सवका रुपया झाला.' [सं. सर्व!]

सवखण—वि. (व.) सबंध; संपूर्ण. 'सवखण पोळी वाढ.' 'सवखण जागा सांपडली.'

सवंग—वि. स्वस्त; अल्पमोली; थोडया किंमतीचें. 'सवंग झालें सवंग झालें। घरा आलें बंदरींचें।' –तुगा ३६४६. 'तयाचें वाक्य सवंग। केलें मज व्यासें।' –ज्ञा १८.१६१०. [सं. समर्घ] **म्ह**० सवंग सवदा हगवण लावी. **सवंगणें**–अक्रि. स्वस्त होणें. **सवंगाई**–स्त्री. स्वस्ताई. 'तांदूळ कमोदी तीस बत्तीस शेर याप्रमाणें सवंगाई त्यांजकडे होती.' –भाब ५६.

सवंगडी–डा संवगडी—पु. खेळगडी; सोबती; सहचर; सांगाती. 'तो मदनाचा जाण सवंगडा.' –कथा १.३.६७. 'लाविलें पिसें संवगडियां।' –तुगा ३६२. [सर्वे+गडी]

संवगण–णी, संवगणणी–णें—स्त्री. पिकाची कापणी, काढणी; लाणी. सोंगणी पहा. 'न पेरितां शेती जे कां संवगणिया जाती।' –अमृ ६.५८. 'एकलें तम करी। संवगणी।' –ज्ञा १३ ३८. **संवगणें, संवगंणें**–उक्रि. पिकाची कापणी करणें; शेतांतून पीक काढून आणून सांठवणें. [सं. सम्+गृह्]

सवघड—वि. सोपें; सहज होण्यासारखें; सुलभ; सुसाध्य; अवघड नव्हे तें. [सं. सु+घट्]

सवच, संवंच—क्रिवि. सवेंच; ताबडतोब; लागलीच.

संवचोर—वि. दिसावयास साव परंतु चोर; सभ्य दिसणारा चोर; सावचोर. 'परी तो संवचोराचा सांगातु। जैसा नावेक स्वस्थु।' –ज्ञा ३.२११. 'संवचोर लागले आंगेसीं। इंद्रियें पै।' –भाए ५०६. [सर्वे+चोर; साव+चोर]

संवछरे—(अप.) संवत्सरे. संवत्सर पहा.

सवड, संवड—स्त्री. १ फुरसत; मोकळा वेळ; मोकळीक. 'मला येण्यास कामांतून सवड झाली तर येईन.' २ अवकाश; मोकळी जागा; रिक्त स्थान. 'चक्रधारेचिया सवडी। माजी चंचरला तांतडी।' –मुआदि ६ ८०. 'एक मनुष्य बसावयास देखील सवड नाहीं.' ३ जागा; स्थल; छिद्र; संधि; कूस; फट. 'धन्याची आज्ञा झाल्यास येईन अशी नाहीं म्हणावयास सवड ठेव.' ४ (सढळपणें) जागा; प्रदेश; क्षेत्र; बाजू. 'निज वृत्ति काढी। सवें माया तोडी। इंद्रिया सवडीं। लपूं नको।' ५ (–स्त्री. सांकेतिक) सल. [सं. सु+वेला] **सवड, सवडे, सवडथा**–शअ. (राजा.) समोर; पुढें; समक्ष. –क्रिवि. १ रुबरू; तोंडासमोर; समक्ष; अपरोक्ष. २ (व.) ताबडतोब; लागलीच; तेव्हांच. **सवडणें, सवणणें**–उक्रि. १ उरकणें; करून टाकणें; आटोपणें (कामधाम); जमविणें. २ येणें; पडणें. 'आंतुची परी बाहेर सवडें।' –अमृ ७.११६. **सवडी**–स्त्री. शेवट; अंत. 'म्हणोनि तृप्तीची सवडी। बोलतां न पडे।' –ज्ञा १०.६०.

संवणें—न. (गो.) पांखरूं. 'संवणेआं पाखरुवांचा स्वरु। पुरवला कर्णी।' –ख्रिपु १.१७.४०. [स्वन?] **सवणीं पडप**–(गो.) पांखरांची किलबिल होणें.

सवणें—उक्रि. (कु.) सवाणणें पहा. देणें; पडणें, 'शिव्या सवणें.' –शिव्या देणें. [सं. सु; स्नु]

सवत–ती—स्त्री. १ सपत्नी; एकाच नवऱ्याची दुसरी बायको. २ (ल.) प्रतिस्पर्धी. 'वेदातें म्हणे मज हे। सवती जाली।' –ज्ञा १६ २३५. [सं.सपत्नी; प्रा. सवत्ती; हिं. सौती] **०मत्सर, सवतीमत्सर**–पु. १ एकाच नवऱ्याच्या दोन बायका असतां त्यांस परस्परांबद्दल वाटणारा हेवा; द्वेष. 'म्हणे रावणपत्न्यांनीं मारली। सवती मत्सर करोनियां।' २ (सामान्यतः) स्पर्धा; हेवा; मत्सर (दोन अनुयायी, सेवक, भृत्य वगैरे मधील). **सवतवळा**–पु. सवतीसवती; एका नवऱ्याच्या अनेक बायका समुच्चयानें. **सवतळा–सवताळा**–पु. १ एकाच स्त्रीशीं लग्न करूं इच्छिणारे दोन अथवा अधिक गृहस्थ परस्पर. २ जार; यार; प्रियकर. (गो.) सवतो. **सवतीचें भांडण**–न. एक मुलींचा खेळ. –मखेपु २९२.

सवतवणी माघवणी—न. पावसाची लहानशी सर; पावसाचा शिंतोडा; भुरभुर. [सटवणी+माघवणी]

सवता—वि. वेगळा; निराळा; अलग; तुटक; स्वतंत्र. 'तेनी धरला सवता घोर।' –ऐपो ३५२. 'मी एकाकी लहान परि सवतें।' –मोविराट ३.७. 'करावें आपणा सवतें।' –रास ४.६. 'तें आतांचि अवघें सवतें केलें।' –ज्ञा १३.५८२. [सं. स्वतः]

सवतां—क्रिवि. स्वतः; खुद्द; आपणच. [सं. स्वतः]

संवतुकी—वि. सारख्या वजनाचें; समतोल. 'संवतुकी कांटाळें। माझें जालें।' –ज्ञा १४.५१. [सम+तुक]

संवत्—पु. १ वर्ष; साल; अब्द. २ विक्रमादित्य राजानें स्थापन केलेला शक. हा नर्मदेच्या उत्तरेस चालतो. [सं.]

संवत्सर—पु. साठ वर्षांच्या कालचक्रांतील वर्षास संज्ञा. या साठ वर्षांचीं नांवें:–प्रभव, विभव, शुक्ल, प्रमोद, प्रजापति, अंगिरा,

श्रीमुख, भाव, युवा, धाता, ईश्वर, बहुधान्य, प्रमाथी, विक्रम, वृष, चित्रभानु, सुभानु, तारण, पार्थिव, अव्यय, सर्वजित्, सर्वधारी, विरोधी, विकृति, खर, नंदन, विजय, जय, मन्मथ, दुर्मुख, हेमलंबी, विलंबी, विकारी, शार्वरी, प्लव, शुभकृत्, शोभन, क्रोधी, विश्वावसु, पराभव, प्लवंग, किलक, सौम्य, साधारण, विरोधकृत्, परिधावी, प्रमादी, आनंद, राक्षस, नल, पिंगल, कालयुक्त, सिद्धार्थी, रौद्र, दुर्मति, दुंदुभि, रुधिरोद्गारी, रक्ताक्षी, क्रोधन, क्षय. २ वर्ष; साल; अब्द; विक्रमाचा शक. [सं.] **०प्रतिपदा**–स्त्री. वर्षप्रतिपदा; चैत्र शुद्ध प्रतिपदा; वर्षारंभाचा दिवस; पाडवा. **०वृद्धि**–स्त्री. वर्षवृद्धि पहा.

संवथळ—न. (राजा.) सपाट जागा; समपातळींतील जागा. [सं. सम+स्थल]

संवदड, सौंदड—स्त्री. शमीवृक्ष. 'संवदड आपटा रानचारा। हा तो दसऱ्याचा तुरा।' –तुगा ४३७७.

संवदण, सौंदण, संवदणी, सौंदणी—स्त्री. परटाचें कपडे धुण्याचें भांडें. 'मळ खाय संवदणी। करी आणिकांची उजळणी।' –तुगा २४०१. 'मोरी संवदणी तेही आप।' –दा १३.१०.१५. 'तरी संवदणी न मानावी। मलिन जैसी।' –ज्ञा १८.१४१. [सं. शोधनी ?]

संवदर, सौंदर—पु. सोंडदोर; मोटेच्या सोंडेला बांधावयाचा दोर. [सोंड+दोर]

संवदर—वि. सुंदर; देखणा. [सं. सुंदर]

संवदरफळ—न. (राजा.) समुद्रफळ.

सवदा, सवदागर, सवदागरी, सवदागिरी, सवदागीर, सवदासूत—पु. सौदा, सौदागर वगैरे पहा. 'सवदासुत घेऊं नेणें।' –दा १९.३.६. 'मळवाया तो कपाळ कां सवदे।' –मोमंभा २.६३. [फा.]

सवंदा—पु. शेतीचें एकत्र काम. 'ढोल व थाळा वाजवून गवत काढण्याचें काम चालतें यास सवंदा म्हणतात.' –खेया [सं. सम+धा]

सवंद्या—पु. संकेत.

संवधुर—स्त्री. समतोल; समानता. 'संवधुर बिघडली परब्रह्माची।' –भाए ९०. [सं. सम+धुर्]

सवन—पु. सूर्य. –नस्त्री. स्वर; ध्वनीची तीव्रता; आवाजाची उच्चता, तारत्व. याचे तीन प्रकार असतात. उच्च, मध्य व नीच; किंवा तृतीय, मध्य व प्रातः; किंवा प्रथम, द्वितीय व तृतीय. [सं.]

सवन—न. स्खलन; स्रवणें. 'वारंवार करी मैथुन। विलंबें पाववी सवन।' –रास १.१२३०. [सं. स्रु-स्रव्]

संवफळ-फळी-फळें—पुस्त्रीन. स्पर्धा; टक्कर; धडक; उडी. 'दंतवक्र संवफळेयासीं आला। तो हिरवाची धरिला।' –शिशु ९८३. 'किंवा सरिसेपणें सूर्य मंडळीं। खद्योत घेऊं पाहे संवफळी।' –स्वादि ६.१.२१. [सं. सम+फल]

सवय—स्त्री. (खा.) गाडीची शिवळ.

सवय, संवय—स्त्री. सवई पहा. स्वाभाविक वृत्ति; सराव; राबता; चाल. [सं. समय] **सवया**–क्रिवि. (महानु.) संवयीनें; सहज. 'तंव तुज सवया थोर आला श्रिमाद्व।' –गस्तो ३३.

सवया—स्त्री. समता; बरोबरी; तुलना. 'उपमा देतां सवयां हीणा।' –उषा ७. 'सवयां दीसे कारीसवार्णे।' –उषा ६८. [सं. समता]

सवरणें, संवरणें—उक्रि. या धातूचीं यावत्धातुमात्राच्या रूपांपुढें तत्सदृशरूपें होऊन उपशब्दासारखीं लागतात. यामुळें त्या क्रियापदाचा अर्थ अधिक स्पष्ट किंवा पूर्ण होतो अथवा अधिक जोरदार होतो. याचा स्वतंत्र अर्थ होत नाहीं. 'मी देऊन संवरून कींहो चोर झालों!'; 'झालें सवरलें. आतां त्याची गोष्ट कशास?' 'मारूनसंवरून' 'खाऊनसंवरून' इ०. [सं. सम्+वृ; स्वरयति–सवरतो –भाअ १८३५]

सवरणें, संवरणें—उक्रि. सांवरणें; आटोपणें; आवरणें; आटोक्यांत आणणें. 'संभ्रमें ज्वाला हृदयस्फोट। न संवरे करुणाजळाचा लोट।' –ऋ २८. 'गंहिवरून न सवरेचि मज।' –उषा ८३. 'मृणाळसुताचिये वागुरे। प्रळयानिळु कां संवरे।' –भाए २१६. [सं. सम्+वृ]

सवरणें—सक्रि. शृंगारणें. 'सवरित बाच्छाई सरदार।' –ऐपो १८. [सं. सम्+वृ; हिं. सवारना]

सवरा—वि. स्वैर; स्वतंत्र; उनाड; आटोक्याबाहेरचा. 'सहा चौघांचे वचनें रिझलें म्हणून जीव झाला सवरा।' –पला १३. [सं स्वैर]

सवरात-थ, सवरार्ता-थी—पु.वि. (अप.) स्वार्थ–स्वार्थी. (व.) सोस; हव्यास. 'बायकांना दागिन्यांचा फार सवरात.' 'त्याला फार सवरात सुटला.' –मसाप १.२.१०. [सं. स्वार्थ]

सवरी—वि. स्वैरिणी; उंडगी; सौरी; निःसंग; उनाड. 'निसंग झालें सवरीब्यवरी अक्षदा बळवटी।' –पला १३. 'रांडभांड ही सवरी झाली।' –पला ८३. [सं. स्वैरिणी]

संवरीत—धावि. आच्छादिलेला; वेष्टिलेला. [सं. संवृत]

सवर्ण—वि. एकरंगी; समरंगी; एकाच रंगाचे, वर्णाचे, जातीचे, वर्गाचे; सजातीय. [सं. स+वर्ण]

सवर्णन—न. (गणित) निरनिराळ्या जातीच्या पदांस एका रूपांत आणणें; चढती किंवा उतरती भांजणी. [सं.] **सवर्णित**–वि. एकरूप दिलेला.

संवर्त-क—पु. १ मेघ; ढग. २ प्रलयमेघ; जगाच्या अंताच्या वेळीं भयंकर वृष्टि करणारा ढग; जलप्रलय; महापूर. 'पाचारुनी संवर्तका।' –निगा ४८. [सं.] **संवर्ताग्नि**–पु. प्रलयकालचा अग्नि. 'संवर्ताग्नि जटामाळा।' –गुच २९. १४२.

संवर्धक—वि. वाढणारें; उत्कर्ष पावणारें; वाढविणारें; उत्कर्षास नेणारें; पोषक; वृद्धिकारक. [सं.सम्+वृध्] **संवर्धन**–न. वाढ; सुधारणा; उत्कर्ष; भरभराट; पोषण. **संवर्धित**–धावि. वाढलेलें; भरभराटलेलें; पोषण केलेलें.

सवर्म—वि. मर्मयुक्त. 'सवर्म हृदय कल्हारीं। तेथ कारुण्य वेळेच्या भरीं।' –ज्ञा २.७१. [सं.]

सवलत—स्त्री. सोहलत, सौलत पहा. सूट; सवड; मेळ; मान्यता.

संवशय—पु. संशय पहा. 'नाहीं तर राजियाशीं कांहीं संवशये धरीत नाहीं.' –पेद १०.७३.

सवशान—न. स्मशान पहा. [सं. शवशयन]

संवसरिसी—स्त्री. बरोबर चालणारी; सहचरी. 'संवसरिसी दिवो राती। दोनी जैसी।' –ज्ञा १३.९५९. [सं. सम्+सृ–सर्]

सवसा—पु. १ साडू; बायकोच्या बहिणीचा नवरा. –मसाप २.३.४८. २ मेहुणा; नवऱ्यामुलाच्या बहिणीचा नवरा. –मसाप २.३.४९. [सं. स्वसा=बहीण]

सवसांज—स्त्री. सायंकाळ; संध्याकाळ. [समय+सांज] **सवसांजचा**–क्रिवि. सायंकाळचा.

संवसाटी—स्त्री. बरोबरी; साम्य; तुल्यता; अदलाबदल. 'शुद्धसत्त्व कैंचा गांठी। जेणें सवसाटी तुम्हासी।' –निगा २११. 'अर्धोन्मीलित निजदृष्टि। होत लयोद्भवाची सवसाटी।' –स्वादि १.३.२०. –क्रिवि. बदलीं; ऐवजीं. 'पागोटया संवसाटी। दिली रगटयाची गांठी।' –तुगा १३५१. 'त्यासी आपुलिये संवसाटी। विकत घेईन उठाउठी।' –एभा ८.२४९. [सं. सम+सत्त्व ?]

सवसाया—स्त्री. (महानु.) प्रेतचिन्ह. 'तयाची सवसाया। सांघैन तुज।' –भाए २०१. [सं. शव+च्छाया]

संवसार—पु. संसार पहा: 'रूपें लावण्यें तियां। जितला संवसारु।' –धवळे २.२.

संवसारणें—अक्रि. सरसावणें. पुढें सरणें. 'बाणासुरु संवसारला।' –उषा १६२३. [सं.सम्+सृ]

संवसारें—क्रिवि. बरोबर; समागमें [सं. सम्+सृ]

संवस्थान, संवस्थापन—संस्थान, संस्थापन पहा.

सवळ—स्त्री. प्रातःकाल; प्रभात: पहांट. 'तो सुर्यें उदयो देखोनि सवळे। पापिया फुटती डोळे। डुडुळाचे।' –ज्ञा १६. २३९ [सं.सु+वेला] –क्रिवि. तात्काल; ताबडतोब 'तव जाला हाहाकार। देव मिळाले सवळ' –ब ४६५.

सवळ, सौळ—वि. (बे) १ पाणचट; बेचव. 'ऊस सौळ आहे.' २ खारें; मचूळ. 'पाणी सौळ आहे.' [सं. शबल ?]

सवळ—पु. फांसा. 'म्हणे माजीं लुगडीं हिरवलीं। आपणेआ माजी वांटिली। आणि सवळ वालोनिया नेली। आंगीमाजी।' –ख्रिपु. २.४९.५१.

सवळा, सवळें–पुन. (गो.) सोवळा–ळें पहा. सवळयांत उंदिर मरप.' भ्रष्ट सोवळें असणें.

सवा—वि. पावपटीनें अधिक; चतुर्थांशानें अधिक; एक पूर्णांक एक चतुर्थांश. उदा० सवाचार=म्हणजे चारपूर्णांक एकचतुर्थांश; सवाशें=एकशेंपंचवीस; सवालाख=एकलक्ष पंचवीस हजार. [सं. सपाद]. **सवाई**–स्त्री. १ सवापट; एकचतुर्थांशानें अधिक. २ एक वृत्त, छंद. याचे अनेक प्रकार आहेत. उदा० एक गजावरि एक हयावरि एक रथावरि बैसुनि आले। –वि. सवापट; चतुर्थांशानें अधिक. 'कोंकणचे मापापेक्षां देशचें माप सवाई आहे.' 'सवाई माधवराव.' **सवाईची मिती**–स्त्री. दरमहा दरशेंकडा सवारुपयाप्रमाणें व्याजाचा करार. 'सवाईच्या मितीनें कर्जे काढून देतात'–व्यनि ४०. **सवाईजमा**–स्त्री. अवांतर जमा; शेतकरी व इतर गांवकरी यांवरील एक सालपट्टी अथवा जास्त पट्टी. –गांगा ५६. **सवाईसूट-वजा-बाद**–स्त्री. साऱ्याच्या पंचमांशाची सूट. **सवाकीं**–स्त्री. सवाचे पाढे. एक उजळणीचा प्रकार; एकसवा सवा, बेसवा अडीच याप्रमाणें. **सवाहाती**–स्त्री. (खाटिक) मेंढीचें आंतडें, (हें सवा हात लांब असतें यावरून).

सवा—स्त्री. १ बाजू; कड; 'उभी ठाके जयासवा। तिकडे मुखें दावी देवा।' –मु आदि 'नाना पत्रें वृक्षविस्तार। दिसे दाही सवा।' –दा ६.८.२०. 'तेथ बैसला होता जियासवा। तियाचिकडे मस्तक खालविला देवा' –ज्ञा ११. २५४. २ प्रकार; पद्धति; परी; तऱ्हा. 'यदू पुसिले ऐसिया सवा' –भाए २६४. 'मोडोनि भांगराचा रवा। लेणें घडिलें आपलिया सवा, –ज्ञा ११.६४४. –क्रिवि. बरोबर. 'स्वयें दर्शनाचिया सवां। अवधियाची जाती फवा।' –अमृ ७.२५५. 'सांभाळून घ्यावें देवा। आपणा सवा यावरि।' –तुगा १२१०.

सवाई—स्त्री. सवई, संवय पहा.

सवाईगवत—न. एक प्रकारचें गवत. यापासून कागद तयार करतात. –केसरी ११.९.३६.

सवाईची दोरी—स्त्री. तंबूच्या मधील खांबाच्या माथ्यास बांधून दोन अथवा चार दिशांस मेखांना ताणून बांधलेली दोरी.

सवागी—स्त्री. एक क्षार; सुहागी; टाकणखार.

सवागी—पु. कसबिणींचा गुरु; (सौभाग्य देणारा) एक फकीर. 'सवागी फकीर आपले हातांत हिरव्या बांगड्या घालून...' –गांगा २०८ [सं. सौभाग्य]

सवाड—वि. (व). पातळ; विरळ.

सवाण—न. (माण.) झरोकें. [साणें]

सवाण—वि. (ना).सपाट; समपातळींतील. [सं. समान]

सवाणणें—उक्रि. (राजा.) चेंदणें; ठासणें; ठोकणें; खांबाचें नेम, बंदूक यांत माती, दारू वगैरे ठासणें.

सवाणा—पु. (सोनार) एक प्रकारचा चिमटा; बारीक चिमटा.

सवाद—पु. चव; रुचि; स्वाद पहा. 'लटिक्याची वाणी चवी ना सवाद।' –तुगा ३०७८. [सं. स्वाद]

सवाद—स्त्री. शिवार; काळी; गांवाभोंवतालची शेतकी जमीन. 'दर सवाद कसबे मजकूर.' –रा १५.१३१. [अर. सवाद्]

संवाद—पु. १ प्रश्नोत्तररूप संभाषण; चर्चा; संभाषण; परस्पर भाषण. २ मेळ; जुळणी; अनुरूपता. [सं. सम्+वद्]

संवादणें–उक्रि १ सांगणें; विवेचन करणें; संभाषण करणें. 'जो संवादला श्रीरंगु। अर्जुनेसी। –ज्ञा १.५०. 'तिहीं जाऊनि सिंहापासि संवादिलें।' –पंच ४२. २ संभाषण करणें; परस्पर बोलणें.

संवादी–वि. १ वादविवादकुशल; संभाषणनिपुण. 'वेवाद रहित संवादी। संग रहित निरोपाधी।' –दा. २.८.२३. 'प्रेमळु संवादिया होये।' –ज्ञा १२.१६१. २ जुळता; जुळणारा; अनुरूप. **०स्वर**–पु. (संगीत) रागांतील महत्त्वानें दुसरा स्वर; वादी स्वराशीं जुळणारा स्वर. या दोन स्वरांत आठ किंवा बारा श्रुतींचें अंतर असतें. वादीपासुन संवादी स्वर चौथा किंवा पांचवा असतो. यांच्या जोडया अशा– आरोहक्रम. सा– पम; रे– ध, प; ग– निध; म– सा (तार). अवरोहक्रम. सा(तार)– प, म; नि– ग; ध– ग, रे; प– रे, सा; म– सा.

सवान—वि. (व.) सपाट; साफ; एका पातळींतील (जमीन). [सं. समान]

सवाय—वि. (गो.) (ल). स्वस्त. म्ह. सवाय खाण पोट फुगे. [सवाई; सवंग]

सवाय, सवायकी, सवायी—सवा, सवाकी, सवाई पहा.

सवार— पु. स्वार; अश्वारोही; अश्वारूढ, घोडयावर बसलेला मनुष्य. –वि. अश्वावर बसलेला; चढलेला (गाडींत, घोडयावर वगैरे). [सं. अश्वारोही; फा. सवार]

सवारणें—सक्रि. शृंगारणें; शोभिवंत करणें; नीट रचना करणें. 'सवारिल्या राजसभा प्रशस्ता।' –सारुह ३.३२ 'बार भोयांची पालखी सवारिली। –ऐपो १४. [सं. सम्+वृ–संवरण; सम्+आरच्–समारचयति–समारयति–समारई; सम्+मृज्–संमार्जन –भाअ १८३४.)

संवार—पु. १ दाटणी; आकर्षण; संकलन. २ आकुंचन; (उच्चार करतांना ओठांचें, बाह्य प्रयत्न पहा). [सं. सम्+वृ]

सवारी—स्त्री. १ स्वारी पहा. 'सवाई माधवराव सवारी निघाली नबाबावरती.' –ऐपो २४९. २ एक कुस्तीचा डाव.

सवार, सवारी, संवारी—स्त्री समा; भरतीची पूर्णावस्था. [सं. सम्+वृ]

सवारी—पु. १ गायनाचा एक प्रकार. २ एक तालाचा प्रकार. यांत पंधरा मात्रा व चार विभाग असतात. –वि. सवारी तालासंबंधी.

सवाल—पु. १ प्रश्न; चौकशी; वादपृच्छा. २ खडया सुरांत म्हटलेला उर्दू भाषेंतील दोहरा, श्लोक. 'हेल काढून खोल आवाजानें सवाल म्हणतात.. ' –गुजा ३३. [अर. सुआल्]

सवाल—पु. अरबी वर्षाचा दहावा महिना. [अर. शव्वाल्]

सवाव—वि. सवा; सव्वा. 'सवाव लक्ष नव कोडि वीया.' –चक्रधर सिद्धांतसूत्रें १०.४. [सं. सपाद]

सवाशा-शे—पु. ब्राह्मणांतील एक पोटजात; सहवासी ब्राह्मण.

सवाशीण, सवाष्ट, सवाष्ण, सवाष्णी—स्त्री. सुवासिनी पहा. सौभाग्यवती स्त्री. 'घराबाहेर पडतांच सवाष्ण बायका कडेवर पण्यानें भरलेली घागर. ... ' –नि २२३. [सं. सुवासिनी]

सवाशीण ब्राह्मण, सवाष्ण ब्राह्मण–पु. १ सुवासिनी व ब्राह्मण; पति जिवंत असलेली एक ब्राह्मण स्त्री व एक पुरुष (जेवावयास बोलवावयाचें झाल्यास योजतात); गण सवाशीण. २ अशा तऱ्हेनें ब्राह्मण व सुवासिनी जेवावयास बोलावण्याचा विधि. (क्रि० घालणें, करणें, सांगणें).

सवास—पु. सहवास पहा. 'नानातीर्थ सवासा। वरिपडा झाला।' –माज्ञा १८.९०९. [सहवास]

सवासन—क्रिवि. वासनेसहित 'तैसीं वोकविलीं सवासन। इंद्रियें विषयीं।' –माज्ञा १८ १०१६. [स+वासना]

सवासा—पु. १ सपत्नीक; सुवासिनीचा नवरा. २ मेहुणा. –बदलापूर २६९.

सवासा—वि. १ सरळ; सोईचा; सुरफाटा. 'भांडें पालथें पडलें आहे तें सवासें कर.' २ अनुकूल; सोईचा. 'सवासा फांसा मडला व आपल्या मनाजोगें काम झालें.' ३ सव्य; उजवा. [सं. सव्य+सा]

सवासुंठ—स्त्री. एक औषधी. 'सवासुंठ चार टाक.' –(बडोदें) प्रसूतिकृत्यादर्श ५.

संवाहन—न. १ वाहून नेणें; आणणें; नेणें; आरोहण. 'ना आंगें करी संवाहन। कर्म सिद्धीचें।' –ज्ञा १८.३०६. २ साह्य; साधन. 'उजू नोहेचि प्राचीन। नेदेचि प्रज्ञा संवाहन।' –ज्ञा १७.३८. ३ अंगमर्दन; रगडणें; चेपणें. 'सकळ तीर्थां अधिष्ठान। करी लक्ष्मी संवाहन।' –तुगा २०८०. 'अंगसंवाहन, पादसंवाहन, हस्तसंवाहन इ०.' [सं. सम्+वह्]

सविकार—वि. परिणाम, प्रकार, विकार यांसह. 'क्षेत्र तंव सविस्तर। सांगितलें सविकार।' –ज्ञा १३.१६१.

सविता—पु. सूर्य; रवि. [सं. सु=प्रसवणें, सवितृ]

संविति, संविती–संवित्ति—स्त्री. १ पूर्ण ज्ञान; योग्य समज; जाणीव. 'आणि परमार्थसंविती।' –विपू १.१८. २ स्नेह; मैत्री; मित्रासंबंधीं चांगली वृत्ति, ओळख. [सं. सम्+विद्–संवित्ति]

सविध—वि. सजातीय; सधर्मीय; सवर्ण; एकाच जातीचा, प्रकारचा. [सं]

संविधान—न. १ संदर्भ; अनुसंधान; धागादोरा (इतिहास, कथा वगैरेचा); संबंध; जुळणी. (क्रि० लावणें; बांधणें; घालणें; रचणें; जमवणें). 'संविधान लवकर ध्यानांत येईना.' –कमं८. २ व्यवस्था; तयारी; तजवीज. 'संपूर्ण नानाविध संविधानीं।' –सारुह ६.३. [सं. सम्+वि+धा]

संविधानक—न. कथासूत्र; कथानक; गोष्ट; कथानकाची रचना. 'तसें नाटकास किंवा कादंबरीस संविधानक होय.' –नि ५३६. [सं. सम्+वि+धा]

सविनय—वि. विनयशील; नेमस्त; नम्र. [स+विनय] **सविनय कायदेभंग**–पु. स्वतः अनत्याचारी राहून व प्रतिकार न करतां सरकारचे जुलमी कायदे मोडण्याची क्रिया.

संविभाग—पु. विभागणी; वांटणी. [सं. सम्+वि+भज्]

सविया—क्रिवि. १ सहज; सहजीं; साहजिकपणें. 'तये काशीपुरी जावया। तीन मार्ग योजिले सविया।' –स्वादि १०. ४.५८. –अमृ ६.७५. २ आपोआप; तत्काल. 'कल्पना निमे प्रवृत्ति शमे। आंग मन विरमे। सवियाची।' –ज्ञा ६.२१२. [सं. स्वयम्]

सविला—वि. संवयीचा; ओळखीचा. [सवय]

सविवळ—वि.क्रिवि. सविस्तर; स्पष्ट; विस्तारपूर्वक; खुलाशासह; विवरणपूर्वक. 'आणि आधींचीं हीं मूळें। उपपत्ती परि सविली सविवळें।' –ज्ञा १५.२०९. [सं. स+वि+वृ]

सविशेष—वि.क्रिवि. सविस्तर. 'तें सविशेषें विणविजे।' –शिशु ११८. [स+विशेष]

सविष—वि. विषारी. [स+विष]

सविस्तर—वि.क्रिवि. १ विस्तारासह; विस्तृत. 'सविस्तर वटत्व जैसें। बीजकणिकेमाजी असे।' –ज्ञा ९.४१०. २ तपशिलासह; विस्तृतपणें; बारीकसारीक माहितीसह. [सं. स+विस्तर]

सविस्मय—वि. आश्चर्यपूर्वक; आश्चर्यचकित; विस्मित; चकित. [स+विस्मय]

सवीळ—स्त्री. (कों. कु.) शिवळ पहा.

सवृत्तिक—वि. हक्कदार; वतनदार; वृत्तिवान [स+वृत्ति]

संवृद्धि—स्त्री. १ वाढ; विस्तार. २ सुबत्ता; विपुलता; समृद्धि; रेलचेल. ३ अभ्युदय; उत्कर्ष; भरभराट. [सं. सम्+वृध्]

सवे, संवे—स्त्री. सवई, संवय पहा. 'सवे लाविता सवे पडे।' –दा ७.७.१५. 'टाकि टाकि अशी सवे सद्गुणमंदिरा।' –होला १८.२४. 'ऐसेनि स्थैर्याची होईल। सवे यथा।' –ज्ञा ६.३८२.

सवे—पु. समय; वेळ; काल. 'सवे सारीतु पातीनिले। दंड नायकापाशीं।' –शिशु ५०४. [सं. समय]

सवें—शअ. बरोबर; सह; समागमें. 'सवें सेना भूपाळ निघालाहे।' –र ३१. 'तयाचि तुलगासवें। वीरवृत्तीचेनि यावें।' –ज्ञा १.१२७. [सं. सम, समेत, सहित]

सवें, सवेंच, सवेंचि—क्रिवि. आपण होऊन स्वतःच; आपोआप; लागलीच; तावडतोब; तात्काळ; तत्क्षणीं 'शब्द बोलतां सवेंच नासे।' –दा ९.२.२७. 'जो मेटलियाचि सवें। पुरती उपायांचे धांवे।' –अमृ २.८. 'सवेंच गाडर पुडेंच सरला।' –ऐपो २१० 'पाहतो भीतरीं सवेंचि तो।' –तुगा १६. [सं. स्वयम्; स्वयम्+एव; समेव]

सवेंच—वि. खर्च होणारें; झिजणारें; नाशवंत. 'रूप सवेंच नाम निर्वेंच। रूप क्षणिक नाम साच।' –रावि १६.९९. [स+वेंच=खर्च]

सवेण्या—स्त्रीअव. (कों.) रासन्हाणी; लग्नसमारंभांत विहिणी बरोबर घराकडील स्त्रियांस वधूकडील स्त्रिया नहाण घालतात तो समारंभ. [स+विहीण]

संवेदक—वि. ज्ञान देणारें; कळविणारें; बोध करणारें. [सं. सम्+विद्] **संवेदना**–स्त्री. ज्ञान; जाणीव; बोध. **संवेद्य**–वि. स्वतःस कळणारें; स्वतःस जाणतां येणारें (पण दुसऱ्यास सांगतां न येण्यासारखें, आत्मानुभव, दुःख, कळ, शूळ इ०)

सवेशा-सा—स्त्री. स्वेच्छा; स्वतःची इच्छा; 'तरी आपुलिया सवेसा। कां न मगावासी परेशा।' –ज्ञा ३.२६. [सं. स्व+इच्छा]

सवेसांजचा—क्रिवि. ऐन सायंकाळचा; अगदीं संध्याकाळीं; तिनीसांजा. [सं. समय+सांज]

सवेळ, सवळ—स्त्री. प्रातःकाळ; सकाळ; प्रभात. 'न पहतां सवेळे। मानससरोवरीचीं कमळें।' -शिशु ७८६. -क्रिवि. तत्क्षणीं; तात्काल 'सवळैचिं वियोग पडेल।' -ज्ञा १७.७७०. [सं. सु+वेला]

सवैल—पु. सहचर; सोबती; शेजारी. 'सवैल गोवळे नानापरी।' -दाव ८३. 'सवैलांचा गुणदोष तुकणें।' -ज्ञाप्र २४२.

सवो—पु. (गो.) बोहल्लें; वधुवरास बसण्याकरितां केलेली सुशोभित जागा. म्ह० १ सव्यार घोव मरप' =बोहल्यावर नवरा मरणें. २ सव्यार न्हाउक लागप. =बोहल्यावरच ऋतु प्राप्त होणें.

सव्य—पु. १ डावा हात. २ (चुकीनें) उजवा हात. वि. १ डावा; उजवा नव्हे तो. २ उलट; विरुद्ध; मागचा. ३ दक्षिणेकडील. ४ (चुकीनें रूढ) उजवा; दक्षिण. 'प्रचंड डावा भुजदंड भारी। सव्यें करें वाजषि कैटभारी।' -वामन, कालियामर्दन. १ ४६. 'वामसव्य दोन भाग। परी दो नामीं एकचि अंग।' -एभा १.९६. 'सव्य ते तळीं ठेविजे। तेणें सिवणी मध्यु पीडिजे। वरी बैसे तो सहजें। वाम चरणु।' -ज्ञा ६.१९४. **सव्य घालणें**-प्रदक्षिणा घालणें; उजवीकडे ठेवून फिरणें. 'घालोनि सव्यें मग अंबिकेला।' -सारुह ७.८९. **सव्यअपसव्य, सव्यापसव्य**-वि. डावा उजवा; उलटसुलट; शुद्ध अशुद्ध; बरोबर व चुकीचें 'सव्यअपसव्य भोवंडी गदा।' -एरुस्व ९.४८. 'पक्षवेगें रथ फिरविती। कावे वेती सव्यअपसव्य।' -ह २६.१५५. -न. (श्राद्धाचे वेळीं उलटसुलट जानवें करावें लागतें यावरून) यातायात, खटपट, उपद्व्याप. **सव्यगत**-क्रिवि. स्पष्टपणें; उघडणें; स्वच्छपणें (दिसणारा). **०साची**-पु अर्जुन. 'सव्यसाची सारखे लागले मागें पहायाला।' -ऐपो ३९२ 'परिस पां सव्यसाची।' -ज्ञा ३.१४५. -वि. डाव्या व उजव्या दोन्ही हातांनी काम करणारा, युद्ध करणारा.

सव्यय—वि. (व्या.) विकरण पावणारा; ज्यास विभक्त्यादि प्रत्यय लागतात असा (शब्द). याच्या उलट अव्यय. [सं.]

सव्याज—वि. व्याजासह; मुळाहून अधिक.

सव्वा, सव्वाइकी, सव्वाई, सव्वाल-सवा, सवाई इ० पहा.

सव्वाल—पु परशुप्रमाणें एक हत्यार; (हें कुऱ्हाडीप्रमाणें मारतात) [हिं. सबल ?]

सव्वीस—वि. वीस अधिक सहा ही संख्या. [सं. षट्+विंशति]

संव्हार, संव्हारणें—संहार, संहारणें पहा. 'आतां ऐका संव्हारणी।' -दा ११.१११.

सशंक—वि. १ शंका असलेला; साशंकित; संदेहयुक्त. २ भीतियुक्त; भिडस्त; भित्रा; धास्तीयुक्त. [सं. स+शंका]

सशक्त—वि. बलवान्; बलिष्ठ; मजबूत; समर्थ; बळकट; जोरदार. [सं. स+शक्ति]

संशय—पु. १ शंका; संदेह; मनाचा डळमळितपणा; मनाचा अनिश्चय. २ वहीम; अंदेशा; विकल्प; अविश्वास; विपरीत भाव. ३ भय; भीति; धास्ती. [सं. सम्+शी=निजणें] **०खोर-वाईक**-वि. संशयी; शंकेखोर; अंदेशा घेणारा; अविश्वासी. **०ग्रस्त**-वि. संशयानें व्यापलेला; अनिश्चित मनःस्थितींत असलेला; विकल्पानें भरलेला; संदेहविशिष्ट. **०निवृत्ति**-स्त्री. संशयाचा निरास; शंकेचें निवारण, निर्मूलन; शंकापहार. **०पिशाचिका**-स्त्री. शंकारूपी भूत. 'स्वतःच्या संशयपिशाचिकेस अग्रस्थान देणाऱ्या लोकांची विचारसरणी आमच्या मतें अगदीं अशास्त्र. -गीर ५१८. **०वाद**-पु. परस्पर विरोधी दोन मतांपैकीं सत्य कोणतें याचा निर्णय करतां येत नाहीं अशी मनस्थिति; जगाच्या उत्पत्तिलयासंबंधी वगैरे अनिश्चितता प्रतिपादन करणारें मत. 'सोफिस्ट बहुतांशीं संशयवादी असत.' ज्ञानकोश, सं. ११३. **संशयात्मक**-वि. शंकायुक्त; संशयी; अनिश्चित; संदिग्ध; गोंधळलेलें; दिक्कतखोर. **संशयार्थ**-पु. (व्याक.) ज्या क्रियापदाच्या रूपावरून संदेहात्मक बोध होतो त्या रूपास असलेली संज्ञा. **संशयाळु**-वि. नेहमीं शंका काढणारा; संशयी वृत्तीचा. **सशयी**-वि. शंकेखोर; अनिश्चित मनाचा; भ्रांतिग्रस्त; घोटाळलेला. [सं:]

सशास्त्र—वि. शास्त्रास अनुसरून केलेलें, बोललेलें, लिहिलेलें, असलेलें. [सं.]

संशुद्धि—स्त्री. स्वच्छता; शुद्धता; निर्मलता; शुद्ध व पवित्र स्थिति; साफसफाई.

संशृत, संश्रित—धावि. आधार दिलेलें; आश्रयाखालील; आश्रय असलेलें; आश्रित; रक्षित. [सं. सम्+श्री]

सशेमिरा—पु. हक्क. -गांगा २५४.

संशोधक—पु. १ शोध लावणारा; शोध करणारा; नवीन गोष्टी शोधून काढणारा. २ शुद्ध करणारा; दुरुस्त करणारा; पवित्र करणारा. [सं. सम्+शुध्] **संशोधन**-न. १ नवीन शोध लावण्याची क्रिया. २ शुद्धि; तपासणी; चौकशी. **संशोधित**-धावि. शोधलेलें; शुद्ध केलेलें; तपासलेलें.

संश्रय, संश्रुति—पु. आधार; आश्रय; आसरा. [सं. सम्+श्री]

सश्रीकता—स्त्री. शोभा; सुबकता; तेजस्वीपणा. 'तिच्या रंगाची सश्रीकता किंवा तिच्या आकाराचा चांगुलपणा...' -साकेटीससंवाद २७७. [स+श्रीकता]

संश्लिष्टता—स्त्री. संलग्नता; संयोग; चिकटून असणें. अभ्यासाच्या चार भूमिकांतील तिसरी भूमिका. [सं.]

संश्लिष्ट—धावि. चिकटलेला; कवटाळलेला; संलग्न.

संश्लेष—पु. आलिंगन; मिठी; कवटाळणें; संलग्नता. [सं. सम्+श्लिष्]

सषड्भ क्रांतिपात—पु. शरत्संपात. [सं.]

सषड्भपात—पु. ग्रहांच्या कक्षेंतील केतुबिंदु.

सष्टम—वि. मोठा; सुंदर; सुरेख; ठळक (दागिना, भांडें, वस्तु); घड; मजबूत; बळकट (कापड, कागद अथवा इतर वस्तु). –क्रिवि (व.) यथेच्छ; खूप; दोन्ही कुशी ताणेपर्यंत. [सं. सत्+तम्]

ससकर—पु १ रेंव; वाळू; खडे (धान्य, वगैरेमध्यें मिसळलेलें गदळ). २ मिसळलेलें धान्य; गदळ असलेलें धान्य. –वि. मिसळलेलें; गदळ असलेलें; कंकरमिश्रित. [स+शर्करा]

ससकार—पु. सचकार पहा. बयाणा.

संसक्त—धावि. १ संबद्ध; जोडलेला; चिकटलेला; संलग्न; बद्ध. २ आसक्त; तत्पर; पाठीमागें लागलेला; अनुरक्त; पिच्छेस लागलेला; अतिशय प्रवृत्त. ३ निकटचा; सुपरिचित; घनिष्ट संबंध असलेला. [सं. सम्+सिच्] **संसक्ति**-स्त्री. १ संबंध; निकटपणा. २ आसक्ति; अतिशय प्रवृत्ति; दृढ व्यासंग. ३ दाट परिचय; घसट.

ससगणी-गाणी—स्त्री. १ सजगणी पहा. दुंडा पैसा; ढबू पैसा. २ सहा रुके; जमीनीचें एक माप. 'महाराजांनीं जमीन सजगाणी इनाम दिली.' –शिचसाले १०४.

संसत्—स्त्री. सभा. [सं. षद्=बसणें]

ससत—पु. (गो.) वंश. **ससतीक**–वि. (गो.) वंशाला.

ससनणें—सक्रि. बोलणें. –मनको.

संसप्तक—पुअव. भारतीय युद्धांत सामील झालेले त्रिगर्तपुत्र; सत्यप्रतिज्ञ. [सं.]

ससंबंधिक, ससंबंधी—वि. साक्षेप; परस्पर सबंध असलेलें; संबद्ध; परस्परांशीं निगडित. 'सेव्य आणि सेवक, लघुत्व आणि गुरुत्व हे शब्द ससंबंधिक आहेत.' [स+संबंध]

संसर—पु. १ संचार; गमन; येजा; वापर. २ पसारा; संगति. ३ चूक; च्युति; प्रमाद. 'तैसे दुर्भेद्य जे अभिप्राय। कां गुरुगम्य हन ठाय। तेथ संसरेवीण जाय। बुद्धि तयाची।' –ज्ञा ६.४५९. [सं. सम्+सृ] **संसरण**–न. १ गमन; जाणें; पुढें सरणें; संचार. २ जन्म, स्थिति, लय वगैरे; जगांतील अस्तित्व; आयुष्यांतील व्यापार. ३ आत्म्याचें आगमन बहिर्गमन; जीवाचा फेरा; जन्ममरणाचा फेरा. 'तरी जिवाचें संसरण। कां न चुकिजे।' **संसरणें**–अक्रि. १ जगणें व मरणें; जन्म, स्थिति, लय यांतून जाणें; संसारचक्रांतून जाणें; भ्रमणें. २ सांवरणें; आटोपणें. 'म्हणोनि असो हें यापरी। तो देखे ज्ञानाची वाखारी। तेणें संसरले निकरी। आपु विश्व।' –ज्ञा ७. १३५. ३ सरसावणें; उद्युक्त होणें; प्रवृत्त होणें. 'वागोरे सांवरावया गोविंदा। संसरलिया।' –ज्ञा ११.२९६. [सं. सम्+सृ=सरणें] **संसरा, संसारा**–पु. १ स्थिति; उद्भव; प्रादुर्भाव. 'मोक्षाचा संसारा। उणा नोहे।' –ज्ञा १४.२८४. 'श्रीरामा आणि दिनकरा। वेगळिकेचा संसरा। क्षीरसागरा आणि क्षीरा। जेणे रीती।' –स्वादि १.२.९०. २ पसारा; विस्तार. 'कैसा वासनेचा संसरा। देहा हों नेदी उजगरा।' –ज्ञा ५.५४. 'नामरूपाचा संसारा। होय जयातें।' –ज्ञा १५.७६. ३ लाभ; संगति; जोड. 'कां स्नेहा, सूत्रा, वैश्वानरा। जालियाहि संसारा।' –ज्ञा १७.३५१. 'बोधाचा हा संसारा। जाला जो आमुतें।' –ज्ञा १८.१७५८. **संसरिसु**–क्रिवि. एकदम; तात्काळ. 'कीं अग्नी घातला पोतासु। ऐसें नव्हे संसरिसु। वेंच झाला।' –अमृ ७.१७७.

ससरा—पु. सासरा; श्वशुर. 'मूर्तिमंत ससरा अभिमाना।' –अकक २. मंगीश राधाविलास. 'पितर मातुळपुत्र ससरे ते पितामह शाळ नातू सोयरे।' –शिवराम, गीतार्चंद्रिका ४४.

संसर्ग—पु १ संबंध; संयोग; संगति. 'कीं लवणेंचि जळ विरे। संसर्गें काळकूट मरे।' –ज्ञा २.१५. २ संघटन; परिचय; दळणवळण; व्यवहार. ३ स्पर्श; सांनिध्य; निकटपणा. [सं. सम्+सृज्] **संसर्गाभाव**–पु. (तर्क.) अभाव; विनाश. याचे तीन प्रकार आहेत–प्राक्, नैमित्तिक व अंत्य; जन्म अथवा उत्पत्तीचा अभाव; नाश किंवा लय. **संसर्गित**–धावि. संबद्ध; युक्त. **संसर्गी**–वि. १ संबद्ध; निगडित; निकटचा; जवळचा. २ परिचित; संगत; ओळखीचा वगैरे.

संसर्प—पु. १ ज्यावर्षी क्षयमास असतो त्यावर्षी येणारा अधिकमास. २ सौम्यगति; हळूच सरणें, हलणें (साप, झरा वगैरे प्रमाणें). [सं. सम्+सृप्]

ससा—पु. १ एक फार भित्रा प्राणि; शश; खरगोष. २ ससाणा याबद्दल संक्षेपानें वापरतात. (गो.) ससो. [सं. शश] **ससाकुत्रा**–पु. एक मुलांचा खेळ. –बालमित्र १.७०. **ससेधोकें**–न. सशासारखी एकसारखी धास्ती, भीति वाटणें. (क्रि० बाळगणें; करणें; लागणें). **ससेहोलपट**–स्त्री. गडबड; धांदल; मारामार; चेंचाचेंच; सगळीकडून एकदम होणारा मारा (सशास सर्वांनीं मिळून एकदम होलपटावें त्याप्रमाणें). 'मारा, मारा, असें होऊन ससेहोलपट होऊन एक ठार झाला.' –भाब १५. 'मग चौकडून दत्ताजीशिंदे यास ससेहोलपट करावी.'–भाब ६३.

ससा—पु. (व.) सांचा (शेव, कुरडया वगैरेचा).–वशाप ८.५१.

संसाटी—स्त्री. संवसाटी पहा. बरोबरी. 'मग माझिया संसाटी। तुकसी जगीं।' –ज्ञा १८.१५०९.

ससाणा—पु एक मांसाहारी, शिकारी पक्षी; श्येन; बहिरी-ससाणा. [सं. श्येन]

संसार—पु. १ जग; विश्व; सृष्टि; इहलोक; संसृति; मानवी जीवित, अस्तित्व; जगाची स्थिति. 'संसार म्हणजे डोळ्यापुढें दिसणारें सर्व जग किंवा दृश्य सृष्टि असा अर्थ आहे.' –गीर८०१. 'शिवशिव कदनाची विवसी संसारीं। कवणु नेघे।' –भाए२२९. २ प्रपंच; व्यवहार; कुटुंबपोषणादि कार्यें; गृहकृत्य; घरकाम. ३ विस्तार; पसारा. 'नवल ऐके धनुर्धरा। कैसा वासनेचा संसारा। देहा होऊं नेदी उजगरा। परी सुखदुःखें भोगी।' –ज्ञा ५.५४. [सं. सम्+सृ] **संसार उभारणें**–गृहस्थाश्रम चालविणें; गृह-व्यवस्था पाहणें. 'मुक्ताबाईनें एखाद्याचा संसार नसता का उभा-रला.' –नामना २१. **संसार करणें**– १ गृहकृत्य करणें; घरां-तील सर्व कामधाम, व्यवहार पाहणें. २ (बे.) ताडाचें पान कापून ताडी मोड्यांत पाडणें. **संसार मांडणें**–संसारास सुरवात करणें. **संसारास-संसारावर पाणी घालणें**–संसाराचा नाश करणें. 'म्हणती आतां संसारा घालूं पाणी। परी अन्न देऊं चक्रपाणी।' –ह१६.११६. **संसार वृथा करणें,जाणें**–संसाराचा नाश करणें. 'तुकयाची ज्येष्ठ कांता। मेली अन्न अन्न करितां। येणें लज्जा वाटे चित्ता। संसार वृथा गेला कीं।'. **संसार हांकणें**–संसार चाल-विणें; प्रपंच योग्य रीतीनें करणें. **संसाराची मात्रा करणें**–सर्व प्रपंचाचा नाश करणें; बिघाड करणें; सर्व आशांचा मोड करणें. सामाशब्द– **०ओझें**–न. प्रपंचाचा भार, जबाबदारी; संसाराची काळजी. 'म्हणे संसारओझें माझें शिरीं। कैसी परी होईल।' **०कष्ट**–पुअव. प्रपंचातील दुःखें, त्रास, मेहनत, जबाबदारी. **०चक्र**–न. प्रपंचाचा गाडा; संसारयात्रा; नेहमीं संसारांत येणारे निरनिराळे प्रसंग, अनुभव वगैरे. **०ताप-दुःख-यातना**–पुन. प्रपंचांतील दुःखें, त्रास, कष्ट, श्रम. 'आधींच संसार तापें संतप्त। तो हा सत्समागमें निवत।'. **०धंदा**–पु. प्रपंचांतील कामें, व्यवहार; उद्योग. 'जेणें उकले आपसा संसारधंदा.' **०भान**–न. प्रपंचांतील लक्ष्य; ऐहिक गोष्टींबद्दल वाटणारा आपलेपणा, प्रेम, आदर. **०भार**–पु. संसाराचें ओझें. **०भ्रम**–पु. संसारांतील माया-पाश; प्रापंचिक गुंतागुंत; ऐहिक गोष्टींसंबंधीं वाटणारें प्रेम व त्यांत गुरफटून राहण्याची बुद्धि. **०माया**–स्त्री. प्रापंचिक गोष्टींसंबंधीं वाटणारा भ्रम; ऐहिक गोष्टींत असणारी क्षणभंगुरता, क्षणिकत्व, परंतु त्यांचेबद्दल सत्त्याचा होणारा भास. 'संसारमाया सांडोनि। दशरथ पावला स्वर्गभुवनीं।' –रावि ११.१४५. **०मार्ग**–पु. जग; विश्व; सृष्टि; ऐहिक व्यापार, व्यवहार. याच्या उलट पर-मार्थमार्ग. **०यात्रा**–स्त्री. प्रपंचाचा रोजचा क्रम; ऐहिक दिनचर्या; संसारांतील अनेक वरेवाईट प्रसंग; आयुष्यक्रम. **०रहाटी**–स्त्री. जगाचा क्रम; विश्वांत चाललेल्या अनेक घडामोडी; जीवितचक्र. **०सागर**–पु. प्रपंचाचा, सृष्टीचा अफाट विस्तार. **०सात**–स्त्री. संसाररूपी बाजार; प्रपंचाचा बाजार. 'तेवि संसारसातेसी येऊन। जो न करील ईश्वरभजन।' –महि कथा १६.५. **०साक्षी**–वि. ज्याला सर्व जगांतील व्यापार दिसतात असा (परमेश्वर). **०सुख**–न. प्रपंचांतील आनंद, सुखोपभोग; ऐहिक सुखोपभोग. **संसाराचा गाडा**–पु. संसारचक्र; प्रपंच, व्यवहार; जगांतील दिनक्रम. **संसाराचें ओखड**–न. प्रपंचाची जबाबदारी; संसा-राचें ओझें. **संसारिक**–वि. १ संसारांत दक्ष; आपले रोजचे व्यवहार योग्य त-हेनें करणारा; व्यवहारज्ञ; प्रापंचिक. २ संसारा-संबंधी; संसारांतील. 'जंव तुझें रूप नोहे दिठे। तंव जगासि संसा-रिक गोमटें।' –ज्ञा ११.३२१. 'संसारिक हे तुटेना।' –दा २. ५ ३५. ३ संसारांत, प्रपंचांत गढलेला; आपल्या आयुष्यांतील गोष्टींचाच केवळ विचार करणारा; संसारी. 'मागें बोलिला संसा-रिक। त्यागेंविण नव्हे कीं साधक।' –दा ५.१०.१. **संसा-रिया**–पु. संसारी; प्रापंचिक. 'आत्मा गुणसंगें। संसारिया।' –ज्ञा १४.३३. **संसारी**–वि. १ प्रापंचिक; संसारांत गढलेला; गृहस्थाश्रमी; स्त्रीपुत्र वगैरे असलेला. २ ऐहिक; जगासंबंधी.

संसारणें—अक्रि. सरसावणें; पुढें होणें; उद्युक्त होणें. 'होरे हो जालें। तंव पारकें संसारलें।' –शिशु ८७५. 'तेथ देओ संसा-रला।' –शिशु ६६०. [सं. संसृ]

संसारा—पु. १ संसार पहा. २ संयोग. 'का स्नेहा सूत्रा वैश्वानरा। जालियाही संसारा।' –ज्ञा १७.३५१.

ससाक्ष, ससाक्षिक, ससाक्षी—वि. साक्षीदार किंवा पुरावा असलेला; साक्षीसह (दस्तऐवज वगैरे). [स+साक्षी]

संसिद्धि—स्त्री. १ नैसर्गिक स्थिति; स्वाभाविक स्थिति; सहजगुण; स्वाभाविक गुणधर्म; जातिस्वभाव. २ पूर्णता; पुरते-पणा; साध्यता; समाप्ति; पूर्णदशा; फलप्राप्ति; इष्टप्राप्ति. ३ वैराग्य; विरक्ति; पूर्णज्ञान; आत्मज्ञान; यौगिक सिद्धि. 'जियें वैराग्य येणें बोले। मागां संसिद्धिरूप केलें।' –ज्ञा १८.९५४. [सं. सम्+सिध्-सिद्धि]

ससु—पु. श्वास; दम. 'चरणीं चाले भरला ससु।' –उषा १८४५. [श्वास]

संसृति—स्त्री. १ सृष्टि; जग; विश्व; मानवी जीवित; सृष्टीची घडामोड; विश्वपरंपरा; संसार; संसरण पहा. 'नेदिजेचि संसृति। माथां उधरे।' –ज्ञा १४.४९. २ प्रवाह; ओघ. [सं. सम्+सृ] **०पंथ**–पु. संसारक्रम; जीवनमार्ग; जन्ममरणादि परंपरा. 'जंव न होसी लिंगदेहातीत तूं। तंव न चुके संसृति-पंथु।'. **संसृष्ट**–धावि. संयुक्त; निगडीत; सांधलेलें; जोडलेलें.

संसृष्टत्व–न. १ (कायदा) एकत्रपणा; अविभक्तता; विभक्त झाल्यानंतरचा पितापुत्र, अगर भाऊ वगैरेंचा एकत्रपणा. २ एकी; मिलाफ; संयोग; जोड; संगति. **संसृष्टि**–स्त्री. १ जुळणी; जोड; मिलाफ; संयोग; एकी. २ एकत्र संग्रह; जमवाजमव; गोळा होणें. ३ विभक्त मालमत्तेचे निरनिराळे भाग पुन्हां एकत्र आणणें; विभक्त मालमत्ता एकत्र करणें. ४ (अलं.) रूपकांचें मिश्रण; मिश्र रूपक. **संसृष्री**–पु. एकदां विभक्त झालेला, पण पुन्हां आपला पिता, भाऊ किंवा चुलता वगैरेबरोबर एकत्र राहणारा समायिक कुटुंबांतील भागीदार.

ससेटा—पु. लोट; प्रवाह. 'जेथें बैसे तेथें बसे। नीर ससेटे वाहती नेत्रास।' –नव १५.१७. [ध्व.]

ससेमिरा—पु. एक प्रकारचें वेड. 'माझ्या शापानें तुला ससेमिरा या अक्षरांचें वेड लागेल.' –सिंहासनबत्तिशी. [स, से, मि, रा. हीं चार अक्षरें चार श्लोकांचीं आद्याक्षरें असुन त्या श्लोकांत एकानें आपल्या मित्राचा विश्वासघात केल्याची कथा आहे. ही कथा सिंहासनबत्तिशींत आहे.]

ससोरा—पु. घसा; गळा; मानगुटी. (क्रि० धरणें). [सं. श्वस्]

संस्करण—न. संस्काराची क्रिया [सं. सम्+कृ]

संस्कार—पु. १ हिंदु धर्मांतील कांहीं विशिष्ट आवश्यक विधि. हे त्रैवर्णिकांकरितां आवश्यक मानतात. हे सोळा प्रमुख मानतात पण त्यांचीं नावें निरनिराळीं आढळतात. उदा० गर्भाधान, पुंसवन, अनवलोभन, विष्णुबलि, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, सूर्यावलोकन, अन्नप्राशन, चूडाकर्म, उपनयन, महानाम्नी, समावर्तन, विवाह, और्ध्वदेहिक 'विदेशी मेले मरणें। तयास संस्कार देणें।' –दा २.७.७७. २ शुद्धिकरण; पवित्र करणें; कोणत्याहि गोष्टीच्या शुद्धीकरतां करावयाचा विधि; दोषापकर व गुणजनन. –केसरी २४.१.३६. ३ तयार करण्याची कृति; क्रिया; परिपाक (स्वयंपाक, औषधि, रसायन वगैरे पचन, भाजणें, चूर्ण करणें, पुट देणें, भावना देणें वगैरे क्रियांनी). ४ उजळा देणें; पूर्ण करणें; साफ करणें; विशदीकरण करणें (क्रिया, वस्तु वगैरे). ५ रूपांतर, बदल, नवीन विशेष गुण उत्पन्न करणें; कोणतेंहि कार्य करणें. ६ एखाद्या गोष्टीचा छाप, ठसा (उठणें); कार्य, परिणाम (दिसणें). [सं. सम्+कृ] **०रहित-विरहित**–वि. ज्याचे संस्कार झाले नाहींत असा. **संस्कारणें**–क्रि. संस्कार करणें; क्रिया, कार्य करणें. **संस्कर्ता**–पु. संस्कार करणारा. **संस्कार्य**–वि. ज्याचा संस्कार करावयाचा आहे तो; संस्कार करण्या योग्य. **संस्कारित**–धावि. संस्कार झालेला. **संस्कृत**–स्त्रीन. गीर्वाण भाषा; व्याकरणनियमांनीं बद्ध अशी भाषा. –धावि. १ ज्यावर संस्कार, कृति, क्रिया घडली आहे असा. २ शुद्धीकृत; पक्व. ३ अलंकृत; व्याकरणशुद्ध; उजळा दिलेलें; विद्वत्तापूर्ण. **संस्कृति**–स्त्री. १ संस्कार; क्रिया; पूर्णत्व. २ मनुष्यांचे जाति अथवा राष्ट्रस्वरूपी जे संघ त्यांचें भाषा, शास्त्रज्ञानादि रूपानें व्यक्त होणारें चरित्र. 'ज्ञातिराष्ट्रादि संघानां साकल्यं चरितम्।' मानवी जातीची बौद्धिक, धार्मिक, नैतिक, सामाजिक, सुधारलेली स्थिति.

सस्त, सस्ता—वि. स्वस्त; सवंग; अल्पमोली; सुलभ. [सं. स्वस्थ] **सस्तावणें**–अक्रि. स्वस्त होणें. –सक्रि. स्वस्त करणें; सवंग करणें. **सस्ताई**–स्त्री. सवंगाई; सवंगपणा; स्वस्ताई; स्वस्त असल्याची स्थिति. **सस्तासुकाळ**–पु. अत्यंत विपुलता; लयलूट.

सस्तन—वि. स्तनयुक्त; ज्यांस आंचूळ आहेत असे (प्राणि). (इं.) मॅमल. [सं.]

सस्त्र—न. शस्त्र, अस्त्र. 'अग्नी सस्त्र सुमरिलें।' –उषा १७२५. [शस्त्र]

संस्थ—वि. १ राहणारें; थांबणारें; वास करणारें; अधिष्ठित. उदा० जलसंस्थ=पाण्यांत राहणारा; वृक्षसंस्थ=झाडांत राहणारा; स्वर्गसंस्थ=स्वर्गांत राहणारा. २ कडे शेवट होणारें, पसरणारें; बाजूला, दिशेकडे असणारें. उदा० दक्षिणसंस्थ; प्राक्संस्थ; उदक्संस्थ. [सं. सम्+स्था]

संस्था—स्त्री. १ यथास्थित स्थिति; स्वास्थ्य; सुखावह स्थिति; स्थिति; स्थान. 'पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरत असतांहि तिची आकाशांतील संस्था बदललेली दिसत नाहीं.' –मराठी सहावें पुस्तक पृ. ३१९. २ शेवट; अंत; अखेरी; समाप्ति. ३ थांबणें; राहणें; वास. ४ ऋजुमार्गानें गमन; सुरळीत चालणें; सरळपणाचा व्यवसाय; सुसूत्र चालणें. ५ रचना; घडामोड; व्यवस्था. 'जैं सृष्ट्यादि संस्था। ब्रह्म्यानें केली।' –ज्ञा ३.८५. 'ते सांख्य कर्मसंस्था। जाणती केंवी।' –ज्ञा ५.२६. ६ घटना; योजना; कार्यनियुक्त मंडळी; कार्यार्थ केलेली मांडणी; उद्योग; सभा. (इं.) कॉर्पोरेशन. [सं. सम्+स्था] **संस्थापक**–वि. स्थापना करणारा; योजक; सुरू करणारा; प्रवर्तक. **संस्थापणें**–उक्रि. १ स्थापना करणें; योजणें; सुरू करणें; घटना करणें; घडवून आणणें. २ निश्चित करून स्थापन करणें; ठरविणें (धर्म, विधि). ३ अधिष्ठित, स्थाननिष्ठ करणें; मांडणें (राजा, मूर्ति). [सं. सम्+स्था] **संस्थापन-ना**–नस्त्री. योजना; निश्चिति; प्रतिष्ठा; मांडणी; बसविणें; स्थानापन्न करणें; सुरू, चालू करणें (राजा, मूर्ति, धर्म, विधि वगैरेचे). **संस्थापित**–धावि. योजलेलें; निश्चित केलेलें; ठरविलेलें; स्थापन केलेलें; रूढ केलेलें; मान्य करून घेतलेलें. **संस्थित**–धावि. १ निश्चित; स्थापित; समाप्त; पूर्णतेस नेलेलें;

प्रतिष्ठित; निर्णीत. २ राहिलेलें; निविष्ट आलेलें; आश्रित (सह, आंत, युक्त वगैरे). **संस्थिति**–स्त्री. १ पूर्णावस्था; शेवट; अखेर; पूर्णता; निर्णय. २ वास; कायमस्थान; युक्तता. ३ टिकाव; स्थिरता; एकाग्रता.

संस्थान—न. १ राजाचा गांव; राजवस्तीचा गांव, शहर; लहानसें राज्य; मांडलिक राजाचें राज्य. २ देवता, साधुसंत पंडित वगैरेस नेमून दिलेलें स्थान; देऊळ, मठ वगैरे सारखी ज्यास सरकारांतून उत्पन्न वगैरे मिळतें अशी जागा; देवाकडे, मठाकडे वगैरे नेमणूक असलेला गांव वगैरे. ३ देवता, साधुसंत यांच्याकरितां केलेली नेमणूक. [सं. सम्+स्था] **संस्थानिक**–पु. संस्थानाचा मालक; मांडलिक राजा; ज्याच्या चरितार्थाकरितां एखादें गांव वगैरे नेमून दिलें आहे अशी व्यक्ति. **संस्थानिक-संस्थानी**–वि. १ संस्थानासंबंधी; संस्थानांतील (उद्योग, चाकरी, व्यवसाय). २ राजकीय; राजसंस्थेसंबंधी ' प्रस्तुतच्या अपुऱ्या इंग्रजी इतिहासांत संस्थानिक वृत्तांखेरीज आमच्या विद्या, कला, स्थितिरीती वगैरे बद्दल एक अक्षरहि नाहीं. ' –नि १०५.

संस्पर्श—पु. संबंध; स्पर्श; शिवाशिव; संसर्ग; योग. [सं. सम्+स्पृश्] **संस्पृश्य**–वि.स्पर्शसुलभ; स्पर्श करण्यासारखा, योग्य; स्पर्श करण्यास शक्य; स्पर्शार्ह; स्पर्शवेद्य. **संस्पृष्ट**-धावि. संबद्ध; स्पर्श केलेला; योग आलेला; एकत्र आलेला; निगडित; युक्त.

सस्मित—न. हास्य; किंचित हंसणें. **सस्मित**–वि. १ हर्षित; हास्ययुक्त; हंसरा. २ (ल.) विकासित.

सस्य—न. १ सामान्यतः वृक्षाचें फल पण विशेष रूढ धान्य; पीक. ' ऐसेनि सस्यादि सकळां । करी धान्यजाती सुकाळां । ' –ज्ञा १५.४०५. ३ धान्याचें रोप. ' कां फळीं सरे वाढणें । सस्याचें जेवीं । ' –ज्ञा १८.४७५. [सं. षस्=निद्रा घेणें] **सस्यांत**–पु. धान्य कापण्याचा काल; सुगी; हंगाम; लाणीचे दिवस. ' सस्यांतीं निवडिलें । बीज जैसें । ' –ज्ञा १४.३५२.

सस्यू—पु. वर्णाश्रम. –मनको.

सस्वर—स्त्री. (कु.) सुसर पहा.

सह—वि. तीन. –आदिलशाही फर्मानें. [फा.]

सह—वि. (समासाच्या उत्तरपदीं) सोसणारा; सहन करणारा. उदा० दुःसह; सुसह; प्रसह; निस्सह. [सं. सह्]

सह—उपसर्ग. याचा अर्थ १ संगति; संबंध; साहचर्य. २ जोड; संयोग; योग. ३ वाढ; आधिक्य. ४ पूर्णता; पुरतेपणा; संपूर्णता.–क्रिवि. बरोबर; संगतीनें; जोडीनें. **०कार-कारिता**–पुस्त्री. सहाय्य; मदत; भागीदारी (काम करण्यांत, क्रिया करण्यांत). **०कारी**–पु. सहाय्यक; मदतनीस; सोबती; भागीदार; जोडीदार. **०कारी पतपेढी**–स्त्री. अनेक लोकांनीं संयुक्त जबाबदारीवर व पतीवर कर्ज काढून परस्परांस साह्य करण्याकरितां चालविलेली पेढी. **०कारी-मंडळ-मंडळी-संस्था**–नस्त्री. अनेक लोकांनीं मिळून एकत्र सामुच्चयिक जबाबदारीवर कार्य करण्याकरितां चालविलेली संस्था, **०गमन**–न. १ सती जाणें; पतीबरोबर स्त्रीनें त्याच्या चित्तेवर स्वतःस जाळून घेणें; पती दूर मरण पावला असल्यास पळसाच्या पानांच्या वगैरे त्याच्या प्रतिमेबरोबर चितारोहण करणें. २ (सामान्यतः) बरोबर जाणें; संगतीनें जाणें; सोबतीनें जाणें. **०चर**–पु.सांगाती; सोबती; मित्र. ' सहचरु मनोधर्मु । देवाचा जो । ' –ज्ञा १७.३३. –वि. बरोबर जाणारा. **०चरी**–स्त्री. १ पत्नी; लग्नाची बायको; २ मैत्रीण; सखी; सोबतीण. **०चारिणी**–स्त्री. धर्मपत्नी; स्त्री; (लग्नाची) बायको. **०धर्मचरिणी**–स्त्री. पत्नी; विवाहित स्त्री; लग्नाची बायको. **०धर्मिणी**–स्त्री. पत्नी; विवाहित स्त्री. **०पान**–न. एकत्र पिणें; एकत्र पान करणें. **०भागीदार**–पु. एकत्र कुटुंबांतील भागीदार; पातीदार;' वाटेकरी. **०भोजन**–न. पंक्तिव्यवहार; एकत्र भोजन; एका पंक्तींत अन्नग्रहण करणें. **०मरण**–न. सहगमन; सती जाणें. **०यात्रा**–स्त्री. सहगमन. ' साध्वीची सहयात्रा म्हणती । ' - मोमंभा १.६८. **०वर्तमान**–शअ. बरोबर; सहित; संगतीनें; जोडीनें. **०वास**–पु. १ एकत्र राहणें; साहचर्य; एक ठिकाणीं राहणें. २ परिचय; मैत्री; ओळख; संगत. **०वासणें**–उक्रि. १ एकत्र राहणें; संगत, सोबत असणें; उपयोगांत, असणें; नोकरी, चाकरी निमित्त जवळ राहणें. २ परिचय, सराव, संवय होणें; निकट सहवास, उपयोग इत्यादीमुळें स्वभाव, गुणधर्म, गुणदोष इ० माहीत होणें; अनुभव येणें. **०वासी**–वि. १ निकट राहणारा. २ एक ब्राह्मण पोटजात. **०संपादक**–पु. दुय्यम संपादक; संपादकाचा मदतनीस, सहायक ' दिवेकर हे मराठा पत्राचे सहसंपादक आहेत. ' –के २७.५ ३०. **०संवेदन**–न. एकदम ज्ञान, जाणीव होणें; दूर अंतरावर असलेल्या दोन व्यक्तींच्या मनांत एकच विचार येणें, एकाच प्रकारची स्फूर्ति होणें; विचारांची देवाण घेवाण होणें. (इं.) टेलीपथी. –साक्रेटीस संवाद १६३. **०हिस्सेदार**–पु समाईक कुटुंबांतील भागीदार. **सहाध्यायी**–पु. बरोबर अध्ययन करणारा; समकालीन विद्यार्थी; गुरुबंधु. **सहानुभाव, सहानुभूति**–पुस्त्री. वर्ण्यवस्तूशीं तद्रूपता; वर्ण्य वस्तूस होणारे भाव स्वतःस होणें. **सहोक्ति**–स्त्री. एक अलंकार, मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टीचा चमत्कारजनक उल्लेख. **सहोढ**–पु. विवाहाबरोबर येणारा मुलगा; विवाह करतेसमयीं पूर्वपतीचा किंवा उदरांत असणारा मुलगा; द्वादशविध पुत्रांपैकीं एक. **सहोदर**–वि. एकाच आईच्या पोटीं जन्मलेला; एकोदर; समानोदर; सख्खा (भाऊ). ' माय बाप तुका म्हणे सहोदर । तोंवरीच तीर न पावतां । ' –तुगा ४६. ' जें काळकूटाचें सहोदर । ' –ज्ञा १०.१९२.

सहज—वि. १ बरोबर झालेला; बरोबर निपजलेला, उत्पन्न झालेला; सहजात; बरोबर जन्मलेला; एकाच वेळीं असलेला. २ भाऊ; सहोदर; एकाच मातेच्या उदरीं जन्मलेला. ३ स्वाभाविक; जन्मजात; जन्मापासून असलेला; निसर्गसिद्ध; नैसर्गिक; स्वभावज. ४ सुलभ; सोपें. 'काशीस जाणें पैशावांचून सहज नव्हे. –क्रिवि. १ कोणताहि उद्देश मनांत न धरितां; निर्हेतुक; उगीच; निष्कारण; स्वाभाविकतः; आपोआप. २ विशेष प्रयत्न न करतां; सुलभतेनें; लीलेनें; साहजिकतेनें; विनाप्रयत्न. ३ विशेष कारण नसतां; निमित्त, प्रसंग, जागा वगैरे कांहीं नसतां. याच शब्दाचे सहजगतीनें, सहजगत्या, सहजरीतीनें, सहजरीत्या, सहजाखालीं, सहजासहजीं, सहजावारी, सहजावृत्त्या, सहजावृत्तीनें, सहजासहज; सहजांत, सहजानसार इत्यादि पर्यायशब्द होतात. **॰कला-ळा**–स्त्री. स्वाभाविक शक्ति. **॰गुण**–पु. निसर्गसिद्ध स्वभाव; स्वाभाविक गुणधर्म; उपजत गुण; जन्मजात स्वभावधर्म; देहस्वभाव. 'सहजगुणास न चले उपाये.' –दा २४.८.३१. 'सहजगुण लोकी न अन्यथा कोणी.' –मोआदि २.९७. **॰ता**–स्त्री. स्वाभाविकता; सहजपणा. **॰ता**–क्रिवि. स्वभावतः. 'आपण सहजता पूर्णकाम.'–तुगा ६३०. **॰प्रेरणा**–स्त्री. स्वाभाविक प्रवृत्ति; नैसर्गिक ओढ. ३ (इं.) इंस्टिंक्ट. 'त्यांच्या अपत्यप्रेमाला सहजप्रेरणा या सदरांत घालणारे...' –विचारविलासित. **॰मित्र**–पु. जन्मजातमित्र; जन्मापासून सहचर; मामेभाऊ, आतेभाऊ, मावसभाऊ. **॰शत्रु**–पु. जन्मापासूनचा वैरी; चुलत भाऊ; सापत्न भाऊ; सावत्रभाऊ. **॰समाधि**–स्त्री. मनाची समाधानी वृत्ति; सविकल्प अगर निर्विकल्प कोणत्याहि वृत्तींत स्वाभाविक आनंदी, समतोल मनोवृत्ति; मायिक उपाधींतहि स्वस्वरूपीं लीन असणें. 'असोन मायिक उपाधि। तेचि सहज समाधी.' –दा ११.१.४४. **॰सिद्ध**–वि. १ सुलभतेनें झालेलें; सहज उत्पन्न होणारें; सहज साध्य झालेलें. २ सहोत्पन्न; स्वाभाविक; नैसर्गिक; जन्मजात. **॰स्थिति**–स्त्री. १ नैसर्गिक स्वभाव, गुणधर्म. २ सरलमार्ग; स्वाभाविक स्थिति. **सहजारी**–पु. सहजशत्रु पहा. **सहजोदासीन**–वि. नात्याचा नव्हे असा; जन्मानें नातें नसलेला; स्वाभाविकतः मित्र किंवा शत्रु नसलेला.

सहणें—अक्रि. सहन करणें; सोसणें. 'जें जें अरि करिल तूं सहा सति तें.'–मोसभा ५.२०. 'वेतों मीं सकलां दिशांस बलि हें मत्कर्म आतां सहा.'–वेणीसंहार [सं. सह्] **सहन**–न. सोसणें; साहणें; सहन करणें; धीर काढणें. –क्रिवि. सोपें; सुलभ; सहज होणारें. **॰ता**–स्त्री. सहनशीलता; सोशिकपणा. 'धन्य विवेकी सहनता दृढ.'–दावि ४३५. **॰शक्ति**–स्त्री. सोसण्याचें सामर्थ्य; सहन करण्याचें बल; सोशिकपणा. **॰शील**–वि. सोशिक स्वभावाचा; धीराचा; सोसणारा; सहिष्णु. **सहनीय**–वि. सहन करण्यासारखें; सहन करण्यास शक्य, योग्य, युक्त. **सह्य**–वि. सहन करण्यासारखें; सोसेसें; सोसण्यास योग्य, शक्य, सुलभ, अवश्य.

संहत—धावि. १ संघटित; गुंफलेला; सांधलेला; जोडलेला. २ एकत्र केलेला; एकवटलेला; गोळा केलेला. [सं. सम्+हन्–हत] **॰जानु -जानुक**–वि. गुडघे जुळलेला; ढोंपरें एकत्र केलेला; **संहति**–स्त्री. १ संघ; समुच्चय; एकत्रितता. २ जोड; मिलाफ; जूट.

सहद—पुन. मध. [फा. शहद]

सहदेवमत—न. सहदेव नांवाच्या ज्योतिष्याची ज्योतिषशास्त्रांतील पद्धति. **सहदेवाचे ठोके**–पुअव. सहदेवाचे भविष्यविषयक अडाखे. **सहदेवी**–वि. सहदेवाच्या ज्योतिषपद्धतीसंबंधी; तीस अनुसरून असलेलें.

सहदेवी—स्त्री. एक औषधी वनस्पती.

सहनाई-नै—स्त्री. सनई पहा. एक सुषिरवाद्य. 'खालु कर्णे सहनै मृदंग। ढोल नडघे गिडबिडें चांग।'–स्वादि १०.२.४६.

संहरणें—उक्रि. नाश पावणें; नष्ट होणें; नाश करणें; लय करणें, पावणें. 'महाप्रलय अवसरें। हें त्रैलोक्य ही संहरे.' –ज्ञा २.१६१. [सं. सम्+हृ] **संहर्ता**–पु. नाश करणारा. –एभा ११.६०७.

संहर्ष, संहर्षण—पुन. संघर्षण; एकत्र घांसणें; घासाघीस; उगाळणी; घोटणी. [सं.]

सहल—स्त्री. १ रपेट; फेरफटका; मोकळ्या हवेंतील मजेनें फिरण्याचा व्यापार; मौजेनें फिरणें. २ फेरी; चक्कर; दौड (घोडा वगैरेस दिलेली). [अर. सैर्] **॰शिकार**–स्त्री. मर्दानी खेळ; शिकार वगैरे. **सहलणें**–सहल करणें.

सहल—वि.क्रिवि. सहज; सुलभ; सोपें; सोईस्कर; जुज्बी. 'गाजदीखान आलिया सहल पडेल.'–पया १३७. [अर. सहूल]

सहलावणें—अक्रि. सैलावणें; सईल होणें. [सं. शिथिल]

सहली—स्त्री. दासी; सखी; सहचरी. [सं. सहचरी]

सहवाणु—न. संवाहन; पाय दाबणें, चेपणें, रगडणें. 'वीडा देऔनि श्रीचरण सहवाणु। करतांतीं [']–दाव ३०९ [सं. संवाहन]

सहविकार—पु. (न्याय.) विगमनाचा एक प्रकार; एका वृत्तांतील विकारावर दुसऱ्या वृत्तांतील विकार अवलंबून असणें. (इं.) कॉंकॉमिटंट व्हेरिएशन. [सं.]

सहसा—क्रिवि. १ एकाएकीं; घाईनें; अविचारानें. 'ऐसें बोलौनि सहसा। जाळेयांतु रीगे अपैसा।–भाए ३२९. 'तें

सहसा कैसें काई। सांगा म्हणों।' –ज्ञा ११.३१. २ बहुशः; बहुतकरून; बहुधा; हजार हिश्यांनीं; कदापि; किमपि; कधीं; सर्वात्मना. 'हें काम मीं सहसा करणार नाहीं.' 'तो सहसा तुझ्या घरीं यावयाचा नाहीं.' 'नरदेह हा स्वाधेन। सहसा नव्हे पराधेन।' –दा १.१०.२५. 'त्याच्या हातून हें काम सहसा होणार नाहीं.'

सहस्कंध—पु. ज्याची मर्यादा चंद्रमंडलापर्यंत आहे असा सप्तस्कंधांतील चौथा स्कंध. [सं.]

सहस्र—वि. एक हजार. [सं.] ०**कर**–पु. सूर्य. ०**किरण**–न. सूर्य. ०**धृत**–न. हजार वेळां धुतलेलें औषधोपयोगी तूप. ०**दल**–न. १ कमल. २ ब्रह्मरंध्र; ब्रह्मदल. 'सहस्र दलाचा मेघु। पीयूषें वर्षोनि चांगु।'–ज्ञा १८.१०३९. ०**धा**–क्रिवि. हजार तऱ्हांनीं, प्रकारांनीं. ०**नयन**–न. इंद्र. ०**नाम**–न. १ हजार नांवांचा संग्रह, यादी (विष्णु, शिव वगैरे देवतांचीं हजार नांवें ग्रथित केलेला श्लोक संग्रह). २ विष्णु, शिव वगैरे देवतेस तुलसी, बेल, दूर्वा वगैरे वरीलपैकीं एकएक नांव घेऊन हजार नांवागणिक वाहण्याचा प्रकार. ३(ल) अपशब्द;शिव्या. 'तुम्हांस सहस्रनामें वाहतात.' –ख २७११. ०**फडी**–वि. १ हजार फडया असलेला (नाग, शेष). २ फडया निवडुंग. ०**फळ**–न. एक दोडक्यासारखें भाजीचें फळ व वेल. ०**भोजन**–न. एक हजार ब्राह्मणास अन्नदान देणें, जेवण घालणें. ०**मुख**–पु. शेष. 'न वर्णवती सहस्रमुखा। ब्रह्मादिका अलक्ष्य।' –एरुस्व १ २२. ०**रश्मि**–पु. सूर्य. ०**शः सहस्रावधि**–क्रिवि. हजारांनीं; हजारों. ०**शीर्ष**–वि हजार डोकीं असलेला (विराट पुरुष); हजार मस्तकांचा. फणांचा (शेष)' जी सहस्रशीर्ष याचे दाखले कोडीवरी होतातिं एकि वेळे।' –ज्ञा ११.२६९ **सहस्राक्ष**–वि १ हजार डोळ्यांचा. २ सर्व पाहणारा (विराट्पुरुष). –पु. इंद्र.

सहा—स्त्री. (बायकी) साय पहा.

सहा—वि. ६ ही संख्या. [सं. षट्] –नअव. (ल.) सहा शास्त्रें. 'साहीसहित वोहटा। वाहिला वेदीं।' –ज्ञा ११.६८२. 'तो हा पंढरीचा राणा। पुसा सहा चौं अठरांजणा।' –तुगा २५३९. ०**कमळें**–नअव. षट्चक्र पहा. ०**गुण**–पुअव. षट्गुण; सहा चांगल्या वृत्ती; ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य, ख्याति, यज्ञश्री, औदार्य. 'ज्ञान वैराग्य ऐश्वर्य ख्याति। यज्ञश्री औदार्य स्थिति। हे साही गुण वसिष्ठासी असती।' –भारा बाल १५.३५. ०**नकार**–पुअव. मौन, विलंब, भ्रूभंग, अधोवदन, गमन, विषयांतर. ०**मुखांचा**–पु. कार्तिकस्वामी. 'सहा मुखांचा दडाला। कपाटामाजी।' –ह ३.७. ०**सुभे**–दक्षिणेतील औरंगाबाद (अहमदनगर), वऱ्हाड, खानदेश, विजापूर, गोवळकोंडें (हैदराबाद) व बेदर (कर्नाटक) हे मोंगलांचे सहासुभे. 'सहा सुभे दख्खन.' **साडेसहासुभे**– १ विजापूर, १दौलताबाद, १ अहंमदाबाद–गुजराथ, १बऱ्हाणपूर–खानदेश, १ हैदराबाद–भागानगर, १ औरंगाबाद व अर्धा नागपूर. –शिदि २०. **साडेसहासुभे दक्षिण. सहा महिन्यांची जांभई**–अतिशय विलंब लागणारी गोष्ट. 'या सोनाराजवळ दागिना करावयास दिला म्हणजे सहा महिन्यांची जांभई.'

सहाकार, सहाकारी—सहकार, सहकारी पहा.

सहासष्ट—वि. ६६ ही संख्या. साठ व सहा. [सं षट्षष्टि]

सहाजणें–नें—नअव. शहादानें; मोठे नगारे; जयवाद्यें. 'यांणी ती जागा फते करून सहाजनें बाजवीत खेतीवर उभे राहिले.' –भाब ११. [फा. शादयान]

सहाण—स्त्री. १ गंध वगैरे उगाळण्याचा कुरुंदाचा दगड. २ शस्त्रास धार लावावयाचा दगड. [सं. शाण; प्रा. सण्ण]

सहाण—वि. (व.) सवान; सपाट (जमीन). [सं. समान]

सहाण—न. (व.) गाय, म्हैस वगैरे पशूंचें जननेंद्रिय. [सं सू=प्रसवणें]

सहाण—वि. लहान; सान पहा.

सहाण्यांत घालणें—(वाप्र.) सहादेवीव्रत करणें. –मसाप ४.४.२५९.

सहानक–की—सानक–की पहा.

सहानुभूति—स्त्री. समदुःखित्व; सहसंवेदन; दुःखाची दुःखित व्यक्तीबरोबर जाणीव. [सं. सह+अनुभूति]

सहामासकी–सहामास्की—स्त्री. १ सहा महिने टिकणारी. माठ भाजीची एक जात. २ वर्षातून सहा महिने दूध देणारी म्हैस. [सहा+मास]

सहाय–य्य—न. मदत; साह्य; हातभार. [सं. सह+अय्]

सहाय–यी—पु. मित्र; सोबती; मदतगार; मदतनीस; जोडीदार. [सं. सह्+अय्=गमन करणें; सह–इ=गमन]

संहार—पु. १ नाश; लय; क्षय; विनाश; प्रलय. २ निःपात; विध्वंस; मोडतोड; लोप (आकार, रूप, स्थिति वगैरेचा); उच्छेद. 'दैत्यांचा संहार करावया।' –तुगा ११. ३ गोळा करणें; जमवाजमव; एकत्र करणें. ४ संक्षेप. ५ संकोच; आकुंचन. [सं. सम्+हृ] **संहारक**––वि. नाश, क्षय, उच्छेद, प्रलय करणारा. **संहारण**–न. संहार पहा. नाश; विनाश; प्रलय. **संहारणें**–उक्रि. संहार करणें. **संहारिता**–वि. संहारक.

सहित—वि. १ बरोबर असलेलें; जोडून असलेलें; संगतींत असलेलें; युक्त; सहवर्तमान. २ सहन केलेलें; सोसलेलें; साहिलेलें. °–शअ. सह; बरोबर; संगती.

संहित—धावि. १ जोडलेलें; सांधलेलें; निगडित; युक्त. २ एकत्रित; जमविलेलें; गोळा केलेलें. ३ संक्षिप्त; आकुंचित; संकोचित. [सं. सम्+धा]

संहिता—स्त्री. १ (व्या.) सान्निध्य; सन्निहितत्व; अनुबंध; योग (दोन वर्णांचा संधि होण्यापूर्वीची स्थिति). २ वेदांची एका ठिकाणीं मांडणी; वेदांचें ग्रथन; वेदांची विशिष्ट शाखा; ऋग्वेद संहिता; यजुःसंहिता; मैत्रायणी संहिता वगैरे. ३ विशिष्ट ग्रंथाची रचना, मांडणी, एकत्रीकरण; शास्त्रादिकांचे मूळ ग्रंथ; पुराणादि ग्रंथ. उदा० सूतसंहिता; वाराहसंहिता; गर्गसंहिता; महाभारत. 'सांगे मुनीश्वराला एकशत सहस्र संहिता सौती.।' –मोआदि १.२२. ४ संग्रह; एकत्रग्रथन; रचना; मांडणी.

सहिलावणें—उक्रि. (राजा.) सईल होणें; ढिलें पडणें; सैलावणें. [सं. शिथिलीभवन] **सहील**–वि. (राजा.) सैल; ढिला; पोकळ. [सं. शिथिल]

सहिष्ण, सहिष्णु—वि. सहनशील; सोशिक; सोसणारा. 'उच्छंश आणि सहिष्ण। तोचि आत्मा।' –दा १३.१.१७. [सं. सहिष्णु] **सहिष्णुता**–स्त्री. सहनशीलता; सोशिकपणा.

सही—स्त्री. सखि; मैत्रीण. 'तेथें येऊनि नारदें शिकविली बाळासि पाळी सही.' ९० अकक २. –कृष्णकौतुक [सं. सखिन्]

सही—स्त्री. स्वाक्षरी; स्वतःच्या हातानें लिहिलेलें स्वतःचें नांव; बरोबर असल्याबद्दलची निशाणी, दस्कत. 'त्यावरी आपणही सही घातली.' –भाब ४२. –वि. योग्य; मान्य; खरें; बरोबर; पूर्ववत; बहाल; अचूक. सई पहा. 'मग सही तूं थोर ब्राह्मण।' –दावि ३१८. 'ती याद सही व मान्य असे.' –रा ७.२२. –क्रिवि. (व.) पुरेसें; लाभांत. 'एकला बाटलीच सही.' [अर. सहीह्] **सही करणें**–नक्की करणें. 'एकशें शिक्का रुपयांस ग्रंथ कोतवाल यांनीं सही केला असतां...' –घाको ७१. **सही सलामत**–वि. सुखरूप; सुरक्षित. 'ती बापडी आजतागाईत सही सलामत आहे.' –भाबं ५. **सही-सही**–क्रिवि. १ तंतोतंत; हुबेहुब; बरोबर. 'केव्हां केव्हां तर सही-सही अगदीं माझेंच प्रवेश मी पहातों आहे असें मला आढळून आलें.' –सुदर्शन ११. २ हळू हळू; हलकें हलकें. 'नातवानें मंहमदखांचें कपट ओळखून चिडून जाऊन सही सही, तान घेतली. –ल. द. जोशीकृत संगीत शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास ६०. **सहीसाक्ष, सहीसूद** –सईसाक्ष, सईसुद पहा.

सही—स्त्री. गोटयांच्या खेळांत केलेला खड्डा; बदा; या खड्ड्यांत गोटी टाकण्याची क्रिया.

संहृत—धावि. १ नष्ट; उच्छेदित; विनाशित; विलीन. २ ग्रथित; एकत्र केलेलें; गोळा केलेलें. संहार पहा. ३ संक्षिप्त; आकुंचित. [सं. सम्+हृ]

सहृदय—वि. १ हृदय असलेला; दयाळु; प्रेमळ; सहानुभूतिक. २ आवड असलेला; प्रवृत्ति असलेला; मन घालणारा; गोडी असणारा.

सहेतु, सहेतुक—वि. हेतुपुरःसर केलेलें; सकारण; साधार. [स+हेतु]

सहेली—पु. सहल पहा; रपेट; व्यायाम. [अर. सैर]

सहेली—स्त्री. फकीरांच्या गळ्यांतील माळ; सली.

सहेली—स्त्री. सखी; मैत्रीण; सहचरी. 'पठाण मोंगल सहिल सहेल्या।' –ऐपो २११. [सं सहचरी]

सह्य—वि. सहन करण्यास योग्य. [सं.]

सह्य—पु. एका पर्वताचें नांव; सह्याद्रि; पश्चिमेकडील कोंकण व देश यांमधील एक पर्वत. 'गेलें रामासह तें **सागरतीरासि** उतरुनी सह्य।' –मोरामायणें १.६०.३४.

सळ—पु. १ अभिमान; आग्रह; हट्ट; ईर्षा. 'म्हणौनि कामाचेनि बळें। जो विषय सेकें पाहे सळें।' –ज्ञा १६.४५४. 'अहंकारें सांडिलें सळ। वियोगु देखौनिया।' –ऋ १०१. 'बळियाचीं आम्ही बाळें। असों निर्भर या सळें।' –तुगा १८१८. २ बळ; झपाटा; उसळी; ऊर्मी; आवेश. 'तैसा नुठी जया सळू। कामोर्मीचा।' –ज्ञा १५.३०२. 'हाणित थाप मुखांत सळानें।' –आ नवरस चरित्र ११७. [स. शल्य]

सळ—पु. भंग; मोड; न्यूनता. 'योगनिद्रा तरी न मोडे अकर्तेपणा सळु न पडे।' –ज्ञा ५.७८.

सळ—न. १ छळ; संकट; पीडा; गांजणूक. 'समुद्रलंघनाचें सळ। तुजवरी केवळ नये घालूं।'–भा रा किष्किंधा १७. ४०. २ घडामोड; कटकट; सुखदुःख. 'गेलें तारुण्य गेलें बळ। गेलें संसारीचें सळ।'–दा ३.५.४५. [सं. छल] **सळणें**–अक्रि. १ छळणें; गांजणें; त्रास देणें. 'जे बुद्धीतें सळी। निश्चयातें टाळी।' –ज्ञा ६.४१४. 'उपाधीच्या योगें सळिसी तूं आम्हां।' –मध्व ७२. २ भिणें; भयभीत होणें. 'जयाचेनि नावें सळे। महाभय।' –ज्ञा १६.४१८. 'ईस देखोनि सळसी।' –आपुतना वध. ३७.८. 'त्यास देखतांचि सळिजे। का उठोन तात्काळ पळिजे।' –ह ६.१९. **सळणूक**–स्त्री. छळणूक.

सळ—न. द्वेष; वैर; दावा; वांकडेपणा. 'पतंगु जैसा सळें। दीपाचेनि।' –ज्ञा १८.६१८. [सं. शल्य]

सळ, सल—न. बाणाग्र; टोंचणी; लोखंड लांकूड वगैरेचा अणीदार बोंचणारा तुकडा. हृदयीं तप्तलोहाचें सळ। साहों येईल चिरकाळ। परी दुष्ट शब्दाची जळजळ। मरणान्तींहि शमेना।' –मुआदि १८.४१. [सं. शल्य]

सळ—न. २ पीक कापल्यावर उरणारा धस; सड; कापलेला बुडखा किंवा त्यास फुटलेला अंकुर. [सं. शल्य]

सळ—पु. १ तरवारीची मूठ म्यानास बांधावयाची दोरी, बंद. 'स्वार भाले वारूवर सळ सोडिले फिरंगीचे।' –ऐपो ५७. २ (सामान्य) बारीक वादी (कातडें शिवण्याची). [सं. शलाका]

सळ—पुस्त्री. घडीची दुमड, मोड, रेषा. [सं. शलाका]

सळ—स्त्री. (सोनारी) सोन्याची लगड. [सं. शलाका]

सळई—स्त्री. १ सुई; बारीक तार; लोखंडाची वगैरे बारीक काडी; ताडी; टोंचणी; भोंसकणी. २ मुसळाचें गोल लांब लांकूड; लोखंडी गज, पहार. ३ मुगटयांतील विणीच्या रेषा. ४ कडबा, गवत, फळें वगैरे मोजतांना दर शेंकडा वगैरे ठराविक झाल्यावर जासूस काढून ठेवलेली पेंढी वगैरे (यांवरून एकंदर माप किती झालें तें ठरवितां येतें); भात मोजतांना आठवणीकरितां, खुणेकरितां पुंजी करून ठेवतात ती. [सं. शलाका; प्रा. सलाया] **सळईचा मुगटा**-पु. ज्या मुगटयाच्या विणींत लहान लहान चौकटी न दिसतां पेट्टे पेट्टे किंवा रेषा दिसतात असा मुकटा. याचे उलट मुगवा मुगटा (लहान लहान चौकडींचा). **सळय-यी**-सळई पहा **सळी**-स्त्री. सळई.

सळक—स्त्री. १ पावसाची सर, सळकधार असाहि वाक्प्रचार आहे. २ तोफांची सरबत्ती; बंदुकांची फैर; शिलग. 'सळका सुटूं लागल्या।' –ख ४२.८९. [ध्व. सळ]

सळक—स्त्री. शिलका; कळ; उसण.

सळक—स्त्री. हद्द; मर्यादा; रेषा. 'पर्वता भोवत्या सळक घालिजे। तिया उलंगुनु न जाईजे।' –ज्ञिपु १.१८.२९. [सं. शलाका]

सळकण-कन-कर-दिन-दिनीं-दिशीं—क्रिवि. सळसळ असा आवाज करून. [ध्व.]

सळकणें—अक्रि. १ सळसळ आवाज करणें; सर्कन निघून जाणें (सापाप्रमाणें). २ घसरणें; निसरणें. ३ गुपचुप निघून जाणें; सटकणें; निसटणें. [ध्व.]

सळका—पु. १ सणका; शिवशिव; रवरव; खवखव; कंड; खाज. (दातांस चावण्याची इच्छा, अतिशय खाजविण्याची वगैरे इच्छा होऊन सुटणारी). (क्रि० सुटणें; येणें; लागणें; जाणें; जिरणें). २ जोराची पावसाची सर. (क्रि० येणें). [ध्व. सळा, सळा]

सळडण—न. (व.) घरावरील कुजकें गवत.

सळणें—अक्रि. १ सळसळणें; उकळी फुटणें; खतखतूं लागणें. २ सळक लागणें; रवरवणें; खवखवणें; शिणक लागणें. 'जयातें बहु सुधा सळे।' –ग्रंथराज ७, महाराष्ट्र सारस्वत [ध्व.]

सळदें—न. (कों.) शिऱ्यांचा झांपा; कुंपणाकरितां काटया-कुटया बांधून तयार केलेलें झडप.

सळनळीत, सळनळ—वि. १ सरळ; थेट; ताठ; सीधा; संधिरहित. २ अगदीं; निःशेष. उदा० सळनळीत उभा.=थेट उभा; किंचितहि बांक नसलेला. 'सळनळीत नागवा'=अगदीं नग्न, निर्वस्त्र.

सळप, सळंप—नस्त्री. (राजा.) लाकडाची धलपी; किलची; चीप; कुळपटा. [सं. च्छाल] **सळपा, उसळपा**-पु. (राजा.) लांकडांचा ठोकळा; मोठा ढलपा.

सळभेसळ—स्त्री. मिसळ; मिश्रण; सरभेसळ; एकंकार. 'अशी सळभेसळ करून आपणांस कोठेंच थारा नाहीं.' –आगर ३.१४३. [भेसळ द्वि.]

सळमिसळ—स्त्री. मिश्रण; पंचभेळ; खिचडी. –क्रिवि. एकत्र; मिश्र. 'सळमिसळ करीना सर्वथा क्षीरतार्की।' –र २९. 'सखेही सांगातें सळमिसळ झाले सकळ ते।.' –र २१. [मिसळ द्वि.]

सळवंगी—वि. कपटी; लबाड. 'सळवंगेआं देवांचां जगथापु।' –शिशु १५४. [सं. छल+अंगी]

सळवठा—पु. (कों.) खराटा; सळाथी पहा.

सळसळ—स्त्री. १ सळ असा आवाज; उकळी; खदखदणें. (क्रि० करणें; वाजणें). २ शिवशिव; रवरव; कंड (जखम, गळूं वगैरेची); तडस; मुसमुस (भरलेले स्तन वगैरेची); घुरचुर; खवखव; शिवशिव (दांत, जीभ वगैरेची) (क्रि० सुटणें).[ध्व.] **सळसळ-ळां, सळाळां**-क्रिवि. १ सळसळणारा आवाज करून (आधण वगैरे). (क्रि० वाजणें; करणें). २ थरथर, धडधड, वगैरे आवाजासारखें. **सळसळणें**-अक्रि. १ उकळणें; खदखदणें; उसळणें (पाणी वगैरे सळसळ आवाज करीत, रक्त वगैरे). 'सळसळणाऱ्या रक्ताला।' –संग्रीमगीतें १०३. २ शिवशिवणें, रवरवणें; कंड सुटणें (खरूज, गळूं वगैरे). ३ तटतटणें; हुळहुळणें; मुसमुसणें (भरलेले आंचूळ, स्तन, स्तनाग्रें वगैरे). ४ शिवशिवणें; खवखवणें (दांत, हात, पाय, जीभ-खाण्याकरितां, चावण्याकरितां, मारण्याकरितां). ५ कुडकुडणें; थरथरणें; शिवशिवणें (थंडी, आंबट पदार्थे वगैरेमुळें-दांत वगैरे). ६ सळसळ असा आवाज करीत जाणें (सर्प वगैरे). [ध्व.] **सळसळीत**-वि. गुळगुळीत; तुळतुळीत; तक्तकीत.

सळसळा—पु. (राजा.) शिरीषाचें झाड (याच्या शेंगांचा आवाज होतो त्यावरून).

सळा—स्त्री. तारेची सळई; भोंसकणी; लोखंडाची काडी, ताडी; कळकाची वगैरे अणकुचीदार काडी, ढलपी. [सं. शलाका]

सळा—पु. छल. [सं. छल]

सळाक-ख—स्त्री. सळई; गज. [सं. शलाका]

सळाथी—स्त्री. (कों.) हिरांची केरसुणी; झाडू. [सड+आथी]

सळासळा-ळां,सळाळां—क्रिवि. सळसळ पहा.'झाडांचीं पानें सळासळा वाजत होतीं.' –कोरकि ४३३.

सळाळ—पु. १द्रवपदार्थ उकळतांना होणारा सळसळ आवाज. २ सरपटण्याचा आवाज. ३ फूत्कार; डुरकण्याचा वगैरे आवाज. [ध्व.] **सळाळणें**–अक्रि. सळसळणें पेक्षां अधिक तीव्र. १ उकळतांना वगैरे सळसळ आवाज करणें. २ जोरानें, मोठ्यानें फूत्कार टाकणें (सर्प वगैरेनीं). ३ मोठ्यानें डुरकणी फोडून, गर्जना करून अंगावर चाल करून जाणें. ४ जोरानें म्यानांतून काढणें (तरवार वगैरे); जोरानें सरपटत जाणें; जोरानें निसटून जाणें.

सळी—स्त्री. सळई पहा.

सळी—स्त्री. कळी; कुचाळी; कुभांड. ' जें सळी लाविली वायेंची । आपणेआं आपणु । ' –शिशु २००. [सं. छल=कपट]

सळी—स्त्री. हांव; ईर्षा. 'प्रपंच लटिका म्हणतां सळी अधिक ' –दावि ६१.

सळिवें—न. सरवळा, शेवई, गव्हला यासारखें खाद्यविशेष. ' नाखिवां माळतिया सळिवें । इत्यादि वळिवट्ट बरवें । '–ऋ८२.

सळु—स्त्री. सळ पहा. रेषा; घडी; दुमड. ' सिंधुची सीव न मोडे । पाणीपणा सळु न पडे । ' –अमृ ७.२६१.

सळु—पु. सळ पहा. आग्रह, बल, न्यून इत्यादि.

सळे, सळा—स्त्री. १ वादी; शिवावयाची तांत. २ मापाची पट्टी; वादी. ' माप टाकी सळे धरिली विद्रलें । थापटोनी केलें समाधान । ' –तुगा ४९०. [सं. शलाका]

सळें—क्रिवि. सत्वर; त्वरित; एकदम. ' पाअेंधूळि रगडे । तरि सळें माथेआं चढें । ' –शिशु ४७२. ' तें बंधन तोडावें स्वामि सळें. ' –विपू १.९३.

सळो कां पळोसें करणें—अतिशय त्रासून सोडणें. 'इंग्रजांस सळोका पळो करून सोडल्याखेरीज ते कांहीं देणार नाहींत.' –केले २.२.४७.

संक्षय—पु. १ विनाश; विलय; प्रलय; विश्वलय. २ (सामान्यतः) नाश; नायनाट; मोडतोड. [सं. सम्+क्षी]

संक्षिप्त—धावि. संक्षेप केलेलें; लहान, आंखूड केलेलें; थोडक्यांत आणलेलें; सारांशरूपानें मांडलेलें. [सं. सम्+क्षिप्]

सक्षुर—वि. खूर असलेले (प्राणी); प्राण्यांचा एक वर्ग. –प्राणिमो ३७. [सं.]

संक्षेप—पु. १ सारांश; निष्कर्ष; समाहृति; थोडक्यांत मांडणी. २ (गणित) अंश व छेद यांतून साधारण गुणक कमी करणें. [सं. सम्+क्षिप्=फेंकणें,] **संक्षेपें**–क्रिवि. थोडक्यांत; सारांशरूपानें. ' ऐसी हे आदि परंपरा । संक्षेपें तुज धनुर्धरा । ' –ज्ञा ३.१३८. **संक्षेपण**–न एकत्र आणणें; थोडक्यांत मांडणी; सारांश; संकोचन. **संक्षेपणें**–उक्रि. संकोचन करणें; आकुंचन करणें; एकत्र आणणें, ओढणें, खेंचणें; आकर्षण करणें. **संक्षेपतः**–क्रिवि. थोडक्यांत; सारूपानें. **संक्षेपिक**–वि. संक्षिप्त; निष्कर्षित; संक्षेपासंबंधीं; सारभूत. **संक्षेपोक्ति**–स्त्री. सारभूत भाषण; थोडक्यांत बोलणें, मांडणें; सारांशकथन.

सक्षौर—वि. क्षौरासुद्धां; दाढीमिशासुद्धां सर्व हजामत करून घेतलेलें (प्रायश्चित). ' माधवरावजींनीं इतरांसाठीं हें प्रायश्चित घेतलें नसतें तर त्यांना सक्षौर प्रायश्चित्त घ्यावें लागलें असतें. ' –आगर ३.१३५. [सं. स+क्षौर]

संज्ञक—वि. संज्ञा असलेला; नांवाचा; नामेंकरून. उदा० गुणसंज्ञक; विष्णुसंज्ञक; तत्रत्यसंज्ञक. [सं.]

संज्ञा—स्त्री. १ नांव; अभिधान; आख्या; संकेतशब्द. २ संकेत; खूण; इषारा; चिन्ह. ' आणि आंगीं वृद्धाप्यतेची । संज्ञा ये मरणाची । ' –ज्ञा १३.७६१. ' संज्ञा करोनि मातेसी । ' –गुच ११.६१. ३ गायत्री. ४ (व्या.) पारिभाषिक नांव; शास्त्रीय नांव. ५ शुद्धि; चेतना; ज्ञान; बुद्धि. [सं. सम्+ज्ञा=जाणणें] **०पत्र**–न. मुखपृष्ठ; नामपत्र. ' या ग्रंथाच्या संज्ञापत्रावरून तीन ग्रंथांचीं यांत नांवें आलीं आहेत. ' –नि ४४४. **०वान्**–वि. १ प्राज्ञ; जाणता; विद्वान. २ शुद्धींत असलेला; सावध.

सज्ञान—वि. १ शाहाणा;हुषार; बुद्धिवान; विद्वान; जाणता. २ (कायदा) वयांत आलेला; जाणता; समजूं लागलेला. अज्ञानाचे उलट. [सं.]

संज्ञी—वि. संज्ञा असलेला; नांव असलेला; त्या नांवाचा.[सं.]

संज्ञीक—वि. (सांकेतिक) विशिष्ट चिन्हांनीं दर्शित; विशिष्ट खुणांनीं, हावभावांनीं वगैरे दिग्दर्शित; विशिष्ट संकेत, ठराविक चिन्हें यांच्या योगानें जाणावयाचा. [सं.]

संक्षु—वि. चालतांना गुडघ्यास गुडघा लागणारा; ढोपरघाश्या. [सं.]

सा—वि. १ सहा; ६ संख्या. ' पाचारूनि अतिदंता । होय विधिता सा बाणीं । ' –एरुस्व १०.१८. २ (सांकेतिक) सहा शब्दें. ' सा चहूं वेगळा अठरा निराळा । ' –तुगा २४७. [सं. षष्–ट्; म. सहा.]

सा—असा यांचें संक्षिप्त रूप; सारखा, सदृश या अर्थी विशेषणें, क्रियापदें इ० ना हा प्रत्यय लागतोः उदा० बरासा, मोठासा, जाईसा, येईसा इ० नांमांना लावतांना कांहीं विकृती होतात. उदा० आज मला निद्राशी वाटली –जेवणसें वाटलें–उपोषणसें वाटलें; पाऊससा–वारासा वाटला; ऊन्हसें वाटलें. इ० ' जो धैर्यें धरसा सहस्रकरसा तेजें तमा दूर–सा ' –र ४. कधीं नुसता

विधानाला जोर येण्यासाठीं वापरतात. 'अरे, मीच सा काय' –मोर ६. [असा.]

सा—स्त्री. १ लक्ष्मी; पार्वती; देवी. २ (महानु.) नांवापुढें लावतात. उदा० कामाइसा; बाईसा. [सं.]

सा—सावकार याअर्थी नांवापुढें लावतात. उदा० पांडुसा; रेणुसा. [सं. साधु; शहा–साहु–शा–सा]

सां—(संक्षेप) साष्टांग.

साअत, साईत—स्त्री. घटिका; मुहूर्त; क्षण. 'नजुमियास बोलावून साअत पांच घटका रात्रीची ठरली.' –रा ५.२७. [अर. साअत]

साइखा(क)डें—न. कळसुत्री बाहुली. 'साइखडियानें काइ प्रार्थावें। सूत्रधारातें।' [सूत्रकृष्ट; प्रा. सुअकट्ठ?]

साइपण—स्वतः; खुद्द. अमृ ७.७९. [सं. स्वयम्; प्रा. सयं, सइं] साई पहा.

साइला—पु. (कों.) देवासाठीं मारलेलें जनावर. 'गांवांत देवस्कीचा साइला पडेल त्याचे फरे खोताला देतात. [का. साय =मरणें]

साइ(ई)ली—स्त्री. सावली पहा 'सर्व सुखाची साइली मोडली। आनंदाची खुलौरी हारतली। –भाए ९०.

साई—स्त्री. १ छाया; सावली. 'जेथें सुशीतळ महीतळ सांद्र साई। –नल ८८. २ (ल.) आश्रय; छत्र. 'बहिण, बंधु, बाप, आई। सकळ गोताचिच साई।' –तुगा ६९३. –वि. खिन्न. 'जरि तुझें हें चित्त साई।' –शिगीता ६९. [सं. च्छा–ा]

साई—स्त्री. स्वाती नक्षत्र. [सं. स्वाती; प्रा. साइ] **साईचा पाऊस**–पु.(कुण.) स्वाती नक्षत्रांत पडणारा पाऊस. –मसाप २.३.६५.

साई—पु. १ कर्नाटकांत धनी, मालक, मोठा माणूस इ० स आदरार्थी संबोधन; स्वामी (अप.) २ गोसावी; साधु. [सं. स्वामी; हिं. साई]

साई—स्त्री. १ साय; मलई. २ साईसारखा थर, पापुद्रा.

साईत—न. (प्र.) साहित्य पहा. ०**सुईत**–न.(व्यापक.) साहित्य, सामान वगैरे. 'साईतसुईत काय लागावयाचें तें तयार कर, जा.' –बाळ २.१०६.

साईर—स्त्री. १ ओळ; रांग (मुंग्या इ० ची). २ थवा; झुंड; झांक (पक्ष्यांची) 'एथें दाणे घाल म्हणजे आतां पारव्यांची साईर येईल.' ३ घोळका; घोंगाट; घोळ (माशा इ० चा). ४ कळप; झुंड (डुकरांची). ५ टोळकें; समुदाय; यूथ (वानर व इतर जनावरें यांचा). [सं. स्वैर? अर. साइर=सव?]

साईर, साईरबाब–सायर, सायरबाब पहा.

साईल—साइला पहा.

साईल–स्त्री. (महानु.) मैत्रीण. 'मग सेजीया साइलीया असति तीया म्हणेति।' –दृष्टांतपाठ ४४. [सखि]

साईली—वि. सावली पहा. –वाडमा १.१६१.

साईस—पु. मोतद्दार; घोडेवाला. सईस पहा. [अर. साईस्]

साउजी—वि. सालस; गरीब. 'भावूजी, महा साउजी।' –अमत ३४. [सं. साधु; हिं. साउ+जी]

साउट—सावट पहा.

साउपा—वि. शुद्धीवर आलेला; सावपा पहा. 'त्यातें मेघवृष्टीच्या आपें। शिंपोनि केलें साउपें।' –मुआदि ४.१०४.

साउंबरा—वि. डवरलेला; विस्तारलेला. 'नवरत्नांचां चौबारां पद्मरागाचा लंबोदरा। वाटारंभी साउंबरा। नाचतु दिसें।' –शिशु ३३५. [साउंबर (स+आडंबर) मूळ शब्द असेल]

साउमा–मीं–में–मेयां—वि.क्रिवि. १समोर; पुढें; सामोरा. सन्मुख. –ज्ञा १४.२८५. 'साउमा येऊनि आपण। वसुदेवादि उग्रसेन। नमस्करूनी संकर्षण।' –एरुस्व १५.३९; 'नगांबा साउर्मी येति।' –पूजावसर; 'मग बोले ऋषिनंदन। साउमे याजी या आलिंगन।' –कथा ३.३.२७; 'तेथें बहुतें डंबाळें। पांडवूं साउमेयां आलें।' –शिशु ५७९. २ प्रत्यक्ष; साक्षात्. 'तेथ साउमा घेयावा उवावो। तंव वोडवला आन प्रस्तावो।' –ज्ञा १६.६२; –शिशु ३०९.[सं. सन्मुख]

साउली—स्त्री. छाया; सावली पहा. 'साउलीवरी न मववे। मवितें जैसें।' –अमृ ५.२६.

साउलें—न. एक प्रकारचें वस्त्र, लुगडें. 'काळें साउलें नेसली। –कथा ६.१०.६३; –आप ९५. सावलें पहा. [देप्रा. साउली]

साउळ—स्त्री. पांढरेपणा. 'दाढी साऊळ धरी। मानें हालौनि वारी।' –ज्ञा १३ ७५७.

सा(सां)उळा—वि. सांवळा पहा.

साऊ—पु. सावकार; साव पहा. 'रामकृष्ण साऊ देवगिरी स्थानीं।' –सप्र ११.७. [साधु; साह]

साऊळ—स्त्रीन. माड, पोफळी इ० ची झावळी. सावळी पहा. ०**शीर**–वि. चांगली वाढलेली; झुपकेदार. 'जाई, जुई, बटवे, साऊळशिरे।' –कथा ४.१८.१०८.

साक—स्त्री. पसा; एका हाताची ओंजळ (पाणी, धान्य इ० घेण्यासाठीं केलेली). **साकेनें पाणी पिणें**–हातानें पाणी पिणें.

साक—स्त्री. १ साक्ष; पुरावा. 'कजे घेण्यादेण्याच्या बाक्षीची राजानें फिर्याद घेऊं नये, एकमेकांची साक ठेवून एकमेकांनीं देणेंघेणें करावें.' –वेदोक्तधर्मप्रकाश. २ टेहळणी; पहारा, शोध, यासाठीं बसविलेला माणूस, माणसें. (क्रि० बसविणें, ठेवणें, राखणें). [सं. साक्ष्य; प्रा. सक्ख]

साक—स्त्री. १ व्यापारी पत, अब्रू. 'सावकारांना साळसुद पणा दाखवून ते आपली साक वाढवितात.' –गुजा १५२. २ (सामा.) नेकी; शील. साख पहा. **०खाणी**–वि. अब्रूचा; लौकिकवान 'कुलेवान चित्तेवान। साकखाणी पहिलवान।' –नव ११.६८. **०पाक**–साकद्वि. **साकीपाकीचा**–वि १ पतीचा; अब्रूचा. २ नेकीचा; शीलाचा. **०सुरत**–वि. नीटनेटका; व्यवस्थित (लेख, भाषण, इ०). साखसुरत पहा. –क्रिवि. उघडपणें; राजरोस; सर्वांदेखत **साकी**–स्त्री. साक पहा.

सांकटण-णें,साकटा—न.पु. लाकडाचा ठोकळा (यावर पदार्थ ठेवून तोडण्यासाठीं). **सांकटणें**–उक्रि. १ सांकटणावर ठेऊन तुकडे करणें, तोडणें. २ (ल.) नाश करणें; धुव्वा उडविणें (सैन्य इ० चा).

साकटी—स्त्री. कळकाची काठी; शेकाटी. –कृषि ४९४.

सांकड-डा—वि. १ अरुंद; आकुंचित; लहानशी (जागा, भांडें, इ०). 'इंद्र श्रीहि सांकड। गमों लागे।' –ज्ञा १४.१६३. २ घट्ट; आंबळ. ३ आखूड; थोटकें (वस्त्र, पादत्राण, इ०). ४ कठीण. 'तेवीं स्वधर्मु सांकडु। देखोनि केला जरी कडु।' –ज्ञा १८. ९२६. **म्ह०**घर सांकड बाईल माकड. **सांकड-डें**–स्त्रीन. १ अडचण; संकट. 'जरी चिंतामणी हातां चढे। तरी वांछेचें कवण सांकडें।' –ज्ञा ३.२३. २ खड्डा; गर्ता. 'नद्या पर्वतीहूनि कोसळल्या। नाना साकडीमधे रिचवल्या।' –दा १६.४.४. ३ कोंडें; विचार. ४ ओझें; भार. [सं संकट] **सांकडणें**–क्रि. संकटांत सांपडणें; अवघडणें; अडचणींत 'स्वगें सांकडलों। दोन्ही भागीं।' –ज्ञा ११ ३२९;६ २१४. **सांकडी**–स्त्री. सांकड.

सांकडा—पु. गाडीची बैठक. [सांगाडा]

सा-(सां)कण—स्त्रीन. गाडीची आख व आखरी, धूर व जूं यांना एकत्र बांधणारी दोरी.

सा(सां)क(ख)र्णे—अक्रि. गोठणें; बोळणें; घट्ट होणें; थिजणें. **साकविणें**–प्रयोजक क्रि. गोठविणें; घट्ट करणें. [सं संच्]

सांकर्णे—क्रि. (खा.) चाखणें. 'रामा ई बोरें मायुंज पयले मांआ हारा दातार्की साकी विईनें.' –भिल्ली २७.

साकर—स्त्री. साखर पहा. 'साकरेची कीजे कुरोंडी। कवितालतेसी।' –शिशु १८.

सांकर—पु. पाट, मोरी इ० मधील प्रवाह अडविणारा केर, पातेरा, काटक्या वगैरे जमतो तो गाळ. २ गातेबोलते वेळेस शब्द नीट उमटविण्यास प्रतिबंध करणारा गळ्यांतील कफांश, बेडका, खाकरा. [सं. संकल्?]

सांकरू—न. (खा.) रताळें; कंद. [शर्करा]

सांकल्पिक—वि. संकल्पिलेलें; योजलेलें; ठरविलेलें.

साकल्य—न. १ सकलता; संपूर्णता; निःशेषता. २ सर्व; समुदाय, एकंदर आकार, जमा, गोष्ट. (समासांत) साकल्य-वर्तमान-वृत्त-अर्थ. [सं.]

सांकव—पु. (राजा.) तात्पुरता पूल. सांकू पहा.

सांकशा—पु. कासाराचें एक हत्यार. –बदलापूर ९६. [सांडस]

सांक(ग)शी—स्त्री. करंडी; संबळी. हिला बव्हंशीं झांकण नसून वीणहि घट्ट नसते.

सां(सा)कळ—स्त्री. १ सांखळी; शृंखला. सांखळ पहा. २ बेडी. 'त्यावरी पंचवीस सांकळा।' –उषा ६९. ३ बांध; कुंपण; सींव. –ख्रिपु १.८.३५. [सं शृंखला; प्रा. संकल] **०कर**–पु. भिक्षेकऱ्यांचा एक पंथ, व त्यांतील व्यक्ति. यांच्या जवळ एक सांकळी असून ती ते आपल्याला मारून घेतात. **साकळण**–स्त्री. प्रतिबंध; मना करणें. (क्रि० करणें). 'सेजी होती रुक्मिणी। तीसही साकळण करूनी।' –व ४६६. **साकळणें**–उक्रि. १ सांखळीनें बांधणें. २ नियंत्रण करणें. **सांकळदंड**–पु. मोठी जाड साखळी. **साकळरीति**–स्त्री. (गणित) त्रैराशिकाची एक रीत. **साकळी**–स्त्री. (सांकळचें अल्प. रूप.) सांखळी पहा. **साकळी लगाम**–पु. लगामाचा एक प्रकार.

सांकळणें—अक्रि. १ गोठणें; घट्ट होणें; बोळणें; सांकणें पहा. २ बद्धकोष्ठानें युक्त असणें (आंतडीं, माणूस) **सा-(सां)कळा**–पु. १ घट्टपणा; घनता. (क्रि० धरणें). 'रक्तानें सांकळा धरला.' २ गोळा; गांठ. ३ बद्धकोष्ठता; मलावष्टंभ. (क्रि० करणें). 'पोटानें साकळा धरला.' ४ खडा. (परसाकडेचा) [सं.सम्+कल्]

सां(सा)कळी—स्त्री. पुराचा पाट, लोंढा (नाल्यांत, खाडयांत घुसणारा). (क्रि० फुटणें; पडणें; भरणें).

साकळी—स्त्री. (कों.) गळ्याची लोंबती कातडी; पोळी.

सा(सां)का—पु. १ दागिन्याला डाक लावण्यासाठीं केलेलें मिश्रण (तांबें व चांदी किंवा सोनें यांचें). २ सोन्याच्या दागिन्यांत लबाडीनें घातलेली दुसरी हिणकस धातु किंवा एखादें मिश्रण. ३ पाण्याच्या प्रवाहांतून वाहून आलेला गाळसाळ; पुलीन ४ साकळ पहा. ५ खाली बसलेला पदार्थ (न विरघळणारा); अविद्राव्य पदार्थ. ६ (शिवणकाम.) उरलेलें कापड. 'जाकीट साक्यांत बसविलें.'

सांकाटा—पु. १ सांगाडा पहा. २ सांपडा पहा.

साकाटो—पु. (गो.) गोणपाटाचा तुकडा. [इं. स्करिएट]

साकार—वि. आकार असलेलें; आकारयुक्त; निश्चित आकृति, आकार, देह असणारा. याच्या उलट निराकार. –अमृ १.४. [स+आकार] **साकारणें**–अक्रि. आकार, देह धारण करणें;

मूर्तिमान होणें. –एभा ६.५६; 'आदि पुरुष हा साकारला।' –रावि १.

साकांक्ष—वि. १ उत्सुक; इच्छा असलेला; कामनायुक्त. 'योगादिकें साधनें। साकांक्ष आराधनें।' –ज्ञा ३.९०. २ श्रद्धाळु. 'राजा परमार्थें साकांक्ष। देखोनि सार्थक कथेचें लक्ष।' –एभा ३.३१. ३ संशययुक्त. 'तुझा बोलु आम्हां। साकांक्षु पै जी।' –ज्ञा १७.३४. [स+आकांक्षा] **साकांक्षित**–वि. चुकीचा प्रयोग आहे. उदा० साकांक्षित स्नेह; कांक्षायुक्त; संशययुक्त.

साकी—स्त्री पत; साक-ख पहा.

साकी—स्त्री. एक मराठी वृत्त. यांत दोन चरण असून शेवटीं यमक असतें. प्रत्येकांत चार मात्रांचा एक असें सात गण असतात. उदा० 'जनकमखातें मुनिसह जातां, प्रभुनें गौतम भार्या।'

साकी—वि. (जुन्नरी) मागचे दोन पाय घोटयाखालीं पांढरे असणारी (मेढी).

साकी—पु. दारूचा पेला भरून देणारा (गुत्त्यांतील) पोऱ्या. [अर.]

साकीबाकी—स्त्री. बाकी शिलक. बाकीसाकी पहा. [बाकी द्वि.]

साकीन—वि. पु. राहणारा; रहिवासी. 'मधुकीर गोसावी साकीन अंबोडें.' –रा १५.१३८. [अर. साकिन्]

सांकुव—न. अंडें. 'मग विष्णु कोपौनु समुद्राकरि सांकुवें आणविलिं।' –पंच १.४१. [सांकू]

सांकुळणें—अक्रि. गोटणें; थिजणें; सांखळणें पहा.

सांकू—पु. तात्पुरता, सरासरी केलेला पूल. 'मध्यें सांकूवर हिलाल लाविले.' –ख ४०७१. [? सं. शंकु–संकू–सांकू.–राज वाडे;हिं. सांखू]

सांकू—न. (कातकाडी) कोंबडीचें संडें. –बदलापूर १२८. सांकुव पहा.

सांकूळ—न. मोरी, पाट, इ० त अडकलेलें गवत, काटक्या, केर इ० गाळसाळ. सांकळ पहा.

साकू(खू)ळ—स्त्री. १ (शेतकी) (राजा. कुण.) भाजावळ केल्यावर न जळतां अर्धवट राहिलेला राब, केरकचरा. २ चेंदामेंदा. **०काढणें**–अर्धवट जळलेला राब पुन्हां जाळणें.

सा(सां)कें—न. डाक; सांका पहा. 'परि पंधरे किडाळा मिळत। तें काय सांकें नोहे।' –ज्ञा ८.३८.

सांकेतिक—वि. १ संकेतासंबंधी. संकेत पहा. २ विशिष्ट खुणा, चिन्हें, हावभाव इ० नें युक्त, दर्शित केलेलें. ३ पारिभाषिक; सांज्ञिक. 'हें भूमितिशास्त्रांतलें सांकेतिक पद होय.' –सुकौ ३९. [सं.] **०लेखन**–न. एखाद्या शास्त्रांतील विशिष्ट चिन्हें वापरून केलेलें लिखाण. (इं.) नोटेशन. 'गवयास गायनाची शास्त्रोक्त माहिती व सदरहूचें सांकेतिक लेखनही अवगत असावें.' –कला ८.

सांके(को)रा—सांकर पहा.

सांकेवप, सांकेणें—क्रि. (गो.) थिजणें; सांकणें पहा.

साको(कु)ली—स्त्री. (कर.) पाणथळ दलदलीची जागा.

सांक्रामिक—वि. सांसर्गिक. [सं.]

साख—स्त्री. १ पत (व्यापारी); साक; अब्रू. (क्रि० वाढणें). २ लौकिक; अब्रू. [सं. साक्ष्य?] **०बाज**–वि. पतीचा; अब्रूचा. **०बाजी**–स्त्री. (व्यापारांत) पत, अब्रू असणें. **साखी**–स्त्री. १ पत; अब्रू. २ सचोटी; प्रमाणिकपणा. साकी पहा. 'तुम्ही चांगली साखीचीं माणसं.' –ख २९५. ३ प्रमाण; साक्ष्य. 'मंत्रतंत्र नहिं मानत साखी। प्रेमभाव नहिं अंतर राखी।' –तुगा ४३२. **साखसुरत**–वि. १ दुमदार; प्रमाणशीर. २ सुरेख; नीटनेटकें. 'साखसुरत पोशाख बिषाग केला कीं मोठा संभावित दिसतो.' –विवि ८.८.१५५. ३ पद्धतशीर; सशास्त्र; योग्य. ४ पटेल असें तयार केलेलें, बांधलेलें, रंगविलेलें (जागा, भाषण, लेखन, इ०). साकसुरत पहा. –क्रिवि. १ उघडपणें; राजरोस. 'सहज साखसुरत जनाना चालला असता.' –सूर्यग्र ११. २ प्रत्यक्ष; साक्षात्. –ख्रिपु १.१५. [साख+सुरत]

सांखणें—अक्रि. थिजणें; घट्ट होणें; गोठणें. साकणें पहा.

साखर—स्त्री. इतर पदार्थ गोड करण्यासाठीं वापरण्यांत येणारा एक पीठ, रेती यासारखा गोड पदार्थ; शर्करा; खांड. ऊंस, बीट इ० पासून ही तयार होते. 'साखर वाढिली रायपुरी।' –मसाप २.१. [सं. शर्करा; प्रा. सक्करा; फा. शकर्; तुल० फ्रें. स्युक्र, सॅकरीन; इं. शुगर] **म्ह०** १ साखर (साखरेचा) खाणार त्यास देव देणार. २ साखर खाईल तर ढेकर देईल. ३ हातावर साखर आणि मानेवर कातर (=मनांत कपट पण बाहेर वर्तन गोड). (वाप्र.) **साखर खावप**–(गो.) साखरपुडा करणें; लग्न ठरविणें. **साखर पेरणें-पसरणें**– १ गोड गोड बोलून वश करण्याचा प्रयत्न करणें. २ तोंड देखल्या गोड बोलणें. **साखरेची साल काढणें**–अतिशय सूक्ष्म व बारीक परीक्षा, छाननी करणें; नसता कीस काढणें (निंदार्थी वापरतात). 'पारिभाषिक शब्दाच्या बाबतींत इतकी घासाघीस करणें हें साखरेची साल काढण्यासारखें वेडेपणाचें आहे.' –(पावशे) मराठींतील अजागलांचें उच्चाटन. **साखरेची साल काढणारा**–अतिशय कडक, खाष्ट, बारकाव्याच्या दोषैकदृष्टि माणसाबद्दल निंदार्थी वापरतात. **साखरेनें तोंड भरणें, तोंड भरून साखर घालणें**–चांगलें गोड बक्षीस देणें; तोंड गोड करणें. सामाशब्द– **०किडा**–पु. १ नुसत्या साखरेवर उपजीविका करणारा एक किडा. २ (ल.) ज्यास साखर फार आवडते असा माणूस. **०गोटी**–स्त्री. एक लहान पण

गोड आंब्याची जात. **०गोळा**-पु. लाडू; पक्वान्न. 'इंग्रजी झाल्यापासून दारूगोळा तर गेलाच पण साखरगोळाही दुर्मिळ झाला.' -टि १.४००. **०चुंबा**-पु. चुंबन; गोड पापा. 'अरुणानें नभःश्रीचा साखरचुंबा घेतला.' -विविधवृत्त खासअंक (स्त्री हृदय) १९२८. **०चौथ**-स्त्री. (महारी) भाद्रपद वद्य ४. -बदलापूर १७४. या दिवशीं चतुर्थीचा उपास पाळतात. **०जांब-भ**-पु. गुलाबी जांब. **०झोंप**-पु. अरुणोदयाच्या वेळची झोंप (ही फार सुखकर वाटते म्हणून नांव). 'लग्न म्हणजे संसाराचा सूर्योदय होण्याच्या आधींची ही साखरझोंप होय.' -रंकाचें राज्य ७. **०नातें**-सक्करनातें पहा. **०निंबी-लिंबी**-स्त्री. गोड लिंबाचें झाड. **०निंबू-लिंबू**-न. गोड लिंबू. हें फळ नारिंगाएवढें असून औषधी आहे. **०निंबोळी**-स्त्री. एक लहान फळ. 'वरि मंडप साखरनिंबोळ्यांचे घोंस पोसले' -अमृत ३४. **०पाडया**-पु. एक मुलांचा खेळ. 'विटीदांडू, चेंडूलगोऱ्या, लपंडाव, कावडी। साखरपाडया, भोंवरे, चक्रगोट्या परवडी।' - होला ५४. साखर पेंढया?. **०पाणी**-न. साखर व पाणी. हें पाहुण्यास आतिथ्य म्हणून देत. १ लिंबाचें सरबत. २ (व्यापक) फराळाचे पदार्थ. **०पारा**-पु. तृपसाखर व रवा यांच्या वड्या. [फा. शकर्-पारा] **०पुडा**-पु. १ विवाहनिश्चयाच्या प्रसंगीं वधूच्या हातांत साखरेचा पुडा देऊन इतरांस पानसुपारी वांटतात तो समारंभ; औपचारिक वाङ्निश्चय. 'तिच्या सासरच्या मंडळींनीं मुलीला घरीं नेऊन साखरपुडाहि केला.' —स्वप ६५. २ अशा वेळीं देतात तो साखरेचा पुडा. **०पुरी**-स्त्री. भेजवानींत मुख्य पक्वान्न पुरी असेल तेव्हां योजतात (कारण तीबरोबर साखर वाढतात.) **०पेंढया**-भाद्रपद-आश्विन महिन्यांतील गवताच्या पेंढयानींखेळावयाचा एक खेळ. **०पोळी**-स्त्री. पुरणासारखी साखर घालून तयार केलेली पोळी. -गृशि ३८५. **०फुटाणा**-पु. वेलदोड्याचा दाणा-फुटाणा इ० वर साखरेचा पाक चढवून करवंदाएवढी करतात ती गोळी; एक मिठाईचा पदार्थ. **०फेणी**—स्त्री. साखरेचा मोठा बत्तासा. 'साखरफेणी वाढिली।' -मसाप २.१. **०बोंड**-न. पिठांत साखर घालून तळलेलें भजें. **०भात**-पु. साखर व केशर घालून केलेला भात; केशरी भात. 'साखरभात वाढला बरा।' -मसाप २.१. **०मांडा**-(कर्ना) मांडा (हा साखरेशीं खातात यावरून). **०रंगी**-वि. गुळी साखरेच्या रंगाचें (वस्त्र). **०लाडू**-पु. बरीचशी साखर घालून तयार केलेला पिठाचा लाडू. **०वडी-ळी**-स्त्री. एक गोड पक्वान्न. **०सुपारी**-स्त्री. साखरपुडा पहा. 'साखरसुपारी वाटिती सुंदर नारी।' -वसा ४६. **साखरी गोडांबी**-स्त्री. साखरेच्या पाकानें मढवून फुटाण्याप्रमाणें केलेली काजूची बी. **साखरेचा**-पु. (सांकेतिक) मुका; चुंबन. **साखरेची सुरी**-स्त्री. (ल.) वरून गोड पण मर्मभेदी भाषण, असें भाषण करणारा, गोड बोलून मान कापणारा मनुष्य. 'या चांडाळाच्या उरांत साखरेची सुरी भोंसकून केंसानेंच मान कापली पाहिजे.' -संभाजी **साखरोळी**-स्त्री. मोहन घालून केलेलें रवा किंवा तांदुळाच्या पिठाचें पुरीसारखें पक्वान्न. -गृशि ३९३. [साखर+पोळी]

साखरशेला—पु. आंखूड, लहान शेला. सांकड पहा. 'आजि तुम्ही बसा। साखर शेले नेसा।' -मसाप २.३५६. (विहिणीच्या गाण्यांत शब्द येतो). घट्ट विणीचा शेला.? [सांकड= आंखूड, लहान+शेला]

सा(सां)खळ—स्त्री. १ मोठी सांखळी. २ रांग; ओळ; पंक्ति उदा० दांतांची साखळी. ३ बेडी; बंधन. 'नियमांचिया सांखळ। वाहणें सदा।' -१८.६३७. ४ संबंध; जोड. 'प्रजेचे हक्क व राजाचे हक्क यांचा एकमेकांस कोणते रीतीनें सांखळ आहे...' इनाम ८०. ५ (खा.) कडी (दाराची). साखळकर, सांखळणें, साखळदंड इ० समासासाठीं सांकळ पहा. [सं. शृंखला; प्रा. संकळ] **सा(सां)खळी**-स्त्री. १ अनेक कड्या एकमेकांत अडकावून केलेली एक दोरीसारखी रचना. ही बांधण्याच्या उपयोगी. २ चांदी-सोन्याच्या कड्यांचा एक दागिना (पायांत किंवा कमरेंत घालण्याचा). 'पदकयुत गळांच्या सांखळयाही विशेषा।' -सारुह २.२८. ३ (व.) दाराची कडी. ४ मुलींचा एक खेळ. ५ (पैमाष) जमिनीची मोजणी करण्याचें ६६ फूट लांबीचें व शंभर कड्यांचें एक माप. **सांखळें**-न. (महानु.) १ सांखळी; माळ. 'कंठीं शब्दवेधाचें सांखळें।' -शिशु १११. २ सांखळी.

सा(सां)खळणें, साखुळणें—अक्रि. १ गोठणें; थिजणें; घट्ट होणें; खडा होणें. २ (शेत) राबांतील गाळसाळ काढणें. [सं. संकलन] **सा(सां)खळा**-पु. १ घट्ट झालेली अवस्था; साकळा. २ मलावरोध; बद्धकोष्ठता. (क्रि०धरणें). ३ तुंबणें; तुंबारा. **सा(सां)खळी**-स्त्री. १ नदीला पाणी चढलें असतां तिला फुटणारा पाट. २ नदीला घातलेला बांध; नदी अडविणें (उतारासाठीं).

सांखारा—पु. १ केळीच्या सोपांचें पाणी, आल्याचा रस, भिजलेले गहूं, रताळीं इ० वाटून त्याचें पाणी यासारखे पदार्थ भांड्यांत घालून ठेवले असतां त्यांत खालीं जमतो जो घनांश तो; सांका. २ पाण्याचा प्रवाह अडविणारा गाळसाळ, केरकचरा इ०. [सं. संकलन]

साखाळा—स्त्री. (महानु.) शाळा. 'साखाळाचिया उंचिया। पांता दृष्टी टांचिया।' -ऋ १६.

साखेय—वि. स्नेहशील; मित्रभावाचा. [सं.]

साख्त—स्त्री. १ संबंध; सख्य. 'कोणाचें म्हणणें राव शिंदे यांसी साख्त आहे.' -रा ७.१९५. २ बजावणी. 'आपला

जिम्मा साख्त करीत जाईल.' –रा ८.२१७. [फा. साख्तन्=करणें]

साख्ता—पु. चिलखताचें जघनपत्रक. –राव्य ५.१५.[फा. साख्त]

साख्य—न. मैत्री; सहवास. [सं.]

सांख्य—नपु. १ ज्ञान; तत्त्वज्ञान. २ एक दर्शन (षड्दर्शनांपैकीं). 'वेदरायाचिया राजधानीं। सांख्यवेदांताच्या भुवनीं।' –ज्ञा १८.२७९. ३ विचार; मत. 'मग उघड करूनि पांडवा। जैं हें आणिसील सांख्याचिया गांवा।–ज्ञा ७.४३. ४ विशिष्ट संन्यास मार्ग. –पु. ज्ञानी लोक. सांख्यशास्त्रास अनुसरणारा. 'एकु ज्ञानयोगु म्हणिजे। जो सांख्यीं अनुष्ठिजे।' –ज्ञा३.३६. [सं.] ०**योग-मार्ग-निष्ठा**–चित्तशुद्धयर्थ कर्में करून ज्ञानप्राप्ती नंतरकर्म त्यागपूर्वक घेतलेला संन्यासमार्ग. –गीर ३०१. **सांखी**–वि. १ सांख्य मतानुयायी. २ सज्ञानी. –हंको

साग—पु. एक झाड; याचें लांकूड इमारतीच्या कामीं फार उपयोगी आहे; सागवान. [सं. शाक; प्रा. साग] ०**वान**–पु. साग. २ (न.) सागवृक्षांचें जंगल. ३ सागाचें लांकूड (बांधकामासाठीं रचून ठेवलेलें). ०**वानी**–वि. सागासंबंधीं; सागाचें; सागली. **सागली**–वि. सागाचें; सागवानी.

सांग—स्त्री. एक प्रकारचा सबंध लोखंडी भाला. हा लोखंडी गजासारखा असून टोंकास भाल्याप्रमाणें टोंक असतें. 'देती यापरी हृदयांत नव्या सांगा।' –मोउद्योग १२.७९.[हिं. सांग; सिं. सांगि] **सांगुणी**–स्त्री.अव. शस्त्रविशेष. 'रीसौनि वैराग्य वळनी। मेळोनि विवेक सांगुणी।' –ऋ ५६.

सांग—वि १ सर्व अंगांसहित; एकूणएक गोष्टींसह. –एभा ७.६३८. २ समग्र; संपूर्ण 'केली यात्रा सांग निघाले तेथोन।' –रामदासी २.६१. ३ यथास्थित; पुरेपूर. 'भोगितांही सांग। कांटाळे मन।' –ज्ञा ६.४४२. ४ अव्यंग; निर्दोष. –ऐपो १०९. [स+अंग] ०**ता**–स्त्री. १ पूर्तता; संपूर्णता; यथास्थितपणा (सर्व साधनें जमून, सर्व संस्कार होऊन–विवाहादि कर्माची). २ (ल.) कर्माची पूर्ति करण्यासाठीं घातलेलें ब्राह्मण भोजन व दिलेली दक्षणा. ०**संपूर्ण**–वि. पूर्ण आणि समग्र. सांग पहा. ०**सरभरा**–स्त्री. सर्व प्रकारची, संपूर्ण मदत; एकंदर मदत. **सांगोपांग**–वि सर्व अंगें, उपांगें, भाग, लहानमोठया, प्रधान गौण गोष्टी यांसह; यथासांग (विवाह, यज्ञ, इ० विधि). 'तैसा सांगोपांगु। निपजे जो योगु।' –ज्ञा १७.१८२. [स+अंग+उपांग]

सांग—स्त्री. धा.नाम. १ सांगणें; सांगणी; निरोप.(क्रि० सांगणें). 'प्रियवधुसि वराला सांगता सांग झाला.' –आमा ९. २ आज्ञा; हुकूम. [सांगणें] ०**कामी-म्या**–वि. १ स्वतःची बुद्धी न चालवितां नुसतें सांगितलेलें काम करणारा; वेळेप्रमाणें वागण्याची अक्कल नसणारा (निंदाव्यंजक उपयोग). २ ज्यानें नुसतें सांगितलेलें काम करावयाचें आहे असा; नुसता तंतोतंत हुकूम पाळला पाहिजे असा. (वाप्र.) **सांगीतल्या कामाचा दिल्या भाकरीचा**–केवळ सांगितलेलेंच काम करणारा व मिळेल तें खाणारा. ०**सरभरा**–स्त्री. १ बोलण्यानें, (एखाद्याबद्दल) गौरवानें सांगून, शिफारस करून मदत करणें. 'त्यानें स्वतः कांहीं दिलें नाहीं पण माझी सांगसरभरा अशी केली कीं माझें लग्न झालें.' २ मदतीच्या थापा देणें; शाब्दिक मदत. 'होय, हा माझा माबाप खरा. ह्यानें असें करीन तसें करीन, हें देईन तें देईन म्हणतां माझी सांगसरभरा केली.' ०**सुगरण-सुग्रण**–वि. नुसती बोलण्यांत हुषार; तोंडपाटिलकी करणारी स्त्री. 'मावशी म्हणजे सांगसुग्रण, चुलीजवळच्या नुसत्या गप्पा.' ०**सुगराई-सुग्राई**–स्त्री. बोलण्यांत शहाणपणा. **सांगणा**–वि. निरोप्या; बोलावणेकरी. –स्त्रिपु २.४.१२. [सांगणें] **सांगणी**–क्रि. १ शिकवण; आदेश; सूचना. २ सांगणें; बोलणें; निरोप (क्रि० सांगणें). ३ शिकविण्याची, समजूत देण्याची पद्धत. **सांगणीचा**–वि. १ वधूपक्षीयांनीं वधूकरितां द्रव्य किंवा कांहीं मोबदला न घेतां तिचा केलेला (वाङ्निश्चय, विवाह). २ अशाप्रकारें विवाहित (कन्या). **सांगणें**–अक्रि. १ कळविणें; कथणें. २ करण्याविषयीं आज्ञापिणें; सुचविणें (काम, मामलत, अधिकार, रोजगार, चाकरी इ०). ३ बोलावणें, निमंत्रण करणें (भोजन, समारंभ इ० स). ४ शिकविणें; समजावणें (अध्ययन, ग्रंथ, विद्या इ०). ५ म्हणून दाखविणें (विद्यार्थ्यास शिक्षकास, धडा इ०). [प्रा. संघइ–तुल० सं. सांगतिक=गोष्टी सांगणारा; मनु ३.१०३.] (दुखणीं, संकटें, कुकर्मे इ० नीं) (**अवघड, कठीण, जड**) **सांगणें**–(त्यांचा) परिणाम कठीण होणें. **सांगून येणें**–विवाहासाठीं देऊं करणें (मुलगी). 'माझ्या भावास एक मुलगी सांगून आली आहे.' **सांगणोवांगणी, सांगा(गी-गो)वांगी, सांगासांगी**–स्त्री. १ प्रत्यक्ष प्रमाण नसतां एकानें दुसऱ्यास, दुसऱ्यानें तिसऱ्यास सांगण्याची परंपरा; ऐकीव गोष्ट; गप्पा. 'सांगणोवांगणीचें काम नव्हे। आपुल्या अनुभवें जाणावें।' –दा १०.१०.५३. २ गप्पा छाटणें; बकवा करणें. ३ एखादी गोष्ट अनेकांना सांगणें; बोभाटा करणें. [सांगणें द्वि.] **म्ह०** सांगासांगीं वडाला वांगीं. **सांगता**–वि. सांगणारा. 'हरिकथेची महिमा कैसी। आदरें पुसतां सांगत्यासी।' –एभा ३.५८७. **सांगावा**–पु. (माण. क.) निरोप. 'मला तुमचा सांगावा पोंचला नाहीं.' **सांगी**–स्त्री. सांग पहा. १ निरोप. २ उपदेश; समजावणी. 'दुष्टांच्या सांगीवरून आथेल्लोची दुर्गति झाली.' –विवि ८.४.८२. ३ आज्ञा; हुकूम. **सांगिजणें**–सांगणें; सांगि

तलें जाणें. –विपू २.७९. 'कसें कार्या या तुम्हीं सांगिजे तें।' –र ३८. 'मग आणिकु उपचारु केला तेहीं। तो सांगिजैलु आतां।' –शिशु ७७२.

सांगटा—पु. सांगाडा; सांटा.

सांगठ्या—वि. (क.) सहा बोटांचा. [सा=सहा+अंगठी]

सांगड—सागळ पहा.

सांगड-डी—पुस्त्री. १ दोन होडया किंवा नावा एकत्र बांधून केलेलें जलयान. २ (स्त्री.) दोन किंवा अधिक भोपळे, नारळ इ० फळें, जनावरें, माणसें यांना एकत्र बांधून केलेली रचना. 'एकीं वेदत्रयाचिया सांगडी। घेतल्या अहंभावाचिया धोंडी।' –ज्ञा ७.८४. ३ (सामा.) तरून जाण्याचें साधन; नाव; होडी. 'योगी संस्कृति सागरांत म्हणती ज्याच्या पदा सांगडी।' –मोकृष्ण २६७. ४ जोडी; सोबत; मैत्री. 'शिंदे यांची जन्माची सांगड होती तों पावेतों ब्राह्मणांसही आमचा वचक होता.' –भाब ३७. ५ काताऱ्याच्या हत्याराचा एक भाग; यानें तो कातावयाची वस्तु घट्ट बसवून ठेवतो. लांकूड कांतण्याची बैठक. [सं. संघट्ट, संघाटिका=युग्म] **०घालणें**–संबंध जोडून देणें; मेळ घालणें. 'वरील दोन कल्पनांची सांगड घालून दिली आहे.' –टि ४.११. **सांगडीस धरणें**–निकटसंबद्ध होईं असें करणें. **सांगडणें**–उक्रि. १ (अनेक पदार्थ) सांगड होईं असे संबद्ध करणें. २ (व्यापक.) सुटूं नये, इतस्ततः होऊं नये म्हणून बांधून ठेवणें. **सांगडणी**–स्त्री. एकत्र गुंतविणें, जोडणें **सांगड बाहुली**–स्त्री. कळसूत्री बाहुली; पुतळी. **सांगडा**–पु. सांगड; भोपळ्याचें पेटें. **सांगडी-डया**–वि. सांगड नेणारा; नावाडी. 'सांगडिया सत्वर येईंबा।' –देप ४. **सांगोड**–स्त्री. (गो.) सांगड (दोन होडयांची) करून तीवर देवतेचा रथ ठेवून तळयांत मिरवणूक काढतात ती.

सांगड तोडणें—क्रि. (राजा.) ग्रामदेवतेस बलिदान करणें. –आडिवऱ्याची महालक्ष्मी ८.

सांगडा—वि. सारखा; सदृश. 'म्हणौनि सूर्य सूर्याचि येवढा। चंद्र चंद्राचि सांगडा।'–अमृ ७.२८८; –शिशु ८७१.

सांगडी—स्त्री. (गु.) विहीर खोदण्याच्या उपयोगाची एक लोखंडी पहार. हिच्या एका बाजूस अणकुचीदार टोंक व दुसऱ्या बाजूस आंकडा असतो. या आकडयांत दोर बांधून तो कप्पीवरून घेतलेला असून त्याचें टोंक विहिरीबाहेरील माणसांनीं हातांत धरून ती पहार विहिरींत सरळ जाऊन आपटेल व भोंक पाडील असें सोडावयाचें असतें.

सांगाडा—पु. वस्तूच्या आकारास आधारभूत रचना (शरीर, गाडा, पलंग, नाव, छत्री इ० स दांडे, लांकडें इ० च्या आधारानें झालेली. यावरून चर्मादि वेष्टन होऊन वस्तु पूर्ण होते); सांपळा; खोका. २ मोठी, अवजड वस्तु, प्राणी, धूड; मढें. ३ विहिरींतील चौकट. [सं. सम्+घट्] **सांगाडी**–स्त्री. विहिरीच्या भिंती पडूं नयेत म्हणून तळाशीं दिलेली आधारचौकट.

सांगाडी—स्त्री. (कांतकाम) कांतण्याचें यंत्र. सांगड ५ पहा.

सागर—पु. १ समुद्र. 'सगराकरितां सागर म्हणती।' –भूपाळ्या १५. २ मोठा सांठा; खाण; आगर. जसें:–गुणसागर, करुणासागर इ०. 'हा वेदार्थसागरु।' –ज्ञा १.७२. [सं.] **सागरान्व**–पु. एक जातीचा मासा. –प्राणिमो ८७.

सागरगोटा—पु. सागरगोटी वेलीचें बी; गजगा. मुली सागरगोटे खेळण्यासाठीं घेतात. **सागरगोटी**–स्त्री. एक औषधी वेल हीस कांटे असून पिवळीं फुलें येतात. हीची बी तो सागरगोटा.

सागरा—पु. (कु.) घागरीसारखें भांडें.

सागरी—स्त्री. (खा.) मुळयाची शेंग; डिंगरी.

सागलाग—पु. १ मनाचा कल; लक्ष. २ पाठलाग; प्रयत्नः बेत; योजना. ३ हेतु; ध्येय; उद्देश (क्रि० साधणें; लागणें; बसणें; बांधणें; ठेवणें; धरणें; इ०). [लाग द्वि.]

सागवली—स्त्री. लागवडीखालची जमीन. [का. सागिसु=लागवड करणें]

सांगशी—स्त्री. एक प्रकारची टोपली, करंडी. सांकशी पहा.

सागळ—स्त्री. बकऱ्याचें कमावलेलें कातडें. हें मऊ असून जोडा इ० ला वरच्या बाजूस लावतात. [सं. छाग] **सागळा**–वि. (महानु.) कातडी; कातडयाचा. 'पखाला तथा पोहरा सागळा जे।' –प्रमा २८ –तुग ३२१९.

सागळा—पु. पाण्याची झारी धरणारा नोकर; शागीर्द. 'मीचि होईन सागळा। करूं सुईन गुरुळां।' –ज्ञा १३.४१८.

सांगळ्या—वि. सहा बोटांचा; सांगठ्या. [सा=सहा+अंगुली]

सागा—पु. (कों.) बकरी, मेंढया, इ० चा कळप.

सांगा—पु. तात्पुरता पूल. सांकू पहा. –तीप्र ४१.

सांगात—पु. (गो.) संगत; सोबत. 'अविद्येचा आवर्तु। जेथ न बाधे विवर्तु। सुटे जेथ पैं सांगात। गुणत्रयांचा।' –सिसं ३ [संगत] **सांगातिणी-तीण**–स्त्री. सखी; मैत्रीण. 'चित्ररेखा तिची सांगातिणी। प्राणाहूनि आवडे।'–ह २८.१९. **विरहे** व्याकूळ पडली उखा। सांगातीण धांवली चित्ररेखा।' –कीतैन १.७५. **सांगाती**–वि.पु. सोबती; मित्र. 'कैवल्य मार्गीचा अभिज्ञु। सांगाती हा।' –ज्ञा १६.९९. 'इष्ट मित्रं आणि सांगाती। आपुलाले घरा जाती।' –रामदास (नवनीत पृ. १५९).

सांगातीं-तें-शअ. बरोबर; सह; संगतीं पहा. 'काय खातों आम्ही कासया सांगातें। कैसें हें लागतें नेगों मुखीं।' -तुगा २५ **सांगातें जाणें**-सती जाणें.

सागु(गो)ती—स्त्री. खाण्यायोग्य असें प्राण्याचें मांस. बहुधा बकऱ्याचें मांस. [सं. छाग; हिं. सगोती]

सांगुळणें—अक्रि. (कों.) गोठणें; साखळणें पहा.

सागू—पु. १ एक झाड; याचा साबूदाणा होतो. २ याच्या सत्त्वाची गोळी; साबूदाणा. [मलायी सागू] **०दाणा, सागूचे तांदूळ**-पु. सागूच्या गोळ्या; साबूदाणा.

सा(सां)गूळ—स्त्री. (को.) १ फणसाच्या गऱ्याभोवतीं असणारा तंतु; पाती; चार. २ चार, अठळ्यासकट फणसाची भाजी; सबंध फणसाची भाजी. [सागळ]

सांगोपान—न. (प्र.) संगोपन पहा.

साग्या—पु. साथीदार; मित्र; चोरी, चहाडी इ० कुकर्मातील सोबती. [सगा] **०लाग्या**-पु. मदतनीस; साथीदार (वाईट कामांत).

साग्यालाग्या, सागालागा—वि. १ एखादी योजना, घटना घडवून आणणारा; युक्तिबाज. लागलाव्या पहा. २ लबाडया, कारस्थानें करण्यांत ज्याची बुद्धि चालते असा. 'पांचसांत सागेलागे जमविले आणि दरोडा घातला.' [सागलाग]

साग्र—वि. १ तीक्ष्ण, अणुकुचीदार टोंक असलेला. २ समग्र; सगळा. [स+अग्र] **०निद्रा-झोंप**-स्त्री. (अशुद्ध प्रयोग) गाढ झोंप.

सांग्रामिक—वि. संग्रामासंबंधी; युद्धविषयक; लष्करी. [सं.]

साग्वात, साग्वाद—स्त्री (गो.) भेट; नजर. -सह्याद्रि १०४ [पोर्तु. साग्वात]

सांघणी-नी—स्त्री. (महानु.) धाड; चाल. 'कामारुया कामबाणी वृजयुवती गणी सांघणी मन्मथाची।' -गस्तो २४. -ऋ ८३ [संघात]

सांघणें—क्रि. सांगणें पहा. 'तेथ चांपेकळिकांची कुसरी। कांई सांघौ।' -शिशु ६३२.

सांघात—पु. संयोग; मिलाफ. 'ना तरी प्रलय वन्हि महावातु। या दोघां जैसा सांघातु।' -ज्ञा १.११८. २ समूह; मंडळी. 'संपैसांघातु न साहे।' -एभा ९.१६०. [सं. संघात]

साच—वि. १ सत्य; खरा. -ज्ञा २.१६. 'सर्व जाणे एक विष्णु साच खरा। आणिक दुसरा नाहीं नाहीं।' -तुगा ११. २ वास्तविक; खराखुरा. 'ठाव नाहीं बापाचा। अकुळी साचा श्रीकृष्ण।' -एरुस्व २.३. ३ समर्थ; बलवान. 'येणें दळभारु आघवा। साचु आमुचा।' -ज्ञा १.१२४. -न. ब्रह्म 'मग साचाचेंचि रूप। होऊनि ठेलें।' -ज्ञा ५.१६०. [सं. सत्य; प्रा. सच्च] **साचोकार-रें**-क्रिवि. खरोखर; सत्यपणें. 'लक्ष लक्षातीत आपण ब्रह्म साचोकारें।' -वेप ९७. 'ऐसेंचि असेल साचोकारें। तरी मी संतुष्ट साचारें।' -मुआदि १९.३६; -ज्ञा ४.९७. **साचोकारा**-वि. खरा; सत्य. -एभा १.३.

सांच—पु. जागा; स्थल; अवकाश; समावेश होईल एवढी सोयीची जागा. 'हें जाहाज फार लहान पडलें. यामुळें यांत इतकें खटलें रहावयाजोगा सांच दिसत नाहीं.' [सांचणें] **सांचणें**-अक्रि. १ जमणें; एकत्र गोळा होणें; थोडा थोडा येत जाऊन सांठा होणें (पाणी, धान्य इ० चा). 'आपुलें धन लोकांवरी सांचे। तें मागूं जातां स्वयें बाचें।' -नव १४.१२१. २ संवर्धित, प्रज्वलित होणें. 'विपरीत ज्ञानदीपिका। सांचली जे।' -ज्ञा १५.८२. ३. सांचविणें, गोळाकरणें; जमविणें; सांठविणें. 'कृपणा ऐसा सांची अर्थ।' -दा २.१०.३५. [सं. संचयन] **सांचवणी**-स्त्री. सांचलेलें, सांचविलेलें पाणी (तळें, हौद, डबकें इ० त विशेषत: फारसा उपसा नसलेलें. याच्या उलट वाहतें पाणी). जें सांचवणी अल्पजल' -एभा २१.११८. **सांचविणें**-उक्रि. सांठविणें; जमविणें; संग्रह करणें. 'येक दोन कोटी देऊं तुजसी। तें घेवोनि सांचवीजे।' -कथा ६.१९.१४३. **सांचा**-पु. संचय; सांठा. 'आला कराया बहु पाप सांचा।' -मोकृष्ण ३४२. **सांचा पडणें**-सांठणें. 'तिळें तिळें पुण्य सांचा पडे। तरि हें बहुतां जन्मीं जोडे।' -तुगा ७१२. **सांचीव**-वि. सांचलेलें (पाणी इ० वाहतें नव्हतें) **सांचीव, सांचाल**-वि. तळें, हौद, इ० त सांटविलेलें (पाणी).

साचर—स्त्री. (बांधकाम) उघडी; सांड पहा. (इं.) स्लुइस.

सा (सां) चल-ळ, साचाल सां, (सा) चोल-ळ, साचोला—पुस्त्री. पावलांची चाहूल (माणूस, प्राणी इ० च्या); आवाज; हालचालीचा शब्द. 'सांचलु न मोडितु। प्राणियाचा।' ज्ञा १३.२४५.-एभा ८.१९९. 'इतुकियांत सांचळ ऐके। द्वारि देखा।' -कथा १.६.१८७. 'तव साचाल जाला मार्गावरी।' -मुवन १६.१२८. 'म्हणे सखे हो एक एका। पाउलें वाजूं देऊं नका। सांचोळ ऐकोन गोपिका। जाग्या होतील निर्धारें। -ह ६.४८. [सं. संचल्]

सांचा—पु. १ ठसा; मूस; एकाच प्रकारचे अनेक पदार्थ तयार करण्यासाठीं केलेली विवक्षित घडण, यंत्र. 'ना तरी चतुरानना चिये वाचे। काय आहाती लटिकिया अक्षरांचे सांचे।' -ज्ञा ११.२०८. २ एकाच जातीच्या पदार्थांचा समुदाय, जुळी. (उदा० सारख्या लांबीरुंदीचे कागद, पानें, इ०). ३ नमुना; किता. ४ (कुंभारी) कोळंबें इ० करण्यासाठीं ज्यावर मातीचा गोळा घेतात

ती फळी. ही शेवटावर बसविली असते. ५ (मुद्रण) आठ, सोळा पानांचा एक भाग; फर्मा. ६ संचय; सांठा. 'उपरि सकंटक साचे परंतु सांचे जयांत सुरसाचे।' –र ८. [सांचणें]

साचार—वि. (क्रिवि. सारखा उपयोग) १ खरा; सत्य. 'तैसी बोली साचारी। अवतरो माझी माधुरी।' –ज्ञा १४. ३१. २ खरोखर. –एभा ८.५९. 'कीं अनेक वाद्यांत साचार। येकचि नाद दुमदुमति।' ३ अकृत्रिम; खराखुरा. 'मरगजस्तंभीं सिंहमूर्ती। साचारासारख्या हुंकारती।' –मुसभा २.३६. [साच] **साचारिव**–स्त्री. खरेपणा. 'जे साचारिवेचेनि बिकें ब्रह्मही भेदी।' –ज्ञा १६.११९.

साचिव्य—न. १ सचीवाचें काम, कारभार; मंत्रीपद. २ मैत्री; साहचर्य. [सं]

साज—न. (कों.) एक प्रकारचें गवत; बेर. **०भारा, साजारा**–न. साज गवताचा भारा, ओझें. **साजाची**–वि. खार जमिनीचा एक प्रकार. हींत साजाचें किंवा बेराचें गवत उगवतें.

साज—पु. १ लागणारें सामान; साहित्य; साधनें; सरंजाम; कार्याला लागणाऱ्या सर्व गोष्टी (समुच्चयार्थी). २ नाचणारणी, गाणारणी, पोवाडेवाले, तमाशेवाले, जादूगार इ० मंडळीना लागणारीं हत्यारें पातारें, साहित्य; उपकरणीं. 'साज सारंगी देत आणून। म्हणे नवरसे कुशलत्वपण। कळा दावी कुशळ कोणती।' –नव १९.३८. ३ गाण्यानाचण्याच्या वेळीं पायांत घुंगरांचा चाळ बांधतात तो. ४ पोषाख; जामानिमा; शृंगार (कलावंतीण, नट, शिपाई इ० चा). ५ सज्ज, तयार होणें; पोषाख घालणें. ६ (सामा.) नटण्यासजण्यासाठीं लागणारा पोषाख, वस्त्रें, इ० ७ थाटमाट; शृंगारमंडण; नटणें. 'बहु दिवसीं पति येतां करि बहु मिथिला पतिव्रता साज।' –मोकृष्ण ८७.१५. ८ पखवाज. ९ गळ्यांतील एक दागिना. [सं. सज्ज; फा. साझ्] **०करी**–पु. वाजंत्री, गवई, तमासगीर, गोंधळी इ० च्या ताफ्यांतील इसम. **०संजोगी**–वि. साज, साजकारी. 'साजसंजोगी थोर प्रवीण।' –दावि ३८१. **०सरंजाम**–पु. एखाद्या कार्याला लागणारें साहित्य, सामानसुमान. **०सामान**–न. साधनें; साहित्य. साज अर्थ १ पहा. 'साज सामान कूल लुटून नेलें.' –ऐच २४. **साजणें**–उक्रि. १ शोभणें; योग्य दिसणें. 'ब्रह्मगोळकांचिया माळा। साजती जियेच्या गळां।' –शिशु ८७. २ चांगलें, योग्य समावणें. [सं. सज्ज] **म्हण** साजेल ते बोलावें आणि पचेल तें खावें. **साजरा, साजिरा**–वि. १ सुशोभित; शोभिवंत; अलंकृत –एभा १८. 'तरी तो मदन तूं तेंच वरी। तेणें तूं साजिरी। जगामाजी।' –कथा १.३.१४०. २ सुंदर; गोजिरवाणा; छान. 'कंठीं हार साजिरा।' –भूपाळी गणपतीची. **म्हण** १ पुणतांब्याच्या म्हशी आणि टोणगांव साजरा. २ फुटका डोळा काजळानें साजरा. **साज(जि)रा गोजरा**–वि. देखणा; सुंदर; 'पद्मावीण तळें, निरक्षर मुखीं जो साजिरा गोजिरा।' –वामन स्फुटश्लोक (नवनीत पृ. १३३). **साज(जि)रेपण**–न. सौंदर्य; शोभा. 'ऐक्याचें मुदल न ढळे। आणि साजरेपणाचा लाभ मिळे।' –अमृ १.५९. **साजविणें**–क्रि. शोभविणें. 'उद्धरुनि पतित राम–प्रभु-कीर्तिहुनी स्वकीर्ति साजविली।' –मो स्फुट आर्या (नवनीत पृ. २५५). **साजावणें**–क्रि. शोभिवंत दिसणें; खुलणें. 'परि तो पूर्णमेसीच पूर्णत्वासी ये। आणि कळेंकें साजावला होय।' –स्वानु ६.१.३२.

साजिंदा—पु. १ कळवंतिणीच्या मागें राहून नाचतांना वाद्य वाजवून तिची साथ करणारा इसम. २ बजवय्या; वादनकुशल. [फा. साझंदा] **साजिंदी**–स्त्री. १ कळवंतिणीची मदतनीस स्त्री; साथीदारीण. २ व्यभिचारी, बेढंगी स्त्री. ३ साजिंद्याचें काम, वृत्ति.

सांज—स्त्री. १ नवें धान्य निघाल्यावर तें खाण्यापूर्वी बऱ्यावाईट देवतांना अर्पण करण्याची रीत. (क्रि० धरणें; असणें). २ जमिनीच्या पिकाच्या अंदाजाचा खरेपणा; अंदाजाप्रमाणें पीक येण्याची खात्री, तशी जमिनीची पात्रता. (क्रि० बाळगणें; सोडणें, टाकणें; बुडणें, जाणें). ३ अंदाजलेलें, अपेक्षिलेलें, उत्पन्न, पीक. (क्रि० येणें; भरणें; उतरणें). उदा० भुईची–जमिनीची-काळीची-पांढरची सांज. 'रचूनि महत्तत्वाचें खळें। मळी एके काळुगेनि पोळें। तेथ अव्यक्तीची मिळे। सांज भली।' –ज्ञा १३.३९. [? साच] **सांजी**–स्त्री. समृद्धि; वाढ. (क्रि० येणें). 'राशि न सरती जाणों आली सहसा धना तदा सांजी। –मोअश्व ५.७२.

सांज—स्त्री. १ संध्याकाळ; अस्तमान. 'तेचि संकल्पाची सांज जैं लोपे।' –ज्ञा ९.७३; –तुगा ४०७. २ संधिप्रकाश; सायंप्रातः काल. 'सांज खुलली पसरली पुसट लाली।' –विक १२. [सं. संध्या; प्रा. संझा; हिं. सांझ; गु. सांज] **०धरणें**–सांजेला काढलेल्या दुधाचें तूप करून त्यांत वात बुडवून देवापुढें दिवा लावणें; दीपव्रत धरणें; दिपत धरणें. सामाशब्द– **०दिवा**–पु. संध्याकाळीं देवापुढें लावलेला दिवा; सांजवात. **०वण वणी**–स्त्री. १ संध्याकाळ; सांज. 'नाना सुटला सांजवणीं। वत्सुचि पां।' –ज्ञा १८.४८१. –सिसं ७.८२. २ संध्याकाळचें गोदोहन. 'जैं जाणिजे हातवटी। सांजवणीची।' –ज्ञा १८.१४८३. ३ धार काढण्याचें पात्र. 'आघवाचि विषयीं भादी। परी सांजवणी टेंकों नेदी। –ज्ञा १३.६३७. –निगा २२. **०वळ**–स्त्री. (अ.) सांजवेळ **०वात**–स्त्री. १ सांजदिवा. २ (सामा.) संध्याकाळीं लावण्यांत येणारा दिवा; दिवाबत्ती. ३ (ल.) मंद, मिणमिण ज्योतीचा दिवा. (क्रि. लावणें;

लागणें). **०वेळ**–स्त्री. संध्याकाळ. –एभा२३.२७८. **०सकाळ**–क्रिवि. सकाळसंध्याकाळ;सर्वदा;नेहमीं. **०सोंवळें**–न. सायंकाळीं स्नान न करतां नुसतें ओंवळें वस्त्र सोडून सोंवळें वस्त्र नेसणें; असा सोंवळेंपणा. **सांज(जा)वणें, सांजळणें**–अक्रि. संध्याकाळ होणें. 'दिवस सांजावितो.' 'मला सांजावतें.' **सांजे-झे**–क्रिवि. संध्याकाळीं. 'संशप्तक वधुनि विजय सांजे शिबिरासि यावया परते.' –मोद्रोण (नवनीत ३२५) **सांजा(जो)ळ**–स्त्री. (गो.) संध्याकाळ. 'सांजोळे दिव्यासी तेल.' –अमृत ११३. **सांजेसा**–क्रिवि. (गो.) संध्याकाळीं.

साजक—वि. पोटगी; ताट. 'पांच महाल साजक दुधास म्हणून दिले.' –मराचिथोशा ५. सानक पहा. **०रोटी**–स्त्री. शपथेचा एक प्रकार. सानकरोटी पहा. 'आतां तुम्हीं मला आज्ञा केली तरी मजला साहेबी साजकरोटी द्यावी.' –भाब २१. [सानक व सानकरोटीबद्दल चुकीचें वाचन]

साजक—पु. एक धान्य; सावा. [सं. श्यामाक]

साजगिरी—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल व तीव्र मध्यम, पंचम, कोमल व तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण. वादी गांधार, संवादी निषाद. गानसमय सायंकाळ.

साजण—पु. प्यार; प्रियकर; सजण पहा. [सं. स्वजन] **साजणी-नी**–स्त्री. १ प्रियकरीण; प्रिया; सजणी पहा. २ सखी; मैत्रीण. 'तुझे मनीचें साजणी। कळलें मज।'–कथा १.३.१०१. 'तंव भणे रुक्मिणी। ऐसिआं तुम्ही साजनी।' –शिशु ८१९. **साजणें**–न. १ मैत्री; सख्य. –ज्ञा १२.६४. 'कृपण मित्राचें साजणें। अंधासंगें पंथ चालणें।' –मुआदि १७.१८. २ सौजन्य; प्रेम. 'जीव घेतलिया उणें। चालों नेणसी साजणें।' –अमृ २.३९; –एभा १०.४२३.

सांजण, सांजणपात्र—सांदण, सांदणपात्र पहा.

साजा—वि. १ प्रसन्न. 'म्हणियाचेनि दाटपणें। साजा होय।' –ज्ञा १३.४३८. २ परिपूर्ण; भरलेला. 'कायि जलार्णव पाउसें। साजा होय।' –ज्ञा १४.३३३. [सज्ज]

साजा-जी-जें—वि. १ नवा; साजूक. –हंको. २ ताजा; टवटवीत. 'भूमिवेगळीं झाडें। पाणी घेती कवणींकडे। न दिसती आणि अपाडें। साजीं असतीं।' –अमृ ७.९१. ३ तयार; सज्ज. –ज्ञा १४.१०२. ? [सं. सद्यः, सज्ज] **साजीवंत**–वि. सजीव; टवटवीत. **साजीवता**–स्त्री. सजीवता; टवटवीतपणा. –हंको. **साजेपण**–न. टवटवीतपणा. 'पै वसंताचें रिगवणें। झाडांचेनि साजेपणें।' –ज्ञा.१३.१७८.

सांजा—पु. १ गहूं दळले, भरडले असतां त्याच्या होणाऱ्या कण्या; जाडा रवा. २ कोणत्याहि धान्याच्या कण्या. 'आणि संयाव शब्दें जाण। जे गोधूम खंडकण। देशभाषा विशेषण। सांजा ऐसें म्हणती।' –रास १.१९४. ३ या कण्यांचें केलेलें गोड खाद्य; शिरा (गुळाचा). शिरा बारीक रव्याचा साखर घालून केलेला, तर सांजा जाड रव्याचा गूळ घालून केलेला असतो. [सं. संयाव] **सांजवरी, सांजोरी**–स्त्री. १ सांजाची पुरी; एक पक्वान्न. 'सोज्वळ ब्रह्मतेजें। साखर सांजोरी। जेवितो हे गोडी। तोचि जाणे।' –ज्ञागा १५९. २ (कर्ना.) सांदणें; इडली.

सांजा—पु. सजाफ पहा. 'खाशा पंक्तीच्या मुकिशच्या रांगोळ्या काढणें, सांजा भरणें वगैरे कामें ...'. –ऐरा प्रस्तावना ७७.

साजात्य—न. १ सावण्यें; साधर्म्य; सजातीयता. २ कुटुंब, जात, वंश इ० चा सारखेपणा; आप्तपणा. –पु. सजातीय व्यक्ति, वस्तु. 'भणौनि जवळीक करणें। साजात्येसी।' –ऋ ९७. [सं.]

साजिरा—पु. एक जातीचा मोठा वृक्ष. यांचीं लांकडें इमारतीला उपयोगी असतात.

साजीखार—पु. एक क्षार; पापडखार. सज्जीखार पहा. [सं. सर्जिकाक्षार; प्रा. सज्जिआखार]

साजीश-स—स्त्री. १ संगनमत; सख्य. 'किल्लेदाराशी साजीश करून सव्वीस कोठे बारूदचे किल्ल्यांतील उडविले.' –दिमरा २.३६. २ फसवणूक; कपट; मसलत. ३ हुन्नर; युक्ति. –रा ८.४८. [फा. साझिश्] **साजीर्सा**–स्त्री. आर्जव. –राव्य ८.९१.

साजूक—वि. १ करून फार वेळ झाला नाहीं म्हणून जो ताजा, चवदार आहे असा (भक्ष्य, भोज्य पदार्थ). 'भीमें आणून साजूक अन्नें। भोजनीं तोषवीं पांचहीजणें।' –मुविराट २.२०. २ मूलस्थानापासून आणून फार वेळ झाला नाहीं असें (उदक, पुष्प, इ०). 'हें असो कायसीं फुलें। पानचि एक आवडतें जाहलें। तें साजूकही न हो सुकलें। भलतैसें।'–ज्ञा ९.३८५. ३ (सामा.) ताजें; टवटवीत; नवें. 'अथर्वण गदा तीख। कमळ साजुक ऋग्वेदु।' –एभा ११.१४७७. [सं. सद्यस्क; प्रा.सज्जस्क; देप्रा. सज्जोक]

सांजें—न. दृष्ट काढण्यासाठीं माणसावरून ओंवाळून टाकण्याचे पदार्थ. (क्रि० टाकणें, उतरणें). 'टाकित होत्या उतरुनि जीवरुनि गृहागमीं सख्या सांजें।' –मोवन ४.१४६. [? सांज= संध्याकाळ ? सांडणें]

सांजें—न. १ शपथ; वचन. २ व्रत. (क्रि० धरणें). ३ पिकाच्या अंदाजाचा खरेपणा. सांज पहा. [साच, सांज]

सांजें—न. (महानु.) वेळ. 'नांदीयाचें सांजें।'

सांझ, सांझें, सांझळणें—सांज इ० पहा.

साझा—पुस्त्री. (ना.) भागी. [हिं.]

साट—पु. माळा, गलबत इ०कावर कामटया, कारव्या इ० ची केलेली तक्तपोशी, आस्तरण. (सामा.) तक्तपोशी; जमीन (कामटयांची). **०बंद**–पु. साटी धुरांडीला ज्या दोरानें बांधतात तो दोर. **०बाव**–स्त्री.साटीचीं दोन्ही बाजूचीं लांकडें. **साटगी**–स्त्री. (साटा-ठा यांचें अल्प रूप) लहान चौकट; साटी.

साट-ठ—न. १ आंबा, फणस इ० ची पोळी. २ (विशेषतः) फणसपोळी. [सांठा]

सा(सां)ट—पु. १ चाबूक; कोरडा; आसुड. –ज्ञा १८.७.३४; –एभा २९.११२. 'ऐसा तो अश्वरावो। तयावरी साजिन्नला घावो। साट्ट फुटला पढाहो। अरुणाचा।' –कालिका १४.२४. २ तडाखा फटकारा. 'घोडियां मांट वेती सोडूनि वाग्दोरे।' –कृमुरा ९६; ५०.४८. [ध्व. सट्, का. चाटी=चाबूक, हिं; सटिका=छडी] **०मार-री**–स्त्री. १ एक राजेरजवाडयांचा खेळ. यांत हत्ती रंगणांत सोडून त्यांस चाबकांनीं–काठयांनीं मारून पळवतात. २ हत्तींची झुंज. **०मार्‍या**–पु. साटमार खेळांसाठीं योजलेला इसम.

सांट—पु स्त्री. अवकाश; जागा; वाव. सांठ पहा. **सांटणें**–अक्रि. सांठणें पहा. 'तैसाचि लवंघा सुटे। मग भुंई ना सेजें सांटे।' –ज्ञा १७.१४९. **साटपा**–पु १ सांठवण. २ सामानसुमान. **सांटव, सांटवण**–सांटवण पहा. 'तापासि सांठवणें। जाला दुःखासि विसंवणें।' –ऋ ४८. **सांटवणी-णूक, सांटवणें, सांटवासांटव**–सांठ मध्यें पहा. **सांटवा**–पु. सांठा. 'साटवा जाणोनि सकृत अंशेचा.' –दावि २०. **साटा**–पु १ सांठा पहा. 'श्रीराम कृपेचा लाहसी साटा।' –दावि ३५१. २ करंजी इ० मध्यें भरतात तें सारण, पुरण. **साटारा**–पु. रास; ढीग.

साटका—स्त्री. त्राटिकेप्रमाणें रावणाची एक बहीण. 'जैसें साटकेचे अग्निस्तंबनु.' –दाव ३७०.

साटकाविटका—वि मळलेला; खराब झालेला. [विटका द्वि.]

साटण—स्त्री. १ बढाई; निष्फळ बडबड. २ खोटीनाटी गप्प. [सं. शातन; म. छाटणें] **साटणें**–क्रि. (कु.) बढाई मारणें; निष्फळ बडबड करणें.

साटणें—उक्रि. बाजारांत आलेला माल एकदम सर्व घेणें; घाऊक माल घेणें. [साटें]

साटणें—क्रि. भेदणें; छेदणें. 'कृष्णाचा शर साटवू जरि दिसे। –गस्तो ८१. **साट्ट**–वि. तोडणारा; छाटणारा. (समासांत उपयोग) 'तंव म्हणे दानवसीर साटु। उद्धव देवा न संडी लाटु।' –भाए २१९. [सं. शातन]

साटल्यामोटल्या—स्त्रीअव अनेक प्रकारच्या मोटळया, गठडया; कपडे, दागदागीने, गुरेंढोरें, चीजवस्त इ० बद्दल समुच्चयानें वापरतात. 'तुम्ही निघून जा मी सा० अटपून येतो.' [मोटली द्वि.]

साटा-टी—पुस्त्री. मोबदला; प्रतिदान. –ज्ञा १०.१६९. 'हरिनें जीवें केली साटी। पाडिली तुटी सकळांसी।' –तुगा १२३. [देप्रा. सट्ट. हिं. साट का. साटी; तुल० सं. साति=देणें, देणगी] **साटकोष्ट-वाट**–न. (व.) आपली मुलगी (बहीण) दुसऱ्यास देऊन त्याची मुलगी (बहीण) आपल्या मुलास करणें. **साटभाऊ**–पु. साडू. **साटेलोटें**–न. १ आपल्या घरची मुलगी दुसऱ्याच्या घरीं व त्या घरची आपल्या घरीं आणण्याचा प्रकार; परस्पर शरीरसंबंध. २ मोबदला; देवाणघेवाण. 'पुण्य कोणाला कोणें द्यावें। साटेलोटें देवाकडे असे।' –दावि ३८७. **साटोवाटी**–स्त्री. अदलाबदल; मोबदला. –ज्ञा ६.४९४. 'जैशा जोहारियाच्या साटोवाटी। गारा आणिल्या उठाउठीं।' –भवि ४८.१०३. [का. साटी. तुल० सं. साति=देणें, देणगी.

साटा—पु १ (प्र.) छाटा; शितोडा. २ पक्वान्न करतांना पोटांत, घडयांमध्यें लोणी, तूप, तेल इ० चोपडतात तें; मोहन. (क्रि० लावणें; करणें).

साटा—पु. १ सांगाडा; चौकट; सांठा–ठ्या पहा. 'गाडीच्या साट्याबरोबर नदींत पाणी होतें.' 'मीळौनि शिरा येकवटा। लींपौनि अस्तिचा साटा।' –भाए ४०२. २ (खा.) शिडी. **साटारा**–पु (क.) साटा. **साटी**–स्त्री. १ गाडीची बैठक, तळचा भाग. २ साट; सांगाडा. ३ (को.) होडी झांकण्याची कामटयांची हांथरी. ४ (सामा.) बांबूच्या कामटयांची जाड हांथरी; पडदा. **साटें**–न. (व.) साटा; सांगाडा.

साटा—पु (व. माळवा) ऊंस. [हिं.]

साटारणा, साटारा—वि. सटारणा पहा.

साटि—वि. साठ. 'साटि लक्ष रथांची माडणी।' –शिशु १०३६ [सं. षष्टि]

साटी—स्त्री. सट्टा; खरेदीचा करार. 'पाण्यांतील म्हैसीची साटी। करणें हेचि बुद्धि खोटी।' –दा १०.८.१०. [गु. सादुं=खरेदीविक्रिचा करार. म. साटें]

साटी—स्त्री. १ आश्रय; संगत. –एभा २४.७७. 'तंव पुष्करें कलीचे साटीं। सर्वहि जिंकिली सृष्टी।' –कथा १.९.१८. २ साहाय्य. [सं. सति]

साटी—स्त्री. १ बरोबरी; सारखेपणा. 'उत्तमाचिया साटीं। नीच मानिजे किरीटी।' –ज्ञा १६.२. २ स्पर्धा; बरोबरी. 'साटी करी म्हणे होडा। महान् कविरत्नाशीं।' –मुआदि ५.६९. [का. साटि]

साटी—स्त्री. नाश. 'जिवाची केली साटी।' –अकक २. शिवराम मुद्रिका. [सं. साति]

साटी—शअ. साठीं पहा.

साटीण—न. एक प्रकारचें मऊ कापड. 'अतळस कुतन्याही साटिण्या रुंद वोली।' –सारुह ३.४०. [इं. साटिन; तुल० सं. शाटी=कापड]

साटीश्राप—पु. (व.) शाप पहा.

सार्टे—न. १ बाजारांत विकावयास आणलेला सर्व माल. (एका व्यापाऱ्यानें). 'तऱ्ही उन्मेखाचिये पेठे। गुणा अवंकणी भरीन बुद्धीचि सार्टे।' –ऋ १४. २ माल एकदम खरेदी करण्याचा सौदा; घाऊक मालाची खरेदी; सट्टा. (क्रि० घेणें; ठरणें; मारणें). ३ खरेदीचा करार; सार्टेखत. [? गु. सार्टु] **०खत**–न. सार्टे ठरवून करतात जो कागद तो. ठरविलेली सर्व रक्कम न देतां कांहीं थोडा विसार देऊन अमुक मुदतींत बाकीची देऊं असा करतात जो दस्तऐवज तो.

साटोप—वि. १ व्यवहारदक्ष; व्यवहार, व्यवस्था इ० चांगला जाणणारा (माणूस). २ आटोपशीर; थोडक्यांत मावणारें; बेतशीर (कामकाज इ०). [स+आटोप]

साटोप—वि. अहंकारयुक्त. 'ते तैसेंचि उचित करी। परी साटोपु नोहे शरीरीं।' –ज्ञा ६.४६. [सं.]

साटोप—पु. १ अति नेट, खटपट. 'महा साटोप जो मांडी।' –एभा १३.१११. २ चेव; आवेश. 'जैसा नपुंसक वांछी स्त्रीसुख। परी संग तया कैचा देख। मुळींच नाहीं बीजारोप। मा कैचा कामसाटोप तयासी।' –एभा २१.३४२. ३ उत्साह. 'साधना करी साटोपें।' –मुआदि ३१.३९. –वि. १ आवेशयुक्त. 'बाहुस्फुरणें आला कंप। वेगें साटोप उठिला।' –एरुस्व १०.४५. २ उद्युक्त. 'पुसोनियां होये। साटोप कर्मी।' –ज्ञा १८.६२३. [स+आटोप]

सा(सां)टोपा—पु. कोठार, सांठा; सांठवण. 'कैसें थोरिवेचें मान पाहे पां। तो सृष्टिबीजाचा साटोपा।' –ज्ञा ८.१६६. 'म्हणोनि पद्मनाभी नांवा। उदरीं त्रैलोक्याचा सांटोवा।' –एरुस्व १.३५. साटपा–वा पहा. [सांठा]

साटोरी—स्त्री. एक पक्वान्न; सारण घातलेली पुरी. [साटा+पुरी]

साट्या—वि. साटमाऱ्या पहा.

साट्या-ठ्या करवत—स्त्री. चौकटीची करवत.

साठ—पु. चौकट; साट पहा. **साठणी**–स्त्री. साटीवर टेंकण्यासाठीं बसविलेलें लांकूड. 'हरिपंतांनीं गाडीच्या सांठणीवर हात ठेवून गाडी मागून चालत असतां...' –खरादे १०३ **साठबंद**–पु. साठी आवळून बसावी म्हणून जे दोन सुरसे धोडक्यांतून आरपार घालून दोरीनें बांधतात ते प्रत्येक. **साठा-ठ्या**–पु. सांगाडा; चौकट (गाडी, जनावर, चित्र इ० ची). 'गजाश्वरथ पडिले खळाळा। रथ काष्ठा साठा वाहाती।' –जै १८. ११८. **साठी**–स्त्री. साठ–ठा पहा. गाडीचा कोठा.

साठ—वि. ६० ही संख्या; षष्टि. [सं. षष्टि; प्रा. सट्ठि] **०संवत्सर**–पुअव. प्रभव, विभव इ० साठ संवत्सरांचीं नांवें (हिंदु कालगणनेंतील, संवत्सर पहा). **साठळणें**–अक्रि. (वयाला साठ वर्षें होणें) म्हातारचळ लागणें; फार वय झाल्यानें बुद्धिभ्रंश होणें. **साठियुं**–पु. (गुजरात) निळवा; लवकर तयार होणारी जोंधळ्याची जात. –कृषि २६६. **साठी**–स्त्री. १ साठाचा समुदाय; संच. २ साठ संख्या. 'नाराच साठि आधीं प्रभुतें मग तीन जिष्णुतें ओपी।' –मोकर्ण ११.१९. ३ साठ वर्षांचें वय. ४ या वयांत होणारी अवस्था; म्हातारचळ. ५ तांदूळ, नाचणी यांची एक जात; साठेरा–री. **म्ह०** साठी आणि बुद्धि नाठी. **०उलटणें**–म्हातारपण येणें. **०बुद्धि**–स्त्री. म्हातारचळ; बुद्धिभ्रंश. **साठें**–न. (कु.) साठ दिवसांनीं पिकणारें भात. **साठेरा–री**–वि १ साठ दिवसांत तयार होणाऱ्या भाताची एक जात. २ नाचणीची एक जात.

सा(सां)ठ—पु. १ मावेल इतकी जागा; पुरेशी जागा (राहाण्यास, ठेवण्यास). २ (ल.) क्षमाशीलता; क्षमा. ३ सांठा; संचय. ४ आश्रय; दबा. 'आम्ही मलंगडचे रानांत साठ म्हणजे दबा घेऊं व तेथून कार्यसिद्धि करूं.' –वसईची मोहीम. [सं. सं+स्था; प्रा. संठा] **सांठण**–न. सांठविण्याचें पात्र. **सांठणें**–अक्रि. १ सांचणें; जमणें; गोळा होणें. २ मावणें; राहणें. **सांठवण**–नस्त्री. १ सांचविण्याचें पात्र, जागा; हौद; बरणी इ०. 'व्योम सांठवे संपूर्ण। ऐसी सांठवण कोठून आणू।' २ संचय; संग्रह. **सांठवणी**–न. १ (तळें, हौद, टांकें इ०त) सांठवलेलें पाणी. २ (खांच, खळगा, डबकें इ०त) सांचलेलें पाणी. **सांठवणी-णूक**–स्त्री. सांठविणें; संचय; संग्रह. **सांठव(वि)णें**–उक्रि. १ भरून ठेवणें; सांठवण करणें. २ सांचविणें; जमविणें. [सं. संस्थापन; प्रा. संठावण] **सांठवा-सांठव**–स्त्री. १ सांठविणें; संचय, संग्रह करणें (अनेक वस्तूं). २ घाईनें, कसें तरी सांठविण्याचा व्यापार. **सांठा**–पु. संग्रह; संचय; ढीग; रास. **सांठी**–स्त्री. १ गोणी. २ सांठा. **साठोपा**–पु. संग्रह; संचय. 'ओला चारा खड्ड्यांत दाबून त्याचा साठोपा करावा.' –केसरी १८.९.३६. **सांठ्याचा**–वि. ठेवणीचा (सुंदर पदार्थ, वस्त्रपात्र).

साठपा, साठमार—साटपा, साटमार पहा.

साठी—स्त्री. तुलना; बरोबरी; साटी पहा. 'जें परब्रह्मा निर्मळा। साठी न सरे।' –ज्ञा ८.२६२. [का. साटि]

साठी—स्त्री. सोबत; संगत. साटी पहा. 'संगती स्त्रिया बाळकांची। आहे साठी जन्माची।' –दा ३.४.४२. [सं. सति]

साठी—स्त्री. नाश; त्याग. 'करील आपुल्या जीवा साठी।' –मुआदि १९.२८. [सं. साति]

साठीं—शअ. १ करितां; स्तव. उद्देशवाचक किंवा हेतुवाचक अव्यय. २ मुळें; योगानें. 'लिखितासाठीं जरी मी सांपडें। तरी कां साधक शिणती गाढे।' –एरुस्व ५.५४. ३ ऐवजीं; बदलीं. 'कां विटेसाठीं परीस जोडे।' –एभा १९.४२४.

साठोरी—स्त्री. सारण भरलेली पुरी. साटोरी पहा.

साड—पु. गाभा; मर्मस्थान (लांकूड, झाड इ० चें); नार. –मोआश्रम ४.१३. [सं. सार]

सांड—पु. १ देवाच्या, धर्माच्या नांवानें मोकळा सोडलेला बैल; पोळ. २ वळू; उत्पत्तीचा बैल. ३ (ल.) नुसता पोसलेला गलेलठ्ठ माणूस;. उनाड, रिकामटेकडा मुलगा (निंदार्थी). 'घरोघरीं दूध लुटी। झाला सांड तुझ्या पोटीं।' –अमृत २३. [सं. षंड; प्रा. संड; हिं. सांढ]

सांड—स्त्री. उंटीण; उंटांतील मादी. [दे. प्रा. संढी]

सांडण,सांडणस्वार–सांडणी, सांडणीस्वार पहा. **सांडणी**–स्त्री. उंटीण; सांड. 'सांडणी दररोज ३०।४० कोस चालतात.' –मराठी ३ रें पु. आवृ. ४.१२८. [हिं. सांटनी] **०बातमी**–स्त्री. सांडणीस्वारानें आणलेली बातमी. 'सांडणी बातमी आली।' –ऐपो २३४. **०स्वार**–पु. सांडणीवर बसून डांक, बातमी इ० पोंचविण्याचें काम करणारा शिपाई. घोड्यापेक्षां उंट, उंटापेक्षां उंटीण फार जलद चालते म्हणून पूर्वी टपालाचें–जासुदाचें काम असे स्वार करीत. **सांडरूं**–न. (तिरस्कारार्थी) सांड; उंटीण.

सांड—स्त्री. १ जास्त झालेलें पाणी काढून देण्याचा मार्ग (बांध, भिंत इ०तून). २ पाण्याचा दरवाजा; उघडी; सांडवा. ३ (राजा.) बांध फुटून पडणारी फट. [सांडणें] **सांडवा, सांडोवा**–पु. १ धरणाचें दार; सांड. २ पाण्याचा निकाल; जास्त पाणी काढून देण्याची वाट. ३ कालवा; पाट. ४ धरणावरची वाट (यावरून पावसाळ्यांत पाणी वाहतें); नदीवरला पायरस्ता. [दे. प्रा. संदेह=पाण्यांतील पाय ठेवण्यासाठीं असलेला दगड] **सांडावा**–पु. सांडवा पहा.

सांड—स्त्री. १ उपेक्षा; विस्मरण. (क्रि० करणें). 'सांड कर माझी दोन दिवस स्वस्थ निजल्यानें।' –प्रला १६३. २ सोडणें; टाकणें; त्याग (विषयीं–करणें). 'पुत्रावियर्यी–संसाराविषयीं–कामाविषयीं सांड केली.' ३ हरविण्याची, गमविण्याची खोड. (क्रि० लागणें). 'काय हो, तुमच्या भावाला रुपयांची सांड लागली.' ४ नांव सोडणें; वाटेल तें करण्याची मुभा देणें. ५ टाकलेली बायको. ६ –न. हरवलेली, सांडलेली वस्तु. ७ दृष्ट, बाधा इ० साठीं ओंवाळून टाकावयाचा पदार्थ. 'म्हणतीं लेंकरें आलीं भिऊन। सांडी ओंवाळून सांडणें।' –ह १३.१६०. –वि. रस्त्यांत पडलेली; बेवारसी (वस्तु). [सं. शद्–शन्न? सं. छर्द्; प्रा. छड्ड; हिं. छांड] **०जाणें**–शेतांतील पाणी जाण्यासाठीं ठेवलेल्या सांडीची खिंड वाहून जाणें. –कृषि २०९. **०देणें–करणें**– १ (अमक्यासला) जाऊं देणें; जाण्यास परवानगी देणें. 'मग टाकीं सांड देऊनि त्यासीं। पाठवीं मजपासीं सत्वर।' –भवि ५६.७७. २ दुर्लक्ष, कानाडोळा करणें (दोषाकडे). ३ टाकून देणें; फेंकणें. 'बाह्य कुटुंबा करी सांड।' –सामाशब्द. **०उपड–उबड**–स्त्री. (ना.) सांडलवंड; नासधूस. **०खत–चिट्ठी–पत्र**–नस्त्री. सोडचिट्ठी (बायकोस, गुलामास, घरादारास इ०). सोडचिट्ठी पहा. **०घर**–वि. घर सोडून जाणारी, नवरा सोडणारी (स्त्री). सांडवर पहा. **०पाणी**–न. धुणें, भांडीं घांसणें इ०केल्यामुळें सांडलेलें पाणी; मोरीचें पाणी. 'सांडपाण्याचा निकाल होण्यासाठीं गटारें व मोऱ्या बांधतात.' –आरोशा १.१.१. **०भोळा**–वि. विसरभोळा पहा. **०रांड**–स्त्री. नवऱ्यानें टाकलेली बाई; सांडरूं. **०लवंड, सांडासांड**–स्त्री. सांडणें, पालथे करणें, नासणें या अर्थी व्यापक शब्द; नासधूस; उधळमाधळ. **०वर**–वि. नवरा टाकलेली; घर सोडून गेलेली (स्त्री.) 'सांडवर कोणी न धरिती हातीं। प्रारब्धाची गति भोगू आतां।'–तुगा ३१७. [वर=नवरा] **०सूट**–स्त्री. कोणाकडून यावयाचा पैसा, माल इ०त दिलेली सूट. **सांडण–णी–णें**–नस्त्री. १ ओंवाळून टाकलेला जिन्नस; बळी (दृष्ट, भूतबाधा काढण्यासाठीं). (क्रि० टाकणें). 'साक्षात पिशाच येऊन। घेऊनि गेलें जैसें सांडण।'–भवि ९.१००. 'अगणित तिज हातीं सांडणी टाकवीती।'–सारुह २.८७. –ज्ञा ८.२६०. २ भूतबाधा, दृष्ट काढणें; ओंवाळणी. ३ कुरवंडी; ओंवाळून टाकणें; तुच्छ, कःपदार्थ असणें. 'अष्टभोग मूर्तिमंत। सांडणें करीत तुजवरून नित्य।' –मुआदि १६.३१. **सांडणी**–स्त्री. १ सांडण्याची क्रिया; त्याग. 'तेवीं अविद्या सांडणी।' –एभा १२.२२५. २ उपेक्षा. 'केली प्रपंचाची सांडणी।' –एभा १०.२५१. ३ बिरणें; लय. **सांडणीस टाकणें–घालणें–पाडणें**–मनांतून घालविणें; विसरणें. **सांडणीस पडणें**–विसरलें जाणें. **सांडणें**–उक्रि. १ बाहेर पडणें, पाडणें; लवंडणें; उपडें होणें. २ हरवणें; गहाळ करणें, होणें. 'भक्ति पांघरूण तें माझें सांडलें।' –नवनीत पृ. १५३. ३ सोडणें; टाकणें; त्याग करणें. –ज्ञा ४.१२९. 'भीम म्हणे सांडिता मूढा। शिक्षा उपटीन।' –मुसभा ९.९०. **सांडरा**–वि. १ उघळया; उडव्या. २ हरव्या; नेहमीं सांडणारा. ३ (ल.) निष्काळजी; विसरभोळा.

सांडरूं–वि. नवऱ्यानें टाकलेली; घरदार सोडलेली (स्त्री. शिवी प्रमाणें उपयोग). **सांडवणें**–अक्रि. १ क्षीण, जर्जर होणें; खंगणें. 'सांडवला भला माणूस याची कोणी कुमक करीनात.'–भाब ८३. २ मुकणें; आंचवणें. 'सुग्रीव स्त्रीराज्यें सांडवला। बंधूच्या रोषें मज शरण रिघाला।'–स्नानु १२.३११. **सांडाव-वा**–पु. सांडणी; सांडण्याची क्रिया; सांड पहा. 'असे सांडाव देत आले अटक उतरून नऊ कोशांवर।'–ऐपो १२१. **सांडी**–स्त्री. त्याग; अव्हेर. 'समर्था मनीं सांडि माझी नसावी।'–राक (करुणाष्टक); –तुगा ५७३. **सांडी-पडणें-धरणें**–हार खाणें; मागें राहणें. 'पदोपदीं त्वां धरिजेत सांडी।'–सारुह ७.११९. **सांडी मांडी**–स्त्री. १ घेण्या-टाकण्याचा व्यापार. 'मग हें सांडीमांडी नलगे तुज।' २ यातायात; त्रास; धरसोड. 'सांडीमांडी मागें केल्या भरोवरी। अधिकचि परी दुःखाचिया।'–तुगा ३०८. **सांडीविखुरीं**–क्रिवि. सांडण्यालवंडण्यांत; इकडेतिकडे. 'मुडाहूनि बीज काढिलें। मग निर्वाळलिये भूमीं पेरिलें। तरि तें सांडीविखुरीं गेलें। म्हणों ये कायी।'–ज्ञा ९.३९. **सांडोर**–वि. (जुन्नरी) पोर न पाजणारी (मेंढी). **सांडोवा**–पु. कुरवंडी; सांडणें; उतारा. 'यालागीं शरीर सांडोवा कीजे। सकळ गुणांचें लोण उतरिजे।'–ज्ञा ९.३८१. **सांडोसांड**–क्रिवि. कांठोकांठ; भरून वाहील अशा रीतीनें.

सांड—स्त्री. कोपरा; सांध. 'सागरुही सांडी पडे।'–ज्ञा १४.२३५. सांडी पडणें पहा [सं. संधि; म. सांध]

सांडई—स्त्री. तांदुळाच्या पिठाचें कुरडईप्रमाणें एक खाद्य. (अव.) सांडया. 'कोणी घडया घालुन मांडयांच्या। नेती पराता मग सांडयांच्या।'–सारुह ६.७९. (नवरा बायकोची सांड करील या भीतीनें–ध्वनिसाम्यावरून–लग्नांत सांडया करीत नाहींत) 'भीमकी प्रिय व्हावी श्रीपती। सांडया न करीच शुद्ध मती। जाणे वृद्धाचार रीती।'–एरुस्व १४.११७.

सांडगा—पु. कोहळा, भोपळा, काकडी इ० च्या फोडींत तिखट मीठ घालून, वाळवून व नंतर तळून केलेलें तोंडी लावणें. 'काळमुखीं व्हायाचा काय सांडगासा च।'–मोउद्योग १.४६. [? शांडाक –भाअ १८३४. का. संडिगे]

सांडणी—स्त्री. सोनाराचा चिमटा; सांडस पहा.

सांडशी—स्त्री. लहान सांडस.

सांडस—पु. (सोनारी, लोहारी) विस्तवांतील पदार्थ उचलण्यासाठीं असलेला चिमटा; (सामा.) पकड; चिमटा. 'कां चांचूचेनि सांडसें। खांडिजे पय पाणी राजहंसें।'–ज्ञा ९.४४. [सं. संदंश; प्रा. संडास; हिं. सँडसी]

साडा—पु. लग्नामध्यें साडे म्हणून जो सोहळा होतो त्यावेळीं वधूस द्यावयाची साडी. **साडी**–स्त्री. १ लहान लुगडें २ (ना.) भारी वस्त्र; पैठणी. 'शेले शालू साडया क्षीरोदक लांबरुंद पाटावें।'–मो सभा ५.८३. [सं. शाटी; प्रा. साडी; हिं. गु. साडी] **साडे**–पु.अव. १ लग्नानंतर चवथ्या दिवशीं ऐरणीपूजनाच्या प्रसंगीं वधूवरास वस्त्रें अर्पण करावयाचा सोहळा 'मुहूर्त पाहुनि लाविलें साडे झाले चौदिवशीं।' –अमृत पुरवणी २. २ या प्रसंगीं देतात तीं वस्त्रें. 'साडे आतां जानकीसी। समर्पिले पाहिजे।'–वेसीस्व १३.१. ३ (ल.) समाप्ति; शेवट. 'तो हा अमृत इच्छितो संसाराचे साडे।'–अमृत ११६. **साडे करणें**–१ खलास करणें; खातें बंद करणें. २ (ल.) काढून लावणें; गचांडी देणें. ३ खरडपट्टी काढणें. **साडे चालणें**–हाल होणें. 'महाराजांच्या हुकुमानें त्याच्या मुलाचे साडे चालले आहेत.'–विक्षिप्त २ १०९.

साडादिडा—वि. धड एकेरी नव्हे, धड दुहेरी नव्हे, धड दिडकी नव्हे, धड तिहेरी नव्हे अशा तऱ्हेची; बेतापेक्षां कमीअधिक; वेडीवांकडी (वस्त्रादिकांची घडी, दोरी इ०). [स+अडा (अर्धा)+दीड]

साडी—स्त्री. (नाविक) काठी पारांत बसविण्यासाठीं अस्तमानावरून माल आडव्याच्या खालच्या अंगास भिडविलेलें लांकूड.

सांडुस, सांडव—पु. (कों.) एक किडा; आळी.

साडू, साडभाऊ—पु. बायकोच्या बहिणीचा नवरा. साटभाऊ. बहिणीबहिणींचे नवरे ते परस्पर. [साट=मोबदला. सिं. सेंढ्व; का. सडुक.] **म्हण** १ सोयऱ्यांत साडू आणि भोजनांत लाडू २ (माण.) पाहुण्यांत साडू आणि हत्यारांत माडू (घातकी असतो).

साडे—पु. अव. साडा (अर्धा) याचें अनेकवचन. १ आणखी अर्धा याअर्थी तीनच्या वरच्या संख्यांना लावितात. उदा० साडेतीन–चार. २ शिवी, अपशब्द यापुढें आणखी, भरीस अर्धा या अर्थी वापरतात. उदा० साडेशिनळीचा-मात्रागमनी–हरामी. [स+अर्ध–प्रा. अड्ढ] **०तीन**–वि.३॥ संख्या. कांहीं प्रख्यात व्यक्ति व वस्तू यांचें प्रमाण–मापन दाखविणारी संख्या. उदा० साडेतीन तलवार (करी)–भालेकरी–लिहणार, शहाणे, इ० **०तीन पीठें**–नअव. (देवीचीं) १ तुळजापूरची भवानी. २ कोल्हापूरची अंबाबाई. ३ माहूरची देवी व ३॥ सप्तशृंगीची देवी. **०तीन पोशाक-ख-वस्त्रें**–पु.नअव. पूर्वी दरबारांत अधिकाऱ्यांना ३॥ वस्त्रें देत असत तीं. १ पागोटें. २ शाल-जोडी किंवा शेला. ३ पायजामा किंवा झगा करण्यासाठीं महामुदी या उंची वस्त्राचा तुकडा, व पटक्यासाठीं किनखापीचा अर्धा तुकडा (अर्धे ठाण). **०तीन मुहूर्त**–पुअव. कोणतेंहि काम करावयास दसरा, बलिप्रतिपदा व वर्षप्रतिपदा (पाडवा). हे तीन अत्यंत उत्कृष्ट मुहूर्त असून

अक्षय्यतृतीया किंवा नागपंचमी हे साधारणपणें अर्धवट उत्कृष्ट मुहूर्त समजले जातात. १ चैत्र शु॥ १, २ आश्विन शु॥ १०, कार्तिक शु॥ १ व ३॥ अक्षय्यतृतीया किंवा नागपंचमी. **०तीन राव**–पुअव. (पेशवाईतील) १ मुरारराव घोरपडे, २ भवानराव प्रतिनिधि, ३ गोपाळराव पटवर्धन व ३॥ थोरले माधवराव पेशवे. **०तीन शहाणे**– १ (पेशवाईतील) १ सखारामबापु बोकील, २ विठ्ठलसुंदर, ३ देवाजीपंत चोरघोडे व ३॥ नाना फडणीस. २ (ल.) दीडशाहाणा; मूर्ख व बढाईखोर. **०पंधरें-पन्हरें**–न. (१५॥) सोनें अस्सल, उत्कृष्ट. १५॥ रु. भावावरून नांव पडलेलें दिसतें. 'कां साडेपंधरया रजतवणी। तैशीं स्तुतीची बोलणीं।' –ज्ञा १०.१५. 'साडे पन्हरेयाचीं सरळें देवो लेइले हातीं।' –धवळे उ १९. **०भावार्थी**–वि. (उप. निंदाव्यंजक) वरून भोळा पण आंतून पक्का लबाड; बकवृत्ति माणूस. **०शंभर**–वि. (अशुद्ध, अशिष्ट प्रयोग) १००॥. **०सातकी**–स्त्री. साडेसात बिघे जमीन. **०साती-सातीचा फेरा**–स्त्रीपु. १ एखाद्याची जन्मराशी व तिची मागची आणि पुढची राशी या तीन राशी क्रमण्याला शनिग्रहाला लागणारा साडेसात वर्षांचा काळ. २ (हा काळ कष्टाचा जातो यावरून ल.) आपत्काल; दुर्दैवाचा फेरा. (क्रि० येणें; लागणें).

साडयामाडया—पु. मुलींचा एक खेळ. पायांवरून हात फिरवितांना पुढील गाणें म्हणतात. (क्रि० करणें).' साडयामाडया पापुडया। गंगणीचीं लेकरं माकुडया। तिथं होती साळुंकी। साळुंकीच्या पायांत दोर ग। गंगणीचा नवरा चोरग।'

साढ्ढ, साढे—साड्ढ, साडे पहा.

साण—स्त्री. होळी देवतेची पालखी ठेवण्याची जागा; देवता स्थापनेची जागा, कोनाडा (होळीच्या दिवशीं लागणारा). [सं. स्थान ?]

सार्णे—न. (राजा.) कोनाडा. [सं. स्थान ?]

साण-णा—स्त्रीपु. (प्र.) सहाण. १ गंध इ० उगाळण्याचा कुर्‍हेदाचा दगड. २ धारेचा दगड; निसणा. [सं. शाण; प्रा. साण] **साणपट्टी**–स्त्री. १ जात्याचें पाळें. २ पाळयाचा दगड. **साणीलाणी**–स्त्री. (कों.) सीमेची खूण (दगडांत कोरलेली). [साण+लाणी=लावणी]

साण—वि. सान; लहान. 'साणा हा सत्वाचा प्राकर्णु।' –उषा १६. [म. सान; का. सण्ण]

साणा—पु. १ तरीचें नाकें; उतारजागा. २ तर; नाव.

साणा—पु. १ भागीदारी जमिनींत आपल्या भागाचें, मालाचें रक्षण करण्यास ठेवलेला माणूस. २ कुळावर देखरेख करण्यास जमिनीच्या मालकानें ठेवलेला माणूस. [शाहाणा] **साणा-ण्या बसणें**– (कों.) पीक काढून होईपर्यंत मालकानें हजर राहणें (मक्तेकऱ्यानें बोलाविल्याखेरीज मालकाला साणा बसतां येत नाहीं). 'तुला मक्ता घालतां येत नसेल तर साणा बसावयाला बोलाव.' **साणेपण**–न. (कों.) पिकाची समक्ष झोडणी मळणी.

सार्णे—न. धूर जावा, उजेड हवा, यावी म्हणून भिंतींत किंवा छपरांत ठेवलेली खिडकी; गवाक्ष; धारें.

सात—वि. १ ७ संख्या; सप्त २ (ल.) संख्येनें मोठा, परिपूर्ण; फार. उदा० सातताड उंच; सात लबाड, सात पडद्यांत बसणें, इ०. [सं. सप्त; प्रा. सत्त; हिं. सात] **म्ह**० १ सात सुडे (सा) तरी भागुबाईचे कुले उघडे. २ सात सुगरणी अन् भोपळा अळवणी. ३ सात पाच रंभा, पाण्याचा नाहीं टिंबा. **०आश्चर्य**–नअव. (बालभाषा) १ आकाशाला खांब नाहीं. २ तळहाताला केंस नाहीं. ३ समुद्राला झांकण नाहीं. ४ घोडयाला स्तन नाहीं. ५ देवाला आईबाप नाहीं. ६ जिभेला हाड नाहीं. ७ केंसाला रक्त नाहीं. **०ताड उंच**–अतिशय उंच. **०धातु**–पु. सोनें, चांदी, पितळ, तांबें, शिसें, कथील व पोलाद. **०पदरी मणी**–पु. (तंजा.) स्त्रियांच्या गळयांतील एक दागिना. **०पांच**–वि. १ पंच्याहत्तर. 'ऐशियाही सातपांच प्रधाना। विभूती सांगितलिया तुज अर्जुना।' –ज्ञा १०. ३०२. २ सात (धातु) व पांच (महाभूतें). 'सातापांचाचें गोठलें। प्रारब्धें आकारलें।' –तुगा २००४. **०पांच करणें**–जींत पुष्कळ विसंगतपणा आहे अशी गोष्ट सांगणें; ताळमेळ नाहीं असें बोलणें. **०पानी**–वि. उगवल्यापासून सात पानें आलीं म्हणजे ज्याला फळ येतें असा (वेल, दूध भोपळा, कांकडी इ० चा). **०पुडी**–स्त्री. (खाटिकी शब्द) आतडयांचें वेष्टन. **०पुडी गलांड**–न. सात वेळां पू होऊन फुटणारें गळूं (यास सात पापुद्रे आहेत असा समज). **०पुती**–स्त्री. १ घडघोसाळीचा वेल. २ सात मुलगे असणारी बाई; साता मुलांची आई. **म्ह**० एकपुती रडे आणि सातपुती रडे. **०पुतें**–न. घडघोसाळें (फळ). **०पुऱ्या**–स्त्रीअव. प्रसिद्ध अशीं सात पवित्र नगरें. 'अयोध्या मथुरा माया। काशी कांची अवंतिका। द्वारावती आदि आल्या। सर्वही मोक्षदायिका।' –विष्णूची भूपाळी. **०फिरक**–न. एक शोभेच्या दारूचें झाड. याला सात फेरीं (फिरतीं चक्रें) लावतात. तीं पेटल्यावर फिरूं लागतात. **०भाई**–स्त्री. शेतांतील किडे वेंचून खाणारा एक प्राणी. **०मौक्तिक स्थानें**–पुअव. १ शिंप, २ डुकराचें मस्तक, ३ सर्पाचें मस्तक, ४ शंख, ५ मत्स्य, ६ बेडुक, ७ हत्ती. **०लाजा**–स्त्रीअव. पुढील सात प्रकारच्या लाजाः– जनलज्जा, मनोलज्जा, वयोलज्जा, धर्मलज्जा, कर्मलज्जा, जातिलज्जा, कुललज्जा. **०लाजा पदरीं बांधणें**–अतिशय निर्लज्ज असणें. **०वडा**–पु. (आठवडा, पंधरवडा याप्रमाणें बनविलेला शब्द–सुमारें ८०। ९० वर्षांपूर्वी). १ सात दिवसांचा काल. २

सात दिवसांचा एकंदर हिशेब. **०वण-वीण**-स्त्रीपुन. एक झाड. याच्या एका डेंखास सात पानें असतात. सप्तपर्णी. 'सरल कुटज वट-वृक्ष सातवण प्लक्ष दाडिमी चांफा।'-नरहरी-गंगारत्नमाला. [सं. सप्तपर्ण-सप्तवर्ण- सातवाण- सातवण] **०वळा-ळी, सातोळा**-वि. १ सातव्या महिन्यांत जन्मलेलें (मूल). २ सातव्या महिन्यांत प्रसूत झालेली (स्त्री.) **०वांकडी**-स्त्री सात दिवस एकसारखी पावसाची झड. 'अमृताची सातवांकुडी। लागो कां अनुघडी।' -ज्ञा १३.६४०; -एभा २३.८५०. **०वार**-रविवारादि आठवड्याचे सात दिवस. **०वेउळी**-स्त्री. सात नांग्यांची इंगळी. 'कां आयुष्य जातिये वेळे। शेळिये सातवेउळि मिळे।' -ज्ञा १६.२५९. **०सडका**-स्त्री.अव. उष्णतेनें हत्तीच्या गंडस्थळांतून वाहणारा मदाचा स्राव. (क्रि० सुटणें). **०सडका सुटणें**- १ स्वच्छंदी, स्वैर बनणें. २ माजणें; उन्मत्त होणें. **०सवाई-सवाईनें**-क्रिवि. १ सातपटीपेक्षां आधिक्यानें (गुणादिकांत); सातपट. २ (ल.) अतिशयोक्तीनें; अतिशय मोठ्या प्रमाणांत; फारच अधिक; वरचढ. 'तुमच्या घोड्यापेक्षां आमचा घोडा सातसवाईनें चांगला आहे.' **०सायास-साय-या**-पुस्त्रीअव. अतिशय, पराकाष्ठेचे परिश्रम. 'सातासायासांनीं' असा बहुधा प्रयोग येतो. **०साया करणें**-अतिशय काळजीनें, सोपस्कारानें वागविणें; फार परिश्रम घेणें. [सात+सायास] **सातरी**-स्त्री. १ सात दिवसांचा काल. २ सप्तक; साताचा समुदाय. सातरें पहा. **सातरें**-न. १ सात अहोरात्रपर्यंत पाऊस वारा इ०ची झोड. 'पावसाचें-वाऱ्याचें सातरें.' २ सहा दिवस मध्यें जाऊन सातव्या दिवशीं हिंवाची येणारी पाळी. ३ (ल.) कधींमधीं मिळणारी इष्टानिष्ट गोष्ट सतत कांहीं दिवस मिळत गेल्यास म्हणतात. 'पंधरा दिवस क्षीरभोजनाचें सातरें लागलें होतें.' ४ सात दिवसांचा काल; सप्ताह. -ज्ञा १७.९८. 'ही मात्रा एक सातरें घे.' **सातर्वा**-स्त्री. मूल जन्मल्याच्या सातव्या दिवशीं करावयाचा कुलाचार (नामदेव समाजांत रूढ). **साता काळजांच्या पलीकडे ठेवणें**-फार फार जपणें. **साता गुणांचा खंडोबा**-पु. १ अनेक दुर्गुण आणि खोडी यांनीं युक्त असा इसम. २ अनेक व्याधी, रोग ज्यांच्या मागें लागले आहेत असा इसम: अठरा गुणांचा खंडोबा पहा. **साता जन्माचा वैरी**-पु. फार जुना, मोठा वैरी; हाडवैरी. 'डोक्यांत दगड घातला तर साता जन्माचा वैरीसुद्धा रडायला लागेल.' -भा २७. **साता नवसांचा**-वि. फारा दिवसांनीं, नवसासायासांनीं झालेला (बाळ); (ल.) फार लाडका. 'साता नवसांचें हें एकुलतें एक लाडकें बाळ। उडण्या बागडण्यांतचि बालपणीं घालवीतसे काळ।' -मोगरे. **साता समुद्रांच्या पलीकडे**-फार फार दूर अशा अर्थी. **साता समुद्राच्या पलीकडे ठेवणें**-फार बंदोबस्तानें, कोणास मागमूस लागू न देतां ठेवणें. **साता सायासांनीं**-क्रिवि. फार परिश्रमांनीं. **सातारें**-वि. सात महिन्यांचें (जन्मलेलें मूल). **म्हo** सातारें आणि म्हातारें, आठ आणि घाट(त). (याचा विशेषणासारखाहि उपयोग करतात). **साताळ**-पु. (व.) सात दांत असलेला बैल. **साताळशी**-वि. अतिशय आळशी. [सात=सातपट+आळशी] **सातिव, सातेरूं**-न. (कों.) जमीनींत (वाऱ्हळांत) लागणारें व सात पोवळीं असणारें मोहं. **साती**-अ. सातानें गुणून; सातपट (पाढ्यांत उपयोग). 'एक साती सात.' **सातेरें, सात्रें**-सातरें पहा. **सातोळा**-वि. सातवळा पहा. **सात्रक**-न. सातरें; सात दिवसांचा काल.

सात—स्त्री. १ सोबत; संगत; समागम; साहचर्य. 'एऱ्हवी मधुकराचा साती केवि जीणवे।' -शिशु २६६; -तुगा ३०७५. २ सोबती; जोडीदार. ३ तिरकमठ्याला बांबूची बारीक बांधतात ती कांब. -बदलापूर १२६. [साथ] **साती**-पु. सोबती; साथीदार.

सात—स्त्री. १ क्रम; आवृत्ति; सातरें (विशेषतः साथीच्या रोगाचें). २ एकाच प्रकाराची, पद्धतीची, पदार्थांची पुनरावृत्ति. उदा० 'भाकरीची-भाताची सात (भोजनास); मुलांची-मुलींची सात (बायकोस). ३ सतत प्रवाह; परंपरा. [सं. सतत]

सात-सांत-ती—स्त्री. सांथीचा रोग; सांथ.

सा(सां)त—स्त्री. एक विवक्षित मासा.

सात-थ—स्त्री. ग्रामदेवतेपुढें नारळ फोडणें (दसऱ्यास किंवा आबणीपूर्वी भगतानें). -बदलापूर ३२०. [? सं. साती=दान]

सांत—वि. समग्र; सर्व. 'यालागिं बोलिले सांतें।' -रास २.६३. [स+अंत]

सांत-सात—स्त्री. १ बाजार; हाट. -ज्ञा १३.३२०. 'गोरस घेऊनी सांतें निघाल्या गौळणी।' -तुगा १२८; दहीसात. २ जत्रा; मेळा. ३ (गो.) आठवड्याचा बाजार. **साती**-स्त्री. (ना.) लहान बाजार.

सांतकें—न. (नंदभाषा) (क.) लुगडें.

सातडें—न. १ कातडें; चामडें (माणसाचें किंवा इतर प्राण्याचें). २ कातड्याचा लोंबता पट्टा, वाभाडा. (क्रि० काढणें; निघणें). ३ झाड-वनस्पतींची साल. (क्रि० काढणें; निघणें). [स+आंत्र?]

सा(सां)तत्य—न. सततपणा; शाश्वतता; अखंडितता. [सं. सतत]

सांतपन—न. १ एक प्रकारची तपश्चर्या. २ प्रायश्चित्ताचा प्रकार. 'सांतपन, चांद्रायण किंवा ज्ञाताज्ञातदोष परिहारक-यांपैकीं कोणतेंहि प्रायश्चित्त घेण्यास तयार होण्याचा...निश्चय केला.' –आगर ३.१३४. [सं.]

सातपाणी—पु. भितीवर चेंडू मारून तो झेलण्याचा खेळ; भितपाणी. –मखेपु ५१.

सातबर्दी-दें—स्त्रीन. पांच किंवा जास्त गडयांनीं चेंडूनें खेळावयाचा एक खेळ. –मखेपु ५८.

सातमां—स्त्री. (नाविक, हेट.) गलबत हांकारणें; गलबत हाकारण्याचा परवाना. सतमां पहा.

सांतर—वि. अंतरांनीं युक्त; अंतर असलेलें; तुटका; फुटका. [स + अंतर] **०स्पर्श**–पु. परंपरासबंध; अप्रत्यक्ष स्पर्श.

सातरणें—अक्रि. चहूंकडून सारखा विस्तार होणें (झाडाचा); चांगलें बहरणें, फैलावणें. [स+आस्तरणें] **सातारा, सातेरा**–वि. सातारलेला (वृक्ष).

सातर(रा)स, सातरवारा—पु. (नाविक, कों.) ईशान्येकडील वारा; सप्तर्षिभागाकडून येणारा वारा. [सं. सप्तर्षि]

सातरी, सात्री, साथरी—स्त्री. (व. न.) अंथरूण; बिछाना. [? सं. स+आस्तृ. अर. सातिर्=आच्छादित]

सातवार—स्त्री. (पुं.) (कों. किनाऱ्यावरचा शब्द) कांहीं विवक्षित लाटा येऊन गेल्यानंतरची येणारी मोठी लाट. (हिंदी खलाशी ही लाट सातवी मानितात व यूरोपीयन खलाशी तिसरी किंवा नववी मानितात). [सात]

सातळणें—क्रि. संचणें. –मनको.

सातळी—स्त्री. (गो.) भिरल माडाच्या सावळीची इरल्यासारखी शिवलेली पण वाटोळी छत्री. (गो.) सतरी. [छत्री]

सातव—पु. (सामा.) सातू.

सांतवन-वीण—नपु. (प्र.) सांत्वन; शांत करणें; समाधान; दु खाचा पहिहार. [सं. सांत्वन] **सांतविणें**–सांत्वन करणें.

सातळणी—स्त्री. (व. ना.) तळणें; फोडणी देणें.

सा(सां)तळणें—क्रि. तळणें; फोडणीस टाकणें; (हरभरे, दाणे, मिरच्या इ०). 'गंगा, थोडे हरबरे सातळ बरें!' [तळणें]

साता-ती-तें—धावि. द्योत्साता, असतां या अर्थी. 'पावला सातां सीणु।' –गीता १.१४८३. 'जैसी तीरीं नाव न ढळे। टेकली सांती।' –ज्ञा ७.४. 'जे योगु यागु न करितीचि। जन्मले साते।' –ज्ञा ४.१५४. [सं. सत्–सति]

सातार्डे—सातडें पहा.

सातारी—स्त्री. (कों.) १ वारुळाची जागा. २ या जागेवर बांधलेलें देऊळ (नागाचें). पेड पहा.

सातारो—पु. (कों.) माशाची एक जात. हे मासे आक्टोबर नोव्हेंबरमध्यें पकडतात.

सातिशय—वि. अधिकाधिक. [सं. स+अतिशय]

साती—स्त्री. (महानु.) छत्री; झुबका. 'झळकती पालव सातीया।' –भाए ४४१. –शिशु १०१८. सातरणें पहा.

सातू—पु. १ गव्हासारखें एक धान्य. २ भाजलेले सातू, गहू व हरभरा यांचें पीठ. [सं. सक्तु]

सांतेरी—स्त्री. (गो.) शांतादुर्गा देवी.

सातेरू—न. एक विशिष्ट प्रकारचें मधाचें पोळें, मोहोळ. हें वारुळांत असतें व याला सात तोंडें असतात. [सात]

सात्—अ. एक तद्धित प्रत्यय. अर्थ– रूपांतर पावलेला; सर्वस्वीं आधीन. उदा० अग्निसात्, भस्मसात्. [सं.]

सात्रक, सात्रक चाल—स्त्री. घोडयाची एक चाल. चौपायीं हळूहळू चालणें. **सात्रक**–वि. घोडयाची एक चाल आहे तिच्या संबंधीचा. –शिदि २०७.

सात्मीकरण—न. (शाप.) परिपाक; एकरसता; एकजीवपणा; समरसता. (इं.) ॲसिमिलेशन. [सं. स+आत्मीकरण]

सात्वत—पु. भक्त; भागवत. 'तोचि चरण सात्वतीं पावावया सम विभूति।' –एभा ६.११६. [सं.] **०धर्म**–पु. भागवत धर्म. –गीर १०.

सात्वती—स्त्री. नाटकाच्या चार मोठ्या प्रकारांपैकीं एक. यांत सौम्य व सात्त्विक भावना दिग्दर्शित केलेल्या असतात [सं.]

सांत्वन-ना—नस्त्री. १ शोककोधादि कारणानीं झालेली क्षुब्धि नाहींशी करून पुन्हां पूर्वस्थितीवर आणणें. २ समाधान करणें; शांतवन; धीर देणें. ३ यामुळें आलेली स्वस्थता, शांतपणा. [सं.] **सांत्ववाद**–पु. सांत्वनपर, प्रेमळ, स्नेहपर भाषण. [सं.] **सांत्वित**–वि. १ शांत झालेला; सांत्वन पावलेला. २ स्वस्थता लाभलेला; शांति, सुख मिळालेला. [सं.]

सात्त्विक-सात्त्विक—पु. सात्त्विकभाव. एकभाव, किंवा मनाची अवस्था (काव्यनाटकांतील). ही स्थायी आणि व्यभिचारी या भावांमधील असून हिच्या ठिकाणीं सहज, अकृत्रिम, सत्य अशा भावना व्यक्त असतात. स्वेद, स्तंभ, रोमांच, स्वरभंग, वेपथु (कंप), वैवर्ण्य, अश्रु आणि प्रलय हे अष्ट-सात्त्विकभाव आहेत. 'आपुलेनि शिहाणपणें। आंगींचे सात्वीकु लपओ जाणें।' –शिशु १८९. [सं.] –वि. (शुद्ध रूप सात्त्विक.)

१ सत्य; पवित्र; प्रामाणिक; उत्कृष्ट; सत्त्वगुणांनीं युक्त. 'म्हणोनि उपनिषदादि समस्त । सात्त्विक ते ।' –ज्ञा २.२५६. २ सौम्य; हितकर; रोगनिवारक (औषध, पथ्य, इं०). ३ अर्थयुक्त; भरींव; ससत्त्व. ४ उत्साह, चैतन्य, बल, तेज इ० गुण असलेला. ५ सत्; सत्य; अस्तित्व असलेला; वास्तवपूर्ण. **०चांडाळ**–पु. सौम्य वृत्तीचा चांडाल. **०प्रेम**–न. खरें, शुद्ध प्रेम. 'निराशेंत सात्त्विक प्रेम करुणवृत्तीचें रूप घेतें.' –एक १०७. **०भाव**–पु. सुखादि भावानें भावित होणाऱ्या अंतःकरणापासून उत्पन्न होणारे भाव. हे आठ आहेत. सात्त्विक पहा. 'म्हणोनि सात्त्विक भावांची मांदी । कृष्णा आंगीं अर्जुनाआधीं ।' –ज्ञा ८.५६.

साथ—स्त्री. १ सोबत; संगत; सहवास. २ सोबती; स्नेही; जोडीदार. ३ मदत; टेका (गाणेंबजावणें, भाषण इ० कामीं). (क्रि० करणें). [सं. सह+अंस्; सार्थ; किंवा सं. स्वस्ति–सत्थि–साथ.–राजवाडे. हिं. साथ=बरोबर] **म्ह०** भात सोडावा साथसोइं नये. **०करी**–पु. साथ, मदत करणारा (गाण्याबजावण्यांत). **साथी**–पु. १ जोडीदार; सोबती. २ कामांत मदतनीस; दुय्यम. **०दार**– १ साथी; मदतगार. २ (वाईट अर्थी). हस्तक; साहाय्यक.

साद—पुस्त्री. १ हांक; येण्याविषयीं बोलाविणें. (क्रि० घालणें; देणें; हाकणें). 'विपायें वाढे सत्त्व शुद्ध । तेव्हां ज्ञानासी करी साद ।' –ज्ञा १७.६२. २ हाकेला उत्तर; ओ देणें. 'सादु दे करे पुत्रराया ।' –उषा ६४; –मोअश्व १.२५. ३ प्रतिध्वनि; पडसाद. ४ शब्द; ध्वनि. 'तंव त्या बैलाचा सादु आईकोनि ।' –पंच. ५ (ल.) इच्छा. 'तोचि अभेदु कैसा । हे जाणावया मानसा । सादं जाली तरी परियेसा । बोलिजेल ।' –ज्ञा १०.१११. [सं. शब्द; प्रा. सद्द; पं. सद; हिं. गु. साद] **०घालणें**– १ हांक मारणें. –केक १२८. २ (कों.) गागणें. **०धरणें**–पडल्यामुळें किंवा भीतीमुळें रडण्याचा आवाज तोंडातून न निघणें (लहान मुलाचा); श्वास धरणें. **०परतणें**–निराळा आवाज देणें; पिकलेली अवस्था–बदललेल्या आवाजावरून दाखविणें (फळानें, विशेषत: फणसाच्या). –सामाशब्द. **०परका–ता**–वि. १ बदललेल्या आवाजाचा. २ (ल.) पिकलेला. साद परतणें पहा. **सादणें**–अक्रि. शब्द करणें. 'भणओनि मदनु सादैजें । लेंकरूंपणा लागी ।' –शिशु ३७०. **सादविणें, सादाविणें**–उक्रि. १ साद घालणें; हांक मारणें. 'वायुदेवातें सादवी । बीजमंत्रें करूनिया ।' –मुआदि २७.१७५; –तुगा ५४. 'करी घेवूनिया सादावी ।' –निगा ११. २ (कर्ना.) ताल धरणें; टिमकी वाजवून साथ करणें. **सादु**–पु. साद; शब्द. 'तंव त्या बैलाचा सादु आईकौनि साशंकित झाला.' –पंच ३. **सादुकार**–वि. शब्द करणारा. –पंच ३.

सांद–दी—स्त्री. (व.) १ बोळ. २ अंगण; परसु. 'सांदीकडे विहीर आहे.' ३ आड बाजू; सांधीकोंपरा. 'भट करी बटकीशी मोहबत । दसर पडलें सांदींत ।' –अफला. सांध पहा. [सं. संधि]

सांद, सांदकाम, सांदणें, सांदभान्या, सांदीकोंदी–इ० शब्द सांधनें आरंभ होणाऱ्या शब्दांमध्यें पहा. **सांदोसांदीं**–क्रिवि. कोनाकोंपऱ्यांत. –दा ३.१.१६. 'कोणी न येती राजद्वाराकडे । जो तो दडे सांदोसांदीं ।'. **सांदा**–पु. सांधा पहा. 'वरि चर्म घातलें रे कर्मकीटकांचा सांदा ।' –नामना ७१. **सांदी**–स्त्री. कोंपरा; फट; सांधी पहा. 'सांदीमाजी रगडावा । महानागें पायांतळीं ।' –ह. १९.९६.

सादट—वि. १ तिखट. २ मळका? –मनको.

सांदण–णें—न. तांदुळाचें एक पक्वान्न. **सांदणपात्र–ताटली**–नस्त्री ज्यांत सांदण करतात तें पात्र.

सांदण—न. (विणकाम) तातूला तातू जोडणें. [सांधणें]

सांदणी–स्त्री. सांधणूक; सांधणी पहा. 'चौऱ्यांयशी लक्ष योनी । तियें कांडा पेरां सांदणी ।' –ज्ञा १४.१०७. **सांदणें**–सांधणें; जोडणें. 'तरि डांक देऊनि सांदिलें । शिळेतें काई ।' –ज्ञा ८.४३. [सांधणें]

सांदणें—सांधणें पहा. 'तयातें साम्याचिया वाढी । ऐक्याची सांदे कुळवाडी ।' –ज्ञा ७.१७९. [सांधणें]

सादनी—स्त्री. (सोनारी) पाटगड व वरतगड हीं एकमेकांस जोडून त्यांची पेटी तयार करण्यासाठीं जी धातूच्या पत्र्याची अरुंद अशी कळी उभारतात ती. साधनी पहा.

सादर—वि. १ आदरयुक्त; मान, शिष्टाचार ठेवणारा. २ तत्पर; तयार; सज्ज. 'तैसाचि गुरुभजनीं सादर ।' –एभा १७.३३१. 'होई शरणागत किंवा युद्धासी सादर ।' –तुगा ३९२. ३ उत्सुक; आतुर. 'कां चंद्रकिरणीं चकोर । जेवीं अत्यंत सादर ।' –एभा ७.१५६. **सादर–रें**–क्रिवि. १ आदरबुद्धीनें; पूज्यभावानें; नम्रतायुक्त. 'सादर लक्षिताचि तेथ । देखता झाला श्रीगुरुसी ।' –गुच १७. २ कौतुकानें. 'मैथुनभूत जे प्राणी । ...। सादर न पहावे नयनीं ।' –एभा १७.३५०. ३ विचारपूर्वक. 'तो सादरें निरीक्षिता जाण । होय त्या सर्पाचें निरसन ।' –एभा २०.४६. [सं. स+आदर]

सादर—धावि. १ आलेला; आगत; प्रविष्ट (पाठविलेलें पत्र किंवा वस्तु). २ उद्भूत; निघालेला; पावलेला. 'हुकूम सादर जाहला आहे तो पाहून मेहेरबानी संपादून घेणें.' –चित्र. गुप्त ८. ३ प्रकाशित; संपादित (हुकूम, जाहीरनामा, शासनपत्र).

[अर. सादिर] **०करणें**–१ पाठविणें; रवाना करणें; देणें (सरकारनें लिहितांना, किंवा पूज्य व्यक्तीस लिहितांना पत्रांतून हा प्रयोग योजतात). २ हजर करणें. पावता करणें. **०होणें**–हजर होणें; उपस्थित असणें. 'विदेसीं मेले म्हणें। तयासि संस्कार देणें। अथवा सादर होणें। तो सत्वगुण।' –दा २.७.७४. **सादीर**–सादर पहा. 'सुभियाचे नांवें सनदा सादीर केल्या असेती.' –रा १५.५५.

सादरा—पु. झपताल किंवा सुलताल ह्या तालांत बसविलेलें गीत.

सादळ—वि सर्द; ओलसर. [सं. स+आर्द्र] **सादळणें**–अक्रि. सरदणें; ओलसर होणें (जागा, वस्तु).

सादापत—न. (अशिष्ट) साधनपत्र. (अप.)

सादापिदा—साधापिधा पहा.

सादिता—स्त्री. आरंभ; आरंभत्व. 'ऐशी सादिता बोलतां। होईल शास्त्राविरुद्ध।' –एभा १०.७४६. [सं. स+आदिता]

सादिरवारिद—व्युत्पत्तिदृष्ट्या हें शुद्ध रूप आहे पण सादिलवार शब्द रूढ आहे. सादिलवार पहा.

सादिलवार-री—स्त्री. १ गांवचा नैमित्तिक, आगंतुक, खर्च (उत्सव, धर्मादाय, भत्ता इ० सार्ठी). हा जादा पट्टी बसवून भागविला जाई २ आगंतुक, आकस्मिक खर्च. –वि. नैमित्तिक; आगंतुक (खर्च, पट्टी, जमा इ०). [अर. सादिरवारिद]

सादी—वि. १ बसणारा; आरोहण करणारा. (समासांत) अश्व-गज-तुरंग-रथ-सादी. २ (गौरवार्थी) घोडेस्वार; सैनिक; योद्धा. –मोकर्ण १०.१८. [सं सद्–सादी]

सा(सां)दुकणें—अक्रि. पेटणें; प्रज्वलित होणें; भडकणें. 'नातरी वडवानलु सांदुकला। प्रलयवातें पोखला।' –ज्ञा १.९०. [सं. संधुक्षण] **सादुकपणा**–पु. पेटवण; भडका. 'तेणें सादुकपणें ज्वाला समृद्धा।' –ज्ञा ४.१३६.

सादृश्य—न. सारखेपणा; सदृशता; समानता. [सं.]

साद्यंत—वि. अवघा; साग्र; संपूर्ण. 'तरी साद्यंतुचि पाहीं। संसारु असे।' –ज्ञा २.३१८. –क्रिवि. आरंभापासुन शेवटपर्यंत; साकल्यानें. [सं. स+आदि+अंत]

सांद्र—वि. १ अगदीं जवळ जवळ, चिकटून असलेलीं (झाडें, घरें, इ०). २ घट्ट विणीचें व दणकट (कापड). ३ निबिड; दाट (अंधार). ४ घट्ट; जाड; अविरल; गच्च. ५ मऊ; कोमल; अनुकूल. 'गांठयाळ जें हृदय सांद्र न होय ज्याचें।' –र २७. [सं.] **०मेह**–पु. १ दाट लघवी होणें. २ अशी दाट लघवी. **सांद्रीकरण-भवन**–न. (शाप.) दटोकरण-भवन. (इं. कॉन्डेन्सेशन).

सांध—स्त्री. १ जोड; सांधा; सांध्याचा बिंदु, रेषा. २ भेग; फट; चीर; तडा; खांच; खिंड. ३ पेरें; ग्रंथि; खीळ; सांधा. ४ (विणकाम) हातमागांतील ताण्याचा तिढा, वेढा, कातरा (क्रि० पडणें). [सं. संधि] **सांधीस बसणें, सांधींत पडणें**–१ एकांतांत राहणें, पडणें (पतिमरणानंतर बारामास विधवा इ०). २ (सामा.) मागें पडणें; लोकांच्या स्मरणांतून जाणें. सामाशब्द–**०क**–वि. सांधकाम करणारा (शिवण इ० तील). 'सांधकाला कर्तेन व सौचन या दोन्ही विषयांत गति पाहिजे.' –(काकडे) शिवणकाम. **०काम**–न. सांधण्याचें, जुळविण्याचें, योग्य रीतीनें एकत्र करण्याचें काम. [सांधणें+काम] **०कोंद**–स्त्री. कानाकोंपरा; खांचखळगा; बीळ; फट; (सामा.) सर्व आडबाजूच्या बारीकसारीक जागा. 'दिवा घेऊन म्यां सांधकोंद पाहिली.' (अव. उपयोग). **०मोड**–स्त्री. (बांधकाम करतांना) एका थरांतील दगड, किंवा विटा यांचे सांधे वरच्या थरांतील दगडविटांच्या सांध्यांशीं सरळ रेषेंत न येतील असे करणें (क्रि० करणें). 'सांधमोड ३ इंचापेक्षां कमी नसावी.' –मॅरट १५. **०रुख**–पु. एक झाड. अस्थिभंगावर औषधी. याचें लाकूड चिरलें तरी पुन्हां सांधलें जातें. अव्वल प्रकारच्या झाडाला 'लवंगी सांधरुख' म्हणतात. **०वण**–स्त्री. पायतणाची दुरुस्ती. –बदलापूर १८७. **सांधणी**–स्त्री. १ (विणकाम) परमणीमुळें साफ झालेलीं सुतें एकत्र वळणें, जोडणें. २ मागावरील सुतांशीं नवीं सुतें जोडणें. ३ या कामीं वापरावयाचें हत्यार, साधन. **सांधणी-णूक**–स्त्री. १ जोडणी; जुळणी; एकीकरण (शिवणें, झाळणें, चिकटविणें इ० नें). २ समेट; एकी. **सांधणें**–उक्रि. जोडणें; एकत्रित करणें; संयुक्त करणें (शिवणें, झाळणें, चिकटविणें, गांठणें इ० क्रियेनें) –अक्रि. एक होणें; जडणें; जुगणें. **सांधन**–न. जोडणी; सांधणूक. **सांधप**–न. (राजा.) सांधण्याचा व्यापार. सांधणें पहा. **सांधा**–पु. १ ग्रंथि; पेरें; संधि; सांध. २ जोड; संधिरेषा–बिंदु; दरज. ३ जोडलेला तुकडा; जो जोडला असतां वस्तु लांब होते किंवा वाढली जाते तो तुकडा. 'दोरीस दाहा हात सांधा लाविला तेव्हां पाणी काढावयाचे उपयोगी झाली.' ४ मिलाफ; एकी. 'आणि शुक्रशोणिताचा सांधा। मिळतां पांचांचा बांधा।' –ज्ञा १३ १०६. ५ (नाविक) खार्डीतील होडया लावण्याची सोईची जागा. ६ (ढोरधंदा) दोन तुकडे एकत्र जोडणें; लाग. (क्रि० शिवणें). [सं. संधि] **०बसणें**–जम बसणें; जुटणें; जमणें; बेतशीर, सोईचें होणें. **सांधासांध**–स्त्री. १ अनेक वस्तू एकत्र येणें, जुळणें; अनेक लोकांनीं एकत्र करणें, जोडणें. २ (ल.) समेट; तडजोड. ३ दुरुस्ती; सुरळीत चालणें. **सांधित**०वि. सांधलेलें; जोडलेलें; जुळलेलें (शिवण्यानें, झाळल्यानें इ०). **सांधी**–स्त्री. १ जोड; सांधा. २ चिरण; फट; भेट. सांध पहा. **सांधीकोंदी**–स्त्रीअव. जोड, सांधे, चिरा,

फटी इ० संबंधीं व्यापकार्थी शब्द; कानेकोपरे. **सांधी कोंदीचा**–वि. १ घरांत कोठें तरी आडबाजूस, कोपऱ्यांत बसणारा; बिळांत राहणारा. २ क्षुद्र; महत्त्व नसलेला; अज्ञात; गल्लीकुचींतील. **सांधीकोनी-नीं**–क्रिवि. कोनाकोपऱ्यांत; आडसंधींत; आडबाजूस. 'जो तो दडे सांधीकोनी।' –र वि १९.१७०. **सांधीचा, सांधीतला**–वि १ कोंपऱ्यांतला; आडबाजूचा. २ अज्ञात; क्षुद्र; हलका. ३ कोंपऱ्यांत, आडबाजूस, गुप्त जागीं असण्यास योग्य, लायक. सांधीचा पदार्थ पहा. **सांधीचा पदार्थ, सांधींतली वस्तु**–स्त्री. १ टाकाऊ, निरुपयोगी वस्तु. २ (ल.) विधवा. ३ गुप्त किंवा खाजगी ठिकाणींच फक्त उपयोगी पडणारी वस्तु. ४ वेगळी काढून ठेवलेली, मोठ्या, नैमित्तिक प्रसंगीं वापरण्यांत येणारी वस्तु (अलंकार, पागोटें, शेला इ०). **सांधींतला व्यवहार**–पु. कोंपऱ्यांत, आडबाजूस, गुप्त, स्थळीं चालणारा व्यवहार; गुप्त, खाजगी व्यवहार. **सांधींतली गोष्ट**–स्त्री. अज्ञात, खाजगी, गुप्त व्यवहार, गोष्ट. **म्ह०** सांधींतली गोष्ट उजेडांत आणूं नये. **सांधींतली सावकारी. सांधींतला व्यापार**–स्त्री पु. अप्रसिद्ध, लहानसा व्यापार, सावकारी; गल्लीकुचींतील धंदा. **सांधींतलें मडकें**–न. (निंदाव्यंजक) विधवा. **सांधीभानेचा**–वि. सांधीकोंदीचा. [सांध+भानवस] **सांधीव**–वि. १ सांधलेलें; जोडलेलें (विभाग, तुकडे). २ तुकडे जोडून केलेली; विभागांची बनलेली (वस्तु, गोष्ट). **सांधोरी**–स्त्री. १ मोठा किंवा अव्यवस्थित सांधा, चीर. २ गल्ली; बोळ. **सांधोरी कोनदोरी-कोन्दोरी**–सांधीकोंदी पहा. **सांधोसांधीं**–क्रिवि. कोनाकोपऱ्यांतून. सांदोसांदीं पहा.

सांधण-णें, सांधणपात्र-ताटली–सांदण इ० पहा. 'तिथें सांधणें वाढिलीं।' –मसाप २.१.

साधक—वि. १ (कार्य इ०) सिद्धीस नेणारा; घडवून आणणारा; पुरें करणारा (माणूस, पदार्थ इ०). २ कार्यसिद्धीविषयीं उपयुक्त; साधनभूत, उपकारक (लेख, वचन, पदार्थ इ०). ३ मोक्षसाधनासाठी जपतप, व्रतवैकल्यें, देहदंड इ० करणारा (योगी, मांत्रिक); मुमुक्षु. 'या बिषयातें साधक। त्यजिती नियमें।' –ज्ञा २.३०३. 'उपदेशिलें आत्मज्ञान। तुटलें संसारबंधन। दृढतेकारणें करी साधन। या नांव साधक।' –दा ५.९. ४. ४ मदतनीस; शिष्य. 'जालंधर सिद्ध महाराज देख। कानिफा तयाचा साधक।' –संतलीलामृत (नवनी. २४३). [सं.] **०ता**–स्त्री. १ एखादी गोष्ट साध्य करण्याची हातोटी; सिद्धि. २ प्रसंगमान जाणणें. –**होकै** ८. **०बाधक**–वि. उपकारक आणि अपकारक; अनुकूल आणि प्रतिकूल. २ योग्य; अयोग्य; चांगलें कीं वाईट. 'भलत्यास पैसा देऊं नये साधकबाधक पाहून' व्यवहार करावा.' **साधणें**–उक्रि. १ (कार्यादि) सिद्ध होई असें करणें; सिद्धीस नेणें. २ करणें; संपादणें. ३ मिळविणें; जिंकणें. 'मत्संकल्प असा कीं साधुनि द्यावीच सर्व भू पार्था।' –मोभीष्म ११.११. ४ मारणें; नाश करणें. –ज्ञा ३.२१६. हें शस्त्रेंवीण साधिती।'–ज्ञा३.२५८. ५ अनुकूळ करणें 'एकातें साधूनि मारिती।' –ज्ञा१६.३४४. ६ पाळणें (व्रत, विधि, इ०); साजरा करणें, मानणें. (सण, सुट्टी). ७ व्याकरण करणें, सांगणें. ८ व्याकरणानुबंधांनीं, शब्दसंयोगाने बनविणें (शब्द). –अक्रि. १ सिद्ध होणें, तडीस जाणें. २ यशस्वी होणें; भरभराटणें. ३ सुरळीत चालणें. [सं. साध्–साधन] **साधणी, साधणूक**–स्त्री. १ साधण्याचा व्यापार; साध्य करून घेणें; संपादणें; मिळविणें. २ सिद्धीचा योग्य मार्ग, संधान. ३ साधन; उपाय; योजना; युक्ति (साध्य करण्याची); घडविण्याचें कौशल्य. 'जिभें घडितां साधुनूक सरें। विश्वकर्मेयांची।' –शिशु ३२८. **साधवणें**–क्रि. (व.) वश करणें. **साधित**–वि. १ साधलेला; मिळविलेला; तडीस नेलेला. २ (व्या.) गुणधर्मयुक्त; मूर्त. ३ (व्या.) उद्भूत; संभूत; प्रत्ययादिकांकरून बनविलेला. याच्या उलट सिद्ध. ४ (व्या.) यौगिक; संस्कारित; घटित याच्या उलट मूळ. ५ (व्या.) दोन किंवा अधिक अवयव एकत्र होऊन बनलेला. **साधितणें**–क्रि. साधणें. **साधन**–न. १ साधण्याचा व्यापार; संपादन; प्राप्ति. २ करणें; बजावणें; उकरणें. ३ कारणभूत अंगें, पदार्थ; साहित्य; सामग्री; उपकरणें. ४ अवयव; अंगें; घटक. ५ योजना; कल्पना; उपाय. 'म्हणती साधनें केलीं अनेक।' –एभा १०.११४. ६ मध्यस्थ; अडत्या; गुमास्ता. ७ धार्मिक व्रतवैकल्यें (मोक्षप्राप्तीसाठीं); मंत्रतंत्र, दानधर्म इ०; अनुष्ठान. ८ (न्याय.) निर्णयाला प्रमाणभूत गोष्ट; प्रतिज्ञा. ९ (कायदा). स्थापित करणें; सिद्ध करणें. १० (औषधें–किमया यांसाठीं) धातूंवर रासायनिक क्रिया, संस्कार (विशेषतः पाऱ्यावर). ११ जोड; संपादणी. 'आपल्याकरितां मी नरकाचं साधन केलं.' –इंप २९. १२ नाश; पराभव. 'त्रिपुर साधन करावयासी।' –गुच १.९. १३ (व.) मार. [सं.] **०चतुष्टय**–न. ब्रह्मप्राप्तीचे चार प्रधान उपाय. वस्तुविवेक, वैराग्य, शमादि षट्संपत्ति, व मुमुक्षुत्व. –एरुस्व ६.५६.'आत्मत्वाचिया विशाळ धोंडी। ठाईं ठाईं ठेविल्या प्रचंडी। साधनचतुष्टयादि हातगुंडी। दुर्ग पावले शोभेसी।' –स्वानु १०.२.१०. **०द्वादशी**–स्त्री. सकाळीं थोडावेळ असणारी द्वादशी (पुढें त्रयोदशी लागत असल्याने एकादशीचा उपवास थोडया वेळांत सोडण्याची व्यवस्था करावी लागते) **०निर्देश**–पु. १ (कायदा) पुरावा पुढें करणें; पुराव्याचा उपन्यास, निर्देश. २ (न्याय.) प्रमाणांची मांडणी, स्थापना. **०पत्र**–न. पुराव्याचा कागद; लेखी पुरावा. **०मार्ग**–पु. १ मोक्षाचा मार्ग, दिशा. **०सूत्र**–न. कार्याचें,

सिद्धीचें, साधन, उपाय; (क्रि० करणें, लावणें). २ (हक्क इ०) शाबीत करण्याचा पुरावा, साधन; खतपत्र; दस्तऐवज. ३ कार्याचा, संपादणीचा मार्ग, पद्धत. **साधनिका**–स्त्री. १ तयार करण्याचें, कृतीचें शास्त्र, पद्धत, कला. २ (व्या.) व्याकरण करणें; वाक्यपृथक्करण. [सं.] **साधनी**–वि. १ सिद्धीच्या, संपादणीच्या कामीं साधनें, उपाय, योजना इ० लावण्यांत, शोधण्यांत वाकबगार, हुषार, मेहनती; संपादन करणारा; साध्य करून घेणारा. २ संपादण्याच्या, तडीस नेण्याच्या कामीं योजलेलें, साहाय्यक, कारण असणारें (साधन, शस्त्र, इ०). ३ सिद्ध, प्रस्थापित करणारें (लिखाण, खत). **साधनीय**–वि. १ संपादण्या–मिळविण्याजोगें; करण्यासारखें. २ सिद्ध, प्रस्थापित करण्याजोगें. [सं.] **साध्य**–वि. साधावयास शक्य, योग्य; संपाद्य; मिळण्यास शक्य, योग्य. 'साध्य नसे मुनिकन्या।' –शाकुंतल (सामासांत) कष्ट–आयास–श्रम–कृच्छ्र–शक्ति–बल–पराक्रम–साध्य. २ प्रतिकार्य; जिंक्य; निवार्य (रोग, शत्रु, इ०). ३ सिद्ध–तयार करावयाचें. 'हे मागुं तरी दोनी। परी एकवटती निदार्नी। जैसी सिद्धसाध्य भोजनीं। तृप्ती एकी।' –ज्ञा ३.३८. ४ (तत्त्व.) अनुमान, निर्णय करण्यासारखें. ५ (कायदा) सिद्ध, प्रस्थापित करावयाचें; सिद्ध करून दाखवावयाचें. ६ (चुकीनें) संपादित; प्राप्त; सिद्ध. –न. १ प्रमेयाचा भाग. २ उद्दिष्ट; हेतु. –पु. १ (ज्यो.) बावीसावा योग. २ देवांचा एक वर्ग, यांत १२ देव आहेत. 'हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसु हन साध्य आघवे।' –ज्ञा ११.३३२. [सं.] ०**साधन**–न. मिळवावयाचें तें मिळणें; सिद्धि लाभणें; हेतुपूर्ति. ०**सिद्धि**–स्त्री. १ हातीं घेतलेल्या कामाची सिद्धि. २ मत, भूमिका हिचें प्रस्थापन; पुरावा. ३ उद्दिष्ट वस्तु प्राप्त झाल्याची स्थिति.

साधन–न. (व.) तूप.

साधनी–णी—स्त्री. १ गवंडी, सुतार इ० चें जमीन एका पातळींत आहे किंवा नाहीं हें पाहण्याचें साधन, हत्यार. (इं.) लेव्हल. २ आंगठी वगैरेच्या कोंदणासभोंवतीची किनारी. **साधनींत येणें–असणें**–समपातळींत, सरळ असणें, क्षितिजाशीं समांतर असणें.

साधर्म्य—न. सादृश्य; सारखेपणा (स्वभाव, गुण इ० चा).

सांधला—पु संधला पहा. बांधकामाचा चुना. 'दगड चांगल्या सांधल्यांत बसवावे.' –मॅरट ३७.

साधलाद—स्त्री. दैवगति; नशीब; योगायोग. 'आम्ही दोघे सारखी चाकरी करीत असतां यजमानानें त्याला हजार रुपये बक्षीस दिले, मला कांहीं नाहीं, ही साधलाद आहे.' [साधणें+लाधणें]

साधा—वि. १ नक्शी, जर, रेशीमकाठ इ० नसलेलें (पागोटें, धोतरजोडा, कापड इ०). २ छानछोकी, अक्कड, ऐट नसलेला (माणूस). ३ वक्रता, अन्योक्ति, अलंकार इ० नसलेलें (भाषण, लेखन). ४ निष्कपटी; अकृत्रिम; गैर हिकमती; सरळ वृत्तीचा; गरीब. ५ मूळ रूपांत, अमिश्र, निर्भेळ, स्वच्छ असलेलें. [फा. सादा. तुल० सं. साधु] **साधें गंध**–न. पांढरें गंध (चंदनी, केशरी नव्हे). ०**जोडा**–पु. साधेकांठी धोतर, याच्या उलट रेशमी जोडा. ०**पिधा**–वि. १ साधा पहा. २ (देशावर उत्तर भागांत) गुबगुबीत; लठ्ठ व निरोगी (चेहरा, देह इ०). ०**पोशाक–ख**–पु. नेहमीचा बिन-रंगी–रेशमी–जरीचा कपडा. ०**बांधा**–पु. साधा आकार, घडण, रूप. 'साधा बांधा बिन अरवा.' ०**भादा**–वि. १ प्रौढ असून साधा व सरळ; प्रौढ व पवित्र. २ अगदीं साधा. ०**सिधा**–वि. सरळ; निष्कपट. 'हें प्रकरण साधेंसिधें नसून कांहींतरी विपरीत आहे हें अनंतरावांना समजलें.' –हाकांघ ९७. ०**सैपाक**–रोजचें जेवण (बिन पक्कान्नाचें). **साधी कैद**–स्त्री. (कायदा) सक्त मजुरीची नसलेली कैद. **साधी चाल**–स्त्री. नेहमीची, जन्मजात चाल (घोड्याची). **साधी पोळी**–स्त्री. पुरण भरून केलेली नाहीं अशी पोळी. **साधें जिरें**–जिऱ्याची एक जात. **साधें पान**–न. संयुक्त नसलेलें, अनेक दळें नसलेलें पान, एकटें पान.

साधारण—वि. १ सामान्य; सर्वांस लागू पडेल असें; अविशिष्ट. २ समाईक; सार्वत्रिक. 'दूतीं साधारण धन पण करुनि नव्हेचि एक हारविता।' –मोसभा ५.५२. ३ उत्कृष्ट नव्हे व टाकाऊहि नव्हे असें मध्यम प्रतीचें. –न. १ सर्वसामान्य नियम, रीत. २ एका वर्गातील सर्व वस्तूंना, व्यक्तींना लागू पडणारा, त्यांच्या ठिकाणचा गुणधर्म. –पु. १ चवेचाळीसावा संवत्सर. २ सामान्य लोक. –एभा २३.३१६. [सं.] ०**अवयव**–पु. (गणित) दोन किंवा अधिक संख्यांत जो एकच अवयव असतो तो. ०**कार्य**–न. व्यक्तीचें विशेषें करून नव्हे असें कार्य. ०**गति**–स्त्री. साधी, नेहमीची, विशेष नसणारी गति. (इं.) सिंपल मोशन. ०**देश**–पु. ज्यांत झाडी व डोंगर मध्यम प्रमाणांत असून पाऊसहि मध्यम प्रमाणांतच पडतो तो देश. ०**धर्म**–पु. सर्वसामान्य, सर्वांना लागू पडणारा धर्म. ०**पक्ष**–पु उत्तम व निकृष्ट या दोन पक्षांमधील पक्ष; मध्यम पक्ष. ०**फुलबाजी**–स्त्री. इंग्रजी फुलबाजीचा एक प्रकार. –अभि २०. ०**भाजक**–पु. (गणित) दोन संख्यांस ज्या सामान्य अवयवानें निःशेष भाग जातो तो. ०**सभा**–स्त्री. संस्थेच्या घटनानियमाप्रमाणें सर्व सभासदांची वर्षांतून एकदां किंवा अनेकदां ठराविक वेळीं भरावयाची सभा. (इं.)

जनरल मीटिंग. ०स्त्री–स्त्री. वेश्या; हलकी स्त्री; अकुलीन, भाडोत्री स्त्री. **साधारण्य**–न. साधारणपणा; सामान्यत्व; याच्या उलट वैशिष्ट्य, विशेषता.

साधु—वि. १ सरळ; योग्य; शुद्ध. २ पवित्र; सात्त्विक; सद्वर्तनी. ३ धर्मनिष्ठ; ईश्वरभक्ति-परायण. ४ विवक्षित दोषरहित व गुणयुक्त. (वाक्य, भाषण, ग्रंथ, कर्म इ०). ५ हितकर; भलें. 'तेआ ही वैर साधु न घडे। अचेतनासी।' –शिशु ४७२. ६ चांगला; व्यवस्थित; पूर्ण. 'वृषरूप दैत्य माहनि तच्चर्में साधु मढविले होते।' –मोसभा १.९०. –पु. १ सज्जन माणूस; पवित्र पुरुष. 'साध्वी शांति नागविली। मग माया मांगी शृंगारिली। तिये करवीं विटाळविलीं। साधुवृंदें।' –ज्ञा ३.२५१. २ भगवद्भक्त; संत. ३ योगी; ऋषि; मुनि. ४ महारांचा धर्मगुरु. –उद्गा. (द्विरुक्तीनें) शाबास! भले बहादर! 'तों साधु! साधु! ऐसें वदले सुरनर म्हणोनि तो खवळे।' –मोभीष्म ९.५२. [सं.] ०बोध–पु. सदुपदेश; चांगली, सज्जनाकडून मिळालेली शिकवण. 'साधुबोध झाला मुरोनिया ठेला।'. ०वाद–पु. धन्यवाद; शाबास असा उद्गार. 'न करि जगीं साधुवाद घुमतातें।' –मोमंत्र ३.३. ०वृत्त-त्ति–वि. पवित्र, सद्वर्तनी मार्गाचा. ०शील–वि. सच्छील; धर्मशील; नीतिमान. ०सज्जन–पुअव. (समुदायानें)सज्जन; सद्वर्तनी, निष्कपटी लोक. ०संत–पुअव. १ (समुच्चयानें) साधू आणि संत. 'साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।'. २ साधू; संत. (विशेषार्थी). ०समागम–पु. साधुसंतांचा, सज्जनांचा सहवास, संग. 'साधुसमागम अंतःकरणांत विनयाचें उपधान करितो.'

सांध्य—वि. सायंकालीन; संध्याकाळचें. [सं.]

साध्यांत, साद्धयांत—वि. १ साग्र; सविस्तर. 'साध्यांत वाक्यार्थ गिरिधरें लिहिला।' –सप्र १५.३८. २ सर्वत्र; सरसकट. 'समर्थें साद्धयांत वाटिलीं साखरपानें।' –सप्र ७.२४. [सं. साद्यन्त]

साध्यायी—पु. (प्र.) सहाध्यायी पहा.

साध्वस—पु. भय; भीति. 'येणें प्रवर्तला साध्वसें। पार्थु बोलों।' –ज्ञा ११.३८. 'न वदती वाणी कदापि साध्वसदा' –मोकर्ण [सं.]

साध्वी—स्त्री. १ साधुपत्नी. २ पतिव्रता; सती. 'साध्वी शांति नागविली।' –ज्ञा ३.२५१. [सं.]

सान—वि. १ लहान; बारीक; छोटें. 'कटि प्रदेशें शोभत जघन। माज अतिशयेंसी सान।' –एरुस्व १५.५५. २ थोडें; अल्प. 'त्यांच्या त्या व्यसनाहुनि भासे स्मृति दुःखही तया सानें।' –मोकर्ण ३.३. ३ हलका; कनिष्ठ. 'हर विशेष विष्णु सान।' ४ लहान; अल्पवयीन. 'सान थोरां सांभाळितो.'[सं. सूक्ष्म; प्रा. सण्ह; का. सण्ण] ०थोर–वि. लहानमोठा.

'न म्हणती सानथोर अवघीं सकळिक।' –तुगा १९९

सानट–वि. चिमुकलें; लहान; सान. 'ते उदकधारा गोमटी। थोरूं ना सानटी।' –शिशु ७८४. **सानणें**–क्रि. लहानावणें. –मनको. **साना**–वि. लहान; सान. 'सरसु आहारु न म्हणे साना थोरु।' –भाए ३३२; –एभा १४.४९२. **सानी**–वि. १ सान; लहान. २ धाकटा; दुसरा. 'आलमगीर सानी.' –बाडथोमा २.१०६. [अर. सानी=दुसरा] **सानीव**–न. लहानपण. 'नाना पुरातिये प्रतिष्ठेलागीं। सानीव धरूनि आंगीं।' –ज्ञा १.४६. **सानुला**–वि. लहान. 'तैसे परमाणु पांगुतलेंआ जाणूनि जीव सानुले।' –ज्ञा १३.२४८. **साने**–वि.अव. लहान. 'थोरसाने भक्तजन।' –वेसीस्व १२.६४. **सानेजणें**–लहान होणें. 'दांतही आन होती। परि अपाडें सानेजती।' –ज्ञा ६.२६३. **सानेपण**–न. लहानपण. 'सानेपण मोडूं नये।' –दा १४.१३२. **सानेबाणें**–वि. थोडें बहुत. –शर.

सान—स्त्री. सहाण पहा. [सं. शाण हिं.] ०पट्टी–स्त्री. रंध्यास धार लावण्याचा दगड.

सान-न्न—स्त्री. (गो. कारवारी) केरसुणी; झाडणी. [सारण अल्प रूप]

सानक—स्त्री. १ जेवणाचें लहान ताट; ताटली. 'सानक वाढोनी रुमालें झांकोनी।' –रामदासी रे.१२२. २ रोटी; अन्न. ३ निर्वाहासाठीं दिलेली इनाम जमीन (ही परत घ्यावयाची नसते). 'मोकदमी इनाम सानक जकात येविशीं' –बाड योमा १.१२७. अर. सहून्; सहनक; हिं. गु.] ०रोटी–स्त्री. शपथेचें अन्न; अन्नाची शपथ; बेलभंडारा. 'तिनें तत्समयीं सानक रोटी दिली.' –भाव २५. **सानकी**–वि. सानकासंबंधी.

सानचा-चो—वि क्रिवि. (प्र.) सांजवा; संध्याकाळचा; संध्याकाळीं.

सानवणें-विणें—क्रि. मुरणें, मुरूं देणें. 'शुद्ध स्वयंपाक पानें आपें आप उतरलीं। निजबोध मवाग्रीनें सानविलीं।' –सप्र १५.७.

सानसून—स्त्री. (व. ना.) सामसुम पहा. निःशब्दता.

साना—पु. (कों) कोनाडा; गवाक्ष. साणें पहा?

सानीन हाल–क्रिवि. नंतर; पुढें. 'सानीन हाल त्याची प्रती निघाली; कोठेंतरी झूटी गलथ असे.' –रा २०.६७. [अर. सानील् हाल्]

सानुकंप—वि. करुणायुक्त; दयार्द्र. [स+अनुकंपा]

सानुकूल—वि. अनुकूल; अविरुद्ध. 'जे सानुकूल श्रीगुरु ज्ञानदेवो म्हणे।' १.७५. [सं. स+अनुकूल]

सानुनय—वि. १ नम्र; विनीत. २ सभ्य; मर्यादशील. [स+अनुनय]

सानुनासिक, सानुस्वार—वि. अनुस्वार असलेला; नाकांत उच्चारावयाचा (वर्ण). [स+अनुनासिक-स्वार]

सानुराग—वि. सप्रेम; प्रेमळ. -पु. अनुराग; प्रेम. 'परि मर्नी आथी निका। सानुरागु।' -ज्ञा ४५७. [स+अनुराग]

सान्न—न. (गो.) तांदुळाच्या कण्यांचें एक पक्कान्न; सांदणें. (कु.) सानान.

सान्निध्य—न. सन्निधता; समीपता; शेजार. [सं.] **०विकार**-पु. (रसा०) सान्निध्यामुळें घटनेंत होणारा फरक; योगक्रिया. (इं) कॅटॅलिसिस.

सान्निपातिक—वि. १ सन्निपातासंबंधी. २ संकीर्ण. [सं.]

सान्ने-न्यें—न. पिशाचबाधा झालेल्याच्या अंगावरून उतरून पिशाचाला दिलेला बळी (भात, कोंबडें, इ०). (क्रि० देणें, टाकणें, उतरणें). [सांड+अन्न]

साप—न. १ एक सरपटणारा प्राणी; सर्प. देशावर नागाखेरीज सर्व सर्पजातीच्या प्राण्यांनां साप म्हणतात; सामान्य जातिनाम जिवाणूं, किरडूं असून, फुरसें, मण्यार, घोणस, शेण्या, नानेटी, जोगी, धामण, आधेला इ० विशिष्ट जातीचीं नांवें कोंकणांत आहेत. २ (गो.) घोरपड; गार. [सं. सर्प; प्रा. सप्प; पं. सप्प; हिं. गु. बं. साप; फ्रेंजि. सप] (वाप्र) **साप खाई तोंड रितें**-(साप चावतो पण त्याच्या तोंडांत कांहीं येत नाहीं) एखाद्या कृत्याचा निष्फळपणा दाखविण्यासाठीं योजतात. **साप साप म्हणून भुई धोपटणें** (साप असल्याच्या खोट्या समजुतीनें भुई बडविणें) नसता दोष लावून बोभाटा, शिक्षा करणें; (कधीं सा० दोरखंड झोडपणें असाहि प्रयोग करतात. 'पण उगीच साप म्हणून दोरखंड झोडपण्यांत काय अर्थ.' -फाल्गुनराव) **म्ह०** साप म्हणूं नये धापलो, बामण म्हणूं नये आपलो. (गो.) दुष्ट माणसावर विश्वास कधीं ठेवूं नये. **०टोळी**-स्त्री. एक विषारी सापाची जात **०सुरळी-सोळी**-स्त्री. एक जातीचा सरडा. ही दिसण्यांत सरड्यासारखी तर चालण्यांत सापासारखी असते; जात विषारी. चोपय पहा. **सापाची जीभ**-स्त्री. अगदीं लहान शस्त्राला म्हणतात. **सापाचीमावशी**-सापसुरळी. **सापाचें वारूळ**-साप राहत असलेलें पांढऱ्या मुंग्यांचें वारूळ. **सापीण**-स्त्री. सापाची मादी.

साप—वि. (प्र.) साफ पहा.

सांपई—वि. (राजा.) कुबट; बुरसलेल्या धान्याच्या घाणीप्रमाणें घाण येत असलेलें. सापट पहा.

सापकंद-कांदा—पु. एक कंद; हा विषारी असतो [साप+कंद]

सापका—पु. १ आणीबाणीची वेळ; ऐन संकटाचा प्रसंग; २ भंयकर संकट, धोका. 'जिवार्शी-प्राणार्शी साप पडला.' [सप्प!] स्वप्न; विचाराच्या, अपेक्षेच्या तीव्रतेमुळें (स्वप्नांत किंवा जागेपणीं) होणारा भास, दृष्टांत. (क्रि० पडणें) [सं. स्वाप+का प्रत्यय]

सा(सां)पट—स्त्री. फट; भेग; चीर (सांधा इ० स असलेली). [संधि+फट]

सा(सां)पट-ड—वि. कुबट; घाणीचें; बुरसट 'अन्न विटलें सांपडें।' -यथादी

सांपटणें—अक्रि. सांपडणें पहा.

सापटी—स्त्री. (कों० तेलीधंदा) जाळीदार दोरी. ही बैलाच्या मानेखालून घेऊन जोखडाला बांधलेली असते. सांपड पहा.

सापटें—न. (महानु.) जीर्ण वस्त्र 'कव्हणीं एकु एसणें सापटें पांगुरावेया दे।' -दृष्टांत पाठ ५३.

सांपड-डी—स्त्री. (राजा.) १ बारीक, लांब लवचिक काडी, काठी (कुंपण इ० बांधण्यास, कांहीं गांठण्यास उपयोगी पडणारी). (अशा कामीं उपयोगी) झाडाचा रोपटा. **सांपूड**-स्त्री. सांपड पहा. [सं संपुट; प्रा. संपुड]

सांपड—पु. १ एकानें दुसऱ्याला गुंतवून किंवा बंधन घालून पकडणें, धरून ठेवणें; गुंतणी; अडकणी. (क्रि० घेणें) २ शेत इ० संबंधीं लावणी, बेणणी इ० काम लौकर व्हावें म्हणून पुष्कळ कामकरी एकत्र मिळून, त्यांत एकानें वाद्य वाजवीत असावें व त्या नादावर इतरांनीं ईर्षेनें तें तें काम त्वरेनें करीत असावें असा शेत कामाचा प्रकार. 'भलेरे दादा,' 'भलेरे भले' इ० गीतें यावेळीं ठेक्यावर म्हणतात, ताल देत सर्व काम करतात. (क्रि० घालणें) [सांपडणें] **सांपडणें**-अक्रि. १ गवसलें जाणें; आढळणें. २ ताब्यांत, हातांत जाणें. ३ अडकणें (संकट पाश, सांपळा इ० त). 'कीं वणव्यांत प्राणी सांपडले। त्यावरि तोडिलें तस्करांनी।, ४ लाभणें; मिळणें; आकळणें. ५ येणें; मिळणें (संधि, फुरसत, वेळ इ०). [सं. संपद्-संपादन; प्रा. संपाडण] **सांपडविणें**-१ सांपडावयास लावणें; सांपडलेसें करणें. २ गुंतवून ठेवणें; बांधणें. 'दोघांसही सांपडवूनि खाटे। आल्यें तुम्हां बोल खरा न वाटे।' -आकृ ३८. **सांपडा**-पु. (कों.) १ काटया, वांसे इ० चा केलेला माळा, मांडव, ताटी, साट; सांकाटा. २ छपर बांधणी; गवत, पानें, इ० च्या खालवर घातलेल्या कामटया. ३ सांपड-डी पहा.

सापती—स्त्री. बैलगाडीस जुंपतांना बैलाच्या गळयाखालून घेऊन जोखडास बांधलेला दोरीचा पट्टा. सापटी पहा. **साप्ता**-पु. (कर्ना.) सापती पहा.

सापत्न—वि. सावत्र. -एभा १९.१५७. [सं.] **०भाव**-पु. सवती, सावत्रभाऊ, इ० चा परस्पर वैरभाव; सावत्रपणा. 'एका राष्ट्रलाही दुसऱ्या राष्ट्राविषयीं सापत्नभाव वाटत आहे.'

–के १७.६.३०. ०संबंध–पु. (कायदा) एका पुरुषाच्या दोन किंवा अधिक विवाहित स्त्रियांचा व त्यांच्या मुलांचा परस्पर-संबंध. **सापत्नीक**–वि. सपत्नीक; बायकोसह. [स+पत्नी] **सापत्न्य**–न. १ सवतपणा. २ (ल.) मत्सर; द्वेष; स्पर्धा. [सं.]

सापवी—स्त्री. (वांई) एक वनस्पती. –मसाप १.३.

सापशीण—स्त्री. (कु.) एक औषधी वेल.

सापयंद्–ध—स्त्री. एक औषधी वेल. यांत काळी व पांढरी अशा दोन जाती आहेत. पूड सापाच्या तोंडांत टाकल्यास तो निर्बल होतो. –वगु ६.४५. [सं. सप+अन्ध ?]

सांपसारणी—स्त्री. (कों.) सांपसारण्याची क्रिया; सुधारण्याचा व्यापार. **सांपसारणें**–उक्रि. (कों.) १ सारांशानें व्यवस्थित मांडणें; उपसंहार करणें; तत्त्व काढणें (चर्चा, भाषण इ० चा). २ दुरुस्त करून, जुळवून नीट करणें; साफसफाई करणें; सुधारणें (भोंगळ, अव्यवस्थित भाषण, बहकलेली, घसरलेली गोष्ट इ०). ३ आवरून, आटपून ठेवणें (इकडे तिकडे पडलेले पदार्थ, पसारा). [सं. संप्रसार; प्रा. संपसार=समवाय]

सापसिंप—स्त्री. थोडा सडा, वर्षाव. ' माळमुरडणाचे वावरांत मात्र पूर्वीच्या नक्षत्रांचे सापसिंपीनें खरिपाचे पेरे झाले होते. ' –शेतकी शेतकरी ३.४. [सं. सिंच्–द्वि]

सापळा—पु. (कु) १ नारळीचें सुकलेलें पान. सुकीसाऊळ. २ सुक्या साऊळाची खोपट शाकारण्याकरितां केलेली जुडी. सावळ पहा.

सांपळा—पु १ उंदीर, घूस, वाघ इ० प्राणी धरण्याकरितां केलेलें यंत्र; पिंजरा. २ अस्थिपंजर; हाडांचा सांगाडा. ३ किडकिडित, बारीक माणूस. [सं. संपत्; प्रा. संपल] **सांपळा वळणें–राहणें**–नुसतीं हाडें उरणें. **सांपळ्यांत सांपडणें–अडकणें–पडणें–गुंतणें**–पिंजऱ्यांत; अडचणींत सांपडलें जाणें (शब्दशः व ल.).

सांपालें—न. (राजा.) निर्जन, साप इ० प्राणी राहात असलेलें, रान वाढलेलें स्थळ. [साप+आलय]

सापिका—पु. १ एक तांब्याचें नाणें. ॥ शिवराई. २ दीड रुक्याचें जमिनीचें माप; ७॥ बिघे.

सापिंड—पु. सपिंड (अप.) पहा.

सापिंड्य—न. १ सपिंडपणा. २ (कायदा) वर व वधू यांचा बाप, आजा, पणजा वगैरे एखादा सामान्य पूर्वज अथवा मूळ पुरुष असणें. [सं.]

सा–सांपें—क्रिवि. सांप्रत; हल्लीं; अलीकडे. ' तो तरी आइकिजे बहुतां काळांचा । आणि तूं तंव श्रीकृष्ण सांपेचा । –ज्ञा ४. ३८; –एभा २२.४४. [सं. सांप्रत]

सांपेजणें—अक्रि. (राजा.) कुबट, कुजट वास मारणें; नासणें (धान्य, पीठ इ०) [सांपई–ट]

सापेक्ष—वि. १ अपेक्षा, गरज असलेला. २ तुलना, तारतम्य, बरोबरी पाहून केलेलें; संबद्ध. ३ अनुबद्ध; तत्तत्प्रमाणानुरूप; अवलंबून असलेलें. जसें–अर्थ–काल–सापेक्ष. ' कालज्ञान यंत्रसापेक्ष आहे. ' [सं. स+अपेक्षा] **सापेक्षा**–स्त्री. इच्छा; गरज; अपेक्षा, आवश्यकता असणें. [स+अपेक्षा. चुकीचा प्रयोग] **सापेक्षित**–वि. १ अपेक्षा धरून असलेला; उत्सुक. २ अनुबद्ध; संबद्ध.

साप्ताहिक—वि. आठवड्याचें; [सप्ताह] –न. आठवड्याचें नियतकालिक, वृत्तपत्र. [सं.]

सांप्रत, सांप्रतकाळीं, सांप्रतीं—क्रिवि. आतां; आजकाल; हल्लीं. ' हो कां सांप्रत ऐसें जाहलें । ' –ज्ञा २.९७. ' श्री हरी म्हणे ऐक सांप्रतीं । सवड बा नसे यावयाप्रती ।' –कीर्तन १. १७. [सं. सांप्रतम्]

सांप्रदाय–व—पु. (प्र.) संप्रदाय पहा. ' चरम गुरु बापदेव । म्हणोनि यांचा सांप्रदाव । ' –निमा १ आत्मचरित्र ।४. १०४. [सं. संप्रदाय] **सांप्रदायिक**–वि. १ संप्रदायासंबंधी; संप्रदायांतील. २ परंपरागत.

साफ—वि. १ स्वच्छ; निर्मळ. २ निर्दोष; पवित्र; निष्कलंक; निष्कपट. ३ रोगांश, अपूर्णत्व, व्यंग इ० पासून मुक्त; अव्यंग; निरोगी (शरीर, अवयव, प्राणी, पदार्थ इ०). ४ गुळगुळीत; एकसारखा; अविषम; सरळ; नीटनेटका; व्यवस्थित (काष्टपाषाण, बांधकाम, तयार केलेली वस्तु, इ०). ५ सरळ; गूढार्थ, वक्रोक्ति, संदेह इ० दोष नसलेलें (भाषण, लेख, प्रबंध). ६ उघड; स्पष्ट. –क्रिवि. १ निखालसपणें; बेधडक; स्वच्छपणें; उघडपणें (बोलणें, उत्तर करणें). २ पुरतेपणीं; सर्वे; एकंदर, अगदीं (जळणें, भिजणें, करणें). ' मी पावसानें साफ भिजलों. ' ३ मुळींच; बिलकूल. ' मला साफ दिसत नाहीं. ' ' विसरुनि चोरांना साफ । असेंच कर तूं आलाप । ' –टिक १६३. ४ स्वच्छ; चांगल्याप्रकारें. ' तेथून समुद्रही साफ दिसतो. ' –पाव्ह ३७. [अर. साफ्] **०करणें**– १ स्वच्छ करणें; धुणेंपुसणें. २ छाटून टाकणें. ' जो आढळेल त्यास पाहतांच त्याचे कान व नाक साफ करीत जावें. ' –रा ५.६६. **०सफा**–वि. १ स्वच्छ आणि निर्मळ. २ गुळगुळीत आणि तजेलदार. ३ नीटनेटका. साफ पहा. **०सफाई**–स्त्री. १ तजेला; चकाकी; मऊपणा. २ साफसुफी; स्वच्छता. **०सुफी**–स्त्री. घासूनपुसून स्वच्छ, व्यवस्थित करणें; स्वच्छता; टापटीप. **साफी**–स्त्री. १ स्वच्छता; पावित्र्य; निर्दोषता. २ मऊपणा; सारखेपणा. ३ सफाई पहा. ' त्यांमध्यें काढण्याची कांहींच साफी दिसत नाहीं. '–मराठी ६ वें पुस्तक(१८७५)

७७. ४ भांग, औषध इ० गाळण्याचें फडकें. ५ चिलमीची छापी. ६ कत्तल; नाश. 'अचानक साफी करोन.' –रा ३.१८५. –वि निवळ; अग्रवस्त्राशिवाय; नक्त; रोख. 'नॉनशिलेदारी पद्धतींत सर्वच सरकार पुरवतें; फक्त त्यांस साफी पगार देण्यांत येतो.' –हिंलइ ३३२.

साफल्य—न. १ सफलता; फलद्रूपता. २ फायदेशीरपणा; प्राप्ति; लाभ. –वि. सफल. 'ते कौसल्या कामधर्मी निशैल्या। ब्रह्मानंदें दैव साफल्य वल्या।' –मुराबाल ५३. [सं.]

सा(सा)फळा—(प्र.) सांपळा पहा.

साफा—पु रुमाल; फेटा; पटका (डोक्यास बांधण्याचा). [हिं.]

सांफोटी-डी—स्त्री. संस्फोट; स्फोट. 'रस सघटसम सांफोटी।' –उषा १४१ अ व आ. [सं. संस्फोट]

साब—सद्गा. साहेब शब्दाचा संक्षेप. 'जी साब!'

सांब—पु. १ शिव; शंकर. २ (ल.) भोळा माणूस. ३ (संकेत) राघोबादादा पेशवे. 'सांबास तिकडे घेऊन गेले.' –पया १७५. ४ विळयाच्या मुठीस देतात ती विशिष्ट आकृति; मांडळी. 'विळयाच्या मुठीला सांब करण्याकरितां या हत्याराचा उपयोग करतात.' –बदलापूर १००. [स+अंबा] **सांबाचा अवतार**–(ल.) अत्यंत भोळा माणूस. **सांबापुढचा**–वि. नंदी; (ल.) मूर्ख. 'तूं शुद्ध सांबापुढचा आहेस, तुला कांहीं कळत नाहीं.'

साबक, साबीक—वि.क्रिवि पूर्वी; पूर्वील; मागें; मागचा. –ख ७.३५८५. [अर. साबिक्] **ब-दस्तुर साबीक**–पूर्वील वहिवाटीप्रमाणें. 'जहाजांचे येण्याजाण्याविशीं भजकूर ब-दस्तूर साबीक लिहिणेंत न आला.' –वाडसमा २.६५.

साबका—पु. (कों.) नांव; पत; अब्रू; लौकिक. [साव]

सांबट, सांफट—स्त्री. (व.) बोळ; अरुंद रस्ता; फट. [सांध+फट]

साबड-डा—वि. १ साधी; अलंकृत, प्रगल्भ नसलेली (कविता, इ०). 'साबड यार्ची कवनें ही कथा।' –दावि ४०८; –ह २५.१२१. २ भोळा; गरीब; निष्कपटी. 'हा सदां पाणि बुडा। युधिष्ठिरूं साबडा।' –शिशु ८९४. ३ एकनिष्ठ; अकृत्रिम. 'एका पाहिजे केवळ। साबडी भक्ती।' –रा ७९.५३. ४ सरळ; शुद्ध; थाटमाट नसलेलें. 'मग साबडीं नामें गाउनि। हरिरंगणीं नाचतसें।' –भवि २.२३६; –ह २५.१२०. [सांब?] **साबडाभाबडा**–वि. भोळा. साबडा पहा. [साबडा द्वि.]

साबण, साबू—पु. मळ धुवून काढण्याचा एक रासायनिक पदार्थ; मळ काढून टाकण्याचें साधन. 'साबण सांडुनि गेरूसि नाशिलें संन्यास घेतला काचारे।' –मुपदें ३. 'जैसें वस्त्र स्पर्शिल्या साबणीं। सकळ मळाची होय हाणी।' –नव २४.१४८. [अर. साबून्] **साबण माती**–स्त्री. कपडे स्वच्छ करण्याची खारी माती; मुलतानी माती. (इं.) फुल्लर्स अर्थ. –पदाव ५३. **साबूचें झाड**–न. रिठा.

साबणी—स्त्री. एक प्रकारची मिठाई; साखरेच्या पाकाची कांडी. सांबरी पहा.

सांबता—पु. (प्र.) सामता पहा.

साबर—न. जादू; मंत्रतंत्र; चेटूक. 'सांबर मंत्र कौटालें अनेकें।' –दा ५.२.२. [सं. शाबर] **साबरी**–वि. जादुटोण्यासंबंधी; जादुगारी. –पु. मांत्रिक; जादुगार. 'साबरी आणोनि नसतांचि दोष। प्रायश्चित्त देताती।' –भवि १४.१२९. [सं. शाबरी] **०विद्या**–स्त्री. जादू; मंत्रविद्या.

साबर, साबरकांडें-निवडुंग—स्त्री.नपु. एक प्रकारचा निवडुंग. 'साबरी वाढिन्नल्या सरळा। परी फळ ना आंतु पोकळा।' –ज्ञा ९.१७४. [सं. शबर] **साबरी निवडुंग**–पु. साबर निवडुंग; त्रिधारी निवडुंग; याच्या उलट फडे निवडुंग.

सांबर—पुन. हरणासारखें पण फांटे फुटलेलीं शिंगें असणारें जनावर; एक हरण जात. [सं. शंबर] **०भोपळी**–स्त्री. एक वेल. हिचा पाला सांबरास पोटदुखी लागली असतां चारतात. **०शिंग**–न. सांबराचें शिंग. **०शिंगी**–वि. सांबरशिंगाचा केलेला (आंकडा इ०पदार्थ). **सांबरी**–वि. १ सांबरासंबंधीचें (कातडें, इ०). २ सांबराच्या कातडयाचा (बूट, पिशवी, इ०). –स्त्री. १ सांबराचें कातडें. २ (राजा.) दारू, गोळया, चकमक, नाचकण, इ० ठेवण्याची कातडी पिशवी (विशेषतः सांबराच्या कातडयाची).

सा(सां)बर मीठ, सांबरी मीठ—न. सांबर सरोवरापासून, खाऱ्या जमिनीपासून काढलेलें मीठ; एक क्षार. [सांबर]

सांबरी—स्त्री. एक मिठाई; साबणी.

सांबरी—वि. (जुन्नरी) मिश्र रंगाची (मेंढी). [सं. शबल]

सांबरें—न. (महानु.) ताटवा; कुंज; क्रीडागृह. 'तैसे माझेनि वीरहज्वरें। नावडे भोगाचें सांबरें।' –भाए १७४. 'केतुकी दळांचीं सेजारें। पाचीचीं सांबरी परिकरें।' –शिशु ७७३. [? सं. शाल्मली; म. सांबरी?]

सा(सां)बरें—न. पाणी. 'मदन वोळगे शेजारें। जेथ चंद्र शिंपे सांबरें।' –ज्ञा ९.३२४. [सं. शबर=पाणी]

सांबरें करणें—क्रि. (व.) आजूबाजूच्या काडया गोळा करून त्या विस्तवांत किंवा ढोरापुढें टाकणें. [सांवरणें?]

साबळा—वि. १ साधा; सौम्य; शांत; धीमा. साबडा पहा. २ गरीब; भोळा. 'कसें करिल लेंकरूं निफ्ट हें पहा साबळें।' –केका ७०. [साबडा] **०भाबळा**–साबडा-भाबडा पहा.

सांबळी—स्त्री. वेताची करंडी–पेटी. संबळी पहा. 'हृदय सांबळी माजी निगुती।' –मुसभा १०.१७; –ह ३४.१६८.

सावळें—न. एक शस्त्र; भाला. 'साउलियेतें साबळें। हालया भोय आडळे।' –अमृ ६.४४; –ज्ञा १७.१४३; –एरुस्व ८.१३. [दे. प्रा. सव्वल; हिं. सब्बल; का. सबळ. तुल० सं. स+भल्ल]

साबान—पु. (प्र.) शाबान; अरबी वर्षाचा आठवा महिना. [अर. शअबान्]

सांबार—पु. (व.) कोथिंबीर. [सं. संभार]

सांबार—पु. सांबारें, भाजी इ०कांत घालण्यासाठीं तयार केलेला मसाला. **सांबारें**–न. ताकाचें पातळ कालवण; ताकांतली पातळ भाजी; सांभारें. [सं. संभार]

साबीत, साबूत-द—शाबीत, शाबूत पहा.

साबू, साबूण—पु. साबण पहा.

साबूचे तांदूळ, साबूदाणा—पु. (प्र.) साबूचे तांदूळ, साबूदाणा. साबूझाडाच्या सत्त्वाच्या गोळया. उपासाचा एक पदार्थ. [मलायी साबू]

साबोटी-टया—वि. सहा बोटें असलेला. [सा=सहा+बोटें]

साब्राअणी—वि. (महानु.) साब्रायण नांवाच्या द्वीपासंबधीं. 'कांतळें साब्राअणीचें.' –शिशु ९३६.

साभडा-ळा—वि. सावडा-ळा पहा.

साभण, साभूण—साबण पहा.

साभणी—स्त्री. साबणी पहा.

सांभव—वि. (प्र.) शांभव; शंभूसंबंधी. [सं.] **०वेधु**–पु. (महानु.) विश्व (ईश्वर) चैतन्याची विद्या. 'नाथब्रह्माचा घडला। कीं सांभववेधु मूर्तीसीं आला।' –दाव २२६. [सांभव+विद्या]

सांभार-रें—सांबार-रें पहा. –नव ५.११९. **सांभार-गाठा**–स्त्रीअव. सांभारें करण्यासाठीं अळूच्या पानाच्या वळलेल्या गांठी.

साभारी—पु. आश्रयदाता; रक्षक; त्राता. [स+आभृ]

साभास—वि. भासमान; सत्य पदार्थाचा आकार, गुण इ० असणारा पण असत्य, मायिक (बाह्य विश्व व प्रत्येक पदार्थ याबदल योजतात). याच्या उलट शब्द निराभास. 'साकार साभास आभासं। चौथें जाणिजे निराभास।' –ह २०.१४५. [स+आभास]

सांभाळ, सांभाळणें—संभाळ, संभाळणें पहा.

साभिमान—वि. अभिमानयुक्त; गर्विष्ट; ताठयाचा. [स+अभिमान]

साभिलाष—वि. अभिलाषायुक्त; आशाळू; लोभी. 'एकें साभिलाषें विरक्तें.' –ज्ञा ११.१२८.

साम—वि. (वैद्यकी) आंव, अपचन यासंबंधी, यांपासून होणारा (रोग) याच्या उलट निराम. [स+आम]

साम—नपु. १ चार वेदांपैकीं तिसरा वेद; सामवेद. यांतील ऋचा गावयाच्या असतात. 'बोलती निपेध नियमें। जिया ऋचा यजुःसामें।' –ज्ञा ५५ १६६. २ सामवेदांतील मंत्र, ऋचा. 'वेदराशीचिया सामा–। आंत बृहत्साम जें प्रियोत्तमा। तें मी म्हणे रमा–। प्राणेश्वरु।' –ज्ञा १०.२८१. [सं. सामन्. तुल० इं साम] **०वेद**–पु. तिसरा वेद; साम पहा. **०वेदी**–वि. १ सामवेद पढलेला (ब्राह्मण). २ सामवेद शाखेचा; सामवेदानुसार संस्कारादि कर्में ज्याच्या कुलांत होतात असा.

साम—न. १ गोड, सामोपचारें बोलणें; सलोखा, तडजोड, समेट होई असें भाषण, कृति. 'सामेंचि कार्य होइल जरि तरि युद्धासि काय कारण हो.' –मोउद्योग १३.१९. २ शत्रु, प्रतिस्पर्धी याला वळविण्याच्या चार उपायांपैकीं एक. साम, दाम, दंड आणि भेद हे ते उपाय होत. ३ मैत्री; सख्य. [सं.] **०दान-म**–नपु. १ एखादी गोष्ट घडवून आणण्यासाठीं, शत्रूला वश करण्यासाठीं योजावयाची शांततेची सख्याची तऱ्हा; समेटाची वागणूक. २ साम आणि दान किंवा दाम हे सख्याचे उपाय योजणें; गोडी गुलीबीनें किंवा द्रव्य देऊन वश करणें. –एभा २३.७१२.

सामक—न. कर्जरकमेंतील मुद्दल; मूळ देणें. [सं.]

सामका—शअक्रिवि. (राजा.) समोर; पुढें. –वि. (राजा. कुग.) सरळ; नीट; योग्य. [सं. सन्मुख, तुल० हिं. सामना] **सामकार-कीर-**(गो.) सामका पहा. **सामुकें**–क्रिवि. सन्मुख. –मुरा ३.९५.

सामग्री—स्त्री. सामान; साहित्य; एखाद्या कार्याला साधनभूत गोष्टी, पदार्थ यांचा समुदाय; शस्त्रास्त्रें; उपकरणें. 'देती सामग्री जय तरि कां सद्रीतिला गुणी वरिते।' –मोविराट. [सं. समग्र] **सामग्र्य**–न. १ सर्व; एकंदरी; समग्रता. २ अखंडता; पूर्णता. [सं.]

सामट—स्त्री. (व. ना.) बोळ; गळी. [सांध]

सामंत—पु. मांडलिक राजा; जहागीरदार; प्रांताधिपति. –वि. १ मर्यादा घालणारा; सीमा, हद्द ठरविणारा. २ सीमेवरील; जवळचा; सन्निध. [सं.] **०वासी**–वि. सीमेवर राहणारा; शेजारी. **०सारंग**–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र

ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल व तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व धैवत वर्ज्य आणि अवरोहांत गांधार वर्ज्य. जाति औडवषाडव, वादी ऋषभ, संवादी पंचम. गानसमय मध्यान्ह.

सामता—पु. (सुतारी) भोंक पाडण्याचें एक हत्यार. –भाए २०. [सं. सम्+मथ्=मंथणें]

सामदस्तक-दस्तखत-दस्कत, सामादस्तक इ०—न. धनकोच्या वहीवर ऋणकोनें पैसे पावल्याची-कर्ज घेतल्याबद्दल करावयाची सही, लेख. [स्व+दस्तक?] **साम(मा)दस्तकी**–वि. सामदस्तक असलेली (वही, खातें, लेख, इ०).

सामधी—स्त्री तयारी. –गीता २.२३५३. 'समस्त पारधी बोलाविले। रावो म्हणे सामधी करा वहिले।' –कालिकापुराण २२.४. [सं. सम+धा]

सामन—पु. एक जातीचा मासा. –प्राणिमो ८५. [इं.]

सामना—पु. १ समोरासमोर असणें. २ विरुद्धता; प्रतिरोध. ३ युद्ध; लढा. ४ अनेक खेळाडूंमध्यें होणारा चुरशीचा खेळ;लढत. (इं.) टूर्नामेंट. [हिं.] **सामनी**–क्रिवि. (राजा. कुण.)समोर; देखत. **सामने**–क्रिवि. (व.खा.) पुढें;समोर. **सामनेवाला**–१ शत्रु; प्रतिस्पर्धी. २ खेळणारा; खेळांत भाग घेणारा.

सामयिक—वि. १ समयास अनुसरून असलेलें. २ समयोचित; यथाकाल. ३ प्रासंगिक; नियमितकालिक. ४ नियुक्त; ठराव, रूढी याला अनुसरून असलेलें. [सं. समय]

सामर, सामरी—सांबर, सांबरी पहा. 'कोकिळा चितळें सामरें। देवालयीं समर्पावी।' –दा ४.५.२६.

सामरस्य—न. १ एकजीव, समरस होणें. 'हें सांडुनि सकल दृश्य। जिवा होए ब्रह्मेसीं सामरस्य।' –भाए ७८१. २ ब्रह्मानंद; ब्रह्ममय होणें. ३ ऐक्यता. –ज्ञा ५.१३७. [सं.]

सामराज्य—न. (प्र.) साम्राज्य पहा. 'अखंड भोगी पद सामराज्य।' –दावि २१९.

सामरिक—वि. युद्धविषयक; समरसंबंधी (वाद्य, शास्त्र,इ०). [सं. समर]

सामर्जन—न. संमार्जन पहा (अप). 'सडा सामर्जन तुळसी वृंदावन। अतीतपूजन ब्राह्मणांचें।' –तुगा ६.३६; –सप्र १७.२.

सामर्थ्य—न १ बल; शक्ति; जोर. –एभा २३.४१६. २ लायकी; पात्रता; क्षमता. ३ गुण; शक्ति. 'नाना सामर्थ्यें वाढवावीं। वैराग्यबळें।' –दा १०.७.१३. ४ (व्या.) शब्दप्रभाव. ५ शब्दांतील परस्पर संबंध. [सं.] **०वान्-वंत**–वि. बल, शक्ति, योग्यता असलेला.

सामल—सामील पहा.

सामलात—स्त्री. १ भागी; हिस्सा; वांटणी (पैसा; माल, धंदा इ० त). २ सामील, संयुक्त होणें; सहाय्य. भाऊसाहेबांच्या सामलातीस नबाबाकडील फौज व शिंदे याजकडील चार पलटणें तोफा सुद्धां द्यावी.' –ख ११.५९०५. ३ शत्रूशीं सख्य; कट. 'जागले पाटलांची कसूर किंवा सामलात दिसून आल्यास त्यांचें इनाम काढून त्यांच्या बिरादरांना देण्यांत येते.' –गांगा ५९. ४ समाइकी; संयुक्त मिळकत. 'एक रुईखेडें मात्र सामलातींत आहे.' –रात १०.२५०. [अर. शामिल्चें अव. शामिलात्] **सामलाती**–वि. सामलात, भागी संबंधी; समायकी; संयुक्त. 'सामलाती मामलत–चोरी–साक्ष–न्याय इ०.'

सामवणें—अक्रि. (प्र.) समावणें; सामावणें; मावणें.

सामवायिक—वि. १ संघ, सभा, मंडळ यांतलें. २ संघ, जमाव यासंबंधीं. ३ समवाय संबंध असलेलें. [सं.]

सामसूम—नस्त्री. शांतता; स्तब्धता; गडबड, हालचाल इ० चा अभाव. 'तेथें कथा होऊं लागली नाहीं अजून सा० आहे.' –क्रिवि. मुकाट्यानें; गपचिप. 'त्याचे घरीं गेलों तों सारे सा० निजले आहेत.' [सं. शांत+शून्य; श्यामा+शून्य? हिं. सुनसान]

सामक्ष—न (दादर) प्रत्यंतर; प्रचित. [समक्ष]

सामक्षा—स्त्री. दृष्टांत; साक्षात्कार (देवतेचा). [समक्ष अप.]

सामा—पु. १ माल; सामान. 'आधीं घे रे रामनाम। सामा भरी हा उत्तम।' –तुगा २६९४. २ (व.) सामग्री; तयारी; साहित्य. 'लग्नाचा सामा एका आठा दिवसांत तयार करूं.' [फा. सामान्. हिं.]

सामाईक—वि संयुक्त; समाईक पहा.

सामाजिक—वि. १ समाजासंबंधीं; समाजाची. 'देशाची सामाजिक व सांपत्तिक स्थिति राजकीय स्थितीवर अवलंबून असते.' –टिव्या. २ सामुदायिक; सामवायिक. ३ सभेंत बसणारा; सभासद; समाजांतील व्यक्ति. 'स्वरचित कवनें जेव्हां तो म्हणे तेव्हां सामाजिकांच्या मनावर त्याचा प्रभाव होत असे.' –नि ३१५. [सं.] **०चळवळ**–स्त्री. समाजसुधारणेसंबंधीं कार्य, प्रयत्न इ०. **०दर्जा**–पु. समाजांतील स्थान, योग्यता, मान. 'कैद्यांचा सामाजिक दर्जा सरकारनें पाहिला पाहिजे.' –के १०.६.३०. **०बहिष्कार**–पु. वाळींत टाकणें: भोंवतालच्या लोकांनीं एखाद्याशीं असहकार करणें; त्याला अन्नपाणी, वाहनें, सुखसाधनें मिळूं न देणें. 'सरकारी नोकरावरील सामाजिक बहिष्कार सरकार कसा बंद पाडणार?' –के १७.६.३०.

सामान—न. १ उपकरणीं; हत्यारें; साधनें. २ चीजवस्त; माल; प्रपंचांतील वस्तू ३ (मुद्रण) फर्मा जुळवून आवळतांना सर्व पानांमध्यें सारखें अंतर पडण्यासाठीं भरीस घालावयाचे

लाकडी तुकडे. –पु. पोषाख; चिलखत. 'परंतु अंगांत सामान यामुळें बार कारेगार झाले नाहींत.' –ख ५.२१३६. [फा. सामान्] ०सुमान–न. (व्यापकपणें) चीजवस्तू; असबाब; सामग्री; साहित्य. क्वचित अनेकवचनी प्रयोग. 'त्यांनीं आपलीं आंगें हालविलीं तोंच वरचीं सामानेंसुमानें फाटकींतुटकीं होतीं त्यांचे शानदार सरंजाम झाले.' –मराठी ६ वें, पु. आ. २.

सामान मोहरा—पु सामान्य इसम. (बहुधा एखाद्या अलौकिक किंवा असामान्य मनुष्यासंबंधीं बोलतांना अकरणरूप प्रयोग योजतात. [सामान्य+मोहरा]

सामानाधिकरण्य—न. १ एकत्र वास; एकत्रता. 'दोनी गुणांचे सामानाधिकरण्य होण्याची योग्यता इंग्रजी भाषेंत जी आली ती अकराव्या शतकांत आली.' –नि ५५६. २ वृत्तीची, कार्याची समानता. ३ (न्याय.) एकदेशीयत्व; एककालिकत्व. [समान+अधिकरण]

सामानुक—स्त्री. सामावणूक; समावेश. 'तेथ भीतरि भरलेल्या आनंदा। सामानुक सायासु।' –ऋ ९१. [सामावणें]

सामान्य—न. १ सर्वसाधारणपणा; समानता; अनेक व्यक्ती किंवा जाती यांशीं संबंध. २ जातीचा, प्रकाराचा धर्म, गुण. 'आंबा, पिंपळ, ताड, माड, इत्यादि सर्व वृक्षांवर वृक्षत्व म्हणून एक सामान्य राहतें.' ३ साहित्यांतील एक अलंकार. एखादी वस्तु इतर तत्सदृश वस्तूंच्या सान्निध्यांत असल्यानें जेव्हां ओळखूं येत नाहीं तेव्हां हा अलंकार होतो. उदा० 'तडागांत जलक्रीडा करायास्तव सांगन। तो गेला, परि पद्मांत नोळखे अंगनानन।'. –वि. १ सर्वसाधारण; सर्वांना लागू पडणारें; सर्वांचें. 'सकळांस जें मान्य। तेंचि होतसे सामान्य।' –दा १५.६.६. २ साधारण प्रतीचा; मध्यम. चांगला आणि वाईट, उच्च आणि नीच यांमधला. 'जैसें सत्रीं अन्न जालें। कीं सामान्या बीक आलें।' –ज्ञा १३.७००. [सं.] ०नाम–न. (व्या.) वस्तु-पदार्थमात्राचें नांव. याच्या उलट विशेषनाम. ०पक्ष–पु. मध्यम मार्ग; मधला पक्ष, प्रकार. ०रूप–न. (व्या.) विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वी नामाचें जें रूप बनतें तें. उदा० घोडा, लांकूड, आज्ञा यांना चा, नें, स, ला, पासून, पाशी, वर इ० लागतांना घोड्या, लाकडा, आज्ञे अशी रूपें होतात. ०लक्षण–न. साधारण, जातिगत विशेष, चिन्ह. ०लिंग–न. ज्या नामाचें (पुरुष किंवा स्त्री) लिंग निश्चित करतां येत नाहीं तेव्हां त्याचें लिंग सामान्य समजतात. उदा० मूल, मी, तूं, इ०. ०शासन–न. अविशिष्ट, सर्वत्र लागू पडणारा हुकूम, कायदा, आज्ञा. ०सर्वनाम–न. जें सर्वनाम साधारणपणें कोणत्याहि नामाबद्दल येतें तें. उदा० कोणी, कांहीं, सर्व, अमुक, इ०. ०स्त्री–स्त्री. वेश्या. 'पात्रें भाट नागारी। सामान्य स्त्रिया काजुवारी।' –ज्ञा १७.२९६.

सामान्यतः–क्रिवि. १ साधारण प्रकारें; सामान्य रीतीनें. २ सर्व जातीला धरून; व्यक्तिशः नव्हे अशा प्रकारें. ३ अविशिष्ट; सार्वत्रिकपणें. ४ व्यापक रीतीनें; बहुसंख्येला, मोठ्या भागाला धरून. ५ बहुशः; नेहमीं. ६ एकंदरीनें; एकूण. **सामान्या**–स्त्री. वेश्या; बटीक. 'सामान्या भली आंग। न शिवे तंव।' –ज्ञा १८.२५०.

सामापसर्पित(करण)—न. (नृत्य) पायांचें स्वस्तिक करून त्यांतून एक पाय काढून घेणें; शिर परिवाहित करणें व हात रेचित करणें. [सं.]

सामायणें—क्रि. (प्र.) सामावणें पहा. 'बीज मोडे झाड होये। झाड मोडे बीजीं सामाये।' –ज्ञा १७.५९.

सामायन—न. सामान (अप) सामुग्री; सिद्धता. 'सतीचें सामायन करा म्हणती।' –होला २२.'

सामावणें, सामेणें—अक्रि. (राजा.) १ प्रवेशून व्यापणें; मावणें; समावणें पहा. 'स्त्रीशूद्रादि प्रतिभे। सामाविलें।' –ज्ञा १८.१६९९. २ एकरूप होणें; ऐक्य पावणें. –एभा २४.५५९. [समावेशन]

सामाशी—वि. सहामासे वजनाचें. [सा+मासा]

सामाशी, सामासकी—स्त्री. १ दरसाल विणारी, म्हणून वर्षांतून सहा महिनेच दूध देणारी गाय; समसकी पहा. २ सामाशें पहा. [सा=सहा+मास] **सामाशें-सें**–न. मृत्यूनंतर सहाव्या महिन्यांत करावयाचें श्राद्ध; षाण्मासिक.

सामास—पु. १ सहा महिने; षण्मास. 'आणि सामासा-मार्जी मासु। उत्तरायण।' –ज्ञा ८.२२०. २ सठी सामास पहा. 'श्राद्धपक्ष सटी सामासें।' –दा १४.१.५३.

सामासिक—वि. १ संयुक्त; जोडलेला. २ सामुदायिक. [सं.]

सामिकतान—स्त्री. (संगीत) तीन स्वरांची तान. पूर्वी सामें तीन स्वरांत म्हणत असावेत. [सं.]

सामिलात—सामलात पहा.

सामीपत्र—न. स्वतःला सरकारची चाकरी करण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे त्या कामासाठीं भाऊबंद उभा करून त्याजपासून लिहून घेतलेला करार. –शर [सं. स्वामिपत्र. सामील+पत्र ?]

सामीप्य—न. १ समीपता; सान्निध्य; निकटवर्तित्व. २ मुक्तीच्या चार प्रकारांपैकीं एक. [सं.]

सामील—वि. १ सहाय्यक; मदतनीस; जोडीदार. २ (हिशेब) समाविष्ट; अंतर्भूत, प्रविष्ट; (क्रि०करणें). ३ (शत्रूला) फितुर. [अर. शामिल्] **सामिली**–स्त्री. सहाय; फूस; ऐक्य; सख्य. 'एक सामिली तरी समजावी नाहींतर अंधळेपणा तरी.'

–सूर्यप्र ३३४. **सामीलनामा**–पु. आपल्याला होत नाहीं म्हणून भाऊ उभा करून त्याच्याशीं केलेला करार. –भाअ १८३२.

सामु(मो)ग्री—स्त्री. १ (प्र.) सामग्री पहा. २ (ल.) सामर्थ्य; ऐश्वर्य. 'तरी पुरतेपणालागीं। आणिकु दुसरा नाहीं जगीं। ऐसी सामुग्री माझ्या अंगीं।' –ज्ञा ३.१६२; –मुसभा २.१३.

सामुदायिक, सामुदाईक—वि. समुदाय, एकंदर संख्या, रास यासंबंधी. २ जमाव, समाज, संघ या संबंधी. [सं. समुदाय] **०चळवळ**–स्त्री. सर्वांनीं मिळून करावयाची चळवळ. 'सामुदाईक चळवळ केल्याशिवाय पगार वाढणार नाहीं' –केले १.२५५.

सामुद्र—वि. समुद्रासंबंधी; उदधि, सागर याविषयीचें [सं.] **०क**–वि. १ दर्याबर्दी; गलबतावरचा नाविक. २ समुद्रतीरस्थ. **०धुनि**–स्त्री. (भौगोलिक अर्वाचिन संज्ञा,) दोन समुद्रांस जोडणारी पाण्याची अरुंद पट्टी, प्रवाह. (इं.) स्ट्रेट. [सं. समुद्र+धुनि=नदी] **सामुद्रांड**–समुद्रकांठचा एक माशासारखा प्राणी. (इं.) सी–अर्चिन. –प्राणिमो ८.१३६. [सामुद्र+अंड] **सामुद्रिक**–न. मीठ. 'कीं समुद्रीं पडलें सामुद्रिक। तें स्वयेंचि अवघा सागर एक।' –पांप्र २७.४४७.

सामुद्र—न. शरीरावरील चिन्ह, खूण. [सं] **सामुद्रिक**–न. हात, पाय, इ० अवयवांवरील शास्त्राप्रमाणें शुभाशुभ चिन्ह. –ज्ञा १३.११६७. 'ध्वजवज्रांकुश रेखा। चरणींचीं सामुद्रिकें देखा।' –एरुस्व १.२२. २ शरीरावरील चिन्हें पाहून शुभाशुभ वर्तविणें; शरीररेखादि ज्ञान. ३ याचें शास्त्र, शास्त्रग्रंथ. –पु. हें शास्त्र जाणणारा ज्योतिषी, भविष्यवादी. –वि. १ शरीरावरील चिन्हांसंबंधी. 'सामुद्रिक लक्षणें सकळ कळा।' –दा ४.१.२१. २ या शास्त्राविषयीचें.

सामुरा—क्रिवि. सामोरा पहा. झडकरी येईं तूं सामुरा।' –ऐपो ६९.

सामु(मो)सा—पु. पुरीचा एक प्रकार. ही तिकोनी असून आंत पुरण भरलें असतें. –गृशि २.१९.

सामें—न. सामान; सामग्री. 'लिहिण्याचें सामें असावें नानाप्रकारीं।' –दा १९.१.१४; –सप्र ८.९. [सामान]

सामोपचार, सामोपाय—पु. १ विशेष त्रास, दुःख न देणारा औषधोपचार; सौम्य उपचार, उपायक्रिया. २ सामाचा, गोडीगुलाबीचा प्रकार, उपाय; सौम्य, शांत शब्दांनीं वळविणें. सामोपचारें, सामोपचारानें असाच बहुधां प्रयोग होतो. [साम+उपचार, उपाय]

सामोरा—क्रिवि. सन्मुख; पुढें (जाणें, येणें, होणें–आगतस्वागतासाठीं). –सं. ७.१६ [समोर] सामोरीं. **सामोरेया**–क्रिवि. समोर; पुढें: 'बोलों सामोरीं सुटतो कांप।' –दावि १८४. 'तेंवीं श्रांता तोषौनि जाणें। सामोरेया।' –ज्ञा १६.१५८.

साम्य—न. १ सारखेपणा; सादृश्य; तुल्यता. २ एकसारखेपणा; समपातळी; बरोबरी. 'तरी कवणेही विषयींचें। साम्य होणें न रुचे।' –ज्ञा १३.१८४. ३ समता (संख्येची). याच्या उलट विषमता. ४ भेदाभेद नसणें; समभाव; तटस्थपणा. 'साम्यावस्था कशी संपादन करावी हेंच भगवद्गीतेंत मुख्यत्वेंकरून सांगितलें आहे।' –गीर २८३. ५ (गणित) तुलना. ६ ऐक्यता. द्वैताचा दुकाळु पाहे। साम्याचें सुयाणें होये।' –ज्ञा १३.१७०. ७ (ल.) सुख. 'ऐसेनि जयाचे चित्तीं। वैषम्य साम्याची वाखती।' –ज्ञा १३.८०६. [सं.] **साम्यता, साम्यत्व**–साम्य यांचें अप. रूप.

साम्योपचार, साम्योपाय—सामोपचार (अप.) सामोपाय (अप.) पहा.

साम्राज्य—न. सार्वभौम राज्य; सम्राटाचें राज्य, सत्ता. २ निष्कंटक राज्य. 'तिये ओळखीचीया साम्राज्यीं बैसी।' –ज्ञा ६.३६७. ३ ज्या राज्यांत चोरी, चहाडी, गांजणूक इ० नाहींत, प्रजा सुखी आहे असें राज्य. [सं.] **०सरकार**–न. सर्व साम्राज्यावर अधिकार असलेलें सरकार. (इं.) इंपीरियल गव्हर्नमेंट. 'गव्हर्नरनें प्रधानांचा सल्ला अमान्य करण्याचें कृत्य साम्राज्यसरकारच्या आज्ञेनुसार केलें.' –वसा ६३.

साय—स्त्री. १ दुधावरची मलई; दूध तापविलें असतां वर येणारा स्नेहयुक्त पापुद्रा. 'ऐसें काय म्हणेल साय न लगे, लोणीच दे खावया।' –मोकृष्ण २६९. २ उकळून घट्ट होणाऱ्या उसाच्या रसावरचा वगैरे सायीसारखा पदार्थ, मळी. ३ नदींतील गाळ; खळमळ; साका. ४ सार; सत्त्वांश. ५ तात्पर्य; सारांश. [सं. सार?] **सायटी–टें**–स्त्री.न. १ पाक दूध, दहीं इ० वर येणारी पातळसर साय. २ गुळावरचा साका, मळी. [साय अल्प. रूप]

साय—स्त्री. १ सावली; छाया. २ रक्षण. ३ रक्षणाला उपयोगी गोष्ट; आश्रय; आडोसा; झाडी इ०. 'स्त्रियाही जावायी तनुज निज सायींच दडती।' –गजेंद्रमोक्ष २५५. [फा. साय. सं. छाया] **सायी–या**–स्त्री. सावली. 'दुपाराची सायी समज अवधी संपति असे।' –सारुह ७.१४१. [सं. छाया]

साय—पु. १ सागाचें लांकूड. [सं. शाक; प्रा. साय] **सायल–ला**–पु. सागवानी. **सायली, सायवानी**–वि. सागवानी. **सायवान**–पु. साग. –न. सागाची लागवड, रान. **साया**–पु. साग. साय पहा. म्ह० साया वृक्षांचा राया.

सायं—स्त्री. संध्याकाळ. 'सायंप्रातर्मध्यान्हा। या तिही काळांची गणना।' –ज्ञा १४.३३२. [सं.] ०**काल-ळ**–पु. १ सूर्यास्ताची वेळ. २ दिनमानाच्या पांच भागांतील शेवटचा काल. 'ऐसें गोप जों संवादत। तों सायंकाळ ओसरला।' –ह १३.५४. ०**काळी**–स्त्री. एक फुलझाड. याच्या फुलास सायंकाळें म्हणतात. ०**काळें**–न. एक फूल. हें संध्याकाळच्या वेळीं फुलतें.

सायक—पु. बाण; शर. 'सखि हस्तिं हस्त न वृष, पांडव हृदयांत सायका मारी।' –मो. **सायकासन**–न. धनुष्य. [सायक+आसन]

सायकल—स्त्री. पायांनीं चालविण्याची एक दोन चाकी गाडी; दुचाकी. [इं. बायसिकल] ०**स्वार**–पु. सायकलवर बसणारा इसम. (इं.) सायकलिस्ट.

सायकवाटी—स्त्री. (खा.) कन्यानिरीक्षण विधि.

साय(यि)खडा, सायखडयाचें बाहुलें—पु.न. कळसूत्री बाहुलें. 'जैशी सायिखडयासि नाचवितसे सूत्रधारक्रिया.' –निभा सुभद्राचंपू ७.८८. 'सायखडियाचें बाहुलें। नाचवी त्या सूत्रें नाचलें।' –भवि २.२५०. [सं. सूत्र+काष्ट?]

सायड-ळ—पु. (व.) भागीदार.

सायतुळव—स्त्री. गाडीचा एक भाग. तुळव पहा;

सायन—पु. मेषसंपात बिंदूपासून गणलेला ग्रहाचा रेखांश. [सं.] ०**खेट-ग्रह**–पु. सायन पहा. ०**पंचांग**–न सायन पद्धतीनें तयार केलेलें पंचांग. ०**पद्धति**–स्त्री. ग्रहाचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत घेण्याची पद्धति. ०**वर्ष**–न. सूर्य एका संपातापासून निघून पुन्हां त्याच संपातास येण्याचा काल; सौरवर्ष. ३६५ दिवस १४ घटका व ३२ पळें.

सायबाणी—वि. रेशमाची एक जात; बेंगनवाडी. –मुंव्या ९७.

सायबान—न. १ मंडपी; सायवान पहा. २ छप्पर. 'बाजूच्या घरांचीं सायबानें आड न येण्याची तजवीज ठेवणें.' –ऐरा २४९.

सायर—न. १ मालावरचा कर; जकात; पट्टी. जमीन सोडून इतर कर. सायरबाब पहा. –बाडमा १.८७. २ जकातनाकें. [अर. साइर्] ०**बाब**–स्त्री. १ (व्यापक.) जकात, कर व किरकोळ पट्टया. २ जंगममालावरील कर. याच्या उलट जमीनबाब. **सायेर**–सायर पहा. –बाड १.३५.

साय(यी)र—स्त्री. रांग; ओळ; साईर पहा.

सायरा—पु. पातळ थर, पापुद्रा, तरंग (पाणी, डोळा इ० वर येणारा). [साय]

सायरी—स्त्री. एक झाड. **सायरेल, साय=येल**–न. सायरीचें तेल.

सायवान—न. १ छत; चांदवा; मंडपी. २ मंडपाच्या बाजूचा पडवीसारखा भाग. ३ सोपा; पडवी. ४ (व.) छप्पर. ५ तंबूच्या चांदणी सभोवतीच्या उतरत्या बाजू. 'निद्रेस डेरा येशजी चहूं सायवानाचा होता त्याप्रमाणें करावा.' –ख १०८५. [फा. सायवान्] ०**दार**–वि., मंडपीसह पाखीं, छपरें असलेली. 'खारव्याची राहुटी चांदणी सायवानदार आहे ती लौकर आली पाहिजे.' –ख ५६७४. **सायवानी**–वि. ज्यास बाजूस छपरें उतरलीं आहेत असा (मंडप इ०).

सायवीण—स्त्री. (गो.) देवी.

सायसंगीत—वि. १ तंतोतंत जुळणारें; पूर्ण ऐक्य असलेलें. २ अगदीं खरें, रास्त ३ (कांहींच्या मतें) सायसंगीन याअर्थी. [? सादि+संगत. प्रा. साइसंगत]

सायसंगीन—वि. १ सुसज्ज; सर्व साधनांनीं युक्त; तयार; संपूर्ण. सांग पहा. २ (कांहींच्या मतें) सायसंगीत याअर्थी. [संगीन]

सायल—पु (कों.) साइला पहा.

सायान्ह—(शुद्धरूप) सायाह्न पहा.

सायारू—पु. (महानु.) जाळी. 'मोतियांचा सायारू बांधिला। कीं देवीं पुष्पवर्खाओ केला।' –शिशु ७१५. [साईर]

सायास—पु. अतिशय आयास; फार कष्ट; मेहनत. 'करूनी सायास मेळविलें धन। तेंही कृष्णार्पण केलें तिहीं।' –तुगा २२. [स+आयास]

सायासी—वि. १ कष्ट करणारा; मेहनती. २ साहसी. **सायासें-शीं**–क्रिवि. मोठया कष्टानें. 'दोन बंब रंगाचे भरून ठेविले होते अति सायाशीं.' –ऐपो २०३.

सायाह्न—पु. सायंकाळ. दिवसाच्या पांच विभागांपैकीं शेवटचा, पराह्न पहा. [सं.]

सायाळ—स्त्री. एक प्राणी. याच्या अंगाला लांब लांब कांटे असतात; साळू. 'त्यांतून देती व्याघ्र आरोळया। अस्वलें दिवाभितें सायेळया।' –होला ११४. [सं. शल्य; हिं. सष्यल्]

सायुज्य—न. १ चतुर्विध मुक्तींतील एक. हींत ईश्वर आणि जीव यांमध्यें अभेद असतो 'तैसें सायुज्य आणि पुनरावृत्ति। ये दोन्ही अवसरा आहाती।' –ज्ञा ८.२०७. २ ऐक्य; संमीलन. [सं.] ०**ता**–सायुज्य मुक्तीची अवस्था. (अप.) 'तुका म्हणे मज न लगे सायुज्यता। राहेन या संतासमागमें।' –तुगा ७९६. ०**मुक्ति**–स्त्री. ईश्वरासी तादात्म्य; चवथी मुक्ति. 'आत्म्याला सायुज्यमुक्ति हें अंतिमसाध्य होय.' –टि ३.२४८. **सायोज्य-सायोज्यता-मुक्ति**–सायुज्य-मुक्ति पहा. 'स्त्री कारणें सायोज्यमुक्ती। तेही तुच्छ मानिली।'–दा ३.२.५६. 'प्रबोध उपजे

श्रोतेयांचिया चित्ता। परब्रह्मेसीं होये सांयोज्यता। म्हणे कवी भास्करू।' –भाए ८२७.

सायुध—वि. सशस्त्र; आयुधांसहित. 'त्रिशूल डमरु शोभाय मान। सायुध ऐसा प्रगटला।' [स+आयुध]

सार—न. चिंच, अमसुल इ० अंबट पदार्थ पाण्यांत कोळून त्याला हिंग, मसाला इ० लावून करतात तें कालवण; एक प्रकारचें अंबट वरण. 'वडे नसती वावडे, सार आवडे।' –अमृ ३५. [द्रा. साऊ; सं. सार]

सार-सारकांड—न. नावेचें परबाण शिडाला ज्यायोगें जोडतात तें कर्डे, दोरी, वादी इ०.

सार—न. सोंगटया, द्यूत याअर्थी टार, गार, नार (घोडा, जवाहीर, स्त्री) या शब्दांबरोबर वापरतात. या गोष्टींवर पैसा उधळला जातो. टार पहा.

सार—स्त्री. (वं.) सुरुंगाची दारू भरण्यासाठीं केलेलें छिद्र, खांच, पोकळी. 'सार करून ती विहीर फोडली.'

सार—पु. कलंक; काळिमा.? 'तूं रावाचा धर्मपुत्र। सुमती नामें महापवित्र। तुवां फेडावा सार। आमुचे मुखींचा।' –कथा ३.१२.३९. [सारा?]

सार—पु न. १ सत्त्व; तथ्यांश. २ साय; नवनीत; रस; अर्क. ३ तत्त्वांश; तात्पर्य. 'तेंही अति आदरें मानुनी। सार निवडूनी घेतसे।' ४ सत्य. 'जरि केवळ सोडिला अहंकार। तरि होय शीघ्र सर्व व्यवहारोच्छेद हें नव्हे सार।' –मोशांति ३.५२. ५ बल; शक्ति. ६ एक अलंकार. एखाद्या वस्तूचा उत्कर्ष किंवा अपकर्ष चढत्या किंवा उतरत्या पायऱ्यांनीं झाला आहे असें वर्णन असल्यास हा अलंकार होतो. उदा० 'वाहे महीतें स्वशिरीं फणीन्द्र तो। पाठीवरी कूर्म तयास वाहतो। त्यालाहि घे सागर मांडियेवरी। थोराचिये थोरिव जाण यापरी।' –वामन. –वि. १ श्रेष्ठ; प्रधान; मुख्य. 'अमृतरसाहूनि हे कथा सारा।' –मोकर्ण २३.१. २ उत्कृष्ट; अतिशुद्ध. 'सार हिऱ्याला गार म्हणति सोनार देत पावली.' –राल ११०. ३ शाश्वत; नित्य. 'सार म्हणिजे शाश्वत। जयास होईल कल्पांत। तें सार नव्हे।' –दा १४.९.५. [सं.] **०वत्ता**–स्त्री. श्रेष्ठता; योग्यता. 'आमच्या देशी भाषेचा विस्तार व तिची सारवत्ता.' –भागवत–देशीभाषा ३. **०वान्**–वि. तथ्य, सार असलेला; सरस; भरींव. **सारासार**–पु. सत्यासत्य; नित्यानित्य; श्रेष्ठकनिष्ठ; तथ्यातथ्य; चांगलेंवाईट. इ०. 'जे नेणती परदोषगुण। सदा सारासार विचारण।' [सार+असार **सारासारविचार**–पु. सार किती व कोणतें तसेंच असार कोणतें याविषयीं विचार; चांगल्यावाईटाचें तारतम्य दान. –दा १३.१.३१.

सार—स्त्री. साईर पहा.

सार—पु. गाभा; झाड.नार (झाडाचा).

सारक, सारूक—न. (कों) १ सुरमाडाची झावळी, फांदी. २ सुरमाडाचा लोंगरासारखा अवयव. याचे तंतु बांधावयाच्या उपयोगास येतात. सारकाचा झेला शेतास पाणी देण्यासाठीं वापरतात. **सारकी**–स्त्री. सुरमाडाच्या फांदीचा लहान झेला.

सारक—वि. १ जुलाबाचें; मलशुद्धि करण्याचा गुण अंगीं असलेलें; रेचक (औषध). २ पुढें ढकलणारा, सारणारा.

सार करणें—क्रि. (व.) बोळवण, पाठवणी करणें

सारकूट-कोट—न पु. सारखेपणा [सारखा]

सारखवट-टा—स्त्री.पु. सादृश्य; सारखेपणा. [सारखा+वत्-वट] 'गाढव आणि घोडे पशूंचा वर्ग एकच आहे व ह्यांची बरीच सारखवट आहे.' –मराठी –पु. ३ आ. ४ पृ. १०८.

सारखा—वि. १ सम; सदृश; जुळता. २ समान; एक रूप. ३ सपाट; समपातळीचा, प्रकारचा; एक गुणी–वर्णी. ५ समभाव असलेला; समदृष्टीतला; आपपरभावहीन. ६ योग्य; जोगता. 'ही जागा घर बांधण्यासारखी आहे.' 'पागोटें डोकीस राहीसारखें बांध.' ७ समभाग–प्रमाण. 'खनिज संपत्ति सारखी वांटलेली नसते' –मदाव १. –क्रिवि. कमजास्त न होतां; एकसारखें; सतत. 'हें पोर चार घटका सारखें रडतें आहे.' 'पाऊस दोन रोज सारखा पडतो आहे.' [सं. सदृक्ष; प्रा. सारिक्ख; हिं. सरीखा] **सारखाविणें**–उक्रि. १ सारखा, सपाट, होईं असें करणें. २ एक सारखा, सदृश होईं असें करणें.

सारंग—पु. १ (संगीत) एक राग. 'उदासधुन सारंग ऐकतां ब्रह्मचारी वेळा चळती।' –प्रला २३६. (या शब्दाचे संस्कृतांत अनेक अर्थ आहेत. त्यांपैकीं जे कांहीं मराठींत येतात ते असे) २ भ्रमर. –ज्ञा १८.१६३५; –एभा १.१०३. ३ हरण. ४ मोर. ५ सर्प. ६ सिंह. ७ चातक. ८ हत्ती. ९ हंसक. १० वृक्ष. ११ वस्त्र. १२ कामदेव. १३ धनुष्य. १४ कमळ. १५ रत्न. १६ सोनें. १७ चंदन. १८ पुष्प. १९ प्रकाश. २० मेघ. २१ कापूर. इ० [सं.] **०धर–पाणी**–पु. विष्णु; कृष्ण 'भीमकी नाकीचें सुपाणी। सहज देखेल सारंगपाणी।' –एरुस्व ७.३३. –एभा २५.४९२.

सारंग—पु. १ खलाशी; नावाडी. –वाडथोमा १.३४४. २ तांडेलांवरील अधिकारी; खलाशांचा नायक. ३ कोंकणांतील नावाडयांची एक जात. [फा. सरंग=सैन्यांतील अधिकारी]

सारंग—वि. चित्रविचित्र; शबल; बहुरंगी. [सं.] **सारंग**–पु. घोडयाचा एक रंग तांबूसकाळा. –वि. तांबूस काळसर रंगाचा. 'तेव्हां सारंगा वारू। राव आणवित।' –शनि ९६.

सारंग—स्त्री. आंब्याचें मोठें जाळें; सारण पहा.

सारंगगाठ—स्त्री. एक जननेंद्रियविषयक अंतर्गळासारखा रोग. यासाठीं कातडी पट्टा (ट्रस) वापरतात.

सारंगपट-पाट—पु १ पटावर सोंगट्या फांशांनीं खेळावयाचा खेळ. २ सोंगट्या आणि पट; सारीपाट.

सारगी—स्त्री. (कोष्टी. कर्ना.) सूत वाळविण्याची जागा. [का. सारे]

सारगी—स्त्री. (बे.) खेप. [का. सारिगि]

सारंगी—स्त्री. एक तंतुवाद्य. लांकूड कोरून कातडयानें मढवितात. सा, प, सा, म या स्वरांत त्याच्या चार तारी मिळवितात; हिला तर्फ्याच्या ३६ तारा असतात. हें वाद्य गजानें वाजवितात. [सं.] **०वाला, सारंग्या**–पु. सारंगी वाजविणारा. [हिं. सारंगिया]

सारघम, सारघुवम—स्त्री. (माण.) एक जोंधळ्याची जात हे काळे असतात.

सारजा—स्त्री. सरस्वती; शारदा. [सं. शारदा; प्रा. सारया]

सारडूळ—न. एक जंगली झाड.

सारढेंकर—पु. (राजा.) करपट ढेंकर. ' आज जडान्नामुळें मला सारढेंकरा येतात. ' [सार+ढेंकर]

सारण-णी—स्त्री. लहान जाळींतून झाडावरून उतरलेले आंबे सांठवण्याचें मोठें जाळें.

सारण—न. १ सारणें; ढकलणें. २ करंजी, पुरी इ०पक्वान्नांत भरावयाचा गूळखोबऱ्याचा किंवा इतर मसाला; पुरण. ३ भाकरी थापण्याकरितां, पोळी वगैरे लाटावयारितां तिच्या खालीं घालतात तें पीठ. –स्त्री. १ पाट; कालवा; सारणी. ' पंप बसविला असेल तेथून सारण चढवून त्यावरून पाणी न्यावें लागतें. ' –शेतकी–शेतकरी ३.५. २ कळक इ० ची बारीक कांब, चिपारी; सरी. ३ (कों. गो.) केरसुणी. [सं. सृ–सरणें] **०पुरी**–स्त्री. (बडोदें.) एक पक्वान्न. –ऐरापु. विवि ३०४. **सारणिक**–वि. रस्ता, प्रवास यासंबंधी. [सं.] **सारणी**–स्त्री. १ ग्रह, पंचांग इ० सिद्ध० करण्याचें गणिती कोष्टक, अंकजाल. उदा० ग्रह–तिथि–योग–नक्षत्र–करण सारणी. २ रीत; मांडणी; विधि. (इं.) फॉर्म्युला. ' फलित प्रेरणा काढण्याची एक सुलभ सारणी काढितां येते ' –यंस्थि २०. ३ सूत्र; सिद्धांत. ४ (रसा.) संकेत; चिन्हरूपानें, संख्येप्रमाणें लिहिलेली पदार्थांची घटना. ५ लहान नदी; ओढा. ६ पाट; नहर. ' सुमन तैलाची सारणी। ' –मुआदि ४८.६. –दा ३.२३. ७ बैलांना मोट ओढतां यावी म्हणून केलेला उतार; मोटेचा उतार; ८ (विणकाम) भेंडळ टांगून ठेवण्याची दोरी. **सारणें**–उक्रि. १ पुढें करणें; ढकलणें; दूर करणें. ' दिव्याची वात सारा पाहूं. ' २ लोटणें; पलीकडे करणें. ' सागर सारुनियां बैसविले। कोंकणीं जन पाळीले। ' –परशुरामाचा पाळणा. –शिशु ३३८. ३ निरास करणें; घालवणें. ' स्वामिनीं वधुनि तापसारिला। त्याक्षणें सकळ ताप सारिला। ' –मोरा १.४६३. ४ खलास करणें; शेवट करणें; संपविणें. ' तेराही स्पष्ट सारिले अब्द। ' –मोविराट ४.६३; –ह ९.४४. ५ आटोपणें; उरकणें. ' प्रत्युत्तर नेदूनि मुखें। भोजन सारी यथासुखें। ' –मुआदि ३८.७७; –तुगा १८६. ६ काढणें; उपसणें (पाणी आंघोळीस इ०). ' जळ सारिलें स्नानाला। ' –रामदासी २.१७७. [सं. सृ–सरणें]

सारथी-थि—पु. १ रथ हांकणारा; गाडीवान. ' सारथी शार्ङ्गधरु। अर्जुनेसीं। ' –ज्ञा १.१४१. २ (ल.) सूत्रधार; कार्यवाह; कर्णधार; प्रमुख. म्ह० तोंडासारखा सारथी जवळ असल्यावर काय कमी. ३ साहाय्यक; संकटनिवारक; पाठीराखा. म्ह० अडल्याचा सारथी भगवान्. [सं. सारथी] **सारथ्य**–न. १ सारथ्याचें काम; पेश, रथ चालविणें. २ (ल.) साहाय्य; मदत. [सं.]

सारद—स्त्री. (प्र.) सरहद्द पहा.

सारद्र—वि. ओलें; (प्र.) सार्द्र. ' सारद्रें जाणि सीतळा –दा ८.५.२२. [स+आर्द्र]

सारनुरी—स्त्री. (क.) राळपिठाचें सारण व गूळ घालून केलेली पोळी [सारण+पुरी]

सारनेटा—क्रिवि. वेगानें; त्वरेनें. –शर. [सारणें+नेट]

सारनोळी—स्त्री. डाळीचें गोड पुरण घालून केलेली पुरी. खाऱ्या पुरणाच्या पुरीला कचोरी म्हणतात. [सारण+पोळी]

सारपणें—सक्रि. (ना.) ओरपणें; भुरकणें.

सारपा—पु. ढलप्यांचा ढीग [साल]

सारफळी—स्त्री. एक अलंकार. सरफळी पहा. ' कानीं नाहीं बाळया वरून सारफळया ल्याला। ' –ऐपो ६८.

सारफा, सारफेवार—सरफा, सरफेवार पहा.

सारभागी—वि. शहाणा; गुणज्ञ. ' म्हणसी सारभागी जे जन। माझीया गुणागुणांचें गायन। करूनियां ते शांतमन। निवांत होती। ' –रास ३.२७८. [सं. सार+भज्]

सारभुंकन-भूकण—वि. नाकपुडीच्या आंतील बाजूस पांढरा ठिपका असणारा (घोडा). हें अशुभ चिन्ह मानतात.

सारभोक्ता—वि. ज्याच्याकरितां दुसऱ्यांनी कष्ट केले आहेत अशा चांगल्या गोष्टीचा आयता उपभोग घेणारा. [सार+भोक्ता]

सारमंडळ—न. एक तंतुवाद्य. हें लाकडी पेटीसारखें असून याच्या ३६ खुंटयांना तारा गुंडाळलेल्या असतात; यांत ३ सुरके असतात.

सारमेय—न. कुत्रा [सं.]

सारल्य—न. १ सरळपणा; निटाई. २ (ल.) प्रामाणिकपणा; अकृत्रिमता; ऋजुता. ३ निर्भीडपणा; स्पष्टपणा; (बोलण्याचा). ४ साधेपणा; स्वाभाविकता (रचना, पद्धति इ. ची) [सं.]

सारवट-टी—स्त्री. (कों.) एक प्रकारची गाडी. बेळगांव कडे दोन बैलांच्या धमणीला म्हणतात.

सारवण—न. १ शेणखळ्यानें लेपणें, सारवणें (जमीन, भित, इ०); पोतेरें. (क्रि० घालणें) २ सारवण्याकरितां तयार केलेला शेणखळा; शेण. ३ सारवलेली स्थिति (जमिनीची). ४ शेण इ० चा दिलेला थर, लेप. [सं. समास्वन; प्रा. सारवण. तुल० का. सारणें,] **सारवणें-विणें**-उक्रि. सारवण करणें; लिंपणें. [का. सारिसु–सारवण]

सारवत—न. (कों.) १ जून, कडकडीत असे विड्याचें पान. २ विड्याच्या पानाला होणारा रोग.

सारवळा—सारोळा पहा.

सारवान—पु. उंटहांक्या; उंटाचा नोकर. [फा.]

सारस—पु. चक्रवाक पक्षी. –ज्ञा ६.१७७. ' सारसाशीं निशीं ध्यान रवीच्या प्रकाशीं । ' –तुगा ८५७. [सं.] **सारसी**–स्त्री. चक्रवाक पक्ष्याची मादी.

सारस—न. कमल. ' सेवा श्रीपतिच्या पदा अलि जसा अत्यादरें सारसा । ' –मोअंबरीष. [सं] **सारसाक्ष**-वि. कमलनयन. ' श्रीमूर्ति तुझी हरि सारसाक्षी । हे जाणते सार असारसाक्षी । ' –वामन हरिविलास ६.२८. [सारस+अक्ष]

सारस, सारीस—न. (कों.) सुरमाडाच्या झावळीचा बुंध्याकडील भाग. हा पन्हाळासारखा असून झाडांस पाणी उडविण्याच्या उपयोगी येतो. सारक पहा.

सारसई—स्त्री. साळू नांवाचें जनावर.

सारसुवी—स्त्री. साफसुफी. –शर.

सारसुसर—स्त्री. १ सामान सुमान; चीजवस्त. २ घरांतल्या, प्रवासाला लागणाऱ्या लहानसहान जिनसा; किरकोळ वस्तू.

सारसे—वि. शअ. सरसा पहा.

सारसें—नं. एक पक्वान्न; सुधारस. ' सहा लिंबाचें सारसं । ' –मसाप ४.२५१. [स+रस]

सारस्य—न. (प्र.) स्वारस्य पहा.

सारस्वत—वि. १ सरस्वतीसंबंधी. २ भाषेसंबंधी. ३ विद्वान्; अभ्यासक. –ऋ ७६. ' ऐसा नष्ट तो अजीगर्ते । महापापिया सारस्वत । ' –कथा ३.७.५६. –पु. १ सरस्वती नदीकांठचा प्रदेश. २ एक ब्राम्हण जात. ३ सरस्वतीचा पुत्र. ' काय धडयावरी सारस्वतें । पढों सिकिजे । ' –ज्ञा ९.८. –न. सर्व विद्या; वाङमय; साहित्य. ' हें सारस्वतांचें गोड । तुम्हींचि लाविलें जी झाड । ' –ज्ञा ११.१९.

सारळीं—क्रिवि. (ना.) नेहमीं; जेव्हां पाहावें तेव्हां. [सर्व वेळीं]

सारा—पु. १ जमिनीवरील कर, पट्टी. ' नाहीं वेठी जेवा सारा । जाहाती नाहीं म्हणियारा । ' –तुगा ३६०. २ खंड. ' हेस्टिंग्ज साहेबानें हा प्रांत साऱ्यानें तरी आपणास वहिवाटीस द्यावा म्हणून बोलणीं लाविलीं । ' –विवि ८.६.११३. ३ भाडें. [अर. साइर्] **०दोरा**–पु. सार, कर पट्ट्या वगैरे. [सारा+दोरा आधिक्यार्थी] **०बंदी**-स्त्री. सरकारास सारा न देणें. एक सत्याग्रह. ' बाळकृष्ण मथुरादास गुजर यांनीं साराबंदीचें उपदेशपर भाषण केल्यावद्दल ४ महिने कैद झाली. ' –के २.१२.३०. **सारेकरी**–पु. सारा भरणारा इसम; खंडकरी.

सारा—पु. डोळ्याचा एक रोग; डोळ्यावरचें पटल.

सारा—पु. (व. ना.) केशकलाप. [सं. सारा=दूर्वा; गवत?'] **०उतरणें**–केशवपन करणें; (विधवा स्त्रीचें).

सारा—पु. भुसार पिकाचा मोठा वाफा. –इरिगेशन खातें.

सारा—वि. अवघा; सर्व; सगळा; एकंदर (संख्या परिमाण) [सं. सर्व] **०सुदीस**-क्रिवि. (कों.) सर्व दिवसभर; सबंध दिवस. [सारा+सु+दीस=दिवस]

सारा-सारि-रें—वि. (कों.) तुल्य; सारखा. ' तुमाला मी भइणी सारी । ' –चैत्रावळ, महाराष्ट्र शारदा, जून १९३५. ' दावी अर्जुन पराशरासारें । ' –मोभीष्म १०.८१. [सं. सदृश]

सारादोरा—पु. १ धागा; जोड; बंध. २ स्नेहबंधन. ' प्रेम सारादोरा उगवेल काशानें । ' –दावि २९०. [दोरा द्वि.]

सारांश—पु. १ सार; सत्त्व; अर्क (लक्षणेनें व शब्दशः) ' गोगोरस मंथन करितां । चोरिशी सारांश नवनीता । ' –एरुस्व ८.२९. २ तात्पर्य; मथितार्थ; गोषवारा. ३ (कायदा) निर्णय; निकाल (न्यायाधिशाचा, पंचाचा). ४ हुकूमनामा; निवाडपत्र.

सारि-री—पु. द्यूतकार; सोंगटया फांसे खेळणारा. –स्त्री. १ सोंगटी. –एभा २९.७७५. २ सोंगटयांचा खेळ; सारीपाट. ' सारी खेळतां अस्करूं । निकरेंही भांडो । ' –ज्ञा ११.५४८. **०पाट**—सारंगपाट पहा; सोंगटयांचा खेळ. –एभा २.२९. ' शिवा सांगातें ते अवसरी । सारीपाट खेळतसे गौरी । ' –कथा १.६.४०. **०फळी**-स्त्री. सोंगटयांचा खेळ. ' पुष्करासि म्हणे कली । तूं नळासी खेळ सारीफळी । ' –कथा १.९.१०.

सारि—स्त्री. (हेट. गो.) चित्तारक्षा; तिसरे दिवशीं भरावयाची राख. [? सं. क्षार] **०धुंवप**–क्रि. (गो.) चिता धुमत राहणें.

सारिका-सारी—स्त्री. एक पक्षी; साळुंकी; मैना. 'लीला बालपणीं हि गाय हरिच्या प्रेमें जसी सारिका।' –मोकृष्ण २४१.२१३. [सं.]

सारिखा—सारखा पहा. 'तेंही प्रज्ञेसारिखें चरणीं। निवेदीन परिसिजे।' –मुआदि ४.४९. [सं. सदृक्ष; प्रा. सारिक्ख]

सारिगम—स्त्री. न. (प्र.) सरगम पहा.

सारिफा, सारिफेबार—(प्र.) सर(रि)फा-वार पहा.

सारी—स्त्री. (बे.) खेप. [का.]

सारूख, सारोख—वि. (राजा.) १ पतीचा; अब्रूदार. २ कांहीं कर्मे करून आपण नामानिराळा असें दाखविण्यांत पटाईत; आपली बाजू पटेल अशी मांडण्यांत शहाणा. ३ चांगलें; सत्य; महत्त्वाचें (भाषण, वर्तन, कृत्य इ०) 'महाभूतांचे सारोख सरळे होती।' –ज्ञा १५.९८. –स्त्री. सारुखी पहा. [सारख?]

सारुखी-सारोखी–स्त्री. १ पत; अब्रू; लौकिक. २ आपला चांगूलपणा दाखविण्याची शिताफी, शहाणपणा. (चोर, लबाड माणसाचा). ३ शहाणपणा; हुशारी. **सारोखीच्या गोष्टी सांगणें**–सविस्तर सबबी, खुलाशाच्या गोष्टी सांगणें.

सारूप्य—न. १ सादृश्य; एकरूपता; सारखेपणा; एकजिनसीपणा. २ मुक्तीच्या चार प्रकारांपैकीं एक; सरूपता. [सं.]

सारें—न, (गो.) १ माशाचें खत (शेतासाठीं). २ जिभेवरचा पांढरा साका. [सं. सार?]

सारें—क्रिवि. (व.) नेहमीं; सर्वकाळ [सर्व]

सारोद्धार, सारोद्धार—क्रिवि. (कु. गो.) सदासर्वदा; सतत. 'वारंवार खेद करून सारोद्धार झुरत बसणें अगदीं उपयोगी नाहीं।' –रत्न ११.

सारोधार—पु. (महानु) सारांश. 'तयांचा सारोधारु। आतां आइक तुं।' –भाए ६९५. [सं. सार+उध्दृ–उद्धार]

सारोळा—पु बेरजेचा एक ताळा. (गु.) सर्वाळा. (क्रि० करणें, उतरणें).

सार्थ—पु. १ व्यापारीसंघ, तांडा. २ (सामा.) संघ; समूह; जमाव. ०**वाह**–पु. १ लग्नांचा नाईक; तांडयाचा मुख्य. [सं.]

सार्थ—वि. १ अर्थयुक्त; अर्थ देणारा (ग्रंथ). 'सार्थ भगवद्गीता. २ सत्य; अन्वर्थक; यथार्थ. ३ निष्फल, निःसत्त्व नव्हे असें. ४ संपन्न; सधन. [सं. स+अर्थ] **सार्थक-क्य**–न. १ समाप्ति; सांगता; शेवट. २ सफलता; सिद्धि. 'म्हणोनि आपुलीं आपणपे या। जरी ये इंद्रियें येती आया। तरी अधिक कांहीं धनंजया। सार्थक असे।' –ज्ञा २.३५१. ३ कृतकृत्यता; इति कृत्यता; इतिकर्तव्यता. ४ उत्तरक्रिया. 'त्याचें सार्थक करणें मला अवश्य आहे, असें म्हणून त्यानें स्मशानांत तात्काळ चिता रचिली.'। –कीर्तन १.५७. ५ चीज; साफल्य. 'ही मनीषा सिद्धीस गेली असें वाचकांस वाटलें तर सर्व श्रमांचें सार्थक्य झालें.' ब्रावि २. –वि. सफळ –एभा ११.३८. [सं. सार्थक्य] **सार्थकी लागणें**–योग्य कारणीं लागणें, यथायोग्य विनियोग होणें.

सार्द्र—वि. ओला; भिजलेला; सर्द. –एभा १३.६३७. [सं. स+आर्द्र] **सार्द्रता**–स्त्री. १ ओलेपणा. –एभा १८ २५९. २ टवटवी. –एभा १३.६३७.

सार्ध—वि. अर्धे मिळविलेलें; दीड; अर्धासह. 'तेथ सार्ध सार्ध प्रांतीं। सांडुनिया।' –ज्ञा ६.१९५. सार्धमुद्रा–रुपया–द्वय–त्रय इ० [स+अर्ध]

सार्प—वि. सर्पासंबंधीं सर्पिल. [सं.].

सार्व—वि. अखिल; सबंध; एकंदर. [सं.] ०**काल**–क्रिवि. सतत; नेहमीं; सदासर्वकाळ. ०**कालिक**–वि. सर्वकाळ लागू असणारें, शाश्वतचें. ०**जनिक-जनीन**–वि. सर्व लोकांसंबंधीं (आचार, इ०). सामान्य; सामुदायिक; लौकिक. खाजगी याच्या उलट. सार्वजनिक गणपति–चर्चा–सभा–हित इ०' ०**भौतिक**–वि. १ सर्व प्राण्यांसंबंधी; जगांतील सर्व भूतमात्रांविषयीं. २ सर्वभूतांविषयीं. ०**भौम**–पु. सम्राट्; सर्व पृथ्वीचा राजा; चक्रवर्ती; बादशहा. 'जन्म गेला कोरान्न मागोन। सार्वभौम नाम तया।' –वि. सर्व पृथ्वीसंबंधीं; जागतिक. ०**भौमपद**–न. सम्राट्पद; सर्व पृथ्वीवर सत्ता, राज्य. ०**राष्ट्रीय**–वि. १ सर्व राष्ट्रांसंबंधीं–बाबत (नियम, कायदा इ०) 'ऑस्टिन हा सार्वराष्ट्रीय धर्मशास्त्राला कायदा ही संज्ञा लावीत नाहीं.' २ आंतरराष्ट्रीय. (इं) इंटरनॅशनल. –ज्ञानको. ०**लौकिक**–वि. जगांतील सर्व राष्ट्रें, लोक यासंबंधीं; अखिल जागतिक. **सार्वत्रिक**–वि. १ सर्वत्र विद्यमान, प्रसिद्ध. २ सर्व जागचा; सर्वत्र संबंध असलेला. **सार्वस्विक**–वि. समाजसत्ताक. 'लोकसत्ताक राज्य चांगलें. सगळें राज्यतंत्र गुंडाळून टाकून सार्वस्विक सांप्रदाय असावा' –नि ७१२. **सार्वांग**–(प्र.) सर्वांग. 'न लांवीं वो कर्पुरू। सार्वांगीं येतसें ओदरूं।' –शिशु ८३२.

सार्लेक् करणें—क्रि. (व.) मदत करणें; हातभार लावणें. 'एकानें दुसऱ्याचें सार्लेक् केलें पाहिजे.'

सार्ष्टिता, सार्ष्ट्य—न. (पंचधा मुक्ति मानतात तेव्हां चवथी मुक्ति). बुद्धि, बल, ऐश्वर्य इ० सर्व गुणांत परमेश्वराशीं साम्य; एक प्रकारचा मोक्ष. [सं.]

साल—न. १ वर्ष; संवत्सर. 'ईश्वर त्याजला बहुसाल करो' –रा ३.३३५. २ वर्षासन; वार्षिक वेतन, पगार. [फा. साल्]

०आयंदा–पु. (कागदोपत्रीं) आगामी वर्ष. आवंदाचें साल. **०उधारी**–स्त्री. वर्षमुदतीची उधारी. –गांगा १४३. **०करी**–पु. १ जोसपण, कुळकरण इ० वृत्तींचे अनेक जे भागीदार त्यांतून विशिष्ट सालची वहिवाट करण्याचा ज्याला अधिकार आहे तो; विशिष्ट सालचा वृत्तिभोगी. २ एक सालाकरितां नेमलेला माणूस. ३ वर्षाचें वेतन द्यावयाचा करार करून ठेवलेला माणूस. **०गिरा–गिरी–गिरे**–पुस्त्री. १ वाढदिवस; वर्षगांठ. 'महाराजांच्या सालगिऱ्याचे दिवशीं ग्वाल्हेरमध्यें मोठा जलसा होता' –एशिआ ३५३. 'नबाबाची सालगिरे' –रा ५.२७. २ वाढदिवसाचा समारंभ. –रा ७.८२. 'सालगिरीच्या समारंभांतही बहुत आरास करावी.' –ऐस्फुले ३४. [फा. सालगिरह्] **०गुदस्त**–न. गेले वर्ष; मागील साल. –दिमरा १.१८८. **०गुदस्त–स्तां**–क्रिवि. गतवर्षी; गुदस्तां. **०झाडा**–पु. साल अखेर हिशोब; वर्षाचा हिशेब. 'सावधान तुका निर्भर मानसीं। सालझाडयापाशीं गुंफो नेणें।' –तुगा १८९४. **०दरसाल**–क्रिवि. प्रतिवर्षी. **०दार**–(खा.) सालाच्या बोलीनें नेमलेला नोकर; शेत्या; सालकरी. **०पाडो**–पु (गो.) वर्षाअखेर झाडांवरचीं सर्व फळें काढणें; वार्षिक तोड. [साल+पाड] **०बंदी**–स्त्री. १ (जमाबंदी संज्ञा) कौल, खत इ० संबंधीं लागोपाठ वर्षांसाठीं ठराव, योजना; हसे अनेक द्यावे, घ्यावे इ० ठरावांचा त्या कागदांवर वर्षक्रम. २ (राजा.) कृत्यादिकांच्या वहिवाटीविषयीं अमुकांनीं अमुकसालीं वहिवाट करावी असा सालकऱ्यांमध्यें झालेला ठराव; सालउत्पन्नाचा करार. **०ब–साल**–क्रिवि. प्रतिवर्षी; दरसाल; वर्षानुवर्ष. 'मौजे मजकूरची जमाबंदी साल–ब–साल तनख्याप्रमाणें करून।' –वाडबाबा १.२०६. **०बेगमी–बेजमी**–स्त्री. वर्षभर पुरेल इतका सांठा करणें; सालाची बेगमी. (धान्य, लोणचीं, पापड इ० ची). **०बोली**–स्त्री. एका वर्षापुरती केलेली बोली, करार. **०भाडया**–पु. साल अखेरचा हिशेब घेणारा अंमलदार. –तुगा. **०मजकूर**–न. चालू साल; वर्तमान वर्ष. **०वारी**–स्त्री. वर्षात घडलेल्या गोष्टींची नोंद, टांचण. –वि. सालवार; सालाप्रमाणें लावलेली. **०संबंधीं**–वि. सालीना; सालचें (उत्पन्न, वेतन, मिळकत, इ०). **०हाल**–न. चालू साल. 'सालहाल व गुदस्तची खंडणीची बेबाकी करून देणें.' –दिमरा १.१८८. –क्रिवि. चालू सालीं. हालसाल पहा.

सालाना, सालि(ली)ना–क्रिवि. वर्षाकांठीं–वर्षाला. सर्व साल मिळून येई, अशा प्रकारानें. 'आम्हांस सालीना एक हजार रुपये वेतन मिळतें.' [फा. सालियाना] **सालाबाद**–वि. वार्षिक; दरसालचा (खर्च, पैका, पट्टी). –क्रिवि. दरवर्षी 'सालबादप्रमाणें'. [फा. साल्–बअद्] **सालाबादी**–वि. दरसाल होणारा, चालणारा (देणें, घेणें इ० व्यवहार). –स्त्री. दरसाल घडत असतो तो विशिष्ट व्यवहार, खर्च इ०. 'श्रीची सालाबादी ३०० रु. आहे.' **सालीं**–वि. वार्षिक; सालाची. **सालोसाल**–क्रिवि. १ प्रतिवर्षी; दरसाल. २ वर्षानुवर्ष.

साल—स्त्री. १ त्वचा; वरचें जाड आवरण (झाड, फळ, इ० चें). २ घांसल्यानें, चोळवटल्यानें निघालेलें कातडें (माणूस, जनावर यांचें); –न. १ बारीक त्वचा; फोल; तूस; टरफल (धान्य, दाणे, इ० वरचें). 'कलियुगांतीं कोरडीं। चहूं युगांचीं सालें सांडी।' –ज्ञा १५.१२९. २ कोकंबीचें टरफल; आमसुल. ३ भात जमीन नांगरल्यानंतर तींतील ढेकळें फोडून जमीन साफ करण्याकरितां जमीनीवर फिरवावयाचा लांकडी जाड ओंडा, गुंठे. [सं. छाल; दे. प्रा. सालण] **०(पाठीचें) जाणें**–चट्टा लागणें; नुकसान येणें. **०ट**–वि. १ थोडेंबहुत साल ज्याच्या अंगीं आहे असा (डाळ, कणीक, तांदूळ, लांकूड इ० पदार्थ). २ आंब्याचा एक प्रकार. –न. १ फोल; टरफल (धान्य, बी इ० चें). २ पोकळ शेंग (आंत दाणा नसलेली). सालटें असा अनेकवचनी प्रयोग बहुधां येतो. **०टी–डी**–स्त्री. १ सबंध कातडें (मनुष्य, जनावर यांचें); शरीरावरण. २ खरचटून, घासून निघालेलें कातडें. ३ (तुच्छतार्थी) एखाद्या माणसाचें कातडें. ४ (सामा.) साल; त्वचा; पातळ कवच. 'आकाशाची सालडी। काढुनि घेइजे आंतुली गोडी।' –सिसं ४.१९६; –विउ ४.६२. **०टें–डें**–न. सालटी–डी (१–२) पहा. **०दाटा**–वि. जाड सालाचा (आंबा, केळें, इ०). 'सालदाटी केळ' नांवाची एक केळयाची जात आहे. [साल+दाटणें] **०दोडा**–पु. १ जाड साल असणारा एक जातीचा आंबा. २ अतिशय जाड साल असणारें शेंदाडाचें फळ. **०पट**–न. १ साल (वृक्ष, मनुष्य, धान्य, फळ इ० ची) २ घांसून, खरचटून निघालेला कातडयाचा तुकडा. साल पहा. ३ कोंडा; तूस; फोल. **०पा**–पु. ढलप्यांची रास. **०मोटा–ठा**–वि. जाड सालीचा (वृक्ष, फळ, वनस्पति इ०). **०वणी**–न. अमसुलाचें सार; सोलवणी. **०सूल**–नस्त्री. (व्यापक) साल, इ०.

साल—न. (गो.) दिवाणखाना; दालन. –सह्याद्री ३१४. [पोर्तु. इं. सलून]

साल, सालई—पुस्त्री. एक झाड; सारफळ. [सं. शाल; प्रा. साल]

सालकडू—पु. (मुंबई) जातगंगेनें पांच टरविलेला इसम. तिळोरी पहा.

सालंकरणें—क्रि. अलंकृत करणें, होणें. 'दिसें सालंकरलें सकळ। प्रत्यक्ष जैसें निराकार केवळ।' –स्वानु १.५.५०. [स+अलंकरण] **सालंकृत कन्यादान**–न. अंगावर दागीने घालून मुलीचें विवाहप्रसंगीं दान करणें. (एरवीं कन्यादानाच्या

वेळीं मुलीच्या अंगावर फारसें कांहीं ठेवीत नाहींत). याच्या उलट गमतीचा प्रयोग–**गिळंकृत कन्यादान.**

सालखावें—न. (कों.) एक प्रकारची दंश करणारी माशी.

सालखाद्या—वि. १ चांगलें असेल तेवढें घेणारा; लोणी, मलई खाणारा. २ फायदा मिळतो आहे तोंपर्यंतच राहणारा (धंदा, नोकरी, जागा इ० वर). [साल+खाणें]

सालजाब—पु जाबसाल पहा. १ तह; निकाल. 'मोंगलाच्या विचारें पाहतां हे उभयतां सरदार देशीं असावे म्हणजे मोंगलाशीं सालजाब होऊन बंदोबस्त होईल.' –रा १.१२१ २ बोलणें. 'तरी सालजाब करून मशारनिल्हेस माघारें लौकर पाठविणें. –रा ६.३९३.

सालढोल—स्त्री. एक झाड; सालफळ पहा.

सालवळ—स्त्री. (बे.) १ वंशावळ. २ चाल. [का. साल]

सालन—पु. (व.) मांसाचा रसा; तोंडीं लावणें. [हिं.]

सालपाई—स्त्री. एक लहान देवता. –खेया.

सालपापड—न. फेणी; एक पक्वान्न. –पाक ६४.

सालफण—पु. एक झाड. –अश्वप २.४८.

सालफळ-ळी—स्त्री. एक झाड; सालढोल.

सालभुक-पाडरी—वि. कानांवर पांढरा ठिपका असणारा (घोडा). –मसाप २.१.५७.

सालभेंडा-डी—वि. १ साल जाड पण आंत तत्त्वांश मात्र थोडा असा (नारळ, पोफळ, केळें, इ० फळ). २ अशीं जाड सालीचीं फळें धरणारें (झाड). ३ जाड सालीचें (झाड). [साल+भेंडा] **सालभेंडी**–स्त्री. एक झाड. याचें साल जाड पण लांकूड फार हलकें असतें.

सालमाल—पु. एक हलकी हिंदु जात. धंदा तांबोळयाचा. –विल्सन कोश.

साल(लं)मिश्री—स्त्री. एक औषधी मूळ. –वगु ६.१०. [अर. सालबि+मिस्री]

सालवन-ण—स्त्री. एक वनस्पति. [सं. शालि-पर्णी]

सालस—वि. १ प्रामाणिक; सज्जन; निरागस. २ गरीब; खोडकर नव्हे असा (माणूस, जनावर). 'ऐका पाटील सालस सवलस होऊन बोलती कशी।' –पला ३.३७. [अर. सलिस] **०पण-णा**–नपु. सुजनता; साळसूदपणा, 'चल सालसपण धरुनि निखालस खोटया बोला बोलुं नको।' –अफला. **सालसाई, सालशी**–स्त्री. प्रामाणिकपणा; सरळपणा. 'त्यांचीं उत्तरें ते सालसीनें लिहितात.' –बाडसभा २.१७७.

साला—पु. १ बायकोचा भाऊ; मेहुणा. –एरुस्व ७.७५. 'हे कोण बायकोचे साले.' –अमृत ११८. २ बहिणीचा नवरा. (या अर्थानें आज फारसा रूढ नाहीं). ३ एक शिवी 'बायकोनें सांवरलं म्हणून ठीक, नाहीं तर साल्यापासुन सुरवात होती.' –के १.७.३०. [सं. श्याल (क); प्रा. साल; हिं. साल; पं. साळा] **साली**–वि. १ बायकोची बहीण (विशेषतः धाकटी). 'साल्या मेहुण्या घरास येती। फराळाच्या बसती पंक्ती।' –अमृत. २ बायकोच्या भावाची पत्नी. 'साली अथवा मेहुणी। रूपवंत कुशल तरणी। स्त्रियेच्या बाळंतपणा आणी। तो एक मूर्ख।' –मुमूल ८३. [सं. श्याली; प्रा. साली] **सालेपण**–न. मेव्हण्याचें नातें. 'झणें लाज धरिसी मनीं। सालेपणें तुजसी केला बाकरु।' –धवळे उ १०.

सालाधाला—वि. १ अल्पसंतोषी. २ आनंदी; सुखी-समाधानी. 'सदा दिसे सालीधाली। रंगम्मा माझी।' –मव्व ३१९. [धाला द्वि.]

सालार—वि. सेनापति; नाईक. [फा. सालार्]

सालिम—वि. (व.) सगळा; तमाम. [अर. सालिम्]

सालु—न. (व.) पागोटें. [हिं.]

सालोक्य—न. सलोकता पहा. [सं.]

सालोत्री—पु. घोडावैद्य; शालिहोत्री; पशुवैद्य. [सं. शालिहोत्र]

सालोरी—स्त्री. एक वनस्पति. हिचें मूळ सार्सापरिल्याच्या ऐवजीं देतात. [सं. शारिवा]

साव—वि. सर्व; अवघा. 'मरावें मारावें या आलें प्रसंगा। बरें पांडुरंगा कळलें सावें।' –तुगा ४०८२. [सं. सर्व; प्रा. सव्व–साव]

साव—पु. १ सावकार; पेढीवाला. 'होय व्याकुळ जळतां सर्वस्व वही मनांत साव जसा।' –मोआश्रम ५.९२. २ श्रीमंत; भरभराट असलेला व्यापारी, धंदेवाला. ३ प्रामाणिक, पतीचा माणूस. याच्या उलट चोर, ठक, इ०. 'तुका म्हणे चोरटाचि झाला साव। सहज न्याय नाहीं तेथें।' –तुगा ३७०. [सं. साधु; प्रा. साहु-साहव] **०जी**–पु. (आदरार्थी) सावकार; शेठजी. 'बहुत सावजी, क्रोधयुक्त प्याद्याचा फर्जी।' –देवनाथ कटिबंध ६. **०चोर**–पु. साव दिसणारा चोर. **०पणा**–पु. सचोटी; प्रामाणिकपणा. **०सावकारा**-पुः सावकार आणि सावकारी, व्यापार–व्यापारी, धंदे आणि धंदेवाले यांसंबंधी व्यापकपणें बोलावयाचें असल्यास योजतात. (सामा.) उद्योगधंदा. 'हें राज्य झाल्यापासुन साव सावकारा वाढला हो!'

सा(सां)व—स्त्री. १ नाडी; शीर; स्नायु (क्रि० चढणें, फुगणें, शेकणें, उतरणें, दुखणें). अनेकवचनी उपयोग; जसें–

सावा ओढतात-ताणतात-तुटतात इ०. 'घडिघडि बहु बाई वोढती सर्व सांवा।' -सारुह ३.७५. २ बकरा, इ० कांच्या आंतड्याचा लांब तंतू, तांत. शिरा, नाडी पहा. [सं. स्नायु]

सावकार—पु. १ ज्यापासून लोक पैसे कर्जाऊ घेतात असा श्रीमंत माणूस; पेढीवाला. २ जो ज्यास कर्जाऊ पैसा देतो तो त्याचा सावकार. ३ व्यापारी; धंदेवाला. साव पहा. [सं. साधुकार; प्रा. साहुकार. थेट्टें पुढील व्युत्पत्ति देतात. सा (सहा)+वकार (वस्त्र, वपु, विद्या, विनय, वाणी, वित्त) ज्याच्या जवळ आहेत किंवा पाहिजेत असा] 'धरजाव, मरजाव, विसरजाव' हा मंत्र सावकार ठेव घेतांना उच्चारतो असें थेट्टें मानतात व त्यास **सावकारी मंत्र** म्हणतात. **सावकारकी**-स्त्री. १ सावकारी पहा. २ (ल. ना.) चोंबडेपणा; लुडबुड. **साधकारा**-पु. १ सावकारांचा समुदाय; अनेक श्रीमान् पेढीवाले. 'त्या शहरांत सावकारा मोठा आहे.' -तीप्र १०४. २ (राजा.) मोठी सावकारी, व्यापार उदीम. 'तमाम सावकारा बंद झाला.' -रा ३. १६४. **०उठणें**-पेठ बसणें; व्यापारी उठून जाणें. **सावकाराचा नातू**-पु. जवळ पैसा नसून श्रीमंताप्रमाणें राहाणाऱ्यास म्हणतात. **सावकारी**-स्त्री. १ पैशाचा व्यवहार, देवघेव. २ सावकाराचा धंदा; सावकारकी. 'ऋण तरि मुष्टी पोहे त्याच्या व्याजांत हेमनगरी ती। मुदलांत मुक्ति देणें ही कोण्या सावकारिची रीती।' -वि. १ सावकारासंबंधी. २ व्यापारी; धंदेवाईक. **०बातमी**-स्त्री. पेशवाईंत सावकार लोक आपली जी डाक स्वतंत्र ठेवीत, तिच्या द्वारें आलेली बातमी. ही अगदीं निश्चित अशी मानली जात नसे. -रा १०.२६२.

सावकाश—पुन. आराम; स्वस्थता. 'कीं ऐकतां परिणाम घोष। भूतप्रेतांस न वाटे सावकाश।' -ह २३.२१४. 'महाराज श्रीस्वामींस सावकाश वाटलें.' -वाडशा ३७. -क्रिवि. घाईं, गोंधळ न करतां; स्वस्थपणें; शांतपणें (क्रि० जाणें, येणें, चालणें इ०). [स+अवकाश] **सावकाशी**-स्त्री. संथपणा; मंदपणा; घाईं नसणें. **०वर घेणें**-सावकाश चालू देणें; संथपणें करणें. **सावकाशें**-क्रिवि. आरामशीर; स्वस्थपणें. 'तंववरी तुम्ही सावकाशें। शाश्वत लोकीं सुखवस्ती।' -मुआदि २०.१४२.

सावकें-सेवकें—क्रिवि. (बायकी) घालूनपाडून; टोमणे मारून; लावून (बोलणें).

सावघड—वि. सोपी; सुलभ. 'या गोष्टी आवघडा। जाल्यावर सावघडा। नांवाचा चौघडा झडल झडल झडल।' -होला १२२. [सं. सुघट]

सावचित-त्त—वि. १ दक्ष; सावधान. 'नव्हतो सावचित्त। तेणें अंतरलें हित।' -तुगा २०२६. २ एकचित्त; लक्षपूर्वक. 'तुकारामरूप प्रत्यक्ष बोलत। होई सावचित्त सावधान।' -व ५०५. ३ जागा; हुशार. 'निजोन उठतां दुश्चित्त। कदा नाहीं सावचित्त।' -दा ८.६.३९. ४ जिवंत; शुद्धीवर आलेलें. 'प्रेत झालें सावचित्त। नवें वस्त्र नेसत।' -गुच ३२.१५५. [सावध+चित्त] **सावचित-तीं, सावचित्तपणें**-क्रिवि. सावधान चित्तानें; स्वस्थपणें. सावचित्त पहा.

सावज—न. १ श्वापद; रानटी पशु (माणसाळलेला नव्हे असा). -एभा २.९३. २ शिकारीचें जनावर (ससा, हरण, इ०). 'विचाराचेनि फरसे। जिव्हेचें सावज उसासे।' -भाए १९८. ३ मगर. 'पाहें पां सावजें हातिरूं धरिलें। तेणें तया काकुळती मातें स्मरिलें' -ज्ञा ९.४४२ [सं. श्वापद. प्रा. सावज; हिं. सौजा]

सावजिरा—पु. संगजिरें पहा.

सावट—न. १ सावलीची जागा, विशेषत: जेथें नेहमीं झाडझुडपांचें आच्छादन असल्यानें जिन्नब होत नाहीं अशी. 'शेतामध्यें झाडांचें सावट फार झालें आहे. तें काढल्याशिवाय पीक चांगलें येणार नाहीं.' २ (सामा.) सावली; छाया. ३ सावलीची स्थिति; आतपशून्यता. [सं. छाया] **०पहाणें**-(माण.) आरसा पाणी इ०त आपलें प्रतिबिंब पाहणें. **सावटी**-वि. सावटाची; सावलीची (जागा, शेत,)

सावट—क्रिवि. (खा.) एकदम. -भात्रै ७.१.४ [स+अवचित]

सावड—स्त्री. शेतकामांत एकमेकांना जनावरें इ० ची मदत करणें; सांपड, इरजीक पहा. (क्रि० करणें).

सावड—स्त्रीन. (गो.) १ रानांतील फांद्यावगैरे राबासाठीं तोडणें. २ राब जाळून धान्य पेरणें (डोंगरावर कडधान्य) **०मारप**-क्रि. रानांतील झाडी तोडून शेतजमीन तयार करणें.

सा(सां)वडणें—उक्रि. १ गोळा करणें; एकत्र करणें (अस्ताव्यस्त वस्तू) २ एकदम नेण्यासाठीं, एकजागीं करणें; ढीग करणें. 'करिन ब्राह्मण पादप्रक्षालन सांवडीन मी उष्टीं।' -मोसभा २. ११. 'राख सावडणें.' असा प्रयोग रूढ आहे. ३ सांचविणें; जमविणें (पैसा). 'तुज होता व्यथा टकमका पहाती। परी सावडीती द्रव्य आधी।' ४ चिवडणें. 'येक दिव्यानें भक्षिती। येक विष्ठा सावडिती।' -दा ६.९.९ ५ (कांहीं अर्थी) सावरणें पहा. [सांवरणें]

सावण—न. (बे.) सावा मळल्यानंतर उरणारें गवत, पेंढा. [सावा]

सावंत—(प्र.) सामंत पहा 'तुं सावंत राओ वाचोनि आणिक। कवण राखेल।' -भाए १०३. २ एक आडनांव.

सावतें—वि. सारखें. -शर [सं. सम]

सावतोल—पु. (ब.) दागिन्याचें रेशमी गोंडे वगैरेसकट वजन. -जनि १५. [सं. सर्व; प्रा. साव+तोलणें]

सावत्र—वि. (समासांत प्रथमपदीं उपयोग) सापत्न पहा. [सं. सापत्न्य; प्रा सावत्त] सावत्र-आई-भाऊ-मामा-चुलता-सासरा इ० सामाशब्द आहेत. **०भाव**-पु. १ सवतीमत्सर; सापत्नभाव. २ परकेपणा; दुजेपण.

सावत्राई—वि. दोन सावत्र बंधूंना राहण्यास सोईस्कर होईल असा एक घराच्या बांधणीचा प्रकार. दुघई, तिघई, चौसोपी, शृंगारी याप्रमाणें सावत्राई हाहि एक प्रकार आहे.

सांवत्सर, सांवत्सरिक—वि. प्रतिवर्षी येणारें, नियमानें करावयाचें (श्राद्धादिक); वार्षिक. [सं. संवत्सर] **सांवत्सरिक-श्राद्ध**-न. १ वार्षिक श्राद्ध; दरसाल मृततिथीला करावयाचें श्राद्ध. २ पक्ष; महालय (भाद्रपद महिन्यांतील).

सावद—न. (राजा. गो.) सावज; शिकार. (प्र.) सावज पहा.

सावध—वि. १ भानावर, शुद्धीवर असलेला; जागृत. -ज्ञा ६.२२५. 'सावध होऊनि साष्टांग लागली पाया।' -वसा १८. २ दक्ष, हुशार; सावधान. ३ (ल.) दुखण्यांतून, विपत्न दशेंतून, अज्ञानावस्थेंतून बाहेर पडलेला; उर्जितदशापन्न. [सं सावधान] **०गिरी**-स्त्री. १ शुद्धि; जागृतावस्था. २ दक्षता; सावधगिरी. 'भित्रेपणांत शहाणपणाची भर पडली म्हणजे त्याला सावधानता म्हणतात.' -टिव्या.

सावधान—वि. दक्ष; सावध; जागृत. 'उदईक आहे तुझें लग्न। तुवां असावें सावधान। पाणिग्रहण मी करीन।' -एरुस्व ५.७८; -तुगा १३१. -न. १ लग्न, मुंज लावतेवेळीं मंगलाष्टकें म्हणून 'सुमुहूर्ते सावधान' असा या शब्दाचा करावयाचा प्रयोग. (याचा उपयोग मुंज्या मुलाला, वधूवराला 'सावध असा' असा इषारा देण्याचा असतो). २ (ल.) लग्न; विवाह. 'सावध असल्याशिवाय सावधान झालें तर कुणालाही पश्चात्तापच होत असतो.' -संन्याशाचा संसार ८९. [सं] **०ता**-स्त्री. १ एकाग्रचित्त. २ दक्षता; हुशारी.

सावधि, सावधिक—वि. १ मर्यादित; ठराविक; परिमित. 'ईश्वराचे गुण सावधि, नाहींत. 'भोजन भाषण सावधिक करावें.' २ अवकाश, अवधि असलेलें; वेळ, योग्य संधी अद्याप न आलेलें; ज्याची वेळ, मुदत संपली नाहीं असें. 'अर्जुन तुमचें लग्न सावधिक आहे एव्हांपासून कशाला खटपट करितां?' ३ मध्यें अंतर तुटावयाचें, काटावयाचें राहिलें आहे असें (दूरस्थ वस्तूसबंधी उपयोग). (सामा). सांतर. ४ विशिष्ट; सामान्य, सर्व साधारण नव्हे असें, मर्यादित अर्थकक्षा असलेलें. उदा० जमिनी संबंधांत बोलतांना शेत हें विशिष्ट झालें; झाडासंबंधांत. फुलझाड हें विशिष्ट. ५ सापेक्ष; संबद्ध.

सावन—वि. सौर; सूर्यासंबंधी (कालमान) उदा० सावन दिन-वर्ष इ० [सं] -पु सावनमास पहा. **०दिन**-न. ग्रह क्षितिजावर एकाच ठिकाणीं लागोपाठ येण्याचा काळ, किंवा एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंतचा काळ. **०मास**-पु सौरमास; सूर्याचें तीस वेळां उगवणें व मावळणें याला लागणारा काळ. **०वर्ष**-न. ३६० दिवसांचा काळ.

सावनी कल्याण—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र गांधार, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव षाडव. वादी षड्ज, संवादी पंचम. गानसमय रात्रीचा पहिला प्रहर.

सावपा—वि. (कों) सावध झालेला; शुद्धीवर आलेला.

सावयव—वि १ अंग, अवयव यांसहित; भाग, साधनें, परिवार असलेला. २ साक्षात्; मूर्तिमंत; साकार. 'सावएव अविद्येची मूर्ति। जन्म माझें।' -ऋ ४८; -ज्ञा १३.२९५. 'जैसी विद्युल्लता सावयव। उतरली पृथ्वीवरी।' ३ समग्र; अखंड. [सं. स+अवयव] **०अंक**-पु. (गणित) अपूर्णांकासहित पूर्णांक असलेली संख्या.

सावर—स्त्री. न. स्नायु; साव पहा. बहुधां अनेक वचनांत उपयोग. उदा० सावरें धरतात-ओढतात, ताणतात-तुटतात-वळतात. [सं. स्नायु; प्रा. साव]

सा(सां)वर—पु. १ पुन्हां शक्ति, जोम, उत्साह परत येणें (दुखणें, संकट इ. नंतर) २ सत्ता, संपत्ति; मान इ० पुन्हां प्राप्त होणें 'अलीकडे राजाचा आश्रय लागल्यापासुन त्यानें सावर घेतला.' ३ वळकटी; दाब. -पेद ५.३३. ४ स्थिरस्थावर. [स+आवरणें किंवा सं. सम+व्याहर] **सा-सांवरणें**- १ गोळा करणें; एकत्रित आणणें; आवरून ठेवणें. २ सांभाळून धरणें; पडूं न देणें. (घसरलेला माणूस, वस्तू) उचलून धरणें. 'हा पडत होता म्यां त्यास सावरून घरलें.' ३ पुन्हां पूर्व स्थितीवर येणें (दुखणें, विपत्ति, नुकसान इ० नंतर सशक्त होणें). ४ दुरुस्त करणें; सुधारणें (चुकी, खोटें वर्तन इ०) ५ शाबूत राखणें; धक्का लागूं न देणें; जसाचा तसा ठेवणें. 'वेद मर्यादा सावरी। प्रीति ज्याची देवावरी।' ६ काळजीपूर्वक, निगा, आदर ठेवून सांभाळणें, रक्षिणें. 'मृत्तिका घेऊनि घाली वदनीं। कोण वनीं सावरी तीतें।' 'तशी प्रकट हे निजाश्रित जना सांवरी।' -केका १२०. ७ आदर, विनय इ० भाव दिसतील असें वागणें. 'तो धांवला सावरोन। चरणीं मिठी घातली।' -जै ८५ २२; -नव १२.१९८. ८ अंग धरणें; लढ होणें. ९ पार पाडणें; तडीस नेणें. 'स्वयंवरीं कृष्ण कसा वरी ते। केलें कसें साहस सावरीतें।' -सारुह १.४२.

सांवर-री—स्त्री. शेवरी; एक प्रकारच्या कापसाचें झाड. [सं. शाल्मली] **सावऱ्या**-पु. सावरीची काठी.

सावरचिन्नें—न. (बे.) एक प्रकारचें रताळें.

सावरणी—स्त्री. (गु.) केरसुणी; झाडू.

सावरणें-णा—न.पु. (सोनारी, कासारी) एक प्रकारची हातोडी [स+आवरण]

सावरें—न. अंगण. -शर ?

सावर्ण्य— न. १ रंगाचा सारखेपणा; एकवर्णीपणा. २ वर्ग किंवा जाति हीं समान असणें. सजातीयत्व. [सं. स+वर्ण]

सांवर्तिक—वि. प्रलयकालीन, 'सांवर्तिक मेघांच्या लाजाव्या द्रौणिसायकां धारा।' -मोविराट (नवनीत ३०४) [सं. संवर्त]

सावली—स्त्री. ? छाया; प्रतिबिंब. २ प्रतिमा. ३ अनुसरणारी वस्तु, व्यक्ति. [सं. छाया, प्रा. छाआ; हिं. छाव; म. सांव (ली).] **०पडणें**-१ आगामी गोष्टीचा प्रभाव दिसूं लागणे, चिन्हें दृग्गोचर होणें. २ आगामी गोष्टीचा परिणाम होण्याइतका त्याच्या आटोक्यांत असणें. 'नवव्या मासाची सावली पडल्यावर बाळंत झाली तर पोरास भय नाही.' ३ परिणाम होणें (विशेषतः अनिष्ट); अनुकरण करणें (निंदार्थी उपयोग). **०पायाखालीं येणें-असणें**-माध्यान्ह होणें. **सावलीस उभा न राहणें**-अजीबात टाळणें, संबंध येऊं न देणें. **सावल्या गेल्या**-संध्याकाळ झाली. **सावली करणारा**-दिव्य करणाऱ्याचा प्रतिस्पर्धी.

सावळें-ळें—न. १ एक प्रकारचें लुगडें; वस्त्र; नेसणें; वसन. 'स्तेन भले न स्त्रीचा नग्न करिती हरुनि सावळें काय।' -मोउद्योग ३.६०. २ (सामा.) स्त्रीवस्त्र; स्त्रीचा कपडा, पेहराव. 'परंतु मराठे मनुष्य पळूं लागिल्यावर कोणाची ईर कोणास नाहींशी होते. रांडेनें सावळें हुसकटलें तर झाडांस बांधिलें असतां झाड घेऊन बारा कोस पळतील.' -भाब ६८. [देप्रा. साउलीं=वस्त्र]

सावव—वि. प्र. सावयव पहा. -मनको

सावशेष—वि. अवशेषयुक्त; कांहीं शिल्लक असलेलें. [स+अवशेष]

सावळ—स्त्री. पाश; फांस. [क्रि० घालणे] 'यमकिंकर पाठविले। सांवळा हातीं।' -वसा ६४, -स्त्रिपु २.४९.५१.

सावळ—स्त्रीन. (कों.) माड, ताड; सुरमाड, पोफळ इ० ची मोठी फांदी; झावळी. [सं. श्यामल किंवा छायावलि ?]

सावळी-स्त्री. (कों.) लहान सावळ.

सावळणें—अक्रि. १ मावळणें; वाळणें; नाहींसा होत जाणें (गोंवर, कांजिण्या, देवी इ०). २ काळया होणे-पडणें (मावळतांना, देवी इ०). ३ काळवंडणें; करपणें. ४ उजळणें (काळाकुट्ट वर्ण, चेहरा). [सांवळा]

सावळगोंदा—वि. १ मलीन; घाणेरडा. २ अनाचारी; दुर्वर्तनी. 'सावळ गोंदा करीना परमार्थ कदा।' -दा २०.३. १८. **सावळगोंदें**-न. सांवळें गोंधळें पहा.

सा(सां)वळा—वि. १ निमगोरा; साधारण गोरा. 'सांवळी तनु सुकुमार।' 'सांवळी मी षोडशवर्षा।' -अमृत २६. २ जांभळ्या रंगाचा; श्यामल; काळा आणि तांबडा यामधील रंगाचा (बैल, जनावर). ३ (सामा.) काळसर. 'सावळा वर बरा गौर वधुला' ४ मेघयुक्त. -एभा २१. -पु कृष्ण. 'सांवळा, नंदाचा मुल खोटा गे।' [सं. श्यामल ना. सामल; हिं. सांवल]

सांवळा गोंधळ-पु. १ हलक्या प्रकारचा गोंधळ; तमाशा. (सं. शांभलिकः गौन्दळः-राजवाडे). २ सावपणाच्या पांघरुणाखालीं चाललेला अनिष्ट प्रकार; गुप्त अनाचार; व्यभिचार. ३ सावळें गोंधळें पहा. **सांवळेंगोंधळें**-न. १ कांहीं निकाल न होतां गोंधळांत अधांतरीं राहाणें; अशी त्रिशंकु अवस्था (देणें, घेणें, वाद इ० ची). २ तात्पुरती सारवासारव, तडजोड करणें. ३ सोंवळें ओंवळें; आचार; पंक्तिविचार इ० विषयीं परंपरागत व्यवस्था न राखणें; संकर; धर्मबाह्य वर्तन.

सांवळी—स्त्री. (गो.) वेडसरपणा.

सा(सां)वा—पु. कांग; एक तृणधान्य. याचा भात होतो. [सं. श्यामाक; हिं. सांवा] **०बीवड**-स्त्री. जमीन खतावण्याकरितां सावा, तीळ यांचा बिवड घेण्यासाठीं जमीनीची नांगरणी करणें. पावसाळ्यापूर्वी दोन महिने माळ जमिनीची अशी मशागत करतात. **साव्याण**-न. साव्याचा पेंढा. [सावा+तृण]

सा-सांवा—पु. साग, सागवान; साया.

सा-सांवा—वि १ बिनकांटेरी. २ (कु.) गोडा. 'सावें पाणी'=गोडें पाणी. साव पहा.

सावाइकें—न १ इतिकर्तव्यता (मृत्युलोकीची). -माझा १८.१७२५. २ अडचण. -बंझा १८.१७२४. [सं. सार्व-ऐहिक ?]

साबाई—स्त्री. सांगता; संपूर्णता.[सं. सर्व; प्रा. सव्व-साव]

सावाइणें—सावायणें पहा.

सावाद—न. (कु.) शिकार; सावज पहा. [सं. श्वापद; प्रा. सावय]

सावाधावा—पु. १ साहाय्यासाठीं धांवून येणें. 'तुजवीण कोण सावाधांवा करी। येई वो झडकरी पांडुरंगे।' -तुगा ८६०. २ धांवाधांव; धांवपळ. 'करितां संसारीं सांवाधांवा।' -दावि २४१. [धांवा द्वि.]

सावान—सायवान पहा.

सावाय-व—पु. सहाय्य; मदत. 'ऐसा स्वयंभु जो जीवें लाटु। सावायेंवीण उद्धटु।' –ज्ञा १८.८५७. 'तें इंधन जैसी आगी। सावावो होय।' –ज्ञा ३.२६५. २ साह्यकर्ता. –स्वानु ९.४.३७. [सं. सहाय] **सावायणें-यिणें, सावावणें**—अक्रि. १ संयुक्त होणें; संग लाभला जाणें. 'तें नित्यकर्म भलें। होय नैमत्तिकीं सावाइलें। सोनयासि जोडलें। सौरभ्य जैसें।' –ज्ञा १८. ५८८; –अमृ १०.२२. २ साहाय करणें. –ज्ञा १७.३६७.

सावारे—पुअव. स्नायु; सांव, सावर पहा. (क्रि० ओढणें, वळणें, तुटणें). सावारा असा एकवचनी प्रयोग क्वचितच होतो.

सावास—पु. १ सहवास; संग. 'तिअें लाजेचां सावासीं भकलिलीं। फुन धरितीचि ना।' –शिशु ६०७. २ सहवासी; हितकर्ता. 'मज तुंचि एकु सावासु। श्रीचक्रधरा पै।' –भाए १३४. [सं. सहवास] **सावासिनी**–स्त्री. सखी; दासी. 'तंव वैदर्भी आभाइली। सावासिनीतें।' –शिशु १९०.

सावित्रा—वि. सरळ. –ज्ञा ८.२३७. –क्रिवि. १ सहज; अकस्मात् 'जे अमृतही परि नावडे। ऐसें सावियाचि आरोचकु जै पडे।' –ज्ञा ४.१९७. २ सर्वथा. 'घेईल हें सावियां। विरुद्धचि।' –अमृ ६.७५. [सं. सव्य; प्रा. सव्व; किंवा सं. स्वाभाव्य; प्रा. साहव्व]

सावित्री—स्त्री. १ ब्रह्मदेवाची पत्नी व त्रैवर्णिकांची मंत्ररूप माता. २ गायत्रीमंत्र. ३ सत्यवानाची पत्नी. [सं.] **०व्रत**–न. वटपूर्णिमेचें व्रत. ज्येष्ठ शु॥ १५ स पाळतात. **०सूत्र**–न. यज्ञोपवीत; जानवें.

सावी-व्वी, सांव्वी—स्त्री षष्ठीपूजनाचा विधि; सहावी. [सं. षष्टि]

सावीज-द—न. (राजा.) सावज पहा.

सावुली—वि. (भि.) सहावी. 'गोठ सावुली.' –भि १७.

सावेरी—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार निषाद वर्ज्य. जाति औडुव-संपूर्ण; वादी पंचम, संवादी षड्ज. गानसमय प्रातःकाल.

सावेव—वि १ साकार; सावयव. 'माया हे सावेव किंवा निरावेव। नकळे याचा ठाव कोणे परी।' –ब १६२. २ सांग; संपूर्ण; सर्व. –अमृ ५.३. ३ मूर्तिमंत. 'मज पाहतां सावेव। शांतिचि ते।' –ज्ञा ६.२५५.

सावेसा—स्त्री. स्वेच्छा; अभिलाष. –शर. [सं. स्वेच्छा]

सावो—पु. (गो) गोड्या पाण्यांतील मासा. [साव=गोड; सावें पाणी=गोडें पाणी]

सावोत्रा—साहोत्रा पहा. 'सावोत्रा देखील इनामतिजाईसुद्धां दरोबस्त अमलाचा करार.' –बाडसभा १.६४.

सॉव्हरिन—पु. इंग्लंड देशांतील सोन्याचें नाणें. किंमत १ पौंड=सुमारें तेराचौदा रुपये. [इं.]

साशंक—वि. १ भित्रा; बुजणारा; शंकेखोर. २ खात्री, विश्वास नसलेला; कचरणारा. [स+आशंका]

सांशयिक—वि. १ संशयास्पद; संदिग्ध; अनिश्चित. २ शंकेखोर; साशंक. [सं. संशय]

साशिवटा—पु. (मुंबई) साक्षात्कार.

साष्टकोष्ट—न. (ना.) साटेलोटें.

साष्टांग—वि. १ अष्टांगासहित (नमस्कार, प्रणाम). २ संपूर्ण; सपशेल (लोटांगण, शरण) –पु साष्टांग नमस्कार (क्रि० घालणें). [स+अष्ट+अंग] **०नमस्कार**–पुं. जमिनीवर पडून (आठ अंगें टेंकून) केलेला नमस्कार; लोटांगण. 'साष्टांग नमस्कारास अधिकारू। नाना प्रतिमा देवगुरु।' –दा ४.६.४.

सास—वि. सत्य; खरें. 'सप्रीचे सुष सास करील.' –उषा १२. [सं. सत्य, प्रा. सच्च; म. साच]

सासट—वि. (प्र.) सहासष्ट पहा.

सासणाय—पु. (गो.) साक्षात्कार.

सांसणें—क्रि. सांचविणें. 'मधु मेळवूनी माशी। आणिकां सासी पारधिया।' –तुगा ३६३१.

सासन—न. साधन; उपकरण.

सासन(ण)णें, सांसि(सी)नणें, सासिन्नणें—क्रि. १ तयार होणें; पिकणें. –ज्ञा ६.२५७. २ बहरणें; फोफावणें. 'नातरी शांतरसें सींपतां। सासीनली ज्ञानलता।' –शिशु ३२.

सासवडी कागद—पु. सासवडचा हातानें केलेला कागद. (पूर्वी जुन्नर, सासवड, दौलताबाद इ० ठिकाणीं कागदाचे कारखाने असत); जाड जमाखर्ची वह्याचे कागद. 'कंदी पागोटीं, खादीचीं धोतरें, बरूच्या लेखण्या, काजळाची शाई, सासवडी कागद वगैरे वस्तूंस उदार आश्रय देणें.' –आगर ३.९६.

सा(सां)सपणें—उक्रि. १ चाचपणें; हातानें दाबून, हात फिरवून पाहाणें. 'सांसपी... तयाच्या... आंगातें.' –मोविराट १.१२८. २ हुडकणें; शोधणें (अनेक वस्तूंतून एकाला). ३ कुरवाळणें; अंगावरून हात फिरविणें (लहानमूल, दुःखित इ० स समाधानाकरितां). –अक्रि. १ (अंधारांत) चांचपडत जाणें. २ रेंगाळणें. [सं. संस्पृश्]

सासबहु—स्त्री. (सासु-सून) दोन सारख्या दिसणाऱ्या पण लहानमोठ्या गोष्टी. (ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर सासबहु या नांवाचीं दोन लहानमोठीं देवळें आहेत तसेंच सांचीस दोन लहानमोठे स्तूप आहेत त्यांस म्हणतात). [हिं. सास=सासू+बहु=सून]

सासर-रें—न. सासरा-सासूचें घर; पतिगृह. 'कन्या सासऱ्यासी जाये। मागें परतोनी पाहे।' 'म्हणे इकडे सासेंर तिकडे माहेर। दोहींकडे आप्तचि समग्र।' –ह २४.३८ [सासरा] **म्ह०** १ वेडीला सासर काय माहेर काय!. २ सासरीं एकादशी माहेरीं शिवरात्र (दोन्ही घरीं दारिद्र्य). **०माहेर-१** सासरीं पाठविणें व माहेरीं आणणें; विचारपूस करणें (मुलीची) २ संक्रांतीच्या वेळीं दोन विवाहित मुली-एक माहेरवाशीण व दुसरी सासुरवाशीण म्हणून-दोनतीन दिवस राहावयास आणून त्यांना चोळीबांगडी करून संक्रांतीनंतर त्यांची पाठवणी करणें. ३ (नवीन लग्न झालेल्या मुलींमध्यें) भांगाचा एक प्रकार. **०वास**-(प्र.) सासुरवास पहा.

सासरा—पु १ नवऱ्याचा किंवा बायकोचा बाप. २ सासऱ्याच्या स्थानीं मानला गेलेला नवऱ्याचा किंवा बायकोचा नातेवाईक. उदा० आजेसासरा, चुलतसासरा, इ०. [सं. श्वशुर; प्रा. स(सा)सुर; हिं. ससुर. तुल० फ्रें.जि. सस्रो] **म्ह०** सासऱ्या गेली म्हणून काय शिंदळ झाली? **सासुरें, सासूर**-सासर पहा. **सासुरवाट**-स्त्री. स्त्रियांचा डावीकडचा भांग. उजवीकडच्यास माहेरवाट म्हणतात. **सासुरवड-वाडी**-स्त्री. १ बायकोच्या बापाचें घर; बायकोचें माहेर. २ सासरें. 'कीं भवाब्धिसम सासुरवाडा।' -मंराधा ५२. **सासुरवाशी-सी, सासुरवाशीण**-स्त्री. १ सासरीं राहणारी (परतंत्र) मुलगी; सून. 'सासुरवाशी। सुन रुसून बसली कैशी।' –भोंडला. २ (ल.) एखाद्याच्या धाकामुळें स्वतंत्रपणें वागतां न येणारी व्यक्ति; ताटाखालचें मांजर. **सासुरवास**-१ सुनेचें सासरीं राहणें. २ (ल.) सासरीं सासू, सासरा, नणंद, दीर इ० करतात तो जाच, छळ. ३ (ल) एखाद्याचा होणारा जाच, छळ, परतंत्रपणा. **सासू, सासूस**-स्त्री. नवऱ्याची किंवा बायकोची आई; सासऱ्याची बायको. [सं. श्वश्रू; प्रा. सासु; हिं. सास; गु. सासु; सिं. ससु] **म्ह०** १ सासूचा पाय सुनेस लागला तर सुनेनेंच पायां पडावें, सुनेचा पाय सासूस लागला तरी तेंच. २ चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे. **सासुडी**-स्त्री. (निंदार्थ.) सासू. **सासूपण**-न. सासुरवास; सासरचा छळ. 'सासूबाई सासु हिनं सासूपण केलं। कपाळीचं कुंकू मला जन्मवरी दिलं।' –जात्यावरील गाणें. **सासूसून**-सासबहू पहा. **सास्वासुना**-मुलींचा एक खेळ. –मखेपु. २६४.

सांसर्गिक—वि. स्पर्शजन्य; संसर्गापासून उत्पन्न होणारा; एकापासून दुसऱ्याला लागणारा, बाधणारा, (रोग). (इं.) इन्फेक्शिअस.

सा(सां)सव, सांसू—स्त्री. (गो.) मोहरी. [सं. सर्षप; प्रा. सासव] **सांसवेल, सांसेल**-न. (गो.) मोहरीचें तेल. **सांसोव**-स्त्री. (गो.) मोहरीचें कालवण; रायतें.

सासष्ट—वि. ६६; सहासष्ट पहा.

सासान—न. अंदण. –शर.

सासाय—पु. (गो.) साक्षात्कार; प्रचीति.

सांसारिक—वि संसारासंबंधी; ऐहिक; प्रापंचिक. [सं. संसार]

सांसिद्धिक—वि. स्वाभाविक; स्वयंभू; मूळची. [सं.]

सांसी—पु. एक गुन्हेगार जात व तींतील व्यक्ति; कंजार.

सासु—वि. जिवंत; सप्राण. 'पावुनि भवत्प्रसादें निजपद बहुकाळ सासु राहो तो।' –मोवन १३.६८. [सं+असु]

सासु—स्त्री. (ना.) शेकोटीसाठीं लागणारें जळण.

सांस्थानिक—वि. १ संस्थानासंबंधी; संस्थानी. (कारभार, नोकरी, भांडण इ०). २ निर्वाहासाठीं संस्थान, किंवा गांव स्वाधीन असलेला; संस्थानिक. [सं. संस्थान]

सास्ना—स्त्री. गाय, बैल इ० जनावराच्या मानेखालची पोळी.

साहकार-री—पु. (प्र.) सहकार-री पहा.

साहंकार—वि. अहंकारी; अभिमानी; गर्विष्ठ 'तैसेनि साहंकारें। फळाभिलाषियें नरें। कीजे गा आदरें। जें जें कांहीं।' –ज्ञा १८.६०५. [स+अहंकार]

साहचर्य—न. १ बरोबर असणें, जाणें; जोड; गट्टी; संबंध. 'दारिद्र्य व विद्याव्यासंग यांचें आज हजारों वर्षांपासून ब्राह्मणांशीं साहचर्य आहे.' –टि ४.१६६. २ सहवास; मैत्री; संगत. [सं.]

साहजिक—वि १ सुलभ; सोपें; सहज साधणारें. २ सहज, तात्काल, एकदम घडून येणारें; स्वाभाविक. ३ आगंतुक; आकस्मिक. –क्रिवि. स्वाभाविकरीत्या; सहज. [सहज]

साहटें, साहटणें—न. (प्र.) सायटें पहा.

साहणें—उक्रि. सहन करणें; सोसणें. 'साहा रे साहां भणौनि हाणती। परतौनियां।' –शिशु ९५९; –ज्ञा १.१८६. [सं. सह्] **साहत साहत**-क्रिवि. कसें तरी सहन करीत, कष्ट सोशीत, अळंबळें (खाणें, पिणें, शिकणें इ०). **साहता**-वि. सहन करणारा. 'आतां सर्वेही साहातिया गरिमा। गर्वा न ये तेचि क्षमा।' –ज्ञा १६.१९१. **साहून पाहून**-क्रिवि. नुकसान सोसून व पडतें घेऊन; कष्टत पण आदरपूर्वक वागून (तडजोड करणारे, व्यापारी उदीम इ० च्या तोंडीचा वाक्प्रचार).

साहणें—न. (कों.) पाख्यास किंवा भिंतीस प्रकाश येण्यासाठीं, धूर जाण्यासाठीं ठेवतात तें भोंक; गवाक्ष; झरोका; साणें पहा. 'डोळे उघडितां त्वरित। पैंधा अडकला साहण्यांत।' –ह ९.१५७.

साहन—साहान पहा.

साहन—वि. लहान; सान. लहान शब्दाबरोबर उपयोग. उदा० लाहन साहन.

साहनक—सानक पहा.

साहनट, साहनवट—स्त्री. (प्रां.) रिकामी, मोकळी जागा (गांवांतील); वर इमारत नसलेली जागा. [अर. साहत्=मैदान?]

साहरा—पु. साह्य; मदत. (क्रि० देणें). [सं. सहकार]

साहरा—पु. (कों.) थर; पापुद्रा. सायरा पहा.

साहरी, साहरेल, साहऱ्येल—सायरी, सायरेल पहा.

साहस—न. १ धाडस; धैर्य; अचाटपणा; मोठा झपाटा. योद्धयाला आवश्यक अशा उद्यम, साहस, धैर्य, बल, शक्ति, पराक्रम या सहा गुणांपैकीं एक. २ अविचार. 'झाला तिणें उपजतां बाळपणीं करुनि साहस त्यजिला.' –मोकर्ण २२. ३३. ३ धाडसाचें, अविचाराचें कृत्य; कोणतेंहि झपाटयाचें, धडाक्याचें काम. म्ह० साहस केल्यावांचून लक्ष्मी मिळत नाहीं. **साहसिक, साहसी**–वि. धाडसी; अविचारी; साहसकर्म करणारा. 'हें नेणुनि मज साहसी म्हणो नीच.' –मोकर्ण २७.१९.

साहस्र—न. हजारांचा समूह. 'एकांगुष्ठींहि तपिजे. तप साहस्रीं.' –ज्ञा १७.४१५. –वि. हजारासंबंधी–विषयीं. [सं. सहस्र]

साहा—वि. १ ६; सहा ही संख्या. सहा पहा. 'बसेत साहा कट दाट पाही. पिपीलिकेला परि मार्ग नाहीं.' –सारुह ८.५३. २ (सांकेतिक) सहा शास्त्रें. 'कळा वाढविती शब्द. साही जणांशीं विशाद.' –एरुस्व ६.७७; –होला १५. **साही**–अ. साहानें गुणून. 'एके साही साहा.' –वि. साहा पहा. 'साही चक्रें ओलांडुनि. मग स्थिरावला स्थानीं.' –सिसं ४.१२९. [सं. षट्] **साहा महिन्याची जांभई**–स्त्री. फार काळ लांबलेला, अंत पाहणारा खटला, व्यवहार इ० स लावतात.

साहाकार—पु. साह्य; मदत. 'ते सत्त्वशुद्धी साहाकारें. गुरुकृपामृततुषारें.' –ज्ञा १८.२५९. [सं. सहकार] **साहाकारी**–वि. सहाय्यकारी; मदतगार. 'साहाकारी तूं भक्तास. म्हणऊन तुज विनवितसे.' –देवसंत ११.

साहाजक—वि. निरंतर; शाश्वत. –वाडबाबा १.५५. [साहानकबद्दल चुकीनें] (पहा).

साहाजण-न—न. शहाजण; मोठा डंका, नगारा. [फा. शाद्याना. शहाजण पहा.]

साहाण—स्त्री. गंध उगाळण्याचा दगड. सहाण पहा.

साहान—न. साधन; सामुग्री; परिवार. 'काय कामधेनू सवें सवें साहान. चालत असे.' –ज्ञा १०.३०९.

साहान—न. (महानु.) (घोडयांचें) सैन्य; (घोड) दळ. 'ते आं घोडेआंचें साहान.' –शिशु ५०६ [सैन्य]

साहानक-नुक—वि. शाश्वत; अक्षय. 'कीं श्रीकृष्णाचें उसिटें सेविती. ते ब्रह्मादिकां वंद्य होती. साहानुक सत्यलोकु भोगिती. सेखीं कैवल्यपदा.' –दाव २६८. [अर. सहनक–सानक पहा]

साहाय्य—न. १ पाठिंबा; मदत; साह्य; जोड. २ स्नेह; संगत. [सं.] **०कारी**–वि. सहकारी; सहकार्य करणारी. (इं.) कोऑपरेटिव्ह. 'शेतकऱ्यांनीं आपापसांत परस्पर साहाय्यकारी बँका काढाव्या.' –टि २.४६३.

साहित्य—न. १ सामुग्री; साधनें; उपकरणें (एखाद्या वस्तूच्या, कार्याच्या उत्पादन–निर्मिति–उभारणी इ० ला लागणारीं). उदा० लग्नाचें–मुंजीचें साहित्य. –मोकर्ण २०.३९. २ सहवास; संगत; स्नेह. 'साहित्य भंगलें येणें बोलें. म्हणती एक.' –दा ८.२.३९. ३ संबंध; ऐक्य; संघ. ४ साहाय्य; मदत. 'संसक्त मथुन जय हि साहित्य करी जपोनि धर्माचें.' –मोशल्य २.१४. 'अडल्याचें साहित्य करावें' –सिंब ५१. ४ (सांकेतिक) तेल (विशेष प्रसंगीं, प्रभातसमयीं इ०). ५ अलंकारशास्त्र; अलंकार. ज्ञा १.६. ६ काव्य, नाटय, कथा, लालित्य यांचा समावेश असलेली वाङ्मयशाखा. 'साहित्याचिया खेडकुलिया.' –शिशु २६. –एभा १.१०१.७ (व्यापक) वाङ्मय; सारस्वत. [सं.] **०पत्र**–न. मदतीची शिफारस करणारें पत्र, दाखला. नव्या अंमलदाराच्या मदतीसाठीं अशीं पत्रें देत. –भाअ १८२२. 'मारवाडी भीमसिंग आणखी बहुत छोटे मोठे सरदार यांस साहित्य पत्रें दिलीं.' –भाब १४. **०शास्त्र**–न. काव्य, नाटय इ०तील अलंकारलक्षणें, गुण, दोष, पद्धति, वगैरे विवेचिणारें शास्त्र; अलंकारशास्त्र; भाषासौंदर्यशास्त्र. **०संमेलन**–न. साहित्यिक चर्चा, ठराव इ० साठीं भरणारा साहित्यिकांचा मेळावा; वाङ्मयसभा; वाङ्मयपरिषद्. **०सहित्य**–न. साहित्य समुच्चयार्थी. [साहित्यद्वि.]

साहुकार, साहू—सावकार पहा.

साहें—न. साह्य; मदत. 'एक म्हणती उच्चिष्ट चांडाळी. साहें करवी.' –दा ८.१०.३५ [सं. साहाय्य] **साहेकरी**–वि. मदत करणारा. 'भक्त साहेकरी पांडुरंग.' –रामदासी २.६७. **साहेभूत**–साह्यभूत; उपयोगी. 'साहेभूत सर्वोपरी. साक्षपें होये.' –दा १४.१४.५.४०.

साहेब—पु. १ स्वामी; धनी; मालक. २ अधिकारी; वरिष्ठ. 'जैसा साहेब नमस्कारिजे. ओळखिल्या उपरि.' –दा ११.९.७. २ टोपीवाला; इंग्रज; युरोपियन. 'साहेबांचे तैं काळ.' –संग्रामगीतें १३०. ३ प्रतिष्ठाबोधक संज्ञा. महाराज, श्रीमंत या अर्थी. ४

(समासांत गौरवार्थी) नांव, हुद्दा, टोपणनांव इ० पुढें योजतात. उदा० पाटीलसाहेब, नानासाहेब, रावसाहेब इ० ५ स्त्रियांच्या प्रतिष्ठानामापुढें उपयोग. केव्हां केव्हां हा नपुंसक बहुवचनी होतो. उदा० 'बाईसाहेब आलीं, ताईसाहेब गेलीं.' ६ देवासहि भक्तिपूर्वक लावतात. उदा० जगदंबेस 'आईसाहेब' असें म्हणण्याची वहिवाट आहे. 'बंदे हुशार रहनाबे। साहेब राजी रखनाबे।' [अर. साहिब्] **०काम-चाकरी**-न. वरिष्ठांचें काम; स्वामिसेवा; सरकारी काम. 'साहेबकामांस नाहीं गेला। गृहींच सुखाडोनि बैसला।' -दा १२.१.५. **०किराण-न**-नपु. सुयोगाचा स्वामी; शुभग्रहांच्या युतीमुळें वैभवशाली. 'शहाजान साहेब किरान यार्णी बत्तीस वर्षे बादशहात करून उपरांत राहिले.' -वाडसनदा १४९. [अर. साहिब् किरान्] **०जादा**-पु. १ राजपुत्र. २ उमराव.' इकडे प्रभु वाजिराय तिकडे फत्तेसिंग साहेबजादा।' -अफळा ४६.'[फा. साहिब्+झादा] **०नौबत**-स्त्री. राजादिकांच्या स्वारींत पूर्वे हत्तीवर घालून चालविलेली नौबद, मोठा डंका. 'साहेबनौबत तुडुम् तुडुम् झडे।' अमृत -६४. **०मवसूप-फ**-साहेबमजकूर. 'येविशींचा सिद्धांत करुन सरकारास साहेब मवसुफ यांणीं दाखवला.' -इनाम १०९. [फा. साहिब+मौसुफ] **०मुलूख-क**-पु. खुरकीवरील मालक, राजा. 'आम्हांसी जो साहेब-मुलूख असेल तो दुश्मनी करूं शकत नाहीं.' -ऐटि १.६०. **०यख्तियार**-पु. अधिकारी. **०रियासत**-पु. राजा; राज्यकर्ता. 'दक्षणचे सर्व साहेबरियासत यांचा एक जाला.' -पया ४७३; -रा १९.१६. **०लोक**-पु.अव. इंग्रज; युरोपियन. **०सुभा**-पु. प्रांताधिप; सरसुभा. 'एकेक पदरचा सेवक साहेब सुभा।' -ऐपो ३०४. **०सेवा**-साहेबकाम पहा. 'ते साहेब सेवेंत घसरले।' -ऐपो २५०. **०हिम्मत**-वि. धैर्यवान्; साहसी. 'फत्ते-नसीब व साहेब-हिम्मत आहेत; करितां हरएक प्रकारें फिरंगियाचे फौजेस तंग करितील.' -चिरा १९. **साहेबी-स्त्री.** १ सत्ता; स्वामित्व. 'मुलखांत साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं.' -सभासद २४. २ मोठेपणा; सर्वोनीं साहेब म्हणावें असा प्राप्त झालेला अधिकार, दर्जा. -वि. १ साहेब, युरोपियन यासंबंधी (वेष, रीत, अधिकार इ०). २ द्राक्षाची एक जात ही लांबट व पांढरी असुन फळ फार मधुर असतें. **साहेबीण-स्त्री.** १ साहेबाची बायको; युरोपियन स्त्री; मडम. २ प्रतिष्ठित स्त्री; थोर कुलांतील स्त्री.

साहोत्रा—पु. १ दरमहा किंवा दरसाल शेंकडा सहा असा व्याजाचा दर. २ शंभरांत सहावा हिस्सा घेण्याचा मालकी हक्क (मालक, सरकारी नोकर इ०चा एखाद्या ठिकाणीं). ३ उत्पन्नाचा एकषष्ठांश. हा राजाचा असे. -गांगा ८. ४ चौथाईपैकीं पंतसचिवाचा हिस्सा. चौथ पहा. [सं. षष्ठ; -म. साहा+उत्तर]

साह्य—न. १ पाठिंबा; मदत; साहाय्य. २ संगत; मैत्री; ऐक्य; मिलाफ. [सं.] **०करणें**-(कायदा) उत्तेजन देणें; मदत करणें; संगनमत करून कांहीं एक गोष्ट करणें. (इं.) अबेटमेंट. **०भूत**-वि. मदतगार; उपयोगी पडणारा.

साह्यटें, साह्यरा-री-रेल—सायटें, सायरा इ० पहा.

साह्या—पु. साग; साया. [सं. शाखा; प्रा. साहा]

साळ—स्त्री. भात. देशावर साळ म्हणतात. 'कांडीतसे लंकेशाचें दळ। साळी ऐसें तेधवां।' -रावि २०.१८८.-ज्ञा १८.९५. [सं. शालि; प्रा. सालि] **साळवण-न.** भाताचा पेंढा. [सं. शालितृण] **साळीडाळी**-स्त्री. अव. मंगळागौर, महालक्ष्मी इ० च्या पूजेमध्यें सोळा सुगाच्या डाळिंब्या व सोळा तांदूळ हीं जीं वाहावीं लागतात तीं. [साळ+डाळ]

साळ—स्त्री. १ (प्र.) शाळा पहा. 'न जाय तो पुत्र कदापि साळे।' -सारुह २.९. २ सुतार, लोहार, कासार इ०च्या कामाचा कारखाना, ठिकाण; धंद्याचें स्थळ. 'मग काळिका झाली प्रसन्न। पुत्रासी देती झाली वरदान। तें आदि सांगेन। साळसूत्र।' -कालिकापुराण २८.५. ३ (समासांत) जागा; ठिकाण. उदा० घोडसाळ, टांकसाळ, इ०. 'गीतसाळ करी कुडी किन्नराची।' -भाए २२. [सं. शाला; प्रा. साल] **०घालणें-मांडणें**-शाळा काढणें.

साळ—साळी (विणकर) पहा. **०घालणें**-(रेशीम, सूत इ० कांची) जितकें लांब सणंग विणावयाचें असेल तितक्या अंतरावर खुंट्या मारून त्यांच्याभोंवतीं सूत गुंडाळून तितका लांब ताणा होई असें करणें. **०वट-टी,साळवी, साळाऊ**-वि. साळयांनीं विणलेलें. याच्या उलट कोष्टी, कोष्टाऊ. **०वाडा**-पु. विणकर लोक राहतात तो भाग.

साळ, साळई—स्त्री. साळ्; सायाळ. अंगावर लांब कांटेरी पिसें असणारें जनावर. [सं. शल्य] **साळजिवाद**-न. साळ पहा. **साळपीस**-न. साळ्ह जनावराचें पीस. **साळशीट-त-द**-न. १ साळपीस. २ साळ्. **साळशी**-स्त्री. साळ्. **साळिंदर, साळिंद्र-द्री-द्रें**-साळशीट पहा. **साळी-ळू**-स्त्री. सायाळ जनावर.

साळई—स्त्री. साळवणी (झाड) पहा. 'जेवों साळईच्या रुखा। साळईच बीज येखा।' -एभा ३.१२७. [सं. शाल;प्रा. साल]

साळकाई-माळकाई—स्त्री. (बहुधा अनेकवचनी प्रयोग) कोणी तरी फालतूक, सटरफटर बाई. निंदार्थी वापरतात. 'सगळा थाट त्या माईसाहेबांचा आणि त्यांनीं जमविलेल्या साळकाया माळकायांचा.' -पकोधे. [सं. श्यालिका+मालिका. म. साळी (का)+माळका] **साळकेगोळके**-पुअव. कोणी तरी माणसें; फालतू, अलबतेगलबते. [सं. श्यालक द्वि.] **साळकोजी**

माळकोजी-पु. १ वरील प्रमाणेंच अर्थ. २ गोमागणेश; कोणी बडा माणूस (निंदार्थी उपयोग). ' तूं मोठा साळकोजीमाळकोजी लागून गेलास, मला ठाऊक आहे. ' [सं. श्यालक+मालिका; म. साळकमाळका]

साळकें—न. (गो. सोनारी) कमळाच्या आकाराचा फुलासारखा दागिना. [सं. शालूक; गो. साळीक=कमळ]

साळखादें—न. एक प्रकारची गांधिल माशी.

साळढाळ—वि. १ साधा; सरळ; निगर्वी; मनमिळाऊ. २ प्रांजळ; मोकळा; खुल्या दिलाचा. ' सगळया आपल्या सरळ न साळढाळ. ' –खरादे ३८. ३ सौम्य प्रकृतीचा; विचारी. ४ कपट, कारस्थान न करणारा; सालस. ५ दुसऱ्याच्या दोषांकडे दुर्लक्ष करणारा; उदार मनाचा. ' या बरोबरच बारिकसारिक मतभेदाचें कांहीं कानेकोपरे असले तर त्यांकडे कानाडोळा करण्याला मनाची जी एक साळढाळ वृत्ति असावी लागते तीहि त्यांजपाशीं मोठीच आहे. ' –अस्पृ ३. ६ वरील वृत्तीच्या माणसाच्या वर्तन-व्यवहार-भाषण इ० ला लावतात. [सढळ ? धवल–ढाळ द्वि.]

साळढोकपणा—पु. दुर्लक्ष; उपेक्षा; चालढकल; ढिलाई. –केसरी १५.१.३७.

साळणी—स्त्री. छाटणी; कापणी; तासणी. –कृषि ७०२. [साल] **साळणें**-उक्रि. १ तासणें. २ साफ करणें; मऊ, गुळगुळीत करणें. ३ छाटणें; काटणें (फांद्या, झाडें). ४ सोलणें; साल काढणें. ' सेवावया आनंदनव्हाळी । प्रथम उसांची पानें साळीं । ' –एभा २८.२२२. [साल; हिं. छील, छालना] **साळींव**–वि. तासलेलें; छाटलेलें; सोललेलें.

साळमाळ—वि. अतिशय, विलक्षण लांब (इमारत, खोली, रस्ता इ०); लांबच्यालांब. [माळ द्वि.]

साळवणी—स्त्री. एक झाड. [सं. शालपर्णी]

साळसूद-ध—वि. १ साधा; निष्कपटी; प्रामाणिक. २ छक्केपंजे माहित नसलेला; सरळमार्गी. [सं. शालाशुद्ध] **साळसूदकी**-स्त्री. प्रामाणिकपणा; सरळपणा.

साळस्त्री—पु. पशुवैद्य; घोडाडाक्टर. साळोत्तरी पहा. [सं. शालिहोत्री]

साळा—पु. (प्र.) साला. बायकोचा भाऊ; श्यालक. [सं. श्यालक; प्रा. साल] **साळी**-स्त्री. बायकोची बहीण; मेहुणी. [सं. श्याली; प्रा. साली]

साळांक—वि. सालंकृत; अलंकारांनीं युक्त. ' तेथ कैवल्य साळांक झालें । नावेक वेऱ्हीं । ' –शिशु ७०७. [स+अलंकृत]

साळावळीस येणें—(गो.) हितकर होणें.

साळाभोळा—वि. सरळ; साधा; प्रामाणिक; छक्केपंजे माहीत नसलेला. साळसूद पहा. ' साळेभोळे जाले ते भक्तिस्तव ' –दावि ४१६. [भोळा द्वि. शाला+भोळा ?]

साळी—पु. विणकरजात व तींतील व्यक्ति. **म्ह**० साळयाची गाय माळयाचें वांसरूं=निरनिराळया ठिकाणांहून आणलेली सामुग्री **०माळी**-पुअ. समाजांतील खालच्या वर्गांना लावतात; सामान्य, उच्च दर्जाचे नसलेले लोक.

साळीक, साळुक—न. (गो. कु.) १ कमळ. २ कमळासारखा डोक्यांतील दागिना. [सं शालूक=कमलकंद]

साळुंकी-खी, साळोंकी-खी—स्त्री. मैनेप्रमाणें एक गाणारा पक्षी; साळू. [दे. प्रा. सालंकी] **साळू**–१ साळुंकीचें अल्प रूप. ' रावे साळया हंस मयूर । ' –ह १७.१६. २ (लावण्यांतून रूढ) प्रियकरीण; छबेली. ' खाशाची मी प्यार साळु भीतें तुझ्या काय बाला । ' –राला ७८.

साळू—स्त्री. सायाळ; साळ पहा.

साळेगोंधें-दें—न. सावळेगोंधळें पहा.

साळोंका-खा—स्त्री. शंकराच्या पिंडीखालचा दगड.शाळुंका पहा. 'स्वर्ग ज्याची साळोंका । समुद्रपाळी पिंड देखा ।'–ज्ञागा ४७.

साळोता, साळुती—पुस्त्री. (क. बे.) केरसुणी; झाडणी. सळाथी पहा. **साळोतणें**-(क.) झाडणें; केर लोटणें.

साळोत्तर, साळोत्र—न. (प्र.) शालिहोत्र; अश्ववैद्यक; घोडयाच्या रोग गुणदोषासंबंधीचें शास्त्र [सं.शालिहोत्र] **साळोत्तरी, साळोत्री**-पु. घोडाडाक्टर; पशुवैद्य. [सं. शालिहोत्री]

साळोरी—स्त्री. (गो.) साळुंकी पहा.

साळ्या—वि. तिळांचा एक प्रकार. हे साळेतील रबीच्या वेळीं होतात. याच्या उलट गोडेतीळ हें पावसाळी पीक आहे. [सं. शीतल]

साक्ष—पु. प्रत्यक्ष गोष्ट घडलेली पाहिली आहे असा इसम; साक्षीदार. –स्त्री. १ साक्षीदाराची जबानी; पुरावा. २ साक्षा पहा. **म्ह**० १ मनोमय साक्ष. २ उंदराला मांजर साक्ष. [स+अक्षि] **०घालणें**-(एखाद्या कागदाची) समक्ष पाहिल्याची हमी पटविणें; त्यासाठीं सही करणें. **०भोजन**–न. पंक्तीस इतर मंडळी आहेत असें भोजन; पंगत. ' साक्षभोजन पाहिजे वनांतरीं । ' –सप्र १५. **०मोज्या(इया)नें**-पुराव्यासह. **साक्षी**-पु. १ एखादा व्यवहार प्रत्यक्ष पाहणारा माणूस. ' होतो तयासि सुरनामक गुप्त साक्षी । ' –र ४४. २ (कायदा) साक्षीदार. एखादी गोष्ट पाहिली आहे, माहिती आहे असें सांगणारा; पुरावा देणारा; गवाह. ' वादी आपण होऊन त्यास साक्षी करीत नाहीं. ' –टि ४.१३०. –स्त्री. १ पुरावा; साक्ष (दस्तऐवज, व्यवहार, घडलेल्या गोष्टी इ० च्या खरेपणासंबंधी). कायद्यांत साक्षीचे दोन प्रकार सांगितले आहेत; कृतसाक्षी व अकृतसाक्षी. २ अनुभव; प्रत्यय. ' सर्वज्ञ म्हणोनि । वानिती पुराणीं । माझें अंतःकरणीं नये साक्षी । ' –गुच १.९७.

०घालणें–साक्ष घालणें. **०येणें**–अनुभवास येणें. 'तुका म्हणे साक्षी आले। तरी केलें प्रगट।' –तुगा ३६८७. **साक्षीदार**–पु. साक्ष; पुरावा देणारी व्यक्ति; गवाह; ग्वाही देणारा. **साक्षीभूत**–वि. साक्षीरूप; प्रत्ययास आणून देणारा. 'आणि गगना ऐसा साक्षिभूतु। तोही मीचि।' –ज्ञा ९.२८५. **साक्ष्य**–न. १ साक्ष, ग्वाही; पुरावा. २ साक्षीचें काम; साक्ष घालणें.

साक्षप-पी—साक्षेप-पी पहा. 'आळसी तेचि साक्षपी होती।' –दा १.१.३३.

साक्षर—वि. १ अक्षरओळख असलेला; लिहितां वाचतां येत असलेला; साधारण शिकलेला. २ (हिं.) सुशिक्षित; विद्वान्. ३ (थट्टेनें) ज्याला (सा) साहा अक्षरें–कांहीं येत नाहीं–फक्त माहिती आहेत असा; निरक्षर; अक्षरशून्य. [सं. स+अक्षर]

साक्षा—स्त्री. १ अनुभव; प्रचीति. २ प्रत्यक्ष प्रमाण. ३ साक्षात्कार (देव, मंत्र, प्रश्न, शकुन इ० चा) ४ साक्ष पहा. [साक्ष] **साक्षात्कार**–पु. १ प्रत्यक्षज्ञान; प्रतीति; अनुभव. –गीर ४०९. २ ब्रह्मात्मैक्य. ३ ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन (क्रि० होणें; दाखविणें). 'श्रवण मनन निजध्यास। धरितां साक्षात्कार होय सरस।' –शिली १.७०. ४ स्वतः प्रचीति घेणें, खरेपणा पाहणें, घेणें, दाखविणें (क्रि० करणें, करून पाहणें). [सं.] **साक्षात्कारी**–वि. ईश्वरदर्शनाचा लाभ होत असलेला; साक्षात्कार अनुभवणारा.

साक्षात्—शअ. समोर, पुढें; प्रत्यक्ष. क्रिवि. १ धडधडीत; उघडपणें; स्पष्टपणें. २ स्वतः; स्वांगें; जातीनिशीं. 'दुसऱ्या कोणास पाठवूं नका. तुम्ही साक्षात् जाऊन पहा.' –वि.क्रिवि. १ मूर्तिमंत; प्रत्यक्ष. 'ब्राह्मण साक्षात् सूर्य आहे.' २ (शाप.) अपरोक्ष; प्रत्यक्ष; सरळ. 'क्लोरिनचें आल्डिहाइडावर साक्षात कार्य घडलें म्हणजे...' –सेंपू २.१२. [सं.] **०कृत**–वि. १ स्वतः अनुभवलेलें, पाहिलेलें. २ स्वतः जातिनिशीं केलेला (ग्रंथ इ०). 'हा ग्रंथ त्याचा साक्षात्कृत आहे.' **०द्रष्टा**–वि. समक्ष पाहिलेला. **०संबंध**–पु. १ प्रत्यक्ष, वैयक्तिक संबंध. २ शरीरसंबंधाचें किंवा आप्तपणाचें नातें. ३ प्रत्यक्ष संयोग, भेट, दळणवळण.

साक्षिणी एकादशी—स्त्री. कार्तिक वद्य एकादशी. ही केली असतां वर्षातील सर्व एकादशा केल्याचें पुण्य मिळतें.

साक्षेप—पु. १ नेट; चिकाटीचा उद्योग; निष्ठापूर्वक कार्य. (क्रि० करणें; धरणें) 'नित्य नवा हव्यास धरावा। साक्षेप अत्यंतच करावा।' –दा ४.२.५. २ आस्था; अगत्य; अतिशय आवड, व्यासंग, तुला पुस्तकांचा साक्षेप आहे.' 'तुझ्या भावाला पैक्याचा सा० आहे.' ३ मनाचा तीव्र कल; बळकट निष्ठा; मनाचा निश्चय, निर्धार. 'हा साक्षेपानें संध्याकाळचे वेळेस निजतो.' 'कोणाला चोरी करण्याचा साक्षेप तर कोणाला शिंदळकीचा साक्षेप फळ सारखेंच.' ४ आग्रह; अगत्य. 'कथेस साक्षेपें पाचारिलें जरी। म्हणे माझ्या घरीं कोणी नाहीं।' –तुग २४५४. ५ दीर्घोद्योग; मोठी खटपट. –एभा ९.३७५; –दा ५.९.५४. 'साक्षेपेंविण केवळ। वृथा पुष्ट।' –दा ११.१०. २०. [सं. स+आक्षेप] **साक्षेपी**–वि. १ काम, अभ्यास, शोध यांत सारखा गढलेला; तन्मय. २ निश्चयानें चिकाटीनें मागें लागलेला, लक्ष घालणारा. ३ आग्रही, निर्धाराचा स्वभाव असणारा. ४ दीर्घोद्योगी; प्रयत्नवादी. **साक्षेप, साक्षेपानें साक्षेपें**–क्रि.वि. १ मुद्दाम; जाणुन बुजून. –ज्ञा १८.१६५३. 'कीं कल्पतरू शोधित आला घर। दरिद्रियाचें साक्षेपें।' –रावि. २ यत्नानें; कष्टानें. –ज्ञा १७.२४९. 'श्रीकृष्णमूर्तीच्या साक्षेपें भार उतरेल धरेचा।' –मुसभा १७.३०. **साक्षेप-पी**–साक्षेप-पी पहा.

साक्ष—वि. शास्त्रोक्त; वेदोक्त. 'अर्जुना एवं यज्ञु। सर्वत्र जाण साक्षु।' –माझा १६.९९. [स+आज्ञा]

सिआरें—न. (प्र.) शहारें पहा. 'तंवं भेडां आलीं सिआरीं।' –शिशु ९५१.

सिक—स्त्री. १ शिक्षण; शिकवण. २ शिक्षा. –एभा २४. २४३. 'आतां तुज सिक लाविन.' –पंच ३०. [सं. शिक्ष्; प्रा. सिक्ख]

सिंक—स्त्री. (प्रा.) शिंक पहा. (क्रि० येणें; जाणें).

सिकंजा—पु. १ दाबाचें यंत्र; चाप; सुतार सांधा जोडतांना लांकडें आंवळून धरतात तें यंत्र. २ (ल.) पेंच; संकट. 'लढाईचे सिकंजात संकटांत पडावें हें मुतसीब नाहीं.' –पैअ ६५. [फा. शिकन्जा]

सिकंजी—स्त्री. लिंबू मध किंवा गुलकंद यांपासून तयार केलेलें थंडाईचें पेय. [अर. सिकंजबी]

सिकता—स्त्री. १ वाळू; रेती. –एभा २७.१०१. 'फुटतां सागर सिकता–सेतूचें काय त्यापुढें चाले।' –मोसंशय. २ मुतखडा. [सं.] **०तेल**–न. (वाळूचें तेल) (ल.) अशक्य गोष्ट; खपुष्प पहा. **०मेह**–पु. १ लघवींतून रेती जाणें. २ अशा तऱ्हेची लघवी. एक प्रकारचा रोग.

सिकंदर—पु. (प्र.) शिकंदर पहा. [अर. अस्कंगर; फा. सिकंदर; इं. अलेक्झांडर]

सिकंदा—वि. हैराण; त्रस्त; उध्वस्त. 'ऐसे चार घटिका युद्ध बहुत उत्तम होऊन रजपूत सिकंदे करून थंडे केले.' –रा ६.६४८. [फा. सिकज्जा]

सिकम—न. पोट (प्र.) शिकम पहा. [फा. शिकम्]

सिकरण-णी, सिंकारणें—शिकरण, शिंकरणें पहा.

सिकल—वि. पुढील उजवा पाय व मागील डावा पाय पांढरा असलेला (घोडा). असा घोडा वाईट समजतात. –अश्वप १.१०४.

सिकल—स्त्री. साफ, स्वच्छ करणें; झिलई देणें; पाजळणें (हत्यारें, शस्त्रें). [अर. सैकल्] **०कर–गर–गार**–पु हत्यारें साफसूफ करणारा; त्यांना उजळून धार लावणारा; शिकलगार.

सिकवण–वणी–विणें, सिकवासिकव, सिकस्त, सिका, सिकाऊ, सिकार, सिकारणी–णें, सिकाळी, सिकील सिकें, सिकेकाई—इ. शब्द 'शि' नें आरंभ होणाऱ्या शब्दांत पहा.

सिकस्त—वि. पराभूत. शिकस्त पहा. 'त्यास सिकस्त करून बरेवजेन गोटांत घातला.' –इमं २७३.

सिका—पु. शिक्का पहा. **सिकाबंद**–पु. शिक्का केलेलें. 'ऐसें खत रायें सिकाबंद दिधलें.' –मब ३६.

सिकायत—स्त्री. (माळवी) तक्रार; फिर्याद. 'त्यांना घालवून द्या, नाहींतर बडेसाहेबांकडे सिकायत करूं.' –विक्षिप्त ३.१७०. [अर. शिकायत्]

सिकारा—पु. एक मडकें. –मसाप २.२.६३. [फा. सुकार]

सिकाल—वि. कपाळावर दोन अंगुळाएवढा रुंद व लांबट पट्टा असलेला (घोडा). हें शुभ लक्षण आहे. –अश्वप १.१०५.

सिकेकाई—स्त्री. (प्र.) शिकेकाई पहा.

सिक्कल–कर–गर–गार—सिकल, सिकलकर पहा.

सिक्का, सिक्केकटार–दौत–बरदार—शिक्का इ० पहा.

सिक्त—वि. शिंपडलेलें; सेचन केलेलें. [सं.]

सिक्थ—न. (शाप.) मेण. (इं.) सेअर, सेरीन. [सं.] **सिक्थिक–न**–वि. मेणाचा; सेरीनचा. उदा० सिक्थिकाम्ल, सिक्थिनाम्ल.

सिखर, सिखरमणी, सिखवणी–विणें, सिंगरट, सिंगरवट, सिंगरूं, सिंगा, सिंगाडा, सिंगी—शि नें आरंभ होणाऱ्या शब्दांत पहा.

सिग—स्त्री. शीग पहा. १ टोंक; अग्रभाग. 'वाफेचिया सिगे। वाती ही लाविल्या लागे।' –ज्ञा १७.१४२. २ मर्यादा; अवधि. 'तुझे आयुष्याची भरली सिग।' –रावि २५.५४. ३ कळस; शिखर. 'सकळ साधनांचें फळ। ज्ञानाची सिगचि केवळ।' –दा ५.६.३०. **(माप) सिगेला येणें–लागणें**–(ल.) शेवटची मर्यादा गांठणें; कळस होणें. 'तुका म्हणे सिगे भरूं आलें माप। वियोग संताप झाला तुझा।' –तुगा १५४५. 'त्रिभुवनीचें तेज एकवटलें। बरवेपण सिगेसि आलें।' –ब्यं ६६.

सिंगन—पु. घोड्याच्या अंगावरील एक भोंवरा. हे दोन्ही कानांच्या आंत असल्यास वाईट. –अश्वप १.१०२.

सिंगरो—पु. (गो. कु.) कारवारच्या बाजूला रानांत आढळणारी पिंगट रंगाची मोठी खार.

सिंगसिंगोटी—(प्र.) शिंगशिंगोटी पहा. –वाडबाबा १.३.

सिंगळद्वीप—न. सिंहलद्वीप (अप.); लंका.

सिंगा—स्त्री. (गो.) मांस भाजण्याची काठी.

सिंगाडा—पु. बंदुकीची दारू ठेवण्याचें शिंगासारखें भांडें; शिंगाडा पहा. –वाडबाबा १.१६७.

सिंग्रुर—न. (गो.) पदार्थ भाजण्याचें चाळणीसारखें भांडें.

सिंघ–ग—पु सिंह. शक ८१० मधील एका राष्ट्रकूट-ताम्रपटांत हें रूप आढळतें. शीख, रजपूत यांसारख्या लोकांत नांवापुढें सिंग जोडण्याचा प्रघात आहे. उदा० गोविंदसिंग, जयसिंग इ०. [सं. सिंह; प्रा. सिंघ]

सिंचक—न. सिंचन; शिंपडणें. 'चंदनोदकाच्या सिंचका। मार्ग धूळीतें शमविलें।' –जै ९१ ६९. [सं.] **सिंचणें**–उक्रि. शिंपडणें; लहान थेंबांनीं भिजविणें; शिंपणें पहा. 'दया-सिंधु तुम्हां भांडवल दया। सिंचावें आतां या कृपामृतें।' –तुगा १०९४. [सं. सिंचन] **सिंचन**–न. शिंपण्याची क्रिया; वर्षाव. 'जैसें मूळ सिंचनें सहजें। शाखा पल्लव संतोषती।' –ज्ञा १.२५. [सं.] **सिंचवणी**–न. शिंपडण्याचें पाणी, पदार्थ. 'घालूनी लोळणी पडलों अंगणीं। सिंचा सिंचवणी तीर्थ वरी।' –तुगा २०१८. [सिंचणें+पाणी] **सिंचित**–वि. शिंपलेलें; सिंचनयुक्त.

सिंज(झ)णें—शिजणें पहा. 'एऱ्हीं तोचि अग्नि संगें सिजे। तरी वेगळा होय।' –ज्ञा ७.६५.

सिंजा—स्त्री. तोरड्या, पैंजण इ० चा ध्वनि; नूपुरांचा आवाज. 'सिंजारवें व्याकुळ सौध झालें।' –सारुह ७.५९. [सं. सिंजा]

सिंजील—स्त्री. दाखला; (दप्तरीं) नोंद. 'तेच मुदतीचे विजापूरचे काजीची सिंजील आहे.' –गोइसा २३. [अर. शिजिल्]

सिंडी–ढी—स्त्री. १ (प्र.) शिडी पहा. २ (खडकांत केलेल्या) पायऱ्या. 'सिंडी दारीं आडसे।' –दावि २४४.

सिंण—पु. (प्र.) शीण पहा. 'हें असो सिंणु नुसधा। दृष्टादृष्टीं तो।' –ज्ञा १७.४२२.

सिणगार, सिणगा(घा)रणें—शृंगार, शृंगारणें पहा. 'जेवि विधवेचा सिणगार।' –दावि ४६७. 'शिणघारुनि गौरी-हरें।' –वेसीस्व ८.९४.

सित-त्त–वि. ६; सहा. [अर. सित्त] **सितैन**–वि. साठ. [अर.]

सित—न. प्रत्यंचा; धनुष्याची दोरी; शीत. सीत पहा. –अमृ ६.२५. 'सित चढऊनि ते क्षणीं। शर लाविला तत्काळ।' –वेसीस्व १४.१३४. [वे. प्रा. सित्थ]

सित—वि. शुभ्र; पांढरें; श्वेत. 'सित-कृष्ण तोय भासे अद्यापी पावली जियें गंगा।' –नरहरिकृत गंगारत्नमाला. [सं.]

०धातु–पु. खडू **सितोपल**–पु. १ स्फटिक. २ खडीसाखर. [सं. सित+उपल] **सितोपलादि चूर्ण**–न. खडीसाखर (१६ तोळे), वंशलोचन (८), वेलची (२), दालचिनी (१), यांचें केलेलें चूर्ण. हें हाडीताप, अरुचि इ०वर उपयोगी आहे.

सितकण—पु.न. (प्र.) शितकण पहा.

सितडणें, सितंडा, सितडी, सितवड—शितडणें इ० पहा.

सितणें—क्रि. (व.) शिवणें; स्पर्श करणें.

सितर—पु. ठक; भूल. 'पडिला शाहाणिया सितर।' –मुआदि ७.८१. **सितरणें**–अक्रि. फसविणें; ठकविणें. सीतरणें पहा. 'दुर्वासा ऐसा जाण। त्यासी क्षणाक्षणा सितरी मन।' –एभा ११.९७८; –ज्ञा १४.३४२. **सितरूं**–वि. फसव्या; ठक. 'शठ शुंभ कातरु। लंड तुर्मुंड सितरू।' –दा २.३.२९.

सिताड—न. (विणकाम) फर्णीत असलेल्या वशारण्याचे फिरके धरणारी कामटी.

सिताफळ-ळी—(प्र.) सीताफळ पहा.

सिताब-बी—शिताब-बी पहा.

सितार—स्त्री. (हिं.) सतार पहा. [फा.]

सितारा—पु. १ तारा. –ऐटि १.४४. २ दैव; नशीब. [फा.]

सितासवाती—स्त्री. (व.) चित्रा आणि स्वाती नक्षत्रें. (शेतकरी लोकांत रूढ). 'सितासवातीच्या पाण्यानें बहार केली.' [चित्रा+स्वाती अप.]

सिती—स्त्री. (एकविटी) अरुंद भित, पडदी.

सितोडा—पु. १ थेंब; कण (पाणी, पाऊस, वर्षाव इ० चा). (क्रि० उडणें). २ वृष्टि; शिंपणी. [सिंचणें+सडा] **सितोडणें**–अक्रि. सितोडे पडणें; तुषार येणें (पावसाचे).

सिद, सिदळ, सिदा—शिद, शिंदळ, शिदा इ० पहा.

सिदणें—उक्रि. छेदणें; कापणें. 'देहही सिदतां तया। काय खेदु होईल।' –ज्ञा १८.६४३. [सं. छिद्]

सिंदूर, सिंधूर—पु.न. शेंदूर पहा. 'झळकत सिंदुराचा टिळक।' –भूपाळी. 'विस्तीर्ण मस्तकीं उदंड। सिंधूर चर्चिला।' –दा १.२.१०. [सं.]

सिंदुवारु—न. (प्र.) सिंधुवार; निर्गुंडी. 'मोतियांचे आकारू। तैसे फुललें सिंदुवारू।' –शिशु २९५.

सिंदेशाई—शिंदेशाई पहा. **सिंदोरी**–स्त्री. शिंदोरी पहा. 'जैसी पंथीची सिंदोरी।' –विपू ७ ६८. –सारुह १.८०.

सिद्दी-द्धी—पु. हबशी; शामल. आफ्रिकेंतील एक जात. [अबिसीनियन]

सिद्ध—पु. १ ईश्वरप्रेरित ग्रंथकार, लेखक. उदा० व्यास. २ भूत-भविष्य-वर्तमानाचें ज्ञान असलेला; द्रष्टा; साधु. ३ अणिमादि सिद्धी प्राप्त झालेला; योगी. ४ मुक्त पुरुष. –दा ५.१०.१०. ५ एक उपदेवांचा वर्ग व त्यांतील व्यक्ति. 'येर सुरसिद्ध किन्नर।' –ज्ञा ११.५०.६. ६ (ज्यो.) एकविसावा योग. [सं.] –वि. १ संपविलेलें; पुरें केलेलें. २ स्थापित केलेलें; सत्य म्हणून दाखवून दिलेलें; पुराव्यानें खरें केलेलें; प्रस्थापित. ३ निकाल केलेलें; तोडलेलें (भांडण, खटला). ४ बनविलेला; तयार केलेला; रचलेला (नियम, घटना, कायदा). ५ पकविलेलें; शिजविलेलें. (अन्न). 'जैसी सिद्धसाध्य भोजनीं। तृप्ती एकी।' –ज्ञा ३.३८. ६ घेण्याजोगें; तयार केलेलें (घोटून, द्रव्यें मिसळून–औषध). ७ तयार ठेवलेला, असलेला (कामास योजावयाचा माणूस, जनावर इ०); मुद्दाम खोळंबलेला, वाट पहात असलेला; राखून ठेवलेला; सज्ज; तयार. ८ कुशल; निष्णात. ९ शाबूत; धडधाकट 'जंव हें सकळ सिद्ध आहे। हात चालावया पाय।' –तुगा ७२९. १० प्रत्यक्ष; मूर्तिमंत 'जरी प्रकटे सिद्ध सरस्वती। तरी मुका आथी भारती।' –ज्ञा १.७८. ११ अकृत्रिम; सहज असणारा. 'नित्यसिद्ध परमशुद्ध माझें स्वरुप शुद्ध जाणती।' –एभा ११.११२७. १२ पूर्णावस्था प्राप्त झालेले. 'वांचोनि कर्मारंभ उचित। न करितांचि कां सिद्धवत। –ज्ञा ३.४५. १३ (व्या.) गुणधर्मयुक्त; मूर्त. याच्या उलट साधित=अमूर्त. १४ (भाषा.) मूळ; अव्युत्पन्न (शब्द). याच्या उलट साधित शब्द. (समासांत) (सिद्ध शब्द उत्तरपदीं असतांना)–अनुभव–उपाधि–ओषधी–क्रिया–न्याय–लोक–व्याकरण–स्वभाव–सिद्ध. ऊन प्रत्ययांत धातुसाधितांपुढें नेहेमीं हा शब्द येतो. उदा० करून–भोगून–शिकून सिद्ध. (वाप्र.) **सर्वसिद्ध आणि चुलीस पोतेरें**–तयारी होण्याच्या फार आधीं तयारी झाल्याचें सांगणाराबद्दल वापरतात. **०तत्त्व**–न. ब्रह्म. **०ता**–स्त्री. तयारी; सर्व सिद्ध असणें. **०पादुका**–स्त्रीअव. ज्या पायांत घातल्यानें वाटेल तिकडे जाण्याची शक्ति प्राप्त होते अशा पादुका. 'करवीर क्षेत्रीं दत्तात्रयें सिद्धपादुका।' –सप्र ३.२०. **०पुरुष**–पु. १ अणिमादि सिद्धी प्राप्त झालेला; योगी; मांत्रिक. २ ब्रह्मस्वरूपीं विलीन झालेला. **०प्रज्ञा**–स्त्री. पूर्वजन्मांतली या जन्मीं मिळणारी बुद्धि. 'तिये सिद्धप्रज्ञेचेनि

लाभे। मनचि सारस्वतातें दुभे।' –ज्ञा ६.४५४. **०मौळी**–वि. श्रेष्ठ सिद्ध पुरुष. 'जयजयाजी सिद्धमौळी।' –गुच २०.२. [सिद्ध+मौलि] **०योग**–पु. बाळहिरडे आणि जिरें यांचें चूर्ण. हें अतिसारांत तांदुळाच्या धुवणांतून घेतात. –योर १.४१५. **०रस**–पु. १ अमृत. 'कुंकुमाचें भरींव। सिद्धरसाचें वोतींव।' –ज्ञा ६.२५५. २ पारा. **०लाडू**–पु. संकष्टी चतुर्थीस कणकेच्या उकडीचे केलेले लाडू; मुटकुळीं. –ह ८.१६. **०वट**–पु. कामना पूर्ण करणारा वड. 'त्या सिद्धवटा सावित्री संपूर्ण। सीता देखून नवस करी।' **०वत्**–क्रिवि. सिद्ध झाल्याप्रमाणें; गृहीत धरून. 'एका विषयाचा वाद पडल्यास इतर विषय सिद्धवत् ध्यावे लागतात.' –वि. (शाप.) गृहीत; खरें मानून चालेलें. 'सिद्धवत् पदें.' (इं.) पॉस्च्युलेट्स. [सं.] **०साधक**–पु.अव. एकाच कपटकारस्थानांतील मंडळी. आपलें ऐक्य बाहेर समजूं न देतां, संगनमतानें दुसऱ्याला फसविण्यासाठी एकमेकांचा पुरस्कार करणारे (एकानें सिद्ध पुरुष बनावयाचें व दुसऱ्यानें त्याचें स्तोम माजवावयाचें) [सिद्ध+साधक] **०साधन**–न. १ सिद्धीचे अद्भुत चमत्कार दाखविणें; जादू; किमया. २ सिद्ध असलेली वस्तु पुन्हां सिद्ध करण्यास लागणें. तर्कशास्त्रांत हा एक दोष मानला जातो. 'तूं चोर आहेस असें चोरालाच म्हटलें असतां सिद्धसाधन दोष होतो.' **०स्थाली**–स्त्री. पाहिजे तें अन्न पाहिजे तेव्हां विपुल निघावें अशी (कोणी सिद्ध पुरुषानें दिलेली) थाळी, पात्र. **सिद्धणें**–क्रि. १ सिद्ध करणें. 'तुलदाइयां बैलां सिद्धवै।' –पाटणशिलालेख शके ११२८. २ सिद्धीस जाणें 'मोक्षमूल कृपाजीवन। जेणें सिद्धे।' –ज्ञाप्र ६१. **सिध्दाई**–स्त्री. १ चमत्कार; सिद्धसाधन. २ दैवी शक्ति प्राप्त होणें. सिद्धि पहा. **सिद्धानुवाद**–पु. सिद्ध गोष्टीचें वर्णन 'तरी सिद्धानुवाद लाहों। आवडी करुं।' –अमृ १०.१२. [सिद्ध+अनुवाद] **सिद्धान्न**–न शिजणें, इ० संस्कारानें सिद्ध झालेलें अन्न; तयार, खाण्यालायक अन्न [सिद्ध+अन्न] **सिद्धार्थ** –वि. १ ज्याचा उद्देश, मनोरथ सिद्धीस गेला आहे असा. २ गौतमबुद्ध [सिद्ध+अर्थ] **सिध्दार्थी**–पु. त्रेपन्नावा संवत्सर. **सिध्दावस्था**–स्त्री. जीवन्मुक्तावस्था; ब्राह्मीस्थिति. –गीर ३६७. [सिद्ध+अवस्था] **सिध्दाश्रम**–पु. १ सिद्धावस्थेस पोंचलेल्या मुनीचा आश्रम. 'जावें सिद्धाश्रमातें।' –रावि ७.१०. २ हिमालयांतील नरनारायणाश्रम. 'सिद्धाश्रमासि पावे विश्व जया सिद्ध सादना गाते।' –मो उद्योग ८.२७. [सिद्ध+आश्रम] **सिध्दासन**–न योगासनाचा एक प्रकार. कामवासना नाहींशी करण्याला याचा उपयोग होतो. –संयोग ३२३. [सिद्ध+आसन] **सिद्धि**–स्त्री. १ दैवी शक्ति; अणिमा इ० अष्टमहासिद्धी. 'देखें विषय हे तैसे। पावती सिद्धि चेनि मिषें।' –ज्ञा २.३१३. २ आश्चर्यकारक, अपूर्व सामर्थ्य, कौशल्य ३ तपश्चर्येचें किंवा देवता भक्तीचें फल. ४ परिपूर्णता; समाप्ति; संपादन; उद्दिष्ट साध्य होणें. 'तें मनोरथ संगें नव्हे। एऱ्हवीं सिद्धि गेलेंचि आहे।' –ज्ञा १३.१३३. ५ पुराव्यानें स्थापना, संस्थिति; प्रस्थापित होणें (मुद्दा, बाजू, आरोप इ०). शाबिती. 'अंतःकरणही अनादि। प्रवाहरूपें त्याची सिद्धी।' –एभा १३.२४५. ६ निर्णय; निकाल; तडजोड (भांडण, खटलें इ० ची). ७ घटना; बनावणी; मांडणी (कायदा, नियम, इ० ची). ८ सिद्धता; तयारी; (अन्न, औषध इ०ची) ९ सज्ज असणें (बदली किंवा इतर काम करण्यास माणूस, जनावर इ०). १० कौशल्य; नैपुण्य; वाकबकारी (योगसामर्थ्य, किमया इ०त). ११ मुक्ति; ब्रह्मस्थिति; निर्वाण. 'तैसें न होणें निपजे। तें नैष्कर्म्य सिद्ध जाणिजे। सर्व सिद्धींत सहजें। परम हेंचि।' –ज्ञा १८.९८०. १२ यश; विजय, उत्कर्ष. १३ सामग्री; साहित्य. 'घरीं त्याच्या आहे सर्व सिद्धी।' –रामदासी २.११८.१२ [सं.] **सिद्धीस-आणणें-नेणें**–पुरें करणें; तडीस नेणें; यशस्वी रीतीनें पुरें होणें, तडीस जाणें. **०स्थान**–न. मूळ ठिकाण.

सिध्दांत—पु. १ प्रमाणानुरोधानें ठरलेला निर्णय; विचार–संशोधनादिकांचें फल २ प्रतिपादित तत्त्व; प्रस्थापित सत्य. ३ तत्त्वांचें कथन; परमतत्त्व. 'जे वदे शास्त्राचें सार। सिद्धांत धादांत विचार।' –दा ५.६.२७. ४ निश्चय; निर्णय. 'अखेरीस त्याच्या मनांत सिद्धांत होऊन तो म्हणाला...' –मराठी ६ वें पु.(१८७५) १८६. ५ नियम; प्रमेय; सारणी. (इं.) थिअरम्. ६ ज्योतिषग्रंथ. उदा० सूर्यसिद्धांत. ७ (ल) पक्की, वज्रलेप, गोष्ट. [सं.] **०मार्ग**-पु. गुरुभक्तिमार्ग. –दा ४.१.९. **सिध्दांतित**–वि. सिद्धांत म्हणून निश्चित केलेला, प्रस्थापित. **सिध्दांती**–वि. १ सिद्धांत ग्रंथ पढलेला. २ प्रयोग करून पाहणारा; सिद्धांत ठरविणारा. ३ कोणतेंहि सत्य, तत्त्व वगैरे प्रस्थापित करणारा.

सिंद्रक—पु. (रसायन) ज्यापासून साखर तयार होते असा एक रासायनिक पदार्थ. (इं.) डेक्स्ट्रिन. –राको ५१७.

सिंध—सिंधु पहा. **०भैरवी**–स्त्री. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण–संपूर्ण. वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर, सार्वकालिकहि आहे. अवरोहांत कोमल ऋषभ घेतात.

सिधा, सिधापाणी–सामुग्री इ०—शिधा इ० पहा.

सिधावा—पु. सिद्धता; तयारी. 'भक्तांचा करिसी सिधावा।' –मुआदि ४८.३९. [सं. सिद्ध]

सिंधु—पु. समुद्र; उदधि. 'पै सरितेचेनि ओघें। सिंधुजळा मीनलें घोघें।' –ज्ञा ८.८४. २ एक मोठी नदी. ही पंजाबांतून वाहात येऊन अरबीसमुद्राला मिळते. ३ या नदीकांठचा एक

प्रदेश; सिंध. ४ हत्तीच्या गंडस्थळांतून वाहाणारा मद. ५ (रसायन) एक धातु. (इं.) सोडियम. -स्त्री. (सामा.) नदी. [सं.] ०क-वि. १ समुद्रांत उत्पन्न झालेलें; सामुद्रिक. २ सिंधुदेशचें; सिंधप्रांतांत उत्पन्न झालेलें. ०कफ-पु. समुद्रफेस; समुद्रमाणकी. [सं.] ०दार्वित-न (शाप.) सोडियम ॲसिटेट. ०दुर्ग-पु. १ समुद्रांतील किल्ला; जंजिरा. 'नाना सिंधुदुर्गी शिष्य केले.' -सप्र १२.३. २ मालवणचा समुद्रांतील किल्ला. ०नद-पु. एक महानद; सिंधु. ०पुष्प-नपु. शंख [सं] ०लवण-न. सेंदेलोण; खाणींतील मीठ.

सिंधुर—पु. हत्ती. [सं.]

सिंधूरा—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत गांधार व निषाद वर्ज. जाति औडव-संपूर्ण. वादी षड्ज. संवादी पंचम. गानसमय सार्वकालिक.

सिधोट—वि. सरळ; साधा. 'तुम्ही सिधोट.' -ख११२८. [हिं. सीधा, सिधावट]

सिधोरी—स्त्री. (प्र.) शिधोरी पहा.

सिनगार—पु. (प्र.) शृंगार पहा. 'नारीनें करून सिनगार, भुलविले यार।' -लावणी.

सिनसाळ—वि. १ जीर्ण, छिन्न साल असलेला. २ क्षणिक; भासमात्र. 'भंवईची पडळें। वोमथर्ती शिनसाळें।' -ज्ञा १३.५६०;१५.१४०. [सं. शीर्ण;प्रा. सिन्न+साल]

सिनळ—वि. (प्र.) शिंदळ पहा. **सिनळ-ळु**-पु: जार; यार. 'जें तुझा सिनळु तुझी वाट पाहातुसे।' -पंच ३०. **सिनळी**-स्त्री. जारिणी. 'रांडे सिनळि, केउति जाति होतिस?' -पंच ३०.

सि(सी)ना(ने)जोरी—स्त्री. १ छातीचें बळ; धाडस; उरोबल. -राज्य ८.२९. २ पराकाष्ठेचें बल; बळजबरी. 'दरवाजियास कुराडी लावून सीनेजोरीने किल्ला घ्यावा.' -पेद १०.५५. ३ सामर्थ्य; प्रताप. 'रैयत सुखामधीं ठेविली बाळाजीपंतानें छत्रपतिच्या सिनाजोरें.' -गापो ९५. [फा. सीना=हृदय+जोरी]

सिनानें—वि. भिन्न; निराळा. 'म्हणोनि भूतेश भवानी। वंदिली न करूनि सिनानी।' -अमृ १.६०; -ज्ञा ६.३९. [सं. छिन्न ?]

सिनार—पु. १ वेगवेगळेपणा; भिन्नत्व. 'अगा पूर्वापर सागर। या नामासीचि सिनार। येर आघवें तें नीर। एक जैसें।' -ज्ञा १८.१५८८. २ (कों.) वेगळा सांठा, संचय; गुप्तसंग्रह 'ऐके देखे परि सिनार। न सोडी पै।' -सिसं ४९. [सं. छिन्न ?]

सिनाल—स्त्री. (गो.) खूण. [इं. सिग्नल; पोर्तु. सिनाल] ०करप-क्रि. खूण करणें. ०जावप-अर्धांगवायूचा झटका बसणें.

सिनीवाली—स्त्री. अमावास्या (विशेषतः चतुर्दशीयुक्त). 'जैसें सिनीवालीचें निशिथ।' -रंयो १.३७५. [सं.]

सिनें—वि. वेगळें; भिन्न. सिनान पहा. 'मग काजळा आणि मसी। न दिसे विवंचना जैसी। तेवीं श्रद्धा तामसी। सिनीनाहीं।' -ज्ञा १७ ७०. [सं. छिन्न; सु+अन्य ?]

सिनेदराजी—स्त्री. छाती; पराक्रम. -पेद १०.५५. [फा. सीना=छाती+अर. दरज=दर्जा ?]

सिनेमा, सिनेमाटोग्राफ—पु. चलच्चित्रपट. हालत्या चित्रांचा खेळ, नाटक. [इं.]

सिंप-सिंपला—शिंप पहा. 'दुग्ध कपिलेचें सिंपीभर पिसी।' -मध्व २५.

सिंपडणें, सिंपणें—शिंपडणें, शिंपणें पहा. 'जे द्वैत दोष्र-संगें। सिंपेचिना।' -ज्ञा ४.१५१.

सिपर—स्त्री. ढाल. [फा.] ०**समशेर**-स्त्री. ढाल तलवार. 'त्यास चार हजार जमावांत कूल सिपर-समशेर असे लोक आहेत, करोल बिलकूल नाहींत.' -रा ७.१२८.

सिपलक—पु घोडयाच्या अंगावरील एक भोंवरा. हा एका कुशीवर असल्यास वाईट, दोन्हीवर असल्यास उत्तम. -अश्वप १.१०२.

सिपाई, सिपाईगिरी-प्यादा-राणा—शिपाई इ० पहा.

सिपारशी, सिपारस—शिपारशी-रस पहा.

सिंपी—शिंपी पहा. 'करीं करी रत्नजडीत सिंपी।'-सारुह १.५३.

सिंपुटी—स्त्री. छिमटी; छडी. 'हातीं घेवूनियां सिंपुटी।' -निगा ३४. [शिंपूट]

सिफला—वि. क्षुद्र. -राज्य ८.१९. [अर. सिफ्ल]

सिफारत—स्त्री. वकिलातीचें ठिकाण. 'यांच्या सिफारती इतक्या जवळजवळ आहेत कीं मधून फक्त एकच रस्ता जातो.' -सासं २.२१४. [अर. सिफारत्]

सिफारशी, सिफारस—शिफारशी-स पहा.

सिबत—पु. करार. 'या गोष्टीनें मजकुरांत द्यावें तेसा सिबत जाला.' -इमं १९५. [अर. सब्त्]

सिबंदी—शिबंदी पहा.

सिबाड—न. एक जहाज; शिबाड पहा. 'जाहजें व सिबाडें तुम्हीं धरिलीं आहेत.' -वाडसमा २.३१.

सिबाळी, सिबिका—शिबाळी, शिबिका पहा.

सिबीर—न. तंबू. शिबीर पहा. 'चौघांनीं च्यारी तनवा धरल्यावर सिबीर उभें राहतें.' -पेद ५.२४.

सिबुर, सिबें—अनुक्रमें सबुरी, शिबें पहा.

सिम, सिमगा, सिमा—अनुक्रमें सीम, शिमगा, सीमा पहा.

सिमुर-री—शिमरी पहा. 'नागवी माथा मोत्यांची जाळी। सिमरी सुपाणी दाणा ल्याली।' –एभा ३.३९३.

सिमेट, सिमेंट—न. एक चुनखडीची भाजून केलेली विशिष्ट पूड; संधानद्रव्य. हें बांधकामास उपयोगी पडतें; शिमिट. [इं.]

सियारी—स्त्री. शहारा; कांपरें. शियारी पहा. [शहारा]

सियारी—स्त्री. डाकीण. 'म्हणे काम सांगुन ऐकेल। हे आशा सियारी देखैल।' –ज्ञा १३.५०४. [अर. साइर=मांत्रिक, चेटकी]

सियाळ—स्त्री. (महानु.) साल; आवरण. 'तेचि स्वर्गेंभु सियाळी। वेढीजताती।' –शिशु २७६. [छाल, छियाल]

सिर—न. १ शिर पहा. २ जंबियाचा एक हात. चीर मारल्यानंतर हात फिरवून डोक्यावर मारणें. **सिरें**–न. शिरोभाग. 'एऱ्हवीं जगदाकाराचें सिरें।' –ज्ञा ८.१५४.

सिरकंबा, सिरका—शिरकंबा, शिरका पहा.

सिरचोट—स्त्री. लकडा; तगादा. 'संभाजीची शिरचोट लागली आहे कीं...' –पेद १०.७२.

सिरजोर, सिरताज—शिरजोर, शिरताज पहा.

सिरड—स्त्री. (जुन्नर) जळाऊ लाकडाचा सांठा.

सिर(रि)याणी, सिराणी—स्त्री. आवड; शिराणी पहा. –ज्ञा १६.३९. 'आनंदाची दिवाळी सनी। जेयांचेयां दर्शनाची सिराणी।' –शिशु १०.

सिरस्ता—शिरस्ता पहा.

सिरा—वि. उत्कृष्ट. शिरा पहा. –सला ६३.

सिराई—स्त्री. (जुन्नर) केरसुणी; झाडणी.

सिरियाळणें—क्रि. गुढग्यांत मान घालून बसणें. –मनको.

सिलक, सिलकझाडा, सिलकणें, सिलकबंद-सांखळी, सिलकावण-णी-णें, सिलकी, सिलंगण, सिलगणें, सिलगावण-णी-णें—श नें आरंभ होणारे हे शब्द पहा.

सिलका—स्त्री. शिणका; शिळका. 'सल सिलका आणि सरांटे।' –दा ३.७.४.

सिलपी—स्त्री. (व.) ढलपी. [छिलणें]

सिलबत्ती-त्या—वि. (व.) शोकी; गुलहौसी. 'मुलगा तर सिलबत्त्या निघाला.' [? हिं. सिलबट्टा=खलबत्ता]

सिलसिला—१ शिलशिला पहा. २ वळण. परंपरा; संबंध. 'राजश्री साबाजी भोसल्याशी बोलण्याचा सिलसिला होताच.' –पेद ५.१२. ३ योजना; तजवीज. **सिलसिलाट**–पु. उपद्रव.

सिलारपेसानी—वि. कपाळावर चक्कासारखा लहान वाटोळा टिळा असणारा (घोडा). हें शुभलक्षण आहे. –अश्वप १.१०४.

सिलावट, सिलाट—वि. पाथरवट. –शिदि ४१४. [सं. शिला; हिं. सिला]

सिलिक—स्त्री. पेटवणी; बत्ती देणें. 'जलदीनें कूच करणें नाहीं तर तोफांस सिलिक होईल.' –भाब ३०. [अर. शल्क. म. शिलगणें, शिलक]

सिले—न. हत्यार; शस्त्र. 'घोडियासी सिले व राऊतासी सिले व टोप.' –इमं ७. –वि. हत्यारबंद. 'हत्ती आणऊनु सिले करविले.' –भाद्विसंवृ १७४. [अर. सिलह्] **०खाना**–पु. हत्यारें ठेवण्याची जागा; शस्त्रागार. 'चकचकीत खुब सिलेखाना।' –ऐपो २१५; –हिंलइ ५३. **सि(सी)ले टोप**–पु. शिरस्त्राण. –तुगा ३०२१. 'सीलेटोप अनेक हा निवडतां ते लोकही भागले।' –सारुह ३.४५.

सिलेदार-री, सिलेदारीढंग, सिलेपोस-पोस्त, सिलेभाल्यानिशीं—शिलेदार इ० पहा.

सिंव—स्त्री. मर्यादा; शिव पहा. 'सिंधूची सिंव न मोडे।' –अमृ ७.२६१. [सं. सीमा]

सिवण, सिवणावळ, सिवणें—शिवण-णें इ० पहा.

सिवणा—वि. निद्रिस्त? 'वोखटा देखे सिवणा। उठूनि बैसे तो शहाणा।' –गीता २.८२. [सं. स्वप्; हिं. सोना]

सिवणी—स्त्री. गुद आणि शिस्न यांना जोडणारी शिवण, यांमधला भाग. शिवणी पहा. 'सव्य तें नळीं ठेविजे। तेणें सिवणीमध्यु पीडिजे।' –ज्ञा ६.१९४.

सिवरा, सिवराई, सिवसेजारी-सर-सरणें-सोयरा. सिवाई-य, सिवायजमा-मिळकत, सिंवार, सिंवारसैंपाक, सिवासीव, सिवी, सिवीगाळ-ळी, सिवेरा—श मध्यें पहा.

सिविंतणें—क्रि. स्वीकारणें; मानणें. 'तैसें तुवां केलें मातें। आपुलें म्हणोनि सिविंतलें होतें।' –मुआदि १०.१२०. [सं. संविद्]

सिंव्ह—(प्र.) सिंह पहा.

सिष्ट, सिष्ट-संभावना, सिष्टाई, सिष्टाचार, सिसकारी—शिष्ट इ० शब्द पहा.

सिस, सीस—न. डोकें; शीर्ष. 'सिसा परता नाहीं दंड। ऐसें बोलती उदंड।' –दा ४.६.१६. [सं. शीर्ष; प्रा.

सिस्स] **सिसार**–पु. अर्धशिशी; एक मस्तकरोग. **सिसाळ-ळी**–स्त्री. शीर्षपंक्ति; मुंडावळी. ' पाठीं उभे ठाकूनि सुवेळीं । प्रतापलंकेश्वराची सिसाळी । ' –ज्ञा १०.२५३; –मुआदि ३७. २५. [सिस+आलि–ळि]

सिसफूल—न. डोक्यांतील अलंकार; शिसफूल. ' सिसफुल धरि माथां भांग टीळा कपाळां । ' –सारुह ६.२२. [शीस+फूल]

सिसव-वा-वी-वेल, सिसा—श मध्यें पहा.

सिसारी, सिसें, सिस्त—शिसारी, शिसें, शिस्त इ०पहा.

सिसेंभासें—न (माण.) दुखणेंबहाणें.

सिंह—पु. १ एक श्रेष्ठ पशु; मृगराज २ (समासांत उत्तरपदीं) श्रेष्ठ; वरिष्ठ व्यक्ति. उदा० पुरुषसिंह, पंडितसिंह. ३ (ज्यो.) बारा राशींतील पांचवी रास. [सं.] **०कटी**–स्त्री. सिंहाप्रमाणें बारीक कमर असलेली स्त्री. बारीक कमर हें सौंदर्याचें एक लक्षण आहे. **०कंपित(करण)**–न. (नृत्य) पाय सरपटत पाठीमागचे बाजूस नेऊन दोन्ही हात आकुंचित करणें. **०केशर**–पु. १ सिंहाची आयाळ. २ एक वनस्पति. **०तल**–पु. पसरून जोडलेले दोन हात. **०द्वार**–न. मुख्य दरवाजा, प्रवेशद्वार (राजवाडा, किल्ला इ० चें); दिल्लीदरवाजा. **०नाद**-पु. १ सिंहाचें ओरडणें. २ (ल.) युद्धाची आरोळी; युद्धाचें आव्हान. ' सिंहनाद केला वीरी । उपराउपरी धाविन्नले । ' –एरुस्व ८.२०. ३ मोठा, भयंकर आवाज; ओरडा; गर्जना. ' विजय जाणोनि तदा केले बहु सिंहनाद हर्षानें । ' –मोकर्ण ४७.३५. ४ देवळांत निर्मानुष स्थितींतहि, एखादे वेळीं आंतून निघणारा गंभीर, खोल आवाज. **०विक्रीडित (करण)**–न. उजवा पाय पुढल्या बाजूस अलात करून, डावा पाय मागच्या बाजूस वळवून कनिष्ठिकेच्या बाजूनें मंडल करून टांचेवर टेंकविणें. **०स्थ**–पु. गुरू सिंहराशीस येण्याचा काल. हा काल सुमारें १२ महिन्यांचा असतो. हा बारा वर्षांनीं एकदां येतो. ही पर्वणी शुभ, पुण्यप्रद मानली जाते. ' कीं श्लोक सर्वतीर्थ संघातु । आला श्रीगीतें गंगे आंतु । जे अर्जुन सिंहस्थु । जाला म्हणौनि । ' –ज्ञा १८.१६७५; –तुगा २७७५. **सिंहल, सिंहलद्वीप**–न. लंका; सिलोन. **सिंहाडा**–पु. मोठा, भयंकर सिंह. ' न समाती दरीमाजीं सिंहाडे । तैसें दांत दिसती रागीट । ' –ज्ञा ११.३४४. **सिंहावतार**–पु. (सिंहासारखा उग्र अवतार). १ (ल.) अतिशय रागावलेली स्थिति; भयंकर क्रोध. (क्रि० धरणें; घेणें). २ (चुकीनें नरसिंहअवतार). **सिंहावलोकन**–न. (सिंहाप्रमाणें वारंवार मागें दृष्टि टाकणें). १ मागचा इतिहास पाहाणें, पूर्ववृत्त लक्ष्यांत घेणें, त्याचा विचार करणें, (उत्तरोत्तर प्रगति होत असतां). ' सिंहावलोकनें करून । पहा मागील अनुसंधान । ' –ह २५.४७. २ एक न्याय. क्रमालोचन पद्धति. [सिंह+अवलोकन] **सिंहासन**–न. १ देव, राजा इ० चें बसावयाचें आसन, पीठ, गादी; तक्त. (अशा सोन्याच्या किंवा मौल्यवान पदार्थांच्या आसनाखालीं सिंह असत म्हणून हें नांव). –एभा १०.६०६. २ राजधानीचा प्रांत, परगणा. ' रायबाग सिंहासन ' –भोजताम्रपट शके ४१०. ३ एक योगासन. –संयोग ३२१. [सिंह+आसन] **सिंहिका**–स्त्री. राहूची माता; एक राक्षसी. ' तो सिंहिकेनें वदन पसरिलें । छायासूत्र साधिलें । ' –रावि १९३९. **सिंही, सिंहीण**–स्त्री. सिंहाची मादी.

सिहतखाना—पु. १ आरोग्यखातें. –साने शि. ब ९९. २ शेतखाना. [अर. सिहत्खाना]

सिंहधार–स्त्री. (बे.) लिंगायतांचें जानवें.

सिंहाड—न. मोठा आर्त स्वर. ' बोबाटी सिंहाडे उठिती । अघवे सिमेथें । ' –क्षिपु २.१३.२६.

सिंहाणा-णा—वि. (महानु.) शहाणा. ' सिंहाणेआं देवा विगोवा । ' –शिशु १५३. [सं. सज्ञान]

सिंहानक—पु. घोड्याचा एक रोग; शिंगाडा. –अश्वप २.३३.

सिहार—न. शेराचें लांकूड. सीहार पहा. –शर.

सिळा, सिळापाका-बाजार-बिब्बा-वेळ, सिळासप्तमी, सिळोपा—' शि ' मध्यें पहा.

सिक्ष—पु शिष्य. ' ब सिक्षांसि हि वस्त्रें कांहिं द्रव्य । ' –पंच ५.१. [सं. शिष्य]

सी—वि. तीन. –शिचप्र १०८. [फा. सिह्]

सीक—स्त्री. शिक्षा; शीक पहा. ' आतां नधारें लावीन सीक । ' –उषा ५४. –एभा २४.२४०.

सीकल—वि. परजलेलें; शिकल पहा. ' जैसें खड्ग सीकल होता । मग भय कायतें शत्रु जिंकिता । ' –नव १०.३७.

सीख—शीख पहा.

सीग—शीग पहा. कृष्णप्रभवें रूपासि आली । बरवेपणा सीग चढली । ' –एरुस्व ७ ६.

सीगट—न. शिंगट पहा. ' मणी होता सीगटाचा । ' –दा ५.६.६२.

सींगवट-टी—स्त्री. (महानु.) (ल.) शृंगाररचना. ' ये मीथळेचा हाटीं । शरीराची करुनि सींगवटी । ' –भाए ४०६. [शृंग–सींग+वट प्रत्यय]

सीण—पु. कष्ट; शीण पहा. ' वक्ता अधिकारेंवीण । वक्तृत्वाचा करी सीण । ' –दा २.१०.११.

सीत—सर्व अर्थी शीत पहा. १ थंडी. ' पिडा होते सीतें खटपट जनीं दैत बसती । ' –दावि २२४. २ ज्या; धनुष्याची दोरी. ' सीत लाऊन सोडिला बाण । ' –जै २०.११९. (बाप्र.)

सीतापुढें मीठ खावप-(गो.) कामाच्या आधींच त्याविषयीं बोंब मारणें.

सीतरणें—क्रि. फसविणें; ठकविणें. 'सीतारोनी नाना जन। पाशी उदर आणि शिश्न।' -मुवन १०.१४९.

सीता—स्त्री. १ रामपत्नी; रामायणांतील नायिका; पंच कन्यांपैकीं एक. २ स्वर्गांतून मेरूपर्वतावर पडल्यानंतर गंगेचे जे चार प्रवाह झाले त्यांपैकीं पूर्वेचा प्रवाह. बाकीचे तीन म्हणजे अलकनंदा, भद्रा व चक्षु ३ वृक्ष, वनस्पतिदेवता. ४ (सांकेतिक) अर्धा रुपाया, अधेली. [सं.] **म्ह**० १ सीता कीं संग्राम =(सीता दे किंवा लढण्यास सिद्ध हो असा रावणास रामाचा निरोप) कठीण अटी असल्यावेळीं हा प्रयोग वापरतात. २ (व.) सीता गेली वनवासा, मला लागली कर्कशा=चांगली गेली व कैदाशीण आली. **०चवरी**-स्त्री. चवरी (वनस्पती) चा एक प्रकार. **०देवी**-स्त्री. पीक काढतांना महारासाठीं तसाच राखून ठेवलेला पिकाचा भाग. कांहीं ठिकाणीं खळ्यावरची रास नेल्यानंतर तेथें जें धान्य राहतें त्याला म्हणतात. या धान्यावर महाराचा हक्क असतो. **०फळ-ळी**-स्त्री.न. एक फळझाड व त्याचें फळ. **सीतेचा पोल्हारा**-एक प्रकारची मोठी कवडी; कवडा. **सीतेचे पोहे**-न. एका जातीच्या गवताचें बी.

सीत्कार—पु. सूस् असा ध्वनि; दुःखाचा हलका ध्वनि; दांत मिटले असतां आंत वारा ओढून काढलेला आवाज. [सं. ध्व.]

सीत्कारणें—क्रि. फेंकणें; धुडकावणें. 'मोटका काळासीं सीतकारी।' -भाए ४५९. [छित्+करणें]

सीधा—वि. १ सरळ. २ प्रामाणिक; निष्कपटी. ३ विना-दुःख-संकट. 'आतां तूं इथून कशी सिंधी सुटतेस तें मी पहातों।' -स्वप ३५४. [हिं.] **सीधे वारस**-पु.अव. बापानंतर मुलगा याप्रमाणें वारस; याच्या उलट तेढेवारस. 'पेशव्यानीं सीधे वारस व तेढेवारस यांजकडे इनामें चालविल्याबद्दल उदाहरणें आहेत.' -इनाम १०१.

सीनसाळ—सिनसाळ पहा.

सीना—पु. (जंबिया खेळ) आपल्या हातांतील जंबियानें जोडीदाराच्या छातींत मधोमध मारणें. [फा. सीना=छाती]

सीम—वि. १ तिसरा. -रा ८.९५. २ तिसरी प्रत; कनिष्ठ (जमीन). 'सबब हल्लीं जमीन अवल दूम सीम तिही प्रतीची ...' -वाडसमा १.३७; -वाडबा १.२०३. ३ तिसऱ्या दर्जाचें; रेशमाची एक जात. -मुंव्या ९६. ४ (विणकाम) जरीच्या कांठाची एक जात. [फा. सिवुम्]

सीम—स्त्री. सीमा पहा. 'तेणें होय देहधर्म। तदनंतर पुढें सीम।' -वि. उ ७.८६.

सीमंत—पु. १ केंसांचा भांग; स्त्रियांची विशिष्ट केशरचना. २ सीमादर्शक चिन्ह; सीमेचा शेवट. [सं.] **०पूजन, सीमंती**-न.स्त्री. सीमांतपूजन पहा. 'मग सीमंती आली। वरा वस्त्रें वोपिलीं।' -कालिका ६.८. **सीमंतोन्नयन**-न. एक गर्भसंस्कार; सोळा संस्कारांपैकीं एक. साळीच्या कांटयांनीं भांग विंचरण्याचा विधि. 'मग सातवें मासीं सीमंतोन्नयन।' -स्वानु ५.२ १८. [सीमंत=भांग+उन्नयन=विंचरणें]

सीमा—स्त्री १ मर्यादा; हद्द; अवधि (देश, ग्राम, काल इ० चा). 'जेणें चैतन्या ईश्वरा ब्रह्मा। देहचि केलें परमसीमा।' -ज्ञा १८.३८२ २ (ल.) आधिक्य; अतिरेक; कळस; पराकाष्ठा पहा. 'येथें बोलण्याची जाली सीमा।' -दा १० ८.२६. ३ (ल.) अतिशय समृद्धि; पुरेपूर; रेलचेल. 'त्यावर्षी पर्जन्यानें मोठी सीमा केली.' [सं.] **०सांडणें**-क्रि. मर्यादा सोडणें; सीमेपलीकडे जाणें. 'तेथें येशकीर्ति प्रतापें। सीमा सांडिली।' -दा १५.२.२१. **०सूत्र**-न. (भूमिति) परिमिति; परिसूत्र; परीघ. **सीमांत-पूजन-पूजा**-नस्त्री १ नवरदेवाची गांवच्या सीमेवर किंवा देवळांत किंवा त्याच्या घरीं जी पूजा करतात तें; श्रीमंतपूजन. 'राव समोर गेला त्यासी। केलें सीमांतपूजेसी।' -एरुस्व ५. ३२. २ ज्येष्ठ अमावास्येला बाराबलुतेदारांनीं गांवसीमांना द्यावयाची भेट. **सीमोल्लंघन**-न. १ गांवसीमा ओलांडणें; गांवाबाहेर जाणें. २ विजयादशमीस समारंभानें अवश्य करावयाचा किंवा श्राद्धादिदिनीं न करावयाचा सीमा ओलांडण्याचा विधि. [सीमा+उल्लंघन]

सीमूर—वि. (महानु.) उद्धट (स्त्री). -दृष्टांतपाठ १६.

सीयाळी—स्त्री. (महानु.) थंडी. -स्मृतिस्थळ. [सं. शीतकाल]

सीर(री)गिरी—स्त्री. (महानु) एक प्रकारचें छत्र. 'पालव छत्रें सीरगिरिआ नाहीं तेथ अंतु।' -धवळे पू ३४. [श्रीगिरि]

सीरणें—न. (महानु.) साम्य; बरोबरी. 'कोवळीक घाली सीरणें। शिरीष पुष्पांसी।' -भाए २६.

सील—पु. (हिं.) पाटा. [सं. शिला]

सील-ल्ला—न. चिलखत. 'सीलवर मारा न चाले जरा।' -ऐपो १९. 'महावाक्य सील्ला अखंडीत ल्यालों।' -मध्व ३०९. [अर. सिलाह्]

सीलद्री—स्त्री. (महानु.) एक प्रकारचें भारी लुगडें; शेलारी. 'तव सीलद्रिया आणिले अनेक वस्त्रें आळंकारू।' -धवळे पू ७६.

सींव—स्त्री. सीमा; मर्यादा; हद्द; शींव पहा. [सं. सीमा] **०शेजारी**-पु. हद्दीवरचा; शेजारी.

सीवकारा-रू—पु. (महानु.) शिडकावा; शिंपडणें. 'देइजे कस्तुरिअेचा सींवकारू।' -शिशु.

सीवणा—पु. स्वप्न. 'दिठीं देखिला सीवणा सांगवेना। सुतैलें तया माखिती सीसहीना।' –मुराअयोध्या ७९. [सं. प्रप्न]

सीवन—न. शिवणें; दोरा घालणें. [सं.]

सीवन—स्त्री. शिश्नमणीच्या कातडयावरील शिवण. [सं.]

सीवा—स्त्री. (व.) तिफणीच्या दात्यांतील मधली जागा.

सीस—न. डोकें; मस्तक. 'परि साचचि महाभोहाचिये पुरीं। बुडालेया देखोनि सीसवरी।' –ज्ञा ११.४९. [सं. शीर्ष; प्रा. सीस] ०**फूल**–न (डोक्यांतील) एक दागिना; शीसफूल. –वेसीस्व ९.१२९.

सीस, सीसक—न. शिसें पहा.

सीहार—न. शेराचें लांकूड. –तुगा १८८१.

सीक्षणें—क्रि. शिक्षा करणें. –दावि ४२१. [सं. शिक्षण]

सु—अव्यय. चांगला, बरा, उत्तम याअर्थी नामादिकांच्या मागें लागणारें अव्यय. जसें–सुपुत्र, सुदृढ. [सं.]

सुआर—पु. आचारी; स्वयंपाकी. 'कीं सुआरासीचि अन्न घरी। येरां नोहे।' –ज्ञा १७.९०. [सं. सूद्=शिजवणें] **सुआरणें**–सक्रि. सेवन करणें.

सुइजणें, सुजणें—सक्रि. कार्यप्रवृत्त होणें. (जमीनींत नांगर वगैरे) घालणें. 'सुइजताती नांगर काई।' –अमृ ५.६५. २ माड, पोफळ इ० झाडांतून पानाचा कोंब निघणें. [सं. सु=प्रसवणें]

सुई—स्त्री. लहान दाभण; कपडा इ० शिवण्याचें साधन. [सं. सूची; फ्रेंजि. सुव] **म्ह**० १ सुईचे अग्रीं मृतिका. २ जिकडे सुई तिकडे दोरा.

सुई(वी)ण—स्त्री. स्त्रियांची प्रसुति सुलभपणें करवून पुढील बाळंतपणाची खटपट करणारी स्त्री. [सं. सु=प्रसवणें] **म्ह**० (व.) सुइणीपुढें चूत लपत नाहीं. ०**पण-णा**–नपु. सुईणीचें काम.

सुपर, सुपरणें, सुपरतुला—सुवेर इ० पहा.

सुक—स्त्री. (कारवारी) एक हक्क.

सुंक—पु. (कु.) मधमाशीचे नांगीचा कांटा.

सुकट—स्त्री. वाळलेला मासा; वाळलेला बोंबील. –वि. सुकलेलें, वाळलेलें. [सं. शुष्क] ०**णें**–अक्रि. वाळणें; शुष्क होणें; ताजेपणा निघून जाणें. **सुकटा-टया**–वि. सुकट (–वि.) पहा. **सुकटी**–स्त्री. वाळलेला माशांचा चुरा, भुगा.

सुक(ख)ड-डी—स्त्री. पुरा झालेला व सुकलेला नारळ. –वि. सुकलेला. [सं. शुष्कल] **सुकड-डया**–वि. सुकटा–टया पहा. **सुकडा**–पु. हिरवट रंगाचा अंगावर खवले नसलेला मासा. **सुकडा-सुकडोजी**–वि. आजारीपणानें वाळलेला (माणूस).

सुकडी—स्त्री. (महानु.) कस्तुरी. 'सर्वांगें बाहाकाति परिमळें। सुकडिचेनि।' –ऋ ७१. [सं. सुकाष्ट?; सुखड=चंदन]

सुकणा—पु. (कु.) एक जातीचा पक्षी. **सुकणें**–अक्रि. १ वाळणें; शुष्क होणें; ओलावा नाहींसा होणें. २ नदी, खाडी इ० मधील पाणी कमी होणें, पात्र कोरडें पडणें. ३ आजारीपणामुळें शरीर क्षीण होणें; वाळणें. [सं. शुष्=वाळणें] **म्ह**० (गो.) सुकलेलें पान न्हयं झालेले सांग=निरुपयोगी माणसास भलतेंच काम सांगणें. **सुकणावळ**–स्त्री. सुकल्यामुळें झालेली द्रवपदार्थाची खराबी. **सुकतळ**–न. जोडयांत पावलाचा घाम शोषून घेण्यासाठीं घातलेला चामडयाचा तुकडा; घामोळें; खोगिराच्या खालचें घामोळें; अंगरखा इ० कामध्यें कांखेंत असल्या प्रकारचें घातलेलें जोड कापड. [सुकणें+तळ] **सुकताव**–पु. भट्टींत सोनें तापवून हवेनें आपोआप थंड होऊं देण्याची क्रिया. याच्या उलट पाणताव (पाणी ओतून थंड करणें). [सुका+ताव] **सुकती**–स्त्री. नदी, समुद्र इ०ची ओहोटी; पात्र कोरडें होणें. **सुकती भरती**–स्त्री. समुद्र इ० चें पाणी उतरणें व चढणें. **सुकवडा**–पु. उडदाचे पिठांत मिरें, सुंठ, हिंग इ० घालून तळलेला वडा. **सुकवण**–न. १ धान्य इ० सुकविणें; वाळवण. २ वाळविण्याची मजुरी. –स्त्री. जीर्ण स्थिति; अशक्तता. **सुक(ख)वत**–स्त्रीन. वाळलेलें केलीचें पान. **सुकवणी**–स्त्री. १ क्षयरोग; क्षीणता. २ (व.) एक प्रकारची गवती चटई. **सुकविणें**–सक्रि. १ वाळविणें. २ (ल.) निस्तेज करणें. –मोस्त्री ४.३९. **सुकवें**–न. (कों.) करपलेलें पीक; वाळलेलें शेत. **सुका**–वि. १ सुकलेलें; वाळलेलें. २ (ल.) लाभरहित, उत्पन्नरहित; पोकळ; निरर्थक; अर्थहीन; कसहीन. ३ कोरडा, जेवणाशिवाय (पगार). [सं. शुष्क; तुल० फ्रेंजि. शुको] **सुकाकूल**–न. एक जातीचें फळ, मिस्त्री. **सुकाट**–न. (कु.) वाळविलेला कोलबी जातीचा एक मासा; सुंगाट. **सुकाट(ठ)णक**–वि. कोरडा ठणठणीत (जमीन). **सुकाड**–पु. १ सुकंडा पहा. २ शेतांतील पांखरांसाठीं उभें केलेलें बुजगावणें. **सुकाताव**–पु. १ भुकेमुळें होणारा पोटाचा भडका; भुकेमुळें होणारी व्याकुळता. २ शुष्क पाहुणचार; निरर्थक फेरफटका; साफ नाकबुली; खरडपट्टी; धसमुसळेपणा. (क्रि० देणें; बसणें). ३ सुकताव पहा. **सुका दुक(ष्का)ळ**–पु. पावसाच्या अभावामुळें पडलेला दुष्काळ. **सुका लफडा-डें**–पुन. निरर्थक व्याद, त्रास, अडचण, भांडण इ०. **सुकाळें**–न. (गो.) सुकें तळें. **सुकी(कें)केळ, सुकेळ**–न. सोलून तूप लावून वाळविलेलें केळें. **सुकी(कू)खरूज**–स्त्री. कोरडी, पू नसलेली खरूज. **सुकेड**–स्त्री. (राजा.) वाळलेली बाजू, जागा. [सुका+कड] **सुको जामोर**–(गो.) फायद्याशिवाय काम करणें. **सुकूखा**–वि. (राजा.) सुका पहा. **सुकयो पोळयो**–(गो.) हवेतेल बंगले मनचे मांडे.

सुकंद—पु. कांदा इ० भाजी. [सं.]

सुकर—वि. करण्यास सोपें; सुलभ; सहज मिळविण्यासारखें. [सं. सु+कृ] ०**णें**–सक्रि. आनंदविणें.

सुकरगुजारा—पु. आभारप्रदर्शन. [फा. शुक्र+गुजारी]

सुकर्मा—पु. १ सत्तावीस योगांतील सातवा योग. २ देवांचा एक कारागीर. [सं.]

सुंकलें—न. लहान मुलग, मुलगी यांच्या कानांत, नाकांत घालावयाचें सोन्याच्या तारेचें लहानसें वेटाळें. प्रथम यानेंच भोंक पाडून मग तें आंत ओंवतात. [सं. शृंखला]

सुकसुक—स्त्री. (ना.) सुगावा.

सुकळ—पु. सुकाळ; सुगी; स्वस्ताई. [सं. सुकाल]

सुकळास—क्रिवि. सुकर पहा. सहजगत्या; सहज; मोकळेपणें; आपोआप [सं. सु+क्लेश]

सुका—पु. (ल.) तंबाखू.

सुकाण-णूं—न. गलबत विवक्षित दिशेस वळविण्याचें त्याच्याच मागच्या बाजूस पाण्यांत असलेलें एक साधन. कर्ण. [सं. सुकर्ण, अर-सुक्कान] **०दार-गीर, सुकान्या(ण्या)**-पु. १ सुकाणू धरणारा; कर्णधार. २ (ल.) पुढारी; मुख्य; नायक. **०यारी**-स्त्री. सुकाणू फिरविण्यासाठीं लावलेली दोरी. **सुकाणूची दांडी**-स्त्री. सुकाणू फिरविण्याचा दांडा.

सुकाळ—पु. १ चांगला पाऊस पडून भरपूर धान्य आलेले दिवस. दुष्काळाच्या उलट काळ. २ समृद्धि; विपुलता; सुवत्ता. [सं. सु+काल] **०पुरा**-पु. अत्यंत विपुलता (धान्य, पाऊस, नफा इ० ची). [सुकाळ+पुरा] **०सौदा**-पु. अत्यंत स्वस्त मालाची देवघेव (विशेषतः नुकसानीचा दर्शक म्हणून योजतात). **म्ह०** सुकाळसौदा आणि हगवणीस काळ. **सुकाळ्या**-वि. १ अत्यंत विषयासक्त; कामोत्सुक (पुरुष, स्त्री). २ सुखार्थ वारंवार दुसऱ्या पुरुषापासून मैथुन करून घेत असावें अशा स्वभावाचा (पुरुष, स्त्री, नपुंसक).

सुकीर-सुक्र, -कर—पु. (अशिष्ट) शुक्र तारा. [सं. शुक्र]

सुकीर्ति—स्त्री. चांगला नांवलौकिक -वि. चांगल्या नांवालौकिकाचा; कीर्तिमान. [सं.]

सुकुडदुम—अक्रि. (ना.) घाबरणें; गडबडणें; सदैं होणें; पांचावर धारण बसणें. [सुकुड=सुकणें, दाबणें, आवरणें+हि. दुम=शेपटी]

सुकुंडो—पु. (गो.) घुला; सुरवंट नांवाचा किडा; कुसुंडा.

सुकुमार—वि. नाजूक; कोमल; कोंवळा. [सं.]

सुकुरउंडो—पु. (गो.) शकुनउंडा.

सुक्का—पु. पत्र; चिठ्ठी; हातरोखा [फा. सुका]

सुकृत—न. १ पुण्याईचें कृत्य; सत्कृत्य; पुण्यकार्य; देवता संतुष्ट करण्यासाठीं करावयाचें कर्म (यज्ञ, याग इ०). २ पुण्य; सद्गुण. - वि. पुण्यवान; सद्गुणी. [सं.] **सुकृती**-वि. पुण्यवान; धार्मिक कृत्यें करणारा; नीतिमान.

सुक्का(सूक्का)सुक्त(सूक्त)—वि. भलेबुरें; बरेंवाईट; न्याय्य अन्याय्य; सदसत्; वेळावेळ; शब्दाशब्द; सभ्यासभ्य. ' चौघांमध्यें सुक्तासुक्त बोलूं नये. समजून बोलावें. [सं. सुक्त+असुक्त]

सुक्ती—स्त्री. (व.) पाथरवटाचा दगड फोडण्याचा लहान हातोडा. सुतकी पहा.

सुख—न. समाधान; मनास वाटणारी स्वस्थता; आराम; आनंद, चैन; अनुकूल अनुभव; शांतता व विश्रांति; करमणूक व उपभोग; शांति. (समासांत) आत्म-रति-विषय-इंद्रिय-सुख (समासांत पूर्वपदीं-विशेषणार्थी) सुखकर; सुखसाध्य; सुखखाद्य इ० [सं.] **म्ह०** सुखंच मे शयनंच मे-चैनींत राहून झोपा ताणणें. (वाप्र.) **सकलसुखसंपत्तिवसति**-सर्व प्रकारच्या सुखाची व समृद्धीची खाण (खुषमस्करी किंवा हितचिंतनाच्या वेळीं उपयोगांत आणावयाचा शब्द) **सुखाचा विचार**-पु. समाधानाची कल्पना. **सुखाचा भाऊबंद-भागी-वाटेकरी-सोबती**-पु. शाळुसोबती; ताज्या घोडयावरील गोमाशा. केवळ चैनीच्या वेळचा सोबती. **सुखाचा शब्द**-पु. गोड, सभ्य भाषा; मनास समाधान वाटेल असे भाषण; मृदु भाषण. **सुखानें सुखें-सुखें=सुखेनैव**-क्रिवि. आनंदानें; तत्परतेनें; अंतःकरणपूर्वक; सहजरीतीनें. **सुखास पडणें-येणें-वाटणें**-सोपें, होणें; बरें वाटणें. सामाशब्द- **०कर-दायक-सुखावह**-वि. सुख देणारें, **०ढाळ**-पु. फार त्रास न देणारें जुलाबाचें औषध व त्यामुळें होणारा जुलाब. [सुख+ढाळ] **०दुःखभोक्तृत्व**-न. सांसारिकास किंवा जीवात्म्यास भोगावे लागणारे सुखदुःखाचे अनुभव. **०निद्रा**-स्त्री. गाढ झोंप. **०प्रसव**-पु. विनाआयास होणारी प्रसुति. **०भाक्-भोगी**-वि. १ सुखी; सुखें भोगणारा; सुखाचा वांटेकरी. २ अत्यंत विषयासक्त **०भाग**-पु. सुखकारक, सोपा वांटा, ठेवा. **०मांस**-पु. समृद्धीमुळें शरीर सुटणें. (क्रि० येणें; चढणें). **०रीण**-न. जरूरी नसतां चैनीसाठीं काढलेलें किंवा सुखानें, सोईनें फेडतां येईल असें कर्ज. **०रूप**-वि. सुखी; खुशाल; संकटरहित. -क्रिवि. कांहीं त्रास किंवा अडथळा न होतां; सुखानें; सुरक्षितपणें; सुखेनैव. **०वंत**-वि. सुखी. **०वस्ती**-स्त्री. १ कोठेंहि सुखानें राहणें, मुक्काम करणें. २ वतन, जमीन, वतनवांडी, कामधंदा यासंबंधाची काळजी मागें नसून केवळ पूर्वार्जित धनसंचयावर कोणत्याहि गांवीं चैनीखातर राहणें. -वि. सुखवस्तू; श्रमरहित जीवन कंठणारा; जीवनाकरितां परिश्रम करावे न लागणारा. **०वास**-पु. सुखवस्ती अर्थ १ व २ पहा. **०वासी**-स्त्री.(व.) गवती चटई (बसण्याची). -वि. सुखवस्ती (-वि.) पहा. **०विर्णे**-अक्रि. सुख देणें; आनंदित करणें. **०शयन**-न. **०शेज**-स्त्री. १ (शृंगारिक काव्य) चांगला पलंग, अंथरूण इ० २ सुखकारक झोप. **०शय्या**-स्त्री. सुखशयन अर्थ १ पहा.

२ परलोकीं सुख व्हावें म्हणून ब्राह्मणास दान करावयाचा पलंग, बिछाना इ०; मृतशय्या पहा. **०संतोष-समाधान**-पु.न. आनंद आणि शांति; स्वास्थ्य व सुखोपभोग; विश्रांति आणि तृप्ति. **०संतोषानें**-क्रिवि. १ आनंदीपणें. २ स्वेच्छेनें; स्वतःच्या राजीखुशीनें; अकलहुषारीनें; कोणाच्या जबरदस्ती विरहित. **०सोहळा, सुखाचा सोहळा**-पु. विवाह, मुंज इ० प्रसंगीं करावयाचें न्हाणे माखणें, मिरवणूक, अलंकारधारण, प्रीतिभोजन इ० (क्रि० भोगणें). **०स्पर्श**-वि. ज्याच्या स्पर्शापासून आनंद मिळतो असा. **सुखांगणें**-अक्रि. १ केवळ चैनींत गुरफटणें; सुखांतच मग्न राहणें (निंदार्थी); हालअपेष्टा सोसल्यानंतर सुखी बनणें. [सुख+अंग] **सुखाचा धनी-प्राणी-जीव, सुखानंद**-पु. १ सुखासमाधानांत आयुष्य, घालवणारी व्यक्ति; सुखानें निर्वाह होणारा माणूस. २ दयाळु, स्नेहाळु, पुरुष. **सुखाचा वांटा**-पु. सुखमय स्थिति, ठेवा. (क्रि० उचलणें; घेणें; भोगणें). **सुखाचा वारा**-पु. १ संतोषदायक बातमी, वार्ता. २ गोड, सुखकारक शब्द, बोलणें; सुखाचा शब्द. **सुखाची आईबाई**-स्त्री. ऐश्वर्यांतील सहचारिणी; सुखापुरती झालेली मैत्रीण. **सुखाची घडी**-स्त्री. सुखदायक वेळ, प्रसंग. (क्रि० येणें; उगवणें; चालणें). **सुखाची भाकर-री**-स्त्री. सुखकारक उद्योग; विनात्रासाचा धंदा, नोकरी किंवा अशा परिस्थितींतील सुख. **सुखाचें माहेर**-न. सुख मिळणारें ठिकाण; आजोळ; आनंद देणारी जागा. 'वक्षस्थळ तैसें रुंदावलें । सर्व सुखाचें माहेर ।' **सुखाचें शरीर**-न. सुखोपभोगानें पोसलेलें शरीर; निरोगी काया. **सुखाड**-न. सुख. -वि. सुखकारक. **सुखा(खां)डणें**-अक्रि. (काव्य) सुख पावणें; आनंदांत गर्क होणें; फार संतुष्ट होणें. 'निजसुखें सुखाडला ।' **सुखादुःखाचा सोबती-सोबतीण**-पु.स्त्री. जिवलग मित्र, नवरा; जिवलग मैत्रीण; बायको. **सुखानुभव-सुखानुभूती**-पु.स्त्री. सुखसंतोषाची जाणीव. **सुखानुभव**-वि. सुखाचा अनुभव घेणारा. **सुखापा(वा), सुखोपा**-पु. सुख; शांति. **सुखापुरी**-पु. एक गोसाव्यांचा पंथ; (निंदार्थी) आनंदी मनुष्य; चैनी, सुखी इसम. [सुख+पुरी] **सुखार्थी-सुखैषी**-वि. सुख इच्छिणारा. **सुखावणें**-अक्रि. सुखाडणें पहा; आनंद पावणें; सुखाची चट लागणें व त्यामुळें आळस उत्पन्न होणें. **सुखावंह**-वि. सुखकर; सुख देणारें. **सुखाविणें**-उक्रि. सुखी व समाधानी करणें; आनंदी व संतुष्ट करणें. **सुखासंतोषानें-संतोषें-समाधानानें**-क्रि.वि. सुखसंतोषें पहा. **सुखासन**-न. सुखानें बसतां येईल अशी पालखी, मेणा इ० वाहन. **सुखासुखी(खीं)**-क्रिवि. १ सुखसंतोषें पहा. २ उगाच; निष्कारण. **सुखास्वाद**-पु. सुखाचा उपभोग. -वि. स्वादिष्टपणाचा; चवीचा. **सुखिया**-वि. १ सुख भोगणारा; सुखी. २ समाधानी; संतोषी, आनंदी; चैनी; मौजा मारणारा. **सुखीस्वभाव**-पु. समाधानी स्वभाव. **सुखें सुखेनैव**-क्रि.वि. १ सुखानें. सुखसंतोषें पहा. २ अनायासें. **सुखोत्पत्ति**-स्त्री. १ सुखाचा उदय. २ सामान्यतः सुख; चैन.

सुखट-सुखटणें-सुखड—सुकट इ० पहा.

सुखणावळ-सुखणें-सुखताव-सुखती—सुकणावळ इ० पहा.

सुखरुज—स्त्री. सुकी खरुज.

सुखवत—स्त्री. (कों.) सुकवत पहा.

सुखवशी—स्त्री. सुकवशी पहा.

सुखा—पु. मांसरस -वि. सुका पहा. शुष्क. [सं. शुष्क] **०ड**-स्त्री. कोरडी जागा. **०डी**-स्त्री. कोरड; शुष्कता; वाळलेली स्थिति. **०रुखा**-वि शुष्क; कोरडा.

सु(स)खून—पु. शब्द; वचन. [सं. शकुन; फा. सुखून]

सुखूस—वि. (गो.) रुचकर; चवदार.

सुगई—स्त्री. सुगी पहा.

सुंगट—न. (गो.) शिंगा जातीचा मासा.

सुग(घ)ड—न. लहान मडकें. [सं. सु+घट].

सुगड-डा—वि. चतुर; कुशल; शहाणा.

सुंगणें—सक्रि. वास घेणें; हुंगणें. [सं. सु+घ्रा; फ्रें. जि.सुंग]

सुगति—स्त्री. १ सुखासमाधानाची स्थिति. २ उत्तम गति; मोक्ष. [सं.]

सुगंध—पु. सुवास; चांगला वास. [सं.] **०क, सुगंधिक**-वि. मधुर वासाचें; सुवासिक. **०मार्जार**-न. जवादी मांजर. **०मूली**-स्त्री. कचोरा; आंबेहळद. **०मृग**-पु. कस्तुरीमृग. **०राज-व**-पु. एक जातीचें सुगंधी तेल. **सुगंधि**-पु. सुवास. -वि. सुवासिक. **सुगंधिक(त)**-वि. सुवासिक. **सुगंधिद्रव्य**-न. सुवासिक औषधें, वस्तु इ० **सुगंधी**-पु. सुवासिक वस्तु अत्तरें इ० विकणारा; गंधी. **०सुगंधेल**-न. अत्तर.

सुगम—वि. १ सोपें, सुलभ; साध्य करण्यास, मिळविण्यास सोपें २ फारसा त्रास न देणारें (औषध). ३ समजण्यास सुलभ (पुस्तक). [सं.]

सुगर—वि. सुगड (-वि.) पहा. [सं.सुघड] **०ण, सुगरीण**-स्त्री. १ एक जातीचा पक्षी २ एक जातीचें जंगली झाड. ३ चांगला स्वयंपाक करणारी स्त्री. ४ (व.) खळवाडीतील गवताच्या काडांची केरसुणी, खराटा. -वि.सुगर, निष्णात(चुकीनें पुरुषासहि लावतात) **सुगरणीचें घर**-न. सुगरीण पक्ष्याचें कोठें. **सुगरीण, सुगराई, सुगरावा, पणा**-पु.स्त्री. हुशारी; दक्षता; कौशल्य; चतुराई. **सुगराघा**-पु. थाटमाट. 'जयाचा सुगरावा देखे ।' -ज्ञा १३.८१२. **म्ह०** (व.) सुग्रीण साताची शेवहातीं

ळल्या हाताची=मोठी सुगरीण पण घर स्वच्छ ठेवतां येत नाहीं अशी स्त्री.

सुगराई—स्त्री. (संगीत) गायनांतील एक राग. [हिं.]

सुगरात—पु. (गो.) स्वार्थ.

सुगळ—वि. चांगल्या मानेचा. सुग्रीव (–वि.) पहा. [सु+गळा]

सुगाड—न. (कु.) वडपौर्णिमेस (संक्रांतीस?) द्यावयाचें सुगडाचें वायन. [सं. सुघट]

सुगावणें—अक्रि. अनुकूल होणें; इच्छेप्रमाणें होणें; सुलभ प्रकारें आढळणें. [सु+गावणें] **सुगा(दा)वा**–पु. शोध; तपास; तलास; पत्ता (हरवलेल्या, सांपडावयाच्या वस्तूचा इ०]

सुगी—स्त्री. १ पिकाचा हंगाम २ समृद्धि; सुकाळ; संपन्नता. (वि.) सोंगणी. (क्रि० सरणें, चुकणें) [सं. सुगति. का. सुग्गी] म्ह० सरली सुगी बैस उगी. ०**सराई**–स्त्री. (व.) सुगी व्यापकपणें.

सुगुण—पु. सद्गुण. [सं.]

सुगु(गू)म—वि. सुगम पहा.

सुगुरवा—पु. (गो.) पायगूण.

सुगूर—वि. (गो.) सावध.

सुग्रण, सुग्राई, सुग्रावा, सुग्रीण—सुगरण इ० पहा.

सुग्रावो, सुगुर्वो—पु. शुभ शकून.

सुग्रास—पु. उत्तम प्रकारचें अन्न; मिष्टान्न. [सं.]

सुग्रीव—पु. किष्किंधेचा वानरराजा व श्रीरामाचा मित्र. –वि. चांगल्या मानेचा. (सु+ग्रीव]

सुघटित, सुघट—वि. १ चांगलें घडविलेलें, बनविलेलें; चांगल्या आकाराचें–घाटाचें. २ बनविण्यास सोपें; सवघड. ३ चांगलें जोडलेलें. ४ चांगल्या योजनेचें, आंखणीचें, मांडणीचें [सं.]

सुघटी—स्त्री. टांच. –ज्ञा ६.१९३.

सुघड—न. सुगड (–न. –वि.) पहा.

सुघडाई—स्त्री. सुगराई पहा.

सुघराणी—स्त्री. सुगरीण पहा.

सुचणें—अक्रि. मनांत स्फुरणें, येणें; आठवणें; मनांत आणणें; निर्माण करणें. [सं. सूच्] **सु(सू)चक**–पु. चहाडखोर माणूस. –वि. सुचविणारें, कल्पना करून देणारें. **सु(सू)चना**–स्त्री. प्रस्ताव; उपक्रमाचें ज्ञान; सुचविणें; जाणीव देणें; लक्ष्यांत घेण्याची गोष्ट. **सुचविणें**–सक्रि. सूचना करणें; कळविणें; इषारा देणें; माहीत करून देणें. **सुचें**–न. सूचना, इषारा.

सुचरित्र—न चांगली, भलाईची वागणूक, आचरण.–वि. चांगल्या वर्तनाचा [सं.] **सुचरित्रा**–स्त्री. चांगली, सद्गुणी स्त्री.

सुचि(चि)त—वि. शांत; स्वस्थ; बिनत्रासाचें; निश्चित. [सं. सुचित्त] **सुचित्त**–वि. १ सुचित पहा. २ दक्ष, सावध.

सुचिन्ह—न. चांगलें; शुभकारक लक्षण; शुभ शकुन, खूण.

सुजगर—वि. जागृत; जागा. [सं. सु+जागर]

सुजणी—स्त्री. एक जातीचें लांबट व निमुळतें मोती.

सुजणें—अक्रि. १ फुगणें; फुगीर दिसणें. २ अत्यंत लुब्ध, उत्सुक होणें. ३ घालणें. 'वांचूनि पिकल्या सेतीं। सुजताती नांगर काई।' –अमृ ५.६५. ४ खोळंबणें–शर. **म्ह०** १ सुजलें भूत कोडबोळ्यास राजी. २ (गो.) सुजिलें तोंड हासुक उपकार ना रडूंकय उपकार ना=जायबंदी वस्तु ठेवून उपयोग नाहीं व टाकूनहि उपयोग नाहीं. **सुजे मोठेपण**–न. (गो.) १ मृत्यूच्या वेळची सुज. (त्यावरून ल.) २ अत्यंत निरुपयोगी वस्तु. [सं. शोथ; हिं. सोजना] **सुजट, सुजकट–सुजीर**–वि. किंचित सुजलेलें; फुगीर. **सुजम(मि)रणें**–अक्रि. थोडेसें सुजणें. **सुजमीर**–वि. सुजट. **सुजरा(ला), सुजलेला**–वि. १ फुगीर, सुजणारा. २ अत्यंत आसक्त; लुब्ध. **सुजलेभूत**–न. सुजरा अर्थ २ पहा. **सुजी**–स्त्री. सुज.

सुजन—पु. सज्जन; सुजाण; सुस्वभावी माणूस. [सं.] ०**ता–त्व**–स्त्रीन. चांगुलपणा; सज्जनपणा; सभ्यता.

सुजना—पु. दाभण; टोंच्या. [फा. सोझन्=सुई]

सुजनी—स्त्री. १ गर्भरेशमी सुती कापड. २ पांघरण्याची दुलई.

सुजाण—वि. सुज्ञ; बुद्धिवान; तडफदार; चलाख. [सं. सुज्ञ]

सुझणें—अक्रि. १ सुचणें; समजणें. २ दिसणें. 'किंबहुना सुझें। स्वर्गवरी।' –ज्ञा १४.१५६. ३ राहणें.–शर. [सं. सूचना]

सुटंक—न. सुचिन्ह. –वि. १ शुभकारक. 'या नांव गा निज नैष्ठिक्य। ब्रह्मचर्य अति सुटंक।'–एभा ३.४४९. २ पाणीदार; तीक्ष्ण; जहाल. 'अति सुटंक दळभार।' –एरुस्व ५.४०.

सुट–कण–कर–दिनीं–दिशीं—क्रिवि. सुट् असा आवाज होऊन; झटकन; फटकन; तडकाफडकी; झटदिशीं. [ध्व.]

सुटकणें—क्रि. १ चटकन् निघून जाणें; सटकणें पहा. [हिं. छुटकना] **सुटका**–स्त्री. १ मुक्तता; मोकळीक. २ प्रसूति; बाळंत होणें. [हिं. छुटका] **सुटगांठ**–स्त्री. सुरगांठ पहा. **सुटणूक**–स्त्री. मुक्तता. **सुटणें**–अक्रि. १ मोकळें होणें; स्वतंत्र होणें; बंधन–करार–दाब–त्रास–घोटाळा इ० तून मुक्त होणें. २ अलग होणें; विभाग पडणें; गांठ–संबंध–संगत इ० मधून मोकळें होणें; विलग, वियुक्त होणें. ३ भंगणें; फुटणें. ४ उद्भवणें; फुटणें; बाहेर पडणें (घाम, कंप, कंड); पाझर फुटणें; वास येणें; भीति-राग-रोग-जुलूम–अरिष्ट इ० चा प्रादुर्भाव होणें; वारा–पाऊस इ० सोसाट्यानें वहाणें; आग–वणवा पेटणें. ५ बैल–घोडा भडकणें किंवा भरधांव पळणें;

दाब-बंधन नसणें; मोकाट धावणें; स्वैरपणें संचरणें; एखादें काम-धंदा इ० करण्यास बेदरकारपणें तुट्न पडणें; मनमुराद व बेमुवंत पणें एखादें कृत्य करीत सुटणें. 'तो मारीत-शिव्या देत-बोंबलत-पळत-सुटला.' ६ बार होणें, उडणें; स्फोट होणें (तोफ, बंदुक इ० चा). ७ मर्यादेबाहेर मोठें होणें; वातानें फोपसें होणें (पोट अंग). [सं. श्वठ्] **सुटला**-वि. (व.) फालतू (माणूस). **सुटल्या सारखा**-वि. आधाशी. **सुटसुटीत**-वि. चपळ; मोकळाचाकळा; नीटनेटका; आखुड व बांधेसूद; हलका व मजबूत; तडफदार व चलाख (माणूस, शरीराचा बांधा); टुमदार व छोटें (घर); सोईस्कर व मर्यादित; आटोपशीर (काम, धंदा); लहान पण व्यवस्थित; बोजड नसलेलें. **सुटा**-वि. १ ढिला; मोकळा; अलग; न गुंतलेला. २ बंधनरहित; घट्ट न बसविलेला; लोंबता; हालत असलेला. ३ गदी नसलेला; विरळ; फट, अंतर पडलेला. ४ एकटा; वेगळा; निराळा. ५ न अटकलेला; कामांत नसलेला. ६ मुक्त; सुटलेला (कर्ज इ० मधून); हाताचा सुटा=उदार. **सुटारु**-स्त्री. (कु.) वाईट चालीची स्त्री. **सुटावणें**-अक्रि. १ सुटणें; मोकळा होणें; विस्कळित होणें; ढासळणें (गवताचा भारा, गंज इ०). २ ओलीनें फुगोटा येणें (मातीची भिंत इ० स); वाढणें; सुजणें; मोठें होणें (पोट इ०); चैनीनें शरीर फोपसें, लठ्ठ होणें. ३ जागेवरून घसरणें (तुळई इ०). **सुटा स्वर**-पु. (संगीत) ज्यावर गायक थांबून रागरक्ति वाढवितो तो स्वर. **सुटिक-का**-स्त्री. १ (काव्य) सुटणूक; सुटका. २ वर्षाव; वृष्टि. 'पर्जन्याची सुटिका जैसी।'-ज्ञा ११.६८६. **सुटी-ट्टी**-स्त्री. मोकळीक; रजा (काम, अभ्यास इ० मधून); कामास टाळा; नागा दिवस. [हिं. छुट्टी] **सुटी करणें**-(कु.) नीट करणें; निवडणें (धान्य). **सुटुक**-न. (व.) लचांड. **सुटुबुटु**-स्त्री. निरर्थक हालचाल; रिकामी चुळबुळ. (क्रि० लावणें; मांडणें; करणें). -क्रिवि. आळसानें; मागेपुढें करून, निरर्थक प्रकारें. **सुट्टा**-क्रिवि. (व.) पहिल्यानें; प्रथम. 'पहिले सुट्टा तो माझ्या घरीं आला.' **सुट्टी बाहेरील टांग**-स्त्री. (मल्लविद्या) कुस्तींतील एक पेंच. **सुट्यो**-न. १ (कों.) देणेंघेणें पूर्ण करणें; कर्जफेड, ऋणमुक्तता. २ -उद्गा. मुलांच्या खेळांतील अटीतून मोकळीक करण्याविषयीं, आंधळघाचे डोळे सोडण्याविषयीं एक संज्ञा.

सुंट(ठ)र-रू-रें, सुंठार-न. सुंठीच्या आगीसारखी आग होणारें गळूं, उठाणूं. [सुंठ]

सुंटारा-पु. घाण्याची संवय लावण्यासाठीं, बैलास ज्या खांबाभोंवतीं गरगर फिरावयास लावतात तो खांब. [खुंट]

सुंठ-स्त्री. वाळविलेलें आलें. [सं. शुंठी] **म्ह०** सुंठीवांचून खोकला गेला=खटपटीवांचून वाईट गोष्ट सुधारणें; पीडा टळणें. **(साठा वर्षी) सुंठ फुलणें**-नशीब फळफळणें. **(गांडींत) सुंठ फुंकणें**-एखाद्याचें मन फिरविणें, कान भरणें; बिचकाविणें. **०वडा**-पु. बाळंतिणीस खाण्यासाठीं किंवा जन्मोत्सवाच्या शेवटीं वाटण्यासाठीं केलेलें सुंठ, गुळ किंवा साखर इ० पदार्थांचें मिश्रण. **०वणी**-स्त्री. सुंठीचा काढा. **०साखर**-स्त्री. पित्तनिरसनार्थ खावयाचें सुंटसाखरेचें मिश्रण.

सुडकणें-अक्रि. सटकणें; झटकन निघून जाणें.

सुडका-कें-पुन. १ जुनें वस्त्राचें फडकें; पटकूर; चिंधी. २ (निंदेनें) म्हातारा मनुष्य. ३ फक्त लंगोटी जवळ असलेला माणूस. -तुगा १८८१.

सुडबुड-स्त्री. सुटबुटु अर्थ २ पहा. **०णें**-अक्रि. लुडबुडणें; चुळबुळ करणें; गोंधळ उडविणें (उंदीर, मुलें यांनीं). **सुडबुडाट**-पु. गोंधळ; लुडबूड.

सुंडमुंडणें-अक्रि. (व.) डोक्यावर पांघरूण घेऊन निजणें.

सुंडमे की मुंडमें-क्रिवि. (व.) अविचारानें; निकरावर येऊन.

सुडसुडाट, सुडसुडीत-सुळसुळाट, सुटसुटीत इ० पहा.

सुडा-पु. (व.) अडकित्ता. [हिं. सरोता]

सुडावणी-स्त्री. १ गर्जना; ध्वनी; गजर. 'तंव अनुहताची सुडावणी। दुर्गामधोनि उठली।' -एभा ९.१२९. २ सुरवात. ३ मुक्तता. -ज्ञा १२.५४. [सुटणें]

सुडावणें-अक्रि. कठीण काम करण्यास पुढें होणें; धाडसानें पुढें सरसावणें. [सूड=शोध]

सुडी-स्त्री. कणिसांसहित जोंधळा, सजगुरा इ० धान्याच्या ताटांचा रचून ठेवलेला ढीग. गंज; गूड. २ गवताची गंजी, भारा, पेंढी. [सं. शंड]

सुढाळ-वि. १ चांगल्या घडणीचें-रचनेचें; सुरेख; सुंदर. २ तेजस्वी; चकचकीत; पाणीदार (मोती इ०). [सु+ढाळ=तेज]

सुणगार-पु. (बे.) चुना भाजणारा.

सुणा-णी-णें-पुस्त्रीन. कुत्रा-त्री-त्रें. [सं. श्वान] **म्ह०** (गो.) सुण्याक सिंहासनावर बसयलें, ताणें गोवरांत उडी घेतली. **०गांठ**-स्त्री. (कु.) कुत्र्याचें हेंडगूळ.

सुणा-णी-णें-वि. व्यर्थ; शून्य; निरर्थक. [सं. शून्य]

सुणें-अक्रि. रिघणें; शिरकाव करणें; घालणें. 'न रिगावें तेथ करणें। तोंडें सुती।' -ज्ञा १३.१२४; -एभा २३.५५४.

सुत-पु. १ पुत्र; मुलगा. २ (ल.) राजपुत्र-कुमार; शिष्य. 'तेथ महेशान्वयसंभूतें। श्री निवृत्तिनाथसुतें।' -ज्ञा १८.१८०५. [सं. सु=बाळंत होणें] **सुता**-स्त्री. मुलगी.

सु(सू)त-न. १ दोरा; धागा; सूत्र. २ नाकांत (नथ घालण्यापूर्वी भोंक रहावें म्हणून) घालावयाचा दोरा, धागा (त्या-

वरून). ३ –वि. सुताप्रमाणें सरळ, नीट. [सं. सूत्र] **सुतानें चंद्राला ओंवाळणें**–शुद्ध द्वितीयेच्या संध्याकाळीं भाविक लोक आपल्या वस्त्राचें सूत (दशा) काढून तें चंद्राला अर्पण करतात आणि तूं जसा पुन्हां नवा झालास तशीं आमचीं वस्त्रें नवीं होऊं दे अशी प्रार्थना करतात त्यावरून. **सुतानें सुत लागणें**–एका गोष्टीच्या योगानें दुसरी गोष्ट समजणें. (गो.) **सुतान डोंगर खेडावप**–डोंगराला सूत वेढणें. **सुतानें स्वर्गास गांठणें–जाणें–चढणें**–एखाद्या गोष्टीचा यत्किंचित् अंश समजल्यानें बुद्धिप्रभावानें ती गोष्ट पूर्णपणें तर्कानें जाणणें. **सुतास लागणें**–सुरळीतपणें चालू लागणें. **सुतासाठीं मणि फोडणें बरोबर नाहीं**–क्षुल्लक वस्तु बचावण्यासाठीं मूल्यवान वस्तूचा नाश करणें योग्य नाहीं. **सुतासुतानें**–लहरीनें; कलानें. **०काडी**–स्त्री. (कोष्टी) सूत गुंडाळावयाची काडी. **०कुर्डे**–न. (गो.) सुताचें गुंडाळें. **सुतड गोतड जुळणें–असणें**–एकमेकांचें गुह्य जमणें; (लांबचा) संबंध असणें. **०णें**–अक्रि. १ (व.) एखाद्या वस्तूभोवतीं सूत गुंडाळणें. २ (ल.) मारणें; ठोकणें. **०पुती–पुतळी**–स्त्री. (कर.) १ कापसाचा (जखमेवर लावावयाचा) मणी. २ स्त्रिया मंगलागौर, शिवामूठ इ० पूजेमध्यें वस्त्राकरितां विशिष्ट आकृतीचा कापूस करून वाहतात ती. **०पोत**–न. कापडाची वीण, पोत. **सुतर फेणी**–स्त्री. एक गुजराथी खाद्य पदार्थ. **सुतरा**–वि. शहाणा; धूर्त, तीक्ष्ण. **सुतव(वि)र्णे**–अक्रि. १ सुतांत गुंफणें, ओवणें; गोवणें. २ भोवतीं सूत गुंडाळणें (संक्रातीचीं सुगडें, वधुवर, पिंपळ इ०च्या). 'विप्रीं त्या सुतवूनियां निज करीं ते कंकणें बांधिती।' –अकक २ सी. स्व. १०२. लग्नांतील तेलफळ, रुखवतांतील लाडू इ०स सूत गुंडाळणें. **सुतळी(ळ)**–स्त्री. सुताची जाड दोरी. **०ळ्या लगाम**–पु. एक प्रकारचा लगाम. **सुताचा तोडा**–पु. १ सुताचा तोडलेला तुकडा, दोऱ्याचा तुकडा. २ (ल.) कःपदार्थ; अत्यंत हलक्या किंमतीची वस्तु. **सुताड पुनव**–स्त्री. (गो.) श्रावणी पौर्णिमा. **सुताडा**–पु. कापसाच्या सुतांचें विणलेलें जाड वस्त्र (लुगडें इ०), झोऱ्या, बोऱ्या. **सुताडें**–न. १ (निंदार्थी) सुताडा. २ फार दूरचें नातेंगोतें, आप्तसंबंध; नात्यागोत्यांचें जाळें; घरोबा; निकटचा संबंध. **सुताडेंगुताडें–गोताडें–गाताडें, सुताडगुताड**–१ सुताडें अर्थ २ पहा. २ दूरचे व्यापारी संबंध; एकमेकांचे गुंतागुंतीचे व्यवहार किंवा संबंध. ३ सुतांची गुंतागुंत. [सुत+गुतणें, किंवा गोत] **सुतार बांधणें**–(कर.) पतंगास दोरा बांधण्यासाठीं फांसा करणें. **सुतारा**–पु. (कोष्टी) मागाचा एक भाग; गुलडयाशीं समांतर असलेली काठी. **सुती**–स्त्री. १ प्रवेश, विस्तार–शर. २ (व.) एखाद्यावर दाब, वजन पाडणें; एखाद्याच्या धाकानें निमूटपणें वागणें, ऐकणें. –वि. १ कापसाच्या सुताचें केलेलें, तत्संबंधी. २ (ल.) सरळ; नीट; बिनचूक; पद्धतशीर; चोख. ३ ओळीनें, सम पातळींत असलेलें, कुशलतेनें मांडणी केलेलें; आवांक्यांतील. ४ (संख्यावाचक शब्द जोडून समासांत) कापडाचा पोत, वीण, तलमपणा दाखविणें. जसें–एकसुती, दोन सुती, जाड सुती, बारीक सुती. **सुतीव**–वि. वरील अर्थ २,३, पहा. **सुतेरा**–पु. कोळी नांवाचा किडा व त्याचे गुदापासून उत्पन्न होणारा तंतु, दोरा.

सु(सु)तक—न. अशौच; मृत माणसाबद्दल धरावयाचा विटाळ. [सं. सु=बाळंत होणें] **०तुला, सुतकाळा(ळ्या), सुतकी, सुतकील, सुतकाडो**–वि. सुतक आल्यामुळें अपवित्र झालेला.

सुतकी—स्त्री. पाथरवटाचें दगड फोडण्याचें एक हत्यार.

सुतणें—अक्रि. निजणें. 'शेजे तो मी सुतलों।' –तुगा १४२९. [सं. शी–शय; हिं. सोना]

सुत(ता)रनाल(ळ)सुत्रनाल—स्त्री. उंटावर वाहून न्यावयाची तोफ. [फा. शुतुर्नाल्] **सुतरस्वार**–पु. सांडणीस्वार (पत्रें इ० नेणारा). [फा. शुतुर्सुवार]

सुत(ता)राम्—क्रिवि. १ (मूलार्थ) पलीकडे, पुढें, अतिशयपणें. २ अगदीं, सर्वथा, सर्वस्वीं, सर्व तऱ्हेनें. ३ मुळींच नाहीं, कधींहि नाहीं (नकारार्थीच) उपयोग. [सं.]

सुतल–ळ—न. सप्तपातालांपैकीं तिसरें पाताळ. [सं.]

सुतला—स्त्री. (गो.) चोरी. **सुतलावप**–चोरी करून नेणें.

सुतसणें—सक्रि. घालणें; ठेवणें. –शर

सुंता, सुनत(ता)—स्त्री. शिश्नत्वचेचा छेद करण्याचा मुसलमानांचा एक धार्मिक विधि. [अर. सुन्नत्]

सुतार—पु. १ लांकडाचें काम करणारी एक जात व त्यांतील व्यक्ति. २ लाकूड कोरणारा एक पक्षी. [सं. सूत्रधार] **०काम**–न. सुताराचा धंदा किंवा त्यानें केलेलें काम. **०की**–स्त्री. सुतारकाम; खेड्यांतील सुताराचा बलुत्याचा हक्क. **०डा**–पु. (निंदार्थी) सुतार. **०मेट**–न. सुतारांचें दुकान, अड्डा.

सुताळ—स्त्री. एक जातीचा तांदूळ.

सुताळी—स्त्री. शोध; थांग; पत्ता. –तुगा २८३. [सूत्र]

सुतिर्णे—अक्रि. मारणें. –शर. [सूत्र]

सुती—(सांकेतिक) (मंडई) 'वीस' या संख्येचा सांकेतिक शब्द.

सुती—स्त्री. (गो.) १ गायीचें जननेंद्रिय. २ आई; जननी. ३ जन्मस्थान; उत्पत्तिस्थान. 'स्त्रीसुखाची आसक्ती।

तेचि वाढत्या दुःखाची सुती।' –एभा ७.५९७. [सं. सू= बाळंत होणें]

सुती—स्त्री. नाद; छंद; लोभ. –तुगा २१२७.

सुतौवाच—उद्गा. सांगण्यास किंवा बोलण्यास सुरुवात करणें या अर्थी वाक्प्रचार. बहुतेक पुराणें सूतानें शौनकादिक ऋषीस सांगितलीं आहेत त्यामुळें त्यांतील अनेक अध्यायांच्या, आरंभीं 'सूत उवाच' असे शब्द असतात त्यावरून. [सं. सूत+उवाच]

सुत्रा-त्री—वि. सुतरा पहा. शहाणा; धूर्त. [सं. सूत्र]

सुथारणें—उक्रि. सरळ व्यवस्थित करणें. सुधारणें पहा. [सं. सुस्थिर; सु+थारा]

सुदगत—स्त्री. शोध; विचारपूस; तपास; चौकशी. (क्रि० लावणें; लागणें). [शुद्धि; शोध+गति]

सुंदडणें, सुंदणें—उक्रि. (कों.) पायाखालीं तुडविणें; चिरडणें. [सं. सुदन]

सु(सू)दणें—सक्रि. (काव्य) देणें; घालणें. 'ऐसेनिहि विष होय सुदलें। नवज्वरीं देतां।' –ज्ञा २.१८४; –ज्ञा १.२६४. [सं. स्यूत] **सुदविणें**-आंत घालणें; शिरकविणें; प्रवेश करविणें.

सुदम—वि. माणसाळण्यास सोपा. [सं. सु+दमन]

सुदमुद—वि. (ना.) हुबेहुब.

सुंदर—वि. देखणा; रम्य; मनोरम; चांगला. [सं.] **सुंदरा-री**-स्त्री. १ सुंदर स्त्री. २ लहान वीतभर सनई, ही मोठ्या सनईच्या दुप्पट तीव्रतेनें वाजते; सतार, रुद्रविणा इ० वाद्यांस विवक्षित स्वरानुसंधानानें त्यांचे दांडीस जे पडदे बांधीत असतात ते प्रत्येकी. **सुदर्शन**—न. १ विष्णूचें चक्र. २ (ल.) व्याद; अरिष्ट; पाठीस लागलेलें लफडें. ३ चक्रांकित शालिग्राम. ४ अमरावती. [सं.] –वि. सुंदर. **०चूर्ण**-न. अनेक औषधें कुटून केलेली एक भुकटी.

सुंदल—स्त्री. (व.) लुडबूड.

सुदंश—वि. ज्ञाता; मार्मिक. 'तेथ अर्जुनु सुदंशु। म्हणोनि चमत्कारिला।' –ज्ञा ५.१६१.

सुदा—वि. शुद्ध; साधा; चांगला; सरळ; नीट; व्यवस्थेशीर. [सं. शुद्ध]

सुदाम, सुदामदेव—पु श्रीकृष्णाचा एक मित्र. हा रोड व दरिद्री होता. –वि. (ल.) रोड, दरिद्री (मनुष्य). [सं.] **०दरिद्र**-पु. अत्यंत दारिद्र्य. **०दरिद्री**-वि. फार दरिद्री. **सुदाम्याचें वस्त्र**-न. अत्यंत जीर्ण व फाटकें वस्त्र. **सुदामपुरी**-स्त्री. फार दरिद्री गांव. **सुदाम्याचे पोहे**-पु.अव. (सुदाम्यानें एक मूठभर पोहे श्रीकृष्णास दिले. त्याच्या मोबदल्यांत देवानें त्यास सोन्याचें नगर दिलें त्यावरून) दात्यानें आपल्या देणगीबद्दल बोलावयाचा विनयाचा शब्द; भाजीभाकरी. **सुदामे**-पु.अव. पोह्यांस सांकेतिक शब्द.

सुदामत—क्रिवि. १ सरळ; सरळपणें, सुखसंतोषानें; सुरक्षितपणें; सुस्थितींत; नुकसान न पावतां, इजा न होतां; बिनधोक (असणें, पोहोंचणें, पावणें इ० चें वि.). 'परंतु नावा सुदामत सांगतील, न सांगतील.' –ख १०.५३३८. 'ऐवज येणें त्यास तो सुदामत फडशा करीत नाहीं.' –ख ११.६००९. २ बिनत्रासानें, विनाझटपट, नियमितपणें, पूर्वीपासून, पूर्ववत, बिन हरकत (वागणें, नांदणें, देणें, बोलणें, चालणें इ०चें वि.). 'कोंकणचें मार्ग सुदामत, चालू लागले' –ख १०.५५३३८. –स्त्री. १ चाल, प्राचीन वहिवाट; सलोखा. 'घरोब्यानें ऐक्यतेनें उभयपक्षीं सुधामत चालवा.' –रा ८.१८१. [फा. शुदामद्]

सुदारणी-णूक-सुदारणें—सुधारणी इ० पहा.

सुदावणें—अक्रि. जड होणें. [सुंद]

सुदावा—पु. सुगावा पहा.

सुदिन, सुदिवस-दीस—नपु. १ कुयोग इ० नसलेला, मंगलकारक, शुभकारक दिवस. २ सणाचा दिवस. ३ इष्टवस्तूचा लाभ, संकटापासून मुक्ति, इष्टवार्ताश्रवण इ० घडण्याचा दिवस. [सं.] **सुदिस**-क्रिवि. (अशिष्ट) सर्व दिवसभर.

सुदीर—पु. (गो.) बाटग्या कुणबी, शूद्र. [सं. शूद्र]

सुदुर्लभ—वि. अत्यंत कठीण (मिळविणें, मिळणें इ० स). [सं.]

सुदूर याफ्तन्—सादर होणें; उद्भूत होणें. [फा.]

सुदृढ—वि. फार बळकट, मजबूत, गच्च बसविलेलें; कठिण; कणखर; सशक्त व मजबूत. [सं.]

सुध्दबुध्द—स्त्री. शुद्धी (ज्ञान); समजण्याची ताकद, जाणीव; मनाची सुस्थिति. [सं. शुद्धि+बुद्धि]

सुध्दां—शअ. १ सहित; बरोबर; संगतीनें; सकट. २ –क्रिवि. देखील. [सं. सार्द्धं]

सुध्दा—वि. (कों.) शुद्ध, साधा; एवढाच. 'हें तांबें सुद्धें सोनें.' [सं. शुद्ध]

सुंधडणें, सुंधणें—(कों.) सुंदडणें, सुंदणें पहा.

सुंधणें—उक्रि. सपाट होणें; समपातळींत येणें, आणणें.

सुधरणें—उक्रि. सुधारणें पहा. **सुधर**-वि. व्यवस्थित, सुधारलेलें. **सुधराई**-स्त्री. १ सुधारणा. २ (बडोदें) म्युनिसिपालिटी.

सुधर्मा—स्त्री. इंद्राची सभा. [सं.]

सुधा—स्त्री. १ अमृत. २ फुलामधील मध. ३ चुना. ४ रस, पाणी. ५ वीज. ६ शेर. ७ हरितकी. [सं.] **०कर, सुधांशु**-पु चंद्र. त्याची सत्रावी कला ती सुधाकरी. **०पाणी**-पु. ज्याच्या

अमृताचा कलश आहे असा देवांचा वैद्य; धन्वंतरी. ०रस-पु. १ अमृत. २ लिंबाचा रस साखरेच्या पाकांत घालून केलेलें एक पक्कान्न.

सुधा—वि. बरोबर; योग्य; बिनचुक; शुद्ध; सरळ. [सं. शुद्ध] म्ह० सुधा बोलरे नाऱ्या, बोडक्या झाल्या साऱ्या. ०भाव-पु. सरळ भाव.

सुधारणें—उक्रि. बरोबर, व्यवस्थित, करणें, रचणें, ठेवणें; सरळ, नीट, बरोबर, योग्य, दुरुस्त करणें; योग्य व व्यवस्थित रीतीनें पुरें करणें, संपविणें. –अक्रि. सरळ, बरोबर, योग्य होणें; अधिक चांगलें, टापटीपेचें होणें; सभ्य बनणें. [सं. शुद्ध; हिं. सुधारना] **सुधारक**-पु १ दोष नाहींसे करूं पाहणारा. २ समाजामध्यें नवीन गोष्टी आणूं पाहणारा; परंपरेस सोडून नवीन आचारविचारांस अनुसरणारा. **सुधारणा-णी-णूक, सुधारा**-स्त्रीपु. १ योग्य, व्यवस्थित मांडणी; व्यवस्था; दुरुस्ती; अधिकाअधिक पूर्णत्वाकडे जाण्याची किंवा नेण्याची क्रिया. २ परंपरेस सोडून नवीन गोष्टींची समाजांत प्रस्थापना; पुराण प्रियतेविरुद्ध बंड.

सुधी—पु. १ पंडित, विद्वान शहाणा माणूस. २ तीक्ष्ण व उत्तमबुद्धीचा मनुष्य. –वि. बुद्धिवान; शहाणा. [सं.]

सुधीर—वि. मजबूत; बळकट; धाडशी; निर्भय; दृढ; खंबीर मनाचा. [सं.]

सुनका—वि. सुना पहा. [सं. शून्य] **सुनबहि(ह्य)री**-१ कातडीचें स्पर्शज्ञान नाहींसें होणें. २ रगतपिती; महाव्याधि. **सुनसान**-स्त्री. सामसूम. **सुना-नें**-वि. १ रिकामा-में. २ ओका; नागवा उघडा; निष्फळ; ओसाड; व्यर्थ; मोकळा. ३ उदास; शून्य; अभावयुक्त. (क्रि० जाणें=तोटयाचा असणें, वांझ असणें, व्यर्थ जाणें). **सुनाट**-वि. सुना; व्यर्थ; शून्यरूप; स्वैर. –क्रिवि. स्वैरपणानें. **सुनावा पडणें**-मोकळा पडणें. **सुनो**-क्रिवि. शून्यरूपानें. **सुन्न**-वि. बधिर (कातडी, अवयव). **सुन्न पडणें**-(व.) निश्चल पडणें; बधिर होणें; मूर्च्छित होणें. **सुन्न होणें**-(व.) थक्क होणें.

सुनत-ता—स्त्री. सुंता पहा.

सुना—पु. एक जातीचें झाड.

सुनावणी—स्त्री. स्पष्टीकरण; कथन; न्यायाधिशापुढचें फिर्यादीचें वाचन; वादीप्रतिवादींचा वगैरे जबाब **सुनाविणें**-उक्रि. १ ऐकविणें. २ कानउघाडणी करणें. [हिं. सुनाना]

सुनील—वि. निळया ढगाच्या रंगाचा. [सं.]

सुनें—न. कुत्रें. [सं. श्वान]

सुपक्व-क्क—वि. (बायकी) चांगलें शिजलेलें; चांगलें पिकलेलें. [सं. सुपक्व]

सुपडें(ली), सुंपली—नस्त्री. लहान सूप. [सूप]

सुपतळ—न. सुकतळ पहा.

सुपती—स्त्री. १ पाथरवटाची हातोडी; सुतकी. २ एक फूलझाड; सुपी.

सुप(पे)ती—स्त्री. निजण्याची गादी, चटई, बिछाना. 'बाजावरी सुपती।' –तुगा १९२. [सं. स्वप्]

सुपथ—पु. १ चांगला रस्ता, वाट. २ (ल.) सन्मार्ग. (क्रि० धरणें; घेणें; सोडणें). [सं.]

सुपरिणाम—पु. चांगला शेवट, अखेरी. –वि. अनुकूल परिणामाचा. [सं.]

सुपरीत—वि. सरळ; बरोबर; व्यवस्थित; नियमित; योग्य; पसंत. २ विपरीतच्या उलट; सुलटें. [सं.]

सुपर्ण—पु. गरुड. [सं.]

सुपली—स्त्री. १ गोकर्णीचा वेल व फूल; ही निळी व पांढरी असते. २ सुपडें पहा.

सुपळाष्ट, सुपाष्ट—वि. (व.) स्पष्ट. [सं. स्पष्ट]

सुपाऊस—पु. फायदेशीर होणारा पाऊस किंवा त्याची सर.

सुपाणी-नी—न. नाकांतील एक जातीची, बहुधां एका मोत्याची नथ; सुंकलें. 'भीमकी नाकींचें सुपाणी।' –एरुस्व ७.३३. –वि. पाणीदार. [सं.]

सुपात्र—पु. दान, मान देण्यास लायक माणूस. [सं.] ०दान-न. वरील प्रकारच्या माणसास द्यावयाचें दान किंवा तें देण्याची क्रिया.

सुपारी—स्त्री. पूगीफल; पोफळीचें बीं; पोफळ व त्याचें फळ. सुपारीचे पुढील प्रकार आहेत:-ओली सुपारी=कच्ची सुपारी; पांढरी-रोंठा-रोठी सुपारी=पक्की व टणक झालेली काढून वाळविलेली सुपारी; चिकणी सुपारी=कच्ची व मऊ असतां काढून, दुधांत शिजवून, सावलींत वाळविलेली सुपारी; दगडी सुपारी=शिजवून कटीण करून तिच्याच पाण्यांत भिजवून उन्हांत वाळविलेली; फुलबरडी-बरडी सुपारी=अर्धवट पक्की असतां काढून, शिजवून उन्हांत वाळविलेली. [सं. सु+पारी=खोबरें] म्ह० १ तारवांत अर्धी सुपारी=सर्व गलबतांतील माल दुसऱ्याचा असतां आपलें एक सुपारीचें खांड टाकून एकंदर मालांत आपला वाटा आहे असें प्रतिपादणें. २ (बे.) सुपारी इतकें खाते, दुपारीं परसाकडे जाते=नाजूक प्रकृतीचें माणूस. **सुपारीचें फूल**-न. सुपारीचे काप बिब्याच्या तेलांत तळून केलेलें एक औषध. ०देणें-मंगलकृत्य, गोंधळ इ० प्रसंगीं ब्राह्मण, गोंधळी इ०कांस त्याचा प्रारंभ करण्यासाठीं सुपारी देऊन (पुन्हां फिरणार नाहीं याअर्थी) निश्चित करणें, नेमणें; आमंत्रण देणें. ०सोडणें-

(बायकी) लग्नांत वधूनें वराच्या किंवा वरानें वधूच्या मुठींत किंवा चिमटींत धरलेली सुपारी सोडवून बाहेर काढणें. **०घाट**–पु. मोतीं अगर इतर रत्नें यांचा सुपारीसारखा आकार; यांचें विशेषण सुपारी घाटी.

सुपिंड—वि. बळकट; दणकट; कणखर. [सं.]

सुपी—स्त्री. सुपती अर्थ २ पहा.

सुपीक—न. चांगला हंगाम; सुगी. –वि. चांगली पिकाऊ (जमीन).

सुपुत्र—पु. कर्तव्यपरायण व प्रेमळ मुलगा. [सं.]

सुपूर्द-र्त-सुप्रत—क्रिवि. हवालीं; ताब्यांत; स्वाधीन. (क्रि० करणें). [फा.]

सुपेती—स्त्री. सफेदी.

सुप्त—वि. १ निजलेला. २ बधिर; स्पर्शज्ञानहीन. [सं.]

सुप्ति–स्त्री. १ झोंप, निद्रा. २ गुंगी; ग्लानि; बधिरता.

सुप्रभात—न. पहांट; सकाळ; उषःकाळ. –क्रिवि. पहांटे; उजाडतांच; सुप्रभातीं. [सं.]

सुप्रयुक्त—वि. उत्तम, यथायोग्य ज्याची योजना केली आहे तो; चांगलें रचलेलें; ठेवलेलें. –क्रिवि. व्यवस्थितपणें, साजेलसें (भाषण, कृत्य). [सं.]

सुप्रयोग—पु. योग्य संबंध, जोडणी, दिशा, प्रसंग. [सं.]

सुप्रसन्न—वि. अतिशय आनंदित; खुष; संतुष्ट. [सं.]

सुफराटणें, सुफारटणें—अक्रि सुलटें, योग्य, सरळ, उजू करणें; उफराटयाचे विरुद्ध करणें किंवा होणें. **सुफराटा, सुफारटा**–वि. सुलटा; सुरफाटा; सरळ; उजू; बरोबर. [सं. सुपरीत]

सुफल—न. १ बाण, सुई इ० चें टोंक, अग्र. २ खांच, खाप; खोंगा. [सु+फळ]

सुफल-ळ—वि. चांगलें फळ, शेवट देणारें, येणारें; चांगलें फळ आलें आहे असें (झाड); लाभकारक; फायदेशीर (धंदा, उद्योग). ३ सुपरिणामकारक फलदायक, (उपाय, योजना). [सं.]

सुफी—पु. मुसलमानांतील एक गूढवादी पंथ. [फा.]

सुफेदठग—वि. (व.) पक्का लबाड. [हिं.]

सुफेदसुरमा—पु. डोळयांत घालावयाचें एक औषध. [हिं.]

सुफेन—न. समुद्रफेस; एक औषध. [सं.]

सुंब-भ—न.पु. नारळाचे कवचीवरचे तंतु; काथ्या, ताग, अंबाडी, मोळ इ०च्या तंतूंची विणलेली दोरी. **म्ह०** सुंभ जळे पण वळ न जळे=सुंभ जळाला तरी पीळ जळणार नाहीं. गर्विष्ट किंवा हट्टी माणसाचें नुकसान झालें तरी त्याचा ताठा किंवा हट्ट जात नाहीं. [सं. शुल्ब] **०खंड-डी-सुंबाडी**–न. स्त्री. काथ्याचा तुकडा. **०णें**–अक्रि. खाट, पाळणा इ. सुंबानें विणणें.

सुंब-म—पु. घोडा, गाढव यांचा खुर. [हिं. सुम **०तराशी-सी**–स्त्री. खुराच्या नख्या काढणें. **सुंबतराश-स**–पु. घोडा, गाढव यांच्या नख्या तासून साफ करणारा मनुष्य.

सुबक—वि. लहान पण चांगल्या घाटाचें; छानदार; सुंदर; नीटनेटकें; सुटसुटीत; बांधेसूद, आटोपशीर, शरीर, ओझें, गठ्ठा. [फा. सबक]

सुबकणें—सक्रि. चुबकणें पहा.

सुबत्ता—स्त्री. शांतता व समृद्धता; विपुलता (धान्य, गांव; इ० चा); स्वस्थता; सवंगाई. [हिं.] **०काळ**–पु. भरभराटीचे दिवस; अनुकूल काळ, हंगाम; शुभकारक दिवस.

सुबद्ध—वि. बळकट, चांगलें बांधलेलें; मजबूत; घट्ट. [सं.]

सुबरा, सुब्रा—पु. (नंदभाषा) एक रुपाया. [सं. शुभ्र= पांढरें]

सुंबा-भा—पु. दगडी शिळा फोडण्याचा जंगी लोखंडी घण. २ तोफ ठासण्याची ठोकणी. ३ घोडयाचा खूर. **सुंबेकरी**–पु. वरील घणानें काम करणारा, दगड फोडणारा मनुष्य.

सुबा, सुबेदार—सुभा, सुभेदार इ० पहा.

सुबाईक—न. सुबत्ता पहा. [सुभिक्ष]

सु(सुं)बारा-सुंबाल्या—पु. (सोंगटयांच्या खेळांतील एक शब्द); फसवून पळून जाणें; निसटणें; दूर पळून जाणें. (क्रि० करणें.) [सु+बारा]

सुबिकी—स्त्री. कमीपणा; हलकेपणा; अप्रतिष्ठा. [फा. सुबकी]

सुंबी चाक—न. चार जाड आरे असलेलें चाक.

सुबुध्द-ध्दि—वि. हुशार; बुद्धिमान; शहाणा; धूर्त. [सं.]

सुबोध—पु. चांगला उपदेश, सल्ला, शिकवणूक. [सं.] –वि. समजण्यास चांगलें; बाळबोध; सोपें; साधें; सहज शिकविण्यासारखें.

सुंभ—पु. कंजूष माणूस. [अर. शूम]

सुंभ—पु १ एक दैत्य. २ (ल.) त्यावरून आळशी व मूर्ख माणूस. [सं. शुंभ]

सुंभ, सुंभखंड-डी, सुंभणें, सुंभतराश-शी, सुभत्ता, सुभत्ताकाळ, सुंभा सुंभाडी—सुंब इ० पहा.

सुभक-ग—वि. सुबक पहा.

सुभक्त—वि. पूजनशील, आदरशील, भक्ति करणारा; भक्ति बसलेला. [सं.] **सुभक्ति**–स्त्री. पूज्यता; आदरणीय प्रेम.

सुभग—वि. १ दैववान; नशीबवान. २ सुंदर. [सं. सु+ भग=दैव] **सुभगा**–स्त्री. भाग्यशाली स्त्री.

सुभट—वि. १ चांगल्या घाटाचें; मोठें. २ भव्य; चांगलें, सुरेख. ३ शूर. [सं.]

सुभद्र—वि. सुखी; संतुष्ट. 'कुसाचें सुभ गायेन मांडोनि। सुभद जाहाले।' –ख्रिपु २.४१.१८२. [सं. सुभद्र]

सुभर—वि. उत्तम भरलेलें. [सं. सु+भृ]

सुभा—पु. १ प्रांत; देश २ प्रांताधिकार. ३ प्रांताधिकारी. ४ (सांकेतिक) विटाळशी स्त्री. [फा. सुबा] **०पेटा**–पु. सुभेदाराच्या हाताखालील पेटा. **सुभेदार**–पु. सुभ्यावरील अधिकारी; गव्हर्नर. २ (इं.) इंग्रजी सैन्यांतील एक देशी अधिकारी. **सुभेदारी**–स्त्री. सुभेदाराचें काम व हुद्दा. **सुभे लष्कर**–न. सेनापती व शिपाई इ० ची नेमणूक, नोंदण्याचें हिशेबी सदर.

सुभाज—वि. पुरता भाजलेला (पापड, धान्य इ०). [सु+भाजणें]

सुभावणा—वि. दिसण्यांत सुरेख; छानदार; सुंदर; देखणा.

सुभाष—वि. चांगलें बोलणारा. **सुभाषित**–न. १ चांगलें भाषण, वक्तृत्व. २ विनोदपर किंवा बोधपर सूत्रवचन. –वि. चांगलें लिहिलेलें, बोललेलें. [सं.]

सुभित्ता, सुभित्ताकाळ—सुबत्ता इ० पहा.

सुभिक्ष—न. सवंगाई; विपुलता; समृद्धि; स्वस्ताई (धान्य इ० ची). –वि. स्वस्त; मुबलक. [सं.] **०ता**–स्त्री. सवंगाई; समृद्धि.

सुम—न. फूल; पुष्प. [सं.]

सुम—वि. (ना.) कंजूष; कद्दू. [अर. शूम]

सुमंत—पु. अष्टप्रधानांतील एक प्रधान. [सं. सुमति]

सुमधुम—क्रिवि. तडक; सरळपणें; दोरीसूत (रस्ता, रांग); स्पष्ट; उघड; स्वच्छ. [धूम द्वि.]

सुमन—पु. १ गहू. २ देव.

सुमन—न. १ चांगलें मन. २ फूल. [सं.]

सुमनस्क, सुमना—वि. १ चांगल्या, सुखी मनाचा; प्रक्षुब्ध नसलेल्या मनाचा. २ अनुकूल मनाचा; प्रवृत्तीचा. [सं.]

सुमरू—न. स्मरण. –शर.

सुमसाम—स्त्री. शांतता; स्तब्धता. –क्रिवि. मुकाटयानें; शांततेनें. [सं. शून्य, शान्त; हिं. सुन-सान]

सुमार—पु. अजमास; अंदाज; गणती; साधारण संख्या; तर्क. (क्रि० पहाणें; काढणें; करणें; बांधणें; येणें; दिसणें; होणें). २ बेसुमार किंवा अंदाजाबाहेरची संख्या. ' विहिरीला पाण्याचा सुमारच नाहीं.' ३ किमान मर्यादा; मध्यम प्रमाण ' हा सुमारानें बोलतो. ' ४ निकटपणा; सांनिध्य ' पौर्णिमेच्या सुमारावर या. ' ५ मर्यादा; काळ. ' हा घोडा बसकणेच्या सुमारास आला. ' ६ भान; शुद्धि. ' एवढा वेळ भलतेंसलतें बोलत होता, आतां सुमारावर आला. ' ७ प्रमाण; नेम; बेत. ८ रोंख. –वि. वाईट; मध्यम प्रकारचें. ' हे आंबे सुमार आहेत. ' [फा. शुमार] **सुमाराचा**–वि. साधारण; मध्यम प्रकारचा. **सुमारणें**–अक्रि. १ मर्यादेंत येणें, असणें. २ अंदाजापेक्षां जास्त होणें, भरभराटणें (पीक, धंदा). ३ किंचित फुगवटी येणें. **सुमार माफक-बट**–वि. सुमाराचा. **सुमारी**–वि. संख्येनें मोजतां येण्यासारखें, मापीच्या उलट. गणनीय; संख्यावाचक. १ –स्त्री. सुमार पहा (अर्थ ३,४ सोडून). २ गणना; गणती. ' खानेसुमारी. ' झाडसुमारी, गांवसुमारी, शेतसुमारी. **सुमारें**–क्रिवि. अंदाजें.

सुमुहूर्त—पु. शुभकार्य, उपयोगीं ग्रहबलादिकेंकरून उत्तम प्रकारचा दिवस, वेळ. [सं.]

सुमेरु—पु मेरु पर्वत. [सं]

सुयका—वि. (व.) सुलटा; सरळ.

सुयटा-टी, सुयरा—पु.स्त्री.पु. केळी–नारळीचा कोंभ, बारीक पानांची सुरळी. [सुई] **सुय(या)रणें**–अक्रि. (कों.) वरील कोंभ, एखाद्या रोगानें जळून जाणें.

सुयंत्र—वि. सुव्यवस्थित; सुरळीत. [सं.]

सुयाण-णें—न. सुकाळ. –ज्ञा ११.३३८.

सुयाणा—पु. (कर.) सुईदोरा ठेवण्याची डबी [सुई]

सुयेर-सुयेरणें—सुवेर; सुवेरणें पहा.

सुर—पु. देव; देवता. [सं] **०गुरु**–पु. देवांचा गुरु, बृहस्पति; गुरूचा तारा. **०तरु-द्रु-द्रुम**–पु. कल्पवृक्ष. **०धनु**–न. इंद्र धनुष्य. **०नदी-सरी-सिंधु**–स्त्री. १ आकाशगंगा; भागीरथी **०पति**–पु. देवराज; इंद्र. **सुरभि**–स्त्री. कामधेनु ' विषाद धरिला म्हणो न सुरभी विष क्षीर वी ' –केका ४. **सुरयुवती**–स्त्री. देवांगना; अप्सरा. **०लोक**–पु. स्वर्ग; देवलोक. **०वाड**–पु. १ मोठेपणा; थोरवी; महात्म्य. २ शोभा, शृंगार, सुख. ३ सुकाळ; पूर; रेलचेल. ४ स्वतंत्रता; अनुकूळता. ५ मर्जी. –वि. शुद्ध, चोख. **०वाडा**–पु. देवाच्या शौर्याचें वर्णन, स्तोत्र, गाणें, पवाडा. (क्रि० गाणें; म्हणणें). **०वाडणें**–अक्रि. आनंदित होणें; शोभणें; प्रफुल्लित होणें.

सुरई—स्त्री. चंबू; खुजा; उभें लांबट व चिवळ मानेचें पाण्याचें भांडें. [सं. सुरा. हिं. सुराही]

सुरई—स्त्री. कटयारीसारखें कमरेंत खोंचण्याचें एक शस्त्र. ' सुरई मारती हातहातात। ' –ऐपो २८३. [हिं. सुराही]

सुरई, सुरई पीक-धान्य-धान-भात—स्त्री.न. कोंकणी खलाटींतील सर्व प्रकारचें पीक. लंवग-वेलदोडे–जायफळ–केशर इ० सुवासिक पीक प्रत्येकीं. **सुरईभात-तांदुळ**–न पु. अव. (कों.) उकडे नसलेले तांदुळ.

सुर-कण-कन-कर-दिन-दिनीं-दिशीं—क्रिवि. झटकन, भरदिशीं (उडवावयाची दारू, पोहण्यांतील सुरकांडी इ० स अनुलक्षून). [ध्व.]

सुरकंडी-कांडी-कुंडी—स्त्री. १ माशासारखा आकार करून पाण्यांत बुडी मारणें; गदींत मुसंडी मारणें. (क्रि० मारणें;

देणें). २ द्रव पदार्थाची (दारु इ०) एकदम वर आलेली सुरळी, प्रवाह. [ध्व.]

सुरकणें—अक्रि. १ सूँर, फुर्र असा आवाज करणें. २ (ल.) गर्दीतून झटकन निसटून जाणें; मुसंडी मारणें. [ध्व.]

सुरकरी—पु. १ तमाशांतील गाणाऱ्याला सुराची साथ देणारा. २ सुर हें वाद्य वाजविणारा. [सुर]

सुरकवडी—स्त्री. एक खेळ.

सुरकांड—स्त्री. (व.) ओळ; रांग (क्रि० मारणें=सरळ धांवणें). [सूर]

सुरकी—स्त्री. भाजलेली ताजी वीट. –मॅरट ८. [फा. सुर्ख=तांबडा]

सुरकु(क) (खु)ती—स्त्री. वस्त्र, चामडें इ० वरील चुणी, वळी, चिरमी; आकुंचन. [का. सुर्कु] **सुरकुतणें**–अक्रि. सुरकुत्या पडणें.

सुरक्या—पु. १ सुरवाद्य वाजविणारा. २ (आटयापाट्यांचा खेळ) मुरदुंग्या; मूयदंड. [सुर]

सुरक्या-रख्या—पु. (गंजिफा) ज्या चित्रापासून खेळाचा प्रारंभ होतो तें चित्र. हें दशावतारांपैकीं दिवसां रामाचें व रात्रीं कृष्णाचें मानितात. [सुरू=प्रारंभ]

सुरखा-मुरखा—पु. अफूच्या झाडावरील एक किडा.

सुरखाई, सुरखी—स्त्री. १ तांबडया रंगाची तकाकी, तेज (कपडा, चामडी इ० वरील) लाली, गुलाबी झांक. २ औषध, जाघ्रण इ० मुळें डोळयांत आलेला तांबूसपणा. ३ फूल, वनस्पती इ० चा तजेला. (क्रि० येणें). [फा. सुरखी=तांबडेपणा]

सुरखाई—स्त्री. सुंदरपणा; सुरेखपणा. [सुरेख]

सुरखाब—न. लहान पाणबदक.

सुरंग-गो—स्त्री. रक्तचंदनाचें झाड. ' जैसें सुरंग तैसें तुझें अंग।' –ह १.३४ [सं]

सुरंग—वि. चांगल्या रंगाचा. [सं.] **०ता**–स्त्री. लालपणा.

सुरं(रुं)ग, सुरुंगा—पु. भुयार, विवर, किल्ल्याचा तट इ० उडवून देण्यासाठीं जमीनीच्या पोटांत भुयार खणून त्यांत स्फोटक दारू भरून तयार करणें, किंवा तसलें भगदाड; तटाखालून बाहेर जाण्यायेण्यास तयार केलेला चोर मार्ग. (क्रि० पाडणें; करणें). [सं.]

सुरंगधातु—पु. गेरु. [सं.]

सुरगांठ—स्त्री. सहज सुटण्यासारखी गांठ; निसरगांठ.

सुरंगी—स्त्री. खाणीच्या कामांतील पहार. –वि. सुरुंग खणण्याच्या उपयोगी. [सं. सुरुंग]

सुरंगी—स्त्री. देवपुन्नाग नांवाचा एक सुवासिक फुलांचा वृक्ष; त्यापासून काढलेलें अत्तर.

सुरंगी—स्त्री. झारी. ' पसरी मुखसुरंगी।' –गुच (पाठभेद) १.१०८.

सुरंज—पु. १ सुरंजी झाडाचें मूळ. रंगकामांत याचा उपयोग होतो. २ रक्तचंदनाचें लांकूड. **सुरंजी**–स्त्री. रक्तचंदनाचें झाड. –वि. रक्तचंदनाच्या रंगानें रंगविलेलें. [सं. सुरंज]

सुरंजन, सुरंजनमिश्री—स्त्री. एक औषध. [अर.]

सुरट—पु. (राजा.) शेताच्या बांधांत पाणी येण्यासाठीं ठेवलेलें लहानसें भोंक.

सुरट, सुरंट—पु. न. सुरवंट पहा.

सुरड—स्त्री. (व.) सपैणाची गाडी; सपैण.

सु(सू)रण—पु. एक खाजट कंद; मूळव्याधीवर याची भाजी खातात. [सं. सुरण]

सुरत—न. १ मैथुन. २ (ल.) ऐक्य. [सं.] **०क्रीडा**–स्त्री. मैथुन; संभोग. **सुरती**–वि. मैथुनविषयक.

सुरत—स्त्री. १ चेहरा; सौंदर्य; प्रतिमा; पुतळा; रूपरेषा. २ हकीकत; तऱ्हा; स्थिति; प्रकार. ३ गांठ. ४ (ल.) हिंमत; स्वरूप [अर. सुरत्] **०पाक**–वि. सुंदर व तेजस्वी चेहऱ्याचा; सुस्वरूप; देखणा. **०हाल**–पु. हकीकत; कैफियत रडकीसुरत=रडण्या तोंडाचा. **म्ह०** सुरतेचा भला कमरेचा ढिला–सुंदर पण निर्बळ असा.

सुरती—वि. सुरत गांवासंबंधीं. उ० सुरती एरंड, सुरती भुईतरवड सुरती, सुरतीचुना, मोतीं=हें बहुमोल व तेजस्वी असतें.

सुरत्वान—वि. सुंदर. ' प्रतिमा सुरत्वान नाहींत.' –ख ४७९३. [अर. सुरत+वान]

सुरत्या, सुरवास, सुरनीस—वि. गाण्यांत, सुर देऊन साथ करणारा. [सूर]

सुरदार—वि. सुरूच्या झाडाप्रमाणें उंच व सुंदर [सुरु=झाड]

सुरना—पु. (व.) तपास; पत्ता; बातमी.

सुरनीस, सुर्नीस—पु. सरकारी सनद, वरात, कौल इ० वर ' सुरू सुद, बार ' हे तीन शब्द लिहिणारा एक सरकारी कामगार; यालाच पुढें संस्कृतांत सचिव हें नांव दिलें गेलें. [फा. सरु+नविष्]

सुरपणें—अक्रि. (कों.) भुरलें किडयांनीं (भात इ०) खाऊन पोकळ होणें.

सुरपाटी—स्त्री. (आटयापाट्या) मधली थेटपर्यंत जाणारी पाटी, मुरदुंग्याची पाटी. **सुरपाट्या**–पु. मुरदुंग्या. [सूर]

सुरपारंबी-बा-ब्या—स्त्री. झाडावर सरसर चढावयाचें, खालीं धावत धावत उतरावयाचें आणि सुर नांवाची काठी फेका-

वयाची असा मुलांचा एक खेळ. (क्रि० करणें=ओढाताण करणें, कमी लेखणें).

सुरफाक—पु. (संगीत) एक ताल.

सुरफाटणें, सुरफाटा—सुफराटणें, सुफराटा इ० पहा.

सुरफुरें—वि. १ भरपूर. 'ऐसें प्रेमरसें सुरफुरें । '—ज्ञा १५. ६८. २ सूचक.

सुरबंद—स्त्री. एक औषधी वनस्पति, हिनें पोटदुखी, जंत यांचा नाश होतो. [सूळ+बंद]

सुरबुर, सुरबुरणें, सुरबुराट—सुडबुड इ० पहा.

सुरबुसाण—पु. (गो.) स्वादिष्टपणा.

सुरभि—वि. १ सुगंधी; सुवासिक. २ संतोषदायक. [सं.]

सुरम, सुरम(मा)ई—स्त्री. एक जातीचा मासा. **सुरमट**—वि. खमंग; स्वादिष्ट; वरील मासा घालून तयार केलेला (पदार्थ).

सुरमा, सुर्मा—पु. १ डोळ्यांत घालावयाचें एक मोत्याच्या चुराचें केलेलें अंजन. २ शिबें नांवाचा शरीरावर पांढरे चट्टे पडणारा एक रोग (क्रि० फुटणें, पसरणें). ३ सुरम नांवाचा मासा.

सुरमाड—पु. एक जातीचें माडाचें झाड; भेरळ; याच्यापासून दारू तयार करतात; याच्या खोडाचे पन्हाळ करतात. याच्या बियांना सुरमाडाची सुपारी म्हणतात. [सुरा+माड]

सुरमी—स्त्री. १ फार जेवण झाल्यानें येणारी सुस्ती, झोंपण्याची सुरसुरी. २ सुरम मासा. ३ सुरमा अर्थ २ पहा. [सुर ! सुर ! ध्व.]

सुरय-यी—स्त्री. सुरई पहा.

सुरल—न. (नाविक) पाण्यांतील खेकडयानें गलबताच्या तळास पाडलेलें बारीक भोंक.

सुरवं(विं-वें)ट—पु. घुला; कुसरूड; जो चावला असतां खाज सुटते असा एक केसाळ किडा.

सुरवा—पु. (कु.) मांस, हरभरे इ० चा रस्सा. [फा. शुर्बा]

सुरवा—पु. केळी, नारळी इ० झाडांस फुटणाऱ्या नवीन सुरळी. कोंब. २ शेव करण्याचें पात्र; सोऱ्या.

सुरवाडिक—वि. १ सुखदायक. २ महत्त्वकारक. [सं. सुख] **सुरवाडें**—न. सुख; अनुकूलता; सुकाळ.

सुर(रु)वात—स्त्री. प्रारंभ, आरंभ; प्रथम उपक्रम.

सुरवार-रां—स्त्री. कमरेजवळ सैल व खालीं निमुळता होत गेलेला, पोटरीपासून तंग बसणारा पायजमा; विजार; पायचोळणा. [फा. शुल्वार्]

सुरवारी हिरडा—पु लांब व मोठा, औषधोपयोगी हिरडा.

सुरस—वि. चवदार; रसाळ; स्वादिष्ट; रसभरित; मधुर; मिष्ट.

सुर(रु)सन (न)—पु. एक मुसलमानी शक. हा इसवी सन ५९९ किंवा शालिवाहन शक ५२१ या वर्षी सुरू झाला. हा मृगनक्षत्र लागतें तेव्हां (बहुधा ६ जून) सुरू होतो, म्हणून यास मृगसाल किंवा अरबीसाल म्हणतात. यामध्यें ९ मिळविले म्हणजे फसली साल येतें. [अर. शुहूर=महिने]

सुरसा—पु. दोन्ही बाजूंस टोकें असलेला लांब खिळा, किंवा बांबूची केलेली खीळ.

सुरसा—पु. डाळिंबाच्या फळावरील एक रोग.

सुरसाबीज—न. सबज्याचें बी.

सुर सिंघार—पु. रबाबप्रमाणें असलेलें एक वाद्य. [सुर+शृंगार]

सुरसी—स्त्री. प्राप्ति. -शर.

सुरसुर-रां—क्रिवि. स्फोटक दारू फुटण्याच्या वेळीं होणाऱ्या आवाजाप्रमाणें. [ध्व.] **सुरसुर**—स्त्री. १ सुरमी १ पहा. २ स्फोटक दारू उडतांना होणारा सुर्र असा आवाज. ३ हातापायांस मुंग्या येणें; रिवरिव. [ध्व.] **०णें**—अक्रि. १ वरील दारूचा सुरसुर असा आवाज होणें. २ अवयवांस मुंग्या येणें; मरगळ येणें. **सुरसुरां(रें)**—पुन. (गो.) गोवराच्या जातीचा एक रोग. **सुरसुरी, सुरसुर**—स्त्री. १ भुईनळ्यासारखा शोभेच्या दारूचा एक प्रकार. २ सुस्ती. ३ सुरमी पहा, (क्रि० येणें). **सुरसेप**—पु. एक जातीचा स्फोटक द्रव्य भरलेला गोळा.

सुरसोटा—पु. तंबोऱ्यासारखें बिन भोपळ्याचें एक सोटयासारखें तंतुवाद्य. [सूर+सोटा]

सुरळ—वि. गाडीची मागील बाजू जड असणें; सुलार पहा.

सुरळी—स्त्री. १ कागद, वस्त्र इ० ची वळकटी. २ बायकांचें एक रेशमी वस्त्र. ३ एक प्रकारचा रोग. [सु+वळणें]

सुरळीत—वि. सरळ; बिनघोक; निर्बाध; व्यवस्थित; अडचणीविरहित; वक्रोक्ति-गूढ इ० ज्यांत नाहीं असें (भाषण, श्लोक इ०) -क्रिवि. व्यवस्थितपणें; मोकळेपणें; निष्कपटपणें (क्रि० जाणें; चालणें; वर्तणें) [सं. सरलित]

सुरक्षण—न. व्यवस्थित राखणें, सांभाळणें. [सं,] **सुरक्षित**—वि. सुखरूप; व्यवस्थित; चांगलें राखलेलें, सांभाळलेलें; निर्धास्त.

सुरा—पु. एक प्रकारचा खंजीर; मोठी सुरी. [हिं.]

सुरा—स्त्री. (बे.) सुळा; केळीचा कोंवळा कोंब; मोना.

सुरा—पु. (खान.) मडकी ठोकण्याचें थापटणें.

सुरा—पु. मुसलमानांच्या कुराणग्रंथाचा खंड. [अर. सुरा]

सुरा—स्त्री. १ मद्य, दारू पिण्याचें भांडें, सुरई. [सं.]

सुराख—पु. शोध; पाळत; बातमी; सूचना. २ भोंक; छिद्र. [फा. सुराघ्]

सुरा (=या) खार—पु. एक प्रकारचा क्षार, सोरा. [सं. सूर्यक्षार]

सुरांगना—स्त्री. देवस्त्री; देवांगना, अप्सरा. [सं.]

सुराचार्य—पु देवांचा पुरोहित; वृहस्पति. [सं.]

सुराज्य—न. चांगलें, जुलमी नसलेलें, व्यवस्थित पद्धतीचें राज्य. [सं.]

सुराणा—पु (व.) आवाज. [सं. स्वर; सुर]

सुराणी—स्त्री. १ आवड. २ उपभोग. –तुगा २६८४.

सुरापान—न. मद्यपान; दारू पिणें. [सं.] **सुरमंड**–पु. दारू तयार करतांना त्यावर येणारा फेस, तवंग. **सुरामेह**–पु. प्रमेह पहा.

सुरालय—पु. १ स्वर्ग. २ मेरु पर्वत; पृथ्वीच्या अक्षाचें टोंक. [सं. सुर+आलय=घर]

सुराष्ट्र—पु. काठेवाड देश; सुरत प्रांत. [सं.]

सुरी—स्त्री. मोठा दुधारी चाकू; लहान तरवार. [सं. छुरिका हिं.; पोर्जि. चुरी] **म्ह**० घे सुरी आणि घाल उरीं.

सुरु—स्त्री. १ पेजेवरची जाड साय. २ अडसर नारळांतील कोंवळें खोबरें.

सुरुक—स्त्री. डुक्कर इ० जनावराची मुसंडी.

सुरुंग—पु सुरंग (भुयार इ०) पहा.

सुरुवात—स्त्री. सुरवात पहा.

सुरुसन—स्त्री. सुरसन पहा.

सुरू—पु. १ खालीं फुगीर व वर निमुळता असा सरळ उंच वाढणारा वृक्ष. फार्सी कवितेंत प्रियेच्या शरीरास याची उपमा देतात. २ एक वनस्पति. [फा. सर्व्] **०चा-दार**–वि. सुरुसारखा सरळ व उंच. (समई, सुंदर स्त्री)

सुरू—पु. वरू (घोडा). –वि. १ प्रारंभ केलेलें; सुरवात झालेलें २ चालू झालेलें (काम). ३ सुरखुरू याअर्थी चुकीनें. [अर. शुरुअ] **०तहकूब**–वि.क्रिवि आरंभिलेलें व मध्यंतरीं थांबविलेलें.

सुरूख—पु सुरक्या (गंजिफांतील) पहा.

सुरूप—वि. सुंदर; दिसण्यांत चांगला; देखणा. (गो.) सुरुपाय. [सं.]

सुरेख—वि. सुरूप पहा. नीटनेटका; रेखीव; ठीक; योग्य. [सं. सु+रेखा] **सुरेखाई-सुरेखी**–स्त्री छानदारपणा; सौंदर्य; गोंडसपणा; बांधेसूदपणा.

सुरोव—पु (गो.) सांडस नांवाचा एक किडा.

सुऱ्या—पु फुरडई, चकली इ० तयार करण्याचें मध्यें भोक असलेलें पात्र; सांचा; सोरा.

सुर्खरु(रो)ई—स्त्री. १ बहुमान; आब. 'त्याजकडून घडलें नाहीं इतकी सुर्खरोई झाहे.' –रा ५.१७०. २ सुटका. [फा]

सुर्खरु-सुरूखरू–वि. १ उजळ तोंडाचा; मुक्त. 'भगवान् सुर्खरू करील तोच सुदिन समजावा.' –रा ६.३९५. २ (ल.) निर्लज्ज; बेशरम; बेमुर्वतखोर; कोडगा; बेगुमान; वाईट कर्में करून प्रतिष्ठेनें वागणारा. [फा. सुर्ख=तांबडें+रु=चर्या] **म्ह**० सुरूखुरू सारिका आणि नकटा तिरुका. **सुर्खाई**–स्त्री. लाली. **सुर्खी**–स्त्री. १ लाली; तजेलेदार गुलाबी छटा. २ लालशाई. [फा.]

सुर्वा—स्त्री. (व.) संध्येची पळी; तिच्यांतील पाण्याचें आचमन. [सं. स्रुवा]

सुलखणी—स्त्री. सोन्यास भोंक पाडून त्याची परीक्षा करण्याची क्रिया; चाचणी. सुलाखणें पहा. **सुलखणें**–सक्रि. सोन्याची परीक्षा पाहणें. **म्ह**० सोनें सुलखावें, माणूस पारखावें.

सुलगावणें—सक्रि. (व.) पेटविणें; शिलगाविणें. [हिं.]

सुलग्न—न. (व.) १ लग्नमुंजींतील बोहल्यावरील ओवाळणी. २ वधुवरांचीं मस्तकें एकमेकांस लावून गंगाळांत पैसा टाकणें.

सुलट-टा—वि. सरळ; योग्य प्रकारचा; सोईचा; उजू; अनुकूल; योग्य दिशेचा व बाजूचा. **सुलटणें**–पुन्हां सरळ रस्त्यावर येणें; अनुकूल होणें; उलटलेल्या स्थितींतून पुन्हां पूर्व स्थितींत येणें; सरळ होणें; बरोबर करणें. याच्या विरुद्ध उलटणें. **सुलटा वारा**–पु. अनुकूल वारा. याचे विरुद्ध उलटा वारा.

सुलतान—पु. १ बादशहा; राजा. २ अनियंत्रित सत्ता चालविणारा जुलमी राजा. [फा.] **सुलतानी**–स्त्री. बादशाहाचा अंमल; सरकारचे हातून घडणारें जुलमाचें अगर इतर वाईट कृत्य; दडपशाही; फौजेनें केलेली लूट; याच्या विरुद्ध अस्मानी=दैवी प्रकोप. **सुलतानी कोस**–पु. टिपू सुलतानानें ठरविलेला ५ मैलांचा एक कोस.

सुलभ—वि. सहज मिळणारें; करण्यास सोपें; स्वल्प; सवघड. [सं]

सुलह—पु. सलूख; सख्य. 'पेस्तर रुक्नुद्दौदाला याचे मारिफत सुलह करून ...' –रा १७५३. [अर. सुल्ह्]

सुलक्षण—न. १ शुभकारक चिन्ह, गुण. २ सद्गुण, उच्चपणा इ० वाखाणण्याजोगे गुण. ३ –वि. चांगल्या गुणांचा, चिन्हांचा; शोभायमान. [सं.] **सुलक्षणिक, सुलक्षणी**–वि. १ शुभकारक चिन्हाचा (घोडा, माणूस). २ सद्गुणी; सुंदर; देखणा.

सुलाख—पु सोनें–चांदीच्या दागीन्यां–नाण्यातील धातूच्या शुद्धतेची परीक्षा पाहण्यासाठीं त्याला पाडलेलें भोंक. (क्रि० घालणें, पाडणें, टाकणें), [फा. सुराख्=भोंक] **०णी**–स्त्री. १ वरीलप्रमाणें भोंक पाडणें. २ असें भोंक पाडण्याचें हत्यार. 'सुलाखणीनें टोचूनि नाणें । खरे पारखिती सज्ञान ।' –भवि ३.२२४. **०णें**–

सक्रि. १ वरीलप्रमाणें भोंक पाडणें. २ (ल.) अंतर्बाह्य परीक्षा करणें. **सुलाखी**-वि. वरीलप्रमाणें भोंक पाडलेलें.

सुलाखणें—अक्रि. दागिन्यांत भरलेली लाख बाहेर, उघडकीस येणें.

सुलार—वि. (व.) मागें झुकलेली ओझ्याची गाडी. सुरळ पहा.

सुलीन—वि. तन्मय; एकरूप. 'तिये पदीं जे सुलीन।' –एरुस्व १.३९. [सं.] **०णें**–सक्रि. एकरूप होणें, ऐक्यता पावणें; लय पावणें. **०ता**–स्त्री. पूर्णपणें लीन होण्याची अवस्था.

सुलुक-ख—पु. १ स्नेहभाव; सलोखा; मैत्री. २ तह, समेट. [अर. सल्क]

सुलुप—पु. उतार; ढाळ. [इं. स्लोप]

सुलें—न. मुलांच्या पोटांत होणारा डबा नांवाचा रोग.

सुलेमानी दगड-पत्थर—पु. मुसलमान लोक ज्याच्या मण्याची गळ्यांत माळ घालतात असा अकीकाच्या जातीचा दगड; त्याचे मणी. या दगडांतील पाणी प्याल्यानें अनेक रोग नाहींसे होतात. –सह्याद्रि आक्टोबर १९१५.

सुवण—पु. जन्म. –शर. [सं. सु=प्रसवणें]

सुव(ब्व)र—पु. डुकर. [फा.]

सुंवरा—पु. केळीचा कोंब; सुयरा; सुई.

सुवर्ण—न. १ सोनें धातु. २ सोळा माशांचें वजन (५ रती=१ मासा), साधारण ८० गुंजांचा एक तोळा. ३ चांगला रंग. –वि. चांगल्या रंगाचें, जातीचें, कुटुंबाचें. [सं.] **०कदली**–स्त्री. सोनकेळ. **०कार**–पु. सोनार. **०कीटक**–पु. काजवा; चकाकणारा कोणताहि किडा. **०खोटी**–स्त्री. सोन्याची लगड. 'सुवर्ण खोटी जडपणें निखळ।' –स्वानुदि १३.१.६६. **०गणित**–न. अंकगणितांतील एक रीत; मध्यम सरासरी. **०चलन**–न. सोन्याच्या नाण्याचा प्रचार; सोन्याचें नाणें. **०धातूचामार्ग**–पु. किमया. 'कां सुवर्ण धातूचा मार्ग। दृष्टिबंधणें लागवेग।' –दा ५.२.३. **०पंथी**–पु. किमयागार. –दास ३. 'सुवर्णपंथी भुरेकरी।' –दा ३.७.४९. **०पाद**–वि. छाती व पाय यांचेवर अतिशय केस असलेला (घोडा). **०पुष्प**–न. सोनचांफा. **०पुष्पी**–स्त्री. सोनचाफ्याचें झाड व फूल. **०मध्य**–पु. दोन परस्परविरुद्ध गोष्टींतून काढलेला मधला मार्ग; मध्यम मार्ग; तडजोड; एरंडोली न्याय. **०मालिनी वसंत**–पु. एका मात्रेचें नांव; हींत सोनें असतें. **०माक्षिक-मुखी-की**–न. स्त्री. एक सोन्यासारख्या रंगाची औषधी मात्रा, विटमाक्षिक. **०स्तेय**–न. सोन्याची चोरी; पंचमहापातकांपैकीं एक. **०स्तेयी**–पु. सोनार. –वि. सोन्याची चोरी करणारा. **सुवर्णाभिषेक**–पु. लग्नांत ज्या पाण्यांत सोन्याचा तुकडा घातला आहे, अशा पाण्यानें वधूवरांस करावयाचा अभिषेक.

सुवह—वि. १ वाहून नेण्यास सोपें; सोसण्यास सुलभ. २ सोशिक. [सं.]

सुवा—पु. मोठी सुई; दाभण. [हिं.]

सुवाच्य—वि. वाचण्यास सोपें, सुलभ; स्वच्छ (पुस्तक, अक्षर). [सं.]

सुवाड—वि. सुरेख. –हरि २.१८.

सुवाड दुवाड, सुवाण—वि. (कु) लहरी, चंचल.

सुवात—स्त्री. (गो.) जागा.

सुवाफळी—स्त्री. (कोष्टी) नकशीचा सोवळा भरण्यासाठीं लागणारी फळी.

सुवाय, सुवावो—पु चांगला वारा. –ज्ञा ९.२८. [सं.सुवायु]

सुवार-रू—पु. पाककर्ता; आचारी. –शर.

सुवारा—पु (वायकी) सुखाचा शब्द; आनंदाची बातमी, वार्ता, माहिती, खबर. 'नवऱ्याचा मला कधी सुवारा नाहीं.' [सं. सुवार्ता]

सुवारा—पु. (कों.) खळ्यांतील भात झोडण्याचा दगड.

सुंवारी—स्त्री. (कु.) छत असलेली छकडी, गाडी.

सुवार्ता—स्त्री. चांगली बातमी, खबर. [सं.]

सुवाला—पु. गलबताचा सुकाणूकडील चपटा भाग.

सुवाव—पु. अनुकूल वारा. 'म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे।' –ज्ञा ९.२८. [सं. सु+वायु]

सुवाव—पु सहवास. –शर.

सुवावणें—सक्रि. घालणें; घेणें (मुठींत). –मनको. 'गगन मुठीं सुवावें। मशकें केवीं।' –ज्ञा १.७४.

सुवाशीण—न. सुवासिनी पहा.

सुवास—पु. १ चांगला वास; सुगंध. २ चांगली वसति. [सं.] **सुवासिक**–वि. सुगंधि; सुगंधयुक्त. **सुवासिणें**–सक्रि. सुगंधित करणें. **सुवासित**–वि. सुगंधित केलेलें; सुवासिक.

सुवासिनी, सुवासीन-ण—स्त्री. सवाष्ण स्त्री; नवरा जिवंत असलेली स्त्री; सौभाग्यवती स्त्री. [सं.]

सुवाळा—पु. (कों.) साधारण फत्तेमारीसारखा, १०० ते १५० खंडी वजन वाहून नेईल असा मचवा.

सुंवाळी—स्त्री. (गो.) एक प्रकारचें वाद्य.

सुवाळीमवाळी—स्त्री गोड व मृदु भाषण; लाडीगोडीचें भाषण [मवाळी द्वि.]

सुविद्य—वि. १ सुशिक्षित; सुज्ञ; पंडित; विद्यासंपन्न, बहुश्रुत. २ हुशार; बुद्धिमान. [सं.]

सुवी—स्त्री. सुई पहा.

सुवीण—स्त्री. सुईण पहा. [सु+वीण]

सुवेत—न. पूर्ण मास होऊन झालेलें स्त्रियांचें बाळंतपण; अशा प्रकारची प्रसूति; योग्यवेळीं व सुलभ रीतीनें झालेली प्रसुति. [सु+वेत]

सुवेनसो—स्त्री. सामर्थ्य.

सुवेर—पु. सुएर; सोयर; वृद्धि; जननाशौच. [सु+वेर=वेळ] ०णें–अक्रि. वृद्धि असणें. ०तुला–वि. सुवेर असलेला. [सुवेर+तुला प्रत्यय]

सुवेळ—स्त्री. चांगली वेळ; शुभकारक काळ, योग; सोईचा समय. [सं.]

सुशक्य—वि. करण्यास सोपें, सुलभ; सत्वर साध्य होणारें, येणारें [सं.]

सुशिक्षित—वि. चांगला शिकलेला, शिकवणुकीचा; उत्तम शिस्तीचा किंवा वळणाचा. [सं.]

सुशी—स्त्री. १ एकप्रकारचें पट्टेदार सुती कापड; गादीचें कापडें. २ लहान मुलांच्या पोटांत होणारा एक रोग.

सुशीत—वि. (माण.) सर्चित.

सुशील—वि. उत्तम वर्तनाचा; सद्वर्तनी; सुस्वभावी. [सं.]

सुशेल—स्त्री. (कु.) कोवळया फणसाची भाजी.

सुशोभित—वि. उत्तमप्रकारें नटविलेलें; शोभायमान; शोभिवंत. [सं.]

सुश्रांत—वि. (काव्य) अत्यंत दमलेला, थकलेला; श्रांत. [सु+श्रांतणें] **सुश्रांतणें**–दमणें; थकणें; श्रमित होणें.

सुश्राव्य—वि. कर्णमधुर; ऐकल्यावर मनास प्रसन्नता देणारें; ऐकण्यास सुखकारक (गाणें, भाषण इ०). [सं.]

सुषमा—स्त्री. उत्तम प्रकारची शोभा. [सं.]

सुषुप्त—वि. गाढ निजलेला; झोंपलेला. [सं.] **सुषुप्ति**–स्त्री. गाढ झोंप; जागृति व स्वप्न या दोहोंहून भिन्न अशी तिसरी अवस्था. हींत अंतःकरणवृत्तीचा अज्ञानांत लय झाल्यामुळें कोणत्याच विषयाची स्फूर्ति असत नाहीं; ज्ञानशून्य अवस्था. [सं.]

सुषुम्ना—स्त्री. (योग) शरीरांतर्गत इडा व पिंगला या दोन नाडयांमधील एक नाडी. [सं.]

सुष्ठ-ष्टु—वि. चांगलें; शुभ. [सं. सुष्टु] **सुष्ठासुष्ठ**–वि. चांगलेंवाईट; बरेंवाईट; शुभाशुभ.

सुस—न. सुख. –हंको.

सुसकार-रा—पु. हृदयांतल्या खोल जागेपासुन वेगानें व शब्द करित बाहेर पडणारा उच्छ्वास; उसासा; (क्रि० टाकणें, देणें). [ध्व.] ०णें–अक्रि. वरीलप्रकारें उसासा टाकणें, काढणें.

सुसंग, सुसंगति—पु. स्त्री. चांगल्या माणसांचा सहवास; सत्समागम. [सं.]

सुसड—वि. उत्तम सडलेलें (धान्य). [सु+सडणें]

सुसत—क्रिवि. सुसकारून.

सुसंबद्ध—वि. सुसंगत, मागच्या पुढच्याशीं उत्तम मेळ असलेलें; चांगलें जोडलेलें. (भाषण इ०). [सं.]

सुसंबळ—वि. (महानु.) स्वबळानें युक्त. राज्यामध्यें सुसंबळ सावधु।'

सुसमारणें—क्रिवि. अंगावर सुज चढणें. [सुज+मारणें]

सुसर—स्त्री. मगर. [सं. सुशिर? सिंधी. सेसरू]

सुसर—वि. चांगल्या वर्तनाचा; सुव्यवस्थित चाललेला.

सुसवो—पु. पीक पिंवळें होऊन सुकूं लागण्याचा एक रोग.

सुसह-ह्य—वि. सोसण्यास सोपें. [सं.]

सुसा—पु. १ जनावरांचा एक रोग. २ (सोनारी) तोटी असलेली कासंडी. हिच्यांत पाणी भरून बागेसरीं (शेगडी)त ठेवतात व तोटींतून येणाऱ्या वाफेमुळें विस्तव टिकवितात.

सुसा—वि. (व.) बारीक; निमुळता.

सुसाइणें—अक्रि. (महानु.) चांगली सावली पडणें. 'सुसाइलीं नाखिवें एके। कवणा साध्ये तें नाटकें।'–ऋ ६९.

सुसाचणें—अक्रि. दम घेणें; उसासा टाकणें. [सुस्कारा]

सु(सुं)साट-टा—पु. १ आवाजयुक्त जोराची गति, गर्जना, गाणें, वाऱ्याचा जोर; गतिमान वस्तूचा आवाज (बाण, बंदुकीची गोळी, पक्ष्याची भरारी इ० चा); जोराचा शिरकाव, तडाखा, झपाटा, सोसाटा. २ जोराचा श्वास. [ध्व.] –क्रिवि. वरील प्रकारच्या आवाजानें; सुं सुं आवाज करीत. ०णें–अक्रि. वरील प्रकारें आवाज करून घुसणें; वेगानें व जावेशानें जाणें; अंगावर चालून जाणें.

सुसार—वि. (गो.) सुसाध्य.

सुसास—पु. अवकाश. –वि. सांगण्याजोगें. –शर.

सुसासा—पु. सुसकारा; उसासा. (क्रि० टाकणें; घालणें. देणें). [ध्व.]

सुसु—क्रिवि. सुसाट (–क्रिवि.) पहा. (क्रि० करणें). [ध्व.]

सुसुंद्रो—स्त्री. (व.) चिचुंद्री.

सुसूत्र-सुत्रक—वि. १ सुसंबद्ध पहा. २ (ल.) छानदार; गोंडस; देखणा. –क्रिवि. व्यवस्थितपणें; बरोबर.

सुसें—न. एक रोग. सुशी पहा.

सुस्कार-रा, सुस्कारणें—सुसकार, सुसकारणें पहा.

सुस्त—वि. मंद; आळशी; रेंगाळणारा; जड; मंद; धिम्मा; थंड; ढिला; आळसावलेला. –क्रिवि. थंडपणें; रेंगाळत. (क्रि० बसणें; निजणें; असणें). [फा.] **सुस्ता**–वि. सुस्त पहा. **सुस्ताई**–स्त्री. आळशीपणा; ढिलाई; थंडपणा; दिरंगाई, हयगय. [फा.] **सुस्तावणें**–अक्रि. सुस्त होणें; उत्साहहीन होणें.

सुस्थ—वि. चांगल्या अवस्थेंत असलेला; सुखी; सुलभ; सोईस्कर. [सं.] **सुस्थिति**–स्त्री. सोईस्कर अवस्था, सोई; सुखदायक अवस्था. [सं.]

सुस्रांतणें—क्रि. (काव्य) सुश्रांतणें पहा.

सुस्मित—वि. आनंदानें हंसणारा; मंदस्मित करणारा. [सं.]

सुस्वभाव—पु. चांगला स्वभाव, वृत्ति, मनोधर्म. [सं.]

सुस्वर—पु. १ (गायन) उत्तम सूर, गळा. २–वि. उत्तम गळयाचा, सुराचा; चांगल्या आवाजांत म्हटलेलें (गाणें). [सं.]

सुस्वर—स्त्री. (अप.) सुसर; मगर.

सुहा—पु. गायनांतील एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव–षाडव, वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा दुसरा प्रहर

सुहा—पु. द्वेष, वैर. –शर.

सुहागी—स्त्री. सवागी, टांकणखार. [हिं.]

सुहाड—पु. १ उत्तम योद्धा; राजा. 'आइके द्वारकापुर-सुहाडा।'–ज्ञा ११.६७०. २ मित्र. 'साम्य तेचि सुहाडा। वेदि जाणे।'–ज्ञा ९.२४१. –वि १ सुज्ञ; शहाणा. 'अगा आत्म-परपीडा। बीज तमक्षेत्रीं सुहाडा। पेरिती मग पुढां। तेचि पिके।'–ज्ञा १७.९९. २ शोभिवंत; मनोरम. 'वरि वैराग्याचिया पाखरा सुहाडा।'–स्वादि ७.३.३९. [सं. सुभट]

सुहाव—पु. १ आवड; प्रीति; प्रेम. 'एकु सुहावे पवाडे पढतु।'–दाव ८४. २ (ल.) ब्रह्मसुख. –शर. –वि. सुशोभित; आल्हादकारक; मधुर. 'आणि शाब्दादिक सुहावे।'–ज्ञा १५.१६१. [सं. सुभट] **सुहावणें**–क्रि. १ सुशोभित करणें. २ रचना, उभारणी करणें. 'वरि मंडप सुहाविला।'–स्वादि १०.१.२. ३ तयार करणें. 'जन्ममृत्यूची सुरंगी। सुहाविली निलागी।'–ज्ञा १३.४८.

सुहावना—वि. (महा) सुंदर. 'कान्हा मना सुहावना। रावो गाती श्री चक्रपाणी।'–धवळेउ ५९.

सुहावा—वि. आवडता; साह्यकर्ता. 'जयजय सर्वे विसांवया। सोहंभाव सुहावया।'–ज्ञा १४.२.

सुहास्यवदन—वि. हंसतमुख असणारा.

सुहीण—स्त्री. सुईण पहा.

सुहृत्-द्—पु. १ प्रेमळ मित्र; सोबती. २ (ल.) लढाईंतील दोस्त राष्ट्र. [सं.] **०ता**–स्त्री. मैत्री.

सुहृदय—नवि. चांगलें मन. चांगल्या अंतःकरणाचा; स्नेहाळ. [सं.]

सुहेर, सुहेरणें, सुहेरतुला—सुवेर इ० पहा.

सुळ-कन-कर-किनी-किशी—क्रिवि. सुळ् अशा आवाजानें गुळगुळीत, बुळबुळीत पदार्थावरून घसरणें, निसरणें किंवा त्यावेळीं होणाऱ्या आवाजाप्रमाणें आवाज होऊन. (क्रि० गळणें; सुटणें; निसटणें; पडणें; उडणें). [ध्व.] **सुळकं(कां)डी-कुंडीं**–स्त्री. सुरकंडी पहा. **सुळकणें**–अक्रि. १ बाजूनें–मधून–आंतून हळूच घसरणें, निसटून जाणें; मुकाटयानें निघून जाणें. २ (व.) बारीक, निमुळतें होणें.

सुळका—पु. १ डोंगराचा, खडकाचा, कडयाचा शूळाप्रमाणें खालीं रुंद व वर क्रमाक्रमानें निमुळता होत गेलेला माथा; शिखर. २ सुळा दांत; शंकुप्रमाणें निमुळता होत गेलेला एखाद्या वस्तूचा भाग. ३ पीक कापल्यावर राहिलेला खुंट; सरळ व वर निमुळता होत गेलेला वृक्ष. ४ दाराच्या चौकटीचा एक भाग; चौकटीच्या बाहीच्या उलट बाजू. ५ (कु.) नारळ सोलण्याचें निमुळतें हत्यार; उत्कड. [सं. शूल] **सुळकी**–स्त्री. खुंटी, दांडा इ०चें निमुळतें अग्र; निमुळती झालेली कोणतीहि वस्तु. **सुळकुं(कं)बा-सुळखांव-खुंबा**–पु. १ बैलरहाटाचे कणेकडाचे खालीं आंत तुंब भरून उभा केलेला निमुळता खांब, तुंब्याचा आधार-२ सुळका. **सुळकेपट्टी**–स्त्री. दाराच्या बाहेरच्या बाजूस माथ्यावर जशी गणेशपट्टी किंवा कपाळपट्टी असते तशी आंतल्या चौकटीची वरची पट्टी. **सुळबुळाट**–पु. सुळसुळाट पहा. [सुळ ध्व.] **सुळबुळीत**–वि. बुळबुळीत. **सुळसुळ**–स्त्री. सुळसुळाट पहा. **सुळसुळणें**–अक्रि. १ सुळकणें पहा. चुळबुळणें, चळवळणें. २ मागें मुंगळा लागणें; धांदल उडणें. **सुळसुळाट**–पु. १ अतिशय मोठी चुलबुल, गर्दी, वळवळ, चुळचुळ मुंगळा, धांदल, गडबड (मुलें, उंदीर, पक्षी, भिकारी, लोकांचा जमाव इ० ची–आंत-बाहेर येणेंजाणें वगैरेची). (क्रि० लावणें; मांडणें; करणें; लागणें; सुटणें; होणें); छपरांतून उंदीर, साप इ० ची येरझार. २ फार त्रास. ३ विपुलता. **सुळसुळीत**–वि. १ बुळबुळीत; निसरतें (अतिशय जिल्हई दिल्यामुळें). २ जीर्ण झाल्यामुळें उतरलेलें (धोतर इ०).

सुळा—पु. १ अणकुचीदार दांत; तोंडांतील सुळयाचा दांत; हत्तीचा पुढचा दांत; डुक्कर, साप, वाघ, मांजर यांचे अणकोचीचे दांत; अणकोचीचा खुंटा; चालताना पायास खुपणारा जमीनींतून वर आलेला खडा, खुंटाप्रा इ०. २ मांस इ० भाजावयाची एक प्रकारची लोखंडी सळई. ३ कसई, कशेट गवतांचें बीं. ४ पशूचे अंगावरील गोचिडाप्रमाणें पडणारा एक जंतु, ऊ. (क्रि० पडणे). ५ मोटेचें चाक ठेवण्यासाठीं जे दोन खांब विहिरीचे कांठावर झुकते उभे केलेले असतात ते प्रत्येकीं. [सं. शूल] **०गीर**–वि. (घरावरील छपर) फार उतारांचें; याचे उलट माठ. **सुळावरची पोळी**–स्त्री. अत्यंत धोक्यांचें, जिवावरचें, जिकीरीचें काम; जो लाभ मिळवावयाला जीव धोक्यांत किंवा संकटांत घालावा लागतो तो. 'मृगसालीं गलबतांत बसून जाणें हें सूळावरची पोळी आहे.'

सुळी—स्त्री. (तंजावर) देवदासी; कलावंतीण; नायकीण. [का. सुळे=वेश्या; देवदासी]

सुज्ञ—वि. विद्वान; समंजस; बुद्धिवान; जाणता; शहाणपणा असलेला. [सं.]

सू—स्त्री. सुई (शिवण्याची.). [सुई]

सू, सूं—क्रिवि. १ जोरानें व वेगानें बाहेर पडल्यानें होणाऱ्या आवाजाप्रमाणें (सापाचा फुस्कारा, बाणाचा वेग, वादळाचा आवाज इ०). २ सुरपारंबी खेळांत तोंडानें उच्चारावयाच्या शब्दाप्रमाणें आवाज करून (क्रि० करणें). ३ -स्त्री. वरीलप्रमाणें होणारा आवाज व क्रिया; (क्रि० करणें). [ध्व.] **०निघणें-सुटणें-पळणें-धांवणें**-वाऱ्याच्या वेगानें (घोडा, दौड करणारा मनुष्य, इ०) पळणें. **सू काढणें-हांकणें-वपटणें-दवडणें**-(घोड्यास) जोरानें धांवविणें. **०बाल्या करणें**-वेगानें निसटणें, पळून जाणें.

सू—वि. (समासांत उत्तरपदीं) जन्म देणारी. उदा० 'वीरसू, विश्वसू.' [सं.]

सू—स्त्री. (हेट) न उघडलेली कोंवळी झावळी, पान; सुयरा.

सू—स्त्री. बाजू.

सूक—पु. शुक्राची चांदणी. [सं. शुक्र]

सूकर—पु. १ डुक्कर. २ एक जातीचें हरिण. [सं.]

सूक्त—न. वेदांतील कांहीं ऋचांचा समूह. -वि. चांगलें म्हटलेलें; बोललेलें; चांगलें; बरें; योग्य; प्रशस्त (भाषण, वर्तन, इ०). सुक्तासुक्त पहा.

सूचक—न. खूण; निदान; तर्क. -पु. हेर; बातमीदार. -वि. १ सुचना, माहिती, कल्पना, ओळख, बोध इ० करून देणारा. २ चहाडी करणारा. ३ भेद, छेद पाडणारा. ४ सभेपुढें ठरावाची सूचना मांडणारा. [सं.]

सूचणी—स्त्री. (काव्य) सुचना. 'ऐशी वार्धक्याची सुचणी।' -ज्ञा १३.५७५.

सूचन-ना—न.स्त्री. १ इषारा; अप्रत्यक्ष रीतीनें कळविलेली गोष्ट; इषारत; सुचवणी व तिची क्रिया. २ सभेच्या विचारार्थ लायक सदस्यानें योग्य वर्दी देऊन मांडलेली योजना, कल्पना. [सं.] **सूचित**-वि. सुचविलेलें; दर्शविलेलें; इषारा दिलेलें; ओळख करून दिलेलें. **सूची**-वि. १ (समासांत उत्तरपदीं) सुचविणारा; सुचक. (-वि. पहा). उदा० हर्षसूची; भाग्यसूची. २ भोसकणारा. [सं.]

सूचिका, सूची—स्त्री. १ सुई; अग्र. २ अनुक्रमणिका; विषयांची यादी. ३ प्रस्तावना. ४ (ज्यो.) पृथ्वीच्या गोलाची कोनाकृति छाया; हिच्यांत चंद्र प्रवेश करतो म्हणून चंद्रग्रहण होतें. ५ सुळका; पिरामीड; शंकू; हत्तीची सोंड; अणकुचीदार खांब इ०. [सं.] **म्ह० सुची प्रवेशे मुसलप्रवेश. ०कटाह न्याय**-पु. एक अति लहान व एक अति मोठी अशीं दोन कामें युगपत् प्राप्त झालीं असतां, लहान काम अगोदर करून टाकावें अशा अर्थाविषयीं दृष्टांतत्वेंकरून घेतात जें, सूई व कढई हीं दोन घडावयाचीं असतां सूई आधीं घडतात, असें जें एक लोकव्यवहाररूप प्रमाण तें. **सूचित**-वि. भोसकलेलें; टोंचलेलें; छिद्र केलेलें. **सूच्यग्र, सूचीमुख**-वि. कोनासारखा; अणकुचीदार; निमुळता. [सं. सुचि=सूई+अग्र]

सूज—स्त्री. शरीरास कांहीं विकारामुळें येणारा फुगीरपणा; फुगवटी. [सं. शोथ; हिं. सूज; फा. सोझ्=दाह]

सूंइया—स्त्री. झपाट्यानें पळणें; सुं बाल्या (क्रि० करणें). [सुर-पारंबीच्या खेळांतील शब्द+इया=घोड्यास हांकतांना उच्चारण्याचा शब्द]

सूट—स्त्री. १ (कर्ज इ० तून) माफ केलेली, सोडलेली रकम. २ (गुलाम, बंदी इ० स) बंधनांतून मुक्तता; सुटका; सोडवणूक. ३ रांगेंत मध्यें पडणारा खंड; दोन पदार्थांतील अंतर; फट. ४ (ना.) वीर्यस्खलन. ५ (व.) वाळलेली मिरची. [सुटणें] **०पत्र**-न. सोडचिठ्ठी; सांडपत्र; सांडखत. **०मोकळ**-स्त्री. १ कांहीं काळापुरती केलेली सुटका. (क्रि० असणें; होणें; चालणें; भोगणें; देणें). २ कर, दस्तुरी, कर्ज इ० तून मिळालेली सूटरकम; सोडमोकळ [सुटणें+मोकळें होणें] **०साट-सांड-तूट**-स्त्री. सूट अर्थ १ पहा; सूटमोकळ अर्थ २ पहा.

सूड—पु. १ शोध; तपास; चौकशी; विचारपूस. (क्रि० काढणें; लावणें; लागणें). २ बदला; परतफेड; उर्ट; वचपा, अपकाराची प्रतिक्रिया. (क्रि० काढणें; लावणें; घेणें). 'मारिलियाचेनि रागें। पाटीचा जेवीं सूड मागें।' -ज्ञा १३.५४२. ३ खतावणींतून काढलेला हिशेबाचा उतारा. उदा० (व.) पहाणीसुड. ४ हिशोब उघडकीस आणणें. ५ नगारा, तबला इ० वाद्यें वाजविण्याची विशिष्ट गति, प्रकार. (क्रि० मारणें). (त्यावरून) खंड न पडतां चाललेलें कोणतेंहि कार्य; अखंड क्रिया. ६ अनेक कलमें लिहिलेला कागद; सूडबंद. ७ खेड्यांची शेतांची कूळवारीनें अथवा नंबरवारीनें यादी ८ ढोल इ० वाजवूं लागल्यापासून मध्यें अवसान घेईतोपर्यंत वाजविण्याचा व्यापार. ९ (व.) विशेष प्रकारचा गीतसमूह. १० ताण देऊन काम करणें. [सं. शोध; का. सुडिचु=तिरस्कार करणें] **०घेणें, उगवणें**-उर्ट काढणें. **०दायी**-वि. (ना.) द्वाड; त्रासदायक. **०बंद**-पु. अनेक कलमांचे सुड लिहिलेली यादी; गांवखतावणींतून काढलेले हिशेब किंवा माहितीपत्रकाची जंत्री.

सूड—स्त्री. (ना.) न फोडलेलें सर्पण; लांकडे. [का. सूड=जळणें; तेल]

सूणें—सक्रि. घालणें; ठेवणें. 'तूं धरूनि देहाभिमानातें। दिठी सूनि या शरीरातें।' –ज्ञा २.१३७. [सं. सु=ठेवणें]

सूत—न १ धागा; दोरा; तार; रेषा, तंतु (विशेषतः कापसाचा). २ (ल.) संधान; संबंध (आश्रय, आधार इ० चा); मार्ग; उपाय (मिळविण्याचा, संपादण्याचा, साध्य करण्याचा) नात्यागोत्याचा संबंध. ३ नासकें फळ. ४ जखम इ० मध्यें धाग्याप्रमाणें आढळणारा एक जंतु. ५ कापडाचें वीणकाम; वीण. ६ (ल.) समेट; स्नेहभाव; मित्रत्वाचा संबंध. ७ अगदीं थोडी लांबी दाखविणारें माप; एकअष्टमांश इंच. ८ लांकूड कापण्यासाठीं त्यावर खूण करावयाची दोरी. ९ चातुर्य; शहाणपण. [सं. सूत्र] (वाप्र.) **सुताचा तोडा**–१ दोऱ्याचा तुकडा. २ (ल.) क्षुल्लक रकम, वस्तु. 'शंभर रुपये दिले त्यांपैकीं सुताचा तोडा हातीं लागला नाहीं.' **सुतानें सूत लागणें**–एका गोष्टीच्या शोधानें दुसरीचा शोध लागणें. **सुतानें स्वर्गास जाणें-स्वर्ग गांठणें**–किंचित सुगावा लागतांच त्यावरून तर्कानें एकंदर सर्व गोष्टींचें स्वरूप ओळखणें. **सुतास (सूतीं) किंवा सुतींपातीं लागणें**–सुरळीतपणें चालू लागणें; नीट व्यवस्था लागणें. **सुतास-सुतीं-सुतीपातीं चालणें, लावणें**–सुरळीत असणें, लावणें. **०बांधणें**–संबंध जोडणें; धागा लावणें (नातेंगोतें, मित्रत्व इ० चा). **(मूठभर) सूत बांधणें-देणें**–(स्नेहदर्शक चिन्ह म्हणून एखाद्यास). पागोटें देणें. **०असणें**–स्नेहसंबंध असणें; जुळतें असणें. **०जमणें**–मैत्री जमणें. **(नाकाशीं) सूत धरणें**–(मरणोन्मुख अवस्थेंत श्वासोच्छ्वास चालला आहे कीं नाहीं हें पाहण्यास नाकाशीं सूत धरतात. यावरून) मरणोन्मुख अवस्था. **सूत नसणें**–मैत्री नसणें. सामाशब्द– **०काडी**–स्त्री. (कोष्टी) जिच्या भोंवतीं सूत गुंडाळलेलें असतें ती काडी; गणा; रिकांडी. **सुतणें**–सक्रि. वेष्टणें. –शर. **०परमें**–न. परम्याचा एक प्रकार; लघवींतून सुतासारखे जंतू जाणें **०पाड**–पु.न.सणंगाची वीण व किंमत. 'हें सणंग सुतापाडास बरें आहे.' **०पात-पोत**–पु. कापडाचें विणकाम, बनावट; वीण.

सूत—पु. १ बाप क्षत्रिय व आई ब्राह्मण अशांची संतति अशी जात व तींतील व्यक्ति; यांचा धंदा सारथ्याचा. (त्यावरून) २ सारथी. ३ सुतार. ४ भाट; पुराणिक. [सं.] **०उवाच**–उझा. सगळ्या पौराणिक कथा वरील जातींतील एका पुराणिकानें सांगितल्या आहेत म्हणून प्रत्येक कथेच्या प्रारंभीं हा शब्द असतो, (यावरून) प्रारंभ करणें.

सूत—वि. जन्मलेला; झालेला. [सं.]

सू(सु)तक—न. १ जननाशौच; सुवेर. २ ग्रहणांतील अशौच. ३ मृताशौच. [सं. सु=प्रसवणें] **सू(सु)तकी**–वि. सतक असलेला.

सूतपणें—अक्रि. तन्मय होणें. –शर.

सूतशेखर—पु. पित्तशामक एक औषधी मात्रा. [सं.]

सूति—स्त्री. १ जन्म; बाळंतपण. २ संतति. ३ प्रवेश. –ज्ञा १०.१०९. [सं. सु=प्रसवणें] **सूतिका**–स्त्री. १ नुक्तीच बाळंत झालेली स्त्री. २ बाळंतरोग. **सूतिगृह, सूतिकागृह**–न. बाळंतिणीची खोली. **सूतिमास**–पु. बाळंत झाल्याचा महिना. **सूत्याशौच**–न. सुखरूप झालेल्या बाळंतपणाचें १० दिवसांचें सुवेर; वाखा झाल्यास गर्भारपणाचे जितके महिने झाले असतील तितके दिवस पाळावयाचें सुवेर.

सूत्कार—पु. जोराचा सोडलेला श्वास; फूत्कार [ध्व.]

सूत्र—न. १ सूत; धागा, तंतु; दोरा. २ कळसूत्री बाहुलीची दोरी, तार, (यावरून) एकाद्या यंत्रांतील किंवा भानगडीच्या धंद्या–उद्योगांतील मख्खी. चाबी, किल्ली, युक्ति, संधान, फिरकी; तसेंच त्या रचनेची युक्ति, पूर्वी करून ठेवलेली योजना; यंत्राच्या कृतीची पद्धत, रीत उ० मनसूत्र म्हणजे मनाचा कल, इच्छा, आवड. ३ नियम, कायदा, तत्त्व; सूचना, शिकवण यांची ठरीव पद्धत, ठराविक रीत. ४ व्याकरण, तर्क इ० शास्त्रांतील नियम, शास्त्रप्रवर्तक आचार्यांनीं त्या त्या शास्त्रावर लिहिलेले मूलग्रंथ; त्यांतील सुटीं वाक्यें. ५ (कायदा) हुकुमनामा; निर्णायक मत. ६ जानवें ७ ओळंबा. ८ वात (कापसादिकांची) ९ (ल.) सरळ ओळ; रांग. 'तैसें दिसें सैन्यसूत्र।'–एरुस्व ६.५५. १० (ल.) मैत्री; संधान. [सं.] **०जमणें**–गट्टी जमणें. सामाशब्द– **०क**–वि. १ बिनचूक; सरळ; सुतामध्यें; निश्चित; बरोबर २ सरळ; एका रेषेंत, लंबरेषेंत, समपातळींत असलेला (रस्ता, भिंत, काठी, खांब). ३ बरोबर; नियमित; (त्यावरून) नीटनेटका, छानदार. **०काठी**–स्त्री. मागच्या हात्यास लाविलेली किंवा जोडलेली काठी. **०जंत**–पु. एक प्रकारचा बारीक जंताचा किडा. **०धार**–पु. नाटकाध्यक्ष; नाटकासंबंधी माहिती करून देणारें मुख्य पात्र. २ कळसूत्री बाहुल्यांच्या खेळांत, ज्याच्या हातांत बाहुल्यांच्या दोऱ्या असतात तो माणूस. ३ मंडळ, समाज, संघ इ० चा मुख्य चालक. **०धारी**–पु सूत्रधार अर्थ २, ३ पहा. **०प्राय**–क्रिवि. थोडक्यांत; संक्षेपानें. **सूत्रात्मा**–पु. हिरण्यगर्भ. [सं.] **सूत्रा-त्री**–वि. सूत्रक पहा. शहाणा; तरबेज; चतुर; चलाख, निष्णात; धूर्त; तीक्ष्ण बुद्धीचा. 'व्यासु सहजें सूत्री बळी।' –ज्ञा १८.३५. [सं.]

सूद कल्याण—पु. (संगीत) कल्याण रागाचा एक प्रकार.

सूदणें—अक्रि.उक्रि. १ मारणें; ठार मारणें; वध करणें (विशेषतः काव्यांत). २ रिघविणें; घालणें;ठेवणें. 'नयनीं सुदलें अंजन।' –एरुस्व ७.२४. [सं. सुद्=ठेवणें; मारणें] **सूदन**–न. वध; हनन.

सूद्रसेव--पु. (गो.) १ पलंगपोस; चादर. २ मच्छरदाणी.

सून—स्त्री. १ मुलाची बायको. २ पुतण्याची किंवा मुलासारखा मानलेल्या पुरुषाची स्त्री. [सं. स्नुषा; प्रा. सोण्हा,सुण्हा] **म्ह०** १ कसी गे सुने घरासारखी. २ (गो.) सुने फुडे खावचें धुये फुढें भोगचें=सुनेच्या हातीं कारभार जाण्यापूर्वी खावेंप्यावें व मुलगी मोठी होण्यापूर्वी दागदागिने घालण्याची हौस भागवून घ्यावी. ३ चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे=सून लहान असतां सासू आपला अधिकार गाजविते, पुढें सुनेस मुलेंबाळें झालीं व सासू म्हातारी झाली म्हणजे सुनेस आपला अधिकार गाजविण्याची संधि मिळते. **०मुख**–न. लग्नांत वरातीच्या अगोदर करावयाचा एक समारंभ. यांत सासू आपल्या सुनेचें तोंड पाहते व तिच्या तोंडांत साखर घालून तीस मांडीवर बसवून अंगावर दागिने घालते.

सून—पु. (कु.) पौष महिना. [सं. शून्य]

सूना—पु. घोडयाच्या जिभेखालचा भाग.

सूना—स्त्री. झाडणें, कांडणें; दळणें, चूल पेटविणें, पाणी भरणें या पांच घरकामांच्या वेळीं किडे इ० च्या हिंसा घडतात त्या प्रत्येकी. [सं.]

सूनि—क्रिवि. डोळ्यापुढें ठेवून, असून, घालून. 'म्हणौनि निवृत्तीची मांडिली। सूनि प्रवृत्तिवळीं।' –ज्ञा १८.७०४. [सं. सू=ठेवणें]

सूनु--पु. पुत्र; मुलगा. [सं.]

सूनृत—वि. खरें; सत्य; गोड (भाषण). –पु. खरें व मधुर भाषण. [सं.] **म्ह०** सत्य आणि सूनृत.

सूप—न. १ धान्य पाखडण्याचें बांबूचें केलेलें एक साधन; पाखडण. २ ओढा–डबकें यांतील पाणी शेतास देण्याचें एक साधन. [सं. शूर्प] **म्ह०** भरल्या गाडयास सूप जड काय! **सुपा एवढें काळीज होणें**–आनंदानें हृदय प्रफुल्लित, मोठें होणें, फुगणें. **सूप फडफडणें-वाजणें**–विवाह वगैरे समारंभ संपला, मांडव परतणें वगैरे झालें म्हणजे हें मंगलकार्य समाप्त झालें असें दर्शविणें (त्या सार्ठी उपाध्याय एखाद्या समिधेनें सूप वाजवितो) मग कार्यासाठीं आलेले पाहुणे परत जातात.

सूप—न. वरण. [सं.] **०कर्म**–न. पाककिया; स्वयंपाक. **०कार**–पु. स्वयंपाकी. **०शास्त्र**–न. स्वयंपाकाचें शास्त्र, रीत, विद्या; पाकशास्त्र.

सूपरम, सूपराम—पु. मरण. 'रडोनि त्या सांगती सुपरामो।' –वामन भरतभाव. [सं.]

सूपवती—स्त्री. (महानु.) आसन. –क्रि १३५.

सूम—वि. (व.) कंजूष, चिक्कू. सुम पहा. [अर. शुमा]

सूय—स्त्री. १ सुई (शिवण्याची). २ केळयांचा घड. सुई पहा. ३ (गो.) एक प्रकारचें पक्वान्न. [सं. सूची]

सूर—पु. १ गाण्यांतील स्वर; आवाज; मधुर ध्वनि. २ नाकांतून बाहेर सोडण्यांत येणारा श्वास. (क्रि० वाहणें; चालणें; जाणें; बंद होणें). ३ सनई, पावा इ० वाद्यें सप्त स्वरांत वाजत असतां, त्या स्वरांचें सामान्य रूप धरून जें सतत एक सारखें लांब सनईप्रमाणें वाद्य वाजवितात तें. यानें सुराचा भरणा होतो. ४ सूरपारंबी खेळांतील फेकावयाची व परत आणावयाची काठी. [सं. स्वर] **०काढणें**–(ल.) रडणें. **०धरणें**–१ स्वर संभाळणें. २ (आटयापाटया) मधली पाटी धरणें. ३ सूर देणें; साथ देणें, री ओढणें. **०देणारा**–पु. सूर ओढणारा, साथ करणारा इसम. **०बंद होणें**–१ थंडी वगैरेमुळें (नाकांतील) श्वासास अडथळा होणें. २ श्वास बंद होऊन मरणें. **०वाहणें**–१ वरील प्रकारचा अडथळा दूर होणें. २ (एखाद्या कामाची) शक्यता किंवा संभव दिसणें; मनाचा कल होणें. **०करी-दास-नीस**–पु. गाणाऱ्याचा साथीदार; त्याचें स्वरपूरण करणारा. **०भरणा**–पु. गाणाऱ्यास सुराची मदत करणें, साथ. **०भरणी**–स्त्री. १ सूर भरण्याची क्रिया; अनेक वाद्यांचे एक सूर जमविणें. २ साथ. **०ज्ञान**–न. स्वरज्ञान. [सं.]

सूर—स्त्री. (कों.) नारळाची दारू (पिण्याची). [सं. सुरा]

सूर—पु. सूर्य. 'उदयापूर्वीच हरी तेजोलेशेंचि जेंवि सूर तमें।' –मोकर्ण ७.१८. [सं. सूर्य]

सूर—वि. शूर; वीर. [सं.] **०मर्द**–पु. शूर पुरुष; धाडसी माणूस. [शूर+मर्द]

सूरण—पु. सुरण पहा.

सूरपारंबी—सुरपारंबी पहा.

सूरमदी—पु. (नाविक) आग्नेयीकडील वारा.

सूर मल्हार—पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल मध्यम, पंचम, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति–औडुव–औडुव, वादी मध्यम, संवादी षड्ज. गानसमय रात्रीचा दुसरा प्रहर. [सं.]

सूर्त—न. (गो.) सुर धरण्याचें वाद्य.

सूर्य—पु. १ आकाशस्थ ज्योतींपैकीं पृथ्वीला विशेष महत्त्वाची एक ज्योति. इतर तारकांप्रमाणें हीहि एक तारकाच आहे. पृथ्वीवरील चराचर वस्तूचें रक्षण–पोषण होण्यास लागणारी उष्णता याच्यापासून मिळते. याच्या उदयास्तानें दिवस–रात्र होतात. पृथ्वीपासून यांचें अंतर ९ कोटी,२७ लक्ष मैल; याचा व्यास ८५००५०० मैल. हा आपल्या आंसाभोंवतीं सुमारें २५ दिवसांत प्रदक्षिणा करतो; आदित्य. रवि; भानु. २ सूर्यदेव.

[सं.] **म्ह०** सूर्यापुढें काडवात–काजवा. (वाप्र.) **सूर्याचे आड–** सूर्य प्रकाशांत. **सूर्याचीं हरणें–पिलें दाखविणें**–मुलाचे कान पकडून त्यास वर उचलणें; कानाच्या पाळ्या आंगठ्यानें जोरानें दाबून उचलणें. याच अर्थी–समुद्र दाखविणें, काशीची वाट दाखविणें, बोरीस बोरें आणणें. इत्यादि वाक्प्रचार आहेत. **हा सूर्य आणि हा जयद्रथ** (= हीच ती वेळ व हाच तो माणूस); एखाद्याचा दोष पुराव्यासकट त्याच्या पदरीं घालणें. सामाशब्द– **०उजेडीं**–क्रिवि. दिवसांउजेडीं; सूर्यप्रकाश असतां. **०कन्या**–स्त्री. (सांकेतिक) भाकरी (भास्करीपासून). [सं.] **०कर**–पु. किरण. [सं.] **०कमल**–पु. सूर्य उगवल्यानंतर उमलणारें व सदोदित सूर्याकडे तोंड असणारें एक कमळ. [सं.] **०कमळी**–स्त्री. वरील कमळाचें झाड. **०कांत**–पु. १ सूर्य किरणांचें एका केंद्रांत परावर्तन करून उष्णता उत्पन्न करणारा एक विशेष प्रकारचा स्फटिकमय मणि; याची पंचायतनांत सूर्य म्हणून पूजा करतात. २ एक सूर्यफूल. **०कांती**–वि. सूर्यकांतमण्याचा (पदार्थ, आरशी इ०). [सं.] **०खार**–पु. एक प्रकारचा खार; सोरा. [सं. सूर्यक्षार] **०ग्रहण**–न. सूर्य आणि पृथ्वी यांच्यांत चंद्र आला म्हणजे सूर्य दिसेनासा होणें; हें ग्रहण अमावास्येस होतें; जुन्या हिंदु शास्त्राप्रमाणें सूर्याचा केतु ग्रहानें केलेला ग्रास. [सं.] **०तबकडी**–स्त्री. सूर्यपूजा करण्यासाठीं बायका ज्या ताम्हनांत, तबकावर सूर्यप्रतिमा काढतात तें पात्र. [सूर्य+तबकडी] **०तळीं**–क्रिवि. सूर्याचे खालीं; पूर्वेस. [सूर्य+तळ] **०दर्शन-व्रत**–न. सूर्य मेघांनीं आच्छादित झाला असतां त्याचे दर्शन होईपर्यंत उपोषण करण्याचें व्रत. [सूर्य+दर्शन+व्रत] **०नंदन**–पु. १ यम. २ शनि. ३ सुग्रीव. ४ कर्ण. **०नक्षत्र**–न. ज्या नक्षत्राजवळ सूर्य असेल तें नक्षत्र. [सं.] **०नारायण**–पु देवतारूप सूर्य. [सं.] **०पत्र-पान**–न. अब्दागीर. 'आणि तीं सूर्यपत्रें।' –माधवरामायण बाल कांड ३९. **०पर्व**–न. सूर्यग्रहण, व्यतीपात, सूर्यसंक्रांत, अमावास्या इ० पर्वे प्रत्येकीं. [सं.] **०पिलूं**–न. लहान दिवा. **०पूट-ठ**–न. सूर्याचें ऊन्ह देऊन वाळविण्याची क्रिया (औषधी, रसायनें इ०); उन्हाचा ताप. [सं.] **०पुटी**–वि. उन्हांत वाळविलेलें (औषध इ०). **०पोटी शनैश्चर**–पु. (शनि हा सूर्याचा मुलगा त्यावरून) चांगल्या बापाचा वाईट मुलगा. **०फूल**–पु. सूर्यकमळ पहा. **०बिंब**–न. सूर्याचें बिंब किंवा प्रतिबिंब. [सं.] **०भक्त**–वि. १ सूर्याचा भक्त. २ (यट्टेनें) दिवाळखोर (सूर्योपासकाप्रमाणें, हात वर करून दिवाळें वाजल्याचें जाहीर करण्याच्या रीतीवरून). **०मंडल**–न. १ सूर्याचें बिंब. २ सूर्याच्या आसपासचा प्रांत, प्रदेश; याचा स्वामि सूर्य असतो; सूर्यलोक. [सं.] **०मंडळी**–स्त्री.अव. सूर्य व त्या सभोंवती फिरणारे इतर गोल, ग्रह, उपग्रह इ०. **०मणि**–पु. सूर्यकांत पहा. **०माला**–स्त्री. सूर्यमंडळी पहा. **०यंत्र**–न. १ सूर्याच्या पूजेसाठीं तांब्याचे पत्र्यावर किंवा एखाद्या फलकावर काढलेली प्रतिमा, एक विशिष्ट रेखाकृति. २ ग्रहाचे वेध घेण्याचें एक यंत्र. [सं.] **०लता-वल्ली**–स्त्री. एक प्रकारचा वेल. **०लोक**–पु. सूर्यमंडल पहा. **०वंश**–पु. सूर्यापासून झालेला एक राजवंश. उ० श्रीरामाचा वंश. **०वंशी**–वि. १ सूर्यवंशांतील (राजा). २ (ल.) सूर्योदय झाल्यावर निजून उठणारा. **०विकासी**–वि. दिवसा उमलणारें व रात्रीं मिटणारें (फूल, कमळ इ०). **०संतान**–न. १ सूर्याची प्रजा, वंश, मूल. २ (शनी हा सूर्यपुत्र पण खोडकर म्हणून ल.) चांगल्या बापाचा वाईट मुलगा. ३ भाकरी. **०सूर**–पु. उजव्या नाकपुडींतून निघणारा श्वास; याचे उलट चंद्रसूर. **०स्नान**–न. उन्हांत बसणें. **०हार**–पु. बायकांचे गळ्यांतील सूर्याच्या आकारांच्या टिकल्यांचा एक हार. **सूर्याचें झाड**–न. सूर्यकमळी पहा. **सूर्यावर थुंकणें**–(ल.) एखाद्या थोर व्यक्तीची निंदा करून स्वतःचें हसें करून घेणें. **सूर्यावर भुंकणें**–प्रसिद्ध पुरुषांची वृथा निंदा करणें. **सूर्यावर्त**–पु. अर्धशिशी दुखण्याचा एक प्रकार; ही सूर्याच्या उदयापासून वाढत जाऊन सूर्यास्तास बंद होते. **सूर्यास्त**–पु. सूर्य मावळणें. **सूर्येंदुसंगम**–पु. अमावास्येनंतरचा चंद्रोदयाचा पहिला दिवस. [सं. सूर्य+इंदु+संगम] **सूर्योदय**–पु. सूर्य उगवणें. **सूर्योपासक**–वि. १ सूर्याची पूजा करणारा सूर्यपूजक. २ (ल.) दिवाळखोर. **सूर्योपासना**–स्त्री. सूर्याची भक्ति उपासना, पूजा इ०.

सूल—पु. एक प्रकारचा ताल; यांत मात्रा दहा व विभाग पांच असतात.

सूस—पु.स्त्री. एक प्रकारचें कंदमूळ. [हिं.]

सूळ—पु. १ शूल पहा. २ एक प्रकारचें हत्यार. **सुळीं द्यावयाची वेळ**–भर दुपारची वेळ. [सं. शूल] **सुळीं देणें**–सुळाच्या तीव्र अग्रावर डांबून बसवून मारणें. **सूळाघरची पोळी**–स्त्री. जीव धोक्यांत घालण्यासारखें काम. **सूळ घेणें**–अत्यंत कष्टप्रद काम करणें. **०घेणा-ण्या**–वि. कठीण; अवघड; दुःसाध्य (काम). **०बांध**–पु. चढाचा व अरुंद रस्ता; सुळक्यासारखा बंधारा, बांध.

सूक्ष्मना—स्त्री. सुषुम्ना (नाडी) याचा अपभ्रंश.

सूक्ष्म—न. ब्रह्म (सर्व विश्वाला व्यापून राहिलेलें पण सूक्ष्माहून सूक्ष्म). –पु. १ अणु. २ साहित्यांतील एक अलंकार. वाच्यालंकार पहा. –वि. १ बारीक; लहान; थोडें; अणुप्रमाण. २ नाजूक; साधारण; किंचित्. ३ सुरेख; विरळ. ४ विरघिरीत; ठिसूळ. ५ दिसण्यांत छानदार; सुरेख. [सं.] **०दर्शक यंत्र**–न. सूक्ष्म व अति सूक्ष्म पदार्थ पाहण्याचें यंत्र. **०दर्शी-दृष्टि-**

द्रष्टा–वि. तीव्र नजरेचा; बारकाईनें पाहणारा; मर्मज्ञ. **०देह-शरीर**–पु न. लिंगदेह पहा; वासनात्मक शरीर. **०बुद्धि**–वि. अतिशय बुद्धिमान; मर्मज्ञ; मार्मिक. **०मान**–न. १ अगदीं बरोबर व सूक्ष्म माप; बिनचूक मोजमाप. २ सविस्तर व तंतोतंत अंदाज. ३ (विपल, पल, विकला, कला इ० निमेषापासून संवत्सरापर्यंत) काल–विभागाचें मोजमाप; याचे उलट स्थूलमान. **०वाद**–पु. परमाणुवाद (एका परमाणूपासून आत्मा झाला हा). याचे उलट स्थूलवाद. **०वादी**–पु. सूक्ष्म वादाचें समर्थन करणारा. **०संचयन गणित**–न. अति सूक्ष्म संख्यांची किंवा परिमाणांची बेरीज करणारें गणितशास्त्र. इंटीग्रल कॅल्क्युलस या इंग्रजी शब्दास प्रतिशब्द.

सृजणें––उक्रि. उत्पन्न होणें; करणें; बनणें, बनविणें. 'ते ते जीव सृजिले तैसे।' [सं. सृज्] **सृजन**–न. १ उत्पत्ति. २ सृष्टि.

सृति––स्त्री. मार्ग. [सं.]

सृष्टि––स्त्री. १ निर्माण करणें; उत्पन्न करणें; जोडणें; लागणें; संलग्न होणें. म्ह० प्रतिजीवीं सृष्टि भिन्न. २ विश्वांतील ब्रह्माचा सर्वव्यापीपणा. ३ जगाची उत्पत्ति. ४ जग; विश्व. (समासांत). मनोरथ सृष्टि=मनोराज्य; त्यांत निर्माण केलेले अनेक प्रकार इ०. स्वप्नसृष्टि=स्वप्नांतील भ्रामक देखावे. जीवसृष्टि=जीवानें निर्माण केलेली सृष्टि; प्रत्येक जीवाचे नानाविध व्यापार. मायिक सृष्टि=अशाश्वत जग; ब्रह्मापासून निर्माण झालेल्या मायेनें वाढविलेला सर्व प्रपंच; विश्व. याप्रमाणें **कल्पना–मानसी–आसुरी–भूत–ब्रह्म–विश्वामित्र**–सृष्टि इ०. [सं. सृज्=उत्पन्न करणें] **०कर्म-मार्ग**–पु १ सृष्टीची रहाटी; रीतभात; रीत; क्रम; मानवी जीविताची परिपाठी, गुणधर्म. 'सृष्टिक्रमच आहे, कोणी रडतो कोणी हंसतो, कोणी मरतो, कोणी जन्मतो.' २ ऐहिक जीवन; जीवित. **सृष्टि नव्यानें-नवी सृष्टी करणें**–बदललेल्या जीवनक्रमासः आयुष्यक्रमास प्रारंभ करणें. **सृष्ट**–वि. १ उत्पन्न केलेलें; निर्माण केलेलें. २ जोडलेलें; संलग्न; बनविलेलें.

से––स्त्री. १ स्मृति; सय; आठवण. 'देखें ऋद्धिसिद्धि तयापरी आली गेली से न करी।'–ज्ञा २.३६३. २त्यावरून छंद, स्फुर्ति. 'म्हणोनि यया वाखाणा–। पार्सी से आली चौगुणा।'–ज्ञा १३.६४५. ३ अनुमान, हेतु. 'ऐसी पुढील से घेतु।'–ज्ञा १.१७१. ४ (ल.) रोष; असंतोष; क्रोधयुक्त स्मृति; दंश. 'परि तें तैसें कैसेनि होईल। जात्यंधा कैसें पाहेल। तेवींचि येरू से घेईल। म्हणोनि बिहे।'–ज्ञा ६.७. [सं. स्मृति-सई, सय=आठवण?]

सेइणें––अक्रि. (घर) शाकारणें; (घर गवतानें) शिवणें. [सं. च्छादन]

सेक, सेकट, सेंकडा-डों-डोशः, सेकणें, सेकसेगडी––शमध्यें पहा.

सेक-ख––पु. शेवट, अखेर; शेवटीं. **सेखीं**–क्रिवि. अखेरीस. 'सेखीं अडविसी'–तुगा १२३८. [सं. शेष]

सेक––पु. शिंपडणी; सिंचन; सडा. [सं. सिच्=शिंपडणें] **०ता**–वि. पडा टाकणारा; सिंचन करणारा.

सेकंद––न. मिनिटाचा ६० वा भाग. [इं.]

सेकाटा-टी, सेकार-रणी-रणें, सेकावणें, सेकाटी, सेखचिल्ली, सेखदार-री, सेखी, सेंग, सेंगट-वगी, सेगडी, सेगवा सेगोळे––शेकाटा, शेकार, शेकविणें इ० पहा.

सेक्रेटरी––पु. चिटणीस [इं.]

सेचन––न. शिंपडणी. [सं.] **सेचक**–वि. शिंपडणारा.

सेचाळ-ळीस, सेज-आरती, सेजार-धर्म, सेजारी-पाजारी, सेजो, सेजुटणें, सेजार-री, सेठ(ट)जी-सेठाई-णी, सेठी-ट्या(ट्या), सेंडा-डी, सेण, सेत, सेताळ-ळीस––शेचाळ, शेज इ० पहा.

सेज––स्त्री. १ बिछाना; शय्या. शेज पहा. २ क्रम; रांग; ओळ. **०साळ**–स्त्री. शयनघर. 'शून्य सेजसाळिये। सुलीनतेचिये तुळिये।'–ज्ञा १३.४२ [सं. शय्याशाला] **सेजे येणें**–निजणें.

सेजरें––न. कणसें ठेवण्यासाठीं केलेलें कडब्याच्या पेंढ्यांचें वर्तुळ. [शेज=रांग]

सेजा––पु. (गो.) सज्जा; ग्यालरी. [हिं. छज्जा]

सेंट––न. विशिष्ट प्रकारें काढलेलें अत्तर; सुगंधी अर्क. [इं.]

सेंटर––पु. मध्यबिंदु; गाभा. [इं.]

सेउ, सईत––पु. (गो.) शेंबूड.

सेतु––पु पूल; बांध; धरण. [सं.] **०बंध**–पु. १ वानरसैन्य लंकेत नेण्यासाठीं रामाच्या आज्ञेवरून नलानें समुद्रावर बांधलेला पूल. २ (सामा.) पूल.

सेंद, सेंदाडशिपाई, सेंदणो, सेंदणें, सेंदरा-री, सेंदव सेंदाडवलि, सेंदवले, सेंदाड, सेंदाडें, सेंधूर, सेंधेलोण––शेंद, शेंदाड शिपाई इ० पहा.

सेंद––स्त्री. कापूर ठेवण्याची हस्तिदंती डबी.

सेंद्रिय––वि. इंद्रियविशिष्ट. [सं.] **०रसायनशास्त्र**–न. इंद्रियविशिष्ट प्राणी व वनस्पति आणि त्यांचीं द्रव्यावर रसायन कार्यें घडून बनलेले संयुक्त पदार्थ यांचें विवरण ज्यांत केलेलें असतें असा रसायनशास्त्राचा भाग.

सेन––पु. ससाणा. [सं. श्येन]

सेनगांठ––पु. घोड्याच्या फऱ्याजवळील भोंवरा.

सेना—स्त्री. सैन्य; फौज. [सं.] **०खासखेल**-पु. बडोदेकर गायकवाड घराण्याची पेशव्यांनीं दिलेली पदवी. **सेनांग**-न. गज-अश्व रथ-पदाती असे सैन्याचे चार भाग, त्यापैकीं प्रत्येक. [सं.] **सेनांगचतुष्टय**-न. वरील चार भागांचें एकत्रित सैन्य. **सेनाचर**-वि. सैन्याबरोबर जाणारा. **०नाथ ०पति**-पु. सैन्याचा मुख्य नायक. **०निवेश**-पु. सैन्याचा तळ; छावणी; शिबिर. **०भार**-पु सर्व सैन्य; दळभार; फौज. **०मुख**-न. तीन पत्ती इतकें सैन्य. **०सरखेल**-पु एक फौजबंद सरदाराची पदवी.

सेप, सेपकिडा, सेपू, सेपूट, सेवई—शेप, शेपकिडा इ० पहा.

सेंपाक-घर-सेंपाकीण—सैपाक, सैपाकघर पहा.

सेंबी—स्त्री. शेंबी पहा.

सेंभ—वि. स्वयंभू. [सं. स्वयंभू]

सेयारी—स्त्री. चेटकी; डाकीण, पिशाची. [अर. साहिर=जादुगार, मांत्रिक]

सेर, सेरणी, सेरी—शेर, शेरणी इ० पहा.

सेरि—स्त्री. तृप्ति; समाधान. -शर.

सेरीक—पु. सरकारी शेरी जमीनीवरील अधिकारी. [शेरी]

सेरू—पु लाकडी पळी. [सं. स्रुवा]

सेल—पु. १ बैलगाडीच्या जुवाचा समतोलपणा. २ एकाच उंचीची बैलजोडी. [सं. शैल]

सेल—पु. १ खाण्याचा पदार्थ. -शर. २ शेवट; टोंक. 'बैसला गुरुत्वाचे सेले।'-अमृ २.२०. -वि. शेलका, निवडक, उत्तम (वांटा); 'तो दुष्कृताचा कीर सेल वाटा।' -ज्ञा ९.४१६. [सं. शैल=टोंक]

सेलडी-डो(दो)रा, सेलूदोरा—पु. मुलांचा एक खेळ. -शर.

सेलणें—सक्रि. १ (पाणी) तोडणें; कापणें; टोंचणें. 'ते उपरतीच्या वावी सेलत।' -ज्ञा ७.१०१. २ दुष्ट शब्द बोलणें. -ज्ञा ३.४९६. ३ आकाशांत भरारी मारणें. 'कीं म्हणिजे गरुड हा सेलत। पतंगासारिखा।' -स्वादि १.२.१६.

सेलतणें—अक्रि. भासणें. -शाब्रीको.

सेला—पु. गर्दी; जमाव; लोंढा. 'दत्ताजी शिंदे इकडे तोंड करीत तों इकडील फौजेचे सेले तोंडसन्मुख येत.' -भ.ब ६३. [फा. सैलाव]

सेलाटक—न. भोंकरीचें झाड.

सेलार-रा—पु बाण तयार करणारा कारागीर. 'सेलारा फणिमौळी। उणैनाभि झीलि। या चोविसा गुरूंची वोळि। सांधितली तुज।' -भाए २६८. [अर. सिलह्=शस्त्र]

सेली—स्त्री. हार; दोन्याची कंठी. [सं.]

सेलू—वि (व्यापारी सांकेतिक) सहा (संख्या). 'सेलू पोकू आणि ढकार। आवारू खूण सांगती सत्वर।' -भवि ४२. ४६.

सेव—पु. (व.) बायकांचा डोकीवरील पदर. [सं. शेवट] -वि. (व.) थोडा ढाळ, उतार असलेलें.

सेव—पु. सफरचंद फळ. 'विलायती मेवा सेव दाणे पंधरा...' -दिमरा १.२२. शेव पहा. [फा.]

सेवक—पु. १ चाकर; नोकर; कामीं येणारा, हाताखालचें हलकें काम करणारा माणूस. २ सेवन पहा. [सं.] **सेविकिनी**-स्त्री. दासी; मोलकरीण. **सेवकी**-स्त्री. चाकरी; सेवाधर्म. **सेवणें**-सक्रि. १ उपयोग करणें; कामावर योजणें; सेवा-चाकरी करणें; पूजा करणें; आदर दाखविणें. २ उपभोग घेणें; भक्षण करणें; खाणें सेवन करणें; [सं. सेवन] **सेवन**-न. १ चाकरी; चाकरी करणें. २ उपयोग; उपभोग; स्वीकार; अनुभव घेणें; कामी लावून पहाणें (वस्तु, उपाय, योजना, औषध, अन्न इ०) 'हें औषध सेवन कर.' ३ शिवणें; दोरा घालणें. ४ पूजा, उपासना, करणें. **सेवनीय**-वि. पूजा करण्यास, आज्ञा पाळण्यास, सेवा करण्यास, उपयोगांत आणण्यास, उपभोगण्यास योग्य. **सेवा**-स्त्री. १चाकरी; नौकरी; दास्य. २ पूजा; मान; आदर. ३ देवाची चाकरी; उपासना. ४ उपयोग. [सं.] **०चोर**-वि. सेवेंत अंतर पाडणारा. **०दल**-न. स्वयंसेवकांचें पथक. **०धर्म**-पु. चाकरीचें काम. **०धार**-पु. सेवेकरी. **सेविका**-स्त्री. १ स्त्रीस्वयंसेविका. २ इस्पितळांत रोग्याची शुश्रूषा करणारी स्त्री. (इं.) नर्स. **सेवित**-वि. सेवन केलेलें; चाकरी झालेलें. **सेवी**-वि. सेवा, चाकरी, उपयोग करणारा, उपभोग घेणारा. (समासांत) तीर्थ-औषध-सेवी. **सेवेकरी**-पु. चाकर; विशेषतः देवांची सेवा करणारा; पुजारी; उपासक. **सेव्य**-वि. सेवनीय. **सेव्याठाय**-पु. (संकेतानें) ब्रह्म. -शर.

सेवखंड, सेवगा, सेवट, सेवटणें, सेवटला, सेवतें—शेवखंड, शेवगा इ० पहा.

सेवडी—स्त्री. कातडें; चामडें. 'वरी चोखट मृगसेवडी।' -ज्ञा ६.१८२. [सं. छाल+डी]

सेवय-या, सेंवरा-री-ऱ्या—'शे' खालीं पहा.

सेवसवजी—स्त्री. भाजीपाल्यावरची पट्टी, कर. [फा. सेव=फळ+सब्जी=भाजी]

सेवाळ-ळी-ळ, सेवाळणें—शेवाळ इ० पहा.

सेशनकोर्ट—न. प्रत्येक जिल्ह्यांत असलेलें सर्वांत वरिष्ठ फौजदारी कोर्ट [इं.]

से(सें)स—स्त्री. शेज पहा.

सेंस-पाट-फूल, सेंसगांठ, सेहत्तर—शेंसपाट, शेंसफूल इ० पहा.

सेहत—स्त्री. प्रकृतिस्वास्थ्य. 'आपल्यास सेहत जालियाचे खुशीचे पाचें...' –पया ४६७. [अर. सिहत्]

सेळक्या, सेळडूं, सेळी—शेळक्या इ० पहा.

सै—स्त्री. सई पहा.

सैंग—स्त्री. (महानु.) सोपा; पडवी. –ऋ ११६.

सैंग-घ—पु. समूह. [सं. संघ] –वि. १ पुष्कळ; सर्व. 'घापे पटामार्जी तंतूची सैंघ सृष्टी।' –ज्ञा ६.१००. २ स्वतःसिद्ध. –क्रिवि. १ केवळ. २ एकदम. 'तयाधर्गी सैंघ पळिपे। क्रोधाग्नि तो।' –ज्ञा १६.३९४.

सैंचळ—न. संचळ पहा.

सैताडला, सैताडल्या वाणाचा—वि. (व.) लहरी, पिसाट.

सैतान—पु. १ झोटिंग; वेताळ; पिशाचांचा राजा. २ (ल.) घोर कर्म आचरणारा पुरुष; पापमूर्ती माणूस [अर. शैतान्]

सैति—स्त्री. दोरी जोडलेली लांब बर्ची [सं. शित=तीक्ष्ण?]

सैदोन—पु. एक प्रकारचा नगारा. [फा.]

सैंधव—न.पु. १ शेंदेलोण. २ घोडा. [सं. सिंधु] **०ता**–स्त्री. खारेपणा. –वि. समुद्रसंबंधी, सिंधुनद अगर सिंध देश यासंबंधी [सं.] **सैंधवी**–स्त्री. गाण्यांतील एक राग.

सैन्य—न. फौज; लष्कर; फौजेची तुकडी. [सं.] **सैना(न्या)धिपति, सैना(न्या)ध्यक्ष**–पु. सेनापति. **सैनापत्य-सैनाधिपत्य**–न. सेनापतीचें काम; त्याची सैन्यावरील हुकमत; त्याची पदवी. **सैनिक**–पु. शिपाई –वि. सैन्यासंबंधी.

सै(सैं)पाक, सैंपाकघर, सैंपाकी, सैंपाकीण—स्वयंपाक इ० पहा.

सैफ—स्त्री. एक जातीची तरवार. [अर. सैफ्]

सैयद—पु. सय्यद पहा.

सैया—पु. भैरव्या; उत्तर हिंदुस्थानांतील इसम. 'घरांत, एकदा परदेशी सैया होऊन येईन' –भावबंधन. [सं. सखिन्]

सैर—पु. चोरांची एक जात व तींतील व्यक्ति. –वि. स्वैर; स्वच्छंदी. [सं. स्वैर] **०ट, सैराट**–वि. स्वच्छंदी; हट्टी; हेकेखोर; दांडगा; वेडेंवाकडें; आडदांड; कठोर; वर्कश. **म्ह०** वांई वैराट बोली सैराट.

सैर, सैरणी—स्त्री. सहल; निसर्गनिरीक्षण. 'आम्रथाची सैर करावयास या प्रांती आले आहेत' –दिमरा १.३०१. [अर. सैर]

सैरंध्री—स्त्री. १ अंतःपुरांतील दासी, ही गरती असून श्रीमंताच्या घरीं वेणीफणी, वस्त्रालंकारादि रचना इ०कामें करण्यासाठीं वेतन घेऊन राहते. २ द्रौपदी. [सं.]

सैरफाजील—न. कोरडवाहू व बागायत यांच्या उत्पन्नांची नोंद व उत्पन्न; याच्या उलट ऐन फाजील. [अर. सायर=इतर]

सैरा, सैरावैरा—क्रिवि. ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे; दाही दिशांनीं; स्वैरपणें (भीतीनें धांवणें, पळणें); अफाट; मोकाटपणें; स्वच्छंदानें [सं. स्वैर द्वि.]

सैरा—वि. (व.) नीट; चांगलें; सरळ. 'सैरा घरीं जा.' **म्ह०** एक कान सैरा, एक कान बहिरा.

सैराण—पु. (कु.) भान; आठवण.

सैरिक-सैर—वि. नांगरासंबंधी, नांगरटी-शेतकीविषयक. [सं. सीर=नांगर]

सैरिय—पु. रेडा; हेला.

सैल—स्त्री. कंगणी इ० दागिने घडविण्याचा दांडा.

सैल—वि. ढिला; लटपटीत; मजबूत नव्हे असा; पोकळ. [सं. शिथिल] **०सोडणें**–ढिलें सोडणें; लटपटित ठेवणें, दाबांत न ठेवणें. **०दोरी**–स्त्री. लटपटीत दाब, वचक, अंमल. (क्रि० देणें; सोडणें). **०णें, सैलावणें**–उक्रि. ढिलें, लटपटित होणें, सोडणें, करणें. **सैलावणी**–स्त्री. मोकळीक; ढिलेपणा.

सैली—स्त्री. १ फकीराच्या गळ्यांतील सुताची माळ. २ (तंजा.) फुलांची माळ. ३ मोत्यांची माळ; कंठी. 'मोत्यांची एक सैली आहे त्याची किंमत नऊ लाख रुपये आहे.' –नानासाहेब शिंदे यांचें आत्मवृत्त ३३८. [हिं.]

सैंवर—न. स्वयंवर पहा.

सैसद—क्रिवि. (राजा.) सारखा; ओळीनें. सतसय पहा.

सोइरगत, सोइरा, सोइराधायरा, सोइरी, सोइरोक—सोयरगत, सोयरा इ० पहा.

सोई, सोय—स्त्री. १ परिस्थितीची अनुकूलता; कामधंदा, व्यापार, उदीम इ०चा फायदा, फुरसत, समाधान, ज्यांत लाभेल अशी परिस्थिति. २ अनुक्रम, व्यवस्था, रचना इ० लावणें, करणें 'पोथ्या सोईनें लाव.' ३ अनुकूलतेचें, व्यवस्थेचें इ० साधन; उपजीविकेचें; धंद्याचे (चाकरी, वतन, शेत) इ० सुखदायक साधन, मार्ग. ४ आश्रय, आधार; विश्रांतिस्थान. –ज्ञा १७.२२९. [सं. सु=चांगलें+ईर=जाणें] **०करणें**–१ व्यवस्था लावणें. २ (व.) टोकणें. **०बसविणें**–(ना.) खोडकी, नांगी मोडणें. **०वार-सार-स्कर**–वि. असावी तशी सोय, फायदा असणारा; लाभदायक; सुखकर (उद्योग, धंदा इ०). **०सुमार**–पु. प्रसंगाचें औचित्य किंवा अनुकूलता; योग्यपणा; व्यवस्थितपणा; मेळ; योग्य काळ वेळ, संधि; मागचें पुढचें धोरण; समजसपणा. 'त्याचे खर्चाला आणि तुझ्या करण्याला सोई सुमार नाहीं.' **०सोईनें**–क्रिवि. बेताबेतानें; हळू हळू; सौम्यपणें; परिस्थितीस अनुसरून (पैसा देणें, घेणें इ०).

सोपर-वेर-हेर, सोपरतुला, सोयेर, सोपरणें—सुवेर इ० पहा.

सोकट—न. वाळलेला मासा; झिंग्या; सुकलेलें बोंबिल. सुकट पहा. [सुकणें]

सोकट—पु. कोष्ट्याचा कापड विणण्याचा माग.

सो(सों)कटी-टें-ठी—स्त्री.न. सोंगट्याच्या खेळांतला पटावर मांडण्याचा लहानसा लांबट लाकडी किंवा हस्तिदंती ठोकळा; नरद पहा. मेजवानीचे वेळीं यांत उदबत्त्या खोचतात. [सं. सारी+काष्ठ] **सोकट्या**-स्त्री. अव. सोंगटीचा खेळ. **सोकटीकांठी, सोकटेकांठी**-वि. कांटाकांठामध्यें सोंगट्यां सारखी नक्शी असलेलें (वस्त्र). **०घाट**-पु. मोती, रत्न इ०कांचा सोंगटीसारखा असलेला घाट. **०बाज**-वि. सोंगट्या खेळणारा.

सो(सों)कणें, सो(सों)कावणें—अक्रि. संवकणें; नाद लागणें; गोडावणें; आवड, चट, लज्जत, शोक, आसक्ति लागणें; लाचावणें; चटावणें. [संवय ?] **म्ह०** १ सोकली मेंढी तेंच रान. २ सोकल्या भुता चल जाऊं मागल्या शेता. **सोकील, सोंकेल-सोकीव**-वि. चटक लागलेला; संवकलेला.

सोंकरणें—सक्रि. राखणें; रक्षणें करणें. **-शर. २** (महानु.) हांकणें; हुसकून लावणें. ' सोंकरिताति तुरंबिआंवरी । पूंसेंयाते । ' -शिशु २५५. [सं. संरक्षण ?] **सोक(का)र-री**-पु. जागल्या; राखणदार; रक्षक. **सोकरा धरणें**-(व.) काळजी वाहणें.

सोकरा-री-रें—छोकरा इ० पहा.

सोकळ—वि. ढिसूळ (दगड इ०).

सोकाजी—वि. छाकटा. [अर. शौक=नाद, छंद]

सोकाटणां-णें—न. (कु.) लाकूड फोडतानां त्याखालीं आधारासाठीं ठेवावयाचा ओंडका.

सोक्त, सोख्त—वि. १ (गंजिफांचा खेळ) कोणत्याहि एका रंगाच्या बारा पानांतून एकहि पान दुसऱ्याचे हातांत राहिलें नाहीं असा जो रंग होतो तो. २ दग्ध. ' सरंजाम सर्व सोख्त जाला. ' -दिमरा २.४. [फा. सोख्त]

सोख-सोखणें—शोष इ० पहा.

सोखी—स्त्री. उन्मत्तपणा. शोखी पहा. ' शामलांनीं सोखी करून बाणकोटास अपाय केला. ' -बाडशाछ २६.

सोंग—न. १ नाटकांत घेतलेली भूमिका; वेष; पाटें. (क्रि० आणणें; घेणें; येणें). २ ढोंग; मिष; बनावट वेष; नक्कल; आविर्भाव. ३ पोकळ देखावा, थाटमाट; निरुपयोगी व व्यर्थ अडचण करणारी गोष्ट. ४ लोकविलक्षण माणूस; चमत्कारिक वस्तु, प्राणी. [सं. स्वांग; का. सोगु] **म्ह०** १ रात्र थोडी सोंगें फार. २ सारी सोंगें येतात, पैशाचें सोंग येत नाहीं. **०करणें**-हुबेहुब नक्कल, अनुकरण करणें. **०ढोंग**-पु. १ सामान्यपणें सोंग. २ खोडसाळपणा. ३ बतावणी. (क्रि० करणें; मांडणें; लावणें; माजवणें). **०संपादणी**-स्त्री. घेतलेल्या भूमिकेची तंतोतंत बतावणी. **सोंगाडी-ड्या, सोंगाळ्या, सोंगी-ग्या**-वि. १ सोंग घेणारा; बहुरूपी. २ ढोंगी. **म्ह०** (व.) सोंग्या ढोंग्या पांडुरंगा.

सोगई—स्त्री. (माण.) विवाहसंबंध; सोयरीक. [गु. सगई]

सोंगटी-डी, सोंगटें-डें—सोकटी इ० पहा.

सोगण, सोगंद—स्त्री. शपथ (क्रि० खाणें; घेणें; वाहणें). [फा. सोगंद]

सोंगणी—स्त्री. १ पिकाची कापणी, लाणी. ' बाजरी सोंगणीस आली. ' २ कापलेल्या पिकाची पेंढी बांधणें, वेटाळणी. **सोंगणें**-अक्रि. (व.) शेताची कापणी करणें; पीक गोळा करणें. **सोंगन**-स्त्री. शेताची कापणी; हंगाम. [सं. संग्रह्]

सोगल—न. (बे.) हिंवाळ्यांतील शेतांतील तण.

सोंगळ—वि. १ नाजुक; कोमल; सुबक; कांटेखोरपणाची जाणीव असलेला. २ मृदु, सुकुमार. ३ मलीनपणाची खंत असलेला; चोखंदळ. याचे उलट ओंगळ. [सं. सुमंगल]

सोगळा—वि. (कर.) ढिला; सैल. ' कोट सोगळा ठेवा. '

सोगा—पु. नेसलेल्या वस्त्राचा लोंबता भाग, पदर. [का. सोगे]

सोगा—पु. डोळ्यांत घालावयाचा सुरमा. ' नयनीं सोगयाचें अंजन । ' -एभा १.३४८. **सोगयाचें अंजन**-न. सुरमा. ' आकर्णपर्यंत विशाल नयन । माजीं विलसे सोगयाचें अंजन । ' -सवि ८.४६.

सोगी—पु. (गो.) एक लहान मासा.

सोच्यपण—न. गरीबी; रंकपण; शोचनीय अवस्था. ' जिए साउलिए वीणे । आमुचे सोच्यपणें । ' -ऋ ७७. [सं. शुच्=शोक करणें]

सोजी—स्त्री. १ कोरडें भांडें चुलीवर ठेवून त्यांत तूप घालून, त्यांत जिरें, हळद घालून मग तांदूळ परतणें, नंतर आधणाचें पाणी घालून केलेला भात. २ सपीट, मैदा; गव्हाचा रवा. ३ (कों.) गव्हाची किंवा तांदूळाची खीर. [सं. शुचि]

सोजीर—पु. पलटणींतील गोरा शिपाई. [इं. सोल्जर]

सोज्वल(ळ), सोज्वलित—वि. १ चकचकीत; चमकणारा. २ तुळतुळीत; निर्मळ. ३ पापरहित; निष्पाप. [सं.]

सोट—पु. पीक खाणारा एक किडा; याचा रंग हिरवा व शरीर लांबट असतें.

सोट—पु. १ लांब, सरळ व जाड लांकूड (तुळई, कडी, खांब इ० साठीं); उंच; सरळ झाड; उंच केळीचा कोका. २ उंच मनोरा; उभट जिना, दादर; पर्वताची सरळ सोंड; सरळ रस्ता. ३ सुमारें २० पायली धान्य भरलेलें व तोंड शिवलेलें

पोतें. ४ (ल.) आडदांड; धश्चोट; राकट माणूस; फटिंग; मूलबाळ किंवा परिवारविरहित पुरुष किंवा स्त्री. ५ (ल.) उंच व धिप्पाड माणूस. [सं. शौंड? हिं. सोंटा] **०गा-गें**-पु. न. दांडकें; सोटा; दंडुका; बडगा. **०बहिरी-भैरव**-पु. गलेलठ्ठ व आडदांड माणूस; फटिंग; सडेसोट पुरुष. **०वाव**-पु. फोंक (झाडाचा इ०). **०शिंग**-पु. सडेसोट; अविवाहित पुरुष. **०ळणें, सोटाळणें**-अक्रि. गाय, म्हैस यांच्या जननेंद्रियातून शेंबडाचे लोळीसारखा स्राव होणें. **सो(सों)टा**-पु. १ लांबट लाकूड (खांब, शिडाची काठी यांच्या उपयोगी). सोटगा, सोट पहा. २ गाय; म्हैस इ० च्या योनींतून शेंबडाचे लोळीसारखा गळणारा स्राव. (क्रि० गळणें, गाळणें). **सोटा-दुपट्टा**-पु. प्रवासांतील वस्त्रपात्र, काठी दांडकें इ० थोडेसें जरूरीचें सामान. **सोटे पान्हवण**-न. सोटा इ० मारून गाय इ० पशु पान्हवण्याची क्रिया; त्यासाठीं सोडण्याचा काढलेला आवाज. **सोटे दरबार**-सोटा बाळगणारा मनुष्य. **सोटे-पीरं-बारगीर-भैरव-सुंभ-सुलतान**-सोट बहिरी पहा; सडाफटिंग; सडेसोट. **सोटे बरदार**-पु. भालदार; चोपदार. **सोटेबाजी-शाई**-स्त्री. काठ्यांची मारामारी; दंडुकेशाई. -वि. आडदांड; आडदांडपणें हल्ला करणारा.

सोट्ट—वि. (कों.) १ वांझ. 'म्हैस सोट्ट आहे.' २ (बे.) पोकळ.

सोड—स्त्री. १ कर्ज इ० ची सुट; अशी सुट दिलेली रकम. २ मोकळीक देणें; अटकाव न करतां जाऊं देणें; उपेक्षेची मोकळीक; सवलत; मुक्तता. ३ परवानगी. ४ काडीमोड; सोडचिठ्ठी (लग्नाची). [सोडणें] **०खत-चिठ्ठी-पत्र**-स्त्री. १ सोडणुकीचें पत्र; सांडखत; आपल्या मालकींतून सोडलेल्या (गांव, शेत, किल्ला इ० च्या) वस्तूच्या मोकलिकेविषयीचें आज्ञापत्र; सांडपत्र; सुटपत्र. २ ज्यावरून कोणी मनुष्य आपला विवाहित संबंध तोडतो असा लेख. **०धांव**-स्त्री. (उद्योग धंदा) सोडून, निघून जाणें; टाकून, पळून जाणें; धरसोड करणें. **०पेंढी**-स्त्री. मोठ्या (गवत इ० च्या) भाऱ्यांतून विक्रीसाठीं बांधलेली लहान पेंढी. **०बांध**-स्त्री. १ वरचेवर मोकळें करणें व बांधणें. २ असल्या प्रकारचा धंदा, नोकरी. 'घोड्यांची सोडबांध मजकडे होती, आतां निराळा घोडक्या ठेवला.' **०मुंज**-स्त्री. मुलाच्या उपनयनाचे वेळीं त्याचे कमरेस जी मुंज (गवताची दोरी) बांधलेली असते ती सोडण्याचा विधि, गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्याची मोकळीक; समावर्तन संस्कार. **०मोकळ**-स्त्री. १ सोडून मोकळें करणें (गवताचा भारा इ०). २ काम इ०ची साधारण मोकळीक; सोडवणूक; पशु, नोकर इ० वर फारसा दाब न ठेवणें. (क्रि० करणें; देणें). ३ कर्ज; सारा इ० पैकीं कांहीं रकम सोडून देणें. ४ सोडमोकळीक; विसकटलेली; मोकळीक दिलेली, विसाव्याची, फुरसतीची स्थिति. **०वण-वणी-वणूक**-स्त्री. १ मुक्तता; मुक्त होणें; मुक्ततेची स्थिति; मोकळीक; स्वतंत्रता; सुटका. २ मुक्ततेचा कोणताहि उपाय. ३ पळवाट; छिद्र; अपवाद. ४ सोडवगी; मळ्यांतील पाटांतून वहाणारें पाणी (शेलण्यानें शिंपडलेलें नव्हे). **०व(वि)णें**-१ जाऊं देणें; सुटे असें करणें; मोकळें करणें; बंधमुक्त करणें. २ कांहीं प्रसंगीं भितीवर चित्रें, रांगोळी, आकृति; प्रतिमा इ० काढणें; रेघोट्या ओढणें. ३ मालकाडून काढून घेणें. ४ गूढ, उखाणा इ० उकलणें. ५ (गणित) प्रश्नाचें बरोबर उत्तर देणें. **०वून ठेवणें**-हातचा राखून ठेवणें; पळवाट काढून ठेवणें; सुटण्याच्या उपायाची तरतूद पूर्वीच करून ठेवणें. **०सांड**-स्त्री. कर्ज इ० ची सुट; या सुटीची रकम. **सोडण**-न. १ (कों.) नारळाचें चोड; नारळावरील तंतुमय आवरण. २ (ल.) हट्टी; चिकट माणूस. **सोडणी**-स्त्री. १ सोडवणूक. २ (ल.) मोक्ष. -ज्ञा १८.४४. **सोडंणूक**-स्त्री. १ मुक्तता. २ ताटातूट; वियोग; संबंध सोडणें. ३ जाऊं देणें. ४ पळवाट; सुटण्याचा मार्ग. **सोडणें**-उक्रि. १ मोकळें करणें; खुलें करणें; बंधन, करार यांतून मुक्त करणें; वचक, घोटाळा, त्रास; संकट यांतून वांचविणें. २ वेगळें, विभक्त होणें; ताटातूट करणें; गांठ, बंधन इ० खुलें करणें; उलगडणें; संबंध, जोडणी, मांडणी इ० विजोड करणें. ३ सामान्यतः जाऊं देणें; असूं देणें; राहूं देणें; सूट (कर्ज, दोष) देणें; सोडून देणें; हात काढून घेणें; मुक्त, सहन, माफ, क्षमा करणें; शरण येणें; टाकणें; फेकणें; ओतणें; गाळणें; निथळणें (घाम, इ०); शिलगाविणें (तोफ, बंदूक इ०); सुटणें पहा. ४ धावविणें; पळविणें; दमविणें (घोडा, इ०). ५ कोणत्याहि धातूच्या ऊन प्रत्ययांत रूपापुढें ईं क्रियापद योजल्यास ती क्रिया पूर्णपणें करणें असा अर्थ होतो. टाकणें पहा. उदा० करून सोडणें; देऊन सोडणें इ० ६ प्रगट करणें. 'विश्वविकासित मुद्रा। जया सोडी तुझी योगनिद्रा।' -ज्ञा १७.१. **म्हo** (व.) सोडला तर पळतो, धरला तर चावतो (साप). दुष्टाशीं निकट संबंध ठेवल्यास आपली इज्जत घेतो, न ठेवल्यास तो शेफारतो. [सं. छोरणम्]

सोडयाळा—पु. (गो.) चणा; हरभरा. **सोडीया**-वि. (काव्य) सोडणारा. **सोडयाळ**-वि. १ चोखंदळ; खोडी काढणारा. २ ज्याचा लवकर कंटाळा येतो असें.

सोंड—स्त्री. १ हत्तीचा नाकासारखा लांब अवयव. २ पर्वत, दगड, अभ्रें यांचा सोंडेच्या आकाराचा भाग, नदीचा घाट; जोतें इ०च्या पायऱ्यांच्या बाजूच्या उतरत्या बंदिस्त बरवंड्या प्रत्येकीं. ३ (कों.) देवालयाच्या बाहेरचा, द्वारपालांच्या दोन्ही बाजूंचा ओटा; अलंग. -आडिवऱ्याची महालक्ष्मी ४७. ४ मोटेचा

पुढील चिंचोळा भाग. [सं. शुंडा] ०का-पु ओढ्याच्या जनावराचे पाठीवरील ओढ्याखालील पोतडी; गादी. ०गादी-स्त्री. पालखीच्या (खांद्यावर ठेवावयाच्या जागीं) दांडयाला जोडलेली लहानशी गादी; खोगीरावरील सोंडेसारखें चार कोपऱ्यांचें एक जीन. ०दोर-रा-सोल-पु. मोटेच्या सोंडेचा दोर, नाडा; सौंदर. ०वादी-स्त्री. मोटेची सौंदर व सोंड यांस जोडणारी वादी. **सोंडा-सोंडाळ-सोंड्या**-वि. सोंड असलेला (हत्ती, पोरकिडा, मुरकुट, टोळ); मोठें व कुरूप नाक असलेला. **सोंडी**-स्त्री. १ (महानु.) घराचे मुख्य दरवाजाचे दोहों बाजूंच्या पडव्या प्रत्येकीं; वेवडी. 'उत्तम दक्षिण सोंडिया दोन्ही।' -ऋ १०६ २ (ना.) मुख्य दरवाजाला लागून दोन हात लांब दरवाज्याइतकी उंच बांधलेली मातीची जागा, ओटा.

सोडगा-गें—सोटगा-गें पहा.

सोडत—स्त्री. शर्यत; लॉटरी; जुगार; एखाद्या पदार्थाची किंमत अनेकांनीं मिळून भरावी व पूर्वसंकेताप्रमाणें ज्याच्या नांवानें तो पदार्थ निघेल त्यानें तो घ्यावा असा व्यवहार [अर. शर्त; पोर्तु. सोर्टे]

सोडा—पु (कु.) एक जातीचा मासा; त्याच्या सुकविलेल्या मांसास सोडे म्हणतात.

सोडा—पु. (कों.) सुपारी वाळत घालण्यापूर्वी तिच्या दोनतीन ठिकाणीं काढलेल्या पातळ साली प्रत्येकीं. [सोलणें]

सोडा—पु. एक क्षार. [इं.] ०वॉटर-न. १ सोडयाचें पाणी. २ कॅर्बानिक असिड वायु दाबून घालून तयार केलेलें पाणी.

सोत, सोती—स्त्री. (कों.) गाय. म्हैस इ० चें जननेंद्रिय. [सं. सू=प्रसवणें]

सोत—स्त्री. (गो.) छडी. **सोतरणें-सोताड(र)णें**-उक्रि. (कों.) छडीनें, फोंकानें झोडपणें, मारणें.

सोत्कंठ—वि. अत्यंत उत्सुक. [सं.] **सोत्कंठा**-स्त्री. कळकळ.

सोदखार—पु. विलायती मीठ; सोडा खार. -मुंव्या १७२.

सोदणें—सक्रि. (बे.) गाळणें. [सं. शोधन]

सोद(ध)नें—न. स्वयंपाक्याचें हात पुसण्याचें फडकें. [सं. शोधन]

सोदर—वि. एकाच आईच्या उदरांतून जन्मलेले; सख्खे भाऊ. [सं.]

सोदा-द्या-धा-ध्या-सोदडा—वि. १ बदमाष; लुच्चा. (व.) सोद्रा. २ रंगेल; स्वैर. ३ (गो.) जार. [हिं.] **सोदाई-सोदे(धे)-गिरी-शाई, सोदावें**-स्त्री. न. १ उडाणटप्पुपणा; लुच्चेगिरी; बदमाषी. २ रंगेलपणा; स्वैरपणा. -वि. सोद्यासंबंधी.

सोनक—पु. (महानु.) खाटीक. 'सोनकानें उरगुढें घेतलें। वैकुंठीचें।' -शिशु १६०.

सोनका—पु. सोंडका पहा.

सोनगादी, सोनदोर-रा, सोनवादी—स्त्री. पु. स्त्री. सोंडगादी, सोंडदोर, सोंडवादी इ० पहा.

सोनामुखी—स्त्री. १ भुईतरवडीचा पाला. हा रेचक असतो. ढाळकाकरितां याच्या पाल्याचा काढा घेतात. २ (कों.) सुवर्णमुखी-माक्षिक.

सोनवी—स्त्री. निशाण; झेंडा.

सोनार—पु. १ सोन्याचे अलंकार घडविणार माणूस व त्यांची एक जात. २ (ल.) लोभी, चिक्कू माणूस. ३ ज्याचा आवाज सोनारानें मारलेल्या हातोडीप्रमाणें निघतो असा एक पक्षी. ४ एक क्षुद्र सपक्ष जंतु. [सं. सुवर्णकार] **म्हo** १ सोनार आणि कोण्हाला होणार!=कोणास फसविणार नाहीं? सोनार शिंपी कुळकर्णी आप्पा यांची संगत नकोरे बाप्पा=हे सर्व संगतीच्या माणसास लुबाडणारे आहेत. **सोनारानें कान टोचणें**-योग्य मनुष्यानें कानउघाडणी करणें. **सोनारकी**-स्त्री. १ सोनाराचा धंदा. २ (ल.) चौर्य करण्याचें कसब. **सोनारडा**-पु. निंदेनें सोनारास म्हणतात. **सोनारा**-वि. (व.) कबऱ्या रंगाचा (बैल इ०). **सोनारी कावा-मत**-पुन. सोनाराचें दागिन्यांतील सोनें चोरण्याचें कसब; फसवेगिरी.

सोनी—स्त्री. गायनांतील एक राग.

सोनी—स्त्री. (कु.) लहान मुलाचें जननेंद्रिय.

सोनें—न. १ कांचन; सुवर्ण; पिवळया रंगाची जड व मोलवान अशी एक धातु. २ दसऱ्याचे दिवशीं सीमोल्लंघन करून आल्यावर इष्टमित्रांस देण्यासाठीं आणलेलीं आपटयाचीं पानें. -वि. १ मोलवान; किंमतीचा; महत्त्वाचा; 'सोन्यासारखें मूल.' २ (चुकीनें) सारणें; उजेडाकरितां राखलेला धान्यांतील भोकसा. [सं. सुवर्ण; फ्रें.जि. सोवन, सोनें; पोर्तु.जि. सोनकै] **म्हo** सोन्याची सुरी झाली म्हणून काय उरीं घालावी? (वाप्र.) ०**आणि सुंगध**-उपयुक्त व सुंदर; फायदेशीर व दिखाऊ. ०**होणें**-मरणोत्तर उत्तम गति प्राप्त होणें; चागलें, चांगल्या परिस्थितींत मरण येणें. **सोन्याचा धूर, पाऊस निघणें-पडणें, सोन्यानें वांत किसणें**-अतिशय श्रीमंती असणें. **सोन्याहून पिवळा**-अतिशय उत्तम. **बाघन कसी सोनें**-१ उत्तम, मुळींच हीणकस नसलेलें सोनें. २ (ल.) उत्तम, शुद्ध वर्तनाचा, प्रामाणिक मनुष्य, किंवा वस्तु. **सोनें गाळणें**-सोन्याचा रस करून आंतील भेसळ काढणें. **कांहीं सोन्याचा तर कांहीं सवागीचा गुण असणें**-सोनें उजळतांना सवागीचा उपयोग करतात. त्यावरून एखादें महत्कृत्य घडवून आणण्यांत महत्त्वाच्या गोष्टी-

प्रमाणें अनुषंगिक गोष्टींचेंहि सहाय्य होणें, थोराप्रमाणें हलक्याचेंहि सहाय्य लागणें. **सोन्याचा दिवस**–पु. महत्त्वाचा, आनंदाचा दिवस. **सोन्याची सीता**–स्त्री. (बायकी) (ल.) नवऱ्याची लाडकी म्हणून नखशिखांत दागिन्यांनीं नटविलेली स्त्री. **सोन्याचे दरवाजे होत व ठसठसां लागोत**–(व.) मुलगा कसा का होईना पण होवो मग तो त्रासदायक झाला तरी चालेल. असेना पण वाचो. **सोन्याचें हाड**–न. नेहमीं उत्कर्ष, भरभराट होणारा माणूस. सामाशब्द– **सोनओ(व)ळख–खी**–स्त्री. दस-याचें सोनें (आपट्याचीं पानें) वांटताना झालेली तोंडओळख, **०कळी**–स्त्री. सोनचाफ्याच्या कळ्यांसारखा केलेला सोन्याच्या कळ्यांचा हार. **०काव**–स्त्री. एक जातीचा गेरू. **०कावळा**–पु. १ कुक्कुटकुंभा; भारद्वाज. २ (कों.) कृष्णकावळा. ३ पांढरा कावळा (काल्पनिक). **०कावळा शिवणें**–(बालभाषा) आई विटाळशी होणें. **०किडा**–पु. काजवा; कोणताहि चमकणारा किडा. **०कुला सोनक्या, सोना–न्या**–वि. लाडका (मुलगा). **०केतक–की**–स्त्री. केळीची एक जात. **०केळ**–स्त्री. एक चांगल्या जातीची केळ. –न. सोनकेळीचें फळ. हें पिवळें धमक व गोड असतें. **०खत–खात**–न. माणसाच्या विष्ठामूत्राचें खत. **०चड–डी; सोनचिडी–चेडी**–स्त्री. १ (को.) डोंबाऱ्याची (कोल्हाटयाची) चिमणी; खेळ करणारी बायको, बाहुली. २ एक जातीची चिमणी. ३ (गो.) वयस्क कुमारी; घोडनवरी. **०चाफा(पा)**–पु. एक जातीचें चाफ्याचें झाड. याच्या फुलास सोनचापें (फें) म्हणतात. याचा रंग पिवळा व वास मधुर असतो. **०जुई**–स्त्री. पिवळसर फूल येणारी जुई व तिचें फूल **०टका–क्का**–पु. १ एक फूलझाड व त्याचें पिवळसर फूल. २ एक प्रकारचें जुनें सोन्याचें नाणें; (त्यावरून) सोन्याचा तुकडा. ३ आवडत्या मुलास म्हणतात. ४ (विणकाम) आरसड व गोल यांचेमध्यें अडकविलेला एक दगड. **०तरवड**–पु. एक जातीचा (पिवळा व तांबडा) तरवड. शंकाशूर पहा. **०ताव**–पु. १ घोडयाचा पाय दुखावला असतां, तापलेल्या तव्यावर त्याचा पाय ठेवून वर पाणी ओतून द्यावयाचा डाग. २ सोनें तापवून पाण्यांत न बुडवितां निवूं देणें. ३ एखाद्याची खरडपट्टी काढणें; गालीप्रदान करणें. (क्रि० बसणें; देणें). **०पावडा**–वि. (कुत्सितार्थी) गरीब; दुर्दैवी (माणूस) **०पितळ**–न. स्त्री. उत्तम, चमकणारें पितळ (धातु) **०फळ**–स्त्री. एकजातीचें भात, साळ. **०मळी**–स्त्री. उंसाचा रस कढवितांना ढोरमळीच्या नंतर येणारी मळी. **०घणी**–न. सोनें तापवून तें ज्यांत बुडविलें आहे असें पाणी; हें बाळंतीण किंवा आजारी माणसास देतात. **०वेल**–स्त्री. १ एक जातीचें भात. २ अमरवेल; आकाशवेल; दाभणाएवढी जाड, वृक्षावर पसरणारी, सोन्यासारखे पिवळया रंगाचे बारीक धागे असणारी, शेरावर वाढणारी वेल. ३ (ल.) शेळी; मेंढी (यांच्या व्यापारानें बराच पैका मिळतो यावरून). ४ (ल.) नागवेल (हिच्या पानांच्या व्यापारापासूनहि बराच पैका मिळतो यावरून) **०वै**–स्त्री. (महानु.) सोन्याची वात. ' कीं सोनवै कैवल्यपथा । पाजळली ते । ' –शिशु ३०. **०सळा**–वि. १ सोनेरी रंगाचे पट्टे असलेलें, रेशमी किंवा जरतारी (कापड, पीतांबर). ' कासे सोन सळा पांघरे पाटोळा । घननीळ सावळा बाइयानों । ' २ पिवळसर (केस, गहूं, घोडा इ०). **सोनुला**–वि. सोनकुला पहा. **सोनेंनाणें–सोनेंवाणें**–न. सोनें, रुपें इ० विषय; सोन्याचे दागिने व नाणें किंवा रोकड. **सोनेरी**–वि. सोन्याच्या रंगाचें; सोन्याचें; आंत सोनें असलेलें (वस्त्रें, शाई, कलाबतू, मुलामा, रंग, वेलबुट्टीचा कागद इ०). **सोनेरी टोळी**–स्त्री. दुसऱ्याला हरतऱ्हेनें फसवून लुबाडणारी धाडशी लोकांची टोळी. **सोनेळ–ळें**–सोनकेळ–ळें पहा. **सोन्नारिंग**–न. (गो.) मोसंबें फळ. [सोनें+नारिंग]

सौनेग्वत––न. (कु.) गुप्तबेत; कूटमंत्र; मेतकूट. ' त्यांचा काय सोनेग्वत आसा. '

सोप, सोपट—नपु. १ केळ, चवेणी या झाडाची त्वचा, साल. २ बैलाच्या गळ्यांतील घंटांचा पट्टा (पूर्वी केळीच्या सोपटाचा करीत यावरून). ३ केळीचें सबंध पान, डांग. ४ दाणे नसलेलें कणीस. ' कणेंविण सोपटें । कणसें लागलीं आथी एक दाटे । ' –ज्ञा ९.४३३. ४ उसांचें चिपाड. –वि. फोल; निष्फळ; व्यर्थ. ' तरी वोसणताही बोलु तयाचा । परी सोपु वचे । ' –ज्ञा ८.६. **०पडणें**–बाजरी–जोंधळ्याच्या पिकावर कीड पडणें. **सोपटणें**–अक्रि. अशक्त होणें; झडणें; दुबळे होणें. **सोपट्या**–वि. चरकांतील उसाच्या चोयट्या काढणारा. **सोपाट**–न. (कुण.) सोपट.

सोपटें—न. सोकटी पहा.

सो(सों)पणें—उक्रि. हवाली करणें; ताब्यांत, स्वाधीन करणें, देणें. [सं. समर्पण हिं. सोंपना] **सोंपविणें**–दुसऱ्याकडे देणें; एखाद्याच्या हवाली करणें. **सोंपीव**–वि. सोंपविलेलें. **सोंपीव खातें**–न. हिंदी दिवाणांच्या ताब्यांत दिलेलें राज्यकारभाराचें खातें.

सोंपणें—अक्रि. १ संपणें पहा. २ (कु.) मरणें.

सोंपरी—वि. निमुळती.

सोपल—पु. (व.) आट, पीळ दिलेला ताग, अंबाडी.

सोपस—वि. (राजा.) नाजूक; कोमल (स्त्री, प्राणी इ०).

सोपस—स्त्री. हांव; लोभ; इच्छा.

सोपस्कर—वि. सर्व आवश्यक वस्तु व साधनें यांनीं युक्त; सर्व साहित्यांनीं भरपूर. [सं. स+उपस्कर]

सोपस्कार--पु. १ अन्न, घर, शरीर इ०कांस विशेष रुचि, शोभा इ० यावी म्हणून जे अनेक प्रकारचे उपचार, उपाय इ० करतात ते; एखाद्या गोष्टीच्या पूर्णतेला लागणाऱ्या साधनांची सिद्धता, संस्कार. २ अतिशय जपणूक (बहुधा अव. प्रयोग). जिवाचे सोपस्कार करणें, लावणें=नाजूकपणें वागविणें, हाताळणें; आदरसत्कारानें वागविणें, कोड पुरविणें).

सोपा—पु. १ घराची ओवरी, ओटी, पडवी, ओसरी; चौकाच्या बाजूची उंच जागा, लांब पडवी. २ कोठा; कोठार. ३ गोठा. [अर. सुफ्फा]

सोपा-पें—वि. सुखावह; भानगडीचें नसलेलें; सुलभ; अवघड नसलेलें. [सं. स्वल्प] **०रा-रें**-वि. (चित्पा.) सोपें.

सोपा-पें—पुन शाईंत बुडवून ठेविलेली चिंधी.

सोपाण-न—स्त्री. (गो.) पायरी; जिन्याची पायरी; जिना; शिडी. [सं. सोपान] **०मार्ग**-पु. १ जिना; पायऱ्यांचा रस्ता, सुलभ असा मार्ग, रीत. २ आचरणास सोपा उपाय.

सोपाधिक—वि. (संसार, चिंता, माया इ० ची) उपाधि असलेलें. याच्या उलट निरुपाधिक.

सोप्पी—पु. सोबती पहा.

सोफ—वि. लटकें; फोल. [हिं.]

सोफा—पु. वेतानें विणलेला पलंग; कोच. [इं.]

सोबकणें—उक्रि. १ दगड इ० वर वस्त्र धुतांना हलकेंच आपटणें; चुबकणें; जमीनीवर दाणदिशीं हापटणें; हबकणें. २ (ल.) (माणूस इ० स मारणें), धोपटणें, बडवणें. [ध्व.]

सोंबट—वि. कोमट.

सोंबटी—स्त्री. सोंगटी.

सोबणी—स्त्री. ताटांतील पातळ पदार्थ न पसरण्यासाठीं ताटाखालीं ठेवावयाचें लाकडी टेंकण; पाण्याच्या भांड्याखालील यावयाचें टेकण; वटकण. [फा.]

सोबणी—स्त्री. हुडळ इ० पिशाचबाधेमुळें शरीराला येणारी कृशता; लागीर.

सोब(भ)त--स्त्री. १ मैत्री; संगत. २ मित्र; सवंगडी. [अर. सोहबत] **०संगत**-स्त्री. लहानमोठी, बरीवाईट संगत, मैत्री, (क्रि० करणें; धरणें). **सोबती**-पु. स्नेही; मित्र; बरोबर येणारा मनुष्य; सवंगडी. २ प्रतिस्पर्धी; दडपता, दाबता मनुष्य; व्यक्ति; गोहो; मारता पोर याप्रमाणें. याचें स्त्रीलिंगी रूप 'सोबतीण' होतें. **सोबती वेल्हाळ**-वि. संगत धरण्यासारखा **सोबती संगती**-पु. (व्यापकपणें); मित्र सांगाती; सहचर.

सोबनशेरा—पु. (व.) जोगवा.

सोबा(भा)ग—न. (अशिष्ट.) सौभाग्य. **सोभागिणी**-स्त्री. (स्त्रि.) सौभाग्यवती.

सोभत, सोभतसंगत, सोभती, सोभतीसंगती—'सोबत' इ० पहा.

सोम—पु. १ चंद्र. २ सोमवल्ली; तिचा रस. ३ धुपणी रोग. ४ सोमयाग; (यांत सोमरसपान होतें त्यावरून) ५ शंकराचें एक नांव. ६ (ल.) अमृत. ७ -वि. चुकीनें (सौम्य पासून) थंड. [सं.] **०कांत**-पु. चंद्रकांत मणी. **सोमकांती**-वि. सोमकांत मण्याचा केलेला (आरसा इ०). **०दिन-वार-वासर**-पु. चंद्राचा वार; रविवारच्या पुढील दिवस. **०नाथ**-पु. बारा ज्योतिर्लिंगापैकीं काठेवाडांतील एक शंकराचें लिंग. **०प**-वि. सोमरस पिणारा (यज्ञकर्ता, देव इ०) **०याग**-पु. यज्ञ; सोम अर्थ ४ पहा. **०याजी**-पु. सोमयाग करणारा दीक्षित. **०रोग**-पु. सोम अर्थ ३ पहा. **०लता**-स्त्री. सोमवल्ली. **०वती**-वि. सोमवारी आलेली (अमावास्या); बायकांचें एक व्रत, यांत १०८ फळें ब्राह्मणास देतात, (यावरून). **०वती घालणें**-पुष्कळ संख्या असणें **०वल्ली-वेल**-स्त्री. १ सोम अर्थ २ पहा. २ (विनोदानें) भांगेचें झाड व भांगेचें पेय. **०वंश**-पु. चंद्रापासून निघालेला एक क्षत्रिय वंश. **०वाऱ्या तेली**-पु. शंकरभक्त तेल्यांचा एक वर्ग. हे सोमवारीं घाणा चालवीत नाहींत. **०सिद्धांत**-पु. शैवांतील एक पंथ व त्याचें तत्त्वज्ञान. **०सूत्र**-न. शिवाचें तीर्थ गाभाऱ्याबाहेरील ज्या कुंडांत पडतें तें कुंड; गायमुख. **०सूत्री प्रदक्षिणा**-स्त्री. शंकराला प्रदक्षिणा घालतांना वरील कुंडापर्यंत येऊन परतावयाचें व उलट दिशेनें जाऊन पुन्हां या कुंडापर्यंत यावयाचें व परत शंकरासमोर यावयाचें अशा प्रकारें कुंड न ओलांडता केलेली प्रदक्षिणा.

सोमट(ळ), सोमाळा—वि. १ कोंबट. २ सोमाल, नाजूक. [सं. सोष्मन्]

सोमता—क्रिवि. (कु.) तत्काळ; ताबडतोब.

सोमल, सोमलखार—पु. एक प्रकारचा क्षार; याचे पांढरा व तांबडा असे दोन भेद आहेत.; रसकर्मांत श्रेष्ठ (इं.) आर्सेनिक. [हिं.; अर. सुंबुल] **सोमली**-वि. सोमलाचा केलेला; ज्यांत सोमल हें मुख्य द्रव्य आहे असें. (औषध इ०)

सोमाजी सकलकळ्या--पु. सोमाजी नांवाचा एक कवि सर्व कलांत निपुण होता; त्यावरून हुशार व सकल कलापूर्ण माणूस; (उपरोधानें) सर्वज्ञपणाचा आव आणणारी व्यक्ति.

सोमा(मो)सा—पु. कंठी, चंद्रहार इ० अलंकाराचे निरनिराळे पदर जेथें एकत्र करतात तें टोपण, जाड तुकडा; बिरडयाजवळची जागा.

सोमीगोमी--पु. (बायकी खेळ) फुगडीप्रमाणें दमछाकीचा, दोघींनीं खेळण्याचा खेळ. नेसत्या लुगड्याच्या पदराची दोन्ही टोकें दोन हातांत धरून, पदर पाठीकडून डोक्यावरून पुढें

आणून उभे राहून डावे उजवे बाजूस; नाचत नाचत लवावयाचें व तोंडानें 'सोट मी, गोट मी । छानी छकुली, मथ्थुली ।' असें म्हणावयाचें. [गोम द्वि.]

सोय—स्त्री. (कु.) ओल्या नारळाच्या चवांतून (किसांतून) रस पिळून काढल्यानंतर राहिलेला चोथा.

सोय—स्त्री. सर्व अर्थी सोई पहा. १ लाभ; प्राप्ति. 'किंबहुना सोये । जीव आत्मयाची लाहे ।' –ज्ञा १३.१२१. २ मेळ; जुळणी. 'आंबुला आंबुलिये । संगती ना सोये ।' –ज्ञा १३.९७९. ३ विश्रांतिस्थान. 'तैसी आपली सोय देखे । आपुलिया स्वभावा मुके ।' –ज्ञा १७.२२९. ४ आश्रय; आधार. 'आणि इये कृष्णमूर्तीची सवे । यालागीं सोय धरिली जीवें ।' –ज्ञा १२.२२.५ अस्तित्व. 'नाहीं रूपाची जेथ सोये । तेथ दृष्टिचें कांहींचि नोहे ।' –अमृ २.५०. **सोय करणें**–(व.) (ल.) सरळ करणें; ठोकणें; चोप देणें; बडविणें. **सोय बसविणें**–(व.) खोडकी, नांगी मोडणें. **सोयधाय**–स्त्री. (गो.) नातेंगोतें. **सोयसाय**–स्त्री. (ना.) व्यवस्था. **सोयीचें बोलणें**–सरळ बोलणें. **सोयीवर येणें**–ताळ्यावर येणें. **सोये**–स्त्री. (काव्य) सोय. –स्त्री. लग्नानें जडलेला आप्तपणा; नातें.

सोयरगत—स्त्री. विवाहसंबंधामुळें झालेला आप्तपणा.

सोयरा—पु. १ लग्नामुळें झालेला आप्त; नातेवाईक. २ वेश्या, बटीक इ० चा भाडश्या, संभोगार्थ ठेविलेला कायमचा माणूस; जार. **म्ह०** १ धरील तो सोयरा, वर्म पाहील तो वैरी.' २ सोय-यांत साडू, हत्यारांत माडू, भोजनांत लाडू=या सर्वांचा सोयीनें फायद्याकडे उपयोग होतो. **०धायरा-जन**–पु. नातेवाईक; स्नेही; सोबती; (व्यापकार्थी अव. प्रयोग) (गो.) सोयधायरा. [सोयरा द्वि.] **सोयरी**–स्त्री. १ आप्त स्त्री. २ ठेवलेली स्त्री; रखेली. **सोयरीक**–स्त्री. १ सोयरगत पहा, विवाहसंबंध. २ (ना.) लग्नांत नवरीस दागिने घालण्याचे वेळचा विधि. **सोयरें माणूस**–न. नातेवाईक.

सोर—स्त्री. (कों.) मातीची लहान तांबली; (हेट.) सोरकुल.

सोर-रु—पु. ओरड; आकांत आक्रोश. [फा. शोर]

सोर—पु. डुकर. 'रागद्वेषादिक सोर ।' –ज्ञाप्र २६७. [सं. सूकर; हिं. सुवर]

सोर(रा)णें—अक्रि. (बे.) अक्रि. दमणें; श्रमणें.

सोरंजन, सोरंजनमिश्री, सोरंजनशिरीन—सुरंजन पहा.

सोरट-ठ—पु. १ हल्लीचा काठेवाड देश. २ (संगीग) गाण्याचा एक राग. –वि. काठेवाडी (माणूस); त्यावरून दांडगा; आड-दांड. [सं. सुराष्ट्र, सौराष्ट्र] **०टाई-ठाई**–स्त्री. दांडगाई; हट्टीठोकपणा; घिटाई. **०टी**–स्त्री. काठेवाडांतील तांदुळाची एक जात. –वि. काठेवाडी. **सोरटी बैल**–पु. काठेवाडांतील बैल हा उंच असून याचे खूर कणखर व शिंगें लहान असतात.

सोरा, सोरमीठ—पु.न. नैट्रिक ॲसिड व पोटयाश यांच्या मिश्रणाचा एक क्षार, सूर्यक्षार (शोभेची दारू इ० उपयोगी). [सं. सूर्यक्षार फा. शोरा]

सोरा—पु. १ (नाविक) टोपणानें फळीस पाडलेलीं भोकें बुजविण्याकरितां तयार केलेला लाकडी गज; सुरसा. २ गुऱ्हाळांतील धुराडें; राख पाडण्यासाठीं ठेविलेलें भोंक.

सोरा-ऱ्या—पु चकल्या, शेव, कुरडया करण्याचा सांचा. [का. सोर=गळणें]

सोराळें—न. एक भांडें; सोऱ्या? 'मग निपजलीं गंगाळें । अर्धनारी सोराळें ।' –कालिका २८.२८.

सोरी—स्त्री खेळांतील डाव. 'हातीं सापडलें उभें बैसो नेदी कोणी । सोरीमागे सोरी घेती ओणवें करूनी ।' –तुगा २०३.

सोरो—पु. (कु.) पिण्याची दारू. [सं. सुरा]

सोऱ्याबल्लु–वि (कु.) अत्यंत दारूबाज.

सोरोप—पु. (कु.) साप. [सं सर्प]

सोल—पु. एक चपटा मासा.

सोल—पु जाड, भक्कम दोर (गाडी, नांगर, इ०चा); नाडा **०खंड**–न. १ 'सोल १ पहा. २ दोरांचा जुंबाडा. [सोलणें?]

सोल—पु. अमसुल; कोकमसोल. **०नारिंग**–न. नारिंगाची एक जात. **०वणी**–न. आमसुलें कोळून केलेलें पाणी (कालवणासाठीं). **सोलणें**–उक्रि. १ वरील पापुद्रा, साल, कातडी इ० काढून टाकणें. २ टरफल, फोलपट काढणें; शेंगाच्या आंतील बीज काढणें. [का. सुलि] **सोला, सोलाणा**–पु. हरभरा, पावटा इ०च्या ओल्या शेंगांतील सोलून काढलेला दाणा; शेंगदाणा. **सोलाट**–वि. (ल.) फटिंग; सडासोट. 'घरकुंटुब ना अभवो । गांब ना तुज ठाव । सोलाट तूं पहा हो । लागला जगीं ।' –एभा २७७१. **सोलीव**–वि. १ त्वचा इ० सोलून काढलेलें. २ (ल.) पक्का, पूर्ण (लुच्चा, लबाड; लवंगा). ३ (ल. काव्य) स्वच्छ; अंतर्गाभ्यांतील; अस्सल. 'सोलींव निर्वंचूं । फलितार्थुचि ।' –ज्ञा १६.१३.१०४९. **सोलीवदारिद्र्य**–अत्यंत गरीबी.

सोलद—स्त्री. (कु.) एक जातीचें पोफळ.

सोलद—स्त्री. (कुं.) मोठी टोपली.

सोलें—न. (कर.) पायांतील एक अलंकार.

सोलोग—पु. (कु.) वृषण कापलेला डुकर.

सोल्दाद—पु. सोल्जर; शिपाई. [जर्मन सोल्हाट]

सोल्या—पु. एक फूलझाड; फुलास सोलें म्हणतात.

सोल्याचें तेल—न. (खा.) करडईचें, भुइमुगाचें तेल.

सोल्लु—न. (कु.) एक जातीचें पोफळ.

सोव—पु.अव. (राजा.) ढोंग; सोंग (दुखणें, दारिद्र्य इ० चें). (क्रि० लावणें; करणें; मांडणें). **०ल्या**—वि. ढोंगी; कोंगाडी.

सोवता-तें—वि. १ सवता; निराळा. २ स्वतःचा. –क्रिवि. स्वाधीनपणें. [सं. स्वतः]

सोवन-नें-सोनें—न. धुराडें; झरोका; साणें.

सोंवळ—वि. (कों.) नाजूक; कोमल. [सं. सोमल]

सो(सों)वळा—वि. १ शुद्ध; पवित्र; स्वच्छ; ओंवळ्याच्या उलट (वस्त्र, मनुष्य, वस्तु); स्नान इ० केल्यानें पवित्र होणारा. २ (ल.) मोकळा; शुद्ध (लांच, गुन्हा इ० पासून). ३ स्वच्छ; सुंदर (रस्ता, गांव इ०). ४ कौटुंबिक व्यवहारापासून स्वतंत्र; अलिप्त (इसम). ५ सप्रवर नसलेलें (लग्न इ०). [सं. सुमंगल, समुज्वल] **सोवळी होणें**–विधवेचें केशवपन होणें. **सोंवळी गोबाई**–स्त्री १ काशींतील एक पवित्र देवी (यावरून) २ अत्यंत सोवळी बाई. **सोवळें**–न. १ संध्या पूजा इ० कर्मांच्या वेळीं शुद्धतेनें राहतां यावें म्हणून इतर अमंगल पदार्थापासून दूर ठेविलेलें धूतवस्त्र किंवा रेशमी किंवा लोकरीचें वस्त्र. २ सोवळेपणाची स्थिति. **सोवळें घेणें**–(बायकी) बाळंतीण. स्त्रीनें महिना दीड महिन्यानें सोवळें नेसून देवाचें तीर्थ घेऊन देवधर्मास योग्य होणें. **सोवळें सोडणें**–(बायकी) रुखवताचे वेळीं वराकडून वधूचे आईस जें खण व लुगडें देतात तें. **सोवळेकरी**–पु. आचारी; स्वयंपाकी ब्राह्मण.

सोंवळा—पु. एक जातीचें व्यापारी जहाज.

सोवा—स्त्री. मनांतील गोष्ट. मनसुब पहा.

सोवागी—स्त्री. एक क्षार; सवागी पहा.

सोवाणी—स्त्री. (महानु.) बैठक; आसन. [सं. सु+आसन?]

सोवाणी—स्त्री. पायरी. 'आयुष्यपंथें प्राणिगणीं। करोनि अहोरात्रींची सोवाणी।' –ज्ञा ११.४२४. 'इंद्रनीळा सोवाणी। वरी बैसोनि पद्मासनी।' –दाव १४५. [सं. सोपान]

सोवें—न. दुःख.

सोव्हा(हा)ळा—पु (रा.) सोहळा पहा.

सोशा—पु. (सोनारी) एक प्रकारचें तांब्याचें भांडें.

सोशा—वि. सों! सों! करीत व अकस्मात येणारा, वहाणारा (वारा). [ध्व.]

सोस—पु. (सोनारी) तार ओढतांना, चपडाई करतांना निघालेला बारीक तंतू.

सोस—पु. सहनशीलता; संयमन; सोसणें; सहन करणें. (क्रि० धरणें, करणें). [सोसणें] **०णूक**–स्त्री. १ सोस पहा. २ जाचणूक; अपेष्टा; हाल भोगणें. **०क, सोशीक-सोसाळू-सोशाक**–वि. सहनशील; सहिष्णु; सोसणारा; धीराचा. **सोसणें**–सक्रि. साहणें; सहन करणें. –अक्रि. मानवणें; पचनी पडणें; प्रतिकूल न होणें (अन्न, औषध इ०). 'हें औषध तुला सोसेल.' [सं. सह्=सोसणें]

सोस—पु. १ जबर हांव; तीव्र इच्छा; हव्यास. (क्रि० घेणें) २ तहान. ३ तीव्र यत्न. –शास्त्रीको. **०घेवडी-माघशी**–स्त्री. दागिने, वस्त्रें, खाद्यपदार्थ इ० विषयीं जबर हांव असलेली स्त्री. [सं. शोष; का. सोसु=हांव; ते सोस=हांव] **०करणें**–हांवरेपणानें वस्तु मिळण्याची इच्छा करणें. अतिलोभ धरणें. **सोसासोसानें, सोसेंसोसें**–अति उतावीळपणानें; हांवरेपणानें. **सोसी-शी**–वि. हांवरा; लोभी. **सोसणी**–स्त्री. हांवरेपणा. 'येथें भिन्नसोसणी। नलगे निरुपणीं करणें तुज।' –एभा ४.१८.

सोंसा—पु वादळ; सों सों असा आवाज करणारा वारा. [ध्व.] **०वारा**–पु (कु) तुफानी वारा. **सोसाट-टा**–सुसाट-टा पहा. **सोंसां**–क्रिवि. सों सों या आवाजानें (युक्त वारा).

सोसाळें—न. सोनें; धातु. –मनको.

सोस्क—न. (बे.) मस्ती; धांगडधिंगा.

सोस्ता-स्ती—वि. कमाल दर, भर सारा असणारी, जिच्यावर साऱ्याची पूर्ण आकारणी करण्यांत येते अशी (जमीन, मळा, बिघा इ०). (या जमीनीस इस्तावा लागू करीत नाहींत). 'हें शेत सोस्तें कीं नवरान?' अशा साऱ्यास सोस्ती(–स्त्री.), सोस्तें (–न.) असें म्हणतात या 'सोस्ती'च्या उलट 'इस्ताव्याची, नवरान, उक्ती, कौली' (जमीन). [सोसणें]

सोहं, सोहम्—पु. १ मी 'ब्रह्म' आहे; मी तें (ब्रह्म) आहे असा भाव. २ गर्भावस्थेंत मूल या मंत्राचा जप करतें व जन्मल्यानंतर 'कोऽहं' (=मी कोण आहे?) असा उच्चार करतें अशी एक समजूत. [सं. सः=तें ब्रह्म+अहं=मी] **०भाव**–पु. 'मीच ब्रह्म' ही भावना (गर्भावस्थेंतील किंवा ब्रह्मज्ञान झाल्यानंतरची). **०मूर्ति-मूर्तिब्रह्म**–न. गर्भावस्थेंतील मूल (कारण या अवस्थेंतील मुलाची भावना सोहंभावाची असते)

सोहनी—पु गायनशास्त्रांतील एक राग. यांत षड्ज, कोमल ऋषभ, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाति षाडव. वादी धैवत, संवादी गांधार. गानसमय रात्रीचा चवथा प्रहार.

सोहनें—पु. धारें; धुराडें; साणें; सोनें.

सोहपा-पें—वि. सोपा-पें.

सोह(हो)लत—स्त्री. १ सवलत; परस्परांस सोइस्कर अशी सवड. 'मन्सुब्यास सोहलत राहिली नाहीं.' –इमं २९५. २ सोइस्कर; सुखावह बाब; गोष्ट; सुरळीत चाललेला व्यवहार;

साम. 'प्रयागाची रद-बदली आहे तोहि मन्सुबा सोहलतीनें होईल तरी करावा.' –पया ३३८. [अर. सुहूलत्]

सोह(हा)ळा—पु. १ उत्सवसमारंभ; आनंददायक प्रसंग; उत्सव. २ मौज; उत्सव; गर्भादान, लग्नादि शोभन संस्कार; आल्हादकारक प्रसंग (खेळ, मेजवानी इ०) करणें. ३ मानवी जीवितांतील भोगावे लागणारे बरेवाईट प्रसंग किंवा संस्कार. [सं. सौहार्द] **सोहळें**–न. लीला; आनंदजनक खेळ.

सोहागा-गी—पु.स्त्री. सवागी क्षार.

सोहे—स्त्री. चर्या. 'ओळखिली बंधूची सोहे.।' –ख्रिपु ७३.४७.

सोहेर, सोहेरणें, सोहेरतुला—सुवेर इ० पहा.

सोहेरगत, सोहेरा-री, सोहेरीक, सोह्यरगत, सोह्यरा-री, सोह्यरीक—सोयरगत, सोयरा इ० पहा.

सोहोलत, सोहोळा—सोहलत, सोहळा पहा.

सोहोरत—स्त्री. सोय; सोपेपणा; सुलभता. [सोहोलत]

सोळका-क्या—वि. (गुऱ्हाळ) फडांतील ऊंस आणून त्यांचीं पातीं काढून ते साफ, चरकांत लावण्यांस योग्य असे करणारा. [सोलणें]

सोळा—वि. सोंवळा पहा. ०**ओळा**–वि. सोंवळा व ओवळा.

सोळा—वि. १६ ही संख्या [सं. षोडश–सोलह–सोला–सोळा] ०**ह**० संगमनेरचे सोळा आणि धांदरफळचा गोपाळा–अतिशय लुच्चा माणूस; **सोळबांड(बाण)चक्रबांड (चक्करबाण)**–वि.(व.) उडाणटप्पु; वृथापुष्ट; सोटया; अडदांड; अडमुठा; रानवट; खुशालचंद; निरक्षर; दांडगेश्वर. **सोळकी**–स्त्री. कामकऱ्यांचा सोळाजणांचा जथा, संच, टोळकें. **सोळकीचा**–वि. वरील टोळकें ज्यास लागतें असें मेहनतीचें (काम); सोळा लोक उचलावयास लागतात असा वजनदार दगड किंवा इतर पदार्थ. **सोळन्हाण-णें, सोळंवदण**–न. लग्नापासून सोळाव्या दिवशीचें वधूवरांचें स्नान व त्या दिवशीं जांवयास द्यावयाचा मानपान. **सोळभोंक**–पु. सोळबांड पहा. [भोंक=शून्य] **सोळवंड-डी**–स्त्री. नारळादि फळें, चाफ्यादि फुलें इ०चा १६ चा संच; स्त्रियांनीं १६ ब्राह्मणांस द्यावयाचें एक दान. [सं. वृंद=वंड] **सोळा आणे**–पु अवं. क्रिवि. पूर्ण रुपाया; त्यावरून सर्वश्रेष्ठ असा; सर्वांत चांगला असा; पूर्ण; भरपूर; पक्कें; उत्कृष्ट. (माणूस, वस्तु, गोष्ट). ०**कळीं तपणें**–(व.) सोळा कलांनीं युक्त असणें (चंद्र) त्यावरून (ल.) हातीं हुकमत व पैसा भरपूर असणें. ०**गुणांचा खंडोबा**–पु.अठरा गुणांचा खंडोबा पहा. ०**शृंगार-शिंगार**–सोळा संस्कार या अर्थी चुकीनें म्हणणात. **संस्कार**–पु.अव. गर्भाधान, पुंसवन इत्यादि संस्कार. संस्कार पहा. २ (ल.) आयुष्यांतील भोगावे लागणारे बरेवाईट प्रसंग; आपत्ती; अडचणी (क्रि० होणें). ३ (ल.) शिष्टाचाराची, आदरातिथ्याची वागणूक. ०**सूक्ष्मभूतें**–न. अव. पंचतन्मात्रा; पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें व मन यांचा समुदाय. पचतन्मात्रा पहा. **सोळु(ळो)ळा(ली)**–वि. सोळा पायल्यांचा (मण, खंडी). **सोळें**–न. सोळा रुपये सोळा या भावाचें उत्तम सोनें, (ज्ञानेश्वरकालीन). 'वानिभेदासि ये सोळें –ज्ञा १५.३४१.

सोळाकिर्ली—स्त्री. (कु.) साळुंकी (पक्षी).

सोक्षमोक्ष—पु. कांहीं एक गुंतून पडलेल्या व्यवहाराचा बरा किंवा प्रतिकूल कांहीं तरी कायमचा शेवट ठरवून टाकणें; सुटणूक; मृत्यु; मोकळीक, मुक्तता; भिजत पडलेल्या व्यवहाराचा घाडशीपणानें लावलेला बरावाईट निकाल. (क्रि० होणें,) [सं. मोक्ष+सोक्ष द्वि]

सौ.—स्त्री. सौभाग्यवती या शब्दाचें संक्षिप्त रूप.

सौकट—पु. कोष्ट्याचा माग. 'सौकटाचिया बोजा। पसरो का बहु पुंजा।' –अमृ ७ २४१.

सौकर्णे-कावर्णे-कील-केल-कींव—सोंकर्णे इ० पहा.

सौकर्य—न. सुकरता; सुलभता. [सं.]

सौख्य—न. सुखीपणा; समाधान. [सं.]

सौंगडा-डी—पु.स्त्री. संवगडी पहा. 'आतां हा आम्हा सौंगडा झाला। कर्णपुत्र।' –कथा ६.९.१०५.

सौगंद—स्त्री. शपथ. 'मुसुलमान होऊन मोडील त्यास सौवराची सौगंद असे.' –रा १५.१३५. [फा.]

सौचिया—पु. कोयती, लहान कोयता.

सौजन—पु. सुजन व्यक्ति (पूर्वी देशमुख देशपांडयांना लिहावयाच्या पत्रांतील मायना) [सं. सज्जन]

सौजन्य—न. १ सुजनता; चांगुलपणा; सभ्यपणा, उत्तम वर्तणूक. २ प्रेम. 'सहसा करूं नये प्रपंचीं सौजन्य।' –तुगा २५००. ३ विनय. [सं.]

सौतें—वि. निराळें; स्वतंत्र. –क्रिवि. स्वतः; खुद्द. सवतें पहा. [सं. स्वतः]

सौत्र—वि. सूत्रासंबंधीं; नियमांनीं ठरविलेलें; आंखीव, ठराविक. [सं.] **सौत्रामणी**–पु. एक प्रकारचा सूत्रकथित यज्ञ. यांत सुरा हें हविर्द्रव्य असतें. 'याग करितां सौत्रामणी।' –एभा ५.२७२.

सौंदड—स्त्री. एक जातीचें झाड.

सौंदड-र-ळ—पु. मोटेचा सोंडदोर. [सोंड+दोर]

सौंदण-णी—स्त्री. १ धोब्याची पाणी साठवून त्यांत कपडे धुण्याची दगडी किंवा धातूची दोण. 'समुद्र आणि सौंदणी।' –हवि १.८५. २ नदी, सरोवर. –शर.

सौंद(दु)री—स्त्री. (व.) मीठ. 'अगोदर सौंदरी वाढा.' [सिंधु]

सौंदर्य—न. सुंदरपणा; लावण्य; देखणेपणा; उत्कृष्ट रूप [सं.]

सौंदळ, संवदळ—न. सैन्य. 'सौदळीं भांडतां मग कण कीला मीठ किती।' –ऐपो १२. [सं. सम+दळ]

सौदा—पु. (नाविक) होडीचा खालचा भाग.

सौदा—पु. १ व्यापार; व्यवहार; देवघेव; बाजारहाट क्रयविक्रय. २ खरेदी-विक्रीचा माल; जिन्नस. [फा. सौदा] **०ग(गि)र**–पु. व्यापारी–उदमी. 'भिन्न भिन्न सौदागरी। सहवर्तमान जाया कुमरी।' –मुसभा २.९१. [फा.] **०ग(गि)री**–स्त्री. सौदा अर्थ पहा. सौदागिराचाधंदा, उद्योग. –वि. व्यापारी; **सौदागरासंबंधीं. ०वणी**–स्त्री. सौदा अर्थ १ पहा. **०सूत**–पु.न. सौदा अर्थ १,२ पहा.

सौदाम(मि)नी—स्त्री. वीज; विद्युल्लता. [सं.]

सौध, सौधव—पु न. राजवाडा चुनेगच्चीचा; मोठा वाडा; चुनेगच्ची भव्य मंदीर. [सं.]

सौनंद—न. मुसळ. 'सौनंदे कामपाळे अति अतुळबळें।' –गस्तो ५३.

सौप्तिक—वि. सुप्तावस्थेसंबंधीं. [सं.]

सौब—स्त्री. तर्फ; बाजू. [अर. सौब्]

सौबरी—स्त्री. एक झाड. [सं. सौवीर]

सौभ(भा)ग, सौभाग्य—न. १ सौंदर्य. २ भाग्य; नशीब 'एवढें एक सौभग।' –ज्ञा १५.१७. ३ ज्याचे योगानें आपणांस मान्यता, शोभा, प्रतिष्ठा, तेज इ० लाभतें असा अधिकार, विद्या, वतन, सामर्थ्य इ० विषय. ४ सवाष्णपणामुळें काजळ, शेंदूर, कुंकू, मंगळसूत्र, बांगड्या इ० वस्तु धारण करण्याचा बायकांचा अधिकार; सुवासिनीत्व. ५ कुंकू, शेंदूर. [सं. सुभग; सौभाग्य] **म्ह०** गौर रुसली आणि सौभाग्य घेऊन बसली=रुसून बसलेल्याची कोण पर्वा करतो अशा अर्थी योजतात. **सौभाग्य मिरविणें लावणें**=सौभाग्यवति स्त्रीनें आपला तोरा मिरविणें. **सौभाग्याचा टिका**–सौभाग्याचें चिन्ह, कुंकू. **०चिन्ह–द्रव्य**–न. कुंकू, बांगड्या वगैरे. **०तंतु**–पु. १ मंगळसूत्र. २ (ल.) नवरा. **०धन**–न. नवरा. 'घातला तिच्या दुष्टानें सौभाग्यधनावर घाला।' –विक १४. **०वती**–स्त्री. सुवासिनी स्त्री. **०वायन वाण**–न. स्वत:ला सौभाग्य चिरकाळपर्यंत लाभावें म्हणून सुवासिनी स्त्रिया सौभाग्यद्रव्यांचें ब्राह्मणांस जें दान (वाण) देतात तें. **०शुंठी–सुठ**–स्त्री. ज्यांत प्रमुखयानें सुंठ घातलेली असते असा एक औषधी पाक.

सौमनस्य—न. मनाचा चांगुलपणा; मनाचा पक्केपणा. [सं.]

सौमास—न. (बायकी) शरीराचा नाजूक भाग. [सुकुमार+मांस]

सौम्य—पु. १ सोमाचा, चंद्राचा पुत्र बुध (देव व ग्रह). २ नवखंड पृथ्वींतील एक खंड. ३ ४३ वा संवत्सर. –न. मृगनक्षत्र. –वि. १ मृदु; नरम; हलकें; तीक्ष्ण नसलेलें; साधें (औषध, मनुष्य, स्वभाव, कृति, उपाय). २ शांत; स्थिर; स्तब्ध; समाधानी. ३ चंद्रासंबंधीं. [सं.] **०ग्रह**–पु. बुध, गुरु, शुक्र हे ग्रह. **०वार–वासर**–पु. बुधवार. **सौम्यगोल**–पु. उत्तरेकडील एक प्रदेश. **सौम्या**–स्त्री. उत्तरदिशा. [सं.]

सौर—पु. एक झाड.

सौर–रा—वि. शूर (शिपाई). 'तो सौरा चांग समरंगीं।' –एभा १६.१२९. [सं. शूर]

सौर—पु. १ सौरमास. २ शनिग्रह. –वि. १ सूर्यासंबंधीं (पूजा, उपासव इ०). २ सूर्याच्या गतीवरून गणना केलेला (वर्ष, दिवस इ०). [सं.] **०दिवस**–पु. कोणत्याहि एका ठिकाणच्या याम्योत्तरावरून सूर्याच्या लागोपाठ होणाऱ्या दोन फेऱ्यांच्या मधला काळ. **०मान**–न. सूर्याच्या गतीवरून काल मोजण्याची पद्धति. **०मास**–पु. सूर्य एका राशींतून दुसऱ्या राशींत जाईपर्यंत जो काल जातो तो. **०वर्ष**–न. पृथ्वीस सूर्याभोवतीं एक प्रदक्षिणा घालावयास लागणारा काल; ३६५ दिवस, ६ तास, ९ मिनिटें व दहा पूर्णांक तीनचतुर्थांश सेकंद. **सौरी**–स्त्री. सूर्याची स्त्री. **सौर्य**–न. तेज.

सौरभ्य—न. १ सुगंध. २ कीर्ति. [सं.]

सौरस—पु. १ गोडी; प्रसाद. 'म्हणउनि मागे कंठीचा सौरस।' –तुगा ८७८. २ संबंध. 'हें कल्पनेचेनि सौरसें।' –ज्ञा ९.९१. ३ सामर्थ्य. –ज्ञा १०.६. ४ अभिप्राय. 'आतां अदंभाचिया बोळखीसी सौरसु देवो।' –ज्ञा १३.२०१. ५ योग्यता; 'तेथ सौरसेवीण जाय। बुद्धि तयाची।' –ज्ञा ६.४५९. ६ आसक्ती; हेतु; इच्छा. 'पुरवी सौरस मनींचा।' –एभा १५६५. ७ यत्न. [सं. सुरस] **सौरस्य–सौरहस्य**–न. १ सुरसपणा; प्रेमभाव. २ सुरसपणा; चवदारपणा. ३ मैत्री; स्नेहभाव; उत्तमप्रकारचें दळणवळण.

सौराथ–थी—स्वार्थ–र्थी पहा.

सौरी—स्त्री. १ स्त्रीवेषांतील हिजडा. २ बेशरम, स्वैर स्त्री. 'सौरियांच्या फेरी।' –तुगा २९७. ४ मुरळी. –वि. निर्लज्ज. [स्वैर]

सौलत—सोहलत पहा.

सौष्ठ(ष्ठ)व—न. १ चांगुलपना; उत्कृष्टपणा; सौंदर्य. २ चपलता. [सं.]

सौसारखा—वि. आमूलाग्र सारखा.

सौहृद, सौहार्द—न. मैत्री; स्नेह. [सं.]

सौळ—वि. (राजा.) मचूळ; सवळ.

स्कंद—पु. १ कार्तिकस्वामी. २ विभाग. [सं.]

स्कंध—पु. १ खांदा. २ झाडाची फांदी; शाखा. ३ पुस्तकाचें प्रकरण, भाग. ४ ज्ञानाच्या ५ शाखा. पंचस्कंध पहा. ५ सैन्याचा व्यूह. ६ पंचविषय व इंद्रिय पहा. ७ समूह, समुदाय. ८ एक प्रकारचें वृत्त. ९ राज्यारोहणास आवश्यक असलेली कोणतीहि वस्तु (चवरी, गंगोदकाचा घट इ०). १० सप्तस्कंध' पहा. ११ (ज्योतिष) गणितस्कंध; होरास्कंध; संहितास्कंध (काळ, ऋतु, मंत्रतंत्र, भविष्य इ० चें). [सं. स्कंध्=जाणें]

स्का-स्की-स्कें—वि. (तं.) सारखा-खी-खें.

स्खलन—न. १ अडखळणें; घसरणें. २ ठिबकणी; पडणें; गळून पडणें. ३ वीर्यपात. ४ (ल.) तोतरें बोलणें; बोलतांना अडखळणें. ५ नीतिबाह्य वर्तन करणें; पाप करणें. **स्खलित**–वि. १ दोषी; पातकी; दुर्वर्तनी. २ चुकलेला; अडखळलेला. [सं. स्खल्=पडणें]

स्तन—न. १ थान; आमा. २ अचळ; सड. [सं. स्तन्=ध्वनि करणें] **०देणें**–थानांतील दूध पाजणें. **०पात**–पु. बाधेकयानें बायकांची थानें लोंबणें. **०पान-प्राशन**–न. थानांतील दूध चोखणें, पिणें (मुलानें, वासरानें). **०मर्दन**–न. (शृंगार) कुचमर्दन; स्तन कुस्करणें; रति प्रकार **स्तन्य**–न थानांतील दूध.

स्तंब—पु. १ घोंस; झुबका; झुबक्याचें झाड; घोंसदार झाड. २ समूह; कांड. ३ अणुरेणु. [सं.]

स्तबक—पु. १ घोंस; झुबका. २ ग्रंथाचा विभाग. [सं.]

स्तब्ध—वि. १ थांबलेला; गति बंद पडलेला; स्थिर; अडथळा झालेला किंवा केलेला; निश्चल; उगा; निःशब्द; खोळंबून राहिलेला. २ मनाचा कणखर; निश्चयी; न नमणारा. ३ ताठरलेला; अवटरलेला. ४ मन, शरीर यांची गति, शक्ति कुंठित झालेला. [सं. स्तंभ्=रोध करणें] **०णें**–अक्रि. १ थांबणें; स्थिरावणें; बंद पडणें. २ उभें राहणें; निश्चल असणें.

स्तंभ—पु. १ खांब; सोट. २ थांबलेली स्थिति; स्तब्धता. 'सुनि स्तंभु चालया।' –ज्ञा १८.१५५४. ३ लघवी, वीर्य यांचा अटकाव; भीती इ० नें स्तब्ध होणें; मति, जाणीव इ० गुंग होणें. ४ अडथळा; अटकाव; जडता. ५ वृक्षाचें खोड. [सं.] **०क**–वि. थांबविणारें. **०न**–न. १ थांबविणें; अटकविणें; गति बंद पाडणें; प्रतिबंध. २ सप्तोपचार पहा. मंत्र, जादूटोणा इ० नीं गति इ० बंद पाडणें; इंद्रियांचें चलनवलन बंद पाडणें; नियमन; निग्रह. ३ वरील बंद पाडण्याचें कोणतेंहि साधन. ४ वीर्य लवकर न पडणें; वीर्यस्खलन होऊं नये म्हणून घेण्याचें औषध, साधन. **स्तंभित**–वि. स्तब्ध पहा.

स्तंभ—पु एक अढळ तारा. 'खलाशांच्या मतें ध्रुवताराहि किंचित विचल असून स्तंभ मात्र पूर्ण अविचल आहे.' –चित्रमयजगत् एप्रिल १९३७. [सं.]

स्तर—पु. थर; पडदा. [सं.]

स्तव—शअ. साठीं; करितां; कारण; मुळें; बद्दल. [सं.]

स्तव, स्तवन, स्तुति—पु.न.स्त्री. (अप स्तुत) स्तुति करणें; स्तवन; वर्णन; वाखाणणी; गुणवर्णन; प्रशंसा; स्तोत्र. [सं. स्टु=स्तुति करणें] **स्तवणें**–उक्रि. स्तवन; वर्णन; वाखाणणी करणें. **स्तवनीय, स्तुत्य, स्तव्य**–वि. स्तुति इ० करण्यास योग्य; प्रशंसनीय; वाखाणण्याजोगें. **स्तुतिपाठक**–पु. १ भाट; प्रशंसा इ० करून श्रोत्यांच्या अंगीं धैर्य उत्पन्न करणारा माणूस; वैतालिक. २ खुशामत करणारा. **स्तुतिप्रिय**–वि. आपली स्तुति केलेली आवडते अशा स्वभावाचा. **स्तुतिवाद**–पु गुणवर्णन; शिफारस; वाखाणणी; स्तुतिपर भाषण. **स्तोता**–वि. स्तुति करणारा. **स्तोत्र**–न १ स्तुति; स्तवन. २ देवता; गुरू इ० च्या प्रशंसापर गद्य किंवा पद्य रचना.

स्तिमित—वि. मंद; आळशी; स्थिर; मट्ट; मद्दड; जड. [सं.] **स्तिमितार्इ**-स्त्री. मंदपणा; जडपणा; मद्दडपणा.

स्तूप—पु बुद्धाच्या अवशेषावर बांधलेली एक विशिष्ट आकाराची इमारत. [सं. स्तूप्=ढीग घालणें]

स्तेय—न. चोरी; उचलेगिरी. [सं.]

स्तोम—पु. १ रास; ढीग. २ संच; जमाव; समुदाय (चराचर वस्तूंचा). –न. मंडळ; समाज; टोळी; संघ; समूह. [सं. ष्टुभ्=थांबविणें]

स्तोम—पु. १ बडेजाव; पोकळ अभिमान; गर्व; पोम; स्तुति. (क्रि० माजविणें=फाजील प्रशंसा करणें). २ एक संस्कार. उदा० व्रात्यस्तोम [सं. स्तु=प्रशंसा करणें]

स्त्री—स्त्री. १ बायको; मादी. २ पत्नी; स्वतःची बायको; भार्या. ३ स्त्रीलिंगी शब्द, वस्तु. ४ फळें येणारी वेल, झाड इ०. [सं.] **स्त्रीचें सोनें होणें**–उतारवयांत स्त्रीनें पतीच्या आधीं मरणें. **स्त्रीच्या नाकावर पदर येणें**–वैधव्य येणें. **सामाशब्द**–**०गमन-संग**–नपु. मैथुन. **०चरित्र**–न. स्त्रीची चालचलणूक; कावेबाज वर्तणूक इ०. **म्ह०** (गो.) स्त्रीचरित्र गाढ; जोऱ्याक आयलें खाड तुम्ही चिकेसरा आड, जोयांचें वचूं नी खांड. **०चिन्ह**–न. स्त्रीचें जननेंद्रिय, गुह्य. **०दास-लंपट-पर-बुद्धि-वश**–वि. स्त्रियांविषयीं आसक्त किंवा बायकोच्या मर्जीप्रमाणें वागणारा; बाईलबुद्दया. **म्ह०** स्त्रीबुद्धिप्रलयंगता. स्त्रीबुद्धिः प्रलयावहा. **०धन**–न. स्त्रीची हक्काची मालमत्ता (लग्नाचे वेळीं मिळालेले दागदागिने किंवा आईबापाकडून मिळालेलें धन इ०). याच्यावर तिचा पूर्ण हक्क असतो. या धनाचे सहा प्रकार आहेत.

०धर्म-पु. १ स्त्री अस्पर्शी होणें. २ लज्जा, विनय इ० स्त्रीचे गुण. **०धर्मिणी**-वि. रजस्वला. **०पुरुषधर्म**-पु. स्त्री, पुरुष यांचीं परस्पर कर्तव्यें. **०पुरुष**-पु अव. नवराबायको. **०रत्न**-न. सुंदर व पतिव्रता स्त्री. **०राज्य**-न. १ पुराणांत वर्णिलेलें एक स्त्रियांनीं चालविलेलें राज्य. २ (ल.) ज्या कुटुंबांत पुरुषापेक्षां बायकोचें प्रस्थ जास्त असें कुटुंब. **०रोग**-पु. प्रदररोग. **०लिंग**-न. नामाच्या तीन लिंगांपैकीं 'जी, ती, ही' अशा सर्वनामरूपांनीं ज्या नामार्थाचा परामर्ष होतो त्या नामाचें जें लिंग तें. -वि. त्या लिंगानें युक्त. **०लोभ**-पु. स्त्रीविषयीं आसक्ति; स्त्रीलंपटपणा. **०हत्या**-स्त्री. स्त्रीचा खून. **स्त्रैण** न. स्त्रीत्व. -वि १ बायकया. स्त्रीदास पहा. २ स्त्रीसंबंधी (व्यवहार). [सं.]

स्थ—वि. राहणारा; वास करणारा. 'गर्भस्थ; जन्मस्थ'. [सं.]

स्थंडिल—न यज्ञ, होम इ० करितां केलेला साधारण एक हात चौरस व चार अंगुळें उंचीचा मातीचा ओटा.

स्थल-ळ—न १ जागा; ठिकाण. २ मोबदला; ऐवज. 'त्याच्या स्थळीं हा चालेल. ३ मुद्दा; प्रयोजन. 'एथ अविद्यानाशु हें स्थळ।'-ज्ञा १८.१२४३. ४ अनेक शेतांचा एक डाग. ५ हुद्याची, कामाची, अधिकाराची जागा. ६ जमीन. ७ उपवर मुलीला देण्यायोग्य वर, ठिकाण. [सं. ष्ठल्=थांबणें; स्था=थांबणें] **०चर**-वि. जमिनीवर राहणारा, वावरणारा (मनुष्य, पशु इ०). **०देवता**-स्त्री. स्थानिक देव. **०मार्ग**-पु. खुष्कीचा रस्ता; जमिनीवरील वाट. याचे उलट जलमार्ग. **०शुद्धि**-स्त्री १ अपवित्र जागा मंत्रादिकांनीं पवित्र करणें; सडासंमार्जन. २ प्रवासांतील तळशोधणी. **स्थलांतर**-न. दुसरी जागा पहाणें किंवा थारेपालट (क्रि० करणें).

स्थविर—वि. म्हातारा; वृद्ध. [सं]

स्थाणु—पु.न. १ खांब. २ खुंटा; काठी; झाडाचें खोड; मेढ. ३ दहावा रुद्र. -वि. भक्कम; स्थिर; गच्च. [सं.]

स्थातव्य—न. थोडा वेळ मुक्काम; वस्ति. -वि. ठेवण्याजोगा; नेमण्याजोगा; गच्च बसविण्यास, निश्चित करण्यास, ठरविण्यास योग्य. [सं. स्था=राहणें] **स्थाता**-वि. उभा राहणारा; थांबलेला; व्यापलेला.

स्थान—न. १ जागा; स्थळ; ठिकाण; राहण्याची जागा. २ दिशा; स्थानिक परिस्थिति. ३ योग्य कालवेळ; हंगाम; प्रसंग; संधि. ४ एखाद्याचे ऐवजीं असणें. ५ (व्याकरण) वर्णोच्चार जेथून होतो तो शरीराचा भाग. [सं. स्था=राहणें] **०च्युत-भ्रष्ट**-वि. जागा, हुद्दा, परिस्थितीपासून सुटलेला, काढलेला. **०क**-न. १ देऊळ; देवालय. -अकक भा. २. कृष्णकौतुक १९. २ मठ; उपाश्रय. **०पति**-पु. मिरासदार. -ज्ञा १३.३७६.

०माहात्म्य-न. जागा, हुद्दा इ०चें अंगचें विशेष महत्त्व; अंमल; गुण; सामर्थ्य (ज्यामुळें त्या जागेवरील माणसाचा लोकांच्या मनावर प्रभाव पडतो). **०संख्या**-स्त्री. गणित किंवा भूमिति श्रेढींतील पदांची संख्या. **स्थानापन्न**-वि. स्थानावर स्थापलेला. **स्थानिक, स्थानीय**-वि स्थळ, जागा, हुद्दा, स्थिति इ० संबंधी. उदा० गुरु-शिर-स्थानिक; कांहीं विशिष्ट स्थानासंबंधाचा. **स्थानिक स्वराज्य**-न. म्युनिसिपालिटी; गांवसभा. **स्थानी**-स्त्री. सभा. 'तेथ यादवाची स्थानी बैसली।'-शिशु ३४८.

स्थापणें—अक्रि. १ ठेवणें; लावणें; रचणें; गच्च बसविणें. २ स्थापन करणें; उभारणें; व्यवस्था लावणें. ३ सिद्ध करणें. ४ एकाग्र करणें. (मन, चित्त वगैरे) ५ रचणें; पाया घालणें. [सं. स्था. राहणें] **स्थापक**-वि. १ ठेवणारा; स्थापन करणारा; बांधणारा; दगड, खूण वगैरे घालणारा. १ स्थापना, उभारणी, करणारा, पाया इ० घालणारा, रचणारा. २ नियमन करणारा; आज्ञापक; ठरविणारा; निश्चित करणारा. ३ सिद्ध, खरें शाबित करणारा. **स्थापना**-न.स्त्री. स्थापणें पहा. १ रचाई, उभारणी; संस्थापन; व्यवस्थित योजना. २ निश्चय; शाबिती. ३ नियमन; आज्ञापन; निश्चिति. ४ प्राणप्रतिष्ठा (देवतेची); उपास्य दैवतावर चित्ताची एकाग्रता; मनाची स्थिरता; दृढता. ५ गर्भाधानांतील एक विधि; पुंसवन संस्कार. **स्थापनीय-स्थाप्य**-वि. स्थापणें, उभारणें इ०स योग्य, अवश्य, शक्य. **स्थापविणें**-सक्रि. स्थापणें याचें प्रयोजकरूप. **स्थापित**-वि स्थापन इ० केलेला. **स्थापत्य शास्त्र**-न. इमारती, पूल, सडका वगैरे बांधण्याचें शास्त्र; गृहशिल्पशास्त्र.

स्थाय—पु. (राग) रागाचा अंश; स्वरयुक्त थोडा स्वरसमूह. [सं. स्था=थांबणें] **स्थायिक, स्थायी**-वि. १ राहणारा, मुक्काम किंवा वस्ती करणारा, उपरी नसलेला; टिकाऊ; कायमचा; स्थिर. २ रागाचें स्वरूप व्यक्त करणारा चीजेचा पहिला भाग. **स्थायीभाव**-पु. १ (साहित्यशास्त्र) विभाव, अनुभाव व व्यभिचारीभाव यांच्या योगानें व्यक्ततेप्रत आल्यामुळें ज्या मनोविकारास रस ही संज्ञा प्राप्त होते तो मनोविकार. हे रति, हास, शोक, उत्साह, क्रोध, भय, निर्वेद, विस्मय इ० आठ आहेत. २ कायमची स्थिति **स्थायीवर्ण**-पु. (राग) थांबून थांबून वारंवार म्हटला जाणार तोच तोच स्वर.

स्थाली—स्त्री. थाळी; थाळा; ताट; अन्न शिजविण्याचें भांडें. [सं.] **०पाक**-पु. गृहस्थाश्रमी त्रैवर्णिकानें गृह्याग्नीवर करावयाचा याग. होमाकरितां भात शिजविणें. **०पुलाकन्याय**-पु. शितावरून भाताची परीक्षा करणें.

स्थावर—न. १ न हालवितां येणारी मालमत्ता; घर वगैरे स्थिर संपत्ति. [सं.] –वि. अचल; न हालणारें; स्थिर; खिळलेलें; निश्चल; हालविण्यास अशक्य. **०इस्टेट-जिंदगी**–स्त्री. शेती-वाडी, घरदार, बागबगीचा इ० मालमत्ता. **०जंगम**–वि. हालणारें व न हालणारें; स्थिरचर. **०प्रतिष्ठा**–स्त्री. स्थिरप्रतिष्ठा पहा. **०विष**–न. खनिज किंवा वनस्पतीचें विष. याचे उलट प्राणिज विष. **स्थावरणें**–अक्रि. १ स्थिर, कायम राहणें; आधार, पाया, आश्रय मिळविणें. २ गेलेली पत, शक्ति परत मिळविणें.

स्थित—वि. असलेलें; थांबलेलें; उभें असलेलें; राहिलेलें. [सं. स्था=राहणें] **०प्रज्ञ**–वि. सिद्ध; ज्याची बुद्धि स्थिर झाली आहे असा.

स्थिति—स्त्री. १ राहणें; उभें राहणें; थांबणें; अवस्था; दशा; रीति; तऱ्हा; परिस्थिति; वास. २ विश्वाच्या तीन अवस्था–उत्पत्ति, स्थिति आणि लय, किंवा संहार (यांच्या देवता आहेत त्या–ब्रह्मा, विष्णु, शंकर) यांपैकीं मधली अवस्था. ३ स्थिरपणा; कायमी; स्थिरता; सातत्य. ४ (ज्योतिष) ग्रहणांचा स्पर्शापासून मोक्षापर्यंतचा काल. ५ रक्षण.–हंको. [सं. स्था=राहणें] **०ओळखणें**–जागा, अवस्था ओळखणें. **०वर येणें-असणें**–योग्य स्थळीं जागीं, अवस्थेप्रत येणें, असणें. **स्थितिशास्त्र**–न. पदार्थाच्या स्थिर अथवा चर अवस्था आणि पदार्थांना गतिमान किंवा गत्युन्मुख करणाऱ्या शक्ती यांचें विवेचन करणारें शास्त्र. (इं.) स्टॅटिक्स. **०रीती**–स्त्री. चालचलणूक; वागणूक; आचरण; नीतिमर्यादा. **०स्थापक**–वि लवचीक, ताणल्यानें लांब होऊन ढिला सोडल्यावर पुन्हां पूर्वस्थितीवर येणारें. **०स्थापकत्व-ता**–न.स्त्री. लवचीकपणा.

स्थिमित, स्थिमिताई—स्तिमित, स्तिमिताई पहा.

स्थिर—वि. १ कायम; निश्चित; स्तब्ध; शांत; न हालणारें; मजबूत; बळकट; निश्चयी. २ एके ठिकाणीं कायम राहणारा. ३ विश्वासु; अस्थिर वृत्ति नसलेला; नेहमीचा. ४ शांत; थंड; समाधानी वृत्तीचा. ५ अचंचल; फरक न पडणारा (दिवस, नक्षत्र); ज्यांच्या ठायीं कार्य आरंभिलें असतां लवकर होत नाहीं व झालें असतां लवकर नाश पावत नाहीं अशीं (रोहिण्यादि नक्षत्रें. वृषभादि राशी, रविवार इ० याचे उलट चर पहा.) ६ स्थावर पहा. **०प्रतिष्ठा**–स्त्री. १ (एखाद्या देवळांत देवतेची) कायमची स्थापना. २ (ल.) कोणतेहि ठिकाणचा कायमचा निवास. **०बुद्धि**–स्त्री. मन, स्वभाव यांचा कायमपणा, समतोलपणा; दृढबुद्धि; याचे उलट चंचलबुद्धि. २ (ल.) मंदबुद्धि; जडबुद्धि. –वि. अशा बुद्धीनें युक्त. **०वेळ-वेळा**–स्त्री. एखाद्या कामास आरंभ केला असतां मंदगतीनें चालून कायम टिकून राहतें अशी वेळ. रात्रीच्या किंवा दिवसाच्या ३० घटिकांच्या आठ विभागांपैकीं आठवा विभाग. वेळ अर्थ ७ पहा. **०स्थावर**–न. शांतता; स्तब्धता. –वि. शांत; सामसुम; स्वस्थ; स्तब्ध, गडबड जाऊन शांत स्थितीला आलेलें. **०ता**–स्त्री. निश्चलपणा, शाश्वतपणा; स्थैर्य; कायमपणा; मजबुती, निर्धास्तपणा; पक्केपणा; विश्वासुपणा; थंडपणा; शांतपणा (मनाचा). **स्थिरावणें(वि)**–उक्रि. १ स्तब्ध शांत, निश्चित होणें. २ थांबणें; खंड पडणें. ३ विसावा घेणें; थांबणें; राहणें; टिकणें. ४ स्थिर करणें; शांत करणें; मजबूत करणें. ५ बंद पाडणें; प्रतिकार करणें. **स्थैर्य**–न. स्थिरता पहा.

स्थीत–स्त्री. स्थिति पहा. [सं. स्थिति] **०रीत**–स्त्री. स्थितिरीति पहा.

स्थूल-ळ—वि. १ मोठा; जाडा; थोर. २ ओबडधोबड; अगडबंब; मोठा व खडबडीत, लठ्ठ, ठोकळ. ३ दाट; गर्द. ४ जड; मंद; मूर्ख. ५ जड; दृश्य; साकार; याचे उलट सूक्ष्म. [सं. स्था=राहणें] **०देह-शरीर**–पु.न. वस्तुमात्रांचें पंचभूतात्मक शरीर; जड देह. लिंगदेहाच्या उलट; धिप्पाड शरीर. याचा उपयोग विशेषणाप्रमाणें करतात. **०दृष्टि**–स्त्री. मनुष्यदृष्टि; अज्ञानदृष्टि; मायिकदृष्टि. 'ते सहसा मुद्रा सोडिली। स्थूलदृष्टीची जवनिका फेडिली।'–ज्ञा ११.१२१. २ देहच आत्मा असें मानणें; जड दृष्टि. **०बुद्धि**–वि. जडबुद्धि; ढोबळ समजूत असलेला. **०भोग**–पु. जागृतीमधील प्रत्यक्ष भोग **०मान**–न. ढोबळ माप, अंदाजी मोजमाप; तर्क. २ दीर्घ कालमर्यादेनें मोजणें, गणना करणें; सूक्ष्ममानाचे उलट. ३ आकारमान पहा; ठोकळमान. **०वाद**–पु. आत्मा हेंच शरीर असा वाद. **०वादी**–वि. असा वाद करणारा. **०सूक्ष्म**–न. १ विश्व; सृष्टि; जगत् 'तें कर्ता कर्म कर्मफळ। ये त्रिपुटी येकी केवळ। वांचूनि कांहींचि नसे स्थूळ-। सूक्ष्मीं इये।'–ज्ञा १८.८११. २ पंचभूतात्मक जड व वासनात्मक लिंगशरीर. –वि. थोर व लहान; जड व अजड.

स्नान—न. १ अंगधुणें; आंघोळ; न्हाणें. २ अभ्यंग स्नान करणें. [सं. स्ना=अंगधुणें] **म्ह०** स्नान करून पुण्य घडे तर पाण्यांत बेडूक थोडे? **०पान**–न स्नान आणि खाणेंपिणें इ० **०विधि**–पु. सशास्त्र स्नान करणें; समंत्रक संकल्पयुक्त स्नान. **०संध्या**–स्त्री. स्नान व संध्या, देवपूजा, तर्पण इ० २ (ल.) लांचलुचपत. 'त्या कामांत कांहीं तरी स्नानसंध्या दिसते.' **०संध्याशील**–वि. कर्मनिष्ठ; सदाचरणी. **स्नात, स्नातक**–पु. सोडमुंज झालेला, ब्रह्मचर्याश्रमांत विद्या संपादन करून गृहस्थाश्रम घेण्यास तयार झालेला पुरुष; या काळांतच वेदांचें ज्ञान मिळविणाऱ्यास 'विद्यास्नातक,' न मिळविणाऱ्यास 'व्रतस्नातक' व ज्ञान मिळवून लग्न न करणाऱ्यास 'अभायैस्नातक' म्हणतात. –वि. स्नान केलेला. **स्नाता**–वि. स्नान करणारा.

स्नायु—पु. प्राण्यास गति, चलनवलन यांची शक्ति देणारा व वाटेल तेव्हां संकुचित किंवा ढिला करतां येण्यासारखा

शरीरांतील तंतुयुक्त भाग. [सं.] **०गत**- वि. स्नायूमध्यें असलेला (वात).

स्निग्ध—वि. १ तेलकट; चरबीयुक्त; तुपट; ओशट. २ चिकटणारा; तुळतुळीत. ३ मृदुत्व, मऊपणा आणणारें (औषध). ४ सौम्य; प्रेमयुक्त; स्नेहाळ. [स.]

स्नुषा—स्त्री. सून. [सं. ष्णु=गळणें, पाझरणें]

स्नेह—पु. १ तेल, चरबी इ० ओशट पदार्थ. २ एकत्र, एक जीव होण्याचा धर्म; स्निग्धता. ३ मैत्री; प्रेम. [सं. स्निह्=चिकटणें] **स्नेहांत, स्नेहावर पाणी घालणें**-मैत्री, मित्रभाव; मोडणें, तोडणें. **०जोड**-स्त्री. मैत्रीलाभ. **०बुद्धि**-स्त्री १ तीव्र स्मरणशक्ति. २ मित्रत्व; प्रेम. –वि. १ असल्या स्मरणशक्तीचा. २ मायाळू; दयाळू; प्रेमळ. **०भाव-वाद**-पु मित्रत्व; प्रेमळपणा; दाट स्नेह. **स्नेहन**-न. १ मर्दन; चोळणें. २ (वैद्यक) तेलकट पदार्थ चोळणें. **स्नेहाकर्षण**-न. एकाच प्रकारचे दोन परमाणु एकत्र ठेवणारी शक्ति. **स्नेहांकित**-वि. (पत्रलेखन) स्नेही; मित्रत्व असलेला. अंकित पहा. **स्नेहाळ-ळू**-वि. १ तेलकट, चरबीयुक्त पदार्थ जास्त असलेला. २ ममताळू; प्रेमळ. **स्नेही**-पु. मित्र; सखा. –वि. १ मित्रत्वाचा; मैत्री असलेला; प्रेम असलेला. २ तेलकट; चरबीयुक्त.

स्पंज—पु. किड्यापासून समुद्रांत उत्पन्न झालेला व छिद्रें असलेला एक मऊ, स्थितिस्थापक पदार्थ. [इं.]

स्पर्धणें—अक्रि. चढाओढ, वरचढपणा, मत्सर इ० करणें; ईर्षेनें बरोबरी करणें. [सं. स्पध्] **स्पर्धा**-स्त्री. मत्सर; ईर्ष्या; वरचढ होण्याची इच्छा; चढाओढ. **स्पर्धी**-वि. मत्सरी; चढाओढ लावणारा; स्पर्धा करणारा.

स्पर्श—पु १ शिवाशीव; संसर्ग; भिडणें. २ संपर्क; संसर्गाची जाणीव. ३ वस्तूंतील संसर्गाचा गुण; संयोग. ४ 'क, ख' इ० पासून 'भ, म' पर्यंत पहिल्या पांच वर्गांतील कोणतेंहि व्यंजन. ५ परीस; स्पर्शमणी. ६ लवलेश; भाग; अंश. 'त्याचे हृदयांत दयेचा स्पर्श नाहीं.' ७ हवा; वारा. [सं. स्पृश] **०मणि**-पु. परीस. **०रेषा**-स्त्री. जी सरळ रेषा वर्तुळाच्या परिघास एका बिंदूंत मात्र स्पर्श करते ती. **०स्नान**-न. ग्रहण लागण्याच्या वेळची आंघोळ. **स्पर्शणें**-उक्रि. शिवणें; धक्का लावणें किंवा लागणें. **स्पर्शास्पर्शी**-पु. सोंवळेओंवळे किंवा सामाजिक उच्च नीच यांची परस्पर शिवाशीव. **स्पृश्य**-वि. स्पर्श करण्यास योग्य. **स्पृष्ट**-वि. स्पर्श झालेलें.

स्पष्ट—वि. १ स्वच्छ; साफ; उघड; असंदिग्ध. २ तंतोतंत, बिनचूक (भविष्य, जमाखर्च इ०). [सं. स्पश्=व्यक्त करणें] **०क्रांति**-स्त्री. आकाशांतील गोलांचें कोनात्मक अंतर. **०ग्रह करणें**) राशिचक्रांतील ग्रहाचें राशिचक्रारंभापासून अंतर (काढणें). **०परिधि**-पु. पृथ्वीची अक्षांशरेखा. **०वक्ता**-वि. १ उघडपणें' भीडमुर्वत न ठेवतां बोलणारा. २ मनांत कांहीं लपवून न ठेवतां उघडपणें बोलणारा. **स्पष्टीकरण**-न. विवरण; साफ, उघड, स्वच्छ करणें; विशदीकरण; उघड करणें; उदाहरणें देऊन मनावर बिंबविणें; प्रसिद्ध करणें. करण पहा. २ **स्पष्टीकृति**-स्त्री. ग्रहाचे खरे रेखांश शोधून काढण्याची रीत.

स्पिरिट—न. एक प्रकारची दारू. [इं.]

स्प्रिंग—स्त्री. स्थितिस्थापकत्वाचा गुण अंगीं असलेली पोलादी कमान किंवा सर्पिलतार वगैरे. [इं.]

स्पृहा—स्त्री. इच्छा; वांच्छा; आकांक्षा. [सं. स्पृह्=लोभ धरणें] **स्पृहणीय**-वि इच्छा करण्यास योग्य; इच्छिण्यास योग्य; इच्छिण्याजोगें; प्रशंसनीय. [सं.]

स्फटिक—पु पैलूदार खडा; कांतियुक्त पारदर्शक दगडाची एक जात. [सं.]

स्फटी—स्त्री. तुरटी. [सं.]

स्फारणें—सक्रि. स्फुरणें. 'तो शब्द स्फारला.' –गीता १.१२८९.

स्फीत-ति—स्त्री. १ स्तुति; प्रशंसा; मान; शिफारस. २ मोठेपणा; मान्यता; प्रतिष्ठा; थोरपणा; वैभव; उत्कृष्टपणा; (क्रि० सांगणें). 'दंभस्फीति भलत्या भावें.' –तुगा ११७९. [सं.]

स्फुंज—पु. फुंज; गर्व. [सं.]

स्फुंजणें—अक्रि. स्फुंदणें, मुसमुसणें. [ध्व.]

स्फुट—वि. १ उघड; विस्तृत. २ फुटलेलें; विकसित. ३ (ल.) घड केलेलें; स्पष्ट विवरण केलेलें; स्पष्ट; स्वच्छ. ४ मोकळा; किरकोळ; सुटा; फुटकळ; अलग. (कविता, गोष्ट, कथा, वाक्य). ५ (ज्यो.) स्पष्ट; [सं. स्फुट्=फुलणें] **०फल**-न. (भूमिति) नक्की क्षेत्रफळ.

स्फुटि—स्त्री. स्फोट; चमक; तेज; कडकडाट; गडगडाट. 'माजीं कल्पांतविजूंचिया स्फुटी.' –ज्ञा ११.२०४. [सं.]

स्फुंद, स्फुंदन—पु.न. स्फुंदणें; हुंदका. [सं.] **स्फुंदणें**-अक्रि. हुंदके देऊन रडणें; मुसमुसणें.

स्फुरण—न. १ फुरफुर; भरभर; कंप (डोळा, कातडी, अवयव यांचा); लखलखाट. (वीज, तरवार, इ०चा); चमक, लुकलुक (तारा, रत्न इ० ची); आवेश, राग इ० चा झटका; संचार; स्फूर्ति (युद्ध, वाद यातील); थरथराट; कंप (राग, भीति इ० मुळें). २ एखादी गोष्ट एकदम आठवणें; स्मरण होणें; मनांत उद्भूत होणें. ३ धडधड; धक्का. [सं. स्फुर्=फुरफुरणें] **स्फुरणें**-क्रि. स्फुरण पहा; कंप पावणें, मनांत एकाएकीं येणें; सुचणें. **स्फूर्त-र्ति**-१ स्त्री. स्फुरण पहा. एकाएकीं प्रादुर्भाव; स्फुरणें. २थरकांप. ३मनांत उत्कटतेनें प्रगट होणारी शक्ति; प्रतिभा.

स्फुलिं(ल्लि)ग—पु. विस्तवाची ठिणगी. २ (गणित) एक अाण्याचा $\frac{१}{६४}$ वा किंवा शिवराईचा $\frac{१}{६४}$ वा भाग (लानिक आहे.)

स्फोट—पु. १ व्रण: फोड; चट्टा. २ फुटणें, तुटणें किंवा तसली अवस्था. ३ फूल इ० उमलणें. ४ एखाद्या गोष्टीची वाच्यता. ५ दारू वगैरेचा भयंकर आवाजासह भडका. [सं. स्फुट्=फुटणें] **स्फोटक**-पु. फोड. 'स्फोटक एक उद्भवला।' -गुच ५.२८. -वि एकदम फुटणारें; भडका होऊन फुटून उडणारें (दारूसारखें द्रव्य). **स्फोटन**-न. फुटणें; मोडणें; फाटणें.

स्मर—पु. १ मदन; काम. 'स्मरादि रिपुमन्मनीं अहि न काळ भेका कसे।'-केका २१ २ स्मरण. [सं.] ०**गृह**-न. स्त्रियांची योनि. **स्मरारि-र**-पु. शंकर.

स्मरण-न. १ आठवण; चिंतन. २ स्मृति; मनांत उद्भवणें. ३ पुन्हां उपस्थित होणें. ४ स्मृति; स्मरणशक्ति. ५ स्मरणें पहा. ६ स्मारकाची वस्तु (अलंकार इ०). ०**टिपण**-न. आठवणी साठीं केलेलें टांचण; टांचणवही. ०**वही**-स्त्री. स्मरणार्थ टांचणें केलेल पुस्तक. **स्मरणी**-स्त्री. सामान्यतः तेरा मण्यांची जपाची माळ. (क्रि० घेणें=ध्यास, चिंतन करणें). **स्मरणीय**-वि. आठवणींत ठेवण्यास योग्य. **स्मृत**-वि. आठवण झालेलें. **स्मारक**-वि. आठवण करून देणारें (कृत्य, वस्तु). -न. स्मृति कायम रहावी म्हणून केलेलें कार्य (मंदिर, चित्र, वस्तु, ग्रंथ वगैरे)

स्मरणें—उक्रि. १ आठवणें; आठवण होणें, करणें; मनांत आणणें, येणें; मनांत उपस्थित होणें, करणें. २ उपास्य देवतेचें वगैरे चिंतन करणें; ध्यान करणें. ३ वारंवार आठवण करणें; न विसरणें. [सं. स्मृ=स्मरणें]

स्मशान, स्मशान वैराग्य, स्मश्रू—'श्मशान' इ० पहा.

स्मित—न. १ गालांतल्या गालांत हसणें. २ फूल उमलणें. याचा विशेषणासारखाहि अर्थ होतो. [सं. स्मि=गालांत हसणें]

स्मृति(त)—स्त्री. १ आठवण. २ 'स्मरण' पहा. ३ हिंदुधर्मशास्त्रासंबंधीं मनु आदिकरून ऋषींनीं घालून दिलेले नियम मागून आठवून लिहिलेले ग्रंथ प्रत्येकीं व त्यांतील वचन; कायदे ग्रंथ [सं. स्मृ=स्मरणें] ०**चिन्ह**-न. आयुष्यांत घडलेल्या गोष्टींची अवशेषरूप खूण; शरीरादिकांवर टिकून राहिलेली एखादी खूण. ०**विरोध**-पु धर्मशास्त्रास येणारा बाध; धर्मशास्त्रविरुद्ध गोष्ट. बेकायदेशीरपणा. ०**शास्त्र**-न स्मृति अर्थ ३ पहा. **स्मार्त**-वि. १ स्मृतींना अनुसरणारें (व्यवहार इ०). २ स्मृतीनें मान्य केलेलें ३ आठवणविषयक; स्मरण करण्याचें. **स्मार्तकाल**-पु. स्मृतीनें ठरविलेली, कायद्यानें ठरविलेली (१०० वर्षांची) मुदत. **स्मार्त-कालातीत**-वि. कायद्याच्या मुदतीच्या बाहेर गेलेलें.

स्यंदन—न. ठिबकणें; पाझरणें. -पु. रथ. 'रमेश रथिं सारथी चतुर वांगवी स्यंदना।' -भीष्मप्रतिज्ञा. [सं. स्यंद्=जाणें]

स्यमंतक—पु सत्राजितानें सूर्यापासुन मिळविलेलें एक बहुमोल रत्न. यापासुन सोनें मिळत असे. [सं.]

स्रग्धरा—स्त्री. एक वृत्त. याच्या एकेका चरणांत २१ अक्षरें व म, र, भ, न, य, य, य हे गण असतात. [सं.]

स्रजणें—उक्रि. (काव्य) उत्पन्न करणें; बनविणें; निर्माण करणें. 'तरी जग हें स्रजिलें अवघें'-ज्ञें. [सं. सृज्=निर्मिणें]

स्रव, स्राव—पु. १ ठिबकणी; गळती; पाझर; प्रवाह; झरा. २ पाझरलेला पदार्थ. ३ गर्भपात (पांच महिन्यांच्या आंतील). [सं. स्रु=जाणें] **स्रवण**-न. १ स्रव पहा. २ घाम, लघवी, पू वाहणें. **स्रवणें**-अक्रि. गळणें; ठिबकणें; पाझरणें (द्रव पदार्थ); वाहूं देणें, पाझरूं देणें. **स्रोत**-पु. प्रवाह.

स्रष्टा—पु ब्रह्मदेव; जगनिर्माता. -वि. उत्पन्न करणारा; निर्माण करणारा. [सं.]

स्रुक्—न. एक पळीसारखें यज्ञीय पात्र. [सं]

स्लीपर—पु. १ एक जाती वा जोडा. २ रुळाखालील लांकूड. [इं.]

स्लेट—स्त्री. लिहिण्याची दगडी पाटी. [इं.]

स्व—सना. आपलें आत्मविशिष्ट. -नपु. स्वतः; स्वात्मा; आपण. -न स्वतःची मालकी; मिळकत. -स्त्री. (बीजगणीत) अधिक रकम. -वि. आपलें; स्वतःचें. [सं] **स्वकपोल कल्पित**-वि. (चुकीचा प्रयोग) मूलभूत प्रमाण नसतां स्वतःच्या कल्पनेनें रचलेलें; डोक्यांतून काढलेलें. ०**कर्म**-न स्वजातीचें नियुक्त काम, उद्योग, कर्तव्य; स्वतःचें काम. ०**कष्टसंपादित-कष्टार्जित**-वि. स्वतःच्या श्रमानें मिळविलेलें. ०**कार्य**-न स्वकर्म पहा. ०**कीय**-वि. स्वतःचें; स्वतःच्या मालकीचें; कुटुंबांतील; घराण्याचें. ०**गत**-वि. स्वतःचें, स्वतःशीं (बोलणें इ०). याचे प्रकार:-(अ) रंगभूमीवर एकट्याच पात्रानें केलेलें भाषण. (आ) रंगभूमीवर दुसऱ्या पात्राशीं संवाद चालू असतां त्यास ऐकू न जातां प्रेक्षकांना ऐकूं जाईल असें केलेलें भाषण. (इ) रंगभूमीवर अनेकांशी संवाद चालू असतां मध्येंच कांहीं मजकूर फक्त एकाच व्यक्तीस ऐकूं जाईल असा बोलणें इ० -वा. म. जोशीकृत. सोयरीक पुस्तकाची प्रस्तावना पृ. ७. ०**गोत्री**-वि. स्वतःच्या गोत्रांतील, कुळांतील; आप्तसंबंधी. ०**च्छंद**-पु. स्वतःची इच्छा, हट्ट, हुक्की, लहर. या शब्दापूर्वी 'आपला' हा शब्द वापरण्याचा एक रीत आहे. 'हा आतां आपल्याच स्वच्छंदानें वागूं लागला.' -वि. स्वच्छंदी; हट्टी; लहरी; नादिष्ट; स्वेच्छाचारी; स्वतंत्र. ०**जन-नी**-पु.स्त्री. स्वतःच्या घराण्यांतील, जातींतील इसम; आप्त; सखा. ०**जाति**-स्त्री. स्वतःची जात, कुळी. ०**ज्योति**-वि स्वयंप्रकाशित. ०**तंत्र**-वि. १ निरावलंबी; अनियंत्रित; मोकळें; स्वैर; स्वतःच्या

इच्छेप्रमाणें चालणारा (यावरून पूर्ण वाढीचा). २ (निंदार्थी) हट्टी; लहरी; स्वेच्छाचारी; मोकाट; नाटाळ. ३ वेगळा; निराळा; बाजूचा. **०तंत्रता, स्वातंत्र्य**-स्त्रीन. स्वाधीनता; मुखत्यारी; स्वच्छंदीपणा; निरावलंबिता; स्वैरवृत्ति; अडदांडपणा; अवखळपणा. **स्वतः**-क्रिवि. आपण होऊन; आपणामुळें-पासून-कडून; स्वभावतः; आपोआप; जातीनें; व्यक्तिशः. **स्वतः प्रमाण**-वि प्रमाणासाठीं स्वतःखेरीज इतरांची गरज नसलेला; स्वयसिद्ध (वेद इ०). **स्वतः सिद्ध**-वि. १ स्वतः होऊन साध्य झालेलें, तयार झालेलें, उत्पन्न झालेलें; स्वयंभू (ब्रह्म इ०). २ स्वयंप्रमाण; स्वयंसिद्ध. **स्वतां-तें**-क्रिवि. स्वतः पहा. **स्वतां**-पु. नवरा (बायकी शब्द). **स्वत्व**-न. मालकी; धनीपणा; मालकी हक्क; आपलेपणाचा धर्म. **स्वत्व निवृत्ति, स्वत्वाभाव**-स्त्रीपु. आपली मालकी दुसऱ्यास प्राप्त करून देणें; आपला हक्क सोडणें. **स्वत्वबोधन**-न. मालकी हक्क प्रस्थापित करणें. **स्वत्वहानि**-स्त्री. हक्क, पदवी धन, यांचा नाश. **स्वोत्पत्ति**-स्त्री. मालकी हक्काचें मूळ. **स्वदस्तूर**-न. १ स्वतःचीं सही; स्वाक्षरी. २ (कागद, खत इ०) स्वतःच्या हातानें लिहिणें; स्वतः लिहिलेला मजकूर **स्वदेश**-पु. स्वतः राहतो तो देश; मायभूमि; मूळ गांव, जागा **स्वदेशपरिधि**-पु. पृथ्वीगोलावरील स्थानिक अक्षांशाचें वर्तुळ **स्वदेशी**-वि. स्वदेशांत उत्पन्न झालेली. (वस्तू). **स्वदेशी चळवळ**-वि. स्वदेशी माल वापरण्यासंबंधीं लोकांस उपदेश करण्याची क्रिया, प्रचार. **स्वधर्म** पु १ स्वतःचा वर्णाश्रमधर्म कर्तव्य, धंदा. २ पदार्थाचा गुण; नैसर्गिक प्रवृत्ति-स्वभाव इ० **स्वपरभाव-भेद**-पु. आपपर भाव, हें आपलें व हें दुसऱ्याचें हा भेद करण्याची प्रवृत्ति. **०प्रकाश**-पु. ब्रह्म -वि. स्वतःच प्रकाशमान होणारा; स्वयंस्फूर्तीनें शिकलेला; स्वप्रभ. **स्वभाग**-पु. १ आपला वांटा. २ आपलें नशीब. **०योनि**-वि. आईच्या बाजूनें संबंध असलेला. **स्वरस**-पु. १ अंगरस; पाणी मिसळल्याखेरीज काढलेला फळांतील रस; नारळांतील पाणी किंवा त्याचें दूध. २ (ल.) भाषण, काव्य इ० ची गोडी, माधुर्य. **०राज्य**-न. १ स्वतःचें राज्य; स्वतंत्र राज्य. २ स्वराज्यांतील चौथाईचा कर; गोदावरीपासून कृष्णेपर्यंतचा प्रदेश. ३ हिंदुपदपातशाही. ४ लोकांच्या हितासाठीं, लोकनियुक्त अधिकाऱ्यांनीं लोकमतास अनुसरून चालविलेली राज्यपद्धति. ५ (वेदांत) ब्रह्मैक्य. 'ऐसेनि ब्रह्मैक्या सारिखें। स्वराज्य येतां जवळिकें।' -ज्ञा १८.१०७२. **०रुचि**-वि. स्वतःच्या आवडीनिवडीप्रमाणें वागणारा; कलाप्रमाणें चालणारा. **०वश**-वि. स्वतंत्र; मोकळें; स्वैर. **०वृत्ति** स्त्री आपला उद्योग, धंदा. २ आपली उपजीविका. **०संतोष**-पानें-क्रिवि. राजीखुशीनें; बळजबरीनें नव्हे असें (लिहिणें, करणें इ०) **०सत्ता**-स्त्री. आपला हक्क. **०सत्ताक-त्मक**-वि आपला हक्क असलेलें. **०संपादित**-वि. आपण मिळविलेलें **स्वसंपादित मिळकत**-स्त्री. जी मालमत्ता वडिलार्जित नसून, वडिलार्जित मालमत्तेची विशेष किंवा मुळींच मदत न घेतां मिळविली ती. **०संवेद्य**-वि. आपण होऊन जाणलें जाणारें; ज्ञानरूप. **०साक्ष**-क्रिवि. समक्ष; डोळ्यासमोर; एकाद्याच्या साक्षीनें. **०स्त्री**-स्त्री. आपली पत्नी, भार्या. **०स्थान**-न. आपली जागा, राज्य. **०हस्त**-पु. स्वतःची सही. **०हित**-न. आपला लाभ, फायदा, नफा.

स्वच्छ—वि. १ शुद्ध; पवित्र; उत्तम; चांगलें; निर्मळ. २ स्पष्ट; साफ साफ (बोलणें इ०). [सं.] **स्वच्छता**-स्त्री. पवित्रपणा, शुद्धता; निर्मळपणा.

स्वधा—उद्गा. पितरांना उपचार अर्पण करतांना अथवा अन्नदान, पिंडदान करतांना म्हणावयाचा मंत्र. [सं.]

स्वन-स्वनि—पु. आवाज. **स्वनित-क**-न. १ आवाज. २ एक १४ ओळींची कविता (इं.) सॉनेट. **स्वनित**-वि. वाजणारें; आवाज करणारें; वाजविलेलें.

स्वप्न—न पु. मनुष्यास निद्रावस्थेंत असतां जागृतीतल्या प्रमाणें सृष्टीतील गोष्टींचा होणरा भास; मनाच्या जाणीवची एक स्थिति. [सं. स्वप्=झोप घेणें] **म्ह०** मनीं वसे तें स्वप्नीं दिसे. **०न असणें**-अस्तित्व नसणें; स्वप्नांतहि न दिसणें; न आढळणें. **०पाहून जागा होणें**-अनुभवावरून शहाणा होणें. **स्वप्नाचें भाकींत सांगणें**-स्वप्नाचा अर्थ लावणें. **स्वप्नीं नसणें**-अत्यंताभाव; मुळींच नसणें. **स्वप्नीं नेणणें**-मुळींच माहीत नसणें. **स्वप्नी पुऱ्या-मांडे-खाणें**-मनोराज्य करणें. सामाशब्द-**०दोष**-पु. स्वप्नावस्था अर्थ २ पहा. **०प्रपंच**-पु. स्वप्नांतील देखावा, जग **०वत्**-वि. मिथ्या; न टिकणारें; भ्रामक; पोकळ. **०विचार**-पु स्वप्नाचा अर्थ सांगणें. **०सृष्टि**-स्त्री. स्वप्नप्रपंच; न टिकणारी गोष्ट; मिथ्या जग. **स्वप्नाकार**-वि. भ्रामक; मिथ्या; क्षणिक; बदलणारें. **स्वप्नावस्था**-स्त्री. १ चार अवस्थांपैकीं दुसरी; स्वप्न पडणें. २ झोपेंत वीर्यपात होणें. ३ मायिक जगत् किंवा जीवित.

स्वभाव—पु. प्रकृति; प्रकृतिगुण; सहजधर्म, स्वाभाविकअवस्था, उपजत गुण, नैसर्गिक धर्म. [सं.] **म्ह०** स्वभावो दुरतिक्रमः=स्वभावास औषध नाहीं. **स्वभावें-स्वभावानें**-क्रिवि. १ स्वतः; खुद्द. २ आपोआप, साहाजिकपणें. **०गति-गत्या, स्वभावतः**-क्रिवि. नैसर्गिक गुणामुळें, मार्गानें; सहजपणें; मोकळेपणें; साहजिकरीत्या. **०चित्र**-न. एखाद्या व्यक्तीची मनांतरण्याजोगी अशी थोडक्यांत वर्णन केलेली माहिती, स्वभाववर्णन. **०वाद**-पु. (वेदांत) आधिभौतिक किंवा जडवाद; प्रकृतिवाद; **ईश्वरसत्तावादाचे विरुद्ध**. **०सिद्ध**-वि. प्रकृतिसिद्ध; नैसर्गिक

(गुण) **स्वाभाविक(वी)क**–वि. नैसर्गिक; साहजिक; जन्मजात. –क्रिवि. आपोआप; साहजिकपणें; बाह्य कारणाशिवाय. **स्वभावोक्ति**–पु. (अलंकार) जात्यादिकाचे ठायीं राहणारा स्वभाव वर्णिला असतां हा अलंकार होतो.

स्वयं, स्वयम्, स्वयमेव—क्रिवि. स्वतः होऊन; जातीनें स्वतःच्या प्रेरणेनें; अंतःस्फूर्तीनें; खुद्द. [सं. स्वयम्] **०ज्योति**–वि. स्वज्योति पहा. **०दत्त**–पु. आईबाप जिवत असतां वयांत आल्यावर आपण होऊन दत्तक पुत्र मानलेला मुलगा; (विशेषणा प्रमाणेंहि उपयोग होतो). **०निर्णय**–पु आपल्यावर कोणी कसें राज्य करावें, राज्यपद्धति कशा प्रकारची असावी इ० गोष्टी स्वतः ठरविणें. **०पाक**–पु. १ स्वतःच्या हातांनीं अन्न शिजविणें. २ अन्न शिजविणें, (सामान्यतः). ३ शिजविलेलें अन्न. **०पाकी**–पु. सैंपाक करणारा; आचारी. **०प्रकाश**–वि. १ स्वज्योति पहा. २ स्वतः ज्ञान मिळविलेला; स्वयंज्ञानी. **०बोध**–पु. आत्मज्ञान; ब्रह्मज्ञान. **०भ-भू**–पु. ब्रह्मा; ब्रह्मदेव; विष्णु; शिव; काळ; प्रेम; पर्वत. –वि. १ मूळचा; स्वतः उत्पन्न होणारा. २ स्वतः एखाद्या पाषाणांत प्रादुर्भूत झालेला किंवा दृष्टांतानें लोकांस समजेलेला (देव, देवता). याच्या उलट स्थापित. **०वर**–पु.न. कन्येनें स्वतःचा पति पसंत करून वरणें. **०सेवक**–पु आपल्या इच्छेनें सेवकभावान लोककार्य करणारा. **स्वयें**–क्रिवि. स्वतः होऊन; आपण होऊन स्वतः सिद्धपणें; स्वयंस्फूर्तीनें; खुद्द.

स्वर्—न. १ आकाश. २ स्वर्गलोक. ३ इंद्रलोक. [सं.] **स्वर्गंगा-नदी**–स्त्री. आकाशगंगा. **स्वर्धुनी**–स्त्री. भागीरथी नदी. **स्वर्लोक**–पु. स्वर्ग.

स्वर—पु. १ (राग) गायनोपयोगी नाद, श्रुति; या सात आहेत व यांचे शुद्ध, विकृत, अचल, उद्धृत, तीव्र, कोमल असे भेद आहेत. २ वेदमंत्रांतील अक्षरांचें उदात्तानुदात्तत्व दाखविणाऱ्या त्या त्या अक्षरांवर दिलेल्या खुणा. ३ (व्याकरण) दुसऱ्या वर्णाच्या साह्यावांचून स्वतंत्रपणें उच्चारला जाणारा वर्ण. ४ साधारणतः आवाज, ध्वनि ५ नाकपुडयावाटें वाहणारा वायु ५ शब्द उच्चरतांना त्याच्या विशिष्ट अवयवावर पडणार जोर. [सं. स्वृ=ध्वनि करणें] **०देणें**–गाण्याची सांथ करणें. **०भजणें, वाहणें**–कल दर्शविणें, झुकणें (मन, इच्छा इ० चा); कार्याचे आरंभी कोणत्या नाकपुडींतून स्वर वाहतो तो कार्यास अनुकूल प्रतिकूल आहे हें पाहणें; यावरून अनुकूल मत होणें. **०करण**–न. सा री ग म प ध नी या अक्षरांचे उलटापालटीनें बनविलेलें. गाणें. **०बद्ध**–वि. गाण्यांतील नियमानुसार रचलेलें (गीत, पद्य) **०भंग**–पु. १ विकारामुळें आवाज बिघडणें. २ गाण्यांतील बेसुर **०मंडल-ली**–नस्त्री. एक प्रकारचें तंतुवाद्य. **०मेळ**–पु दोन किंवा अधिक स्वरांचा योग्य मिलाफ. **०शास्त्र**–न. नाकांतून वाहणाऱ्या श्वासाचें लक्षण, गती–वरून प्रश्न पाहण्याचें शास्त्र. **०सप्तक**–न. (राग) शुद्ध सात स्वरांचा समुदाय. **०ज्ञान**–न. गाण्यांतील स्वरांचें ज्ञान. **स्वरांतर तान**–स्त्री. चार स्वरांची तान.

स्वरूप—न. १ स्वतःचें रूप, आकार. ढब, चेहरा. २ मुद्रा; तोंडवळा; हुबेहुब रूपरेषा. ३ प्रकृति; स्वभाव. ४ लावण्य; सौंदर्य. ५ आत्मस्वरूप. 'आंतु मीनलेनि मनोधर्में । स्वरूपप्राप्तीचेनि प्रेमें ।' –ज्ञा ८.९३. ६ महत्त्व; वैशिष्ट्य. 'मग मत्स्वरूप काय ब्राह्मण आले दुरूनि जेवाया । त्यांसि तुझी भगिनी हे वा न नमुनि जरि म्हणेल जेवा या ।' –मोवन ८.१९. **स्वरूपता**–स्त्री. चार मुक्तींपैकीं एक; ईश्वरासारखें रूप होणें; सरूपता. 'स्वरूपचि व्हावें ते स्वरूपता । तिसरी मुक्ति ।' –दा ४.१०२४. **स्वरूप प्राप्ति**–स्त्री. ब्रह्ममय होणें. **स्वरूपवान**–वि. सुंदर, देखणा. **स्वरूपस्थिति**–स्त्री. १ प्रकृति; भावना इ०ची अवस्था. २ ब्रह्मस्वरूप होणें. ३ नैसर्गिक अवस्था. **स्वरूपाकार**–वि. ब्रह्मस्वरूप झालेला. **स्वरूपी**–वि. तत्सदृश; तल्लक्षणवान; तदाकार.

स्वर्ग—पु. इंद्राचा लोक, देवांचें वसतिस्थान, पुण्यकर्में करणाऱ्यास मृत्यूनंतर मिळावयाचा लोक. [सं.] **म्ह० स्वतः मेल्यावांचून स्वर्ग दिसत नाहीं=कष्टावांचून फळ नाहीं. २ स्वर्ग दोन बोट उरणें**=गर्वानें फुगणें. **स्वर्गाची वाट**=मृत्यु. **स्वर्गास हात पोहोंचणें, स्वर्गीं ध्वज लावणें**=इच्छिलेलें अतिशय उच्चपद प्राप्त होणें, कृतकृत्य होणें. सामाशब्द:– **०गति**–स्त्री. मरणें; स्वर्गाची वाट, रस्ता. –वि. स्वर्गी जाणारा. **०द्वार**–न. स्वर्गाचा रस्ता; मार्ग **०पुष्प**–न. पारिजातकाचें फूल. **०वास**–पु. १ स्वर्गांत राहणें. २ मृत्यु. **०वासी**–वि. १ स्वर्गांत राहणारा. २ नुकताच मेलेला. **स्वर्गारोहण**–न. १ स्वर्गांत जाणें. २ मृत्यु पावणें. **स्वर्गीय, स्वर्ग्य**–वि. १ स्वर्ग लोकातील. २ स्वर्गासंबंधी ३ (ल.) अत्यंत उत्कृष्ट.

स्वर्ण, स्वर्ण-कदली-कार-पुष्प-माक्षिक—सुवर्ण, सुवर्णकदली इ० पहा.

स्वल्प—वि. १ फार थोडें; किंचित. २ क्षुल्लक; सोपें. [सं.] **स्वल्पाहार**–पु फराळ; थोडेसें जेवण.

स्वसणें—अक्रि. श्वास टाकणें. [सं. श्वस्]

स्वसा—स्त्री. बहीण. [सं.]

स्वस्त—वि. शांत; स्वस्थ; सुखी; शारीरिक व मानसिक सौख्य भोगणारा. [सं. स्वस्थ] **स्वस्तावणें**–अक्रि. शांत होणें, समाधानी बनणें.

स्वस्त-स्ता—वि सवंग, महाग नसलेला. [हिं.] **स्वस्ता (स्था)ई**–स्त्री. सवंगपणा. **स्वस्तावणें**–अक्रि. सवंग होणें.

स्वस्ति—उद्गा. बरें; चांगलें; कल्याण; उत्कर्ष: क्षेम, आशीर्वादाचा एक प्रकार. 'रामाय स्वस्ति रावणास स्वस्ति' =दोन्ही

पक्षांस खूष ठेवणें, दोन डगरीवर हात ठेवणें. [सं.] ०वाचन-न. व्रत; शांती इ० मंगलकार्याच्या आरंभीं करण्याचा एक विधि; पुण्याहवाचन. ०क्षेम-अ. स्वस्ति पहा. -न. त्रास, गडबड इ० कांहीं न होतां कुशल किंवा यथास्थित असणें. सुस्थिति; चांगली स्थिति. **स्वस्त्ययन**-न. लग्नमुंजींतील एक धार्मिक समारंभ, स्वस्तिवाचन; पुण्याहवाचन.

स्वस्तिक—न. १ एक शुभदायक चिन्ह. हें जैनांच्या सातव्या तीर्थंकराचें निदर्शक आहे. २ एक विशिष्ट बांधणीचें देऊळ. ३ कोणताहि शुभ, मंगल पदार्थ. [सं.]

स्वस्थ—वि. १ सुखी; समाधानी; तृप्त; निरोगी. २ उगा; स्तब्ध; निश्चयी; शांत; (शारीरिक, मानसिक दृष्ट्या). ३ (चुकीनें) सवंग. ४ निश्चयी; करारी. [सं. स्था=राहणें] **स्वस्थता**-स्त्री. सुख; निश्चलता; शांतता; फुरसत. **स्वस्थावणें**-अक्रि. शांत होणें; स्थिरावणें. **स्वस्थाविणें**-क्रि. १ शांत करणें; संतुष्ट करणें. २ (चुकीनें) सवंग करणें. **स्वास्थ्य-स्थ**-न. १ प्रकृति, धंदा इ० त सौख्य; समाधानीपणा. २ उपजीविकेचें सुखाचें साधन; (इनाम, जमीन इ०). ३ आत्मविश्वास. ४ आरोग्य; आराम.

स्वागत—न. आतिथ्य; पाहुण्याचा उत्तम आदरसत्कार करणें, तो करण्याची क्रिया. [सं.]

स्वागी—स्त्री. सवागी पहा.

स्वाड—वि. चांगलें; शुभ, उत्तम (नेहमीं द्वाड शब्दाशीं योजून उपयोग) ' बाहेर निघतांच स्वाडद्वाड शकुन पहावा. '

स्वाति-ती—स्त्री. पंधरावें नक्षत्र. [सं.] ०चा पाऊस-पु. या नक्षत्रावर पडणारा पाऊस. त्यानें समुद्रांत मोती उत्पन्न होतात अशी लोकसमजूत.

स्वात्म—वि. आपल्या आत्म्यासंबंधीं. [सं.] ०सुख-न अंतःसुख; ब्रह्मानंद. **स्वात्मानुभव**-पु ब्रह्माचा अनुभव.

स्वाद—पु. १ चव; लज्जत; गोडी; आमोद. २ चव घेणें; गोडी चाखणें. ३ वास; सुवास. [सं.] **स्वादिष्ट-ष्ठ, स्वादिक**-वि. चवदार; लज्जतदार; रुचकर. **स्वादु**-वि. १ गोड. २ चविष्ट, मधुर.

स्वाधिष्ठान—न. १ गुदद्वार. २ (योग) षट्चक्रांतील दुसरें चक्र. ३ स्वतःचें स्थान. [सं.]

स्वाधीन—वि. आपल्या इच्छेप्रमाणें चालणारा; दुसऱ्याचे ताब्यांत नसलेला, स्वतंत्र; मोकळा. -वि. कबज्यांतील. -शअ अंमलाखालीं; काळजीखालीं; ताब्यांत; आज्ञेंत. ' मी आपले बापाचे स्वाधीन आहे. ' [सं.] ०पतिका-भर्तृका-स्त्री. नवऱ्यास मुठींत ठेवणारी बायको.

स्वाध्याय—पु. वेदपठण; वेदाध्ययन; तें सुरू करण्याचा दिवस. [सं.] **स्वाध्यायी**-वि. १ वेदाध्ययन करणारा (विद्यार्थी). २ (चुकीनें) साहाध्यायी.

स्वानंद—पु. आत्मानंद; ब्रह्मानुभव. -वि. आत्मसुखाचे आनंदांत मग्न झालेला. [सं.] **स्वानंदसोहळा**-पु. आत्मानंदाचा अनुभव घेणें.

स्वानुभव, स्वानुभूती—पुस्त्री. १ तूर्यावस्था. २ आत्मानुभव, स्वतःचा अनुभव. [सं.]

स्वाभिमान—पु. १ स्वतःचा (चांगला, वाईट) अभिमान; गर्व. २ तेजस्विता; दुसऱ्यानें निष्कारण केलेल्या उपमर्दाची असहिष्णुता. ३ पोकळ अहंकार. [सं.]

स्वामि-मी—पु. १ धनी. २ मालक. देवता; ईश्वर; राजा. ३ गुरू; नवरा; साधु; संन्यासी, गोसावी. क्वचित् ' स्वाम ' असेंहि रूप आढळतें उदा० स्वाम आज्ञा करतील त्याप्रमाणें मी चालेन. -वि. मुख्य; श्रेष्ठ. [सं.] **स्वामित्व**-न. १ धनीपणा; मालकी; ताबा. २ शेत, धंदा इ० मालकापासून करावयास घेतांना मालकास त्याबद्दल द्यावयाची हक्काची रक्कम; मालकी हक्क. **स्वामिनी**-स्त्री. धनीण; मालकीण. **स्वामिद्रोह**-पु. गुरू, राजा, धनी यांच्याशीं केलेली फितुरी, द्वेष. **स्वामिद्रोही**-वि. मालकाशीं द्रोह करणारा.

स्वायत्त—वि. स्वाधीन पहा.

स्वार—पु. घोडयावर बसलेला माणूस; सैनिक; राऊत. [फा. सवार्]

स्वार—न. (नाविक) सुकती अगर भरती पूर्ण झाली म्हणजे कांहीं वेळ पाणी स्थिर राहणें अशी अवस्था.

स्वारंबी—वि. (को.) बकरीं, गुरें यांच्या मलमूत्रांनीं राबविलेली, खतविलेली (जमीन).

स्वारस्य—न. १ स्वाभाविक, नैसर्गिक गोडी; चव; रसाळपणा; अभिरुची; माधुर्य (काव्य, भाषण इ०). २ चांगलेपणा; उत्कृष्टपणा; चांगुलपणा. ३ मर्म; खुबी. [सं.]

स्वारी, सवारी—स्त्री. १ घोडयावर बसणें. २ घोडयावर बसलेली व्यक्ति. ३ मोहीम; दौड; धावणी. ४ वाहन. ५ (बहुमानार्थी) आपण स्वतः. ' आमची स्वारी काल नाटकाला गेली होती. ' ६ मोठया माणसाचा लवाजमा, परिवार, सरंजाम, मिरवणूक. ७ हत्यारी लोकांची टोळी; तिचा हल्ला. ८ कोणत्याहि वाहनावर आरूढ झालेला मनुष्य. ९ राजा; सरदार इ० थोर व्यक्ति. १० (ल.) प्रेतयात्रा. ११ (बायकी) नवरा. १२ (कुस्ती) एक प्रकारचा पेंच यामध्यें खालच्या गडयास वरचा गडी दोन पायांच्या पकडीमध्यें पकडतो. (क्रि० घालणें, भरणें). १३ मध्यरात्रीं निघणारी वेताळाची फेरी. १४ संचार; अवसर.

१५ मोहरमांत मुसलमानांमध्यें होणारा पीर वगैरेचा संचार. [फा. सवारी] **०करणें**–हल्ला चढविणें. **०पेच**–पु. स्वारी अर्थ ११ पहा. **०शिकारी**–स्त्री. (व्यापकार्थी) मिरवणूक; लवाजमा; स्वारी करणें; शिकारीस जाणें; मोहीम.

स्वार्थ—पु. १ स्वतःचा फायदा, लाभ; मतलब. २ वाच्यार्थ; मुख्य अर्थ; मुद्दा; (भाषण इ० तील). ३ स्वतःची मालमत्ता. ४ (व्याकरण) जेथें क्रियापदानें एखाद्या गोष्टीचें विधान साक्षात होतें म्हणजे एखादी गोष्ट आहे किंवा नाही इतकें मात्र समजतें तेथें असणारा अर्थ. [सं.] **०त्याग**–पु. स्वहितावर तिलांजली देणें; स्वतःच्या मतलबावर पाणी सोडणें; स्वतःच्या हिताकडे दुर्लक्ष करून एखादें महत्कार्य करणें. **०पर-परायण**–वि. आपमतलबी; स्वतःचेंच हित पाहणारा. **०बुद्धि**–स्त्री. आपमतलबीपणा. –वि. आपमतलबी. **स्वार्थी**–वि. १ मूलभूत अर्थाप्रमाणें. २ नेहमीं आपला फायदा पाहणारा; मतलबी.

स्वाहपी—वि. शांत; संतुष्ट; समाधानी. [सं. स्वाहा=अग्निची ज्वाला]

स्वाहा—अ. १ देवास हवि देण्याचा मंत्र. २ अधाशीपणानें खाणें. (क्रि० करणें=गिळंकृत करणें.) ३ (ल.) दुसऱ्यानें विश्वासानें ठेवलेली वस्तु उपटणें; अपहार करणें. **स्वाहाकार**–पु. देवतांस अग्नीच्या द्वारें हविर्भाग देणें.

स्वाक्षर-री—न.स्त्री. १ स्वतःच्या हातचें लिहिणें. २ स्वतःची सही; स्वदस्तुर. [सं.]

स्विष्टकृत्—स्त्री. १ मुख्य होम झाल्याबर द्यावयाची आहुती. २ (ल.) समाप्ति; शेवट; अखेर. ३ (ल.) समूळ नाश; उच्छेद. [सं.]

स्वीकरण-स्वीकार—न.पु. १ कबूल करणें; हक्क बजावणें; पत्करणें. २ स्थिति, वाद इ०कबूल करणें; मानणें; संमति देणें. ३ अंगीकार करणें. [सं.] **स्वीकारणें**–सक्रि. घेणें; हक्क सांगणें; मान्य करणें; मानणें; अंगीकार करणें; संमति देणें. **स्वीकृत**–वि. घेतलेलें; अंगिकारिलेलें; मान्यता, कबूली दिलेलें.

स्वीय—वि. स्वतःचें; स्वतःसंबंधी. [सं.]

स्वेच्छ—वि. १ स्वैर; स्वतःच्या मनाप्रमाणें वागणारा. २ उनाड; अवखळ; आडदांड; मोकाट; उच्छृंखल. –क्रिवि. यथेच्छ; आपल्या मनाप्रमाणें. [सं.] **स्वेच्छा**–स्त्री. १ स्वतःची मर्जी. २ आडदांडपणा; उनाडपणा. **स्वेच्छाचार-गमन-विहार**–पु न पु. स्वच्छंदीपणाचें आचरण. **स्वेच्छाचारी-गामी-विहारी**–वि. स्वेच्छ पहा.

स्वेत-तु—पु. (अप.) सेतु; पूल. [सं. सेतु]

स्वेद—पु. १ घाम. २ वाफ. [सं.] **०ज**–वि. घामापासून उत्पन्न होणारा. (प्राणी, ऊ इ०)

स्वैपाक, स्वैपाकघर, स्वैपाकी—स्वयंपाक इ० पहा.

स्वैर-री—वि. स्वेच्छ पहा. स्वच्छंदी; उनाड; आडदांड. [सं.] **०गति**–स्त्री. १ स्वेच्छाचार पहा. २ –वि. स्वेच्छाचारी पहा. **०गामी-वृत्त-त्ति**-वि. स्वेच्छाचारी पहा. **स्वैरिणी**–स्त्री. उनाड स्त्री; व्यभिचार करणारी बाई; स्वच्छंदी स्त्री; वेश्या.

स्वोदय—पु. (ग्रह, नक्षत्र इ० चा) उदय; उगवणें; उदयाचा ठराविक काल. लंकोदय, चर इ० पहा. [सं.]

स्वोपार्जित—वि. स्वतः कष्ट करून मिळविलेलें. [सं.]

ह

ह—मराठी व्यंजनमालेंतील तेहेतिसावें व्यंजन. अक्षरविकासाच्या पांच अवस्थांपैकीं पहिली गिरनारचा अशोक लेख, दुसरी मथुरेचा शोडास जैन लेख, तिसरी गिरनारचा रुद्रदामन् लेख, चौथी अप्सद लेख, व पांचवी अकराव्या शतकांतील उज्जनीचा लेख यांत आढळते,

हुं—उद्गा. लक्ष वेधणें–देणें, सूचना, संमति, पसंति दाखविणें इ० चा दर्शक शब्द; हां. [ध्व.]

हइता, हइराण, हइराणगत, हइरान, हईक—हैता, हैराण इ० पहा.

हउदा, हउशा, हऊसी, हऊळा, हऊद, हऊर, हऊस, हऊसदार—हौदा, हौशा इ० पहा. **हउस**–स्त्री. इच्छा; हौस पहा. 'परस्पर बिघाडविसीं हउस राहिली नाहीं.' –चंद्रचूड दप्तर १.१०५.

हक, हकटक, हकदार इ०—हक्क, हक्कटक इ० पहा.

हक—हक्क पहा. **०ताला**–पु. उच्च ईश्वर. 'एखादे आपले हिंदूंचें तीर्थी बसौनु हकतालाची बंदगी करून हजरत साहेबास द्या देऊनु.' –इंम ६७. [अर हक्क्-तआला] **०नाहक-नाक**–क्रिवि. नाहक; विनाकारण; अन्यायानें. 'आजदीड महिनाहक्कनाहक फिरतो.' –चंद्रचूड दप्तर १.१३७. 'वेधिलें चित्त हकनाक उशीर लाविला।' –प्रला १३१. **०होणें**–मरणें. 'नजबखानास राजयक्ष्मा रोग होऊन चौदावे रबिलाखरीं हक जाला.' –मदबा १.११८. **०परस्ती**–स्त्री. १ सत्यपूजा. २ कृतज्ञता. –पेअ ६१.

हकणें, हकलणें—(विप्र.) हाकणें, हाकलणें पहा.

हकम—पु. गांव–जिल्हा–अधिकारी; मालक. हाकीम पहा. [अर. हक्म्] **०हकमात**–स्त्री. राज्यकर्ता वर्ग; अधिकारी वर्ग. **हकमी-माई**–स्त्री. हकमाचें काम, अधिकार; स्वामित्व; मालकी. हकिमी पहा.

हकमक-हकम—क्रिवि. हटकून; मुद्दाम.

हकमी, हकमाई—स्त्री. हकीमाचा धंदा, वृत्ति, काम इ०. [हकीम]

हकळा—पु. गवताचा एक प्रकार.

हकाटणें, हकाटा, हकाटी, हकारणें, हकारा—हाकाटणें, हाकाटा इ० पहा. [हांक]

हकारणी—स्त्री. चालू करणें; चालविणें (गलबत, नाव); ढकलणें; शीड उभारणें. हकारणें पहा. **हकारणें**–उक्रि. १ किनाऱ्यापासून पुढें आंत–समुद्रांत ढकलणें, चालवणें, नेणें, हाकणें (नांव, बोट). २ शीड उभारणें (गलबताचें–जलप्रवास सुरू करतांना). ३ सोडणें; हांकणें; चालविणें (गाडी, बैलांचा तांडा, खटारा इ०). ४ जोरानें सोडणें; वेग देणें (वल्हीं मारून नाव इ० स). ५ तांतडीनें, लवकर जाण्याविषयीं सांगून पाठविणें; रवाना करणें (दूत, जासूद). ६ सपाटून पळविणें; भरधांव काढणें (घोडा इ०). ७ बोलावणें. हाकारणें पहा. **ग्रह०** आषाढी आणि सण हकारी. [ध्व. हाकार]

हकालणें—उक्रि. १ काढून देणें–लावणें, घालवून देणें (पशु, पक्षी इ०). २ हाकणें पहा. ३ हकारणें अर्थ १–४ पहा. [हकारणें; हिं. हकारना] **हकालपट्टी**–स्त्री. काढून लावणें–देणें; हद्दपारी.

हकाहाक, हकाक—स्त्री. आरडाओरड; बोंबाबोंब; हाकाटी. हाकाहाक पहा. [हाक द्वि]

हकि(की)कत, हकीगत—स्त्री. १ बातमी; वृत्तांत; वर्णन; अहवाल. २ घडलेलें वर्तमान; गोष्ट; प्रसंग; वाका. 'साहेबी हकीकती मनास आणून पाहतां...'–रा १७.३८. [अर. हकीकत] **०नामा**–पु. घडलेल्या गोष्टीचा लेखी वृत्तांत, अहवाल. [फा.]

हकीम—पु वैद्य; वैद्यकी (मुसलमानी) जाणणारा; युनानी वैद्य. [अर. हकीम्] **हकिमाई, हकिमी**–स्त्री. हकिमाचा धंदा, काम; वैद्यकी (युनानी).

हकीम—पु. अधिकारी; अंमलदार. हकम, हाकीम पहा. 'त्याचे हकिमाचे इतलेशिवाय स्वारी निभावून जाणार नाहीं.' –ख १०.५६१४. [अर. हक्म्] **हकिमी**–स्त्री. अधिकार; अंमल. 'प्रांत मजकूर हकिमी गंगाधर प्रतिनिधी यांजकडे होती.' –बाडबाबा २.३२. [फा. हाकिमी]

हक्क—पुन. १ अधिकार; मालकी; वारसा. २ देशमुख, देशपांडे, महाजन इ० पिढीजाद महाल–गांव–अधिकाऱ्यांचा गांववसुलींतला किंवा पिकाचा वांटा, हिस्सा; वर्षासन. 'आम्ही मोहिब्बाचे हक्कामध्यें हमेशाचे दर्गामध्यें शुक्रगुजारी करीत असतो.' –ब्रच ५.२४०. ३ (ल.) धंदा; उद्योग; काम. 'झाडावर चढणें हा वानराचा हक्क आहे.' ४ पगार; प्राप्तव्य. 'ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हक्कांत धरावी.' –सभासद २३. ५ नेमणूक. 'पाटील कुळकर्णी यांसी हक्क बांधून दिला.' –सभासद २५. ६ सत्य. [अर. हक्क्] **०करणें–देहांतशिक्षा करणें.** –मदरु १.१६. **०होणें–मरणें. हक्का(का)टक्कां(कां)त येणें, हक्काटकास येणें**–१ तावडींत, सपाटयांत सांपडणें; आटोक्यांत येणें; हातांत–अवसानांत–टप्प्यांत–कक्षेत–आवांक्यांत–अधिकारांत येणें २ मर्जीस येणें; संमत होणें. ३ आंकडयांत, हिशेबांत बसणें. **हक्काटक्कांत जाणें–गुजरणें–उरकणें–भटपणें–आटोपणें–मरणें**–भर तारुण्यांत, ऐन उमेदींत मरणें, नष्ट होणें. **०अदाव**–पु १ हक्क रुपुम पहा. २ (सामान्यतः) हक्क. **०जबारी**–स्त्री. हक्कदारपणा. –शर. **०टक्-टाक्**–पु १ देशमुख इ०. पिढीजाद गांवकामगारांना रोख द्यावयाचे पैसे. २ (सामान्यतः) हक्क. **०ताला**–उच्च ईश्वर. हकताला पहा. **०दस्तुरी**–स्त्री. १ हक्क आणि वहिवाट; हक्क आणि ठरलेली बलुतीं, वतन. २ (सामान्यतः) हक्क. **०दार**–वि. १ वार्षिक वसुलाचा किंवा पिकाचा अंशतः मालक. २ वारस; वांटेकरी. [फा] **०दारी**–स्त्री. १ हक्कदाराचा भाग, वांटा. २ हक्क धारण करणें; हक्क. **०माल**–पु सतेचा माल; हक्काचें स्वामित्व; आपला योग्य हक्क आहे असा माल. 'हा पदार्थ माझा हक्कमाल आहे, माझा मला द्यावा.' 'बक्षीस कांहीं देणार होतां तें न द्याल तर न द्या पण चाकरीचा पैसा तो तर माझा हक्कमाल आहे.' **हक्कनाहक, हकनाहक**–क्रिवि. १ बरोबर असो कीं नसो; न्यायानें किंवा अन्यायानें; सकारण किंवा अकारण; कशाहि रीतीनें अविचारानें. २ नाहक पहा. [फा. हक्–ना–हक्] **०रसूम–रुसूम–लाजिमा**–पुभव. १ देशपांडे इ० पिढीजात अधिकाऱ्यांचे हक्क आणि विशेष अधिकार; वतनदारी हक्क वगैरे. २ हक्क व भोगवटा; विशेषाधिकार; कायदेशीर हक्क व प्रस्थापित मालकी. **०हराम-हरामाचा**–वि. वाजवी व न्याय्य; बरोबर कायदेशीर. 'हक्क हरामाचा पैसा–अधिकार–वृत्ति–मिळकत.' (हराम शब्दाचा गैर कायदा असा मूळ अर्थ वाईट असतां मराठींत या वाक्प्रचाराला सोवळेपणा आलेला आहे). हक्काहरामाचा पहा. **०हलाल–हलालाचा**–वि. वाजवी; न्याय्य; कायदेशीर. [अर-हलाल्=कायदेशीर] **०हवाल**–पु. सुस्थिति; भरभराट; (पीक, बाजारभाव, पाऊस, व्यक्ति इ०ची). **०हिशेब-शोध**–पु हक्क आणि येणें; बरोबर, खरा हिशेब–हिशेबी येणें. **हक्काचे दाणे**–खळें झाल्यावर मळण मातेरें व चांगले दाणे कांहीं महारास सोडावे लागतात तो हक्क. **हक्का हिशेबाचा**–वि. निर्विवाद हक्काचा, मालकीचा. **हक्का हरामाचा**–वि. १ न्याय्यान्याय्य रीतीनें मिळविलेला; भल्याबुऱ्या मार्गानें केलेला (पैसा). २ अन्याय्य; अप्रामाणिक; लबाडीचा (धंदा, काम, पैका इ०).

हक्कार—पु. हाकारा; हाकाटी हाकमारणें; ओरडणें. [सं]

हग—पु. मल; विष्ठा; गू (मनुष्य, पशु इ० चा). [सं. हद्]
०ओक-वक–स्त्री. (पटकींतील) जोराचे ढाळ, ओकारी वगैरे.

[हगणें+ओकणें] **हगटणें**–अक्रि. (क्रोध–तिरस्कारार्थी) हगणें. ' ससें उठलें कुत्रें हगटलें. ' हगुटणें पहा. **हगणवट**–न. जनावराचें गुदद्वार. **हगणें**–उक्रि. १ मल, विष्ठा शरीराबाहेर टाकणें; मलविसर्जन करणें. २ बाहेर टाकणें, पडणें (डोळ्यांतील चिपडें, पू). ३ वर टाकणें–येणें (समुद्रांतील घाण) ४ वर, बाहेर फेंकणें, येणें (जात्याचा खिळा ढिला झाल्यामुळें पीठ). (हें क्रियापद सकर्मक व अकर्मकहि आहे). **म्ह०** हगल्या पेक्षां निपटणें बरें. **हगंद(दा)री, हगदारी**–स्त्री. सार्वजनिक शौचाची जागा; परसाकडेची जागा. जेथें मल, विष्ठा, घाण पडते अशी जागा. [हगणें+दरी] **०मुती–मूत**–स्त्री. भीतीनें, तीव्र वेदनेनें मलमूत्र विसर्जनाची होणारी घाई; घास्तीनें मलमूत्र विसर्जन होणें. (क्रि० सुटणें; लागणें). **हगरड**–स्त्री. १ ढेंडाळी; हगवण. २ विष्ठा. घाण इ० ढीग. **हगरडा–रडें, हगिरडा–डें, हगुरडा–डें**–वि. १ शौचगृहून आल्यावर ढुंगण न धुतलेला. २ (ल.) अपुरा; अर्धवट राहिलेला; मध्येंच बंद पडलेला (काम, धंदा इ०). ३ बिघडलेलें; खराब झालेलें (काम इ०). ४ घाणेरडें; ओंगळ; किळसवाणें. ५ क्षुल्लक; निरुपयोगी; बिनकिंमतीचें. **हगरा**–वि. १ सदोदित हगणारा. २ (ल.) भित्रा; भ्याड. ३ (व्यापक) वाईट; ओंगळ; घाण; किळसवाणी (व्यक्ति, वस्तु, गोष्ट इ०). ४ क्षुद्र; गबाळ; निरुपयोगी; कुचकामाचा. **हगरीरें**–स्त्रीन. १ शौचासाठीं केलेली व्यवस्था; ठाकोली. २ शौचाची लांकडी घडवंची; गलबतावरील मलविसर्जनाची जागा. ३ या घडवंचीचें भोंक. ४ (गुऱ्हाळ) चुलाण्यांतील राख ज्या थारोळ्यांतून खालीं पडतें त्याचें भोंक. ५ (हगरी) शेतांत ठिकठिकाणीं ठेवलेल्या खताच्या राशी–प्रत्येकी. ६ शेतांत खत न्यावयाच्या गाडींत खत भरण्यासाठीं असलेल्या कुरकुलाचें मागील दार, झडप. **हगरें**–न. (अशिष्ट) १ सोरा; यवक्षार. २ टाईप पाडण्याचें यंत्र. **हगली मुतली, हगलेंमुतलें**–स्त्री.न. १ क्षुद्र; बारीकसारीक गोष्ट; लहानसहान चुका, अपराध, गैरवर्तन (दुसऱ्याजवळ गाऱ्हाणी केलेलें). २ एखाद्याच्या साध्या, स्वाभाविक, खासगी गोष्टी. (क्रि० सांगणें; कानावर घालणें; पाहणें). ' हा दिवाण चाकर लोकांचीं हगलींमुतलीं राजाच्या कानावर घालतो. ' ३ (लहान मुलाच्या) हगण्यानें भरलेले कपडे; गुवेलें. **हगवण**–स्त्री. अतिसार; वारंवार शौचास होणें. **म्ह०** फुकाची भाजी हगवणीस काळ. **हगवणकर–करी**–वि. हगवणीचा आजार असलेला. **हगवणें–विणें**–सक्रि. १ शौचास, परसाकडेस बसविणें (मूल इ०). २ (ल.) ओशाळणें; लाजविणें; गोंधळविणें; दांत पाडणें. ३ नाश करणें; नायनाट करणें; घाबरून सोडणें; रडकुंडीस आणणें; बिघडविणें (सल्ला, युक्ति, धाडसाचें काम). ४ बलात्कारानें काढणें; परत देण्यास भाग पाडणें (पैसा इ०). **हगाड**–स्त्री. हगंदरी पहा. **हगीरडामुतीरडा**–वि. हगरडा अर्थ १ पहा. **हगिरडें**–न. फुरसें (एक जातीचा साप). **हगीर**–वि. हगरा पहा. **हगीरमुतीर**–वि. (ल.) घाबरगुंडी झालेला; अतिशय गोंधळलेला; दुःख, भीति इ० मुळें देहभान सुटलेला; पांचावर धारण बसलेला. **हगुटणें**–अक्रि. १ परसाकडेस घाई होणें; परसाकडेस लागणें. २ हगणें; हगटणें पहा. ३ (ल.) गर्भगळित होणें. ४ घाबरगुंडी उडणें;' उगीच घाईत असणें. [हग+उठणें] **हगूट**–पु. परसाकडेची घाई. गुदद्वारावाटे नुकताच बाहेर पडलेला किंवा पडत असलेला मळ; विष्ठा. **हगूर**–वि. हुलका. **हगेरा, हगोला**–वि. गुवानें भरलेला, बरबटलेला (कपडा). **हगेरें, हगोलें**–न. गुवानें भरलेलें वस्त्र, दुपटें; गुवेलें. **हग्या, हगिया**–वि. १ शौचास बसलेला, निघालेला. २ शौचास नेण्याचा (तांब्या, जोडा इ०). ' दुराणी हगियांसी (जोडयांनीं) मारूं लागले. ' –भाब १४०. ३ हगावयास लावणारा. ४ (ल.) अतिशय जोराचा (मार इ०).

हंग—हंगे पहा.

हंगवणें, हंगून काढणें–केलेले उपकार वारंवार बोलून दाखविणें.

हंगाम—पु. मोसम; ऋतु; सुगी (पीक पाणी इ० ची); योग्य काळ (एखाद्या व्यवहाराचा); ऐन सराई (उद्योग–धंदा इ० ची). [फा. हंगाम्] **०शीर**–क्रिवि. हंगाम चालू असतां (विकणें, विकत घेणें इ०); –वि. ऋतु, समय याला योग्य; यथाकालोचित; वक्तशीर. ' या गांवावरी हंगामशीर प्रजन्य पडला नाहीं. ' –रा ६.१८५. **हंगामी**–वि. १ हंगामापुरता; तात्पुरता (चाकर, नोकर इ०). २ हंगामासंबंधीं; हंगामाच्या वेळचा; हंगामशीर.

हगामा—पु. कुस्त्यांची दंगल. [फा. हंगाम्]

हंगामा—पु. १ धुमाकूळ; गडबड; धिंगाणा; धुडगूस; धुमश्चक्री. ' जरीमरीनें यंदा फार गांवांत हंगामा केला. ' २ आरडाओरड करून केलेला हल्ला; गर्दी. ' त्यानें मजवर हंगामा करून मला पाडलें. ' ३ दंगा; बखेडा. ' नेतेसमयीं दोनचार माणसें जखमी जाली, हंगामा जाला होता. ' –रा १.२५. ४ (सामा.) नाश. [फा. हंगाम्]

हंगे–गें, हंगये—क्रिवि. १ इकडे; या दिशेनें; इकडून. २ आतां. [ध्व. हं.] **०तंगें**–न. उडवाउडवीचें भाषण; टंगळमंगळ; टाळाटाळ. (क्रि० करणें; लावणें; चालविणें; म्हणणें). –क्रिवि. विसंगतपणें; कांहीं तरी बोलून; टोलवाटोलवी करून; टाळाटाळीनें. (क्रि० म्हणणें; बोलणें; करणें). [हंगे द्वि.] **०तंगें म्हणतां–हां हां म्हणतां**; एकदम.

हगोनगी—स्त्री. ऐक्य; एगानगत; येगानगत.

हंचत्वंच, हंचात्वंचा—नस्त्री. मी तूं; अरे तुरे; एकेरीवर येणें; हमरीतुमरी करणें. [सं. अहम्+च+त्वम्+च]

हजबी—स्त्री. जनावराच्या पाठीवरून पैसे नेण्यासाठीं केलेली, मध्यें तोंड असलेली लांब पडशीसारखी दुहेरी पिशवी; पडशी; हसबी पहा.

हजर, हजरजबाब, हजरजामीन, हजरनीस, हजरबिगार, हजराहजरी—हाजीर; हाजीरजबाब इ० पहा.

हजरजावंद—क्रिवि. हुकूमांत; आज्ञेंत.

हजाम—पु न्हावी; नापित. [अर. हज्जाम्] **हजामत**—स्त्री. १ हजामाचें काम; श्मश्रू; (डोक्यावरील व चेहेऱ्यावरील) केंस काढण्याची क्रिया. २ (ल.) ताशेरा; खरडपट्टी; बोडंती; चांगल्या शिव्या देऊन केलेली कानउघाडणी. ३ लुटणें; लुबाडणें; नागवणूक (क्रि० करणें).

हजार—वि. १००० संख्या; सहस्र; दहा शंभर. 'तोफ हजारो हजार सुटली।' –प्रला ५२. [फा. हझार्] **म्ह०** हजार वळसे आणि एक गांठ. **०पांचशें पाऊस पडणें**–थोडासा पाऊस पडणें; शिंतोडे येणें.

हजारा—पु. (सोंगटया) तीन फाश्यांनीं नऊ किंवा सात हें (छतीन नऊ, पाचचार नऊ किंवा पांचदोन सात) पडलेलें दान. [फा.] **हजारा**–स्त्री. अनेक धारा पडणारें कारंजें. **हजारी**–स्त्री. १ पुष्कळ छिद्रें असलेलें नळाचें, कारंजाचें तोंड. २ हजार सैनिक बाळगण्याची मन्सबी. –वि. हजारासंबंधी; [फा. हजार्] **हजारी कारंजें**–न. पुष्कळ धारा उडतात असें कारंजें; हजारा. **हजारी घर**–न. एका विशिष्ट तऱ्हेनें बांधलेलें घर. **हजारी पान**–न. जनीचें पान पहा. **हजारी माड**–पु. हजार नारळांचें उत्पन्न देणारें माडाचें झाड. **हजारी मोगरा**–पु. अनेक फुलांचा गुच्छ येणारें एक फूल झाड. **हजारों, हजारोंहजार**–वि. असंख्य; हजारानें मोजतां येणारें.

हजिबा, हजिम्मा, हजिमा—पु. १ तुंबळ, अतोनात गर्दी; दाटी; झिंमड; खेंचाखेंच. २ अतिरेक; अमर्यादपणा; पराकाष्ठा (चैन, रंगतमाशा, भांडण, युद्ध, वैर, पाऊस, पीक, जिन्नस, सामुग्री इ० ची). (क्रि० माजणें; जमणें; होणें). ३ फजीती; टर; धुव्वा. (क्रि० होणें, उडणें). 'पुढें डौल कसा होतो पहावें, परंतु हजिमा आहे.' –ख ९.४८.७४. [अर. हझीमा]

हजिरी, हजिरीखर्डा–पट–पत्रक–बंद–याद हजीर, हजीरजबाब–जबाबी, जामीन–नीस–बिगार–बिगारी–मजालस, हजेरी—हाजिरी; हाजीर इ० पहा.

हंजी—अ. हांजी पहा.

हजूर हशम—पु. खास राजाचे शरीर संरक्षक शिपाई.

हज्जत–ती—पुस्त्री. स्वामी; महाराज; धनी (राजा, पैगंबर, अगर इमामादि श्रेष्ठ आणि वंद्य पुरुष यांस लावतात). [अर. हझ्रत्]

हट–ट्ट—पु. १ हेका; दुराग्रह; खणपट. २ मत्सर; चुरस; आकस. ३ (सामा.) आग्रह. [सं. हठ] **०जिरणें**–हट्टीपणा जाणें; समजूत होणें, पडणें; (एखाद्या गोष्टीस) वळणें. **हटा(ट्टा)स पेटणें**–हट्ट करून बसणें; जिद्दीस येणें; अटीस पेटणें. **हटणें**–अक्रि. हट्टी बनणें; हट्ट करणें; न ऐकणें. 'कालपासून पोर हटला.' **०कोर–खोर**–वि. हट्टी; हेकाड; हेकेखोर; न जुमानणारा. **०तट**–पु. १ अतिशय हट्टीपणा; हेका; आपलें खरें करण्यासाठीं भांडण, धडपड. 'हटातटानें पटा रंगवुनि जटा घरिशीं कां शिरीं। मठाची उठाठेव कां तरी.' –राला २ चिकाटी; अत्याग्रह. **हटातटाचा, हटातटानें, हटातटीं**–असे प्रयोग रूढ आहेत. **०तटीं**–क्रिवि. तडकाफडकीं. –शर. **०निग्रह**–पु. अत्यंत चिकाटी; आग्रह; हेका. **०वाद**–पु. अतिशय हट्ट; हेकेखोरपणा. (क्रि० करणें; घेणें; धरणें). **०वादी**–पु. अत्यंत हेकेखोर; हट्टी. **हटा(ठा)त्**–क्रिवि. जबरीनें; जुलमानें; बळेंच. [सं.] **हटिया**–वि. १ हट्टी. २ हट्टयोगी. 'म्हणोनि हटियातें जिणिजे। इहींचि जगीं।' –ज्ञा ३.२६६. **हट्टी**–वि. हट्टी पहा. **हट्टु**–वि. १ हट्टी; आग्रही. २ (महानु.) न हटणारा. 'तया शौर्यसीं तट्टु। बळेंसीं हट्टु।' –भाए १५८. **हट्टूनतट्टून**–क्रिवि. १ हट्टानें. २ चिकाटीनें; निश्चयानें. **हट्टेंच**–वि. १ हट्टानें बळेंच; कोणाचें न ऐकतां. 'नको जाऊं म्हणत असतां हटेंच गेला.' २ हटात् पहा. **हट्टेंतट्टें**–क्रिवि. १ हटकून. २ जबरीनें. **हट्टेला**–वि. हट्टी; दुराग्रही. **हट्टी, हट्टीबाज–खोर**–वि. हटेला; हेकेखोर; दुराग्रही.

हट–ट्ट—पु. बाजार; मंडई; विशेषतः फिरता बाजार, जत्रा. [सं. हट्ट] **म्ह०** १ हटीं जेवण मटीं निद्रा. (स्वैर, चार दाखविण्यासाठीं योजतात). २ हट गोड आहे परंतु हात गोड नाहीं. (बाजारी माल चांगला आहे पण तयार करणारा चांगला नाहीं). **हटास ओघळ जाणें**–रेलचेल, समृद्धि असणें. **०करीकरीण**–पु. स्त्री. १ बाजारकरी; बाजारकरीण. २ बाजारांत विक्री करणारा माणूस, स्त्री; दुकानदार. **०कारी**–पु. हटकरी पहा. 'राम्याराम्या लांब दोरी, हटकोऱ्याच्या भाकऱ्या चोरी.' **०बाजार**–पु. बाजारहाट. 'कुटुंबवत्सळ खर्च पदरीं। म्हणवूनि घावे हटबाजारीं।' **०वट**–स्त्री. फळें; भाजीपाला विकण्याची जागा; भाजीबाजार. **०विलासिनी**–स्त्री. वेश्या; बाजारबसवी. [सं.] **हटाऊ**–वि. १ बाजारासंबंधी; बाजारी. २ हलका; क्षुद्र; नीच. **म्ह०** हटाऊ गुरु आणि शिटाऊ–पटाऊ–भेटाऊ चेला.

हटक—स्त्री. १ हांक मारणें; बोलावणें. २ (रस्त्यांत) अडथळा, खोळंबा करणें. (क्रि० लागणें; लावणें). **हटकण–णी**–

स्त्री. १ हांक; हटक; ओरड; आव्हान. (क्रि० करणें; लावणें). २ चौकशी; विचारपूस. (क्रि० लावणें; लागणें). **हटकणें**–उक्रि. १ हांका मारणें; बोलावणें. 'तें तुज विदित असो गे जो तो कामी गळां पडे हटकी।'–मोसभा ६ २०. २ आव्हान देणें. ३ चौकशी करणें; विचारणें. ४ विरोध करणें; अनादरणें. ५ आमंत्रण देणें. ६ संबोधणें; उद्देशून बोलणें. ७ थांबविणें. [हिं. हटकना] **हटकाहटक**–स्त्री. १ परस्परांस हांका मारणें. २ एकमेकांची चौकशी, विचारपूस करणें. [हटक द्वि.]

हटकून, हटीं—क्रिवि. १ न चुकतां; बरोबर; कांहीं झालें तरी; खचित; निःसंशय. २ निश्चयानें; कशास न जुमानतां. ३ मुद्दाम; मनस्वीपणें.

हटणें—उक्रि. चमचा, पळी इ० नें शिजलेली डाळ इ० चेपणें, घाटणें. अहाटणें पहा.

हटणें—अक्रि. माघार घेणें; परतणें; मागें जाणें–येणें; पराभव पावणें. [हिं हटना] **हटविणें**–सक्रि. मागें सारणें; ढकलणें; परतविणें; पळवून लावणें; पराभव करणें.

हटहट, हटहटणें— हडहड, हडहडणें पहा.

हटूटी—स्त्री. १ लहान बाजार; जत्रा. २ एकाच जातीच्या किंवा धंद्यांतल्या माणसांच्या घरांचा समुदाय. उद० बुरुड–सुतार–गवळी–भंगी–मांग–हटी. ३ गांवापासून थोडक्या अंतरावर असलेलीं भिल्ल, रामोशी इ० चीं घरें, वस्ती. 'भिल्लांची–रामोशांची–कातकऱ्यांची हटी.' ४ भिल्ल, रामोशी इ० लोकांचा मोठा अड्डा, बालेकिल्ला. ५ असल्या लोकांचा जमाव, टोळी, कंपू. [सं. हट्ट]

हठ—पु. हट्ट, दुराग्रह. हट-ट्ट पहा. [सं.] **०योग**–पु. १ प्राणवायूचा निरोध करून त्याच्या द्वारें चित्तवृत्तीची एकाग्रता करण्याचा योगांतील एक प्रकार. २ सतत एका पायावर उभे राहणें, अधोमुख होऊन धूम्रपान करणें, हात वर करून उभें राहणें इ० प्रकारचें घोर तप. याच्या उलट राजयोग.

हठकविता—स्त्री. ओढून ताणून, वशी तरी रचलेली कविता. याच्या उलट प्रासादिक कविता.

हड—उद्गा. कुत्रा हाकलतांना, बैलाला पळवितांना उच्चारावयाचा शब्द. [ध्व] **०हड**–अ. गाय, कावळा, कुत्रा वगैरेस हाकारण्याचा शब्द. –स्त्री. १ धुडकावणी; झिडकारणी; तुच्छतेचे शब्द. 'भिकारी पेडलों आतां लोकांची हडहड सोसण प्राप्तच आहे.' २ (भिकारी वगैरेंचें) कंटाळवाणें भटकणें; दगदग; लोकांकडून नेहमीं हकालपट्टी होणें (क्रि०करणें) 'पोटासाठीं मला ही हडहड करावी लागते.' 'आतां म्हातारपण झालें ही हडहड सोसवत नहीं.' ३ दुःखकारक अस्वस्थता, अशांतता. **हडाविणें, बडाविणें**–उक्रि. धुडकावणें; हिडीसफिडीस करणें; घालवून देणें; धिक्कार करणें; झिडकारणें.

हड—स्त्री. तळीं, डबकीं, खंदक इ० तून उगवणारें जाड, लांब गवत, लव्हाळें.

हड—पु. (दक्षिण महाराष्ट्र) पाणमांजर.

हड—पु. हाड; अस्थि; (प्र.) हाड पहा **हडकी**–स्त्री. १ लहान हाड. २ महारांना गांवांतील मेलेल्या जनावरांचीं हाडें, चामडीं इ० ठेवण्यासाठीं दिलेली बिगरसारा जमीन. **हडकी, हडोळा**–पु. (व्यापक.) महाराची इनामी जमीन. हाडकी व हाडोळा पहा. **हडकुळा, हडक्या**–वि. १ अतिशय रोड; हाडें निघालेला. २ (ल.) गर नसलेलें (फळ). **हडक्या ऊंस**–पु. रस थोडा पण गोड, जाड सालीचा कळक्या ऊंस. **हडवळा**–हडोळा पहा. **हडवैर**–न. फार दिवसांपासून चालत आलेलें भयंकर शत्रुत्व; हाडवैर. **हडस**–वि. १ मजबूत हाडांचा, बांध्याचा. २ निरोगी; निकोप प्रकृतीचा; रूणखणीत (म्हातारा माणूस). ३ (चुकीनें) अडस; हेकाड; हेकेखोर.

हडकणें—उक्रि. (मागावरील कापड, चटई, वेणी इ०) घट्ट आणि अटस होण्यासाठीं हातानें किंवा कांहीं साधनानें झटकणें; ठोकणें; आवळणें.

हडकणें, हडंगणें, हडणें—अक्रि. १ वाळणें; कडकडीत होणें (ओलें कापड इ०) सुकणें. २ रोडावणें.

हडकता—वि. (चुकीनें) १ अटकाव, प्रतिबंध करणारा. २ हटकता–विचारणारा; अडकता. 'हडकती सासू ना धडकता भावा.'

हडगरी—वि. हडगर गांवासंबंधीं कापड इ०.

हडगा, हंडगा—वि. १ बायकांत वावरणारा; बायल्या; वायक्या; रांडयाराघोबा. २ हिडगा पहा.

हडगा—पु (कु.)तांबडी कुर्ली.

हडगी—स्त्री. मोठी टोपली.

हडद–दा–दें—स्त्री.पु.न. १ (ल.) गुंता; पायखोडा; बेडी (कुटुंब, नौकरी, धंदा, काम इ० ची) (क्रि० वसणें; येणें; करणें; निवारणें; टाळणें; चुकविणें). २ बैदा; त्रास; कष्ट; खस्ता (लहान मुलें, आजारी माणसें, फार पाहुणे, मोठे समारंभ, मेजवान्या इ० प्रसंगीची). (क्रि० वाढणें; सोसणें; भोगणें; पुरवणें; करणें; निघणें; पुरणें, पडणें, होणें) 'पाहुण्यांचा हडदा भारी पडला पण काढावा लागतो.' 'लग्नाचा हडदा पार केला.' 'घोड्याची हडद मीच काढतो.'

हडप—न. १ जामीन; ओल; तारण; गहाण (यावयाच्या पैशासाठीं). २ नोकरी बजावल्याचा दाखला म्हणून ठेवलेला जिन्नस. ३ आरोपी किंवा एखादा माणूस वेळेवर हजर ठेवण्यासाठीं यावयाचा जामीन; जामीनकीचीरकम.

हडप—न. १ पानदान; पानपुडा. 'हडप मी वोळगेन।' –ज्ञा १३.४१९. [का. हडप; देप्रा. हडप्प=तांबूलपात्र] २ (गो.) न्हाव्याची धोकटी. **हडपा**–पु. मोठी पेटी; मांदूस; संदूक. [का. हडप] **हडपी, हडपु, हडपेकरी**–पु. राजे, मोठे लोक इ०च्या जवळ असलेला, लागेल तेव्हां विडा देणारा नोकर; तांबूलकरंडकवाही. स्त्रीलिंगी-हडपिणी. 'जाइलीं सुनी देखे आंधरीं। तरि म्हणे हडपु कवणाचा।' –भाए ३८४. 'हडपी देती विडिये करूनी।' –ह १४.११. 'सवें सखी हडपिणी। सैरंध्री सूत्रधारी।' –कालिका ३०.३७. [का. हडपिग]

हडप—पु गहाळ; गुप्त; नाहींसा; गिळंकृत. 'कांहीं केंद्रांतून खादी चोरीस गेल्याचे किंवा हडप झाल्याचे रिपोर्ट आले होते.' –विविधवृत्त २७-८-३७. पृ. २८. [गडप? हजम?]

हडपता—वि. अडपता पहा.

हडपा—पु. पंखा; झडपा पहा. **हडपणें**–अक्रि. वारा घालणें; झडपणें पहा.

हडपा—पु. १ जिन्याच्या तोंडावरचें दार, झांकण. २ झडपे असलेलें भिंतींतील फडताळ. ३ (कों.) धान्य वगैरे ठेवण्याची मोठी पेटी. [का. हडप]

हडबड—स्त्री. गडबड; गोंधळ (दंगा, धांदल इ० मुळें) 'एक म्हणती धरा धरा। हडबड झाली वीरा।' [हिं.] **हडबडणें**–अक्रि. १ गोंधळून जाणें; गडबडणें; खडबुडणें. 'हडबडोनि उठे नंद राणी।' –ह ११ २०१. २ अकांडतांडव करणें; बेचैन होणें (लहान मुलानें). [हिं. हडबडना] **हडबडाट**–पु. अतिशय गोंधळ; गर्दी; घाई; धांदल.

हडबडीत—वि. (प्रां.) खडबडीत; ओबडधोबड.

हँडबिल—न. हस्तपत्रक; लहान जाहिरात. [इं.]

हंडरीमडकीं—नअव. (सामा.) हंडीमडकीं पहा.

हडबंग—पु. (राजा. चों.) क्रोधयुक्त स्पर्धा; मत्सरपूर्वक भांडण. **हडबंगणें-बांगणें**–अक्रि. खराब, अशक्त, क्षीण होणें; हडकणें. **हडबंगी**-वि. हट्टी; हेकेखोर. 'त्या हडबंग्याची समजूत कोणी करावी?'

हडविणें—उक्रि. खालून जोर लावून वांकविणें; खालीं करणें (झाडाची फांदी, मान इ०).

हडसण—स्त्री. एक औषधी वनस्पति.

हडसणें—सक्रि. १ हिसकणें; झटकन ओढणें; झटका मारणें; एकदम जोरानें ओढणें. २ आवळून, खेंचून बांधण्यासाठीं जोरानें ओढणें. (क्रि० बांधणें). हडसून बांधणें असाहि प्रयोग रूढ आहे ३ खेंचणें; ठासणें; आपटणें; जमीनीवर आदळणें; ठोकून दाट बसविणें (मागावरील कापड, चटई, साखरेनें वगैरे भरलेलें पोतें इ०). ४ (कों.) गिऱ्हाइकाला देण्यापूर्वी लाभ वरकत येण्या अशा बुद्धीनें कापड इ० माल जमीनीवर, फळीवर, पेटीवर आपटणें (कापडवाल्यांत हा प्रघात विशेष आहे). ५ निक्षून, बजावून सांगणें, बोलणें. [सं. हट] **हडसणी**–स्त्री. १ हडसण्याची क्रिया; झटका; हिसडा. २ ढकलणी; घोळणी. **हडसणी**–स्त्री. मागावरील कापड ठासण्यासाठीं असणारी एक फळी; फणी. **हडसूनखडसून**–क्रिवि. १ हडसण्याची क्रिया करून; झटकून; हिसडून; जोरानें ओढून. २ ठोकूनठाकून; हालवून. ३ निक्षून; बजावून. 'हडसून खडसून हें सनंग दिलें.' ४ उघडपणें; राजरोस; बिनदिक्कत. 'हडसूनखडसून दरवडा घातला.' ५ रोकठोक; स्पष्टपणें; धडधडीत; तोंडावर; निर्भिडपणानें. 'हडसून खडसून जबाब दिला.' ६ सरळपणानें; उघडपणें; हमखास; मनावर बिंबेल अशा रीतीनें.

हडसणें—उक्रि. हडपणें. झडपणें पहा. **हडसणी**–स्त्री. झडपणी.

हडहडणें—अक्रि. १ सुकणें; वाळणें (ओली जमीन, कापड). २ कृश होणें; रोडावणें. हडकणें पहा. **हडहडीत**–वि. रोडावलेला; कृश.

हडळ-ळी—स्त्री. १ एक स्त्री पिशाच; जखीण पहा. २ (ल.) वाईट, दुष्ट स्त्री.

हंडा—पु. १ मोठ्या तोंडाचें पाणी वगैरे सांठविण्याचें भांडें. २ गर्भसुती व १२ हात लांबीची साडी. [सं. हंड; हिं.] **०पळी**–स्त्री. (ल.) वरणभात; नवऱ्यापेक्षां दिसण्यांत मोठी नवरी असलेलें जोडपें.

हडि—उद्गा. कुत्र्यास हाकलण्याचा शब्द. हड पहा.

हडी—स्त्री. (कु.) चर; चुलाण.

हंडी—स्त्री. १ लहान हंडा किंवा मडकें. 'कां पाषाणाचिया माथां। हांडी फुटली पार्था।' –ज्ञा १६.३६८. (समासांत) दह्यांडी; उकडहंडी. २ मोठ्या पेल्याच्या आकाराचा एक कांचेचा टांगावयाचा दिवा. [सं. हंड] **हंडीशीं हंडी फुटणें**–अत्यंत खेचाखेच, गर्दी होणें. **०मडकीं**–न.अव. (व्यापकपणें) स्वयंपाक इ० चीं भांडींकुंडीं.

हंडीवाग—पु. १ गारुडी, नजरबंद इ० लोकांचा हस्तक, पोऱ्या. २ (ल.) चलाख, प्रौढबुद्धी, चाणाक्ष पोरगा. ३ नेहमीं स्वयंपाकघरांत खाण्यासाठीं घुटमळणारें मूल. ४ अन्न मिळविण्याच्या कामीं खटपट न करतां नेहमीं खाण्याकडे मात्र लक्ष ठेवणारा माणूस; आळशी परान्नपुष्ट व्यक्ति. [हिं.]

हडुं(डों)ग—नपु. १ अडथळा; मोडा; विघ्न. (क्रि०घालणें; पडणें). २ अडचणीची स्थिति; व्यत्यय. (क्रि० करणें; होणें).

हडूक—न. १ लहान हाड. २ (अल्पर्थी) हाडूक. [हाड]

हुडे—क्रिवि. (कु.) इकडे.

हंडें—न. १ लहान-मोठें स्वयंपाकाचें भांडें. २ (हेटाळणीच्या अर्थानें) हंडी. [हंडा] **०भांडें-मडकें**-न. हंडीमडकीं पहा. **०साडी**-स्त्री. हंडा अर्थ २ पहा. **हंडोल-हंडूल**-न. १ लहान हंडा. २ (तिरस्कारार्थी) हंडें; हंडी.

हडोल-ळी—स्त्री. हडळ पहा.

हडोळा-ळी—पुस्त्री. हडकी; हाडोळा पहा.

हडौती—स्त्री. गळ्याखालील हाडांचा खळगा. 'मग कंठनाळ आटे। हनुवटी हे हडौंती दाटे।' –ज्ञा ६.२०७. [हाड+वाटी?]

हड्डी—स्त्री. हाड. [देप्रा. हड्ड; म. हाड] **०नरम करणें**-चांगलें, बेदम मारणें. –नारुकु ३.६२.

हड्डें—न. (गो.) छाती; स्तन. **हड्डयांत कलकलणें**-(गो.) छाती धडधडणें.

हडया—पु. १ कुत्रा, कावळा इ० पशु; हडकें खाणारा, चघळणारा. –उद्गा. कुत्रा पक्षी वगैरे हांकलण्याचा शब्द. हड पहा. [ध्व.]

हडया—पु. (व.) बैलगाडी खालीं टेकण्याचा धुरीला जोडलेला खुंटा.

हडयावर्ण—पु. अस्थिगत व्रण. हाडयावर्ण पहा.

हण—पु. हूण लोक व त्यांचा देश. [सं. हूण]

हणगें—न. (कों.) हिणगें; एक प्रकारची कळकाची टोपली.

हणगोबा—पु. १ हनुमान. २ मूर्ख, अडाणी, सुस्त माणूस. ३ (निंदार्थी) दुसऱ्याच्या तंत्रानें वागणारें बाहूलें; शेंदूर फासलेला दगड. [सं. हनुमान्] **०करणें**-१ स्वतःच्या अकलेनें ज्यास काम करतां येत नाहीं त्यास तें करावयास उद्युक्त करणें; घोडयावर बसविणें. २ परदेशीं गेलेला मनुष्य परत येईल कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं त्याची शेणाची प्रतिमा करणें. **मारून मुटकून (कुटून) हणगोबा करणें**-बळेनें एखाद्याकडून विशिष्ट काम करून घेणें

हणणें—उक्रि. १ हाणणें; मारणें; तडाखा देणें. २ छाटणें; तोडणें; काटणें. ३ ठार मारणें. [सं. हन; प्रा. हण] **हणविणें**-उक्रि. १ हणणें पहा. २ मारविणें; हणणें प्रयोजक.

हणभर—वि. (गो.) दणकट (माणूस).

हणम—वि. १ (प्रा.) मोठया व उभ्या शिंगांचें (जनावर). २ (ल.) मोठया शरीराचा; थोराड; धिप्पाड (माणूस, पशु).

हण(णु)मं(वं)त—पु. हनुमान; मारुती. [सं. हनुमान; प्रा. हणुमंत-वंत] **०भोंवरा**-पु. एक फूलझाड व त्याचें फूल. **हणमंताचें शेंपूट**-न. लांबलचक गोष्ट; त्रासदायक काम; मारुतीचें शेंपूट.

हणवटली, हणवटी, हणू, हणवी—स्त्री. हनुवटी; हनु. [सं. हनु]

हणा—स्त्री. घोडयाच्या जिनाची सोंड. [हिं. हणा; का. हणे=बुंधाचा वरचा भाग]

हणेफणे—पु. (बे.) हुतूतूचा खेळ.

हत्—उद्गा. पशू इ० हांकलून लावतांना, मनुष्यास रागानें झिडकारतांना उच्चारावयाचा शब्द. [ध्व.]

हत—वि. १ तडाखा लागलेला; ठोकलेला. २ ठार मारलेला. ३ (ल.) नाश पावलेला; लोपलेला; खुरटलेला इ० अर्थानें समासांत उपयोग. उदा० हत-ज्ञान-पराक्रम-दैव-श्री इ०. [सं. हन्-मारणें] **०दैव-भाग्य**-वि. कमनशिबी; हीनभाग्य; दुर्दैवी. **०लज्ज**-वि निर्लज्ज; विनयहीन. **०वीर्य**-वि. दुबळ; नामर्द; ताकद नसलेला; सत्त्व-गुण-जोम-महत्त्व-सामर्थ्य नाहींसें झालेला (मनुष्य, प्राणी, औषध, वनस्पति इ०). **०श्री**-वि. संपत्ति, भरभराट, वैभव नष्ट झालेला; कंगाल; गरीबी आलेला. **०ज्ञान**-वि. बुद्धि, समज नष्ट झालेला. **हताश**-वि. निराश; आशानष्ट; दुर्बळ. [हत+आशा]

हत-करवत-खंड-खवणी-नळा-पाणी, हता-निराळा-वेंगळा, हतोटी, हतोफळी—हात शब्दामध्यें पहा.

हत(द)गा—पु. भोंडल्याप्रमाणें पावसाळयाच्या आरंभीं (हस्त नक्षत्राच्या वेळीं) मुली एक खेळ खेळतात तो. [सं. हस्त; प्रा. हत्थ]

हत(द)गा—पु. अगस्ता; एक फूलझाड, याच्या फुलांची भाजी होते.

हततुक—स्त्री. अटकळ. –शर

हतरकी—स्त्री. (कों.) जमीन भाजण्याचे टहाळे वगैरे. [हांतरणें]

हंतरणें, हंतरी, हंतरूण—अंथरणें, अंथरी इ० पहा.

हतरूं, हतरूड—न. (तिरस्कारार्थी) हत्ती.

हतवटी—स्त्री. हातवटी पहा. 'शंखासुर मर्दिला समुद्र मंथिला धन्य तुझ्या हतवटी।' –पला १.२१.?

ह(हा)तवसणें—सक्रि. हस्तगत करणें. 'एवं प्रपंचाचें जें स्फुरण। तें स्वप्रकाश ब्रह्मपूर्ण। तें हातवसूनि ब्रह्मज्ञान। विकल्पच्छेदन हरि करी।' –एभा २८.२९९. [हात]

हतवा—पु. हत्ता; केशर-कुंकु इ० नें भरलेल्या हातानें भिंतीवर उठविलेलें हातानें चिन्ह. (क्रि० देणें). [हात]

हंता—वि. १ तडाखा, ठोसा मारणारा. २ ठार करणारा. [सं.]

हतासन—न. (प्रा.) निमित्त; मिष. –शर

हतियार-येर, हतेर—हत्यार पहा. 'आपण हात आपण हतियार।' –ज्ञा ११.२१४.

हतोडा—पु. घण; ठोकण्याचें साधन. [हिं.] **हतोडी**–स्त्री. लहान हतोडा. [सं. हस्त+ताड; प्रा. हत्थाड]

हत्ता—पु. १ तालमींत दंड काढावयाच्या वेळीं हात टेंकण्याकरितां केलेले दगडाचे, विटेचे, लाकडाचे, मातीचे ठोकळे किंवा ओटे. २ चेंडू, कवडया इ० खेळतांना जेथून खेळावयाचें ती जागा, मर्यादा. ३ हस्तचिन्ह; हतवा पहा. (क्रि० देणें). [हात] **केवडयाचा हत्ता**=केवडयाचें अपुरें उमललेलें कणीस.

हत्ती—पु. १ सोंड असलेलें एक प्रचंड जनावर; गज; कुंजर; वारण. २ नक्षत्रमालेंतील १३ वें नक्षत्र; हस्त. **म्ह० पडेल हत्ती तर पाडील भिंती. ३** (जरतार) तूर ज्यांत फिरते तो खांब. ४ बुद्धिबळांतील एक मोहरें. [सं. हस्तिन्; प्रा. हत्थि] **म्ह० १ हत्तीला अंकुश केवढा असतो!** (मोठयाला लहानहि भारी होतो). २ हत्ती गेला व शेंपटार्शी अडकला–एखादें प्रचंड काम अखेरपर्यंत सुरळीत होऊन शेवटीं मात्र नासणें. ३ हत्ती चालतो आणि कुत्रे भोंकतात–श्रेष्ठांचा मत्सर करणारे लोक असतात पण त्यांचें कांहीं चालत नाहीं. ४ हत्तीबरोबर बैलाचें वारगोळें. **०दारांत झुलणें**–अत्यंत श्रीमंती असणें. (वाप्र.) **हत्तीचा अंकुश**–पु. (ल.) चोपून काम करून घेणारा. **हत्तीचा पाय**–पु. १ (ल.) ज्याच्या औदार्यानें, श्रीमंतीनें पुष्कळ लोकांचा संसार सुखानें चालतो अशी व्यक्ती, काम, धंदा, नोकरी, इस्टेट इ०. २ एक खेळ. **०दांत**–पुन. हत्तीचा दांत; हस्तीदंत. **०दांती**–वि. हस्तिदंती (काम, वस्तु इ०). **०पाव**–न. पांढरें रेशीम. **०बार**–पु. हस्तनक्षत्राच्या पावसानें येणारें पीक. दुसरीं दोन पीकें–मृगबार, आंबेबार. **०भोग**–पु एक प्रकारचा जाड तांदूळ. **०महाल**–पु. हत्तीखाना. **०सोंड**–पु. एक मुलांचा खेळ. **हत्तीण**–स्त्री. हत्तीची मादी. **हत्तीचें उथाण**–न. हस्तनक्षत्राच्या वेळचा अतिशय उकाडा. **हत्तींच्या आहारांत लाखो मुंग्यांचा आहार चालणें**–थोरांच्या खर्चांत अनेक गरीबांचा आपोआप समावेश होणें. **हत्तीच्या गंडस्थळीं बसणें**–थोर वैभवास चढणें. **हत्तीच्या दांतासारखे दांत असणें**–दुटप्पी वर्तन असणें. (हत्तीचे खायचे दांत व दाखवावयाचे दांत निराळे असतात यावरून). **हत्तीच्या पायांत–पावलांत–सगळयांचे पाय–पावलें**–मुख्य व्यक्तींत हाताखालील सर्व व्यक्तींचा समावेश आपोआप होतो. **हत्तीवर बसणें**–मदांध होणें; दारूनें मत्त होणें. **हत्तीशीं टक्कर घेऊं नये**–बलिष्ठाशीं वैर करूं नये. **हत्तीस ओंढाळ कोण म्हणेल?** –थोरांचें बिंग बाहेर कोण फोडील? **हत्तीसारखें धतन**–अलोट संपत्ति; वैभव. **हत्ती होऊन लांकडें खाणें, मुंगी होऊन साखर खाणें**–मोठे (गर्विष्ठ) पणानें आपदा येतात तर नम्रतेनें सुख लाभतें. **हत्तीचें मढें–प्रेत**–१ अवाढव्य, बोजड, न पेलणारें प्रकरण, काम. २ फार कंटाळवाणें, त्रासदायक काम. (क्रि० पुरणें; उचलणें). 'मला हत्तीचें मढें पुरावयाचें आहे.' **हत्तीच्या पायानें जाणें**–फार सावकाश जाणें (रोग, इ०) **०खाना**–पु. हत्ती ठेवण्याची जागा; पीलखाना.

हत्या-त्या—स्त्री. १ हिंसा; खून; वध; एक फौजदारी गुन्हा. उदा० आत्महत्या. २ (निंदार्थी) मरतुकडा, रोगट, अशक्त माणूस किंवा पशु. [सं.] **हत्यारा**–वि. हत्या करणारा; खुनी. उदा० बाळ-ब्रह्म-गो-पितृ-गुरु-हत्यारा. 'दशरथ पातकी ब्रह्महत्यारासी। नवल त्याचे कुशीं जन्म तुझा।' –तुगा ९४८. [सं. हत्याकार]

हत्या, हत्त्या—पु. १ (विणकाम) हात्या; मागाच्या फणीचा दांडा; हात. २ उभे दोरे जींत ओवलें आहेत अशी फणी बसविलेली लांकडी चौकट ३ रहाटाच्या चाकाचा दांडा. ४ हत्ता पहा. [हात] **०दांडी**–स्त्री. वरील फणीची चौकट; महादेव पावेती.

हत्याण—न. गाढवी, घोडी इ० स्त्री जनावर माजावर येणें, त्यास संभोगेच्छा होणें. **०करणें-हत्याणास येणें**–माजास येणें.

हत्यार—न. १ शस्त्र; आयुध. २ अवजार; साधन; उपकरण (धंदा चें, कामाचें). [सं. हन्–मारणें. दे. प्रा. हत्थियार हिं. हथियार] **०बंद, हत्यारी**–पु. सशस्त्र शिपाई; लष्करी माणूस. –वि. शस्त्रधारी; सशस्त्र.

हत्तूं—न. (तिरस्कारार्थी) हतरूं; हत्ती.

हद्द, हद्दनामा—हद्द, हद्दनामा पहा.

हद्दगा—पु. हतगा पहा.

हद्दन—न. परिमाण; प्रमाण. –स्त्री. १ (कों.) योग्य रीत, क्रिया (एखादी गोष्ट करण्याची). २ (गो.) योग्य वेळ. [का.]

हदरणें—अक्रि. १ हालणें; कंप पावणें; थरथरणें; लटपटणें. २ धक्यामुळें, भीतीमुळें क्षुब्ध होणें; मनास धक्का बसणें. ३ –उक्रि. धक्का देणें; गदगदां हालविणें. [ध्व.] **हदरा**–पु. धसका; धक्का; गदांगदां हलणें.

हदहदणें—अ. हदरणें पहा.

हंदा—पु. (उ. कों.) शेतमजुरीचे कामांत शेतकऱ्यांनीं परस्परास करावयाची मदत; इरजीक.

हदाल-ळ—वि. थोराड; प्रचंड; मोठा; स्थूल (जनावर, वस्तु). [हद्दा; तुल० का. हदुल] **०पार्वती-पारोती**–स्त्री. अतिशय स्थूल, फोपशी बाई; फातिमा.

हदालीफुदाली-ळी—स्त्री. पुदडा, पुदाडा पहा. (क्रि० काढणें; घालणें; पाडणें; करणें). [पुदाली द्वि.]

हदी—पु. वाटाडया. 'आपणांपासीहि हे स्थलाचे हदी ज्याणी स्थल पाहिले असेल ते विदीत करतीलच.' -पेद ३. १८३. [अर. हादी]

हदीस—स्त्री. पैगंबराचें वाक्य. -वाड २३. [अर. हदीस्]

हंदु(द)ळणें, हंदुळहिंदुळ, हंदळहिंदळ—हांदुळणें इ० पहा.

हदेरा—वि. घाणेरडा; ओंगळ; हगरा. [सं. हद=विष्ठा]

हंदोळविंदोळ—स्त्री. चळवळ. -शर. -वि. चळवळया. [हांदुळणें द्वि.]

हद्द—स्त्री. १ मर्यादा; बांध; कांठ; कड. २ शेवट; पराकाष्ठा; तड; अतिरिक्तता. 'आतां हद्द झाली.' -सभासद ६६; -वाडसनदा १७३. [अर.] **०नामा**-पु. १ गांवशिवेचें टांचण; शेतसीमांची नोंदवही. २ इनाम किंवा वहित शेतांचें सीमापत्रक. -पुस्त्री. हद्द अर्थ २ पहा. **०महदूद-मौदूद**-स्त्री. मर्यादा; सीमा (सामान्यतः). -वि. मर्यादित; सीमांनीं युक्त 'हद्दमहदूद पांढरीवरी जें उत्पन्न होईल तें निमें दोनी ठाईं तारोतार वांटून द्यावें.' -रा १५.५१. [अर. हद्द+महदूद्] **०हदूद**-स्त्री. मर्यादा. 'हद्दहदूद बांधणें' -रा ६.५७९.

हद्या—पु. रेडा; हेला. [हल्या]

हन—अ. १ अन्; आणखी. २ हि; पादपूरणार्थक शब्द. 'अथवा नावें हन जो रिगे।' -ज्ञा ४.९७. [आणि-अन्-हन्]

हनन—न. १ वध हिंसा; ठार मारणें. २ मारणें; ताडन. ३ काटणें; छाटणी. [सं. हन्=मारणें] **हननीय**-वि. ताडन करण्यास, ठार मारण्यास योग्य.

हनवट—पु. स्त्रियांचा पायाच्या बोटांत घालावयाचा एक दागिना. अणवट, अनवट पहा.

हन(नु)वटी, हनु—स्त्री. तोंडाच्या खालच्या जबडयाचा पुढील भाग; दाढी; चिबुक. [सं. हनु+सं. पट्टी; प्रा. वट्टी; म. वटी] **हनुवटी**-स्त्री. एक मुलींचा खेळ. -मखेपु ३३७ **हनुग्रहस्तंभ**-पु. दांतखीळ बसणें. [सं.]

हनपट्टी—स्त्री. (बे)गाडीच्या साठयांतील पुढची लाकडी पट्टी.

हनुमंत-मान्—पु मारुती; बजरंगबली. [सं.] **म्हo** १ गांव जळाला, हनुमंत निराळा=कळ लावून देऊन स्वतः नामानिराळा राहणारा. २ सूर्यापुढें दिवटी हनुमंतापुढें कोल्हाटी. **०जयंती, हनुमज्जयंती**-स्त्री. मारुतीची जन्मतिथि; चैत्री पौर्णिमा.

हनोज—क्रिवि. अद्यापि; अजून. -रा १०.१६४. [फा. हनोझ्]

हपका—पु. अपका (चुरीवरचा पदार्थ इ० वर दिलेला); जोरानें पाणी इ० शिंपडणें; शिपका. (क्रि० मारणें; टाकणें; देणें). [ध्व.]

हपटणें—उक्रि. अपटणें पहा.

हप(ब)शी—पु. १ अबिसीनिया देशांतील माणूस; सिद्दी. २ श्यामल; जंजिरेकर. [अर. हबशी] **०पट्टी**-स्त्री. १ हबशी सरकारनें बसविलेली पट्टी. २ सक्तीची, जुलमी पट्टी, कर. **हप(ब)सा(शा)ण**-न. १ अबिसीनिया देश. २ दक्षिण कोंकणांतील हबशी राजाच्या ताब्यांतील प्रांत; जंजिरा. ३ यांतील लोकांचा तेथील अंमल. **हप(ब)सा(शा)णी**-वि. हपसाणाविषयीं; हबशा संबंधीचा (प्रांत, अंमल इ०).

हपाप—पु. १ शिव्याशाप; तळातळाट (क्रि० घेणें; देणें). 'माझे हपाप तुला भोवतील.' २ जुलूम; त्रास; छळ. (क्रि० लावणें, देणें; लागणें; बसणें; चालणें). **म्हo** हपापाचा माल गपापा=जुलुमानें दुसऱ्याकडून काढलेलें द्रव्य आलें तसें लवकर जाणें. **०णें**-(क्वचित्) जुलुम सोसणें; जुलमामुळें तळतळणें; हांकाटी करणें. [सं. हा ! पापम् !] **हपापी**-स्त्री. भय; भीति; धडकी. (क्रि० घेणें; सुटणें; लागणें).

हपाप—स्त्री. हांव; अनावर इच्छा. 'वाढती श्रीमंती, वाढता लौकिक याविषयींची माझी हपाप कांहीं कमी होईना.' -वांईकर भटजी. [ध्व. हप्] **हपापणें**-अक्रि. १ हांव करणें; फार लोभ सुटणें; लोभी दृष्टि ठेवणें. २ अतिशय उतावीळ होणें; उत्कंठित होणें.

हपीस—न. कचेरी. 'रजिष्टराचें हपीस आणि मामलतदार कचेरी थोडया तासांच्या प्रवासानें मिळण्यासारखी असेल.' -आगर ३.८५. [इं. ऑफिस]

हपूस—पु. एक उत्कृष्ट जातीचा कलमी आंबा. [पोर्तु. अल्फान्सो]

हप्ता, हफ्ता—पु. १ पैसे (पगार, मजुरी इ०) देण्याची ठराविक दिवसांची मुदत. २ मुदतींत दिलेला किंवा द्यावयाचा पैका एकदम देतां न येणाऱ्या रकमेचा ठराविक मुदतींनें थोडाथोडा देण्याकरितां ठरविलेला भाग; किस्त. 'बाकी निमे ऐवज राहिला त्याचे तीन हप्ते ठरले आहेत.' -वाडसमा १.३४४. ३ आठवडा; सप्ताह. [सं. सप्ताह; फा. हफ्ता=आठवडा] **हप्तेबंदी**-स्त्री. १ हफ्त्या हफ्त्यानें रक्कम फेडण्याचा ठराव. २ हफ्त्यानें करावयाची फेड.

हबक, हबा—उद्गा. खंडोबाचा भक्त अंगांत आणतांना काढतो तो शब्द, उद्गार. [ध्व. वाघाची आरोळी] **हबकणें**-अक्रि. १ भक्ष्यावर उडी मारतांना वाघ इ० नें डुरकाळी फोडणें; डरकाळणें. २ हबा ! हबा ! असें ओरडणें (वाघ्यानें).

हबक—स्त्री. १ धक्का बसण्याची जागा; नुकसानीचा धंदा, व्यापार. २ आलेलें नुकसान; तोटा. (क्रि० येणें; बसणें; देणें). ३ वाईट प्रसंग; अडचण; त्रास; लचांड; कटकट (क्रि० येणें) ४ धक्का; आचका; हिसका; हबका. (क्रि० बसणें). [ध्व.] **हबकणें**-उक्रि. १ जोरानें हलविणें; धक्का देणें, बसणें; हिसकणें. २ (ल.) लुगाडणें; लुटणें; बुचाडणें. ३ जोरानें खालीं आदळणें; आपटणें. **हबका**-पु. १ धक्का; हबक (४) पहा. (क्रि० बसणें; देणें, मारणें). ' गाडयावर बसुन चाललें म्हणजे अंगास हबके बसतात. ' २ तोटा; हबक अर्थ २ पहा. ३ जोरानें पाण्याचा शिपका मारणें (भात इ० वर); हपका पहा. (क्रि० मारणें, टाकणें). **हबकी**-स्त्री. १ धक्का; हबक अर्थ ४ पहा. २ (ल.) तोटा; हबक अर्थ २ पहा.

हंब(बा)रणें—अक्रि. गाईबैलाचें हम्मा ! असें ओरडणें. [ध्व.] **हंब(बा)रडा**-पु. १ गाई-बैलांचा शब्द; डुरकणें. २ (ल.) आक्रोश; दीनवाणी रडणें. (क्रि० फोडणें). ' फोडिती हंब रडा या हरिचा लागे सुहृत्कदंब रडाया. ' -मोकृष्ण ५३.१७.

हंबरातुंबरी—स्त्री हमरीतुमरी पहा.

हंबरू—पु. (महानु.) गळफांस ' तैसा प्रपंचाचां हंबरु । केवि ल्ये जिउ निराकारु । ' -भाए ५९६.

हंबरू—पु हमरु पहा.

हंबलणें—सक्रि. गिळणें.

हबा—उद्गा. हबक पहा.

हबा, हंबा—स्त्री. १ ओरडा, हंबरडा पहा. २ (मुलांच्या भाषेंत) गाय इ० जनावर. [ध्व.] -क्रिवि. गुरांच्या ओरडण्याप्रमाणें. **हबासणी**-स्त्री. जोरानें ओरडणें; खेंकसणें.

हबा(वा)र—पु. जमीन सारखी करून घेणें. -वि. सपाट; समपातळींत.

हंबि(बी)र—पु. १ थोर पुरुष; सरदार; अमीर. ' आले कचेरीस बोलाविले हंबीर । ' -इपुस्त्रिपो २२०. २ योद्धा. [अर. अमीर्] **०राव**-पु. एक किताब.

हंबुलें—न. (गो.) हंबरणें. [ध्व.]

हबू—पु. (गो) बाऊ.

हंबेतुंबे—स्त्री. अरेतुरे; हमरीतुमरी. [हिं.]

हबेधुबे—स्त्री. आदळआपट. ' गढ्याचे बाह्य स्वरूपावरून लांबच्या प्रवासानें त्याची फार हबेधुबे झाली असावी. ' -घारपुरेकृत स्यूत सौतिक पृ ९४.

हबेरा—पु. खेच; ओढ.

हबेलंडी—स्त्री. १ घाबरगुंडी; दुर्दशा; गाळण; पचची. २ पंचाईत; अडचणीची स्थिति; फजीति; हलबेलंडी पहा. [हिं. हा+बे+लंडी]

हम—वि. सर्व. [फा. हमह; अर. आम्] **०खास-खास्त**-क्रिवि. १ प्रसिद्धपणें; जाहीररीतीनें; लहानमोठया सर्वा लोकांसमक्ष-करितां-बरोबर. ' म्यां हमखास रुपये दिल्हे आणि तो नाहीं म्हणतो. ' ' हमखास दर म्हणाल तर बारा रुपये खंडी आहे. ' २ निश्चयपूर्वक; खात्रीनें; हटकून. ३ सर्वसामान्य. [अर. आम+खास] **०चौरस**-वि. चारी बाजू सारख्या असलेला. **०चौरस बिलवर**-ज्या बिलवरावरील पेलू चौरस आकाराचे असतात असा बिलवर. **०जात**-स्त्री. सर्व जातीच्या, प्रकारांच्या लोकांचा समुदाय; सर्व प्रकारची जनता. (क्रि० जमणें; मिळणें). ' येथें हमजात मिळाली, कोण कोण्हाला पुसतो. ' -वि. १ त्याचा जातीचा (माणूस, जनावर). २ सारख्या वयाचा. **०रंग**-पु. (गंजिफा) एकच रंग; तोच रंग. -वि. एकाच रंगाचा. **०रस्ता-रहा**-पु. रहदारीचा, सार्वजनिक रस्ता; राजमार्ग.

हमगी—वि. सर्व. ' खानगौडा दत्तक-घेतलेला व तिची बायका हमगीस आणून ठेविलें. ' -ख ९.४६९८. [फा.]

हमतामी—वि. (गो.) कर्तबगार

हमन(ण)गोळा—पु. (बायकी) १ ओबडधोबड गोळा (कणीक, शेण, चिखल इ० चा). २ फोफशी, लठ्ठ व्यक्ति. ३ वेडावांकडा ढीग, रास (भित इ०). ४ (निंदार्थी) ढेरपोटें, आळशी मूल. [हणम+गोळा]

हमरा—वि. (नाशिक) लायक; समर्थ; बरोबरीचा. [फा. हमराह्] **हमराई**-स्त्री. १ हुशारी; लायकी. २ संगत; जूट. ' ज्यांजबर रुपया येतो त्यांज ा जखम लागली असतां हळद-फटकूं मिळणें कठीण. तेव्हां फौजेची हमराई राहते कशी ? '-हौके ३०.

हमरातुमरी, हमरीतुमरी—स्त्री. अरेतुरे; एकेरीची भाषा; जोराचें भांडण; हबरातुंबरी पहा. [हिं.]

हमराह—क्रिवि. संगती; बरोबर; सामील. ' आपलें उत्तम जाणाल तें करणें; आम्ही तुमचे हमराह आहोंत. ' -रा १.१९८. [फा. हमराह्] **०करणें**-गोळा करणें. ' फौज हमराह करून सुभा पातशाई याजवर आणून घालावे. ' -हौके ७.

हमरू—पु. किनारीदार रेशमी वस्त्र. [फा. आमरू]

हमरो—पु (गो.) उंबरठा.

हमलो—पु (गो.) तांबडी मुंगी.

हमशा, हमशाधुमशा—पु. धुडगूस; धांगडधिंगा, वाचाबाची; ओढाताण. (क्रि० घालणें; मांडणें; माजणें; चालणें). [ध्व.]

हमशाई—स्त्री. १ शेजार; शेजारसंबंध. शाई पहा (क्रि० लागणें; असणें). २ शेजार हक्क; समाईक भितीचा वगैरे हक्क. -वि. शेजारील. ' त्या प्रांतीचे वतनदार हमशाई गांवीचे. ' -रा १५.८०. [फा. हम्साया] **०शाईदार**-वि. शेजारी.

हमसर—पु. प्रामस्थ. –पेद १०.७०.

हंमा—हंबा पहा.

हमाणी–नी, हमीण, हमिणी–नी, हमेणी—स्त्री.पुस्त्री. १ पैसे टेवण्याची लांब पिशवी; कसा. 'कंबरेस हमिन्या द्रव्याच्या.' –मदरु १.६४. 'जिनसवार हमीणे दिल्हे.' –इमं ७. २ कोडबोळें. [फा. हम्यानी]

हमाम—पु. उखळ; खल. [फा. हावन्. हिं.] **०दस्ता**–पु. खल व बत्ता. [हिं.]

हमामखाना—पु. न्हाणीघर; स्नानगृह. [अर. हम्माम्+फा. खाना]

हमामा—पु. १ गुराख्यांचा एक खेळ. 'पेंधा म्हणे यमुनेसी। तूं बायको होऊन आम्हासीं। हमामा आजि घालसी।' –ह १०.८९. २ (ल.) धुमश्चक्री; धुडगूस; धांगडधिंगा (खेळांतील). (क्रि० घालणें; मांडणें; माजणें; करणें). ३ अस्ताव्यस्त ढीग, रास; गडगा (माती, चिखल इ० चा); ओबडधोबड रचना (घर, भिंत इ० ची). हमशा पहा.

हमामो—पु. निवळीचें बीं.

हमाल—पु. १ ओझें वहाणारा मनुष्य; मजूर. २ पालखी इ० वाहून नेणारा माणूस; भोई. ३ अफूच्या बोंडांतील रसाचा घट्ट गोळा होण्यासाठीं तो रस तांब्याच्या पत्र्यावर तुडवून मळण्याचें काम करणारा इसम. हें काम हा इसम माजूमच्या कैफांत करतो. [अर. हम्माल्] **हमाली**–स्त्री. १ हमालाचा पेशा, धंदा, कामगिरी. २ हमालाची मजुरी. ३ बिन डोक्याचें–अक्कलेचें काम; केवळ शारीरिक कष्ट **हमाली चाकरी**–स्त्री. १ हमाली धंदा. २ मुख्यतः निरोप आणणें–पोहोंचविणें एवढी नोकरी. ३ हातावरचें काम; आज आहे उद्यां नाहीं असा रोजगार. ४ हलकें काम.

हमिचा—पु. तांब्याचे पैसे वगैरे ठेवण्याची, चारी पाय शाबूत आहेत अशा कोंकराच्या कातडयाची पिशवी.

हमी—स्त्री. जामिनकी (तिऱ्हाईत माणसानें भरण्याची); जिम्मा; खात्री. (क्रि० देणें; भरणें; घेणें; पटणें; पटविणें). [अर. हामी] **०टमी**–स्त्री. (सामा.) हमी; खात्री (क्रि० करणें; देणें; भरणें). **०तारण**–न हमीटमी. (क्रि० देणें; घेणें; पटविणें). **०दार**–वि. जामीन राहणारा. 'ती जवळून आपण ऐवजाचा हमीदार घेतला.' –ऐटि १.२२. **०दारी**–स्त्री. हमीदाराचें काम, पेशा. **०पत्र**–न. जामीनखत; खात्री पटविण्यासाठीं लिहून दिलेला कागद.

हमीधुमीचा—वि. दिखाऊ; डौलाचा; थाटामाटाचा; डामडौलाचा; दिपविणारा; झगझगीत; उठून दिसणारा (क्रम, इ० समारंभ).

हमीन—स्त्री. खरतुडीचें मूळ, कांदा.

हमीर—पु. (संगीत) कल्याण रागाचा एक प्रकार.

हमी(मे)श–शा–क्रिवि. नेहमीं; सतत; चिरकाल. [फा. हमिशह्]

हमु—पु. अहंकार. –शर. [सं. अहम्; अर. हिम्यान्]

हम्रु—पु. घोडा फिरविणारा. –शर. [फा.]

हम्वार—वि. प्रसन्न; सरळ. 'ज्यांत त्यांची मर्जी हम्वार राहे तें करणें योग्य.' –इमं २५५. [फा. हम्वार्]

हय—पु. घोडा; अश्व. [सं.] **०कुंडी**–वि. मानेवर भोंवरा असलेला (घोडा). हें घोडघाचें शुभ चिन्ह आहे. **०भंग**–वि. पोटावर पांढरे ठिपके असलेला (घोडा). हें अशुभ चिन्ह होय. **०मेध**–पु. अश्वमेध. **०विक्रय**–पु. घोडे विक्री. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें निषिद्ध आहे. विक्रय पहा.

हंय—क्रिवि. (गो. कों. कु.) येथें. [सं. इह] **०सर**–(हेट.) येथवर. **०सून**–क्रिवि. येथून.

हयकत—स्त्री. (माण.) हाल; अपेष्टा; तारंबळ. [हाय!]

हयकोल—पु. सरी; गळ्यांतील बायकी दागिना. [अर. हैकल्]

हयगई–य–यी, हैगई—स्त्री. १ दुर्लक्ष; हेळसांड. 'परोपकार, परमार्थसाधन इ० पुण्यकर्माविषयीं हयगय केल्यास पाप वाढतें.' २ ढिलाई; चालढकल; दिरंगाई. 'सत्कर्माविषयीं हयगय करूं नये, आयुष्य थोडें आहे.' ३ बेफिकिरी; अनादरबुद्धि. 'घोड्याचे पोटाची हयगय केल्यास घोडा वाळेल.' [हिं.]

हयता—सना. (राजा. कुण.) १ तो; तो पलीकडचा. 'त्याची मीं तुला गोष्ट नाहीं सांगितली, हयता शेवटास बसला आहे तो त्याची गोष्ट.' २ ज्याप्रमाणें तो या सर्वनामापासून तिकडचा, तिकडे, तसा, तेवढा, तेथें इ० रूपें होतात त्याप्रमाणें हय या सर्वनामापासून. **हयतिकडचा, हयतिकडे, हयतसा, हयतेवढा**–इ० रूपें होतात. [हा+तो]

हयपत–पती–वत–वती—हैबत इ० पहा.

हयराण–न, हयराणगत, हयराणी–नी—हैराण इ० पहा.

हयवान—पु. १ पशु; जनावर; निर्बुद्ध प्राणी. २ (ल.) अगदीं अशक्त, नाजूक प्रकृतीचा माणूस. [अर. हयवान्=सजीव प्राणी]

हयवासी—वि. (कु.) स्वार्थी?

हयहाय–हय— हायहाय–हय इ० पहा.

हया—स्त्री. लज्जा; विनय. [अर.]

हयात–ती—स्त्री. १ आयुष्य; जिंदगी; जिवंतपणा. 'आज येथून आमची हयात खुंटली यैसें भविष्य केलें.' –भाब १८३४.

'काय हयाती बाकी असेल ते, ते स्थळीं अखेर होय तर उत्तम आहे.' –मत्रबा १.१५६. २ उमर; वय. –वि. जिवंत. [अर. हयात्] **०मुलाकात-मुलाखत**–स्त्री. (कागदोपत्रीं) तुमची आमची जगून भेट (होणें). **हयातीचा दम**–१ आयुष्यांतील जोम; उत्साह; शक्ती; सत्त्व; वीर्य; रग. २ जगण्याची आशा, इच्छा. **हयातीचा दम असला तर**–आम्ही तुम्ही जगलों वांचलों तर.

हयासा—पु. धोड्याच्या तंगास लावण्याची वादी किंवा दोरीचा तुकडा; जेरबंद. [फा.]

हय्यंगवीन—न. कालच्या दुधाचें साजूक तूप. 'हय्यंगवीन जैसें मुरसिक रसनेपुढें न तेल टिके।' –मोवन. [सं.]

हर—पु. शंकर; शिव. 'तेथ हर म्हणे नेणिजे। देवी जैसें कां स्वरूप तुझें।' –ज्ञा १.७१. [सं.]

हर—पु. (गो.) अजगर. **म्ह०** हर उडता म्होण गायंडोळ उडता=अजगर उडतो म्हणून गांडूळ उडतो.

हर—वि. (व) कठीण; टणक. **०हालणें**–अक्रि. नरम होणें; थोडेफार शिजणें (अन्न).

हर, हरजीत—स्त्री. हार, हारजीत पहा.

हर—वि. प्रत्येक; दरएक उदा० **हरघडी-वखत-रस्ता-गांव-जागा** इ०. [फा.] **०उपाय**–पु. दरएक इलाज, युक्ति, साधन; सर्व, नाना इलाज, युक्तया (विशेषतः अव. प्रयोग). **०एक**–वि. १ प्रत्येक; जो जो कोणी तो तो. 'हरएक मनुष्यासमागमें पत्र पाठवून संतोषवीत असावें.' २ कवलाहि; कोणाचाहि. 'जुने लोक यांस हरएक उपद्रव न केला.' –मराचिस २८. **०एकरंगी**–वि. निव्वळ एकाच रंगाचा (घोडा). हें अशुभ लक्षण आहे. अशुभ चिन्हें पहा. **०कशी**–वि. कशीबशी; हरएक. 'हरकशी निभावणूक करून तंजावरपर्यंत आले.' –पेशवे० महाराष्ट्र २४४. **०कसबी**–वि. १ हरएक कौशल्याचें काम करणारा; अष्टपैलू कारागीर. २ हरकामी. **०काम**–न. प्रत्येक किंवा कोणतेंहि काम, धंदा; वेळीं उपस्थित होईल तें काम. **०कामी-काम्या**–वि. १ जरूर पडेल तें तें काम करण्यास तयार असलेला; अशा बोलीनें ठेवलेला (माणूस). २ कोणतेंहि किंवा दरेक प्रकारचें काम करण्यास समर्थ असलेला; कोणतेंहि काम करण्यास ज्याचे हात वळतात असा. ३ अनेक प्रकारें उपयुक्त होणारी (वस्तु). **०कोणही-कोणी**–वि. १ भलतासलता कोणी. २ प्रत्येक जण; दरएक. **०घडी**–क्रिवि. वारंवार; प्रत्येकक्षणीं;; नेहमीं; घटकोघटकीं. **०जिन्नस**–पु. सर्व तऱ्हेचा माल, जिन्नस; किरकोळ व्यापारी वस्तू. **०जिनशी-सी**–वि. हरएक, अनेक जातीचा-प्रकारचा; सर्व प्रकारचा. 'त्याचे दुकानीं लहान मोठे गोड आंबट असे हरजिनशी आंबे आहेत.' **०तऱ्हा**–स्त्री. प्रत्येक रीत, योजना, युक्ति, साधन इ० (विशेषतः अव. प्रयोग); नाना तऱ्हा-प्रकार. [फा.] **०दम**–क्रिवि. हरघडी. **०दम ख्यालीं**–पु. १ दरेकक्षणीं नवीन कल्पना, लहर, ख्याल. २ (अव.) अनेक युक्तया, यत्न, बेत, योजना, साहसें, श्रम. 'हरदमख्याल करून त्यानें लग्न केलें.' ३ शोधकता; कल्पकता; हिकमत. 'ज्याचे अंगीं हरदमख्याल नाहीं असला एकमार्गी काय उपयोगी?' **०दमख्याली**–वि. १ फार उलाढाल्या करणारा; चळवळ्या; उद्योगी; युक्तिबाज. २ (ल.) लहरी. '(शिवे) जात्या हरदमख्याली...कसें करितील याचा विश्वास नाहीं.' –ख ७.३२. ३ लबाड. 'त्यांत तो (हैदर) हरदमख्याली आहे.' –ख १०९६. **०प्रयत्न-प्रेत्न**–पु. प्रत्येक प्रकारची खटपट, श्रम, योजना. २ (अव.) सर्व प्रकारच्या खटपटी इ०. **०बयाज-द-बहाणा**–पु. दरएक सबब; ढोंग, युक्ति, कावा, खोटी कहाणी (अपराध्यानें पुढें केलेली). (क्रि० करणें). **०बाबी-बाब**–वि. दरेक बाबीसंबंधीचें (बाब=जमाबंदीचा प्रकार). जसे-हरबाबी बंद-कागद-हिशेब-वसुलबाकी इ०. **०भास**–वि. फार हुशार; अष्टपैलु; सर्व गोष्टींत निपुण; बहुगुणी. **०भांस**–वि. १ वरील शब्द पहा. २ सर्व प्रकारचा; जातीचा, तऱ्हेचा, नानाविध. **०मळ-माळ**–स्त्री. १ माणसें, गुरें इ० ची चालणारी रांग, ओळ, जाणाऱ्यायेणाऱ्यांची माळका. (क्रि० लावणें; लागणें; चालणें; टळणें; मोडणें). २ नेमलेली, ठरविलेली वेळ. (क्रि० संभाळणें; साधणें; टळणें; चुकणें). ३ परिचय; घसट; वावर. **०युक्ती**–स्त्री. दरेक उपाय, योजना, बेत, मसलत; (अव.) सर्व उपाय इ०. **०येक**–वि. हरएक पहा. **०वखत**–क्रिवि. हरघडी. **०वळ**–स्त्री. हरमाळ अर्थ १ पहा. **०साव**–न. चोर, शत्रू इ० धाडीवर, सर्व प्रकारचीं शस्त्रास्त्रें घेऊन उठलेला गांवकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा समूह, थवा. (क्रि० उठणें, मिळणें). **०हमेश-शा**–क्रिवि. नेहमीं. **०हुन(न्न)र**–न प्रत्येक कौशल्य, युक्ति, कसब; (अव.) सर्व कलाकौशल्य. **०हुन(न्न)री**–वि. हरकसबी; हरहुन्नर जाणणारा.

हर—वि. १ हिरावून नेणारा; उचलून नेणारा; पळविणारा. (समासांत) 'धन-कीर्ति-सुख-कफ-वात-ज्वर-हर इ०' २ (गणित) भाजक. ३ (गणित) अपूर्णांकाचा छेद. [सं. हृ=हरण करणें] **०क**–पु. चोर; लुटारू. –वि. हरण करणारा; हर अर्थ १ पहा.

हरक—न. एक प्रकारचें पांढरें कापड; हारक. [इं.?]

हरकणें—अक्रि. (क.) हुरळणें; हर्षित; होणें. हरखणें पहा.

हरकत—स्त्री. १ अडथळा; आडकाठी; विरोध; अडकविण्याचें, थांबविण्याचें कोणतेंहि कृत्य, प्रकार (क्रि० करणें). 'बेडर मजकूर कावू वखत पाहून जागा व मकानें घ्यावयाचे उद्देशें हरकत करणार.' –रा ५.६८. २ प्रतिकूल वर्तन, (देणें-घेणें-व्यापारी इ० व्यवहारीं); अयोग्य कर्म. ३ विलंब; खोटी. [अर. हरकत्] **०खोर, हरकती**–वि. हरकत करणारा, घेणारा

हरकत—स्त्री. (संगीत) विशिष्ट स्वरांची तान.

हरक(को)ल, हरकलपटणी—स्त्री. एक प्रकारचा तांदूळ, सं'ळ.

हरका—पु. घोड्याच्या पाठीच्या कण्यास होणारा रोग. अश्व २.३००.

हरकारा—पु १ दूत; निरोप्या; जासूद; बोलावणेकरी (राजा, सरदार इ० जवळील. याचे हातीं गोंडा असलेली काठी असते). २ हेर; टेहळ्या. 'तेथील लष्करची माहीयेत खरी कळावी म्हणून दोघे हरकारे पाठविले होते.' –चिरा ४४. [फा. हर्कारा] **०गिरी, हरकारगी**-स्त्री. हरकाऱ्याचें काम, धंदा; जासुदी. 'तुजे बाप नार शेणवी यासी हरकारगी मिरास वेसाई यांणी मोकर करून दिवाण–चाकरीसी ठेविले होते' –सासं ३ जुलै २५.

हरकी, हर्की–स्त्री. १ वादांत ज्याचा जय होतो, त्यानें हर्ष झाल्याबद्दल सरकारांत द्यावयाचें द्रव्य; नजर. 'कुंभार खरे झाले त्यांजपासून हरकी घेतली.' –वाडसमा ३.२६५. २ हरवलेली वस्तु आणून देणारास दिलेली बक्षिसी. ३ चांगली नोकरी केल्याबद्दल, एकदम लाभ झाला असतां, एकाएकीं मित्रभेट झाली असतां, कोणतेंहि आनंददायक कृत्य चालू असतां वाटावयाचें बक्षीस. [सं. हर्ष; म. हरख] **०पत्र**-न. बक्षीसपत्र. **०शिरिणी–शेरणी**-स्त्री. १ हरकी अर्थ १ पहा २ आनंदाचे प्रसंगीं वांटलेली मेवामिठाई. [शेरणी=मिठाई]

हरकीपत्र—न. वादांत हरणारापासुन घेण्याविषयींचें पत्र. –शर. [हरणें]

हरकेंड—न. (राजा.) १ हरीक धान्याचा पोकळ दाणा; तूस, गोंड, केंड. २ (निंदार्थी) हरीक. [हरीक+केंड] **हरकेण-कयेण-कयाण**-न. (कों. कु.) हरीकाचें गवत; काड. [हरीक+तृण]

हरख—पु हर्ष; आनंद. [सं. हर्ष; हिं. हरख] **हरखणें**–अक्रि. हर्ष पावणें; आनंदणें.

हरखी—स्त्री. हरकी पहा.

हरगा, हरगेचार, हरगेभाई—'हिडगा' पहा.

हरगाह—अ ज्याअर्थी. –रा २०.४७. [फा. हर्गाह्]

हरगी(घी)ज-स—क्रिवि. १ हरहमेश; नेहमीं. 'तेथें तुम्हांकडून उपसर्ग हरगीस होऊं नये.' –वाडदुबा. २ मुळींच; बिलकूल. 'सासरसीचा तह हरगीस होत नाहीं.' –पेद ६.१९०. 'जे मजला मानिती। मज्ञया विचारें वर्तती। ते हरगीस झोला न पावती।' –रामदिवटा ६. [फा. हर्गिझ्]

हरजुरी—स्त्री. (बे.) आंब्याच्या झाडावरील एक औषधी बांडगूळ.

हरडफुंक्या—हुरडफुंक्या पहा.

हरडा-डी—हिरडा-डी पहा.

हरडा—पु. (सोनारी) कमरेच्या गोफाचा एक भाग.

हरडी—स्त्री. एक जंगली झाड.

हरडें—न. (कु.) अंतःकरण; छाती. [सं. हृदय]

हरण—पु न. मृग; एक जनावर. –स्त्री. हरणी. [सं. हरिण] **०फाशांत सांपडणें-पडणें**–अडचणींत पडून हताश होणें. **०फाशांत घालणें-पाडणें**–अडचणींत आणणें, टाकणें. **०काळजी**–स्त्री. (एका गोष्टीवरून) अतिशय काळजी (हरवलेल्या वस्तूची, इ०); एखाद्या गोष्टीबद्दल अतिशय चिंता; काळजी. 'हरणकाळजी फारच बाई मी मला दिलासा कोणीं द्या ग।' –पला ४.२. **०टोळ**–स्त्री. भयंकर विषारी, हिरव्या रंगाची, झाडावर चढणारी सापाची एक जात; सापटोळी. –बदलापूर ३४८. **०दोडी**-स्त्री. एक वनस्पति, वेल. **०मान्या-शिकारी-न्या**–वि. हरणाची शिकार करणारा; पारधी. **०वीत-वेण-वेत**-नस्त्री. तात्काल, सुलभ प्रसूति (मुलें होण्याच्या स्त्रीची). **०वेल**-स्त्री. फार वाढणारी, फळांतून रेशमासारखा कापूस निघणारी, पानांची भाजी होणारी एक वेल; हरणदोडी. **०शिकार**-स्त्री. हरणाची पारध. **हरणाळें**-न (चांभारी) हरणाचें कातडें. **हरणाचें काळीज**-न भीति. 'तुम्ही एवढें मनुष्य, दुराणी तो दृष्टीस पडेनात, रांडापोरें घोडी ओढतात, तुमच्या पोटांत हरणाचीं काळजें कशीं शिरलीं?' –भाब ९१. **हर(रि)णी**–स्त्री. १ हरणाची मादी. **हरणूली**-स्त्री. (चंद्रपुरी) (लाडक्या भाषेंत) हरण. 'मी ग हरणूली होईन। वनामधिं जाइन् पळून।' –मासं जुलै १९३२.

हरण—न. १ जबरदस्तीनें नेणें; लुटणें; अपहार. २ नाश; घात करणें; दूर करणें; नाहींसें करणें (पाप, रोग, भास इ०). (समासांत) पापहरण; दुःखहरण; दोषहरण इ०. 'कुळहरणीं पातकें।' –ज्ञा १.२२९. ३ (गणित) भागाकार. [सं.] **हरणीय**-वि. लुटून नेण्यास योग्य; हरण करण्याजोगी (वस्तु इ०).

हरण—स्त्री. सोनार, लोहार यांची ऐरण. [हिं. अहरन]

हरणी—स्त्री. (बैलगाडी) बैलास चाक लागूं नये म्हणून चाकाचे पुढें आडवें जोडलेलें लांकूड.

हरणें—उक्रि. १ बलात्कारानें, अन्यायानें नेणें, घेऊन जाणें; उपटणें; अपहार करणें. २ दूर करणें; नाहींसें करणें; निवारणें (दुःख, शोक, पाप, त्रास, अडचण, दोष, रोग इ०). 'पै हरूनि कफवात।' –ज्ञा १४.१९६. ३ जिंकणें; जितणें (बक्षीस). 'त्यानें पहिल्या डावास शंभर रुपये मांडले ते म्यां हरले.' –अक्रि. १ पराभव पावणें; हटणें (युद्ध, खेळ,

वाद इ० त). २ अपुरें पडणें; कामास न येणें; निष्फळ होणें (बुद्धि, प्रयत्न, शक्ति, शहाणपणा इ०). ३ (ल.) फसविणें; भुलविणें. 'लाघवी हरी मेखळे। लोकु जैसा।' –ज्ञा १५.२४१. [सं. हरण] **हरतलेपण**–न. अभाव; नसलेपणा. 'हें अथी तरी कायसें हरतलेपण।' –अमृ ७.१०४.

हरताळ—स्त्री.पु. एक पिवळें विषारी–द्रव्य. [सं. हरिताल] **०लागणें–फासणें**–१ दोष देणें, लावणें. २ (हस्तलिखित लेखांतील अक्षरें इ० वर हरताळ लावून) खोडणें; रद्द करणें. **०लागणें**–रद्द पडणें; चुकीचा ठरणें; खोटा ठरणें. **०तीज**–स्त्री. हरताळका पहा. **०भस्म**–न. हरताळाचें भस्म.

हरताळ—पु. बाजार, व्यवहार बंद असणें; प्रत्येक दुकानास कुलूप लागणें, असणें; बाजारी संप; काम बंद पडणें. [हर+सु ताळुं=कुलूप] **०पडणें**–दुर्मीळ होणें; अत्यंत उणीव असणें; वाण पडणें. **०बाजारांत पडणें**–१ थोर व्यक्ती मेली असतां, किंवा सरकारच्या जुलमाचा निषेध प्रदर्शित करण्याकरितां व्यापाऱ्यांनीं आपापलीं दुकानें खुषीनें बंद ठेवणें; व्यापार-व्यवहार बंद करणें.

हरताळ(ळि)का—स्त्री. १ हरताळ अर्थ १ पहा. २ भाद्रपद शुद्ध तृतीयेस सुवासिनीनी गौरीची, पार्वतीची करावयाची पूजा; त्या दिवशीची तिथि. ३ पूजेची पार्वतीची मूर्ति; हरितालिका. [सं. हरितालिका]

हरदहाल—क्रिवि. केव्हांहि. 'हरदहाल मोहिब्बाचे कामा मध्यें तफावत तजावज करणार नाहीं.' –ब्रप २४०. [फा.]

हरदावळ—पु. घोड्याचे छातीवरील भोंवरा; हा अशुभकारक असतो. [सं. हृदावर्त; हृदय+आवली] **हरदावळी**–वि. वरील भोंवरा असलेला (घोडा).

हर(रि)दास—पु. १ कथेकरी; कीर्तनकार. २ (खा.) कोल्हाट्याप्रमाणें एक कसब करणारी शूद्र जात. –गांगा १२२. [सं. हरिदास] **हरदाशी–सी**–वि. हरदासविषयक; हरदासाचा (पोषाक, वाद्य, तट्टू इ०). **हरदासवळ**–स्त्री. शाहीरांतील एक पक्ष; हे देवास प्रकृतीपेक्षां श्रेष्ठ मानून तुरा–लावणी गातात. **हरदासी घोडा–तट्टु**–पु. हडकुळें, ठेंगणें, रेरें करीत चालणारें तट्टू.

हरदू—वि. १ (खतपत्रांत) दोघेहि; दोन्ही पक्षांचे. 'हरदू असाम्यांचे घराची जप्ती करतील.' –वाडसमा १.१९०. २ दोहों पैकीं प्रत्येक; जोडी. [फा. हर्दो] **०पक्षकार**–पु.अव. वादांतील दोन्ही पक्षांचे पक्षकार; वादी–प्रतिवादी; दोन्ही पक्ष. **०मुसना जुमला**–क्रिवि. हरवलेली सनद पुन्हां करून देतेवेळीं तिच्यावर लिहिण्याचा शेरा. [मुसन्ना=दुहेरी नकल]

हरदू, हरदुसर—स्त्री. (गंजीफा) हुकुमाचीं अनुक्रमें दोन पानें जसें–वजीर–एक्का; एक्का–दुव्वा; दुव्वा–तिव्वा इ०. वरच्या रंगांतील याचे उलट खालच्या रंगातील दहिल्या–नाहिल्या, नहिल्या–अड्या वगैरे. [फा.]

हरद्द—न. १ अर्थ; उद्देश; मनाचा कल; झोंक. २ मजकूर; अभिप्राय; मुद्दा; मतलब (भाषण, क्रिया इ० चा) 'शामलाकडील वकील बोलाऊन आणून त्याचें हरद्द मनास आणून पक्का तह करणें.' –वाडसमा १.३११. [सं. हार्द]

हरप–फ, हर्फ—पु. १ (कागदपत्रांत) अक्षर; वर्ण (विशेषतः अरबी, फार्सी). 'तहनाम्यांत कांहीं हर्फ नीट करावयाचे ते करून.' –रा ५.३३; –ब्रच ८९. २ दोष; ठपका. (क्रि० लावणें; ठेवणें; आणणें; लागणें; येणें). ३ (कारकुनी) घड्या पाडलेल्या कागदांत दुसऱ्या रकान्याचे मध्यापासून पुढील रकान्यापर्यंत ओढलेल्या रेघेचें नांव. [अर. हरफ्] **०ब–हर्फ**–क्रिवि. अक्षरशः. 'कलमांची फर्द सरकारची आली ती हरफ–ब–हर्फ वाचून दाखविली.' –रा ७.८.

हरपणें—उक्रि. १ हरविणें; गमाविणें. –अक्रि. सांडणें; जाणें; नाहींसें होणें; नष्ट होणें. 'द्वेषाचिया भावें हरिसम झाले। भाव हरपले देहादिक।' –तुगा ८८. [हरणें]

हरपरेंवडी—स्त्री. एक प्रकारचा लहान आंवळा आणि त्याचें झाड; रायआंवळा व रायआंवळी. [सं. हरिपर्वरी; हिं. हरफारेवडी]

हरब(भ)क–की—स्त्री. (कु.) खादाडपणा. –वि. खादाड; हांवरा.

हरबटणें—अक्रि. (कों.) लडबडणें; बरबटणें (माती, चिखल इ० नीं अवयव किंवा स्वयंपाकाचीं भांडीं इ०).

हरबडणें—क्रि. (ना.) ऐन वेळेवर इकडेतिकडे शोध करणें.

हरंबळ—स्त्री. हयगय.

हरंबळणें—अक्रि. तळमळणें, हरमळणें पहा. 'तेणें दुःखें प्राणी हरंबळे।' –दा ३.७.३९.

हरब(भ)रा—पु. एक द्विदल धान्य; चणा; घोड्यास खावयास द्यावयाचें एक कडधान्य. [सं. हरि=घोडा किंवा हर=शिव+भरक] **हरभऱ्याचे झाडावर चढविणें–बसविणें**–आपलें काम करून घेण्यासाठीं एखाद्याची फाजील स्तुति करून त्याला खूष करणें; खुशामत करणें; बनविणें; फसविणें. **हरभऱ्याच्या झाडावर चढणें**–अशा खोट्या स्तुतीला भुलणें; फसणें. 'याला एखादे वेळीं तूं फार चांगला दिसतोस असें कोणीं म्हटलें असेल, तेवढ्यावरच स्वारी हरभऱ्याच्या झाडावर चढली आहे!' –अतिपीड.

हरमळ—स्त्री. हरमाळ (हर=प्रत्येक मध्यें) पहा.

हरमळ—वि. (कों.) (दुःख, आजार इ० नें) अस्वस्थ; बेचैन **हरमळणें**–अक्रि. तळमळणें; तडफडणें.

हरमळणें—अक्रि. परिचित होणें; ओळख होणें. हरमाळ पहा. [हरमळ-माळ=परिचय]

हरमोर—स्त्री. हरमाळ (हर=प्रत्येक मध्यें) पहा.

हरया(ये)ळी—स्त्री. हरळी; दूर्वा.

हरराजो, हराजो, हर्राजी—स्त्री. लिलांव. [अर. हर्राज्, हराज्]

हरल-ला-ली—पुस्त्री. (कु. कों.) १ लहानसा प्रवाह; ओढा; ओघळ (विशेषतः पावसाळ्यांतील); त्याचें पात्र, मार्ग. २ पाण्यासाठीं खोदलेला चर, पाट; लहान कालवा.

हरला—पु बांबूची लहानशी वाटोळी टोपली; लहान हारा.

हरव(वि)णें—उक्रि. १ घालविणें; गमाविणें; सांडणें (संपत्ति, कीर्ति, नांव, प्रकृति, सद्गुण, मान इ०). २ घालविणें; गमवावयास लावणें; नुकसान सोसावयास लावणें; मुकविणें; लुबाडणें. ३ प्रतिपक्षास हरे असा करणें; पराभव करणें (वाद, लढाई, खेळ इ० त). [हरणें प्रयोजक] **हरवस करणें**–(माण.) हरवून घेणें; आपत्ति ओढवून घेणें.

हरवळ—वि. (दादर) ऊग्र.

हरवळ—स्त्री. (दादर) हयगय.

हरव(बा)ळ—वि. १ खेळकर; आनंदी (मूल). २ (माण.) चपळ.

हरवार-ळ—वि अरुवार; हलकें व मऊ; मोखर (अनरसा इ० पक्वान्न). हळवार पहा.

हरवेल—स्त्री. (गो.) हरणटोळ नांवाचा हिरवा साप.

हरवो—वि. (कु.) हिरव्या रंगाचा; हिरवा.

हरशीं-शें-सें—क्रिवि. (गो.) एरवीं; सहज.

हरस—पु. (बे.) बैलगाडीचा कणा.

हरसट—स्त्री. (ना.) चंपाषष्ठी. सट पहा.

हरस्व—वि. =ह्रस्व; लहान. ' चौदा वियांचा गोसावी । हरस्व लोचन हिलावी । ' –दा १.२.१३. [सं. =ह्रस्व]

हर! हर!—उद्गा. शिव, शिव; वाईट वाटलें असतां निघणारा शब्द. [सं.] **०महादेव**–उद्गा. (आवेश, औत्सुक्य दर्शविणारा उद्गार) १ निकराचा हल्ला करतांना मराठ्यांची लढाईंत उच्चारावयाची रणगर्जना. ' हरहर महादेव या रणघोषांत । ' –संग्राम ६९. २ पंगत जेवावयास वसतांना म्हणावयाचा शब्द (याच्या आधीं ' पार्वतीपते ' म्हणतात). ३ सर्वस्व नाश; नायनाट; सत्यानाश (एखाद्या वस्तूचा, माणसाचा).

हरहरला—क्रिवि. १ हटकून; खात्रीनें; बिनचूक. २ सतत; नेहमीं. [? हरणें–हरला न हरला तरी]

हरहरा, हरारा—पु. (व.) पातळसर शिरा. ' हरहरा करून रोग्याला खायला घातला. ' [? हिं. हरीरा=एक पेय]

हरळ-ळी—स्त्री. एक गवत; दूर्वा. [सं. हरिताली; प्रा. हरिआली; हिं. हरियल] **०ची मुळी**–स्त्री. १(दूर्वा उपटली तरी तिचा बीजांश जमीनींत राहून पुन्हां पुन्हां उगवतेच त्यावरून) अनेक प्रकारचे छळ, त्रास इ० सोसूनहि टिकाव धरणारी जात, कुळी, समाज. २ जमीन, अधिकार, हुद्दा, मान इ० कोणत्याहि रीतींनीं काढून घेतला असतांहि पुन्हां तो परत मिळविणारी व्यक्ति, विशेषतः वतनदार इसम. ३ अनेकवार औषधादिकांनीं दबविला तरी पुन्हा उचल घेणारा रोग, आजार. **हरळीप्रसाद**–पु. १ (ल) हरदासी तट्टू; किंमतींत उतरलेला घोडा; नुसत्या गवतावर राहणारा (चंदी न मिळणारा) घोडा. २ कुचकामी नोकर.

हरळ—पुन. १ डोळ्यांस त्रिकाळ पाणी सुटण्याचा व खुपण्याचा एक रोग. २ डोळ्याचा एक विकार; खुपऱ्या. (क्रि० येणें.).

हरळ—पु. लहान दगड; बारीक खडे; कण; गार; केर; धूलीकण. ' आणि घासाआंतील हरळु । फेडितां लागे वेळु । '–ज्ञा १३.३३६. –स्त्री वाळू. ' सिकता हरळ शिजवितां । मवाळ नव्हे कल्पांती । ' [का. हरळु]

हरळ—स्त्री. खाष्ट सेवा; त्रासदायक काम, नोकरी; चगदग; त्रास. (क्रि० लागणें) ' काय हो त्या पोराची हरळ लागली. '

हरळ-ळा—पु. १ (वांगी, मिरच्या इ० कांचें) रोप लावण्यासाठीं जमीनींत खोदलेली लांबट खळी; खांच, चर. २ पाणी नेण्याचा पाट; कालवा. हरल पहा. ३ पाणी वाहण्यानें पडलेला ओघळ; चर.

हरळ—वि. सैल; विरळ; फटी, भेगा असलेला. अरळ पहा. **हरळणें**–अक्रि. फट ठेवणें, पाडणें; दूर, विरळ असणें (दांत, झाडें इ०). ' दांत कस्करे आणि हरळे । '–दा ३.७.२३.

हरळगा—पु. (बे.) एक जातीचा तांदूळ.

हरळी—स्त्री. (प्र.) १ आरोळी; मोठ्यानें मारलेली हाक. २ आक्रोश; दु.खानें फोडलेला हंबरडा, किंकाळी; बोंब. (क्रि० फोडणें; मारणें). ३ (नाट्य) राक्षसपात्राची आरडाओरड. [आरोळी]

हरा—पु. १ हारा; बांबूच्या कामट्यांची मोठी टोपली; पाटी (भाजी, फळें इ० ठेवण्याची). २ (ल.) हाराभर जिन्नस (वाळकें, फळें इ०). **म्ह०** १ वाळकाचा हरा आणि ताकाचा डेरा (फार दिवस टिकत नाहीं). २ हरा वारा देव्हारा (दोन दिवसांचा)=क्षणभंगुरता, नश्वरता दर्शक.

हरांजनी—वि. एक विशिष्ट रंगाचा(घोडा). –अश्वप १.२८.

हराडा—पु. (व.) तापाची कसर; अंग मोडून येणें. 'एवढा फोड झाला त्याचा हराडा आला असेल.'

हराम—वि. १ बेकायदेशीर; असमान; विषम; दुष्ट; वाईट; अन्यायी; गैरशिस्त; निंद्य (व्यक्ति, काम). २ निषिद्ध (अन्न). [अर. हराम्] **०खोर**–वि. १ स्वामिद्रोही; लुच्चा; बेइमान. २ निषिद्ध अन्न सेवन करणारा. ३ लांचखाऊ; अप्रामाणिक; [फा. हराम्खुर्] **०खोरी**–स्त्री. १ बेकायदेशीर कृत्य; अप्रामाणिकपणा; स्वामिद्रोह; लुच्चेगिरी. २ निषिद्ध अन्नसेवन. ३ लांच खाणें; अन्यायाची प्राप्ति. [फा. हराम्खुरी] **०जादगी**–स्त्री. १ हरामखोरी; लुच्चेगिरी. 'जमीनदारांनीं हरामजादगी केली.' –रा १. २४४. २ स्वामिद्रोह. 'रयत हरामजादगी करून अंमल सुरळीत देत नाहीं.' –रा ८.१५८. **०जादा**–वि. १ अनौरस; जारज. २ स्वामिद्रोही; लबाड; बेइमान. ३ धूर्त; दुष्ट; कपटी; बदमाष; ठग. [फा. हराम्झादा] **०जादी**–स्त्री. १ अनौरस स्त्री. २ हरामजादगी; लबाडी. 'त्यांच्या हरामजाद्या व मकरे सर्व नशाब बहादूर यांचे ध्यानांत.' –रा १९.५९. **०नमकी**–स्त्री. निमकहरामी. 'पादशहाशी ज्यानें हरामनमकी बे–अदा केली.' –पया २१. **०मोत**–स्त्री. वाईट प्रकारें आलेला मृत्यु. **हरामाचा**–वि. लबाडी, अन्याय इ०नीं मिळविलेला (माल, पैसा). **हरामी**–वि. लबाड, लुच्चा; कपटी; हराम पहा. –स्त्री. हरामखोरी.

हरावल—पु. हरोल; सैन्याची आघाडी. [फा. हरावुल्]

हराशिवा—उद्गा. स्पष्टपणें नाकबुली; नकार देतांना उच्चारावयाचा शब्द. [सं. हर! शिव!] **०गोविंदा**–उद्गा कांहीं उत्तर नाहीं, कृति नाहीं, अगदीं तटस्थता आहे असें दर्शविणारा उद्गार; रामशिवा!, गोविंदा!.

हराष—पु. तोटा; नुकसान; हानि. [सं. ऱ्हास; अर. हराज्] **०काळ**–पु. अडचणीची परिस्थिति, दिवस; उतरती कळा; विनाशकाळ. **हरावणें**–अक्रि. नष्ट होणें; नाहींसें होणें; उतरती कळा लागणें.

हरास—पु. लिलांव; विक्री. 'पांचशें शेतें हारासाला निघालीं असून त्यांपैकीं ३० हरासही झालीं.' –केसरी २१.५.३७. **हरराज** पहा.

हराहोरा—पु. हरें वारें पहा.

हरि—पु. १ विष्णु; कृष्ण. 'हरि ज्यांचा कैवारी त्या पांडुसुतांसि वंदितों भावें.' –मोआदि १.७. (समासांत) हरि–सत्ता–कीर्तन–कथा. २ जुन्या संकृत व प्राकृत वाङ्मयांत हरि शब्द पुढील अर्थानें आढळतो. उदा० घोडा; सिंह; माकड; बेडुक; सूर्य; इंद्र; यम, वायु, चंद्र, प्रकाशकिरण, पोपट; सर्प इ०. ३ पृथ्वीच्या नऊ वर्षांपैकीं (भागां) एक वर्ष (हें निषध व हेमकूट यांच्यामध्यें आहे). [सं.] **०ध्वज**–पु. विष्णुवाहन; गरुड. 'त्याच्या विमान येइल काय्यै न येतांचि हरिखग मनातें.' –मोवन. **०गण**–पु. वानरसेना. 'सुग्रीवें घालुनि आपुली आण। आणविले सप्तद्वीपांचे हरिगण।'. **०चंदन**–पु. पिवळा चंदन; कुंकुमागरु. –न. केशर. **०जन**–पु महार, मांग, भंगी इ० अस्पृश्य मनुष्य व जात (महात्मा गांधींनीं तयार केलेला शब्द). **०जागर**–पु एकादशीच्या रात्रीचें जागरण. 'दशमीव्रत एकभुक्त साचार। एकादशी उपोषण हरिजागर।' **०दास**–पु. १ हरीचा भक्त, उपासक. २ कथेकरी, हरदास पहा. **०दिन–दिनी**–पुस्त्री. एकादशी. –जैअ १७.१२४. **०दिशा**–स्त्री. पूर्वदिशा. 'हरीदिशेप्रती गमन करी। तों पुढें सह्याद्री देखिला।' –जैअ १६.२. **०द्वार**–पु. उत्तर हिंदुस्थानांतील एक तीर्थ क्षेत्र; येथें गंगा हिमालयांतून बाहेर सपाटीवर येते. **०नाख–ग**–वि. १ एकरंगी पण पाठ पांढरी असणारा (घोडा). –मसाप२. १. २ दोन्ही कानांत आणि डोक्याच्या केसांत भोंवरा असलेला (घोडा). –अश्वप १.१०१. **०पद**–न. मेषसंपात; महाविषुव. [सं.] **०पाठ**–पु. विठ्ठलभक्तिपर नामदेवरचित अभंग. **०भक्त**–वि. १ विष्णुभक्त. (विशेषतः) हरिनाम घेत संन्यासवृत्तीनें फिरणारा भक्त. २ (ल.) पक्का नास्तिक; दांभिक; ढोंगी. ३ (ल.) भोळसर; वेडसर **०भक्तपरायण**–वि. भगवद्भक्त; संत; हरदास. **०रंगण**–न. देवापुढील भजन किंवा नृत्य करण्याची जागा. –एभा १७.१९०. 'गरुडपार हरिरंगणीं। टाळ मृदुंगाचा ध्वनी। **०वर्ष**–न. हरि अर्थ ३ पहा. **०वासर**–पु. १ द्वादशीचा प्रथम पाद; तिथिवासर (यांत भोजन करावयाचें नसतें). २ आषाढ, भाद्रपद, कार्तिक या महिन्यांतील शुद्ध द्वादशीचा व अनुक्रमें अनुराधा, श्रवण, रेवती या नक्षत्रांचा योग; नक्षत्रवासर. **०विठ्ठल**–उद्गा. भजनांतील नामोच्चार. –न. (ल.) सत्त्यानाश; नासधूस; सर्व समाप्ति; कार्यहानि इ०. **हरीचा लाल**–पु.वि. १ चैनी मनुष्य; रंगेल मनुष्य. 'डफ तुणतुणे वाजविणारे हरीचे लाल कोण असतील?' –स्वप २९. २ कोणी तरी, कोठला तरी माणूस.

हरिकअम्ल—न. (शाप) क्लोरिक ॲसिड. [हर=क्लोरिन+अम्ल]

हरि(री)ख–क—पु आनंद; हर्ष; उल्हास. [सं. हर्ष; प्रा. हरिस; हिं. हरिस] **हरिखणें, हरिखावणें, हरिखेजणें**–अक्रि. आनंद होणें, पावणें. 'जो आत्मलाभासारिखें। गोमटें कांहींचि न देखें। म्हणोनि भोगविशेखें। हरिखेजे ना।' –ज्ञा ३. ७५९; १८.२३३.

हरिण—पु. मृग. हरण पहा. [सं.] **हरिणी**–स्त्री. हरणाची मादी. २ स्त्रियांच्या चार जातींपैकीं एक. चित्रिणी पहा. ३ (काव्य) एक वृत्त. याचे चरणांत १७ अक्षरें व न, स, म, र, स, ल, ग, हे गण असतात. उदा० 'हृदय उलतें शोकें माझें नव्हे द्विविधा तरी। विकल करते मूर्च्छा काया न जीवित संहरी।

हरित—वि. हिरवें. [सं.]

हरि(री)तणें—सक्रि. हिसकावून घेणें; काढून घेणें; नाहींसें करणें. 'पूर्वकर्मे स्वतंत्रता । हरितली कीं ।' –विपू १००. –एभा २३.५१९. [सं. हृ=हरण करणें] **हरिता, हर्ता**–वि. १ नाहींसे करणारा; हरण करणारा. २ चोर. –एभा २.३८८. **हरिपत्र**–न. आपण हरलों असें लिहून द्यावयाचें पत्र; जितलेख. 'अथवा द्यावें हरिपत्र.' –गुच २५.३६.

हरिताल—पु. हरताळ पहा. **हरितालिका-हरितालीं**–स्त्री. 'हरताळका–हरताळतीज' पहा.

हरिद्र—न. हरद्र पहा. [सं. हार्द्र]

हरिद्र—न. (दादर) दारिद्र्य. [सं. हृ–हर]

हरिद्रा—स्त्री. हळद. [सं.] **०मेह**–पु. पिवळी लघवी होणरा एक रोग. 'प्रमेह' पहा. **०राग**–वि. हळदीच्या रंगाचें (नीलरागाच्या उलट). २ (ल.) चंचल; अस्थिर वृत्तीचा, प्रेमाचा.

हरिन्मणि—पु. पाच रत्न. [सं.]

हरिपी-प्या—वि. धाडशी; साहसी. हरीप पहा.

हरियळ-ह्याळ—पु. मधमाशा खाणारा एक प्राणी.

हरियाळ—पुस्त्री. हऱ्याळ पहा. [हिं.]

हरिश्चंद्र—पु १ सूर्यवंशांतील एक प्रसिद्ध राजा. यानें स्वप्नांत दिलेलें वचन अनेक संकटें सोसून पूर्ण केलें. २ (ल.) (हरिश्चंद्रासारखा) सत्यवचनी, उदार माणूस. [सं.]

हरी—स्त्री. हार; ओळ; रांग (झाडें, पिकें इ० ची). [सं. हार] **हरीं**–क्रिवि. दिशेनें; ओळीनें; सरी.

हरी—स्त्री. पराभव; हार. 'तेवीं पुत्रांपुढें रघुनाथ । हरी आपण घेतसे ।' –जैअ ३६.६५. [सं. हृ=हरण करणें]

हरीक—पु. कोदु नांवाचें हलकें, नाचणी सारखें धान्य. याच्या ४ जाती आहेत. भात, पेज इ० करतात; आकार राईसारखा, व रंग पिवळा असतो. –वगु ६.२५. **हरि(र)काचें जातें**–न. हरीक दळण्यासाठीं एक विशिष्ट प्रकारचें केलेलें मातीचें जातें.

हरीतकी, हर्तकी—स्त्री. पिवळा हिरडा. याचे ७ प्रकार. आहेत सप्त हरीतकी पहा. [सं.]

हरीप-फ—पु. १ शत्रु; वैरी; बलाढय प्रतिस्पर्धी. २ शौर्यादि गुणांमुळें दुसऱ्याचें दमन करणारा माणूस. 'आतां देवा कोठें जाशी । गांठ पडली हरीपाशीं ।' ३ लबाड, धूर्त माणूस; कावेबाज शत्रु. 'मराठे हरीफ बहुत आहेत, असें बोललों.' –सभासद ४९. –दिमरा १.२६१. ४ गोहो; धोव; वस्ताद; तोडीस तोड देणारा; तुल्यबल. मनुष्य. [अर. हरीफ्] **हरिपी-फी, हरिफाई**–स्त्री. १ वैर; शत्रुभाव. २ धाडस; साहस; धैर्य; धाडसी कृत्य. ३ धूर्तता; चतुराई; कावेबाजी. 'आतां तुमची त्यांची भेटी खासे खासे यांची करवितों; तुम्हीं हरिफी करून कार्यभाग करणें तो करावा.' –सभासद १५. **हरिपी-प्या**–वि. धीट; साहसी; धाडसाच्या कामांत पुढें असणारा.

हरीमूग—पु. मुगा(धान्या)ची एक जात. रंग हिरवा. –कृषि ३२३.

हरूख-ष, हर्ख—पु. हर्ष; हरीक-ख पहा. 'हरुषकाळीं विषमकाळीं ।' –दा ४.३.५. [सं. हर्ष] **०मात**–स्त्री. आनंदाची बातमी. 'आली दारा देखे हरुषाची गुढी । सांगितली पुढीं हरूखमात ।' **हरूषतें**–वि. हर्षित.

हरेवा(हो)रें—न. (ख्यालीखुशाली, चैन इ० ची) अस्थिरता; चंचलता; क्षणभंगुरता; पोकळपणा; इ०. होरा वारें; हराहोरा. हरा पहा. [होरा=भविष्य+वारें=वेव इ० चा संचार] **म्ह०** हरेवारे देव्हारे किंवा हरावारा देव्हारा.

हरोल-ळ-ली—स्त्री. १ हरवल पहा. सैन्याची आघाडी बिनी. 'जाधवराव पुढें हरोलीस आले.' –पेद १.२२. २ (ल.) पुढारी माणूस; नायक. 'तुम्ही या मनसबियास हरोल होऊन मनसुबा सिद्धीस जाय तें करणें.' –बाडशाछ ३०; –पेद १.१२. [फा. हरावुल्]

हरोह(हा)र—विक्रि. हारोहार पहा.

हरोळी—स्त्री. आरोळी पहा. –लोककथा २.८०.

हरोळी—स्त्री. आरोळी; गाकर; लहान पोळी, भाकरी. 'गूळ घालून हरोळ्या केल्या.' (लक्ष्मीबाई टिळक) १३३. [अहार–ळ+पोळी]

हर्क—पु. हरिख; हर्ष. 'तर्कांत तर्कला कि तर्क । हर्कांत हर्कला कि हर्क ।' –ज्ञाप्र ३६०. [सं. हर्ष]

हर्ता—वि. हरण करून नेणारा; बलात्कारानें घेऊन जाणारा. पळवून नेणारा. २ निवारण करणारा (संकट इ०). 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची ।' –गणपतीची आरती. [सं.] **हर्तृत्व**–न. १ पळवून नेणें; बलात्कारानें लुबाडणें; हरण; अन्यायानें संपादन. २ लुबाडण्याची इच्छा.

हर्यळ—पु. हरियळ पहा.

हर्र—उद्गा. मेंढ्या, बकरीं इ० ना हांकावयाचा शब्द. [ध्व.]

हऱ्याळ—पु. लहान हिरवट साप. [सं. हरित्=हिरवा+अहार–आर=अजगर]

हर्वजेनें—क्रिवि. कोणत्याहि रीतीनें. 'शिकंदरि याहून शादल निघाला म्हणजे मार्गीच हर्वजेनें शिक्षा करितो.' –रा ६२३. [फा. हर्वजह्]

हर्ष—पु. आनंद; उल्हास; सुख. [सं.] **०माण**–वि. आनंदित; उल्हासित; आनंद उपभोगणारा. **०वायु**–पु. अत्यंत आनंद झाला असतां होणारा वातविकार. **०शोकविरहित**–वि. स्थितप्रज्ञ; मनाच्या सुखदुःखादि भावनांपासून मुक्त. **हर्षक**–

वि. आनंद देणारा. **हर्षंग**–न. १ आनंद करणें–देणें; आनंदावस्था २ –पु. (ज्यो.) चवदावा योग. ३ –नपु डोळ्यांचा एक रोग **हर्षणें हर्षिणें**–अक्रि. आनंदणें; आनंद पावणें. 'दाता देखतां याचक हर्षती।' **हर्षामर्ष–र्षा**–पु. १ तंटाभांडण; अरेतुरे; गालिप्रदान; चुरस. 'त्यांचा तुमचा हर्षामर्ष पहिलेपासुन लागला.' –बाडशाछा २४. २ आनंद व क्रोध; रागलोभ. 'हर्षामर्षे ठेलें। दुजेनविण।' –ज्ञा १२.१६८. [हर्ष+अमर्ष] **हर्षित**–वि. आनंदित; आनंदलेला; आनंदित झालेला किंवा केलेला.

हल्—पु १ व्यंजन. २ अर्धाक्षर, व्यंजन दर्शविणारी अक्षराचे खालील पाय तोडावयाची (ं) खूण. (क्रि० देणें, करणें). ३ असल्या खुणेचें अक्षर. [पाणिनीच्या पहिल्या माहेश्वर सूत्रावरून] **हलन्त**–वि. ज्या शब्दाच्या शेवटीं स्वर नसुन व्यंजन असतें असा (शब्द).

हल—पु. नांगर. –एभा २७.२५६. [सं.] **०धर–हलायुध**–पु. बलराम यादव. 'तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे।' –मोकृष्ण ८६.२. **हलबंदी**–स्त्री. गायकवाडींत जमीन कपण्यासाठीं वापरण्यांत येणाऱ्या दोन बैलाच्या नांगरावरील कर –दा. ना. आपटेकृत सयाजीराव गायकवाड (तिसरे) याचें चरित्र खं. १, पृ. ३३९. [हल=नागर+बंदी]

हलअ(आ)पदा–अपेष्टा—हाल मध्यें पहा.

हलक—स्त्री गवयाचा गळा; आवाज; फिरकी. [अर. हल्क्]

हलक(ल्ल)क, हलाक–ख—वि. १ निःशक्त झालेला; दमलेला; क्षीण (दुखणें, श्रम इ० नें). 'दोनतीन चपेट होऊन बहुत हलाक जहालों आहों.' –चित्रगुप्त ७९. २ गरजू; निष्कांचन; दरिद्री. [अर. हलाक्] **हलाकी–खी**–स्त्री. १ थकवा; शीण; अशक्तपणा; क्लांति. 'आपलें राज्य नवें त्याहीमध्यें दोनतीत चपेट होऊन हलाखी झाली आहे.' –सभासद ४७. २ कंगालपणा; अत्यंत दारिद्र्य; दुर्दशा. 'हलाखीची स्थिति' असा रूढ प्रयोग. 'लश्करांत दाणाचारा मिळेना तेव्हां हलाकींत आले.' –मराचिथोशा ५८. [अर. हलाकी]

हलकट—वि (सर्व अर्थानें) हलका पहा. [अल्पार्थी हलका]

हलकट—स्त्री. (राजा.) दंगाधोपा; हाणमार: लुटालूट. 'गंगातीराकडे अताशीं हलकट आहे तुम्ही तिकडे जाऊं नका.' [अर. हलाकत्] **हलकटणें**–अक्रि. दंगा चालू असणें.

हलकडी—स्त्री. १ नथेचे लोंबते मोती. झिरमिळ्या. २ मोती गुंफण्यासाठीं दुफांशी नथेला जो तुकडा जोडतात तो. ३ झोंपाळा, पाळणा इ० टांगण्याचा आंकडा, कडी. [अर. हलका]

हलकथोल—न. चित्रें इ० कांस रंग देण्याचे उपयोगी एक पदार्थ; हा जस्तापासुन करतात. [अर. हला=विरघळणें+कथील]

हलकलणें—अक्रि. १ (दंगाधोपा, आग, दुष्काळ इ० नीं देश, गांव जनसमुदाय इ०) गडबडणें; गोंधळणें. २ अस्वस्थ, बेचैन, फार प्रक्षुब्ध होणें (एखाद्या व्यक्तीनें). [कल्कल्+हल् द्वि]

हलकल्लोळ–कल्होळ–कालोळ—पु. आरडाओरड; बोंबाबोंब; गडबड; गोंधळ; मोठा बेसुर आवाज (वाद्यें इ०चा); तुंबळ ध्वनि; कडकडाट. [कल्लोळ+हल द्वि]

हलकल्हई—स्त्री. जस्तापासुन केलेला एक मऊ हलका पदार्थ; हलकथील.

हलका–गा—पु. १ झोंपाळा, पाळणा इ० ज्या दोऱ्या, कड्या छतास टांगण्यासाठीं केलेले विशिष्ट आकाराचे आंकडे प्रत्येकी. 'लावून रुपेरी हलके हिंदुळे बांधिले।' –प्रला. २ दिवा इ० टांगण्याचा आंकडा. 'फणें पिवळीं हलक्यांना। आंत पिवळ्या मोंबत्या आरसे पिवळे झलक्याना।' –प्रला ९३. [अर. हलका] **हलकी**–स्त्री. झोंपाळा इ० टांगावयाची आंकडी, कडी. हलका पहा.

हलका—पु. एक वाद्य. याला हलका व घूम नांवाचीं दोन डफडीं असतात. संबळ पहा. **हलकी**–स्त्री. एक वाद्य; खंजिरी; डफडी. हलका पहा.

हलका—पु. (बे. कर्ना.) शेतांतील ढेकळें फोडण्याचें दांताळें; एक औत. [का हलिके; तुल० सं. हल]

हलका—वि. १ वजनांत कमी; जड नसलेला. २ लहान; न्यून (प्रमाण, वजन, लांबी इ० मोजतांना). ३ कमीप्रतीचा; कडक नसलेला (गुण, प्रभाव इ० त). 'अंमलाच्या बाबतींत अफूपेक्षां भांग हलकी.' ४ सौम्य; मंद; कमजोर (थंडी, पाऊस इ०). ५ जड नसलेलें; पचण्यास सोपें (अन्न). ६ शरीरास गुणकारी, (अन्न); पचण्यास सोपें (पाणी). ७ सहन करण्याजोगा; फारसा मोठा नसलेला; क्षुल्लक (रोग, विकार, काम). ८ कमी महत्त्वाचें; किरकोळ (काम, बाब). ९ कमी दर्ज्याचा, अधिकाराचा, वजनाचा (माणूस). १० कमी किंमतीची (वस्तु). ११ बेताची; प्रमाणशीर; कमी (किंमत, भट). १२ क्षुल्लक; गौण (विषय). [सं. लघु; प्रा. हलुअ; हिं हलका; तुल० सं. क्षुल्लक] **कानाचा हलका**–वाटेल त्यानें ऐकून त्यावर विश्वास ठेवणारा. **जिवाचा मनाचा हलका**–संकुचित दृष्टीचा; क्षुद्र; हलकट. **बुद्धीचा हलका**–कमी बुद्धीचा; मंद बोकयाचा; मूर्ख. **०पतला**–वि. (व) कमकुवत; दुर्बळ; किरकोळ. **०फराळ**–पु थोडें अन्न व पुष्कळ पाणी पिणें. **०फूल**–वि. अत्यंत हलका. **०भार**–पु. कमी पत, नांव. **हलकायानें**–क्रिवि. हलू; लघुप्रमाणानें; सावकाश (बोलणें, चालणें इ०). 'हलक्यानें–बोल, चाल इ०.'

हलकारत-ती—स्त्री. १ आंत दिवे (कापूर इ०) लावून देवास ओवाळावयाचें एक लांबट व चापट असें धातुमय पात्र. २ आरती. [हलका+आरती ?]

हलकारा—पु. जासूद. हरकारा पहा. **हलकारगिरी-करागिरी**-स्त्री. हलकाऱ्याचें काम व हुद्दा.

हलकावणी—स्त्री. हुलकावणी पहा.

हलकावणें—अक्रि. १ हलकें होणें; अशक्त, कमी होणें. 'कष्टांचा भारही हलकावत जाईल.' –तुफान २९. २ विनीत, नम्र होणें. –उक्रि. १ हलकें करणें. २ (एखाद्याचा ताठा, गर्व) उतरविणें; खालीं करणें. [हलका]

हलकूत-द—वि. मऊ व नाजूक; हलकी (वस्तु, प्रकृति, व्यक्ति). [हलकें]

हलकूम-न—पु (कुस्ती) हातखोडा; आपला हात जोडीदाराच्या पलीकडच्या बरगडीवरून घालून, अलीकडच्या आपल्या हाताच्या कोंपराच्या सांध्यांत आपल्या हाताचें मनगट धरून, जोडीदाराच्या पोटास दाब देऊन घुसमटून चीत करणें. **हलकूम उलटा**-पु. (जंबिया) आपल्या जंबियानें जोडीदाराच्या गळ्याच्या घांटीजवळ उजवीकडे मारणें. **०सीधा**-वरील डावाच्या उलट म्हणजे जोडीदाराच्या घांटीच्या डाव्याबाजूजवळ मारणें. [अर हलक-हल्कूम्=गळ्याची घांटी]

हलकें—न १ लहान लहका हलकी (कडी डफडें). २ लहान हलकरती. [हलका] **हलकें डोसकें-डोकसें-मस्तक**-न. १ हजामतीला सोपें व रांठ नसलेल्या केसाचें डोकें; याचे उलट जड डोसकें. २ मस्तक हलकें होणें (रक्त जाण्यानें इ०). ३ लवकर बिघडणारें, भडकणारें डोकें; याच्या उलट शांत डोकें ? **०फूल**-वि. सार्धे, बिनत्रासाचें (काम धंदा).

हलख—स्त्री.वि. हलक पहा.

हलखुशामत-ती—हालखुशामत पहा.

हलखूद—वि. हलकें; सहज व्यवस्था करतां येणारें; अवजड नसलेलें; बिनत्रासाचें (काम, गट्ठा, शरीर इ०). [हलका+सं. क्षुद्र; फा. खुर्द=लहान]

हलगती—वि. हलगत म्हणून एक पेठ आहे तेथील (कापड इ०).

हलगरजी-जू—वि. निष्काळजी; स्वतः वाटेल तेव्हां, वाटेल तसें काम करणारा; सुस्त; मंद (प्र.) अलगरजी. [फा. अहल्-इ-गरज्=स्वार्थी] **हलगरज**-स्त्री. सुस्तपणा; निष्काळजीपणा. असेंहि नाम कधीं वापरतात.

हलगा—(सर्व अर्थी) हलका कडी पहा.

हलगी—हलकी पहा.

हलगी मालगी—स्त्री. टगळमंगळ; नानूं; कांकूं; चालढकल (क्रि० करणें). –क्रिवि. कांकूं करीत. [ध्व]

हलचाल, हलणें, हलता नारळ—हालचाल इ० पहा. [दे. प्रा. हल्ल; हि. हिलना]

हलद(दि)वा—वि. (कों) पिवळा. [हळद]

हलपटणें—सक्रि. (बे.) फेकणें.

हलापला—वि. (क.) चपळ; दक्ष; भरभर काम करणारा.

हलफिलाल—क्रिवि. आत्तां; याक्षणीं; लवकर. [अर. हाल, फिल्हाल]

हलफूल—वि. हलका फूल.

हलब(ळ)वी—पु. नागपूर-वऱ्हाड प्रांतांतील एक रजपूत मराठा हिंदु जात. हे लोक शेती करून असतात. याच्या अनौरस संततीस 'खाल पंक्ति' म्हणतात. यांस जातीनें बहिष्कृत केल्यामुळें हे इस्लाम धर्म स्वीकारतात. याच्यांत घरजांवई करून घेण्याची चाल आहे. अशा घरजावयास 'घरडगले' म्हणतात. –केसरी ३०.६ ३६.

हलबेलंडी-बालंडी-बेलंडें, हलबिंडया-बंडया—स्त्री.स्त्री.न.स्त्री.अव. (अशिष्ट) गाळण; तारांबळ; तिरपीट; भीतीमुळें होणारी अवस्था, स्थिति. [हिं हे+बे+लंड]

हलमस्त—वि. दरिद्री परंतु गर्विष्ठ; हालमस्त पहा.

हलमा दांडू—वि. (व.) आडदांड. 'सुन सांपडली हलमा दांडू.'

हलयाणें—सक्रि. हलासिणें; हाणणें. –शर.

हलवा—पु. १ एक मिठाई. २ तीळ, लवंगा वेलचीदाणा इ० साखरेच्या पाकांत घोळून त्यावर कांटा आणून केलेली एक मिठाई; संक्रांतीचा तिळगूळ. ३ एक जातीचा मासा. [अर. हल्वा] **हलव(वा)ई**-पु. हलवा व इतर मिठाई करणारा व विकणारा मनुष्य; मिठाईवाला. [फा. हल्वाई] म्ह० हलवायाचे घरावर तुळशीपत्र-ब्राह्मणाला=परभारे दुसऱ्याची वस्तु तिसऱ्यास देणें; आईजीच्या जीवावर बाईजी उदार याप्रमाणें.

हलवांग—पु. (गो.) खुशामत्याचा अंगविक्षेप. [हलविणें+अंग]

हलवान—न. कमी किंमतीच्या शालीचें एक फर्दे; अलवान पहा.

हलवान—न. एक पेल्यासारखें भांडें,

हलवी—स्त्री. एक लहान झाड.

हलसान—क्रिवि (व.) बेजार (क्रि० होणें). [हलाक]

हलसूद—वि. हलकें; अवजड नसलेलें (शरीर, ओझें इ०). हलखूद पहा. [हलकें]

हलह(हा)लणें—अक्रि. राग इ० विकारानें अंगाचा थरकाप होणें. [हिं. हरहलाना; म. हलणें द्वि.] **हलह(हा)लून**-क्रिवि. कापत कापत. (क्रि० उठणें).

हलहलीत—वि. अत्यंत दरिद्री; हीनदीन. [हाल]

हलहवाल—पु. संकटमय दुःखद स्थिति. हालहवाल पहा.

हलाक-ख—हलक पहा.

हलायक—वि. पांच ते दहा अंगुळेंपर्यंत पांढरे पाय असलेला (घोडा). –अश्वप १.९.

हला(ल्ला)ल—वि. १ योग्य; धर्म्य; विहित; न्याय्य; अनिषिद्ध (खाद्य वस्तु, दान इ० देण्याचे पदार्थ); विधीपूर्वक मारलेल्या पशूचें (मांस). 'मुलानानें फात्या न दिला तर बकरें मुर्दाड म्हातें म्हणजे तें हलाल होत नाहीं.' –गांगा ११३. २ रास्त; योग्य; प्रामाणिक; उत्तम; कायदेशीर (धंदा, नेमणूक, काम. फायदा, मिळकत, संपादन). [अर. हलाल्] **०करण**-मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें पशु मारणें; जबा-जबे करणें. **हलालाचा**-वि. योग्य मार्गानें, न्यायानें मिळविलेला, संपादलेला. **०खार**-पु. १ स्वतः श्रम करून खाणारा माणूस. २ भंगी; झाडू. 'क्षेत्र मजकूरच्या गल्ल्या हलालखोराकडून झाडून निर्मळ राखणें.' –वाडसमा ३.१२. ३ हलकें काम करणारा माणूस. [फा. हलालखुर्] **हलालखोरी**-स्त्री १ हलालखोराचा धंदा, स्थिति. २ हलका धंदा ३ प्रामाणिकपणा; इमानीपणा. 'तुझे बाबें नरसो दामोधरें हुजूर हलालखोरी बहुत वजा सागितली.' –रा १५.३१. –वि. हलालखोरासंबंधी (भाषा, वश, इ०). **हलालो हरामो**-स्त्री. प्रामाणिकपणा व अप्रामाणिकपणा; बरेंवाईटपणा. –वि बरेवाईट; भलाबुरा 'हलाली-हरामीची गांठ पडली तर यांस मारूं न द्यावी.' –भाब ८१. [अर.]

हलालणें—अक्रि. अतिशय हलणें, हलहलणें. [हलणें]

ह(हा)ला(स)सिणें—क्रि हाणणें. –हंको.' जेणें उरीं हालासि पांपरा। तयाचा चरण वाहामी दातारा।' –माझा ११.१०५.१

हलाहल—न. १ समुद्रमंथनांतून निघालेलें भयंकर विष. 'शंकरें धरिलें हलाहला। तेणें नीलवर्ण झाला गळा।' –व्य. २ सापाचें जलाल विष. (सामा.) जहर, जहाल विष हालाहल पहा.

हली, हलिक—पु नांगऱ्या; शेतकरी; कर्दा. 'जैवि भजे शक्रपाणि हलिक वडा।' –मोवन ४.९२. [सं. हल]

हलीमवाली—पुअव. मोठेधाकटे; उच्चनीच; श्रीमंतगरीब; सरसकट सारेजण. [अर, अहालीमवाली]

हलोहरामो—स्त्री. ठकबाजी; लुच्चेगिरी यांचा अतिरेक. –वि. लुच्चा; लबाड; अप्रामाणिक; भामटा. [हरामी द्वि.]

हलुवट—वि. हलकें. हलुवट पहा.

हलुस्वार—वि. (कु.) हौशी.

हलूमालू—स्त्री. टंगळमंगळ; चालढकल; कांकूं; नानू. –क्रिवि. टंगळमंगळ, कांकूं करीत. हलगोमालगो पहा.

हलेणें—सक्रि. बडविणें; मारणें. 'तरी चाखिता गूळगुळें। माखिलें काजळ काजळें। कां घेपे वेपे शुळें हालया शूळ।' –अमृ ७.५०. 'साउलियेते साबळें। हालया भोय आदळें।' –अमृ ६.४४.

हलेसा—पतिंगा पहा.

हलो—पु. (कु.) रेडा; हल्या.

हलोह(हा)ल—क्रिवि हलफिलाल. हालोहाल पहा. [हिं.]

हल्य—वि. नांगर, नांगरट इ० संबंधी. [सं.] **हल्या**-पु. रेडा; टोणगा. [सं. हल्य; हिं. हेला] **हल्याहल्या करणें**-(कर.) टुमणें लावून काम करून घेणें.

हल्ल—हाल पहा. 'प्राणवल्लभा हल्ल पावल्या.' –अमृत युद्धवर्णन पृ. ५५.

हल्लक-ख, हल्लकी-खी—हलाक, हलाकी पहा.

हल्लर—पु. अगाईगीत; पाळणा. 'अनुहत बालका हल्लर गाती।' –तुगा ४०३५. 'हल्लर गाती यशोदा सुंदरी।' [ध्व. हला!]

हल्ला—स्त्रीपु १ चढाई; छापा; एलगार. 'शिवाजी आपला पुत्र याजवरी हल्ला करावी.' –सभासद १०. २ (ल) आवेशानें झटणें; जोमानें, निश्चयानें एखाद्या कामास लागणें. 'तुम्ही साप्रत लिहिण्यावर हल्ला मांडला हें काय?' [अर. हला] **०हरकत**-स्त्री. १ अडथळा; त्रास; विघ्न; तंटा; बखेडा. (सर्वसामान्यपणें). 'या वाटेनें तुम्ही खुशाल जा, कोणी हल्ला हरकत करणार नाहीं.' 'हा गृहस्थ बरा आहे त्यास रुपये दिले असतां कांहीं हल्ला हरकत करणार नाहीं.' २ (चुकीनें) हिल्ला हरकत. असेंहि रूप आढळतें.

हल्लाळ—हालाहल पहा.

हल्लाळी—वि. मारलेल्या जनावराचें काढलेलें (कातडें); हलाली पहा. याच्या उलट मुर्दाडी.

हल्लीं—क्रिवि. सांप्रत; आतां; यावेळीं. हाली पहा. **हल्लीनाजी**-माजी इ० पहा.

हल्लीसक नृत्य—न. रासक्रीडेचा एक प्रकार. या नृत्यांत एक पुरुष व एक स्त्री अशी माळ लावून चक्राकार फेर धरून नृत्य करतात. अथवा क्वचित् एकच पुरुष असून स्त्रिया मात्र अनेक असतात. –किरातकृत भासाच्या बालचरित नाटकाचा मराठी अनुवाद व त्याची प्रस्तावना, पृ. ५. [सं.]

हल्संधि—पु. व्यंजनाशीं होणारा संधि. उदा० महान्+अहं=महानहम्. [सं.]

हवई(यी), हवाई—स्त्री. १ मोठी चंद्रज्योत (शोभेच्या दारूची). २ एक प्रकारचा बाण (दारूचा). 'हवया गगनातें भेदिती। देव पाहती विमानीं।' –ह २४.१३४. [फा. हवाई]

हवडा—पु. (बायकी) कपटानें गिळंकृत करणें; डल्ला. (क्रि० मारणें).

हवदा—पु. हौदा पहा.

हवन—पु. होम; अग्नींत आहुती टाकणें. 'गुरुवाक्यहुताशीं। हवन केलें।' –ज्ञा ४.१२३. 'अथवणें वेदें केलें हवन। प्रहशांति यथोचिता।' –एरुस्व ५.२२. **हवणें**–सक्रि होम करणें; आहुति देणें. [सं. हु] **हवनी**–स्त्री. होमकुंड.

हवरा—वि. लोभी. हावरा पहा.

हवरा-री—पुस्त्री. पांढरे तीळ.

हवलदि(दी)ल—वि. भयभीत; घाबरलेला; गोंधळलेला. हवालदिलें पहा. [फा.] **हवलदिली**–स्त्री. भीतीची अवस्था; काळजी; चिंता; हवालदिली.

हवशा-शी-सी, हवस, हवसदार—हौशा, हौस इ० पहा. 'मामल्याची हवस कांहीं राहिली नाहीं.' –इमं ६७.

हवळा—पु. हुळा; भाजलेले हिरव्या हरभऱ्याचे घाटे. [सं. होलक]

हवळा—वि. लोभी; अधाशी; हावरा. [हांव]

हवळा—वि. नाजूक; कोमल (व्यक्ति, रचना, प्रकृति, शरीर, झाड इ०). [हळवा]

हवा—स्त्री. १ वारा; वायु; पंचमहाभूतांपैकीं एक. २ हवेचें शीतोष्णमान; प्रकृतीवर परिणामकारक गुणधर्म. ३ आकाशाची पोकळी; अंतराळ. 'पक्षी हवेंत उडतात.' ४ हवापाणी. ५ धुंदी. 'उतरली भरज्वानीची हवा।' –पला. [अर. हवा; तुल० सं. वह्] **०खाणें**–सहल करणें; घराबाहेर उघड्या मैदानांत इ० फिरावयास जाणें. **०खेळणें**–घरांत हवेचा प्रवाह सर्वत्र मोकळेपणें वहाणें. **०दोज**–वि. उंच; गगनचुंबी. 'हवादोज शामीने.' –भाब १८३४.४८ **०फेर**–पु. (गु.) प्रकृति सुधारण्यासाठीं दुसरे ठिकाणीं चांगल्या हवेंत जाणें; हवापालट. **०शीर**–वि. पुरुकळ वारा असलेली; शुद्ध हवा मुबलक खेळते अशी (जागा इ०). **हवाई**–वि. हवेसंबंधी. **हवाई जहाज**–न. विमान.

हवाई—स्त्री. छापा; हल्ला. 'तेथून सडे होऊन रोज फौज येत च लली म्हणजे त्याजवरी हवाई करावयास येईल.' –ख १. २०७.

हवाडी—स्त्री. सुकाणूची मूठ.

हवारू—वि. (गो. व्यापारी नेदभाषा) दोन (संख्या). अवारू पहा.

हवाव—स्त्री. शोभा; रंग. 'सहज रंगें हवावें।' –ज्ञा १५. १६१. 'कैशी बोलाची हवाव।' –ज्ञा ६.१३२.

हवाल—पुस्त्री. (बरीवाईट) चालू परिस्थिति; हालहवाल पहा. (कामकाज, व्यक्ति, देश, स्थान इ० ची). 'वाचून दाखवतील त्याजवरून कच्चा हवाल अथवा ध्यानास येईल.' –दिमरा १.१३३. [अर. अह्वाल]

हवा(व)लदार—पु १ सुभेदाराच्या हाताखालचा मुलकी अधिकारी. २ किल्ल्याचा रखवालदार अधिकारी. ३ इंग्रजी सैन्यांतील सार्जंटच्या तोलाचा अधिकारी (जमादार, नाईक याप्रमाणें); निरनिराळ्या खात्यांतील या पदवीचे अनेक अधिकारी असतात. ४ एक पोलीस अधिकारी. [फा. हवालदार] **हवालदारी**–स्त्री. हवालदाराचें काम; अधिकार इ०. [फा.]

हवालदिल-ली—वि. घाबरलेला; धीर सुटलेला. हौलदिल इ० पहा. [फा.]

हवाला—पु. १ ताबा; काळजी; भिस्त; दुसऱ्याकडे सोपविणें. २ हमी; जामीनकी. –घका ९८. ३ रखवाली; राखण; टाकलेला विश्वास (क्रि० पार पाडणें; उरकणें; चालविणें इ०). 'निजप्रियजनांकडे तरिहि दे हवाला जशी।' –केका १५. ४ मुखत्यारी; जबाबदार ताबा किंवा अधिकार. (क्रि० देणें; घेणें). [अर. हवाला] **हवाला-ली-लें**–क्रिवि. (रक्षणादिसाठीं) स्वाधीन. (क्रि० करणें; होणें; असणें इ०) **हवालणें**–उक्रि. सोंपविणें; सुपूर्त करणें; स्वाधीन करणें; जबाबदारीवर टाकणें; हवाला देणें (कर्ज, काम इ०). 'हें घर बांधण्याचें काम मजकडे हवालून द्या' **हवालत**–स्त्री. सोंपवणूक; जबाबदारी; भिस्त. हवाला पहा. 'अठरा हजार रुपये हवालतीस होते तेही परिहार करून.' –मदरु २.१४. [अर.] **हवाला कपाला-टवाला**–पु. (सामान्यतः) हवाला; हमी इ०. [हवाला द्वि.]

हवावी—स्त्री. (कों.) धांवल्यानें लागलेली धाप; दमा; ऊर्ध्वे. [ध्व. हाः!]

हवि—न होमांत टाकावयाचें (तूप, भात इ०) द्रव्य, पदार्थ; बली. [सं. हविस्] **हवित्रि**–स्त्री. होमकुंड. **हविष्य**–न. १ हवन करावयास योग्य वस्तु; हवि. २ व्रतादि दिवशीं भक्षणीय असा शुद्ध पदार्थ (गोधूम, गोदुग्ध इ०). ३ (ल.) वरील पदार्थ खाण्याचें व्रत, नियम, बंधन. ४ (उप.) नेहमीचो लोकाचाराविरुद्ध किंवा स्वैर वागणूक, वहिवाट, नेम, प्रघात, व्यसन. 'या गांवांत सर्व लोकांस रांडबाजी हें तर हविष्य आहे.' 'घोडयावर बसणें हें त्याचें हविष्य आहे.' **हविष्यान्न**–पु हवि; हविष्य अर्थ १ पहा. २ तांदूळ, गहू इ० धान्य व तूप, दूध इ० हवनीय पदार्थ. ३ हे पदार्थ खाऊन रहावयाचें एक व्रत. [सं. हविष्य+अन्न]

हवेली—स्त्री. १ मोठा वाडा; राजवाडा; मंदिर; मोठें व उंच सुशोभित घर. २ जिल्ह्याचें मुख्य ठिकाण; राजधानी (प्रांत जिल्हा याच्या मुख्य शहराच्या नांवापुढें किंवा मागें जोडून हा

शब्द येतो). ३ राजधानीचे भोंवतालचा भाग; गिर्दे. ४ पुणें जिल्ह्यांतील आंत पुणें शहर असलेला एक तालुका. [फा हवीली] ०दाखल–वि. गृहप्रविष्ट. ' आम्हो हवेलीदाखल जाहलों. ' –रा ६.२८८.

हवेली—स्त्री. (गु.) गुजराथेंतील वैष्णवांचें देवालय. - महात्माजीचे सत्याचे प्रयोग. [फा हवीली]

हव्य—न. १ तूप, भात इ० हवन करावयास योग्य पदार्थ: हवि २ यज्ञयागादि कर्म. [सं] ०कव्य–न. (देवांसाठीं तें हव्य व पितरांसाठीं तें कव्य) देव व पितर यांना हविर्भाग अर्पण करावयाचा विधि होमहवन, व्रत; पूजा, श्राद्धपक्ष इ०. ' त्याचे घरीं कांहीं हव्यकव्य झालें असतां मला बोलावतात. ' ०पाक–पु देवतांसाठीं तयार केलेलें अन्न इ०; होमान्न. ०वाट्–पु. अग्नि.

हव्यास—पु १ उत्कट इच्छा; तृष्णा; हाव; छंद; नाद. २ सोस. (क्रि० घेणें; लागणें). ' दुर्बोधत्वकथनीं ज्याचा सर्वत्र परम हव्यास। ' –मोभीष्म १२.३८ ' या जोशीबुवास पुस्तकसंग्रह करण्याचा हव्यास फार.' ३ उत्साह [अर हवस्; हवें अशी आस] **हव्यासी**–वि. १ सकाम; सतृष्ण. २ नादी; छंदी; सोसबाहुला.

हश(शा)म—न. लवाजमा; परिवार; नोकरचाकर; शिपाईप्यादे; अनुयायी(मोठ्या लोकांचे). [अर. हशम्] ०दरुगाह–पन्हा–वि. ऐश्वर्यसंपन्न. ०नवीश–स, ०नीस–पु. किल्ल्या वरील किंवा सैन्यांतील सैन्याची हजेरी, हिशेब इ० ठेवणारा अधिकारी. [फा. हशमनवीश्] ०निशी–सी–स्त्री. हशमनीसाचें काम, हुद्दा. ' प्रांत बेलापूर येथील हशमनिशी शामजीराम यांजकडे होती. ' –वाडसमा ३ १२. ०फडणवीस–फडणीस–पु. हशमनवीश. **हशमत**–हशम पहा. [अर. हश्मत्] **हशमी**–वि. हशमसंबंधी.

हशा—पु कापडाची किनार, कांठ (शाल, गालिचा, दुलई इ० चा). [अर. हाशिया] **हशेदार**–वि. किनारीदार. ' गाद्या मशलऱ्या हशेदार. ' –वाडबाबा १.११३.

ह(हं)शा—पु. १ मोठ्यानें खो खो हसणें; हास्य. (क्रि० करणें; पिकणें). २ हंशी पहा. ३ लहान मुलांचें हंसणेंखिदळणें. [सं. हस्: हिं. हंशी]

हं ह)शी—स्त्री. हंशा; उपहासात्मक हसणें; विडंबन; मस्करी. (क्रि० करणें; मांडणें). [हिं.] ०खुशी–स्त्री. प्रसन्नवृत्ति; प्रसन्नमर्जी; राजीखुशी. ०खेळी–स्त्री हसणें व खेळणें; मजा; चैन. हशीखेळी–खालीं–नें–मध्यें इ०. (कारक विभक्तींत प्रयोग). [हसणें+खेळणें]

ह(हं)शी(सी)ल—न. (प्र.) हशी(सी)ल. १ सरकार देणें; आकार. २ हेतु; उद्देश; अर्थ; तात्पर्य. ३ टपाल इत्यादीचा खर्च, आकार, किंमत, फी. ४ प्राप्ती; लाभ; नफा. ' साहुकारीमुळें जकातीचेंच हशील होईल. ' –मराआ ३७. –वि प्राप्त. ' पुढें मुद्दे हशील होतील. ' –ख २.५४८. [अर हासिल्]

हंस—पु. १ एक पक्षी. हा मानससरोवराकडे असतो. बदकापेक्षां मोठा व पांढरा असून दूध आणि पाणी एकत्र केलें असतां त्यांतून दूध निवडून पिणारा, जबर उडणारा, पोहणारा पक्षी असा त्याचा लौकिक आहे. बदक; वरट. २ (ल.) जीवात्मा. ' हंसाविणें कुडी. ' –वपा. ३ संन्याशातील एक भेद; परमहंस ४ ब्रह्म; परमात्मा. ५ विष्णु, सूर्य इ० देव. [सं.] ०कंकणी–पु (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. आरोहांत ऋषभ व धैवत वर्ज्य जाति औडुव–संपूर्ण. वादी पंचम, संवादी षड्ज. गानसमय दिवसाचा तिसरा प्रहर ०गति–गामिनी–वि. हंसाप्रमाणें चालणारी (स्त्री). ०ध्वनी–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज. तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, पंचम, तीव्र निषाद हे स्वर येतात. जाति औडुव–औडुव, वादी षड्ज, संवादी पंचम वेळ रात्रीचा पहिला प्रहर. ०नाद–पु हंस, बदक यांचा किलकिलाट. ०पद–न. काकपद (लिखाणांत केलेलें). ' हंसपद देवोनी ओळी। उगें अक्षर रेखिजे मौळी। ' –मुभादि २५.५९. ०पक्ष(हस्त)–पु. नृत्यांतील एक अंगविक्षेप. आंगठा व करंगळी यांशिवाय सर्व बोटें मिटणें (तीं तळहातास न चिकटतील अशीं वांकविणें), आंगठा कोणत्याहि बोटास न चिकटवितां थोडा वांकविणें व करंगळी उभी ठेवणें. ' हंसपक्षी नितबकु ऐसे। भेद सांगतां कथा ठाकैल। '–भाए ४५८. ०पुतळी–स्त्री. गळ्यांतील पुतळीचा एक प्रकार. ' हंसपुतळया तेज कल्लोळ। ' –देवीदासकृत भामावर्णन ६. ०बुद्धि–स्त्री. तीव्रबुद्धि; विषय चटकन आकलन करण्याजोगी बुद्धि; तारतम्य बुद्धि –ज्ञानप्रकाश १७–८–३८. –वि. अशा बुद्धीचा. ०माला–स्त्री. हंसाची रांग, पंक्ति. ०मुख(हस्त)–न. नृत्यांतील एक अंगविक्षेप. आंगठा, तर्जनी व मधलें बोट या तीन बोटांचीं अग्रें एकत्र जुळविणें, करंगळी व अनामिका हीं उभीं ठेवणें. ०वाहन–पु ब्रह्मदेव. ०वाहिनी–स्त्री. सरस्वती. ०क्षीरन्याय–विवेक–पु. दूध पाण्याच्या मिश्रणांतून हंस दूध तेवढें काढून पितो अशी संसजुत आहे त्याप्रमाणें एखाद्या कृत्यांतील दोषाकडे दुर्लक्ष्य करून त्यांतील गुणांचें ग्रहण करणें. **हंसळें**–न (महानु) हंसाचें चित्र काढलेलें, अगदीं पांढरें स्वच्छ वस्त्र. ' गौर्वी मुरळे हसळें। ' –प्रमा ८. **हंसात्मा**–पु. प्राण्याचा जीवात्मा. ' हंसात्मा प्रगट। दावीलें सुभट। सद्गुरु वसिष्ठ। तोचि जाणा। ' **हंसासन**–न.

योगशास्त्रांतील एक आसन. प्रथम मयूरासनाप्रमाणें आकृति करून नंतर पाय मयूरासनांतल्याप्रमाणें अवांत्रीं न धरतां त्यांचीं बोटें जमिनीवर ठेवून स्थिर राहाणें. –संयोग ३४९. **हंसी**–स्त्री. १ हंसाची मादी. २ तिच्याप्रमाणें चालण्याची गति. 'दाखविती गती नानापरी। उष्ट्री नाकुळी हंसी मयूरी।' –जै ४.२२.

हसकार-रा—पु. (बायकी) (डोळ्यांत अश्रु, तलाव-विहरींत पाणी, घरांतील तूप इ० संबंधीं योजतांना) पूर्ण अभाव, नकारघंटा याअर्थी अभावात्मक प्रयोग. 'हा रडतो खरा पर डोळ्यांत पाण्याचा हसकारा नाहीं.' [सं. अस्तिकरण–असणेंकार–असकार?]

ह(हं)सडणें—उक्रि. १ जोरानें हिसका देणें; आंचका मारणें; ओढणें; झटकणें. २ (ल.) (एखाद्यापासून) द्रव्य इ० काढणें; धुतारणें; लुबाडणें. ३ भोसडपट्टी काढणें; खडकावणें; खडसणें. [ध्व.] **ह(हं)सडा**–पु १ जोराचा हिसका, झटका, आंचका (तंगडी इ० चा). २ मृत्युसमयींचा जोराचा श्वास, घोर. ३ (ल.) खरडपट्टी, खडसणी (क्रि० देणें). आसडा पहा.

ह(हं)सणें—उक्रि. १ हास्य, स्मित करणें. २ (ल.) एखाद्यास नावें ठेवणें, खोड्या काढणें, उपहास करणें. ३ (ल.) फुटणें; उलणें (करंजी, गुरवळी लाडू इ०). [सं हसन] **(खापरानें) हसणें**–(चुलीवर ठेवलेल्या) वर जमलेल्या मशीनें पेट घेणें. **हसता नाहीं पोसता नाहीं**–अत्यंत पोरका, गरीब, सुखदुःख देणारा कोणी आप्तेष्ट नसलेला **हसायला आहेत पोसायला नाहीं**–फक्त थट्टा, फजीति करणारे लोक असतात, पोटाला कोणी घालीत नाहींत. **हसत हसत-हसतां हसतां दांत पाडणें**–न रागावतां, चरफडतां एखाद्याची फजीती, पराभव, नाश करणें. **हसत्या बरोबर हसणें, रडत्या बरोबर रडणें**–बारा येईल तशी पाठ देणें. **हसून गोड (साजरें) करणें**–१ दुसऱ्याचा राग, विषाद, शेवटीं गोडगोड शब्द बोलून घालविणें. २ गोड बोलून फसविणें. **हंसतील त्यांचे दांत दिसतील**–लोकांनीं नावें ठेवल्यास त्याची पर्वा न करणें. **आपण हंसे लोकांना शेंबूड आपल्या नाकाला**–दुसऱ्याला ज्या दोषाबद्दल हंसावयाचें तोच दुर्गुण आपणापाशीं असणें **हंसत गौरी-पार्वती-लक्ष्मी**–स्त्री. हसतमुख, आनंदी स्त्री. **०चहाड**–वि. हंसत हंसत चहाडया करणारा. **०मुख**–न आनंदी, हंसरा चेहरा. –वि. उल्लसित, आनंदी वृत्तीचा. **०शिरळ**–वि. १ नखरेबाज, चटकचांदणी (परंतु प्रत्यक्ष व्यभिचारी नाहीं अशी स्त्री). २ मोठमोठ्यानें हंसण्याची खोड असलेला (पुरुष). ३ हंसवून फसविणारा, भ्रष्ट विणारा, भुरळ घालणारा; गोड बोलून केसानें गळा कापणारा. **हंसता**–वि. १ हंसणारा. २ (ल.) हौशी; रंगेल; आनंदी; खेळकर. **म्ह०** 'हसती बायको रडता पुरुष कामाची नाहींत.' **हसती-स्त्री** हास्यविनोद. **हसती(स्ती)दंती भेट ओळख**–स्त्री. न बोलतांना नुसतें परस्परांकडे पाहून हंसून झालेली भेट; फक्त परस्पर स्मित करण्याइतकी ओळख. **ह(हं)सरा**–वि. १ नेहमीं किंवा पुष्कळ हंसणारा. २ खेळकर, आनंदी (मूल इ०). **हंसाबाजी**–स्त्री १ हास्यविनोद; थट्टा. २ मस्करी; टिंगल; उपहास [हिं.] **हसित**–न (न्याय) मुख, नेत्र व गाल हे ज्यामध्यें किंचित विकसित होऊन कांहींसे दांत हि दिसतील असें हंसणें. हसिताचे प्रकार:–अतिहसित, अपहसित, उपहसित, विहसित, स्मित. –मराठी रंगभूमी ३३२. **हसूं-स हंसू-सें**–न. १ हंसणें, हास्य. २ विटंबना, उपहास; फजिती. 'चौघांमध्यें माझें हंसें झालें.' ३ हसण्याचा विषय, हास्यास्पद वस्तु.

हसंती—स्त्री. शेगडी, आगटी. [सं]

हसबी—स्त्री. रुपये इ० भरून घोडयावर घालून गांवांस न्यावयाच्या उपयोगी पडशीसारखी पिशवी [अर.]

हसरा—पु (चांभारी; कों.) चामडे ठोकण्याचा बत्ता. –बदलापूर १८६.

हंसली-ळी—स्त्री. गळ्याजवळचें हाड **०उलटी**–स्त्री. (जंबिया) आपल्या जंबियानें जोडीदाराच्या गळ्याच्या उजव्या बरगडी जवळील खड्ड्यांत वार करणें. **०सीधी**–स्त्री. (जंबिया). वरील डावाचे उलट डाव, उजव्या ऐवजीं डाव्या बरगडीजवळचा वार [हिं.]

हंसहं)ळी, हंसोळी—स्त्री चांदी-सोन्याची लहान सरी; (लहान मुलाचा) गळ्यातील एक दागिना. [हिं हंसली]

हसोक—पु (कर.) अशोकाचें झाड, अशोक. त्याचें फळ, बी. [सं. अशोक]

ह हं)सोळा—स्त्री. एक रानवट फळझाड. **ह(हं)सोळें**–न. हसोळीचें फळ. **हसोळीं खाणें**–अतिशय, बेफाट हंसणें.

हस्कार-रा—पु हंसकार-रा पहा.

हस्त—पु १ हात; कर. २ कोंपरापासून मधल्या बोटाचे टोंकापर्यंतची लांबी; तितक्या लांबीचें माप; चोवीस अंगुळांचें परिमाण. ३ हत्तीची सोंड. ४ तेरावें नक्षत्र (अव. प्रयोग). ५ खांबाचा वरचा भाग व त्यावर पेलले जाणारें ओझें किंवा पाखाडी यांमधील ठोकळा, लांकडी चापट तुकडा. ६ (बुद्धिबळें) एकदां प्यादयास हात लावला कीं तें खेळलेंच पाहिजे अशी खेळाची रीत, प्रकार (विशेषण, क्रियाविशेषण किंवा उद्गारवाचक प्रयोग होतात). [सं.] **०क**–पु १ हात. 'दोन हस्तक व तिसरें मस्तक' यांनीं नमस्कार करणें, एवढेंच काय तें देण्यासारखें राहिलें आहे अशावेळीं म्हणावयाचा प्रयोग. २ मदतनीस, हाताखालचा आज्ञांकित माणूस. ३ एखाद्याच्या सांगण्या-

वरून, चिथावणीनें काम करणारा इसम, गुमास्ता, अडत्या, एजंट **०कर्डे-कडगें**-न हातांतील कर्डे. 'हस्तकडगें देऊनि कौल्लिक मागें फिरविले।' -सप्र ३.७८. **०कौशल्य**-न. हातकसब; हातकामातील नैपुण्य, हातोटी; हाताची कारागिरी; (चित्रलेखन; भरतकाम; विणकाम इ०तील). **हस्तक्रिया**-हस्तक अर्थ २ व ३ पहा. **हस्तक्रिया**-स्त्री. हातकाम; हातानें केलेलें काम (अनुष्ठान, रसायन इ० प्रसंगी). **०गत**-वि. हातांत, ताब्यांत गेलेला; स्वाधीन झालेला; हातीं आलेला; काबीज केलेला; स्वाधीन. **०गुण**-पु. हाताचा गुण (चांगला, वाईट, काम. धंदा औषध इ० प्रसंगीं सुरू करतांना, देतांना). **०चापल्य**-न. हाताची चपळता, हस्तकौशल्य **०दोष**-पु लेखांत, हाताचे दुर्गुणानें आलेली अशुद्धता; असावधानतमुळें हातून घडलेली चूक. **०पदस्त-स्ता**-वि (बुद्धिबळें) एकदां प्यादास हात लाविला कीं तें खेळलेंच पाहिजे, किंवा एकदां एखादें प्यादें एखाद्या जागीं नेऊन बसवलें कीं तेथेंच ठेविलें पाहिजे अशा कडक नियमानें खेळावयाचा प्रकार, पद्धत ज्यांत आहे असा (खेळ, बाज). -क्रिवि. वरील नियमाप्रमाणें (क्रि० खेळणें). [हस्त=हात+पग=पट+फा. दस्त-हात] **०पत्रक**-न थोडक्यांत माहिती देणारें पत्रक; प्रसिद्धीपत्रक; जाहिरात. **०परीक्षा**-स्त्री. हातानें स्पर्श करून, हात पाहून रोग, भविष्य इ० सांगणें. **०पाद**-पु खांबाखालील व वरील भाग; पिंडें आणि तळखडा. [हात+पाय] **०मात्रा**-स्त्री. हातातील कडी, तोडा इ० अलंकार. 'हस्तमात्रा कर्णमात्रा। कृष्णामी वोपिल्या विचित्रा।' -एरुस्व १५.१४९. [सं.] **०मिलाफ**-पु हस्तादोलन; (इं.) शेकण्यांड. **०लाघव**-न. १ हस्तकौशल्य. २ हाताचा हलकेपणा; हस्तचापल्य. **०शाखा**-स्त्री.अव. हाताचीं बोटें. 'महाकर्कशाकार ताराच देखा। क्षणें लागतां खंडल्या हस्तशाखा।' -मुरायुद्ध १८०. **०संकोच**-पु (हात आखडणें), कृपणपणा, चिक्कूपणा. **०सामुद्रिक**-न हातांवरील रेषा पाहून भविष्य सांगण्याचें शास्त्र. **हस्तागौर-री**-स्त्री. हस्तनक्षत्रीं हत्तीवर बसविलेली गौरीची मूर्ति. हिचें व्रत असतें त्यास **हस्तागौरीव्रत** म्हणतात. हत्ती, शंकर, पार्वती, गणपती या चार मूर्ति सोन्याच्या करून त्यांची चौदा दिवस पूजा करून समाप्तीच्या वेळीं हत्तीसह त्या मूर्ती ब्राह्मणास दान देतात. -गजगौरीव्रत. **हस्तांतर**-न. हाताचें अंतर. (ल.) भिन्नपणा. 'तैसा मीचि अज्ञानद्वारें। दिसे परी हस्तांतरें।' -ज्ञा १८.११२८. **हस्ताक्षर**-न. १ स्वतःच्या हातचें, स्वतः लिहिलेलें अक्षर. २ स्वतःची सही; स्व क्षरी. **हस्तें**-क्रिवि. १ हातानें. २ तर्फे; मार्फत; करवीं. (देणें; घेणें इ०). 'राघो नारायण यांजकडील जमा रुपये हजार हस्तें दाजीबा।' **हस्तें परहस्तें**-क्रिवि. स्वतःच्या हातानें किंवा (व) दुसऱ्याकरवीं; प्रत्यक्ष अथवा (आणि) अप्रत्यक्ष. **हस्तोदक**-न १ हातावर घ्यावयाचें पाणी. २ जेवणाच्या वेळीं संन्याशाच्या हातावर घालावयाचें पाणी. ३ दान देण्याच्या प्रसंगीं उदक सोडण्यासाठीं हातांत घ्यावयाचें, हातावर सोडावयाचें पाणी. 'तो तूं परब्रह्मचि असावें। मज देवें दिधलासो हस्तोदकें।' -ज्ञा १०.३२२. ४ हस्तनक्षत्रीं पडलेला पाऊस. **हस्त्य**-वि. हातासंबंधीं; हातचें.

हस्तबूद-पु सारा. -वि. मुलकी; वसुली. 'शिंद्याचे हस्तबूद अमल चालू लागले.' -ख ८.४०४६. [फा.]

हस्तमुख-वि. हसतमुख पहा.

हस्ता-पु. १ हत्ती; एक जनावर. २ हस्त नांवाचें १३ वें नक्षत्र [सं हस्तिन्] **०दंत, हस्तिदंत**-पु. हत्तीचा दांत; (सामा.) हत्तीचें हाड. याचे पुष्कळ जिन्नस होतात. **०दंती**-वि. हत्तीच्या दातांसंबंधीं, दांतांचें केलेलें (फणी; बुदबळें; इ० जिन्नस). **हस्तिनी**-स्त्री. १ हत्तीण. २ स्त्रियांचा एक वर्ग. यांतील स्त्रिया खादाड असतात, स्त्रियांची कनिष्ठ जात; लठ्ठ व फार कामुक स्त्री **०मद**-पु हत्ती माजला म्हणजे त्याच्या गंडस्थळांतून वाहणारा एक प्रकारचा रस. **०मेह**-पु. एक प्रकारचा लघवीचा रोग व तपली लघवी, प्रमेह पहा. **०शुंडा**-स्त्री. हत्तीची सोंड.

हस्ती-पु. (चांभारी) चामडें ठोकण्याचें हत्यार.

हस्तोना-पु (कातकरी) प्रेत ठेवण्याच्या जागेवरील धोंडा. -बदलापूर १२२.

हस्त-क्रिवि. प्रमाणें. [अर. हस्ब्] **हस्बुल्हुकुम**-क्रिवि. तपशीलाप्रमाणें. **हस्बुहुकूम**-पु. आज्ञापत्र. 'सुरजमल व माधोसिंग यांस हस्बुहुकुम व जयाप्पास खिलत वगैरे पाठविणें.' -रा ६.३९.७. -क्रिवि. आज्ञेप्रमाणें.

हस्मासुस्मी-स्त्री. (कर.) गर्दी, कोंडमारा. (क्रि० होणें).

हं हं-स्त्री. हां, हूं पहा. (क्रि० करणें). -उद्गा. अवधानदर्शक उद्गार, हो हो! (क्रि० करणें; हगणें). [ध्व.]

हहह-उद्गा. हा, हा, करून मोठ्यानें हसण्याचा ध्वनि. [ध्व]

हळ-स्त्री. कढत वाऱ्याचा झोत, झळ.

हळ-पु १ हाळ, लांबट चर. २ (व.) विहिरीजवळील गुरांचें पाणी पिण्याचें लांबट टांकें, हौद. हाळ पहा.

हळ-स्त्री. हाळ पहा.

हळ-पु. नांगर. [सं. हल]

हळभायी, हळहाई-स्त्री. अंगाईगीत. [अंगाई गीतांतील पहिल्या शब्दावरून]

हळकर्णे—अक्रि. (कों.) हडकणें; बाळणें; कोरडें व हलकें होणें; सुकणें. [हळका]

हळका, हळकावर्णे—हलका, हलकावर्णे इ० पहा.

हळकुंड—हळद पहा.

हळखळ—स्त्री. (गो.) हळहळ.

हळजर्णे—अक्रि. (महानु व.) बाळंत होणें. 'सुना हळजती तरी लेकच होती।' –अज्ञातच ५७.

हळद—स्त्री. एक झाड; याचें मूळ, मुक्यापासून तयार केलेली पूड; हळकुंड. [सं. हरिद्रा; प्रा. हलिद्द] **म्ह०** पी हळद आणि हो गोरी=उतावीळपणाबद्दल योजतात. 'आजपर्यंत लोकांनीं जीं मोडमोठालीं कामें उरकलीं, तीं लागलीच पी हळद हो गोरी या न्यायावर उरकलीं नाहींत.' –निचं (वाप्र.) **०उतरणें**–लग्नांत वधूवरास लाविलेली हळद मंगलस्नान घालून समारंभानें काढून टाकणें. –ऐरापुविवि १४९. **०काढणें**–(क.) बाळंतपण, लग्न इ० उरकल्यानंतर त्यांतून मोकळीक देण्यासाठीं स्नान घालणें. 'आज हळद काढावयाची आहे तेव्हां गूळपोळ्यांचें जेवण आहे.' **०खेळणें**–(कन्हाड) विवाहांत नवरानवरींनीं स्नानाचे वेळीं एकमेकांवर हळद उडविणें. **०लाग(ा)णें**–१ (विवाहाचे वेळीं वधूवरांस प्रथम हळद लावून मंगलस्नान घालतात त्यावरून) विवाह संस्कार होणें २ वैभवास, मानमान्यतेस चढणें; भाव वाढणें. ३ (ल.) दुर्मिळ होणें. 'हल्लीं भाद्रपद महिना, भटांना काय हळद लागली आहे: तेव्हां आम्हीं पक्ष लांबविला.' **हळदीचा डाग लागणें–विटाळ होणें**–लग्न झाल्यावर थोडेच दिवसांत नवरा किंवा बायको मरणें. **हळकुं खुं)ड**–न. हळदीच्या मुळाचें कुडें; (गो.) हळकुटा [हरिद्राखंड] **म्ह०** अर्ध्या हळकुंडानें पिवळे होणें=थोड्याशा यशानें, प्राप्तीनें, गर्वानें ताठून जाणें. **हळकुंडासाठीं लग्न मोडणें**–एखादी क्षुल्लक बाब न जुळल्यामुळें मोठें कार्य जुळत आलेलें असून तें मोडून टाकणें **हळदकुंकू–विडे, हळदा कुंकू–विडे**–न पुअव. चैत्रांत किंवा नवरात्रांत सुवासिनी स्त्रियांनीं परस्परास व कुमारिकांस वांटावयाचें सौभाग्यदर्शक हळद व कुंकू आणि विडे देणें व ओट्या भरणें इ०. समारंभ. 'शेजारच्या मुली आपल्या सासरीं जाऊं येऊं लागल्या म्हणजे पुष्कळ वेळां सरोजिनिला हळदीकुंकू करण्याची पाळी येई.' –झामु. **हळदवर्गी**–पु. (कु.) एक प्रामाचार. **हळद लेकूरवाळी**–स्त्री. एक प्रकारचें फांया फुटलेलें हळकुंड. हें शुभ मानतात व लग्नांत घाण्यासाठीं घेतात. **हळदिवा–दुवा**–वि. हळदीरंगाचा; पिवळा. [सं. हळद+इव] **हळदीचा गाभा**–पु. अत्यंत सुंदर रंग, अंगकळा **हळदुली**–स्त्री हळद लावण्याचा समारंभ. 'उटिलीं वधूवरें हळदुली स्वानदें।' –एकनाथ. **हळदुटणें–हळदुण**–न. (तंजा.) सुनमुखानंतर वधूवर परस्परांस हळदकुंकू, पानसुपारी इ० देतात तो समारंभ. [हळद+उटणें] **हळदेमाळी**–पु. हळद पिकविणारा माळी. **हळ्या**–पु. १ कांवळी सारखा एक रोग (माणूस, झाड इ० स होतो). २ एक जातीचें विष. ३ मधाच्या पोळ्यांतील पिठासारखा एक पिवळा पदार्थ.

हळवें—न. एक गोड पांढरें मूळ.

हळव—पु. (बे.) सनदी शिपाई. [का. हळब=म्हातारा शिपाई]

हळवट्या—वि. गोड व मनमिळाऊ स्वभावाचा; गोडबोल्या.

हळवट—वि. १ हळवें; लवकर पिकणारें (एक प्रकारचें धान्य). २ मऊ, गोड (व्यक्ति, स्वभाव) ३ नाजूक; कोमल (प्रकृति, शरीर, रचना). ४ भिकार; खराब; हलकी (शेतजमीन). [हळू+वट प्रत्यय] **०बुद्धाचा**–वि. अल्पज्ञ; उथळ बुद्धीचा. **०भुकेचा**–भूक सहन न होणारा. **हळवा, हळा**–वि. १ इतर सजातीयापेक्षा लवकर पिकणारें (धान्य); याचे उलट माहान्. २ असलें धान्य पेरण्यास योग्य किंवा परलेली (जमीन). [हळू]

हळवा—पु एक खाऱ्या पाण्यांतील मासा.

हळ(ळु)वार—वि. १ अरुवार; नाजूक; कोमल; फार श्रम सोसण्यास असमर्थ; हलका; मृदु. २ हलका; खुपखुशीत; उंची; श्रीमंती (कपीक, तूप इ० चें पदार्थ, पक्वान्न). –क्रिवि नाजूकपणें. **०णें**–अक्रि नाजूक होणें; हळकें होणें. 'जें यमदमीं हळुवारलें। आइतें होतें।' –ज्ञा ४.१३५ **०पण**–न हलकेपणा; सूक्ष्मपणा. 'अति हळुवारपण चिता। आणुनिया।' –ज्ञा १.५७; ६.२६ ? [हळू+वार]

हळवी अंबेमोहोर–गौरी—स्त्री. एक जातीची नाचणी (धान्य).

हळवें—न. नागरंबमीचे पूर्वी पिकणारें किंवा इतर सजातीयापेक्षा लवकर निघणारें तांदूळ, सावा, वरी इ० धान्य, पीक. [हळवा]

हळ(ळी)स—पुन. नांगराचा दांडा. [सं. हल+अंस–आस]

हळसांदें—न. (गो.) चवळी सारखें तांबूस रंगाचें एक धान्य; अळसंदा. [का. अळसंदी]

हळहळ(हा)ळ—स्त्री. १ हुरहुर; चिंताची अस्वस्थता; अस्वास्थ्य; मोठी काळजी (शारिरीक, मानसिक). (क्रि० लागणें, वाटणें; करणें). 'न हों भक्तीचें बळ। तंवचरी हळहळरे हळहळरे।' २ खेद; पश्चात्ताप. (क्रि० लागणें; करणें). ३ चिंता; त्रास; दगदग. [सं. हलहल किंवा हरहर!] **०खळखळ**–स्त्री. चिंता आणि त्रास; हळहळ पहा. **हळहळणें**–अक्रि. हुरहुर वाटणें; खेद, शोक करणें; त्रस्त असणें. **हळहळाट**–पु. हाहाःकार; थयथयाट. 'अळें नोहे प्रळय अवाट। कीं प्रळयरुद्राचा हळफळाट।' –नव ४.८१. **हळहळीचा माल**–पु. विकणाराच

फार मनस्ताप देणारा पीडादायक माल. **हळहळीत**-वि. अस्वस्थ; चिंताग्रस्त; त्रस्त.

हळहळ—वि. (व.) कोमट (पाणी, शरीर इ०). 'आंग हळहळ लागतें.'

हळा—वि. हळवा पहा.

हळा—पु. (कु.) पोफळीची विरी; झावळीच्या बुडख्याशीं असणारें विरविरीत वेष्टन.

हळाखळ—स्त्री. १ अस्वास्थ्य; बेचैन; हळहळ पहा. २ (अव. प्रयोग-हळाखळा) तळतळाट, जुलूम झालेल्या लोकांचे शिव्याशाप. (क्रि० येणें) **हळाखळीचा माल**-हळहळीचा माल पहा.

हळाहळ, हळाळ—न. हालाहल विष; कालकूट. 'हळाहळ आगी पियालें।' -ज्ञा ११.३५८. [सं. हालाहल]

हळी—स्त्री. १ टोपली; रोवळी; हाळ. २ डोईंतील एक बायकी दागिना. ३ (गो.) मोगरीच्या फुलांची वेणी.

हळु-ळू—वि. १ हलका; अजड. २ हळक; मोकळें. 'डोळे काढले कपाळ हळू झालें.' ३ (इतर अर्थी) हलका पहा. [सं. लघु=लहू-हळु] **हळु-ळू, हळूहळू, हळूच-कण-कन-कर-दिशी**-१ सावकाश; हलकेंच; आस्ते; मंदगतीनें. २ सहज; सौम्यतेनें (बोलणें, चालणें, हलणें, वागणें). **म्ह०** (व.) हळु बोल्या गोंधळ घाल्या-हळूच चुगली खाऊन कलागत लावणारा. **हळुमळ-माळ-वार**-वि. नाजूक; मऊ; कोमल (व्यक्ति, प्रकृति, फूल झाड इ०). अरुंवार पहा **हळुवट**-वि. १ (काव्य) साधारण हलकें, मऊ, नाजूक, सौम्य. 'उपमे तुळितां निर्जर नगर। चढे हळुवट आकाशीं।' २ क्षुद्र; क्षुल्लक; तिरस्करणीय. ३ हळवट पहा. ४ लहान; लघु. 'श्रीगुरु ते वस्तु घनवट। लघुते बोलिजे हळुवट।' ५ उणें; न्यून **०घाय**-क्रिवि. (गो.) हळुहळू. **हळुवें**-वि. हलकें.

हळोंदा—पु. अळसुंदा; हळसुंदा पहा.

हळ्या—पु एक प्रकारचा तवा.

हळ्ळीगाडा—पु. (बे.) मोठ्या चाकांचा गाडा.

हा—सना. १ पुल्लिंगी दर्शकसर्वनाम. व्यक्ति किंवा वस्तु यास उद्देशून योजलेला शब्द. 'या कृष्णेनें तेव्हांपासुनि केवळ ऋषीच हा केला।'-मोउद्योग ५.१२. २ अविलंबिता, तात्कालिक क्रिया दर्शविण्यासाठीं हें सर्वनाम योजतात. 'तुम्ही पुढें चला हा मी मागून येतों.' ३ स्वतः, खुद्द याअर्थी. 'मी हाच आलों-येईन.' [सं एषः; प्रा. एसओ-अपभ्रंश एहो] **०ठायघरी-ठावोवरी**-क्रिवि. येथवर. 'हा ठावोवरी वियोगा भेटें।' -अमृ १.६.

हा—उद्गा. १ एकदम, एकाएकीं प्रतिबंध, विरोध करतांना निघणारा उद्गार. २ शोकदर्शक उद्गार, हाय! हाय! 'वनोवनिं फिरा पिशापरि म्हणा अहोरात्र हा।'-केका ८१. ३ (पांखरें इ०) हाकलतांना काढलेला उद्गार. 'दाजिबा हा-हा-हा-हा करी।' -मायदेव. [ध्व.] **०कपाळा**-उद्गा. (कपाळावर हात मारून काढलेला) शोकाचा उद्गार. हायरे! देवा! 'मी कां तशीं आणिन हा! कपाळा!' -आशावरी १४. **०कार**-पु. हाहाःकार, शोकध्वनि. 'तों आकार धिकार देखुनि उठे हाकार माडीवरी।' -आसी ३४.

हा—क्रि. (कु. गो.) आहे. [आहे-हाय-हा]

हां—उद्गा. १ मान्यता, कबुली, रुकार इ० दर्शक अव्यय; होय. 'जाशील का म्हणून विचारिलें तेव्हां हां म्हणालास आतां कां नाहीं म्हणतोस.' २ अकल्पित आनंद, थोडें आश्चर्य, समाधान इ० दाखविण्याचें अव्यय. 'हां! आतां श्लोक लागला.' 'हां गा सूर्य काय शिळा।' -ज्ञा १०.२०१. ३ दुःखोद्गार, वेदनादर्शक उद्गार. हाय! (क्रि० म्हणणें). ४ इषारा देणें, सावध करणें, जागें करणें, धमकी देणें इ० अर्थी उद्गार. 'हां! खबरदार पुढें बोललास तर.' 'तंव सात्यकी बोलिला। हां गा अे शिशुपाळा।' -शिशु ८६४. [ध्व.]

हांहुई—उद्गा. हायहूय पहा.

हांईस येणें—अक्रि. थकणें; जेरीस येणें. हाय, हायास येणें पहा. [हाय]

हाउली-ळी—स्त्री. (महानु.) समूह. 'जिणौनि अन्य साधनांची हाउळी।' -ज्ञाप्र ७३९; -भाए ६३८. [सं. आवलि?]

हाऊ—पु. (कु.) बाऊ. 'पडशावी तान्हा हाऊ आला।' -तुगा ३५५७. [ध्व. आऊ]

हा(हां)क—स्त्री. १ आरोळी; नांवाचा मोठ्यानें उच्चार; बोलावणें. (क्रि० मारणें). २ मोठ्यानें ओरडणें; बोंब, आरडा करणें. 'सभेमाजिं रायापुढें हाक गेली।' -राक १.४. ३ दुलौकिक; सार्वजनिक चर्चा; हाकाटी. ४ आरोळी ऐकूं जाईल इतकें अंतर. 'वाटेवर हाक हाकेवर चौक्या होत्या.' ५ विक्रेणारानें आपल्या मालाची पुकारलेली किंमत. (यावरून) त्यानें जबर किंमत मागणें. 'पेठेंत तांदळाची हाक दाहा रुपये फरा असी आहे.' 'जिन्नस पुष्कळ येतांच वाण्याची हाक कमती झाली.' ६ (ल) उपदेश. 'बा! हाणिली सुरभिला जेंवि तुज्या तेंवि लात हांकेला।' -मोशल्य १.१०. ७ बडबड; आरडाओरड. 'तुमच्या होणार काय हाकानीं।' -मोउद्योग ८.७९. [हिं. प्रा. हक्का] **०देणें**-१ हाक मारणें. २ ओ देणें, बोलावल्याबरोबर येतों म्हणून धांवून येणें. ३ उपयोगी

पडावयास किंवा गरज भागविण्यास तयार होणें. **०फोडणें**–मोठ्यानें दुःखोद्गार काढणें; मोठ्यानें हांक मारणें; टाहो फोडणें. –मोआदि २. **०मारणें**–१ बोलावणें, हाका मारणें. २ कार्य करणें, पाड लावणें. 'मद्गति हे अन्याचें येथें मारील काय हाक बळ।' –मोवन ६.३. **हाका मारणें**–१ ओरड करीत वसणें; चरफडत राहणें, केलेल्या चुकीबद्दल दुःख भोगीत बसणें, दुसऱ्याचे नांवाचा बभ्रा करणें, मोठ्यानें तक्रारी करीत सुटणें. 'कां न तुम्हींहि परिसा मारित आलों अशाचि हाका मी।' –मोउद्योग ११.५१. २ काम अपुरें पडून राहणें; प्रगति खुंटणें, बेत, कार्य इ० फिसकटणें. **हाक ना बोंब**–१ बिनबोभाट; तक्रार, नाखुषी इ० न दर्शविणें. २ केलेली ओरड, तक्रार एखाद्याचे कानीं जावयाची मुष्कील, अशक्यता. **हाक बोंब–म**–स्त्री. आरडाओरड; हाकाटी; गलबला. **हाकटणें**–उक्रि. १ मोठ्यानें बोलावणें, एकानें किंवा अनेकांनीं एकास किंवा अनेकांस, जोराजोरानें हांक मारणें. –वामनराधा ५३. २ डांगोरा पिटणें; बोभाटा करणें. **हाकणें**–उक्रि. १ पशूंना लवकर जाणे इ० करितां शब्द, काठी इ० नीं नेटानें चालविणें; त्यांना काढून लावणें, पिटाळणें, पुढें ढकलणें. २ संसारादि खटले कसेहि करून चालविणें, रेटणें. ३ अतिशयोक्ति दिसायाजोगी किंमत, बातमी, गप्प सांगणें, झोकणें. **हाकलणें**–सक्रि हाकणें पहा. **हकारणी, हाकारणी**–स्त्री. (जहाज इ०) चालू करण्याची क्रिया. **हाकरणें, हाकारणें**–क्रि. गलबत, नाव इ० चालू करणें, त्यांस गति देणें. २ गलबत चालू करण्याकरितां त्यांचें शीड वाऱ्यावर पसरणें. ३ बैलांचा तांडा, प्रवासी यांना प्रवास करण्यास सांगणें. ४ एखाद्या कामगिरीवर जासुद, नोकर पिटाळणें, दवडणें. ५ घोडा इ०कांस जलद चालण्याबद्दल इशारा देणें, दौड करावयास लावणें. **हाकावणें**–उक्रि. (प्रा.) हाकणें १ अर्थ पहा. **हाकहूल**–स्त्री. आरडाओरड; हांकाटी, दंगा. [हिं.] **हाका**–पु (बडोदें) शिकारीचें जनावर दडलेल्या ठिकाणाहून हुसकविण्यासाठीं केलेली ओरड; हाकारा. (क्रि० करणें). 'हाका सुरू जाहला वाघ निघून गेला।' –गापो २३. हाका करणाऱ्यास **हांक्या** किंवा **हांकेवाला** म्हणतात. –गापो २३. **हाकाक, हाकाहाक**–स्त्री. १ हाकहूल पहा. २ तक्रार; ओरड. 'कोणा ग्रंथकाराची लेखणी भाषेच्या कोतेपणामुळें थांबली अशी हाकाक अजून कोणाच्या कानीं नाहीं.' –नि २०१. **हाकाटा–टी**–पुस्त्री. १ अनेक हाकांचा; आरोळ्यांचा आवाज; गलबला; गोंधळ. २ एखाद्याचे विरुद्ध ओरड; बोभाटा; तक्रार. ३ हवी असलेल्या वस्तूसाठीं जोराची मागणी. ४ ओरड; दंगा; गोंधळ; कल्ला. ५ कुप्रसिद्धि; डांगोरा. **हाकटयाचा**–वि. विद्वत्ता, धन इ० असण्याबद्दल प्रसिद्ध; नांव, कीर्ति झालेला; अक्कन्याचा. **हाकारणी, हाकारणें**–हकारणी–णें पहा. **हाकारणें**–सक्रि. १ ओरडून हांक मारणें; बोलावणें. २ शीड उभारून गलबत चालू करणें; शीड उभारणें; हकारणें. ३ चालू करणें; गती देणें. **म्हण०** आषाढी आणि सण हाकारी. **हाकारा**–पु १ हाकाटा पहा. बोलावणें. 'नवखंडीचिया राया हाकारा केला।' –संतराजीरूख १३. ५. २ दवंडी. ३ दरारा. ४ (नगरी) बोभाट. **हाकालणें**–उक्रि. हकालणें पहा. **हाकाहाक–की**–स्त्री. १ अनेक हाकांचा मिळून झालेला आवाज, यानें त्याला, त्यानें याला याप्रमाणें हांक मारणें; यामुळें झालेला गोंधळ. २ सर्वसामान्य सर्वत्र ओरड; हाकाटी; उदा० पावसाची–पिकाची–पाण्याची–हांकाटी; जुलमाविरुद्ध ओरड; उदा० कोतवालाची–मामलेदाराची–हांकाटी. ३ बाजारांतील जिन्नसांची चढीची किंमत इ०; किंवा जिन्नस संपल्यानें होणारी हांका मारण्याची अवस्था; दुर्भिक्ष.

हाक, हक्क—पु. हक्क पहा; तेथेंच सामासिक शब्द पहा. 'तुका म्हणे तरी म्हणवावें सेवक। खादलें तें हाक अन्न होय।' –तुगा ३६१३.

हाकम, हाकमाई, हाकमी—हाकीम इ० पहा.

हाकाल–ळ—क्रिवि. अद्याप; आतांपर्यंत; या वेळेपर्यंत. मयःदेपर्यंत, पावेतों, वरी. इ० शब्दार्थी हि हा शब्द जोडला जातो. [हा+काल] 'तूं हाकाल खोटें बोलला नाहींस.' 'मीं हाकालपर्यंत तुझें वाईट केलें नाहीं.'

हाकिकत, हाकिकतनामा— हकिकत इ० पहा.

हाकी(कि)म—पु. देश, सुभा, परगणा, शहर यावरचा मुख्य अधिकारी, (मामलेदार, मोकाशी इ०). –रा ६.२९७. [अर. हकम्] **०शारा**–पु. धर्मशास्त्री. –रा १८.२१. **हाकिमी, हाकिमाई**–स्त्री. नगरचें–परगण्याचें अधिपत्य; हाकिमाचा हुद्दा व काम.

हाकीम—पु. वैद्य; हकीम. –वामनविराट ६.५७. [अर. हकीम्]

हाग, हागओ(व)क, हागणें, हागंदरी, हागमूत, हागरड, हागरडा, हागरा, हागरो, हागरें, हागवण, हागवणकर, हागार, हागिरडा, हागुरडा—हग, हगओक पहा. **हागदोडी**–स्त्री. (व.) उकिरडा.

हांग—उद्गा. छान! वाहवा! [ध्व.] 'आनंत्या बोलिला हांग असा माझा भाई।' –ऐपो ७०.

हांगा—अ. (गो.) येथें. हंग पहा. **०सर**–क्रिवि. (गो.) येथवर. **०सलुं**–वि. येथलें.

हांगाडेंगी—स्त्री. (व.) हयगय; दुर्लक्ष. [हांग द्वि.]

हागे—पुअव. लुटारू. –हरिवंशाची बखर २७.

हागोडा—वि (ना.) हगिरडा पहा. **हागोडें काम**–न. (ना.) अव्यवस्थित, अपूर्ण काम.

हाज—स्त्री. पर्वताचे कडयाखालील जागा, रस्ता.

हाज, हज्ज—स्त्री. मक्केची यात्रा. [अर. हज्ज]

हाजत—स्त्री. जरूरी; अडचण. 'परशुरामपंत यांस बिलफैल इंग्रजांचे तंबीकरितां आणवावे ऐसी हाजत नाहीं.' –रा १९. १०६. [अर. हाजत्]

हांजा—पु लांझा पहा.

हांजा—पु. (नाविक) लांकडी बोंबास शीड अडकविण्यासाठीं त्याचे शेंडयावरील भोंकांत भरून घेतलेली दोरी.

हाजिबा, हाजिमा-म्मा—पु हजिम्मा पहा.

हाजिरी—स्त्री. १ हजर असणें; प्रत्यक्षता; विद्यमानता; उपस्थिति. २ हाजिरी घेणें. ३ उपस्थितीची नोंद. (क्रि० घेणें). ४ अशा नोंदीची वही; रजिस्टर; मस्टर. [फा.] **०खरडा-पट-पत्रक-बंद्-याद्**-पुनस्त्री. हजिरी नोंदण्याची वही. **०ग(गि)णती**-स्त्री. (सैन्याची) मोजणी; मोजदाद. **हाजिरा हाजिरा**-क्रिवि. विश्रांती घेत घेत; दम खात (हमाल, जनावरें इ० नां वाहतूक करतांना). [हाजीर द्वि.]

हांजी—उद्गा. हां! जी!; कोणी बोलत असतांना ऐकलें असें विनयानें उत्तर देताना उच्चारावयाचा शब्द. [हां! जी! हिं.] **०हांजा**–स्त्री खुशामत; पुढें पुढें करणें. (क्रि० करणें, म्हणणें).

हाजी—पु. मक्केची यात्रा करून आलेला मुसलमान. [अर. हज्ज=मक्केची यात्रा]

हाजीर—वि. उपस्थित; विद्यमान; हजर. [अर. हाझिर्] **म्ह०** हाजीर तो वजीर=वेळेला जो कोण असेल त्याचें काम साधणें. **०जबाब-जाब**-पु. त्वरित उत्तर; समयसूचक उत्तर. –वि त्वरित उत्तर देणारा; समयसूचकता असलेला. [फा.] **०जबाबी-जाबी**–वि. हजीर जबाब अर्थ २ पहा. [फा.] **०जामिनकी**–स्त्री. हाजीरजामीनाचा हुद्दा व काम. **०जामीन**–पु. नेमलेल्या वेळीं आरोपीस (कोर्ट इ० त) हजर करण्यासाठीं घेतलेला ओलीचा माणूस; हमीदार. **०निशी**–स्त्री हाजीरनीसाचें काम व हुद्दा. [फा.] **०नीस**–पु. सैन्याची हजेरी घेणारा व तत्संबंधीं कामें करणारा अधिकारी. [फा.] **०बाशी, हाजरबाशी**–स्त्री. वास्तव्य; मुलाजमत. 'दरबारीं हाजरबाशी करून सरकारची दौलतखाई चिंतीत आहों.' –चिरा ३५. [फा.] **०बिगार**–स्त्री. तयार ठेवलेल्या बिगाऱ्यांकडून केलेली सामानाची वाहतूक. [हिं.] **०बिगारी**–पु. हजीरबिगार करणारा बिगारी, माणूस. [हिं.] **०मजाल(लो)स**–स्त्री. १ खटला ऐकावयाची दिवाणाची कचेरी; न्यायमंदिर; दरबार. २ अशा कोर्टे-दरबारांतील सभासद. ३ कोणत्याहि प्रसंगीं हजर असलेली सर्व मंडळी, समाज. ४ मामलेदार, मुन्सफ वगैरे तक्रार ऐकणाऱ्या सरकारी अधिकाऱ्याकडे केलेली लेखी तक्रार, अर्ज. –क्रिवि. १ भर न्यायकचेरीत, प्रत्यक्ष; सभेसमोर; सरकारी कोर्टापुढें. २ जगासमोर; लोकांपुढें; चारचौघांसमक्ष. 'मी तुला घरांत सांगणार नाहीं हाजीरमजालीस कायतें सांगेन.' **हजारमजालिसीची याद**–स्त्री. सभेंतील जमलेल्या सर्व लोकांच्या सह्या घेतलेला कागद, निकालपत्र. **हजेरीची फौज**–स्त्री. नेहमींचें खडें सैन्य.

हाजुमा—स्त्री. दाट मैत्री; घरोबा. –शर. [अर. हज्म]

हाट—पु. (बे.) स्त्रियांचा मासिक रजःपात; विटाळ. [का. हाटु]

हाट—पु. बाजार; विशेषतः फिरता बाजार; जत्रा. [सं. हट्ट; का. हट्टि] **म्ह०** हाट गोड किंवा हात गोड=पक्वान्नास स्वादिष्टपणा बाजारच्या पदार्थांनीं येतो कां सुग्रणपणानें येतो? **०कर-करी**–वि. बाजारकरी; बाजारचा. 'हाटकरी सकळ जन।' –तुगा ४२५७. **०गाणें**–न. बाजारांतील गाणें. 'केवळ सत्त्वशुद्धीविण। जाहल्या गुरुवाक्यांचें श्रवण। तें हाटगाण्या ऐसें जाण। अनोळखपण स्वस्वरूप।' –एभा १३.१६५. **०चोहोटा**–पु. (महानु.) बाजारांतील चौक; भरबाजार. 'हे हाटचोहोटा बोलावे।' –सुपा वि. १.५२. **०धारण**–स्त्री. (महानु.) बाजारभाव. 'कीं संभोग-सुखाचिअे हाटधारणे।' –शिशु ४७. **०बाजार**–पु १ सामान्यतः बाजार; बाजारहाट. २ जिन्नसखरेदी. 'सकाळपासून हाटबाजार केला आणि आतां शेरभर अन्न आणलें.' **०वका**–पु. (महानु.) बाजारांत घेतलेलें प्रमाण. –शर. **०वट**–पुस्त्री बाजार; बाजारांतील दुकान; बाजारपेठ. 'उत्तर-दक्षिण कासारांची हाटवटी।' –रुक्मि ११४. 'कीर्तन केलें पोटासाठीं। देव मांडिले हाटवटीं।' –दा ५.८.१९. **हाटकेवयाचा**–वि. बाजारांतून आणलेला (माल). 'वामनभटी हाटकेवयांचा वाटुगा मस्तखीं घेतला।' –उच.

हाट—पु. हट्ट. 'मागे तेव्हां देऊं हाट त्याचा पाहूं।' –रामदासी २.७७. [हट्ट] **हटावलें**–वि. हट्टी. 'नेदितां विषयदान हटावलें क्षोभें मन।' –एभा २०.२०४. **हाटु-ठु**–वि. (महानु.) हट्टी. 'बळेसी हाठु.' –भाए ३५८.

हाटक—न. सोनें; सुवर्ण. 'वीट उत्तम हाटकाची।' –नव २३.४४. [सं.] **०रस**–पु. १ सोन्याच्या रंगाची शाई; सोनेरी शाई. २ सोन्याचा रस.

हाटणें—उक्रि. घाटणें; अहाटणें पहा.

हाटील, हाटेला—वि. हट्टी; आडदांड; कडवा; बेपर्वा. 'ते राठोड रजपूत हाडे परम हाटेले, त्यांचे ध्यानांत गनिमाची फौज नाहीं.' –भाब ९; –ऐपो २७९. [हिं.]

हाडुशापाणी—पु. मुलींचा एक खेळ. –मखेपु २८४.

हॉटेल—न. १ फराळाचें दुकान. २ खाणावळ. [इं.]

हाड—न. १ अस्थि; हाडक. २ (ल.) मूळ जात; उत्पत्ति. 'त्या मनुष्याचें हाड खरें.' ३ अंगकाठी; शरीररचना; बांधा (जनावर, माणूस इ० चा). [सं. हड्; हिं. हड्डी] **म्ह०** १ हाड तितकें शेपूट जाड तोंड पाहून जेवण वाढ. २ (गो.) हाडली पड खाल्ली पड-हातावरचें पोट **हाडचा**-वि. १ मूळचा; जातीचा; वर्णाचा. 'हा हाडचा ब्राह्मण.' २ स्वभावाचा. 'हाडचा गरीब आहे.' **एका हाडाचा-हाडामासाचा**-वि. एकाच जातीचा, कुळाचा. **हाडाचा खंबीर-कणखर-कठीण-बळकट-खबरदार**-वि. कणखर प्रकृतीचा-शरीराचा-बांध्याचा शरीरानें मजबूत. **हाडाचा खरा-चांगला-भला-अस्सल**; जातीवंत; टिकाऊ (मनुष्य, वस्तु). 'हा रुपया वरून वाईट दिसतो पण हाडाचा खरा आहे.' **हाडांचा चुना-चुरा-चूर-हाडांचीं काडें-हाडांचें पाणी-हाडांचे मणी-हाडांच्या फुंकण्या-करणें-हाणें**-शरीर झिजविणें; फार परिश्रम करणें. शरीर खराब होणें; रोडावणें; झिजणें. **हाडांला-हाडीं खिळणें**-१ सर्व अंगांत मुरणें, शिरणें; दृढमूल होणें (भावना, रोग, गुण, दुर्गुण). **हाडाला-हाडीं लागणें**-१ (जिव्हारीं लागणें; वर्मी लागणें. २ त्रासदायकपणें चिकटणें. ३ (मूल, कर्ज, धंदा इ० बद्दल). फार काळजी लागणें; अभ्यास-चिंता-शोध इ०चा विषय होणें. **हाडांला-हाडीं-फासण्या घालणें-मारणें**-जिव्हारी टोचून बोलणें; एखाद्यास लागेल असें बोलणें. **हाडांवर-हाडीं घाव घालणें**-१ वर्म मर्मच्छेद करणें. २ कडक रीतीनें, कठोरपणें वागविणें. **हाडावर चोट असणें**-(बना.) तोशीस लागणें. **हाडांशीं लग्न लावणें**-म्हाताऱ्याशीं किंवा अत्यंत रोडक्या माणसाशीं मुलीचें लग्न लावणें. **हाडीं विसावणें**-हाडीं शिरणें व तेथें थांबणें (जबर शत्रूचें शत्रुत्व, स्वतःच्या दुष्कृत्याचा पश्चात्ताप, असाध्य रोग). **हाडीं शुद्ध**-जातीनें, मनानें शुद्ध, चांगला. **हाडें उजविणें-भाजणें-शेकणें**-कसें तरी लग्न करणें; लग्न होणें. (अविवाहित, ब्रह्मचारी मृत झाला असतां त्या प्रेताचा समावर्तन व विवाह संस्कार करून मग दहन करतात. हा प्रेतसंस्कार कसा तरी उरकून घ्यावा लागतो यावरून ल.) **हाडें घुसळणें**-१ अतिशय काम करणें. २ सतावणें; गांजणें; जबर करणें. **हाडें निघणें-पडणें**-हाडें दिसणें; फार अशक्त, रोड होणें. **हाडें मोडणें-घुसळणें-खिळखिळीं करणें**-अतिशय गांजणें; निष्ठुरपणानें छळणें; त्रास देणें. **सामाशब्द-०कपाळ्या**-वि (हाडाच्या कपाळाचा-कपाळावर नशीब लिहिलें असतें म्हणून) दुर्दैवी; कमनशिबी; कपाळकरंटा. **हाडकपाळी**-वि. हेकड; शिरजोर; सैरट; बेपर्वा; उपदेश; ताकीद इ०स न जुमानणारा. **हाडकी**-स्त्री. १ लहान हाड. २ मेलेल्या जनावरांचीं हाडें इ० ठेवण्यासाठीं महारांना दिलेली जमीन. हडकी पहा. **हाडकुरकुटी**-स्त्री. हाडीज्वर. **हाडकुळा-ळी-ळें**-वि. हाडें निघालेला; अशक्त; रोड. **हाडकेंकाडकें**-नअव. १ शेतीचीं जनावरें व आउतें. २ झिजलेलें व हाडहाड उरलेलें शरीर (क्रि० होणें; रहाणें; उरणें). **हाडखाईर**-न. हाडवैर. 'म्हणोनि समर्थेसीं वैरा। जया पडिलें हाडखाईरा।' -ज्ञा १३.५५० **हाडखाऊ**-वि. (तिरस्कारार्थी) मांसभक्षक (शूद्र-यवनादिक जाती) **हाडगळ**-वि. रोडका; हाडें वर निघालेला; कृश. [हाड+गळणें] **हाडगात**-न. शरीरयष्टि, बांधा. 'हा पोटानें दुबळा झाला आहे पण हाडगात मोठें आहे.' [हाड+गात्र] **हाडजर, हाडीं ज्वर**-पु. हाडांत मुरलेला ताप. **हाडति-हडौति**-स्त्री. गळ्याखालच्या अर्धचंद्राकार हाडावरील खळगा. 'मुख मळिण वदन उभा हाडतिये घोणे।' -तुगा १२२. **हाडपरब**-पु. (व.) पितृपक्ष. **हाडपेर**-न. अंगकाठी. हाडगात पहा. **हाडबोड**-पु. (गो.) मासळीचा डोकें इ० भाग. **हाडभाऊपणा**-पु. भाऊबंदकी. 'वडीलकीचे अथवा हाडभाऊपणा सिद्ध करणारे महजर सांपडतात.' -अडिवऱ्याची महालक्ष्मी ६. **हाडमोडी**-स्त्री. एक बांडगुळासारखी वेल. हिला पानें नसून शेराप्रमाणें कांडया असतात. **हाडवळा**-पु. हाडोळा पहा. **हाडवैर**-न. अत्यंत तीव्र व फार जुनें वैर. **हाडशिंगारी-सांधण**-स्त्री. एक बेल. **हाडसंद-संधी**-स्त्री. (बे.) हाडशिंगरी पहा. त्रिधारी कांडवेल. ही ठेचून ३ दिवस मोडलेल्या हाडावर बांधल्यास तें बरें होतें. **हाडहाड-हाडोहाड**-क्रिवि. प्रत्येक हाडांत. **हाडळ**-वि हाडकुळा पहा. **हाडांचा पंजर-सांपळा**-पु. हाडांचा सांगाडा. **हाडी जखम**-स्त्री जबर दुखापत **हाडींज्वर-ताप**-पु. हाडज्वरपहा. **हाडूक**-न. लहान हाड. (**गळ्याशीं-दाराशीं**) **हाडूक बांधणें**-१ एखादी बाई ठेवून घेणें, रखेली राखणें. २ त्रासदायक काम अंगावर ओढून घेणें. **हाडूक दाराशीं-दाराला-रोवणें-लावणें, पुरणें**-जातीबहिष्कृत करणें. **हाडेंकाडें**-नअव. हाडांचा सांपळा; कृश शरीर. (क्रि० होणें; रहाणें; उरणें-शरिराचें). **हाडोहाड**-क्रिवि. हाडहाड पहा. **हाडोळा-ळी**-पुस्त्री. १ महाराला दिलेली जमीन. हडोळी पहा. २ असलया जमीनीचें उत्पन्न. **हाडया**-पु. १ (खा. व.) कावळा. 'जाय उडून रे हाडया। नको करूं काव काव।' -कोलते. २ (खा.) गाडी जमीनीवर टेकण्याचें जुंवासालील लांकूड, खुंटा. -वि. १ हाडकुळा. २ फार हट्टी; हेकड. **हाडा रजपूत**-पु. फार हेकट माणूस. (रजपुतांच्या स्वभावावरून पुढील म्हण आहेच). 'कुत्रा (विहिर) टळे पण रजपूत ना टळे.' **हाडयावर्ण-व्रण**-पु. हडयावर्ण पहा. हाडांत खोल गेलेला व्रण.

• **हांडक-कें**—पु. (व. ना.) लहान मडकें. [हंडी]

हाडणें—सक्रि. (कों. गो. कु.) आणणें.

हाडबा—पु (जुन्नरी) भाला.

हाडसणी-णें—हडसणी-णें पहा.

हाडळ—स्त्री. हडळ पहा. 'ते देखे इंद्रियांची हाडळि।' –भाए ५२१.

हाडा—पु. हंडा पहा.

हाडी—स्त्री. (कु.) चर.

हांडी, हांडीबाग, हांडीमडकी, हांडेभांडें, हांडेमडकें—हंडी, हंडीमडकी इ० पहा.

हांडी—स्त्री. (नाविक) १ गलबताचा पाण्यावरील सुकाणूकडचा कांहींसा भाग. २ (गो.) कमर; कडा. **म्ह०** (गो.) हांडीर असा चेडो, भोवतो सगलो वाडो=कमरेवर मूल पण सगळा गांव धुंडाळते. तुल० खानेंत कळसा, गांवाला वळसा.

हांडुंग—न. हडुंग पहा.

हांडूबायल्या, हांडोण्या—वि. (ना.) रांडयाराघोजी; भेकड.

हांडूळ, हांडोरें—न. (कों.) लहान हांडा.

हांडोरिया—वि. अडाणी; अज्ञान. 'जाणवूनि गेला हांडोरिया पोरां.' –तुगा ३२२६. [आंडोर?]

हाण—स्त्री. १ हानि; तोटा; नुकसान. २ घात;इजा; दुखापत. 'मुला वय तुझें लहान। तुला लागल्या तहान। उदक न मिळतांचि हाण।' [स. हानि] **म्ह०** आपली हाण लोकाची मरमर.

हाणणें—उक्रि. १ काठी इ० नें ताडण करणें; मारणें; ठोकणें. २ छाटणें; काटणें; कापणें. ३ ठार मारणें. ४ (व.) हांकणें; हाकून लावणें. [सं. हन्=मारणें] **हाणून पाडणें**–१ जमीनदोस्त करणें. २ (ल.) बिघडविणें; निष्फल करणें; मोडून काढणें. **हाणता**–वि. ठोकणारा; धोपटणारा; बडविणारा; छाटणारा, कापणारा; ठार मारणारा. **म्ह०** हाणत्यांच्या मागें पळत्यांच्या पुढें=अत्यंत भेकड माणसास उद्देशून म्हणतात. **हाण(णा) मार, हाणामारी, हाणाहाण-णी**–स्त्री. एकमेकांनीं एकमेकांस मारणें; आवेशानें ठोकणें; मारामारी. [हाणणें+मारणें] **हाणविणें**–उक्रि. (हाणणेंबद्दल चुकीनें) मारणें; मारविणें; बडविणें; ठोकणें. **हाणी**–स्त्री. हानि; तोटा. [सं. हानि]

हात—पु. १ हस्त;बाहु; खांद्यापासून बोटांपर्यंत शरीराचा भाग. कोपरापासून बोटांपर्यंतचा भाग. २ कोपरापासून मधल्याबोटाच्या टोकापर्यंतचें माप. 'हा पंचा साडेचार हात भरला.' ३ उजवी किंवा डावी बाजू, तरफ. 'आमचें घर वाड्याचे उजव्या हातास आहे.' ४ ताबा; आटोका; अधिकार; खातें. 'तुझें काम करणें माझ्या हातीं नाहीं.' (कारक विभक्तींत प्रयोग). ५ स्वतः, व्यक्तिगत मनुष्य. 'अपराधावांचून शिवी देणें हें माझ्या हातानें घडणार नाहीं.' ६ स्वामित्व; कबजा; मालकी; ताबा. 'सांप्रत माझ्या हातीं पैसा नाहीं.' ७ हातानें वाजविण्याच्या वाद्यावर मारलेली हाताची थाप. ८ डाव; खेळ (काठी, लाठी, पट्टा इ० शस्त्रांचा). 'पट्ट्याचे दोन हात करून दाखव'. ९ कर्तृत्वशक्ति; अंग; हस्तकौशल्य (एखाद्या विषयांतील, कलेंतील). 'त्याचा चित्र काढण्याचा हात चांगला आहे.' १० कुलुपाची किल्ली; चावी. 'कुलपाचा हात इकडे दे बघूं.' ११ सोंगटया, पत्ते इ० खेळांतील डाव, खेळण्याची पाळी, खेळ; खेळणारा गडी. 'अजून आमच्यांतील एक हात खेळावयाचा आहे.' १२ हस्तक; मदतनीस; साहाय्यक; हाताखालचा मनुष्य. १३ ज्यावर दंड, जोर काढावयाचे तो लांकडी, दगडी ठोकळा; हत्ती. १४ (रंग देणें, सारवणें इ० कामीं) वरून हात फिरविणें; हातानें दिलेला थर, लेप. १५ टोंसा; तडाखा; हस्तक्रिया (भिन्नभिन्न प्रसंगीं त्या त्या अर्थानीं). १६ (तेली-घाणा) कातरीस जोडलेला वांकडा लाकडी तुकडा. १७ हात टेकावयासाठीं, हातानें धरावयाचा कोणताहि पदार्थाचा भाग. 'खुर्चीचे-रहाटाचे-हात.' १८ हाताच्या आकाराची कोणतीहि वस्तु. १९ (सोनारी) हातांतील दागिना सैल करण्याचें एक हत्यार. २० (नृत्य) दोन हातांनीं मिळून करावयाचे अभिनयाचे प्रकार. हे ४० प्रकारचे आहेत. २१ (शिंपी) कापड मोजण्याचें बारा तसूंचें एक माप; गज. २२ पान्हा (नट-बोलट फिरविण्याचा). [सं. हस्त; प्रा. हत्थ; हिं. गु. हाथ; बं. हात; आर्मे. जि.हथ, अथ; पॅलेस्टाईनजि. हस्त; पोर्तुजि. बस्त] **म्ह०** १ हात ओला तर मैत्र भला–नाहींतर पडला अबोला–जोपर्यंत माणूस दुसऱ्यास देत असतो तोंपर्यंत त्याच्याशीं सगळे मित्रत्वानें वागतात. २ हात घशांत घातला तरी कोरडाच=कितीहि मदत केली तरी बेइमान राहणारा. ३ हातपाय रोडया, पोट लोडया; हातपाय काडया, पोट ढेऱ्या=पोटाचा तटतटीतपणा व अवयवांचा रोडकेपणा. ४ हात फिरे तेथें लक्ष्मी फिरे, तोंड फिरे तेथें अवदसा फिरे=उद्योगी माणसाचा हात श्रीमंती आणतो तर नुसत्या बडबडयाच्या हातून कांहींच होत नाहीं उलट दारिद्र्य येतें. ५ आपला हात जगन्नाथ (जगन्नाथपुरीस आपल्या हातानें वाटेल तेवढा प्रसाद घेतां येतो त्यावरून) वाटेल तेवढें व तसें घेणें; प्राचुर्य. ६ हातचें सोडून पळत्याचे पाठीस लागूं नये=जें खात्रीनें आपलें आहे (आपणांस मिळावयांचेंच आहे) तें सोडून जें अनिश्चित आहे तें मिळविण्याच्या नादीं लागूं नये. ७ हातच्या कांकणास आरसा कशाला? (हातांतील कांकण डोळ्यानें दिसण्यासारखें आहे, आरसा आणणें वेडेपणा)=जी गोष्ट उघड सिद्ध आहे ती दाखविण्यास पुराव्याची जरूरी नाहीं. ८ हातपाय =हावलें काम करूं वायले=नाइलाज होणें. ९ हातपाय लुले तोंड चुरचुरां चाले=अशक्त पण तोंडाळ, मुजोर माणूस. १० हातभर लांकूड

नऊं हात ढलपी=अतिशयोक्ति करणें. ११ हातांत नाहीं भडका बाजारांत चालला भडका=जवळ कवडी नाहीं पण डौल बादशहाचा (ब.प्र.) ०**आखडणें**-देण्यासाठीं पुढें केलेली वस्तु एकदम मागें घेणें; देण्याचें प्रमाण कमी करणें, बंद करणें. ०**आटोपणें**-मारणें इ० हातानीं करावयाची कोणतीहि क्रिया बद करणें. ०**आवरणें**-१ हात आटपणें २ कोणत्याहि कृत्यापासुन परावृत्त होणें. 'ऐकल वचन माझें आवरिल द्रौपिकाळ हात रणीं।' -मोकर्ण ४६.४४. ०**इचकणें**-(व.) हात मोडणें. ०**उगारणें उचलणें**-(एखाद्यास) मारावयास प्रवृत्त होणें. ०**उचलणें**-१ स्वयंस्फूर्तीनें, आपण होऊन बक्षीस देणें. २ हातीं घेणें (काम, धंदा). ०**ओढविणें**-१ घेण्यासाठीं झांप टाकण. २ विटंबना, करण्यासाठीं तुच्छता दर्शविण्यासाठीं तोंडापुढें हात करणें. ०**ओंवाळणें**-तुच्छता दर्शविणें. ०**करणें**-१ लाठी मारणें; शस्त्राचा वार करण. हात टाकणें. 'स्त्रीचे अंगातर हात करूं नये.' २ पट्टा, बाथाटी वगैरेचे डाव करणें; फिरविणें ३ वादविवाद, युद्ध करणें. ०**कापून-देणें-गुंतणें**-लेखी करारकरून स्वतःस बाधून दणें ०**खंडा असणें**-एखादें कार्य (हुन्नर) हमखास पार पाडण्याचें कौशल्य. पटाईतपणा अंगीं असणें. ०**गहाण ठेवणें**-अजवा हात देवास वाहून कोणत्याहि कामीं त्याचा उपयोग करावयाचा नाहीं असा नवस करणें. २ कोणत्याही कामास हात न लावण. ०**घालणें**-१ (एखादें काम) पत्करणें; करावयास घेणें. २ एखादी वस्तु घेणें, धरणें, शोधणें यासाठीं हात पुढें करणें. 'मग विभु वसनासी त्याचिया हात घाली।' -आनंदतनय. ३ (एखाद्या कामात, व्यवहारात) ढवळाढवळ करणें; आंत पडणें. ०**घेणें**-(पत्र्यांचा खेळ) हुकूम मारून अगर भारी पान मारून दस्त करून घेणें. ०**चढणें**-प्राप्त होणें. 'अनुताप चढलिया हात। क्षणार्धे कीं विरक्त।' -एभा २६.२०. **हाताचा आंवळा-मळ, हातचें कांकण**-उघडउघड गोष्ट; सत्य. ०**चा मळ**-अत्यंत सोपें कृत्य; हात धुण्यासारखें सोपें काम; अंगचा मळ. ०**चालणें**-१ हातात सत्ता, सामर्थ्य, संपत्ति असणें, मिळावणें, मिळणें. २ एखादी गोष्ट करतां येणें. 'कशियावर माझा हात चालत नाहीं.' ०**चालविणें**-हत्यार चालविणें (संरक्षणार्थ). 'न्यायाच्या अभावीं ज्याला त्याला हात चालवावेसें वाटणें रास्तच होईल.' -टि १ २२. ०**घेणें**-लांचाचे पैसे मुकाट्यानें एखाद्याचे हातांत देणें. ०**चोळणें**-फार राग आला असतां तळहात एकमेकांवर घासणें; कुंठित गति होऊन स्वस्थ बसावें लागणें. 'शल्य सुयोधन वाकर्ये कोपे चोळी करें करा ...।' -मोकर्ण २१.१३. ०**जाडणें**-१ नमस्कार, प्रार्थना, विनति करणें. २ शरण जाणें, घेणें. 'अपराध फार केले परि आतां हात जोडिले स्वामी।।' -मोआर्याकेका. ३ नको असलेला पदार्थ हात जोडून आजीवानें दूर सारणें; अडचणें. 'दानश्री त्याहुनि बहु दुरभामहि हात जोडितो मीन।' -मोवृहद्द ८ ०**झाडणें**-१ झिडकारणें; नापसंत ठरविणें. २ निराशेनें सोडून देणें ३ एखादें काम उरकून मोकळें होणें. ०**टाकणें**-१ पोहणांना पाण्यावर हात मारणें. २ (एखाद्यावर) प्रहार करणें; मारणे. 'बायकोमाणसाच्या अंगावर हात टाकणें तुम्हाला शोभत नाहीं' ०**टेकणें**-१ काम करण्यास असमर्थ असल्यानें पराभव पावल्याचें कबूल करणें. २ म्हातारपणानें अशक्त होणें. ३ दमणें, थकणें; टेकीस येणें. ०**ताडणें**-स्वतःच्या लेखानें आपणांस बांधून घेणें. ०**थावरणें** हात थावरणें; आटोपणें. '...थावरूनि हातरणीं।' -मोस्त्री ६.५१. ०**दाखविणें-दावणें**-१ हस्तसामुद्रिक जाणण्यासाठीं जाणापुढें तळहात करणें. २ अहितकारक परिणाम करणें. ३ स्वतःची शक्ति सामर्थ्य दाखविणें 'शक्र दि देव असते तरि त्यामहि इ वितोचि हात रणीं।' -मोभीष्म ३.४ ४ नाडीपरीक्षा करण्यासाठीं वैद्यापुढें हात करणें. ५ हातानें एखादी वस्तु दशवणें. ६ बडवून काढणें; पारिपत्य करणें; सुड घेणें; उदा० काढा म्हण हात दाखून नवऊक्षण चिंतणें, करणें. ०**दाबणें**-लांच देणें 'त्यानें आपल्यास मदत करावी म्हणून त्याचे हात दाबावे असें एकदा मनात येतें. -विवि १०. ९ २१० ०**देणें**-१ मदत करणें; तारणें. घडता अधःपतन मज पुण्यें देतिल न हात परिणामीं।' -मोआदि १९ ३०. २ चोरणें; उचेगिरी करणें. ३ खाद्यपदार्थावर ताव मारणें ४ (बायकी, छप्पापाणी) छप्पू घातलेल्या मुलीस इतर मुलींनीं (तिनें उठावें म्हणून) हस्तस्पर्श करणें. ०**धरणें**-१ अडविणें; हरकत करणें; स्पर्धा करणें; बरोबरी करणें. २ लाच देणें. ०**धरून जाणें**-विवाहित स्त्रीनें एखाद्या परपुरुषाबरोबर पळून जाणें; जाराबरोबर निघून जाणें. ०**धुणें**-(ल) एखाद्या कामातून आलें अंग काढून घेणें. ०**धुवून पाठीस लागणें**-एखाद्याचा नाश करण्याविषयीं हट्टानें प्रवृत्त होणें; चिकाटी धरून एखाद्याचा पाठलाग करणें. ०**न बनणें**-(व.) विटाळशी होणें; गुंता येणें. ०**नाचविणें**-चेष्टा करण्यासाठीं दुसऱ्याचे तोंडापुढें हातवारे करणें. हात ओवाळणें पहा. ०**पडणें**-१ एखादें काम अनेकांनीं लागून संपविणें; एखादा खाद्यपदार्थ अनेकांनीं एकसमयावच्छेदेंकरून फस्ता करणें. २ (ना.) जिवंतपणीं भेट नाहीं पण दहनापूर्वी तरी प्रेताचें दर्शन होणें. ०**पसरणें**-भीक मागणें. ०**पाय खाडणें**-१ अवयव आखडणें; विव्हल होणें. २ एखाद्यास प्रतिबंध, अडचण करणें. ०**पाय गळणें-गाळणें**-१ अशक्त होणें; रोडावणें. २ खचून जाणें; नाउमेद होणें; गलितधैर्य होणें ०**पाय गुंडाळणें**-१ अंतकाळच्या वेदनानीं हातपाय आखडणें, क्रियाशक्ति रहित होणें. २ हरकत, अडथळा करणें. ०**पाय चोळणें**-१ सुड घेण्याची प्रतिज्ञा करणें; चरफडणें. २ रागानें तरफडणें; शिव्याशाप देणें. ०**पाय**

झाडणें–१ हातपाय गुंडाळणें अर्थ १ पहा. २ सुटकेसाठीं हातापायांचा उपयोग करणें. ३ धडपड करणें; चरफडणें. **०पाय ताणणें**–सुखानें, निष्काळजीपणानें हातपाय पसरून पडणें **०पाय धोडावप**–(गो) आटापिटा करणें **०पाय पसरणें**–१ हातपाय गुंडाळणें अर्थ १ पहा. २ मर्यादेच्या, आटोक्याच्या बाहेर जाणें; जास्त जास्त व्याप वाढविणें; पसारा वाढविणें. **म्ह**० भटाला दिली ओसरी, भट हातपाय पसरी. ३ काम हातनसल्यास सबबी सांगणें; कामांत आळस करणें (काम करीन असें वचन दिलें असतां). ४ मागणी वाढत जाणें, अधिकाधिक आक्रमण करणें. **०पाय पाखडणें**–अंतकाळच्या वेदनेनें, फार सतापानें हातपाय झाडणें. **०पाय पांघरून-पोटाळून बसणें**-आळशासारखें बसणें; जेठा मारून बसणें **०पायं फुटणें**–१ उधळपट्टी सुरू होणें; संपत्तीला (जाण्यास) पंख फुटणें. 'दौलतीला अलीकडे हातपाय फुटूं लागले आहेत.' ३ लुच्चेगिऱ्या करण्यांत तरबेज होणें. २ थंडीनें हातपायास भेगा पडणें. **०पाय फोडणें-लावणें-फुटणें-लागणें**–१ मूळ गोष्टींत, अंदाजांत भर घालणें; वाढविणें. २ नटविणें; थटविणें; अलंकृत करणें. ३ मागून वाढविणें (काम, दर, खर्च इ०). ४ लबाड्या इ० नीं सजवून उजळून दाखविणें. **०पाय मोकळे करणें**-फेरफटका करून हातपाय सैल, हलके करणें; फिरणें; सहल करणें. **०पाय मोडणें-मोडून येणें-टाकणें**–१ तापापूर्वी अंग मोडून येणें; निरंगळी येणें. २ बलहीन, निःसत्त्व करून टाकणें; हरकत घेणें. **०पाय सोडणें**–अंतकाळच्या वेदनांनीं हातपाय ताणणें, ताठ होणें. **०पाय हालविणें**–उद्योग, परिश्रम, कष्ट इ० करणें; स्वस्थ न बसणें **०पोचणें**–कृतकृत्य होणें (ढुंगणाला हात पोंचणें असा मूळ प्रयोग). **०फाटणें**–रुची वाढणें. 'जेथें जिव्हेचा हातु फाटे।' –ज्ञा १८.२४९. **०फिरणें**-लक्ष जाणें; व्यवस्थित ठेवण्याची काळजी घेणें; साफसफाई करणें. **०फेरविणें**–१ लहान मुलास प्रेमानें कुरवाळणें. 'प्रेमें मजवरुनि हात फिरवूनी।' –मोउद्योग १३.१८३. २ पुन्हां उजळणी, उजळा देणें. **०बसणें**–१ एकसारखें लिहीत, वाचीत इ० राहणें. २ अक्षरांचें वळण बसणें; तें पक्कें होणें. ३ एखादें काम उत्तम प्रकारें करतां येणें; मनांत ठसणें; विशिष्ट क्रिया करण्याची सफाई हातास प्राप्त होणें. **०बांधणें**–१ मर्यादा घालणें; स्वैर होऊं न देणें. २ अडथळा आणणें. **०बोट लावणें-भार लावणें**–मदत करणें. **०भिजणें**–१ दक्षणा देणें; (गो.) हात भिजविणें. २ लांच देणें; हात ओले करणें. **०मारणें**–१ वळकाविणें|(पैसा इ०) देणें. २ अधाशीपणानें खाणें; ताव मारणें. ३ एखाद्या वस्तूवर विविध क्रिया करणें. **०मिट्ठीला येणें**–(माण.) हाताहातीं होईपर्यंत भांडणें. **०मिळवणें**–१ घाव घालणें. 'तस्करानें जलदीकरून हात मिळविला जाऊन।' –ऐपो २९०. २ (कुस्ती) सलामी घेणें. **०मोडणें**–१ असहाय्य, मित्रहीन होणें २ मिळत असलेली देणगी बक्षीस नाकारणें **०र खर्चे-कुचराई करणें. ०राखून खर्च करणें**-काटकसरीनें खर्च करणें. **०लागा ना**-(गो.) विटाळशी होणें. **०लावणें**–मदत करणें. **-वसणें**–क्रि. हस्तगत होणें. ते ज्ञाननिष्ठा जेथें हातवसे। –ज्ञा १८ १२४८; –भाए २४०. **०वहाणें**–१ हत्यार चालविणें. 'परि परमप्रिय अर्जुन त्यावरि याचा न हात वाहेल। –मोउद्योग १२.५४. २ प्रवृत्त होणें; कार्य करणें. **०वळणें**–१ सराव, परिपाठ इ० नें हातास सफाई येणें. २ (एखाद्या गोष्टीस, कृत्यास) प्रवृत्त होणें. **०सैल सोडणें**–सढळपणें खर्च करणें. **०सोडणें**–१ पूर्वीप्रमाणें कृपा, लोभ न करणें. २ संगति, ओळख सोडणें. **०हातांत देणें**–लग्न लावणें 'एखाद्या तरुणीचा हात माझ्या हातांत दे.' –भा ४९. **०हालचीन येणें**–काम न होतां रिकामें परत येणें. **हातणें**–क्रि. सारवणें **हाताखालीं घालणें**–नेखरेखीखालीं, अंमलाखालीं, कबज्यांत, ताब्यांत घेणें. **हातां चढणें**–प्राप्त होणें. 'जरी चिंतामणी हाता चढे।' –ज्ञा ३.२३; –एभा १०.२८२. **हाताचें पायावर लोटणें**–आजची अडचण उद्यांवर ढकलणें; आजचें संकट लांबणीवर टाकणें. **हाताचे लाडू होणें**-खरजेनें हाताच्या मुठी वळणें, त्या न उघडणें **हाताच्या धारणेनें घेणें**–मारणें; बुकलणें. **हातांत कंकण बांधणें**–एखाद्या गोष्टीची प्रतिज्ञा करणें; चंग बांधणें (यजमानानें यज्ञ करावयाच्या पूर्वी हातांत दीक्षासूत्र बांधण्याच्या चालीवरून). **हातांत हात घालणें**-१ लांच देणें २ मैत्रीच्या भावानें वागणें, प्रेम करणें. ३ विवाहसंबंध घडवून आणणें. ४ विवाहित स्त्रीनें परपुरुषाशीं संबंध ठेवणें; निघून जाणें. **हातांतोंडाशीं गांठ पडणें**–१ घास तोंडांत पडणें; खावयास सुरुवात करणें; जेवणाखेरीज इतरत्र लक्ष न जाणें. २ एखाद्या कार्यास घाईनें आरंभ होणें ३ बोंब मारणें. **हातांतोंडास येणें**–१ तारुण्यावस्था प्राप्त होणें (लग्न झालेली स्त्री, तरुण मुलगा इ०). २ फल देण्याच्या स्थितीस येणें. **हातापायांचा चौरंग होणें**–पेटके वगैरेमुळें हातपाय आंखडणें. **हातापायांचे डगळे होणें-पडणें-मोडणें**–अशक्तपणानें अंगास कंप सुटणें; अंग शिथिल होणें. **हातापायांचे ढीग पडणें-होणें**–भीतीनें, आजारानें अशक्त असहाय्य होणें. **हातापायांच्या फुंकण्या होणें**–अशक्तता, निर्बलता येणें. **हाता(तीं)पायां(यीं) पडणें**–१ गयावया करणें; प्रार्थना करणें. २ शरण जाणें; नम्र होणें; दया याचिणें. **हाताबोटावर येणें, हातावर येणें**–आतां होईल, घटकाभऱ्यानें होईल अशा स्थितीस येणें; हस्तगत कबज्यांत, साध्य होण्याच्या अगदी बेतांत असणें. **हाताला चढणें**–प्राप्त होणें. 'संसार कशाचा जरि न हाताला चढली।'

–राला ११२. **हाताला येईल तें**–जें कांहीं हातांत सांपडेल तें; ज्याचेवर हात पडेल तें. **हाताला लागणें**–गमावलेल्या, फुकट गेलेल्या, नासलेल्या, बिघडलेल्या वस्तूंतून अल्प अंश मिळणें. 'कापडांत पैसे घालूं नका, त्यांतून हाताला कांहीं सुद्धां लागणार नाहीं.' **हाताला वंगण लावणें**–लांच देणें. –राको १३३७. **हाताला हात लावणें**–१ पति पुण्याहवाचनादि धर्मसंस्कारास बसला म्हणजे पत्नीनें त्याच्या हातास नुसता हात लावणें (म्हणजे तिलाहि त्याचें फळ मिळतें). २ स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यानें केलेल्या कामाच्या फळांत वटिकरी होणें; दुसऱ्याच्या कार्याला अनुमति देणें. **हातावर असणें**–पूर्णपणें साध्य असणें. **हातावर घेणें–आणणें–काढणें**–तारण, गहाण न ठेवतां पैसे उसनें आणणें, काढणें, घेणें. **हातावर तुरी देणें–देऊन पळून जाणें–हातावर हात देऊन–मारून पळणें–पळून जाणें**–फसविणें; डोळ्यादेखत फसवून पळून जाणें; देखत देखत भुलविणें. 'सुभद्रा कावीज करण्यासाठीं श्रीकृष्ण परमात्म्याच्या मदतीनें बलिरामाच्या हातावर ज्या तुरी दिल्या...तें पाहून तरी आम्हांस कधीं विषाद झाला आहे काय?' –आगर. **हातावर दिवस काढणें–लोटणें**–मोठ्या कष्टानें संसार चालविणें. **हातावर धरणें**–हातांवर संभाळीत राहावयास लावणें (मुलानें). 'यानें मला सकाळपासून हातावर धरिलें.' **हातावर पाणी पडणें**–भोजनोत्तर आंचवणें. 'हातावर पाणी पडलें कीं चालला बाहेर.' **हातावर पिळकणें**–लांच देणें. **हातावर पोट भरणें–संसार करणें**–अंगमेहनत, भिक्षा, नौकरी करून उपजीविका करणें. **हातावर मिळविणें**–मिळवावें व खावें अशा स्थितींत राहणें. **हातावर येणें**–जवळ येऊन ठेपणें. **हातावर येणें–लागणें–दूध देऊं लागणें**–व्यानास वासरूं न लावतां किंवा पान्हवण (सरकी इ०) पुढें न ठेवतां जनावरानें दूध देणें, पान्हवणें. **हातावर शीर घेऊन असणें**–कोणतेंहि घाडसाचें कृत्य करण्यास सदां सिद्ध असणें. **हातावर हात चोळणें**–रागानें तळहात एकमेकांवर घासणें; चरफडणें. 'इंद्रें स्वतातघातक पाठीसी घातला म्हणोनि करें। कर चोळी...'–मोआदि ७.४०. **हातावर हात मारणें**–१ एखादी गोष्ट, सट्टा इ० पटला म्हणजे दुसऱ्याचे हातावर आपला हात मारणें. २ वचन देणें. **हातास हात लावणें**–(देणाऱ्याच्या, घेणाऱ्याचे हातास स्पर्श होणें) द्रव्यलाभ होणें. **हातास–हातां–हातीं चढणें**–प्राप्त होणें. 'तो किल्ला माझ्या हातीं चढला.' 'नवनीत मंथनावांचून। हातां न चढे सहसाहि।' **हातीं धरणें**–१ स्वतःच्या देखरेखीखालीं घेणें; एखाद्यास आपल्या आश्रयाखालीं घेणें. २ निरंकुशपणें मोकाट सोडणें (जीभ, तोंड, पोट इ० इंद्रियें). **हातीं धोंडे घेणें**–१ विरुद्ध उठणें. २ वेड्यासारखें करणें. **हातींपायीं(अंग इ०) डेवणें–धावणें–येणें–रेवणें**–जाड्य, सुस्ती येणें; शिव्या देण्यास तयार होणें. **हातींपायीं उतरणें–सुटणें–मोकळी होणें**–सुखरूपपणें बाळंत होणें. **हातींपायीं पडणें, लागणें**–अतिशय विनवण्या, काकुळत्या करणें. **हातीं भोपळा घेणें–देणें**–भिक्षा मागणें, मागावयास लावणें. **आडव्या हातानें घेणें**–१ चोरून; चोरवाटेनें घेणें. २ झिडकारणें; भोसडणें; तुच्छता दाखविणें; कचकावून खडकाविणें; मारणें. **आडव्या हातानें घेणें, चारणें**–बाजूनें, तोंडांत हात घालून खाऊं घालणें; औषधोपचार करणें (घोडा इ०स). (देणें–चोरून देणें–मारणें–मागल्या बाजूनें मारणें–ठोकणें). **एका हाताचीं बोटें पण सारखीं नाहींत**–सारख्या परिस्थितींतील माणसें असलीं तरी त्यांच्यांत थोडाफार फरक असतो. **दोहों हाताचे चार हात करणें–होणें**–लग्न करणें, होणें **या हाताचे त्या हातावर**–क्रिवि. ताबडतोब; जेव्हांचे तेव्हांच (दुष्कृत्याची फेड लवकर व खात्रीनें मिळते या अर्थी). **या हाताचे त्या हातास कळूं न देणें**–अत्यंत गुप्तपणें करणें. **रिकाम्या हातानें**–जरूरीच्या साधनां–उपकरणां–सामग्रीखेरीज; कांहीं काम न करतां. **याचा हात कोण धरीसा आहे?**–याच्या वरचढ, बरोबरीचा कोण आहे? याचा हात धरण्याची शक्ति कोणास आहे? **हातांत काय तागडू मिळाला**–(व) कोणता फायदा झाला? **हातांत नारळाची आई (नरोटी) देणें**–भिक्षा मागावयास लावणें. सामा.शब्द– **०अनार**–पु. शोभेच्या दारूचा एक प्रकार. **०इंद्र**–न. (कों.) खेंकडे पकडण्याचें जाळें. **०उगावा**–पु. १ एखाद्या किचकट, अडचणीच्या कामांतून, धंद्यांतून अंग काढून घेणें. २ सुड; पारिपत्य. (क्रि० करणें). ३ कर्जाची उगराणी; घातलेलें भांडवल परत मिळविणें. [हात+उगवणें] **०उचल**–स्त्री. १ पेढींतून स्वतःची रक्कम आतां थोडी मग थोडी अशा रीतीनें खर्चण्यास घेणें. २ मूळ भांडवल; मुद्दल. उचल मध्यें पहा. **०उचला**–वि. १ आपखुषीनें, हात उचलून दिलेला (पदार्थ). २ ज्याचा स्वतः करण्याबद्दल पत्कर घेतला आहे असा (व्यवहार, उद्योग). **०उसणा–ना**–वि थोडा वेळ उसना घेतलेला; लवकर परत करण्याच्या बोलीनें आणलेला (त्यामुळें लेख इ० लिहून न घेतां दिला–घेतलेला). **०उसणें–नें**–न. थोड्या मुदतींत परत करण्याच्या बोलीनें (लेख करून न देतां) उसनी घेतलेली रक्कम. **०कडी**–स्त्री. हातांतील बेडी. 'मन सितरील विवेकासीं। यालागीं हात कडिया दोहींसीं।' –एभा २३.९५१. **०करवत**–पुस्त्री. हातानें चालविण्याची लहान करवत. **०करवती**–स्त्री. लहान हात करवत. **०करीण**–स्त्री. अचळाला हात लांबतांच (वासरूं न सोडतां किंवा आंचोण न ठेवतां)

पान्हा सोडून दूध देणारी गाय; म्हैस. इच्या उलट पान्हवणकरीण. ०कार्पे-न. (गो.) लांडी, बिन बाह्यांची बंडी. ०काम-न. हस्तकौशल्याचें काम (यांत्रिक कामाच्या विरुद्ध); हस्तव्यवसाय. (इं.) हँडफॅक्ट. ०कैची-कचाटी-स्त्री. आलिंगन; मिठी. ०खंड-वि. १ मधून मधून कामांत खोडवणूक करणारा; मदतनीस (मूल, मित्र, शेजारी); अडल्या वेळीं आपल्या कामीं उपयोगी पडणारा. २ हात खंडा पहा. [हात+खंड=खळ, विसावा] ०खंडा-वि. निष्णात, करतलामलकवत् असलेली; म्हणाल त्यावेळीं तयार (विद्या, कला). ०खर्च-पु. किरकोळ खर्च; वरखर्च. ०ख(खं)वणी-स्त्री. लहान खवणी. ०खुंट-खुंटा-पु (विणकाम) वशारन पसरलेल्या लांबीपाशीं असलेल्या समोरच्या खांबापासून मागा पाशीं बसण्याच्या जागेजवळ उजवीकडे दोरी बांधावयाची खुंटी. ०खुरपणीचें लोणी-न. हातखुरप्या नारळाचें खोबरें. ०खुरपा-वि. हातानेंच आंतील खोबरें खरवडून काढण्याजोगा (कोंवळा नारळ). ०खुर्पे-न १ हातखुरपा नारळ. २ गवत काढण्याचा लहान विळा. ०खे(खो)रणें-न. कलथा; उलथणें; झारा. (क्रि० लावणें-अन्नास, पैक्यास=पैका उकळण्याचा सपाटा). म्ह० हातखेरणें असतां हात कां जाळावा. ०खेवणें-न. १ हातवल्हें. २ मदतनीस; हाताखालचा माणूस. ०खेवा-व्या-पु. हातखेवणें अर्थ २ पहा. ०खोडा-पु. हात अडकविण्याचा सांपळा. 'चंद्रसुर्याचा हातखोडा । काळा कैसेनि चालिजे ।' -भाए ५९४. ०गाडी-स्त्री. हातानें ढकलून चालविण्याची गाडी. ०गुंडा-धोंडा-पु. १ हातानें फेकण्या-उचलण्या-जोगा दगड. 'कुश्चीतभावाचे हातगुंडे।' -ज्ञाप्र २६५.;२ असला दगड हातानें जेथवर फेंकला जाईल तितकें अंतर. ०गुण-पु. (बरेंवाईट करण्याचा योग, गुण) नशीब; हातीं (काम, माणूस) धरणाराचा प्रारब्धयोग. हस्तगुण पहा. ०घाई-स्त्री. १ हातानें वाजवावयाचें वाद्य जोराजोरानें, आवेशानें वाजविणें. २ (ल.) उतावळेपणा; जोराची हाल चाल. (क्रि० हातघाईवर, हातघाईस येणें=मारामारी करणें). ०चरक-पु. १ हातानें फिरवून रस काढावयाचा चरक. २ हात घाणी. ०चलाख-वि. चोर; उचल्या. ०चलाकी-खी-स्त्री. हस्तचापल्य; लपवाछपवी; नजरबंदीचा कारभार (गारुडी, सराफ इ० चा). ०चाळा-पु. १ हाताचा अस्थिरपणा; चुळबुळ; हातानें कांहीं तरी उगीच करीत रहावें अशी लागलेली खोड; हातचेष्टा. (क्रि० लागणें). २ अशा प्रकारानें होणारें नुकसान. (क्रि० करणें). ३ सवोदित हात गुंतलेला असणें; त्यांत निमग्न असणें (वाढता धंदा, व्यापार, खेळ इ० त); देवघेवीचा मोठा उद्योग. ०चिठी-चिटी-ट्ठी-स्त्री. १ अधिकाऱ्यानें लिफाफाको. ७. ४२

मोर्तब न करतां आपल्या हातच्या निशाणीनेंच पुरी केलेली चिठी, हुकूम. २ कोणाहातीं पाठविलेली चिठी-चपाटी. ०चे हातीं-च्या हातीं, हातोहातीं-क्रिवि. लगेच; तावडतोब; आतांचे आतां; क्षणार्धांत; पटकन (करणें, घडणें). 'हा गडी हाताचे हातीं जाऊन येईल.' 'हाताचे हातीं चोरी-लबाडी-शिंदळकी' इ०. ०चोखणें-चुंफणें-न. तान्ह्या मुलास चोखण्यासाठीं हातांत देण्याची वस्तु. ०जतन-स्त्री. हातानें केलेली मशागत (मालीस इ०); रोज वक्तशीर घेतलेली काळजी. 'हा घोडा नुसत्या हातजतनानें इतका हुशार आहे.' ०जुळणी-स्त्री. (ठाकुर) लग्न लागल्यानंतर मुलानें मुलीचे दोन हात धरणें. -बदलापूर १३८. ०झाड-स्त्री. आपोआप उगवलेलें नसून मुद्दाम लाविलेलें झाड. ०झाडणी-स्त्री. राग, तिरस्कार इ० नें हात झटकणें. ०झालणा-पु. हातजाळें; हातविंड. ०झोंबी-स्त्री. परस्पराचे हात धरून केलेली झटापट; हिसकाहिसकी; झगडा. ०तुक-न. १ हातानें वजन करणें. 'नव्हती हाततुके बोल।' -तुगा ३४२३. २ अटकळ; अजमास. 'मग त्यागु कीजे हातुकें।' -ज्ञा १८.१३१. ०दाबी-स्त्री. लांच. 'मालकानें हातदाबी केली म्हणजे माल त्यांना परत देतात.' -गुजा ६७. ०धरणें-न (खा.) सोधणें; स्वयंपाकघरांतील भांडीं उतरणें इ० चें फडकें. ०धरणी माप-न. माप भरतांना त्याचे शेवटास डावा हात धरून, मापापेक्षां थोडें जास्त धान्य घेऊन केलेलें माप. बोटधरणी माप पहा. ०धुगी-स्त्री. १ राजाच्या हातधुणारास दिलेलें इनाम इ०. २ स्वयंपाकघरांतील मोरी. ०धोंडा-पु. १ हातानें उचलण्याजोगा धोंडा. २ धोंडा हातानें फेंकला असतां जेथवर जाईल इतकें अंतर; टप्पा. ०नळा-पु. हातांत धरून सोडण्याचा, शोभेची दारू भरलेला नळा. ०नळी-स्त्री. चपटें कौल. ०निघा-गा-हातजतन पहा. हातजपणूक. ०नेट-क्रिवि. १ (व.) हाताचा जोर, भार देऊन. २ (व.) हाताजवळ. ०पडत-पात-वि. हातीं असलेलें; अगदीं जवळ असणारें; लागेल त्यावेळीं तावडतोब मिळणारें. ०पहार-स्त्री. हातभर लांबीची पहार. ०पा-हातोपा-पु अंगरखा इ०ची बाही. ०पाटिलकी-स्त्री. १ हातानें ठोकणें; चोपणें, बदडणें. तोंडपाटिलकीचे उलट. २ बोलण्यापेक्षां प्रत्यक्ष कृति, काम. 'तोंडपाटिलकी सगळ्यांस येते हातपाटिलकी कठीण.' ३ हस्तचापल्य; उचलेगिरी. ०पाणी-न. १ लग्नांत रासन्हाणीचे वेळीं वधूच्या सासूनें तिचे हातांवर ओतावयाचें पाणी. (क्रि० घालणें). २ लग्नांत मांडव सरतण्याचे दिवशीं सासूनें सुनेची बोहोल्यावर ओटी भरून, किंवा मांडवांत न्हातेवेळीं नवऱ्यानें केशरी रंगांत बुडवून तिचे हातांत घालावयाची अंगठी. ३ लग्नांत मुलाच्या हातास्त्रालीं मुलीचा हात ठेवून त्यांवर समंत्रक पाणी घालणें. -बदलापूर

२०५. ०पान–पु. कोंका पडण्यापूर्वीचें केळीचें पान. ०पान्हा–पु. हातकरीण गाय, म्हैस इ० नें सोडलेला पान्हा (वासरूं किंवा अंबोण दाखविल्याशिवाय). हातपान्ह्यास लागणें, येणें, हातपान्ह्याची गाय इ० प्रयोग. ०पालवी–स्त्री. हात पोंहोचेल इतक्या उंचीवरील पाला. ०पावा–वि. (कों.) हाताच्या आटोक्यांतील, हात पोहोंचेल इतक्या उंचीवरील (वेलीचें फूल इ० किंवा खोली–विहिरींतील पाणी इ०). [हात+पावणें] ०पिटी–स्त्री. १झोंबाझोंबी; गुद्दागुद्दी. २(ल.)हातघाईची मारामारी. 'तंव राउतां जाली हातपीटी।' –शिशु ९६८. [हात+पिटणें] ०पेटी–स्त्री. हातानें भाता चालवून वाजवावयाची बाजाची पेटी; हार्मोनियम. २ सरकारी कामाचे कागदपत्र ठेवण्याची पेटी. –स्वभावचित्रें २४. ०पोळी–स्त्री. चेंडूफळीचा एक प्रकारचा खेळ. –मखेपु ५६. ०फळ–न (बे.) मेर ओढण्याचें फळ. ०फळी, हातोफळी–क्रिवि. हातोहातीं; लवकर. ०बळ–न. हस्तसामर्थ्य. 'हातबळ ना पायबळ, देरे देवा तोंडबळ.' ०बांधून डंकी–स्त्री. (कुस्ती) जोडीदारास खालीं आणल्यावर त्यानें आपला एक पाय धरला तर आपण दुसऱ्या पायानें जोडीदाराचे पाठीवरून झोंका घेऊन उडी मारून त्यास चीत करणें. ०बेडी–स्त्री. कैद्याच्या हातांत अडकवावयाची बेडी; हातकडी. ०बोनें–न. हातांत घेतलेलें भक्ष्य. 'बुद्धीचेनि शाकें। हातबोनें निकें।' –ज्ञा ६.२८२. ०बोळावन–स्त्री. हातानीं मार्गाला लावणें. 'जाणो नेदी योग्यता। प्रहीं हातबोळावन करितां।'–भाए ३४९. ०भाता–पु. हातांत घेऊन फुंकावयाचा भाता; लहान भाता. ०भार–पु मदत; साहाय्य (विशेषतः द्रव्याचें). (क्रि० लावणें). ०भुरकणा–भुरका–वि. हातानें भुरकून खावयाजोगा (पेयपदार्थ) ०भुरकणें–भुरकें–वरील प्रकारचा पातळ पदार्थ. ०भेटी–स्त्री. प्रेमानें हातांत हात घालणें. –ऐभा २८.५९२. ०मांडणी–स्त्री. पैसे पावल्याची पोंच म्हणून पैसे नेणाऱ्याची खतावणीवर घेतलेली सही. ०मात–स्त्री. हात टेकणें. ०मेटी हेटीमेटी–क्रिवि. आळसात; निरुद्योगीपणानें; हातांवर व गुडघ्यावर टेकून रमतगमत (दिवस इ०) घालविणें. 'दिवस गेला हातमेटीं चांदण्या खाली कापूस वेटी.' ०रगडा–पु उंसाचा हातचरक. ०रवी–स्त्री. घुसळखांब, मांजरी यांचे विरहित हातानेंच फिरविण्याची लहान रवी. ०रहाट–पु हातानें ओढून पाणी काढण्याचा लहान रहाट. ०रिकामी–स्त्री. विधवा स्त्री. –बदलापूर १७४. ०रिती–वि (महानु.) रिकामी विधवा. –स्मृतिस्थळ. ०रुमाल–पु. १ तोंड वगैरे पुसण्याचा लहान रुमाल. २ नित्योपयोगी कागदपत्रें ठेवण्याच्या दप्तराचा रुमाल; चालता रुमाल; त्यांतील कागदपत्रांचें बंडल. ०रोखा–पु. दस्तक; चिठी; आज्ञापत्र. 'पाराजीपंत वाघ यांस हातरोखा वरचेवर पाठवून अति आग्रहें अंतरवेदींत घालविलें.'–भाव १०२. ०लाग–पु. हाताचा टप्पा. ०लागास–लागीं येणें–असणें–कक्षा, आंवाका, आटोका, अवसान इ०त येणें, असणें. ०लागा–लाग्या–वि. अनुकूल असणारा. 'तुमचे हातलागे लोक असतील.' –वाडबाबा १.६. ०लावणी–स्त्री. १ वेश्येचा चिरा उतरणें; कौमार्यभंग. (क्रि० करणें). २ हाताची पेरणी; लागवण. –वि. हातपेरणीचें. ०लावा–ट्या–वि हाताळ; चोरटा; चोरी करण्यासाठीं हात फुरफुरत असलेला. ०वजन–न. १जिन्नस हातांत घेऊन केलेलें वजन. २ अशाप्रकारें वजन काढण्याची लायकी. ०वटी–हातोटी–स्त्री. १ हस्तकौशल्य; हस्तचातुर्य. २ (सामा.) कसब; नैपुण्य; चलाखी. 'अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये। परि ते हातवटी चंद्री कीं आहे।' –ज्ञा ९.२९. ३ विशिष्ट पद्धत, रीत, प्रकार. [हिं.] भाषणाची–पोहण्याची–व्यापाराची इ० हातोटी. ०वडा–हातोडा–पु. सोनार, कासार इ० चें ठोकण्याचें हत्यार. ०वडी हातोडी–स्त्री. लहान हातोडी. ०वणी–न. १ हात धुतलेलें पाणी. २ (कों.) हातरहाटाचें पाणी पन्हळांतून जेथें पडतें तेथील जमीनीचा उंच केलेला भाग; हातणी. ०वल्हें–न. हातानेंच वल्हवावयाचें लहान वल्हें. ०वश–वि. हस्तगत. ०वशी–स्त्री. हात उगारणें. –शर. ०वळा, हातोळा–पु हातवटी पहा म्ह० गातां गळा; शिंपतां मळा, लिहितां हातवळा. ०वारे–पु.अव. हातानीं केलेले हावभाव; हाताची हालचाल. ०विंड–न. (राजा.) हात झालणा पहा. ०विरजण–न. अजमासानें घातलेलें विरजण ०विरजा–विरंगुळा–वि. कामांत मदत करण्याच्या लायक, लायकीस झालेला (पुत्र, शिष्य, उमेदवार इ०) [हात+विरजणें] ०शिंपणें–न. सोडवणी न देतां शेलणें इ० साधनानें भाजीपाल्यास उडवून द्यावयाचें पाणी; असें पाणी शिंपणें. ०शेकणें–न. (उसाचा चरक) चुलाण्यांत जाळ घालणारास त्याच्या मेहनती बद्दल द्यावयाचा गूळ. ०शेवई–स्त्री. हातानें वळलेली शेवई; याचे उलट पाटशेवई. ०सर–न. बायकांचा हातांतीक एक दागिना, गजरा. 'हे पाटल्या हातसरांस ल्याली।' –सारुह ६.२६. ०सारवण–न. खराटा, केरसुणी न घेतां हातानें जमीन इ० सारवणें. ०सुख–न. १ दुसऱ्यास, शत्रूस हातानें मारून त्यामुळें अनुभविलेलें सुख (क्रि० होणें). २ हातानें दिलेला मार. ०सुटका–स्त्री. १ एखाद्या व्यवहारांतून, धंद्यांतून स्वतः अंग काढून घेणें; मोकळें होणें. २ हातविरजा पहा. ३ हाताचा सढळपणा. ०सुरी–स्त्री. औदार्य. 'हे हातसुरीक्षीरसागरा। वांचोनि नाहीं।'–भाए७६९. ०सुनकी–स्त्री. पाथरवटाचें दगड फोडण्याचें हत्यार. ०सूत–न. चातीवर हातानीं काढलेलें सूत. ०सोकी(के)ल–सोका–वि. हाताच्या संवयीचा; अंगाखांद्यावर घेण्यास संवकलेला. 'केल कुत्रा हातसोका।' 'घडो नेदि तीर्थयात्रा.'–तुगा २९५४. ०सोडवण–नस्त्री. हातसुटका अर्थ १, २ पहा. ०सोरा–ट्या

सुरा-ऱ्या-पु. कुरडया इ० करण्याचा सांचा. **०हालवणी**-स्त्री. प्रवाशांवरील एक जुना कर (त्यांच्या हात हालवण्याच्या क्रियेबद्दल हा कर असे). **हातचा**-वि. १ हातानें दिलेला; स्वाधीनचा; हातांतला; हातानें निर्मिलेली, मिळविलेली, दिलेली (वस्तु, काम, उत्पादन इ०). 'शूद्राचे हातचें पाणी स्नानसंध्येस घेऊं नये.' 'रोग्यास औषध देणें मनुष्याच्या हातचें आहे-आयुष्य घालणें नाहीं.' २ (अंकगणित) पूर्णांकाची बेरीज करतांना बेरजेच्या संख्येंतला अंक ज्या स्थानाचा त्या स्थानीं मिळविण्याकरितां उरलेला अंक. (क्रि० येणें; रहाणें; ठेवणें). ३ लवकर हातीं येणारें; अवसानांतील ४ ताब्यांतील; कबजांतील. **म्ह०** 'हातचें सोडून पळत्याचे पाठीस लागूं नये.' **०चा पाडणें**-१ हातांतील सोडणें. २ एखाद्यास त्याचे ताब्यांतील वस्तूस मुकविणें. **०चा-धड-नीट**-वि. नीटनेटकें काम करणारा (लेखक, कारागीर). **०चा फोड**-पु. फार प्रिय माणूस. तळहाताचा फोड पहा. **०चा मळ**-पु. सहज घडणारी गोष्ट. 'सरळ, सोपी आणि बालिकाबोध भाषा कशी वापरावी हें म्हणजे माझ्या हाताचा मळ आहे.' -कीच. **०चा सुटा**-वि. सढळ हाताचा. **हातवा**-पु १ (बायकी) गौरीपूजनाचे समयीं हळदीकुंकवानें हात भिजवून जमिनीवर छाप मारणें. २ लग्नांत नवऱ्याच्या मिरवणुकीच्या मार्गे धरावयाचा कणकेचा दिवा. ३ घोडयाचा खरारा, साफ करण्याचा काथ्याचा पंजा. ४ काडवात मनको. ५ (कन्हाड) म्हाणवली बसवितांना, मखर बांधावयाचे ठिकाणीं, कुंकू पाण्यांत भिजवून हातानें पांच उलटे पांच सुलटे ठसे उठविणें. **हातळ, हाताळ-ळु**-वि. चोरण्याची संवय असलेला; चोर; भामटा. **हातळणें, हाताळणें**-उक्रि. १ हात लावणें; चोळवटणें; चिवडणें, २ हाताळ माणसानें वस्तू चोरणें. **हातळी, हाताळी, हाताळें**-स्त्रीन. १ घोडयाचा काथ्या इ० चा खरारा. २ भात्याची बोटांत, हातांत अडकवावयाचा चामडयाची वादी. ३ (कर.) भाकरी. **हाता**-पु. हातांत राहील इतका जिन्नस, पसा (फळें, फुलें इ० पांच-सहा इ० संख्येचा संच एकेक वेळ हातांत घेऊन बाजूस ठेवतात). **हाताखालचा**-वि. १ मदतनीस; हाताखालीं काम करणारा. २ उत्तम परिचयाचा; माहितींतील. ३ हातांतील; कबज्यामधील; स्वाधीन. ४ दुय्यम; कमी दर्जाचा. **हाताखालीं**-क्रिवि. १ सत्तेखालीं; दुय्यम प्रतीत. २ स्वाधीन. ३ जातांजातां; हातासरशीं; सहजगत्या. 'मी आपला घोडा विकावयास नेतोंच आहे, मर्जी असली तर हाताखालीं तुमचाहि घोडा नेईन आणि विकीन.' **हाताचा उदार, मोकळा, सढळ**-वि. देणगी इ० देण्यांत सढळ. **हाताचा कुशल**-वि. हस्त कौशल्यांत निपुण, प्रवीण. **हाताचा जड-घळकट-थंड**-वि. १ चिकूक; कृपण. **म्ह०** हाताचा जड आणि बोलून गोड. २ मंद (लेखक). **हाताचा जलद**-वि. काम करण्यांत चलाख **हाताचा फटकळ**-वि. फटाफट मारणारा; मारकट. **हाताचा बाण**-पु वर्चस्व, पगडा, वजन पाडणारें कृत्य, गोष्ट (क्रि० गमावणें; दवडणें; सोडणें) **हाताजागता**-वि. १ हातांत बसेल; मावेल; धरतां येईल असा. २ हात पोहोचण्याजोगें. **हातानिराळा-वेगळा**-वि १ पूर्ण; पुरा; सिद्ध केलेला; पुन्हां हात लावण्याची जरूरी राहिली नाहीं असें (काम, धंदा इ०). 'हा दुर्निवह कोश एकदां हातानिराळा झाला म्हणजे दुसरें काम घेतां येईल.' २ -क्रिवि एकीकडे; बाजूस. 'कामापुरती भांडीं वहिवाटींत ठेवा बरकड हातानिराळीं ठेवा.' **हातापद्धति**-स्त्री दलाल माल घेणाऱ्याच्या हातावर रुमाल टाकून गुप्तरीतीनें मालाची किंमत माल घेणाऱ्याकडून अजमावतो ती पद्धत. **हाताची थट्टा**-स्त्री. थट्टेनें मारणें (थापटी इ०); चापट देणें. (तोंडी थट्टा नव्हे). **हाता(ता)फळी**-स्त्री. गुद्दागुद्दी; मारामारी; कुस्ती; हातझोंबी; धक्काबुक्की. 'मजसीं भिडे हातोफळी।' -ह १९.१४३. -क्रिवि. पटकन; चटदिशी; तत्काळ; हातावर हात मारून. [हात+फळी] **हातावरचा संसार-हातावरचें पोट**-पुन. मजुरी, कामधंदा करून स्वतःचें कसेंतरी पोट भरणें (क्रि० करणें; चालविणें) थोडया पगाराची, कष्टाची नोकरी करून उदरनिर्वाह. **हातावीती**-क्रिवि. हातोहात पहा. 'सर्वज्ञ हातावीती पुढें जाती।' -पुच. **हातासन**-न. हातवटी. 'अन्योपदेशाचेनि हातासनें।' -ज्ञा ६.११९. **हातासरसां**-क्रिवि. त्याच हातानें, प्रकारानें; तसेंच; त्याच बरोबर; चालू कामांत आहे तोंच. 'उष्टी काढतो आहेस तों हातासरशीं भांडीं घास मग हात धू.' **हातिणें**-अक्रि. मारणें. -मनको. **हातिवा**-स्त्री. काडवात. 'उजळोनि दिव्य तेजा हातिवा।' -ज्ञा १६ २३. **हातुवसोया**-वि. एक हात अंतरावरील. 'हातवसिया कळांगगां पावेती।' -धवळे३१ **हातोणी**-स्त्री. (व.) खरकटें पाणी; हातवणी. **हातोपा**-हातपा पहा. **हातोपात-ती**-क्रिवि. एका हातांतून दुसऱ्या हातांत, वरचेवर; हातोहात. -ज्ञा १८.१५६. **हातोरी**-क्रि. (ना.) हातानें; साहाय्यानें. **हातोवा**-पु. (महानु.) अंजली; ओंजळ. 'हातोवा केवि आटे अंभोनिधि।' -भाए २१७. **हातोसा**-पु. मदत; हातभार. (क्रि० देणें), **हातोहात-तो**-क्रिवि. १ हातचेहातीं; हातोपात. २ चटकन; भरदिशीं. (क्रि० येणें=मारामारी करणें). 'हिवांळयाचे दिवसांत दुपार हातोहात भरते.' **हातोळा**-हातवळा पहा. **हातोळी**-स्त्री. (व.) लग्न. **हात्या**-पु. १ पाणरहाटाचा दांडा. २ घोडा घासण्याची पिशवी; खरारा. हाताळी अर्थ १ पहा. ३ मागाच्या फणीची मूठ. ४ काहिलींतील गूळ खरवडण्याचें खुरपें. ५ (कर.) मोठी किल्ली.

हात—स्त्री. संवय; खोड. 'तरुणपणाची ऐट आणण्याची विलक्षण हात होती.' -महाराष्ट्रशारदा, नोव्हेंबर १९३६.

हातणी-न-नी—स्त्री. (कु. कों. राजा.) विहिरीच्या काठावर बैलरहाटाचें पाणी पन्हळांतून पडतें त्या ठिकाणीं बांधलेली उंच जागा; बांधावरून (पाटाचें) पाणी नेण्याकरितां केलेली वाट; बैल-पाय-रहाट लावावयाच्या विहिरीचे बाजूस कैंणेकडाचे टोंक किंवा रूख टेकण्यासाठीं केलेला चौथरा. -आडिव-याची महालक्ष्मी १५४. [सं. हस्त]

हातणी-नी—स्त्री. १ घोडा वगैरे धुतांना हातांत घालण्याची काथ्याची पिशवी; खरारा. २ खळ्यांतील खराटा, केरसुंणी. ३ (चांभारी) चामडें ठोकण्याचें अवजार. [सं. हस्त; हिं. हथनी]

हातमली—स्त्री. (बुद्धिबळें) प्रतिपक्षाचा हत्ती व राजा आणि आपला हत्ती, राजा व एकच प्यादें राखून प्यादी करणें.

हांतर-री—पुस्त्री. बांबूची मोठी चटई: (गो.). हातर पाटो.

हांतरणें-हांथरूण—अंथरणें इ० पहा.

हाथरूं—न. (निंदार्थी) हत्ती.

हातळ—स्त्री. धु-यांवर जोखड ज्या दोरीनें बांधतात ती दोरी. -बदलापूर २८७.

हाता—पु. (कों. गो.) केतकी; केवडा; सोनकेवडा, त्याचें कणीस.

हातियार-येर-येरु, हातेर—न. हत्यार पहा. ' तरी मनासि करावा मारु । तेथ न चले हातियेरु । ' -एभा २३.७१५.

हांतुलें—स्त्री. लाकडाचें परळ. -शर.?

हातुल्यो—उद्गा. मुलांचे खेळांत, अटींतून मुक्त होण्याचें वेळीं उच्चारण्याचा शब्द; थुथुळ्यो, थुंगुश्याप्रमाणें.

हाते(त्या)ण—न (घोडी, गाढवी) माजावर येणें; वाफ; माज. (क्रि० करणें). ' पडल्या एका शिंग्याकरूनि हातेणें । ' -मोउद्योग १३.२१७. **हात्याणास येणें**-माज करणें.

हातेर—न. (कों.) पाटील, खोत इ० च्या शेत इ० मधील कुळांनीं किंवा रयतांनीं करावयाची बिगार.

हात्यार-त्येर, हात्यारबंद—हत्यार इ० पहा.

हाथरणें, हाथरूण—आंथरणें इ० पहा.

हाथि(ए)येर—हातियेर. हत्यार पहा. ' हें कां हो जी उसासिलें । हाथिएरविण । ' -भाए ७६.

हांदकळणें—अक्रि. (बे.) डचमळणें; हिंदकळणें पहा.

हादगा—हदगा पहा.

हादरणें—हदरणें पहा. ' पदराच्या वा-यानेंसुद्धां बायकांचें हृदय हादरायला लागतं. ' -एक ६५.

हांदा—पु. पैरा; इरजीक; पडकेल; डाळें; परस्परांना मदत करण्याची शेतक-यांची रीत. **हांदेकरी, हांदलेकरी**-पु. हांदा करण्यासाठीं दिलेला माणूस, बैल इ०. हांदा केला आहे ते परस्पर.

हादाल, हादालपार्वती—हदाल इ० पहा.

हादी—पु. वाटाड्या. -पेद ३.१८३;३,११०. [अर.]

हांदु(द)ळणें—उक्रि. १ आंदुळणें पहा. फळें पाडण्यासाठीं झाड गदगदां हालविणें. २ झोके देणें; पुढेंमागें करणें. -अक्रि. हालणें; डोलणें; झोका खाणें. [सं. आंदोलन] **हांदुळ-हिंदूळ-हिंदळ**—स्त्री. झोका; आचका; पुढें मागें करणें. झोकाझोकी.

हादोशी—स्त्री. (कु.) हांव; लोभ. -वि. लोभी.

हान—उअ. अन्; आणि. -शर.

हानजा—पु. (नाविक.) यारी.

हानाव—पु. (नाविक.) तिरपा सांधा.

हानि-नी, हान, हाण—स्त्री. १ नुकसान; तोटा; बूड. २ घात; दुखापत; धोका; उध्वस्तता; बिघाड; नाश. [सं.] **म्ह०** आपली हानि जगाचें हासें. **०पंचक**-न. (ज्यो.) एक कुमुहूर्त. चोरपंचक पहा.

हापटणें—आपटणें पहा.

हांपा—पु. धांप; दमा; श्वास. (क्रि० भरणें; टाकणें; देणें; सोडणें). [हिं. हापना. ध्व.]

हाफीज—पु. कुराण तोंडपाठ म्हणणारा मुसलमान. [फा. हाफिझ्]

हाब—न. (माण. धनगरी) बिरोबासाठीं बकरें मारून त्याच्या मांसाचें घातलेलें जेवण.

हाबक—स्त्री. (व.) कटकट; त्रास. (क्रि० मिटणें).

हाबकणें—उक्रि. हबकणें पहा. **हाबका**-हबका पहा.

हाबड—स्त्री. (ना.) तोटा; नुकसान.

हांबडणें—क्रि. (कु.) गुरें हांकणें. आंबडणें अर्थ २ पहा.

हांबरणें, हांबरडा—हंबरणें, हंबरडा पहा.

हाबशी, हाबसाण—हपशी, हपसाण पहा.

हाबसाहुबशी, हामसाहामशी—स्त्री. स्फुंदणें; हुंदका. -क्रिवि. ओक्साबोक्शी. [ध्व.]

हाबळणी-णें—हेबाळणी-णें पहा.

हाबासणी—स्त्री. (दादर) जोरानें ओरडणें; खेंकसणें.

हांबेट—उद्गा. (गो.) खेळ थोडावेळ बंद करावयाच्या सुचनेचा शब्द; थुथुळ्यो; थुश्यो. [ध्व.]

हामी, हामीदार-री—हमी इ० पहा.

हाय, हा—बहुवचनाचा फारशी प्रत्यय (हा बहुधां निर्जीव वस्तु दर्शविणा-या नामांना लागतो. पण मराठींत प्रादेशिक नामांनाच लागतो. उदा० वेहेहाय, जिल्हेहाय, महालहाय. [फा. हा]

हाय—स्त्री. हयात; आयुष्य. [अर. हइ] **हायत, हयात**-हयात इ० पहा.

हाय—उद्गा. १ सुखानुभवाचा उद्गार (दुःखाचा प्रतिकार होऊं लागला म्हणजे तोंडांतून निघणारा. २ शरीर, मन यास दुस्सह वेदना झाली असतां निघणारा सुस्कारा, दुःखोद्गार; हां, चूं, कुं, कटकटा, इ०. –स्त्री. (बालभाषा) तिखट, विस्तव, दिवा, तीक्ष्ण शस्त्र, क्षत इ०. [ध्व.] **०खाणें-घेणें**–१ जिवास लावून घेणें; धास्ती घेणें; घाबरून जाणें. २ (तापाची, खाण्याची) भीति वाटणें, धडकी घेणें. **०पतकरणें-मोकलणें**–पश्चात्ताप करणें; चुकीबद्दल दुःखोद्गार काढणें. **०सोडणें-देणें-घालणें**–उसासा टाकणें. **०घालणें**–ध्यास घेणें; धोसरा काढणें. **हायास येणें-आणणें**–जीव मेटाय्स येणें; थकणें; भागणें; अशक्त करणें, दुर्दशेप्रत आणणें. **०दोस्त-दोस-दुल्ला-धुल्ला, हायदोस**–उद्गा. [मुसलमान लोक ताबुताचे पुढें हसन व हुसेन हे त्यांच्या लग्नानंतर लवकरच लढाईंत मरण पावले, म्हणून हाय! मित्रा! नवरदेवा! असा दुःखोद्गार काढून नाचतात त्यावरून] नाचणें, ओरडणें; दंगल; धुमाकूळ. (क्रि० घालणें; माजणें; उठणें; मांडणें; करणें) [हिं. हाय! दोस्त! दुल्हा=नवरा] **०सा**–वि क्रिवि. हाय! असा; समाधानाचा, आनंदाचा उद्गार उच्चारावयाच्या स्थितींत असलेला; दुःखकारक स्थितींतून सुटका झाल्यामुळें सुखी झालेला. (क्रि० होणें). 'त्या दाटीमध्यें माझा जीव अगदीं कासावीस झाला होता, मी अंमळ बाहेर येतांच हायसा झालों.' **हायसें वाटणें**–आनंद, स्वस्थता वाटणें (दुःखप्रतिकारानंतर). **हाय-हुय**–दुःखोद्गार. –स्त्री. करुणोद्गार; वेदनांमुळें विव्हळणी. **हाया, हायाहुया**–हाय पहा.

हायकोर्ट—न. वरिष्ठ न्यायमंदिर. [सं.]

हायन—न. वर्ष. 'तेरा पळेंहि नसती माता हें हायन चवदावें हो।'–मोउद्योग ७.५१. [सं.]

हायल, हायेल—वि. भयंकर. 'लेकीन हा मझेला हायेल होय.' –रा ५.१५७. [अर. हाईल्]

हायवडा—पु. (व.) हव्यास.

हांयस—न. (गो.) आमिष; आविस. [सं. आमिष]

हायस्कूल—न. इंग्रजी दुय्यम शिक्षणाची शाळा. [इं.]

हार—न. (कु.) पाशीं; जवळ. 'माझ्या हार नाय.'

हार—पु. (गो.) आर; अजगर. आर पहा.

हार—स्त्री. १ नुकसान; तोटा; खोट. (क्रि० येणें; बसणें). 'आंब्याच्या व्यापारांत मला मोठी हार आली.' २ पराभव; अंगावर डाव येणें, लागणें (युद्ध, जुगार इ० त). (क्रि० येणें). ३ –पु. अपहार; हरण; लूट. ४ (अंकगणित) भाजक; छेद. [सं. हृ=हरण करणें, चोरणें] **०खाणें-घेणें-जाणें**–पराभव पावणें; माघार घेणें; तोटा सोसणें; कमी दर्जाचे आहों असें कबूल करणें. 'त्यानें त्यांचा यथायोग्य समाचार घेऊन त्यांस हार खावयास लावलें' –नाना–महादजी. **०जाणें**–कमीपणा पतकरणें; पड खाणें; पराभव पावणें; मागें राहणें. 'चलाखपणांत आम्हीं कोणत्याहि लोकांस हार जाणार नाहीं अशी आमची खात्री आहे.' –नि. **०घेणें-पत्करणें-मानणें**–नुकसान सोसणें. म्ह० १ हार मानली झगडा तुटला. २ हार मानली पण झगडा तुटो=कोणीकडून तरी तंटा मिटो. **हारीं जाणें**–पराभव पावणें; पत्करणें. **हारक**–वि. १ हरण करणारा; लुबाडणारा; लुटणारा. २ निवारण करणारा; नाहींसें करणारा. उदा० पित्तहारक-वातहारक इ० (औषध) हारी मध्यें पहा. ३ (अंकगणित) भाजक. **हारजीत**–स्त्री. जयापजय. 'हारजीत कोणाचे स्वाधीन नाहीं.' [हारणें+जितणें] **हारणें**–उक्रि. १ जिंकणें. 'म्यां त्याला १०० रुपयांस हारलें.' २ हरणें पहा. **हारतणें**–हरण करणें. 'मुक्तीचा ठेवा हारता।' –भाए ८८. **हारतेंपण**–न. हरवलेपण; नसतेंपण; नाहींपणा 'हें आथी तरी कायिसें। हरतले पण।' –अमृ ७. १०४. **हारपणें**–अक्रि. हरवणें; हरपणें पहा. **हारवणें-विणें**–उक्रि. गमावणें; घालविणें; हरविणें पहा. **०सडणें-हारसरणें**–अक्रि. (राजा.) पराभव कबूल करणें; हार खाणें; शरण जाणें. **हारो**–स्त्री. हार; पराभव; तोटा. हार पहा. –एभा २८.६८५. –वि. १ हारक पहा. (दुखहारी, ज्वरहारी). २ मोहक; आकर्षक. **हार्य**–वि. हरण करण्यास शक्य, योग्य. [सं.] **हारसडणें**–उक्रि. (राजा.) आटोक्यांत येईल इतपत कमी होणें, करणें; समावणें; सहज करतां येईल येथपर्यंत आकुंचित होणें, करीत आणणें. [हारणें+सडणें किंवा हार=रांग, ओळ] **हारसडीस आणणें**–आटोक्यांत, मर्यादेंत आणणें; आटोपशीर करणें (मोठा उद्योग, धंदा इ० हळू हळू विल्हेवाट लावून). 'एक वर्षाचें लिहिणें तुंबलें आहे, सारा गोंधळ झाला आहे, एवढें हारसडीस आणून दे, मग मी शेवटास नेईन.' **हारसडीस येणें**–आवाक्यांत येणें.

हार—पु १ गळ्यांतील एक कंठा; माळ (फुलें, रत्नें इ० ची). 'हार कंठीं साजरा।' २ रेशमाच्या लडया एकत्र ओंवून माळेसारखा करतात तो आकार. –स्त्री. ओळ; रांग; पंक्ति. [सं.] **हारोहार**–क्रिवि. १ एका अखंड ओळींत; एका ओळीनें; रांगेत; मागोमाग. २ अव्याहत क्रमानें; एकामागून एक (घडलेल्या गोष्टी, प्रसंग). 'त्या बायकोस हारोहार चार खेपा मुलीच झाल्या.'

हारा—पु. मोठी बांबूची पाटी; हरा. **०डेरा**–पु. १ मंगळागौरीचे पूजेच्या वेळीं कणकेच्या डेऱ्यांत पुरण भरून देवीजवळ ठेवतात तो. २ विवाहांत वराचे घरीं वरांत आल्यावर एकावर एक तीन तपेलीं ठेवून, त्यांत काय आहे म्हणून वधू;

वरास विचारते व वर उत्तर देतो कीं नवरत्नाचा हार आहे, या प्रकारास हाराडेरा म्हणतात. ३ (व.) वरातीबरोबर न्याव याचा वधूकडील कलश; करादिवा.

हाराष-स—पु. तोटा; नुकसान; खोट. (क्रि० येणें; होणें; बसणें). [सं. ऱ्हास]

हारिख—पु. आनंद; हर्ष. [सं. हर्ष]

हारिद्र—वि. हळदीचें; पिवळें. [सं.]

हारी—स्त्री. रांग. **हारी-क्रिवि.** १ कडे; दिशेस; बाजूस. 'तो शेताहारीं गेला.' २ कडे; हातीं; जवळ. 'त्या हारीं माझे दहा रु० आहेत.' ३ इतरअर्थी कडे शब्द पहा. ४ जवळ; पाशीं. 'गांवाहारीं, डोंगराहारीं.' **हारेमोहरे, हारेमोहरेस. हारेम्होरे-स, हाऱ्यामोहऱ्यास**-क्रिवि. जवळ; आसपास; समोर; पुढें; आजूबाजूस. (नकारार्थी प्रयोग). 'म्यां एकवेळ त्या पोरास मार दिल्हा, तेव्हांपासुन तो माझे हारेमोहरेस उभा राहत नाहीं.' 'त्याचे हारेमोहरेस तुम्ही उभे राहूं नका, तो सोदा आहे.'

हार्णाळ—स्त्री. ओघ; प्रवाह. 'केली हार्णाळां अंघोळी।' –तुगा ४१२५.

हार्द-र्द्र—न. १ इंगित; हृद्गत; कल. २ उद्देश; आशय; अभिप्राय; श्लोक (कृति, भाषण इ० चा). –वि. मनांतील. [सं. हार्द]

हाल—पु. जलदी; त्वरा. [हिं.] **हालका**-क्रिवि. जलदीनें. 'चार हजार घोडा। हालका धराया चालला।' –ऐपो १४. [अर. हाल=आता]

हाल—पु. आपदा; कष्ट; निकृष्टावस्था; दैना; तारंबळ (बहुधां अनेकवचनी प्र०). (क्रि० काढणें; भोगणें; सोसणें; घेणें; होणें; देणें; पाडणें; करणें). [अर. हाल्] **म्ह० हाल असे झाले कीं कुत्रें खाईना. ०अपेष्टा-आपदा**-स्त्री. हाल; दुर्दशा; नानाप्रकारचीं संकटें; आपत्ति. **०हवाल**-पु स्त्री. दुर्दशा; हालअपेष्टा. 'हालहवाल असेल तत्रापी हे खंडणी सोडतात असा अर्थ नाहीं.' –ख ११४५. –वि. संकटग्रस्त; दुर्दशा असलेला. 'फौज हाल हवाल झाली.'

हाल—स्त्री. १ निश्चय; हट्ट; निर्धार; पण. (क्रि० बांधणें, सोडणें). 'मज कोण्ही न लगे आणीक संगाती। राखावी बहुतीं हाल माझी।' २ पैज; होड; प्रतिज्ञा; स्पर्धा; धडाओढ; शर्यत. (क्रि० बांधणें).

हाल—हालत पहा. 'लस्कर पायमालानें रयतीचा हाल राहिला नाहीं.' –रा १८.५३.

हाल—वि. हल्लींचा. –क्रिवि. १ सध्यां; हल्लीं; वर्तमान. २ सतत; नेहमीं; एकसारखें. 'हालबसूल.' –बाडथोमा १.९३. [अर. हाल्] **०अंमल**-पु. सध्याचें सरकार; अंमल. **०अहवाल-हकीकत**-स्त्री. १ कैफियत. 'एणें प्रमाणें आपला हाल अहवाल खातरेसी आणितां...' –रा १८.३१०. 'आमची हाल हकीकत विदित करून...' –इऐ ५.४८. २ वर्तमान. **०खुद्द-द्द**-क्रिवि. आहे त्या स्थितींत; ठायीचे ठायीं. 'आपण शिवाजीवरी जातों, त्यास हालखुद्द ठेवितों।' –सभासद ५९. **०खुशामती**-वि. नेहमीं नव्यानें हांजीहांजी करणारा खुशामती पहा. **म्ह०** 'हाल खुशामत ताजी रोटी.' **०फिलाल**-क्रिवि. आतांचे आतां; या क्षणीं. **०साल**-न. चालू वर्ष. –क्रिवि. या वर्षी. **०हवाल**-पु. हकीकत; वर्तमान; सद्यःस्थिति. 'रयतीचा हाल हवाल जाहीर केला.' –रा १८.५३. [अर.] **हालीं-हाल्लीं**-क्रिवि. सांप्रत; आतां. –रा ३.९७. [फा. हाली]

हाली(ल्ली)माजी-स्त्री. १ सरकारी अधिकाऱ्यांची बदलाबदली; राज्यकारभारांत बदल; फरक; फेरफार. 'तूर्त हालीमाजीमुळें...' –बाडथोमा १.३३५. 'आमचे दौलतींत हालीमाजी होत गेल्यामुळें कागदपत्र दाखलेशीर राहिला नाहीं.' –रा १.३१२. २ येजा; जुनें जाणें, नवें येणें. **हालोहाल**-क्रिवि. या क्षणीं; आतांच; हातचे हातीं. [हिं.]

हॉल—पु. दिवाणखाना. 'दरबार हॉल.' [इं.]

हालउंडा—पु. (गो.) तांदूळ, साखर इ० चें एक पक्वान्न. [हालगो+उंडा ?]

हालगो—पु. भाताची एक जात. [हळबा ?]

हालणें—अक्रि. १ सरणें; ढळणें; गती येणें, सरकणें. २ गडबडीत, दंगलींत, गोंधळांत असणें (देश, गांव, घर). ३ हलकल्लणें. [हिं. हालना] **हालकडी**-स्त्री. नथेंतील किंवा मोत्यांची कडी, घोंस. हलकडी पहा. [हालणें+कडी] **हालचाल**-स्त्री. १ सजीव अवस्थेची द्योतक क्रिया; चेतना. २ चळवळ; चालना; उद्योग; वळवळ; चलनवलन. [हिं.] **हालता नारळ**-पु. हालविला असता आंतील पाणी वाजणारा नारळ. **हालबोंद्रा-बोंद्रा-बेंद्रा**-वि. १ घाणेरडा; अजागळ; मूर्ख. २ वेडगळ; हेकाड. ३ नालायक; कुचकामाचा; नपुंसक; दुबळ मनाचा. ४ (हेटकरी.) एक शिवी. चिंध्या लावणारा. [हालणें+बोंदर–री; हलका+इंद्रिय] **हालविणें**-सक्रि. सरकविणें; गति देणें; सारणें; धामधूम करणें; जागृत करणें; चेतविणें; चेवविणें. **हालवून जागा करणें**- १ आयासानें, प्रयासानें प्रवेश करणें. २ उठविणें; चेतना आणणें (सांगून, सुचवून).

हालत—स्त्री. हाल; सुस्थिति; त्राण; जोर; दम; हाल. 'मुलकांत हालत कांहीं राहिली नाहीं.' –मदबा १.२१३. [अर. हालत्]

हालपा—पु. (जुन्नरी) मेंढराच्या गळ्यास होणारा एक हवळा. हळवा पहा. **हावा**-पु. हव्यास. 'भणौनि तळौनि काढिला हावा। अमृतरूप।' –ऋ ८१.

हालबं(बिं)डया, हालबा(बे)लंडी-डें—हलबेलंडी इ० पहा.

हालमस्त—वि. गरीब पण गर्विष्ठ. हालमस्त पहा. म्ह० हालमस्त कीं मालमस्त. [अर. हाल्+फा-मस्त]

हालहूल—स्त्री. गडबड; गोंधळ; आरडाओरड; धिंगाणा; बेदिली (देशांत परचक्र आलें असतां किंवा लूटमार होत असतां होणारी).

हालाहल—पु. हलाहल पहा.

हालिक—वि. नांगरासंबंधीं. [सं.]

हाली—क्रि. (महानु.) हागितेली; हाणली. 'कां करुणा केली हाली।' –भाए १११. [सं. हा.]

हालीमवाली—वि. उच्चनीच; गरीब श्रीमंत. अहालीमवाली पहा. [अर. अहाली+मवाली]

हाली हरामी—हलीहरामी पहा.

हाल्या—पु. रेडा; हल्या पहा.

हांव—सना. (गो.) मी. [सं. अहं; हिं. इं.]

हाँव—पु. (गो.) मधाचें पोळें; मोहोळ.

हाव—स्त्री. गप्प; वदंता. [अर हवा]

हाव—पु. १ कामोद्दीपक चेष्टा; नखरा; नट्टापट्टा. २ (अव) शृंगारचेष्टा; प्रेमकला. ३ (अव.) हावभाव. [सं.]

हाव—स्त्री. १ तीव्र इच्छा; औत्सुक्य; बलकट आशा. (क्रि० भरणें; लागणें; धरणें). २ हिंमत; धमक; घाडस; दम. 'हजार रुपये खर्चीन अशी त्याची हांव आहे.' ३ तेज; प्रभा. –शर. ४ हव्यास; लोभ. [अर. हवा=आयुष्य, वारा] **०घालणें**–(काव्य) आशा धरणें. 'माजारें देखिला लोणियाचा गोळा। लावूनिया डोळा हाव घाली।' **हाव करणें**-मिळविण्यासाठीं धडपडणें; घाबरे होणें. **०भरी भरणें-होणें**–अतिशय उत्सुक होणें; लोभ उत्पन्न होणें. **हावेस-नें-हावें भरणें**–१ उत्सुकतेनें पत्करणें (असामान्य, विक्षिप्त योजना). २ मन घालून पाठपुरावा करणें; चिकाटी धरणें. ३ फार महत्त्वाकांक्षी बनणें, होणें. ४ हव्यास पेटणें. 'तों त्यावरि उठे भरले दोघेहि संगरीं हाव।' –मोकर्ण ४५.३४. **०भरी**–वि. १ लोभयुक्त; हावरा; वासनायुक्त. २ महत्त्वाकांक्षी; अति उत्साही; एखाद्या गोष्टीसाठीं वेडा झालेला. (क्रि० होणें). **हावर-रें**-पु.स्त्री.न. अतिशय इच्छा; लोभ; हव्यास. (क्रि० सुटणें; भरणें). **हावरा, हांवरा**–वि. १ अत्यंत लोभी; कितीहि मिळालें तरी हवेंच अशा स्वभावाचा; आशाळभूत. २ उतावळा; हळवा; असहनशील (दुःख, ईप्सित वस्तु इ० संबंधीं). **हावळा**-वि.

हावडें—न. (क.) अतिशय कष्ट, श्रम. खरड पहा. (क्रि० काढणें). 'त्यानें माझें हावडें काढलें.'

हांवदु ठणें—हांदुळणें पहा.

हावबोर—पु. बचल्याचें बी. –मुंव्या ११३.

हावभाव—पुअव. १ भावनादर्शक अभिनय, भाव, चळवळ आणि हातवारे; आंतरभावदर्शक क्रिया. 'तंव नेत्रकटाक्ष हावभाव। दाविती नाना लाघव.' २ नखरे; चेष्टा. ३ अनुमान; अंदाज; तर्क. (क्रि० बांधणें). [हाव+भाव]

हावर—पुस्त्री. गळूं, फोड इ० फुटल्यानंतर पुन्हां जो गुबारा धरला जातो तो. (क्रि० धरणें).

हावरी-रा—स्त्रीपु. (व.) पांढरा तीळ.

हावळा—पु. हिरवा वाटाणा, हरभरा यांचा केलेला हुरडा. हुळा पहा.

हॉवा—न. (गो) लग्नाचें वऱ्हाड.

हावा—(प्र.) व्हावा. [होण]

हावाव—स्त्री. शोभा. –मनको. [हाव+आव]

हा(हां)वाळी—स्त्री. (कु.) १ दमा; श्वास. २ सांथ. [ध्व. हां]

हावेली—स्त्री. मोठें घर; वाडा. हवेली पहा.

हाशम—हशम पहा. शिबंदी. 'हाशमाकडील फडणीसीची असामी.' –बाडदुबा २१७.

हाशा-शी, हांशा-शी—पुस्त्री. हशियाहशी; बारतोंडी; एक झाड. पानें चार बोटें रुंद व लांबट असून; फळ बोराएवढें असून मुळापासून पिवळा रंग होतो. –वगु ६ ३८.

हाशा-हासोया—पु. वस्त्राची दशी; किनार. [अर हाशिया]

हाशीखुशी, हाशीखेळी—हशीखुशी पहा.

हाशी(सी)ल—न. १ हशील पहा. २ फायदा; नफा [अर. हासील] **०करणें**-(उप.) गमविणें; घालविणें.

हास—स्त्री. (व.) गळ्यांतील सरी; हासळी.

हास—पु. हास्य; हसणें. [सं.] **हासणें**-हसणें पहा. **हासी**-स्त्री. हंसें; उपहास. 'असी किरे प्रीत वाढल किर्त जनांत न होय हासी।' –सला १०. **हासीन(स)णें**–अक्रि. (काव्य) हसणें. 'तेव्हेळीं विस्तिममुखें हासीनली।'–शिशु १९०. **हांसें**-हंसें पहा. **हास्य** न. १ हंशा; हसें. २ आनंदाचें हसूं; सुखाची भावना. ३ नवरसांपैकीं एक रस. ४ थट्टा; उपहास. ५ विनोद; मौज. हास्याचे चार प्रकार–स्मित, हसित, हास्य, अट्टहास्य. **हास्यक**–न. हास्याला कारणीभूत होणारी गोष्ट; विनोदविषय;

हास्यकारण. (इं.) जूमरला प्रतिशब्द. -हास्यविनोदमीमांसा, प्र ६. [सं.] ०कारक-वि. १ हंसें उत्पन्न करणारें. २ उपहासास्पद. ०मुख-घवन-वि. १ नेहमीं हंसरा; हंसतमुख; हसऱ्या तोंडाचा; आनंदी. २ विशेषप्रसंगीं हास्ययुक्त वदन ज्यांचें झालें आहे असा. ०रस-पु. नवरसांतील पांचवा रस; हास्य-हांसणें. हास्यास्पद-वि. हंसण्यासारखें; उपहास-थट्टा यांचा विषय होण्याजोगें.

हासडणें, हासडा, हांसणें, हांसडा, हांसळी, हांसू, हांसें—हसडणें इ० पहा.

हांसाबाजी—स्त्री. हंसाबाजी पहा.

हासिया—स्त्री. किनार. हाशा पहा. -ऐटि १.१४. [अर. हाशिया]

हांसेगहूं—पु. एक जातीचा गहूं.

हाहा—उद्गा. दु.खोद्गार; अरेरे!, हाय, हाय!. 'हाहा! हाहा! ऐसें म्हणताचि हतशेष बळ पळालें हो!' -मोभीष्म ११.११६. [ध्व.] ०कार-हाहाःकार, हाहाक्कार-पु. १ मोठा शोक; विलाप. 'चोहोंकडे पाण्याचा हाहाकार पडला.' २ एखाद्या पदार्थाचा अभाव, हाकाटी पडणें.

हांहां—उद्गा. थांब! खबरदार! मागें सर! असें बजावणारा उद्गार. (क्रि० म्हणणें; करणें). [ध्व.] ०म्हणतां-म्हणेतों-क्रिवि. हातचेहातीं; चटदिशीं; त्वरेनें; चटकन. 'सुचिरक्षुधित ब्राह्मण हांहां म्हैणताहि वाढिल्या ताटीं।' -मोकृष्ण ८६२२.

हा हू, हां हूं—स्त्रीन. १ भय, सावधान, जागृतपणा इ० सांगण्यासाठीं काढलेला उद्गार; खांकरणें; हं करणें इ०. २ तळमळ; विवळणें ३ कांकू; साशंकता; अनिश्चितपणा. [ध्व.]

हाहाक्कार—पु. छांछूं. [ध्व.]

हाहाट—पु. ओरड; आक्रोश. 'मुक्या नाकीं भरे मुरकुट। तें फेंकें बेंबें करी निकृष्ट। न कळे रडे करी हाटाट ते खटपटं वाउंगी।' -एभा २१.२२८. [ध्व. आटाआट]

हाळ—स्त्री. १ हारा; टोपली. २ (त्यावरून) विक्रीचे जिन्नस घेऊन परगांवीं जाणें किंवा खेडोखेडी विक्री करीत हिंडणें. उदा० हाळी जाणें-चालणें-निघणें. ३ (अशा तऱ्हेनें विकावयाचा माल; जिन्नस. ४ या मालाचा विक्रीचा पैका, नफा. ०बाजार-पु. माल घेऊन खेडोखेडीं विकत हिंडणें. (क्रि० करणें).

हाळ—स्त्री. लागवड करतांना जमीनींतून काढलेल्या किंवा पूर्वी असलेल्या झाडाची खूण.

हाळ—पु. १ गुरांसाठीं बांधलेला पाण्याचा मोठा हौद; ठाकी. २ लांब व खोल चर; लांबट, खोल चूल; विस्तवाची खाई; चंपाषष्ठीचे दिवशीं खंडोबाचा गोंधळ चालू असतां त्याचे भक्त ज्या वरून चालत जातात तो विस्तव, खाई. आहार-ळ पहा. ३ (कर्ना.) डोंगरावरून वाहाणारा ओढा, झरा. त्याचें बनलेलें खडबडीत पात्र. ०करी-पु. हाळांत मोटेचें पाणी भरणारा माणूस.

हाळ—पु. नाश. [का. हाळु] ०करणें-(क.) गमावणें; उधळणें.

हाळजणें—अक्रि. (माण. व.) बाळंत होणें.

हाळदुली—स्त्री. हळद-हळदुली पहा.

हाळी—स्त्री. (महानु) एक प्रकारची पळी. 'हाळीया पाळीया।' -सिद्धांतसूत्र.

हाळी—स्त्री. (कु.) हांक; आरोळी.

हाळीज-स—न. (व.) नांगराची धुरा; आडवी दांडी; इसाड. [सं. हलिज]

हाळीव—न. अहाळीव (धान्य) पहा.

हाळोपाळ—क्रिवि. (व.) आसपास; जवळ; शेजारीं. [आळी द्वि. का. हळ्ळी+पळ्ळी]

हि—अ. देखील; आणखी. [सं. अपि?]

हिक—स्त्री. (व.) घाण.

हिकडचा-ला-लो, हिकडणें, हिकडील, हिकडून, हिकडनतिकडन, हिकडे, हिकडेतिकडे—इकडचा इ० पहा.

हिकणें—उक्रि. (अश्लील) संभोग करणें.

हिंकणें—उक्रि. (राजा. तिरस्कारार्थी) खाणें; बोकणा भरणें.

हिकमत—स्त्री. १ शहाणपण; चातुर्य. २ कावा; मसलत; जादू; युक्ति. [अर. हिक्मत्] हिकमती-त्या-वि. १ शहाणा; हुन्नरी; कसबी; हुशार. २ कावेबाज; लबाड.

हिंका, हिंके(हिक्के)खोर—हेंका, हेंकेखोर पहा.

हिकाती—स्त्री. (क.) अयोग्य, खोटी सबब; अडचण दाखविणें; फालतू कारण, तकार; आडफाटे. हिकाती-त्या, हिकात्याखोर-वि. सबबी सांगणारा; आडफाटे आणणारा; तकारी करणारा. [अर. हिकायत्]

हिकायत—स्त्री. कथा; गोष्ट; कहाणी. [अर. हिकायत्] हिकायती-स्त्री. चार रकान्यापर्यंत ओढलेली रेघ (पूर्वीच्या लिहिण्यांत). रेघ पहा. -वि. १ हिकाती पहा. २ गोष्टी सांगणारा.

हिकृष्वती—स्त्री. दुर्भिक्ष; दारिद्र्य. 'त्यांच्या कपाळीं आपली हिकृष्वती.' -खेडयांतील स्वभावचित्रें ९८. [हिकृष्वती या वैदिक मंत्रावरून अडाणीपणें बनविलेला चुकीचा अर्थ]

हिक्का—स्त्री. उचकी. [सं.]

हिक्का—पु. हेका पहा.

हिंग—पु. अति उग्र वासाचा एक चीक. हा मसाला, फोडणी इ० त घालतात. [सं. हिंगु] **०लावणें-लावून विचारणें-मानणें-मोजणें**-(नकारार्थी प्रयोग) मानणें; आदर देणें; महत्त्व देणें (हिंग महाग असल्यानें महत्त्वाच्या पदार्थांतच वापरतात, यावरून). **०हगणें**-रोग इ० नीं झिजणें; रोडावत जाणें; पिचत पडणें. **हिंगडा**-पु. १ हलक्या प्रकारचा हिंग; वाईट हिंग. २ (निंदार्थी) हिंग. **हिंगणें वाफणें**-उक्ति. १ (पदार्थांस प्रथम हिंग लावून मग फोडणी देतात त्यारून लक्षणेनें-नकारार्थी प्रयोग करून) करावयाचें कृत्य अपुरें असणें; आरंभहि नसणें. 'अजून शेत हिंगलें नाहीं वाफलें नाहीं; इतक्यांत पट्टी काय म्हणून केली.' 'रोजगाराचा ठिकाणा नाहीं अजून हिंगला नाहीं वाफला नाहीं.' २ (शेतजमीन) वाफणें पहा. ३ शेत भांगलणें. ४ अजारांतून बरें होऊं लागणें. [हिंग+वाफ] **हिंगतूप-धूप-पु** अव. नेहमीं होणारा संसाराचा किरकोळ खर्च (विशेषतः देवधर्म, जेवणखाण इ० चा). (क्रि० जाणें; उडणें; खरचणें). (पैसा कसा उडतो हें दाखवितांना वापरतात). 'हिंगतुपास-तुपाखालीं-वारी-त्यानें सर्व संपत्ति उडविली.' **हिंगरडूं-रूड**-न. हिंग खाल्ल्यामुळें व्रणावर उठणारें बेंड; हिंगुरडें. **हिंगवणी**-न. हिंग लावलेलें पाणी. **हिंगाचा अंगारा**-पु. बाळंतिणीचे पांचवे व सहावे दिवशीं हिंग व हळद पाण्यांत कालवून बाळंतिणीस व घरांतील मुलाबाळांस लावतात तो अंगारा. **हिंगाचा खडा**-पु. १ एखादी त्रासदायक, निष्कारण फाटे फोडणारी व्यक्ति, वस्तु. २ गडबडया, तल्लक माणूस. **हिंगाचा वास**-पु. संपत्ति, शक्ति, अधिकार इ० नाहींसें होऊन मागें राहिलेला निव्वळ लौकिक; काप गेले, भोकें राहिली या अर्थी. **म्ह० हिंग गेला पण हिंगाचा वास राहिला. हिंगाचें पोतें**-न. वरील लौकिकवान् व्यक्ति. **हिंगा-लोण्याचा**-वि. (ना.) अशक्त व नाजूक प्रकृतीचा. **हिंगाष्टक**-न. सुंठ, मिरें, पिंपळी, ओवा, सैंधव, जिरें, शहाजिरें व हिंग या आठ औषधांचें समभाग चूर्ण. हें जठराग्नि प्रदीप्त करतें. [हिंग+अष्टक] **हिंगु**-पु. हिंग व त्याचें झाड. [सं.] **हिंगुनिर्यास**-पु हिंग. **हिंगुरडें**-हिंगूडूं पहा.

हिंग—क्रिवि. (व. कुणबाऊ) इकडे. हंगे; हिंगे पहा. [का. ई-हींगे]

हिंगण-णा-णी, हिंगणबेट-टी—पु स्त्री. एक झाड. 'कल्पतरु आणि बाभूळ। हिंगण आणि मल्यागर।' [सं. इंगुदी] **हिंगणबेट-मिठा**-न.पु. वरील झाडाचें फळ. यांत बंदुकीची

दारू भरून आपटबार इ० करतात. **हिंगणमूळ**-न. हिंगणीचें मूळ.

हिंगणें—न. (राजा.) एक प्रकारचें बांबूचें शिपतर.

हिंगरावांगर—स्त्री. (व) (लहान मुलांची) झोंबाझोंबी; भांडण; तंटा.

हिंगलाट—न. (कु.) हिंगरडूं पहा. घट्टा; चामखीळ.

हिंगा—पु (माण.) एक किडा; भुंगा **हिंगे पडणें**-(माण.) बाजरीच्या पिकावर लहान किडे पडणें.

हिंगारी—स्त्री. (माण.) रब्बीचें पीक; याचे उलट मुगारी. [का. हिंगु, हिंदे=मागें]

हिंगुल-गूळ, हिंगोळ, हिंगळूक-हिंगुळूक—पु पारा व गंधक यांचें एक मिश्रण; पाऱ्याची अशोधित धातु [सं. हिंगुल] **हिंगळी लाख**-स्त्री. हिंगूळ मिसळलेली लाख. **हिंगुळी**-वि हिंगुळासंबंधी (रंग, रसायन, पारा इ०).

हिंगू(गो)दाखविणें—अक्रि. चकविणें; फसविणें; चोंदी देणें. **हिंगो तिंगो** स्त्री. टाळाटाळ; चालढकल.

हिंगे-गे—क्रिवि. १ (अशिष्ट) हंगे; इकडे; येथें. २ आतां. [का. हींगे=असें; याप्रकारें ?] **०तिंगे**-न. १ (इकडेतिकडे) असंबद्ध व टाळाटाळीचें भाषण; टोलवाटोलव. (क्रि० करणें; लावणें; मांडणें; चालवणें; म्हणणें). -क्रिवि. १ असंबद्धपणें; दुटप्पीपणानें. २ अजमासें; ढोबळमानानें; उणेपुरें. (क्रि० म्हणणें; बोलणें; करणें).

हिचक, हिचका, हिचकाविणें, हिचडणें हिचडा—हिसकणें इ० पहा.

हिंचण—पु. वन्य पशूंचा सुळा, दांत.

हिचमिचणें—अक्रि. (कसें तरी, मोठ्या कष्टानें), थोडा विसांवा घेणें; थोडेसे हातपाय हालविणें; चलनवलन करणें, हातपाय ताणून अंग मोकळें करणें; इकडे तिकडे हलणें. 'या दाटींत कसें बसावें; अंमळ हिचमिचेन म्हटलें तर जागा नाहीं.' [ध्व. हिच्+मिच्]

हिंचुटा—वि. हिंपुटा; हिमटा; हिंपुटा पहा. [हीन+घुटा (पुटा) ?]

हिजड(र)णें—अक्रि. (व.) रागानें अंगावर वसकन् जाणें; रागावणें. 'तो माझ्यावर फार हिजरला.'

हिजडा—पु. १ पुरुषवेषधारी नपुंसक; षंढ; यांची विशिष्ट जात. २ (ल.) निर्लज्ज, बीभत्स हावभाव, भाषण करणारा माणूस. ३ निःसत्त्व, दुबळा, पौरुषहीन माणूस. कांहीं हिजडे स्त्रीवेषांत गांवांत दरसाल गरीब श्रीमंतांकडून पैसे उकळतात त्यांस वतनदार हिजडे म्हणतात **हिजडी**-स्त्री. स्त्रीवेषधारी नपुंसक. **हिजडें**-न. हिजडा-हिजडी यांस सामान्यतः म्हण-

तात. म्ह० (गो.) हिजड्यांनीं जोडचें, मुंड्यांनीं खावचे=एकानें मिळवावें, दुसऱ्यानें खावें.

हिजरा-री, हिजरी साल—पु स्त्री न. एक अरबी वर्ष; मुहम्मद पैगंबर मक्का सोडून मदिनेकडे गेला त्या दिवसापासून म्हणजे १६ जुलै इ० स० ६२२ पासून सुरू झालेला शक. [अर. हिजरा=वतनत्याग] **हिजरी**-वि. हिजरासंबंधी. **हिजरात**-स्त्री. सामुदायिक देशत्याग.

हिज्जे करणें—(व.) उपहास करणें.

हिटगा—वि. (व.) मनाचा हलका; क्षुद्र बुद्धीचा. **हिटगेपणा**-पु. हलकेपणा.

हिड—पु. (गो) गुरांचा कळप.

हिडक—स्त्री. घिरत, जातें यांतील टाकीची वाटोळी खाच, शीर.

हिडगा—पु. १ छांदिष्ट, लहरी माणूस. २ भटक्या, उनाड माणूस. म्ह० १ हिंडण्याची व्याली गाय आणि खांद्यावर बांसरूं जड्याला जाय. २ व्यसनी, फंदी, टवाळ माणूस. ३ आळशी, दुर्लौकिक असलेला, अव्यवस्थित माणूस. अनेकवचनी व भाई या शब्दाबरोबर उपयोग. उदा० 'हिडगेभाई मिळाले आणि मसलत बिघडली.' **हिडगेचार**-पु अव. स्वैर वर्तन; गर्ह्य वर्तणूक.

हिंडणें—अक्रि. भटकणें; फिरणें; भ्रमण करणें. [सं. हिंडन] **हिंडणवारे**-पु.अव उगीच इकडेतिकडे भटकणें; उद्योग सोडून भटकी मारणें; उनाडक्या. (क्रि० करणें; लागणें). [हिंडणें+वारा] **हिंडन**-न. फेरी; भटकी; भ्रमण. **हिंडण्या, हिंडफिऱ्या**-वि. १ भटक्या; प्रवासी. २ (ल.) जुनबी; उडतउडत असलेलें. 'या पिटुकल्या हिंड्या लिहिण्याची किंमत मोजूं लागल्यास काडीचीहि नाहीं.' -खेया. [हिंडणें+फिरणें] **हिंडावें मुंडावें**-न. तीर्थयात्रा करणें व संन्यास घेणें. 'नलगे हिंडावें मुंडावें काहीं। साधनाची आटाआटी।' [हिंडणें+मुंडणें]

हिडशा-शी-सा—वि. घाणेरडा; किळसवाणा; ओंगळ; बीभत्स; हिडीस (व्यक्ति, वस्तु इ०). [सं. हिड्=धिक्कारणें, हिडीस] **हिडसणें**-उक्रि. धिक्कारणें, अपमान करणें; विटंबना करणें; कल्पटाप्रमाणें लेखणें; हिडीसफिडीस करणें. **हिडसावणें**-उक्रि. १ झिडकारणें; धुडकावणें. २ घाण करणें; मळ विणें; लिडबिडीत करणें (भांडीं इ०). 'भांडीं सारीं हिडसावून टाकलीं कीं हो बेट्यानें?' **हिडी(डं)स**-न. उकीरडा; घाण; खातेरें. -वि. हिडशा पहा. [सं. हिड] **हिडीसपि(फि)डीस**-न. अनादराची, तुच्छतेची वागणूक. -क्रिवि धिक्कारून; धुडकावून; तिरस्कारानें (क्रि० करणें).

हिडळणें—उक्रि. डुचकळणें; हिचमिचणें, हिंदळणें पहा [ध्व.]

हिंडा(डो)ळा—पु. हिंदोळा पहा.

हिंडिंबा—स्त्री हडिंबा पहा.

हिंडोर—न. (बे.) शेतातील ढेकळें फोडण्याचें एक औत [का हेंड=ढेंकूळ]

हिंडोल—पु. गायनांतील एक राग. [सं. हिंदोल]

हिण-णें—न हीण पहा. [सं. हीन] **हिणकस-कट-वट-कसी**-वि हीणकस इ० पहा. **हिणवणी, हिणावणी**-स्त्री कमी करणें; हिणावणें; मानखंडणा. **०वणे-विणें, हिणा(ण्या)(ळ)विणें**-उक्रि. १ दोष, अपराध, चूक इ० दाखवून मानखंडणा करणें; हीनपणा काढून लाजविणें. २ कमी करणें; उतरविणें. (गो.) हिणसूचे. 'परी एकाधें कां आंग। हिणावती जै।' -ज्ञा १७.३८८. **हिणवर**-पु. १ (कर.) प्रथम लग्नाचा, बिजवर नसलेला नवरदेव. २ हीणवर पहा. **हिणसुंद्रा**-पु. (व.) थकवा. -वि. (व.) फार श्रमलेला; थकलेला. (क्रि० होणें). **हिणाव-वो**-पु. फजीती; लाज; हलकेपणा. 'तें अगाधपण जाईल। हिणावो अंगा येईल।' -ज्ञा २.२१७.

हिणगें—न. (को) बांबूची एक प्रकारची टोपली.

हित—न लाभ; कल्याण; बरेपणा;फायदा. (क्रि० शोधणें). -वि. १ उपयुक्त; फायद्याचें; योग्य; रास्त. [सं.] म्ह० (व.) हिताची हितखोर अन जन्माची फजीतखोर. (सुनेला उद्देशून). **०कर**-वि. कल्याणकारक; फायदेशीर. **०गूज**-न. १ स्वतःचे कल्याणाची गोष्ट. 'सत्य वचन राखण्यास नव्हळा कवितों त्या हितगुजा।' -अफला २ आपल्या मनांतील गोष्ट; गुप्त गोष्ट; कानगोष्ट (क्रि० सांगणें; बोलणें; राखणें). 'माझ्या मनिचें हितगुज सारें ठाउक कृष्णाला।' -सौभद्र. [हित+गुह्य] **०चिंतक**-वि. १ कल्याण चिंतणारा;हितेच्छु २ सार्वजनिक संस्थेस विशिष्ट रक्कम (वर्गणी) देणारा सभासद. (इं.) सिंपथायझर. **०बुद्धि**-वि. हित चिंतणारा, करणारा **०शत्रु**-वि. अकल्याण, अहित करणारा; हिताच्या आड येणारा. 'मुलास खेद होईल म्हणून चागली शिक्षा लावीत नाहीं अशा बापास हितशत्रु म्हणावें।' -बायबल-प्राव्हर्बे १३.२४. **०वादी**-वि. कल्याणाची गोष्ट, सल्ला सांगणारा. **०संबंध**-पु. १ हितासाठीं येणारा संबंध. २ मैत्री; मलोखा. **हितान्वेषण**-न. कल्याण शोधणें. **हितार्ळ-ळा-ळू**-वि हितकर्ता; उपकार कर्ता. 'हित कर गे हिताळे, अनहित कर गे बोळाळे'; हितकर्ता हिताळू अनहित कर्ता ओढाळू.' **हितेच्छु, हितैषी**-वि. कल्याण इच्छिणारा; हितचिंतक. **हितोपदेश**-पु. कल्याणकारक सल्ला. **हितोपदेशी**-वि. असा सल्ला देणारा.

हितचा, हितपर्यंत, हितवर, हितून—इथचा, एथचा इ० पहा.

हिंताल—पु. एक प्रकारचें खजूरीचें झाड.

हिंद—पु १ हिंदुस्थान देश. 'हा हिंददेश माझा।' २ या देशांतील लोक (हिंदु आणि मुसलमान). [सं. सिंधु-सिंधः अर. सिंध: फा. हिंद्]. **०चानी, हिंदवी**-वि १ हिंदु; हिंदुस्थानसंबंधी. 'हिंदवी स्वराज्य.' २ हिंदी **हिंदी**-स्त्री उत्तर हिंदुस्थानातल्या लोकांची भाषा. -वि. हिंदुस्थानचा. **हिंदु-दू**-पु. भरतखंडांतील परंपरागत सनातनधर्मानुयायी, त्या धर्मातील व्यक्ति. **हिंदुस्थान**-पु न. १ हिंदूंचा देश; सर्व भारतवर्ष. २ नर्मदोत्तर भारतवर्ष; उत्तर हिंदुस्थान. **हिंदुस्थान सरकार**-न. हिंदुस्थानचा राज्यकारभार पाहणारी संस्था; गव्हर्नर जनरल-इन-कौंसिल. **हिंदुस्थानी**-स्त्री. ऊर्दूभाषा. ऊर्दूमिश्रित हिंदी भाषा. -वि हिंदुस्थानसंबंधी.

हिंदकळणें हिंदळणें-उकि. डुचमळणें; हिसळणें; हेलकावे खाणें, देणें. [सं. हिंदोल]

हिंदण-न, हिंदाण-हिंद्यान—न. १ नेम मारण्यामार्टी केलेले चिन्ह; लक्ष्य. २ आणीबाणीची वेळ. ३ नेम. (क्रि० धरणें; बांधणें). विंधणें पहा. [सं. विधन]

हिंदग-न. हिंदाण-न—न. १ युक्ति; चातुर्य; विंदान पहा. २ (ना.) शिकवण.

हिंदहिंदणें—अकि. बिलबिलीत होणें (फळ, गळूं इ०). [ध्व.?] **हिंदहिंदीत, हिंदहिंदा**-वि. बिलबिलीत झालेला.

हिंदुळा, हिंदोल, हिंदाळा—पु. १ पाळणा; चोपाळा; झोंपाळा २ झोंका; हिसका; धक्का. ३ एक राग. यांत षड्ज, तीव्र गांधार, तीव्र मध्यम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. जाती औडुव-औडुव. वादी धैवत, संवादी गांधार वेळ रात्रीचा चौथा प्रहर. [सं. हिंदोल] **हिंदाळणें**-सक्रि. हालविणें. 'म्या हिंदोळला कैलास।' -वेसीस्व ४ ९३.

हिंद्यान—न. (व. घाटी) नेम; हिंदण पहा.

हिनसुता—वि. हिरमुसलेला. -मनको.

हिंपुटा-पूट-पुटा—वि. (काव्य.) खिन्न; खेदयुक्त; कष्टी. 'बहु हिंपुटी होईजे मायपोटीं।' -मनाचे श्लोक २०; -तुगा ८३३. -स्त्री. शून्य-शर. (साहि० अद्वया). ३. [हीन=आकुंचित+पुट=ओठ; तुल० अर. हम्म्=चिंता]

हिफाजत—स्त्री. १ संरक्षण. 'पटणचरूचे हिफाजती करितां अगोदर नबाबांनीं सिताबराव अमील यास...पाठविलें.' -रा ५.११९. २ आश्रय. 'सिद्धी अबदुला बेदरचे हिफाजतीस जात होता.' -रा ५.६१. [अर. हिफाझत्]

हिम—न. १ धुकें. २ बर्फ. ३ थंडी; थंडपणा; गारठा (हवा, शरीर यांत). ४ हौंद; सरदी. ५ (-पु न.) औषधी पदार्थ भिजत घालून त्यावें ध्यावयाचें पाणी. ६ थंड पदार्थाचा स्पर्श. -पु. १ चंद्र. २ हिमालय पर्वत. ३ चंदनाचें झाड. ४ कापूर इ०. -वि. थंड. [सं.] **०कर**-पु चंद्र. **०केदार**-पु. हिमालयांतील केदाराश्रम, बद्रिकाश्रम. 'त्या दोघी मातापितरीं। वाटे तप केलें हिमकेदारीं। तरीच मांडीवरी श्रीहरी। रात्रंदिवस खेळतसे।' -ह ५.८४. **०गिरी**-पु. १ ध्रुव प्रदेशांतील बर्फाचे डोंगर. पुढें पुढें हे समुद्रांत वहात येतात. २ हिमालय. **०ज्वर**-पु. हिंवताप; शैत्यज्वर. **०तेल**-न. नारळाच्या रसावर थंडीच्या दिवसांत येणारा मलईसारखा थर. ह तेल मस्तकव्याधीवर गुणकारी असतें. **०नग-वंत-वान्**-पु. हिमालय पर्वत. **०नगजा**-स्त्री. पार्वती. **०भानु, हिमांशु**-पु. चंद्र. **०स्थान**-वि. थंड; गार; बर्फमय **ध्रुव**-पु. (भूगोल) ज्या उंचीवर नेहमीं बर्फ असतें ती उंची अथवा असा प्रदेश दर्शविणारी भौगोलिक रेषा. **हिमाचल हिमाद्री हिमालय**-पु. १ भरतखंडाच्या उत्तर सीमेवरचा प्रचंड पर्वत. २ (ल) अजस्र ढीग. 'चुक्यांचा हिमालय.' **हिम्य**-वि. थंडीचें; बर्फाचें.

हिमकरणी—वि. (व.) हिमटा; कृपण. [सं. हीन+कृ-कर?]

हिमजी—पु सुरवारी हिरडा. -मुंव्या १७२.

हिमट, हिमटतांडया—वि. हिंपुटा; खिन्न [सं. हिम?]

हिमटा-टा-टया—वि. चिक्कू; कृपण. **हिमटाण**-पु. (गो.) कंजूषपणा.

हिमटी काढून रडणें—(कु.) ओक्साबोक्शी रडणें. [हीमटा=ही! असा ध्वनी?]

हिमत हिम्मत—स्त्री. १ धाडस; धैर्य; शौर्य. 'सर्वांचीं ज्ञानें, हिंमत-मर्दानपणा मजला ठाऊक आहेत. पानपतवर भाऊस टाकून शालेत.' -ख १४८१; -मराआ १३. २ निग्रह; दिलया; उत्साह; उमेद; धमक; अवसान. [अर. हिम्मत्] **म्ह०** हिम्मत मर्दा तर मदत खुदा. **०हरणें**-धैर्य, अवसान, उत्साह इ० नाहींसा होणें; गडबडणें. **हिम्मतदार, हिम्मती, हिम्मतीचा**-वि. धाडशी; धैर्यवान्; निधड्या छातीचा. **०बहादर**-वि. १ शूर; वीर. २ एक पदवी. -स्वप १३२.

हिमसाण—पु. (कु) मासळीची घाण.

हिम(मू)ळ—वि. १ बेचव; निःसत्व; पाणचट. 'तापवून निवविलेलें गोड पाणीहि हिमळ लागतें.' २ कोंवट. [हीनबळ?]

हिमाईत-यत—स्त्री. १ संरक्षण; मोठ्याचा आश्रय; आधार; मदत. 'पेंडारी यांची हिमाईत करून स्वामींचा क्रोध होऊन स्वामी उपोषणें करितात हें काय?' –ख ९.४५८. २ जोरावारी; दंडेली. 'आऊंधकर हिमायेतीनें आउतें धरितात.' –रा ६.१३. [अर हिमायत्] **हिमाइ(य)ती-त्या, हिमाईतीचा, हिमाईतदार-गार**-वि. १ आश्रित; संरक्षित. २ आवडता दोस्त. **हिमाइतीचा गाढव-चीं गधडी**-पुस्त्री. १ आवडतें गाढव. २ (ल.) आवडता पण नालायक आश्रित. **म्ह०** हिमाइतीचा गाढव तेऱ्याला लाता मारी. **हिमायत-येत, हिमायतदार हिमायती**–हिमाईत इ० पहा. 'हिमायतीच्या बळें गरीबगुरिबाला गुरकावूं नको.'

हिमायल—पु. (जंबिया) आपल्या जंबियानें जोडीदाराच्या गळ्याजवळील बरगडीच्या खड्ड्यांत केलेला वार याचे उलटा व सीधा असे दोन प्रकार आहेत. [अर. हमायल=ताईत]

हिम्माद—स्त्री. मदत –सासंईतह २.

हियें—न. १ (काव्य) छाती; हृदय. 'तेणें दुःखें हियें फुटेल.' –ज्ञा १.२३४. २ धैर्य. [सं. हृदय; प्रा. हिअय; हिं. हिया] **०घालणें**–छाती फुटणें; काळजाचा ठाव सुटणें. 'जो गाजत जंव आइकती। तंव उभेचि हियें घालिती।' –ज्ञा १.१६३. **०फोडणें**-अंतःकरण खुलें करून गुप्त गोष्ट सांगणें. 'येणें मानें जीवाचें हियें फोडावें।' –ज्ञा ९.३५. **हिय्या**–पु. हिंम्मत; धैर्य; अवसान; छाती. [हिं.] **हिय्येदार-बाज**-वि. धाडसी; हिंमतवान.

हियो-य्यो—उद्गा. नांगर फिरवितांना बैलांना द्यावयाचा इशारतीचा शब्द. [ध्व.]

हिर—हीर पहा.

हिरक—स्त्री. घरट, जातें यांतील टांकीची खांच, शीर.

हिरकूट—नपु. (तिरस्कारार्थी) हीर पहा. **हिरका**–पु. १ ताड, माड, पोफळ इ० च्या झावळींतील, लांकडांतील रेषा. २ सुपारींतील रेषा. हीर पहा. ३ खापरपोळी इ०च्या पोटीं रेघांनीं भिन्नभिन्न झालेला अवयव.

हिरगण—न. खांब व तुळई यांच्यामधील + अशा आकाराचा तुकडा; पिढें.

हिरगुंडा कापशी—स्त्री. एक झाड.

हिरडा—पु. १ हरडा; एक औषधी फळ. याचे जंगली, रंगारी, चांभारी, बाळ, सुरवारी इ० अनेक प्रकार आहेत. २ (ल.) हिरड्याच्या आकाराची वस्तु (गळ्याची घाटी, निशाणाचे काठीचा शेवटचा भाग इ०) [सं. हरीतकी; प्रा. हरडई] **हिरडी**–स्त्री. वाळलेला बारीक कोंवळा हिरडा.

हिरडी—स्त्री. १ ज्याच्यामुळें दांत परस्परांशीं संबद्ध असतात व ज्यांत ते बसविलेले असतात तो मांसल भाग; दातांची खोबण; घर.

हिरणें—उक्रि. हरण करणें; बलात्कारानें छिनविणें, हिरावून घेणें. 'तोही मी कोल्हावा हिरें। मग तमचि होती एकसरें।' –ज्ञा १६.४१६. [सं.]

हिरण्य—न. सोनें. [सं.] **०केशी**–पु. एक सूत्रकार. –वि. यजुर्वेदाची एक शाखा व सूत्र; त्या शाखेचा (ब्राह्मण). **०गर्भ**–पु. ब्रह्मदेव. **०श्राद्ध**-पु अन्नदाना ऐवजीं हिरण्यदान करून केलेलें श्राद्ध. **हिरण्मय**-वि.सोनेरी; सोन्याचें.

हिरतणें—सक्रि हिरावून घेणें. 'जेणें भ्रांतिपासुनि हिरतलें।' –ज्ञा ५.३४. [सं. हर्]

हिरमुशी-मुषी, हिरमूस, हिरमोडी–वि. निराश; उत्साहहीन; हतबल; धीर खचलेला. **हिरमुसणें**-अक्रि. निराश होणें; धीर सुटणें; विरस होणें. 'राजा मोठ्या डौलानें स्वारीस निघाला होता, पण हत्ती मरतांच हिरमुसून पडला.' [हीर=ईर्षा+मृष्] **हिरमोड**–पु. निराशा; धैर्य खचणें; उत्साहभंग; मनोभंग. [हीर=ईर=मोडणें]

हिरमोड—वि. (राजा.) हिरवट रंगाचा; गडद हिरवा नव्हे असा. [हिरवा+मोडणें]

हिरली-लें—इरली-लें पहा.

हिरवा—वि. १ पाच, शेवाळ, कोंवळें गवत इ० च्या रंगाचा. २ (ल.) कच्चा; अपक्व; अपुरा शिजलेला (फळ, अन्न, रसायन, वीट). ३ कोती (समजूत, विचार). ४ अपक्व वासाचा; कच्च्या रुचीचा. ५ (सांके.) भांग, गांजा किंवा तो ओढणारा इसम. ६ भांडखोर; ज्याचें कोणाशींहि पटत नाहीं असा; हिरवट. [सं. हरित] **०एरंड**–पु. एरंडाची एक जात. **०कंच-०गार ०चार**–वि. अतिशय हिरवा; गर्द हिरवा. **०कच्चा**–वि. १ अर्धवट शिकलेलें (फळ इ०). २ अर्धवट शिजलेलें, भाजलेलें. (अन्न इ०). ३ अर्धवट केलेलें (काम) **०चांपा-चांफा**–पु. एक फूलझाड. याच्या उलट पांढरा, पिवळा चांपा. **०निळा-पिवळा**–वि. काळानिळा (राग, मत्सर, विष इ०मुळें झालेला-चेहरा, मुद्रा). **०भाजला खाणें**–सदानकदा, कांहींहि झालें तरी अतिशय छळणें, त्रास देणें. **हिरवट**–त्रि. १ साधारण किंचित् हिरवा. २ किंचित अपक्व; कच्चा. ३ तंबाखूसह गांजा ओढणारा. ४ (ल.) अडाणी; अशिक्षित; रानवट. ५ अविचारी; तापट; एककल्ली; चिडखोर; तिरसट. 'मृत्यू ऐसा व्याघ्र। मुख पसरोनि समोर। तेथें हिरवटाचार। देहधेनूतें केंवि रुचे।' –मुरंशु २८२. **हिरवटाण**–स्त्री. हिरवा चारा, फळ इ० ची घाण; हिरवा असल्याची घाण. [हिरवट+घाण] **हिरवंडा**–वि. १ हिरवट. अर्थ २ पहा. २ हिरवट घाण येणारें, हिरवट असलेलें (फळ, वीट इ०). **हिरवस**–वि. हिरवंडा. **हिरवसान**–पु. (गो.) हिरवटपणा; कच्चेपणा. **हिरव(वा)ळ, हिरावळ**–स्त्री. ओलें, हिरवेंगार गवत,

वनस्पति इ०चा समुदाय. 'सडकून पर्जन्य पडला म्हणजे आठा दिवसांत चोहींकडे हिरवळ होत्ये.' **हिरवळणें**-अक्रि. हिरवा पाला फुटणें; पालवेजणें. 'वाळलें काष्ठ हिरवळेना।' -दा ९.७.२९. **हिरवी घेवडी**-स्त्री. हिरव्या शेंगा येणारी घेवड्याची वेल. **हिरवीजमीन**-स्त्री. (कों.) जमीन प्रथम भाजल्याशिवाय, दाढ केल्याशिवाय जींत पेरणी केली आहे अशी जमीन. **हिरवी तमाखू**-स्त्री. (सांके.) गांजा. **हिरवें**-न. गुरांना खाण्यास उपयोगी असें हिरवें गवत, पाला इ० हिरवळ.

हिरविणें—हिगविणें पहा.

हिरशी-सी—वि. १ लोभी; खादाड. २ चिडखोर; अवहेलना करणारा; शिडशिडा. [अर. हिर्साहा] **हिरस**-स्त्री. १ (क.) लोभ; लोभीपणा; हांव. २ (ना.) मत्सर; स्पर्धा; ईर्षा. [अर. हिर्स]

हिरसा—वि. १ खेकाळण्याची संवय असलेला (घोडा). २ उन्मत्त; नाठाळ. [हिरसणें] **०तट्टू**-न १ खेकाळणारें, नाठाळ तट्टू. २ बडाईखोर माणूस. ३ -वि. परदाराभिलाषी; व्यभिचारी; दुर्व्यसनी (माणूस). 'लंडेगुंडे हिरसेतट्टू त्यांची संगत धरूं नको.' -अफला.

हिरहिरी—स्त्री. १ हिरिरी पहा. २ हल्ला. 'अशा पांच सात हिरहिऱ्या जाल्या.' -भाव १४७.

हिरा—पु. एक पांढऱ्या रंगाचें महारत्न. परंतु, बिलंवी, मुखलसी, पलचा इ० याचे प्रकार आहेत. [सं. हीरक, हीर] **म्ह०** हिरा तो हिरा गार ती गार=थोर व हलका कोण हें तेव्हांच ओळखूं येतें. **०दिवा**-पु. पुरा मूर्ख. **०बोळ**-पु. एक प्रकारचा बोळ; कातबोळ. **०हिंग**-पु. चकाकणारा उत्कृष्ट हिंग. **हिरेखाण**-स्त्री. हिऱ्यांची खाण. **हिरेदिवे**-पु.अव. मकरसंक्रांतीस ब्राह्मणास, दोन दिवे व दोन आरसे बायका दान देतात ते.

हिराकस—स्त्रीपु. शाई, रंग वगैरे करण्याच्या उपयोगाचा एक खनिजपदार्थ; लोहगंधकित. [हिंदी]

हिराटा—पु. (गो.) गिधाड.

हिरामण—पु. पोपटांतील एक जात. [हिं.]

हिरावणें—उक्रि. जबरीनें दुसऱ्यापासून घेणें; हिसकाविणें. [सं. हृ-हरणें-हिरणें]

हिरावळी—स्त्री. बायकांची पांघरण्याची ओढणी (क्रि० पांघरणें). [तुल० तुर्की हिरावळ]

हिरासा—वि. १ भयभीत. 'दरोबस्त शीख हिरासा होऊन ... पानपतकडे गेले.' -दिमरा १.१६४. २ हैराण. 'ते हिरासा आहेत;' -दिमरा १.११७. [फा. हिरासान]

हिरिरी—स्त्री. १ वेग; आवेश; सपाटा; झपाटा. 'क्रोधाचे हिरीरीबरोबर मी एखादा वाईट शब्द बोललों असेन.' २ निकराचा हल्ला; आवेशानें तुटून पडणें. 'फौजेनें पहिल्या हिरीरीस किल्ला घेतला.' [सं. वीर्य; म. ईर, हीर]

हिरीस—स्त्री. हांव; आधाशीपणा. [अर. हिर्स] **हिर्शी**-वि. लोभी.

हिरुती, हिरोत—न. (व.) कुटलेलें लाल तिखट. [वीर्यवती ?]

हिरूनफिरून—क्रिवि. इरूनफेरून पहा.

हिरोळी—स्त्री. (कों.) एक वेल, हिचे कंदही खातात.

हिलगड—स्त्री. १ (देणेंघेणें इ० व्यवहारांतील) भानगड; लचांड. (क्रि० घालणें; ठेवणें; पडणें; होणें). 'तुमचे आमचे देण्याघेण्याची हिलगड ठेवूं नका.' २ अडथळा; गुंताडा; गुंतागुंत. [हिलगणें-लोंबणें] **हिलगडणें**-उक्रि. लोंबकळत ठेवणें, भिजत घोंगडें ठेवणें; शेवटपर्यंत पुरें न करणें (काम, फिर्याद इ०); एकादें काम सिद्धीस न जाऊं देतां अडथळून पाडणें. 'आमच्या लग्नाचें काम त्यानें हिलगडलें.' -अक्रि. निकाल न लावतां अनिश्चितपणें लोंबत राहणें. **हिलगडा, हिलगण, हिलंगवण**-पुस्त्री हिलगड. **हिलगणें, हिलगाव(वि)णें**-उक्रि. हिलगडणें; ढिलें बांधणें; लोंबत ठेवणें; सरासरी जुडणें; टांचणें (कागदाच्या गड्ड्या इ०); अडकविणें. -अक्रि. १ लोंबकळत पडणें; लोंबत राहणें. २ गुंतणें; अडकणें. ३ एखाद्या कामांत गुरफटून जाणें. 'मी दिवसभर हिलगलो.' [हिं. हिलगना]

हिलणें—हालणें पहा. [हिं. हिलाना]

हिलफिरकी—स्त्री. (चांभारी) बूट घोटण्याचें एक हत्यार. [इं. हिल=टांच+फिरकी]

हिलामत—नअव. (गो.) लग्नांतील वरातीचें चवरी, अब्दागीर इ० साहित्य.

हिलारी, हिलारणी—स्त्री. १ हल्ला; हिरिरी पहा. २ दौड; चाल (घोड्याची). (क्रि० देणें).

हिलाल—पु. १ दिवटी; टेंभा; पलिता; मशाल. 'सोय-ऱ्यांचे मंडपांत पुरुष व बायका रात्रीचें जाण्यायेण्यास हिलाल दिवट्या अगोदर बातमी राखोन सिद्ध करून ठेवाव्या.' -पया २८८. २ चन्द्रकोर; चन्द्रज्योत. [अर. हिलाल्] **हिलाल्या**-वि. मशालजी.

हिलावणें—सक्रि. हलविणें.

हिल्ला—पु. १ लबाडी; युक्ति; कारवाई; ढोंग; बतावणी; सबब; टाळाटाळीची युक्ति; खोटी अडचण. 'त्यास कांहीं एक हिल्ल्यानें दूर घालावयाचें ऐसें मनांत आणून लांबविलें असेल तर ईश्वर जाणें.' -ख १२.६६७५. २ निर्वाहाचें साधन (आश्रय, उद्योग, धंदा, रोजगार इ० चें). [अर हीला] **०हरकत**-स्त्री. १ युक्तिप्रयुक्ति; सबबी; बतावण्या (कर्जे पगार, निकडीचें काम

इ० टाळण्यासाठीं). २ विरोध; हरकत. ३ हला हरकत पहा. [अर.] हिल्लेबाज–वि. छट; दंगेखोर; हरकत्या.

हिल्लारी—स्त्री. आरोळी; हांक. हुल्लड पहा. 'एकचि हिल्लारी करा म्हणती।' –निगा ४८. [ध्व.]

हिंव—न. १ थंडी; वस्तु, हवा यांतील गारवा; गारठा. २ शिरशिरी; सर्दी. ३ हिंवताप. ४ थंडीच्या कडाक्यानें खराब झालेलें पीक. (क्रि० जाणें; फिरणें). [सं हिम] ०ज्वर–ताप–पु. थंडीचा ताप; हिमज्वर. **हिंवडणें, हिंवणें**–अक्रि. थंडीनें कुडकुडणें; हुडहुडी भरणें; गारठणें; कांपणें. 'एकां उभयांचि प्राण गेले। चांगांचे दांत बैसले। बिरुदांचे दादुले। हिंवताती।'–झा १.१३५ **हिंवडी**–स्त्री.(को) थंडीची हुडहुडी. **हिंवत हिंवत जमीन**–पुस्त्री. १ हिंवाळ्यांत नांगरून पावसाळ्यापर्यंत तशीच ठेवलेली पड जमीन. 'हें नवरान हिंवताकडे ठाकलें.' २ (डांगी) एकवेळ पड ठाकून पहिल्या हंगामांत लागवडीस आणलेली माळजमीन. **हिंवताचो नांगरणी**–स्त्री. वरील जमीनीची नांगरट. **हिंवनाड**–न. (तिरस्कारानें) हिंवत. **हिंवताळा**–पु. (व.) हिंवाळा. **हिंवली**–स्त्री. थंडी. 'हिंवली जैसी आंगिकें। हिंवो नेदी निजांग।'–झा १७ २२९. **हिंवशी**–स्त्री. (व.) थंडी. **हिंवशी पटक**–स्त्री.(व) फार थकवा. **हिंवश्या पाण्याच्या भाकरी खाणें**–(व.) काळजी नसणें. **हिंवस**–स्त्री. १ (कों) सर्द हवा. २ शीत तुषार. –वि. (व.) थंडगार. **हिंवसणें**–अक्रि. १ थंडीची, सर्दीची बाधा होणें. २ (ल.) निराश होणें; हिरमुसणें; म्लान–मलूल होणें; थिजणें; उत्साहहीन होणें. **हिंवसा**–वि. १ थंड; सर्द (पाणी हवा इ०). २ रागीट नसलेला, सौम्य (माणूस). **हिंवसाण**–स्त्री सर्द झालेल्या व बिघडलेल्या वस्तूची घाण. [हिंव+घाण] **हिंवाडी**–हिंवडी पहा. **हिंवारें**–न. हिंवताप. 'जळसोस आणि हिंवारें।' –दा ३.६.२६. **हिंवांळा–ळी**–पुस्त्री. थंडीचा ऋतु

हिंवर—पु. एक मोठें कांटेरी झाड. **म्ह०** हिंवर तरूची शीतल छाया=नपुंसकाच्या हातीं पद्मिनी, सुलावरची पोळी. याप्रमाणें निरुपयोगी, निषिद्ध. (हिंवराच्या छायेंत बसूं नये असा संकेत आहे).

हिंवळणें, हिंवळावणें, हिंवाळणें—अक्रि. विवळणें पहा.

हिंवळाण—स्त्री. (गो.) मासळीची घाण.

हिंवावचें—सक्रि. (गो.) पसरणें; वासणें.

हिंवाळें—न. (कु.) बिन विषारी साप. वयाळें पहा.

हिशे(शो)ब—पु. १ अंक; आंकडे; व्यावहारिक जमाखर्चाचें, आवकजावकाचें गणित; गणती; मापन; संख्याफल. २ गणना; अंकगणिताप्रमाणें मेळ पहाणें. ३ गणित करून रक्कम निश्चित करणें; गणितानें निघालेली रक्कम. ४ कागदावर लिपलेला जमाखर्च; कर्ज, खर्च इ० चें टिपण. ५ जमाखर्चातील एखादी बाब. (क्रि० धरणें). ६ (ल.) सरळपणा; न्यायीपणा; न्याय, वाजवी रीत; सरळ मार्ग. ७ (ल.) पर्वा; महत्त्व; लौकिक. [अर. हिसे(सा)ब्] ०किताब–ठिशोब–पु. सामान्यपणें जमाखर्च, जमाखर्चाचे कागद इ०; गणित. **हिशो(शो)बी**–वि. १ हिशेब, गणित, जमाखर्च यासंबंधी २ हिशोबाचे कामांत वाकबगार; कुशल; दक्ष; व्यवस्थित; सरळ. ३ न्याय्य; योग्य; रास्त; बरोबर. ४ चोख; व्यवस्थित (माणूस). ५ कांटेकोर; पैन पै हिशेब देणाघेणारा.

हिस—स्त्री. (व.) कदर; मान. (क्रि० बाटणें; मानणें). [अर. हिस्स्]

हिसकणें—उक्रि. १ जोरानें, झटक्यानें ओढून घेणें; झटकणें; हिसडणें; जबरदस्तीनें घेणें. २ (ल.) उपटणें; उकळणें; हासडणें (पैसा इ०). ३ फिपकटविणें; बिघडविणें (काम; योजना; मसलत) [सं. हिष्कर्षण? हिं. हिसकना] **हिसकणी**–स्त्री हिसडा; झटका; हिसकणें पहा. **हिसका**–पु. १ हिसकणी; झटक्यानें ओढणें व त्यापासून झालेली स्थिति. (क्रि० देणें; बसणें). २ अकल्पित बसलेला तडाखा; झपाटा; सपाटा; आचका; हिसडा आणि त्यापासून उद्भवलेला त्रास, होणारा परिणाम. ३ (ल.) (चालू काम, धंदा) एकदम बंद पडणें; विघ्न येणें; तूट येणें; विघ्न; अडथळा. ४ (ल) निष्फळ व दगदगीचा प्रवास; खेप; हेलपाटा. [हिं.] **हिसकावणी**–स्त्री. जोरानें ओढून घेणें; हिसडणी. **हिसकाविणें**–उक्रि. हिसकणें; जोरानें ओढून घेणें; अन्यायानें व बळानें घेणें; बळकावणें. **हिसकाहि(फि)सक**–स्त्री. (अनेकांनीं केलेली) ओढाताण; झटापट; ओढाओढी. **हिसडणें**–उक्रि. हिसकणें; हिसका देणें. **हिसडा–डो**–पुस्त्री. हिसका; झटका.

हि(हिं)सगें—अक्रि. (घोडा) खेंकाळणें. [सं. हेष्. ध्व.] **हिसाण**–न. खेंकाळणें. 'बाळ करिती हिसाण।' –गीता १.४८४.

हिंसणें—उक्रि. (काव्य) हिंसा करणें; इजा करणें; ठार मारणें; खून करणें. [सं. हिंसन] **हिंसक, हिंस्र**–वि. १ खुनी; हत्यारी; घातक. २ (ल.) क्रूर; उग्र; भयंकर (व्याघ्रसिंहादि प्राणी). **हिंसा**–स्त्री. १ हत्या; खून; ठार मारणें. २ इजा; पीडा; दुखापत. हिंसेचे तीन प्रकार–मानसिक (द्वेष; मत्सर इ०), शाब्दिक (शिव्या; शाप), शारीरिक (वध, खून). [सं.] **हिंसालु**–वि. हिंसक पहा.

हि(हिं)सळणें—अक्रि. १ उसळणें; उसळी खाणें; हेंदकळून सांडणें (मांडयांतील घातळ पदार्थ). २ (ल.) भरघाव, बेफाम पळणें; उचळणें (घोडा, बैल). ३ शिंतोडे उडणें.

हिस(सा)ळा—पु. कणसांवर पडणारा एक रोग. 'हिसाळ्यानें गेलें शेत।' –एभा २३.१२८.

हिसा—हिस्सा पहा.

हिसा—वि. थंडगार (पाणी, वस्तु). हिंवसा पहा. [हिंव]

हिसाडणें, हिसाडा-डी—हिसडणें इ० पहा.

हिसाब, हिसाबकिताब, हिसाबी—हिशेब इ० पहा. 'त्याचा हिसाब काय धरावा.' –मराचिथोशा ४३. 'ऐसें हिसाबीकिताबी असतां.' –रा १५.२६.

हिसार—पु. किल्ला; गड. 'बजानब कारकुनानी हिसार जावळी.' –रा २०.१५९. [अर. हिसार्]

हिसेंमिरें—न. (तंजा.) कंकोळ. [हिंवसें+मिरें]

हिंस्र—हिंसणें पहा.

हिस्सा—पु. वांटा; भाग; अंश; पाती. [अर. हिस्सा]

हिस्सेरशी-रसीद—स्त्री. १ (गणित) वांटावयाचें द्रव्य व वाटेदारांची संख्या हेच भाज्यभाजक मानून त्रैराशिकाच्या रीतीनें त्रिभाग करण्याचा प्रकार. (क्रि० घालणें). २ हिशेबानें काढलेला वांटा; पाती. (क्रि० येणें; बसणें). 'मशारनिले याच्या वियमानाची शिबंदीची हिसेरसीद बेहडयाच्या अज मासें निवडून पाठविली आहे.' –पया ९२. [फा. हिस्सा+रसद्] **हिस्सेदार**-वि. पातीदार; भागीदार; वांटेली; वाटेकरी. [फा. हिस्सा+दार्]

हिहिहि—स्त्री. उपहास; फिदीफिदी. –क्रिवि. निंदार्थी कुत्सित, हसण्याच्या आवाजाचें अनुकरण करून. [ध्व.]

हिळणें, हिळणेंमिळणें—अक्रि. वठणीस येणें; कह्यांत येणें; रुळणें; माणसाळणें. [मिळणें द्वि.; हिं. हिलाना]

हिळभर—न. (बे.) नांगराची मूठ. [सं. हल]

ही—अ. १ वेखील; सुद्धां. २ तसेंच; आणखी. हि पहा.

हीट—न. (गो.) तांदुळाच्या पिठाचें एक पक्वान्न. [का. इट्टु=पीठ; तुल. सं. पिष्ट]

हीड—स्त्री. (कों.) वळचण.

हीण-न—न. १ हलक्या प्रतीची धातू. २ (ल.) क्षुद्रता; हलकटपणा. ३ (हिणवायाजोगें) व्यंग; दोष; उणीव. –वि. १ क्षुद्र; हलका; नीच. २ उणा; रहित; हीन पहा. ३ कमी प्रतीचा; गौण. [सं. हीन] म्ह० रीण फिटेल पण हीण फिटणार नाहीं. **०कट-कस-घट-कसी**-वि. १ भेसळीचें; मिश्रित. २ आंत हीण (कमी किंमतीचा धातू) घालून कमी किंमतीचें बनविलेलें. ३ कमी कसाच्या सोन्या चांदीचें (नाणें, अलंकार). **०कौल**-पु. भर आकारापेक्षां कमी सान्यानें जमीन देण्याचा लेखी करार. **०घर**-पु. १ नवरीपेक्षां वय, उंची इ० नी कमी असलेला नवरामुलग २ असल्या जोडप्यांतील विगोडपणा. ३ सर्वसाधारणपणें ठेवण, रुबाब इ० बाबींत हलका भरणारा धनी, वरिष्ठ. 'धिक् जिणें ज्याचा स्वामी हीन। मरण तें बरें भलें मग।' –तुगा १२७६. [हीन+घर]

हीन—वि. १ न्यून; रहित (विवक्षित गुणधर्मादिकांनीं); उणा. 'द्रव्य-संपत्ति-बुद्धि-सामर्थ्य-तेज-कौर्य-हीन.' २ क्षुद्र; गौण; हलका. 'हीन-जाति-वर्ण-दातृत्व-भाग्य इ०.' [सं.] **०दंती**-वि. पांच दांत असणारा (घोडा). –अश्वप १.९४. **०वर**-हिणवर पहा. **०वाद**-पु. (कायदा) अयोग्य, अस्वीकरणीय साक्ष. **०वादी**-पु. अशी साक्ष देणारा तो. **०वीर्य**-वि. निःसत्त्व; गुणहीन; पराक्रमहीन; पुरुषत्व नष्ट झालेला.' **०शक्त-क्ति**-वि. अशक्त; कमजोर. **०संग**-न. हलक्या जातीच्या, धंद्याच्या लोकांशीं मैत्री. **०सेवा**-स्त्री. हलकट धन्याची किंवा हलक्या प्रकारची नौकरी. **हीनांग**-वि. व्यंग असलेल्या शरीराचा; विकलांगी.

हीर—पु. १ माड, पोफळ इ० च्या पातींतील काडी. 'कुठें हिरा तो कुठें हीर हा।' २ हिरका पहा. ३ शिजलेल्या भातांतील न शिजलेला तांदूळ, कणी. ४ हिरकूट; कुसळ; घस; सडी. (क्रि० भरणें; शिरणें; सलणें; उपटणें). **०भाजणें**-(सडीचें टोंक जाळून बोथट करणें, पेरण्याच्या दाण्याचे डोळे मोड इ० भाजणें, यावरून) शौर्य; तेज इ० चा नाश करणें; मऊ आणणें. 'काळाग्नि हा रुद्ररूपी रामराजा तुझा भाजिल हिरवा हीर।' –मध्व ६६.

हीर—स्त्री. ईर्ष्या; चढाओढ. [वीर्य; ईर] **०मोड-सांड**-पुस्त्री. १ उत्साहभंग; उमेदमोड; नाउमेदीची स्थिति. २ हेलसांड.

हीर—पु. (महानु.) प्रकाशकिरण; कीळ. 'तया रंगाचे हीर।' –भाए ६४५. [सं.]

हीर, हीरक—पु. हिरा; रत्न. [सं.]

हींव—न. हिंव (सर्व अर्थी) पहा. [सं. हिम; पोर्तुजि. हील, हीर]

हीहीही—स्त्री. फिदिफिदी हास्य. –क्रिवि. असल्या प्रकारें हसून; खिदळून. [ध्व.]

हीळ—स्त्री. (हेट.) झावळीची काडी. हीर (१) पहा.

हुं, हुः, हुंऊ-हुंहुं—उद्गा. मान्यतादर्शक शब्द, उच्चार, हुंकार. [ध्व.] **०म्हणणें-करणें**-१ ऐकतों आहे, करतों आहे इ० दर्शविणें. २ मान्यता देणें; संमति देणें. 'कोणें अकर्ण विजया पृथ्वी करतोंचि बोल बापा हुं।' –गोडबोले वेणीसंहार.

हुपल—स्त्री. (कु. गो.) आरोळी; ओरड; बोंब. [ध्व. तुल० इं. येल्]

हुकणें—अक्रि. १ दगड, गोटी इ० बरोबर नेमानें न लागणें; नेम, मार चुकणें. २ असा नेम मारतां न येणें, मारण्यास चुकणें. ३ चुकणें; भुलणें; न साधणें (वेळ, गाडी). [हिं. हुकना] **हुकचूक**-स्त्री. १ चूकभूल; फसगत; विसर. २ (सामान्यपणें) चुकणें; कार्यसिद्धि न होणें. 'हुकचूक आहे, एखाद वेळ गोळी लागत नाहीं.' [हुकणें+चुकणें]

हुका(क्का), हुकामुका—पु. १ धूम्रपान व चुंबन. २ स्त्रीपुरुषांचा स्वैर संबंध; विलास; विहार; क्रीडा. [हुक्का+मुका]

हुं का(क्की) चूं, हूं चूं, हुचू—न. कुरकूर; निषेध; अवाक्षर (नकारार्थी प्रयोग). [ध्व.] **हुंकार**-पु. १ प्रश्नकर्त्यास उत्तरादाखल, कथा गोष्ट सांगणारास अवधानदर्शक करावयाचा उच्चार. २ राग, धाक, दर्शविणारा उच्चार. 'ऋषीनें हुंकार टाकला तर भस्म होशील' ३ हंबरणें. 'जेवी वत्साचेनि हुंकारें। धेनु स्रवत चाले क्षीरे।' –एभा २९ ४२४. **हुंकारा**-पु १ हुंकार अर्थ १ पहा. २ धनुष्याचा टणत्कार; गर्जना. [हूँ+कार] **हुंकीर**-पु. (गो.) हुंकार करणारा एक पाण्यांतील लहान मासा. **हुं कूं**-हुं का चूं पहा. (क्रि० करणें; म्हणणें).

हुकार—पु हिंदूंच्या 'श्री' कारा सारखा अरबी-फारशी पत्रांचे माथ्यावर लिहावयाचा शब्द. [अर. हू=तो म्हणजे देव]

हुकावणें—अक्रि. १ नादीं लागणें; उतावीळपणें मागें लागणें. २ अतिशय निमग्न होणें; गढून जाणें. [हुकी]

हुकी-क्की—स्त्री. १ कोल्ह्याचें ओरडणें. २ वाद्याचा ध्वनि. ३ एकाएकीं मनांत आलेली अनावर इच्छा; नादीं लावणारी कल्पना-विचार-लहर-उकळी. (क्रि० येणें; उठणें). 'लहानपणीं शाळेंत शिकत असतां जोसेफला समुद्रावर सफर करावयाची हुकी आली.' –केळकर, ग्यारिबाल्डी. [ध्व.]

हुकीर—न. (कु.) उकीर; उंदीर वगैरेनी बिळांतून उकरून काढलेली माती. [उकीर]

हुकूम, हुक्म—पु. १ आज्ञा. २ अनुरोध; सांगी. ३ (गंजिफा) सर पान, ज्यास वरचढ दुसरें पान नाहीं असें पान. याच्या उलट चोर पान. (पत्ते) डावापुरता ठरलेला जोरावर रंग; त्या रंगाचें पान. [अर. हुक्म] **०अहकाम**-पु अधिकार; सत्ता. 'तालुक्यांत सर्व हुकूम-अहकाम त्याजकडील.' –रा ७.४९. **०खुदाई**-स्त्री. देवाज्ञा; मृत्यु. 'मल्हारभटास हुकूम खुदाई जालियावरी।' –रा २०.३४६. [खुदाई=ईश्वराचा] **०गारदाई**-स्त्री. सैन्याची (राजसत्तेविरुद्ध) उठावणी; शिपायांचें बंड. गारदाई पहा. **०बाज**-वि. आज्ञा करणारा. 'हुकूमदाज तुका। येथें कोणी फुंदो नका।' –तुगा ३२५५. **०नामा**-पु. १ दिवाणी खटल्याचा निकाल झाल्यानंतर खरा ठरलेल्या पक्षास कोर्टाकडून मिळणारें निर्णयपत्रक; दाव्यांत मागितलेल्या दादीपैकीं सगळ्या किंवा कोणत्याहि दादीसंबंधानें पक्षकाराच्या हक्कांचा निरुत्तर रीतीनें दिलेला निर्णय; अम्मलबजावणीचे दृष्टीनें कोर्टानें दिलेला हुकूम. (इं.) डिक्री. २ (सामा.) लेखी हुकूम; आज्ञापत्र [अर. हुक्मनामा] **०बंदा**-पु. हाताखालचा इसम. –वि. 'हुकमती' पहा; आज्ञाधारक. [फा.] **०बंदी**-वि आज्ञेतील; आज्ञांकित. **०बरदार**-वि. आज्ञाधारक. **०हाकमत**-स्त्री. स्वामित्व व ताबा; अंमल व अधिकार; सार्वभौम सत्ता. [अर.] **हुकमत**-स्त्री. १ अधिकार; सत्ता; ताबा; अंमल; छाप. २ (कायदा) कोर्टाचा अधिकार. (इं.) ज्युरिसडिक्शन. [अर. हुक्मत] **हुकमतपन्हा**-पु. हुकुमाखालच्या प्रजेचा रक्षणकर्ता; सत्ताधीश; एक पदवी. **हुकमती**-वि. १ ताब्यांतील, अंमलाखालील अधिकारी; सत्ताधीश. 'मोगलाईंत हुकमती केसांची टोळी दाढीखालीं लोंबत होती ती मराठशाहींत कवटीवर चढली।' –राजसंन्यास २०. **हुकमा**-क्रिवि. १ आज्ञेबरहुकूम; जसा हुकूम मानावा त्याप्रमाणें. २ खात्रीनें; हटकून (मनाई केलेल्या गोष्टीसंबंधानें). 'नको जेवूं म्हटलें असतां हा हुकमा जेवतोच.' **हुकमाचा**-वि. आज्ञेतील; ताब्यांतील, हुकमी. –क्रिवि. खात्रीनें; हटकून; अचूक. **हुकमा बाहेरचा**-वि. अनधिकृत; नामंजूर; आज्ञेविरहितचा. **हुकमी**-वि. १ हुकमाचा पहा; हुकमाप्रमाणें वागणारा. २ अचूक. हुकमाचा (–क्रिवि.) पहा; जसें 'हुकमी-गोळा-तीर-निशाण'=अचूक लागणारा इ० (क्रि० लावणें; पाडणें; मारणें). 'हुकमी-पाऊस-फासा-मात्रा–पुडी–लढाई–शिस्त–हत्यार (भाला, बरची, तलवार, सोटा इ०)-बाब (हक्क, येणें)'=हटकून लागू पडणें, येणें, होणें, लागणें इ०. ३ मंजूर केलेलें; आज्ञा दिलेलें; संमत. ४ अवलंबून असलेला; आज्ञेतील; नियमाखालील. उदा० 'हुकमी कारभार'=स्वतःची अक्कल न चालवितां आज्ञा केल्याप्रमाणें पार पाडावयाचें काम. 'हुकमी-राज्य-चाकर'=घालून दिलेल्या नियमाप्रमाणें कारभार चालणारें राज्य; चाकर. ५ हुकमासंबंधींचें, आज्ञानोंदणीचें. **हुकमी-दफ्तर**=आज्ञा, हुकूम ज्यांत नोंदले आहेत असें दफ्तर; नियमावली. **हुकमी पत्र**-न. कामगिरीवर रवाना होण्या विषयींचा लेखी हुकूम. **हुकमें**-क्रिवि. हुकुमान्वयें. हुकमा पहा. **हुकमें हुकूम**-(पत्ते) हुकूमपत्ता; एकसारखीं हुकुमाचीं पानें झाडून दस्त करणें.

हुकूक—स्त्री. पहाटेचें तांबडें; उषःकाल. (क्रि० फुटणें).

हुकूक—स्त्री. हक्क पहा.

हुक्का-का—पु १ गुडगुडी. २ ज्वालाग्राही द्रव्यांनीं भरलेलें पात्र; बाँब. 'दारूगोळा, बाण, हुके.' –मराभा ५. [अर. हुक्का] **०पाणी**–न. खाजेंपिणें इ० व्यवहार. **०पाणी बंद करणें**–जातीबहिष्कृत करणें; वाळींत टाकणें. **हुक्केबरदार**–पु. गुडगुडी तयार करून देणारा चाकर. [फा. हुक्कबर्दार] **हुक्केबाज**–वि गुडगुडीचें व्यसन असणारा.

हुंग—स्त्री. वास; घेतलेला, आलेला वास; गंध. (क्रि० काढणें; घेणें). 'हें कुत्रें हुंग काढतें.' **हुंगणें**–उक्रि. १ वास घेणें; आघ्रात करणें. २ गुप्त गोष्ट, मसलत इ०चा सुगावा काढणें, ती उघडकीस आणणें, शोधून काढणें; लक्षणादिकांवरून जाणणें. ३ नाकानें वास वर ओढणें, ओढून घेणें; सुंगणें. ४ (ना.) तुच्छतेनें विचारपूस करणें. [देप्रा सुंघ; सुंघना] **हुंगाडा-ड्या, हुंग्या**–वि. गुप्त गोष्टींचा सुगावा काढणारा; गुप्तपणें गुन्हे इ० शोधून काढणारा; हेर; गुप्तपोलीस.

हुग्गी—स्त्री. (बे.) गव्हाची खीर. [का.]

हुच—उद्गा. बकरें इ० स किंवा लोकांस पुढें जाण्यास प्रोत्साहन देतांना उच्चारावयाच्या शब्दाचें अनुकरण. [ध्व.] **हुच्च-च्चा**–वि. १ प्रपंचाकडे लक्ष्य न घालतां, ख्यालीखुशाली, कुचेष्टा इ० त काळ घालविणारा. २ हलकट; नीच. [हिं. हुच्च; का. हुच्चा=वेडा] **०भाई-मणी**–पु. क्षुल्लक, हलकट. कुचकिंमतीचा माणूस. **हुचेदिवाणी**–वि. हुचभाई; बेफामपणें हुरळून जाऊन साहसाचें काम करणारी व्यक्ति; हूड.

हुचम(मु)ल्ली—स्त्री. (बुद्धिबळ) प्यादेमातीचा एक प्रकार; प्रतिपक्षाचें उंट व राजा आणि आपला उंट, राजा व एकच प्यादें राखून प्यादेमात करणें.

हुज(ज्ज)त, हुज(जु)ती—स्त्री. १ वितंड वाद; घासाघीस. २ अडथळा; विघ्न; अडचण. ३ टाळाटाळीची सबब; तक्रार; बहाणा. (क्रि० घालणें). ४ पोत्यास ऐवज जमा झाल्याची पावती. 'जमा असत म्हणोन हुजत लिहून दिल्ही असे.'–बाबा २.४४; –तुगा २३५९. [फा. हुज्जत] **०खोर-खाऊ, हुजती-त्या**–वि. १ तक्रारी, घासाघीस करणारा; वितंडवादी. २ सबबी सांगणारा.

हुजूर—पु. १ राजदरबार; राजसभागृह. २ स्वतः राजा; राज्याधिकारी; सरकार; हजरत. ३ जिल्ह्याची मुख्य कचेरी. याचे उलट मुहाली. –शब्र. समक्ष; समोर; दरबारांत. 'माझे हुजूर तो असें बोलला.' –क्रिवि. मुख्य सरकारांत. 'मुहालीं चोर धरले असतील ते हुजूर पाठवून द्यावे.' **०खर्च**–पु. राजाचा खर्च. **०खजिना**–पु. सरकारी खजिना. **०चाकरी-वसर-शिबंदी-शिलेदार-स्वार**–स्त्री.न.स्त्री.पु. सरकारची चाकरी वसर इ०. **०अर्जी**–स्त्री. राजा, राजसभा यांच्याकडे केलेला अर्ज. **०कामगार**–पु. १ खुद्द राजाचा (राज्याचा नव्हे) सेवक; खास अधिकारी. २ राजाचा चिटणीस. **०चौकशी-तपासणी**–स्त्री. राजानें, राजसभेनें केलेली चौकशी, तपास. **०जमा**–स्त्री. सरकारी खजिन्यांतून महालांत पाठविलेला पैसा. **०नवीस**–पु. राजानें दिलेल्या सनदा व आज्ञा नोंदून ठेवणारा अधिकारी; राज्याचा चिटणीस. **०नेमणूक**–स्त्री. १ राजाचे खर्चासाठीं ठरविलेला पैसा. २ राजाची नेमणूक. ३ सरकारी नोकरी. **०पक्ष**–पु विधिमंडळ इ० तील सरकारपक्षीय सभासद; सरकारी पक्ष. **०पागा**–स्त्री. राजाचा रिसाला, पागा. **०पाग्या**–न. १ हुजुरपागेवरील मुख्य अधिकारी. २ त्या पागेंतील स्वार किंवा घोडा. **०बाजार**–पु. मुख्य पेठ; त्या पेठेवरील अधिकारी. **०मामला**–पु. सरकारांतून सरदार इ०कांस जे गांव इ० इनाम देतात त्यांत सरकारचा अंशतः जो अंमल असतो तो. **०मोकदमा**–पु राजसभेनें, राजन्यायाधिशानें निकाल देण्यास योग्य असा खटला; बाब. **०सनदी**–वि. १ थेट राज्यांतून मिळालेल्या सनदेवरून ताब्यांत असलेली (जमीन). २ –पु असली जमीन भोगणारा इनामदार. **०साब**–पु. नांदेड येथील शीखांचें गुरुद्वार. **०हशम**–पु. खास राजाचा अंगरक्षक, सैनिक, शिपाई. **हुजरात**–स्त्री. १ खुद्द राजाची खडी फौज; राजाचें खाजगी घोडदळ, फौज; (सरकारच्या निरनिराळ्या सरदारांच्या हातांखालची फौज हिच्याहून निराळी असते). –मराभा १२. २ दासदासी, पशु, पक्षी इ० खटलें. [अर.] **हुजरात-ती**–वि १ हुजुरात सैन्यासंबंधीं २ सरकारी मंत्री, अधिकारी, राजाचे खास नोकर, शरीररक्षक इ० संबंधीं; याच्या उलट गैबी, गैबती=बाहेर असलेलें; गैरहजर असलेलें; निरनिराळ्या प्रांतात असलेलें. 'हुजरात आणि गैबती। सेवनमार्ग द्विधा असती। दोहींत मुख्य हुजुराती। सन्निध सेवा।' –मेस्तक ३८. **हुजरात पागा**–स्त्री. हुजरात अर्थ १ पहा. **हुजराहुजूर, हुजुराहजूर**–स्त्री. समक्षासमक्ष असण्याची स्थिति; प्रत्यक्ष विद्यमानता. (क्रि० करणें, होणें). –क्रिवि. १ समक्ष; विद्यमानें. **हुजीर**–क्रिवि. (कु.) २ दोन्ही पक्षांच्यासमक्ष; समक्ष; देखत. **हुजऱ्या**–पु. निकटवर्ती सेवक; खिजमतगार; शागीर्द; शिपाई.

हुट(ट्ट)—न. (बे.) बेणण्याचें औत; कोळपा. (क्रि० मारणें). [का. हुट्ट]

हुटकणें—उक्रि. १ झटकणें; हिसडणें; जोरानें हालविणें. २ (ल.) स्मरणशक्तीस चालना देणें. ३ उतावीळ, घाई करणें; निकड लावणें. [ध्व. हुट] **हुटकणी**–स्त्री. १ हिसका; झटका. २ घाई; निकड; टोंचणी. **हुटहुट-हुटी**–स्त्री. १ तीव्र इच्छा; उतावळेपणा; उत्सुकता. (क्रि० भरणें; येणें). 'सर्वत्रास हुटहुट होती कीं एकवेळ झुंज करावें.' –भाव ९९. २ हुरहुर; चित्ताची उद्विग्नता. ३ घाई; निकड. (क्रि० करणें; लावणें). **हुटहुटणें**,

हुडाटणें–अक्रि. उतावीळ होणें; अधीर होणें; गर्व, अभिमान बाळगणें. 'अथवा यज्ञदानादि किरीटी । कां तपे हन हुटहुटी ।' –ज्ञा ९.३६९. **हुटाट-टा**–पु. हुटहुट अर्थ १ पहा. (क्रि० भरणें; येणें).

हुड—उद्गा. १ पशु इ०नां हांकून लावण्याचा शब्द. २ तिरस्कार, धिक्कारदर्शक उद्गार; हड्. **हुडकावणें**–उक्रि. १ हांकलून लावणें; धुडकावणें; घालवून देणें. २ झिडकारणें; तिरस्कारानें वागविणें. **हुडुत्त**–उद्गा, हत्त; हुड अर्थ २ पहा.

हुंड—पु. १ मळलेला किंवा डांकी दागिना उजळ दिसावा म्हणून विटकर, मीठ इ० चा लेप करून मग त्याला आंच द्यावयाचा संस्कार. २ त्यासाठीं लागणारें विठकरीची पूड, मीठ इ० सांस्कारिक द्रव्य, त्याचा लेप. (क्रि० देणें). [सं. हुड्=स्वीकार करणें?] **हुंडणें**–उक्रि. दागिना हुंड लावून उजळणें. **हुंडा**–पु. हुंड पहा. **हुंडाचपका**–पु. वरील उजळा देण्याची कृति. चपका पहा. (क्रि० देणें, लावणें).

हुडक, हुडुक्क, हुडुक—पुन. डमरू (सरोदे, कुडबुडे जोशी, माकडवाले इ०च्या हातीं असणारा). [ध्व.] **हुडुक-हुडुक**–क्रिवि. विशिष्ट चालीच्या ध्वनीचें अनुकरण करून.

हुडकणें—उक्रि. शोधणें; धुंडणें; तपास काढणें, लावणें (वस्तु, जागा इ०चा). [का. हुडुक्] **हुडकणी**–स्त्री. शोध तपास; थांग; चौकशी, माहिती काढण्याचें काम. **हुडकावा**–पु. (कर.) हुडकणी. **हुडकी नजर**–स्त्री. बारीक नजर; भेदक दृष्टि.

हुंडका—पु. हुंदका पहा.

हुंडका—पु १ दूध सुटावें म्हणून वासरूं आईच्या कांसेस जी ढुशी मारतें तो; धडका. २ डोकें; खांदा यांनीं करावयाचा प्रहार; थडक; मुसंडी. हुंदडा पहा. **हुंडकी**–स्त्री. हुंडका अर्थ १ पहा.

हुडकी—पु. (चांदा) डोंगरांतील नाला.

हुडगी—स्त्री. (कु.) टोपली.

हुंडण—न. १ ढुशी; धडक; धक्काबुक्की. (क्रि० मारणें). २ तालीमखान्यांतील अशा प्रकारचा व्यायाम. ३ चिक्कारगर्दी; दाटी; घोळका; गोंधळ; झुंड (माणूस, शिपाई, गुरें, मुंग्या इ० ची). (क्रि० फुटणें; लोटणें; लागणें; जमणें; येणें). उदा० माणसाचे-शिपाऱ्याचे-गुरांचें-मुंग्यांचें हुंडण.

हुंडणें—अक्रि. इतस्ततः भटकणें; उनाडणें. **हुंडगी**–स्त्री. अडदाड; उनाड स्त्री. उंडगी पहा.

हुडदी—स्त्री. (कर. बे) दंगा; त्रास; गोंगाट. (क्रि० घालणें). [हुंदड]

हुडवा—पु. शेणीचा, गोवऱ्यांचा ढीग. 'परडयांत शेणींचा मोठा हुडवा रचलेला होता.' –महाराष्ट्र शारदा मे १९३७. [हुडा]

हुंडवा—पु व्यापार विक्री इ० चा कुलमुक्ता; त्याचा परवाना; ठराविक रकमेस विक्रत घेतलेला हक्क (सारा वसूल जमा करणें इ० चा खोती हक्कासारखा); कंत्राट. २ खंड; कुळानें मालकास धान्य इ० देण्याचा केलेला ठराव, करार. [हुंडा]

हुडसाम, हुडसुदुदु—स्त्री. १ हुतुतूचा खेळ. २ हा खेळ खेळतांना तोंडानें म्हणावयाचा शब्द. ३ धाड; जोराची चाल; झुंड. (क्रि० घालणें).

हुडहुड-डी—स्त्री. १ (थंडी, थंडीतापाचें) कांपरें; (भरणें, भरून येणें). २ (ल.) उत्कट इच्छा; अधिरता; हुकी अर्थ ३ पहा. (क्रि० भरणें; येणें; करणें; मोडणें; जिरविणें; उतरणें). [ध्व.] **हुडहुडणें**–अक्रि. १ (थंडी, ताप इ० नें) कांपणें; लटलटणें. २ फार अधीर होणें. **हुडहुडा ज्वर-ताप**–पु. थंडीताप; हिंवताप.

हुडा—पु. एकाद्या देवतेची जत्रा. **०करणें**–(व.)जिवाचा आटापिटा करणें. 'जिवाचा हुडा केला तेव्हां हे दिवस प हिले.'

हुडा—पु. १ बुरूज; तट; कोट इ० 'जैसे पन्नासिलें गगनाचें हुडे।' –ज्ञा ७.८०. 'मेरू ऐसें लंकचे हुडे।' २ शेणामातीनें लिंपलेला गोवऱ्याचा ढीग, गंज; कडबीचा गंज; रास. ३ गाड्यावरील, गच्चीवरील लहानशी खोली (निजणें, हवा खाणें इ० साठीं). [का. हुडा=किल्ला]

हुंडा—वि. भुंडा; बिन शिंगांचा; शिंगें खालीं, मागें वळलेलीं, वाकलेलीं आहेत असा (पशु). **०बैल**–(ल.) मूर्ख. **हुंड्या कपाळाचा**–वि. अरुंद कपाळाचा.

हुंडा—पु. १ वरदक्षणा; वधूपक्षानें वरपक्षास लग्नांत द्यावयाची रोख रक्कम; शुल्क. २ भाजून खाण्यास ठीं जोंधळा, मका इ०चें पक्कें नसलेलें कणीस. ३ एक प्रकारचा भरीव बांबू. ४ मक्का. हुंडवा पहा. ५ विहिरहुंडा; बागाईत जमीनीवरील सारा; हा बिघ्यावरून न ठरवितां विहिरीच्या पाण्याची जेवढी भीज ती-वरून ठरवितात. 'विहिरहुंड्याकडील तरम.' –पैमा २.३४. ६ तेल्याच्या घाण्यांतील लाट. [सं. हुड्=स्वीकारणें] **०पांडा**–पु. वरास द्यावयाचा पैसा, मानपान इ०. हुंडा अर्थ १ पहा. **हुंडेबंदी**–स्त्री. पाटस्थळ जमीनीवरील पाट, विहिर इ० हिशेबानें बसविलेला सारा. **हुंडेकरी**–वि. हुंडा घेतल्यावांचून कोणाची मुलगी न पत्करणारा प्रतिष्ठित (वर).

हुंडाभांडा, हुंडेभांडे—पुन. माल वाहून नेण्याचें एकंदर भांडें, मक्ता (यांत जकात, सारा, नाकपट्टी इ० धरतात); ठोक वाहतुकीचा करार. [हि.]

हुंडारणें—न. पाण्याची थडक सोसण्याकरितां घातलेला गडगा, बांध. –उक्रि. १ पशूनें आपल्या डोक्यानें पलीकडे लोटणें, झुगारणें, दूर करणें; हुंडाडणें. २ (सामान्यतः) ढकलून

देणें; झिडकारणें; धिक्कारणें. ३ लाथाडणें; भिरकावणें; हुंदडा मारणें. [हिं. हंडाना]

हुंडी—स्त्री. १ एका ठिकाणचें झाड दुसऱ्या ठिकाणीं नेऊन लावावयाचें असलें म्हणजे मुळांस धक्का लागूं न देतां मातीसकट उपटतात तें; तयार केलेलें झाडाचें लहान रोप. २ बुधल्याच्या तोंडास दोरी बांधून व फडक्यानें आच्छादून वर बसविलेलें मातकापड-शेणाचें लिंपण किंवा दट्टया.

हुंडी—स्त्री.अव. जोंधळ्याची एक जात. हा उन्हाळ्यांत पेरतात.

हुंडी—स्त्री. जडयाचें हत्यार. -शर.

हुंडी—स्त्री. (तंजा.) वर्गणीची पेटी. (याला वर भोंक असतें).

हुंडी—स्त्री. १ परस्थळीं पैसे पाठवावयाचे असतां आपल्या ठिकाणच्या सावकाराच्या दुकानीं सदर रक्कम व वरखर्च इ० साठीं थोडेसे पैसे दिले असतां तो दुसऱ्या ठिकाणच्या सावकाराला सदर रकम देण्याबद्दल देतो तें पत्र. २ (ल.) अविवाहित मुलगी. ३ (ल.) देशांतरी गोत्रज मरण पावल्याबद्दलचें वर्तमान, पत्र इ०; त्याच्या मरणानें आलेलें आशौच [सं. हुड्=स्वीकारणें ? हिंदी हुंडी] **०लावणें-देणें**-हुंडीपत्र नेऊन दे **०चिट्ठी-पत्र**-स्त्रीन. हुंडीचा कागद; हुंडी अर्थ १ पहा. **०पांडी**-स्त्री. (सामान्यतः) हुंडी-पत्र इ० कागद. **हुंडणावळ, हुंडावण**-स्त्री. हुंडीबद्दलचा बट्टा; कमिशन; बटाव. [हिं.]

हुंडुक, हुंडुकक—न. आमटीसारखें एक तोंडी लावणें.

हुंडु—पु. १ (व.) मोठा फोड. २ बूच.

हुंडुक, हुंडु, हुंडुका—पु. १ प्रबल भावनेचा आवेग; उठाव (शोक, करुणा, प्रेम इ० चा). २ हुंदका पहा. (क्रि० भरून येणें; भरणें; येणें). [हुंदका]

हुंडेकरी—पु. १ कोठार इ० मध्यें ठराविक वेतन घेऊन माल वाहून नेणारा इसम. (यांत नाकें, जकात इ० भरण्याचा पैसा तोच भरतो, मालकास द्यावा लागत नाहीं), हुंडयाभाडयाचा व्यापारी; दलाल. २ स्टेशनावरून घरीं, घरून स्टेशनावर माल नेणारा आणणारा माणूस.

हुणू(नू)क—स्त्री. १ सूक्ष्म गैरसमज करून देणारें भाषण; हूल. (क्रि० करणें; दाखविणें). २ चिन्ह; खूण (ओळखीची). ३ रीत; पद्धत; चाल. (क्रि० साधणें; येणें). चुणूक पहा.

हुत—वि. १ अग्नींत हवन केलेलें; होमांत टाकलेलें; जाळलेलें. २ जाळून राखरांगोळी केलेली (वस्तु इ०). [सं.] **०क**-न. हवनीयद्रव्य; आहुती. 'आणि हुतक वस्तु जें जें। तेंही मीचि।' -ज्ञा ९.२६८. **०वह-हुताश-हुतास-हुताशन**-पु. अग्नि. 'गुरुवाक्य हुताशीं। हवन केलें।' -ज्ञा ४.१२३. 'हुताशन नेणें धडकतां। सीत कैचें उरलें पैं।' **हुताशनी**-स्त्री. होळी.

हुत—वि. निमंत्रित; बोलाविलेला. [सं.]

हुतका—पु. १ (उवा, पिसवा, किडे इ० चा) बुजबुजाट; वळवळाट. २ (ल.) घरांतील मुलाबाळांचा सुळसुळाट; गर्दी; भिकारी; याचक इ० ची सभोंवतीं दाटी. ३ खरजेची कंड, खाज. (क्रि० येणें; सुटणें). ४ माशा, ढेंकूण इ० चा सुळसुळाट व चावा. ५ उत्कंठा; अधीरता; पुळका (बोलणें, गाणें, मारणें, धावणें इ० चा). (क्रि० येणें). [ध्व ?] **हुतकाड**-(निंदार्थी) हुतका पहा.

हुतकाड—पु. (ना.) लहानसा भाग.

हुताट-टा, हुताटकी—पु.स्त्री. पराकाष्ठेचा उतावीळपणा. हुटहुटी पहा. [हुटहुट] **हुताटणें**-अक्रि. उतावीळ होणें; हुटहुटणें. **हुताटया**-वि. उतावळया.

हुती—स्त्री. (कों.) वावटळ; वातचक्र.

हुतुतु, हुतुतु हमामा—पु. १ एक खेळ. यांत 'हुतूतू' असा शब्द म्हणत धावावयाचें असतें. २ (ल.) अभ्यास इ० सोडून मुलें दांडगाई, गोंधळ घालतात तो धिंगाणा. (क्रि० घालणें). [ध्व.]

हुदु(दु)क(ग)णें—सक्रि. १ हालविणें; चालविणें; झडपणें (पंखा, कापड, इ०). २ जोरानें हांकणें. -अक्रि. १ दुडक्या चालीवर चालणें (घोडा). २ हबके खाणें; बसणें (घोडेस्वारानें). [ध्व.] **हुदक(ग)णी-हुदकणें**-स्त्री. १ हालचाल; हबका; हुडकी. २ कुरकुर; किरकिर; निकड; टुमणें. (मुलांची).

हुंदका—पु हुतका पहा.

हुंदका-की—पुस्त्री. रडण्याचा उमाळा; 'हुंडका-की' पहा. **हुंदणें**-अक्रि. हुंदका देणें; रडणें. 'अश्रुपात वाहताति हुंदतात घडिघडि।' -सला ११.

हुंद(दा)डणें—उक्रि. १ शिंगानें, डोक्यानें हिसडा, ढुश्शी मारणें, देणें. २ (ल.) घालवून देणें. ३ (ल.) दूर लोटणें; बाजूस करणें; खोडून काढणें (दोष, आरोप). -अक्रि. बागडणें; हुदडणें; नाचणें; धुडगूस घालणें (मूल इ० नें). [ध्व. का. हुदीद] **हुंद(दा)डा**-पु. १ हुंडका २ पहा. २ डोकें, खांदा यांनीं मारलेली ढुस्सी; धडक. ३ जरीमरीसारखा एक रोग आणि त्याची देवता. ४ धसमुसळया, मुसळकंद, आडदांड माणूस; मार्गांत कितीहि अडचणी आल्या तरी धडाक्यानें पुढें जाणारा माणूस. ५ (सोंगटया) एकच फिरती शेवटची सोंगटी. **हुंद(दा)डी**-स्त्री. दूध पितांना बाजरानें कासेस दिलेली ढुशी. हुंडका पहा.

हुंदळा—पु. (बे.) पाळणा; झोपाळा. [हिं. हिंदोळा]

हुदा रुमाल—पु. म्यानासह तरवार एका रेशमी जाड मोठ्या पिशवींत घालून त्या पिशवीचे तोंडास बांधलेला एक रुमाल. हा चवरीप्रमाणें देवीवर ढाळावयाचा असतो. -आडिवऱ्याची महालक्ष्मी १०६.

हुदुक हुदुक, हुदडुक हुदडुक, हुदुक हुदुक, हुदुक चाल—क्रिवि. घोडा, गाडव इ० प्रमाणें खुदुकखुदुक चालीनें चालून.

हुदुदु, हुदुदुसुदुदु—पु. हुतुतु खेळ पहा.

हुद्दा—पु. १ अधिकार; काम; जागा; नोकरी; नेमणूक. 'केवळ लिहिणें येईना, कमाविशीही न केली त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा.' -सभासद २४; ब्रंव ६१. २ ताशा, मरफा व ढोल हीं तीन वाद्यें व तीं वाजविणारे प्रत्येकीं. [अर. उद्दा] **हुद्देदार-करी**-पु. १ (हुद्दा असलेला) अधिकारी; नोकर. २ शस्त्रवाहक कामदार. -शर. [फा.] **०मामला**-पु. कामकाज. -रा ८.१३४.

हुनई—स्त्री. रेशमाची एक जात. -मुंव्या ९७.

हुनमुखा—पु. (माण.) विहिरीच्या वरवंडीवरील बाजूस बसविलेला दगड.

हुन(न्न)र, हुनेर—पु. कौशल्य; कला; कसब; कल्पकता; शोधकता. २ युक्ति; इलाज; योजना. 'हुन्नर ही नवाच केला.' -सभासद ३१. 'काय हुनेर करावा म्हणोन चिंताचूर जाहले.' -मदब ११.५३. [फा. हुनर] **०बंद, हुनरी, हुनेरी, हुन्नरवंत-वृ**-वि. १ कल्पक; कलावंत; कुशल; कसबी; शोधक. २ धूर्त; कावेबाज ३ युक्तिबाज. ४ शिल्पकार. -शर. 'समागमें शिल्पी कार हुनरबंद कारागर त्या देशींचे आणून.' -मदरु १.२२. [फा. हुनरमन्द] **०बंदी**-स्त्री. १ कुशलता. २ कावेबाजपणा.

हु(हू)प—स्त्री. १ उत्सुकता. २ धैर्य. हुरूप पहा.

हुंपट, हुप्पा—पु. १ वानराच्या टोळींतील मुख्य; पुढारी. २ (ल.) भटक्या व लबाड माणूस. [ध्व. हूप!]

हुपररोटो—पु. (गो.) एक पक्वान्न.

हुंब—वि. (माण.) अडाणी.

हुबकणें—उक्रि. १ जोरानें एकदम खालीं ओढणें; आदळणें. २ चटकन पकडणें; हिसकणें. ३ (ल) चोरणें; लुबाडणें; कपटानें गिळंकृत करणें; हबकणें. [ध्व?] -अक्रि. एकदम, दणकन; खालीं पडणें; कलंडणें; कोसळणें. २ हादरणें. हबकणें पहा.

हुंबणें—अक्रि. (काव्य) कण्हणें; विव्हळणें; कुंथणें. 'एक बायाळ येती हुंबत.' -ह २४.५२. [ध्व.]

हुंबतें—न. भांडण; वाद. हुंबरी पहा.

हुबर-री-ळी, हुंबल-ली-लें—स्त्री. गुराख्यांचा सुर कावळीचा एक खेळ. (क्रि० घालणें; खेळणें). 'एकु हमामा घालिति हुंबली।' -दाव ८५.

हुंबरड, हुंब(बा)रडा-डी—पुस्त्री. गाईबैलांचें ओरडणें; हंबरडा. **हुंब(बा)रणें**-अक्रि. १ गाईबैलांनीं ओरडणें; हंबरणें. २ (ल.) गर्वानें गुरगुरणें. 'थाटले सहा गायक। अभिमानानें हुंबारती देख।' ३ घुमणें. 'परमानंदेंहि हुंबरे। सुखोद्गारें तुष्टोनि।' -एभा ३ ६०१.

हुंबरणें—अक्रि. निस्तेज, फिकट होणें; पांढरें पडणें (तोंड-उष्णता इ० नीं). उबळणें पहा.

हुंबरीतुंबरी—हमरातुमरी पहा.

हुंबा-ब्या—वि. रडका; रडया. 'हुंब्यासीं हुंबा लाऊन द्यावा। टोणप्यास टोणपा आणावा।' -दा १९ ९.२९.

हुबहु, हुबेहू हुबेहुब—क्रिवि. (चुकीनें हुबरहु असेंहि रूप आढळतें.) सर्व प्रकारें एकसारखें; थेट असें; पूर्ण सादृश्यतेनें; अत्यंत सादृश्य असल्यामुळें तोच हा अशी प्रतीति होई असें; (क्रि० असणें; दिसणें; बोलणें इ०). [अर. हुबहू; ऊ-ब-ऊ]

हुबाडा, हुम्माडा—पु. (ना.) हुंदडा, हुंडका अर्थ २ पहा.

हुब्बक—पु. घोड्याचा एक रोग. -अश्वप २.१४७.

हुब्बेवतन—न. स्वदेशप्रेम. 'कबुतरांना उडविण्याची आम्ही फार खटपट करीत असूं पण तीं कसचीं जातात. त्यांच्या तही हुब्बेवतन असतेंच.' -उत्तरेकडील भिती. [फा. हुब्बु-इ-वतन]

हुमकलवें—सक्रि. (गो.) टांगणें; लोंबकळणें.

हुमण—स्त्री. (गो.) मांसाची आंबटी.

हुमण—पु.न. हुम, हुम असा आवाज करणारा एक पक्षी. याचा शब्द अशुभ समजतात.

हुमण दांडगा—वि. (माण.) रानवट; अडाणी. [हुणम-दांडगा?]

हुमणी—स्त्री. झाडांच्या आळ्यांत किंवा खतांत होणारी कीड; ही कोंवळें पीक खाते.

हुमणी—स्त्री. १ थडक; ठोसा; हुंडका पहा. 'मागध क्षोभोनि उफराटी। हुमणी हाणी मस्तकीं।' -मुसभा ७.२७. २ वासरू पितांना गाईस देतें तो हुंदडा; हुंडका.

हुम(मा)रडा, हुमरणें—हुंबरडा इ० पहा.

हुमरणें, हुमारून येणें—अक्रि. तापानें तोंड फुलून येणें; सुजणें; विद्रूप होणें. [उमलणें?]

हुमरीतुमरी—हमरातुमरी पहा.

हुमरी-हुम-ल्ल, हुम्मल—स्त्री. हुंबर पहा. (क्रि० घालणें; खेळणें).

हुमल-ग्मल—स्त्री. १ हुंबर प्रमाणें एक खेळ; त्यावरून. २ सबबी सांगणें; हुज्जत. (क्रि० घालणें).

हुमला—पु. झाडावर राहणारी व कडकडून चावणारी तांबडी मुंगी.

हुमला—पु. (बडोदें) हल्ला; चाल. ' सशस्त्र रजपूत लोकांनीं चावडीवर हुमला करून.' –सयाजीराव चरित्र ४६८. [गु. हुमलो]

हुमाणा-णें, हुमर्णे—पुन. उखाणा; कोडें; कूट.

हुमायून—बिना. दिल्लीचा एक बादशहा. -वि. पातशाही. ' फर्मान हुमायून.' –रा २०.१०. [फा. हुमायूनी]

हुमारडा—पु. हुंबरडा पहा.

हुम्मा-मा—पु. १ एक काल्पनिक पक्षी. हा शुभकारक, नेहमीं आकाशांत फिरणारा, आपलेंच मांस खाणारा असून ज्याचे डोक्यावरून हा उडतजाईल तो राजा होतो अशी समजूत. २ घोड्याचा तुरा (पक्ष्याच्या पिसांचा). [फा. हुमा]

हुंमैचें—अक्रि. (गो.) घाम येणें. **हुमसाण**-स्त्री. घामाची घाण.

हुम्या-हुमा—वि. १ (दुसऱ्याची कितीहि घाई असली तरी संथ राहून नुसतें हूं म्हणणारा) घुम्या; तोंडातून अक्षर हि न काढणारा. २ टोणपा; ठोंब्या; मद्दड. [ध्व.]

हुयेल—स्त्री. (कु.) आरडाओरड; बोंब. [तुल० इं. हौल]

हुर—उद्गा.स्त्री. हुर्रे पहा.

हुरकुंड—पु. एक खेळ.

हुरडणें—उक्रि. भाजणें; होरपळणें; वरवर जाळणें. [जाळण्याचा ध्वनि हुर्र्? का. हुरि=भाजणें]

हुरडा—पु. मका; जोंधळा, नाचणा इ० च्या कणसाचे भाजलेले दाणे. २ अशा भाजून खाण्याच्या स्थितीस आलेलें दाण्याचें कणीस. याचे दोन प्रकार करड (जून) किंवा बामणी (कोंवळा). [देप्रा.हुरड; हुरडणें पहा.] **हुरडयास येणें**–कणीस हुरड्यासाठीं तोडण्याच्या स्थितीस येणें. **हुरडा फुंकया**-वि. १ भाजलेलें हुरड्याचें कणीस चोळून फुंकणारा (विशिष्ट कामाचा गडी). २ (ल.) भित्रट; पळपुटा; लढाईस निरुपयोगी (शिपाई) ३ रिकामटेकडा; आडदांड; उद्धट. [हुरडा+फुंकणें] **हुरडभाज**-स्त्री. १ हुरडा भाजणें. २ (ल.) कसेंतरी, वरवर भाजणें; योग्य प्रकारें, बरोबर न भाजणें. **हुरडभूज**-स्त्री. (कों.) राब, काट, कवळ इ० अपुरा पडल्यानें कशी तरी शेतजमीन भाजणें. [हुरड+भुजणें]

हुरण—न. १ मुंग्यांचा (किंवा ल० नें माणसांचा) समुदाय; थवा. २ (राजा.) एक जातीची मुंगी.

हुरणी, हुरणें—होरणी; होरणें पहा.

हुरदंग-गा—पु. १ गडबड; दंगा; अशांति; कला; धुडगूस. (क्रि० घालणें; मांडणें; चालवणें; करणें). –वि. १ अव्यवस्था, दंगा इ० ने युक्त. २ दंगेखोर; गोंधळ माजविणारा.

हुरदावठ—पु.स्त्री. हरदावळ पहा.

हुरपळ-(ळा), हुरपा(फ)ळा—पु. १ वरवर भाजणें; परतणें; होरपळा. २ अशा प्रकारची स्थिति; आगभाग. ३ वरवर दग्ध होणें. (क्रि० करणें; होणें). [देशी] **हुरपडणी-फळणी**-स्त्री. हुरपळ पहा. **हुरपळणें-पाळणें**-उक्रि. १ वरवर भाजणें; आंच देणें. २ व्यापारांत तूट येणें. –अक्रि. १ वरवर जळणें. २ (शरीर, अवयव इ० ची) आग होणें; जळजळणें. [हुर्र+पोळणें]

हुरपुर-हुर्र—न पु. (गो. कु.) गोवर रोग.

हुरमट—वि. उर्मट; हुड पहा.

हुरमत. हुर्मत-ती—स्त्री. अब्रू; पत; नांवलौकिक. ' दिल्लीपतीची हुरमत राखावी.' –पाव १६. ' चिरंजीवाची हुर्मती आपण बचाविली हा उपकार विसरणार नाहीं.' –रा ६.३२६. [अर. हुर्मत्] **०खाऊ-घेऊ-घेणा**-वि. मानहानि करणारा; खालीं पहावयास लावणारा; काळोखी लावणारा; अब्रू घालविणारा, लौकिक बुडविणारा (धंदा, मनुष्य इ०). **हुरमतीचा, हुरमतदार, हुरमती**-वि. अब्रूदार; पतदार; लौकिकवान.

हुरमू(मो)ज—स्त्री. विशिष्ट प्रकारची कावेसारखी तांबूस माती; रंग. [अर. हुरमुज=ओर्मझ बंदर; अहुरमज्द शब्दावरून बनलेलें नांव] **हुरमु(मो)जी**-वि. १ हुरमूज रंगाचा, रंगासंबंधीं. या रंगाचें इराणी आखातांतील उत्कृष्ट (मोती). ' तुमचें रूप जसें हुर्मुजी दाणा जी।' –होला १६९. [फा. हुर्मुझी]

हुरा-री—पु स्त्री. (व.) ठोसा; गुद्दा.

हुरेवडी, हुरली, हुरवावडी, हुर्रेवडी—स्त्री. १ फजीती; हुर्यो; फटफजीती; बचेरी. २ फजीतीमुळें येणारी नामुष्की. [हुर्र+रेवडी, वावडी इ०]

हुरशी—स्त्री. उमाळा; उत्साह; उमेद; अवसान; उत्सुकता; स्फुरण; शिरशिरी; झटका. [हुर्र]

हुरहुर—स्त्री. १ चिंता; चुटपुट; फार काळजी. २ दुःख; शोक (चुकी, आपत्ति, नाश इ० बद्दल). ३ पश्चात्ताप; दिलगिरी; अस्वस्थता. (क्रि० वाटणें; लागणें). [हुर] **हुरहुरणें**-अक्रि. १ दुःख; शोक, वाईट वाटणें; काळजी, अस्वस्थता वाटणें; खेद करणें. २ आसुसणें; तळमळणें.

हुरळ—स्त्री. भूल; भुरळ; अविचारी उत्साह. [का. हुरि] **हुरळणें, हुराळ(ध)णें**-उक्रि. उद्युक्त करणें; भरीस घालणें.

'माझ्या पोराला तूं हुरळूं नकोस.' –अक्रि. अविचारी उत्साहानें एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें. हुरावणें पहा. म्ह० हुरळली मेंढी लागली लांडग्याच्या पाठीस.'

हुरळा—पु. (व.) हुरडा पहा.

हुरळे—पु अव. (माण.) शेतांत कापून ठेवलेल्या कणसांसकट कडब्याच्या पेंढया.

हुरा—पु. १ शेर; एक प्रकारचा निवडुंग. २ एक कुडयासारख झाड.

हुराण—न. (कु.) मुंग्यांचें झाडावरील घर. हुरण पहा.

हुरावणें—अक्रि. हुरळणें पहा. म्ह० हुरावली मेंढी लागली लांडग्याचे पार्टी.

हुराळा—पु. हुरपळा पहा.

हुरूप—पु.स्त्री उत्साह; हुरशी; उमाळा. हुरूम पहा.

हुरूम—स्त्री. चिकाटी; निश्चय; मनाची दृढता. [अर. हुरिम्=मन]

हुरूरू—पु स्त्री. हुरेरवडी पहा.

हुरोळा लागणें—(माण.) फळविण्याकरितां गायीचे मागें बैल लागणें.

हुर्द—न. (कों.) हृदय. 'हुर्दे ज्याचें भरून आलें.' –ऐपो ४२. [सं. हृदय]

हुर्बुड—न. (व.) जूं जुंपण्याचें कातडी साधन.

हुर्मुद्द—वि. (व.) रंगेल; बेपर्वा.

हुर्याण—पु (कों.) मुंग्यांचा थवा त्यांचें घर. हुरण पहा.

हुर्यो, हुररे, हुर्र—स्त्री पु फजीती; पच्ची. –उद्गा. हांकलून, फेटाळून लावताना, फजीती करतांना उच्चारावयाचा शब्द. (क्रि० करणें; लावणें). ०करणें–१ हुरावणें. २ हुरेरवडी करणें.

हुलक, हुर्ली—स्त्री. (व.) कोरडी ओकारी. (क्रि० लागणें).

हुलकट—स्त्री. हुल्लड; गडबड; बंडाळी; दंगा. [हूल+कट] **हुलकटणें**-अक्रि. दंगा, बंडाळी करणें; बंड पुकारणें, माजणें. 'गंगातीराकडे अताशीं हुलकटलें आहे.'

हुलकावणी—स्त्री खरें कळूं न देणें; भाषण, हालचाल इ० नें भलतीकडे रोख दाखवून फसविणें; हूल; फसवणूक. (क्रि० दाखवणें). [हूल]

हुल(लु)कें—न. (व.) हिंव; थंडीताप.

हुलको, हुलूक—स्त्री. (कु.) पिसूं (किडा).

हुलगा-गी, हुलवळा, हुलोळा—पु स्त्री. कुळीथ नांवाचें धान्य.

हुलगूड—पु.न. होला; भिलकवडें नांवाचा पक्षी.

हुलचूतिया-चुत्या—पु. ठोंब्या, मूर्ख माणूस.

हुल(ल्ल)ड—स्त्री. १ गर्दी; ओरड; गडबड; हुलकट; बंडाळी; दंगा. 'पांच सातशें माणूस कापून काढले, मग हुल्लड शांत जाहाली.' –भाब ५२. २ (सामान्यतः) हल्ला; एखाद्या व्यक्तीनें केलेला जोराचा हल्ला. ३ नेटानें कामास लागणें. ४ कामाची पाळी. [हिं. हूलड]

हुलप—पु. १ (गो.) जाळ. २ (राजा. कुण.) आगीचा डोंब. [होळपणें] **हुलवप**-(गो.) वरवर भाजणें.

हुलपा-पो—पु. (गो. राजा.) उलफा पहा; शिधा. –मसाप ४.४.

हुलरी—स्त्री. खेळांतील गलबला. 'ती मात होतसे भारी। माजली भली ही हुलरी।' –रामला ३८. [हूल]

हुलसरा—पु मुलकी खात्यांतील एक अधिकारी.

हुलसार-स्वार—पु. हूलस्वार पहा [का.]

हुलहुल—स्त्री. निकड; घाई; धादल. (क्रि० लावणें; मांडणें लागणें). [ध्व. हिं. हूलना] **हुलहुल्या**-वि. गबडया; धांदल्या.

हुला—वि. वेडा; खुळा. हुलचुतिया पहा.

हुलुक—पु आवेश. [फा. ?]

हुलुसवार—वि. नाजूक; अरुवार (प्रकृति, वस्तु).

हुल्लारा—पु. कांदे इ० ठेवण्याचा हारा.

हुल्या मारणें—अक्रि. (व.) व्यर्थ मेहनत करणें.

हु(हा)वळा—वि. नेता; पुढारी; मार्गदर्शक.

हुंवार—पु. (गो.) नदीचा पूर. और पहा. [अर ?]

हुवाला-ली—वि. (कर.) अडाणी. **हुवालेपणा**-पु. अडाणीपणा.

हुवेल—स्त्री. (गो.) ओरड; बोंबाबोंब. [तुल. इं. हौल]

हुश(श्श), हुःश हुस्स—उद्गाभ. १ विश्रांतीचा, ओझें उतरल्यानंतरचा, काम संपल्यावरचा सुस्कारा. २ अतिशय उष्णता भासमान झाल्याचा, दाटीचा, मानसिक त्रासाचा उद्गार. ३ पांखरांस हाकावयाचा शब्द. [ध्व.] ०करणें–एखाद्यास विवक्षित स्थान, पदवीवरून दूर करणें; हुसकावणें.

हुशार—वि. १ बुद्धिमान; चलाख; शहाणा. २ सावध; दक्ष. ३ ताजातवाना; उत्साहयुक्त; तरतरीत (दुखण्यातून उठल्यानंतर, चांगलें खाऊंपिऊं लागल्यावर). [फा. हुश्यार्] **हुशारणें**-अक्रि. सावध, जागें होणें; शुद्धीवर येणें; ताळ्यावर यणें. **हुशारी**–स्त्री. १ चलाखी; बुद्धि; शहाणपणा. २ सावधानता; सावधपणा; सावधगिरी. ३ तकवा; तरतरी; उल्हास. [फा. हुश्यारी]

हुशा-सी—स्त्री. उशी; आपटलेल्या चेंडूचें वर उडणें; हापटी (क्रि० खाणें; उडणें; लागणें). [उशी]

हुसकचें—क्रि. (गो.) काळजी करणें. [हुसका]

हुसकटणें—उक्रि. १ झिडकारणें; घालवून देणें; तिरस्कारानें हाकालपट्टी करणें; हाकून लावणें. २ अस्ताव्यस्तपणें इकडेतिकडे फेकणें; उसकटणें. ३ मोडणें; फिसकटविणें. 'त्या दुष्टानें माझ्या लग्नाचें काम हुसकटलें' -अक्रि. घाबरणें; बुजणें; भिऊन थबकणें (पशु, इ० नीं); चुथडा होणें; बिघडणें (काम, धंदा, बेत इ०). [हुस्सा]

हुसकणें, हुसकावणें—उक्रि. १ हांकणें; हांकलून देणें (पशु, पक्षी इ०स). २ चुकणें; हुकणें (नेम, शिस्त, निशाण, टोला) ३ बिघडविणें; नाश करणें; फिसकटविणें. ४ एकदम हिसकावून घेणें. ५ उसकटणें. [हुस्स!]

हुसका—पु. मनाला सारखा लागलेला ध्यास; चिंता; हुरहुर; उचका पहा. [हुश्श=श्वास सोडणें]

हुसकावणी—स्त्री. हाकलणी; धुडकावणी.

हुसकी—स्त्री. (आटयापाटयाचा खेळ) कांडें चिरण्याच्या वेळीं द्यावयाची टाळी. **हुसक्या**-वि. १ हिसकाविणारा; धुडकावणारा. २ विस्कटाविस्कट करणारा.

हुसके मोकळा—वि. निष्काळजी; (गो.) हुसक्या मेकळो.

हुसळणें, हुसळी—उसळणें-ळी पहा.

हुसूक—स्त्री. १ फुफुक (दारु इ० च्या फुसक्या बाराचा शब्द); हुस्स; फुस्स (फुसकट बार); चुकलेल्या टोल्याचा आवाज. २ (ल.) निष्फळ प्रयत्न; ओंफस. (क्रि० होणें; जाणें; करणें). [ध्व.] **हुस्कार-रा, हुसकार** पु. सुस्कारा; उसासा; फुसकारा (साप, माणूस इ० चा) (क्रि० देणें; टाकणें; सोडणें). **हुसकारणें, हुस्कारण**-अक्रि. जोरानें वारा, सुस्कारा सोडणें; उसाका टाकणें, हुश्श पहा. **हुसहुस**-स्त्री. वारा सोडण्याचा, श्वास टाकण्याचा ध्वनि; सुस्कारा. (क्रि० देणें; सोडणें). -क्रिवि. हुश्श अशा आवाजानें; सुस्कारा टाकून.

हुसेनी—वि. १ हुसेनाविषयीं. २ (सामा.) मुसलमानी [फा.] **०कानडा**-पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, कोमल गांधार, कोमल मध्यम, पंचम, कोमल धैवत, कोमल निषाद हे स्वर लागतात. जाति संपूर्ण-संपूर्ण, वादी तारषड्ज, संवादी पंचम, वेळ मध्यरात्र. **०ब्राह्मण**-पु. बाटून मुसलमान झालेला ब्राह्मण. **हुसैनी**-स्त्री. समुद्रांतील एक मोठा काळा मासा.

हुस्न—न. १ सौंदर्य; लावण्य. २ चांगलेपणा. 'यांतील हुस्न लिहिलें.' -रा ७; खलप २.१०३. [अर. हुस्न्]

हुहा—स्त्री. हाहू पहा. [ध्व.]

हुंहुं—उद्गा. दुःखाचा उद्गार. [ध्व.]

हुळका—वि. (बे.) तोंडावर देवीचे वण असलेला. [का. हुळकु]

हुळवाजणें—अक्रि. १ माघार घेणें; अंग-पाय काढून घेणें. २ उनाडणें; भटक्या मारणें.

हुळहुळ-चुळ—स्त्री. १ गुदगुली; हुळहुळण्यासारखी खाज; कंड; शिरिरि (अवयवावरून केंस, माशी इ० फिरल्यानें होणारी). ३ परद्रव्याच्या किंचित स्पर्शानें नाजुक किंवा दुखऱ्या अवयवास वरील अवस्था होणें. [स्पर्शध्वनि] **हुरहुळणें**-अक्रि. १ वरील अवस्था, गुदगुल्या होणें; कस, मुंगी इ० अंगावर फिरल्यानें असा परिणाम होणें; तसें होण्यास वरील वस्तु अंगावरून फिरणें. २ (ल.) अधीर, उत्कंठित होणें; खाजणें-(हात, पाय, जीभ इ० मारण्यास, बोलण्यास). **०पुळपुळ-चुळचुळ**-स्त्री. अतिशय घाई; गडबड; चुळबुळ. **हुळहुळा**-वि. १ नाजूक; कोमल; परकीय वस्तु जवळ आली असता अंगावर शहारे उभे राहणाऱ्या प्रकृतीचा (मनुष्य, कातडी, अवयव). २ तशा प्रकारची झालेली (प्रकृति, कातडी). ३ स्पर्श सहन न होणारा; प्रक्षुब्ध. ४ बिन विचारानें एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणारा. **हुळहुळाट**-पु. अतिशय हुळहुळ. **हुळहुळी**-स्त्री. (गो) पिसू. **हुरहुळी मुंगळी-मुंगी**-स्त्री. धावरी मुंगी; जलद चालणारी काळी मुंगी.

हुळहुळा, हुळा—पु. भाजलेल्या हरभऱ्याचे घाटे; भाजलेला ओला हरभरा. [सं. होलक; हिं.]

हुळहुळी—स्त्री. (गो.) आंबटी करण्याचें एक प्रकारचें भांडें. [का. हुळी=आमटी]

हुळूम—पु. वांगी, मिरची इ० च्या मुळास लागणारी कीड.

हूं—उद्गा. १ प्रवृत्त करणें, परवानगी देणें, निकड लावणें, उत्तेजन देणें, संमती देणें, कबूल करणें इ० साठीं उपयोगांत आणावयाचा उद्गार; हं! हां!! २ दुखापत झाली असतां काढलेला दुःखोद्गार; हाय! चूं! कूं! उस! (क्रि० म्हणणें; करणें). [ध्व.] **म्ह०** (गो.) हूं म्हळयार तपलें घास तूं=अनुमोदन दिलें तर तुम्हींच काम करा.

हूक—स्त्री. १ कमर, पाठ इ० त एकाएकीं निघालेली उसण; चमक. (क्रि० भरणें; निघणें). २ कोल्ह्याचें ओरडणें; कोल्हेकुई. ३ अफवा; उडत बातमी. (क्रि० उठणें; पडणें; निघणें;

पसरणें). ४ सूर्यकिरण; पहाटचें तांबडें; तांबूस प्रकाश; पहाट. (क्रि० फुटणें). 'सूर्याची हूक देखिली।' –कालिका ६.९. [हिं.]

हूक—पु. टांगण्याचा आंकडा. –विवि ८.३.४८. [इं.]

हुड—स्त्री. लीला –वि. १ तापट; अविचारी. २ अडदांड; घाडशी. ३ खोडकर; अचपळ. [हू!]

हुंतूं—न. वांकडेपणा. -शर.? [मी, तूं]

हुन—अ. १ पासून. 'तो पुण्याहून आला.' २ पेक्षां. 'रामा गोविंदाहून मोठा आहे.' ३ (क्रियाविशेषणें, शब्दयोगी अव्यय यांना जोडून) बाजूनें; दिशेनें. उदा० इकडून, तिकडून, जवळून, आंतून, बाहेरून, खालून.

हुप—न. वानराचा भुभुःकार, ओरड. –क्रिवि. वानराच्या ओरडण्याप्रमाणें. [ध्व.]

हुप—स्त्री. १ धैर्य. २ उत्सुकता.

हुल—पु. (जंबिया) सिर मारल्यानंतर; जोडीदाराच्या डाबीकड बेंबीपासुन बरगडीच्या शिंपीपर्यंत केलेला वार.

हुल—स्त्री. १ हुलकावणी पहा. (क्रि० दाखविणें). २ लोकांची आरडाओरड; दंगा. ३ सौंगट्याचे खेळांतील एक संज्ञा. ४ खूण; चिन्ह. ५ आवई; भयदायक बातमी; गप्प. ६ बतावणी. [हिं.] ०चाल–स्त्री. हूल अर्थ २ पहा. ०स्वार–पु. (शत्रु चालून येत आहे अशी हूल करतात यावरून) आघाडीचे स्वार.

हुळ—स्त्री. १ घाबरण्यासारखी घाई करणें. २ भयकारक, आरडाओरड, गडबड, दंगा (क्रि० करणें; लावणें; मांडणें). ३ गाढवावरून ताशे इ० वाजवीत काढलेली धिंड मिरवणूक. (क्रि० काढणें; मिरविणें; भोंवंडणें; वाजविणें; निघणें; वाजणें; जाणें; चालणें). हुळवाजणें पहा. [धिंडका]

हृत्—वि. घेऊन जाणारा; हरून नेणारा; समासांत उपयोग. उदा० 'दुःख-पाप-प्राण-हृत्.' [सं. हृ]

हृत्-द्—न. १ हृदय; मन; अंतःकरण. २ काळीज; छाती. [सं.] ०कंप–पु. छातीचें, काळजाचें धडधडणें. ०कमल-०पिंड–पु. हृदय. ०कोश–पु १ हृदयावरचें आवरण. २ हृदय व त्याचें आवरण, एकत्रपणें. ०ताप-संताप–पु हृदयाचें दुखणें; दुःख, त्रास, पश्चात्ताप इ० ची मनास लागलेली टोंचणी. हृदाकाश–पु. हृदय; अंतःकरण. 'हृदाकाशीं मीपण स्फुरे जिवाशीं।' हृदावर्त, हृदावळ-ळी-हरदावळ-ळी पहा. हृदिस्पृश–वि. हृदयांतलें; आवडतें; प्रिय. हृद्गत–न. १ मनांतील हेतु, अर्थ, अभिप्राय. –वि. १ मनांत, अंतःकरणांत असलेलें, ठसलेलें. २ आवडतें; प्रिय. ३ अंतःकरणावर खोदलें गेलेलें. हृद्य–वि. १ मना संबंधी. २ हृदयंगम; सुंदर. ३ मनापासूनचें; खरें; कळकळीचें. ४ प्रिय; आवडतें. हृद्रोग–पु. १ छातीचा रोग. २ (ल.) अत्यंत काळजी; दुःख; चिंता. हृद्वर्त–वि. छातींतील (दुःख, रोग, शूल) हृद्विकार–पु १ छातीचा बिघाड; छातीचा रोग. २ अंतःकरणाची कोणतीहि भावना, विकार, वासना. हृद्विकास–पु. अंतःकरण मोठें, उदार, कृपाशील, आनंदित असणें. हृद्विलास–पु. अंतःकरणाचा आनंद. हृत्संताप–पु. मनाचें अस्वास्थ्य; राग; खेद; औदासिन्य इ०. हृन्मंदिर–न. हृदयमंदिर.

हृत—वि. हरण केलेलें; नेलेलें. [सं.] ०सर्वस्व–वि. ज्याचें सर्वस्व हरण करून नेलें आहे असा.

हृद—पु. पाण्याचा डोह. (प्र.) ऱ्हद पहा. 'काळा घाटी सुये जे हृद गहाणा।' –गस्तो.

हृदय—न. १ हृत्-द् पहा. २ वक्षःस्थल; छाती. ३ (ल.) मनांतील हेतु; आशय. ४ उद्देश; खोंच; मर्म (भाषण, वाक्य इ०तील). [सं.] ०भरून येणें, दाटणें–गहिंवरणें. 'तों हृदय भरोनी येतें.' –संग्रामगीतें २४. ०फुटणें–अतिशय दुःख होणें. ०कमल–हृत्कमल पहा. ०देश–पु. वक्षःस्थल; छाती. 'सभय हृदयदेशा अंचलें नित्य झांकी।' –सारुह २.५२. ०मंदिर–न. हृदय; अंतःकरण; वक्षःस्थल. हृदयंगम–वि. चित्ताकर्षक; मोहक; हृद्य; आवडता; सुंदर; मनोहर. हृदयवान्-हृदयालु-हृदयी–वि. सकरुण; दयाशील; कोमल अंतःकरणाचा. ०विश्राम–पु. (मनाचें विश्रांति स्थान) परमेश्वर. ०शून्य–वि. १ निर्दय; निष्करुण; क्रूर. २ बुद्धि, मनाची शक्ति कमी असलेला. ३ उदासीन; नष्टचित्त; विमनस्क. ०स्थ–वि. अंतःर्यामी असणारा. हृदयाराम–वि. अंतःकरणास शांति, आराम देणारा; हृदयविश्राम; देवाचें अभिधान. 'निजजन हृदयारामा।' हृदयीं-आलिंगणें–हृदयाशीं धरणें; मिठी मारणें.

हृषित हृष्ट—वि. आनंदित झालेला; सुखी; हर्षित. [सं.] हृष्टपुष्ट–वि. सुखी; समाधानी; खाऊनपिऊन बरा. हृष्टहृदय–वि. आनंदित अंतःकरणाचा.

हे—उद्गा. सन्मानार्थी हांक मारण्याचें, संबोधनाचें अव्यय. अहो! अरे!. 'हे! राजा! तुझें कल्याण असो.' [ध्व. सं.]

हे—सना. १ हा चें अनेकवचन. २ (काव्य) ही (स्त्रीलिंगी). जसें ते=ती, जे=जी. [हा]

हेकणें—अक्रि. खोकणें (गुरांचें). [ध्व. सं. हेका]

हे(हें)का, हें(हें)हें(हें)का—पुस्त्री. आपलेंच म्हणणे धरून बसणें; हट्ट; आग्रह; छंद; नाद; दुराग्रह (क्रि० धरणें; घेणें; करणें; चालविणें). [हेंकार–हेंच असें करणें] (आपला) हेका करणें–आपलाच हट्ट चालविणें. हे(हें)कट(ड), हेंक(ग)टी, हेकडवाईक-हेकड(ल)खोर, हेकाड, हेकेखोर, हेंकेवाईक, हेकेबाज(करो)-हेंकाखोर(वाईक)–वि.

आपल्याच हेक्यानें चालणारा; हट्टी; दुराग्रही; एककल्ली; छांदिष्ट. 'इंग्रजांचे खरे दोष प्रगट केले असतां आमच्या रेवरेंड बंधूस व इतर हेकडखोर लोकांस न आवडोत.' –नि २०९. म्ह० हेकड कुणबी सातदां राबी. **हेकरी**–स्त्री. हेका; हट्ट. 'स्वधर्म भूमीपति हा न सोडी। तो आपली हेकरि हो न मोडी।' –सारुह ८.३५

हेकणा–ना—वि. (व.) काणा; एका डोळ्यानें आंधळा.

हेकस, हेकोडा, हेकडा—वि. (व. खा.) तिरपा; वांकडा; वांकडातिकडा.

हेक्का—स्त्री. उचकी. हिक्का पहा [सं. हिक्का]

हेंगड–डा, हेंगडतिफड, हेंगाड–डा—वि. १ ओबडधोबड; चमत्कारिक; वेडेविद्रें; कर्णकटु (भाषण, कामधंदा, बोली). २ राकट; कठोर; विद्रुप; विशोभित; रानटी; राक्षसी (रीत, वहिवाट, वर्तणूक, स्वरूप, अंग). ३ मूर्ख; रानवट; अडाणी (माणूस). ४ हट्टी; दुराग्रही. [का. हेंगसु=स्त्री] म्ह० हेंगाडा कुणबी दुणा राबे धन्याला खर्च फार लागे. **हेंगडतट्टू**–पु. हेंगाड–डा माणूस. **हेंगड(डु)मेंगड(डु), हेंगडा मेंगडा**–स्त्रीन. १ किरकोळ; क्षुल्लक माल, वस्तु. २ बडबड; गप्पा. –वि. १ हलका; क्षुद्र; घाणेरडा; मळकट; क्षुल्लक. (वस्तु, प्राणी, दागिना). २ अडाणी; रानटी; खेडवळ; राकट; ओबडधोबड. ३ विसंगत; असंबद्ध (भाषण). –क्रिवि. विसंगतपणें.

हेंग(गा)डमत—न. १ अडाणी मत; बुद्धि. २ हट्टीपणा, मंदपणा. ३ हेंगाड. **हेंगडाविणें**–उक्रि. १ बावळट, हेंगाडा, हट्टी इ० ठरविणें; नावें ठेवणें (भाषण, कृति, व्यवहार इ०स). २ अवहेलना, विटंबना, कुचेष्टा, कुचाळी करणें. **हेंगाड दासी**–स्त्री. हट्टी, हेकाड स्त्री. म्ह० हेंगाड दासी दादला (ल्या) नाशी.

हेंगडी प्रधान—पु. १ मल्हारी(खंडोबा)चा प्रधान. २ (ल) ढिला, अजागळ, रेंग्या माणूस.

हेंगल—स्त्री. अडचण, सबब, अडथळा, तकार उपस्थित करणें (क्रि० घालणें, घेणें, लावणें). **०खोर, हेंगली(ल्या)**–वि. हुज्जती; तकारी. [का. हेंगे=कसें?]

हेंगसा—वि. (कर.) बुळा; गांडया; नपुंसक. 'हेंगशा माणसाला तुमचें म्हणणें पटावें कसें?' [का. हेंगसु=स्त्री]

हेंगाडेंगी—स्त्री. तिटकाऱ्यानें झिडकारणें; तिरस्कार; झाडणी. (क्रि० करणें). –वि. (व.) निष्काळजी.

हेंगाळणें—उक्रि. धिक्कारणें; झिडकारणें; तिरस्कार करणें. **हेंगाळणी**–स्त्री. तिरस्कार; झाडणी.

हेंगे—क्रिवि. इकडे. हंगे पहा.

हेजीब—पु. १ जिल्हा अधिकाऱ्याचा मदतनीस; मदत कारकून. २ चाकर; नोकर. ३ वकील. ४ दूत. 'बोले नैषधेंद्र-

वाचा। नाम हेजीब इंद्राचा।' –नल. [अर. हाजिब्] **हेजिबत, हेजिबी**–स्त्री. १ वकिली; शिष्टाई. –मदरु १.२०. २ दूतांचें काम, धंदा, वृत्ति.

हेट—स्त्री. (नाविक) दक्षिणदिशा; ठम (हेटकरी). –वि. खालचा दक्षिणेकडील; तळकोंकणचा. –क्रिवि. १ खालीं; खालच्या प्रांतांत, प्रदेशीं, भागीं. २ किनाऱ्याच्या दक्षिणेस; दक्षिण दिशेकडे; विशेषतः कोंकणांतील सावित्री नदीच्या दक्षिणेकडे. 'यंदा हेटप्रांत चांगला पिकला.' [सं. अधस्थ; देप्रा. हेट्ठ; गु. हेठ] **०करी**–पु १ दक्षिणेकडील (हेटप्रांतांतील) रहिवासी. २ तिकडील बरकंदाज, शिपायी. **०चा वारा**–पु. दक्षिणेकडील वारा. **०वाहेरचा वारा**–पु नैर्ऋत्येकडील वारा. **हेटणें**–अक्रि. (कु.) तुफानी वारा सुटणें.

हेटकी—वि. (व) पायांत पाय घालून चालणारी (गाय, व्यक्ति). [सं. हेठ] **हेटुक लावणें**–क्रि. (माण.) वांकडें लावणें; तेढें बोलणें.

हेटा–टी—पुस्त्री. (व. ना.) १ हातगा. २ शेवगा (झाड).

हेटा, हेटाशेटा—वि. हलका; क्षुद्र; दुर्लौकिकाचा (माणूस, व्यवहार इ०).

हेटाळणी, हेटाळी, हेटाळकी, हेटाळा—स्त्रीपु. अवहेलना; टवाळी; तिरस्कारानें वागविणें. [सं. हेडन] **हेटाळणें**–उक्रि. अवहेलना करणें; धिक्कारणें; हाडसणें; निंदा करणें.

हेटी—स्त्री. गौळीवाडा; गायरान. 'ढोरें हेटीवर गेलीं।'

हेटी–डी—स्त्री. (व.) रानांतील वस्ती, तळ. 'लमाणांची हेटी रस्त्यांत लागते.' [का. हट्टी]

हेटीमेटी—स्त्री. १ हेटाळणी; पाणउतारा; अवहेलना; तिरस्कार. २ निष्काळजीपणा; बेफिकिरी; अगत्य नसणें (क्रि० करणें). –क्रिवि. निष्काळजीपणें; बेफिकीरपणानें. [हट+मठ] म्ह० दिवस गेला हेटाहेटी (हेटीमेटीनें किंवा हातींमेटीं, रेटारेटी) चांदण्याखालीं (दिवा लावून) कापूस वटी. **हेटीमेटी खालीं(वारी)नेणें-घालविणें**–हलगरजीपणानें दूर लोटणें, सारणें.

हेड—स्त्री. विक्रीसाठीं नेलेलें गुरांचें खिल्लार, दावण, कळप. –तुगा २०५०. [सं. हेडावुक?] **हेडया**–वि १ खिल्लारी, हेडीचा व्यापार करणारा. २ पुरा माहितगार; धूर्त; पुष्कळ ओळखी असणारा. **हेडचें**–अक्रि. (गो.) खिल्लार घेऊन फिरणें.

हेंड—न. १ झोंबटपणा; झोंबी. २ मैथुन. 'श्वानांचें हेंड तत्काळ सुटे। मनुष्यांचें आकल्प न सुटे।' –एभा १३.२११. **०गूळ, हेंडूक हेंडूकमेंडूक**–न. कुत्र्याचें गुप्त इंद्रिय; कुत्र्यांचें मैथुन. (क्रि० गुंतणें; लागणें).

हेंडगा—पु. १ डोईवरील भातण, नाचणकांड साठ्याण, सरमाड, काड, विपाड इ० चा भारा, बोजा. २ वरील प्रकारची पांजरणाच्या कोपऱ्यास लाविलेली पेंडी. (क्रि० बांधणें).

हेंडणें—क्रि. (नाविक) तुफान होणें. हेटणें पहा.

हेडंबा-बी—स्त्री १ भीमाची एक राक्षसजातीची स्त्री. २ (ल.) घिप्पाड व विद्रूप स्त्री. ३ ओंगळ, किळसवाणी स्त्री. [सं. हिडिंबा]

हेडमास्तर—पु शाळेवरचे मुख्य शिक्षक. [इं.]

हेडली—स्त्री. (कों) एक पिशाच; विधवा स्त्रीचें भूत.

हेंडवा—पु (व.) गोणी; पोतें.

हेड(डी)स, हेड(डी)स फेड(डी)स—स्त्री. धिक्कार; अपमान; हेटाळणी, विटंबना (क्रि०करणें; बोलणें; मांडणें; लावणें). –वि. हिडीस पहा. ओंगळ. –क्रिवि. झिडकारून; फेटाळून; हेटाळून (क्रि० करणें). [सं हिड्=तिरस्कार करणें] **हेडसावणें, हेडा(ड)वि(य)णें**–उक्रि. हेटाळणें पहा; हिडसणें पहा. 'काय लागे त्यासी बळ हेडावितां कोण काळ।' –तुगा १२५९.

हेडसरी—स्त्री. एक वृक्ष.

हेडा—पु. (नाविक) मासे मारण्याचें एक आयुध.

हेडा—पु. (कों.) खाजणांत उगवणारें व गुरांना मानवणारें गवत. [हेड?]

हेंडा—पु. (बे.) मोठें ढेकूळ. [का.]

हेंडाळणी, हेंडाळी, हेंडाळणें—शेंटाळणी इ० पहा.

हेंडाळू—पु. गोराड पहा.

हेडू—पु. हेद, हेदू पहा. (कों.) एक इमारती मऊ लाकडाचें झाड.

हेंडे होळकर—पुअव. १ होळीचे होळकर; होळीचे दिवशीं धुडघुस घालणारे, खेळणारे. २ (ल.) दंगेखोर; बंडखोर.

हेण्याचा—पु. (कों) एक समुद्रांतील मासा.

हेत—पु. हेतु पहा. 'आपल्या डोळ्यादेखत मुलाचें लग्न व्हावें एवढा मात्र हेत राहिला आहे.' 'जपतो पुरवावया तुझा हेत।' –मोकर्ण ५.८. **०प्रीत**–स्त्री. १ मनांतला उद्देश, इच्छा. २ कृपालोभ; प्रेम; मैत्री.

हेतु—पुं. १ इच्छा; वासना; वांच्छा. २ कारण; उद्देश; आधार; प्रसंगकारण; निमित्तकारण. ३ बेत; उद्देश. [सं. हेतु] **०गर्भ**–वि. हेतु गर्भित असतो असा; अंतर्भूत कारण, अर्थ असलेलें (भाषण, शब्द, कर्म इ०); सहेतुक. **०मंत**–वि. सकारण बोलणारा. **०मान्**–वि. हेतु, प्रेरणा असलेलें (कार्य). **हेतुकवि**. हेतु असलेला; कामनिक. **हेतुकपण**–न. अभिलाष; इच्छा. **हेत्व्**–स्त्री. (ना.) आठवण; स्मरण. **हेत्वाभास**–पु. १ भ्रामक हेतु; दाखविलेलें चुकीचें कारण, हेतु. २ (न्याय.) व्यभिचार, विरुद्धता, असिद्धि, बाध व सप्रतिपक्षता या पांच दोषांनीं युक्त असलेलें विधान.

हेती—स्त्री. तरवार; शस्त्र. [सं.]

हेद-दू-दू—पुस्त्री. कोंकणांतील एक मोठें, मोठ्या आणि चाटोळ्या पानांचें, इमारती लाकडाचें झाड. या लाकडावर लाखी रंग सुबक बसतो. **हेदी**–वि. हेदाच्या लांकडाचे.

हेद-त—पु. एक समुद्रमासा.

हेंदकाळणें, हेंदोलणें, हेंदोवणें—उक्रि. हलणें; डुचमळणें; हेलकावणें (भांडयांतील द्रव पदार्थ, समुद्रांत तारूं इ०). 'तारूं सागरिंचें अवचितें। हेंदोवलें आलें येथें।' –तुगा ४१०६. [सं. हिंदोलन]

हेंदर, हेंदररेंदड—स्त्रीन. घाण; केरकचरा; विष्टा; घाणीची रास; उकिरडा. **हेंदरा(डा), हेंद्रा**–वि. १ घाणेरडा; गचाळ; ओंगळ; अमंगळ. २ मूर्ख; अडाणी; वेडगळ. **हेंदोडा**–वि (व.) हेंदरा पहा.

हेदर—पु. (दगडी बांधकाम) बंद; भिंतींत अंतराअंतरावर बसविलेला लांब गळजोडीचा दगड. यानें बांधकाम आवळून एकजीव होतें. [इं. हेडर]

हेदाडा—पु. (ना.) दटावणी; रागें भरणें; दरडावणी; धसाडा.

हेदावणें—अक्रि. (व.) थकून जाणें; शिणणें. 'चालण्यानें जीव हेदावून गेला.'

हेपणें, हेप(पा)लणें—उक्रि. संभोगक्रिया करणें; झवणें. **हेपतबल्ला**–वि. १ (ना.) स्त्रीसंगासाठीं उत्सुक झालेला. २(ल.) तारतम्य नसणारा; अर्धवट. **हेपल्या मारणें**–हेपलणें. **हेपल्लाट्या**–वि. (व.) गचाळ. **हेपसलिंगा(लुंगा), हेपुसलुंगा**–वि. १ नपुंसक; गांडया. २ दुर्बळ; क्षुद्र. ३ गरीब; कमकुवत. [हेपलणें+लिंग]

हेपल(ळ)णें—सक्रि. (व. ना.) खाणें; पुरखा झोडणें; गट्ट करणें.

हेबडगुबड—न. कपट; काळेबेरें. 'मनांत कांहीं हेबडगुबड आलें.' –वि. (व.) वांकडातिकडा, ओबडधोबड.

हेंबाड भुतऱ्या—वि. (व.) मूर्ख; वेडगळ. [हेंगाड+भूत?]

हेबा(ब)ळ(ल)णी, हेंबाळणी—स्त्री. ओढाताण; चोळटाचोळट; धसकाफसक; धसमुसळेपणानें घेणें, वापरणें, हालविणें; हिसकाहिसकी. **हे(हें)बा(ब)ळणें, हेबाळणें, हेबलणें**–उक्रि. १ दाडगेपणानें हाताळणें; धसकफसक करणें; ओढाताण करणें. २ रटणें; धक्का मारणें, चेंगरणें. –अक्रि. उसळणें; उचंबळणें; हेलकापे खाणें (नदीचें पाणी, लाटांत सांपडलली नाव इ०).

हेबे तेबे, हेबेतेबे—पुअव. (व.) दगदग; फुकट खेप, येरझार याचा त्रास. –क्रिवि. नाहक; विनाकारण.

हेम—न. सोनें. [सं.] **०कट**–वि. सोनेरी. 'दंत शुभ्र सदट। रत्नजडित हेमकट।' –दा १.२.१५. **०कल्याण**–पु. (संगीत) एक राग. यांत षड्ज, तीव्र ऋषभ, तीव्र गांधार, कोमल मध्यम, पंचम, तीव्र धैवत, तीव्र निषाद हे स्वर लागतात. आरोहांत धैवत वर्ज्य; जाती षाडव–संपूर्ण; वादी षड्ज; संवादी पंचम; समय रात्रीचा पहिला प्रहर. **०कूट**–पु. हिमालयाचे उत्तरेचा, गंधर्ववस्तीचा एक पर्वत; सप्तपर्वतांतील एक. **०गर्भ**–पु. सोनें घालून केलेली एक औषधी मात्रा. **०द्रव्य**–पु. (महानु) सोनार. 'हेमद्रव्या हाटी। सुवर्णा आटाआटी।' **०धर**–पु. मेरू पर्वत. **हैम**–वि. सोन्याचें.

हेमटा—वि. हिमटा पहा.

हेमटी—स्त्री. दुशी; थडक; हुंडका पहा. (क्रि० मारणें;देणें).

हेमंत, हेमंत ऋतु—पु न. मार्गशीर्ष व पौष हे दोन महिने मिळून होणारा ऋतु; यावेळीं सुर्य वृश्चिक व धन या दोन राशींस असतो. [सं.]

हेमाडपंती—वि. हेमाडपंतानें प्रचारांत आणलेली (देवळांची बांधणी, लिपी इ०).

हेय—वि. त्याज्य; टाकून देण्यास योग्य. [सं.]

हेर—वि. येर; इतर; क्षुल्लक; कुचकामाचें; क्षुद्र. 'नृपा तुला उत्तम क्वारि जाली। दैवें निघाली परि हेरि जाली।' –सारुह ३.१०. [येर]

हेर—पु. १ गुप्त दूत. २ बातमीदार. –स्त्री. टेहळणी; गुप्त पहाणी. [सं. हेरक; देप्रा. हेर; हिं. हेर, हेरना] **हेरणी, हेराहेरी**–स्त्री. टेहळणी. **हेरणें**–उक्रि. १ टेहळणें; बारीक, गुप्तपणें चौकशी करणें; सूक्ष्म दृष्टीनें पहाणें; न्याहाळणें. २ स्पष्ट दिसणें; सांपडणें. ३ तर्क करणें; ध्यानांत येणें; समजणें. **हेऱ्या**–वि. गुप्त बातमी काढणारा; टेहेळ्या; न्याहाळणारा. **हेरफेर, हेरी(र)फेरी, हेरीहेरी**–स्त्री. हिंडता हिंडता टेहळणी, पहाणी करणें. 'रानांतून हेरफेर कर.' **हेरी, हेराफेरी**–स्त्री. प्रवास; फिरती; येरझार.

हेरफेर—पु. १ थोडासा बदल; फरक; फेरबदल (परस्पर दोन वस्तूंत). २ विसंगति; तफावत; अंतर (हिशेब, जमाखर्च इ० मध्यें). ३ बदली (पहारेकऱ्यांची); आवजाव (सैन्यांची); येरझार. [हेर=क्षुल्लक+फेर. किंवा फेर द्वि.] **हेरून फेरून**–क्रिवि. फेरफार करून; उलथेंपालथें करून; इकडेतिकडे; पुन्हा पुन्हां; वारंवार.

हेरंब—पु. गणेश देवता.

हेरवां-वीं—एरवां-वीं पहा.

हेरस्तूं, हेरस्तून—क्रिवि. (राजा. कु.) व्यर्थ; उगाच; निष्फळपणें.

हेरूच—वि. (कु.) इतर; दुसराच.

हेरें-ऱ्यें—न. (नाविक) गलबतांचें शीड बदलणें. (क्रि० घेणें). **०बोऱ्यें**–न. वाऱ्याच्याविरुद्ध दिशेनें गलबत हांकारणें. 'कोणीकडला तरी वाव असावा म्हणजे हेऱ्येबोऱ्ये करून गलबत नेतां येईल.'

हेल—पु.स्त्री. १ नवीन मूल जन्मेल त्या घरीं पाणी, दूध दहा दिवस पुरविणें (कुणबिणी किंवा इतर स्त्रिया थोरांच्या घरीं या प्रकारें करतात). (क्रि० घालणें). 'हेल घालिती अठरा पगड जातीच्या नारी।' –गापो ५.३५. २ असलें पाणी, दूध इ० पदार्थ. ३ याच कारणासाठीं अशा थोरा–मोठ्यांच्या घरापुढें कांहीं दिवस पाण्याचा सडा टाकणें.

हेल—पु. बोलणें, गाणें, रडणें इ० तील लांबट काढलेला सूर. (क्रि० काढणें; निघणें). –स्त्री. आटयापाटयांतील डावाचे शेवटाची एक संज्ञा. [ध्व.]

हेल—न. (चांदा) पाण्याचें मडकें.

हेल—पु.स्त्री. १ ओझें वाहण्याचा धंदा (क्रि० वाहाणें). २ असलें वाहावयाचें ओझें. गवत इ० ची ओझ्याची गाडी; ढीग. ३ तें वाहण्याची मजुरी; भाडें. **०करी**–पु. ओझें वाहणारा; मजूर; हमाल. **०करीण**–स्त्री. १ ओझें वाहणारी. २ (व.) मालकाच्या शेतांत काम करणाऱ्या नोकराची बायको. **०पाटी**–स्त्री. १ ओझें वाहाण्याचा लहान हारा. २ हेलकऱ्याचें काम; हातमजुरीचा धंदा; मोलमजुरी. [हेल+पाटी] **०पायकी**–स्त्री. (कु.) निष्कारण हेलपाटा, हेलपटनिशी पहा. [हेल+पायकी]

हेलकावा—पु. १ आंदोलन; झोंका; लाट; मागें पुढें होण्याची क्रिया (समुद्राच्या पाण्याची, झाडाची फांदी इ० ची). २ माणूस जहाज इ० चें हालणें; झुलणें; झोका खाणें (लाटा, वारा इ० नीं). (क्रि० बसणें; खाणें). ३ हिसका; धक्का; झोका (क्रि० देणें). ४ (ल.) (अजैदार इ० चा) फुकट हेलपाटा; वृथा येरझार. (क्रि० देणें). [सं. हेला=क्रीडा, खेळ] **हेलकावणें**–अक्रि. १ आंदोळणें; हेंदकाळणें; डोलणें (लाट इ० नें). २ लाटांच्या माऱ्यानें तारूं इ० नें खालींवर उशा खाणें; लाटा खाणें; झोंके खाणें. ३ इकडून तिकडे झुलणें (पाळणा इ० नें). ४ आचके बसणें; हिसका खाणें; मागेंपुढें होणें; हबका सोसणें (घोडेस्वार, उंटस्वार यांनीं–चालतांना). ५ (सामान्यतः) झोंके खाणें. **हेलकाविणें**–सक्रि. १ हलविणें; झोंके देणें; डोलविणें; हेलकावा देणें. २ ओढाताण करणें; पुढेंमागें करणें. ३ हेलपाटा, उगीच दवडणें. ४ धुडकाविणें; तिरस्कारानें हांकलून लाविणें; घालविणें.

हेलकी—स्त्री. भटकी; उनाड स्त्री; गप्पिष्ट बाई.

हेलगट—पु. (तिरस्कारार्थी) हल्या; रेडा; हेला. [सं. हेला]

हेलगड—स्त्री. 'हिलगड' पहा.

हेलगा—पु. रेडा; हेला.

हेलना—स्त्री. अवहेलना; अपमान; हेटाळणी; अनादर; तिरस्कार. [सं.]

हेलप(पा)टणें—उक्रि. १ व्यर्थ येरझार करावयास लावणें; निष्कारण खेप करविणें; क्षुल्लक निरोपासाठीं हेलपाटा घालावयास लाग(व)णें. २ बिघडविणें; फिसकटविणें; निरुपयोगी करणें (उपाय, मसलत, श्रम इ०). –अक्रि. १ (कों.) वाऱ्यानें उमळून पडणें; नाश पावणें (झाड, झोपडें). २ नासधूस होणें; चुराडा होणें. [सं. हेला=फेरा] **हेलप(पा)टणी**–स्त्री. निरोपाचा व्यर्थ हेलपाटा; फेरा. **हेलप(पा)टनिशी**–स्त्री. निष्कारण हेलपाटे खाण्याचा प्रकार; वरचेवर व्यर्थ खेपा करणें. [हेलपटा+फा. नविशी] **हेलप(पा)टा**–पु. १ फुकट खेप; येरझार; त्रासदायक फेरा, चाल. (क्रि० पडणें; बसणें; देणें; करणें). २ रस्त्याचें लांबचें वळण; गैर माहितीनें या वळणानें जाणें; त्यामुळें झालेले श्रम; फिरकांडा (क्रि० बसणें; खाणें; होणें).

हेलमी—पु. (नाविक) तुफान; तुफानी वारा व पाऊस.

हेल(ळ)सांड-सांडणी—स्त्री. १ अनादर; हेलना पहा. २ दुर्लक्ष; निष्काळजीपणा. [सं. हेला+सांडणें] **हेळसांडणें**–उक्रि. १ तिरस्कारणें; क्षुद्र लेखणें; अवहेलना करणें. २ हलगर्जीपणा करणें; कानाडोळा, दुर्लक्ष्य करणें.

हेला-ळा—पु क्षण. 'ऐसें येकि हेळा बोलिला।'–ज्ञा २.८३. –क्रिवि. क्षणांत; सत्वर; सहज; अनायासें. **०भर**–क्रिवि. (महानु.) थोडावेळ. 'मा हेलाभरा पानीया जाईन.' –ऋध १५. **०मात्रें**–क्रिवि. लीलेनें; सहजासहजीं. 'दर्शनहेळामात्रें तया होय मुक्ति।' –आरती विठ्ठलाची. [वेप्रा. हेला=वेग]

हेला—स्त्री १ खेळ; क्रीडा. २ धिक्कारणी; फेटाळणी; अनादर; अपमान; हेटाळणी.

हेला—पु. रेडा. [सं.] **म्ह०** १ हेल्याच्या कानीं किंगरी वाजविली तरी तो आपली द्रोंय सोडींत नाहीं=मूर्ख सदुपदेशानें सुधारत नाहीं. २ जन्मा आला हेला पाणी वाहतां मेला=खायला काळ भुईला भार असा वृथा माणूस.

हेलावणें, हेलावा, हेलाविणें—हेलकावणें इ० पहा. 'हेलावला नळ पयोधि दयारसाचा.' –नल ५५

हेलि(ळी, ळु)—पु. सूर्य. 'किं हेलि उगवतां निशेष। दोषा सरे प्रगटे प्रकाश।' [सं.]

हेलेसें—न. वल्हें (क्रि० मारणें). 'आम्ही त्या कोळयां बरोबर हेलेसीं मारूं लागलों.' –किर्लोस्कर–आगस्ट १९३७.

हेवड—पु. गुंताडा. 'ढिलेपणें हेवड आलें।' –दा १५.१.५. **०देवड**–स्त्री. १ इरजीक पहा. २ आदलाबदल.

हेवड—वि. (व.) हेकड.

हेवा, हेवादेवा—पु. १ मत्सर; द्वेष; शत्रुभाव. २ स्पर्धा. [का. हेव] **म्ह०** १ शेजी गेली देवा हा मला सुटला हेवा. २ हेवादेवा नकटी गेली चांगदेवा. **हेवाखोर, हेवेखोर**–वि. द्वेषी; मत्सरी.

हेवा—पु. १ लोभ; हव्यास. 'धनधान्य हेवा। नाड कुटुंबाची सेवा।' –तुगा ३२२. २ हाव; सोस. 'बायकोला दागिन्याचा हेवा असा कीं, आंग दुखलें तरी सोडीत नाहीं.' ३ इच्छा; मनीषा. 'तुजवांचुन आमुचा हेवा। कोण माधवा पुरवील।' [अर. हवा=इच्छा]

हेवाळ—पु. (गो. कु.) विरोळा; पाणसर्प.

हेषा—स्त्री. घोडयाचें खिंकाळणें. [सं.] **हेसणें**–अक्रि. खिंकाळणें.

हेस—स्त्री. (कों.) तुषार; वर उसळलेले पाण्याचे किंवा द्रव पदार्थाचे थेंब.

हेसळणें—अक्रि. हिंसळणें पहा.

हेसा—पु. काजळ–ळी.

हेळ—स्त्री. १ गुरांना पाणी पिण्याकरितां बांधलेला हौद. २ (माण.) पाण्यासाठीं खणलेला खोल झरा; ओढयांतील विहिर. –के १०.११.३६. हाळ पहा.

हेळण-णा-णी—स्त्री. हेलना पहा. 'कुरूप म्हणून केलें हेळण।' –नव १८.१२४. [सं. हेलना] **हेळणें**–सक्रि. तिरस्कारानें वागविणें; धिक्कारणें. **हेळसण, हेळा**–स्त्री. अवहेलना; हेलना. **हेळसणें**–सक्रि. हेळणें. 'हांसति बहु हेळसोनि हंसातें।' –मोकर्ण २८.४२. **हेळसांड**–स्त्री. हयगय; दुर्लक्ष; हेलसांड पहा.

हेळणें, हेळणेंमेळणें—अक्रि. मिळूनमिसळून वागणें; घरोबा ठेवणें. [मेळणें द्वि.] **हेळीमेळी**–स्त्री. घरोबा; स्नेहसंबंध. –क्रिवि. खेळीमेळीनें. [मेळ द्वि.] **हेळीमेळीचा, हेळीमेळीनें हेळीमेळीतला** असे रूढ प्रयोग.

हेळंबी—स्त्री. (नाविक) भयंकर वादळ. हेलमी पहा.

हेळा—स्त्री. दृष्टि. –मनको.

हेळा—पु. (कों.) बेहडयाचें झाड.

हेळू—पु. अळू पहा.

हैक, हैकहैक, हैकथैक—उद्गा. गुरांना हांकलण्याचा शब्द. –स्त्री. टोंचणी; टुमणी. [ध्व.]

हैकत—स्त्री. दुर्दशा; हयकत पहा.

हैकोल—पु स्त्रियांच्या गळ्यांतील एक अलंकार; हयकोल पहा.

हैगई, हैगय-यी, हयगई—स्त्री. हयगई-य पहा.

हैजा—पु. (ना.) पटकी; कालरा. [अर. हैसा]

हैता—वि. हयता पहा.

हैतुक—वि. हेतुक; हेतु, कारण यासंबंधी. [सं.]

हैद—पु. समुद्रांतील एक मासा.

हैद्र्या—वि. एक जातीचें भात.

हैद्रोस—पु. गोंधळ; हायदोसदुल्ला पहा.

हैप(ब)त—स्त्री. धाक; धास्ती; भीति; दरारा (क्रि० घेणें; खाणें; धरणें; बसणें). 'फौजेनें हैबत खाल्ली. आतां तह ठरवावा.' –हौके १२. [अर. हैबत] **०खाल्ला, खाल्लेला**–वि. भ्याड; घाबरट. **हैबती**–वि. भीतिग्रस्त. **हैबतीगैबती**–वि. अजागळ; गबाळ. [गैबती द्वि.]

हैम—वि. बर्फी, थंडी, हिवाळा इ०चें; हैमन. [सं. हिम] **हैमवती**–स्त्री. १ पार्वती. २ श्वेतवखंड.

हैयत-ती—हयात पहा.

हैर—पु. (कु.) सापासारखा पिवळा मासा, याला धरून त्याचे अंगावर चण्याचें पीठ चोपडून त्याच्या बोळाच्या गोळया करतात. या औषधी असतात.

हैरत—स्त्री. हैपत पहा. 'लढाईची जुरत न ठेवितां हैरत खाऊन फरारी जाले.' –चिरा १७. [अर. हैरत्]

हैराण—वि. १ त्रस्त; त्रासलेला; खंगलेला (आजार,शीण, दुःख इ० नें) व्याकुळ; आजारी; अस्वस्थ. २ हतबुद्ध; दंग; आश्चर्यचकित. –भाइ १८३४; –वाबृ २०८. [अर. हैरान्] **०गत**–स्त्री. १ आजार; दुःख. २ दुर्दशा; व्याकुळता; आपदा. ३ गोंधळ; घोंटाळा; मानसिक त्रासाची अवस्था. **हैराण(न)गी, हैराणी**–स्त्री. हैराणगत. 'तेणें करून आपली हैरानगी जाली.' –रा १५.२९०. [फा. हैरानी] **हैराण परेशान**–वि. त्रस्त व चिंताक्रांत. 'फिरंगाणच्या मनसुब्यामुळें हैराण परेशान जाहले.' –ब्रच ७६.

हैवा—पु. ब्राह्मणांतील एक पोटजात.

हैवान—पु. (ल.) पशु; जनावर. –वि. दुर्बळ; मूर्ख; पशुतुल्य. [अर. हैवान्]

हो—उद्गा. १ आदरपूर्वक हांक मारण्याचा शब्द; अहो! 'सुनिर्मळ तुझीं पदें कथितरी विलोकीन हो।' –केका १५. २ थांबण्यास सांगण्याचा शब्द. 'हो हो अमळ हो.' ३ मान्यता, कबुली, परवानगीदर्शक शब्द; होय. ४ (काम इ० करण्यास सांगतांना) हटकून करण्यासाठीं, जोर देण्यासाठीं, दिशा दाखण्यासाठीं किंवा लाडानें उच्चारावयाचा शब्द. 'काम सांगितलें आहे तें कर हो, विसरशील.' 'मुला! भुकेला आहेस, जेव हो.' [ध्व.] **होस हो मिळविणें-म्हणणें-लावूणें-जोडणें-करणें-देणें; हो म्हणणें-भरणें-करणें**–कोणी कांहीं म्हणेल त्यास संमति देणें. **०ना**–होय कीं नाहीं. (क्रि० म्हणणें; सांगणें;करणें). **०ना करणें**–कचरणें; अनमान,कांकूं करणें. **होका(क)रणें**–अक्रि. १ मोठ्यानें बोलावणें; हांक मारणें. २ संमति देणें; होकार देणें. 'म्हणतात होकरा यास।' –मोशांति ३.४३. ३ थांबविणें. 'वाजतिया वायूनें जरी होकरी।' –ज्ञा ९. १२५. **०कां**–उद्गा. बरें तर! होय कीं! 'हो कां म्हणितलें महानुभाव।' –दावि २३७; –ऋ ३८. **०कार**–पु. रुकार; संमति; अनुज्ञा; परवानगी. **०कारणी**–स्त्री. मोठ्यानें मारलेली हांक; हांकारणी. **०वा**–होयवा.

हो—उद्गा. होवो. 'सुतात्मज तेजोवध वर बहु तेणेंचि भद्र महिवर हो।' –मोभीष्म१.९८. [सं. भू=होणें] **होआवें**–व्हावें. 'आम्हां पती होआवा।' –दाव १४४; –ज्ञा १५.२५५. **होइजे**–व्हावें. 'जगीं होइजे धन्य या रामनामें।' –राम. **हो(ऊ)क**–न. १ होणारी गोष्ट होण्यमाण; भविष्य. २ भवितव्य. 'आईक जें होईक वर्तविलें.' **होऊन**–क्रिवि. १ होणें धातूचें ऊन प्रत्ययांत अव्यय. २ कोणाच्या प्रेरणेवांचून; आपलें आपण (करण्यास प्रवृत्त होणें). 'त्यानें होऊन बोलाविलें?' 'आपण होऊन.' ३ पासून. 'विजयनगराहोऊन.' –इमं ७. ४ स्वत:; खुद्द; जातीनिशीं. **होए**–होई. 'अंतरीं न वेधिजे पाषाणें। जरि होए तापा हानि।' –ऋ! **होऔनि**–क्रिवि. होऊन. 'पृथिवी साद्रव होऔनि गळतां।' –दाव १३०. **होणार**–पु. भविष्यकालचा. 'नाना होणार परीक्षा.' –दा ५.५.१८. **होणें**–अक्रि. १ घडणें; असणें; उत्पत्तीस पावणें; प्राप्त होणें; घडून येणें. 'तुझे बायकोस पुत्र झाला.' २ रूपांतरानें बदलून दुसरा एखादा गुण इ० येणें; बनणें. 'अंबा पक्व झाला.' ३ घडून येणें; अस्तित्वांत येणें. ४ संपणें; शेवट होणें; खलास होण. 'मजपासीं रुपये होते तितके झाले, आतां कोठून देऊं?' ५ पार सत्यानास पावणें; रसातळास जाणें. **होणें**–याचा एक उपयोग सतत क्रियावाचक हि आहे. उदा० 'देते व्हा, जेवते व्हा.' याचा काव्यांत भूतकालीन उपयोग होतो. उदा० 'बोलता झाला, सांगता झाला.' [सं. भू; भूत; प्रा. होत्था, होइ] **होऊन जाणें**–१ जवळ जवळ होणें. २ खलास होणें; थांबणें; चुकणें; बारगळणें. **होती नव्हती तितकी केली**–खूप खरडपट्टी काढली. **होतव्य**–न. १ भविष्य; भवितव्य; होईक पहा. २ (ल.) दैव; नशीब. **होता**–वि. (काव्य) १ होणारा. 'दे देवदूत दर्शन...विमूढ होत्यासि।' –मोआदि ३.३५. २ चालता; अनुकूळ (काल). उदा० 'आजपर्यंत आमचा होता काळ होता.' –भाब ७२.

होता की नव्हता करणें–समूळ नाहींसें करणें. 'सगळे मराठे एकचित्त होऊन झटून मदत करतील तर दक्षिणेंत मुसलमान होता कीं नव्हता असें करून टाकीन. –संभाजी. **होती कळा**–स्त्री. चढती कला. **होती वस्त–स्तू, होता माल**–पु. वाढत्या प्रमाणांत चांगुलपणा, लायकी, किंमत असणारी वस्तु. **होती वाट**–स्त्री. उघडलेली वाट, मार्ग; उघडा झालेला रस्ता; (विवाहित स्त्रीचें पोट (गर्भाशय) उघडण्याच्या वेळीं म्हणतात). **होती वेळ, काळ**–स्त्री. १ योग्य संधि; हंगाम. 'होती वेळ आली म्हणजे कार्य सहज घडतें.' २ होता काळ पहा. **होत्साता**–क्रिवि. होत असतां; एखाद्या स्थितींत असतां; (विवक्षित गुण; वगैरेनें विशिष्ट असतां. 'विक्रम राजा राज्य करीत होत्साता कोणीहि दरिद्री नव्हता.' **होनेणें**–होऊं न जाणें. –मनको. **होबको**–वि. व्हावयाचें. **होया**–वि. होणारा **होयाचें**–(काव्य) होण्याचें; व्हावयाचें. 'जीणें ... सृष्टि होयाची।' –मोअंनु १.३४. **होय–होय्यमाण**–न. होतव्य. **होय**–उद्गा. बरें; संमतिदर्शक अव्यय. **हो ना, होय नाही**–स्त्री. होय कीं नाहीं यांतील एखादें उत्तर; संदिग्धता; गोंधळ; हेलकावा; अनिश्चितता. (क्रि० म्हणणें; करणें; सांगणें). **होयीस होय म्हणणें–उठविणें–करणें**–अधीनपणें;परतंत्रपणें रुकार देणें. **होयकार**–पु. रुकार; संमति. **होय नव्हे**–स्त्री. १ निश्चितपणें बोलणें (होकारार्थी किंवा नकारार्थी दोहींतून कोणतेंहि एक). (क्रि० करणें; म्हणणें; सांगणें) २ विचारपूस; पाहिजे नको इ० चौकशी. **होय(या)बा**–पु. विचारलेल्या कोणत्याहि प्रश्नास होय म्हणणारा; दुसऱ्याच्या होस हो लावणारा; ज्याला स्वतःचें मत नाहीं असा. **होहो**–पु. गोंधळ; गडबड. 'एकदम होहो होऊन गेली.' –विक्षिप्त १.७१. [हो द्वि.] **होहो खरेंच**–उद्गा अकस्मात आठवण झाली असतां निघणारा उद्गार. 'हो हो खरेंच, आज मला तिकडे जावयाचें आहे, नव्हे.'

होक–न. (बे.) भातांतील तण; रान.

होकल–ली, होकाल–स्त्री. (कु.) १ नवरी. २ उपवर मुलगी.

होका, होकायंत्र–न. दिशा ओळखण्याचें लोहचुंबकाचें यंत्र.

होका–पु. १ हुक्का. २ तोफेचे गोळे; बाण; सुरुंग वगैरे, बाँब. 'अगणित होके उडती भराभरा।'–माधव–तारापुरचा संग्राम. [फा.]

होग(गा)ड(र)णें–उक्रि. (कों.) १ अधिकार इ० बरून हाकलून लावणें; घालवणें. २ संपत्ति, प्रतिष्ठा, आरोग्य इ० नासणें; अव्यवस्थितपणें आपले हातून जाईं असें करणें. ३ फेंकून देणें; भिरकावणें. ४ हारवणें.

होगा–वि. (कों.) १ आडदांड; दांडगा; अत्याचारी, लुटारु. २ आळशी; मंद; सुस्त. ३ आवरशक्ति नसलेला. हागे पहा.

होट, होंट–पु. ओठ; ओष्ठ. [सं. ओष्ठ; प्रा. होट्ठ; हिं. होठ] **म्ह०** १ होटांत एक पोटांत एक=आंत एक बाहेर एक. २ होटाबाहेर तें कोटाबाहेर=षट्कर्णी होणें. ३ होटास जाळ पोटाळ काळ-खादाड आणि तोंडाळ (नोकर, आश्रित इ० बद्दल म्हणतात). **होटांवर दूध विसणें**–अजून बाल्यदशा असणें. **होटाचें वाळणें, जिरणें**–बाल्यावस्था ओलांडणें. **होटतुटया**–वि. तुटलेल्या ओंठाचा. **होटाळ**–वि. जाड ओंठाचा; बाबर होटया. **होंटाळी**–स्त्री. खरारा करतांना चावूं नये म्हणून घोड्याच्या खालच्या ओंठास बांधलेली दोरी. 'आपल्यास काय परंतु होटाळीवांचून तट्टू न जाय.'

होटाकणें–अक्रि. (तंजा.) उभें राहणें; ओटाकणें. [उभे ठाकणें]

होंट्यो–न. (गो.) ओटीभरण. [ओट-टी]

होड–स्त्री. १ पैज; पण; शर्यत. (क्रि० बांधणें; लावणें; मारणें; करणें). २ करार; व्यवहार. [दे. प्रा. होड] **होडत**–स्त्री. होड. **होड विडा**–पु. पैजेचा विडा. 'होडविडा उचलुनी हस्तकीं। मस्तकीं धरिला।' –अमृ २१. **होडा**–पु. १ होड. २ अहंकार.

होंड–न. (का.) पाण्याचें टांकें.

होडकी, होडकें(गें)–स्त्री.न. लहान नाव; होडी; मचवा; तीन ते पांच शिडें असणारें गलबत; नौका. (गो.) होडकुली. [सं. होड्=जाणें] **होडी**–स्त्री. नाव; नौका. [सं. होड्=जाणें] **होडकार**–पु होडीवाला. **होडें ताणप**–(गो.) १ होडी चालविणें. २ निजणें.

होंडकी–वि. (व.) शिंग मोडलेली (गाय, म्हैस इ०).

होंडगणें–उक्रि. (राजा.) होडंगा फेकणें; मारणें. **होड(डं)गा–होडांगा, होडिंगा**–पु. सोटा; काठी. होलपटा पहा. **हाडगा नडग, होडिक नाडिक**–स्त्री. १ मारामारी; हाणाहाणी. २ तोंडातोंडी; भांडणतंटा. 'ऐसा होता होडिक नाडिक।' –कथा ६.१८.१०. [होडगा=काठी+नडग=अस्वल]

होंडा–पु. मोठेपणा; हुडा पहा.

होंडा–पु. खळगा. [सं. अधः; ओढं तुल० ओंड=खोल]

होंडा–पु. हुंडा पहा.

होंडी–स्त्री. जोंधळ्याची एक जात. हुंडी पहा.

होणजे–से–स्त्री. नणंद; वन्सें; व्हणजे–से पहा.

***होणसणें**–क्रि. टोंचणें; भोसकणें.

होतकरू—वि. पुढें उत्कर्ष पावेल असें ज्याबद्दल वाटतें असा; प्रगतिपर; आशादायक. [होणें+कर]

होतवस्तु—स्त्री. होती वस्त पहा.

होता, होतृ—पु १ यज्ञ करणारा; यज्ञांत आहुती देणारा. 'ऐसा मानुनी पळता झाला होतृसमूह.' २ एक ऋत्विज. [सं.]

होम—न. १ हवनीयद्रव्य; आहुती. २ होम; विधिपूर्वक आहुती देणें. [सं.]

होमार—न (नाविक) दोरी तापून बांधण्याची क्रिया.

होन—पु. सोन्याचें साधारण ३॥ रु. किंमतीचें एक नाणें. याचे कांहीं प्रकार-शिवराई, पादशाही, सणगीरी, अच्युतराई, रामराई, देवराई, जडमाळ, धारवाडी, कावेरी, पामनायकी, आदवानी, ताडपत्री, निशाणी, उकिरी, सापे, एकेरी इ० [का. होन=सोनें, सोन्याचें नाणें] **होना पायली होणें**-फार महाग होणें. **०माळ**-स्त्री. होनांची केलेली गळ्यांत घालण्याची माळ.

होपट—वि. पोल; पोकळ. -मुंव्या ?

होपळ, होपळसुती—वि. १ अव्यवस्थित; मंद; मूर्ख; भोंपळसुती पहा. २ पोकळ; निरर्थक.

होपारी—स्त्री. (व.) पाळी; वेळ.

होपा(प)ळी—न. (कु.) सकाळचें कोंवळें ऊन्ह.

होबळकांदा—पु. (कु.) एक विषारी कंद (औषधी उपयोगाचा).

होबाडकें—न. (व.) थोबाड; मुसकट.

होबास—पु. (ना.) लग्नापूर्वी नवरदेवास, नवरीच्या बापानें कपडे इ० देण्याचा विधि. [हो+भाषभास]

होबासा—पु. काम करून देण्याबद्दलचें आश्वासन; खात्री देणें. [हो+बा+असा]

होबाळ—स्त्री. (कु.) १ लहान तळें. २ पाणी साचणारी भातशेतीची जमीन; खाचर.

होभाग—स्त्री. (व.) ठराव; करार; संमति. [हो+भाक]

होम—पु. १ यज्ञ; विधीपूर्वक अग्नींत (तूप, तांदूळ इ० ची) आहुती देणें; हवन. (क्रि० देणें). २ आहुती. [सं.] **०कुंड**-न. यज्ञकुंड; होम करण्याची जागा. **होमकुंडीं घालणें-टाकणें-देणें-(किंवा) पडणें-सांपडणें**-आपत्तींत-पीडेंत लोटणें किंवा पडणें. **०द्रव्य**-न. होमास लागणारें द्रव्य; हवनद्रव्य. **०शाला-ळा**-स्त्री. अग्निशाला; यज्ञस्थान; यज्ञघर (अग्निहोत्री इ० चें). **०हवन**-न. होमासंबंधीं सर्व क्रिया व विधी सामान्यतः. 'होम हवनें होय कोशवृद्धि.' **होमणें**-सक्रि. होम करणें; जाळणें. **होमाग्नि**-पु. होमासाठीं तयार केलेला अग्नि. **होम्य**-वि. होमासंबंधीं.

होमिओपाथी—स्त्री. समचिकित्सा शास्त्र; एक रोगचिकित्सापद्धति. ज्या पदार्थांनें शरीरांत रोगलक्षणें उत्पन्न होतात तोच पदार्थ अति सूक्ष्म प्रमाणांत त्या रोगावर योजावयाची पद्धति. (इं.)

होर—स्त्री. १ पावसानें वाहून आलेली माती, केरकचरा इ० चा गाळ, खळमळ यानें शेतांतील खाचखळगे भरून शेतजमीन सारखी भरून येते तो प्रकार. २ वाहून, धुपून आलेली माती, गाळ इ०. **०णी**-१ वरील होरण्याची क्रिया. २ खड्डे; शेत इ० होरण्याकरिता तेथें घातलेली माती इ० ची भरती. ३ त्या भरतीच्या गाळसाळ इ० वस्तु; गाळ. **होरणें**-उक्रि. १ गाळसाळ इ० येऊन शेतजमीनींतील खाडींतील खाचखळगे भरणें-भर घालणें. ' पुळणवट जमिनीच्या विहिरी लवकर होरतात. ' ' येथील खळी होरा, म्हणजे जमीन बराबर होईल. ' २ आच्छादणें; व्यापणें (अलंकारादिकांनीं शरीर इ०). ' केसांनीं कपाळ अगदीं होरून गेलें. "[सं. आवरण ?]

होरट—स्त्री. उग्र वास; घाण; ओरट पहा.

होरट—स्त्री.पु. १ अतिशय हट्ट; हेकाडपणा. २ आरडाओरड; गोंगाट. **होरटी-ट्या**-वि. १ गोंधळ; गोंगाट करणारा. २ फार हट्टी; हटवादी; दुराग्रही.

होरप(पा, फ)ळणें—उक्रि. भाजणें; पोळणें; हुरपळणें; डागणें. [हुरपळ] **होरपा**-पु. (व.) कणसें भाजण्याची पहिली पाळी.

होरस—स्त्री. लग्नांत वधूपक्षानें वरपक्षास दिलेली मेजवानी. **होरसा जेवण**-न. (गो.) विहिणीकरितां केलेली विशेष जेवणावळ.

होरा—स्त्री. १ (ज्यो.) मेषादि राशीचें-लग्नाचें अर्ध. २ दिवसाचा २४ वा भाग; एक तास; अडीच घटका. ३ भविष्य; भावी घटना सांगणें. ' राजाला पुत्र झालेला आहे असा त्याचा होरा आहे. ' ४ मेषादि लग्न. ५ ज्योतिषाचा एक प्रकार. ६ मुहूर्त. ' भंगेल गुर्वंपूजक, साधुनि देईल गर्व होरा ज्या। ' -मोभीष्म १.७१. ७ अंदाज; अजमास; अटकळ. (क्रि० चालणें; आंत येणें; दिसणें; वहाणें). ' माझा होरा या गोष्टीविषयीं चालत नाहीं. ' [सं.] **०वृत्त**-न. तासांचें चक्र.

होरी—स्त्री. १ होळीच्या सणांत वसंतोत्सवासंबंधीं व इतर शृंगारविषयक हिंदुस्थानी गाणें. हें दीपचंदी किंवा धमार तालांत गातात. २ (सामा.) शृंगारिक गाणें. [सं. होलि हि.]

होरी—स्त्री. (जरतार धंदा) एक शेर वळलेलें रेशीम. [का. होरलु=वळणें. होरे]

होरेत—पु. (गो.) बिजवर नवरा.

होलकांडा—पु. झोकांडा; झोकांडी; झोक. (क्रि० जाणें; खाणें).

होलगट-ड—न. (तिरस्कारार्थी) हेला किंवा होलापक्षी.

होलगट(ड)णें—उक्रि. भिरकावून देणें; झोंकणें; रागानें झिडकारून देणें. –अक्रि. १ होलगाडणें; होलपणें; झोंक जाऊन पुढें पडणें. २ प्रेताच्या तिरडीपुढें जें मडकें असतें तें श्मशानांत नेऊन फोडल्यावर त्याच्या खापरांतील पाणी पिऊन होलापक्षी एखाद्याच्या पाठीवर बसला किंवा पाठीवरून गेला असतां त्या प्राण्याची कंबर किंवा पाठ मोडणें. **होलगडून पाडणें**–(गाय, बैल इ०). जोरानें ठेंचकळून पडणें; अडखळून कोलमडणें.

होलगडा—पु. काठी; लहान दांडकें

होलगा, होला—पु. १ एक पक्षी. २ रेडा; हेला. **होलगें**–पु. (तिरस्कारार्थी) होला पक्षी.

होलप(पा)टणें—न. १ होलगडा. २ –क्रि. (पत्ते) अखेरचे दोहोपेक्षां अधिक हात सर्व एकदम घेणें. (क्रि० मागणें; घेणें; पाडणें). –उक्रि. १होलपटा (दाडकें) फेकणें; फेकून मारणें (फळें इ० झाडावरून पाडणें इ० साठीं). २ हेलपटणें पहा. **होलप(पा)टा**–पु. १ होलगडा. २ आंचका; हिसका; हिसका देऊन फेकणें. (क्रि० मारणें; देणें). [होला]

होलगा—पु. कुळीथ; हुलगा धान्य.

होला—पु. होलगा पक्षी. [गु. होलो] **०कोला**–पु. क्षुद्र; भित्रा, नेभळट, नालायक माणूस. [होल+कोल्हा]

होलार—पु. महार, मांग इ० जातीचे वाजंत्री व त्यांतील व्यक्ति. होलार डफडें वाजवून गातो.'

होलाळा—पु लाट; वेग. –शर.

होलिका—स्त्री. १ होळीची अधिष्ठात्री देवता; राक्षसी. २ होळीचा सण; होळीची गवऱ्या इ० ची रास, ढीग; होळी; हुताशनी. [सं.] **०पूजन**–न. वरील वतेची देपूजा. **होलिकोत्सव-त्साव-त्साह**–पु. होळीचा सण; शिमगा.

होवी—स्त्री. (गो.) १ ओंवी. २ स्तुति. (क्रि० गाणें).

होवर—पु. ओहर; वव्हर; वधुवरांचें जोडपें. [वधूवर-वहूवर]

होवरी—स्त्री. (कु.) १ सोपा; ओवरी. २ खोली. [ओवरी]

होवळणी—स्त्री. १ होवळ्याचा धंदा. २ उपव्याप; नसता कारभार. **होवळा**–वि. पुढारी; सर्व बाबतींत पुढाकार घेणारा; तंटेभांडणें तोडणारा; लग्नें वगैरे जमवून देणारा इ०. २ (क.) कारभार करणारा; उपव्यापी. ३ (चुकीनें) हवळा. **म्ह०** रिकामटवळा आणि गांवचा होवळा.

होवळीक—न. (गो.) लग्नमुंजीचें आमंत्रण. **होवळी**–स्त्री. (गो.) करवली.

होश(ष)-शा—पु. १ उत्साह; कळकळ; उत्सुकता; जोम. (कृत्य, धंदा, धाडस इ० संबंधीं). 'त्यांचें राजकारण विध्वंस जाहलें; त्यांचा होश गेला।' –रा १०.५९. २ शुद्धि; भान; अवसान; त्राण. 'पेंढारी आल्याचें ऐकतांच त्याचा होष गेला; कांहीं सुचेनासें झालें.' [फा. हुश्]

होसरणें—क्रि. होणें; येणें; वोसरणें. 'कडकडाट भूपर्वतां। महाकंप होसरला।' –मुआदि ४१.१२१. [ओसरणें]

होळणी—स्त्री. धुपणीचा रोग. [होळणें] **होळणें**–न. धुण्याचा जिन्नस. –सक्रि. पाझरणें; गळणें; स्रवणें; धुपणें; ओहोळणें. –उक्रि. १ धुणें; धोळणें. उदा० अंग होळणें (धुणें). २ सांडणें. –बाळमित्र. [का. होळु, होळे]

होळदो—स्त्री. (गो.) होळी. (तिरस्कारार्थी).

होळप—अक्रि. (गो.) अपुऱ्या महिन्यांची बाळंत होणें; धुपावणें.

होळप(फ)णें—उक्रि. हुरपळणें पहा.

होळंबणी—स्त्री. (बायकी) काळजी; चिंता; खेद; मनस्ताप. (क्रि० घालणें; करणें). (अनेकवचनी प्रयोग).

होळंबंदी—स्त्री. (बडोदें) नांगराचर बसविलेली शेतसाऱ्याची पद्धत. –बडोद्याचे राज्यकर्ते ३५७. [सं. हल्य, हल]

होळा—पु. हवळा पहा.

होळा—पु. मोठी होळी. [होळी]

होळाव—पु. पालन.

होळी—स्त्री. १ होलिका पहा. २ (कों.) होळींत, मध्यें पुरावयाचें एरंडाचें, पोफळीचें किंवा केळीचें झाड [सं. होलिका] **०करणें**–१ होळी पेटविणें. २ (ल.) जाळपोळ करणें; सर्वनाश करणें. **अंगाची होळी होणें**–राग, ताप इ०नीं अंगाची आग होणें. **०शिंपणें**–न. होळीच्या दिवसांत पडणारा लहानसा पाऊस **होळीची कर**–स्त्री. होळी जळल्यानंतरचा दुसरा दिवस. **होळीची पोळी**–स्त्री. १ होळीवर पोळी पहिल्यानें बांधण्याचा, ठेवण्याचा हक्क; हा बहुधां मुखत्यार पाटलाचा असतो. २ अशा तऱ्हेची पोळी. **होळीचे होळकर**–पु.अव. १ होळीच्या पुढें खेळ, गडबड, मजा करणारी मंडळी. २ अजागळ व अव्यवस्थित लोक. ३ (ल.) सटरफटर छंदी लोक; नुसते तमाशा बघण्यासाठीं, खेळण्यासाठीं जमलेले लोक.

होळी—स्त्री. (क.) गंज; रास. 'गवताच्या दोन होळ्या.'

हौउया—पु. फजिती; बेअब्रू; अपमान. (क्रि० उडणें; उडविणें; पाडणें). [अर. हब्बू]

हौद—पु. पाणी सांठविण्यासाठीं दगडचुन्याचें बांधीव किंवा धातूचें पात्र. २ जमिनींत केलेला खड्डा; गुप्त जागा; टांकें. [अर. हौझ्]

हौदा—पु. १ हत्तीवर बसण्याकरितां असलेली उघडी कठडेदार अंबारी. २ कुस्तीसाठीं केलेला चौकोनी हौदाप्रमाणें खळगा; आखाडा. [अर. हौद्ज्]

हौर—पु. १ (राजा.) नदीला एकाएकीं आलेला पूर. २ ऊर्मि; सुरसुरी (बोलणें, खेळणें इ०तील). और पहा.

हौरा—पु. (नासिक) लुगड्याचें (दोन्ही कांठ सोडून) मधलें पोत.

हौरा-री—पुस्त्री. पांढरे तीळ. हवरा-री पहा.

हौलदि(दी)ल—वि. भयभीत; गोंधळलेला; किंकर्तव्यमूढ; हवालदिल पहा. [फा. हवालदिल] **हौलदिली**-स्त्री. भीति; धास्ती; भयचकीत होणें.

हौलिका, हौलिकापूजन, हौलिकोत्सव—होलिका इ० पहा.

हौस—स्त्री. उत्कट इच्छा; महत्त्वाकांक्षा; उत्सुकता; गोडी; आवड; उत्साह; नाद; उमेद. [फा. होस्; अर. हवस्] **हौशा-शी-स्त्री**-वि. १ हौस बाळगणारा; उत्साही. २ खयालीखुशाली, गाणेंबजावणें इ० नीं आपल्या मनाची हौस पुरविण्याचा स्वभाव असलेला; रसिक. **हौशे(स)णें**-अक्रि. हौस असणें, बाळगणें; चटक लागणें; आवड असणें. **हौसदार**-वि. १ शोकीन; लहरी; चैनी; विषयासक्त. २ महत्त्वाकांक्षी; तीव्र इच्छेचा; हौशा. **हौसला**-पु. १ इच्छा; हेतु. 'त्यांचा मानस-हौसला उत्तम आहे.' -रा १०.५९. २ कर्तृत्वशक्ति; उत्साह. 'काम मोठें, हौसला थोडा.' -रा ५.११. [अर. हौसला] **हौसेहौसें**-क्रिवि. तीव्र इच्छेनें; उत्सुकतेनें.

हौसा—पु. (कों.) भाद्रपदांत अनुराधा नक्षत्र ज्या दिवशीं असेल त्या दिवसापासून तीन दिवस करावयाचा कुणब्यांतील गौरीप्रमाणें एक उत्सव.

हौळ—स्त्री. (व. ना.) अव्यवस्थित जमाव, टोळी; घोळका; झुंड. 'पोर हौळ जमली बाहेर.'

हौळा—पु. हुळा पहा; भाजलेला ओला हरभरा. [सं. होला]

हौंगशा—वि. (बे.) हिजडा; नपुंसक. [का. हेंगसु=बाई, स्त्री]

हौंज—पु. (बे.) ढेंकूळ.

हौंबाडणें, हौंबाडी होणें—अक्रि. (बे.) कलंडणें; उलथणें (गाडी इ०).

ह्यस्तन, ह्यस्य—वि. कालचा; कालच्या दिवसासंबंधीं. [सं.]

ह्याचा—हा या दर्शकसर्वनामाचें षष्ठी विभक्तीचें पुल्लिंगी रूप. (कु.) ह्योचो. [हा] **ह्यो**-द.सना. (अशिष्ट) हा. 'ह्यो कागुद...हातांमदीं...नेऊनश्यानी टाक.' -बाबं २.२.

ह्याऱ्यांत येणें—ताऱ्यांत (विशेषतः स्त्रिया) येणें.

ह्यासणें—अक्रि. मश्यास येणें. -मनको.

शब्दो. ७. ४६

ळ

ळ—मराठी व्यंजनमालेंतील चौतिसावें अक्षर. हें कोणत्याहि शब्दाच्या आरंभीं येत नाहीं. **अक्षरविकास:**—पहिली व दुसरी अवस्था इ. स. २ ऱ्या शतकांतील नाशिकच्या शिलालेखांत व तिसरी इ. स. १२१३ तील चेब्रोलूच्या शिलालेखांत.

क्ष

क्ष—मराठी व्यंजनमालेंतील पस्तीसावें अक्षर. हें क् आणि ष् या दोन व्यंजनांच्या संयोगानें झालेलें आहे. **अक्षरविकास**—याच्या पांच अवस्था आढळून येतात. पहिली इ. स. २ ऱ्या शतकांतील उषवदातच्या नाशिक शिलालेखांत, दुसरी त्याच वेळच्या रुद्रदामन्च्या गिरनार लेखांत, तिसरी इ. स. ४ थ्या शतकांतील अलाहाबादच्या समुद्रगुप्ताच्या शिलालेखांत, चौथी इ. स. ६ व्या शतकांतील एका ताम्रपत्रांत व पांचवी इ. स. १३ व्या शतकांतील चिरवा लेखांत आढळते.

क्षण—पु. १ एका मुहूर्ताचा बारावा भाग. ४ मिनिटें; ३० कला. २ सूक्ष्म काळ; किंचित, थोडा वेळ; पळ; निमिष. ३ श्राद्धाच्या आमंत्रणाकरितां ब्राह्मणाच्या हातावर द्यावयाचे दर्भ. (यावरून) ४ ब्राह्मणास श्राद्धाचें आमंत्रण. (क्रि० देणें; घेणें). ५ श्राद्धभोजन. 'ब्राह्मण क्षणास बसला-आला-गेला.' [सं.] **क्षणणें-क्षण देणें**—सक्रि. श्राद्धाकरितां हातांत दर्भ देऊन ब्राह्मणास आमंत्रण करणें **०प्रभा**-स्त्री. वीज; विद्युल्लता. 'मेघी स्थिरावली क्षणप्रभा।' **०बुद्धि**-वि. चंचल, अस्थिर, अनिश्चित, मनाचा, बुद्धीचा. **०भंगुर**-वि. एका क्षणांत नाश पावणारा, मोडणारा; नाशवंत; अशाश्वत; क्षणिक. 'अनुभविलेलें क्षणभंगुर सर्वहि जें सुज्ञजन पहातात।' -मोभीष्म १.१४. **०भर-भरि-री**-क्रिवि. (काव्य) थोडा वेळ; एक क्षण कालापुरतें; पळभर; तिळभर. 'दोघांस न विसंबे क्षणभरी।' **०विध्वंसी**-वि. (एका क्षणांत विध्वंस होईल असा) क्षणभंगुर; नश्वर. **क्षणाक्षणां-क्षणीं, क्षणोक्षणीं**-क्रिवि. प्रत्येक क्षणास-क्षणीं; पावलोपावलीं. 'परापेक्षा होऊं नये क्षणाक्षणा।' -दा १४.१.२३. **क्षणावधि**-पु. थोडा वेळ; एक क्षण; पळ. -क्रिवि. एका क्षणांत; क्षणभर. **क्षणिक**-वि. एक क्षण टिकणारें; अल्प काळ राहणारें; नाशवंत; नश्वर; चंचल. 'अपेक्षिजे राज्यसुख। जया लागीं तें तंव क्षणिक।' -ज्ञा १.२६३. **क्षणिक बुद्धि**-वि क्षणबुद्धि; चंचल वृत्तीचा-मनाचा. **क्षणिक बुद्धि-मति-कल्पना-विचार-निश्चय**-स्त्री.पु. थोडा वेळ टिकणारी बुद्धि, मति, इ०; चंचलपणा; अस्थिरपणा. **क्षणे(णै)क**-क्रिवि. (काव्य)

एक क्षण; थोडा वेळ. 'क्षणेक तेणें मग ती रुसावी।' –सारुह २.३०.

क्षणन—न. १ मारणें. २ जखमी करणें. [सं.]

क्षत—न. जखम; व्रण; इजा. –वि. व्रण, जखम झालेला; जखमी (शत्रु इ० नीं). [सं. क्षण्–मारणें] **०ज**–न. रक्त (क्षतांतून वाहणारें). **०दृष्टि**–स्त्री. वैरभाव; प्रतिकूल नजर; मारक दृष्टि. –वि. अशा तऱ्हेचा भाव ठेवणारा; वैरी. **०वृत्ति**–वि. चरितार्थाचें साधन नसलेला; बेकार. **०व्रत**–वि. व्रतभंग करणारा; शपथ मोडणारा; भ्रष्ट.

क्षंता—वि. क्षमाशील; सहनशील; सोशिक. [सं.] **क्षंतव्य**–वि. क्षमा करण्याजोगा; क्षम्य.

क्षति–ती—स्त्री. १ तोटा; नुकसान; नाश. २ इजा; जखम; दुखापत. ३ (व्यापकार्थी) नागवणूक; ऱ्हास; बिघाड. ४ (ल.) चिंता; फिकीर (काळजी तोटा, इजा याविषयीं विशेषतः नकारार्थी प्रयोग). पर्वा; दरकार; किंमत याअर्थी. (क्रि० धरणें; बाळगणें). 'त्याची काय मला क्षती?' [सं.]

क्षत्र—पु. १ चार वर्णांतील दुसऱ्या म्हणजे क्षत्रिय वर्णाचा पुरुष. २ योद्धा; वीरपुरुष. –न. क्षत्रिय जात. 'कर्म गा नैसर्गिक। क्षत्र जातीसी।' –ज्ञा १८.८७८. [सं.] **क्षत्रिय**–पु. १ क्षत्र अर्थ १ पहा. 'ब्राह्मण साहाय्यकर क्षत्रिय जो तोचि संत तोचि तरे।' –मोआदि ३१.५६. २ दुय्यम प्रत, थोडीसी हलकी प्रत दाखविण्यासाठीं कांहीं शब्दांच्या पूर्वी योजावयाचा शब्द. उदा० क्षत्रिय हिरा=जरा कमी तेजाचा; पहिल्या प्रतीचा नव्हे असा हिरा. [सं.] **क्षत्री**–पु. (क्षत्रिय शब्दाचा अपभ्रंश) क्षत्रिय; क्षत्री. 'तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया।' –ज्ञा ९.४६०. **क्षत्रियांतक**–पु. परशुराम. [क्षत्रिय+अंतक]

क्षपणक—पु. १ जैन किंवा बौद्धधर्मीय साधु. 'नग्नक्षणपक।' –मोआदि २.१००. २ जैन किंवा बौद्ध मतानुयायी. [सं.] **०वाद**–पु. बौद्ध धर्म; नास्तिक मत; एक पाखंड.

क्षपा—स्त्री. रात्र. [सं.] **०चर**–पु. राक्षस.

क्षम—वि. १ सोशिक; सहनशील; क्षमाशील. (समासांत) आघात–क्षम इ०. २ शक्त; समर्थ; लायक; योग्य. सामाशब्द–निर्वाह–विचार–व्यवहार–क्षम. 'भावि तमःप्रशमीं न क्षमही होऊनि तेज हेंहि सके।' –मोसभा ५.१९. ३ शक्य असलेला; व्यवहार्य; आचरणीय. [सं.] **क्षमण**–न. क्षमा. 'क्षमण करिं कृपेनें सर्व तूं न्यायसारा।' –वामन विराट ८.६०. **क्षमणें**–क्रि. १ समर्थ होणें. 'श्रमला पळावयासहि नच तो भगदत्त सिंधुर क्षमला।' –मोभीष्म ५.५४. २ क्षमा करणें. **क्षमत्व**–न. १ सोशीकपणा; सहनशीलपता; क्षमा करण्याचा धर्म. 'तुझेनि क्षमत्व आलें। पृथ्वीवेसी।' –ज्ञा १४.७. २ सामर्थ्य.

क्षमा—स्त्री. १ अपराध सहन करण्याची क्रिया, धर्म; सहनशीलता; माफी. (क्रि० करणें). २ सोशीकपणा; शांति; स्थिरता; सहिष्णुता. 'असंमोहसहन सिद्धी। क्षमा सत्य।' –ज्ञा १०.८३. ३ पृथ्वी; धरा. 'आणि देवाचेनि क्षमत्वें क्षमा। आधारु जाली आहे या भूतग्रामा।' –ज्ञा ११.५५९. [सं.] **०पाळ**–पु. राजा; भूपति. 'त्वां यद्धर्म समेंतचि कथिले कीं प्रायशः क्षमापाळ।' मोसभा १.४१. **०वन्त–वान, क्षमिता, क्षमी**–वि. १ क्षमाशील; दया करणारा; सहनशील. 'किंबहुना धैर्यक्षमी। कल्पांतीही।' –ज्ञा १३.४९८. २ समर्थ. 'आचरणें नोहे क्षमी। न निघे मनोधर्मी।' –ज्ञा १८.६५८. **क्षमापन**–न. शांतवन (राग, दुःख इ०चें); समाधान; सांत्वन.

क्षय—पु. १ झीज; ऱ्हास; अवनति; नाश. **म्ह० सुखानें पुण्याचा क्षय दुःखानें पापाचा क्षय.** २ नायनाट; लय; नाश; तोटा; अस्तित्व नाहींसें होणें; लोप. 'पाप–पुण्य–कुल–धर्म–राज्य–क्षय.' ३ एक रोग; शारीरिक ऱ्हास; राजयक्ष्मा. ४ सूर्य, चंद्र यांच्या बिंबाचा ऱ्हास; तिथिक्षय. ५ पृथ्वीप्रलय; लय. ६ (बीजगणित) ऋणसंख्या–याच्या उलट वृद्धि–धन–संख्या. ७ साठ संवत्सरांपैकीं शेवटचें संवत्सर. ८ सूर्योदयानंतर प्रवृत्त जे तिथि, नक्षत्र, योग इ० दुसऱ्या सूर्योदयापूर्वी संपणें. 'तिथिक्षय.' [सं.] **०कार**–पु. कफक्षय; क्षयरोगांतील खोकला. **०गामी**–वि. ऱ्हास पावणारा; उत्तरोत्तर खालावलेला; मृत्युपंथास लागलेला. याच्या उलट वृद्धिगामी. **०तिथि**–स्त्री. १ आज सूर्योदयानंतर सुरू झालेली व उद्यां सूर्योदयापूर्वी संपणारी चांद्रमानांतील तिथि; सूर्योदयीं नसणारी तिथि. २ मृत माणसाची महिन्याची किंवा वर्षाची मृत्युतिथि, दिवस (चांद्रमानाची). **०दिवस**–पु. क्षयतिथि. **०पक्ष**–पु. दर महिन्यांतील दुसरा पंधरवडा; वद्यपक्ष; कृष्णपक्ष. **०मास**–पु. ज्या महिन्यांत दोन संक्रांती येतात तो अमावास्यांत मास. हा क्वचित येतो. क्षयमास कार्तिक, मार्गशीर्ष, पौष या तीन महिन्यांत येतो. इतर महिन्यांत येत नाहीं. –ज्योतिषसार ७. **०रोग**–पु. राजयक्ष्मा; रोगराज यानें शरीरांतील सर्व धातू उत्तरोत्तर क्षीण होऊन मृत्यु येतो; हा असाध्य मानतात. **०रोगी**–वि. वरील रोग झालेला. **०वृद्धि**–स्त्री. १ ऱ्हास–उत्कर्ष; उतरती–वाढती कळा; कमतरता–वढती; कमी होणें–वाढणें. २ (बीजगणित) ऋण–वृद्धिसंख्या; उणें–अधिक संख्या. **०सूतक**–न. (काव्य) मृताशौच; अशौच. **क्षयाह**–पु. क्षयतिथि अर्थ २ पहा. **क्षयिष्णु**–वि. नश्वर; अशाश्वत; नाश पावणारें; ऱ्हास पावण्याजोगें. **क्षयी**–वि. १ क्षयिष्णु. २ क्षयरोगी.

क्षर—पु. १ सृष्टींतील सर्व नाशवंत पदार्थ. –गीर १४१. २ सर्व भूतें. 'तेथ क्षराक्षर अरणी दोन्ही । गुरूमंत्रें दृढ मंथुनी ।' –एभा १९.७४. [सं.] –वि. १ गळणारें; ठिबकणारें; झिरपणारें. २ झिजणारें; ऱ्हास पावणारें. ३ नाशवंत; अशाश्वत. **क्षरण**–न. १ गळती; झिरपा; ठिबकणी. 'अधोद्वारीं दोही । क्षरणें तेंचि ।' –माज्ञा १८.३३५. (पाठ). २ हळूहळू नाश; ऱ्हास. **क्षरणें**–अक्रि. पाझरणें; ठिबकणें; गळणें; झिरपणें; हळू हळू नाहींसें होणें. **क्षराक्षरविचार**–पु. (तत्त्वज्ञान) शरीर व मन यांचा क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार झाल्यावर मग त्यांतून जें तत्त्व निष्पन्न होतें तें आणि आपल्या भोंवतीं जी दृश्य सृष्टि–ब्रह्मांड आहे तिच्या निरीक्षणानें जें तत्त्व निष्पन्न होतें तें, मिळून दोन्ही एकच कां भिन्न आहेत यांचें परीक्षण करणें. –गीर १४१. **क्षरित**–वि. १ गळलेलें; ठिबकलेलें. २ गाळलेलें. **क्षारित**–वि. पाझरविलेलें; ठिबकविलेलें.

क्षांत—वि. १ सहन केलेलें; क्षमा केलेलें. २ सोशिक; धीराचा; सहनशील; क्षमाशील. [सं. क्षम्=सोसणें] **क्षांति**–स्त्री. १ क्षमा; माफी. २ सहनशीलता; धीर; सोशिकपणा. ३ शांति. 'उभय सहिष्णुता ते क्षांती । क्षांतीसी क्षिती गुरू केली ।' –एभा ७.३६२.

क्षाती—स्त्री. कीर्ति; नांव; ख्याति. 'पुत्रीनें केली क्षाती ।' –वसा ७३. [ख्याति]

क्षात्र—वि. क्षत्रियासंबंधीं. [सं.] **०धर्म-व्रत-वृत्ति**–पु न स्त्री. १ क्षत्रियाचा उद्योग, कर्म इ०. २ शौर्य, धैर्य इ० गुण. 'क्षात्रवृत्ति भुंजतां । पाप नाहीं ।' –ज्ञा २.२२५.

क्षानत—न. (राजा.) अनिष्टसूचक कृत्य इ० (दिवा खालीं पडणें वगैरे).

क्षार—पु. १ सह्या रसांतील एक. (सामा.) मीठ (खनिज किंवा कृत्रिम). २ खारटपणा. ३ केळीचें सोपट, आघाडा, हळदीचें पान इ० ची राख; अल्क (इं.) अल्कली. ४ पोटॅश, सोडा इ० क्षार पदार्थ. ५ पावेलोण; बीडलवण. ६ अम्ल व अल्कली यांचे रासायनिक संयोगापासून बनलेला पदार्थ. ७ क्षारांचें तीव्र मूलतत्त्व. (इं.) कॉस्टिक अल्कली. –वि. खारट. [सं.] **०ता**–स्त्री. खारटपणा. –ज्ञा १३.९१९. **०पंचक**–न. पळसाचा क्षार, तिळाच्या काड्यांचा क्षार, मोरव्याचा क्षार, सज्जीखार व जवखार यांचें सममाग मिश्रण. **०मेह**–पु. क्षारयुक्त लघवी किंवा तिचा विकार. प्रमेह पहा. **क्षाराब्धि**–पु. क्षारसमुद्र. [क्षार+अब्धि] **क्षारोत्पादक**–वि. क्षार उत्पन्न करणारें (क्लोरीन, आयोडीन इ०). **क्षारोदक**–न. खारट पाणी. [क्षार+उदक]

क्षालन—न. धुणें; प्रक्षालन; क्षाळण असें अपभ्रष्ट रूप रूढ आहे. [सं.] **क्षाल(ळ)णें**–उक्रि. प्रक्षाळण करणें; धुणें. **क्षालित**–वि. धुतलेलें. [सं.]

क्षिणणें—अक्रि. क्षीण, अशक्त, खराब होणें; झिजणें. [सं. क्षीण] **क्षित**–वि. खराब झालेलें; ऱ्हास पावलेलें; खालावलेलें.

क्षिती—स्त्री. १ पृथ्वी. 'परब्रह्म क्षितीं उतरलें ।' –तुगा १०३. २ (संगीत) चौदाव्या श्रुतीचें नांव. ३ खराबी; नासाडी; ऱ्हास; उतरती कळा; क्षय. [सं.] **क्षितिज**–न. आकाश जेथें जमीनीस लागलेलें दिसतें ती वर्तुळाकार मर्यादा. **क्षितिजलंबन**–न. खस्थ पदार्थ क्षितिजांत असतां त्याचें असलेलें मोठें लंबन. –सूर्य २५. **क्षितिजसमसूत्र**–वि. क्षितिजाच्या सरळ पातळींत असलेलें; पृथ्वीच्या पृष्ठभागाशीं सपाट असलेलें. **क्षितिज्या**–स्त्री. (ज्यो.) चराशीं जुळणारी युज्यासमांतरवृत्ताची भुजज्या. 'उदयापासुन उन्मंडलापर्यंत पोहोंचेतोवर सूर्यास अहोरात्र वृत्ताचे जे अंश आक्रमावे लागतात त्यांच्या वृत्तावरील (युज्याकर्णीय) भुजज्या.' –भाज्यो ३४. **क्षितीश**–पु. राजा; भूपति. 'न्यायातें पोषी क्षितीशु ।' –ज्ञा १८.१८०४.

क्षिति—स्त्री. (चुकीनें) क्षति; चिंता; फिकीर; पर्वा (क्रि० धरणें; बाळगणें). 'सांडिल्याची क्षिती मागुता । न करी सर्वथा निजबोधें ।' –एभा १०.१८७. क्षति पहा.

क्षिपक—वि. फेकणारा; टाकणारा. [सं. क्षिप्–क्षिपक] **क्षिपण**–न. टाकणें; फेंकणें. [सं.] **क्षिप्त**–वि. १ टाकलेलें; फेकलेलें; प्रक्षिप्त. २ (ल.) शिव्यागाळी, शब्द इ०नीं निर्भर्त्सिला गेलेला; निंदित.

क्षिप्र—वि. वेगयुक्त; जलद; शीघ्र; घाईचा. –क्रिवि. जलदीनें; ताबडतोब. [सं.]

क्षिप्रा—स्त्री १ खीर. २ उज्जनीची शिप्रा नदी. [सं.]

क्षिरापत—स्त्री. (प्र.) खिरापत पहा.

क्षीण—वि. १ क्षयी; अशक्त; दुर्बल. २ नाश पावलेला; नाहींसा झालेला; संपलेला. ३ सडपातळ; बारीक; किरकोळ; कृश; रोडया. [सं. क्षि=क्षय होणें] **०पाप**–वि. ज्याचें पाप नष्ट झालें आहे असा; निष्पाप. **०पुण्य**–वि. ज्याचें पुण्य खर्च झालें आहे, संपलें आहे असा; ज्याचें पुण्य भोगून झालें आहे, क्षय पावलें आहे असा. **०शक्ति**–वि. अशक्त; निःशक्त. **क्षीणायु**–वि. मरणोन्मुख; विनाश जवळ आलेला आहे असा; अल्पायु.

क्षीत—स्त्री. क्षति; क्षिति; खातर; पर्वा; दरकार. (क्रि० धरणें; बाळगणें). [सं. क्षति]

क्षीव—वि. दारू पिऊन उन्मत्त झालेला; झिंगलेला. [सं.]

क्षीर—न. १ दूध. 'नीरक्षीरालिंगनरूपी ज्ञान तुला तें घालोनि:।' –सौभद्र. २ पाणी. ३ झाडांचा पांढरा चीक, रस. ४ –स्त्री. खीर. ५ क्षीरसागर. [सं.] **०कीट**–पु. नासलेल्या दुधांतील कीड. **०नीरन्याय**–पु. एकांत एक पूर्णपणें मिसळून जाणें (दुधांत नीर=पाणी जसें एकरूप होतें तसें) पूर्ण विलीनता. **०नीर विभाग-विवेक**–पु. हंस पक्षी जसा दूधपाण्याच्या मिश्रणांतून दूध निराळें काढतो तसें ख=याखोट्याच्या मिश्रणांतून खरें निवडून काढणें; चांगलें-वाईटांतून चांगलें शोधणें; निवड. **०पथ**–पु. आकाशगंगा. (इं.) मिल्की वे. 'क्षीरपथाचें अवलोकन ज्यानें एकवार केलें आहे तो या विश्वांतील कोणत्याही गोष्टीचा अंत आपणास स्पष्टपणें दिसून आला आहे, असें म्हणण्यास धजणार नाहीं.' –आगर. **०वृक्ष**–पु. ज्यांतून दुधासारखा चीक निघतो असें झाड (वड, रुई, चाफा, उंबर, शेर इ०). **०सागर-सिंधु-समुद्र-अब्धि-अर्णव**–पु. दुधाचा समुद्र (पौराणिक). सप्तसमुद्र पहा. 'क्षीरसिंधु परिसरीं।' –ज्ञा १८.१७५१. 'नातरी क्षीरसमुद्रु।' –ज्ञा १७.२२६. 'परि क्षीराणवी कल्लोळा' –ज्ञा ११.५३५. **०स्फटिक**–पु. गोमेद रत्न. **क्षीरापती**–पु. विष्णुदेव. –शर. **क्षीराब्धिकन्या-तनया-स्त्री**. लक्ष्मी देवी. **क्षीराब्धि. जामात**–पु. विष्णु. **क्षीरोदक**–न. उंची, रेशमी पातळ (बायकांचें). 'शेले, शालू, साडया क्षीरोदक लांब रुंद पाटावें।' –मोसभा ५.८३. **क्षीरोदक पाटोळा**–पु. क्षीरोदक पहा.

क्षीरार्ं—न. खिल्लार. –शर.

क्षुण्ण—वि. १ तुडविलेलें; ठेचलेलें; चुरडलेलें (हात, पाय, दगड इ० नीं). २ रूढ; बराच चोखाळलेला (मार्ग). [सं.]

क्षुत-त्—न. शिंक. (क्रि० येणें). [ध्व.]

क्षुत्—स्त्री. क्षुधा; भूक. [सं.] **०बोध**–पु. तीव्र भूक लागणें; क्षुधेची प्रदीप्तता. **०क्षाम**–वि भुकेला; भुकेनें व्याकुळ झालेले. 'क्षुत्क्षाम स्तनपानें सुतृषित नव्हतां।' –गस्तो १२.

क्षुद्र—न. न्यून; उणेपणा; वैगुण्य; दोष. –वि. लहान (योग्यता, आकार इ० नें); हलकें; क्षुल्लक. 'क्षुद्र मत्स्य-प्राणी-प्राम इ०.' 'जोडा पुसणें, केर काढणें ही क्षुद्रकर्में तुम्हा सारख्यांनीं जातीनें करूं नयेत.' [सं] **०कल्पना**–स्त्री. कमी महत्त्वाची; हलकी कल्पना. तर्क, विचार. **०घंटिका**–स्त्री. घुंगरु; घुंगरांची माळ; घुंगरू लावलेला एक दागिना. 'क्षुद्र घंटिका झलकती।' –वेसीस्व ३.७१. **०दृष्टि**–स्त्री. हलकें, बारीकसारीक दोष पाहण्याची प्रवृत्ति; कोतें मन; अनुदार वृत्ति. –वि. उणेपणा काढणारा; क्षुद्रदृष्टि ठेवणारा; क्षुद्रान्वेषी. **०मेह**–पु. लघवी थोडी होणें; अशी होणारी लघवी. **०रोग**–पु. क्षुल्लक रोग, विकार (यांची २०० पर्यंत संख्या आहे). **क्षुद्रान्वेषण, क्षुद्रान्वेषी**–क्षुद्रदृष्टि पहा. **क्षुद्रक**–क्षुद्र पहा.

क्षुधा—स्त्री. भूक. [सं.] **क्षुधाक्रांत, क्षुधातुर, क्षुधार्त**–वि. फार भुकेला, भुकेनें व्याकुळ झालेला. **क्षुधित**–वि. भुकेला.

क्षुब्ध, क्षुभित—वि. क्षोभ पावलेला; चवताळलेला; रागावलेला विकार झालेला; चेतलेला. (अक्षरशः व ल). [सं. क्षुभ्]

क्षुर—पु. १ वस्तरा. २ गुराच्या (विशेषतः घोडयाच्या) पायाचा खूर. [सं.] **०प्र**–पु. बाण; इषु. 'कामाचे धनुचे क्षुरप्र मनसीं भुवाल्लनेत्रोत्पलें।' –विद्रल रसमंजरी ११८.

क्षुल्लक—न. क्षुद्र पहा. –वि. १ लहान; कमती; अल्प; थोडें. २ (ल.) हलकें; कमी दर्जाचें; कवडी किंमतीचें; क्षुद्र; (किरकोळ, माणूस कृति, काम, बाब). [सं]

क्षेत्र—न. १ शेत. २ तीर्थाची जागा; पवित्र व धार्मिक स्थळ; यात्रेचें, देवतेचें ठिकाण; अयोध्या, गया, काशी इ०. ३ जागा; स्थळ; स्थान; भूमिभाग. ४ (भूमिति) लांबी, रुंदी, उंची यापैकीं मापन करतां येणारा पदार्थ, आकृति. ५ बारा शाळिग्रामांचा संच. ६ ज्यांत आत्मा राहतो असें प्राण्यांचें शरीर; सविकार व सजीव मनुष्यदेह. –गीर १४२. ७ (संतति उत्पत्तीचें स्थल म्हणून) स्त्री; पत्नी. 'जैसि पितृक्षेत्रीं मीं, मत्क्षेत्रींहि तसें चि संतान।' –मोआदि १९.३४. ८ लंघन: कडकडीत उपवास (धार्मिक उपवास मात्र नव्हे). (क्रि० पडणें; होणें; घालणें). ९ चोवीस शाळिग्राम, अकरा बाण, एकवीस नर्मदे गणपती, बारा सूर्यकांत व आठ सुवर्णमुखी देवी इतक्या देवतांचा समूह. १० उत्पतिस्थान. ११ युद्धभूमि; रणांगण. 'तो ना गवसेचि क्षेत्रीं।' –कथा १.७.६९. १२ रेखागणित; भूमिति. १३ नकाशा; आकृति. [सं.] **०गणित**–न. भूमितिशास्त्र. **०ज**–पु. स्वस्त्रीच्या ठायीं स्वत:चा भाऊ किंवा भाऊबंद यांचे पासून झालेला पुत्र; परवीर्यापासून स्वस्त्री(क्षेत्रा)च्या ठायीं उत्पन्न झालेलें अपत्य. नियोगापासून झालेली संतती. प्राचीन काळीं हिंदुधर्मशास्त्रांत असल्या संततीस कायदेशीर मान्यता असे. द्वादशविधपुत्र पहा. **०जीवी**–वि. शेतकरी; शेतीवर उपजीविका करणारा. **०तीर्थ**–न. १ तीर्थक्षेत्र; यात्रेचें ठिकाण. २ असल्या ठिकाणाची यात्रा. **०देव**–पु. तीर्थक्षेत्रांतील देवता. 'अथवा क्षेत्रदेव पादाती। ठाईंठाईं।' –दा १९.५.१८. **०पाल-ळ**–पु. स्थल, ग्राम रक्षक देवता; स्थानिक देवता; ग्रामदेवता. **०फल-ळ**–न. १ (भूमिती) कोणतीहि पातळी अथवा क्षेत्र एखाद्या क्षेत्रपरिमाणानें मोजलें असतां त्या परिमाणाची निष्पन्न होणारी संख्या. २ (ल.) निकाल; परिणाम; फळ (काम, व्यापार, उद्योग यांतील). 'पांच पुतळया दिल्या काय आणि पंचवीस रुपये दिले काय क्षेत्रफळ एकच.' 'आजा मेला नातू झाला क्षेत्रफळ सारखेंच.' **०भूमि**–स्त्री. १ लागवडीची, लागवडीस योग्य अशी जमीन. २ धार्मिक, पवित्र जागा; तीर्थक्षेत्र.

०यात्रा–स्त्री. तीर्थस्नानाची यात्रा, प्रवास. **०राशी**–स्त्री. (भूमिति) कांहीं विशिष्ट आकाराची राशि, संख्या; (भूमितीच्या आकृतीनें दर्शविली जाणारी). **०वास**–पु तीर्थक्षेत्राच्या ठिकाणीं रहिवास, वास्तव्य. **०वासी**–वि. क्षेत्रवास करणारा. **०संन्यास**–पु. एखाद्या पुण्यक्षेत्रीं राहून, हे क्षेत्र सोडून मरेपर्यंत कोठेंहि जावयाचें नाहीं असा केलेला नियम; संन्यास घेऊन क्षेत्रीं राहणें. **०संन्यासी**–वि. क्षेत्रसंन्यास केलेला. **०संस्कार**–पुस्त्री. क्षेत्राचा गर्भाधान; पुंसवन इ० संस्कार; संततिरूप फल उत्पन्न होण्यासाठीं धार्मिक विधि. **०स्थ**–वि. क्षेत्र किंवा पवित्र ठिकाण येथील रहिवासी. **०क्षेत्रज्ञविचार**–पु. स्वतःच्या पिंडाच्या, क्षेत्राच्या किंवा शरीराच्या व मनाच्या व्यापाराचें परीक्षण करून त्यावरून क्षेत्रज्ञरूपी आत्मा कसा निष्पन्न होतो याचें विवेचन करणें. –गीर १४१. **०ज्ञ**–पु. आत्मा, जीवात्मा; आत्मा देहांत बद्ध असतां म्हणजे त्यास क्षेत्रज्ञ म्हणतात.' –गीर १९.७. **क्षेत्राजीव, क्षेत्री**–वि. शेतांत कष्ट करून उपजीविका चालविणारा शेतकरी. **क्षेत्रोपवास**–पु. १ क्षेत्रांत आल्यावर व मुंडन विधि करण्यापूर्वी करावयाचा उपवास. २ (ल.) अन्नपाण्याशिवाय असा कडकडीत उपवास. **क्षेत्रोपाध्याय**–पु. क्षेत्राच्या ठिकाणचा पंडया; याकडून क्षेत्रांतील सर्व धार्मिक विधि करून घेतात.

क्षेत्री—पु क्षत्रिय पहा. 'आम्ही वीर क्षेत्री' [क्षत्रिय अप.]

क्षेप—पु १ टाकणें; फेकणें; खर्च करणें; घालविणें. 'काल–धन–आयुष्य–वृत्ति–कर्म–धैर्य–क्षेप.' २ दूर पाठविणें. ३ खगोल अक्षांश. ४ क्षेपक; ग्रहादिकांचें सिद्ध झालेलें गणित स्पष्ट व्हावें इत्यार्थ त्यांत मिळवावा किंवा उणा करावा म्हणून सांगितलेला अंकराशि. ५ कोणेक ग्रंथकाराचे ग्रंथांत इतरानें घातलेले श्लोक, वाक्य इ०; प्रक्षिप्त मजकूर; क्षेपक. ६ एकच प्रसंग, वेळ, एकच गोष्ट, प्रसंग, क्रिया इ०. याला लागलेला सबंध काळ; अवकाश. 'देतां क्षेपें, घेतां क्षेपें, जेवतां क्षेपीं.' **क्षेप** पहा. ७ विलंब. ८ अनादर [सं.] **०निक्षेप**–क्रिवि. न चुकतां; खात्रीनें; निश्चयानें; टाकोटाक; खास 'तों भाऊसाहेब क्षेपनिक्षेप आले.' –भाब ८८. 'त्यास क्षेपनिक्षेप आज्ञा करून इकडे रवाना करावें.' –पेद १.५५. **०पात**–पु. (ज्यो.) दोन ग्रहांच्या कक्षा ज्या एका बिंदूंतून एकमेकांस छेदून जातात तो पात; ग्रहकक्षेचा आरोह छेदन बिंदु. **०वृत्त**–न. ग्रहाची कक्षा; विमंडल. **०सूत्र**–न. खगोल रेखांशवृत्त. **क्षेपक**–पु क्षेप अर्थ ४,५ पहा. –वि. टाकणारा; क्षेपणकर्ता. [सं.] **क्षेपण**–न क्षेप अर्थ १, २ पहा. **क्षेपणी**–स्त्री. (काव्य) वल्ही; क्षपणी. **क्षेपणें**–उक्रि. १ टाकणें; फेकणें. २ दूर पाठविणें. **क्षेपा**–वि. १ क्षेपक; फेंकणारा; टाकणारा. २ पाठविणारा.

क्षेम—न. १ कल्याण; अभ्युदय; सुख; हित. २ स्नेहालिंगन; भेट. (क्रि० घेणें; ओढणें). 'येरी म्हणे दमयंतिबे। उठी क्षेम देई वा इये।' –कथा १.१०.५५. –वि. सुखी; हितकर; कल्याणप्रद. [सं.] **क्षेमंकर**–वि सुखकर; उत्कर्षकारक; कल्याणदायक. **क्षेमालिंगन**–न. मित्रादिकांस प्रीतीनें मारलेली मिठी; स्नेहालिंगन; क्षेम अर्थ २ पहा. (क्रि० घेणें). **क्षेमी**–वि. आनंदी. 'तो केवि मार्गी इयें। क्षेमी होए।' –ऋ ३१७.

क्षेवणें—सक्रि. (महानु.) लावणें; रेखणें. 'वरि टिळा क्षेवणिला चोखटु।' –ऋ ६४. [सं क्षेपण?]

क्षेवी—अ. (महानु.) क्षणीं; लागलेंच. 'प्रथम ज्ञान होत क्षेवी। ईश्वर मायबाप गोंसावी।' –ज्ञाप्र ६६. [सं. क्षण; क्षेप]

क्षोणी—स्त्री. १ पृथ्वी. 'उघडवी देशियेचिया क्षोणी।' –ज्ञा १२.१२. २ संख्या. **०प–पति–पु.** राजा; भूपति. 'म्हणे हंस क्षोणीपतिस तुज कोणी सम नसे।' –नल. [सं.]

क्षोद—पु. १ चूर्ण; भुकटी; पूड. २ विचार; चर्चा. [सं.] **०क्षम**–वि. १ भुकटी करण्यासारखें. २ (ल.) वादविवाद, चर्चा, विचारविनिमय करण्यासारखें; विचारक्षम.

क्षोभ—पु. १ राग; क्रोध; अतिशय संताप. 'देवताक्षोभ'. २ खळबळ; व्यग्रता; प्रक्षोभ; मनाची चलबिचल; गडबड; त्रेधा. 'ऐसा ज्या सुखाचा आरंभु। दावी काठिण्याचा क्षोभु।' –ज्ञा १८.७८८; –ज्ञा २.३९. ३ (महानु) अनुराग; आवडी. –शिशु ५७४. ४ हर्ष; संतोष (सामा.) कोणताहि विकार. [स. क्षुभ्–रागावणें] **०क**–वि. विकारोत्पादक; संताप आणणारा; खळबळ माजविणारा. **क्षोभणें**–क्रि. १ रागावणें; क्षुब्ध होणें; चेतणें. २ अंतःकरणाची चलबिचल होणें; अस्थिर होणें. 'तरी तेथींचेनि अपरितोखें। क्षोभावें ना।' –ज्ञा २.२६९. ३ (महानु.) लुब्ध होणें; विकारवश होणें. 'क्षोभे अनंगू जिये।'. ४ (महानु.) मोहवश होणें. 'क्षोभे भूपति सर्वथा सकलही ताटस्थ्य सर्वाजना।' –गस्तो ७३.८३. **क्षोभना**–स्त्री. स्फुरण. 'जैं ज्ञानाची नसे क्षोभना।' –अमृ ७.१. **क्षोभिणी**–स्त्री. (संगीत) बाविसाव्या श्रुतीचें नांव. **क्षोभित**–वि. क्षुब्ध पहा. **क्षोभ्य**–वि. रागावण्याजोगा; क्षुब्ध होण्याचेतण्यासारखा

क्षौद्र—न. मध. 'क्षौद्र लोणी मिश्र करून शिंगरास पाजावें.' –अश्वप १.१६७. [सं.]

क्षौर—पु. १ हजामत (डोक्याची); श्मश्रु. २ पैतृककर्मांत किंवा तीर्थाच्या ठिकाणीं मिशासकट केलेली सर्व हजामत. [सं. क्षुर्–कापणें]

क्ष्मा—स्त्री. १ पृथ्वी. २ क्षमा. [सं.] **०पति**–पु. राजा; क्षोणीपति.

क्ष्वेड—न. विष. 'कंठीं नीळमणीसमान बरवें तें क्ष्वेड साजें जया।' –निमा १ (सांबशिव स्तुतिध्यान). [सं.]

ज्ञ

ज्ञ—मराठी व्यंजन मालेंतील छत्तिसावें अक्षर. हें ज् आणि ञ् या दोन व्यंजनांच्या संयोगानें बनलें आहे. अक्षरविकासः—याच्या तीन अवस्था; पहिली क्षत्रपवंशी राजा रुद्रदामन् याच्या गिरनार शिलालेखांत (इ. स. २ रें शतक). दुसरी पहिलीचें रूपांतर; तिसरी अबूचा परमार राजा धारावर्ष याच्या वेळच्या (इ. स. १२०८) ओरिआ लेखांत आढळते. –पु. बुधग्रह. –वि. जाणणारा; तज्ज्ञ; (समासांत) शास्त्रज्ञ; रसज्ञ; सर्वज्ञ; इ०.

ज्ञपित, ज्ञप्त—वि. जाणलेलें; प्रसिद्ध केलेलें; शिकविलेलें. [सं. ज्ञा=जाणणें] **ज्ञप्ति**-स्त्री. १ बुद्धि; ज्ञान २ माहीत असणें; जाणीव. 'म्हणितलें या ज्ञप्ती। अर्वाचीना।' –ज्ञा १३. ४०. ३ ब्रह्मज्ञानामुळें झालेली जागृति; अंतःकरणांतील स्फुरण. –माज्ञा १८.१२०४.

ज्ञात—स्त्री. जात; ज्ञाति पहा.

ज्ञात—वि समजलेला; जाणलेला; ठाऊक असलेला. [सं. ज्ञा. जाणणें] **०सिद्धांत**–वि. शास्त्रार्थी पूर्ण परिचित असलेला. **ज्ञातव्य**–वि. जाणण्यास, समजण्यास, ठाऊक असण्यास योग्य, शक्य; जाणीव होण्याजोगें. 'तैसें ज्ञानें जेणें। करितां ज्ञातव्यातें पाहाणें।' –ज्ञा १८.५३३. ज्ञेय पहा. **ज्ञाता**–वि. १ जाणणारा; समजणारा; माहिती असलेला; तज्ज्ञ. २ शहाणा; विद्वान्; सुज्ञ; ज्ञानी. [सं. ज्ञा=जाणणें] **ज्ञातृत्व**–न. १ ज्ञान; वृत्त; माहिती. २ बुद्धि; धारणाशक्ति. 'विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धी।' –दा १९.४.२०.

ज्ञाति—स्त्री. १ जातः वर्ग; प्रकार. २ गोत्रज; बांधव. 'पार्थ म्हणे श्री धर्मावरि धरितिल जे असिप्रति ज्ञाति।' –मोभीष्म १०.१०.६. ३ जाति; धर्मकर्माप्रमाणें पडलेला भेद. 'ब्राह्मण-वैश्य ज्ञाति.' –वि. जातिविषयीं–संबंधीं. **०मेहेत्रे**–पुअव. ज्ञातीचे पुढारी.

ज्ञान—न. १ बुद्धि; विषयांचें आकलन करण्याचें सामर्थ्य २ मनोव्यापाराचा विषय, शास्त्र ३ बातमी; माहिती. ४ विषय ग्रहणाचा बुद्धीवर झालेला संस्कार; मनावरचा ठसा, समजूत. ५ ब्रह्मज्ञान; सृष्टींत अनेकप्रकारचे जे अनेक विनाशी पदार्थ आहेत त्या सर्वांत एकच अविनाशी परमेश्वर भरून राहिला आहे असें जाणणें; ब्रह्मात्मैक्यज्ञान. –गीर ७१३. अध्यात्मविद्या. [सं. ज्ञा=जाणणें] **०कमळ**–न. १ एक रांगोळी काढण्याचा प्रकार. २ (योग) शरीराच्या ठिकाणीं कल्पिलेल्या आठ कमळांपैकीं प्रत्येक. **०कळा**–स्त्री. बुद्धिवैभव; बुद्धिप्रभाव. 'कौशल्य ज्ञानकळा परम।' २ शहाणपणाचा प्रकाश; बुद्धीची, जाणिवेची भूमिका; जाणण्याची कला. 'आंगीं ज्ञानकळा आली म्हणजे दुराचार घडत नाहीं.' ३ जाणतीकळा पहा. **०कळेपार**–वि. मनुष्याच्या बुद्धीच्या आटोक्याच्या बाहेर; बुद्धीला अगम्य. **०कांड**–न. त्रिकांड वेदांतील आत्मज्ञानाचें प्रतिपादन केलेला भाग; आरण्यकें व उपनिषदें (यांत यज्ञयागादि कर्म गौण व ब्रह्मज्ञानच काय तें श्रेष्ठ असतें). –गीर २८७. याच्या उलट कर्मकांड. **०कोश**–पु. १ ज्ञानाचा संग्रह, साठा. २ विविध विषयाची माहिती ज्यांत दिली असते असा कोश; (इं.) एन्सायक्लोपीडिया. ३ मराठींतील असा ग्रंथ. **०गुरु**–पु. १ ज्ञान देणारा, शिकविणारा शिक्षक. २ महावाक्योपदेशकरून ब्रह्म प्रत्ययास आणून देणारा, मोक्षगुरु. **०घन**–वि. परिपूर्ण ज्ञानस्वरूप असलेला; ज्ञानानें पूर्णपणें भरलेला. 'महाराज राज सद्गुरु ज्ञानघना' **०चक्षु-ष्टि**–पु. बाह्येंद्रियांच्या विषयापलीकडील आत्मस्वरूप जाणण्याचें ज्ञान, बुद्धि, मनःचक्षु. –वि. एतद्विशिष्ट (मनुष्य). **०जनक**–वि. ज्ञान उत्पन्न करणारें. **०दाता**–पु. ज्ञानगुरु. –वि ज्ञान दान करणारा. **०दिवा-दीप**–पु. बुद्धिरूपी दिवा. 'अंतरिचा ज्ञानदिवा मालवूं नकोरे।' **०निष्ठा**–स्त्री. ज्ञानोत्तर सर्व कर्मे सोडून देऊन ज्ञानांतच गढून जाण्याची सिद्धावस्थेतील स्थिति –गीर ४१२. **०परंपरा**–स्त्री. १ एकामागून एक येणाऱ्या विचारांमुळें, माहितीमुळें झालेलें ज्ञान. २ वाढतें ज्ञान. **०मठ-मठी**–पुस्त्री. १ अध्यात्म ज्ञानाचा अथवा ध्यानयोगाचा अभ्यास करण्यासाठीं बांधलेला आश्रम; एकांतस्थान. २ (ल.) तुरुंग; कारागृह. **ज्ञानमठांत बसणें**–१ सांसारिक बंधनांतून पराङ्मुख होऊन आध्यात्मिक चिंतनांत काळ घालविणें. २ स्वतःच्या शहाणपणाबद्दल घमेंड, गर्व बाळगणें. **०मार्ग**–पु. ईश्वर प्राप्तीचा वेदांचा शास्त्रोक्त रास्त, मार्ग; अव्यक्तोपासनेची साधनावस्थेतील स्थिति दाखविणारी रीत. –गीर ४१२. **०मार्गी**–वि. ज्ञानमार्गाचा अवलंब करणारा; ब्रह्मज्ञानाच्या मार्गे असणारा. **०माला(ळ-ळा)**–स्त्री. १ स्वाध्यायास प्रारंभ करतांना शिष्याच्या, पुत्राच्या गळ्यांत गुरूकडून किंवा पित्याकडून घातली जाणारी माळ. २ ही माळ घालण्याचा संस्कार. ३ (ल) जगाचें ज्ञान; व्यवहारज्ञान. **०यज्ञ**–पु. ज्ञानप्राप्ति; परमेश्वर स्वरूपाचें ज्ञान करून घेऊन त्या ज्ञानाला अनुरूप अशा आचरणानें परमेश्वराची प्राप्ति करून घ्यावयाचा मार्ग, साधन. –गीर ६८०. **०रत्नाची मांदुस**–स्त्री. ज्ञानी, शहाणा माणूस, याबद्दल गौरवानें म्हणतात. [ज्ञान+मांदूस=पेटी] **०लक्षण**–न. १ ज्ञानसाधनाचे चिन्ह; खूण. २ बुद्धिलक्षण. **०वल्ली**–स्त्री. (घरेनें)

भांग. **०वाद**–पु. १ (तत्त्वज्ञान) ज्ञानानेंच मोक्ष प्राप्ती होते, मुक्ति मिळते हें तत्त्व; व त्या तत्त्वाचें समर्थन. २ (इं.) मॉस्टिसिझम्. **०वान्**–वि. १ शाहाणा; ज्ञानी. २ अध्यात्मज्ञान असणारा; ब्रह्मज्ञानी. **०वायु**–पु एक वातरोग. हा झाला असतां माणूस गहन विषयावर विद्वत्तापूर्ण बडबड करीत सुटतो. **०विग्रह**–पु. ज्ञानरूपी शरीर असलेली (देवता). **०विज्ञान**–न. १ आध्यात्मिक ज्ञान आणि आधिभौतिक किंवा शास्त्रीय ज्ञान. २ अध्ययनापासून मिळालेलें ज्ञान आणि अनुभवजन्य किंवा प्रत्यक्ष ज्ञान. ३ वाङ्मय आणि शास्त्र. **०शक्ति**–स्त्री. १ ज्ञानेंद्रिय पंचक. २ बुद्धिसामर्थ्य. **०सूर्य, ज्ञानार्क**–पु ज्ञानरूपी सूर्य. 'ज्ञानसूर्य उगवला देहामाजी।' **०स्पृश्**–वि. ज्ञानाला स्पर्श झालेलें; जाणलेलें; समजलेलें. **ज्ञानांजन**–न. ज्ञानरूपी अंजन, काजळ; ज्ञानोपदेश 'नयनीं लेइलें ज्ञानांजन.' **ज्ञानाभ्यास**–पु. अध्यात्मज्ञानाचें चिंतन; ब्रह्मज्ञानाचा अभ्यास, चिंतनमनन **ज्ञानाभ्यासी**–वि. सदोदित ब्रह्मचिंतन करणारा. याच्या उलट कर्मसंगी. **ज्ञानार्थ**–पु ज्ञानरूप, ज्ञानाचा विषय. 'हे असो आतां वाजटा। तो ज्ञानार्थ करूनि गोमटा।' –ज्ञा १४.२६. [ज्ञान+अर्थ] **ज्ञानाज्ञान**–न. पारलौकिक ज्ञान व (अन्यथा) ऐहिक विषयांचें ज्ञान. –ज्ञा १५.५०३. [ज्ञान+अज्ञान] **ज्ञानी–ज्ञानिया**–वि. १ ज्ञाता; शाहणा, जाणणारा; विद्वान; सुज्ञ. २ आध्यात्मिक, पारमार्थिक ज्ञान असणारा; ब्रह्मज्ञानी. 'तिज अथार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा।' –ज्ञा ७.१०९; एभा ११.२४९. [सं. ज्ञानिन्] **ज्ञानेंद्रिय**–न. ज्यांच्याद्वारें वस्तूंचें ज्ञान होतें अशीं त्वचा, नेत्र, जिव्हा, कान, नाक हीं पांच इंद्रियें प्रत्येकीं याच्या उलट कर्मेंद्रिय. या पांचांच्या समूहास ज्ञानेंद्रियपंचक म्हणतात. [सं.] **ज्ञानोपदेश**–पु. अध्यात्मज्ञान; आत्मज्ञान याचा उपदेश, बोध. (क्रि० करणें; देणें). [सं.] **ज्ञानोपासना**–स्त्री. उपासनेचा तिसरा प्रकार. वेद व शास्त्रें यांच्यापासून ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न, मार्ग, (कर्मोपासना व आत्मोपासना हे उपासनेचे पहिले दोन प्रकार आहेत). [सं.]

ज्ञापक—वि. ज्ञान करून देणारा; जाणविणारा; माहिती देणारा; ओळख करून देणारा (लेख, शास्त्र, चिन्ह). [सं.] **०निमित्त**–न. (तर्क) निदर्शककारण; दर्शविणारें, माहिती करून देणारें कारण) (प्रकाश, नाद). याच्या उलट कारकनिमित्त.

ज्ञापन—न. माहिती करून देणें; दाखविणें; शिकविणें. [सं.]

ज्ञापनीय—वि. माहिती करून देण्यास, दाखविण्यास योग्य, शक्य.

ज्ञापविणें—सक्रि. (काव्य) १ माहिती करून देणें; स्पष्ट करणें; जाणविणें; सुचविणें; सांगणें. २ परिचय करून देणें; शिकविणें. [सं. शा–ज्ञाप्]

ज्ञापित—वि. १ जाणविलेला; स्पष्ट, उघड केलेला. २ परिचित; माहिती करून दिलेला; शिकविलेला. ३ सुचविलेला; दर्शित. [सं.]

ज्ञाप्य—वि. जाणावयाचा; माहिती करून देण्यासारखा; शिकविण्यासारखा; सांगण्याजोगा; ज्ञापनीय पहा. [सं.]

ज्ञेय—वि. माहीत होण्यासारखा; जाणण्याचा (विषय); समजण्यास, जाणण्यास योग्य. 'मनाचें मनपण गेलें। जेथ बोलाचें बोलपण ठेलें। जयामाजि सांपडलें। ज्ञेय दिसे।' –ज्ञा ४.१६३; –ज्ञा १८.५२९. 'ह्या अनुपम शब्दकोशांतील प्रत्येक शब्द ज्ञेय आहे. एतज्ज्ञानानें जो ज्ञाता तोच सुज्ञ.' –शास्त्रीकोश. **०वाद**–पु. १ (तत्त्वज्ञान) आध्यात्मिक गोष्टींचा उलगडा एका गूढ तत्त्वज्ञानानें करणाऱ्या एका पाखंडी पंथाचें मत. (इं.) ग्नॉस्टिसिझम्. २ शास्त्रीय ज्ञान हेंच ज्ञेय असें मत. [सं.]

समाप्त.